सामवेदाचा सुबोध अनुवाद

(उत्तरसंहिता) उत्तरार्चिकः ।

अथ प्रथमोऽध्यायः ।

अथ प्रथमप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ १ ॥

[१]

(१-२३) १ असितः काश्यपो देवलो वा; २ कश्यपो मारीचः; ३ शतं वैखानसः; ४, २१ भरद्वाजो बार्हस्पत्यः। ५, ७ विश्वामित्रो गाथिनः; ५ जमदग्निर्वा; ६ इरिम्बिठिः काण्वः; ८ अमहीयुरांगिरसः; ९ सप्तर्षयः (१ भरद्वाजो बार्हस्पत्यः; २ कश्यपो मारीचः; ३ गोतमो राहूगणः; ४ अत्रिर्भौमः, ५ विश्वामित्रो गाथिनः; ६ जमदग्निर्भार्गवः; ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः); १० उशना काव्यः; ११ वसिष्ठो मैत्रावरुणिः; १२ वामदेवो गौतमः; १३ नोधा गौतमः; १४ कलिः प्रागाथः; १५ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; १६ गौरवीतिः शाक्त्यः, १७ अग्निश्चाक्षुषः; १८ अन्धीगुः श्यावाश्विः; १९ कविर्भार्गवः; २० शंयुर्बार्हस्पत्यः; (तृणपाणिः) २२ सोभरिः काण्वः; २३ नृमेधः आंगिरसः ॥ १-६, ८-१०, १५-१९ पवमानः सोमः; ४, २०, २१ अग्निः; ५ मित्रावरुणौ; ७ इन्द्राग्नी; ६, ११-१४, २२-२३ इन्द्रः ॥ १-८, १२ (१-२), १५, १८ (२-३), २१ गायत्री; ९, ११, १३, १४, २० प्रगाथः = (विषमा बृहती, समा सतो बृहती); १० त्रिष्टुप्; १२ (३) सोदनिचृत्; १६, २२ काकुभः प्रगाथः = (विषमा ककुप् समा सतो बृहती) १७ उष्णिक्; १८ (१) अनुष्टुप्; १९ जगती; २३ (१) ककुप्, (२) उष्णिक् (३) पुर उष्णिक् ॥

६५१ उपास्मै गायता नरः पवमानायेन्दवे । अभि देवाँ इयक्षते ॥ १ ॥ (ऋ. ९।११।१)

६५२ अभि ते मधुना पयोथर्वाणो अशिश्रयुः । देवं देवाय देवयु ॥ २ ॥ (ऋ. ९।११।२)

[१] प्रथमः खण्डः ।

[६५१] हे (नरः) ऋत्विज हो ! (देवान् अभि इयक्षते) देवांसाठीं हवन होण्याची इच्छा करणाऱ्या (पवमानाय अस्मै इन्दवे) शुद्ध होणाऱ्या या सोमाची (उप गायत) तुम्ही स्तुति करा. ॥ १ ॥

सोमरस गाळला व तो तयार झाला म्हणजे त्याचें देवांसाठीं हवन केलें जातें. तो गाळला जात असतां यज्ञ करणारे त्या सोमाचीं स्तोत्रें म्हणतात व त्यांचें गायन करतात.

[६५२] (ते देवयु देवं) तुम्या देवांना दिल्या जाणाऱ्या दिव्य रसाला (देवाय) इन्द्रदेवासाठीं (मधुना पयः) मधुर दुधाबरोबर (अथर्वाणः) अथर्ववेदी ऋषिनीं (अभि-अशिश्रयुः) मिसळलें. ॥ २ ॥

दिव्य सोमरस देवांना देण्यासाठीं गाईच्या मधुर दुधाबरोबर मिसळून ऋषिलोक तयार करतात. अथर्ववेदी याजक सोमरसाला दुधाबरोबर मिसळतात.

६५३ स नः पवस्व शं गवे शं जनाय शमर्वते । शꣳ राजन्नोषधीभ्यः ॥ ३ ॥ १ (ती) ॥
(ऋ. ९।११।३)

६५४ दविद्युतत्या रुचा परिष्टोभन्त्या कृपा । सोमाः शुक्रा गवाशिरः ॥ १ ॥ (ऋ. ९।६४।२८)

६५५ हिन्वानो हेतृभिर्हित आ वाजं वाज्यक्रमीत् । सीदन्तो वनुषो यथा ॥२॥ (ऋ. ९।६४।२९)

६५६ ऋधक्सोम स्वस्तये संजग्मानो दिवा कवे । पवस्व सूर्यो दृशे ॥ ३ ॥ २ (यि) ॥
(ऋ. ९।६४।३०)

६५७ पवमानस्य ते कवे वाजिन्त्सर्गा असृक्षत । अर्वन्तो न श्रवस्यवः ॥ १ ॥ (ऋ. ९।६६।१०)

---

[६५३] हे (राजन्) तेजस्वी सोमा ! (सः) तो तूं (नः गवे शं) आमच्या गाईंचें कल्याण कर, (जनाय शं) पुत्रपौत्रांचें कल्याण कर, (अर्वते शं) आमच्या घोड्यांचें कल्याण कर (ओषधिभ्यः शं) आणि औषधींचें कल्याण कर व (पवस्व) गाळला जाऊन शुद्ध हो. ॥ ३ ॥

सोम गाय, घोडे, पुत्रपौत्र व औषधी यांचें हित करो व तो गाळून शुद्ध होवो.

[३५४] (दविद्युतत्या रुचा) तेजस्वी कान्तीनें युक्त व (परिष्टोभन्त्या कृपा) शब्द करणाऱ्या धारेनें (शुक्राः सोमाः) स्वच्छ सोमरस (गवाशिरः) गाईच्या दुधामध्यें मिसळून तयार झाले आहेत. ॥ १ ॥

सोमरस चमकत आहे व धारा प्रवाहानें शब्द करीत गाळला गेल्यानंतर त्यांत गाईचें दूध मिसळून तो तयार केला आहे.

[६५५] (वाजी) बलवर्धक सोमरस (हेतृभिः हिन्वानः) स्तोत्यांकडून स्तविला जात आहे. (हितः) तो हित करणारा (वाजं अक्रमीत्) यज्ञांमध्यें चालून येत आहे, (यथा) ज्याप्रमाणें (वनुषः सीदन्तः) युद्ध करणारे वीर युद्धभूमिमध्यें आक्रमण करीत असतात. ॥ २ ॥

सोमरसाचीं स्तोत्रें गाईलीं जातात व रस काढला जात असतो. नंतर तो सोम सर्वांना हितकर होऊन यज्ञांमध्यें तसा प्रविष्ट होतो, ज्याप्रमाणें योद्धे शत्रूवर आक्रमण करण्यासाठीं युद्धभूमिमध्यें प्रविष्ट होतात. सोम प्यात्यावर उत्साह वाढतो व त्यामुळें वीरांची वीरता वाढते. ते वीर शत्रूवर आक्रमण करून यशस्वी होतात.

[६५६] हे (कवे सोम) ज्ञानी सोमा ! तूं (सूर्यः) सूर्याप्रमाणें (ऋधक्) वर चढून (संजग्मानः) तेजानें युक्त होऊन (स्वस्तये दृशे) सर्वांचें कल्याण व्हावें यासाठीं (दिवा) दिव्य प्रकाशानें युक्त होऊन (पवस्व) गाळला जा.॥ ३ ॥

सोमरसानें ज्ञानयुक्त उत्साह वाढतो. सूर्य जसा वर चढला म्हणजे तेजस्वी होतो, त्याप्रमाणें सोमरसाची चमक वाढत जाते. सोमरसानें सर्वांचें कल्याण होतें, तेज वाढतें व उत्साह वाढतो.

[६५७] हे (कवे वाजिन्) ज्ञानी व बलवर्धक सोमा ! (पवमानस्य ते) गाळला जाणाऱ्या तुझ्या (श्रवस्यवः सर्गाः) यशस्वी धारा (असृक्षत) पात्रांत पडत आहेत, (अर्वन्तः न) घोडे जसे अश्वशालेमधून बाहेर पडतात. ॥१॥

सोमरस ज्ञान व बल वाढवतो. गाळला जात असतांना त्याच्या धारा गाळणींमधून खालच्या भांड्यांत पडतात, ज्याप्रमाणें घोडे अश्वशालेमधून बाहेत पडतात. घोडे जसे वेगानें बाहेर पडतात, तशा सोमाच्या धारा वरच्या गाळणींमधून खालच्या पात्रांत वेगानें पडतात.

६५८ अच्छा कोशं मधुश्चुतमसृग्रं वारे अव्यये । अवावशन्त धीतयः ॥ २ ॥ (ऋ. ९।६६।११)

६५९ अच्छा समुद्रमिन्दवोऽस्तं गावो न धेनवः । अग्मन्नृतस्य योनिमा ॥ ३ ॥ ३ (कौ) ॥ (ऋ. ९।६६।१२)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

६६० अग्न आ याहि वीतये गृणानो हव्यदातये । नि होता सत्सि बर्हिषि ॥१॥ (ऋ ६।१६।१०)

६६१ तं त्वा समिद्भिरङ्गिरो घृतेन वर्धयामसि । बृहच्छोचा यविष्ठ्य ॥ २ ॥ (ऋ. ६।१६।११)

६६२ स नः पृथु श्रवाय्यमच्छा देव विवाससि । बृहदग्ने सुवीर्यम् ॥ ३ ॥ ४ ॥(ऋ. ६।१६।१२)

६६३ आ नो मित्रावरुणा घृतैर्गव्यूतिमुक्षतम् । मध्वा रजांसि सुक्रतू ॥ १ ॥ (ऋ. ३।६२।१६)

---

[६५८] (मधुश्चुतं कोशं अच्छा) मधुर रस ज्यांत भरला जातो त्या द्रोण कलशामध्यें (अव्यये वारे) मेंढीच्या केंसांच्या गाळणींमधून आम्ही सोमरस (असृग्रं) गाळीत आहों. (धीतयः) आमच्या अंगुली (अवावशन्त) पुनःपुनः दाबून रस काढण्याची इच्छा करीत आहेत. ॥ २ ॥

वर मेंढीच्या केंसांची गाळणी आहे, तीमधून रस गाळला जात आहे व तो खालच्या कलशामध्यें पडत आहे. आमच्या अंगूली सोमाला दाबून रस काढण्याचा प्रयत्न करीत आहेत.

[६५९] (इन्दवः) सोमरस (समुद्रं कलशं अच्छ) जलयुक्त कलशामध्यें सरळ जात आहेत, (न) ज्याप्रमाणें (धेनवः अस्तं) गाई आपल्या घरीं म्हणजे (ऋतस्य योनिं) यज्ञाच्या स्थानामध्यें (आ अग्मन्) जातात. ॥ ३ ॥

सोमरस पाणी असलेल्या कलशामध्यें गाळले जातात. ते सोमरसाचे प्रवाह कलशामध्यें त्या वेगानें जातात, जशा गाई आपल्या स्थानामध्यें जातात.

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[६६०] हे (अग्ने) अग्निदेवा ! तूं (गृणानः) स्तुति केल्यानंतर (वीतये) हवीर्द्रव्यांचें भक्षण करण्यासाठीं व (हव्य-दातये) हवि देवतांना पोंचवण्यासाठीं (आ याहि) ये. आमच्या यज्ञामध्यें (होता) देवांना बोलवणारा होऊन (बर्हिषि नि षत्सि) आसनावर विराजमान् हो. ॥ १ ॥

[६६१] हे (अंगिरः) सुन्दर अग्ने ! (तं त्वा) त्या तुला (समिद्भिः) समिधांनीं व (घृतेन) तुपानें (वर्धयामसि) आम्ही प्रज्वलित करीत आहों. हे (यविष्ठ्य) तरुण अग्ने ! (बृहत् शोच) तूं अधिक प्रकाशित हो. ॥२॥

[६६२] हे (देव) तेजस्वी अग्निदेवा ! (सः) तो तूं (पृथु श्रवाय्यं) पुष्कळ यशस्वी (बृहत् सुवीर्यं) मोठें पराक्रम करणारें सामर्थ्य (नः) आम्हांला (अच्छ विवाससि) सरळपणानें प्राप्त होईल असें कर. ॥ ३ ॥

[६६३] हे (सुक्रतू) उत्तम कामें करणाऱ्या (मित्रा-वरुणा) मित्र व वरुण देवांनों ! (नः गव्यूतिं) आमच्या गाईंच्या स्थानाला (घृतैः आ उक्षतं) घृतानें सिंचित करा व (मध्वा) मधुर रसानें (रजांसि) रजोलोकांना - परलोकांतील स्थानांना उत्तम रीतिनें सिंचित करा. ॥ १ ॥

आम्हांला गाईंपासून भरपूर तूप मिळो व सर्व ठिकाणीं मधुर अन्नरस प्राप्त होवो.

*

६६४ उरुश२ंसा नमोवृधा मह्ना दक्षस्य राजथः । द्राघिष्ठाभिः शुचिव्रता ॥२॥ (ऋ. ३।६२।१७)

६६५ गृणाना जमदग्निना योनावृतस्य सीदतम् । पात२ं सोममृतावृधा ॥ ३ ॥ ५ (यि) ॥ (ऋ. ३।६२।१८)

६६६ आ याहि सुषुमा हि त इन्द्र सोमं पिबा इमम् । एदं बर्हिः सदो मम ॥१॥ (ऋ. ८।१७।१)

६६७ आ त्वा ब्रह्मयुजा हरी वहतामिन्द्र केशिना । उप ब्रह्माणि नः शृणु ॥ २ ॥ (ऋ. ८।१७।२)

६६८ ब्रह्माणस्त्वा युजा वय२ं सोमपामिन्द्र सोमिनः । सुतावन्तो हवामहे ॥ ३ ॥ ६ (फौ) ॥ (ऋ. ८।१७।३)

६६९ इन्द्राग्नी आ गत२ं सुतं गीर्भिर्नभो वरेण्यम् । अस्य पातं धियेषिता ॥ १ ॥ (ऋ. ३।१२।१)

६७० इन्द्राग्नी जरितुः सचा यज्ञो जिगाति चेतनः । अया पातमिम२ं सुतम् ॥२॥ (ऋ. ३।१२।२)

---

[६६४] हे (शुचि-व्रता) शुद्ध कर्म करणाऱ्या मित्र व वरुणांनो ! (उरुशंसा) पुष्कळ प्रशंसित व (नमो-वृधा) हविष्यान्नानें वाढणारे तुम्ही (द्राघिष्ठाभिः) मोठ्या स्तुतिनीं प्रशंसित होऊन (दक्षस्य मह्ना राजथः) आपल्या बलाच्या माहात्म्यानें विराजित होत आहां. ॥ २ ॥

[६६५] हे मित्र वरुणांनो ! (जमदग्निना) जमदग्नि ऋषिनें (गृणाना) स्तुति केलेले तुम्ही दोघे (ऋतस्य योनौ) यज्ञाच्या ठिकाणीं (सीदतं) बसा व (ऋता-वृधा) यज्ञाला वाढवणारे तुम्ही दोघे (सोमं पातं) सोम-रस प्या. ॥ ३ ॥

[६६६] हे (इन्द्र) इन्द्रा ! (आ याहि) ये, आम्ही (ते) तुझ्यासाठीं (सुषुमा हि) सोमरस काढला आहे. (इमं सोमं पिब) हा सोमरस पी. (मम इदं बर्हिः आ सदः) माझ्या या आसनावर बैस. ॥ १ ॥

[६६७] हे (इन्द्र) इन्द्रा ! (ब्रह्म-युजा) मंत्र बोलतांच रथाशीं जोडले जाणारे (केशिनौ हरी) केंसाळ दोन घोडे (त्वा आवहतां) तुला घेऊन येवोत. येथें येऊन तूं (नः ब्रह्माणि) आमचीं स्तोत्रें (उप शृणु) जवळून ऐक. ॥ २ ॥

[६६८] हे (इन्द्र) इन्द्रा ! (सोमिनः सुतावन्तः वयं) सोमयज्ञ करणारे व सोमरस तयार करणारे आम्ही (ब्रह्माणः) ज्ञानी याजक (सोमपां त्वा) सोमरस पिणाऱ्या तुला (युजा हवामहे) योग्य स्तोत्रानें बोलावित आहों. ॥ ३ ॥

[६६९] हे (इन्द्राग्नी) इन्द्रा व अग्ने ! (गीर्भिः) स्तोत्रांनीं स्तविलेला (नभः आगतं) आकाशांतून - पर्वतांच्या उंच शिखरावरून आलेला हा (वरेण्यं सुतं) श्रेष्ठ सोमरस आहे. (धिया इषिता) बुद्धिनें प्रेरित केलेले तुम्ही (अस्य पातं) याचें पान करा. ॥ १ ॥

सोमवल्ली पर्वताच्या उंच शिखरावरून आणली जाते म्हणून तिला " नभः आगतं " आकाशांतून आणलेला सोम असें म्हटलें आहे.

[६७०] हे (इन्द्राग्नी) इन्द्रा व अग्ने ! तुम्ही (जरितुः सचा) स्तुति करणाऱ्याचे सहाय्यक आहां. (यज्ञः चेतनः जिगाति) यज्ञ ज्याचा होतो व जो चेतना देतो तो सोम तुम्हांला प्राप्त होत आहे. (अया) या स्तुतिनें बोलावले गेलेले तुम्ही (इमं सुतं पातं) या सोमरसाचें पान करा. ॥ २ ॥

६७१ इन्द्रमग्निं कविच्छदा यज्ञस्य जूत्या वृणे । ता सोमस्येह तृम्पताम् ॥ ३ ॥ ७ (ता) ॥
(ऋ. ३।१२।३)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

६७२ उच्चा ते जातमन्धसो दिवि सद्भूम्या ददे । उग्रं शर्म महि श्रवः ॥ १ ॥ (ऋ. ९।६१।१०)

६७३ स न इन्द्राय यज्यवे वरुणाय मरुद्भ्यः । वरिवोवित्परि स्रव ॥ २ ॥ (ऋ. ९।६१।१२)

६७४ एना विश्वान्यर्य आ द्युम्नानि मानुषाणाम् । सिषासन्तो वनामहे ॥ ३ ॥ ८ (ठी) ॥
(ऋ. ९।६१।११)

६७५ पुनानः सोम धारयापो वसानो अर्षसि ।
आ रत्नधा योनिमृतस्य सीदस्युत्सो देवो हिरण्ययः ॥ १ ॥ (ऋ. ९।१०७।४)

---

[६७१] (यज्ञस्य जूत्या) यज्ञाच्या प्रेरणेनें प्रेरित होऊन (कविच्छदा) स्तुति करणाऱ्यांना योग्य फल देणाऱ्या इन्द्र व अग्नि देवांना (वृणे) मी स्वीकारीत आहें. (ता इह) ते दोनही देव या यज्ञांत (सोमस्य तृम्पतां) सोमाच्या पानानें तृप्त होवोत. ॥ ३ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[६७२] हे सोमा ! (ते अन्धसः) तुझ्या अन्नरूपी सोमाचा (दिवि उच्चा जातं) द्युलोकामध्यें उच्चस्थानीं जन्म झालेला आहे. तुझें (उग्रं सत्) शौर्यवर्धक खरें (शर्म महि श्रवः) सुख देणारें मोठें यशस्वी अन्न (भूमि आददे) भूमिवर आम्ही प्राप्त करीत आहों. ॥ १ ॥

सोमवल्ली हिमालय पर्वताच्या मौजवान नामक उच्च शिखरावर उगवते. तेथून ती पृथिवीवर आणतात व यज्ञामध्यें तिचा उपयोग करतात. त्या सोमवल्लीचा रस वीर्यवर्धक, सुखदायक व अन्नाप्रमाणें पुष्टिकारक आहे.

[६७३] हे (वरिवो-वित्) धन देणाऱ्या सोमा ! (सः) तो तूं (नः यज्यवे) आम्हांला पूज्य असलेला (इन्द्राय वरुणाय) इन्द्र, वरुण व (मरुद्भ्यः) मरुत् यांसाठीं (परिस्रव) गाळला जा. ॥ २ ॥

[६७४] हे सोमा ! (मानुषाणां) मनुष्यांना प्राप्त करण्यास योग्य अशा (एना विश्वानि द्युम्नानि) या सर्व धनांना (आ अर्यः) प्राप्त करून तुझी (सिषासन्तः) सेवा करूं इच्छिणारे आम्ही (वनामहे) तुला भजत आहों. ॥३॥

[६७५] हे (सोम) सोमा ! (पुनानः) गाळला जात असतां तूं (आपः वसानः) पाण्यांत मिसळला जाऊन (धारया अर्षसि) धारेनें पात्रांमध्यें पडतोस. (रत्नधा) रत्नें देणारा व (उत्सः देवः) जलरूपानें चमकणारा (हिरण्ययः) सुवर्णासारखा तेजस्वी असा तूं (ऋतस्य योनिं आसीदसि) यज्ञाच्या ठिकाणीं बसतोस. ॥ १ ॥

सोमरस पाण्यांत मिसळतात, तो गाळणींतून कलशामध्यें गाळतात. तेव्हां तो चमकतो. असा हा सोम यज्ञामध्यें ठेवला जातो.

६७६ दुहान ऊधर्दिव्यं मधु प्रियं प्रत्नं सधस्थमासदत् ।
आपृच्छ्यं धरुणं वाज्यर्षसि नृभिर्धौतो विचक्षणः ॥ २ ॥ ९ (लु) ॥ (ऋ. ९।१०७।२)

६७७ प्र तु द्रव परि कोशं नि षीद नृभिः पुनानो अभि वाजमर्ष ।
अश्वं न त्वा वाजिनं मर्जयन्तोऽच्छा बर्ही रशनाभिर्नयन्ति ॥ १ ॥ (ऋ. ९।८७।१)

६७८ स्वायुधः पवते देव इन्दुरशस्तिहा वृजना रक्षमाणः ।
पिता देवानां जनिता सुदक्षो विष्टम्भो दिवो धरुणः पृथिव्याः ॥ २ ॥ (ऋ. ९।८७।२)

६७९ ऋषिर्विप्रः पुर एता जनानामृभुर्धीर उशना काव्येन ।
स चिद्विवेद निहितं यदासामपीच्यां३ गुह्यं नाम गोनाम् ॥ ३ ॥ १० (हु) ॥ (ऋ. ९।८७।३)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

---

[६७६] (**मधु प्रियं दिव्यं ऊधः**) मधुर प्रिय व दिव्यरसाचें (**दुहानः**) दोहन करणारा हा सोम (**प्रत्नं सधस्थं आसदत्**) पुरातन यज्ञस्थानावर बसला आहे. त्यानंतर (**वाजी**) बलवर्धक सोम (**नृभिः धौतः**) याजकांनीं गाळला गेला आहे. हा (**विचक्षणः**) विशेष निरीक्षण करणारा सोम (**आपृच्छ्यं धरुणं**) प्रशंसनीय यज्ञाचें धारण करणाऱ्या यजमानाला (**अर्षसि**) प्राप्त होत आहे. ॥ २ ॥

पर्वतावरून सोम यज्ञशालेमध्यें आणला, याजकांनीं त्याचा रस काढून तो गाळला व त्यानंतर तो यज्ञ करणाऱ्या यजमानाजवळ पोंचला आहे.

[६७७] हे सोमा ! तूं (**तु प्र द्रव**) धांवत लवकर ये. (**कोशं परि निषीद**) कलशामध्यें बसून रहा. (**नृभिः पुनानः**) याजकांनीं गाळल्यानंतर (**वाजं अभि अर्ष**) हविरूप अन्न होऊन रहा. (**वाजिनं अश्वं न**) बलवान् घोड्याला जसें स्वच्छ करतात, त्याप्रमाणें (**त्वा मर्जयन्तः**) तुला शुद्ध करणारे ऋत्विज (**बर्हिः अच्छ**) यज्ञस्थानाकडे (**रशनाभिः**) अंगुलींनीं तुला (**नयन्ति**) नेतात. ॥ १ ॥

सोमरस गाळून स्वच्छ केला जातो. घोड्याला जसें स्वच्छ करतात, त्याप्रमाणें सोमरसाला स्वच्छ करतात व नंतर यज्ञस्थानाकडे त्याला नेतात व तेथें त्याचें हवन होतें.

[६७८] (**स्वायुधः**) उत्तम आयुधांनीं युक्त (**अ-शस्ति-हा**) शत्रूंचा नाश करणारा (**वृजना**) उपद्रवांना दूर करणारा, (**रक्षमाणः**) रक्षण करणारा (**पिता**) पालन करणारा (**देवानां जनिता**) देवांना उत्पन्न करणारा (**सु-दक्षः**) उत्तम बलवान् (**दिवः विष्टम्भः**) द्युलोकाला आधार देणारा व (**पृथिव्याः धरुणः**) पृथिवीचें धारण करणारा (**देवः इन्दुः पवते**) दिव्य सोम गाळला जात आहे. ॥ २ ॥

सोमरस बल व उत्साह वाढवतो म्हणून वरील विशेषणें त्यास आलंकारिक रीतिनें लावलेलीं आहेत.

[६७९] (**विप्रः पुरः एता**) ज्ञानी व अग्रेसर (**जनानां ऋभुः**) लोकांचा तेजस्वी पुढारी, (**धीरः उशना ऋषिः**) धैर्यशाली उशना ऋषि आहे. (**सः चित्**) तो खरोखर (**आसां गोनां**) या गाईंमध्यें असणारें (**यत् अपीच्यं गुह्यं नाम**) जें आंत गुप्तरूपानें दूध आहे तें (**काव्येन विवेद**) काव्याच्या योगानें जाणलें. ॥ ३ ॥

गाईंमध्यें गुप्तरूपानें असणारें उत्तम दूध आहे हें उशना ऋषिनें जाणलें व पुढारीपणानें त्यानें सर्वांना सांगितलें.

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४]

६८० अभि त्वा शूर नोनुमोऽदुग्धा इव धेनवः ।
ईशानमस्य जगतः स्वर्दृशमीशानमिन्द्र तस्थुषः ॥ १ ॥ (ऋ ७।३२।१२)

६८१ न त्वावाँ अन्यो दिव्यो न पार्थिवो न जातो न जनिष्यते ।
अश्वायन्तो मघवन्निन्द्र वाजिनो गव्यन्तस्त्वा हवामहे ॥ २ ॥ ११ (यी) ॥
(ऋ. ७।३२।२३)

६८२ कया नश्चित्र आ भुवदूती सदावृधः सखा । कया शचिष्ठया वृता ॥ १ ॥ (ऋ. ४।३१।१)

६८३ कस्त्वा सत्यो मदानां मंहिष्ठो मत्सदन्धसः । दृढा चिदारुजे वसु ॥ २ ॥ (ऋ ४।३१।२)

६८४ अभी षु णः सखीनामविता जरितॄणाम् । शतं भवास्यूतये ॥ ३ ॥ १२ (टा) ॥
(ऋ. ४।३१।३)

६८५ तं वो दस्ममृतीषहं वसोर्मन्दानमन्धसः ।
अभि वत्सं न स्वसरेषु धेनव इन्द्रं गीर्भिर्नवामहे ॥ १ ॥ (ऋ. ८।८८।१)

---

[४] चतुर्थः खण्डः ।

[६८०] हे (शूर) शूरवीर इन्द्रा ! (अ-दुग्धाः धेनवः इव) न दूध काढलेल्या गाई जशा वांसरांजवळ येतात, त्याप्रमाणें आम्ही (अस्य जगतः ईशानं) या जंगम जगताचा स्वामी व (तस्थुषः ईशानं) स्थावर जगाचा स्वामी अशा (स्वः दृशं त्वा) स्वयं सर्वांचें दर्शन करणाऱ्या तुला (अभिनोनुमः) प्रणाम करीत आहों. ॥ १ ॥

[६८१] हे (मघवन्) धनवान् इन्द्रा ! (त्वावान्) तुझ्यासारखा (अन्यः) दुसरा कोणीहि (दिव्यः न) द्युलोकांत नाहीं व (पार्थिवः न) पृथिवीवर राहणाराही नाहीं, (न जातः) कोणी झाला नाहीं व (नः जनिष्यते) कोणी होणारही नाहीं. हे (इन्द्र) इन्द्रा ! (अश्वायन्तः) घोड्यांची इच्छा करणारे, (वाजिनः) धनाची इच्छा करणारे (गव्यन्तः) गाईंची इच्छा करणारे आम्ही (त्वा हवामहे) तुझी प्रार्थना करीत आहों. ॥ २ ॥

[६८२] (सदा-वृधः) सदोदित वाढणारा (चित्रः सखा) विलक्षण मित्र असा हा इन्द्र (कया ऊती) कोणत्या रक्षण साधनांनीं (शचिष्ठया कया वृता) व कोणत्या शक्तिनें युक्त होऊन (नः आभुवत्) आमच्याजवळ येईल बरें ? ॥ १ ॥

[६८३] (मंहिष्ठः) महान् (सत्यः) सत्य कर्म करणारा व (मदानां कः) आनंददायकांमध्यें कोण बरें विशेष आनंददायक आहे ? (अन्धसः) सोमरस असा आनंददायक आहे. कारण तो (दृढा चित् वसु आरुजे) सुदृढ असलेलें शत्रूचें धन विनष्ट करणासाठीं (त्वा मत्सत्) तुला उत्साहित करतो. ॥ २ ॥

[६८४] (सखीनां जरितॄणां) मित्रांसारख्या स्तोत्यांचा तूं (अविता) रक्षक आहेस. यासाठीं (नः) आमचें (शतं ऊतये) शेंकडों प्रकारांनीं संरक्षण करण्यासाठीं (सु अभि भवासि) उत्तम प्रकारें तयार होऊन समोर उभा रहा. ॥ ३ ॥

[६८५] (स्वसरेषु) गोशालेमध्यें (वत्सं धेनवः इव) वांसरांजवळ जशा गाई जातात, त्याप्रमाणें (दस्मं) दर्शनीय व (ऋतीषहं) शत्रूंचा पराभव करणाऱ्या (वसोः अन्धसः मन्दानं) पात्रामध्यें असलेल्या सोमरसानें आनंदित होणाऱ्या (वः तं इन्द्रं) तुमच्या त्या इन्द्राची (गीर्भिः नवामहे) स्तोत्रांनीं आम्ही स्तुति करतों. ॥ १ ॥

६८६ द्युक्षꣳ सुदानुं तविषीभिरावृतं गिरिं न पुरुभोजसम् ।
क्षुमन्तं वाजꣳ शतिनꣳ सहस्रिणं मक्षू गोमन्तमीमहे ॥ २ ॥ १३ (ही) ॥ (ऋ. ८।८८।२)

६८७ तरोभिर्वो विदद्वसुमिन्द्रꣳसबाध ऊतये ।
बृहद्गायन्तः सुतसोमे अध्वरे हुवे भरं न कारिणम् ॥ १ ॥ (ऋ. ८।६६।१)

६८८ न यं दुध्रा वरन्ते न स्थिरा मुरो मदेषु शिप्रमन्धसः ।
य आदृत्या शशमानाय सुन्वते दाता जरित्र उक्थ्यम् ॥ २ ॥ १४ (जु) ॥ (ऋ. ८।६६।२)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

[५]

६८९ स्वादिष्ठया मदिष्ठया पवस्व सोम धारया । इन्द्राय पातवे सुतः ॥ १ ॥ (ऋ. ९।१।१)

६९० रक्षोहा विश्वचर्षणिरभि योनिमयोहते । द्रोणे सधस्थमासदत् ॥ २ ॥ (ऋ. ९।१।२)

---

[६८६] (द्यु-क्षं) द्युलोकामध्यें असणाऱ्या (सु-दानुं) उत्तम दान देणाऱ्या (तविषीभिः आवृतं) अनेक सामर्थ्यांनीं युक्त व (पुरु-भोजसं) पुष्कळ भोजन करणाऱ्या इन्द्राजवळ (क्षुमन्तं) पुष्कळ अन्नानें युक्त (शतिनं सहस्रिणं) शेंकडों व हजारों धनांनीं युक्त (गोमन्तं वाजं) गाईंनीं उत्पन्न केलेलें अन्न (मक्षु ईमहे) लवकर मिळावें असें आम्हीं इच्छितों. ॥ २ ॥

[६८७] हे ऋत्विजानों ! (वः) तुम्हीं (सुतसोमे अध्वरे) सोमयागामध्यें (तरोभिः) वेगवान् अश्वांसह असणाऱ्या (विदद्वसुं इन्द्रं) धनाचें दान करणाऱ्या इन्द्रासाठीं (स-बाधः) विरोधकांपासून (ऊतये) रक्षण व्हावें म्हणून (बृहत् गायन्तः) बृहत् नांवाच्या सामाचें गायन करा. (भरं न) भरणपोषण करणाऱ्याला ज्याप्रमाणें बोलावलें जातें, त्याप्रमाणें (कारिणं हुवे) हित करणाऱ्या इन्द्राला मी सहाय्यार्थ बोलावतों. ॥ १ ॥

[६८८] (सु-शिप्रं यं) उत्तम हनुवटी असलेल्या ज्या इन्द्राचें (दु-ध्राः न वरन्ते) दुष्ट शूर असुर निवारण करूं शकत नाहींत, (स्थिराः न) युद्धामध्यें स्थिर राहणारे शूर इन्द्राचें निवारण करूं शकत नाहींत, (मुरः) मारणारे शत्रूहि त्याचें निवारण करूं शकत नाहींत, असा (यः) जो इन्द्र आहे, तो (अन्धसः मदे) सोमरसाच्या आनंदामध्यें (आदृत्य शशमानाय सुन्वते जरित्रे) आदरानें स्तुति करणाऱ्या सोमयाग करणाऱ्या स्तोत्यासाठीं (उक्थ्यं दाता) प्रशंसनीय धन देत असतो. ॥ २ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५] पञ्चमः खण्डः ।

[६८९] हे (सोम) सोमा ! (इन्द्राय पातवे) इन्द्राला पिण्याला देण्याकरतां (सुतः) काढलेला हा सोमरस आहे तो तूं (स्वादिष्ठया मदिष्ठया धारया) स्वादिष्ठ व आनन्द वाढवणाऱ्या धारेनें (पवस्व) गाळला जा. ॥ १ ॥

[६९०] (रक्षो-हा) राक्षसांचा नाश करणारा (विश्व-चर्षणिः) सर्व मानवांचें हित करणारा (अयोहते द्रोणे) सुवर्णाच्या पात्रामध्यें (सधस्थं योनिं) जवळच्या यज्ञ स्थानामध्यें (अभि आसदत्) सोमरस जाऊन बसला. ॥ २ ॥

सोमरस गाळून सुवर्णपात्रामध्यें भरून ठेवला.

६९१ वरिवोधातमो भुवो मंहिष्ठो वृत्रहन्तमः । पर्षि राधो मघोनाम् ॥ ३ ॥ १५ (पौ) ॥
(ऋ. ९।१।३)

६९२ पवस्व मधुमत्तम इन्द्राय सोम क्रतुवित्तमो मदः । महि द्युक्षतमो मदः ॥ १ ॥
(ऋ. ९।१०८।१)

६९३ यस्य ते पीत्वा वृषभो वृषायतेऽस्य पीत्वा स्वर्विदः ।
स सुप्रकेतो अभ्यक्रमीदिषोऽच्छा वाजं नैतशः ॥ २ ॥ १६ (प) ॥ (ऋ. ९।१०८।२)

६९४ इन्द्रमच्छ सुता इमे वृषणं यन्तु हरयः । श्रुष्टे जातास इन्दवः स्वर्विदः ॥ १ ॥
(ऋ. ९।१०६।१)

६९५ अयं भराय सानसिरिन्द्राय पवते सुतः । सोमो जैत्रस्य चेतति यथा विदे ॥ २ ॥
(ऋ. ९।१०६।२)

६९६ अस्येदिन्द्रो मदेष्वा ग्राभं गृभ्णाति सानसिम् ।
वज्रं च वृषणं भरत्समप्सुजित् ॥ ३ ॥ १७ (कि) ॥ (ऋ. ९।१०६।३)

---

[६९१] हे सोमा ! तूं (वरिवो-धातमः) धन देणारा (मंहिष्ठः) मोठा (वृत्र-हन्तमः) शत्रूंचा अत्यंत नाश करणारा (भुवः) आहेस. म्हणून (मघोनां राधः पर्षि) धनवान् शत्रूंकडे असणारें धन आम्हांला दे. ॥ ३ ॥

[६९२] हे सोमा ! तूं (मधुमत्तमः) अत्यन्त मधुर (क्रतु-वित्-तमः) कर्म करण्याचा मार्ग उत्तम रीतिनें जाणणारा (महि द्युक्षतमः) मोठा तेजस्वी (मदः) आनन्द देणारा आहेस म्हणून (इन्द्राय मदः) इन्द्राला आनन्द देण्यासाठीं (पवस्व)गाळून तयार हो. ॥ १ ॥

[६९३] हे सोमा ! (वृषभः) बलवान् इन्द्र (यस्य ते पीत्वा) त्या तुला पिऊन (वृषायते) अधिक बलिष्ठ होत असतो. (स्वः-विदः अस्य पीत्वा) आत्मज्ञानी असलेल्या या सोमाला पिऊन आनन्दित होतो. (सु-प्र-केतः सः) उत्तम ज्ञानी असा तो इन्द्र (इषः अभ्यक्रमीत्) शत्रूंच्या अन्नाला आपल्या आधीन करतो. (न) ज्याप्रमाणें (एतशः) घोडा (वाजं) संग्रामामध्यें (अभि) जाऊन विजय मिळवतो. ॥ २ ॥

[६९४] (श्रुष्टे) लवकर (जातासः इन्दवः) तयार झालेले (स्वः-विदः हरयः इमे सुताः) ज्ञान वाढवणारे हिरव्या रंगाचे हे सोमरस (वृषणं इन्द्रं अच्छ यन्तु) बलवान् इन्द्राजवळ शीघ्र पोंचोत. ॥ १ ॥

[६९५] (भराय) संग्रामाच्यावेळीं (सानसिः) सेवन करण्यास योग्य (अयं सुतः) असा हा सोमरस (इन्द्राय क्षरति) इन्द्रासाठीं गाळला जात आहे. हा (जैत्रस्य चेतति) विजयी इन्द्राला उत्तेजन देतो (यथा विदे) जें सर्व लोक जणतात. ॥ २ ॥

[६९६] (अस्य इत् मदेषु) या सोमाच्या आनन्दामध्यें इन्द्र (सानसिं) सेवन करण्यास योग्य (ग्राभं गृभ्णाति) असें धनुष्य घेतो. नंतर (अप्सुजित् इन्द्रः) पाण्याच्या प्रवाहांना जिंकणारा इन्द्र (वृषणं वज्रं च) बलवान् वज्राला (सं भरत्) धारण करतो. ॥ ३ ॥

६९७ पुरोजिती वो अन्धसः सुताय मादयित्नवे ।
अप श्वान॑श्नथिष्टन सखायो दीर्घजिह्व्यम् ॥ १ ॥ (ऋ. ९।१०१।१)

६९८ यो धारया पावकया परिप्रस्यन्दते सुतः । इन्दुरश्वो न कृत्व्यः ॥ २ ॥ (ऋ ९।१०१।२)

६९९ तं दुरोषमभी नरः सोमं विश्वाच्या धिया । यज्ञाय सन्त्वद्रयः ॥ ३ ॥ १८ (यि) ॥
(ऋ. ९।१०१।३)

७०० अभि प्रियाणि पवते चनोहितो नामानि यह्वो अधि येषु वर्धते ।
आ सूर्यस्य बृहतो बृहन्नधि रथं विष्वञ्चमरुहद्विचक्षणः ॥ १ ॥ (ऋ. ९।७५।१)

७०१ ऋतस्य जिह्वा पवते मधु प्रियं वक्ता पतिर्धियो अस्या अदाभ्यः ।
दधाति पुत्रः पित्रोरपीच्यां॑नाम तृतीयमधि रोचनं दिवः ॥ २ ॥ (ऋ. ९।७५।२)

---

[६९७] हे (सखायः) मित्रांनों ! (वः पुरोजिती) तुम्ही आपल्या पुढें विजय आहे असें समजून (अन्धसः सुताय) अन्नरूपी या सोमरसापासून तो (मादयित्नवे) आनन्द देणारा असल्यामुळें (दीर्घ-जिह्व्यं) लांब जीभ असलेल्या कुत्र्याला (अपश्नथिष्टन) दूर करा. ॥ १ ॥

कुत्रा सोमरसाला न चाटेल अशी सावधानता ठेवा.

[६९८] (सुतः कृत्व्यः) सोमरस यज्ञकर्माचा सहाय्यक आहे. (यः इन्दुः) तो सोमरस (पावकया धारया) शुद्ध होणाऱ्या धारेनें (परि प्रस्यन्दते) गाळला जात आहे (अश्वः न) जसा घोडा वेगानें धांवत असतो. ॥ २ ॥

सोमरस यज्ञाचा सहाय्यक आहे. तो शुद्ध होण्यासाठीं गाळणींतून गाळला जात आहे व खालील भांड्यांत अखंड धारेनें गळत आहे. घोडा जसा धांवतो तसा तो खालील भांड्यांत वेगानें पडत आहे.

[६९९] (नरः) ऋत्विज लोक (दुरोषं) दुष्टांचा नाश करणाऱ्या (तं सोमं अभि) त्या सोमाजवळ जाऊन (विश्वाच्या धिया) सर्वांचें संरक्षण करण्याच्या बुद्धिनें (यज्ञाय) यज्ञाला (अद्रयः सन्तु) आदरानें पाहणारे होवोत. ॥ ३ ॥

[७००] (चनो-हितः) अन्नरूप असल्यानें हित करणारा सोम (प्रियाणि नामानि अभि पवते) सर्वांना तृप्त करणाऱ्या पाण्यांना पवित्र करतो. (येषु) ज्या जलांमध्यें (यह्वः अधिवर्धते) हा महान् सोम वाढत असतो. (बृहतः सूर्यस्य) मोठ्या सूर्याच्या (विष्वंचं अधिरथं) सर्वत्र गमन करणाऱ्या रथावर (बृहत् विचक्षणः आरुहत्) हा मोठा व सर्वद्रष्टा सोम चढला आहे. ॥ १ ॥

सोम अन्नरूप आहे. तो पाण्यांत मिसळला जातो तेव्हां तो पाण्याला पवित्र करतो. पाणी घातल्यामुळें सोमरस वाढला जातो. नंतर तो सूर्य प्रकाशांत ठेवला जातो.

[७०१] (ऋतस्य-जिह्वा) यज्ञाची जिह्वा जणूं काय असा हा (वक्ता) शब्द करणारा सोमरूपी (प्रियं मधु पवते) प्रिय व मधुर रस गाळला जात आहे. (अस्य धियः पतिः) या यज्ञकर्माचा पालक हा सोम (अ-दाभ्यः) न दाबला जाणारा आहे व (पुत्रः) यजमानरूपी हा पुत्र (पित्रोः अपीच्यं) मातापिता यांना न माहित असलेलें (दिवः रोचनं) द्युलोकाला प्रकाशित करणारें (तृतीयं नाम) तिसरें नांव (अधि दधाति) धारण करतो. ॥ २ ॥

सोमरस गाळला जात असतां त्याचा शब्द होतो, म्हणून तो सोम वक्ता आहे. हा न दाबला जाणारा यज्ञाचा कर्ता आहे. यज्ञ केल्यानंतर या यज्ञकर्त्याला " सोमयाजी " असें तिसरें नांव प्राप्त होत असतें. नक्षत्रावरून एक नांव, व्यवहारांतील नांव दुसरें व यज्ञ केल्यामुळें हें तिसरें " सोमयाजी " नांव त्यास मिळतें.

७०२ अव द्युतानः कलशाँ अचिक्रदन्नृभिर्येमाणः कोश आ हिरण्यये ।
अभी ऋतस्य दोहना अनूषताधि त्रिपृष्ठ उषसो वि राजसि ॥ ३ ॥ १९ (दि) ॥
(ऋ. ९।७५।३)

॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

[६]

७०३ यज्ञायज्ञा वो अग्नये गिरागिरा च दक्षसे ।
प्रप्र वयममृतं जातवेदसं प्रियं मित्रं न शंसिषम् ॥ १ ॥ (ऋ. ६।४८।१)

७०४ ऊर्जो नपातं स हिनायमस्मयुर्दाशेम हव्यदातये ।
भुवद्वाजेष्वविता भुवद्वृध उत त्राता तनूनाम् ॥ २ ॥ २० (यु) ॥(ऋ. ६।४८।२)

७०५ एह्यू षु ब्रवाणि तेऽग्न इत्थेतरा गिरः । एभिर्वर्धास इन्दुभिः ॥ १ ॥ (ऋ. ६।१६।१६)

७०६ यत्र क्व च ते मनो दक्षं दधस उत्तरम् । तत्र योनिं कृणवसे ॥ २ ॥ (ऋ. ६।१६।१७)

---

[७०२] (द्युतानः) तेजस्वी सोम (नृभिः) ऋत्विजांनीं (हिरण्यये कोशे येमानः) सुवर्णाच्या कलशामध्यें गाळला जात असतां (कलशान् अचिक्रदत्) कलशामध्यें शब्द करीत शिरत आहे. यावेळीं (ऋतस्य दोहनाः) यज्ञ करणारे ऋत्विज सोमाची (अभि अनूषत) स्तुति करीत असतात. हे सोमा ! (त्रि-पृष्ठः) तीन सवनांमध्यें (उषसः अधि) उषःकालाच्या प्रकाशानंतर (विराजसि) तूं चमकतोस. ॥ ३ ॥

सोमरस ऋत्विजांकडून सुवर्णाच्या पात्रांमध्यें गाळला जातो. तो शब्द करीत खालच्या भांड्यांत पडत असतो. यावेळीं ऋत्विज या सोमाचीं स्तोत्रें म्हणत असतात. तीनही सवनांमध्यें हा सोमरस चमकत असतो.

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६] षष्ठः खण्डः ।

[७०३] हे स्तुति करणाऱ्या ऋत्विजांनों ! (वः) तुम्ही (यज्ञायज्ञा) प्रत्येक यज्ञामध्यें (दक्षसे अग्नये) प्रदीप्त होणाऱ्या अग्निची (गिरागिरा) आपल्या वाणीनें स्तुति करा (च) आणि (वयं) आम्हीहि (अमृतं जातवेदसं) अमर ज्ञानी अग्निची (प्रियं मित्रं न) प्रिय मित्राप्रमाणें (प्र प्रशंसिषम्) प्रशंसा करतों. ॥ १ ॥

[७०४] (ऊर्जः न-पातं) बल कमी न करणाऱ्या अग्निची आम्ही स्तुति करीत आहों. (हिना सः अयं) खरोखर तोच हा अग्नि (अस्मयुः) आमचें हित करणारा आहे. (हव्य-दातये दाशेम) देवतांना हव्य पोंचवणाऱ्या या अग्निला आम्ही हवि देत आहों. हा (वाजेषु अविता) युद्धांमध्यें आमचें रक्षण करणारा व (वृधः) आमची वृद्धि करणारा (भुवत्) होवो (उत) आणि (तनूनां त्राता भुवत्) आमच्या शरीरांचें रक्षण करणारा होवो. ॥२॥

[७०५] हे अग्ने ! (एहि) ये. (ते गिरः) तुझीं स्तोत्रें (इत्था सु ब्रवाणि) अशीं आम्हीं उत्तम रीतिनें म्हणत आहों, (उ) आणि (इतराः) दुसरीं स्तोत्रेंही म्हणत आहों तीं तूं ऐक. (एभिः इन्दुभिः) या सोमरसांनीं (वर्धासे) तूं वाढतोस. ॥ १ ॥

[७०६] (ते मनः) तुझें मन (यत्र क्व च) जेथें कोठें असतें, (तत्र) तेथें (उत्तरं दक्षं) श्रेष्ठ बल (दधसे) तूं स्थापन करतोस. तसेंच तेथें (योनिं कृणवसे) घरही निर्माण करतोस. ॥ २ ॥

*

७०७ न हि ते पूर्तमक्षिपद्भुवन्नेमानां पते । अथा दुवो वनवसे ॥ ३ ॥ २१ (यी) ॥
(ऋ. ६।१६।१८)

७०८ वयमु त्वामपूर्व्य स्थूरं न कच्चिद्भरन्तोऽवस्यवः । वज्रिं चित्रं हवामहे ॥ १ ॥ (ऋ. ८।२१।१)

७०९ उप त्वा कर्मन्नूतये स नो युवोग्रश्चक्राम यो धृषत् ।
त्वामिध्यवितारं ववृमहे सखाय इन्द्र सानसिम् ॥ २ ॥ २२ (च) ॥ (ऋ. ८।२१।२)

७१० अधा हीन्द्र गिर्वण उप त्वा काम ईमहे ससृग्महे । उदेव ग्मन्त उदभिः ॥ १ ॥
(ऋ. ८।९८।७)

७११ वार्ण त्वा यव्याभिर्वर्धन्ति शूर ब्रह्माणि । वावृध्वांसं चिदद्रिवो दिवेदिवे ॥ २ ॥
(ऋ. ८।९८।८)

७१२ युञ्जन्ति हरी इषिरस्य गाथयोरौ रथ उरुयुगे वचोयुजा ।
इन्द्रवाहा स्वर्विदा ॥ ३ ॥ २३ (यि) ॥ (ऋ. ८।९८।९)

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥
इति प्रथमप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ १ ॥ इति प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

---

[७०७] हे अग्ने ! (ते पूर्तं अक्षिपत्) तुझें तेज नेत्रांना बाधक (नहि भुवत्) होत नाहीं. हे (नेमानां पते) नियमांमध्यें राहणाऱ्या मानवांच्या अधिपति ! (अथ दुवः) आतां आमची सेवा तूं (वनवसे) स्वीकार कर. ॥ ३ ॥

[७०८] हे (अपूर्व्य वज्रिन्) अपूर्व वज्रधारी इन्द्रा ! (भरन्तः वयं) तुला सोमरस देणारे व (अवस्यवः) आमचें संरक्षण व्हावें असें इच्छिणारे आम्ही (चित्रं त्वां उ हवामहे) विलक्षण श्रेष्ठ अशा तुला सहाय्यासाठीं बोलावीत आहों. (कच्चित् स्थूरं न) जसें कोणी मोठ्याला बोलावतात. ॥ १ ॥

[७०९] हे (इन्द्र) इन्द्रा ! (कर्मन्) कर्म करीत असतां (ऊतये) संरक्षणासाठीं (उपचक्राम) तुझ्याजवळ आम्ही येत आहों. (यः) जो तूं (धृषत्) शत्रूंचा पराभव करणारा (युवा उग्रः) तरुण व शूरवीर (नः चक्राम) आमच्याजवळ ये. (सखायः) आम्ही तुझे मित्र (सानसिं अवितारं त्वा इत्) संसेव्य व संरक्षक अशा तुलाच सहाय्यासाठीं (ववृमहे) स्वीकारीत आहों. (हि) हें सर्वांस माहीत आहेच. ॥ २ ॥

[७१०] हे (गिर्वणः इन्द्र) स्तुत्य इन्द्रा ! (अधा हि) आतां (त्वा कामे ईमहे) तुला आमच्या इच्छा तृप्त करण्यासाठीं प्रार्थित आहों. (उदा इव ग्मन्तः) पाणी घेऊन जाणारे मनुष्य (उदभिः) पाण्यानें जसे खेळतात त्याप्रमाणें (उप ससृग्महे) आम्ही तुझ्याजवळ येत आहों. ॥ १ ॥

पाणी घेऊन जाणारे आपसांमध्यें पाणी एकमेकांवर टाकून खेळतात. त्याप्रमाणें आम्ही आपल्या इच्छा तृप्त करण्यासाठीं इन्द्राजवळ जात आहों. तो आमच्या इच्छा तृप्त करील. आमच्या इच्छा आम्ही इन्द्राजवळ करीत आहों. तो त्या तृप्त करतो.

[७११] (अद्रिवः शूर) हे वज्रधारी शूर इन्द्रा ! ज्याप्रमाणें (वार्ण) समुद्राला (यव्याभिः वर्धन्ति) नद्या वाढवतात. त्याप्रमाणें स्तुति करणारे (ब्रह्माणि) स्तोत्रें म्हणून (वावृध्वांसं चित्) मोठ्या असणाऱ्या (त्वा दिवेदिवे) तुला - इन्द्राला - दररोज वाढवतात. ॥ २ ॥

[७१२] (इषिरस्य) प्रगतिशील इन्द्राला (ऊरुयुगे) मोठे जूं असलेल्या (उरौ रथे) मोठ्या रथामध्यें (इन्द्रवाहा) इन्द्राला वाहून नेणारे (वचो-युजा) शब्दानें जोडले जाणारे (स्वः-विदः) स्वतःचें स्थान जाणणारे (हरी) दोन घोडे (गाथया युंजन्ति) स्तोत्रें म्हणतांच जोडले जातात. ॥ ३ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥
॥ इति प्रथमोऽध्यायः ॥

प्रथम अध्याय

या अध्यायामध्यें इन्द्र, सोम, अग्नि, मित्र, वरुण इत्यादि देवतांचे मंत्र आहेत. या देवतांचें गुणवर्णन या अध्यायामध्यें केलेलें आहे, देवतांचे गुण उपासकानें जाणावे व ते आपण आपल्या अंगीं धारण करून वाढवावे, यासाठीं हें गुणवर्णन असतें. यासाठीं या गुणांचा विचार याठिकाणीं आपण प्रथम करूं या —

१ शुचि-व्रता [६६४] - शुद्ध व पवित्र व्रताचें आचरण करणारे, अपवित्र आचरण कधींहि न करणारे.

२ उरु-शंसा [६६४]- पुष्कळ प्रशंसा ज्यांची होत आहे. सर्व लोक ज्यांची प्रशंसा गात असतात.

३ नमो-वृधा [६६४] अन्नानें वाढणारे, आपणाजवळ पुष्कळ अन्न ठेवणारे, नम्रतेनें वाढणारे.

४ दक्षस्य मह्ना राजथः [६६४]- आपल्या सामर्थ्यानें विराजतात. आपल्या स्वतःच्या मोठेपणानें जे तेजस्वी होतात.

५ ऋता-वृधा [६६५]- यज्ञाची वाढ करणारे, सत्य मार्गानें वाढणारे, सत्याची वाढ करणारे,

६ ऋतस्य योनौ सीदतं [६६५]- यज्ञाच्या स्थानीं बसतात. सत्य कर्माला करण्यासाठीं तयार असतात.

७ कवि-च्छदा [६७१]- ज्ञानीलोक ज्यांची स्तुति करतात. दूरदर्शी लोक ज्यांची वाखाणणी करतात.

मित्र व वरुणाचे हे गुण आहेत. आतां इन्द्राचे गुण पहा-

१ वृषणः इन्द्रः [६९४]- बलवान् इन्द्र आहे.

२ सदा-वृधः [६८२]- सदोदित वाढणारा, मोठा होणारा.

३ चित्रः सखा [६८२]- विलक्षण थोर मित्र, सहाय्यक.

४ अप्सु-जित् [६९६]- अन्तरिक्षामध्यें विजयी, पाण्याच्या प्रवाहांना जिंकून आपल्या ताब्यांत ठेवणारा.

५ वज्रं संभरत् [६९६]- वज्र धारण करून लढतो.

६ सानसिं ग्राभं गृभ्णाति [६९६] - हातामध्यें धरण्यास योग्य असें धनुष्य हातांत धरून शत्रू बरोबर लढतो.

७ कया ऊती कया शचिष्ठया वृता, नः आभुवत् [६८२]- कोणत्या संरक्षणाच्या साधनांसह व कोणत्या सामर्थ्यानें युक्त होऊन तो आमच्या सहाय्यासाठीं आमच्याजवळ येईल बरें ?

८ यं सु-शिप्रं दुध्राः न वरन्ते [६६८]- उत्तम साफा बांधणाऱ्या ज्या इन्द्राला दुष्ट शत्रु पराभूत करूं शकत नाहींत.

९ स्थिराः यं न वरन्ते [६६८]- युद्धांत स्थिर राहणारे वीर सुद्धां ज्याचा पराभव करूं शकत नाहीं.

१० मुरः न वरन्ते [६६८]- वध करण्यांत कुशल शत्रूही ज्याचा पराभव करूं शकत नाहींत. नाश करण्यांत पटाइत शत्रूचे वीर ज्याच्या पुढें टिकाव धरूं शकत नाहींत.

११ देव ! सः त्वं पृथु श्रवाय्यं बृहत् सुवीर्यं नः अच्छ विवाससि [६६२]- तो तूं मोठें यशस्वी प्रचंड सामर्थ्य आम्हांला सरळपणानें प्राप्त होईल असें कर.

१२ वाजेषु अविता [७०४]- युद्धांमध्यें आमचें रक्षण करणारा.

१३ वृधः-भुवत् [७०४]- आमची वाढ करणारा हो.

१४ तनूनां त्राता भुवत् [७०४]- आमच्या शरीरांचें संरक्षण करणारा हो.

१५ ते मनः यत्र क च, तत्र उत्तरं दक्षं दधसे, योनिं कृणवसे [७०६]- तुझें जेथें मन असतें तेथें तूं श्रेष्ठ बल वाढवतोस व आपलें घर निर्माण करतोस.

१६ दस्मं ऋतीषहं वसोः अन्धसः मन्दानं इन्द्रं नवामहे [६८५]- दर्शनीय शत्रूंचा पाडाव करणाऱ्या, सोमरसानें आनंदित होणाऱ्या, इन्द्राची आम्हीं स्तुति करतों.

१७ सखीनां अविता [६८४]- मित्रांचें रक्षण करणारा.

१८ नः शतं ऊतये सु अभि भवासि [६८४]- आमचें शेंकडों प्रकारांनीं रक्षण करण्यासाठीं तूं उत्तम प्रकारें तयार राहतोस.

१९ स-बाधः ऊतये [६८७]- बाधा करणाऱ्या शत्रूंपासून रक्षण करण्यासाठीं तयार रहा.

२० हे अपूर्व्य वज्रिन् ! अवस्यवः भरन्तः वयं चित्रं त्वां हवामहे [७०८]- हे अद्वितीय शस्त्रधारी इन्द्रा ! आमचें रक्षण व्हावें अशी इच्छा करणारे आम्ही विलक्षण शक्ति धारण करणाऱ्या तुला आमच्या संरक्षणासाठीं बोलावीत आहों.

२१ कर्मन् ऊतये उप चक्राम [७०९]–आम्ही कर्म करीत असतांना आमचें संरक्षण व्हावें यासाठीं तुझ्याजवळ येत आहों.

२२ यः धृषत् युवा उग्रः नः चक्राम [७०९]– तो शत्रूंचा पराभव करणारा तरुण उग्रवीर आमच्याजवळ आमचें रक्षण करण्यासाठीं येवो.

२३ सानसिं अवितारं त्वा ववृमहे [७०९]– विजयी संरक्षक अशा तुला आम्ही स्वीकारीत आहों.

२४ गिर्वणः इन्द्र ! त्वा कामे ईमहे, उप ससृग्महे [७१०]– हे स्तुत्य इन्द्रा ! आमच्या इच्छा तृप्त करण्यासाठीं तुझी आम्ही प्रार्थना करतों व तुझ्याजवळ येत आहों.

आतां सोमाचीं विशेषणें पहा—

१ देवः [६५२]– तेजस्वी, चमकणारा.
२ देवयुः [६५२]– देवांच्याबरोबर राहणारा, देवांशीं युक्त होणारा.
३ राजन् [६५३]– तेजस्वी, चमकणारा.
४ दविद्युतत्या रुचा [६५४]– चमकणाऱ्या तेजानें युक्त.
५ शुक्रः सोमः [६५४] वीर्यवान् सोम, स्वच्छ.
६ वाजी [६५५]– बलवान्.
७ हितः [६५५]– हितकारक.
८ हेतृभिः हिन्वानः [६५५]- स्तोत्यांकडून स्तविला जाणारा.
९ कविः [६५६]– ज्ञानी.
१० संजग्मानः [६५६]– तेजस्वी, मिळून राहणारा.
११ दिवा [६५६]– तेजस्वी, चमकणारा.
१२ रक्षो-हा [६९०]– राक्षसांना मारणारा.
१३ विश्व-चर्षणिः [६९०]– सर्व पाहणारा.
१४ मंहिष्ठः [६९१]– महान्, मोठा.
१५ वृत्रहन्तमः [६९१]– घेरणाऱ्या शत्रूला मारण्यांत प्रवीण.
१६ वरिवो–धा-तमः [६९१]– अधिक धन देणारा.
१७ मधुमत्तमः [६९२]– अत्यंत मधुर.
१८ क्रतुवित्तमः [६९२]–कर्म उत्तम रीतिनें करण्यांत प्रवीण.
१९ महि द्युक्षतमः [६९२]– महान् तेजस्वी.
२० मदः [६९२]– आनन्द वाढवणारा.
२१ वृषभः [६९३]– बलवान्.
२२ तस्य पीत्वा वृषायते [६९३]– त्याच्या पिण्यानें बल वाढतें.
२३ स्वः विदः [६९३]– ज्ञान वाढवणारा, जाणणारा.
२४ सु-प्र-केतः [६९३]- उत्तम ज्ञानी.
२५ हरयः इन्दवः [६९४]– हिरव्या रंगाचा सोमरस.
२६ चनोहितः [७००]– अन्नरूपानें हितकर.
२७ द्युतानः [७०२]– तेजस्वी.
२८ विचक्षणः [६७६]- विशेष ज्ञानी.
२९ वाजं अभि अर्ष [६७७]–बल वाढव.
३० प्र-द्रव [६७७] धांव,, वेगानें जा.
३१ पुनानः [६७७]- स्वच्छ होणारा, स्वच्छ केला जाणारा.
३२ स्वायुधः [६७८]- उत्तम शस्त्रास्त्रें ज्याच्याजवळ आहेत असा वीर.
३३ अशस्ति-हा [६७८]–अप्रशस्तांचा नाश करणारा.
३४ वृजना [६७८]– उपद्रवकारी शत्रूंना दूर करणारा.
३५ रक्षमाणः पिता [६७८]– बापाप्रमाणें संरक्षण करणारा.
३६ सु-दक्षः [६७८]- उत्तम दक्ष.
३७ पृथिव्या धरुणः [६७८]- पृथिवीचा धारण करणारा.
३८ विप्रः [६७९]- ज्ञानी.
३९ जनानां पुर एता [६७९]–लोकांचा अग्रगामी, नेता, पुढारी.
४० धीरः [६७९]- धैर्यधारी वीर.
४१ सत्यः [६८३]- सत्य कार्य करणारा.
४२ कृत्व्यः [६९८]- कर्म करणाऱ्याचा सहाय्यक.
४३ दुरोषं सोमं [६९९]- दुष्टांचा नाश करणारा सोम आहे.

अग्निचें विशेषण आतां पहा—

१ ऊर्जः न-पातः [७०४]- बल कमी न करणारा.

या अध्यायांत हे देवतांचे गुण दिले आहेत. ते उपासकांनीं आपणांमध्यें धारण करावे व ते आपणांमध्यें वाढवावे व या गुणांनीं युक्त व्हावें यासाठीं हे गुण येथें वर्णिले आहेत.

वाचकांनीं हे दिव्य गुण पहावे व आपणांमध्यें ते धारण करावे. असें केलें असतां आपला उत्कर्ष कसा होईल तें त्यांनीं पहावें. या गुणांमध्यें कांहीं गुण इन्द्राचे, अग्निचे, मित्र व वरुण यांचे आहेत. व कांहीं गुण सोमाचेहि आहेत. देवतेचे हे गुण आहेत हें येथें लक्ष्यांत ठेवावें. ज्या गुणांनीं देवता युक्त आहे ते गुण उपासकांनीं आपल्यामध्यें धारण करून ते आपणांमध्यें वाढवावयाचे आहेत. देवता लहान असो अथवा मोठी

असो. आपण त्या गुणाकडे लक्ष्य द्यावयाचें आहे. आपण गुण आपलेसे करून आपण देवत्व प्राप्त करावयाचें आहे. इतर बाबींकडे पहावयाचें नाहीं. हा येथें पाळावयाचा नियम आहे.

धन प्राप्त करणें

मनुष्याच्या उन्नतिचीं सर्व कार्यें धनानें होतात. धना-शिवाय कांहीं होऊं शकत नाहीं. धनाचा योग्य उपयोग केल्यानें मनुष्य धन्य होतो. असें हें धन मनुष्याला सुख प्राप्त करून देणारें आहे. या धनासंबंधीं या अध्यायामध्यें असें म्हटलें आहे—

१ द्यु-क्षं [६८६]- द्युलोकामध्यें असणारें, तेजस्वी. द्युलोकांत जे पदार्थ आहेत ते सर्व तेजस्वी असतात. तसें धन तेजस्वी आहे.

२ सु-दानुं [६८६]- उत्तम दान देण्यास योग्य.

३ तविषीभिः आवृतं [६८६]- अनेक सामर्थ्यांनीं युक्त, ज्याच्यामुळें अनेक प्रकारचीं सामर्थ्यें प्रकट होऊं शकतात.

४ पुरुभोजसं [६८६]- पुष्कळांस भोजन देणारें, पुष्कळ अन्न देणारें. धन जवळ असेल तर पुष्कळांस अन्न देणें शक्त होतें.

५ क्षु-मन्तं [६८६]- पुष्कळ अन्नानें युक्त.

६ शतिनं सहस्रिणं [६८६]- शेंकडों व हजारों सामर्थ्यांनीं युक्त.

७ गोमन्तं वाजं [६८६]- गाई ज्याच्याबरोबर आहेत असें अन्न देणारे.

धनाचे हे गुण या मंत्रांत सांगितले आहेत ते सर्वच्या सर्व मननीय आहेत.

८ मानुषाणां विश्वा द्युम्नानि आ अर्यः सिषासन्तः वनामहे [६७४]- मनुष्यांना उपयोगी असलेलीं सर्व धनें प्राप्त करून तुझी सेवा करूं इच्छिणारे आम्ही तुझें स्तवन करीत आहों.

९ रत्नधा देवः हिरण्ययः ऋतस्य योनिं आसी-दसि [६७५]- रत्नांचे धारण करणारा हा सुवर्णमय देव यज्ञामध्यें आपल्या स्थानावर बसतो. हा देव रत्नांचें धारण करतो. सुवर्णांचीं भूषणें घालतो. हा भक्तांना धन देतो.

१० हे इन्द्र ! अश्वायन्तः गव्यन्तः वाजिनः त्वा हवामहे [६८१]- हे इन्द्रा ! घोडे गाई व धन किंवा अन्न यांची इच्छा करणारे आम्ही तुझी प्रार्थना करीत आहों. तूं आम्हास हें सर्व दे.

११ दृढा चित् वसु आरुजे त्वा मत्सत् [६८३]- सुदृढ असलेलें शत्रूचें धन विनष्ट करण्यासाठीं हा सोम तुला प्रसन्न करीत आहे.

१२ जरित्रे उक्थ्यं दाता [६८८]- स्तवन करणाऱ्यांना प्रशंसनीय धन देतो.

१३ मघोनां राधः पर्षि [६९१]- धनवान् शत्रूंकडे असलेलें धन आम्हांला दे.

याप्रमाणें धनाविषयीं या अध्यायामध्यें वर्णन आहे. शत्रू-कडे असलेलें धन त्याचा पराभव करून तें आपणाकडे यावें अशी इच्छा येथें आहे. शत्रूचा पराभव करण्याचें बल आपणा-मध्यें असावें हा याचा उद्देश आहे. धनाबरोबर बल, सामर्थ्य, शौर्य, वीर्य आदि गुण अंगीं असले पाहिजेत हा भाव येथें आहे.

सोम देवांसाठीं आहे

सोमरस तयार केल्यानंतर तो देवांना अर्पण करावा व मग इतर याजकांनीं सेवन करावा. हें दाखवण्यासाठीं म्हटलें आहे—

१ इन्द्राय मदः पवस्व [६९२]-

२ इन्द्राय वरुणाय मरुद्भ्यः परिस्रव [६७३]- इन्द्र, वरुण, मरुत् आदि देवांना देण्यासाठीं सोमरस गाळून शुद्ध करा.

३ सः अस्मयुः, हव्यदातये दाशेम [७०४]- तो अग्नि आमचें हित करणारा आहे. त्याला हव्य देण्यासाठीं आम्ही हवनीय द्रव्यें देत आहों.

४ पुरोजिती [६९७]- तुम्ही असें समजावें कीं आपल्या-पुढें जय उभा आहे. आपला पराभव कधींहि होणार नाहीं. इतकें बल आपलें असलें पाहिजे. आपणामध्यें भित्रेपणा मुळींच नसावा. तर विजय मिळवण्याची खात्री स्थिर राहिल असा शूरपणा असावा.

सोमरसाजवळ कुत्रा न यावा

सोमरस जेथें ठेवतात, त्या जागेजवळ कुत्रा येऊं नये अशी खबरदारी घेतली पाहिजे. यासाठीं सुचविलें आहे.

१ सुताय मादयित्नवे दीर्घजिह्व्यं अप श्नथिष्टन [६९७]- हा सोमरस आनंद देणारा असल्यामुळें लांब जीभ असेलेल्या कुत्र्याला जवळ येऊं देऊं नका. कुत्र्याला फार दूर ठेवा. तो सोमरसाजवळ पोंचूं नये असें करा.

स्तुतिपासून लाभ

इन्द्रादि देवांची स्तुति यज्ञामध्यें मुख्य असते. देवांची स्तुति ऐकावी व देवांसारखें व्हावें हा या स्तुतिचा उपयोग आहे.

१ नः ब्रह्माणि उप श्रृणु [६६७]- आमचीं स्तोत्रें जवळून ऐका. " ब्रह्म " शब्दाचा अर्थ " ज्ञान " देणारें स्तोत्र. मोठें होण्याचें शिक्षण देणारें स्तोत्र. देवतांचीं स्तोत्रें उपासकांना मोठें होण्याचें शिक्षण देत असतात. देवांचे गुण ऐकावे, ते आपणामध्यें आणावे, ते आपणामध्यें स्थिर करावे व वाढवावे, म्हणजे मनुष्य मोठा होत असतो. प्रशंसनीय बनत असतो.

२ मघवन् ! त्वावान् अन्यः दिव्यः न, पार्थिवः न, न जातः न जनिष्यते [६८१]- हे इन्द्रा! तुझ्यासारखा दुसरा कोणी द्युलोकांत अथवा पृथिवीवर झाला नाहीं किंवा होणारही नाहीं. असें अद्वितीयत्व आपण प्राप्त करावें व लोकोत्तर व्हावें. हा स्तुतिचा आशय आहे.

३ यज्ञायज्ञा दक्षसे अग्नये गिरागिरा [७०३]- प्रत्येक यज्ञामध्यें दक्ष व बलवान् अग्निची स्तुति करा. जो दक्ष व बलवान् असतो त्याची सर्वत्र प्रशंसा होत असते म्हणून कर्तव्यदक्ष बनावें व बलवान् बनावें. असा जो होईल त्याची सर्वत्र प्रशंसा होईल.

देवतांच्या स्तुतिपासून असा लाभ होत असतो. आपल्या अंगीं कोणते गुण वाढवले पाहिजेत हें स्तुतिच्या मंत्रांपासून समजून येतें.

यज्ञ

यज्ञ हा देवतांच्या संतुष्टींसाठीं करावयाचा असतो.

ऋतुसंधिषु व्याधिर्जायते ।
ऋतुसंधिषु यज्ञाः क्रियन्ते ॥ (गोपथ ब्रा.)

ऋतुसंधिकालामध्यें हवा बिघडते व त्यांतील दोष दूर करण्यासाठीं यज्ञ केले जातात. हे औषधींचे यज्ञ असतात. म्हणजे जे रोग होण्याचा संभव असतो किंवा जे रोग सुरू झालेले असतात, त्यांना दूर करणाऱ्या औषधींच्या चूर्णांचें हवन केलें जातें. म्हणजे त्या योगानें हवेंतील रोगबीजें नष्ट होतात व वायुची प्रसन्नता होते.

१ त्वा समिद्भिः घृतेन वर्धयामसि [६६१]- हे अग्ने ! तुला समिधा व गाईचें तूप यांनीं आम्हीं प्रदीप्त करीत आहों याठिकाणींच गाईचें तूप घेतलें पाहिजें अन्य तूप घेऊन चालणार नाहीं.

२ यविष्ठ्य ! बृहत् शोच [६६१]- हे तरुण अग्ने ! तूं अधिक प्रकाशित हो, अधिक प्रदीप्त हो.

३ हव्यदातये आ याहि [६६०]- हवनीय द्रव्यें देवतांजवळ पोंचवण्यासाठीं ये. अर्थात् तुझ्यामध्यें जें आम्ही हवन करूं तें त्या त्या देवतेची प्रसन्नता करण्यासाठीं त्या देवतेजवळ पोंचव.

४ नः गव्यूतिं घृतैः उक्षतम् [६६३]- आमच्या गाई जेथें राहतात तेथें गाईच्या तुपाचें सिंचन होऊन तें स्थान पवित्र होऊं दे. गाईच्या तुपाच्या हवनानें सर्व स्थान पवित्र होतें इतकें विष नाश करण्याचें सामर्थ्य गाईच्या तुपामध्यें आहे.

इन्द्राचे घोडे

इन्द्राचे घोडे प्रसिद्ध आहेत. इन्द्र घोड्यांचा वंश उत्तम करतो व घोड्यांना शिकवून तयार करतो. याविषयींचें असें वर्णन आहे—

१ तरोभिः इन्द्रं बृहत् गायत [६८७]- घोड्यांसह राहणाऱ्या इन्द्राला बृहत् नामक सामाचें गायन ऐकवा. "तरु" चा अर्थ येथें त्वरेनें धांवणारे घोडे असा आहे. शर्यतीमध्यें जे घोडे वापरतात ते घोडे इन्द्राजवळ असतात.

२ ब्रह्मयुजा केशिनौ हरी त्वा आ वहतां [६६७]- शब्दांचा इशारा होतांच रथाला जोडले जाणारे दोन केंसाळ घोडे इन्द्राला रथांतून नेतात. घोड्यांची आयाळ उत्तम असते म्हणून त्यांना येथें "केशिनौ" उत्तम आयाळ असलेले असें म्हटलें आहे.

३ इषिरस्य उरुयुगे उरौ रथे इन्द्रवाहा वचोयुजा स्वर्विदः हरी गाथया युंजन्ति [७१२]- प्रगतिशील, इन्द्राच्या मोठें जूं असलेल्या मोठ्या रथाला इशाऱ्याचे शब्द उच्चारतांच जोडले जाणारे इन्द्राचे दोन घोडे, स्वतःचें स्थान जाणणारे, स्तोत्र म्हणतांच जोडले जातात.

असे इन्द्राचे घोडे होते. इशारा होतांच आपआपल्या जागेवर रथाजवळ जाऊन ते उभे राहत असत. त्यांना नुसत्या इशाऱ्यानें सर्व कांहीं करावयाचें तें समजत असे. इतके ते हुषार असत. घोडे असे शिकवून तयार करावे हें येथें सुचविलें आहे—

सोम

सोमरसाचें यज्ञामध्यें मोठें महत्त्व आहे. हा सोम उंच पर्वतावरून आणला जात असे. पहा—

१ नभः आगतं वरेण्यं सुतं [६६९]- आकाशांतून आणलेला हा मोठा सोम आहे, त्याचा रस काढला आहे. हिमालयाच्या उंच शिखरावरून हा सोम आणला आहे.

२ ते अन्धसः दिवि उच्चा जातं [६७२]- तुझ्या अन्नरूप सोमाची उत्पत्ति उंच द्युलोकांत झाली आहे. हा उंच द्युलोक म्हणजे हिमालयाचें उंच शिखर होय.

३ मधु प्रियं दिव्यं ऊधः दुहानः [६७६]- मधुर प्रिय अशा द्युलोकरूपी दुग्धाशयामधून हा दोहून काढला आहे.

४ दिवः विष्टम्भः देवः [६७८]- द्युलोकाला आधार देणारा हा दिव्य सोम आहे.

या प्रमाणें सोमाचें स्थान उंच हिमालय पर्वताच्या शिखरावर आहे. तेथून तो आणतात व त्याचा रस काढून त्याचा यज्ञ करतात.

५ उग्रं सत् शर्म महि श्रवः भूमि आददे [६७२] – उग्रता व वीरता वाढवणारें सुखदायी सोमरसरूपी मोठें अन्न भूमिवर आलें आहे. स्वर्गातील सोम पृथिवीवर आणला

आहे. हा सोमरस हें मोठें यश प्राप्त करून देणारें उत्कृष्ट साधन आहे. यज्ञ करणाराला मोठें यश प्राप्त होत असतें.

सोमरस पाण्यांत मिसळतात

१ सोमः पुनानः, आपः वसानः धारया अर्षति [६७५]- सोमरस गाळून पवित्र करण्याच्या पूर्वी त्याला पाण्यांत मिसळण्यांत येतो, मग तो गाळणींतून खालच्या भांड्यांत गाळला जातो. तो खालच्या भांड्यांत धारेनें पडतो. तेव्हां त्याचा शब्द होतो.

२ धीतयः अवावशन्त [६५८]- हाताच्या अंगुली सोमाला पुनः पुनः दाबून रस काढण्याची इच्छा करीत आहेत. चांगला दाबल्याशिवाय त्यांतून सर्व रस बाहेर येत नाहीं.

३ बर्हिः अच्छ रशनाभिः नयन्ति [६७७]- यज्ञस्थानाकडे अंगुलींनीं पकडून ऋत्विजलोक सोमाला नेतात.

गाळणी

१ अव्यये वारे मधुश्चुतं कोशं अच्छ असृग्रं [६५८]- मेंढीच्या केसांच्या गाळणींमधून मधुर रस भरण्याच्या भांड्यांत मी गाळीत आहें.

मेंढीच्या केसांच्या गाळणींमधून तो गाळला जातो.

सोमरस गाळणें

१ दिवा पवस्व [६५६]- दिव्य प्रकाशानें युक्त होऊन गाळला जा. चमकत गाळला जा.

२ हे सोम ! इन्द्राय पातवे सुतः स्वादिष्ठया मदिष्ठया धारया पवस्व [६८९]- हे सोमा ! इन्द्राला पिण्याला देण्यासाठीं स्वादिष्ट व आनंदकारक धारेनें गाळला जा.

३ अयोहते द्रोणे सधस्थं योनिं अभि आसदत् [६९०]- सुवर्णाच्या पात्रामध्यें जवळच्या यज्ञस्थानामध्यें सोमरस बसला आहे.

४ वनोहितः प्रियाणि नामानि अभिपवते, येषु यह्वः अधि वर्धते [७००]- अन्नरूप असल्यानें हितकारक सोम सर्वांना तृप्त करणाऱ्या पाण्यांमध्यें मिसळला जाऊन गाळला जातो, त्यामुळें तो महान् सोम वाढला जातो.

५ ऋतस्य जिह्वा वक्ता मधु पवते, अस्य धियः पतिः अदाभ्यः [७०१]- यज्ञाची जिव्हाच जणूं काय, असा हा सोम, शब्द करीत मधुर रस, यज्ञाचें पालन करणारा असा हा न दबला जाणारा सोम गाळला जात आहे.

अशा रीतिनें सोमरस गाळला जात असतो. त्यावेळीं त्याचा शब्द होतो, तो चमकतो. यामुळें त्याचीं अशीं आलंकारिक वर्णनें होतात.

सोम गाळण्याच्यावेळीं सामगान

जेव्हां सोमरस यज्ञामध्यें गाळला जातो, त्यावेळीं उद्गाते सामगायन करीत असतात. एका बाजूला सामगायन चालतें व दुसऱ्या बाजूला हा सोमरस गाळला जातो.

१ हे नरः ! पवमानाय इन्दवे उप गायत [६५१]- हे याजक हो ! सोमरस गाळला जात असतां तुम्ही त्याच्याजवळ बसून गायन करा.

२ ऋतस्य दोहना अभि अनूषत, त्रिपृष्ठः उषसः अधि विराजसि [७०२]- यज्ञ करणारे ऋत्विज सोमाची स्तुति गात असतात. तीन सवनांमध्यें उषःकालानंतरच्या प्रकाशानंतर हे सोमा ! तूं अधिक चमकत असतोस.

सोमरस दुधांत मिसळतात

१ देवयु देवाय मधुना पयः अभि अशिश्रयुः [६५२]- देवांना देण्यासाठीं तयार केलेला सोमरस मधुर गोदुग्धाशीं मिसळला जातो.

२ रुचाः शुक्राः सोमाः गवाशिरः [६५४]- तेजस्वी सोमरस गाईच्या दुधाशीं मिसळला जातो.

३ विप्रः पुर एता जनानां ऋभुः धीरः ऋषिः गोनां अपीच्यं गुह्यं नाम काव्येन विवेद [६७९]- ज्ञानी अग्रणी लोकांचा पुढारी धैर्यशाली ऋषि गाईमध्यें जें गुप्तरूपानें दूध आहे तें आपल्या ज्ञानानें जाणतो.

याप्रमाणें गाईच्या दुधामध्यें गाळलेला सोमरस मिसळला जातो व नंतर तो देवांना अर्पण करण्यांत येतो व त्यानंतर त्याचें प्राशन इतर लोक करतात.

याप्रमाणें या प्रथम अध्यायामध्यें वर्णन आलें आहे तें वाचकांनीं मननपूर्वक पहावें व जो बोध घेतां येईल तो घ्यावा.

सुभाषितें

१ हे राजन् ! नः गवे, अर्वते, जनाय ओषधिभ्यः शम् [६५३]-हे राजन् ! गाई, घोडे, लोक व औषधींचें कल्याण होवो.

२ हितः वाजं अक्रमीत्, यथा वनुषः सीदन्तः [६५५]- हित करणाऱ्या वीरानें युद्ध भूमीवर जावें, ज्याप्रमाणें योद्धे युद्धामध्यें जातात.

३ स्वस्तये दशो दिवा पवस्व [६५६]- सर्वांचें कल्याण व्हावें या दृष्टीनें तेजानें युक्त होण्यासाठीं शुद्ध हो.

४ श्रवस्यवः सर्गाः असृक्षत [६५७]- यशस्वी कार्ये उत्पन्न करावीं.

५ धीतयः अवावशन्त [६५८]- अंगुलि कार्य करण्याची इच्छा करीत आहेत.

६ ऋतस्य योनिं आ अग्मन् [६५९]- सत्याच्या मूल केन्द्रामध्यें जा. सत्याच्या किंवा यज्ञाच्या स्थानीं जावें.

७ हव्यदातये आयाहि [६६०]- अन्नदान करण्यासाठीं ये.

८ बर्हिषि नि षत्सि [६६०]- आपल्या आसनावर बैस.

९ हे यविष्ठ्य ! बृहत् शोच [६६१]- हे तरुणा ! तूं विशेष तेजानें युक्त हो. विशेष तेजस्वी हो.

१० हे देव ! पृथुश्रवाय्यं बृहत् सुवीर्यं नः अच्छ विवाससि [६६२]- हे देवा ! पुष्कळ यशस्वी असें मोठें सामर्थ्य आम्हांला मिळेल असें कर.

११ शुचिव्रता उरुशंसा नमोवृधा दक्षस्य महा राजथः [६६४]- शुद्ध निर्दोष व्रताचें आचरण करून, पुष्कळ प्रशंसित होऊन, अन्नाची समृद्धि करून सामर्थ्याच्या मोठेंपणानें विराजमान् व्हा.

१२ ऋतावृधा ऋतस्य योनौ सीदतं [६६५]- सत्य यज्ञकर्माचें संवर्धन करून यज्ञाच्या स्थानीं बसा.

१३ नः ब्रह्माणि उपश्रृणु [६६७]- आमचीं ज्ञान वाढवणारीं भाषणें जवळून ऐक.

१४ ब्रह्माणः त्वा युजा हवामहे [६६८]- आम्ही ज्ञानी तुला मित्रत्वाच्या नात्यानें सहाय्यार्थ बोलावीत आहों.

१५ यज्ञः चेतनः जिगाति [६७०]- यज्ञ चेतना उत्पन्न करून तुम्हांला प्रेरणा देतो.

१६ यज्ञस्य जूत्या कविच्छदा वृणे [६७१]-यज्ञाच्या प्रेरणेनें प्रेरित होऊन ज्ञानाचा छंद धारण करणाऱ्यांना मी स्वीकारतों.

१७ उग्रं सत् महि श्रवः शर्म [६७२]- तुझें उग्रतावीरतावर्धक मोठें यश कल्याण करणारें आहे.

१८ मानुषाणां विश्वा द्युम्नानि आ अर्यः सिषासन्तः वनामहे [६७४]- मनुष्यांना इष्ट असलेल्या सर्व तेजस्वी धनांना प्राप्त करून आम्ही तुझी सेवा करूं इच्छिणारे तुला भजत आहों.

१९ रत्नधा हिरण्ययः देवः ऋतस्य योनिं आसीदसि [६७५]- रत्नें धारण करणारा सुवर्णासारखा तेजस्वी देव यज्ञाच्या ठिकाणीं बसतो. यज्ञ करतो.

२० वाजी विचक्षणः नृभिः धौतः आपृच्छयं धरुणं अर्षसि [६७६]- बलवान् ज्ञानी, वीर नेत्यांनीं निर्दोष ठरवलेला, प्रशंसनीय कर्मच करीत असतो.

२१ स्वायुधः अ-शस्ति-हा वृजना रक्षमाणः देवानां पिता जनिता सु-दक्षः देवः पवते [६७८]- उत्तम शस्त्रें व अस्त्रें धारण करणारा, शत्रूंचा नाश करणारा, उपद्रवांना दूर करणारा, संरक्षण करणारा, उत्तम व्यवहार करणारांचा पिता जनक, उत्तम दक्ष जो आहे तोच श्रेष्ठ शुद्ध होत असतो.

२२ विप्रः पुर एता, जनानां ऋभुः धीरः ऋषिः काव्येन विवेद [६७९]- ज्ञानी, पुढारी, लोकांचा नेता, धैर्यशाली द्रष्टा आपल्या ज्ञानानें सर्व जाणतो.

२३ अस्य तस्थुषः जगतः ईशानं स्वर्दृशं अभि नोनुमः [६८०]- या सर्व जगाच्या स्थावर जंगमाचा स्वामी व आत्मदर्शी जो आहे त्याला आम्ही प्रणाम करतों.

२४ हे इन्द्र ! त्वावान् अन्यः दिव्यः पार्थिवः न जातः न जनिष्यते [६८१]- हे इन्द्रा ! तुझ्यासारखा दिव्य, पार्थिव असा दुसरा कोणीहि न झाला आहे व न होईल. तुझ्यासारखा तूंच आहेस.

२५ सदावृधः चित्रः सखा कया ऊत्या कया शचिष्ठया वृता नः आ भुवत् [६८२]- नेहेमीं वाढणारा उत्तम मित्र, कोणत्या संरक्षणाच्या शक्तिनें व कोणत्या मोठ्या शक्तिनें युक्त होऊन आमची सहाय्यता करण्यासाठीं आमच्याजवळ येईल बरें ?

२६ मंहिष्ठः सत्यः मदानां कः [६८३]- मोठा सत्य आचरण करणारा कोण बरें खरा आनंद देणारा आहे ?

२७ नः शतं ऊतये सु अभि भवासि [६८४]- आमचें संरक्षण शेंकडों प्रकारांनीं करण्यासाठीं तूं उत्तम सहाय्य करणारा हो.

२८ दस्मं ऋतीषहं अन्धसः मन्दानं इन्द्रं गीर्भिः नवामहे [६८५]- सुन्दर, शत्रूंचा पराभव करणाऱ्या, अन्नानें आनंदित होणाऱ्या इन्द्राची वाणींनीं आम्ही स्तुति करीत आहों.

२९ द्युक्षं सुदानुं तविषीभिः आवृतं पुरुभोजसं क्षुमन्तं शतिनं सहस्रिणं गोमन्तं वाजं मक्षू ईमहे [६८६]- तेजस्वी, उत्तम दान ज्याचें होतें अशा, अनेक सामर्थ्यांनीं युक्त, पुष्कळ भोजन देणाऱ्या अन्नानें युक्त, शेंकडों व हजारों प्रकारच्या गाईंच्या पासून उत्पन्न झालेल्या अन्नाची प्राप्ति लवकर व्हावी असें आम्ही इच्छीत आहों.

३० सबाधः ऊतये इन्द्रं बृहत् गायत [६८७]- बाधा करणाऱ्या शत्रूंपासून संरक्षण करणाऱ्या इन्द्रासाठीं बृहत् सामाचें गायन करा.

३१ भरं न कारिणं हुवे [६८७]– भरणपोषण करणाऱ्याप्रमाणें कार्य करणाऱ्याला मी बोलावीत आहें.

३२ सु-शिप्रं दुध्राः स्थिराः मुरः न वरन्ते [६८८]– उत्तम साफा बांधणाऱ्या इन्द्राचा प्रतिकार दुष्ट, स्थिर व मूर्ख शत्रू करूं शकत नाहींत.

३३ जरित्रे उक्थ्यं दाता [६८८]– स्तुति करणाऱ्याला तो प्रशंसनीय धन देतो.

३४ रक्षोहा विश्व-चर्षणिः [६९०]– राक्षसांचा वध करणारा सर्व मानवांचें हित करीत असतो.

३५ वरिवोधातमः वृत्रहन्तमः मघोनां राधः पर्षि [६९१]– अधिक धन देणारा, शत्रूंना मारणारा तूं धनवान् शत्रूंकडील धन आम्हांस दे.

३६ मधुमत्तमः क्रतु-वित्तमः महि द्युक्षतमः [६९२] –अत्यंत मधुर, यज्ञाचें विधान उत्तम रीतिनें जाणणारा मोठा तेजस्वी असतो.

३७ स्वः-विदः सु-प्रकेतः इनः अभ्यक्रमीत् [६९३] –आत्मज्ञानी विशेष विद्वान् शत्रूंच्या स्थानावर आपला अधिकार स्थापन करतो.

३८ जेषस्य चेतति [६९५]– विजय प्राप्त करण्यास उत्तेजन देतो.

३९ इन्द्रः चापं वृषणं वज्रं च गृभ्णाति [६९६]– तो वीर इन्द्र धनुष्य घेतो व बलयुक्त वज्र धारण करतो.

४० पुरोजिती [६९७]– आपल्यासमोर विजय आहे असें समजा.

४१ नरः दुरोरसं ते विश्वाच्या धिया अद्रयः सन्तु [६९९]– नेते लोक दुष्टांचा नाश करणाऱ्या त्या वीराचा सर्वांचें संरक्षण करण्याच्या बुद्धिनें आदर करणारे होवोत.

४२ विष्वंचं अधिरथं विचक्षणः आरुहत् [७००]– चहूंकडे गमन करणाऱ्या रथावर विशेष ज्ञानी बसला आहे.

४३ अस्य धियः पातिः अदाभ्यः [७०१]– या कर्माचें पालन करणारा दबला जाणार नाहीं.

४४ यज्ञायज्ञा दक्षसे गिरा अमृतं प्रशंसिषम् [७०३]– प्रत्येक यज्ञामध्यें बल प्राप्तीसाठीं आपल्या वाणीनें अमर देवाची स्तुति करा.

४५ ऊर्जो न-पातं [७०४]– बल कमी न करणाऱ्याची मी प्रशंसा करतो.

४६ वाजेषु अविता [७०४]– युद्धांमध्यें तो आमचें रक्षण करणारा आहे.

४७ वृधः भुवत् [७०४]– आमची शक्ति वाढवणारा तो आहे.

४८ तनूनां त्राता भुवत् [७०४]– आमच्या शरीरांचें रक्षण करणारा तो आहे.

४९ ते मनः यत्र क्व च तत्र उत्तरं दक्षं दधसे [७०६]– तुझें मन कोठेंहि असो तें उत्तम श्रेष्ठ बल धारण करतें.

५० योनिं कृणवसे [७०६]– तूं आपलें घर तयार करतोस.

५१ ते पूर्तं अक्षिपत् न हि भुवत् [७०७]– तुझें तेज डोळ्यांना बाधा करणारें होत नाहीं.

५२ हे अपूर्व्य वज्रिन् ! भरन्तः वयं अवस्यवः चित्रं त्वां हवामहे [७०८]– हे अद्वितीय वज्रधारी इन्द्रा ! आम्ही तुला हवनीय अन्न देत आहों, आमचें रक्षण करण्यासाठीं विलक्षण शक्तिमान् अशा तुला सहाय्यासाठीं बोलावीत आहों.

५३ अवितारं त्वा ववृमहे [७०९]– रक्षण करणाऱ्या तुला बोलावीत आहों.

५४ कर्मन् ऊतये उप चक्राम [७०९]–कर्म करीत असतां संरक्षणासाठीं आम्ही तुझ्याकडे येत आहों.

याप्रमाणें या अध्यायांत सुभाषितें आहेत. यांचा अर्थ थोडा मोकळेपणानें, वाचकांच्या सहज ध्यानांत यावा यासाठीं, दिला आहे.

उपमा

या प्रथम अध्यायामध्यें पुढे दिलेल्या उपमा आल्या आहेत —

१ हितः वाजी वाजं अक्रमीत् यथा वनुषः सीदन्तः [६५५]– हित करणारा बलवान् सोम यज्ञामध्यें तसा जातो, ज्याप्रमाणें योद्धे वीर युद्धभूमीमध्यें जातात.

२ अर्वन्तः न [६५७]– घोडे जसे अश्वशाळेंतून बाहेर पडतात, त्याप्रमाणें " पवमानस्य ते सर्गाः असृक्षत " शुद्ध होणाऱ्या सोमाच्या धारा खालील भांड्यांत पडतात.

३ धेनवः अस्तं न [६५९]– गाई ज्याप्रमाणें आपल्या गोठ्यांत जातात, त्याप्रमाणें " इन्दवः समुद्रं कलशं न अच्छ आ अग्मन् " सोमरस पाण्याच्या भांड्यांत सरळपणानें जातात.

४ वाजिनं अश्वं न, त्वा मर्जयन्तः [६७७]– बलवान् घोड्याला ज्याप्रमाणें धुतात, त्याप्रमाणें सोमरसाला स्वच्छ करतात.

५ अदुग्धाः धेनवः इव, जगतः तस्थुषः ईशानं स्वर्दृशं त्वा अभिनोनुमः [६८०]– दूध काढलें नाहीं

*

अशा गाई ज्याप्रमाणें आपल्या वांसरांजवळ येतात, त्याप्रमाणें स्थावर जंगमाच्या स्वामी तुज ईश्वराजवळ नम्र होऊन आम्ही येतों.

६ स्वसरेषु वत्सं धेनवः इव, दस्मं इन्द्रं गीर्भिः नवामहे [६८५]- गोशालेमध्यें आपल्या वांसराजवळ जशा गाई जातात, त्याप्रमाणें दर्शनीय इन्द्राजवळ आपल्या वाणींनीं स्तुति करीत आम्ही जातों.

७ भरं न, कारिणं हुवे [६८७]- लोक भरणपोषण करणाऱ्याला ज्याप्रमाणें आदरानें बोलावतात, त्याप्रमाणें कर्तृत्ववान् पुरुषाला आम्ही बोलावीत आहों.

८ एतशः वाजं अभि न, सु प्रकेतः इषः अभ्य-क्रमीत् [६९३]- घोडा जसा युद्धामध्यें विजय मिळवितो, त्याप्रमाणें उत्तम ज्ञानी इन्द्र सोमरसरूपी अन्नाला प्राप्त करतो व त्यावर विजय मिळवतो, त्याला पिऊन टाकतो.

९ अश्वः न, इन्दुः धारया परि प्रस्यन्दते [६९८] - घोड्याप्रमाणें सोम धारेनें गाळला जातो. भांड्यांत प्रवेश करतो.

१० प्रियं मित्रं न, अमृतं जातवेदसं प्रशंसिषम् [७०३]- प्रिय मित्राप्रमाणें अमर अग्निची मी प्रशंसा करतों.

११ स्थूरं न, चित्रं त्वा हवामहे [७०८]- जसें कोणी मोठ्या माणसाला बोलावतो, त्याप्रमाणें विलक्षण श्रेष्ठ अशा तुला आम्ही आमच्या सहाय्यासाठीं बोलावतों.

१२ उदा इव ग्मन्तः उदभिः त्वा उप ससृग्महे [७१०]- पाणी घेऊन जाणारे ज्याप्रमाणें पाण्यानेंच खेळतात, त्याप्रमाणें आम्ही तुझ्याबरोबर खेळत आहों.

१३ हे अद्रिवः शूर ! वार्णः यव्याभिः वर्धन्ति, वावृध्वांसं त्वा चित् दिवेदिवे [७११]- हे वज्रधारी इन्द्रा ! ज्याप्रमाणें समुद्राला नद्या वाढवतात, त्याप्रमाणें वाढत असणाऱ्या तुला आम्ही दररोज स्तुतींनीं वाढवीत आहों.

याप्रमाणें उपमा या अध्यायामध्यें आहेत. त्यांचा विचार वाचकांनीं करावा.

प्रथमाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
६५१	९।११।१	असितः काश्यपो देवलो वा	पवमानः सोमः	गायत्री
६५२	९।११।२	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
६५३	९।११।३	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
६५४	९।६४।२८	कश्यपो मारीचः	,,	,,
६५५	९।६४।२९	कश्यपो मारीचः	,,	,,
६५६	९।६४।३०	कश्यपो मारीचः	,,	,,
६५७	९।६६।१०	शतं वैखानसः	,,	,,
६५८	९।६६।११	शतं वैखानसः	,,	,,
६५९	९।६६।१२	शतं वैखानसः	,,	,,
		(२)		
६६०	६।१६।१०	भरद्वाजो बार्हस्पत्यः	अग्निः	,,
६६१	६।१६।११	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
६६२	६।१६।१२	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
६६३	३।६२।१६	विश्वामित्रो गाथिनः	मित्रावरुणौ	,,
६६४	३।६२।१७	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
६६५	३।६२।१८	विश्वामित्रो गाथिनः जमदग्निर्वा	मित्रावरुणौ	गायत्री
६६६	८।१७।१	इरिम्बिठिः काण्वः	इन्द्रः	"
६६७	८।१७।२	इरिम्बिठिः काण्वः	"	"
६६८	८।१७।३	इरिम्बिठिः काण्वः	"	"
६६९	३।१२।१	विश्वामित्रो गाथिनः	इन्द्राग्नी	"
६७०	३।१२।२	विश्वामित्रो गाथिनः	"	"
६७१	३।१२।३	विश्वामित्रो गाथिनः	"	"
		(३)		
६७२	९।६१।१०	अमहीयुरांगिरसः	पवमानः सोमः	"
६७३	९।६१।११	अमहीयुरांगिरसः	"	"
६७४	९।६१।१२	अमहीयुरांगिरसः	"	"
६७५	९।१०७।४	सप्तर्षयः		प्रगाथः (विषमा बृहती, समा सतो बृहती)
६७६	९।१०७।५	सप्तर्षयः	"	"
६७७	९।८७।१	उशना काव्यः	"	त्रिष्टुप्
६७८	९।८७।२	उशना काव्यः	"	"
६७९	९।८७।३	उशना काव्यः	"	"
		(४)		
६८०	७।३२।२२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	इन्द्रः	प्रगाथः (विषमा बृहती, समा सतो बृहती)
६८१	७।३२।२३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
६८२	४।३१।१	वामदेवो गौतमः	"	गायत्री
६८३	४।३१।२	वामदेवो गौतमः	"	"
६८४	४।३१।३	वामदेवो गौतमः	"	पादनिचृत्
६८५	८।८८।१	नोधा गौतमः	"	प्रगाथः (विषमा बृहती, समा सतो बृहती)
६८६	८।८८।२	नोधा गौतमः	"	"
६८७	८।६६।१	कलिः प्रागाथः	"	"
६८८	८।६६।२	कलिः प्रागाथः	"	"
		(५)		
६८९	९।१।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	पवमानः सोमः	गायत्री
६९०	९।१।२	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	"	"
६९१	९।१।३	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	"	"
६९२	९।१०८।१	गौरवीति शाक्त्यः	"	काकुभः प्रागाथः (विषमा ककुप्, समा सतो बृहती)
६९३	९।१०८।२	गौरवीति शाक्त्यः	"	"

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
६९४	९।१०६।१	अग्निश्चाक्षुषः	पवमानः सोमः	उष्णिक्
६९५	९।१०६।२	अग्निश्चाक्षुषः	,,	,,
६९६	९।१०६।३	अग्निश्चाक्षुषः	,,	,,
६९७	९।१०१।१	अन्धीगुः श्यावाश्विः	,,	अनुष्टुप्
६९८	९।१०१।२	अन्धीगुः श्यावाश्विः	,,	गायत्री
६९९	९।१०१।३	अन्धीगुः श्यावाश्विः	,,	,,
७००	९।७५।१	कविर्भार्गवः	,,	जगती
७०१	९।७५।२	कविर्भार्गवः	,,	,,
७०२	९।७५।३	कविर्भार्गवः	,,	,,
		(६)		
७०३	६।४८।१	शंयुर्बार्हस्पत्यः (तृणपाणिः)	अग्निः	प्रगाथः (विषमा बृहती, समा सतो बृहती)
७०४	६।४८।२	शंयुर्बार्हस्पत्यः (तृणपाणिः)	,,	,,
७०५	६।१६।१६	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	गायत्री
७०६	६।१६।१७	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
७०७	६।१६।१८	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
७०८	८।२१।१	सोभरिः काण्वः	इन्द्रः	काकुभः प्रगाथः (विषमा ककुप्, समा सतो बृहती)
७०९	८।२१।२	सोभरिः काण्वः	,,	,,
७१०	८।९८।७	नृमेध आंगिरसः	,,	ककुप्
१७१	८।९८।८	नृमेध आंगिरसः	,,	उष्णिक्
७१२	८।९८।९	नृमेध आंगिरसः	,,	पुर उष्णिक्

अथ द्वितीयोऽध्यायः ।

अथ प्रथमप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ १ ॥

[१]

(१-२२) १, ४ श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः; २, ८, १३-१५ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ३ मेधातिथिः काण्वः; प्रियमेधश्चांगिरसः; ५ इरिम्बिठिः काण्वः; ६ कुसीदी काण्वः; ७ त्रिशोकः काण्वः; ९ विश्वामित्रो गाथिनः; १० मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ११ शुनःशेप आजीगर्तिः; १२ नारदः काण्वः; १६ अवत्सारः काश्यपः; १७ (१) शुनःशेप आजीगर्तिः स देवरातः कृत्रिमो वैश्वामित्रः; १७ (२-३) मेध्यातिथिः काण्वः; १८ (१, ३) असितः काश्यपो देवलो वा; १८ (२) अमहीयुरांगिरसः; १९ त्रित आप्त्यः; २० सप्तर्षयः (१ भरद्वाजो बार्हस्पत्यः, २ कश्यपो मारीचः; ३ गोतमो राहूगणः, ४ अत्रिर्भौमः, ५ विश्वामित्रो गाथिनः, ६ जमदग्निर्भार्गवः, ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः); २१ शावाश्व आत्रेयः; २२ (१-२) अग्निश्चाक्षुषः; २२ (३) प्रजापतिर्वैश्वामित्रो वाच्यो वा ॥ १-१२ इन्द्रः; १३ अग्निः; १४ उषाः; १५ अश्विनौ; १६-२२ पवमानः सोमः ॥ १ (२-३)-११; १६-१९, २१; गायत्री, १२, २२ (१-२) उष्णिक्; १३-१५, २० प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती); १ (१), २२ (३) अनुष्टुप् ।

७१३ पान्तमा वो अन्धस इन्द्रमभि प्र गायत ।
विश्वासाहꣳशतक्रतुं मꣳहिष्ठं चर्षणीनाम् ॥ १ ॥ (ऋ. ८।९२।१)

७१४ पुरुहूतं पुरुष्टुतं गाथान्या३ꣳ सनश्रुतम् । इन्द्र इति ब्रवीतन ॥ २ ॥ (ऋ. ८।९२।२)

७१५ इन्द्र इन्नो महोनां दाता वाजानां नृतुः । महाꣳअभिज्ञ्वा यमत् ॥ ३ ॥ १ (वा) ॥ (ऋ. ८।९२।३)

७१६ प्र व इन्द्राय मादनꣳ हर्यश्वाय गायत । सखायः सोमपाव्ने ॥ १ ॥ (ऋ. ७।३१।१)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[७१३] (वः अन्धसः आ-पान्तं) आपण दिलेल्या सोमरूप अन्नरसाचें पान करणाऱ्या, (विश्वा-साहं) सर्व शत्रूंचा पराभव करणाऱ्या, (शत-क्रतुं) शेंकडों प्रकारचीं कर्मे करणाऱ्या, (चर्षणीनां मंहिष्ठं) मानवांमध्यें फार मोठ्या (इन्द्रं अभि प्रगायत) इन्द्राच्या स्तुतिचें गायन करा. ॥ १ ॥

[७१४] (पुरु-हूतं) पुष्कळ लोक सहाय्यार्थ ज्याला बोलावतात, (पुरुष्टुतं) पुष्कळ ज्याची स्तुति करतात, (गाथान्यं) जो स्तुति करण्यास योग्य आहे, (सन-श्रुतं) सनातन कालापासून जो प्रसिद्ध आहे (इन्द्रं इति ब्रवीतन) त्या इन्द्राची अशी स्तुति करा. ॥ २ ॥

[७१५] (नृतुः) सर्वांना चालवणारा, (नः) आम्हांला (महोनां वाजानां दाता) मोठ्या धन अन्न आदींचा दाता (महान् इन्द्रः इत् अभि-ज्ञुः) मोठा इन्द्रही आमच्यासमोर येऊन आम्हांला (आ यमत्) धन आदि देवो. ॥ ३ ॥

१ नृतुः— सर्वांना नाचवणारा, सर्वांना चालवणारा.

२ अभिः-ज्ञुः— समोरून पाहणारा, गुडघ्यापर्यंत वांकणारा.

[७१६] हे (सखायः) मित्र हो ! (वः) तुम्ही (हर्यश्वाय) घोडे ज्याच्याजवळ आहेत अशा (सोम-पाव्ने) सोम पिणाऱ्या इन्द्राला (मादनं प्रगायत) आनन्द देणारें स्तोत्र गा. ॥ १ ॥

१ हर्यश्वः- (हरि-अश्वः)— लाल घोडे ज्याच्याजवळ आहेत.

७१७ शꣳसेदुक्थꣳ सुदानव उत द्युक्षं यथा नरः । चकृमा सत्यराधसे ॥ २ ॥ (ऋ. ७।३१।२)

७१८ त्वं न इन्द्र वाजयुस्त्वं गव्युः शतक्रतो । त्वꣳहिरण्ययुर्वसो ॥ ३ ॥ २ (गौ) ॥ (ऋ. ७।३१।३)

७१९ वयमु त्वा तदिदर्था इन्द्र त्वायन्तः सखायः । कण्वा उक्थेभिर्जरन्ते ॥१॥ (ऋ. ८।२।१६)

७२० न घेमन्यदा पपन वज्रिन्नपसो नविष्टौ । तवेदु स्तोमैश्चिकेत ॥ २ ॥ (ऋ. ८।२।१७)

७२१ इच्छन्ति देवाः सुन्वन्तं न स्वप्नाय स्पृहयन्ति । यन्ति प्रमादमतन्द्राः ॥ ३ ॥ ३ (पा) ॥ (ऋ. ८।२।१८)

७२२ इन्द्राय मद्वने सुतं परि ष्टोभन्तु नो गिरः । अर्कमर्चन्तु कारवः ॥ १ ॥ (ऋ. ८।९२।१९)

७२३ यस्मिन्विश्वा अधि श्रियो रणन्ति सप्त सꣳसदः । इन्द्रꣳ सुते हवामहे ॥ २ ॥ (ऋ. ८।९२।२०)

---

[७१७] (उत) आणि हे मित्र हो ! (सु-दानवे) उत्तम दान देणाऱ्या (सत्य-राधसे) सत्य रीतिनें धन ज्याच्याजवळ आहे अशा इन्द्रासाठीं (उक्थं) स्तोत्राचें गायन करा. (नरः) अन्य स्तुति करणारे लोक जशी स्तुति करतात, तशी स्तुति तुम्ही (द्युक्षं शंस) तेजस्वी रीतिनें करा. (इत् चकृम) आणि आम्ही सुद्धां त्याची स्तुति करतों. ॥ २ ॥

[७१८] हे (इन्द्र) इन्द्रा ! (त्वं नः वाज-युः) तूं आम्हांला अन्न देणारा आहेस. हे (शत-क्रतो) अनेक प्रकारचे पराक्रम करणाऱ्या इन्द्रा ! (त्वं गव्युः) तूं गाई देणारा हो. हे (वसो) निवासका ! (त्वं हिरण्ययुः) तूं सोनें देणारा हो ॥ ३ ॥

[७१९] हे (इन्द्र) इन्द्रा ! (त्वायन्तः) तुला प्राप्त करूं इच्छिणारे (सखायः) आम्ही मित्र (तदिदर्थाः) त्याच हेतुसाठीं (त्वा) तुझी स्तुति करीत आहों. (उ) आणि (कण्वाः) कण्वगोत्रांतील लोक सुद्धां (उक्थेभिः जरन्ते) स्तोत्रांनीं स्तुति करतात. ॥ १ ॥

[७२०] हे (वज्रिन्) वज्रधारी इन्द्रा ! (अपसः) यज्ञकर्मापैकीं (तव नविष्टौ) तुझ्या नवीन यज्ञामध्यें (अन्यत् न घेम्) मी तुझ्या स्तोत्राशिवाय दुसरें स्तोत्र (आ-पपन) म्हणणारच नाहीं. (तव इत् उ) तुझ्याच (स्तोमैः चिकेत) स्तोत्रांनीं स्तुति करणें मी जाणत आहें. ॥ २ ॥

[७२१] (देवाः) देव (सुन्वन्तं इच्छन्ति) सोमरस काढणाऱ्याची इच्छा करतात. (स्वप्नाय न स्पृहयन्ति) आळशी जो आहे त्याची इच्छा करीत नाहींत. (अतन्द्राः) उद्यमी देवता (प्र-मादं यन्ति) परम आनन्द देणाऱ्या सोमाला प्राप्त करतात. ॥ ३ ॥

[७२२] (मद्वने इन्द्राय) आनंद देणाऱ्या सोमरसाची इच्छा करणाऱ्या इन्द्राची (सुतं) सोमरस तयार करतांना (नः गिरः परिष्टोभन्तु) आमच्या वाणी स्तुति करतात. (कारवः) स्तुति करणारे (अर्कं अर्चन्तु) स्तुतिला योग्य सोमाची स्तुति करोत. ॥ १ ॥

[७२३] (यस्मिन्) ज्या इन्द्रामध्यें (विश्वाः श्रियः अधि) सर्व शोभा राहिल्या आहेत व (सप्त संसदः रणन्ति) ज्याची स्तुति यज्ञाचे सात ऋत्विज करीत असतात, त्या (इन्द्रं) इन्द्राला (सुते हवामहे) सोमयागामध्यें आम्ही बोलावीत आहों. ॥ २ ॥

७२४ त्रिकद्रुकेषु चेतनं देवासो यज्ञमत्नत । तमिद्वर्धन्तु नो गिरः ॥ ३ ॥ ४ (ला) ॥
(ऋ. ८।९२।२१)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

७२५ अयं त इन्द्र सोमो निपूतो अधि बर्हिषि । एहीमस्य द्रवा पिब ॥ १ ॥ (ऋ. ८।१७।११)

७२६ शाचिगो शाचिपूजनायं रणाय ते सुतः । आखण्डल प्र हूयसे ॥ २ ॥ (ऋ. ८।१७।१२)

७२७ यस्ते शृङ्गवृषो णपात्प्रणपात्कुण्डपाय्यः । न्यस्मिं दध्र आ मनः ॥ ३ ॥ ५ (दि) ॥
(ऋ. ८।१७।१३)

७२८ आ तू न इन्द्र क्षुमन्तं चित्रं ग्राभं सं गृभाय । महाहस्ती दक्षिणेन ॥१॥ (ऋ. ८।८१।१)

७२९ विद्मा हि त्वा तुविकूर्मिं तुविदेष्णं तुवीमघम् । तुविमात्रमवोभिः ॥ २ ॥ (ऋ. ८।८१।२)

७३० न हि त्वा शूर देवा न मर्तासो दित्सन्तम् । भीमं न गां वारयन्ते ॥ ३ ॥ ६ (के) ॥
(ऋ. ८।८१।३)

---

[७२४] (देवाः) सर्व देवता (त्रि-कद्रुकेषु) यज्ञाच्या तीन दिवसांमध्यें (चेतनं) उत्साह वाढवणाऱ्या यज्ञाचा (अत्नत) विस्तार करतात. (तं इत्) त्याचीच (नः गिरः वर्धन्तु) आमच्या वाणी प्रशंसा करोत. ॥ ३ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[७२५] हे (इन्द्र) इन्द्रा ! (ते) तुझ्यासाठीं (अयं सोमः) हा सोम (बर्हिषि अधि) वेदीवर (निपूतः) गाळला जात आहे. (ईं अस्य एहि) यावेळीं याच्याजवळ ये, (द्रव) लवकर ये आणि (पिब) तों पी. ॥ १ ॥

[७२६] (शाचि-गो) सामर्थ्यवान् किरणांनीं युक्त (शाचि-पूजन) शक्तिमान् होण्याच्या कारणानें जो पूजला जात आहे अशा (आ-खण्डल) शत्रूंना तोडणाऱ्या हे इन्द्रा ! (ते रणाय) तुला सुख व्हावें म्हणून (अयं सुतः) हा रस काढला आहे. यासाठीं (प्र हूयसे) तुला बोलावीत आहों. ॥ २ ॥

[७२७] (शृंग-वृषः न-पात्) किरणांच्या प्रसाराला कमी न करणाऱ्या इन्द्रा ! (ते प्रणपात्) तुझा सहाय्यक (यः कुण्डपाय्यः) असा जो सोम पिण्याचा यज्ञ आहे (अस्मिन् मनः आ नि दध्रे) त्यामध्यें आपलें मन लाव. ॥ ३ ॥

१ शृंग-वृषः न-पात्— किरणांचा प्रसार जो कमी करीत नाहीं, प्रकाश जो पसरवतो.

२ कुण्ड-पाय्यः— मोठ्या भांड्यानें जेथें सोम प्याला जातो असा यज्ञ.

[७२८] हे इन्द्रा ! (महा-हस्ती) मोठ्या हातांचा तूं (नः) आमच्यासाठीं (क्षु-मन्तं चित्रं ग्राभं) तेजस्वी, विलक्षण व स्वीकार करण्यास योग्य असें धन (दक्षिणेन सं गृभाय) उजव्या हातानें धर, धन देण्यासाठीं हातांत धारण कर. ॥ १ ॥

[७२९] हे इन्द्रा ! (तुविकूर्मिं) अनेक पराक्रम करणारा, (तुवि-देष्णं) देण्यास पुष्कळ धन ज्याच्याजवळ आहे असा (तुवि-मघं) मोठा धनवान् (तुवि-मात्रं) मोठ्या आकाराचा (अवोभिः) संरक्षणाच्या अनेक साधनांनीं युक्त (त्वा विद्म हि) अशा तुला आम्ही जाणतों. ॥ २ ॥

[७३०] हे (शूर) वीर इन्द्रा ! (दित्सन्तं त्वा) देण्याची इच्छा करणाऱ्या तुला (देवाः न) देव व (मर्तासः न) मनुष्यही (वारयन्ते) निवारण करूं शकत नाहींत. (हि न भीमं गां) ज्याप्रमाणें भयंकर बैलाला कोणी (न) निवारण करूं शकत नाहींत. ॥ ३ ॥

७३१ अभि त्वा वृषभा सुते सुतꣳसृजामि पीतये । तृम्पा व्यश्नुही मदम् ॥ १ ॥ (ऋ. ८।४५।२२)

७३२ मा त्वा मूरा अविष्यवो मोपहस्वान आ दभन् । मा कीं ब्रह्मद्विषं वनः ॥ २ ॥ (ऋ. ८।४५।२३)

७३३ इह त्वा गोपरीणसं महे मन्दन्तु राधसे । सरो गौरो यथा पिब ॥ ३ ॥ ७ (या) ॥ (ऋ. ८।४५।२४)

७३४ इदं वसो सुतमन्धः पिबा सुपूर्णमुदरम् । अनाभयिन्ररिमा ते ॥ १ ॥ (ऋ. ८।२।१)

७३५ नृभिर्धौतः सुतो अश्नैरव्या वारैः परिपूतः । अश्वो न निक्तो नदीषु ॥ २ ॥ (ऋ. ८।२।२)

७३६ तं ते यवं यथा गोभिः स्वादुमकर्म श्रीणन्तः । इन्द्र त्वास्मिन्त्सधमादे ॥ ३ ॥ ८ (थौ) ॥ (ऋ. ८।२।३)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

७३७ इदꣳह्यन्वोजसा सुतꣳराधानां पते । पिबा त्वा३स्य गिर्वणः ॥ १ ॥ (ऋ ३।५१।१०)

---

[७३१] हे (वृषभ) बलवान् इन्द्रा ! (सुते त्वा) सोमयज्ञामध्यें तुला (पीतये सुतं अभि सृजामि) पिण्यासाठीं सोमरस नीट तयार करीत आहों. (तृम्प) तूं त्यानें तृप्त हो आणि (मदं व्यश्नुहि) त्या आनन्ददायक रसाला पी. ॥ १ ॥

[७३२] हे इन्द्रा ! (त्वा) तुला (अविष्यवः मूराः) रक्षणाची इच्छा करणारे मूर्ख (मा दभन्) त्रास न देवोत. (उपहस्वानः मा) उपहास करणारेही त्रास न देवोत. (ब्रह्म-द्विषं) ज्ञानाचा द्वेष करणाऱ्याला (मा कीं वनः) तूं सहाय्य करूं नकोस. ॥ २ ॥

[७३३] हे इन्द्रा ! (इह त्वा) या यज्ञामध्यें तुला (गो-परीणसं) गाईच्या दुधाशीं मिसळलेला सोमरस अर्पण करून याजक (महे राधसे) पुष्कळ धन प्राप्त करण्यासाठीं (मदन्तु) आनन्दित करोत. (यथा गौरः सरः) ज्याप्रमाणें मृग सरोवरावर पाणी पितो, त्याप्रमाणें तूं (पिब) सोमरस पी. ॥ ३ ॥

[७३४] हे (वसो) निवासक इन्द्रा ! (इदं सुतं अन्धः पिब) हें सोमरसरूपी अन्न तूं पी. (उदरं सु-पूर्ण) तुझें पोट उत्तम रीतिनें भरून जावो. (अनाभयिन्) हे निर्भय इन्द्रा ! (ते ररिम) तुला सोमरस देत आहों. ॥ १ ॥

[७३५] (नृभिः धौतः) याजकांनीं स्वच्छ केलेला (अश्नैः सुतः) दगडांनीं कूटुन काढलेला हा रस (अव्या वारैः परिपूतः) मेंढीच्या केंसांच्या चाळणींतून गाळलेला (नदीषु अश्वः न) नदीमध्यें घोडा धुतात तसा पाण्यांत धुतलेला (निक्तः) व गाळून तयार केलेला हा आहे. ॥ २ ॥

[७३६] हे इन्द्रा ! (तं ते) तो रस तुला देण्यासाठीं (यवं यथा) ज्याप्रमाणें जवांचा पुरोडाश करतात, त्याप्रमाणें (गोभिः श्रीणन्तः) गाईच्या दूध आदींकाशीं मिसळून (स्वादु अकर्म) मधुर तयार केला आहे. हे (इन्द्र) इन्द्रा ! (त्वा अस्मिन् सधमादे) तुला या यज्ञांत आनन्द प्राप्त व्हावा म्हणून बोलावीत आहों. ॥ ३ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[७३७] (राधानां पते) हे धनपते ! (गिर्वणः) स्तुत्य इन्द्रा ! (ओजसा) बलानें युक्त असा तूं (इदं सुतं अनु) या सोमरसाशीं अनुकूल होऊन (अस्य नु पिब) याचें प्राशन कर. ॥ १ ॥

७३८ यस्ते अनु स्वधामसत्सुते नि यच्छ तन्वम् । स त्वा ममत्तु सोम्य ॥ २ ॥ (ऋ. ३।५१।११)

७३९ प्र ते अश्नोतु कुक्ष्योः प्रेन्द्र ब्रह्मणा शिरः । प्र बाहू शूर राधसा ॥ ३ ॥ ९ (पी) ॥
(ऋ. ३।५१।१२)

७४० आ त्वेता नि षीदतेन्द्रमभि प्र गायत । सखाय स्तोमवाहसः ॥ १ ॥ (ऋ. १।५।१)

७४१ पुरुतमं पुरूणामीशानं वार्याणाम् । इन्द्रँसोमे सचा सुते ॥ २ ॥ (ऋ. १।५।२)

७४२ स घा नो योग आ भुवत्स राये स पुरन्ध्या । गमद्वाजेभिरा स नः ॥ ३ ॥ १० (टी) ॥
(ऋ. १।५।३)

७४३ योगेयोगे तवस्तरं वाजेवाजे हवामहे । सखाय इन्द्रमूतये ॥ १ ॥ (ऋ. १।३०।७)

७४४ अनु प्रत्नस्यौकसो हुवे तुविप्रतिं नरम् । यं ते पूर्वं पिता हुवे ॥ २ ॥ (ऋ. १।३०।९)

---

[७३८] हे इन्द्रा ! (ते यः) तुला हा सोम (स्वधां अनु असत्) अन्नासारखा आहे. (सुते) या सोमयागामध्यें तूं (तन्वं नियच्छ) आपल्या शरीराला ने व हे (सोम्य) सोमाला योग्य अशा इन्द्रा ! (सः त्वा ममत्तु) तो सोम तुला आनन्दित करो. ॥ २ ॥

[७३९] हे (इन्द्र) इन्द्रा ! (सः ते कुक्ष्योः प्राश्नोतु) तो सोम तुझ्या कुशींमध्यें भरून राहो. (ब्रह्मणा शिरः) स्तोत्रानें तो तुझ्या मस्तकापर्यंत-सर्व शरीरापर्यंत-पोंचो. हे (शूर) शूर इन्द्रा ! (राधसा बाहू प्र) धन देण्यासाठीं तुझे बाहूही त्याला प्राप्त होवोत. ॥ ३ ॥

[७४०] हे (स्तोम-वाहसः सखायः) यज्ञ करणाऱ्या मित्रांनों ! (तु आ एत) लवकर या, (निषीदत) बसा व (इन्द्रं अभि प्र गायत) इन्द्राला उद्देशून सामगायन करा. ॥ १ ॥

[७४१] (सचा) एकत्र बसून (सुते) सोमयागामध्यें (पुरूतमं) पुष्कळ शत्रूंना पराभूत करणाऱ्या (पुरूणां वार्याणां ईशानं) पुष्कळ श्रेष्ठ धनांचा स्वामी अशा (इन्द्रं) इन्द्राची स्तुति करा. ॥ २ ॥

१ पुरु-तमः— पुष्कळांचा-पुष्कळ शत्रूंचा नाश करणारा.

२ तमः— नाश करणारा.

३ वार्य— स्वीकार करण्यास योग्य धन.

[७४२] (सः घ) तो निश्चयानें (नः योगे) आमच्या पुरुषार्थाच्या (आभुवत्) कर्मांमध्यें सहाय्यक होवो, (सः राये) तो धन प्राप्त करण्याच्या कार्यांमध्यें, (सः पुरन्ध्यां) तो पुष्कळ बुद्धि लावून करण्याच्या कार्यांमध्यें सहाय्यक होवो. (सः वाजेभिः नः आगमत्) तो अन्नांसह आमच्याजवळ येवो. ॥ ३ ॥

१ पुरं-धी – पुष्कळ बुद्धि, स्त्री.

२ योग— स्वकष्टानें मिळवलेलें धन, जोडणें, संयोग.

[७४३] हे (सखायः) मित्र हो ! (योगे-योगे) प्रत्येक कर्माच्या प्रारंभीं व (वाजे-वाजे) प्रत्येक युद्धामध्यें (तवस्तरं इन्द्रं) अत्यन्त बलवान् इन्द्राला (ऊतये हवामहे) संरक्षण करण्यासाठीं आम्ही बोलावतों. ॥ १ ॥

[७४४] (प्रत्नस्य ओकसः) आपल्या पुरातन घरामधून (तुवि-प्रतिं) पुष्कळांकडे जाणाऱ्या (नरं) नेत्या इन्द्राला (अनु हुवे) आम्ही सहाय्यासाठीं बोलावतों. (यं ते) ज्याला (पिता पूर्वं हुवे) माझ्या बापानें पूर्वी बोलावलें होतें. ॥ २ ॥

१ प्रत्नस्य ओकसः – इन्द्राचें सनातन घर हें विश्वच आहे. स्वर्गधाम आहे.

*

७४५ आ घा गमद्यदि श्रवत्सहस्रिणीभिरूतिभिः । वाजेभिरुप नो हवम् ॥ ३ ॥ ११ (ला) ॥
(ऋ. १।३०।८)

७४६ इन्द्र सुतेषु सोमेषु क्रतुं पुनीष उक्थ्यम् ।
विदे वृधस्य दक्षस्य महाँ हि षः ॥ १ ॥ (ऋ. ८।१३।१)

७४७ स प्रथमे व्योमनि देवानां सदने वृधः ।
सुपारः सुश्रवस्तमः समप्सुजित् ॥ २ ॥ (ऋ. ८।१३।२)

७४८ तमु हुवे वाजसातय इन्द्रं भराय शुष्मिणम् ।
भवा नः सुम्ने अन्तमः सखा वृधे ॥ ३ ॥ १२(वा) ॥ (ऋ ८।१३।३)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

७४९ एना वो अग्निं नमसोर्जो नपातमा हुवे ।
प्रियं चेतिष्ठमरतिं स्वध्वरं विश्वस्य दूतममृतम् ॥ १ ॥ (ऋ. ७।१६।१; वा. य. ३।५)

---

[७४५] (यदि नः हवं श्रवत्) जर तो आमचें बोलावणें ऐकेल तर (सहस्रिणीभिः ऊतिभिः सह) सहस्रावधि संरक्षणाच्या साधनांसह तसेंच (वाजेभिः) अन्नांसह तो (उप आगमत्) आमच्याजवळ येईल, (आ घ) हें खरें आहे. ॥ ३ ॥

[७४६] हे (इन्द्र) इन्द्रा ! (सोमेषु सुतेषु) सोमरस काढल्यानंतर (वृधस्य दक्षस्य विदे) मोठें बल प्राप्त करण्यासाठीं (क्रतुं उक्थ्यं पुनीषे) कर्म व स्तोत्र यांना तूं पवित्र करतोस (सः महान् हि) असा तो तूं मोठा आहेस. ॥ १ ॥

[७४७] (सः) तो इन्द्र (प्रथमे व्योमनि देवानां सदने) पहिल्या आकाशांतील देवांच्या स्थानांत (वृधः) यजमानांना वाढवणारा (सुपारः) उत्तम रीतिनें दुःखांतून पार करणारा (सु-श्रवस्तमः) उत्तम यशस्वी (सं-अप्सुजित्) राक्षसांना जिंकणारा आहे. त्याला आम्ही बोलावतों. ॥ २ ॥

१ सं-अप्सु-जित् — पाण्याला प्रतिबंध करणारे राक्षस आहेत त्यांना जिंकणारा, पाण्याच्या प्रवाहाला प्रतिबंध करणारे मेघ अथवा बर्फ आहे, त्या प्रतिबंधाला दूर करणारा.

२ देवानां सदनं — स्वर्ग.

[७४८] (तं उ) त्या (शुष्मिणं इन्द्रं) बलवान् इन्द्राला ज्यांत (वाज-सातये भराय) अन्नदान होतें अशा यज्ञासाठीं (हुवे) बोलावतों. हे इन्द्रा ! (सु-म्ने अन्तमः भव) सुखाच्यावेळीं आमच्याजवळ रहा. तसेंच (वृधे सखा) उन्नतिच्यावेळीं मित्र होऊन आमच्याजवळ रहा. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[७४९] (वः) तुमच्यासाठीं (एना नमसा) या स्तोत्रानें (ऊर्जः न-पातं) बल कमी न करणाऱ्या (प्रियं चेतिष्टं) प्रिय व चेतना देणाऱ्या (अरतिं) प्रगतिशील (सु-अध्वरं) उत्तम यज्ञ करणाऱ्या (विश्वस्य दूतं) संपूर्ण याजकांच्या दूतासारखा जो (अमृतं अग्निं) अमर अग्नि आहे त्याला (आ हुवे) मी बोलावीत आहें. ॥ १ ॥

७५० स योजते अरुषा विश्वभोजसा स दुद्रवत्स्वाहुतः ।
सुब्रह्मा यज्ञः सुशमी वसूनां देव२ राधो जनानाम् ॥ २ ॥ १३ (तु) ॥ (ऋ. ७।१६।२)

७५१ प्रत्यु अदर्श्यायत्यू३च्छन्ती दुहिता दिवः ।
अपो मही वृणुते चक्षुषा तमो ज्योतिष्कृणोति सूनरी ॥ १ ॥ (ऋ. ७।८१।१)

७५२ उदुस्रियाः सृजते सूर्यः सचा उद्यन्नक्षत्रमर्चिवत्
तवेदुषो व्युषि सूर्यस्य च सं भक्तेन गमेमहि ॥ २ ॥ १४ (वा) ॥ (ऋ ७।८१।२)

७५३ इमा उ वां दिविष्टय उस्रा हवन्ते अश्विना ।
अयं वामह्वेऽवसे शचीवसू विशंविश२ हि गच्छथः ॥ १ ॥ (ऋ. ७।७४।१)

७५४ युवं चित्रं ददथुर्भोजनं नरा चोदेथा२ सूनृतावते ।
अर्वाग्रथ२ समनसा नि यच्छतं पिबत२ सोम्यं मधु ॥२॥ १५ (चा) ॥ (ऋ. ७।७४।२)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

---

[७५०] (सः) तो अग्नि (अरुषा विश्व-भोजसा) तेजस्वी सर्वभक्षक अश्वांना (योजते) आपल्या रथाला जोडतो. त्यानंतर (सु-ब्रह्मा) उत्तम ज्ञानी (यज्ञः) यजनीय, पूज्य (सु-शमी) उत्तम संयमी (स्वाहुतः) उत्तम आहुतींनीं प्रदीप्त झालेला तो अग्नि देवतांना आणण्यासाठीं (दुद्रवत्) जातो, तेव्हां (देवं) त्या अग्निदेवाला (वसूनां राधः) धनांचें ऐश्वर्य प्राप्त होतें. ॥ २ ॥

[७५१] (आयती उच्छन्ती) येऊन चमकणारी (दिवः दुहिता उषाः) द्युलोकाची पुत्री उषा (प्रति अदर्शि) दिसूं लागली आहे. ती (मही तमः उ) मोठ्या अन्धकाराचें (चक्षुषा उप वृणुते उ) प्रकाशानें निवारण करीत आहे. (सूनरी ज्योतिः कृणोति) उत्तम नेतृत्व करणारी ही उषा प्रकाश करीत आहे. ॥ १ ॥

[७५२] (सूर्यः) सूर्य (सचा) एकदम (उस्रियाः) आपले किरण (उत्सृजते) फैलावतो. (उद्यत्) उदय पावल्यानंतर (नक्षत्रं) आकाशांतील ग्रह नक्षत्रें (अर्चिवत्) प्रकाश पसरवतात. हे (उषः) उषे ! (तव सूर्यस्य च) तुझा व सूर्याचा (व्युषि) प्रकाश झाल्यावर (भक्तेन संगमेमहि इत्) अन्नानें आम्ही युक्त होऊं. ॥ २ ॥

[७५३] हे (अश्विना) अश्विनौ देवांनों ! (इमा दिविष्टयः उ) या स्वर्गाची इच्छा करणाऱ्या प्रजा (उस्रौ वां हवन्ते) निवासक अशा तुम्हांला सहाय्यासाठीं बोलावतात. हे (शची-वसू) आपल्या शक्तीनें निवास करणारे देव हो ! (अयं) हा स्तुति करणारा (अवसे) संरक्षणासाठीं (वां अह्वे) तुम्हांला बोलावीत आहे, (हि) कारण कीं तुम्ही (विशं विशं गच्छथः) प्रत्येक प्रजाजनाजवळ जात असतां. ॥ १ ॥

[७५४] (नरा) हे नेत्यांनों, अश्विदेवांनों ! (युवं) तुम्ही (चित्रं भोजनं ददथुः) विलक्षण भोजन देत असतां. (सूनृतावते चोदेथां) स्तुति करणाऱ्याला तुम्ही प्रेरित करतां. तुम्ही (स-मनसा) एक विचारानें (रथं अर्वाक् नियच्छतं) रथाला अलीकडे थांबवा आणि येथें (सोम्यं मधु पिबतं) मधुर सोमरस प्या. ॥ २ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५]

७५५ अस्य प्रत्नामनु द्युतꣳ शुक्रं दुदुह्रे अह्रयः । पयः सहस्रसामृषिम् ॥ १ ॥ (ऋ. ९।५४।१)

७५६ अयꣳ सूर्य इवोपदृगयꣳ सरांꣳसि धावति । सप्त प्रवत आ दिवम् ॥ २ ॥ (ऋ. ९।५४।२)

७५७ अयं विश्वानि तिष्ठति पुनानो भुवनोपरि । सोमो देवो न सूर्यः ॥ ३ ॥ १६ (ते) ॥ (ऋ. ९।५४।३)

७५८ एष प्रत्नेन जन्मना देवो देवेभ्यः सुतः । हरिः पवित्रे अर्षति ॥ १ ॥ (ऋ. ९।३।९)

७५९ एष प्रत्नेन मन्मना देवो देवेभ्यस्परि । कविर्विप्रेण वावृधे ॥ २ ॥ (ऋ ९।४२।२)

७६० दुहानः प्रत्नमित्पयः पवित्रे परि षिच्यसे । क्रन्दं देवाꣳ अजीजनः ॥ ३ ॥ १७ (हा) ॥ (ऋ. ९।४२।४)

७६१ उप शिक्षापतस्थुषो भियसमा धेहि शत्रवे । पवमान विदा रयिम् ॥ १ ॥ (ऋ. ९।१९।६)

७६२ उपो षु जातमप्तुरं गोभिर्भङ्गं परिष्कृतम् । इन्दुं देवा अयासिषुः ॥ २ ॥ (ऋ. ९।६१।१३)

---

[५] पञ्चमः खण्डः ।

[७५५] (अस्य) या सोमरसाच्या (प्रत्नां द्युतं अनु) पुरातन तेजाला स्मरून (शुक्रं सहस्रसां) तेजस्वी व सहस्रावधि इच्छा पूर्ण करणाऱ्या (ऋषिं पयः) ज्ञानवर्धक रसाला (अह्रयः दुदुह्रे) कवि लोक तयार करतात. ॥ १ ॥

[७५६] (अयं) हा सोम (सूर्यः इव) सूर्याप्रमाणें (उप-दृक्) सर्वांना पाहणारा आहे. (अयं सरांसि धावति) हा [तीस] जल पात्रांत गाळला जातो. तसेंच (आ दिवं) द्युलोकापर्यंत (सप्त प्रवते) सात प्रवाहांच्या रूपानें पोंचतो. ॥ २ ॥

१ सरांसि— त्रिंशत् उक्त पात्राणि - तीस पाण्याचीं पात्रें.

२ धावति— धांवतो, गाळला जातो.

[७५७] (अयं पुनानः सोमः) हा पवित्र होणारा सोमरस (विश्वानि भुवना उपरि) सर्व भुवनांच्यावर (देवो न सूर्यः) सूर्य देवाप्रमाणें (तिष्ठति) प्रकाशतो. ॥ ३ ॥

[७५८] (हरिः एष देवः) हिरव्या रंगाचा हा सोम (प्रत्नेन जन्मना) पूर्वीपासून (देवेभ्यः सुतः) देवासाठीं रस काढून (पवित्रे अर्षति) गाळणींतून गाळला जात असतो. ॥ १ ॥

[७५९] (प्रत्नेन मन्मना) पूर्वीपासून स्तोत्रें म्हणून (एषः देवः) हा प्रकाशमान् (कविः) ज्ञानी सोम (देवेभ्यः) देवतांसाठीं (विप्रेण परिवावृधे) ब्राह्मणांकडून वाढवला जात असतो. ॥ २ ॥

[७६०] (प्रत्नं इत् पयः) पूर्वीपासून हा रस पात्रामध्यें (दुहानः) काढला जातो व नंतर (पवित्रे परिषिच्यते) गाळणींमधून गाळला जातो. हा (क्रन्दन्) शब्द करीत (देवान् अजीजनः) देवांना यज्ञांत जणूं काय बोलावीतच असतो. ॥ ३ ॥

[७६१] हे (पवमान) सोमा ! (उप-तस्थुषः) जवळ बसणाऱ्यांना (उप शिक्ष) समजाऊन सांग कीं, (शत्रवे) शत्रूला (भियसं आधेहि) भय प्राप्त होईल असें कर आणि (रयिं विदाः) धन आम्हांला दे. ॥ १ ॥

[७६२] (जातं) रस काढल्यावर (अप्-तुरं) पाण्यांत मिसळला जातो, (भङ्गं) शत्रूंचा नाश करणाऱ्या (गोभिः परिष्कृतं) गाईच्या दुधांत मिसळलेल्या (इन्दुं) सोमरसाजवळ (देवाः उप अयासिषुः) देव जातात. ॥ २ ॥

७६३ उपास्मै गायता नरः पवमानायेन्दवे । अभि देवाँ इयक्षते ॥ ३ ॥ १८ (वौ) ॥
(ऋ. ९।११।१)

॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

[६]

७६४ प्र सोमासो विपश्चितोऽपो नयन्त ऊर्मयः । वनानि महिषा इव ॥ १ ॥ (ऋ. ९।३३।१)

७६५ अभि द्रोणानि बभ्रवः शुक्रा ऋतस्य धारया । वाजं गोमन्तमक्षरन् ॥२॥ (ऋ. ९।३३।२)

७६६ सुता इन्द्राय वायवे वरुणाय मरुद्भ्यः । सोमा अर्षन्तु विष्णवे ॥ ३ ॥ १९ (वि) ॥
(ऋ. ९।३३।३)

७६७ प्र सोम देववीतये सिन्धुर्न पिप्ये अर्णसा ।
अंशोः पयसा मदिरो न जागृविरच्छा कोशं मधुश्चुतम् ॥ १ ॥ (ऋ. ९।१०७।१२)

७६८ आ हर्यतो अर्जुनो अत्के अव्यत प्रियः सूनुर्न मर्ज्यः ।
तमीं हिन्वन्त्यपसो यथा रथं नदीष्वा गभस्त्योः ॥ २ ॥ २० (रु) ॥ (ऋ. ९।१०७।१३)

७६९ प्र सोमासो मदच्युतः श्रवसे नो मघोनाम् । सुता विदथे अक्रमुः ॥ १ ॥ (ऋ. ९।३२।१)

---

[७६३] हे (नरः) याजक हो ! (देवान् अभि इयक्षते) देवांसाठीं यज्ञ करण्याची इच्छा करणाऱ्या यजमानाकरतां (पवमानाय अस्मै इन्दवे) गाळल्या जाणाऱ्या या सोमासाठीं (उप-गायत) सामगायन करा. ॥ ३ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६] षष्ठः खण्डः ।

[७६४] (विपश्चितः ऊर्मयः सोमासः) ज्ञान वाढवणारे हे सोमरस (आपः प्र नयन्ते) पाण्यांत मिसळले जातात, (वनानि महिषाः इव) जसे वनांत रेडे जातात. ॥ १ ॥

[७६५] (बभ्रवः शुक्राः) भुऱ्या रंगाचे हे स्वच्छ सोमरस (ऋतस्य धारया) पाण्याच्या धारेबरोबर (द्रोणान्) भांड्यांत (गोमन्तं वाजं) गोदुग्धरूपी अन्नाशीं (अभि अक्षरन्) मिसळून जात असतात. ॥ २ ॥

[७६६] (सुताः सोमाः) सोमरस काढल्यानंतर इन्द्र, वायु, वरुण, मरुत् व विष्णु या देवांना ते (अर्षन्तु) प्राप्त होवोत. ॥ ३ ॥

[७६७] हे (सोम) सोमा ! तूं (देव-वीतये) देवांना देण्यासाठीं (अर्णसा प्र पिप्ये) पाण्यांत मिसळला जातोस, (सिन्धुः न) ज्याप्रमाणें नदी जलानें भरली जाते. (मदिरः न जागृविः) आनंद देणाऱ्या पदार्थाप्रमाणें तूं उत्साह वाढवणारा आहेस. (अंशोः) या सोमरसाला (पयसा) दुधाबरोबर मिसळा व नंतर (मधुश्चुतं कोशं अच्छ) या मधुररसाला ठेवण्याच्या भांड्यांत सरळपणानें भरा. ॥ १ ॥

[७६८] (हर्यतः सूनुः न) प्रिय पुत्राप्रमाणें (मर्ज्यः अर्जुनः) शुद्ध होणारा हा स्वच्छ सोमरस (अत्के आ अव्यत) भांड्यांत गाळला जातो. (तं ईं) त्या या सोमाला (नदीषु) जलांमध्यें (गभस्त्योः आ हिन्वति) हातांनीं मिसळतात (अपसः रथं यथा) ज्याप्रमाणें वेगवान् रथाला संग्रामामध्यें नेतात. ॥ २ ॥

[७६९] (मद-च्युतः सोमासः) आनंद वाढवणारे हे सोमरस (सुताः) तयार केल्यानंतर (विदथे) यज्ञामध्यें (मघोनां नः) हविष्यान्न देणाऱ्या आमच्या (श्रवसे) कीर्तिसाठीं-यशासाठीं (प्र अक्रमुः) सहाय्यक होतात. ॥१॥

७७० आदीं हंसो यथा गणं विश्वस्यावीवशन्मतिम् । अत्यो न गोभिरज्यते ॥ २ ॥
(ऋ. ९।३२।३)

७७१ आदीं त्रितस्य योषणो हरिं हिन्वन्त्यद्रिभिः । इन्दुमिन्द्राय पीतये ॥३॥ २१ (ली) ॥
(ऋ. ९।३२।२)

७७२ अया पवस्व देवयु रेभन्पवित्रं पर्येषि विश्वतः । मधोर्धारा असृक्षत ॥१॥ (ऋ. ९।१०६।१४)

७७३ पवते हर्यतो हरिरति ह्वरांसि रंह्या । अभ्यर्ष स्तोतृभ्यो वीरवद्यशः ॥२॥ (ऋ. ९।१०६।१३)

७७४ प्र सुन्वानायान्धसो मर्तो न वष्ट तद्वचः ।
अप श्वानमराधसं हता मखं न भृगवः ॥ ३ ॥ २२ (लि) ॥ (ऋ. ९।१०१।१३)

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

॥ इति प्रथमप्रपाठके द्वितीयोऽर्धः प्रथमप्रपाठकश्च समाप्तः ॥ १ ॥

॥ इति द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

---

[७७०] (आत् ईं) आणि हा सोम (हंसः यथा गणं) हंस जसा आपल्या समुदायांत जातो, त्याप्रमाणें (विश्वस्य मतिं) सर्वांच्या बुद्धिला (आवीवशत्) वश करतो. (अत्यः न) घोड्याला ज्याप्रमाणें न्हाऊं घालतात त्याप्रमाणें (गोभिः अज्यते) गाईच्या दूधाशीं त्याला मिसळतात. ॥ २ ॥

[७७१] (आत् ईं हरिं इन्दुं) या हिरव्या रंगाच्या सोमाला (त्रितस्य योषणः) त्रित ऋषिच्या अंगुली (इन्द्राय पीतये) इन्द्राला पिण्यास देण्यासाठीं (अद्रिभिः हिन्वन्ति) दगडांनीं कुटतात ॥ ३ ॥

[७७२] हे सोमा ! (देवः-युः) देवांना मिळण्याची इच्छा करणारा तूं (अया पवस्व) धारेनें गाळला जा. (रेभन्) शब्द करीत (पवित्रं विश्वतः पर्येषि) गाळणींतून पूर्णपणानें बाहेर पडतोस व त्यानंतर तुझ्या (मधोः धाराः असृक्षत) मधुर रसाच्या धारा बाहेर पडूं लागतात. ॥ १ ॥

[७७३] (हर्यतः हरिः) इच्छा करण्यास योग्य असा हा हिरव्या रंगाचा सोम (स्तोतृभ्यः) स्तुति करणाऱ्यांना (वीर वत् यशः) वीर पुत्रांनीं युक्त असलेलें यश (अभ्यर्षन्) देऊन, (रंह्या) रमणीय (ह्वरांसि अति पवते) गाळणींतून गाळला जातो. ॥ २ ॥

[७७४] (सुन्वानाय अन्धसः) काढल्या जाणाऱ्या या अन्नरूपी सोमाबद्दल (तत् वचः) तें हीन वचन (मर्तः न प्र वष्ट) मनुष्य न ऐको. हे याजक हो ! (अ-राधसं श्वानं) अयोग्य कुत्र्याला (अप हत) दूर करा. (भृगवः मखं न) ज्याप्रमाणें भृगूंनीं अयोग्य यज्ञाला दूर केलें होतें. ॥ ३ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति द्वितीयोऽध्यायः ॥

द्वितीय अध्याय

इन्द्र देवता

या द्वितीय अध्यायामध्यें इन्द्र देवतेचे हे गुण विशेषेंकरून उपासकांनीं मनन करण्यासारखे आहेत—

१ विश्वा-साहः [७१३]- सर्व शत्रूंचा पराभव करणारा.

२ शत-क्रतुः [७१३]- शेंकडों उत्तम कर्मे करणारा.

३ चर्षणीनां मंहिष्ठः [७१३]– मानवांमध्यें फार मोठा.

४ इन्द्रः (इन्+द्रः) [७१३]– शत्रूंचें विदारण करणारा.

५ पुरु-हूतः [७१४]– ज्याला पुष्कळ लोक आपल्या सहाय्यासाठीं बोलावीत असतात.

६ पुरु-ष्टुतः [७१४]- पुष्कळ लोक ज्याची प्रशंसा करतात.

७ गाथान्यः [७१४]– प्रशंसनीय, स्तुत्य.

८ सन-श्रुतः [७१४]- सनातन कालापासून ज्याची प्रशंसा होत आली आहे.

९ नृतुः [७१५]– सर्वांना चालवणारा, सर्वांना आपआपल्या कार्यामध्यें प्रवृत्त करणारा.

१० महोनां वाजानां दाता [७१५]- पुष्कळ धनें व अन्नें देणारा.

११ हर्यश्वः (हरि-अश्वः) [७१६]- लाल रंगाचे घोडे आपणाजवळ बाळगणारा.

१२ सुदानुः [७१७]- उत्तम दान देणारा.

१३ सत्य-राधाः [७१७]- खरें धन ज्याच्याजवळ आहे. नेहेमीं टिकणारें धन ज्याच्याजवळ आहे. हित करणारें धन जो आपल्याकडे बाळगत असतो.

१४ द्यु-क्षः [७१७]– द्युलोकामध्यें जो राहतो, द्युलोकामध्यें तेजस्वी.

१५ वाज-युः [७१८]- अन्न व बल देणारा, अन्न व बल ज्याच्याजवळ भरपूर आहे असा.

१६ गव्युः [७१८]- जो गायींचें पालन करतो, गाई ज्याच्याजवळ आहेत.

१७ वसुः [७१८]- निवास करणारा, धनवान्, आठ वसु आहेत, ते ज्याच्याजवळ आहेत. आठ वसु- आपः, ध्रुवः, सोमः, घरः, अनिलः, अनलः, प्रत्यूषः व प्रभासः. वसुचे हे अर्थ आहेत- मिष्ट, धन, रत्न, सुवर्ण, उत्तम, जल, घृत, किरण, धनवान्.

१८ हिरण्य-युः [७१८]- सुवर्ण जवळ बाळगणारा, सुवर्णाचें दान देणारा.

१९ वज्री [७२०]- वज्रनामक शस्त्रास्त्र वापरणारा. वज्रधारी.

२० मद्-वा [७२२]- आनंदित, ज्याच्याजवळ आनंद आहे.

२१ यस्मिन् विश्वाः श्रियः अधि [७२३]- ज्याच्याजवळ सर्व प्रकारच्या संपत्ति वा ऐश्वर्ये आहेत.

२२ शाचि-गुः [७२६]- जो आपल्या शक्तिनें सुप्रसिद्ध आहे. ज्याचीं इंद्रियें शक्तिशाली आहेत.

२३ शाचि-पूजनः [७२६]- शक्तिमान् असल्यामुळें ज्याचें पूजन होत आहे.

२४ आ-खण्डलः [७२६]- शत्रूचे तुकडे करणारा, शत्रूची कत्तल करण्यांत जो प्रवीण आहे.

२५ शृंग-वृषः न पात् [७२७]- आपला प्रकाश कमी न करणारा, आपले किरण जो चहूंकडे पसरवतो. ज्याच्या शिंगांचें बल कमी होत नाहीं.

२६ महाहस्ती [७२८]- मोठें मजबूत हात ज्याचे आहेत.

२७ महाहस्ती नः क्षुमन्तं चित्रं ग्राभं दक्षिणेन संगृभाय [७२८]- मोठ्या हातांचा, आमच्यासाठीं तेजस्वी व स्वीकार करण्याजोगें असें धन उजव्या हातांत देण्यासाठीं धारण करणारा.

२८ तुवि-कूर्मिः [७२९]- अनेक पराक्रमाचीं कृत्यें करणारा.

२९ तुवि-देष्णः [७२९]- देण्यासाठीं पुष्कळ धन ज्याच्याजवळ आहे.

३० तुवि-मघः [७२९]- पुष्कळ धनवान्.

३१ तुवि-मात्रः [७२९]- मजबूत शरीराचा, ज्याचें शरीर मोठें धिप्पाड आहे.

३२ अवोभिः त्वा विद्म हि [७२९]- संरक्षणाचीं अनेक साधनें तो इन्द्र आपणाजवळ बाळगतो हें आम्हांस माहित आहे.

३३ शूरः [७३०]- शूरवीर.

३४ वृषभः [७३१]- बलवान्, बैलाप्रमाणें सामर्थ्यवान्.

३५ दित्सन्तं त्वा देवाः मर्तासः न वारयन्ते [७३०] – धन देण्याची इच्छा करणाऱ्या तुझें देव व मनुष्य निवारण करूं शकत नाहींत.

३६ अविष्यवः मूराः त्वा मा दभन् [७३२]- आपल्या संरक्षणाची इच्छा करणारे मूर्ख लोक तुझ्यावर वडपण न आणोत.

३७ ब्रह्मद्विषं मा किं वनः [७३२]- ज्ञानाचा द्वेष करणाऱ्याला तूं सहाय्य करूं नकोस.

३८ अनाभयी (अन्-आभयी) [७३४]- निर्भय, भयरहित.

३९ राधानां पतिः [७३७]- अनेक धनांचा स्वामी.

४० गिर्वणः [७३७]- स्तुत्य.

४१ हे शूर ! राधसा बाहू [७३९]- हे शूर इन्द्रा ! तुझे बाहू धनाला बागणारे आहेत.

४२ तवस्तरः [७४३]- अत्यंत बलवान्.

४३ तवस्तरं ऊतये हवामहे [७४३]- बलवान् वीर इन्द्राला आमच्या संरक्षणासाठीं आम्हीं बोलावतों.

४४ तुवि-प्रतिः [७४४]- पुष्कळांकडे सहाय्य करण्यासाठीं जाणारा.

४५ नरः [७४४]- नेता, पुढारी.

४६ प्रत्नस्य ओकसः तुवि-प्रतिं नरं हुवे [७४४] - आपल्या पुरातन घरामधून पुष्कळांच्या सहाय्यासाठीं जाणाऱ्या नेत्या इन्द्राला मी संरक्षणासाठीं बोलावतों.

४७ यं ते पिता पूर्वं हुवे [७४४]- ज्या इन्द्राला तुझ्या वडिलांनीं पूर्वी आपल्या सहाय्यासाठीं बोलावलें होतें.

४८ सः महान् हि [७४६]- तो इन्द्र मोठा आहे.

४९ वृधः [७४६]- वाढवणारा, शक्तिचा विकास करणारा.

५० सु-पारः [७४६]- संकटांतून पार पोंचवणारा.

५१ सुश्रवस्तमः [७४६]- कीर्तिमान्, यशस्वी.

५२ सं-अप्सुजित् [७४६]- पाण्यांत राहणाऱ्या शत्रूंना जिंकणारा.

५३ शुष्मी [७४८]- बलवान्, सामर्थ्यवान्.

५४ सुम्ने अन्तमः [७४८]- सुखाच्यावेळीं जवळ राहणारा.

५५ वृधे सखा [७४८]- उन्नतिच्यावेळीं मित्रासारखा.

५६ शुष्मिणं इन्द्रं वाजसातये भराय हुवे [७४८] - बलवान् इन्द्राला अन्नाचें दान होतें अशा यज्ञांमध्यें बोलावतों.

५७ सहस्रिणीभिः ऊतिभिः सह उपागमत् [७४५] - सहस्रावधि संरक्षणांच्या साधनांसह तो इन्द्र येत असतो.

५८ सः योगे राये पुरन्ध्या वाजेभिः नः आगमत् [७४२]- तो इन्द्र लाभ होण्याच्यावेळीं, धन मिळण्याच्यावेळीं, व बुद्धिचीं कामें करावयाच्यावेळीं, अन्नांसह आमच्याकडे येतो.

५९ हे सखायः ! योगे-योगे, वाजे-वाजे तवस्तरं इन्द्रं ऊतये हवामहे [७४३]- हे मित्र हो ! प्रत्येक लाभाचें कार्य करण्याच्यावेळीं प्रत्येक युद्धाच्या वेळीं अत्यंत बलशाली इन्द्राला संरक्षणासाठीं आम्हीं बोलावतों.

६० सखायः ! आ एत, निषीदत, इन्द्रं अभि प्र गायत [७४०]- हे मित्र हो ! या बसा व इन्द्राच्या गुणांचें गायन करा.

६१ सचा सुते पुरूतमं पुरूणां ईशानं वार्याणां इन्द्रं [७४१]- यज्ञामध्यें पुष्कळ धनांचा स्वामी अशा इन्द्राच्या गुणांचें वर्णन करा.

याप्रमाणें इन्द्राच्या या श्रेष्ठ गुणांचें वर्णन या मंत्रांमध्यें आलेलें आहे. शौर्य, वीर्य, युद्धकौशल्य, लोकांना सहाय्य करण्याची तयारी, जनतेचें हित करण्याची तत्परता इत्यादि सद्‌गुण या वर्णनामध्यें आलेले आहेत. उपासकांनीं हे सद्‌गुण आपल्यामध्यें आणावे व वाढवावे व देवत्व प्राप्त करावें, अथवा श्रेष्ठ व वंदनीय व्हावें.

वैदिक देवतांचें वर्णन एवढ्यासाठींच वाचावयाचें असतें. उपासकांनीं देवतांचे सद्‌गुण कोणते आहेत तें पहावें व ते शुभ गुण आपणामध्यें आणण्याचा प्रयत्न करावा. हेंच वैदिक अनुष्ठान आहे. नुसते गुण आपण पाहिले व ते गुण आपणामध्यें आणण्याचा प्रयत्न केला नाहीं तर ते गुण आपल्या उपयोगी पडणार नाहींत.

नुसतें " इन्द्र शूर आहे " इतकें जाणून कार्यभाग होणार नाहीं, तर शूरता आपणामध्यें आणली पाहिजे व ती आपणामध्यें वाढेल असें केलें पाहिजे. मनुष्यधर्म वेदानें जो सांगितला आहे, तो हा आहे. उपासकांनीं हें अनुष्ठान करावें व देवत्व प्राप्त करावें.

अग्नि देवता

अग्नि देवतेचे गुण या अध्यायामध्यें जे आले आहेत ते हे आहेत —

१ ऊर्जो-न-पात् [७४९]- बल कमी न करणारा, उत्साह कमी न करणारा.

शरीरामध्यें उष्णता असेपर्यंतच या शरीरामध्यें बल असतें. शरीर थंड होतांच या शरीराची हालचाल बंद होते. यावरून हा अग्नि बल टिकवणारा कसा आहे तें समजून येईल.

२ अरतिः [७४९]- प्रगतिशील.

३ प्रियः चेतिष्ठः [७४९]- प्रिय व चैतन्य उत्पन्न करणारा.

४ अमृतः [७४९]- अमर, विनष्ट न होणारा.

५ सु-अध्वरः [७४९]-उत्तम हिंसारहित कार्य करणारा.

६ विश्वस्य दूतः [७४९]- विश्वाचा दूत, हवन केलेले पदार्थ सर्वत्र पोंचवणारा.

७ सु-ब्रह्मा [७५०]- उत्तम ज्ञानी.

८ यज्ञः [७५०]- पूज्य, पूजनीय.

९ सु-शमी [७५०]- उत्तम संयमी.

१० सु-आहुतः [७५०]- उत्तम आहुती ज्यांत पडतात.

११ द्रुद्रवत् [७५०]- देवांना आणण्यासाठीं लवकर जातो.

१२ देवं वसूनां राधः [७५०]- या अग्निदेवाला धनांनीं प्राप्त होणारें ऐश्वर्य मिळो.

१३ स अरुषा विश्वभोजसा योजते [७५०]- तो तेजस्वी लाल रंगाच्या सर्व पालक घोड्यांना आपल्या रथाला जोडतो.

अग्नि देवतेचे इतके गुण या अध्यायामध्यें वर्णिले आहेत. वाचकांनीं यांचें मनन करावें व जे गुण जेवढ्या प्रमाणामध्यें आपल्यामध्यें आणतां येतील, तेवढे आपणामध्यें वाढवावे. आतां उषा देवता पहा—

उषा देवता

उषा देवतेच्या वर्णनामध्यें तिचे पुढें दिलेले महत्त्वाचे गुण मननीय आहेत. ते हे आहेत —

१ आयती उच्छन्ती [७५१]- उषा येते व प्रकाश पसरूं लागते. अन्धकार दूर करणें व त्यासाठीं प्रकाश पसरवणें अत्यंत आवश्यक आहे.

२ दिवः दुहिता उषा प्रत्यदर्शि [७५१]- द्युलोकाची पुत्री उषा दिसूं लागली आहे. तिचा प्रकाश पसरूं लागला आहे.

३ महीनमः चक्षुषा अप वृणुते [७५१]- मोठा अन्धकार आपल्या डोळ्यानें - आपल्या प्रकाशानें - निवारीत आहे. अन्धकार प्रकाशानें दूर करीत आहे.

४ सूनरी ज्योतिः कृणोति [७५१]- उत्तम नेतृत्व करणारी प्रकाश करीत आहे. अन्धकार दूर करून प्रकाश पसरवीत आहे.

५ सूर्यः सचा उस्रियाः उत्सृजते [७५२]- उषेबरोबर सूर्य येऊन आपले किरण पसरवितो.

६ उद्यन् नक्षत्रं अर्चिवत् [७५२]- उदय होतांच नक्षत्रें चमकूं लागतात.

७ हे उषः ! तव सूर्यस्य च द्युषि भक्तेन संगमेमहि [७५२]- तुझ्या व सूर्याच्या प्रकाशानंतर आम्ही अन्नाचें सेवन करूं.

उषा येते, आणि प्रकाश पसरवते व अंधकार दूर करण्यास प्रारंभ करते. उषेच्या नंतर सूर्य उदय होऊन तो प्रकाशूं लागतो. तात्पर्य उषा उदय पावल्याबरोबर अन्धकाराचा नाश होण्यास प्रारंभ होतो. याप्रमाणें मनुष्य आपल्या समाजामध्यें, आपल्या राष्ट्रामध्यें, कार्य करूं लागला कीं त्यानें आपल्या समाजांतील अज्ञानान्धकार दूर करण्याचा यत्न केला पाहिजे व आपल्या समाजाला अथवा आपल्या राष्ट्राला प्रकाशांत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उषा प्रति दिवशीं हें करून लोकांना बोध देत आहे. तो बोध लोकांनीं आपल्या जीवनामध्यें उतरवला पाहिजे.

आतां अश्विनौ देवतेचें वर्णन पहा—

*

अश्विनौ देवता

या अध्यायामध्यें " अश्विनौ " देवतेचे पुढें दिलेले गुण वर्णिलेले आहेत—

१ उस्रिया [७५३]- तेजस्वी, चमकणारा, किरण, प्रकाशाचे किरण, बैल, ईश्वर, सूर्य, दिवस, अश्विनीकुमार.

२ उस्रा [७५३]- प्रभात, प्रकाश, चमकणारें आकाश, गाय, पृथ्वी, अश्विनीकुमार.

३ शचीवसू [७५३]- आपल्या शक्तिनें राहणारे.

४ नरा [७५४]- नेतृत्व करणारे.

५ युवं चित्रं भोजनं ददथुः [७५४]- तुम्ही विलक्षण गुणकारी भोजन देत असतां.

६ सूनृतावते चोदेथां [५५४]- सत्यमार्गानें चालणाऱ्याला उत्तम प्रेरणा तुम्ही देत असतां.

७ समनसा रथं अर्वाक् नियच्छतं [७५४]- एक विचारानें आपल्या रथाला इकडे आणा.

८ विशं विशं गच्छथः [७५३]- तुम्हीं प्रत्येक प्रजाजनाकडे जात असतां. त्याच्या रोगाची चिकित्सा करण्यासाठीं जात असतां.

९ अवसे वां अह्वे [७५३]- आमचें संरक्षण करण्यासाठीं तुम्हांला आम्ही बोलावीत आहों. रोगमुक्त करण्यासाठीं आम्ही या अश्विनौला बोलावतों.

१० इमाः दिविष्टयः उस्रा वां हवन्ते [७५३]- या देवत्व प्राप्त करूं इच्छिणाऱ्या प्रजा अश्विनौ देवतांना आपल्या हिताकरतां बोलावीत असतात.

अश्विनौ हे दोन देव आहेत. यांपैकीं एक शस्त्रक्रिया करणारा आहे व दुसरा औषधिचिकित्सा करणारा आहे. हे दोघेहि रोग्याजवळ जातात व त्याचा रोग दूर करण्याचा यत्न करतात. हे देव आहेत, पण यांचे रोगी मानवच असतात.

रोग्याला हे असें उत्कृष्ट भोजन तयार करून देतात, कि हें भोजन रोग्यानें खाल्लें म्हणजे रोगी रोगमुक्त होतो. औषधाचें सेवन करण्यापेक्षां औषधमिश्रित भोजनाचें सेवन केलें, तर तें रोग्याला अधिक लाभदायक असतें; कारण 'औषध मी घेत आहें' अशा भावनेमध्यें मी रोगी आहें ही भावनाहि मनांत असते, पण भोजन करण्यामध्यें तशी भावना नसते. रोग्याला वाटतें कीं मी बरा आहें. माझें भोजन मी खात आहें. मानसिक स्वास्थ्य कायम ठेवण्याच्या दृष्टीनें औषधापेक्षां, भोजनरूपानें औषध शरीरांत पोंचवणें व त्याच्या योगानें रोग्यास रोगमुक्त करणें तें पुष्कळच बरें.

वैद्यांनीं आपल्या रोग्यांवर असे प्रयोग करावे. खानपानांमधून औषध पोंचवावें व रोग्यास बरें करावें.

अश्विनीकुमारांना 'दस्रा' म्हणतात, कारण कीं ते सकाळीं रोग्याकडे त्याला तपासण्यासाठीं जातात. हीच वेळ रोग्याला तपासण्यासाठीं उत्तम आहे.

सोम

सोम एक वेल आहे. ती हिमालयाच्या मौंजवान् या शिखरावर मिळते. यासाठीं याला ' मौंजवान् सोम ' असें वेदमंत्रांमध्यें म्हटलेलें आढळतें.

सोम गाळण्याच्यावेळीं सामगान

यज्ञामध्यें सोमरस गाळण्याच्यावेळीं सामगायन केलें जातें. त्याविषयीं वर्णन असें वेदांमध्यें केलेलें आढळतें—

१ पवमानाय इन्दवे उप गायत [७६३]– गाळल्या जाणाऱ्या सोमासाठीं सामगायनें म्हणा.

यावेळीं हीन वचन किंवा निंद्य शब्द बोलूं नयेत, असें स्पष्ट सांगितलें आहे—

२ सुन्वानाय अन्धसः तत् वचः मर्तः न प्रवद्य [७७४]- काढल्या जाणाऱ्या या अन्नरूपी सोमाबद्दल कोणीहि माणसानें हीन अर्थाचे शब्द बोलूं नयेत. तसेंच सोमरस काढीत असतां त्या ठिकाणीं कुत्रा येईल असेंहि करूं नये.

३ अराधसं श्वानं अपहत [७७४]- अनुदार कुत्रा तेथें आला तर त्याला मारून दूर करा. जेथें सोम असेल तेथें कुत्र्यानें येऊं नये.

सोम कुटून रस काढतात

सोमवल्ली आणतात, तिला दगडांनीं कुटतात व तिचा रस काढतात याविषयीं असे मंत्र आहेत—

१ हरिं इन्दुं योषणः इन्द्राय पीतये अद्रिभिः हिन्वन्ति [७७१]- हिरव्या रंगाच्या चमकणाऱ्या सोमाला हात दगडांनीं कुटतात व कुटल्यानंतर अंगुलींनीं दाबून त्याचा रस काढतात. इन्द्राला पिण्यास देण्यासाठीं हें केलें जातें. लांकडांच्या फळचावर सोम ठेवतात व दगडांनीं तो कुटतात व मग हातांनी त्यापासून रस काढला जातो. असा हा रस काढल्यानंतर त्यांत पाणी मिसळून तो गाळतात. या विषयीं असें म्हटलेलें आहे—

नृभिः धौतः, अश्नैः सुतः, अव्यावारैः परिपूतः निक्तः [७३५]- याजकांनीं तो प्रथम धुवून स्वच्छ केला, दगडांनीं कुटून रस काढला, मेंढीच्या केसांच्या चाळणीं-मधून तो गाळला गेला. अशा रीतिनें शुद्ध केलेला हा सोमरस आहे.

रस काढल्यानंतर त्या रसाला पाण्यांत मिसळतात व नंतर गाळणींतून तो गाळला जातो.

२ अयं सरांसि धावति [७५६]–हा सोम सरोवरां-जवळ धांवत जातो. येथें " सरः " शब्द पाण्याचें भांडें असा आहे. सोमरस पाण्याच्या भांड्यांत जातो व त्यांतील पाण्यांत मिसळतो.

३ हरिः एषः देवेभ्यः सुतः पवित्रे अर्षति [७५८]– हा हिरव्या रंगाचा चमकणारा सोम देवांना देण्यासाठीं काढला आहे, तो गाळणींतून खालच्या कलशामध्यें उतरत आहे.

४ एषः देवः देवेभ्यः विप्रेण परि वावृधे [७५९]– हा चमकणारा दिव्य सोमरस ब्राह्मणांकडून वाढवला जात आहे. म्हणजे ब्राह्मण त्यांत पाणी मिसळून त्याला वाढवतात व त्याला पिण्यास योग्य करीत असतात.

५ दुहानः पवित्रे परिषिच्यते [७६०]– रस काढल्या-नंतर गाळणीमधून तो गाळला जातो. गाळला जात असतां जो त्याचा खालच्या कलशामध्यें पडत असतांना शब्द होतो, त्यानें तो देवांना बोलावीत असतो, अशा अलंकाराची भाषा वापरली गेली आहे. पहा—

६ क्रन्दन् देवान् अजीजनः [७६०]– गाळणींतून खालीं पडतांना जो सोमरसाचा शब्द होतो, त्या शब्दानें तो जणूं काय देवांना बोलावतोच आहे असें वाटतें.

७ विपश्चितः ऊर्मयः सोमरसः आपः प्रनयन्ते [७६४]- ज्ञान वाढावणारे हे सोमरस लाटांच्या रूपानें पाण्याजवळ नेले जातात अर्थात् पाण्यांत सोमरस मिसळला जात असतो.

८ हे सोम ! देववीतये अर्णसा प्रपिप्ये [७६७]- हे सोमा ! तूं देवांना पिण्यास देण्यासाठीं पाण्यांत मिसळला जातोस.

९ नदीषु गभस्त्योः आ हिन्वन्ति [७६८]–नदीच्या पाण्यामध्यें हातांनीं तो सोमरस मिसळला जात आहे. येथें ' नदीषु ' ' नद्यांमध्यें मिसळला जातो ' असें म्हटलें आहे. नदीच्या पाण्यामध्यें मिसळला जातो, असें म्हणण्या-ऐवजीं नद्यांमध्यें मिसळला जातो, असें म्हटलें आहे. ' अंशा-साठीं पूर्णाचा प्रयोग वेदामध्यें होत असतो. ' ' जल ' म्हणण्याच्या ऐवजीं ' नदी ' शब्द या आलंकारिक अर्थानें वापरला आहे.

याप्रमाणें या अध्यायामध्यें सोमरस काढल्यानंतर तो पाण्यांत मिसळला जातो व नंतर गाळला जातो असें वर्णन आहे.

१० गोभिः श्रीणन्तः स्वादु अकर्म [७३६]– गाईच्या दुधाशीं सोमरस मिसळून त्याला आम्ही मधुर केला आहे.

११ जातं अप्तुरं भङ्गं, गोभिः परिष्कृतं इन्दुं देवाः उप अयासिषुः [७६२]– सोमरस काढल्यानंतर, त्यांत नंतर पाणी मिसळतात, त्या शत्रूला ठार मारणाऱ्या सोमाला गाईच्या दुधांत मिसळतात, तेव्हां त्याच्याजवळ देव जातात. रस काढणें, पाणी मिसळणें, गाळणें व त्यांत गाईचें दूध मिसळणें व नंतर पिणें किंवा हवन करून पिणें असा क्रम येथें स्पष्ट दिसत आहे.

१२ बभ्रवः शुक्राः ऋतस्य धारया द्रोणान् गोमन्तं वाजं अभि अक्षरन् [७६५]- स्वच्छ सोमरस पाण्याच्या धारेबरोबर कलशामध्यें गोदुग्धरूपी अन्नाशीं मिसळले जातात.

१३ अंशोः पयसा मधुश्च्युतं कोशं अच्छ [७६७] – सोमरस दुधांत मिसळल्यानंतर त्याला मधुर रस ठेवण्याच्या भांड्यांत ठेवतात.

१४ गोभिः अज्यते [७७०]- गाईच्या दुधाशीं सोमरस मिसळला जातो. येथें 'गो' पद गाईच्या दुधाचें वाचक आहे.

१५ मर्ज्यः अर्जुनः अत्के आ अव्यत् [७६७]- शुद्ध होणारा सोम भांड्यांत गाळणींतून गाळला जात आहे.

१६ रेभन् पवित्रं विश्वतः पर्येषि [७७२]- शब्द करीत गाळणींतून खालील भांड्यांत येतोस.

१७ अया पवस्व [७७२]- धारेनें गाळला जा.

१८ मधोः धाराः असृक्षत [७७२]- मधुर रसाच्या धारा खालीं सरकत आहेत.

१९ हर्यत हरिः, स्तोतृभ्यः वीरवत् यशः अभ्यर्षन् रंह्या ह्वरांसि अति पवते [७७३]- हिरव्या रंगाचा सोमरस, स्तोत्यांना वीर पुत्रांसह मिळणारें यश देऊन, गाळणींतून गाळला जातो.

२० अयं सूर्यः इव उपदृक् [७५६]- हा सूर्याप्रमाणें तेजस्वी आहे, सर्वांना पाहतो.

२१ अयं पुनानः सोमः विश्वा भुवना उपरि, देवो न सूर्यः तिष्ठति [७५७]- हा स्वच्छ होणारा सोमरस सर्व भुवनाच्यावर सूर्याप्रमाणें प्रकाशित होत आहे.

असा सोमरस गाळून दुधांत मिसळून तयार केल्यानंतर त्याचें हवन करून तो देवांना अर्पण केला जातो. पहा —

२२ हे इन्द्र ! त्वा अस्मिन् सधमादे [७३६]- हे इन्द्रा ! तुला या यज्ञांत बोलावलें जात आहे.

२३ इदं सुतं अनु पिब [७३७]- या सोमरसाला तूं पी.

२४ ते यः स्वधां अनु असत् [७३८]- तुला सोमरस अन्नासारखा आहे.

२५ सुते तन्वं नियच्छ [७३८]- सोमयागामध्यें आपल्याला ने.

२६ सोम्य ! स त्वा ममत्तु [७३८]- हे सोम पिणाऱ्या इन्द्रा ! हा सोम तुला आनंद देवो.

२७ स ते कुक्ष्योः प्राश्नातु [७३९]- तो तुझ्या कुशींमध्यें भरून जावो.

२८ सोम्यं मधु पिबतं [७५४]-सोमाचा मधुर रस प्या.

२९ देवयुः [७७२]- हा सोम देवांजवळ जाणारा आहे.

३० विश्वस्य मतिं आ विवशत् [७७०]- सर्वांच्या बुद्धींना हा आपल्या वशांत ठेवतो. सर्वांच्या बुद्धींवर आपला प्रभाव उत्पन्न करतो.

३१ उदरं सुपूर्णं सुतं अन्धः पिब [७३४]- पोट भरेपर्यंत सोमरसरूपी अन्न पी.

३२ मदच्युतः सोमासः सुताः विदथे मघोनां नः श्रवसे प्राक्रमुः [७६९]- आनंद वाढवणारे सोमरस यज्ञामध्यें यजमानांचें यश वाढवतात.

शत्रूला भय दाखवणें

सोमरस प्याल्यानंतर मनाचा उत्साह वाढतो, शरीराची शक्ति वाढते व शत्रूला भय वाटावें असें सामर्थ्य उत्पन्न होतें पहा—

३३ हे सोम ! उपस्थुषः उपशिक्ष, शत्रवे भियसं आधेहि [७६१]- हे सोमा ! जवळ बसणाऱ्यांना सांग कीं तुम्ही शत्रूला भय दाखवा.

शत्रूला भय दाखवण्याइतकें सामर्थ्य सोमरस पिण्यानें वाढतें. सर्व देव हा रस पितात व सामर्थ्यवान् बनतात व आपल्या सर्व शत्रूंचा पराभव करतात.

सुभाषितें

आतां द्वितीयाध्यायांतील सुभाषितें पहा —

१ विश्वा-साहं, शतक्रतुं, चर्षणीनां मंहिष्ठं इन्द्रं प्र गायत [७१३]- सर्व शत्रूंचा पराभव करणाऱ्या, शेंकडों प्रकारचीं कर्में करणाऱ्या, मानवांमध्यें फार मोठ्या इन्द्राच्या स्तुतिचें गायन करा.

२ नृतुः नः महोनां वाजानां दाता [७१५]- तो इन्द्र सर्वांना चालवणारा, आम्हांला मोठें धन अन्न आदींचा देणारा आहे.

३ वः हर्यश्वाय सोम-पाव्ने प्रगायत [७१६]- हे मित्र हो ! तुम्ही घोडे ज्याच्याजवळ आहेत अशा सोम पिणाऱ्या इन्द्राला आनन्द देणारें स्तोत्र गा.

४ सु-दानवः सत्य-राधसः [७१७]- हा इन्द्र उत्तम दान देणारा आणि सत्य रीतिनें धन आपल्याजवळ राखणारा आहे.

५ **वाज-युः, गव्युः, हिरण्य-युः** [७१८]- तो इन्द्र आम्हांला अन्न, गाई आणि सोनें देणारा आहे.

६ **इन्द्र ! त्वायन्तः सखायः त्वा** [७१९]- हे इन्द्रा ! तुला प्राप्त करूं इच्छिणारे आम्ही मित्र तुझी स्तुति करीत आहों.

७ **अपसः तव नविष्ठौ अन्यत् न घं आ पपन** [७२०]- हे इन्द्रा ! यज्ञकर्मापैकीं तुझ्या नवीन यज्ञामध्यें तुझ्या स्तोत्राशिवाय मी दुसरें स्तोत्र म्हणणारच नाहीं.

८ **तव इत् उ स्तोमैः चिकेत** [७२०]- तुझ्याच स्तोत्रांनीं स्तुति करणें मी जाणत आहें.

९ **देवाः सुन्वंतं इच्छन्ति** [७२१]- देव सोमरस काढणाऱ्याची इच्छा करतात. सोम यज्ञ करणाऱ्या माणसाला धन देतात.

१० **स्वप्नाय न स्पृहयन्ति** [७२१]- आळशी माणसाची इच्छा करीत नाहींत.

११ **अ-तन्द्राः प्र-मादं यन्ति** [७२१]- उद्यमी देवता परम आनन्द देणाऱ्या सोमाला प्राप्त करतात, म्हणजे उद्यमी माणसेंच सुखाला प्राप्त करूं शकतात.

१२ **यस्मिन् विश्वाः श्रियः अधि** [७२३]- या इन्द्रामध्यें सर्व शोभा राहिल्या आहेत.

१३ **सप्त संसदः रणन्ति** [७२३]- इन्द्राची स्तुति यज्ञाचे सात ऋत्विज करीत असतात.

१४ **देवाः त्रि-कद्रुकेषु चेतनं अत्नत** [७२४]- सर्व देवता यज्ञाच्या तीन दिवसांमध्यें उत्साह वाढवणाऱ्या यज्ञाचा विस्तार करतात.

१५ **शाचि-गोः शाचि-पूजनः** [७२६]- हा इन्द्र सामर्थ्यवान् किरणांनीं युक्त आणि शक्तिमान् होण्याच्या कारणानें पूजला जात आहे.

१६ **हे आ-खण्डल ! प्र हूयसे** [७२६]- हे शत्रूंना तोडणाऱ्या इन्द्रा ! सोमासाठीं तुला बोलावीत आहों.

१७ **शृंग-वृषः न पात्** [७२७]- किरणांचा प्रसार जो कमी करीत नाहीं, अशा हा इन्द्र आहे.

१८ **इन्द्र ! महा-हस्ती न क्षुमन्तं चित्रं ग्राभं दक्षिणेन सं गृभाय** [७२८]- हे इन्द्रा ! मोठ्या हातांचा तूं आमच्यासाठीं विलक्षण तेजस्वी व स्वीकार करण्यास योग्य असें धन देण्यासाठीं उजव्या हातांत धारण कर.

१९ **तुविकूर्मिः, तुवि-देष्णः, तुवि-मघः, तुवि-मात्रं अवोभिः** [७२९]- अनेक पराक्रम करणारा, देण्यास पुष्कळ धन आपल्याजवळ ठेवणारा, मोठा धनवान्, मोठ्या आकाराचा संरक्षणाच्या अनेक साधनांनीं युक्त असा हा इन्द्र आहे.

२० **हे शूर ! दित्सन्तं त्वा देवाः न, मर्तासः न वारयन्ते** [७३०]- हे वीर इन्द्रा ! दान देण्याची इच्छा करणाऱ्या तुला देव व मनुष्यही निवारण करूं शकत नाहींत.

२१ **त्वा अविष्यवः मूराः उपहस्वानः मा दभन्** [७३२]]- तुला रक्षणाची इच्छा करणारे मूर्ख व उपहास करणारेही त्रास न देवोत.

२२ **ब्रह्म-द्विषं मा कीं वनः** [७३२]- ज्ञानाचा द्वेष करणाऱ्याला तूं सहाय्य करूं नकोस.

२३ **राधानां-पते गिर्वणः ! ओजसा पिब** [७३७]- हे धनपते, स्तुत्य इन्द्रा ! बलानें युक्त असा तूं या सोमरसाला पी.

२४ **हे शूर ! राधसा बाहू प्र** [७३९]- धन देण्यासाठीं तुझे बाहूही सोमाला प्राप्त होवोत.

२५ **पुरू-तमः पुरूणां वार्याणां ईशानः** [७४१]- तो इन्द्र पुष्कळ शत्रूंना पराभूत करणारा व पुष्कळ स्वीकार करण्यास योग्य धनांचा स्वामी आहे.

२६ **सः घ नः योगे, राये, पुरंध्यां आ भुवत्** [७४२]- तो इन्द्र निश्चयानें आमच्या पुरुषार्थाच्या कर्मामध्यें, धन प्राप्त करण्याच्या कार्यामध्यें, पुष्कळ बुद्धि लावून करण्याच्या कार्यामध्यें सहाय्यक होवो.

२७ **योगे-योगे वाजे-वाजे तवस्तरं इन्द्रं ऊतये हवामहे** [७४३]- प्रत्येक कर्माच्या प्रारंभीं व प्रत्येक युद्धामध्यें अत्यन्त बलवान् इन्द्राला संरक्षण करण्यासाठीं आम्हीं बोलावतों.

२८ **प्रत्नस्य ओकसः, तुवि-प्रतिं नरं अनु हुवे** [७४४]- आपल्या पुरातन घरामधून पुष्कळांकडे जाणाऱ्या नेत्या इन्द्राला आम्हीं सहाय्यासाठीं बोलावतों. " प्रत्नस्य ओकसः " इन्द्राचें सनातन घर हें विश्वच आहे, स्वर्गधाम आहे.

२९ **सः महान् हि** [७४५] - तो मोठा आहे.

३० **सः देवानां सदने वृधः सु-पारः सु-श्रवस्तमः सं अप्सु-जित्** [७४७]- तो इन्द्र देवांच्या स्थानांत यजमानांना वाढवणारा, उत्तम रीतिनें दुःखांतून पार करणारा, उत्तम यशस्वी व राक्षसांना जिंकणारा आहे.

३१ **हे इन्द्र ! सुम्ने अन्तमः भव, वृधे सखा** [७४८]- हे इन्द्रा ! सुखाच्या वेळीं आमच्याजवळ रहा, तसेंच उन्नतिच्यावेळीं मित्र होऊन आमच्याजवळ रहा.

३२ ऊर्जः न-पातं, प्रियं, चेतिष्ठं अरतिं सु-अध्वरं विश्वस्य दूतं अमृतं अग्निं आ हुवे [७४९]- बल कमी न करणाऱ्या, प्रिय व चेतना देणाऱ्या, प्रगतिशील, उत्तम यज्ञ करणाऱ्या, सम्पूर्ण याजकांच्या दूतासारखा जो अमर अग्नि आहे, त्याला मी बोलवीत आहें.

३३ सः अरुपा विश्व-भोजसा योजते [७५०]- तो अग्नि तेजस्वी सर्वभक्षक अश्वांनां आपल्या रथाला जोडतो.

३४ सु-ब्रह्मा, यज्ञः, सु-शमी सु-आहुतः [७५१]- तो अग्नि उत्तम ज्ञानी, यजनीय, पूज्य, उत्तम संयमी, उत्तम आहुतींनीं प्रदीप्त झालेला आहे.

३५ आयती उच्छन्ती दिवः दुहिता उषा महीतमः चक्षुषा उप वृणुते उ [७५१]- येऊन चमकणारी द्युलोकाची पुत्री उषा मोठ्या अन्धकाराचें प्रकाशानें निवारण करीत आहे.

३६ सूनरी ज्योतिः कृणुते [७५१]- उत्तम नेतृत्व करणारी ही उषा प्रकाश करीत आहे.

३७ उषः ! तव सूर्यस्य च द्युति भक्तेन संगमेमहि [७५२]- हे उषे ! तुझा व सूर्याचा प्रकाश झाल्यावर अन्नानें आम्हीं युक्त होऊं.

३८ अश्विना ! इमाः दिविष्टयः उस्रौ वां हवन्ते [७५३] हे अश्विनौ देवांनों ! या स्वर्गाची इच्छा करणाऱ्या प्रजा निवासक अशा तुम्हांला सहाय्यासाठीं बोलावतात.

३९ विशं विशं गच्छथः [७५३]- तुम्ही प्रत्येक प्रजाजनाजवळ जात असतां.

४० नरा ! युवं समनसा चित्रं भोजनं ददथुः [७५४]- हे नेत्यांनों, अश्विदेवांनों ! तुम्ही विलक्षण भोजन देत असतां.

४१ शुक्रं सहस्रसां पयः [७५५]- तेजस्वी आणि सहस्रावधि इच्छा पूर्ण करणारा हा सोमरस आहे.

४२ अयं सूर्यः इव उपदृक् [७५६]- हा सोम सूर्याप्रमाणें सर्वांना पाहणारा आहे.

४३ अयं सोमः विश्वानि भुवना उपरि तिष्ठति [७५७]- हा सोमरस सर्व भुवनांच्यावर प्रकाशतो.

४४ पवमान ! शत्रवे भियसं आधेहि [७६१]- हे सोमा ! शत्रूला भय प्राप्त होईल असें कर.

४५ ई विश्वस्य मतिं आ विवशत् [७७०]- हा सोम सर्वांच्या बुद्धींना वश करतो.

४६ हर्यतः हरिः स्तोतृभ्यः वीरवत् यशः अभ्यर्षत [७७३]- इच्छा करण्यास योग्य हा हिरव्या रंगाचा सोम स्तुति करणाऱ्यांना वीर पुत्रांनीं युक्त असलेलें यश देतो.

४७ तत् वचः मर्तः न प्र नष्ट [७७४]- तें हीन वचन मनुष्य न ऐको.

४८ अ-राधसं श्वानं अपहत [७७४]- अयोग्य कुत्र्याला सोमाजवळून दूर करा.

उपमा

या द्वितीयाध्यायांत अशा उपमा आहेत. त्या येथे पहा—

१ भीमं गां न देवाः मर्तासः न वारयन्ते [७३०]- ज्याप्रमाणें भयंकर बैलाला कोणी निवारण करूं शकत नाहींत, त्याप्रमाणें तुला देव व मनुष्यही निवारण करूं शकत नाहींत.

२ यथा गौरः सरः पिब [७३३]- ज्याप्रमाणें मृग सरोवरावर पाणी पितो, त्याप्रमाणें हे इन्द्रा ! तूं सोमरस पी.

३ नदीषु अश्वः न, अव्यावारैः निक्तः [७३५]- जसा नदीमध्यें घोडा धुतात तसा पाण्यांत मिसळलेला हा सोम मेंढीच्या केसांच्या चाळणींतून गाळून तयार केलेला आहे.

४ यवं यथा, तं गोभिः श्रीणन्तः स्वादु अकर्म [७३६]- ज्याप्रमाणें जवांचा पुरोडाश करतात, त्याप्रमाणें तो रस गाईच्या दूध आदींकांशीं मिसळून मधुर तयार केला आहे.

५ सूर्यः इव, अयं उपदृक् [७५३]- सूर्याप्रमाणें हा सोम सर्वांना पाहणारा आहे.

६ सूर्यः देवः न, सोमः विश्वानि भुवना उपरि तिष्ठति [७५७]- सूर्य देवाप्रमाणें हा सोम सर्व भुवनांच्यावर प्रकाशतो.

७ वनानि महिषाः इव, सोमासः आपः प्र नयन्ते [७६४]- जसे वनांत रेडे जातात, तसेच हे सोमरस पाण्यांत मिसळले जातात.

८ सिन्धुः न, सोम ! अर्णसा प्र पिप्ये [७६७]- ज्याप्रमाणें नदी जलानें भरली जाते, त्याप्रमाणें हे सोम ! तूं पाण्यांत मिसळला जातोस.

९ मदिरः न जागृविः [७६७]– आनन्द देणाऱ्या पदार्थाप्रमाणें हा सोम उत्साह वाढवणारा आहे

१० हर्यतः सूनुः न, मर्त्यः अर्जुनः अत्के आ अव्यत [७६८]– प्रिय पुत्राप्रमाणें शुद्ध होणारा हा स्वच्छ सोमरस भांड्यांत गाळला जातो.

११ अपसः रथं यथा, ईं नदीषु गभस्त्योः आ हिन्वन्ति [७६८]– ज्याप्रमाणें वेगवान् रथाला संग्रामामध्यें नेतात, त्याप्रमाणें या सोमाला जलांमध्यें हातांनीं मिसळतात.

१२ हंसः यथा गणं, ईं विश्वस्य मतिं आविवशत् [७७०] हंस जसा आपल्या समुदायांत जातो, त्याप्रमाणें हा सोम सर्वांच्या बुद्धिला वश करतो.

१३ अत्यः न, गोभिः अज्यते [७७०]– घोड्याला ज्याप्रमाणें न्हाऊं घालतात, त्याप्रमाणें गाईच्या दुधाशीं या रसाला मिसळतात.

१४ भृगवः मखं न, अ-राधसं श्वानं अपहत [७७४] ज्याप्रमाणें भृगूंनीं अयोग्य यज्ञाला दूर केलें होतें, त्याप्रमाणें हे याजक हो ! अयोग्य कुत्र्याला दूर करा.

द्वितीयाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
७१३	८।९२।१	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	इन्द्रः	अनुष्टुप्
७१४	८।९२।२	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	गायत्री
७१५	८।९२।३	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
७१६	७।३१।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
७१७	७।३१।२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
७१८	७।३१।३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
७१९	८।२।१६	मेधातिथिः काण्वः, प्रियमेधश्चांगिरसः	,,	,,
७२०	८।२।१७	मेधातिथिः काण्वः, प्रियमेधश्चांगिरसः	,,	,,
७२१	८।२।१८	मेधातिथिः काण्वः, प्रियमेधश्चांगिरसः	,,	,,
७२२	८।९२।१९	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
७२३	८।९२।२०	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
७२४	८।९२।२१	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
		(२)		
७२५	८।१७।११	इरिम्बिठिः काण्वः	,,	,,
७२६	८।१७।१२	इरिम्बिठिः काण्वः	,,	,,
७२७	८।१७।१३	इरिम्बिठिः काण्वः	,,	,,
७२८	८।८१।१	कुसीदी काण्वः	,,	,,
७२९	८।८१।२	कुसीदी काण्वः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
७३०	८।८१।३	कुसीदी काण्वः	इन्द्रः	गायत्री
७३१	८।४५।२२	त्रिशोकः काण्वः	,,	,,
७३२	८।४५।२३	त्रिशोकः काण्वः	,,	,,
७३३	८।४५।२४	त्रिशोकः काण्वः	,,	,,
७३४	८।२।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
७३५	८।२।२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
७३६	८।२।३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
		(३)		
७३७	३।५१।१०	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
७३८	३।५१।११	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
७३९	३।५१।१२	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
७४०	१।५।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
७४१	१।५।२	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
७४२	१।५।३	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
७४३	१।३०।७	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
७४४	१।३०।९	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
७४५	१।३०।८	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
७४६	८।१३।१	नारदः काण्वः	,,	उष्णिक्
७४७	८।१३।२	नारदः काण्वः	,,	,,
७४८	८।१३।३	नारदः काण्वः	,,	,,
		(४)		
७४९	७।१६।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	अग्निः	प्रगाथः (विषमा बृहती, समा सतो बृहती)
७५०	७।१६।२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
७५१	७।८१।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	उषा	,,
७५२	७।८१।२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
७५३	७।७४।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	अश्विनौ	,,
७५४	७।७४।२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
		(५)		
७५५	९।५४।१	अवत्सारः काश्यपः	पवमानः सोमः	गायत्री
७५६	९।५४।२	अवत्सारः काश्यपः	,,	,,
७५७	९।५४।३	अवत्सारः काश्यपः	,,	,,
७५८	९।३।९	शुनःशेप आजीगर्तिः स देवरातः कृत्रिमो वैश्वामित्रः	,,	,,
७५९	९।४२।२	मेध्यातिथिःकाण्वः	,,	,,
७६०	९।४२।४	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
७६१	९।६९।६	असितः काश्यपो देवलो वा	पवमानः सोमः	गायत्री
७६२	९।६१।१३	अमहीयुरांगिरसः	"	"
७६३	९।११।१	असितः काश्यपो देवलो वा	"	"
		(६)		
७६४	९।३३।१	त्रित आप्त्यः	"	"
७६५	९।३३।२	त्रित आप्त्यः	"	"
७६६	९।३३।३	त्रित आप्त्यः	"	"
७६७	९।१०७।१२	सप्तर्षयः	"	प्रगाथः (विषमा बृहती, समा सतो बृहती)
७६८	९।१०७।१३	सप्तर्षयः	"	"
७६९	९।३२।१	श्यावाश्व आत्रेयः	"	गायत्री
७७०	९।३२।३	श्यावाश्व आत्रेयः	"	"
७७१	९।३२।२	श्यावाश्व आत्रेयः	"	"
७७२	९।१०६।१४	अग्निश्चाक्षुषः	"	उष्णिक्
७७३	९।१०६।१३	अग्निश्चाक्षुषः	"	"
७७४	९।१०१।१३	प्रजापतिर्वैश्वामित्रो वाच्यो वा	"	अनुष्टुप्

अथ तृतीयोऽध्यायः ।

अथ द्वितीयप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ २ ॥

[१]

(१–१९) १ जमदग्निर्भार्गवः; २, ५, १५ अमहीयुरांगिरसः; ३ कश्यपो मारीचः; ४, १० भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा; ६–७ मेधातिथिः काण्वः; ८ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ९ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ११ उपमन्युर्वासिष्ठः; १२ शंयुर्बार्हस्पत्यः; १३ वालखिल्याः; प्रस्कण्वः काण्वः; १४ नृमेध आंगिरसः; १६ नहुषो मानवः; १७ (१–२) सिकता निवावरी; १७ (३) पृश्नियोऽजाः; १८ श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः; १९ जेता माधुच्छन्दसः; ॥ १–५, १०–११, १५–७ पवमानः सोमः; ६ अग्निः; १७ मित्रावरुणौ; ८, १२–१४, १८–१९ इन्द्रः; ९ इन्द्राग्नी ॥ १–१०, १५, १८ गायत्री; ११ त्रिष्टुप्; १२–१४ प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती), १६, १९ अनुष्टुप्; १७ जगती ॥

७७५ पवस्व वाचो अग्रियः सोम चित्राभिरूतिभिः । अभि विश्वानि काव्या ॥ १ ॥
(ऋ. ९।६२।२५)

७७६ त्वꣳसमुद्रिया अपोऽग्रियो वाच ईरयन् । पवस्व विश्वचर्षणे ॥ २ ॥ (ऋ. ९।६२।२६).

७७७ तुभ्येमा भुवना कवे महिम्ने सोम तस्थिरे । तुभ्यं धावन्ति धेनवः ॥ ३ ॥ (यी) ॥
(ऋ. ९।६२।२७)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[७७५] हे (सोम) सोमा ! (अग्रियः) तूं अग्रभागीं राहणारा मुख्य आहेस. तूं (चित्राभिः ऊतिभिः) आपल्या विलक्षण संरक्षक शक्तिसह (वचः पवस्व) आमची स्तुति ऐकून घे. तसेंच तूं (विश्वानि काव्या अभि) आपलीं सर्व स्तुतिचीं काव्यें ऐकून घे. ॥ १ ॥

१ अग्रियः— अग्रभागीं रहावें, पुढारी व्हावें.

२ चित्राः ऊतयः— विशेष संरक्षणाची शक्ति आपणाजवळ असावी.

३ विश्वानि काव्या अभि— सर्व स्तुतिचीं काव्यें व्हावीं अशीं कृत्यें करावीं.

[७७६] हे (विश्व-चर्षणे) सर्वांच्या निरीक्षका ! (अग्रियः) अग्रगामी होऊन, (वाचः ईरयन्) स्तुतींना प्रेरणा देऊन, (समुद्रियाः आपः) अन्तरिक्षांतील जल (पवस्व) प्राप्त कर. सोमरसामध्यें जल मिसळलें जावो. ॥२॥

१ विश्व-चर्षणिः— सर्व कर्मांचें निरीक्षण योग्य रीतिनें करावें.

२ अग्रियः— मुख्य स्थानीं विराजमान व्हावें, अग्रेसर व्हावें.

३ वाचः ईरयन्— दुसऱ्यांची वाणी स्तुति करण्यास प्रवृत्त होईल, असें उत्तम कर्म करावें.

४ समुद्रियाः आपः पवस्व— सोमरसामध्यें अन्तरिक्षांतून पावसाच्या रूपानें मिळणारें जल मिळवावें.

[७७७] हे (कवे) दूरदर्शी सोमा ! (तुभ्यं) तुझ्या (महिम्ने) मोठेपणासाठीं (इमा भुवना तस्थिरे) हीं भुवनें स्थिर राहिलीं आहेत. तसेंच (धेनवः) या गाई (तुभ्यं धावन्ति) तुझ्याजवळ दूध देण्यासाठीं धांवत आहेत. ॥ ३ ॥

*

७७८ पवस्वेन्दो वृषा सुतः कृधी नो यशसो जने । विश्वा अप द्विषो जहि ॥१॥ (ऋ. ९।६१।२८)

७७९ यस्य ते सख्ये वयंसासह्याम पृतन्यतः । तवेन्दो द्युम्न उत्तमे ॥ २ ॥ (ऋ. ९।६१।२९)

७८० या ते भीमान्यायुधा तिग्मानि सन्ति धूर्वणे । रक्षा समस्य नो निदः ॥ ३ ॥ २ (ह) ॥ (ऋ. ९।६१।३०)

७८१ वृषा सोम द्युमाँअसि वृषा देव वृषव्रतः । वृषा धर्माणि दध्रिषे ॥ १ ॥ (ऋ ९।६४।१)

---

१ कविः— क्रान्तदर्शी, दूरदर्शी, पुढें जें होणार तें आधीं पाहणारा.

२ तुभ्यं महिम्ने इमा भुवना तस्थिरे— तुझा महिमा वाढवण्यासाठीं हीं भुवनें यत्न करीत आहेत. आपला महिमा वाढावा, यासाठीं यत्न करावा. आपला महिमा कमी होईल असें कांहींहि कोणींहि करूं नये.

३ धेनवः तुभ्यं धावन्ति— गाईचें दूध सोमरसामध्यें मिसळावें यासाठीं गाई सोमाजवळ येतात. सोमयागा-जवळ पोंचतात.

[७७८] हे (इन्दो) सोमा ! (सुतः वृषा) काढलेला हा सोमरस बल वाढवणारा आहे. (पवस्व) तूं गाळला जा. (जने) लोकांमध्यें (नः यशसः कृधि) आम्हांला यशस्वी कर. आणि (विश्वाः द्विषः अप जहि) सर्व शत्रूंचा नाश कर. ॥ १ ॥

१ सुतः वृषा— सोमरस बल वाढवणारा आहे.

२ जने नः यशसः कृधि— जनांमध्यें आम्हांला यशस्वी कर.

३ विश्वाः द्विषः अप जहि— सर्व शत्रूंचा पराभव कर, सर्व शत्रूंना नष्ट कर.

[७७९] हे (इन्दो) सोमा ! (यस्य ते सख्ये) ज्या तुझें सख्य झाल्यानंतर (तव उत्तमे द्युम्ने) तुझ्या उत्तम तेजाला प्राप्त झालों आहों, यामुळें (पृतन्यतः सासह्याम) सैन्यासह हल्ला करणाऱ्या शत्रूला आम्ही पराभूत करूं शकूं. ॥ २ ॥

१ तव उत्तमे द्युम्ने सख्ये— तुझ्या उत्तम तेजस्वी मैत्रीला प्राप्त करून आम्ही उत्तम तेजस्वी बनूं.

२ पृतन्यतः सासह्याम— सैन्यासह चालून येणाऱ्या शत्रूचा पराभव आम्ही करूं शकूं असें कर.

[७८०] हे (सोम) सोमा ! (ते) तुझी (या भीमानि) जीं भयंकर (तिग्मानि आयुधा) व तीक्ष्ण शस्त्रें (धूर्वणे) शत्रूंचा नाश करण्यासाठीं आहेत, त्यांच्या योगानें (समस्य निदः) सर्व शत्रूंच्या निंदेपासून (नः रक्ष) आमचें संरक्षण कर.

१ भीमानि तिग्मानि आयुधा धूर्वणे— भयंकर तीक्ष्ण आयुधें शत्रूंचा नाश करण्यासाठीं आपणाजवळ ठेवावीं.

२ समस्य निदः नः रक्ष— सर्व शत्रूंच्या निंदेपासून तीं आपलें उत्तम संरक्षण करूं शकतील.

उत्तम शस्त्रें व अस्त्रें शत्रूंपासून संरक्षण करूं शकतात. म्हणून उत्तम शस्त्रास्त्रें आपणाजवळ तयार ठेवावीं.

[७८१] हे (सोम) सोमा ! तूं (वृषा द्युमान् असि) बलवान् व तेजस्वी आहेस. हे (देव) हे सोमदेवा ! (वृषा) तूं कामनांची तृप्ति करणारा आहेस, (वृषः-व्रतः) बल वाढवणें हें तुझें व्रतच आहे. तूं (वृषा धर्माणि दध्रिषे) आपल्या बलानें सर्व कर्तव्यांचें धारण करतोस. ॥ १ ॥

१ वृषा द्युमान्— बलवान् व तेजस्वी व्हावें.

२ देव— देवत्व प्राप्त करावें.

३ वृष-व्रतः— बल वाढवणें हेंच व्रत पाळावें.

४ वृषा धर्माणि दध्रिषे— आपल्या बलानें सर्व कर्तव्यें स्वतः करण्याचा निश्चय करावा.

७८२ वृष्णस्ते वृष्ण्यं शवो वृषा वनं वृषा मदः । स त्वं वृषन्वृषेदसि ॥ २ ॥ (ऋ. ९।६४।२)

७८३ अश्वो न चक्रदो वृषा सं गा इन्दो समर्वतः । वि नो राये दुरो वृधि ॥ ३ ॥ ३ (लु) ॥ (ऋ. ९।६४।३)

७८४ वृषा ह्यसि भानुना द्युमन्तं त्वा हवामहे । पवमान स्वर्दृशम् ॥ १ ॥ (ऋ. ९।६५।४)

७८५ यदद्भिः परिषिच्यसे मर्मृज्यमान आयुभिः । द्रोणे सधस्थमश्नुषे ॥ २ ॥ (ऋ. ९।६५।६)

७८६ आ पवस्व सुवीर्यं मन्दमानः स्वायुध । इहो ष्विन्दवा गहि ॥ ३ ॥ ४ (यो) ॥ (ऋ. ९।६५।५)

७८७ पवमानस्य ते वयं पवित्रमभ्युन्दतः । सखित्वमा वृणीमहे ॥ १ ॥ (ऋ. ९।६१।४)

[७८२] हे (वृषन्) बलवान् सोमा ! (वृष्णः ते शवः) बलवान् अशा तुझें सामर्थ्य (वृष्ण्यं) पुष्कळ प्रभावी आहे. (वनं वृषा) तुझें सेवन करणें हें बल वाढवणारें आहे. (मदः वृषा) तुझा सोमरस बल वाढवणारा आहे. (सः त्वं वृषा इत् असि) तो तूं बल वाढवणारा आहेस. ॥ २ ॥

१ वृष्णः ते शवः वृष्ण्यं — बल वाढवणाऱ्या तुझें सामर्थ्य अत्यंत प्रभावशाली आहे.

२ सः त्वं वृषा इत् असि — तो तूं खरा बलवान् आहेस. साधकांनीं खरें बल प्राप्त करून उत्तम सामर्थ्यानें युक्त व्हावें.

[७८३] हे (इन्दो) सोमा ! (वृषा) तूं बलवान् आहेस. (अश्वः न) तूं घोड्याप्रमाणें (सं चक्रदः) शब्द करतोस व (गाः अर्वतः) गाई आणि घोडे तूं देतोस यासाठीं (नः राये दुरः विवृधि) आम्हांला धन मिळण्याचीं द्वारें उघडून ठेव. ॥ ३ ॥

१ नः राये दुरः विवृधि— आमच्यासाठीं धन प्राप्त करण्याचीं द्वारें उघडून ठेव. धर्ममार्गानें धन मिळावें असें कर. सन्मार्गानें धन मिळावें.

[७८४] हे सोमा ! तूं निश्चयानें (वृषा हि असि) बलवाढवणारा आहेस. हे (पवमान) शुद्ध होणाऱ्या सोमा ! (स्वः-दृशं) आत्मदर्शी व (भानुना द्युमन्तं) स्वकीय तेजानें तेजस्वी (त्वा हवामहे) अशा तुला आम्ही आमच्याजवळ बोलावीत आहों. ॥ १ ॥

१ स्वः-दृश्ः— आपल्या तेजानें चमकणारा.

२ भानुना द्युमन्तं— स्वतःच्या तेजानें तेजस्वी.

३ हवामहे — तेजस्वी असतो त्याला आपणाजवळ बोलवावें. त्याच्या तेजानें तेजस्वी व्हावें.

[७८५] हे सोमा ! तूं (आयुभिः मर्मृज्यमानः) ऋत्विजांकडून शुद्ध केला जातोस. व (यत् अद्भिः परिषिच्यसे) जेव्हां जलाशीं मिसळला जातोस, तेव्हां (द्रोणे सधस्थं अश्नुषे) कलशामध्यें स्थान प्राप्त करतोस. ॥ २ ॥

ऋत्विज सोमरस गाळतात, त्याला पाण्यामध्यें मिसळतात व कलशामध्यें भरून ठेवतात.

[७८६] (सु-आयुध) उत्तम आयुधांनीं युक्त असणाऱ्या सोमा ! (मन्दमानः) तूं आनन्द देणारा होऊन (सु-वीर्यं आ पवस्व) उत्तम वीर्य आम्हांला दे व हे (इन्दो) सोमा ! (इह उ सु आगहि) येथें या यज्ञामध्यें उत्तम रीतिनें ये. ॥ ३ ॥

१ मन्दमानः सु-वीर्यं आ पवस्व— आनन्द देणारा होऊन उत्तम पराक्रम करण्याचें सामर्थ्य आम्हांस दे.

२ सु-आयुध — उत्तम आयुधें जवळ बाळगावीं. येथें स्फ्य, कपाल आदि यज्ञाचीं आयुधें अभीष्ट आहेत. जें कार्य करणें असेल त्याचीं आयुधें निरनिराळीं असतात.

[७८७] हे सोमा ! (पवित्रं अभ्युन्दतः) गाळणीमध्यें गाळल्या जाणाऱ्या (पवमानस्य ते) व पवित्र होणाऱ्या तुझ्याशीं (सखित्वं आ वृणीमहे) मित्रभाव वाढावा असें आम्ही इच्छीत आहों. ॥ १ ॥

७८८ ये ते पवित्रमूर्मयोऽभिक्षरन्ति धारया । तेभिर्नः सोम मृडय ॥ २ ॥ (ऋ. ९।६१।५)

७८९ स नः पुनान आ भर रयिं वीरवतीमिषम् । ईशानः सोम विश्वतः ॥ ३ ॥ ५ (ला) ॥
(ऋ. ९।६१।६)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

७९० अग्निं दूतं वृणीमहे होतारं विश्ववेदसम् । अस्य यज्ञस्य सुक्रतुम् ॥ १ ॥ (ऋ. १।१२।१)

७९१ अग्निमग्निं हवीमभिः सदा हवन्त विश्पतिम् । हव्यवाहं पुरुप्रियम् ॥ २ ॥ (ऋ. १।१२।२)

७९२ अग्ने देवाँ इहा वह जज्ञानो वृक्तबर्हिषे । असि होता न ईड्यः ॥ ३ ॥ ६ (यौ) ॥
(ऋ. १।१२।३)

७९३ मित्रं वयं हवामहे वरुणं सोमपीतये । या जाता पूतदक्षसा ॥ १ ॥ (ऋ. १।२३।४)

---

[७८८] हे सोमा ! (ते ये ऊर्मयः) तुझ्या ज्या लाटा (धारया पवित्रं अभिक्षरन्ति) एका धारेनें गाळणींतून खालीं पडतात, (तेभिः नः मृडय) त्यांच्याकडून आम्हांला सुख मिळेल असें कर. ॥ २ ॥

[७८९] हे सोमा ! (विश्वतः ईशानः) तूं सर्वांचा स्वामी आहेस (सः अभिषुतः पुनानः) तो तूं रस काढून गाळला गेल्यानंतर (नः) आम्हांला (रयिं वीरवतीं इषं आ भर) धन व पुत्रपौत्रयुक्त अन्न भरपूर दे. ॥ ३ ॥

१ विश्वतः ईशानः— सर्व प्रकारें सर्वांचा स्वामी.
२ पुनानः— पवित्र होऊन.
३ रयिं वीरवतीं इषं आ भर— धन व पुत्र देणारें अन्न भरपूर दे.

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[७९०] (होतारं) देवतांना बोलावून आणणाऱ्या (विश्व-वेदसं) सर्व धनें जवळ बाळगणाऱ्या (अस्य यज्ञस्य सुक्रतुं) या यज्ञाला उत्तम रीतिनें सिद्ध करणाऱ्या (दूतं अग्निं वृणीमहे) देवतांना हवि पोंचवणाऱ्या अग्निची आम्ही आराधना करतों. ॥ १ ॥

१ होता— श्रेष्ठ देवांना बोलाऊन आणणारा.
२ विश्व-वेदाः— सर्व प्रकारचीं धनें आपल्याजवळ बाळगणारा.
३ यज्ञस्य सुक्रतुः— यज्ञ उत्तम रीतिनें करणारा.
४ दूतः— हवि देवांना पोंचवणारा.
५ अग्निः— " अग्निः कस्मादग्रणीर्भवति " (निरुक्त)- अग्रणी, पुढें नेणारा, शेवटपर्यंत पोंचवणारा.

[७९१] (विश्पतिं) प्रजाजनांचें पालन करणाऱ्या (हव्य-वाहं) हविला देवतांकडे पोंचवणाऱ्या (पुरु-प्रियं) अनेकांना प्रिय वाटणाऱ्या (अग्निं अग्निं) अग्रणी अग्निला (हवीमभिः सदा हवन्ते) हवनाच्या मंत्रांनीं आम्हीं नेहमीं बोलावतों. ॥ २ ॥

[७९२] हे (अग्ने) अग्नि देवा ! (जज्ञानः) अरणींतून उत्पन्न होणारा तूं (वृक्त-बर्हिषे) आसन पसरवणाऱ्या यजमानासाठीं (इह देवान् आ वह) या यज्ञामध्यें देवांना बोलाऊन आण. तूं (नः होता ईड्यः असि) आमचा देवांना बोलावणारा स्तुत्य सहाय्यक आहेस. ॥ ३ ॥

[७९३] (वयं) आम्ही (सोम-पीतये) सोमपान करण्यासाठीं (या जाता पूत-दक्षसा) जे यज्ञामध्यें येणारे पवित्र बलयुक्त आहेत, त्या (मित्रं वरुणं) मित्र व वरुणाला (हवामहे) बोलावीत आहों. ॥ १ ॥

७९४ ऋतेन यावृतावृधावृतस्य ज्योतिषस्पती । ता मित्रावरुणा हुवे ॥ २ ॥ (ऋ. १।२३।५)

७९५ वरुणः प्राविता भुवन्मित्रो विश्वाभिरूतिभिः । करतां नः सुराधसः ॥ ३ ॥ ७ (वा) ॥
(ऋ. १।२३।६)

७९६ इन्द्रमिद्गाथिनो बृहदिन्द्रमर्केभिरर्किणः । इन्द्रं वाणीरनूषत ॥ १ ॥ (ऋ. १।७।१)

७९७ इन्द्र इद्धर्योः सचा सम्मिश्ल आ वचोयुजा । इन्द्रो वज्री हिरण्ययः ॥ २ ॥ (ऋ. १।७।२)

७९८ इन्द्र वाजेषु नोऽव सहस्रप्रधनेषु च । उग्र उग्राभिरूतिभिः ॥ ३ ॥ (ऋ. १।७।४)

७९९ इन्द्रो दीर्घाय चक्षस आ सूर्यं रोहयद्दिवि । वि गोभिरद्रिमैरयत् ॥ ४ ॥ ८ (खा) ॥
(ऋ. १।७।३)

८०० इन्द्रे अग्ना नमो बृहत्सुवृक्तिमेरयामहे । धिया धेना अवस्यवः ॥ १ ॥ (ऋ. ७।९४।४)

८०१ ता हि शश्वन्त ईडत इत्था विप्राय ऊतये । सबाधो वाजसातये ॥ २ ॥ (ऋ. ७।९४।५)

---

[७९४] (यौ ऋतेन) जे सत्यवचनांनीं (ऋता-वृधौ) सत्याचें संवर्धन करतात, जे (ज्योतिषः पती) तेजाचे स्वामी आहेत, (ता मित्रा-वरुणा हुवे) त्या मित्र व वरुण यांना मी बोलावतों. ॥ २ ॥

१ ऋतेन ऋतावृधौ — सत्यनियम पाळून सत्यमार्गाचें संवर्धन करीत असतात.

२ ज्योतिषः-पती — प्रकाशाचे स्वामी, प्रकाश पसरवितात.

[७९५] (विश्वाभिः ऊतिभिः) आपल्या सर्व संरक्षक साधनांनीं (वरुणः मित्रः) वरुण व मित्र, हे प्रत्येकीं (प्राविता भुवत्) आमचें संरक्षण करणारे होवोत (नः सुराधसः करतां) व आम्हांला उत्तम धनानें युक्त करोत. ॥ ३ ॥

[७९६] (गाथिनः) सामगायकांनीं (इन्द्रं इत्) इन्द्राचीच (बृहत् अनूषत) बृहत् नामक साम गाऊन स्तुति केली. (अर्किणः) अर्चना करणाऱ्यांनीं (अर्केभिः इन्द्रं) मंत्रांनीं इन्द्राची स्तुति केली, तसेंच (वाणीः इन्द्रं) स्तोत्रांनीं इन्द्राचीच स्तुति केलेली आहे. ॥ १ ॥

[७९७] (वज्री हिरण्ययः इन्द्र इत्) वज्रधारी, सुवर्णाचीं आभूषणें धारण करणारा इन्द्र (वचो-युजा हर्योः) शब्द उच्चारतांच जोडले जाणारे घोडे (सचा) एकदम (आ संमिश्लः) आपल्या रथाला जोडणारा आहे. ॥ २ ॥

[७९८] हे (इन्द्र) इन्द्रा ! (उग्रः) उग्रवीर असा तूं (उग्राभिः ऊतिभिः) संरक्षणाच्या प्रबल साधनांनीं (सहस्र-प्रधनेषु वाजेषु) हजारों प्रकारचीं धनें ज्यांत प्राप्त होतात अशा युद्धांमध्यें (नः अव) आमचें रक्षण कर. ॥ ३ ॥

१ उग्रः उग्राभिः ऊतिभिः नः अव — तूं उग्रवीर होऊन, उग्र अशा संरक्षणाच्या साधनांनीं आमचें संरक्षण कर.

२ सहस्र-प्रधनेषु वाजेषु नः अव — हजारों धनें ज्यांत मिळतात अशा युद्धांत आमचें रक्षण कर.

[७९९] (इन्द्रः) इन्द्रानें (दीर्घाय चक्षसे) विशाल प्रकाशासाठीं (दिवि सूर्यं आरोहयत्) द्युलोकामध्यें सूर्याला चढवलें आहे तसेंच (गोभिः अद्रिं व्यैरयत्) किरणांनीं मेघाला प्रेरित केलें आहे. ॥ ४ ॥

[८००] (अवस्यवः) आपल्या संरक्षणाची इच्छा करणारे आम्ही (इन्द्रे) इन्द्राला व (अग्नौ) अग्निला (बृहत् नमः सुवृक्तिं) पुष्कळ अन्न व उत्तम स्तुति (एरयामहे) पोंचवीत आहों; तसेंच (धिया धेनाः) बुद्धिपूर्वक प्रार्थना करीत आहों. ॥ १ ॥

[८०१] (ता हि) त्या इन्द्र व अग्निची (शश्वन्तः विप्रासः) पुष्कळ ज्ञानी मिळून (ऊतये) आपल्या संरक्षणासाठीं (इत्थं ईडते) अशी स्तुति करतात. त्याप्रमाणें (स-बाधः) परस्पर भांडणारे (वाज-सातये) अन्न प्राप्तिसाठीं अशीच स्तुति करतात. ॥ २ ॥

८०२ ता वां गीर्भिर्विपन्यवः प्रयस्वन्तो हवामहे । मेधसाता सनिष्यवः ॥ ३ ॥ ९ (हु) ॥
(ऋ. ७।९४।६)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

८०३ वृषा पवस्व धारया मरुत्वते च मत्सरः । विश्वा दधान ओजसा ॥ १ ॥ (ऋ. ९।६५।१०)

८०४ तं त्वा धर्तारमोण्यो३ः पवमान स्वर्दृशम् । हिन्वे वाजेषु वाजिनम् ॥२॥ (ऋ. ९।६५।११)

८०५ अया चित्तो विपानया हरिः पवस्व धारया । युजं वाजेषु चोदय ॥ ३ ॥ १० (ट) ॥
(ऋ. ९।६५।१२)

८०६ वृषा शोणो अभिकनिक्रदद्गा नदयन्नेषि पृथिवीमुत द्याम् ।
इन्द्रस्येव वग्नुरा शृण्व आजौ प्रचोदयन्नर्षसि वाचमेमाम् ॥ १ ॥ (ऋ. ९।९७।१३)

८०७ रसाय्यः पयसा पिन्वमान ईरयन्नेषि मधुमन्तमंशुम् ।
पवमान सन्तनिमेषि कृण्वन्निन्द्राय सोम परिषिच्यमानः ॥ २ ॥ (ऋ. ९।९७।१४)

---

[८०२] (विपन्यवः) स्तुति करण्याची इच्छा करणारे (प्रयस्वन्तः) हविष्यान्नजवळ बाळगणारे (सनिष्यवः) धन मिळण्याची इच्छा करणारे व (मेध साता) यज्ञ करणारे आम्ही (ता वां) त्या तुम्हां दोघांना इन्द्र व अग्निला (गीर्भिः हवामहे) स्तुतिंनीं बोलावीत आहों. ॥ ३ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[८०३] हे सोमा ! तूं (वृषा) बल वाढवणारा होऊन (धारया पवस्व) एका धारेनें गाळला जा आणि (विश्वा ओजसा दधानः) सर्व धन आपल्या बलानें धारण करून (मरुत्वते मत्सरः) मरुतांसह राहणाऱ्या इन्द्राला आनंद देणारा हो. ॥ १ ॥

[८०४] हे (पवमान) शुद्ध होणाऱ्या सोमा ! मी (ओण्योः धर्त्तारं) द्यावापृथिवीचें धारण करणाऱ्या (स्वः-दृश वाजिनं) आत्मदर्शी बलवान् (तं त्वा) अशा त्या तुला (वाजेषु हिन्वे) संग्रामामध्यें जाण्याची प्रेरणा करीत आहें. ॥ २ ॥

[८०५] (अया विपा) या अंगुलींनीं (चित्तः हरिः) काढलेल्या हिरव्या रंगाच्या सोमरसा ! (धारया पवस्व) एका धारेनें द्रोण कलशामध्यें गाळला जा व (वाजेषु युजं चोदय) युद्धांमध्यें जाण्यासाठीं आपल्या मित्र इन्द्राला प्रेरणा कर. ॥ ३ ॥

[८०६] (शोणः वृषा) लाल रंगाचा बैल (गाः अभि कनिक्रदत्) गाईकडे पाहून जसा शब्द करतो, त्याप्रमाणें (नदयन्) शब्द करणारा हा सोम आहे. हे सोमा ! तूं (पृथिवीं उत द्यां एषि) पृथ्वी व द्युलोकाला प्राप्त होतोस. (आजौ) युद्धामध्यें (इन्द्रस्य वग्नुः इव) इन्द्राच्या शब्दाप्रमाणें तुझा (आशृण्वे) शब्द ऐकूं येतो. (प्रचेतयन्) आपल्या स्वरूपाचें ज्ञान देत (इमां वाचं आ अर्षसि) या स्तुतिरूप वाणीला तूं प्राप्त करतोस. ॥ १ ॥

[८०७] (रसाय्यः) प्रथम मधुर पण नंतर (पयसा पिन्वमानः) गाईच्या दुधाशीं मिसळल्यानंतर (मधुमन्तं अंशुं) अधिक मधुर झालेल्या सोमाला (ईरयन् एषि) प्रेरणा करीत तूं जातोस. हे (सोम) सोमा ! (परिषिच्यमानः पवमानः) पाण्याशीं मिसळून गाळला जाणारा (संततिं कृण्वन्) आपली धारा करीत तूं (इन्द्राय एषि) इन्द्राला प्राप्त होतोस. ॥ २ ॥

८०८ एवा पवस्व मदिरो मदायोदग्राभस्य नमयन्वधस्नुम् ।
परि वर्णं भरमाणो रुशन्तं गव्युर्नो अर्ष परि सोम सिक्तः ॥ ३ ॥ ११ (रि) ॥
(ऋ. ९।९७।१५)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

८०९ त्वामिद्धि हवामहे सातौ वाजस्य कारवः ।
त्वां वृत्रेष्विन्द्र सत्पतिं नरस्त्वां काष्ठास्वर्वतः ॥ १ ॥ (ऋ. ६।४६।१)

८१० स त्वं नश्चित्र वज्रहस्त धृष्णुया मह स्तवानो अद्रिवः ।
गामश्वं रथ्यमिन्द्र सं किर सत्रा वाजं न जिग्युषे ॥ २ ॥ १२ (फु) ॥
[धा. १० । उ. २ । स्व. ९] (ऋ. ६।४६।२)

८११ अभि प्र वः सुराधसमिन्द्रमर्च यथा विदे ।
यो जरितृभ्यो मघवा पुरूवसुः सहस्रेणेव शिक्षति ॥ १ ॥ (ऋ. ८।४९।१)

---

[८०८] हे सोमा ! (मदिरः) उत्साह वाढवणारा तूं (वध-स्नुं) वृत्रवध झाल्यानंतर (उदग्राभस्य नमयन्) उदक अडवणाऱ्या मेघाला नम्र करीत (मदाय पवस्व) आनंद देण्यासाठीं तूं गाळला जा. (रुशन्तं वर्णं परि भरमाणः) तेजस्वी रंग धारण करीत (सिक्तः) पाण्यांमध्यें गाळला जाऊन (गव्युः) गोदुग्धाची इच्छा करीत (नः परि अर्ष) आमच्या चारी बाजूंस जा. ॥ ३ ॥

॥ येथे तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[८०९] हे (इन्द्र) इन्द्रा ! (कारवः) स्तुति करणारे आम्ही (वाजस्य सातौ) अन्नाची प्राप्ति व्हावी म्हणून (त्वां इत् हि हवामहे) तुलाच बोलावीत आहों. हे इन्द्रा ! (सत्पतिं) श्रेष्ठ पुरुषांचें पालन करणाऱ्या अशा तुला (नरः) लोक (वृत्रेषु [हयन्ते]) शत्रू उत्पन्न झाल्यानंतर बोलावतात. तसेंच (अर्वतः काष्ठासु) घोड्यांच्या युद्धामध्यें (त्वां) तुलाच सहाय्यासाठीं बोलावतात. ॥ १ ॥

[८१०] (चित्र वज्रहस्त अद्रिवः) हे विलक्षण पराक्रमी, वज्रधारी पर्वतावर राहणाऱ्या इन्द्रा ! (धृष्णुया) आपल्या शत्रुनाशक शक्तिनें (महः) मोठा झालेला तूं (स्तवानः) स्तुति केल्यानंतर (गां अश्वं रथ्यं संकिर) गाई, घोडे व रथ उत्तम रीतिनें आम्हांला दे. (जिग्युषे) विजयी पुरुषाला (सत्रा वाजं न) जसे एकदम घोडे वगैरे पदार्थ तूं देतोस, त्याप्रमाणें आम्हांस दे. ॥ २ ॥

१ धृष्णुया महः— शत्रूचा पराभव करण्याच्या शक्तिनें मोठेंपण प्राप्त होतें.

२ जिग्युषे सत्रा वाजं— विजयी वीराला सहज अन्न व बल प्राप्त होतें.

[८११] (पुरू-वसुः मघवा) पुष्कळ धन जवळ बाळगणारा धनवान् असा (यः) जो इन्द्र (जरितृभ्यः सहस्रेण इव शिक्षति) स्तुति करणाऱ्यांना सहस्र प्रकारचें धन देत असतो. (यथा-विदे) जसें माहित आहे, त्याप्रमाणें (वः) तुम्ही (सु-राधसं इन्द्रं अभि प्र अर्च) उत्तम धन देणाऱ्या त्या इन्द्राची अर्चना करा. ॥ १ ॥

८१२ शतानीकेव प्र जिगाति धृष्णुया हन्ति वृत्राणि दाशुषे ।
गिरेरिव प्र रसा अस्य पिन्विरे दत्राणि पुरुभोजसः ॥ २ ॥ १३ (हि) ॥
[धा. १६ । उ. ना. । स्व. ३] (ऋ. ८।४९।२)

८१३ त्वामिदा ह्यो नरोऽपीप्यन्वज्रिन् भूर्णयः ।
स इन्द्र स्तोमवाहस इह श्रुध्युप स्वसरमा गहि ॥ १ ॥ (ऋ. ८।९९।१)

८१४ मत्स्वा सुशिप्रिन्हरिवस्तमीमहे त्वया भूषन्ति वेधसः ।
तव श्रवांस्युपमान्युक्थ्य सुतेष्विन्द्र गिर्वणः ॥ २ ॥ १४ (ल) ॥
[धा. १९ । उ. ना. । स्व. १] (ऋ. ८।९९।२)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

[५]

८१५ यस्ते मदो वरेण्यस्तेना पवस्वान्धसा । देवावीरघशंसहा ॥ १ ॥ (ऋ. ९।६१।१९)

---

[८१२] (धृष्णुया शतानीक इव) शूरवीर जसा शत्रूसेनेवर (प्र जिगाति) चढाई करतो, त्याप्रमाणें इन्द्र (दाशुषे वृत्राणि हन्ति) दान देणाऱ्यासाठीं शत्रूंना ठार करतो. (पुरु-भोजसः अस्य) पुष्कळ धन आपणाजवळ ठेवणाऱ्या या इन्द्राचीं (दत्राणि प्र पिन्विरे) दानें पुष्कळच आहेत. ज्याप्रमाणें (गिरेः रसाः इव) पर्वतांवर उदकप्रवाह असतात. ॥ २ ॥

१ धृष्णुया शतानीक इव प्र जिगाति— शूर पुरुष आपल्या शौर्यानें शत्रूसेनेवर आक्रमण करतो व विजय मिळवितो.
२ दाशुषे वृत्राणि हन्ति— उपकार करणाऱ्यासाठीं शत्रूंना हा ठार करतो व दात्याचें रक्षण करतो.
३ गिरेः रसाः इव अस्य दत्राणि प्र पिन्विरे— पर्वतावरचे जलप्रवाह जसे सर्वांस मिळतात, त्याप्रमाणें याचीं दानें सर्वांस लाभकारी होतात.

[८१३] हे (वज्रिन्) वज्रधारी इन्द्रा ! (भूर्णयः नरः) हवि अर्पण करणारे यजमान (ह्यः त्वां अपीप्यन्) ज्या पहिल्या दिवशींच तुला सोम देतात, तेव्हां (सः) तो तूं (स्तोम-वाहसः) स्तोत्र म्हणणाऱ्यांचें स्तोत्र (इह श्रुधि) या यज्ञामध्यें ऐक व (स्वसरं उपागहि) यज्ञस्थानामध्यें विराजमान हो. ॥ १ ॥

[८१४] हे (सु-शिप्रिन् हरिवः गिर्वणः) सुन्दर फेंटा धारण करणाऱ्या, घोड्यांचें पालन करणाऱ्या स्तुत्य इन्द्रा ! (वेधसः) तुझी सेवा करणारे (त्वया आभूषन्ति) तुला उत्तम रीतिनें सुशोभित करतात. (मत्स्व) तूं सोम पिऊन तृप्त हो. हे (उक्थ्य) स्तुत्य इन्द्रा ! (सुतेषु) सोमरस तयार झाल्यानंतर (तव उपमानि श्रवांसि) तुला उपमा देण्यास योग्य अन्नेंही दिलीं जातील. ॥ २ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५] पञ्चमः खण्डः ।

[८१५] हे सोमा ! (ते देववीः) तुला देवतांना देण्यास योग्य (अघ-शंस-हा) पापी राक्षसांना मारणारा (वरेण्यः मदः यः ते) श्रेष्ठ आनन्द देणारा असा जो रस आहे, (तेन अन्धसा पवस्व) त्या संसेवनीय रसासह तूं पात्रामध्यें गाळला जा. ॥ १ ॥

८१६ जघ्निर्वृत्रममित्रियꣳ सस्निर्वाजं दिवेदिवे । गोषातिरश्वसा असि ॥ २ ॥ (ऋ. ९।६१।२०)

८१७ सम्मिश्लो अरुषो भुवः सूपस्थाभिर्न धेनुभिः । सीदं च्छयेनो न योनिमा ॥३॥ १५ (चौ) ॥

[धा. १२ । उ. १ । स्व. नास्ति] (ऋ. ९।६१।२१)

८१८ अयं पूषा रयिर्भगः सोमः पुनानो अर्षति ।
पतिर्विश्वस्य भूमनो व्यख्यद्रोदसी उभे ॥ १ ॥ (ऋ. ९।१०१।७)

८१९ समु प्रिया अनूषत गावो मदाय घृष्वयः ।
सोमासः कृण्वते पथः पवमानास इन्दवः ॥ २ ॥ (ऋ. ९।१०१।८)

८२० य ओजिष्ठस्तमा भर पवमान श्रवाय्यम् ।
यः पञ्च चर्षणीरभि रयिं येन वनामहे ॥ ३ ॥ १६ (फु) ॥

[धा. १९ । उ. २ । स्व. ५] (ऋ. ९।१०१।९)

८२१ वृषा मतीनां पवते विचक्षणः सोमो अह्नां प्रतरीतोषसां दिवः ।
प्राणा सिन्धूनां कलशाꣳ अचिक्रददिन्द्रस्य हार्द्याविशन्मनीषिभिः ॥ १ ॥ (ऋ. ९।८६।१९)

---

[८१६] हे सोमा ! तूं (अ-मित्रियं वृत्रं जघ्निः) शत्रुरूपी दुष्टाचा नाश करणारा आहेस. तूं (दिवे दिवे) प्रत्येक दिवशीं (वाजं सस्निः) युद्धामध्यें जातोस व (गो-षातिः) गाईंचें दान व (अश्व-सा असि) घोड्यांचें दान तूं करतोस. ॥ २ ॥

१ अ-मित्रियं वृत्रं जघ्निः— शत्रूचा वध करतोस.

२ दिवे दिवे वाजं सस्निः— प्रतिदिवशीं तूं युद्ध करतोस.

[८१७] हे सोमा ! तूं (सु-उपस्थाभिः धेनुभिः संमिश्लः) सुन्दर धेनूंच्या दुधाशीं मिसळला जाऊन, (श्येनः न) ज्याप्रमाणें श्येन पक्षी (योनिं आसीदं) आपल्या स्थानावर बसून (न अरुषः भुवः) तेजस्वी होतो तसा तूं चमकतोस. ॥ ३ ॥

[८१८] (पूषा) पोषण करणारा (भगः) भजनीय (रयिः) धनासारखा (अयं पुनानः अर्षति) हा सोम गाळला जात असतां कलशामध्यें जात आहे. (विश्वस्य भूमनः पतिः सोमः) सर्व प्राणिमात्रांचें पालन करणारा हा सोम (उभे रोदसी व्यख्यत्) दोनही द्युलोक व पृथ्वीवर आपल्या तेजानें चमकत आहे. ॥ १ ॥

[८१९] (प्रियाः घृष्वयः गावः) प्रेम करणाऱ्या व स्पर्धा करणाऱ्या गाई (मदाय समनूषत) आनंद प्राप्त करण्यासाठीं स्तुति करतात. (उ) तें खरें आहे कीं (पवमानासः इन्दवः) शुद्ध होणारे (सोमासः) सोमरस (पथः कृण्वते) आपल्या वाहण्यासाठीं मार्गाला बनवितात. ॥ २ ॥

[८२०] हे (पवमान) सोमा ! (यः ओजिष्ठः) जो सोमरस शक्ति वाढवणारा आहे तो तूं (श्रवाय्यं आ भर) प्रशंसनीय सामर्थ्य आम्हांला भरपूर दे. (यः) जो (पञ्च-चर्षणीः) पांचही लोकांना (अभि) प्राप्त होत असतो आणि (येन रयिं वनामहे) ज्याच्या योगानें आम्ही धन प्राप्त करतों. ॥ ३ ॥

[८२१] (मतीनां वृषा) बुद्धींचें बल वाढवणारा (विचक्षणः) विशेष ज्ञानी (अह्नां उषसां दिवः प्रतरीता) दिवस, उषा व द्युलोक यांचें तेज वाढवणारा (सिन्धूनां प्राणा) नद्यांचा जणूं काय प्राणच (मनीषिभिः) विद्वानांनीं स्तुति करण्यास योग्य असा हा सोम (इन्द्रस्य हार्दिं आविशन्) इन्द्राच्या हृदयामध्यें प्रवेश करण्याची इच्छा करीत (कलशान् अचिक्रदत्) शब्द करीत कलशामध्यें प्रविष्ट होत आहे, गाळला जात आहे. ॥ १ ॥

८२२ मनीषिभिः पवते पूर्व्यः कविर्नृभिर्यतः परि कोशाँ असिष्यदत् ।
त्रितस्य नाम जनयन्मधु क्षरन्निन्द्रस्य वायुँ सख्याय वर्धयन् ॥ २ ॥ (ऋ. ९।८६।२०)

८२३ अयं पुनान उषसो अरोचयदयं सिन्धुभ्यो अभवदु लोककृत् ।
अयं त्रिः सप्त दुदुहान आशिरँ सोमो हृदे पवते चारु मत्सरः ॥ ३ ॥ १७ (गी) ॥
[धा. २६ । उ. २ । स्व. ४] (ऋ. ९।८६।२१)

॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

[६]

८२४ एवा ह्यसि वीरयुरेवा शूर उत स्थिरः । एवा ते राध्यं मनः ॥ १ ॥ (ऋ. ८।९२।२८)

८२५ एवा रातिस्तुविमघ विश्वेभिर्धायि धातृभिः । अधा चिदिन्द्र नः सचा ॥ २ ॥
(ऋ. ८।९२।२९)

८२६ मो षु ब्रह्मेव तन्द्रयुर्भुवो वाजानां पते । मत्स्वा सुतस्य गोमतः ॥ ३ ॥ १८ (ति) ॥
[धा. १४ । उ. १ । स्व. २] (ऋ. ८।९२।३०)

८२७ इन्द्रं विश्वा अवीवृधन्त्समुद्रव्यचसं गिरः ।
रथीतमँ रथीनां वाजानाँ सत्पतिं पतिम् ॥ १ ॥ (ऋ. १।११।१)

---

[८२२] (पूर्व्यः कविः) पूर्वीपासून ज्ञानी असलेला हा सोम (मनीषिभिः पवते) याजकांच्या द्वारें गाळला जात आहे. (नृभिः यतः) यज्ञ करणाऱ्यांकडून नियंत्रित झालेला हा सोम (कोशान् पर्यसिष्यदत्) कलशांमध्यें जात आहे. (त्रितस्य इन्द्रस्य नाम जनयन्) तीनही लोकांमध्यें प्रसिद्ध असलेल्या इन्द्राचें नांव अधिक प्रसिद्ध करीत (मधु) हा मधुर रस (इन्द्रस्य सख्याय) इन्द्राच्या मित्रत्वासाठीं (वायुं वर्धयन्) वायूचें सेवन करीत (क्षरन्) भांड्यांत पडत आहे. ॥ २ ॥

[८२३] (लोक-कृत्) लोकांचें हित करणारा (अयं पुनानः) हा सोम पवित्र होत असतां (उषसः अरोचयत्) उषांना प्रकाशित करतो. (सिन्धुभ्यः अभवत्) नद्यांना वाढवणारा हा झाला आहे. (अयं हृदे) हा सोम पोटांमध्यें जाण्यासाठीं (त्रिः-सप्त दुदुहानः) एकवीस गाईंचें दूध काढीत (मत्सरः चारु पवते) आनंददायक होऊन उत्तम रीतिनें गाळला जात आहे. ॥ ३ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६] षष्ठः खण्डः ।

[८२४] हे इन्द्रा ! तूं (वीरयुः एव असि हि) युद्धामध्यें वीरांचा उपयोग करणारा आहेस. कारण कीं तूं (शूरः एव) शूर आहेस (उत स्थिरः) व युद्धांत स्थिर राहणारा आहेस. यासाठीं (ते मनः) तुझें मन (राध्यं एव) आराधना करण्यास योग्य आहे. ॥ १ ॥

[८२५] हे (तुवी-मघ) पुष्कळ धनवान् (इन्द्र) इन्द्रा ! (विश्वेभिः धातृभिः) सर्व धारण करणाऱ्या देवतांना हवि देणाऱ्या यजमानाजवळ तूं दिलेलें (रातिः) दान (धायि चित्) स्थिरपणानें राहतें. (अध) इन्द्र हे इन्द्रा ! (नः सचा) आम्हांला धन देऊन आमचें सहाय्य कर. ॥ २ ॥

[८२६] हे (वाजानां पते) अन्नांच्या व बलांच्या स्वामी इन्द्रा ! (तन्द्र-युः ब्रह्मा इव) आळशी ब्राह्मणासारखा (मा उ सु भुवः) तूं आळसी होऊं नकोस. (गोतमः सुतस्य मत्स्व) गोदुग्धमिश्रित सोमरसानें आनंदित हो. ॥ ३ ॥

[८२७] (विश्वाः गिरः) सर्व स्तुति (समुद्र-व्यचसं) समुद्राप्रमाणें विस्तृत (रथीनां रथीतमं) रथी वीरामध्यें अत्यंत श्रेष्ठ (वाजानां पतिं) बलांचा स्वामी (सत्पतिं इन्द्रं अवीवृधन्) सत्पुरुषाचें संरक्षण करणाऱ्या

८२८ सख्ये त इन्द्र वाजिनो मा भेम शवसस्पते ।
त्वामभि प्र णोनुमो जेतारमपराजितम् ॥ २ ॥ (ऋ. १।११।२)

८२९ पूर्वीरिन्द्रस्य रातयो न वि दस्यंत्यूतयः ।
यदा वाजस्य गोमत स्तोतृभ्यो मंहते मघम् ॥ ३ ॥ १९ (ली) ॥
[धा. १८ । उ. नास्ति । स्व. ४] (ऋ १।११।३)

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

॥ इति द्वितीयप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ २ ॥

॥ इति तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

---

[८२८] (शवसः पते) हे बलाच्या रक्षक (इन्द्र) इन्द्रा ! (ते सख्ये वाजिनः) तुझ्या मैत्रीमुळें बलवान् होऊन आम्ही (मा भेम) निर्भय होऊं. (जेतारं) विजयी (अपराजितं) पराभूत न होणाऱ्या अशा (त्वां अभि प्रणोनुमः) तुला आम्ही प्रणाम करीत आहों. ॥ २ ॥

[८२९] (इन्द्रस्य रातयः पूर्वीः) इन्द्राचीं दानें प्राचीनकालापासून मिळत आलीं आहेत.(स्तोतृभ्यः) स्तुति करणाऱ्यांना (गोमतः वाजस्य मघं) गाईपासून उत्पन्न झालेलें अन्नरूपी धन (यदा मंहते) जेव्हां तो देतो, त्यावेळीं (रातयः) दानें (न वि दस्यन्ति) कमी होत नाहींत. ॥ ३ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति तृतीयोऽध्यायः ॥

तृतीय अध्याय

इन्द्र–देवता

या अध्यायांत इन्द्र देवतेचें वर्णन आहे. त्या देवतेचे हे गुण या अध्यायांत वर्णिले आहेत —

१ उग्रः [७९८]– इन्द्र उग्रवीर आहे. तो शूर आहे.

२ वज्री:– [७९७]– वज्र नांवाचें शस्त्र घेऊन तो युद्ध करतो.

३ इन्द्रः (इन्-द्रः) [७९७]– शत्रूचें निवारण करतो.

४ हिरण्ययः [७९७]– सुवर्णाचीं आभूषणें धारण करतो.

५ वचो युजा हर्यो सचा आ संमिश्लः [७९८]– शब्दांचा उच्चार ऐकतांच आपल्या रथाच्या जागीं जोडले जाणारे असे हुशार ज्याचे घोडे आहेत. असा इन्द्र आहे.

इन्द्राचे घोडे इतके उत्तम शिकविलेले होते. शब्द उच्चारतांच ते आपल्या जागीं जाऊन उभे राहत असत.

६ उक्थ्यः [८१४]– स्तुत्य, प्रशंसनीय.

७ वाजानां पतिः [८२६]– अन्नांचा, बलांचा स्वामी.

८ हे इन्द्र ! सहस्र-प्रधनेषु वाजेषु नः अव [७९८]– हे इन्द्रा ! हजारों धनें ज्यांत प्राप्त होतात, अशा युद्धांत आमचें रक्षण कर.

युद्धांत हजारों प्रकारचीं धनें मिळतात, तीं शत्रूंचा पराजय केल्यानंतर त्याची जी लूट केली जाते, त्या लुटींत हीं धनें प्राप्त होतात. अर्थात् युद्धांत विजय मिळविल्यानंतर शत्रूची लूट करण्याचा अधिकार विजयी वीरांना आहे. हें येथें वेदांनीं मान्य केलेलें आहे असें दिसतें.

९ हे इन्द्र ! वीरयुः शूरः असि, स्थिरः असि [८२४]– हे इन्द्रा ! तूं वीरांबरोबर राहून शूरता वाढवणारा आहेस व युद्धांत आपल्या जागेवर स्थिर राहणारा आहेस. कारण याचा कधींहि पराजय होत नाहीं, म्हणून हा इन्द्र युद्धांत आपल्या जागीं स्थिर राहतो.

१० **सत्पतिं नरः वृत्रेषु हवन्ते** [८०९]- उत्तम रीतिनें पालन करणाऱ्या इन्द्राला लोक युद्धांमध्यें सहाय्या-साठीं बोलावतात.

११ **सुशिप्रिन् हरिवः गिर्वणः** [८१२]- उत्तम साफा बांधणारा उत्तम घोडे पाळणारा प्रशंसनीय इन्द्र आहे.

१२ **धृष्णुया शतानीक इव प्र जिगाति** [८१२]- धैर्यानें शेंकडों सैनिक जवळ बाळगणाऱ्या वीराप्रमाणें शत्रूवर इन्द्र चाल करून जातो.

१३ **दाशुषे वृत्राणि हन्ति** [८१२]- दान देणाऱ्याचें कल्याण करण्यासाठीं त्याच्या शत्रूंना ठार करतो.

१४ **हे इन्द्र ! कारवः वाजसातौ त्वां हवन्ते** [८०९] – हे इन्द्रा ! स्तुति करणारे यज्ञांत जेव्हां अन्नाचें दान होतें, तेव्हां तुला बोलावतात.

१५ **गाथिनः इन्द्रं बृहत् अनूषत, अर्किणः अर्केभिः वाणीः इन्द्रं** [७९६]- स्तोत्र म्हणणारे इन्द्राची बृहत् साम गाऊन स्तुति करतात, अर्चना करणारे मंत्रांनीं प्रशंसा करतात. सर्वांच्या वाणी इन्द्राचें वर्णन करतात.

१६ **अवस्यवः इन्द्रे अग्नौ बृहत् नमः सुवृक्तिं प्रेरयामहे** [८००]- आपल्या रक्षणाची इच्छा करणारे इन्द्र व अग्नि यांची आम्ही मोठी स्तुति करतो, असें म्हणतात.

१७ **विश्वाः गिरः समुद्रव्यचसं रथानां रथीतमं वाजानां पतिं सत्पतिं इन्द्रं अवीवृधन्** [८१७]- सर्व स्तुति समुद्राप्रमाणें विशाल, श्रेष्ठ रथी, धनांचा स्वामी, उत्तम अधिपति अशा इन्द्राचें यश वाढवतात.

१८ **इन्द्रः दीर्घाय चक्षसे दिवि सूर्यं आरोहयत्** [७९९]- इन्द्रानें मोठा प्रकाश मिळावा म्हणून सूर्याला द्युलोकांत वर चढवलें आहे.

१९ **गोभिः अद्रिं व्यैरयत्** [७९९]- किरणांनीं मेघाला फोडलें व पाऊस पाडला.

इन्द्राचे हे गुण या मंत्रांत आलेले आहेत. यांत जे गुण आज आपणामध्यें आणतां येतील, ते आज आणावे व जे मनुष्यांमध्यें येऊं शकत नाहींत, त्यांचा आशय साधकांनीं आपणांमध्यें आणावा. जसें ' सर्वांस प्रकाश मिळावा यासाठीं इन्द्रानें सूर्याला आकाशांत वर चढवला आहे. ' याप्रमाणें सूर्याला आकाशांत चढवणें साधकांना शक्य नाहीं, पण अज्ञानान्धकारांत पडलेल्या मनुष्यांना ज्ञानाचा प्रकाश देऊन त्यांना सज्ञान करणें, हें साधकांना शक्य आहे. हें साधकांनीं करावें हें येथें सुचवणें आहे.

" **वज्रधारी** " इन्द्र आहे. आम्ही वज्रधारी होऊं शकत नाहीं, कारण आमच्याकडे वज्र नाहीं. पण आम्ही " शस्त्र-धारी " किंवा " **लाठीधारी** " होऊं शकतो. अशा रीतिनें इन्द्राच्या गुणांनीं जो बोध दिला आहे, जो जाणावा व ते ते गुण भावार्थानें अंगीं आणण्याचा प्रयत्न करावा हेंच येथें सांगणें आहे. आतां दुसऱ्या देवतांचे गुण पहा—

अग्नि–देवता

अग्नि देवतेचे हे खालीं दिलेले गुण या अध्यायामध्यें आलेले आहेत—

१ **अग्निः** [७९०]- अग्र-णी, अग्रभागीं नेणारा, शेवटापर्यंत पोंचवणारा.

२ **विश्व-वेदाः** [७९०]- सर्वज्ञाता, सर्व धनें आपणा-जवळ ठेवणारा.

३ **यज्ञस्य सुक्रतुः** [७९०]- [illegible] सज्जनांचा सत्कार, सर्व लोकांचें [illegible] उद्धार करणारा.

४ **विश्पतिः** [[illegible]]- [illegible]

५ **पुरु-प्रियः** [७९१]- [illegible]

६ **हव्यवाह्** [[illegible]]- [illegible]

७ **दूतः** [[illegible]]- [illegible]


८ **होता** [[illegible]]- [illegible]

९ **जज्ञानः** [illegible] उत्पन्न होतांच [illegible]

१० [illegible] होता व स्तुत्य [illegible]

[illegible] आणणारा व यज्ञ-शालेमध्यें [illegible] स्थानांवर बसवणारा आहे असें सांगितलें आहे. येथें यज्ञशाला हें आमचें शरीर आहे. या शरीररूपी यज्ञशालेंत नेत्रस्थानीं सूर्य, हृदयस्थानीं चन्द्र, फुफ्फुसांत वायु, छातीमध्यें इन्द्र, मुखामध्यें अग्नि, कानामध्यें दिशा असे अनेक अवयवांमध्यें अनेक देव येऊन राहिले आहेत व या देहामधील आपआपलीं कामें ते करीत आहेत. हे देव शरीरांत उष्णतारूप अग्नि असेपर्यंतच शरीरा-मध्यें राहतात. शरीर थंड होण्याच्या पूर्वी सर्व निघून जातात, म्हणून म्हटलें आहे कीं अग्नि हा या शरीररूपी यज्ञ-शाळेंत या सर्व देवांना बोलाऊन आणतो व त्यांस यथास्थानीं बसवून त्यांच्याकडून येथील सर्व कार्यें करवून घेतो. शरीरा-मध्यें हा अनुभव साधकांनीं घ्यावा व आपल्या शरीररूपी यज्ञशालेंत हे सर्व देव कसे व कोठें आहेत तें जाणावें.

यज्ञशालेचें चित्र



यज्ञशाला हें शरीराचेंच चित्र आहे. असो. याप्रमाणें अग्निचे गुण जे मंत्रांत आलेले आहेत ते जाणावे व ते गुण आपल्या अंगीं आणावे.

देवांना बोलवून आणणें हें ज्ञानी विद्वानांना बोलावून आणणें राष्ट्रांमध्यें आहे. "विद्वांसो हि देवाः" (श. प.) विद्वान हेच राष्ट्रांतील देव आहेत. याप्रमाणें देवतांचे गुण आपल्या कर्तव्याची - राष्ट्रीय व वैयक्तिक कर्तव्याची जाणीव देत आहेत. ती जाणीव करून घ्यावी व तें कर्तव्य करून आपली उन्नति करून घ्यावी.

इन्द्र-अग्निची स्तुति

इन्द्र व अग्निची स्तुति एके ठिकाणीं केलेली आहे. याविषयीं असें म्हटलें आहे—

१ ऊतये ता इत्था ईडते [८०१]- आमच्या संरक्षणासाठीं त्या दोघांची याप्रकारानें स्तुति केली जात असते.

२ सबाधः वाजसातये ईडते [८०१]- शत्रु बाधा करण्यासाठीं आले असतां अन्न प्राप्तिसाठीं यांची स्तुति केली जाते.

३ विपन्यतः प्रयस्वन्तः सनिष्यवः मेधसाता ता वां गीर्भिः हवामहे [८०२]- स्तुति करणारे, हवन करणारे, धनाची इच्छा करणारे, यज्ञ करणारे आम्ही तुम्हां दोघां - इन्द्र व अग्नि यांना स्तुति करून बोलवीत आहों.

४ यथाविदे सुराधसं इन्द्रं अभि प्र अर्च [८११] – जसें माहित आहे, त्या प्रमाणें उत्तम धन देणाऱ्या इन्द्राची अर्चना करा.

याप्रमाणें इन्द्र व अग्निची स्तुति करण्याविषयीं लिहिलें आहे. ही स्तुति एवढ्याचसाठीं करावयाची आहे कीं या स्तुति मध्यें त्यांचे गुण वर्णिलेले असतात, त्यांचें स्मरण व्हावें व ते शुभ गुण आपल्या अंगीं आणण्याची प्रेरणा व्हावी.

मित्र व वरुण यांची स्तुति

मित्र व वरुण या दोन देवतांची स्तुतीहि या अध्यायांत आहे. त्या स्तुतिमध्यें वर्णिलेले या देवतांचे गुण आतां पहा—

१ ऋतेन ऋतावृधौ ज्योतिषस्पती मित्रावरुणा हुवे [७९४]- सत्यपालनानें सत्यमार्गाचें संवर्धन करणारे, तेजानें तेजस्वी झालेले मित्र व वरुण आहेत त्यांना मी सहाय्यासाठीं बोलावीत आहें.

यामध्यें सत्याचें पालन करणारे व सत्यमार्गाचें संवर्धन करणारे मित्र व वरुण आहेत असें सांगितलें आहे. सत्यपालन व सत्यमार्गाचें संवर्धन हे गुण किती महत्त्वाचे आहेत तें

जाणावें व हे गुण आपल्या अंगीं आणण्याचा यत्न साधकांनीं करावा.

ते तेजस्वी आहेत. आपण तेजस्वी बनावें.

२ विश्वाभिः ऊतिभिः मित्रः वरुणः प्राविता भुवत् [७९५]- सर्व प्रकारच्या संरक्षणाच्या साधनांनीं हे मित्र व वरुण आमचें संरक्षण करतात.

आपण संरक्षणाचीं साधनें आपणाजवळ बाळगावीं व इतरांचें संरक्षण त्या साधनांनीं करावें.

३ नः सुराधसः करताम् [७९५]- आम्हांला ते उत्तम धनानें युक्त करोत.

दान

या देवता दान देतात. त्या उदार आहेत पहा—

१ गाः अर्वतः नः राये दुरः विवृधि [७८२]- गाई व घोडे तूं देतोस, यासाठीं धन मिळण्याचीं दारें आमच्यासाठीं उघडून ठेव.

२ अभिषुतः पुनानः नः रयिं वीरवतीं इषं आभर [७८९]- रस काढल्यानंतर गाळला जाणारा तूं आम्हांला धन व पुत्रपौत्रांनीं युक्त भरपूर अन्न दे.

धन व अन्न पुत्रपौत्रांनीं युक्त असावें. घरांत धन व अन्न असावें व पुत्रपौत्रही भरपूर व्हावे.

३ चित्र वज्रहस्त अद्रिवः ! धृष्णुया मह्यः स्तवानः गां रथ्यां संकिर [८१०] हे विलक्षण पराक्रमी वज्र धारण करणाऱ्या व किल्ल्यांत राहणाऱ्या इन्द्रा ! आपल्या शत्रूनाशक शक्तिनें मोठी स्तुति झाल्यानंतर गाई व घोडे उत्तम रीतिनें आम्हांस दे.

४ पुरुवसुः मघवा जरितृभ्यः सहस्रेण इव शिक्षति [८११]- पुष्कळ धनवान् इन्द्र आपल्या स्तोत्यांना सहस्रावधि धन देत असतो.

५ पुरुभोजसः अस्य दत्राणि प्रपिन्विरे [८१२]- पुष्कळ अन्नवान् या इन्द्राचीं दानें अनेक आहेत.

६ गोषातिः अश्वसा [८१६]- गाई व घोडे यांचें दान इन्द्र करतो.

७ इन्द्रस्य: रातयः पूर्वीः [८२९]- इन्द्राचीं दानें पूर्वीपासून चालत आलीं आहेत.

८ स्तोतृभ्यः गोमतः वाजस्य मघं यदा मंहते, ऊतयः न विदस्यन्ति [८२९]- स्तुति करणाऱ्यांसाठीं जेव्हां गाईपासून उत्पन्न झालेलें अन्नरूपी धन तो देतो, तेव्हां त्याचीं दानें कमी होत नाहींत.

या प्रमाणें दानाचें वर्णन या अध्यायामध्यें आहे. लोकांमध्यें दान देण्याचा गुण वाढावा हा याचा उद्देश आहे.

तेजस्वी

१ हे पवमान ! स्वर्दृशं भानुना द्युमन्तं त्वा हवामहे [७८४]- हे शुद्ध होणाऱ्या सोमा ! तूं आत्मदर्शी व आपल्या तेजानें तेजस्वी आहेस. अशा तुला सहाय्यासाठीं बोलावीत आहों.

येथें " स्वः-दृशं " व " भानुना द्युमन्तं " हे गुण महत्त्वाचे आहेत. स्वतः आपल्या शक्तिनें सर्व पहावें, दुसऱ्याच्या सहाय्यानें पाहूं नये, दुसऱ्याच्या दृष्टीनें पाहूं नये. तर स्वतःच्या दृष्टीनें सर्व गोष्टी पहाव्या. तसेंच आपल्या स्वतःच्या तेजानें तेजस्वी व्हावें. आपल्या तेजानें विश्वामध्यें चमकावें.

हे गुण पहावे व ते अंगीं आणावे व आपण आपल्या प्रयत्नांनीं आपली उन्नति करावी.

यशस्वी होणें

१ जने नः यशसः कृधि [७७८]- लोकांमध्यें आम्हांला यशस्वी कर.

२ तव श्रवांसि उपमानि [८१४]- तुझीं यशें उपमा देण्यास योग्य आहेत.

या लोकामध्यें आपलें यश वाढवलेंच पाहिजे. यशस्वी जीवन जगणें हें येथें अत्यन्त आवश्यक आहे.

शत्रूला दूर करावें

शत्रूला दूर करण्याचा उपदेश अनेक प्रकारांनीं या अध्यायांत सांगितला आहे. पहा—

१ विश्वाः द्विषः अप जहि [७७८]- सर्व शत्रूंना दूर कर.

२ ते देववीः अघशंस-हा वरेण्यः मदः [८१५]- तुझा आनन्द हा देवांशीं सम्बन्ध जोडणारा व पापी शत्रूंना मारणारा आहे. पापी दुष्टांना मारून दूर केलें पाहिजे.

३ अमित्रियं वृत्रं जघ्निः [८१६]- शत्रु असेल त्याला तूं मारणारा आहेस.

४ ते सख्ये, तव उत्तमे सुम्ने, पृतन्यतः सासह्याम: [७७९]- तुझ्या मैत्रीनें व तुझ्या तेजस्वितेनें युक्त झालेले आम्ही सैन्य घेऊन आमच्यावर चाल करून येणाऱ्या शत्रूंचा पराभव करूं शकूं.

५ ते या भीमानि तिग्मानि आयुधा धूर्वणे, समस्य निदः नः रक्ष [७८०]- तुझ्याजवळ जीं भयंकर तीक्ष्ण अशीं आयुधें शत्रूचा नाश करण्यासाठीं आहेत, त्यांनीं आमच्या निन्दकांपासून आमचें रक्षण कर.

६ हे शवसस्पते इन्द्र ! ते सख्ये वाजिनः मा भेम [८२८]- हे बलवान् इन्द्रा ! तुझ्याशीं मैत्री झाल्यानें आम्ही बलवान् बनून शत्रूंना भिणार नाहीं.

७ जेतारं अपराजितं त्वा अभि प्रनोनुमः [८२८]-

विजयी व कधींहि पराजित न होणाऱ्या तुला आम्ही वारंवार प्रणाम करीत आहों.

शत्रू दूर करण्याविषयीं, तसेंच शत्रूंचा पराभव करून त्यांचा नाश करण्याविषयीं अशीं वर्णनें या अध्यायांत आहेत. तीं पाहिलीं म्हणजे असें स्पष्ट दिसून येईल कीं, उपासकांनीं आपली शक्ति वाढवून विजयी होण्यासाठीं प्रयत्न करावा.

सोमाचे गुण

सोम ही एक वेल हिमालयावर उगवणारी आहे. तिचा रस देव व यज्ञ करणारे पितात व त्यामुळें त्यांचा उत्साह वाढतो, शौर्य वाढतें व ते प्रत्येक कार्यांत यशस्वी होतात. या सोमाचे उत्तम गुण या अध्यायांत वर्णिले आहेत, ते हे आहेत—

१ देवः [७८१]- तेजस्वी, प्रकाशणारा.

२ द्युमान् [७८१]- तेजस्वी, चमकणारा.

३ इन्दुः [७८६]- चमकणारा.

४ वृषा [७७८]- बलवान्, शक्तिमान्, सामर्थ्यसम्पन्न.

५ वृषव्रतः [७८१]- बल वाढवण्याचें ज्याचें व्रत आहे.

६ कविः [७७७]- ज्ञानी, दूरदर्शी.

७ अग्रियः [७७५]- अग्रभागीं राहणारा.

८ सु-आयुधः [७८१]- उत्तम आयुधें धारण करणारा.

९ विश्व-चर्षणिः [७७६]- सर्व मनुष्यांचें हित करणारा.

१० विश्वतः ईशानः [७८९]- सर्वांचा स्वामी, ईश्वर.

सोमरसाचे हे गुण या अध्यायांत दिले आहेत. त्यांतील कांहीं गुण आलंकारिक रीतिनें जाणावयाचे आहेत. जसें ' कवि '- दूरदर्शी, विद्वान् मनुष्य सोमरस पितो व त्यामुळें याची ज्ञानशक्ति उत्तेजित होते म्हणून हा सोमरस ' कवि ' आहे.

शूर पुरुष सोमरस पितात व त्यांचा उत्साह वाढतो व त्यामुळें ते शौर्याचीं विशेष कार्यें करूं शकतात, म्हणून हा शौर्य व बल वाढवणारा आहे, हा उत्तम आयुधें वापरणारा आहे कारण शूरवीर सोमरस पिऊन उत्साहित होऊन युद्धांत जातात व तेथें आपलीं आयुधें तीक्ष्ण करून तीं वापरतात. या आलंकारिक रीतिनें या पदांचे अर्थ समजून घ्यावे.

हा बलवान्, शूर व विजयी आहे. याप्रमाणें साधकांनीं बलवान्, शूर व विजयी व्हावें हा भाव येथें स्पष्ट आहे.

सोमाची संरक्षणशक्ति

सोमाची संरक्षणशक्ति अशाच रीतिनें श्रेष्ठ आहे, पहा—

१ चित्राभिः ऊतिभिः वचः पवस्व [७७५]- तुझ्या विलक्षण संरक्षणाच्या शक्तिनीं स्तुतिचीं वचनें पवित्र कर.

२ विश्वानि काव्या अभि पवस्व [७७५]- आमचीं स्तुतिचीं काव्यें ऐकून घे.

३ हे वृषन् ! वृष्णः ते शवः वृष्ण्यं [७८२]- हे बलवान् देवा ! तुझ्यासारख्या बलवान् वीराचें सामर्थ्य विशेष प्रभावी आहे.

४ वनं वृषा [७८२]- तुझें सेवन करणें बल वाढवणारें आहे.

५ सुतः वृषा [७८२]- सोमरस बल वाढवणारा आहे.

६ त्वं वृषा असि [७८२]- तूं बल वाढवणारा आहेस.

सोमरसाचें हें वर्णन त्याच्या सामर्थ्य वाढवण्याच्या गुणामुळें आहे. सोमरस प्याल्यामुळें वीराचें वीर्य वाढतें, तें सोमरसाच्या पानामुळेंच असल्यामुळें हे शौर्य वीर्य आदि शुभ गुण या सोमाचेच आहेत असें वर्णन करण्यांत आलें आहे.

सोमाचें वीर्य व तेज

सोम वीर्यवान् व तेजस्वी आहे. सोमरसामध्यें तेजस्विता आहे म्हणून सोमरसाचें वर्णन असें केलें जातें—

१ विश्वस्य भूमनः पतिः सोमः उभे रोदसी व्यख्यत् [८१८]- सर्व प्राणिमात्रांचें पालन करणारा सोम पृथिवी व द्युलोक यामध्यें आपल्या तेजानें चमकत आहे.

२ हे सु-आयुध ! मन्दमानः सुवीर्यं आ पवस्व [७८६]-हे उत्तम आयुधें धारण करणाऱ्या सोमा ! तूं आनंद देणारा होऊन आम्हाला उत्तम वीर्य प्रदान कर. याठिकाणीं उत्तम आयुधें धारण करणारा सोम आहे असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ असा कि वीर लोक सोमरस पितात व त्यामुळें त्यांचा उत्साह वाढतो व ते उत्तम आयुधें घेऊन लढतात. हें सोमपानानें होतें म्हणून सोमच ' सु-आयुध ' उत्तम आयुधें घेऊन लढणारा आहे.

३ हे पवमान ! ओजिष्ठः श्रवाय्यं आभर, यः पंचचर्षणिः अभि तिष्ठति, येन रयिं वनामहे [८२०] - हे सोमा ! तूं सामर्थ्य वाढवणारा आहेस, म्हणून यश वाढवणारें सामर्थ्य आम्हांला भरपूर दे. पांचही प्रकारच्या लोकांचें कल्याण करण्यासाठीं तयार रहा व आम्हांला धन मिळेल असें कर.

सोमरसपानाच्या योगानें असें सामर्थ्य वाढतें.

सोमाचा महिमा

१ तुभ्यं महिम्ने इमा भुवना तस्थिरे [७७७]- तुझ्या महिम्यासाठीं हीं सर्व भुवनें राहिलीं आहेत. अर्थात् सर्वत्र तुझा महिमाच सर्वांचा उत्साह वाढवीत आहे.

२ वृषा धर्माणि दध्रिषे [७८१]- तूं आपल्या बलानें सर्व कर्तव्यांचें धारण करीत आहेस.

या प्रमाणें सोमाचा महिमा सर्वांचा उत्साह वाढवतो व

त्यांच्याकडून सर्व कार्यें करवून घेतो. सोमामध्यें उत्साह वाढवण्याचें सामर्थ्य आहे. एवढा या वर्णनाचा भाव आहे. म्हणून आम्ही सोमाशीं सख्य करतों व त्याच्या उत्साहानें उत्साहित होऊन आपआपलीं कार्यें करीत असतों.

सोमाशीं सख्य

१ पवमानस्य ते सखित्वं आवृणीमहे [७८७]- सोमाशीं मित्रता करावी असें आम्ही इच्छितों.

२ ते ऊर्मयः धारया पवित्रं अभि क्षरन्ति, तेभिः नः मृड [७८८]- तुझ्या लाटा एका धारेनें छाननींमधून गाळल्या जात आहेत, त्यांनीं आमचें सुख वाढव.

सोमानें उत्साह वाढतो, मोठमोठीं शौर्याचीं कामें करण्याची शक्ति अंगीं येते म्हणून त्याच्याशीं मित्रता करावी असें लोकांस वाटतें. ही मित्रता म्हणजे सोमरस पिण्याची इच्छाच होय. सर्वांना ही इच्छा असते. कारण उत्साह वाढावा व आपल्याकडून मोठमोठीं कार्यें व्हावीं असें सर्वांस वाटणें अगदीं स्वाभाविक आहे.

सोमपान

१ वयं सोम-पीतये पूतदक्षसा मित्रं वरुणं हवामहे [७९३]- आम्ही सोमपान करण्यासाठीं पवित्र बलानें युक्त असणाऱ्या मित्र व वरुणांना बोलावीत आहों.

मित्र व वरुण यांचें बल पवित्र कामांमध्यें उपयोगी पडण्यास योग्य आहे. यासाठीं त्यांस सोमपानासाठीं बोलावलें जातें. इन्द्र आदि दुसऱ्या अनेक देवांनाहि असेंच सोमपानासाठीं बोलावण्यांत येतें. सर्व देव यज्ञांत येतात व सोम पितात व मोठमोठीं सार्वजनिक हित करण्यासाठीं अनेक कार्यें करतात. त्याचप्रमाणें इतर लोकही यज्ञामध्यें जाऊन सोमरसाचें पान करतात व उत्साहानें आपलीं कर्तव्यें करतात.

सोमरस तयार करणें

सोमवल्ली हिमालयावरून आणतात. ती लांकडाच्या फळ्यांवर ठेऊन दगडांनीं कुटतात व चांगली कुटल्यानंतर अंगुलींनीं दाबून रस काढतात. कुटण्याच्या पूर्वींहि ती धुतली जाते. या रसामध्यें कस्पटें, तन्तु वगैरे असतात. यासाठीं या रसामध्यें पाणी मिसळलें जातें व मेंढीच्या लोकरीच्या कपड्यांतून तो रस गाळला जातो. तो सोमरस अधिक तुरट असतो व त्यांत पाणी घालून पातळ केल्याशिवाय तो पितां येत नाहीं म्हणून सोमरस काढल्यानंतर त्यांत पाणी मिळवतात व नंतर तो गाळतात व त्यानंतर त्यांत गाईचें दूध, गाईचें दही, गाईचें तूप, मध, जवांचें पीठ यांपैकीं जें मिळवावें असें वाटेल, तें मिळवितात. त्यानंतर त्याचें हवन होतें व नंतर त्याला लोक पितात.

या विषयीं क्रमानें आतां पहा—

सोमामध्यें जल

१ समुद्रियाः आपः पवस्व [७८५]- अन्तरिक्षरूपी समुद्राचें पाणी मिसळ. पृथिवीवरील समुद्र खाऱ्या पाण्याचा असतो. तें खारें पाणी पिण्याच्या कामीं उपयोगांत येत नाहीं. अन्तरिक्षांत मेघ असतात, तो समुद्र गोड्या पाण्याचा आहे व त्याचें पाणी अथवा विहिरीचें अथवा नदी नहर आदिचें पाणी सोमाच्या रसामध्यें मिसळण्यांत येत असतें.

२ आयुभिः मर्मृज्यमानः यत् अद्भिः परिषिच्यसे द्रोणे सधस्थं अश्नुषे [७८५]- जेव्हां ऋत्विज सोमाला गाळतात, तेव्हां पाण्यांत तो मिसळला जातो व द्रोणामध्यें - कलशामध्यें त्याला स्थान मिळतें; म्हणजे गाळलेला सोमरस कलशामध्यें भरला जातो.

३ रुशन्तं वर्णं परि भरमाणः सिक्तः गव्युः पर्येषि [८०८]- तेजस्वी वर्ण धारण करून पाण्याशीं मिसळल्यानंतर गाईच्या दुधाची इच्छा करून सोमरस पुढें जातो.

गाळल्यानंतर त्यांत गाईचें दूध मिसळतात. सोमरस गाळणींतून गाळतात या विषयीं असें वर्णन आलें आहे—

१ अया विपानया चित्तः हरिः धारया पवस्व [८०५]- ह्या अंगुलींनीं काढलेल्या हिरव्या रंगाच्या सोमरसा ! तूं धारेनें गाळला जा.

२ अयं पुनानः अर्षति [८१८]- हा सोमरस पवित्र होत - गाळला जात खालीं भांड्यांत जात आहे.

३ नृभिः यतः कोशान् पर्यसिष्यदत् [८२२]- याजकांनीं काढलेला हा सोमरस कलशांमध्यें पडत आहे.

४ कलशान् अचिक्रदत् [८२१]- गाळला जात असतां कलशांमध्यें शब्द करीत पडत आहे.

सोम शब्द करीत गाळला जातो

१ नदयन् वृषा गाः अभि कनिक्रदत् [८०६]- शब्द करीत हा बलवान्, सोम गाईंची इच्छा करीत व शब्द करीत कलशामध्यें येत आहे.

वरच्या भांड्यांत सोमरस असतो. तो मेंढीच्या केंसांच्या गाळणीवर ओतला जातो व गाळणीमधून गाळला जाऊन खालच्या भांड्यांत पडत असतांना त्याचा शब्द होत असतो. असा शब्द होणें अगदीं स्वाभाविक आहे. खालच्या भांड्यांत पाणी ओतलें तरी त्याचा जसा आवाज होतो तसा हा आवाज आहे.

सोमरसामध्यें दूध मिसळणें

गाळल्यानंतर सोमरसामध्यें आवडीप्रमाणें गाईचें दूध, दहीं वगैरे मिसळतात. याविषयींचें वर्णन असें आहे—

१ धेनवः तुभ्यं धावन्ति [७७७]- गाई तुझ्याजवळ-सोमाजवळ धांवत येतात. गोदुग्ध सोमरसाजवळ आणलें जातें.

२ रसाय्यः पयसा पिन्वमानः मधुमन्तं अंशुं ईरयन् एषि [८०७]- प्रथम मधुर पण गाईच्या दुधाशीं मिसळल्यानंतर अधिक मधुर झालेल्या सोमाला प्रेरणा करीत तूं जातोस.

३ प्रिया घृष्वयः गावः मदाय समनूषत पवमानासः इन्दवः सोमासः पयः कृण्वते [८१९]- प्रेम करणाऱ्या व स्पर्धा करणाऱ्या गाई सोमाशीं मिळण्याचा आनंद प्राप्त करण्याची इच्छा करतात. शुद्ध झालेले सोमरस दूध प्राप्त करतात.

४ लोककृत् अयं पुनानः सिन्धुभ्यः अभवत् । अयं ह्रदे त्रिः सप्त दुहानः मत्सरः चारु पवते [८२३] – लोकांचें हित करणारा हा गाळला जाणारा सोम नद्यांना वाढवणारा झाला आहे. याच्यासाठीं एकवीस गाईंचें दूध काढलें जातें व नंतर हा आनंद देणारा होतो.

अर्थात् यांत नद्यांचें पाणी मिसळलें जातें व नंतर गाईंचें दूध मिसळलें जातें.

५ गोमतः सुतस्य मत्स्व [८२६]- गोदुग्धमिश्रित सोमरसानें आनंदित हो.

याप्रमाणें सोमरसामध्यें गाईचें दूध मिसळलें जातें व मग तो पितात.

सुभाषितें

१ अग्रियः चित्राभिः ऊतिभिः वचः पवस्व [७७५]- अग्रणी होऊन आपल्या विलक्षण श्रेष्ठ संरक्षणांनीं आपलें वचन पवित्र कर.

तूं अग्रणी हो, आपणाजवळ संरक्षणांचीं साधनें संग्रह करून ठेव व आपलें भाषण पवित्र विचारांनीं युक्त होईल असें कर.

२ विश्वानि काव्या अभि [७७५]- सर्व श्रेष्ठ काव्यें मुख्यत्वेंकरून अवलोकन कर. श्रवण कर.

३ हे विश्व-चर्षणे ! अग्रियः वाचः ईरयन् पवस्व [७७६]- सर्वांचें निरीक्षण करणाऱ्या ! अग्रणी होऊन आपल्या वाणीच्या प्रेरणेनें सर्वत्र पवित्रता कर.

४ हे कवे ! तुभ्य महिम्ने इमा भुवना तस्थिरे [७७७]- हे दूरदर्शी ज्ञानी पुरुषा ! तुझ्या मोठेपणासाठीं हीं भुवनें आहेत. (असें समजून आपला थोरपणा वाढवण्याचा यत्न कर.)

५ धेनवः तुभ्यं धावन्ति [७७७]- गाई तुला पाहून धांवत येतील (इतकें प्रेम गाईंवर कर.)

६ वृषा पवस्व [७७८]- बलवान् होऊन शुद्ध हो.

७ जने नः यशसः कृधि [७७८]- लोकांमध्यें आम्हांला यशस्वी कर.

८ विश्वाः द्विषः अप जहि [७७८]- सर्व शत्रूंचा पराभव कर.

९ यस्य ते सख्ये, तव उत्तमे द्युम्ने, पृतन्यतः सासह्याम [७७९]- तुझ्याशीं मैत्री झाल्यानंतर, तुझ्या उत्तम तेजानें तेजस्वी होऊन, सैन्यासह आमच्यावर चालून येणाऱ्या शत्रूंचा आम्ही पराभव करूं शकूं.

१० ते या भीमानि तिग्मानि आयुधा धूर्वणे, समस्य निदः नः रक्ष [७८०]- तुझीं जीं भयंकर तीक्ष्ण आयुधें शत्रूचा नाश करण्यासाठीं आहेत, त्यांच्यायोगानें आमच्या सर्व निंदक शत्रूंपासून आमचें रक्षण कर.

११ वृषा द्युमान् असि [७८१]- तूं बलवान् व तेजस्वी आहेस.

१२ हे देव ! वृषा वृषव्रतः वृषा धर्माणि दध्रिषे [७८१]- हे देवा ! तूं बलवान् आहेस, बल वाढवण्याचें तुझें व्रत आहे, असा तूं बलवान् होऊन आपलीं कर्तव्यें स्वतः करतोस.

१३ वृषन् ! वृष्णः ते शवः वृष्ण्यं [७८२]- हे बलवाना ! बल वाढवणाऱ्या तुझें सामर्थ्य अत्यन्त प्रभावी आहे.

१४ त्वं वृषा असि [७८२]- तूं खरा बलवान् आहेस.

१५ नः राये दुरः विवृधि [७८३]- आमच्यासाठीं संपत्ति मिळण्याचीं दारें उघडून ठेव.

१६ स्वः–दृशं भानुना द्युमन्तं त्वा हवामहे [७८४] – स्वतः पाहण्याची शक्ति असलेल्या, स्वतःच्या तेजानें तेजस्वी झालेल्या, तुझी आम्ही प्रशंसा करतों.

१७ आयुभिः मर्मृज्यमानः [७८५]- मनुष्यांकडून शुद्ध होणारा.

१८ सु-आयुध ! मन्दमानः सुवीर्यं आ पवस्व [७८६]- उत्तम आयुधें जवळ ठेवणाऱ्या वीरा ! आनंद वाढवणारा होऊन उत्तम वीरता प्रकट कर.

१९ पवमानस्य ते सखित्वं आवृणीमहे [७८७]- पवित्र बनणाऱ्या अशा तुझी मित्रता व्हावी असें आम्ही इच्छीत आहों.

२० नः मृडय [७८८]- आम्हांला सुखी कर.

२१ विश्वतः ईशानः नः रयिं वीरवतीं इषं आ भर [७८९]– तूं सर्वांचा स्वामी होऊन आम्हांला वीर पुत्रांनीं युक्त धन व अन्न भरपूर दे.

२२ होतारं विश्व-वेदसं यज्ञस्य सुक्रतुं दूतं अग्निं वृणीमहे [७९०]– देवतांना बोलावून आणणाऱ्या, सर्वज्ञ, यज्ञ उत्तम रीतिनें करणाऱ्या दूत अग्निला आम्ही स्वीकारतों.

२३ विश्पतिं पुरुप्रियं अग्निं सदा हवन्ते [७९१] – प्रजांचा पालक पुष्कळांना प्रिय अशा अग्रणीला आम्ही सदोदित आमच्याजवळ बोलावतों.

२४ इह देवान् आ वह [७९२]– येथें देवांना बोलावून आण.

२५ नः ईड्यः असि [७९२]– तूं स्तुत्य असा आमचा सहाय्यक आहेस.

२६ पूत-दक्षसा वयं हवामहे [७९३]– ज्याचें पवित्र सामर्थ्य आहे त्याला आम्ही बोलावीत आहों.

२७ ऋतेन ऋतावृधौ ज्योतिषस्पती हुवे [७९४] – सत्यानें सत्यधर्म वाढवणाऱ्या वीरांना मी बोलावतों.

२८ विश्वाभिः ऊतिभिः प्राविता भुवत् [७९५]– सर्व संरक्षणाच्या साधनांनीं तो आमचा संरक्षण करणारा होवो.

२९ नः सुराधसः करतां [७९५]– आम्हांला उत्तम धनानें युक्त करोत.

३० गाथिनः इन्द्रं बृहत् अनूषत [७९६]–सामगायक इन्द्राची बृहत् साम गाऊन स्तुति करतात.

३१ उग्रः उग्राभिः ऊतिभिः सहस्रप्रधनेषु नः अव [७९८]– उग्रवीर, प्रबल संरक्षणाच्या साधनांनीं हजारों प्रकारचीं धनें ज्यांत प्राप्त होतात, अशा संग्रामांमध्यें आमचें रक्षण करोत.

३२ इन्द्रः दीर्घाय चक्षसे दिवि सूर्यं आरोहयत् [७९९]– इन्द्रानें विशेष प्रकाश मिळावा यासाठीं द्युलोकांमध्यें सूर्याला चढवलें.

३३ विश्वा ओजसा दधानः [८०३]– सर्व सामर्थ्य धारण कर.

३४ स्व-र्दृशं वाजिनं त्वा वाजेषु हिन्वे [८०४]– आत्मदर्शी बलवान् अशा तुला संग्रामांमध्यें जाण्याची प्रेरणा करतों.

३५ वाजेषु युजं चोदय [८०५]– युद्धांमध्यें जाण्याची मित्राला प्रेरणा कर.

३६ आजौ इन्द्रस्य वग्नु आ शृण्वे [८०६] युद्धामध्यें इन्द्राचा शब्द ऐकूं येत आहे.

३७ वधस्नुं नमयन्, मदाय पवस्व]८०८]– वध करणाऱ्या शत्रूला नम्र करून, आनंद वाढवण्यासाठीं शुद्ध हो.

३८ सत्पतिं नरः वृत्रेषु हवन्ते [८०९]– श्रेष्ठ पुरुषांचें योग्य पालन करणाऱ्या वीराचें लोक युद्धांच्या वेळीं सहाय्य मिळावें असें इच्छितात.

३९ हे वज्रहस्त अद्रिवन्! धृष्णया मदः गां रथ्यं संकिर [८१०]– हे वज्रधारी इन्द्रा! आपल्या शत्रूनाशक शक्तिनें आनंदित झालेला तूं गाई व घोडे आम्हांला दे.

४० जिग्युषे सत्रा वाजं [८१०]- विजयी वीराला एकदम अन्न व बल मिळतें.

४१ पुरुवसुः मघवा जरितृभ्यः सहस्रेण शिक्षति [८११]– पुष्कळ धनवान् इन्द्र स्तोत्यांना सहस्र प्रकारचें धन देत असतो.

४२ यथा विदे सुराधसं इन्द्रं अभि प्र अर्च [८११] – जसें तुम्हांला माहित आहे तशी इन्द्राची आराधना करा.

४३ धृष्णुया शतानीकः इव प्र जिगाति [८१२]– शूरवीर शत्रूसेनेवर चाल करतो.

४४ दाशुषे वृत्राणि हन्ति [८१२]– दात्याचें हित करण्यासाठीं शत्रूंना ठार मारतो.

४५ पुरुभोजसः अस्य दत्राणि प्र पिन्विरे [८१२]– पुष्कळ अन्न असलेल्या या इन्द्राचीं दानें सर्वांस लाभकारी असतात.

४६ तव उपमानि श्रवांसि [८१४]– तुझीं यशें उपमा देण्यास योग्य आहेत. तुझीं अन्नें उपमा देण्यास योग्य आहेत.

४७ ते मदः देववीः अघशंस-हा वरेण्यः [८१५]– तुझा आनंद देवांजवळ पोंचवणारा व पाप्यांचा नाश करणारा असा श्रेष्ठ आहे.

४८ अमित्रियं वृत्रं जघ्निः [८१६]– शत्रूरूपी दुष्टाचा नाश करणारा तूं आहेस.

४९ दिवे दिवे वाजं सस्निः [८१६]– दररोज तूं युद्धांत जातोस.

५० गोषातिः अश्वसा [८१६]– गाईचें व घोड्यांचें दान करतोस.

५१ अरुषः भुवः [८१७]– तेजस्वी हो.

५२ पूषा भगः रयिः [८१८]– हा पोषण करणारा, भाग्य वाढवणारा व धन देणारा आहे.

५३ विश्वस्य भूमनः पतिः [८१८]– सर्व प्राणिमात्रांचा पालक.

५४ ओजिष्ठः श्रवाय्यं आ भर [८२०]– बल वाढवणारा तूं प्रशंसनीय धन भरपूर दे.

५५ येन रयिं वनामहे [८२०]– ज्यानें आम्ही धन मिळवूं असें कर.

५६ मतीनां वृषा [८२१]- बुद्धिचें बल वाढवणारा हो.

५७ पूर्व्यः कविः [८२२]- पूर्वीपासून ज्ञानी असा प्रसिद्ध आहेस.

५८ लोककृत् पुनानः उषसः अरोचयत् [८२३]- लोकांचें हित करणारा हा पवित्र उषःकालीं प्रकाशित होतो.

५९ हे इन्द्र ! वीरयुः असि [८२४]- हे इन्द्रा ! तूं वीरांचा उपयोग करणारा आहेस.

६० शूरः एव असि [८२४]- तूं शूर आहेस.

६१ स्थिरः असि [८२४]- तूं युद्धामध्यें आपल्या जागेवर स्थिर राहत असतोस.

६२ ते मनः राध्यं [८२४]- तुझें मन आराधना करण्यास योग्य आहे.

६३ रातिः धायि चित् [८२५]- तुझें दान स्थिर टिकणारें आहे.

६४ नः सचा [८२५]- आमचा मित्र हो.

६५ तन्द्रयुः मा सु भव [८२६]- तूं आळशी होऊं नकोस.

६६ विश्वाः गिरः समुद्र-व्यचसं, रथानां रथी-तमं, सत्पतिं इन्द्रं अवीवृधत् [८२७]- सर्व स्तुति समुद्राप्रमाणें विस्तृत, रथी वीरांमध्यें श्रेष्ठ, बलांचा स्वामी, सज्जनांचा रक्षक अशा इन्द्राचें महात्म्य वाढवितात.

६७ हे शवसः-पते इन्द्र ! ते सख्ये वाजिनः मा भेम [८२८]- हे बलवान् इन्द्रा ! तुझ्या मैत्रीमुळें आम्हीं बलवान् होऊन निर्भय होऊं.

६८ जेतारं अ-पराजितं अभि प्रणोनुमः [८२८]- विजयी व अपराजित वीराला आम्ही प्रणाम करतों.

६९ इन्द्रस्य रातयः पूर्वीः [८२९]- इन्द्राचीं दानें प्राचीनकालापासून चालत आलीं आहेत.

७० मघं यदा मंहते, रातयः न विदस्यन्ति [८२९] – जेव्हां तो धन देतो, तेव्हां त्याचीं दानें कमी होत नाहींत.

उपमा

या अध्यायामध्यें पुढें दिलेल्या उपमा आलेल्या आहेत.

१ अश्वः न [७८३]- घोड्याप्रमाणें (संक्रन्दः) सोमरस गाळला जात असतां शब्द करतो.

२ शोणः वृषा गाः अभि कनिक्रदत् [८०६]- लाल रंगाचा बैल गाईंकडे पाहून जसा शब्द करतो, तसा सोम गाईंच्या दुधाशीं मिसळत असतां शब्द करतो.

३ जिग्युषे सत्रा वाजं न [८१०]- विजयी पुरुषाला एकदम तूं घोडे वगैरे देतोस त्याप्रमाणें आम्हांस दे.

४ गिरेः रसाः इव [८१२]- पर्वतांवरून जसे जल-प्रवाह वाहतात, त्याप्रमाणें याचीं दानें लोकांकडे वाहत असतात.

५ श्येनः न योनिं आसीदन् [८१७]- श्येन पक्षी ज्याप्रमाणें आपल्या स्थानावर बसल्यानें शोभतो व (न अरुषाः भुवः) जसा तो चमकतो, तसा सोम चमकतो.

याप्रमाणें उपमा या अध्यायामध्यें आल्या आहेत.

तृतीयाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
७७५	९।६२।२५	जमदग्निर्भार्गवः	पवमानः सोमः	गायत्री
७७६	९।६२।२६	जमदग्निर्भार्गवः	,,	,,
७७७	९।६२।२७	जमदग्निर्भार्गवः	,,	,,
७७८	९।६१।१८	अमहीयुरांगिरसः	,,	,,
७७९	९।६१।१९	अमहीयुरांगिरसः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
७८०	९।६१।३०	अमहीयुरांगिरसः	पवमानः सोमः	गायत्री
७८१	९।६४।१	कश्यपो मारीचः	,,	,,
७८२	९।६४।२	कश्यपो मारीचः	,,	,,
७८३	९।६४।३	कश्यपो मारीचः	,,	,,
७८४	९।६५।४	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
७८५	९।६५।६	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
७८६	९।६५।५	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
७८७	९।६१।४	अमहीयुरांगिरसः	,,	,,
७८८	९।६१।५	अमहीयुरांगिरसः	,,	,,
७८९	९।६१।६	अमहीयुरांगिरसः	,,	,,

(२)

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
७९०	१।१२।१	मेधातिथिः काण्वः	अग्निः	,,
७९१	१।१२।२	मेधातिथिः काण्वः	,,	,,
७९२	१।१२।३	मेधातिथिः काण्वः	,,	,,
७९३	१।२३।४	मेधातिथिः काण्वः	मित्रावरुणौ	,,
७९४	१।२३।५	मेधातिथिः काण्वः	,,	,,
७९५	१।२३।६	मेधातिथिः काण्वः	,,	,,
७९६	१।७।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	इन्द्रः	,,
७९७	१।७।२	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
७९८	१।७।४	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
७९९	१।७।३	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
८००	७।९४।४	वसिष्ठो मैत्रावरुणिः	इन्द्राग्नी	,,
८०१	७।९४।५	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
८०२	७।९४।६	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,

(३)

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
८०३	९।६५।१०	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	पवमानः सोम	,,
८०४	९।६५।११	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
८०५	९।६५।१२	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
८०६	९।९७।१३	उपमन्युर्वासिष्ठः	,,	त्रिष्टुप्
८०७	९।९७।१४	उपमन्युर्वासिष्ठः	,,	,,
८०८	९।९७।१५	उपमन्युर्वासिष्ठः	,,	,,

(४)

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
८०९	६।४६।१	शंयुर्बार्हस्पत्यः	इन्द्रः	प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतो बृहती)

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
८१०	६।४६।२	शंयुर्बार्हस्पत्यः	इन्द्रः	प्रगाथः- (विषमा बृहती, समा सतो बृहती)
८११	८।४९।१	वालखिल्याः प्रस्कण्वः काण्वः	,,	,,
८१२	८।४९।२	वालखिल्याः प्रस्कण्वः काण्वः	,,	,,
८१३	८।९९।१	नृमेध आंगिरसः	,,	,,
८१४	८।९९।२	नृमेध आंगिरसः	,,	,,
		(५)		
८१५	९।६१।१९	अमहीयुरांगिरसः	पवमानः सोमः	गायत्री
८१६	९।६१।२०	अमहीयुरांगिरसः	,,	,,
८१७	९।६१।२१	अमहीयुरांगिरसः	,,	,,
८१८	९।१०१।७	नहुषो मानवः	,,	अनुष्टुप्
८१९	९।१०१।८	नहुषो मानवः	,,	,,
८२०	९।१०१।९	नहुषो मानवः	,,	,,
८२१	९।८६।१९	सिकता निवावरी	,,	,,
८२२	९।८६।२०	सिकता निवावरी	,,	,,
८२३	९।८६।२१	पृश्नियोऽजाः	,,	,,
		(६)		
८२४	८।९२।२८	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	गायत्री
८२५	८।९२।२९	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
८२६	८।९२।३०	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
८२७	१।११।१	जेता माधुच्छन्दसः	,,	,,
८२८	१।११।२	जेता माधुच्छन्दसः	,,	,,
८२९	१।११।३	जेता माधुच्छन्दसः	,,	,,

अथ चतुर्थोऽध्यायः ।

अथ द्वितीयप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ २ ॥

[१]

(१-१९) १ जमदग्निर्भार्गवः; २ भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा; ३ कविर्भार्गवः; ४ कश्यपो मारीचः; ५ मेधातिथि; काण्वः; ६-७ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ८ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ९ सप्तर्षयः (१ भरद्वाजो बार्हस्पत्यः; २ कश्यपो मारीचः; ३ गोतमो राहूगणः; ४ अत्रिर्भौमः; ५ विश्वामित्रो गाथिनः; ६ जमदग्निर्भार्गवः; ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः); १० पराशरः शाक्त्यः; ११ पुरुहन्मा आंगिरसः; १२ मेध्यातिथि काण्वः; १३ वसिष्ठो मैत्रावरुणिः; १४ त्रित आप्त्यः; १५ ययातिर्नाहुषः; १६ पवित्र आंगिरसः; १७ सोभरिः काण्वः; १८ गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ; १९ तिरश्चीरांगिरसौ ॥ १-४, ९, १०, १४-१६ पवमानः सोमः ; ५, १७ अग्निः; ६ मित्रावरुणौ; ७ मरुतः, ७ (१, ३) इन्द्रश्च; ८ इन्द्राग्नी; ११-१३, १८-१९ इन्द्रः ॥ १-८, १४ गायत्री; ९ (३) द्विपदा विराट्; १० त्रिष्टुप्; ९ (१-२) ११, १३ प्रगाथः = (विषमा बृहती, समा सतोबृहती); १२ बृहती; १५, १९ अनुष्टुप्; १६ जगती; १७ प्रगाथः = (विषमा ककुप्, समा सतोबृहती); १८ उष्णिक् ॥

८३० एत असृग्रमिन्दवस्तिरः पवित्रमाशवः । विश्वान्यभि सौभगा ॥ १ ॥ (ऋ. ९।६२।१)

८३१ विघ्नन्तो दुरिता पुरु सुगा तोकाय वाजिनः । त्मना कृण्वन्तो अर्वतः ॥ २ ॥ (ऋ. ९।६२।२)

८३२ कृण्वन्तो वरिवो गवेऽभ्यर्षन्ति सुष्टुतिम् । इडामस्मभ्यं संयतम् ॥ ३ ॥ १ (या) ॥

[धा. ७ । उ. नास्ति । स्व. २] (ऋ. ९।६२।३)

८३३ राजा मेधाभिरीयते पवमानो मनावधि । अन्तरिक्षेण यातवे ॥ १ ॥ (ऋ. ९।६५।१६)

८३४ आ नः सोम सहो जुवो रूपं न वर्चसे भर । सुष्वाणो देववीतये ॥ २ ॥ (ऋ. ९।६५।१८)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[८३०] (तिरः पवित्रं) छाननीमधून (एते आशवः इन्दवः) हे शीघ्रगामी सोमरस (विश्वानि सौभगा अभि) सर्व उत्तम धनांच्या प्राप्तिसाठीं (असृग्रं) गाळले जात आहेत. ॥ १ ॥

[८३१] (वाजिनः) बल वाढवणारे व (पुरुः दुरिता विघ्नन्तः) पुष्कळ पापांचा नाश करणारे हे सोमरस आमच्यासाठीं (तोकाय सु-गाः) पुत्रपौत्रांसाठीं उत्तम गाई मिळाव्या, व (अर्वतः) घोडे मिळावे यासाठीं (त्मना कृण्वन्तः) स्वतः मार्ग करीत आहेत. ॥ २ ॥

[८३२] हे सोमरस (गवे अस्मभ्यं) गाईसाठीं व आम्हांसाठीं (सं-यतं) बल वाढवणारें (वरिवः इडां कृण्वन्तः) धन व अन्न तयार करतात व (सुष्टुतिं अभि-अर्षन्ति) उत्तम स्तुतिला प्राप्त करतात. ॥ ३ ॥

[८३३] (मनौ अधि) मनुष्य यज्ञ करीत असतां (पवमानः राजाः) शुद्ध होणारा सोमराजा (मेधाभिः) बुद्धिपूर्वक केलेल्या स्तुतींसह (अन्तरिक्षेण) अन्तरिक्षाच्या मार्गानें (यातवे ईयते) कलशामध्यें जाण्यासाठीं पुढें जात आहे. ॥ १ ॥

[८३४] हे (सोम) सोमा ! (देव-वीतये) देवतांना देण्यासाठीं (सुष्वाणः) गाळला जात असतां तूं (सहः जुवः) बल प्राप्त करून (रूपं न) सुंदर रूप प्राप्त करावें त्याप्रमाणें (वर्चसे नः आ भर) आमचें तेज पसरावें यासाठीं आम्हांला बल व तेज भरपूर दे. ॥ २ ॥

१ सहः जुवः, रूपं न, वर्चसे नः आ भर— बल प्राप्त कर व सुन्दर रूप प्राप्त व्हावें यासाठीं आमची तेजस्विता भरपूर वाढव.

८३५ आ न इन्दो शातग्विनं गवां पोषꣳ स्वश्व्यम् । वहा भगत्तिमूतये ॥ ३ ॥ २ (ला) ॥
[धा० १४ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ ९।६५।१७)

८३६ तं त्वा नृम्णानि बिभ्रतꣳ सधस्थेषु महो दिवः । चारुꣳ सुकृत्ययेमहे ॥१॥ (ऋ. ९।४८।१)

८३७ संवृक्तधृष्णुमुक्थ्यं महामहिव्रतं मदम् । शतं पुरो रुरुक्षणिम् ॥ २ ॥ (ऋ. ९।४८।२)

८३८ अतस्त्वा रयिरभ्ययद्राजानꣳ सुक्रतो दिवः । सुपर्णो अव्यथी भरत् ॥३॥ (ऋ. ९।४८।३)

८३९ अधा हिन्वान इन्द्रियं ज्यायो महित्वमानशे । अभिष्टिकृद्विचर्षणिः ॥ ४ ॥ (ऋ. ९।४८।५)

८४० विश्वस्मा इ स्वर्दृशे साधारणꣳ रजस्तुरम् । गोपामृतस्य विर्भरत् ॥ ५ ॥ ३ (हू) ॥
[धा० २६ उ० नास्ति स्व० ६] (ऋ. ९।४८।४)

८४१ इषे पवस्व धारया मृज्यमानो मनीषिभिः । इन्दो रुचाभि गा इहि ॥१॥ (ऋ. ९।६४।१३)

८४२ पुनानो वरिवस्कृध्यूर्जं जनाय गिर्वणः । हरे सृजान आशिरम् ॥ २ ॥ (ऋ ९।६४।१४)

---

[८३५] हे (इन्दो) सोमा ! (शातग्विनं) शंभर गाईनीं युक्त व (गवां पोषं) गाईचें पोषण करणारें आणि (सु-अश्व्यं) सुंदर घोड्यांनीं युक्त, (भगत्तिं) भाग्याचें दान (नः आ वह) आम्हांला दे. ॥ ३ ॥

आम्हांला गाई, घोडे व भाग्य पुष्कळ प्रमाणामध्यें दे.

[८३६] (महो दिवः) महान् द्युलोकाच्या (सधस्थेषु) अनेक स्थानांमध्यें असणाऱ्या (नृम्णानि बिभ्रतं) अनेक प्रकारच्या धनांना धारण करणाऱ्या (चारुं तं त्वा) सुन्दर अशा तुला (सुकृत्यया ईमहे) उत्तम यज्ञाच्या द्वारानें प्राप्त करण्याची इच्छा आम्ही करीत आहों. ॥ १ ॥

[८३७] (संवृक्त-धृष्णुं) ज्यानें आपले प्रभावी शत्रु नष्ट केले आहेत, (उक्थ्यं) अशा प्रशंसनीय व (महा-महि-व्रतं) अनेक महत्वाचीं कार्यें करणाऱ्या (मदं) आनन्द देणाऱ्या (शतं पुरः रुरुक्षणिं) शंभर शत्रूंच्या नगरांना तोडणाऱ्या [सोमा] जवळ आम्ही धन मागत आहों. ॥ २ ॥

[८३८] हे (सु-क्रतो) उत्तम कर्म करणाऱ्या सोमा ! (रयिः अभि अयत्) धनाजवळ पोंचणाऱ्या (राजानं त्वा) तेजस्वी अशा तुला (अतः दिवः) या द्युलोकामधून (अ-व्यथी सुपर्णः) दुःख न मानणाऱ्या गरुडानें (आ भरत्) आणलें. ॥ ३ ॥

१ अ-व्यथी सुपर्णः— कार्य करतांना दुःख न मानणाऱ्या गरुडानें स्वर्गामधून - हिमालयाच्या अत्युच्च शिखरावरून सोमवल्ली खालीं आणली.

[८३९] (अधा) नंतर (विचर्षणिः) विशेष ज्ञानी आणि (अभिष्टिकृत्) इष्ट फल देणारा सोम (इन्द्रियं हिन्वानः) आपल्या शक्तिला उत्तम रीतिनें प्रेरित करून (ज्यायः महित्वं आनशे) विशेष श्रेष्ठता प्राप्त करतो. ॥ ४ ॥

[८४०] (रजस्तुरं) उषकाला प्रेरित करणाऱ्या (ऋतस्य गोपां) यज्ञाचा संरक्षक (विश्वस्मै स्वर्दृशे साधारणं इत्) सर्व स्वयंप्रकाशी देवांना प्राप्त होणाऱ्या सोमाला (विः) गरुडपक्ष्यानें (भरत्) आणलें. ॥ ५ ॥

[८४१] हे (इन्दो) सोमा ! (मनीषिभिः मृज्यमानः) बुद्धिमान् याजकांनीं शुद्ध केलेला तूं (इषे धारया पवस्व) आमच्या अन्नासाठीं धारेनें गाळला जा. (रुचा गाः अभीहि) तेजानें गाईंना प्राप्त हो. ॥ १ ॥

१ रुचा गाः अभीहि— तेजानें गाईंना प्राप्त हो. चमकणारा सोम गोदुग्धाशीं मिसळला जावो.

[८४२] हे (गिर्वणः हरे) स्तुत्य हिरव्या रंगाच्या सोमा ! (आ शिरं सृजानः पुनानः) दुधाशीं मिसळून गाळला जाणारा तूं (जनाय ऊर्जं वरिवः कृधि) यजमानासाठीं अन्नरूपी धन दे. ॥ २ ॥

८४३ पुनानो देववीतय इन्द्रस्य याहि निष्कृतम् । द्युतानो वाजिभिर्हितः ॥ ३ ॥ ४ (या) ॥

[धा० १७ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ९।६४।१५)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

८४४ अग्निनाग्निः समिध्यते कविर्गृहपतिर्युवा । हव्यवाड् जुह्वास्यः ॥ १ ॥ (ऋ. १।१२।६)

८४५ यस्त्वामग्ने हविष्पतिर्दूतं देव सपर्यति । तस्य स्म प्राविता भव ॥ २ ॥ (ऋ. १।१२।८)

८४६ यो अग्निं देववीतये हविष्माँ आविवासति । तस्मै पावक मृडय ॥ ३ ॥ ५ (रि) ॥

[धा० १२ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. १।१२।९)

८४७ मित्रं हुवे पूतदक्षं वरुणं च रिशादसम् । धियं घृताचीं साधन्ता ॥ १ ॥ (ऋ. १।२।७)

८४८ ऋतेन मित्रावरुणावृतावृधावृतस्पृशा । क्रतुं बृहन्तमाशाथे ॥ २ ॥ (ऋ. १।२।८)

८४९ कवी नो मित्रावरुणा तुविजाता उरुक्षया । दक्षं दधाते अपसम् ॥ ३ ॥ ६ (व) ॥

[धा० १० । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. १।२।९)

---

[८४३] हे सोमा ! (वाजिभिः) अनेक शक्तींनीं (द्युतानः) तेजस्वी दिसणारा (देव-वीतये पुनानः) देवांना देण्यासाठीं पवित्र केला जाणारा (हितः) हित करणारा तूं सोम (इन्द्रस्य निष्कृतं याहि) इन्द्राच्या स्थानाजवळ जा. ॥ ३ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[८४४] (कविः) दूरदृष्टी (गृह-पतिः) यज्ञगृहाचें रक्षण करणारा (युवा) तरुण (हव्य-वाट्) हवि देवांपर्यंत पोंचवणारा (जुह्वास्यः अग्निः) जुहूनामक मुखानें युक्त अग्नि (अग्निना समिध्यते) मंथनानें उत्पन्न केलेल्या अग्निच्या योगानें प्रदीप्त केला जातो. ॥ १ ॥

[८४५] हे (अग्ने देव) अग्नि देवा ! (यः हविष्पतिः) जो हविष्यान्न देवांना पोंचवणारा यजमान (दूतं त्वां सपर्यत) तुझ दूताला सुपूजित करतो, (तस्य प्राविता भव) त्याचें पूर्णपणानें संरक्षण करणारा हो. ॥ २ ॥

[८४६] हे (पावक) शुद्ध करणाऱ्या अग्ने ! (यः हविष्मान्) जो हवि अर्पण करणारा यजमान (देव-वितये) देवतांना देण्यासाठीं (अग्निं आ विवासति) अग्निची आराधना करतो (तस्मै) त्याला (मृडय) सुखी कर. ॥ ३ ॥

[८४७] मी (पूत-दक्षं मित्रं) पवित्र बलाच्या मित्राला व (रिश-अदसं वरुणं च) हिंसक शत्रूंच्या नाशक वरुणाला (हुवे) बोलावीत आहें. या मित्र व वरुण देवता (घृताचीं धियं साधन्ता) जल उत्पन्न करण्याचें कार्य सिद्ध करतात. ॥ १ ॥

[८४८] (मित्रा-वरुणौ) मित्र व वरुण हे देव (ऋता-वृधौ) सत्य यज्ञाला वाढवणारे आहेत. (ऋत-स्पृशौ) सत्याला स्पर्श करणारे आहेत. हे देवांनों ! तुम्ही दोघेहि (बृहन्तं क्रतुं) या मोठ्या यज्ञाला (ऋतेन आशाथे) सत्यानें पूर्ण करीत आहांत. ॥ २ ॥

[८४९] (कवी) दूरदर्शी (तुवि-जाता) अनेक कर्मामध्यें उपयोगी (उरु-क्षया) अनेक स्थानांमध्यें राहणारे (मित्रा-वरुणा) मित्र व वरुण (नः दक्षं अपसं दधाते) आमच्या बलाला व कार्याला परिपुष्ट करीत आहेत. ॥ ३ ॥

८५० इन्द्रेण सं हि दृक्षसे संजग्मानो अबिभ्युषा । मन्दू समानवर्चसा ॥ १ ॥ (ऋ. १।६।७)

८५१ आदह स्वधामनु पुनर्गर्भत्वमेरिरे । दधाना नाम यज्ञियम् ॥ २ ॥ (ऋ. १।६।४)

८५२ वीडु चिदारुजत्नुभिर्गुहा चिदिन्द्र वह्निभिः । अविन्द उस्रिया अनु ॥ ३ ॥ ७ (ति) ॥

[धा० १४ । उ० १ । स्व० ३] (ऋ. १।६।५)

८५३ ता हुवे ययोरिदं पप्ने विश्वं पुरा कृतम् । इन्द्राग्नी न मर्धतः ॥ १ ॥ (ऋ. ६।६०।४)

८५४ उग्रा विघनिना मृध इन्द्राग्नी हवामहे । ता नो मृडात ईदृशे ॥ २ ॥ (ऋ. ६।६०.५)

८५५ हथो वृत्राण्यार्या हथो दासानि सत्पती । हथो विश्वा अप द्विषः ॥ ३ ॥ ८ (पी) ॥

[धा० १० । उ० १ । स्व० ४] (ऋ. ६।६०।६)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

८५६ अभि सोमास आयवः पवन्ते मद्यं मदम् ।
समुद्रस्याधि विष्टपे मनीषिणो मत्सरासो मदच्युतः ॥ १ ॥ (ऋ. ९।१०७।१४)

---

[८५०] (मन्दू) आनन्दित व (समान वर्चसा) समान तेजस्वी असे मरुद्गण (अबिभ्युषा इन्द्रेण संजग्मानः) निर्भय इन्द्राबरोबर राहून (सं दृक्षसे हि) उत्तम दिसतात. ॥ १ ॥

[८५१] (आत् अह) सत्वर (स्वधां अनु) अन्नाला अनुलक्षून (यज्ञियं नाम दधानाः) पूज्य नांव धारण करणारे मरुत् (पुनः गर्भत्वं ईरिरे) पुनः गर्भाला प्राप्त होतात. ॥ २ ॥

[८५२] हे (इन्द्र) इन्द्रा ! (वीडु चित्) सुदृढ किल्ला (आ रुजत्नुभिः) तोडणाऱ्या (वह्निभिः मरुद्भिः) तेजस्वी मरुतांनीं (गुहा चित्) गुहेमध्यें असणाऱ्या (उस्रियाः अविन्दः)) गाई प्राप्त केल्या. ॥ ३ ॥

[८५३] (ता इन्द्राग्नी हुवे) त्या इन्द्र व अग्निला मी सहाय्यासाठीं बोलावतों. (ययोः) ज्या दोघांनीं (पुराकृतं विश्वं इत्) पूर्वी केलेले हे सर्व पराक्रम (पप्ने) स्तविले जात आहेत, ते इन्द्र व अग्नि (न मर्धतः) स्तुति करणाऱ्यांना दुःख देत नाहींत. ॥ १ ॥

[८५४] ते (उग्रा) उग्रवीर (मृधः विघनिना) शत्रूंचा नाश करणारे आहेत, त्या (इन्द्र-अग्नी) इन्द्र व अग्निनां आम्ही (हवामहे) सहाय्यार्थ बोलावीत आहों. (तौ) ते (ईदृशे) अशा या संग्रामामध्यें (नः मृडातः) आम्हांला सुखी करोत. ॥ २ ॥

[८५५] हे इन्द्र व अग्नि हो ! (आर्या) श्रेष्ठ तुम्ही (वृत्राणि हथः) शत्रूंना मारा. तुम्ही (सत्पती) सज्जनांचे पालक आहां, यासाठीं (दासानि हथः) नीचांना दूर करा. तसेंच (विश्वाः द्विषः अप हथः) सर्व द्वेष करणाऱ्यांचा नाश करा. ॥ ३ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[८५६] (मनीषिणः आयवः) बुद्धिमान् ऋत्विज (मत्सरासः मदच्युतः सोमासः) आनंद वाढवणाऱ्या, उत्साही सोमरसांना (समुद्रस्य अधि विष्टपे) जलपात्राच्या वर असणाऱ्या छाननीमधून (मद्यं मदं अभि पवन्ते) आनंद व उत्साह वाढावा यासाठीं गाळतात. ॥ १ ॥

*

८५७ तरत्समुद्रं पवमान ऊर्मिणा राजा देव ऋतं बृहत् ।
अर्षा मित्रस्य वरुणस्य धर्मणा प्र हिन्वान ऋतं बृहत् ॥ २ ॥ (ऋ. ८।१०७।१५)

८५८ नृभिर्येमाणो हर्यतो विचक्षणो राजा देवः समुद्र्यः ॥ ३ ॥ ९ (वु) ॥

[धा० १९ । उ० नास्ति । स्व० ९] (ऋ. ८।१०७।१६)

८५९ तिस्रो वाच ईरयति प्र वह्निर्ऋतस्य धीतिं ब्रह्मणो मनीषाम् ।
गावो यन्ति गोपतिं पृच्छमानाः सोमं यन्ति मतयो वावशानाः ॥ १ ॥ (ऋ. ९।९७।३४)

८६० सोमं गावो धेनवो वावशानाः सोमं विप्रा मतिभिः पृच्छमानाः ।
सोमः सुत ऋच्यते पूयमानः सोमे अर्कास्त्रिष्टुभः सं नवन्ते ॥ २ ॥ (ऋ. ९।९७।३५)

८६१ एवा नः सोम परिषिच्यमान आ पवस्व पूयमानः स्वस्ति ।
इन्द्रमा विश बृहता मदेन वर्धया वाचं जनया पुरंधिम् ॥ ३ ॥ १० (पी) ॥

[धा० ३० । उ० १ । स्व० ४] (ऋ. ९।९७।३६)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

---

[८५७] (पवमानः देवः) शुद्ध केला जाणारा (राजा) तेजस्वी सोम (बृहत् ऋतं समुद्रं) मोठ्या जलमय कलशामध्यें (ऊर्मिणा तरत्) धारेनें तरतो आहे. (हिन्वानः ऋतं बृहत्) प्रेरणा करणारा तो सत्य सोमरस (मित्रस्य वरुणस्य) मित्र व वरुणांनीं (धर्मणा प्र अर्षा) स्वीकारावा म्हणून गाळला जात आहे - कलशामध्यें पडत आहे. ॥ २ ॥

[८५८] (नृभिः येमाणः) ऋत्विजांकडून तयार होणारा (हर्यतः विचक्षणः) वर्णनीय, विशेष ज्ञान वाढवणारा (देवः राजा) दिव्य सोम राजा (समुद्र्यः) जलामध्यें इन्द्रासाठीं गाळला जात आहे. ॥ ३ ॥

[८५९] (वह्निः तिस्रः वाचः प्रेरयति) यज्ञकर्ता ऋक्, यजु, साम या तीन वाणींचें उच्चारण करतो. (ऋतस्य धीतिं) यज्ञाची रीति व (ब्रह्मणः मनीषां) ज्ञानानें पवित्र झालेले विचार यांत उच्चारले जातात. (गावः गो-पतिं यन्ति) गाई गोपाळाजवळ जातात, त्याप्रमाणें, (पृच्छमानाः सोमं यन्ति) गाई शब्द करीत सोमाजवळ जातात, तेव्हां (वावशानाः मतयः) इच्छा करणाऱ्या बुद्धि त्याची स्तुति करतात. ॥ १ ॥

[८६०] (धेनवः गावः) दुधाळ गाई (सोमं वावशानाः) सोमाची इच्छा करतात, (विप्राः मतिभिः सोमं पृच्छमानाः) ज्ञानी लोग आपल्या बुद्धिनीं सोमाचें वर्णन करतात. (सुतः सोमः) सोमरस काढल्यानंतर (पूयमानः ऋच्यते) गाळला जात असतांना पात्रांत पडत असतो. (त्रिष्टुभः अर्काः सोमे सं नवन्ते) त्यावेळीं त्रिष्टुप् छंदाचे मंत्र सोमाचें वर्णन करतात. ॥ २ ॥

[८६१] हे (सोम) सोमा ! (परिषिच्यमानः) पात्रामध्यें पाण्यांत मिसळला जाऊन आणि (पूयमानः) पवित्र होऊन (नः एव स्वस्ति पवस्व) आमच्या कल्याणासाठींच तूं गाळला जा. (बृहता मदेन इन्द्रं आविश) मोठ्या आनंदानें इन्द्राच्या पोटांत जा. (वाचं वर्धय) स्तुतिचें संवर्धन कर. (पुरन्धिं जनय) पुष्कळ कर्मे करणारी बुद्धि उत्पन्न कर. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४]

८६२ यत् द्याव इन्द्र ते शतꣳशतं भूमीरुत स्युः ।
न त्वा वज्रिन्त्सहस्रꣳसूर्या अनु न जातमष्ट रोदसी ॥ १ ॥ (ऋ. ८।७०।५)

८६३ आ पप्राथ महिना वृष्ण्या वृषन्विश्वा शविष्ठ शवसा ।
अस्माꣳअव मघवन् गोमति व्रजे वज्रिं चित्राभिरूतिभिः ॥ २ ॥ ११ (ली) ॥

[धा० १९ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ८।७०।६)

८६४ वयं घ त्वा सुतावन्त आपो न वृक्तबर्हिषः ।
पवित्रस्य प्रस्रवणेषु वृत्रहन्परि स्तोतार आसते ॥ १ ॥ (ऋ. ८।३३।१)

८६५ स्वरन्ति त्वा सुते नरो वसो निरेक उक्थिनः ।
कदा सुतं तृषाण ओक आ गमदिन्द्र स्वब्दीव वꣳसगः ॥ २ ॥ (ऋ. ८।३३।२)

८६६ कण्वेभिर्धृष्णवा धृषद्वाजं दर्षि सहस्रिणम् ।
पिशङ्गरूपं मघवन्विचर्षणे मक्षू गोमन्तमीमहे ॥ ३ ॥ १२ (छा) ॥

[धा० २७ । उ० २ । स्व० २] (ऋ. ८।३३।३)

[४] चतुर्थः खण्डः ।

[८६२] हे (इन्द्र) इन्द्रा ! (ते) तुझी बरोबरी करण्यासाठीं (यत् द्यावः शतं स्युः) जर शंभर द्युलोक असले, (उत भूमिः शतं स्युः) व भूमी शंभर असल्या व हे (वज्रिन्) वज्रधारी इन्द्रा ! (सहस्रं सूर्याः) हजार सूर्य झाले तरी ते सर्व (त्वा न अनु न अष्ट) तुझी बरोबरी करूं शकत नाहींत. (जातं न अनु अष्ट) कोणतेंही उत्पन्न झालेलें जगत् तुझी बरोबरी करूं शकत नाहीं, (रोदसी) ही सर्व द्यावापृथिवी तुझी बरोबरी करूं शकत नाहीं. ॥ १ ॥

[८६३] हे (वृषन्) बलवान् इन्द्रा ! तूं आपल्या (वृष्ण्या महिना) सामर्थ्याच्या महात्म्य युक्त (शवसा) बलानें (विश्वा आ पप्राथ) सर्वांना पूर्ण करीत आहेस. हे (शविष्ठ) बलवान् (मघवन् वज्रिन्) धनवान्, वज्रधारी इन्द्रा ! (गोमति व्रजे) गाईंनीं भरलेल्या गोशालेमध्यें (चित्राभिः ऊतिभिः) नाना प्रकारच्या संरक्षक साधनांनीं (नः अव) आमचें रक्षण कर. ॥ २ ॥

[८६४] हे (वृत्रहन्) शत्रूचा वध करणाऱ्या इन्द्रा ! (त्वां वयं घ) तुझ्याजवळ आम्ही (सुतावन्तः) सोमरस काढून (आपः न) जलप्रवाहांप्रमाणें येत आहों. (पवित्रस्य प्रस्रवणेषु) पवित्र सोमाचें शुद्धीकरण करीत असतां (वृक्त-बर्हिषः स्तोतारः) आसनें पसरून स्तुति करणारे (परि उप आसते) तुझी उपासना करीत आहों. ॥ १ ॥

[८६५] हे (वसो) निवासक इन्द्रा ! (सुते निरेके) सोमरस काढल्यावर (उक्थिनः नरः) स्तुति करणारे ऋत्विज (त्वा स्वरन्ति) तुझी स्तुति करतात. (सुतं तृषाणः) सोमरस पिण्याची इच्छा करणारा (वंसगः) बैल जसा (स्वब्दीव) शब्द करीत (कदा ओकः आगमत्) केव्हां आमच्या घरीं येईल बरें. ॥ २ ॥

[८६६] (धृष्णो) शूरवीर इन्द्रा ! (कण्वेभिः) कण्वांनीं स्तुति केल्यानंतर त्यांना तूं (सहस्रिणं वाजं आदर्षि) सहस्र प्रकारचें बल अथवा धन देतोस. हे (मघवन् विचर्षणे) धनवान् व ज्ञानी इन्द्रा ! तुझ्याकडून (धृषत्) शत्रूचा नाश करणारें (पिशंग-रूपं) सोन्यासारखें चमकणारें (गोमन्तं वाजं) गाईंसह असणारें धन (मक्षु ईमहे) लवकर प्राप्त व्हावें असें इच्छीत आहों. ॥ ३ ॥

८६७ तरणिरित्सिषासति वाजं पुरंध्या युजा । आ व इन्द्रं पुरुहूतं नमे गिरा नेमिं तष्टेव सुद्रुवम् ॥ १ ॥
(ऋ. ७।३२।२०)

८६८ न दुष्टुतिर्द्रविणोदेषु शस्यते न स्रेधन्तꣳरयिर्नशत् ।
सुशक्तिरिन्मघवं तुभ्यं मावते देष्णं यत्पार्ये दिवि ॥ २ ॥ १३ (यि) ॥
[धा० १७ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ७।३२।२१)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

[५]

८६९ तिस्रो वाच उदीरते गावो मिमन्ति धेनवः । हरिरेति कनिक्रदत् ॥ १ ॥ (ऋ. ९।३३।४)

८७० अभि ब्रह्मीरनूषत यह्वीर्ऋतस्य मातरः । मर्जयन्तीर्दिवः शिशुम् ॥ २ ॥ (ऋ. ९।३३।५)

८७१ रायः समुद्राꣳश्चतुरोऽस्मभ्यꣳसोम विश्वतः । आ पवस्व सहस्रिणः ॥ ३ ॥ १४ (हा) ॥
[धा० १८ । [illegible]]

८७२ सुतासो मधुमत्तमाः सोमा इन्द्राय मन्दिनः ।
पवित्रवन्तो अक्षरं देवान्गच्छन्तु वो मदाः ॥ १ ॥ (ऋ. ९।१०१।४)

[८६७] (तरणिः इत्) दुःखांतून तरून जाणारा वीर (युजा पुरंध्या) योग्य विशाल बुद्धीनें (वाजं सिषासति) बल प्राप्त करावें असें इच्छीत असतो. हे यज्ञ करणाऱ्यांनो ! (वः) तुमच्यासाठी (गिरा) स्तुति करून (पुरुहूतं इन्द्रं) पुष्कळांनीं स्तविलेल्या इन्द्राला (आ-नमे) बोलावून [illegible] (तष्टा सुद्रुवं नेमिं इव) सुतार लांकडाचें नमवून चक्र बनवतो. ॥ १ ॥

[८६८] (द्रविणोदेषु) धनाचें दान करणाऱ्या पुरुषाची (दुः-स्तुतिः न शस्यते) निंदा केली तर ती प्रशस्त आहे असें कोणी समजत नाहीं. (स्रेधन्तं) दान करणाऱ्याची स्तुति न करणाऱ्याला (रयिः न नशत्) धन प्राप्त होत नाहीं. हे (मघवन्) धनवान् इन्द्रा ! (पार्ये दिवि) सोमसवनाच्या दिवशीं (मावते) माझ्यासारख्याला (देष्णं यत्) देण्यास योग्य जें धन आहे, तें (तुभ्यं सुशक्तिः इत्) तुझ्यापासून उत्तम शक्तिमान्‌ही प्राप्त करीत असतो. ॥ २ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५] पञ्चमः खण्डः ।

[८६९] (तिस्रः वाचः उदीरते) ऋक्, यजु, साम या तीन वाणी यज्ञ करणारे उच्चारतात. (धेनवः गावः मिमन्ति) दुधाळ गाई हंबरतात. (हरिः कनिक्रदत् एति) हिरव्या रंगाचा सोमरस शब्द करीत कलशामध्यें उतरतो. ॥ १ ॥

[८७०] (ब्रह्मीः) वेदांमधील (ऋतस्य यह्वीः मातरः) यज्ञाचें मोठें महत्त्व वर्णन करणारी स्तुति (दिवः शिशुं मर्जयन्तीः) द्युलोकाच्या पुत्ररूपी सोमाला शुद्ध करीत (अभि अनूषत) गाईली जात असते. ॥ २ ॥

[८७१] हे (सोम) सोमा ! (रायः चतुरः समुद्रान्) धनाच्या चारही समुद्रांला (अस्मभ्यं) आम्हांसाठीं (विश्वतः आ पवस्व) चारही बाजूंनीं आणून दे आणि (सहस्रिणः) आमच्या हजारों इच्छा तृप्त कर. ॥ ३ ॥

[८७२] (मधुमत्तमाः) अत्यंत मधुर (मन्दिनः सुतासः) आनन्द वाढवणारे सोमरस (पवित्रवन्तः) [illegible] (इन्द्राय अक्षरन्) इन्द्रासाठीं कलशामध्यें पडतात. हे (सोमाः) सोमरसानों ! (वः मदाः देवान् गच्छन्तु) [illegible] आनन्ददायक रस देवांना प्राप्त होवोत. ॥ १ ॥

८७३ इन्दुरिन्द्राय पवत इति देवासो अब्रुवन् । वाचस्पतिर्मखस्यते विश्वस्येशान ओजसः ॥ २ ॥
(ऋ ९।१०१।५)

८७४ सहस्रधारः पवते समुद्रो वाचमीङ्खयः ।
सोमस्पती रयीणाꣳसखेन्द्रस्य दिवेदिवे ॥ ३ ॥ १५ (लि) ॥
[धा० २९ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ९।१०१।६)

८७५ पवित्रं ते विततं ब्रह्मणस्पते प्रभुर्गात्राणि पर्येषि विश्वतः ।
अतप्ततनूर्न तदामो अश्नुते शृतास इद्वहन्तः सं तदाशत ॥ १ ॥ (ऋ. ९।८३।१)

८७६ तपोष्पवित्रं विततं दिवस्पदेऽर्चन्तो अस्य तन्तवो व्यस्थिरन् ।
अवन्त्यस्य पवितारमाशवो दिवः पृष्ठमधि रोहन्ति तेजसा ॥ २ ॥ (ऋ. ९।८३।२)

८७७ अरूरुचदुषसः पृश्निरग्रिय उक्षा मिमेति भुवनेषु वाजयुः ।
मायाविनो ममिरे अस्य मायया नृचक्षसः पितरो गर्भमा दधुः ॥ ३ ॥ १६ (दु) ॥
[धा० ३८ । उ० १ । स्व० ९] (ऋ. ९।८३।३)

॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

---

[८७३] (इन्दुः) सोमरस (इन्द्राय पवते) इन्द्रासाठीं गाळला जात आहे, (इति देवासः अब्रुवन्) असें स्तुति करणारे म्हणत आहेत. (वाचः-पतिः) स्तुतिचा रक्षक व (विश्वस्य ओजसः ईशानः) सर्व बलाचा स्वामी हा सोम (मखस्यते) यज्ञामध्यें उपयोग केला जात आहे. ॥ २ ॥

[८७४] (समुद्रः) पाण्यांत मिसळलेला (वाचं ईखयः) स्तुतिंना प्रेरणा देणारा (रयीणां पतिः) धनांचा स्वामी (इन्द्रस्य सखा) इन्द्राचा मित्र (सोमः) हा सोम (दिवे दिवे) प्रतिदिवशीं (सहस्र-धारः पवते) सहस्र धारांनीं कलशामध्यें उतरत आहे. ॥ ३ ॥

[८७५] हे (ब्रह्मणः पते) मंत्रांच्या स्वामी सोमा ! (ते पवित्रं विततं) तुझा पवित्र झालेला भाग सर्वत्र पसरला आहे. तूं (प्रभुः) सामर्थ्यवान् (गात्राणि पर्येषि) पिणाऱ्याच्या अवयवांना प्राप्त होतोस. (विश्वतः अ-तप्त-तनूः) सर्व प्रकारें शरीराला ताप न झाला तर (आमः तत् न अश्नुते) अपक्व शरीरानें तें सुख त्याला प्राप्त होत नाहीं, (शृतासः इत्) जे परिपक्व होतात, तेच (वहन्तः तत् सं आशते) यज्ञाचा भार उचलीत तें सुख प्राप्त करतात. ॥१॥

[८७६] (तपोः पवित्रं) शत्रूंना ताप देणाऱ्या सोमाचें तें पवित्र अंग (दिवः पदे विततं) द्युलोकाच्या स्थाना-मध्यें पसरलें आहे. (अस्य तन्तवः) याचे किरण (अर्चन्तः व्यस्थिरन्) चमकत तेथें विशेष रीतिनें स्थिर झाले आहेत. (अस्य आशवः) या सोमाचे शीघ्र पसरणारे रस (पवितारं अवन्ति) शुद्ध करणाऱ्याचें रक्षण करतात. ते (दिवः पृष्ठं) द्युलोकाच्या पृष्ठभागावर (तेजसा अधिरोहन्ति) आपल्या तेजानें चढून बसतात. ॥ २ ॥

[८७७] (उषसः पृश्निः) उषःकालामधील सूर्य (अग्रियः अरूरुचत्) प्रथम प्रकाशित असतो. (उक्षा) वृष्टि करणारा तो (भुवनेषु मिमेति) सर्व भुवनांमध्यें जलसिंचन करतो व प्रजेला (वाज-युः) अन्नानें युक्त करतो. (मायाविनः) शक्तिमान् देवता (अस्य मायया) याच्या शक्तिनें (ममिरे) जगत् निर्माण करीत असतात. (अस्य) या सोमाच्या शक्तिनें (नृचक्षसः पितरः) मानवांचें निरीक्षण करणारे पालक (गर्भं आदधुः) ओषधिमध्यें गर्भ धारण करतात. ॥ ३ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६]

८७८ प्र मंहिष्ठाय गायत ऋताव्ने बृहते शुक्रशोचिषे । उपस्तुतासो अग्नये ॥ १ ॥
(ऋ. ८।१०३।८)

८७९ आ वंसते मघवा वीरवद्यशः समिद्धो द्युम्न्याहुतः ।
कुविन्नो अस्य सुमतिर्भवीयस्यच्छा वाजेभिरागमत् ॥ २ ॥ १७ (वा) ॥
[धा० १७ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ८।१०३।९)

८८० तं ते मदं गृणीमसि वृषणं पृक्षु सासहिम् । उ लोककृत्नुमद्रिवो हरिश्रियम् ॥ १ ॥
(ऋ. ८।१५।४)

८८१ येन ज्योतींष्यायवे मनवे च विवेदिथ । मन्दानो अस्य बर्हिषो वि राजसि ॥ २ ॥
(ऋ. ८।१५।५)

८८२ तदद्या चित्त उक्थिनोऽनु ष्टुवन्ति पूर्वथा । वृषपत्नीरपो जया दिवेदिवे ॥ ३ ॥ १८ (छ) ॥
[धा० २१ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ८।१५।६)

८८३ श्रुधी हवं तिरश्च्या इन्द्र यस्त्वा सपर्यति । सुवीर्यस्य गोमतो रायस्पूर्धि महाँ असि ॥ १ ॥
(ऋ. ८।९५।४)

---

[६] षष्ठः खण्डः ।

[८७८] (उप-स्तुतासः) हे स्तुति करणाऱ्यांनों ! तुम्ही (मंहिष्ठाय) पूज्य (ऋतावने) यज्ञ करणाऱ्या (बृहते शुक्र-शोचिषे) मोठ्या तेजस्वी (अग्नये प्र गायत) अग्निसाठीं स्तोत्रें गायन करा. ॥ १ ॥

[८७९] (मघवा द्युम्नी) धनवान् तेजस्वी (समिद्धः आहुतः) प्रदीप्त व हवन केला गेलेला अग्नि (वीरवत् यशः) पुत्रांसह असलेलें यश (आ वंसते) देत असतो. (अस्य) या अग्नीची (भवीयसी सुमतिः) आम्हांला अनुकूल असणारी उत्तम बुद्धि (नः अच्छ) आमच्याजवळ (वाजेभिः) अन्नांसह (कुवित् आगमत्) अनेक वेळां येवो. ॥ २ ॥

[८८०] हे (अद्रिवः) वज्रधारी इन्द्रा ! (ते वृषणं) तुझ्या मनोरथाची पूर्ती करणाऱ्या (पृक्षु सासहिं) युद्धांमध्यें शत्रूंचा पराभव करणाऱ्या (लोककृत्नुं उ) लोकांचें हित करणाऱ्या (हरि-श्रियं) अश्वांची शोभा ज्याच्या- जवळ आहे अशा (तं मदं) सोमपानानें उत्पन्न झालेल्या उत्साहाची (गृणीमसि) आम्हीं प्रशंसा करतों. ॥ १ ॥

[८८१] हे इन्द्रा ! (येन) ज्या उत्साहानें (आयवे मनवे) दीर्घायु मनुष्यांच्या हितासाठीं (ज्योतींषि विवेद) सूर्यादि अनेक तेजस्वी गोलक प्रकाशित केले आहेत. (अस्य बर्हिषः मन्दानः) या यज्ञकर्त्यांच्या आसनावर आनन्दित होऊन (विराजसि) तूं विराजमान होतोस. ॥ २ ॥

[८८२] हे इन्द्रा ! (ते तत्) तुझ्या त्या प्रसिद्ध बलाची (अद्या चित्) आजही (पूर्वथा) पूर्वीप्रमाणें (उक्थिनः अनुस्तुवन्ति) स्तुति करणारे स्तुति करतात. असा तूं (वृषपत्नीः अपः) बलाचें पालन करणारें जल (दिवे दिवे जय) प्रतिदिवशीं जिंकून प्राप्त कर. ॥ ३ ॥

[९८३] (यः त्वा सपर्यति) जो तुझी आराधना करतो, हे (इन्द्र) इन्द्रा ! (तिरश्च्याः हवं श्रुधि) त्या तिरश्चि ऋषिची प्रार्थना श्रवण कर व (सुवीर्यस्य गोमतः रायः पूर्धि) उत्तम श्रेष्ठ पुत्रानें युक्त व गायींनीं युक्त धनानें आम्हांला पूर्ण कर. (महान् असि) तूं महान् आहेस. ॥ १ ॥

८८४ यस्त इन्द्र नवीयसीं गिरं मन्द्रामजीजनत् ।
चिकित्विन्मनसं धियं प्रत्नामृतस्य पिप्युषीम् ॥ २ ॥ (ऋ. ८।९५।५)

८८५ तमु ष्टवाम यं गिर इन्द्रमुक्थानि वावृधुः ।
पुरूण्यस्य पौंस्या सिषासन्तो वनामहे ॥ ३ ॥ १९ (फा) ॥
[धा० १५ । उ० २ । स्व० २] (ऋ. ८।९५।६)

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

॥ इति द्वितीयप्रपाठके द्वितीयोऽर्धः । द्वितीयप्रपाठकश्च समाप्तः ॥ २ ॥

॥ इति चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

---

[८८४] हे (इन्द्र) इन्द्रा ! (यः) जो (नवीयसीं) नवीन (मन्द्रां गिरं) आनन्ददायक स्तुति (ते अजीजनत्) तुझ्यासाठीं करतो, त्या स्तोत्याला (प्रत्नां ऋतस्य पिप्युषीं) यज्ञाला वाढवणारी (चिकित्विन् मनसं) मनाला शुद्ध करणारी (धियं) बुद्धि दे. ॥ २ ॥

[८८५] आम्ही (तं उ इन्द्रं स्तवाम) त्या इन्द्राची स्तुति करीत आहों. (यं गिरः उक्थानि वावृधुः) ज्याचें महात्म्य मंत्र व स्तोत्रें वाढवतात. यासाठीं (अस्य) या इन्द्राच्या (पुरूणि पौंस्या) पुष्कळ पराक्रमांना आम्ही (सिषासन्तः वनामहे) भक्तिनें वर्णन करीत आहों. ॥ ३ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति चतुर्थोऽध्यायः ॥

चतुर्थ अध्याय

या चवथ्या अध्यायामध्यें इन्द्राचे गुण वर्णन केले आहेत, ते हे आहेत—

इन्द्राचे गुण

१ अबिभ्युषः [८५०]- निर्भय, कोणालाहि न भिणारा.

२ धृष्णुः [८६६]- शत्रूंना दूर करणारा, शूरवीर.

३ तरणिः [८६७]- दुःखांतून पार होणारा.

४ वृषा [८६३]- बलवान्, सामर्थ्यवान्.

५ वज्रिन् [८६३]- वज्रधारी, शस्त्रास्त्रधारी.

६ शविष्ठः [८६३]- सामर्थ्यवान्.

७ मघवान् [८६३]- धनवान्.

८ वसुः [८६५]- धनवान्, निवास करणारा.

९ विचर्षणिः [८६६]- विशेष ज्ञानी.

१० पुरु-हूतः [८६७]- ज्याला पुष्कळ लोक आपल्या सहाय्यासाठीं बोलावीत असतात.

११ अस्य पुरूणि पौंस्या सिषासन्तः वनामहे- [८८५]- या इन्द्राचीं पुष्कळच पराक्रमाचीं कृत्यें आम्ही भक्तिनें वर्णन करीत आहों.

१२ सुवीर्यस्य गोमतः रायः पूर्धि [८८३]- उत्तम वीर्यवान् पुत्र व गाई यांनीं युक्त अशा धनानें आम्हांला परिपूर्ण कर.

१३ हे वृषन् ! वृष्ण्या महिना शवसा विश्वा आ पप्राथ [८६३]- हे बलवान् इन्द्रा ! सामर्थ्यानें व मोठ्या बलानें तूं सर्व कृत्यें परिपूर्ण करीत असतोस.

१४ हे इन्द्र ! यः नवीयसीं मन्द्रां गिरं ते अजीजनत्, प्रत्नां ऋतस्य पिप्युषीं चिकित्विन् मनसं धियं

[८८४]- हे इन्द्रा ! जो तुझी नवी व आनंद वाढवणारी स्तुति करतो, त्याला पुरातन कालापासून यज्ञाला वाढवणारी व मनाला पवित्र करणारी बुद्धि तूं देतोस.

१५ हे इन्द्र ! **यत् द्यावः शतं स्युः, यत् भूमिः शतं स्युः, सहस्रं सूर्याः त्वा न अनु अष्ट, जातं न अनु अष्ट, रोदसी न अनु अष्ट** [८६२]- हे इन्द्रा ! जरी शंभर द्युलोक झाले, शंभर भूमी बनल्या, हजारों सूर्य झाले, तरी ते तुझी बरोबरी करूं शकत नाहींत, उत्पन्न झालेलें जगत् तुझी बरोबरी करूं शकत नाहीं, द्यावापृथिवीहि तुझी बरोबरी करूं शकत नाहींत.

इन्द्राचे असे गुण या अध्यायांत वर्णिले आहेत. ते उपासकांनी आपल्या अंगीं आणण्याचा यत्न करावा. जे आपल्या अंगीं येण्यासारखे नसतील, त्यांचा भावार्थ मनांत आणून जेवढा भाव आपल्या अंगीं आणतां येईल, तेवढा भाव अंगीं आणावा.

इन्द्राचें रक्षण

इन्द्र सर्वांचें संरक्षण करीत असतो म्हणून म्हटलें आहे —

१ हे मघवन् ! वज्रिन् ! **गोमति व्रजे चित्राभिः ऊतिभिः नः अव** [८६३]-हे धनवान् वज्रधारी इन्द्रा ! गाईंनीं भरलेल्या गोठ्यांमध्यें अनेक संरक्षणाच्या साधनांनीं आमचें संरक्षण कर. म्हणजे आम्हाला गाईंनीं भरलेला गोठा मिळूं दे व आमचें संरक्षणही होऊं दे.

२ हे अद्रिवः ! **ते वृषणं पृक्षु सासहिं लोककृत्नुं मदं गृणीमसि** [८८०]- हे वज्रधारी इन्द्रा ! तुझ्या बलशाली, युद्धांमध्यें शत्रूंचा पराभव करणाऱ्या, लोकांचें हित करणाऱ्या अशा उत्साहाची आम्ही प्रशंसा करतों. इन्द्राचा उत्साह लोकांचें हित करणारा आहे.

३ **ते तत् अद्याचित् पूर्वथा उक्थिनः अनुस्तुवन्ति** [८८२]- तुझ्या त्या शौर्याची पूर्वींप्रमाणें आजही स्तोते स्तुति करतात.

इन्द्र धन देतो

इन्द्र स्तुति करणाऱ्यांना धन देतो, याविषयीं पुढील मंत्रभाग पाहण्यासारखे आहेत —

१ हे धृष्णो ! **सहस्रिणं वाजं आदर्षि** [८६६]- हे शूरवीर इन्द्रा ! आम्हांला सहस्र प्रकारचें बल अथवा धन तूं देतोस.

२ हे मघवन् विचर्षण ! **धृषत् पिशंगरूपं गोमन्तं वाजं मक्षु ईमहे** [८६६]- हे धनवान् ज्ञानी इन्द्रा ! शत्रूंचा पराभव करणारें, सोन्यासारखें चमकणारें, गाईंसह असणारें धन लवकर प्राप्त व्हावें असें आम्ही इच्छीत आहों.

३ **तरणिः युजा पुरन्ध्या वाजं सिषासति** [८६७] दुःखांतून पार होणारा वीर तुझ्या योग्य विशाल बुद्धीनें बल अथवा धन प्राप्त करण्याची इच्छा करतो.

४ **पुरु-हूतं इन्द्रं आनमे** [८६७]- पुष्कळांनीं स्तविलेल्या इन्द्राला मी आपल्या सहाय्यासाठीं बोलावतों.

५ **द्रविणोदेषु दु-स्तुतिः न शस्यते** [८६८]- धनाचें दान देणाऱ्या इन्द्रादिकांची निंदा करणें योग्य समजलें जात नाहीं. कारण त्यांची उत्तम स्तुति होणेंच योग्य आहे.

६ हे मघवन् ! **पार्ये दिवि मावते देष्णं तुभ्यं सुशक्तिः इत्** [८६८]- हे इन्द्रा ! दुःखांतून पार करणाऱ्या दिव्य यज्ञामध्यें माझ्यासारख्याला जें देण्यास योग्य असें धन आहे, तें तुझ्या पासून उत्तम शक्तिमान्च प्राप्त करूं शकतो. शक्तिमान् यज्ञ करतो व धन मिळवतो.

इन्द्र उपासकांना धन देतो, याविषयीं असे मंत्रभाग मनन करण्यासारखे आहेत. यज्ञामध्यें इन्द्रादि देवतांना सोमरस देण्यांत येतो. याविषयींचे मंत्रभाग आतां पहा—

इन्द्राला सोम देतात

यज्ञामध्यें सोमाचा रस काढतात व तो इन्द्रादि देवांना देतात. याविषयींचे मंत्रभाग पहा—

१ **इन्दुः इन्द्राय पवते इति देवासः अब्रुवन्** [८७३] – सोम इन्द्राला देतात असें देवांनीं सांगितलें आहे.

२ **रयीणां पतिः दिवेदिवे इन्द्रस्य सखा सोमः सहस्रधारः पवते** [८७४]- ऐश्वर्यांचा पालक, प्रतिदिवशीं इन्द्राचा मित्र सोम हजारों धारांनीं गाळला जात आहे.

३ **वाचस्पतिः विश्वस्य ओजसः ईशानः मखस्यते** [८७३]- वाणींचा पति सर्व सामर्थ्यांचा ईश्वर असा हा सोम यज्ञामध्यें सन्मानाला योग्य होत आहे. यज्ञामध्यें इन्द्राला पिण्यास दिला जातो हा सोमाचा सन्मानच आहे.

४ **बृहता मदेन इन्द्रं आविश** [८६१]- हे सोमा ! तूं मोठ्या आनंदानें इन्द्रामध्यें प्रवेश कर.

५ **वाचं वर्धय पुरन्धिं जनय** [८६१]- वक्तृत्वशक्ति वाढव व उत्तम बुद्धि निर्माण कर. सोम प्याल्यावर जो उत्साह वाढतो, त्यानें उत्तम वक्तृत्व करतां येतें व बुद्धिहि उत्तम तीव्र होते.

याप्रमाणें इन्द्रादि देवता सोमरस पितात व मोठीं शौर्याचीं कामें करतात. पहा—

६ संवृक्त-धृष्णुं महामहिव्रतं मदं शतं पुरः रुरुक्षाणिं [८३७]- ज्यानें आपले शत्रु पराभूत केले आहेत, जो मोठमोठीं कार्यें करतो, जो शत्रूंचे शंभर किल्ले तोडतो, त्या सोमरसाच्या आनंदाची आम्ही प्रशंसा करीत आहों. सोमरस प्याल्यानें असे पराक्रम करण्याची शक्ति अंगीं येते.

याप्रमाणें इन्द्राचें वर्णन या अध्यायांत आहे. आता अग्निचें वर्णन पहा —

अग्निचें वर्णन

या अध्यायामध्यें अग्निचे हे गुण वर्णन केले आहेत —

१ कविः [८४४]- ज्ञानी, दूरदर्शी.

२ युवा [८४४]- तरुण.

३ गृहपतिः [८४४]- घराचें रक्षण करणारा.

४ पावकः [८४६]- पवित्र करणारा.

५ प्राविता [८४५]- उत्तम रीतिनें रक्षण करणारा.

६ मघवा [८७९]- धनवान्.

७ द्युम्नी [८७९]- तेजस्वी.

८ मंहिष्ठः [८७८]- महान्, थोर, मोठा.

९ ऋतावन् [८७८]- सत्यपालक, यज्ञ संपादक, सत्कर्म करणारा.

१० बृहत् [८७८]- मोठा, थोर.

११ शुक्रशोचिः [८७८]- शुद्ध प्रकाशमान्.

१२ हव्यवाट् [८४४]- हवन केलेले पदार्थ देवतांकडे पोंचवणारा.

१३ दूतः [८४५]- देवांना हवि पोंचवणारा दूत.

१४ वीरवत् यशः आ वंसते [८७९]- पुत्रपौत्रांसह मिळणारें यश प्राप्त करून देतो.

१५ अस्य भवीयसी सुमतिः नः अद्य वाजेभिः कुवित् आगमत् [८७९]- याची अनुकूल असलेली उत्तम बुद्धि आमच्याजवळ आज अन्नांसह येवो.

याप्रमाणें अग्निचे गुण या अध्यायांत वर्णन केले आहेत, हे गुण जर मनुष्यांनीं धारण केले, तर त्यांची योग्यता केवढी तरी मोठी होईल.

सूर्य

सूर्याचें वर्णन या अध्यायाच्या एका मंत्रानें केलें आहे, तें आतां पहा —

१ उषसः पृश्निः अग्रियः अरूरुचत् [८७७]- उषःकालानंतर सूर्य प्रथम चमकूं लागतो.

*

२ उक्षा भुवनेषु मिमेति [८७७]- वृष्टि करणारा तो सर्व भुवनांमध्यें जलाचें सिंचन करतो.

३ मायाविनः अस्य मायया ममिरे [८७७]- कुशल देवता याच्या सामर्थ्यानें जगतामध्यें निर्मिति करतात.

उषःकाल होतांच उठावें आणि दुसऱ्यांना प्रकाश दाखवून मार्ग दाखवणें, दुसऱ्यांना जल म्हणजे जीवन देऊन नाना प्रकारचीं कौशल्याचीं कार्यें करण्यास उत्तेजन देणें हे बोध या वचनांत आले आहेत.

मरुत्

मरुत् देवतेचें वर्णन या अध्यायामध्यें असें केलेलें आहे—

१ मन्दू समानवर्चसा अविभ्युषा इन्द्रेण संजग्मानः संदृक्षसे [८५०]- स्वभावानें आनंदी व सारखे तेजस्वी मरुत् निर्भय इन्द्राबरोबर राहत असल्यामुळें उत्तम तेजस्वी दिसतात.

२ वीळु चित् आरुजत्नुभिः वह्निभिः मरुद्भिः गुहाचित् उस्रियाः अन्वविन्दः [८५२]- सुदृढ किल्ले तोडणाऱ्या तेजस्वी मरुतांनीं गुहेमध्ये लपविलेल्या गाई प्राप्त केल्या.

मरुत् असे तेजस्वी व लढवय्ये वीर आहेत, शत्रूचे किल्ले तोडतात व आपला अधिकार त्यांवर बसवितात. तशी वीरता लोकांनीं आपणांमध्यें वाढवावी.

इन्द्र व अग्नि

१ ता इन्द्राग्नी, ययोः पुराकृतं विश्वं पप्ने [८५३] – ते सुप्रसिद्ध इन्द्र व अग्नि आहेत, कीं ज्यांनीं पूर्वी केलेलीं सर्व सत्कृत्यें वाखाणलीं जात आहेत.

२ न मर्धतः [८५३]– ते कधींहि दुःख देत नाहींत.

३ ता उग्रा मृधः विघनिना इन्द्राग्नी हवामहे [८५४]– ते उग्रवीर शत्रूंचा नाश करणारे इन्द्र व अग्नि आहेत, त्यांना आम्ही आमच्या सहाय्यासाठीं बोलवीत आहों.

४ ईदृशे नः मृडातः [८५४]– हे आम्हांला सुख देत असतात.

५ हे इन्द्राग्नी ! आर्या वृत्राणि हथः [८५५]- हे इन्द्र व अग्नि हो ! तुम्ही आर्यांचें कल्याण करण्यासाठीं शत्रूंचा संहार करतां.

६ हे सत्पती ! दासानि विश्वा द्विषः अप हथः

[८५५]- हे सत्य पालकांनों ! तुम्ही नीचांना तसेंच सर्व शत्रूंना ठार मारा व दूर करा.

याप्रमाणें उपासकांनीं उत्तम वीर बनावें व जे शत्रू असतील त्यांना दूर करावें.

पाण्याची उत्पत्ति

मित्र व वरुण हे दोन वायु आहेत, ते पाणी उत्पन्न करतात असें मंत्रांत सांगितलें आहे.

१ मित्रं हुवे पूतदक्षं वरुणं च रिशादसम् । धियं घृताचीं साधन्ता [८४७]- (पूत-दक्षं मित्रं) पवित्र बल असलेल्या मित्राला व (रिशादसं वरुणं) हिंसक शत्रूंचा नाश करणाऱ्या वरुणाला (हुवे) मी बोलावीत आहें. हे दोघे (घृताचीं धियं साधन्ता) पाणी उत्पन्न करण्याचें कर्म सिद्ध करतात.

२ रिश-अदस् वरुणः [८४७]- गंजवून खाणारा, (आक्सीजन वायु) जो गंज उत्पन्न करतो.

३ पूतदक्षः मित्रः [८४७]- पवित्र बलवान् वायु (हाइड्रोजन).

यांत " रिश्, रिष्ट (रस्ट Rust) धातु गंजवण्याचा भाव दाखवीत आहे, इतकेंच नव्हे तर इंग्रजी " रस्ट " शब्द संस्कृत " रिश् " शीं निकटपणानें संबंधित आहे.

४ मित्रावरुणौ ऋतावृधौ [८४८]- मित्र व वरुण हे पाणी वाढवणारे आहेत.

५ कवी तुविजाता उरुक्षया मित्रावरुणा नः अपसं बलं दधाते [८४९]- (क-वी) " क " म्हणजे जल 'वी' उत्पन्न करणारे (तुवि-जाता) अनेक कार्यांत उपयोगी (उरु-क्षया) अनेक ठिकाणीं राहणारे मित्र व वरुण हे वायु आमचें कार्य व बल यांचें पोषण करतात.

या मंत्रांत हे दोन वायु (घृत-अर्चीं धियं साधन्ता) पाणी उत्पन्न करण्याचें कार्य करतात असें स्पष्ट म्हटलेलें आहे.

सोमाचे गुण

आतां या अध्यायामध्यें सोमाचें वर्णन केलें आहे. त्यांत सोमाचे हे गुण वर्णिले आहेत, ते आतां पहा—

१ वाजी [८३०]- बलवान्, अन्नवान्.

२ राजा [८३३]- राज्य चालवणारा, तेजस्वी, चमकणारा.

३ सहः जुवः [८३४]- बल वाढवणारा.

४ संवृक्त-धृष्णुः [८३७]- ज्यानें आपले सर्व सामर्थ्यवान् शत्रु पराभूत करून नष्ट केले आहेत.

५ महा-मांहि-व्रतः [८३७]- अनेक मोठमोठी कार्य करणारा.

६ सुक्रतुः [८३८]- उत्तम कर्म करणारा.

७ विश्वस्य ओजसः ईशानः [८३८]- सर्व सामर्थ्यांचा स्वामी.

८ शतं पुरः रुरुक्षी [८३७]- शत्रूंचीं शेंकडों नगरें तोडणारा.

९ पुरु दुरिता विघ्नन् [८३१]- पुष्कळ घातक शत्रूंना-पाप कर्म करणाऱ्यांचा नाश करणारा.

१० तपोः पवित्रं [८७६]- शत्रूला ताप देणाऱ्याचा पवित्र भाग.

११ विचर्षणिः [८३९]- विशेष ज्ञानी।

१२ अभिष्टिकृत् [८३९]- इष्ट आहे तें करणारा.

१३ ऋतस्य गोपा [८४०]- सत्याचा रक्षक, यज्ञाचा रक्षक.

१४ हितः [८४३]- कल्याण करणारा.

१५ देवः [८५७]- प्रकाशमान्, दिव्य.

१६ वाचः-पतिः [८७४]- वक्तृत्व करणारा, वाणीचा स्वामी.

१७ ब्रह्मणः-पतिः [८७५]- ज्ञानाचा पति, ज्ञानी.

१८ विचक्षणः [८५८]- विशेष ज्ञानी, चतुर।

१९ हर्यतः [८५८]- पूज्य, वंदनीय.

२० पुरंधिं जनय [८६१]- विशाल बुद्धि प्रकट करणारा.

२१ इन्द्रियं हिन्वानः [८३९]- आपल्या इंद्रिय शक्तिंना उत्साहित करणारा.

२२ मनीषिभिः मृज्यमानः [८४१]- ज्ञानी ज्याची शुद्धता करतात. ज्ञान्यांकडून शुद्ध होणारा.

२३ विश्वस्मै स्वर्दृशे साधारणः [८४०]- सर्व स्वयंदर्शी ज्ञान्यांमध्यें साधारणतया असणारा.

२४ वाजिभिः द्युतानः [८४३]- बलवानांनीं प्रकाशित केलेला, बलवान् ज्याला पुढें आणतात असा.

२५ मत्सरः मदच्युतः [८५६]- आनंद वाढवणारा.

२६ पवमानः [८५७]- शुद्ध होणारा.

२७ बृहत् ऋतं हिन्वानः [८५७]- मोठें सत्य प्रकट करणारा, मोठ्या यज्ञाला करणारा.

२८ दिवः पदे [illegible]] [illegible] स्थाना-मध्ये राहणारा.

[illegible] [illegible] [illegible]

[illegible] [illegible] [illegible]

[illegible] [illegible] अग्म [illegible] ८]- धनाजवळ पोचवणारा.

हे सोमाचे [illegible] सोमरस [illegible] त्याला [illegible] स्थान [illegible] [illegible] त्यामुळे वीर पुरुष [illegible] [illegible] [illegible] दाखवतात, यामुळे हे गुण सोमाचे [illegible] [illegible] आलंकारिक वर्णन केले जाते. हे [illegible] इतके वरील गुण सोमाचे कसे आहेत, ते [illegible].

सोम [illegible] [illegible]णतो

सोम स्वर्गातून [illegible] [illegible] असे [illegible] वर्णन वेदांमध्ये अनेक ठिकाणी [illegible] आहे. हिमालयाचे उंच शिखर ' मौजवान् ' पर्वत आहे. त्या शिखरावर उंच ठिकाणी सोम उगवतो व तेथून तो आणतात. स्वर्ग हा हिमालयाच्या वर आहे तेथून सोम आणला जातो म्हणून तो स्वर्गातून आणला जातो असें म्हणतात. हें वर्णन [illegible] पहा—

१ रयिः अभि अयत् राजानं त्वा दिवः अध्वर्यो सुपर्णः आभरत् [८३८]- धनाजवळ पोचवणाऱ्या तेजस्वी राजाप्रमाणें तुला द्युलोकामधून-स्वर्गामधून [illegible] आणणाऱ्या गरुडानें आणलें.

२ ऋतस्य गोपां, विश्वक्षें स्वर्दृशे साधारणं विः भरत् [८४०]- यज्ञाचें संरक्षण करणाऱ्या सर्व स्वर्ग पाहणाऱ्या देवांना साधारण रीतिनें प्राप्त होणाऱ्या सोमाला पक्ष्यानें आणलें.

३ तपोः पवित्रं दिवः पदे वितत [८७६]- शत्रूला ताप देणाऱ्या सोमाचें तें पवित्र अंग स्वर्गलोकांत पसरलेलें असतें.

४ दिवः पृष्ठं तेजसा अधिरोहन्ति [८७६]- स्वर्गाच्या पृष्ठभागावर सोम आपल्या तेजानें वाढतो-सोमवल्ली चमकत असते.

याप्रमाणें सोम स्वर्गातून आणला जातो व यज्ञामध्यें त्याचा रस काढतात व त्याचें हवन केलें जातें.

सोम धन देतो

सोम धन देतो याविषयीं पुढीलमंत्र पाहण्यासारखे आहेत—

१ इन्दवः विश्वानि सौभगा अभि [८[illegible]]- सर्व सौभाग्यें सोम देतो.

२ महो दिवः सधस्थेषु, नृम्णानि बिभ्रतं, चारुं तं त्वा सुकृत्यया ईमहे [८३६]- महान् द्युलोकाच्या अनेक स्थानांमध्यें असणाऱ्या, अनेक प्रकारच्या धनांना धारण करणाऱ्या [illegible] [illegible]-सोमाला- उत्तम यज्ञाच्या द्वारानें प्राप्त करतो.

सोम गाई व घोडे देतो

१ वाजिनः पुरु पुरित्ता [illegible], तोकाय [illegible] गाः अवींः [illegible] कृण्वन्तः [८३१]- बल वाढवणारे, पुष्कळ [illegible] [illegible] हे सोमरस, आमच्या पुत्रांसाठीं उत्तम गाई व घोडे मिळावे यासाठीं स्वतःच मार्ग करीत आहेत.

२ हे इन्दो ! शातग्विनं गवां पोषं, स्वश्व्यं भगं [illegible] आवह [८३५]- हे सोमा ! शेंकडो गाईंना पुष्ट, गाईंचें पोषण करणारें, सुंदर घोड्यांनी युक्त असा भाग्याचें दान आम्हांला दे.

याप्रमाणें सोम गाई व घोडे देतो असें वर्णन आहे. सोमाचा यज्ञांत उपयोग होतो व यज्ञामध्यें गाई व घोडे देतात, ते सोमच आणतो, अशी ही आलंकारिक वर्णनाची भाषा आहे.

सोम पाण्यांत मिसळतात

सोम कुटून त्याचा रस काढतात व त्यांत पाणी मिसळून तो गाळतात, याविषयींचें वर्णन पुढील मंत्रांत आहे—

१ हे सोम ! परिषिच्यमानः, नः स्वस्ति पवस्व [८६१]- हे सोमा ! पात्रांतील पाण्यांत मिसळला जाऊन, आमच्या कल्याणासाठीं गाळला जा.

२ हे सोम ! रायः चतुरः समुद्रान् अस्मभ्यं विश्वतः आ पवस्व [८७१]- हे सोमा ! धनाच्या चारही समुद्रांना आमच्यासाठीं चारही बाजूंनी आणून गाळला जा. पाण्यांत मिसळला जाऊन गाळून सोम शुद्ध होतो.

सोमरस गाळला जातो

सोमरस पाण्यांत मिसळला जातो व नंतर तो गाळला जातो. याविषयींचे मंत्र पहा—

१ एते आशवः इन्दवः तिरः पवित्रं असृग्रम् [८३०] – हे शीघ्रगति करणारे सोमरस गाळणीमधून गाळले जात आहेत.

२ हे इन्दो ! मनीषिभिः मृज्यमानः इषे धारया पवस्व [८४१]- हे सोमा ! बुद्धिमान् याजकांनीं शुद्ध केला जाणारा तूं आमच्या अन्नासाठीं गाळला जा.

३ वाजिभिः द्युतानः देववीतये पुनानः हितः इन्द्रस्य निष्कृतं याहि [८४३]- अनेक शक्तींनीं तेजस्वी दिसणारा, देवांना देण्यासाठीं गाळला जाऊन हित करणारा सोम इन्द्राच्या स्थानाजवळ जा.

४ मनीषिणः आयवः, मत्सरासः मदच्युतः सोमासः समुद्रस्य अधि विष्टपे, मद्यं मदं अभि पवन्ते [८५६]- बुद्धिमान् याजक, आनंद वाढवणाऱ्या उत्साही सोमरसांना, जलपात्राच्या वर असणाऱ्या गाळणीमधून, आनंद व उत्साह वाढवण्यासाठीं गाळतात.

५ पवमानः देवः राजा बृहद् ऋतं समुद्रं ऊर्मिणा तरत्, हिन्वानः ऋतं बृहत् मित्रस्य वरुणस्य धर्मणा प्र अर्ष [८५७]– शुद्ध केला जाणारा तेजस्वी सोम राजा, मोठ्या जलमय कलशामध्यें धारेनें प्रेरणा करणारा तो सत्य सोमरस मित्र व वरुण यांनीं स्वीकारावा म्हणून गाळला जात आहे.

६ नृभिः येमाणः हर्यतः विचक्षणः देवः राजा समुद्र्यः [८५८]– ऋत्विजांकडून तयार होणारा वर्णनीय व ज्ञानवाढवणारा तो दिव्य सोमराजा जलांमध्यें मिसळून गाळला जात आहे.

७ सुतः सोमः पूयमानः ऋच्यते, त्रिष्टुभः अर्काः सोमं संनवन्ते [८६०]– सोमरस गाळून पाण्यांत पडत असतो, त्यावेळीं त्रिष्टुप छंदाचे मंत्र सोमाचें वर्णन करीत असतात.

याप्रमाणें सोमरस पाण्यांत मिसळून ते गाळले जातात असें वर्णन आहे. ते रस गाळले गेल्यानंतर त्यांत दूध मिसळून ते पिण्यासाठीं उपयोगांत येतात.

सोमरस गाईंच्या दुधांत मिसळतात

याविषयीं पुढील मंत्र पहा—

१ रुचा गाः अभीहि [८४१]– तेजस्वी सोमरस गाईच्या दुधाशीं मिसळला जातो.

२ धेनवः गावः सोमं वावशानाः [८६०]– दुधाळ गाई सोमाची इच्छा करतात. आपलें दूध सोमरसांत मिसळलें जावें असें इच्छितात.

३ आशिरं सृजानः पुनानः [८४२]– दूधाशीं मिसळून सोम गाळला जातो.

४ धेनवः गावः मिमन्ति, हरिः कनिक्रदत् एति [८६९]– दुधाळ गाई हंबरडतात व हिरव्या रंगाचा सोम शब्द करीत कलशामध्यें जातो.

याप्रमाणें सोमाविषयीं या अध्यायांत वर्णन आलें आहे. या वर्णनामध्यें जे देवतांचे गुण वर्णिले आहेत ते साधकांनीं आपल्या अंगीं आणावे व वाढवावे आणि देवत्व प्राप्त करून यशस्वी व्हावें.

सुभाषितें

१ विश्वानि सौभगा अभि असृग्रं [८३०]– सर्व सौभाग्यें - धनें - प्राप्त करण्यासाठीं ते पुढें जात आहेत.

२ वाजिनः, पुरु दुरिता विघ्नन्तः, तोकाय सु-गाः अर्वतः त्मना कृण्वन्तः [८३१]– बल वाढवणारे व पुष्कळ पापांचा नाश करणारे, पुत्रपौत्रांसाठीं उत्तम गाई व घोडे मिळावे यासाठीं स्वतः यत्न करीत असतात.

३ गवे अस्मभ्यं वरिवः इडां कृण्वन्तः [८३२]– गाईंसाठीं व आमच्यासाठीं श्रेष्ठ धन व अन्न प्राप्त करण्याचा यत्न करतात.

४ मनौ अधि पवमानः राजा मेधाभिः अन्तरिक्षेण यातवे ईयते [८३३]– मनुष्यांमध्यें शुद्ध होणारा राजा आपल्या बुद्धिनीं उच्च मार्गानें जाण्याची खटपट करतो.

५ देववीतये सहः वर्चसे नः आ भर [८३४]–देवत्व प्राप्त करण्यासाठीं शत्रूचा पराभव करण्याची शक्ति आमचें तेज वाढवण्यासाठीं आम्हांला भरपूर दे.

६ शतग्विनं गवां पोषं, स्वश्व्यं भगत्तिं नः आ आवह [८३५]– शंभर गायींनीं युक्त, गाईंचें पोषण करणारें, उत्तम घोडे आहेत असें भाग्य आम्हांला दे.

७ नृम्णानि बिभ्रतं चारुं त्वा सुकृत्यया ईमहे [८३६]– अनेक धनांचें धारण करणाऱ्या सुंदर अशा तुला उत्तम कृत्यें करून प्राप्त करण्याची इच्छा आम्ही करीत आहों.

८ संवृक्त-धृष्णुं उक्थ्यं महामहिव्रतं मदं शतं पुरः रुरुक्षणिं [८३७]– ज्यानें आपले प्रभावी शत्रू नष्ट केले आहेत, अशा प्रशंसनीय व अनेक महत्त्वाचीं कार्यें करणाऱ्या, आनंद देणाऱ्या, शत्रूच्या शेंकडों नगरांना तोडणाऱ्या वीराजवळ आम्ही धन मागत आहों.

९ हे सुक्रतो ! रयिः अभि अयत् त्वा राजानं अव्यथी आभरत् [८३८]– हे उत्तम कर्में करणाऱ्या ! धनाजवळ जाणाऱ्या तुझ्यासारख्या राजाला कर्तव्य कर्में करण्यांत दुःख न मानणाऱ्यांनीं आणलें आहे.

१० विचर्षणिः, अभिष्टिकृत्, इन्द्रियं हिन्वानः, ज्यायः महित्वं आनशे [८३९]– विशेष ज्ञानी व इष्ट सिद्ध करणारा, आपली शक्ति चालवून विशेष श्रेष्ठत्व प्राप्त करतो.

११ ऋतस्य गोपां, विश्वस्मै स्वर्दृशे साधारणं भरत् [८४०]– सत्याचें संरक्षण करणारें, स्वतःच्या दृष्टीनें पाहणाऱ्या सर्वांमध्यें साधारणपणें असणारें, तेज आम्हांला प्राप्त होवो.

१२ जनाय वरिवः ऊर्जं कृधि [८४२]– लोकांमध्यें श्रेष्ठ बल उत्पन्न कर.

१३ वाजिभिः द्युतानः पुनानः हितः [८४३]–

१४ कविः गृहपतिः युवा अग्निः समिध्यते [८४४] – दूरदर्शी गृहाचा स्वामी तरुण अग्रणी प्रज्वलित केला जात आहे. अधिक तेजस्वी केला जात आहे.

१५ यः सपर्यति तस्य प्राविता भव [८४५]– जो तुझी पूजा करतो त्याचा रक्षक तूं हो.

१६ यः अग्निं आ विवासाति तस्मै मृडय [८४६]– जो अग्निची अराधना करतो त्याला सुखी कर.

१७ पूत-दक्षं मित्रं रिशादसं वरुणं हुवे, घृताचीं धियं साधन्ता [८४७]– पवित्र बलानें युक्त मित्र व शत्रूंना दूर करणारा वरुण, यांना मी सहाय्यासाठीं बोलावतों. ते घृत अर्थात् पौष्टिक पदार्थ प्राप्त करणारी बुद्धि वाढवतात. पवित्र कार्य करणारें बल व शत्रूंना दूर करण्याचें सामर्थ्य जेथें असतें तेथें पोषण करणारे पदार्थ असतात

१८ ऋतावृधौ ऋतस्पृशौ [illegible] बृहन्तं क्रतुं आशाथे [८४८]– सत्य वाढवणारे, सत्याला स्पर्श करणारे सत्यानेंच मोठें कार्य करतात.

१९ कवी नृविजाता उरुक्षया अपसं [illegible] दधाते [८४९]– दूरदर्शी, अनेक कार्यें करणारें, अनेक स्थानांमध्यें राहणारे सत्कार्य करण्याचें बल धारण करतात.

२० मन्दू समान वर्चसा अविभ्युषा संजग्मानः [८५०]– आनंदित व तेजस्वी वीर न भिणाऱ्या वीरा-बरोबर मिळाले आहेत.

२१ वीडु आ रुजत्नुभिः वह्निभिः गुहा उस्रियाः अन्वविन्दः [८५२]– शत्रूंचा सुदृढ किल्ला तोडूं शकणाऱ्या तेजस्वी वीरांनीं शत्रूंनीं चोरून नेलेल्या व गुहेंत लपवून ठेव-लेल्या गाई प्राप्त केल्या.

२२ ता पुराकृतं विश्वं इत् पन्ने, न मर्धतः [८५३] – त्यांनीं पूर्वीं केलेल्या सर्व पराक्रमांची स्तुति होत आहे, ते दुःख देत नाहींत.

२३ ता उग्रा विघनिना हवामहे]८५४]– ते उग्रवीर शत्रूंचा नाश करणारे आहेत, त्यांना आमच्या सहाय्यासाठीं बोलावीत आहों.

२४ ईदृशे नः मृडातः [८५४]– अशा या संग्रामा-मध्यें आम्हांला ते सुखी करतात.

२५ आर्या वृत्राणि हथः [८५५]– आर्यांच्या कल्याणा-साठीं तुम्ही शत्रूंना मारा.

२६ सत्पती दासानि हथः [८५५]– तुम्ही सज्जनांचें पालन करणारे आहांत, यासाठीं नीचांना मारून दूर करा.

२७ विश्वाः द्विषः अप हथः [८५५]– सर्व द्वेष करणाऱ्या शत्रूंचा नाश करा.

२८ वाचं वर्धय [८६१]– वाङ्मयाचें संवर्धन कर.

२९ पुरन्धिं जनय [८६१]– पुष्कळ श्रेष्ठ कर्में करूं शकणारी बुद्धि उत्पन्न कर.

३० हे वृषन् ! वृष्ण्या महिना शवसा विश्वा आ पप्राथ [८६३]– हे बलवान् वीर ! सामर्थ्ययुक्त महात्म्यानें व बलानें तूं सर्व कार्यें पूर्ण करतोस.

३१ हे शविष्ठ मघवन् वज्रिन् ! गोमति व्रजे चित्राभिः ऊतिभिः नः अव [८६३]– हे बलवान् धनवान् वज्रधारी वीरा ! गाईंनीं भरलेल्या गोशाळेमध्यें विलक्षण प्रकारच्या संरक्षणाच्या साधनांनीं आमचें रक्षण कर.

३२ हे विचर्षणे मघवन् ! धृषत् पिशंगरूपं गोमन्तं वाजं मक्षु ईमहे [८६६]– हे ज्ञानी व धनवान् इन्द्रा ! तुझ्याकडून शत्रूंना नाश करणारें, सोन्यासारखें चमकणारें, गाईसह असणारें, धन लवकर प्राप्त व्हावें असें आम्ही इच्छीत आहों.

३३ तरणिः युजा पुरन्ध्या वाजं सिषासति [८६७] – दुःखांतून तरून जाणारा [illegible] बुद्धिनें, बल प्राप्त करण्याची इच्छा करतो.

३४ द्रविणोदेषु दु-[illegible] [८६८]– धनाचें दान करणाऱ्यांची [illegible]

३५ रयिः न नशत् [८६८]– [illegible] धन मिळत नाहीं.

३६ मावते देष्णं तुभ्यं सुशिप्रिः [८६८]– [illegible] साररूयाला देण्याजोगें धन तुझ्याकडून शक्तिशालीहि प्राप्त करूं शकतो.

३७ धेनवः गावः मिमन्ति [८६९]– दुधाळ गाई दुध काढण्याच्या वेळीं हंबरतात.

३८ ब्रह्मीः ऋतस्य यह्वीः मातरः दिवः शिशुं मर्ज-यन्ति [८७०]– ज्ञानी सत्याच्या थोर माता दिवसा मुलाला न्हाऊं घालतात.

३९ रायः अस्मभ्यं विश्वतः आ पवस्व [८७१]– धन आम्हांला चारही बाजूंनीं आणून दे.

४० वाचः-पतिः विश्वस्य ओजसः ईशानः मख-स्यते [८७३]– वाणीचा स्वामी - विद्वान् - सर्व सामर्थ्यांचा स्वामी असला तर तो पूज्य होतो.

४१ हे ब्रह्मणस्पते ! ते पवित्रं विततं [८७५]- हे ज्ञानाच्या पति - हे ज्ञान्या ! तुझें पवित्र कार्य सर्वत्र पसरलेलें आहे.

४२ अतप्ततनूः आमः तत् न अश्नुते [८७५]- ज्यानें तप केलें नाहीं त्याला तें सुख मिळत नाहीं.

४३ शृतासः इत् तत् समाशत [८७५]- जे परिपक्व होतात त्यांना तें सुख मिळतें.

४४ तपोः पवित्रं दिवः पदे विततं [८७६]- शत्रूला ताप देणाऱ्या वीराचें तें पवित्र स्थान द्युलोकामध्यें पसरलें आहे.

४५ दिवः पृष्ठं तेजसा अधिरोहन्ति [८७६]- ते (शत्रूला ताप देणारे) द्युलोकाच्या पाठावर आपल्या तेजानें चढून बसतात.

४६ उषसः पृश्निः अग्रियः अरूरुचत् [८७७]- उषःकालानंतर सूर्य अग्रेसर होऊन चमकूं लागतो.

४७ उक्षा भुवनेषु मिमेति वाजयुः [८७७]- मेघ. भुवनांमध्यें पाऊस पाडतो व अन्न उत्पन्न करतो.

४८ मंहिष्ठाय ऋतावने बृहते शुक्रशोचिषे प्रगायत [८७८]- श्रेष्ठ सत्यनिष्ठ मोठा तेजस्वी असेल त्याचें वर्णन करा.

४९ मघवा वीरवत् यशः आ वंसते [८७९]- धनवान् इन्द्र पुत्रपौत्रांसह असलेलें यश देतो.

५० ते वृषणं पृक्षु सासहिं लोककृत्नुं मदं गृणीमसि [८८०]- तुझ्या बलवर्धक, युद्धांमध्यें शत्रूचा पराभव करणाऱ्या, लोकांचें हित करणाऱ्या उत्साहाची आम्ही प्रशंसा करतो.

५१ ते तत् पूर्वथा अद्य उक्थिनः अनुस्तुवन्ति [८८२]- तुझ्या त्या बलाचें पूर्वीप्रमाणें आजहि स्तोते स्तवन करतात.

५२ सुवीर्यस्य गोमतः रायः पूर्धि [८८३]- उत्तम श्रेष्ठ पुत्रानें युक्त व गाईंनी युक्त अशा धनानें आम्हांला परिपूर्ण कर.

५३ ऋतस्य पिप्युषीं चिकित्विन् मनसं धियं [८८४]- सत्याचें पोषण करणारी, मनाला परिशुद्ध करणारी शुभ बुद्धि मला दे.

५४ अस्य पुरूणि पौंस्या सिषासन्तः वनामहे [८८५]- याच्या पुष्कळच पराक्रमाचीं कृत्यें भक्तिनें आम्ही वर्णन करीत आहों.

चतुर्थाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
८३०	९।६२।१	जमदग्निर्भार्गवः	पवमानः सोमः	गायत्री
८३१	९।६२।२	जमदग्निर्भार्गवः	,,	,,
८३२	९।६२।३	जमदग्निर्भार्गवः	,,	,,
८३३	९।६५।१६	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
८३४	९।६५।१८	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
८३५	९।६५।१७	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
८३६	९।४८।१	कविर्भार्गवः	,,	,,
८३७	९।४८।२	कविर्भार्गवः	,,	,,
८३८	९।४८।३	कविर्भार्गवः	,,	,,
८३९	९।४८।५	कविर्भार्गवः	,,	,,
८४०	९।४८।४	कविर्भार्गवः	,,	,,
८४१	९।६४।१३	कश्यपो मारीचः	,,	,,
८४२	९।६४।१४	कश्यपो मारीचः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
८४३	९।६५।१५	कश्यपो मारीचः	पवमानः सोमः	गायत्री
		(२)		
८४४	१।१२।६	मेधातिथिः काण्वः	अग्निः	,,
८४५	१।१२।८	मेधातिथिः काण्वः	,,	,,
८४६	१।१२।९	मेधातिथिः काण्वः	,,	,,
८४७	१।२।७	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	मित्रावरुणौ	,,
८४८	१।२।८	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
८४९	१।२।९	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
८५०	१।६।७	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	इन्द्रः	,,
८५१	१।६।४	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	मरुतः	,,
८५२	१।६।५	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	इन्द्रः	,,
८५३	६।६०।४	भरद्वाजो बार्हस्पत्यः	इन्द्राग्नी	,,
८५४	६।६०।५	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
८५५	६।६०।६	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
		(३)		
८५६	९।१०७।१४	सप्तर्षयः	पवमानः सोमः	प्रगाथः (विषमा बृहती, समा सतो बृहती)
८५७	९।१०७।१५	सप्तर्षयः	,,	
८५८	९।१०७।१६	सप्तर्षयः	,,	द्विपदा विराट्
८५९	९।९७।३४	पराशरः शाक्त्यः	,,	त्रिष्टुप्
८६०	९।९७।३५	पराशरः शाक्त्यः	,,	,,
८६१	९।९७।३६	पराशरः शाक्त्यः	,,	,,
		(४)		
८६२	८।७०।५	पुरुहन्मा आंगिरसः	इन्द्रः	प्रगाथः (विषमा बृहती, समा सतो बृहती)
८६३	८।७०।६	पुरुहन्मा आंगिरसः	,,	,,
८६४	८।३३।१	मेध्यातिथिः काण्वः	,,	बृहती
८६५	८।३३।२	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
८६६	८।३३।३	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
८६७	७।३२।२०	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	प्रगाथः (विषमा बृहती, समा सतो बृहती)
८६८	७।३२।२१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
		(५)		
८६९	९।३३।४	त्रित आप्त्यः	पवमानः सोमः	गायत्री
८७०	९।३३।२	त्रित आप्त्यः	,,	,,
८७१	९।३३।६	त्रित आप्त्यः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
८७२	९।१०१।४	ययातिर्नाहुषः	पवमानः सोमः	अनुष्टुप्
८७३	९।१०१।५	ययातिर्नाहुषः	,,	,,
८७४	९।१०१।६	ययातिर्नाहुषः	,,	,,
८७५	९।८३।१	पवित्र आंगिरसः	,,	जगती
८७६	९।८३।२	पवित्र आंगिरसः	,,	,,
८७७	९।८३।३	पवित्र आंगिरसः	,,	,,

(६)

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
८७८	८।१०३।८	सोभरिः काण्वः	अग्निः	प्रगाथः (विषमा ककुप्, समा सतो बृहती)
८७९	८।१०३।९	सोभरिः काण्वः	,,	,,
८८०	८।१४।४	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	इन्द्रः	उष्णिक्
८८१	८।१४।५	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	,,	,,
८८२	८।१४।६	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	,,	,,
८८३	८।९५।४	तिरश्चीरांगिरसौ	,,	अनुष्टुप्
८८४	८।९५।५	तिरश्चीरांगिरसौ	,,	,,
८८५	८।९५।६	तिरश्चीरांगिरसौ	,,	,,

अथ पञ्चमोऽध्यायः ।

अथ तृतीयप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ ३ ॥

[१]

(१-२२) १ अकृष्टा माषाः; २ अमहीयुरांगिरसः; ३ मेध्यातिथिः काण्वः; ४, १२ बृहन्मतिरांगिरसः; ५ [illegible] हणिर्जमदग्निर्भार्गवो वा; ६ सुतंभर आत्रेयः; ७ गृत्समदः शौनकः; ८, २१ गोतमो राहूगणः; ९, १३ वसिष्ठो मैत्रावरुणिः; १० दृढच्युत आगस्त्यः; ११ सप्तर्षयः (भरद्वाजो बार्हस्पत्यः, २ कश्यपो मारीचः; ३ गोतमो राहूगणः; ४ अत्रिर्भौमः; ५ विश्वामित्रो गाथिनः, ६ जमदग्निर्भार्गवः, ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः) १४ रेभः काश्यपः; १५ पुरुहन्मा आंगिरसः; १६ असितः काश्यपो देवलो वा; १७ (१) शक्तिर्वासिष्ठः, १७ (२) उरुरांगिरसः; १८ अग्निश्चाक्षुषः; १९ प्रतर्दनो दैवोदासिः; २० प्रयोगो भार्गवः; २१ पावकोऽग्निर्बार्हस्पत्यो वा, गृहपतियविष्ठौ सहसः पुत्रावन्यतरो वा; २२ ॥ १-५; १०-१२, १६-१९ पवमानः सोमः; ६, २० अग्निः; ७ मित्रावरुणौ; ८, १३-१५, २१ इन्द्रः; ९ इन्द्राग्नी; २२ ॥ १, २ जगती; ३-५, ७-१०, १२, १९, २० गायत्री; ११, १५ प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती); १३ विराट्; १४ (१) अति जगती, १४ (२-३) उपरिष्टाद् बृहती; १७ काकुभः प्रगाथः= (विषमा ककुप समा सतोबृहती); १८ उष्णिक्; १९ त्रिष्टुप्; २१ अनुष्टुप् ॥

८८६ प्र त आश्विनीः पवमान धेनवो दिव्या असृग्रन्पयसा धरीमणि ।
प्रान्तरिक्षात्स्थाविरीस्ते असृक्षत ये त्वा मृजन्त्यृषिषाण वेधसः ॥ १ ॥ (ऋ. ९।८६।४)

८८७ उभयतः पवमानस्य रश्मयो ध्रुवस्य सतः परि यन्ति केतवः ।
यदी पवित्रे अधि मृज्यते हरिः सत्ता नि योनौ कलशेषु सीदति ॥ २ ॥ (ऋ. ९।८६।६)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[८८६] हे (पवमान) शुद्ध होत असलेल्या सोमा ! (ते) तुझ्या, (आश्विनीः धेनवः) वेगवान् दुधाळ गाई (दिव्याः) दिव्य [illegible] (पयसा) आपल्या दुधानें (धरीमणि) कलशामध्यें (प्र असृग्रन्) पोंचत आहेत. (ऋषिषाण) [illegible] सोमरसा ! (ये वेधसः त्वा मृजन्ति) जे ज्ञानी ऋत्विज तुला गाळतात. (ते) ऋत्विज (अन्तरिक्षात्) वरच्या भांड्यांतून (स्थाविरीः असृक्षत) स्थिर धारांनीं खालील कलशामध्यें तुला पोंचवतात. ॥ १ ॥

[८८७] (पवमानस्य ध्रुवस्य सतः) गाळल्या जाणाऱ्या स्थिर सोमाचीं (केतवः उभयतः परियन्ति) किरणें दोनही बाजूंनीं पसरत असतात. (यदि) जेव्हां (पवित्रे हरिः अधिमृज्यते) गाळणींतून हिरव्या रंगाचा सोम गाळला जातो, त्यावेळीं (सत्ता) स्थिर राहूं इच्छणारा सोम (योनौ कलशेषु निषीदति) कलशरूपी पात्रामध्यें जाऊन राहतो. ॥ २ ॥

*

८८८ विश्वा धामानि विश्वचक्ष ऋभ्वसः प्रभोष्टे सतः परि यन्ति केतवः ।
व्यानशी पवसे सोम धर्मणा पतिर्विश्वस्य भुवनस्य राजसि ॥ ३ ॥ १ (वी) ॥
[धा० ३९ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ९।८६।५)

८८९ पवमानो अजीजनद्दिवश्चित्रं न तन्यतुम् । ज्योतिर्वैश्वानरं बृहत् ॥ १ ॥ (ऋ. ९।६१।१६)

८९० पवमान रसस्तव मदो राजन्नदुच्छुनः । वि वारमव्यमर्षति ॥ २ ॥ (ऋ. ९।६१।१७)

८९१ पवमानस्य ते रसो दक्षो वि राजति द्युमान् । ज्योतिर्विश्वं स्वर्दृशे ॥ ३ ॥ २ (पा) ॥
[धा० २० । उ० १ । स्व० २] (ऋ. ९।६१।१८)

८९२ प्र यद्गावो न भूर्णयस्त्वेषा अयासो अक्रमुः । घ्नन्तः कृष्णामप त्वचम् ॥ १ ॥ (ऋ. ९।४१।१)

८९३ सुवितस्य वनामहेऽति सेतुं दुराय्यम् । साह्याम दस्युमव्रतम् ॥ २ ॥ (ऋ. ९।४१।२)

८९४ शृण्वे वृष्टेरिव स्वनः पवमानस्य शुष्मिणः । चरन्ति विद्युतो दिवि ॥ ३ ॥ (ऋ. ९।४१।३)

८९५ आ पवस्व महीमिषं गोमदिन्दो हिरण्यवत् । अश्ववत्सोम वीरवत् ॥ ४ ॥ (ऋ. ९।४१।४)

---

[८८८] हे (विश्वचक्षः) सर्वत्र पाहणाऱ्या सोमा ! (प्रभोः सतः ते) प्रभुत्व करूं इच्छिणाऱ्या तुझीं (ऋभ्वसः केतवः) मोठीं किरणें (विश्वा धामानि परियन्ति) सर्व स्थानांमध्यें पोंचतात, तेव्हां हे (सोम) सोमा ! (व्यानशी) व्यापक स्वभावाचा तूं (धर्मणा पवसे) आपल्या स्वभावधर्मानें शुद्ध होत असतोस व (विश्वस्य भुवनस्य पतिः) सर्व भुवनांचा स्वामी तूं (राजसि) चमकत असतोस. ॥ ३ ॥

[८८९] (पवमानः) पवित्र केला जाणारा सोम (बृहत् वैश्वानरं ज्योतिः) मोठ्या वैश्वानर नामक तेजाला (दिवः चित्रं तन्यतुं न) द्युलोकांतील विलक्षण तेजस्वी विजेप्रमाणें (अजीजनत्) उत्पन्न करतो - तो चमकतो. ॥ १ ॥

[८९०] हे (राजन् पवमान) तेजस्वी शुद्ध होणाऱ्या सोमा ! (तव मदः) तुझा उत्साह वाढवणारा (अ-दुच्छुनः रसः) राक्षसांना न मिळणारा रस (अव्यं वारं वि अर्षति) मेंढीच्या केसांच्या छाननींतून खालील भांड्यांत जात असतो. ॥ २ ॥

[८९१] हे सोमा ! (पवमानस्य ते) शुद्ध केल्या जाणाऱ्या अशा तुझा (दक्षः द्युमान् रसः) बलवान् व तेजस्वी रस (विराजति) चमकत आहे. (विश्वं स्वः ज्योतिः दृशे) सर्व व्यापक आपलें तेज येथें दिसत आहे. ॥ ३ ॥

[८९२] (गावः न) गाईंप्रमाणें (भूर्णयः) शीघ्रगामी (त्वेषाः अयासः) तेजस्वी गतिमान् (यत्) जो सोम (कृष्णां त्वचं अपघ्नन्तः) काळी त्वचा दूर करीत (प्र अक्रमुः) भांड्यांत पडतो त्याची प्रशंसा होते. ॥ १ ॥

[८९३] (सु-वितस्य) सुखदायी सोमाच्या (दुराय्यं अति सेतुं) दुष्प्राप्य बंधनाला दूर करण्यासाठीं आम्ही (वनामहे) प्रार्थना करतों. (अ-व्रतं दस्युं साह्याम) सत्कर्म न करणाऱ्या शत्रूचा आम्ही पराभव करूं. ॥ २ ॥

[८९४] (वृष्टेः स्वनः इव) वृष्टिच्या शब्दासारखा (पवमानस्य) शुद्ध केल्या जाणाऱ्या सोमरसाचा शब्द (श्रूयते) ऐकूं येतो. यावेळीं (शुष्मिणः विद्युतः) बलशाली सोमाचीं किरणें (दिवि चरन्ति) आकाशांत संचार करतात. ॥ ३ ॥

[८९५] हे (इन्दो सोम) रसरूप सोमा ! तूं (महीं इषं) पुष्कळ अन्न, (गोमत्) गाईंसह (हिरण्यवत्) सोन्यासह (अश्ववत्) घोड्यांसह व (वीरवत्) पुत्रपौत्रांसह आम्हांला (आ पवस्व) दे. ॥ ४ ॥

८९६ पवस्व विश्वचर्षण आ मही रोदसी पृण । उषाः सूर्यो न रश्मिभिः ॥ ५ ॥ (ऋ. ९।४१।५)

८९७ परि णः शर्मयन्त्या धारया सोम विश्वतः । सरा रसेव विष्टपम् ॥ ६ ॥ ३ (मी) ॥

[धा० १९ । उ० ४ । स्व० ४] (ऋ. ९।४१।६)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

८९८ आशुरर्ष बृहन्मते परि प्रियेण धाम्ना । यत्रा देवा इति ब्रुवन् ॥ १ ॥ (ऋ. ९।३९।१)

८९९ परिष्कृण्वन्ननिष्कृतं जनाय यातयन्निषः । वृष्टिं दिवः परि स्रव ॥ २ ॥ (ऋ ९।३९।२)

९०० अयꣳस यो दिवस्परि रघुयामा पवित्र आ । सिन्धोरूर्मा व्यक्षरत् ॥ ३ ॥ (ऋ. ९।३९।४)

९०१ सुत एति पवित्र आ त्विषिं दधान ओजसा । विचक्षाणो विरोचयन् ॥४॥ (ऋ. ९।३९।३)

९०२ आविवासन्परावतो अथो अर्वावतः सुतः । इन्द्राय सिच्यते मधु ॥ ५ ॥ (ऋ. ९।३९।५)

९०३ समीचीना अनूषत हरिꣳहिन्वन्त्यद्रिभिः । इन्दुमिन्द्राय पीतये ॥ ६ ॥ ४ (जी) ॥

[धा० ३२ । उ० ३ । स्व० ४] (ऋ. ९।३९।६)

---

[८९६] हे (विश्व-चर्षणे) सर्वांना पाहणाऱ्या सोमा ! (पवस्व) शुद्ध हो व आपल्या या रसानें (मही रोदसी) या मोठ्या द्यावापृथिवीला (आ पृण) भरून टाक. (सूर्यः रश्मिभिः उषाः न) ज्याप्रमाणें सूर्य आपल्या किरणांनीं उषःकालानंतर सर्व विश्वाला भरून टाकतो त्याप्रमाणें. ॥ ५ ॥

[८९७] हे (सोम) सोमा ! (नः) आमच्यासाठीं (शर्मयन्त्या धारया) सुखदायक धारेनें (विष्टपं) या भूलोकाला (रसा इव) जलांनीं ज्याप्रमाणें (विश्वतः परि सर) चारही बाजूंनीं घेरतात, त्याप्रमाणें घेरून टाक. ॥ ६ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[८९८] हे (बृहन्मते) बुद्धिमान् सोमा ! (प्रियेण धाम्ना) आपल्या प्रिय शरीरानें - आपल्या धारेनें (आशु परि अर्ष) लवकर ये (यत्र देवाः) जेथें देव राहतात (इति ब्रुवन्) असें म्हणतात, त्या यज्ञामध्यें ये. ॥ १ ॥

[८९९] (अनिष्कृतं परिष्कृण्वन्) संस्कार न केलेल्या स्थानाला संस्कारयुक्त करून, (जनाय इषः यातयन्) लोकांना अन्न देण्यासाठीं (दिवः वृष्टिं परिस्रव) द्युलोकांतून वृष्टी कर. ॥ २ ॥

[९००] (यः दिवः परि रघुयामा) जो द्युलोकाच्या वर सावकाश चालतो, (सः अयं) तो हा सोम (पवित्रे आ) गाळणींतून गळत आहे व (सिन्धोः ऊर्मा वि अक्षरत्) तो पाण्याच्या लाटांमध्यें टपकत आहे. ॥ ३ ॥

[९०१] (सुतः त्विषिं दधानः) सोमरस तेजस्विता धारण करून (विचक्षाणः विरोचयन्) सर्वांचें निरीक्षण करून सर्वांना प्रकाशमान् करीत (ओजसा) वेगानें (पवित्रे आ एति) गाळणीमधून लवकर गाळला जात आहे. ॥ ४ ॥

[९०२] (सुतः) रस काढल्यानंतर (परावतः अथो अर्वावतः) दुरून व जवळून (आ विवासन्) शुद्ध करून (इन्द्राय) इन्द्राला (मधु) हा मधुर रस (सिच्यते) दिला जात आहे. ॥ ५ ॥

[९०३] (समीचीनाः) स्तुति करणारे एकत्र जमून (अनूषत) स्तुति करतात. (इन्द्राय पीतये) इन्द्राला प्यावयास देण्यासाठीं (हरिं इन्दुं) हिरव्या रंगाच्या सोमाला (अद्रिभिः हिन्वन्ति) दगडांनीं कुटतात. ॥ ६ ॥

९०४ हिन्वन्ति सूरमुस्रयः स्वसारो जामयस्पतिम् । महामिन्दुं महीयुवः ॥ १ ॥ (ऋ. ९।६५।१)

९०५ पवमान रुचारुचा देव देवेभ्यः सुतः । विश्वा वसून्या विश ॥ २ ॥ (ऋ. ९।६५।२)

९०६ आ पवमान सुष्टुतिं वृष्टिं देवेभ्यो दुवः । इषे पवस्व संयतम् ॥ ३ ॥ ५ (इ) ॥

[धा० ११ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ९।६५।३)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

९०७ जनस्य गोपा अजनिष्ट जागृविरग्निः सुदक्षः सुविताय नव्यसे ।
घृतप्रतीको बृहता दिविस्पृशा द्युमद्वि भाति भरतेभ्यः शुचिः ॥ १ ॥ (ऋ. ५।११।१)

९०८ त्वामग्ने अङ्गिरसो गुहा हितमन्वविन्दं च्छिश्रियाणं वनेवने ।
स जायसे मथ्यमानः सहो महत्त्वामाहुः सहसस्पुत्रमाङ्गिरः ॥ २ ॥ (ऋ. ५।११।६)

[९०४] (उस्रयः जामयः स्वसारः) सर्वत्र गमन करणाऱ्या परस्पर बंधूंप्रमाणें आवडणाऱ्या बहिणी - अंगुली (मही-युवः) मोठें कार्य - सोमरस काढण्याचें कार्य करणाऱ्या (सूरं पतिं) श्रेष्ठ स्वामी अशा (महां इन्दुं) मोठ्या सोमरसाला (हिन्वन्ति) काढतात - सोमाचा रस काढतात. ॥ १ ॥

[९०५] हे (रुचा रुचा) तेजानें (देव पवमान) चमकणाऱ्या शुद्ध होणाऱ्या सोमा ! (देवेभ्यः सुतः) देवांना देण्यासाठीं काढलेला तूं (विश्वा वसूनि आ विश) सर्व धनें आम्हांला दे. सर्व धनांमध्यें तूं प्रविष्ट होऊन रहा. ॥ २ ॥

[९०६] हे (पवमान) शुद्ध होणाऱ्या सोमा ! (सुष्टुतिं वृष्टिं) उत्तम स्तुति करण्याजोगी वृष्टि (देवेभ्यः दुवः) देवतांपासून प्राप्त होणाऱ्या आशीर्वादाप्रमाणें (आ पवस्व) आमच्याजवळ पाठव (इषे संयतं) अन्न प्राप्त व्हावें साम[illegible] कर. ॥ ५ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[९०७] (जनस्य गोपा) लोकांचा रक्षक (जागृविः सुदक्षः) जागृत व उत्तम दक्ष (अग्निः) अग्नि (नव्यसे सुविताय अजनिष्ट) नवीन तऱ्हेनें जनांचे कल्याण व्हावें यासाठीं प्रकट झाला आहे. त्यानंतर (घृतप्रतीकः) तुपानें प्रज्वलित केलेला (बृहता दिविस्पृशा) मोठ्या द्युलोकाला स्पर्श करणाऱ्या तेजाने युक्त (शुचिः) शुद्धता करणारा अग्नि (भरतेभ्यः) यज्ञ करणाऱ्या लोकांसाठीं (द्युमत् विभाति) प्रकाशमान् होऊन चमकत आहे. ॥ १ ॥

[९०८] हे (अग्ने) अग्निदेवा ! (अंगिरसः) अंगिरस ऋषींनीं (गुहा-हितं) गुहेमध्यें राहिलेल्या (वने वने शिश्रियाणं) प्रत्येक वृक्षाच्या आश्रयानें राहणाऱ्या (त्वां अन्वविन्दन्) तुज अग्निला प्राप्त केलें. (महत् सहः सः) मोठ्या बलानें युक्त असलेला तूं अग्नि (मथ्यमानः जायसे) मंथन करून प्रकट होतोस. हे (अंगिरः) अंगांमध्यें राहणाऱ्या अग्ने ! (त्वां सहसः पुत्रं आहुः) तुला सामर्थ्याचा पुत्र असें म्हणतात. ॥ २ ॥

९०९ यज्ञस्य केतुं प्रथमं पुरोहितमग्निं नरस्त्रिषधस्थे समिन्धते ।
इन्द्रेण देवैः सरथꣳस बर्हिषि सीदन्नि होता यजथाय सुक्रतुः ॥ ३ ॥ ६ (वे) ॥
[धा० ३० । उ० नास्ति । स्व० ७] (ऋ. ५।११।२)

९१० अयं वां मित्रावरुणा सुतः सोम ऋतावृधा । ममेदिह श्रुतꣳहवम् ॥ १ ॥ (ऋ. २।४१।४)

९११ राजानावनभिद्रुहा ध्रुवे सदस्युत्तमे । सहस्रस्थूण आशाते ॥ २ ॥ (ऋ. २।४१।५)

९१२ ता सम्राजा घृतासुती आदित्या दानुनस्पती । सचेते अनवह्वरम् ॥ ३ ॥ ७ (पि) ॥
[धा० १९ । उ० १ । स्व० ३] (ऋ. २।४१।६)

९१३ इन्द्रो दधीचो अस्थभिर्वृत्राण्यप्रतिष्कुतः । जघान नवतीर्नव ॥ १ ॥ (ऋ. १।८४।१३)

९१४ इच्छन्नश्वस्य यच्छिरः पर्वतेष्वपश्रितम् । तद्विदच्छर्यणावति ॥ २ ॥ (ऋ. १।८४।१४)

९१५ अत्राह गोरमन्वत नाम त्वष्टुरपीच्यम् । इत्था चन्द्रमसो गृहे ॥ ३ ॥ ८ (ठी) ॥
[धा० १३ । उ० २ । स्व० ४] (ऋ. १।८४।१५)

---

[९०९] (नरः) ऋत्विज (यज्ञस्य केतुं) यज्ञाचा ध्वज (पुरोहितं) पुढें ठेवलेला (देवैः सरथं) देवांसह एका रथावर बसणाऱ्या (प्रथमं अग्निं) मुख्य अग्निला (त्रि-सधस्थे) तीन ठिकाणीं (प्रथमं) प्रथम (सं इन्धते) नीट रीतिनें प्रज्वलित करतात. त्यानंतर (सुक्रतुः होता सः) उत्तम कर्म करणारा, देवांसाठीं हवन करणारा तो अग्नि (बर्हिषि) आपल्या स्थानामध्यें (यजथाय) यज्ञ करण्यासाठीं (निषीदत्) बसतो. ॥ ३ ॥

[९१०] हे (ऋतावृधा मित्रावरुणा) यज्ञाला वाढवणारे मित्र व वरुण हो ! (वां) तुम्हांसाठीं (अयं सोमः (सुतः) हा सोमरस काढून व गाळून ठेवला आहे. यासाठीं (इह) येथें या यज्ञामध्यें (मम इत् हवं श्रुतं) माझीच प्रार्थना ऐका. ॥ १ ॥

[९११] हे (राजानौ अनभिद्रुहा) तेजस्वी व द्रोह न करणारे मित्र व वरुण हो ! (ध्रुवे उत्तमे सहस्र-स्थूणे सदसि) स्थिर, श्रेष्ठ व हजार खांब असलेल्या या यज्ञमण्डपामध्यें (आशाते) येऊन बसा. ॥ २ ॥

[९१२] (सम्राजा) सम्राट् (घृतासुती) घृतरूपी अन्न खाणारे (आदित्या) अदितिचे पुत्र (दानुनः पतिः) [illegible] स्वामी असे (ता) ते मित्र व वरुण (अनवह्वरं) कुटिल नसणाऱ्या यज्ञकर्त्याचें (सचेते) सहाय्य करतात. ॥३॥

[[illegible]] (अ-प्रति-ष्कुतः) ज्याला विरोधी नाहींत अशा (इन्द्रः) इन्द्रानें (दधीचः अस्थभिः) दधीचीच्या [illegible] ([illegible] नव) नव्याण्णव (वृत्राणि जघान) घेरणाऱ्या शत्रूंना मारलें. ॥ १ ॥

[[illegible]] (पर्वतेषु अपश्रितं) पर्वतांमध्यें असलेलें (अश्वस्य यत् शिरः) घोड्याचें जें शिर आहे, तें (इच्छन्) प्राप्त करावें असें इंद्र इच्छित होता, तें त्यानें (शर्यणावति तत् विदत्) शर्यणावती सरोवराजवळ मिळविलें व त्यानें असुरांचा संहार केला. ॥ २ ॥

[९१५] (अत्राह) येथें (गोः चन्द्रमसः गृहे) गमन करणाऱ्या चन्द्रम्याच्या मंडलांत (त्वष्टुः अपीच्यं नाम) सूर्याचीं गुप्त किरणें रात्रीच्यावेळीं (इत्था अमन्वत) याप्रमाणें प्रकाशित होतात असें मानण्यांत येतें. ॥ ३ ॥

९१६ इयं वामस्य मन्मन इन्द्राग्नी पूर्व्यस्तुतिः । अभ्राद्वृष्टिरिवाजनि ॥ १ ॥ (ऋ. ७।९४।१)

९१७ शृणुतं जरितुर्हवमिन्द्राग्नी वनतं गिरः । ईशाना पिप्यतं धियः ॥ २ ॥ (ऋ. ७।९४।२)

९१८ मा पापत्वाय नो नरेन्द्राग्नी माभिशस्तये । मा नो रीरधतं निदे ॥ ३ ॥ ९ (चा) ॥

[धा० १२ । उ० १ । स्व० २] (ऋ. ७।९४।३)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

९१९ पवस्व दक्षसाधनो देवेभ्यः पीतये हरे । मरुद्भ्यो वायवे मदः ॥ १ ॥ (ऋ. ९।२५।१)

९२० सं देवैः शोभते वृषा कविर्योनावधि प्रियः । पवमानो अदाभ्यः ॥ २ ॥ (ऋ. ९।२५।३)

९२१ पवमान धिया हितो३ऽभि योनिं कनिक्रदत् । धर्मणा वायुमारुहः ॥ ३ ॥ १० (ख) ॥

[धा० ११ । उ० २ । स्व० १] (ऋ. ९।२५।२)

९२२ तवाहꣳसोम रारण सख्य इन्दो दिवेदिवे ।
पुरूणि बभ्रो नि चरन्ति मामव परिधीꣳरति ताꣳइहि ॥ १ ॥ (ऋ. ९।१०७।१९)

---

[९१६] हे (इन्द्राग्नी) इन्द्र व अग्नि ! (इयं वां पूर्व्य-स्तुतिः) ही तुम्हां दोघांची अपूर्व स्तुति (अस्य मन्मनः) या माननीय विद्वानांपासून (अभ्रात् वृष्टिः इव) मेघांतून वृष्टी होते त्याप्रमाणें (अजनि) उत्पन्न झाली आहे. ॥ १ ॥

[९१७] हे (इन्द्राग्नी) इन्द्र व अग्नि ! (जरितुः हवं शृणुतं) स्तोत्याची प्रार्थना तुम्ही ऐका. (गिरः वनतं) त्यांची स्तुति ऐकून घ्या. (ईशाना) स्वामी असलेले तुम्ही दोघे (धियः पिप्यतं) त्यांच्या कर्मांला योग्य फळें द्या. ॥ २ ॥

[९१८] (नरा इन्द्राग्नी) हे नेतारूपी इन्द्र व अग्नि ! (नः) आम्हांला (पापत्वाय मा रीरधतं) पाप करण्यासाठीं लाऊं नका. (अभिशस्तये मा) हिंसा करण्यासाठीं लाऊं नका. (निदे नः मा) व निंदेसाठीं आम्हांला लाऊं नका. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[९१९] हे (हरे) हिरव्या रंगाच्या सोमा ! (दक्ष-साधनः मदः) बल वाढवणारा व उत्साह वाढवणारा तूं (देवेभ्यः मरुद्भ्यः) देवांसाठीं, मरुतांसाठीं व (वायवे) वायुसाठीं (पीतये पवस्व) पिण्याला देण्याकरितां शुद्ध हो. ॥ १ ॥

[९२०] (वृषा कविः) बलवर्धक ज्ञानी (योनौ अधि) आपल्या स्थानावर (पवमानः प्रियः) शुद्ध झाल्यामुळें प्रिय आणि (अदाभ्यः) न दबला जाणारा सोम (देवैः संशोभते) देवांसह उत्तम शोभतो. ॥ २ ॥

[९२१] हे (पवमान) शुद्ध होणाऱ्या सोमा ! (धिया हितः) बुद्धिनें नीट ठेवलेला तूं (कनिक्रदत्) शब्द करीत (योनिं अभि आरुहः) कलशामध्यें पडत आहेस. (धर्मणा वायुं आरुहः) आपल्या गुणांनीं वायुला प्राप्त कर. ॥ ३ ॥

[९२२] हे (इन्दो) सोमा ! (तव सख्ये) तुझ्या मैत्रीसाठीं (अहं दिवे दिवे रारण) मी प्रतिदिवशीं यत्न करतों आहें. हे (बभ्रो) कान्तिमान् सोमा ! (पुरूणि मां) पुष्कळ राक्षस मला (नि अव चरन्ति) त्रास देत आहेत. (तान् परिधीन् अति इहि) त्या शत्रूंना नष्ट कर. ॥ १ ॥

९२३ तवाहं नक्तमुत सोम ते दिवा दुहानो बभ्र ऊधनि ।
घृणा तपन्तमति सूर्यं परः शकुना इव पप्तिम ॥ २ ॥ ११ (ति) ॥
[धा० १४ । उ० १ । स्व० ३] (ऋ. ९।१०७।२०)

९२४ पुनानो अक्रमीदभि विश्वा मृधो विचर्षणिः । शुम्भन्ति विप्रं धीतिभिः ॥ १ ॥
(ऋ. ९।४०।१)

९२५ आ योनिमरुणो रुहद्गमदिन्द्रो वृषा सुतम् । ध्रुवे सदसि सीदतु ॥ २ ॥ (ऋ. ९।४०।२)

९२६ नू नो रयिं महामिन्दोऽस्मभ्यं सोम विश्वतः । आ पवस्व सहस्रिणम् ॥ ३ ॥ १२ (चा) ॥
[धा० १२ । उ० १९ । स्व० २) (ऋ. ९।४०।३)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

[५]

९२७ पिबा सोममिन्द्र मदन्तु त्वा यं ते सुषाव हर्यश्वाद्रिः । सोतुर्बाहुभ्यां सुयतो नार्वा ॥ १ ॥
(ऋ. ७।२२।१)

९२८ यस्ते मदो युज्यश्चारुरस्ति येन वृत्राणि हर्यश्व हंसि । स त्वामिन्द्र प्रभूवसो ममत्तु ॥ २ ॥
(ऋ. ७।२२।२)

---

[९२३] हे (बभ्रो) भुऱ्या वर्णाच्या सोमा ! (उत नक्तं उत दिवा) रात्रौ अथवा दिवसा (तव ऊधनि अहं) तुझ्याजवळच मी आहें, (ते घृणा) स्वतःच्या तेजानें (तपन्तं) चमकत असणाऱ्या तुला (परं सूर्यं) दूर असलेल्या सूर्याला (शकुनाः इव अति पप्तिम) जसे पक्षी पाहतात, त्याप्रमाणें आम्ही पाहत आहों. ॥ २ ॥

[९२४] (पुनानः विचर्षणिः) पवित्र होणारा विशेष निरीक्षक सोम (विश्वा मृधः अक्रमीत्) सर्व शत्रूंचा पराभव करीत असतो, त्या (विप्रं) ज्ञानी सोमाला ऋत्विज (धीतिभिः शुम्भन्ति) स्तुतींनीं सुशोभित करतात. ॥ १ ॥

[९२५] (अरुणः) अरुण रंगाचा सोम (योनिं आरुहत्) कलशामध्यें प्रवेश करीत आहे. नंतर (वृषा इन्द्रः) बलवान् इन्द्र (सुतं गमत्) त्या सोमरसाजवळ जातो आणि (ध्रुवे सदसि) स्थिर स्थानामध्यें (सीदतु) राहतो. ॥ २ ॥

[९२६] (इन्दो सोम) हे सोमरसा ! (अस्मभ्यं) आम्हांला (नु) लवकर (महां सहस्रिणं रयिं) मोठें सहस्रोंप्रकारचें धन (विश्वतः आ पवस्व) चहूंकडून आणून दे. ॥ ३ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५] पञ्चमः खण्डः ।

[९२७] हे (इन्द्र) इन्द्रा ! (सोमं पिब) सोमरस पी. (त्वा मदन्तु) तुला हे रस आनंद देवोत. हे (हर्यश्व) घोडे पाळणाऱ्या इन्द्रा ! (ते) तुझ्यासाठीं (सोतुः बाहुभ्यां) सोमरस काढणाऱ्याच्या बाहूंनीं (सु-यतः अद्रिः) धरलेला पाषाण (यं सुषाव) ज्या रसाला काढतो (अर्वा न) घोड्याप्रमाणें तो तुला आनंद देवो. ॥ १ ॥

[९२८] हे (हर्यश्व इन्द्र) हरिनामक घोडे जवळ बाळगणाऱ्या इन्द्रा ! (ते युज्यः) तुझ्या योग्य (चारुः मदः) उत्तम आनंद देणारा (यः अस्ति) जो सोम आहे, (येन वृत्राणि) ज्याच्या उत्साहानें तूं वृत्रांना (हंसि) ठार मारतोस. हे (प्रभूवसो) पुष्कळ धनवाना ! (सः त्वा ममत्तु) तो सोम तुला आनंद देवो. ॥ २ ॥

९२९ बोधा सु मे मघवन्वाचमेमां यां ते वसिष्ठो अर्चति प्रशस्तिम् ।
इमा ब्रह्म सधमादे जुषस्व ॥ ३ ॥ १३ (चा) ॥
[धा० १२ । उ० १ । स्व० २] (ऋ. ७।२२।३)

९३० विश्वाः पृतना अभिभूतरं नरः सजूस्ततक्षुरिन्द्रं जजनुश्च राजसे ।
क्रत्वे वरे स्थेमन्यामुरीमुतोग्रमोजिष्ठं तरसं तरस्विनम् ॥ १ ॥ (ऋ. ८।९७।१०)

९३१ नेमिं नमन्ति चक्षसा मेषं विप्रा अभिस्वरे ।
सुदीतयो वो अद्रुहोऽपि कर्णे तरस्विनः समृक्वभिः ॥ २ ॥ (ऋ. ८।९७।१२)

९३२ समु रेभासो अस्वरन्निन्द्रꣳ सोमस्य पीतये ।
स्वः पतिर्यदी वृधे धृतव्रतो ह्योजसा समूतिभिः ॥ ३ ॥ १४ (ची) ॥
[धा० २२ । उ० १ स्व० ४] (ऋ. ८।९७।११)

९३३ यो राजा चर्षणीनां याता रथेभिरध्रिगुः ।
विश्वासां तरुता पृतनानां ज्येष्ठं यो वृत्रहा गृणे ॥ १ ॥ (ऋ. ८।७०।१)

---

[९२९] हे (मघवन्) धनवान् इन्द्रा ! (यां प्रशस्तिं वाचं) तुझ्या ज्या स्तुतिरूप वाणीनें (वसिष्ठः अर्चति) वसिष्ठ तुझी अर्चना करतो (इमां सु आ बोध) त्या स्तुतिला तूं नीट रीतिनें समजून घे व (इमा ब्रह्म) या ज्ञानाला, या अन्नाला (सधमादे जुषस्व) यज्ञशालेमध्यें तूं सेवन कर. ॥ ३ ॥

[९३०] (विश्वाः पृतनाः) सगळ्या संग्रामांमध्यें शत्रूला (अभिभूतरं इन्द्रं) पराभूत करणाऱ्या इन्द्राची (नरः सजूः ततक्षुः) सर्व लोक मिळून स्तुति करतात. (राजसे जजनुः) इन्द्राचें तेज वाढावें यासाठीं स्तोते त्याचें सामर्थ्य वाढवतात. (क्रत्वे वरे स्थेमनि) आपल्या कर्तृत्वानें श्रेष्ठ स्थानांमध्यें राहणाऱ्या (आमुरिं) शत्रूला मारणाऱ्या (उग्रं ओजिष्ठं) वीर व महाबलिष्ठ (तरसं तरस्विनं) श्रेष्ठ व त्वरेनें सर्व कार्यें करणाऱ्या इन्द्राची सर्व स्तुति करतात. ॥ १ ॥

[९३१] (विप्राः अभि स्वरे) ऋत्विज मोठ्या स्वरानें स्तोत्र म्हणतांना (मेषं नेमिं चक्षसा नमन्ति) शक्तिमान् व्यापक इन्द्राला डोळ्यांनीं प्रथम नमस्कार करतात. हे स्तुति करणारे हो ! (सु-दीतय अ-द्रुहः) उत्तम तेजस्वी व द्रोह न करणारे (वः) तुम्ही (अपि) सुद्धां (तरस्विनः) वेगानें (कर्णे) इन्द्राच्या कानांत पोंचेल अशा स्वरानें (ऋक्वभिः सं) ऋचांनीं त्याची स्तुति करा. ॥ २ ॥

[९३२] (रेभासः) स्तुति करणारे ऋत्विज (सोमस्य पीतये) सोमरस पिण्यासाठीं (इन्द्रं उ समस्वरन्) इन्द्राचीच उत्तम रीतिनें मिळून स्तुति गातात. (यत्) जेव्हां (स्वः पतिः) स्वर्गाचा पालक इन्द्र (वृधे) यजमानाला मोठा करूं इच्छितो, त्यावेळीं (धृत-व्रतः) व्रताचें आचरण करणारा इन्द्र (ओजसा ऊतिभिः सं) आपल्या सामर्थ्यानें व आपल्या संरक्षण साधनांनीं (सं) युक्त होतो. ॥ ३ ॥

[९३३] (यः चर्षणीनां राजा) जो लोकांचा राजा आहे (रथेभिः याता) जो रथांतून जाणारा आहे, (अध्रिगुः) जो पुढें जाणारा आहे, (विश्वासां पृतनानां तरुता) जो सर्व शत्रूसेनांपासून तारण करणारा आहे, (यः वृत्रहा) जो शत्रूचा नाश करणारा आहे त्या (ज्येष्ठं गृणे) श्रेष्ठ इन्द्राची मी स्तुति करतों. ॥ १ ॥

९३४ इन्द्रं तं शुम्भ पुरुहन्मन्नवसे यस्य द्विता विधर्तरि ।
हस्तेन वज्रः प्रति धायि दर्शतो महां देवो न सूर्यः ॥ २ ॥ १५ (चि) ॥
[धा० १७ । उ० १ । स्व० ३] (ऋ. ८।७०।२)

॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

[६]

९३५ परि प्रिया दिवः कविर्वयांऽसि नप्त्योर्हितः । स्वानैर्याति कविक्रतुः ॥ १ ॥ (ऋ. ९।९।१)
९३६ स सूनुर्मातरा शुचिर्जातो जाते अरोचयत् । महान्मही ऋतावृधा ॥ २ ॥ (ऋ. ९।९।३)
९३७ प्रप्र क्षयाय पन्यसे जनाय जुष्टो अद्रुहः । वीत्यर्ष पनिष्टये ॥ ३ ॥ १६ (रि) ॥
[धा० ३ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ९।९।२)

९३८ त्वᳲ ह्याऽ३ंऽङ्ग दैव्य पवमान जनिमानि द्युमत्तमः । अमृतत्वाय घोषयन् ॥ १ ॥
(ऋ. ९।१०८।३)

९३९ येना नवग्वा दध्यङ्ङपोर्णुते येन विप्रास आपिरे ।
देवानाᳲ सुम्ने अमृतस्य चारुणो येन श्रवाᳲस्याशत ॥ २ ॥ १७ (पौ) ॥
[धा० ११ । उ० ९ । स्व० नास्ति] (ऋ. ९।१०८।४)

---

[९३४] (पुरुहन्मन्) अनेक शत्रूंना मारणाऱ्या इन्द्राच्या उपासका ! (अवसे तं इन्द्रं शुम्भ) आपल्या रक्षणासाठीं त्या इन्द्राची उपासना कर. (यस्य विधर्तरि) ज्याच्या संरक्षणशक्तीमध्यें (द्विता) दोनही प्रकारच्या शक्ति आहेत, विनाश व अनुग्रह करण्याच्या दोनही शक्ति आहेत, तो इन्द्र (दर्शतः महान् वज्रः) दर्शनीय आणि महान् वज्र (देवः सूर्यः न) तेजस्वी सूर्याप्रमाणें (हस्तेन प्रति धायि) हातानें धारण करतो. ॥ २ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६] षष्ठः खण्डः ।

[९३५] (कविः) ज्ञानी (कविक्रतुः) बुद्धिनें कर्म करणारा (नप्त्योः हितः) फळ्यांवर ठेवलेला (दिवः) द्युलोकांतील (परिप्रिया वयांसि) अति प्रिय पक्षीरूप पाषाणांनीं काढलेला सोमरस (स्वानैः) रस काढणाऱ्या अध्वर्यूंच्याकडून (परि याति) प्राप्त होत असतो. ॥ १ ॥

[८३६] (शुचिः जातः) शुद्ध झालेला (महान् सः) मोठा तो सोमनामक (सूनुः) पुत्र (मही ऋतावृधा जाते मातरा) मोठ्या यज्ञाला वाढवणाऱ्या प्रसिद्ध माता - द्यावापृथिवी - ना (अरोचयत्) प्रकाशित करतो. ॥२॥

[९३७] हे सोमा ! (प्र प्र क्षयाय) तुझ्या निवासासाठीं यत्न करणाऱ्या (अद्रुहः) द्रोह न करणाऱ्या व (पन्यसे जनाय) स्तुति करणाऱ्या मनुष्यासाठीं (वीति) भक्षणाकरितां (जुष्टः) उपयोगांत आणलेला तूं (पनिष्टये अर्ष) स्तुतिला प्राप्त हो. ॥ ३ ॥

[९३८] हे (दैव्य पवमान) दिव्य सोमा ! (द्युमत्तमः त्वं हि) अत्यंत तेजस्वी असा तूं (अङ्ग) लवकर (घोषयन्) घोषणा करून (जनिमानि) आपलीं दिव्य जन्में लक्ष्यांत घेऊन (अमृतत्वाय) अमरपणाला प्राप्त हो. ॥ १ ॥

[९३९] (नव-ग्वा दध्यङ्) नौ गाईंचे पोषण करणारा दध्यङ् ऋषि (येन अपोर्णुते) ज्या सोमानें यज्ञाचें द्वार उघडतो, (विप्रासः येन आपिरे) याजक विप्रांनीं ज्या सोमाच्या योगानें गाई प्राप्त केल्या, (देवानां सुम्ने) देवतांना यज्ञानें सुख प्राप्त झाल्यावर (चारुणः अमृतस्य श्रवांसि) श्रेष्ठ जलाच्या योगानें मिळणाऱ्या अन्नांना (येन आशत) ज्या सोमाच्या द्वाराने यजमान प्राप्त होतात तो तूं सोम देवतांना प्राप्त हो. ॥ २ ॥

९४० सोमः पुनान ऊर्मिणाव्यं वारं वि धावति । अग्रे वाचः पवमानः कनिक्रदत् ॥ १ ॥
(ऋ. ९।१०६।१०)

९४१ धीभिर्मृजन्ति वाजिनं वने क्रीडन्तमत्यविम् । अभि त्रिपृष्ठं मतयः समस्वरन् ॥ २ ॥
(ऋ. ९।१०६।११)

९४२ असर्जि कलशाँ अभि मीढ्वान्त्सप्तिर्न वाजयुः ।
पुनानो वाचं जनयन्नसिष्यदत् ॥ ३ ॥ १८ (फा) ॥
[धा० १० । उ० २ । स्व० २] (ऋ. ९।१०६।१२)

९४३ सोमः पवते जनिता मतीनां जनिता दिवो जनिता पृथिव्याः ।
जनिताग्नेर्जनिता सूर्यस्य जनितेन्द्रस्य जनितोत विष्णोः ॥ १ ॥ (ऋ.९।९६।५)

९४४ ब्रह्मा देवानां पदवीः कवीनामृषिर्विप्राणां महिषो मृगाणाम् ।
श्येनो गृध्राणाँ स्वधितिर्वनानाँ सोमः पवित्रमत्येति रेभन् ॥ २ ॥ (ऋ. ९।९६।६)

---

[९४०] (पुनानः सोमः) शुद्ध केला जाणारा सोम (उर्मिणा) आपल्या धारेनें (अव्यं वारं विधावति) मेंढीच्या गाळणींतून खालीं पडत आहे. (पवमानः) शुद्ध केला जाणारा सोम (वाचः अग्रं कनिक्रदत्) स्तोत्रपाठानंतर शब्द करीत खालच्या भांड्यांत पडत आहे. ॥ १ ॥

[९४१] (वाजिनं) बलवान् (वने क्रीडन्तं) जलामध्यें मिसळला जाणारा (अति अविं) गाळणींतून गाळला जाणारा सोम (धीभिः मृजन्ति) स्तुतिस्तोत्रें म्हणून ऋत्विज शुद्ध करीत आहेत. (त्रिपृष्ठं) तीन भांड्यांत राहणाऱ्या सोमरसाची (मतयः अभि समस्वरन्) स्तोत्रें प्रशंसा करीत आहेत. ॥ २ ॥

[९४२] (वाजयुः) अन्नाशीं युक्त होणारा (मीढ्वान्) व जलांत मिश्रित होणारा सोम (कलशान् अभि असर्जि) कलशांमध्यें पडत आहे. (सप्तिः न) घोडा जसा संग्रामामध्यें जातो त्याप्रमाणें (पुनानः) शुद्ध होणारा सोम (वाचं जनयन्) शब्द करीत (असिष्यदत्) पात्रांमध्यें गाळला जात आहे. ॥ ३ ॥

[९४३] (मतीनां जनिता) स्तुतींना उत्पन्न करणारा, (दिवः जनिता) द्युलोकाला प्रकट करणारा, (पृथिव्याः जनिता) पृथिवीचा जनक (अग्नेः जनिता) अग्निचा जनक (सूर्यस्य जनिता) सूर्याचा जनक, (इन्द्रस्य उत विष्णोः जनिता) इन्द्र व विष्णु यांचा जनक (सोमः पवते) सोम शुद्ध केला जात आहे. ॥ १ ॥

या देवांना यज्ञशाळेंत सोम आणीत असतो, यासाठीं यांचा उत्पन्नकर्ता असें आलंकारिक वर्णन या मंत्रांत केलें आहे. सोम असला तरच हे देव यज्ञामध्यें येतात.

[९४४] (देवानां ब्रह्मा) देवांमध्यें ब्रह्मा, (कवीनां पदवीः) कवींमध्यें शब्दांची योजना करणारा, (विप्राणां ऋषिः) विप्रांमध्यें ऋषि, (मृगाणां महिषः) पशूंमध्यें रेडा, (गृध्राणां श्येनः) पक्ष्यांमध्यें श्येन पक्षी, (वनानां स्वधितिः) हिंसकांमध्यें शस्त्र रूप (सोमः) सोमरस (रेभन्) शब्द करीत (पवित्रं अति एति) छाननी - मधून कलशामध्यें गाळला जात आहे. ॥ २ ॥

९४५ प्रावीविपद्वाच ऊर्मिं न सिन्धुर्गिर स्तोमान्पवमानो मनीषाः ।
अन्तः पश्यन्वृजनेमावराण्या तिष्ठति वृषभो गोषु जानन् ॥ ३ ॥ १९ (फू) ॥
[धा० २० । उ० २ । स्व० ६] (ऋ. ९।९६।७)

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

[७]

९४६ अग्निं वो वृधन्तमध्वराणां पुरूतमम् । अच्छा नप्त्रे सहस्वते ॥ १ ॥
(ऋ. ८।१०२।७)

९४७ अयं यथा न आभुवत्त्वष्टा रूपेव तक्ष्या । अस्य क्रत्वा यशस्वतः ॥ २ ॥
(ऋ. ८।१०२।८)

९४८ अयं विश्वा अभि श्रियोऽग्निर्देवेषु पत्यते । आ वाजैरुप नो गमत् ॥ ३ ॥ २० (डा) ॥
[धा० ८ । उ० ३ । स्व० २] (ऋ. ८।१०२।९)

९४९ इममिन्द्र सुतं पिब ज्येष्ठममर्त्यं मदम् । शुक्रस्य त्वाभ्यक्षरन्धारा ऋतस्य सादने ॥ १ ॥
(ऋ. १।८४।४)

---

[९४५] (सिन्धुः वाचः ऊर्मिं न) ज्याप्रमाणें वाहणारी नदी शब्द करीत गमन करते, त्याप्रमाणें (पवमानः) शुद्ध होणारा सोम (मनीषाः गिरः स्तोमान्) मनाला प्रिय लागणाऱ्या शब्दांना (प्रावीविपत्) प्रेरणा करीत आहे. (वृषभः) बलवान् असा हा सोम (अन्तः पश्यन्) आपल्या आंत पहात (गोषु जानन्) गाईंमध्यें दूध आहे हें जाणून (अवराणि) कमी न होणाऱ्या (इमा वृजना) या बलांना (आतिष्ठति) प्राप्त होत असतो. ॥ ३ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

[७] सप्तमः खण्डः ।

[९४६] हे ऋत्विज हो ! (वः) तुम्ही (अध्वराणां नप्त्रे) बलवानांचा नातु अशा (सहस्वते वृधन्तं) बलवानाला वाढवणाऱ्या (पुरूतमं अग्निं) श्रेष्ठ अग्नीच्या (अच्छ) जवळ जा. ॥ १ ॥

१ अध्वरः (अ-ध्वरः)- ज्याचा नाश केला जात नाहीं, असा बलवान्. हिंसा-रहित.

[९४७] (अयं) हा अग्नि (नः) आम्हांला (त्वष्टा) सुतार (तक्ष्या रूपा इव) जसा लांकडांना ठीक करतो, त्याप्रमाणें (आभुवत्) ठीक करतो. (अस्य क्रत्वा) याच्या कर्मानें आम्ही (यशस्वतः) यशस्वी होत असतों. ॥ २ ॥

[९४८] (देवेषु) देवांमध्यें (अयं अग्निः) हा अग्नि (विश्वाः श्रियः) सर्व ऐश्वर्यांना (अभिपत्यते) प्राप्त होत असतो. असा हा अग्नि (नः) आम्हांजवळ (वाजैः उपागमत्) अन्नांसह येवो. ॥ ३ ॥

[९४९] हे (इन्द्र) इन्द्रा ! (ज्येष्ठं मदं) श्रेष्ठ आनंद देणाऱ्या (अमर्त्यं) दिव्य अशा (सुतं इमं पिब) या सोमरसाला पी. (ऋतस्य सादने) यज्ञाच्या शालेमध्यें (शुक्रस्य धाराः) या तेजस्वी सोमाच्या धारा (त्वां अक्षरन्) तुला प्राप्त होण्यासाठींच खालीं पडत आहेत. ॥ १ ॥

९५० न किष्ट्वद्रथीतरो हरी यदिन्द्र यच्छसे । न किष्ट्वानु मज्मना न किः स्वश्व आनशे ॥२॥

(ऋ. १।८४।६)

९५१ इन्द्राय नूनमर्चतोक्थानि च ब्रवीतन ।
सुता अमत्सुरिन्दवो ज्येष्ठं नमस्यता सहः ॥ ३ ॥ २१ (र) ॥

[धा० ८ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. १।८४।५)

९५२ इन्द्र जुषस्व प्र वहा याहि शूर हरिह । पिबा सुतस्य मतिर्न मधोश्चकानश्चारुर्मदाय ॥ १ ॥

९५३ इन्द्र जठरं नव्यं न पृणस्व मधोर्दिवो न ।
अस्य सुतस्य स्वा३र्नोप त्वा मदाः सुवाचो अस्थुः ॥ २ ॥

९५४ इन्द्रस्तुराषाण्मित्रो न जघान वृत्रं यतिर्न ।
बिभेद वलं भृगुर्न ससाहे शत्रून्मदे सोमस्य ॥ ३ ॥ २२ (ङ) ॥

[धा० ११ । उ० ९ । स्व० १]

॥ इति सप्तमः खण्डः ॥ ७ ॥
॥ इति तृतीयप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ ३ ॥
॥ इति पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥

[९५०] हे (इन्द्र) इन्द्रा ! (यत्) ज्या अर्थी तूं (हरी यच्छसे) आपल्या घोड्यांना रथाला जोडतोस, त्या अर्थी (त्वत्) तुझ्यापेक्षां (रथीतरः न किः) अधिक श्रेष्ठ रथीवीर दुसरा कोणीहि नाहीं. (मज्मना) बलानेंहि (त्वा अनु नकिः) तुझ्यासारखा दुसरा कोणीहि नाहीं. (सु-अश्वः) उत्तम घोडे पाळणाराही (न किः आनशे) दुसरा कोणी नाहीं. ॥ २ ॥

[९५१] हे ऋत्विज हो ! (नूनं इन्द्राय अर्चत) खरोखर तुम्ही इन्द्राचीच अर्चना करा. (उक्थानि च ब्रवीतन) स्तोत्रें म्हणा. (सुताः इन्दवः अमत्सुः) गाळलेले सोमरस इन्द्राला आनन्द देवोत. (ज्येष्ठं सहः) श्रेष्ठ बलवान् इन्द्राला (नमस्यत) नमस्कार करा. ॥ ३ ॥

[९५२] हे (हरिह शूर इन्द्र) घोडे बाळगणाऱ्या शूर इन्द्रा ! (आयाहि) ये. (प्र वह) हविष्यान्नाचा स्वीकार कर. (चारुः मदाय) उत्तम आनन्द प्राप्त व्हावा यासाठीं (न चकानः) यावेळीं इच्छा करून (सुतस्य मधोः) मधुर सोमरस (मतिः) आपल्या इच्छेप्रमाणें (पिब) पी. ॥ १ ॥

[९५३] हे (इन्द्र) इन्द्रा ! (सुतस्य अस्य मधोः) या मधुर सोमरसाच्या (दिवः न) द्युलोकामधून जसा (सुवाचः मदः) उत्तम स्तुतीचा आनन्द (त्वा उप अस्थुः) तुला प्राप्त व्हावा त्याप्रमाणें (स्वः न) त्या स्वर्गीय आनंदाप्रमाणें आपल्या (जठरं) पोटाला (नव्यं न पृणस्व) नवीनच पोट असल्याप्रमाणें भरून ठेव. ॥ २ ॥

[९५४] (तुराषाट् इन्द्रः) त्वरेनें शत्रूचा पराभव करणारा इन्द्र (मित्रः न) मित्राप्रमाणें (वृत्रं जघान) शत्रूला मारतो. (यतिः न वलं बिभेद) ज्याप्रमाणें संयमी वीर वल राक्षसाला मारतो. (सोमस्य मदे) सोमाच्या आनंदामध्यें (भृगुं न शत्रून् सासहे) भृगु जसा शत्रूंचा पराभव करतो, त्याप्रमाणें तूं शत्रूंचा पराभव कर. ॥ ३ ॥

॥ येथें सातवा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति पञ्चमोऽध्यायः ॥

पञ्चम अध्याय

इन्द्राचे गुण

या अध्यायामध्यें इन्द्राचे हे गुण वर्णिले आहेत—

१ अ-प्रातिष्कुतः- [७१३]- ज्याचा कोणीहि प्रतिकार करूं शकत नाहीं.

२ चर्षणीनां राजा [९३३]- सर्व लोकांचा राजा, सर्वांचा शासक.

३ रथेभिः याता [९३३]- रथांबरोबर जाणारा, ज्याच्याबरोबर पुष्कळच रथ असतात. ज्याच्याबरोबर सरदारांचेहि रथ असतात.

४ अध्रि-गुः [९३३]- पुढें जाणारा.

५ ज्येष्ठः [९३३]- श्रेष्ठ, सर्वांहून थोर.

६ तुराषाट् [९५४]- त्वरेनें शत्रूचा पराभव करणारा.

७ हरिः [९५२]- घोडेजवळ बाळगणारा, दुःखांचें हरण करणारा.

८ शूरः [९५२]- शूरवीर.

९ तरस्वी [९३१]- वेगानें सर्व कार्यें करणारा.

१० स्वः-पति [९३२]- स्वर्गाचा स्वामी, आत्मविजयी.

११ धृत-व्रतः [९३२]- नियमांचें पालन करणारा.

१२ पुरुहन्मा [९३४]- अनेक शत्रूंना मारणारा.

१३ ज्येष्ठं सहः [९५१]- ज्याच्याजवळ श्रेष्ठ सामर्थ्य आहे.

१४ इन्द्रः दधीचः अस्थभिः नवती नव वृत्राणि जघान [९१३]- इन्द्रानें दधीचाच्या अस्थिच्या अस्त्रांनीं ९९ राक्षस मारले.

१५ विश्वासां पृतनानां तरुता वृत्रहा [९३३]- सर्व शत्रूंच्या सैन्याचा पराभव करणारा इन्द्र आहे.

१६ इन्द्रः वृत्रं जघान [९५४]-इन्द्रानें वृत्राला मारलें.

१७ इन्द्रः वलं विभेद [९५४]- इन्द्रानें वल राक्षसाला फाडलें.

१८ सोमस्य मदे शत्रून् सासहे [९५४]- सोमाच्या आनंदामध्यें सर्व शत्रूंचा इन्द्रानें पराभव केला.

१९ हे इन्द्र ! यत् हरी इच्छसे, त्वत् रथीतरः न किः [९५०]- हे इन्द्रा ! ज्या अर्थी तूं घोडे आपल्या रथाला जोडतोस, त्या अर्थी तुझ्यापेक्षां अधिक मोठा रथांत बसणारा वीर दुसरा कोणी नाहीं.

२० मज्मना त्वा अनु न किः [९५०]- बलामध्यें तुझ्यासारखा कोणी नाहीं.

२१ सु-अश्वः न किः [९५०]-उत्तम घोडे पाळणाराहि तुझ्याशिवाय दुसरा कोणी नाहीं.

२२ ज्येष्ठं सहः नमस्यत [९५१]- इन्द्राच्या श्रेष्ठ साहसपूर्ण शौर्याला नमस्कार करा.

२३ यस्य विधर्तरि द्विता [९३४]- ज्याच्या धारक-शक्तिमध्यें दोन शक्ति आहेत. एक अनुग्रह करण्याची शक्ति व दुसरी शत्रूचा विनाश करण्याची शक्ति.

२४ दर्शतः महान् वज्रः हस्तेन प्रतिधायि [९३४] – पाहण्याजोगें मोठें वज्र तो हातानें शत्रूला मारण्यासाठीं धरतो.

२५ पुरु-हन्-मन् ! अवसे तं इन्द्रं शुम्भ [५३४] –हे पुष्कळ शत्रूंना मारणाऱ्या इन्द्राच्या भक्ता ! आपल्या संरक्षणासाठीं त्या इन्द्राची उपासना कर.

२६ नूनं इन्द्राय अर्चत, उक्थानि च ब्रवीतन [९५१]- खरोखर इन्द्राची अर्चना करा. त्याचीं स्तोत्रें म्हणा.

२७ रेभासः इन्द्रं समस्वरन् [९३२]–स्तोता इन्द्राची स्तुति करतात.

२८ यत् स्वः-पतिः वृधे, धृतव्रतः ओजसा ऊतिभिः सं [९३२]- जेव्हां स्वर्गाचा स्वामी संवर्धन करूं इच्छितो, तेव्हां तो नियमांप्रमाणें चालणारा आपल्या सामर्थ्यानें व संरक्षणाच्या साधनांनीं सहाय्य करतो.

२९ विप्राः अभिस्वरे मेषं नेमिं नमन्ति [९३१]- ज्ञानी एका आवाजानें त्या मुख्य इन्द्राची स्तुति गातात.

याप्रमाणें इन्द्राचे गुण या अध्यायामध्यें वर्णिले आहेत.

अग्निचे गुण

आतां या अध्यायामध्यें जे अग्निचे गुण वर्णिले आहेत ते पहा—

१ जागृविः [९०७]- जागृत राहणारा.

२ सु-दक्षः [९०७]- उत्तम दक्ष.

३ जनस्य गोपा [९०७]- लोकांचा रक्षक.

४ शुचिः [९०७]- शुद्ध, पवित्र, निर्मळ.

५ अंगिरसः [९०८]- अंग-प्रत्यंगामध्यें जो प्रकाशतो.

६ यज्ञस्य केतुः [९०९]- यज्ञाचा ध्वज.

७ सुक्रतुः [९०९]- उत्तम कर्में करणारा.

८ सहस्वान् [९४६]- सामर्थ्यानें युक्त.

९ सुविताय अजनिष्ट [९०७]- लोकांचें कल्याण करण्यासाठीं उत्पन्न झाला.

१० द्युमत् भाति [९०७]– तेजस्वी होऊन प्रकाशतो.

११ महतः सहः सः मथ्यमानः जायसे [९०८]– मोठें बल तो मन्थन करून उत्पन्न झाला म्हणजे प्रकट करतो.

१२ अस्य क्रत्वा यशस्वन्तः [९४७]– याच्या कृतिनें आम्ही यशस्वी होतों.

१३ देवेषु अयं अग्निः विश्वाः श्रियः अभि पत्यते [९४८]– देवांमध्यें हा अग्नि सर्व शोभा स्थापन करतो.

१४ नः वाजैः उपागमत् [९४४]– आमच्याजवळ तो अग्नि अन्नांसह व बलांसह येवो.

१५ त्वा सहसः पुत्रं आहुः [९०८]– तूं बलानें उत्पन्न होतोस असें म्हणतात.

याप्रकारानें अग्निचें वर्णन या अध्यायामध्यें आलें आहे.

मित्र व वरुण

आतां मित्र व वरुण यांचें वर्णन पहा—

१ ऋतावृधा मित्रावरुणा [७१०]– सत्य अथवा यज्ञ वाढवणारे मित्र व वरुण आहेत.

२ राजानौ अनभिद्रुहे ध्रुवे उत्तमे सहस्रस्थूणे सदसि आशाते [९११]– हे दोन राजे आहेत, ते परस्पर भांडत नाहींत व स्थिर आणि हजार खांबांच्या उत्तम सभेमध्यें बसतात.

३ सम्राजा घृतासुती आदित्या दानुनः-पती अनवह्वरं सचेते [९१२]– ते दोन सम्राट् आहेत, घृत मिश्रित अन्न खाणारे, आदित्याचे पुत्र, धनाचे स्वामी आहेत, ते कुटिल व्यवहार न करणाऱ्याला सहाय्य करतात.

याप्रमाणें मित्र व वरुण यांचें येथें वर्णन केलेलें आहे.

इन्द्र व अग्नि

आतां इन्द्र व अग्नि यांचें वर्णन पहा—

१ हे इन्द्राग्नी ! इयं वां पूर्व्यस्तुतिः, अस्य मन्मनः अजनि [९१६]– हे इन्द्र व अग्नि हो ! ही तुम्हां दोघांची अपूर्व स्तुति या मनन करणाऱ्या विद्वानापासून उत्पन्न झाली आहे.

२ हे इन्द्राग्नी ! जरितुः हवं शृणुतं, गिरः वनतं, ईशाना धियः पिप्यतं [९१७]– हे इन्द्र व अग्नि हो ! स्तोता प्रार्थना करीत आहे ती तुम्ही ऐका, त्याची स्तुति ऐकून ध्या, तुम्ही दोघेही अधिकारी आहांत, त्यासाठीं त्यांच्या कर्मांना योग्य फळें द्या, अथवा त्यांच्या बुद्धींना परिपक्व करा.

३ हे नरा इन्द्राग्नी ! नः पापत्वाय रीरधम् [९१८] – हे इन्द्र व अग्नि हो ! आम्हांला पाप करण्याकडे प्रवृत्त करूं नका.

४ अभिशस्तये मा, निदे नः मा [९१८]– हिंसा करण्याच्या कार्याकडे प्रवृत्त करूं नका, निंदनीय कर्मे करण्याकडे प्रवृत्त करूं नका.

अर्थात् तुम्ही आमची सत्कर्मांकडे प्रवृत्ति करा. याप्रमाणें देवतांच्या प्रार्थना आहेत. त्या दाखवीत आहेत कीं आमची प्रवृत्ति प्रशस्त कर्मे करण्याकडेच असावी. खराब कार्यें करण्याकडे नसावी. देवतांचे गुण याचसाठीं वर्णिले आहेत. देवतांचे गुण आपण धारण करणें ही सत्प्रवृत्ति आहे व याच्या विरुद्ध जी आहे ती असत्प्रवृत्ति आहे. मनुष्यानें सत्प्रवृत्ति धारण करावी व असत्प्रवृत्तीपासून आपणास दूर ठेवावें.

यज्ञामध्यें सोमरस तयार करतात व तो इन्द्राला अर्पण करतात. याविषयींचें वर्णन आतां पहा—

इन्द्राला सोम

१ सुतः आ विवासन् इन्द्राय मधु सिच्यते [९०२] – सोमरस काढल्यानंतर त्याला गाळून शुद्ध करून, इन्द्राला तो मधुर रस दिला जात आहे. हा रस मधुर होण्यासाठीं यांत गाईचें दूध मिसळलें जात असतें.

२ इन्द्राय पातवे हरिं इन्दुं अद्रिभिः हिन्वन्ति [९०३]– इन्द्राला सोमरस प्यावयास देण्यासाठीं हिरव्या रंगाच्या सोमाला दगडांनीं कुटतात.

३ वृषा इन्द्रः सुतं गमत्, ध्रुवे सदसि सीदतु [९२५]– बलवान् इन्द्र सोमयागाच्या ठिकाणीं जातो व स्थिर अशा यज्ञशालेंत तो जाऊन बसतो.

४ हे इन्द्र ! सोमं पिब, त्वा मदन्तु [९२७]– हे इन्द्रा ! तूं सोमरस पी. हे सोमरस तुला आनन्द देवोत.

५ हे हर्यश्व ! ते सोतुः बाहुभ्यां सुयतः अद्रिः यत् सुषाव [९२७]– हे उत्तम घोडे बाळगणाऱ्या इन्द्रा ! रस काढणाऱ्याच्या बाहूंनीं पकडलेल्या दगडानें हा रस काढला आहे.

६ हे इन्द्र ! ज्येष्ठं मदं अमर्त्यं इमं सुतं पिब [९४९] – हे इन्द्रा ! श्रेष्ठ अमर किंवा दिव्य आनंद देणाऱ्या या सोमरसाला पी.

७ ऋतस्य सादने शुक्रस्य धाराः त्वां अक्षरन् [९४९]– यज्ञाच्या ठिकाणीं या वीर्यवान् सोमरसाच्या धारा तुझ्यासाठीं निघाल्या आहेत. तुझ्याकडे चालल्या आहेत.

८ चारुः मदाय सुतस्य मधौ मतिः पिब [९५२]- उत्तम आनंद प्राप्त व्हावा यासाठीं हा मधुर सोमरस आपल्या इच्छेला वाटेल तितका पी.

९ हे इन्द्र ! सुतस्य मधोः मदः त्वा उप अस्थुः जठरं पृणस्व [९५३]- हे इन्द्रा ! या मधुर सोमरसाचा आनंद तुला मिळो, पोट भरून पी.

याप्रमाणें सोमरस इन्द्राला व इतर देवांना दिला जातो, ते सर्व देव यज्ञशाळेंत बसून तो पितात व उत्साहित होऊन आपआपलीं कार्यें उत्तम रीतिनें करतात.

स्वर्गांतील सोम

१ यः दिवस्परि रघुयामा [९००]- जो द्युलोकावर असतो तो हा सोम आहे. हिमालयांतील शिखरावर उंच ठिकाणीं सोम उगवतो, तेथून यज्ञ करणारे यजमान त्याला आणतात व यज्ञामध्यें त्याचा उपयोग करतात.

सोमाचे गुण

सोमाचे गुण कसे आहेत ते आतां पहा—

१ पवमानः [८८६]- शुद्ध, पवित्र, गाळला जाणारा.

२ ऋषि-षाणः [८८६]- ऋषि यज्ञांत ज्याचा उपयोग करतात.

३ ध्रुवः [८८७]- स्थैर्य देणारा.

४ हरिः [८८७]- दुःखांचें हरण करणारा, हिरव्या रंगाचा.

५ विश्वचक्षः [८८८]- सर्व पहाणारा, सर्वद्रष्टा.

६ प्रभुः [८८८]- स्वामी.

७ विश्वस्य भुवनस्य पतिः [८८८]- सर्व भुवनांचा स्वामी.

८ व्यानशी [८८८]- व्यापक, सर्वत्र प्रभाव उत्पन्न करणारा.

९ दक्षः द्युमान् रसः [८९१]- बलवान् व तेजस्वी रस.

१० अ-दुच्छुनः [८९०]- दुष्टांना प्राप्त न होणारा.

११ विश्वं स्वः ज्योतिः [८९१]- सर्व रीतिनें तेजस्वी ज्योति.

१२ विश्व-चर्षणिः [८९६]- सर्व पाहणारा.

१३ बृहन्मतिः [८९८]- मोठी बद्धि असलेला.

१४ कविः [९२०]- ज्ञानी, दूरदर्शी.

१५ वृषा [९२०]- बलवान्, इच्छा पूर्ण करणारा.

१६ प्रियः [९२०]- प्रिय.

१७ अ-दाभ्यः [९२०]- न दबला जाणारा. कोणीहि ज्याला दाबून टाकूं शकत नाहींत असा सामर्थ्यवान्.

१८ देवैः सं शोभते [९२०]- देवांबरोबर शोभतो.

१९ कविक्रतुः [९३५]- उत्तम कर्म करणारा.

२० मतीनां, दिवः, पृथिव्याः, अग्नेः, सूर्यस्य, इन्द्रस्य, विष्णोः जनिता सोमः [९४३]- बुद्धि, द्युलोक, पृथिवी, अग्नि, सूर्य, इन्द्र, विष्णु यांच्यामध्यें उत्साह उत्पन्न करणारा सोम आहे.

हे सोमाचे गुण आहेत. सोमरस प्याल्यानें हे गुण उत्साह वाढल्यामुळें वाढतात, त्यामुळें हे गुण सोमाचे आहेत असें म्हटलें जातें.

शत्रूचा पराभव करणारा सोम

१ हे इन्दो ! तव सख्ये अहं दिवे दिवे रारण ! हे बभ्रो ! पुरूणि मां अवचरन्ति, तान् परिधीन् अति इहि [९२२]- हे सोमा ! तुझ्या मैत्रीमध्यें मी रहावें, असें दररोज इच्छीत आहें. कारण कीं, हे सोमा ! पुष्कळ शत्रु मला वारंवार त्रास देत आहेत, त्यांना तूं दूर कर.

२ पुनानः विचर्षणिः विश्वाः मृधः अक्रमीत् [९२४]- गाळला जाणारा विशेष ज्ञानी सोम सर्व शत्रूंवर आक्रमण करून त्यांना दूर करतो.

३ हे हर्यश्व इन्द्र ! ते युज्यः चारुः मदः यः अस्ति, येन वृत्राणि हंसि [९२८]- हे लाल रंगाचे घोडे जवळ बाळगणाऱ्या इन्द्रा ! तुला योग्य असा हा उत्तम उत्साह आहे, त्यानें तूं शत्रूंना मारतोस.

याप्रमाणें सोमरस वीरांमध्यें असा उत्साह उत्पन्न करतो कीं ते त्यामुळें शत्रूला विनष्ट करण्याचीं कामें करण्यास योग्य होतात. हा असा सोमरसाचा प्रभाव आहे.

अंगुली सोमाचा रस काढतात

सोमवल्ली फळयांवर ठेऊन दगडांनीं कुटतात व बोटांनीं दाबून तिचा रस काढतात. याचें असें वर्णन आहे —

१ उस्रियाः, जामयः, स्वसारः, महीयुवः, सूरं पतिं महां इन्दुं हिन्वन्ति [९०४]- सर्वत्र गमन करणाऱ्या परस्पर बहिणींप्रमाणें एकमतानें काम करणाऱ्या, अशा अंगुली, मोठें कार्य करण्याची इच्छा करून, श्रेष्ठ स्वामी अशा मोठ्या सोमाला दाबून त्याचा रस काढतात.

सोमाचा रस काढणें हें एक मोठें काम आहे, कारण त्यानें सोमयाग सिद्ध होतो व त्यांत सर्व देव संतुष्ट होतात.

सोम धन देतो

१ देवेभ्यः सुतः विश्वा वसूनि आविश [९०५]– देवांसाठीं काढलेला सोमरस आम्हांसाठीं सर्व धनांत प्रविष्ट होवो. अर्थात् सर्व धनें आम्हांला देवो.

२ हे इन्दो सोम ! अस्मभ्यं महां सहस्रिणं रयिं विश्वतः आ पवस्व [९२६]– हे तेजस्वी सोमा ! तूं आम्हांला मोठें हजारों प्रकारचें धन चारही बाजूंनीं आणून दे.

सोमयागामध्यें सर्व लोक धन देतात, तेव्हां तें धन सोमच देतो असें म्हटलें जातें.

सोम पाण्यांत मिसळतात

सोम कुटून त्याचा रस काढतात. नंतर त्यांत पाणी मिसळतात व नंतर त्याला गाळतात व गाळलेला सोमरस कलशामध्यें भरून ठेवतात. यासंबंधीचें वर्णन असें केलें आहे—

१ यः दिवः परि रघुयामा, सः अयं पवित्रे आ सिन्धोः ऊर्मा वि अक्षरत् [९००]– जो सोम द्युलोकावर असतो, तो हा सोम चाळणींतून गळत आहे, तो नदीच्या पाण्याच्या लाटांमध्यें टपकत आहे. नदीचें पाणी मिसळून तो गाळला जात आहे.

२ वाजिनं वने क्रीडन्तं आति अविं धीभिः मृजन्ति [९४१]– बलवान् सोमाला पाण्यांत मिसळून मेंढीच्या केंसांच्या चाळणींतून, स्तोत्रें म्हणून याजक गाळीत असतात.

३ वाजयुः मीढ्वान् कलशान् अभि असर्जि [९४२] – अन्न देणारा पाण्यांत मिसळलेला सोम कलशामध्यें गाळला जात आहे.

असें सोमरसाला पाण्यांत मिसळण्याचें वर्णन आहे. यानंतर तो गाळला जातो त्याचें वर्णन असें केलेलें आढळतें—

सोमरस गाळणें

१ हे ऋषिषाण ! ये वेधसः त्वा मृजन्ति, ते अन्तरिक्षात् स्थाविरीः असृक्षत् [८८६]– हे ऋषींनी काढलेल्या सोमा ! जे ज्ञानी तुला काढतात, ते वरच्या भांड्यांतून स्थिर धारेनें खालच्या भांड्यांत तुला, पोंचवितात; गाळतात.

२ यदि पवित्रे हरिः अधिमृज्यते सत्ता योनौ निषीदति [८८७]– जेव्हां गाळणींतून हिरव्या रंगाचा सोम गाळला जातो. त्यावेळीं स्थिर राहूं इच्छिणारा हा सोम कलशरूपी पात्रामध्यें जाऊन बसतो.

३ हे राजन् पवमान ! तव मदः अदुच्छुनः रसः अव्यं वारं वि अर्षति [८९०]– हे सोमराजा ! तुझा आनंद देणारा रस वाईट दुष्ट लोकांना न मिळणारा, मेंढीच्या केंसांच्या गाळणींतून गाळला जाऊन खालीं पडत असतो.

४ ओजसा पवित्रे शीघ्रं आ एति [९०१] –वेगानें गाळणींमधून शीघ्र गाळला जातो.

५ हे हरे ! दक्षसाधनः मदः देवेभ्यः पीतये पवस्व [९१९]– हे हिरव्या रंगाच्या सोमा ! बल वाढवण्याचें साधन असा तुझा आनंद देणारा रस देवांना पिण्यास देण्यासाठीं गाळून तयार होवो.

६ पुनानः सोमः ऊर्मिणा अव्यं वारं वि धावति [९४०]– गाळला जाणारा सोम लाटांनीं मेंढीच्या केंसांच्या गाळणींमधून धांवत खालील भांड्यांत येतो.

याप्रमाणें सोम गाळला जातो व तो मेंढीच्या केंसांच्या गाळणींमधून गाळला जातो, या विषयींचें वर्णन आहे.

सोमामध्यें गाईचें दूध मिसळतात

१ हे पवमान ! ते आश्विनीः धेनवः दिव्याः पयसा धरीमणि प्र असृग्रन् [८८६]– हे सोमा ! तुझ्या त्या वेगवान् गाई दिव्य आहेत, त्या आपल्या दुधानें कलशामध्यें पोंचत आहेत. कलशामध्यें गाळलेला सोमरस आहे त्यांत गाईंचें दूध मिसळलें जात आहे.

२ वृषभः अन्तः पश्यन्, गोषु जानन्, अवराणि इमा वृजना आ तिष्ठति [९४५]– बलवान् सोमरस आंत पहातो, व गाईंमध्यें दूध आहे हें जाणतो, कमी न होणाऱ्या बलांना तो गाईच्या दुधानें प्राप्त करतो.

याप्रमाणें आलंकारिक भाषेनें सोमरसामध्यें गाईंचें दूध मिसळलें जातें, याचें वर्णन मंत्रांमध्यें आहे.

सोम अन्न देतो

१ हे इन्दो सोम ! महीं इषं गोमत् आ पवस्व [८९५]– हे तेजस्वी सोमा ! तूं मोठें अन्न गाईच्या दुधानें युक्त असलेलें आम्हांला दे.

२ प्र न [illegible] [illegible] धन्वन्ने अनाय वोति जुष्टः पनिष्टये अर्ष [९३७]– हे सोमा ! तुझ्या निवासासाठीं यत्न करणाऱ्या, [illegible] करणाऱ्या व स्तुति करणाऱ्या मनुष्यासाठीं, [illegible] [illegible] यागांत आणला गेलेला, तूं स्तुतिला पात्र हो.

सोम हें अन्न आहे, असें मंत्रांनीं प्रतिपादन केलेलें आहे.

सोमाचा शब्द

सोमरस गाळला जात असतांना त्याचा शब्द होत असतो, त्याचें वर्णन असें मंत्रांमध्यें केलेलें आहे—

१ वृष्टेः स्वनः इव पवमानस्य श्रूयते [८९४]- वृष्टीचा जसा आवाज होतो, तसा गाळल्या जाणाऱ्या सोमरसाचा शब्द ऐकूं येतो.

२ धिया हितः कनिक्रदत् योनिं अभि आरुहः [९२१]- बुद्धिनें यज्ञांत ठेवलेला सोम शब्द करीत कलशामध्यें येत आहे.

३ पवमानः वाचः अग्रं कनिक्रदत् [९४०]- गाळला जात असतां सोम शब्द करीत असतो.

४ त्रिपृष्ठं मतयः अभि समस्वरत् [९४१]- तीन भांड्यांत स्तुति होत असतां सोम शब्द करीत जातो.

५ पुनानः वाचं जनयन् असिष्यदत् [९४२]- गाळला जात असतां शब्द करीत भांड्यांत उतरतो.

६ सोमः रेभन् पवित्रं अति एति [९४४]- सोम शब्द करीत गाळणीमधून गाळला जातो.

७ पवमानः मनीषाः गिरः स्तोमान् आवीविपत् [९४५]- शुद्ध होत असलेला सोम मनाला प्रिय लागणाऱ्या शब्दांना प्रेरणा करीत आहे.

अशा रीतिनें सोमरस गाळला जात असतां शब्द करीत गाळणीमधून खालील भांड्यांत पडतो, त्याचें आलंकारिक वर्णन मंत्रांमध्यें केलेलें आढळतें. भांड्यांत प्रवाही पदार्थ असेल व जर त्या भांड्यांत दुसरा प्रवाही पदार्थ पडूं लागला तर त्याचा शब्द होणारच, तसाच हा शब्द आहे. खालील कलशामध्यें पाणी असतें व त्यांत गाळलेला सोमरस गाळणीमधून खालीं पडूं लागला तर त्याचा शब्द होणारच. तोच हा सोमाचा शब्द आहे.

सोमाचें तेज

सोमवल्ली तेजस्वी आहे, तिचा रसही तेजस्वी आहे. या तेजस्वितेचें वर्णन मंत्रांमध्यें असें आढळतें —

१ पवमानस्य ध्रुवस्य सतः केतवः उभयतः परियन्ति [८८७]- गाळल्या जाणाऱ्या स्थिर सोमाचे किरण दोनही बाजूस पसरतात.

२ पवमानः बृहत् वैश्वानरं ज्योतिः अजीजनत् [८८९]-गाळला जाणारा सोम मोठें व्यापक तेज उत्पन्न करतो.

३ पवमानस्य ते दक्षः द्युमान् रसः विराजति [८९१]- गाळल्या जाणाऱ्या सोमाचा बलवर्धक तेजस्वी रस शोभत असतो.

४ विश्वं स्वः ज्योतिः दृशे [८९१]- सोमाचें स्वतःचें तेज दिसत आहे.

५ शुष्मिणः विद्युतः दिवि चरन्ति [८९४]- बलवान् सोमाचे किरण द्युलोकांत पसरतात.

६ मही रोदसी आ पृण [८९६]- विशाल द्यावापृथिवी भरून टाक.

७ सुतः त्विषिं दधानः विचक्षणः विरोचयन् [९०१]- सोमरस तेज धारण करीत, तेजस्वी होऊन चमकूं लागतो.

८ रुचा देवः पवमानः [९०५]- तेजानें सोमदेव शोभतो.

९ शुचिः जातः महान् सः सूनुः मही ऋतावृधा जाते मातरा अरोचयत् [९३६]- शुद्ध झालेला सोमनामक पुत्र मोठ्या यज्ञाला वाढवणाऱ्या प्रसिद्ध माता द्यावापृथिवींना प्रकाशित करतो.

१० दैव्य पवमान ! द्युमत्तमः त्वं [१३८]- हे प्रकाशमान् सोमा ! तूं तेजस्वी आहेस.

याप्रमाणें सोमरस तेजस्वी आहे, यासंबंधाचीं वर्णनें आहेत.

सुभाषितें

१ ध्रुवस्य सतः केतवः उभयतः पारयन्ति [८८७] -स्थिर व सत् कार्य करणाऱ्याचें तेज दोनही बाजूंना पसरतें.

२ हे विश्वचक्षः ! प्रभोः सतः ते ऋभ्वस्य केतवः विश्वा धामानि परियन्ति [८८८] हे सर्वांचें निरीक्षण करणाऱ्या निरीक्षका ! प्रभुत्व करूं इच्छिणाऱ्या तुझा मोठा प्रकाश सर्व स्थानांमध्यें पोंचतो.

३ धर्मणा पवसे [८८८]- आपल्या धर्मानें शुद्ध होतोस.

४ विश्वस्य भुवनस्य पतिः राजसि [८८८]- तूं सर्व भुवनांचा स्वामी होऊन चमकत आहेस.

५ पवमानः बृहत् वैश्वानरं ज्योतिः दिवः चित्र तन्यतुं न अजीजनत् [८८९]- पवित्र झालेला सोम मोठें सर्व मानवांचें हितकरणारें तेज, द्युलोकांत चमकणाऱ्या विजेप्रमाणें, उत्पन्न करतो.

६ हे राजन् ! तव मदः अ-दुच्छुनः [८९०]- हे राजा ! तुझा आनंद दुष्टांना न मिळणारा आहे.

*

७ ते दक्षः द्युमान् विराजाति [८९१]- तुझें तेजस्वी बल प्रकाशीत होत आहे.

८ विश्वं स्वः ज्योतिः दृशे [८९१]- सर्व विश्वामध्यें आत्मज्योति दिसत आहे.

९ त्वेषाः अयासः प्र अक्रमुः [८९२]- तेजस्वी व प्रगतिशील जे असतात ते विशेष प्रगति करतात.

१० अ-व्रतं दस्युं साह्याम [८९३]- सत्कर्म न करणाऱ्या शत्रूला आम्ही पराभूत करूं या.

११ शुष्मिणः विद्युतः दिवि चरन्ति [८९४]- बलशाली विजेचा प्रकाश द्युलोकांत पसरत आहे.

१२ वृष्टेः स्वनः श्रूयते [८९४]- वृष्टीचा शब्दही ऐकूं येत आहे.

१३ गोमत्, अश्ववत्, हिरण्यवत्, वीरवत् महीं इषं आ पवस्व [८९५]- गाई, घोडे, सोनें व वीरपुत्र यांनीं युक्त असलेलें मोठें अन्न आम्हांला दे.

१४ हे विश्व-चर्षणे ! मही रोदसी आपृण [८९६] - हे सर्व लोकांचें हित करणाऱ्या वीरा ! तूं आपल्या तेजानें या मोठ्या द्यु व पृथिवी लोकांना भरून टाक.

१५ सूर्यः रश्मिभिः उषाः न [८९६]- सूर्य जसा आपल्या किरणांनीं उषःकालानंतर जगाला भरून टाकतो, तसा तूं भरून टाक.

१६ नः शर्मयन्त्या धारया विश्वतः परिसर [८९७] -आम्हांला सुख देणाऱ्या अन्नरसाच्या धारेनें चारही बाजूंनीं घेरून टाक.

१७ हे बृहन्मते ! प्रियेण धाम्ना आशुः परि अर्ष [८९८]- हे बुद्धिमाना ! आपल्या प्रिय जीवनानें लवकर इकडे ये.

१८ अनिष्कृतं परिष्कृण्वन् जनाय इषः यातयन्, परिस्रव [८९९]- असंस्कृताला सुसंस्कृत करीत, लोकांना अन्न मिळेल असें करीत, चारही बाजूला भ्रमण कर.

१९ त्विषिं दधानः, विचक्षणः विरोचयन्, ओजसा शीघ्रं आ एति [९०१] तेजस्विता धारण करून, सर्वांचें निरीक्षण करणारा स्वतः प्रकाशमान् होत, स्वसामर्थ्यानें लवकर प्रगति करतो.

२० उस्रयः जामयः स्वसारः महीयुवः सूरं पतिं हिन्वन्ति [९०४]- तेजस्वी एकत्र राहणाऱ्या बहिणी, मोठ्या कार्यांत आपणास युक्त करून, आपल्या तेजस्वी पतिला योग्य कार्यांत प्रेरित करतात.

२१ रुचा विश्वा वसूनि आ विश [९०५]- आपल्या तेजानें सर्व धनांमध्यें तूं प्रविष्ट झाल्याप्रमाणें रहा.

२२ जनस्य गोपा, जागृविः सुदक्षः अग्निः, नव्यसे सुविताय अजनिष्ट [९०७]- लोकांचें संरक्षण करणारा, जागृत व दक्ष अग्रणी, नवीन मार्गानें सर्वांचें कल्याण व्हावें यासाठीं प्रकट झाला आहे.

२३ बृहता दिविस्पृशा शुचिः भरतेभ्यः द्युमत् भाति [९०७]- मोठ्या आकाशाला स्पर्श करणाऱ्या तेजानें पवित्र झालेला तो, भारत देशांतील लोकांच्या हितांसाठीं, तेजस्वी होऊन चमकत आहे.

२४ सः महत् सहः [९०८]- तो शत्रूचा पराभव करणाऱ्या मोठ्या बलानें युक्त आहे.

२५ त्वां सहसः पुत्रं आहुः [९०८]- तुला सामर्थ्याचा पुत्र असें म्हणतात.

२६ राजानौ अनभिद्रुहौ ध्रुवे उत्तमे सहस्रस्थूणे सदसि आशाते [९११]- जे राजे आपसांत भांडत नाहींत ते स्थिर उत्तम हजार खांबांच्या सभेमध्यें बसतात.

२७ सम्राजा दानुनः पती अनवह्वरं सचेते [९१२] -ते सम्राट् धनांचे स्वामी कुटिल नसलेल्या सत्कर्माचें सहाय्य करतात.

२८ अ-प्रतिष्कुतः इन्द्रः दधीचः अस्थिभिः नवतीः नव वृत्राणि जघान [९१३]- ज्याचा कोणीहि पराभव करूं शकत नाहीं, अशा इन्द्रानें दधीच ऋषिच्या अस्थींनीं नव्याण्णव वृत्रांना ठार मारलें. शत्रूला मारण्यासाठीं ऋषींनीं आपल्या अस्थीहि राष्ट्रहितासाठीं समर्पित केल्या.

२९ गोः चन्द्रमसः गृहे त्वष्टुः अपीच्यं नाम इत्था अमन्वत [९१५]- चन्द्रामध्यें सूर्याचीं गुप्त किरणें अशीं प्रकाशित होतात. सूर्याचीं किरणें चन्द्रावर जाऊन पडतात व त्यांचें तेथून परावर्तन होऊन रात्रीच्यावेळीं पृथिवीवर तो चन्द्राचा प्रकाश पडतो.

३० ईशानाः धियः पिप्यतं [९१७]- तुम्ही बोधेहि स्वामी आहांत, म्हणून आमच्या बुद्धींना पूर्ण विकसित करा.

३१ हे नरा इन्द्राग्नी ! नः पापत्वाय मा, अभिशस्तये मा, निदे मा, रीरधतं [९१८]- हे नेत्या इन्द्र व अग्निनों ! आम्हांला पाप करण्यास लाऊं नका, हिंसा करण्यास प्रवृत्त करवूं नका व निंदा करण्यासहि लावूं नका.

३२ वृषा कविः प्रियः अदाभ्यः संशोभते [९२०]- बलवान् कवि प्रिय परंतु न दबला जाणारा जो असतो, तो शोभत राहतो.

३३ धिया हितः धर्मणा आरुहः [९२१]- बुद्धिनें जो हितकारक असतो, तो आपल्या गुणधर्मानें वर चढतो.

३४ पुरूणि मां नि अवचरन्ति तान् परिधीन् अति दहि [९२२]- पुष्कळ दुष्ट शत्रु मला त्रास देत आहेत, त्या दुष्टांना दूर कर.

३५ ते घृणा तपन्तं अति पश्यम [९२३]- तूं आपल्या तेजानें चमकत आहेस, असें आम्ही पाहत आहों.

३६ विचर्षणिः विश्वाः मृधः अक्रमीत् [९२४]- विशेष निरीक्षण करणारा आपल्या सर्व शत्रूंना पराभूत करीत असतो.

३७ विप्रं धीतिभिः शुम्भन्ति [९२४]- त्या ज्ञान्याला सर्व विद्वान् स्तुतींनीं सुशोभित करतात.

३८ वृषा इन्द्रः ध्रुवे सदसि सीदति [९२५]- बलवान् इन्द्र स्थिर सभेमध्यें बसत असतो.

३९ अस्मभ्यं महां सहस्रिणं रयिं विश्वतः आ पवस्व [९२६]- आम्हांला मोठें सहस्र प्रकारचें धन चहूंकडून आणून दे.

४० ते युज्यः चारुः मदः यः अस्ति, येन वृत्राणि हंसि [९२८]- तुझा योग्य उत्तम उत्साह जो आहे, त्यानें तूं शत्रूंना ठार मारतोस.

४१ विश्वाः पृतनाः अभिभूतरं इन्द्रं नरः सजूः ततक्षुः [९३०]- सर्व शत्रूंच्या सैनिकांचा पराभव करणाऱ्या इन्द्राची सर्व लोक मिळून स्तुति करतात.

४२ राजसे जजनुः [९३०]- त्याचें तेज वाढवतात.

४३ क्रत्वे वरे स्थेमनि, आमुरिं उग्रं ओजास्विनं, तरसं तरस्विनं [९३०]- आपल्या कर्तृत्वानें श्रेष्ठ स्थानांत राहणाऱ्या, शत्रूला मारणाऱ्या, उग्र व महाबलवान्, श्रेष्ठ व त्वरेनें सर्व कार्यें करणाऱ्याची स्तुति केली जाते.

४४ विप्राः अभिस्वरे मेषं नेमिं नमन्ति [९३१]- ज्ञानी मोठ्या स्वरानें शक्तिमान् अशा व्यापक इन्द्राला नमस्कार करतात.

४५ सु-दीतयः अ-द्रुहः वः तरस्विनः कर्णे ऋक्वभिः सं [९३१]- उत्तम तेजस्वी व द्रोह न करणारे तुम्ही वेगानें इन्द्राच्या कानांत पोंचेल अशा स्वरानें मंत्रांनीं त्याची स्तुति करा.

४६ यत् स्वः पतिः वृधे, धृतव्रतः ओजसां ऊतिभिः सं [९३२]- जेव्हां स्वर्गाचा स्वामी इन्द्र भक्ताचें संवर्धन करूं इच्छितो, तेव्हां नियमांचें पालन करणारा तो इन्द्र आपल्या सामर्थ्यानें व संरक्षणाच्या साधनांनीं युक्त होतो.

४७ चर्षणीनां राजा अध्रिगुः, विश्वासां पृतनानां तरुता वृत्रहा ज्येष्ठं गृणे [९३३]- लोकांचा शासक, प्रगति करणारा, सर्व शत्रूच्या सैन्यापासून तारण करणारा इन्द्र आहे, त्या श्रेष्ठ इन्द्राची मी स्तुति करतों.

४८ पुरुहन्-मन् ! अवसे तं इन्द्रं शुम्भ [९३४] - हे शत्रूंना मारणाऱ्या इन्द्राच्या उपासका ! आपल्या संरक्षणासाठीं त्या इन्द्राची उपासना कर.

४९ यस्य विधर्तरि द्विता [९३४]- ज्याच्या संरक्षण शक्तिमध्यें दोन प्रकारच्या शक्ति आहेत. एक शत्रूचा विनाश करण्याची शक्ति व दुसरी भक्तावर अनुग्रह करण्याची शक्ति.

५० महान् दर्शतः वज्रः हस्तेन प्रतिधायि [९३४] -मोठें दर्शनीय वज्र तो हातानें धरतो.

५१ शुचिः जातः मही ऋतावृधा मातरा अरोचयत् [९३६]- शुद्ध झालेला आपल्या मोठ्या सत्य वाढवणाऱ्या आयांना प्रकाशित करतो.

५२ द्युमत्तमः त्वं जनिमानि अमृतत्वाय [९३८] -अत्यंत तेजस्वी असा तूं आपल्या जन्मांमध्यें अमृतत्वाच्या प्राप्तीसाठीं यत्न कर.

५३ अस्य क्रत्वा यशस्वन्तः[९४७]- याच्या पुरुषार्थ प्रयत्नानें आम्ही यशस्वी होतों.

५४ अयं विश्वाः श्रियः अभि पत्यते, नः वाजै उपागमत् [९४८]- हा सर्व ऐश्वर्यांनीं युक्त असतो, तो आमच्या-जवळ सर्व अन्नांसह येवो.

५५ यत् हरी यच्छसे त्वत् रथीतरः न किः [९५०] -ज्या अर्थी तूं आपले दोनही घोडे रथाला जोडतोस, त्या अर्थी तुझ्यापेक्षां अधिक उत्तम रथवीर दुसरा कोणी नाहीं.

५६ मज्मना त्वा अनु न किः [९५०]- बलानें तुझ्या-सारखा दुसरा कोणीहि नाहीं.

५७ सु अश्वः न किः आनशे [९५०]- उत्तम घोडे पाळणाराही दुसरा कोणी नाहीं.

५८ ज्येष्ठं सहः नमस्यत [९५१]- शत्रूचा पराभव करण्याचें श्रेष्ठ बल ज्याच्याजवळ आहे अशा इन्द्राला नमस्कार करा.

५९ तुराषाट् इन्द्रः वृत्रं जघान [९५४]- त्वरेनें शत्रूचा पराभव करणारा इन्द्र शत्रूला मारतो.

६० यतिः न वलं बिभेद [९५४]- संयमी पुरुषा-प्रमाणें वल-नामक राक्षसाला मारतो.

६१ भृगुः न शत्रून् सासहे [९५४]- भृगुप्रमाणें शत्रूंचा पराभव करतो.

उपमा

या अध्यायामध्यें पुढें दिलेल्या उपमा आल्या आहेत—

१ दिवः चित्रं तन्यतुं न [८८९]– आकाशांत वीज चमकते, त्याप्रमाणें (पवमानः बृहत् वैश्वानरं ज्योतिः) सोम मोठें विश्वाचें नेतृत्व करणारें तेज पसरवीत असतो.

२ गावः न [८९२]– गाईप्रमाणें - गाईच्या दूधाप्रमाणें– (भूर्णयः त्वेषाः अयासः कृष्णां त्वचं अपघ्नन्तः प्र अक्रमुः) शीघ्रगामी तेजस्वी सोमरस काळचा चामडीला दूर करीत खालील भांडचांत पडतात. गाईचें दूध सोमरसांत जेव्हां मिसळलें जातें, तेव्हां सोमाचा काळसर भुरकट रंग दूर होतो व तो सोमसाठीं ठेवलेल्या भांडचांत पडतो.

३ वृष्टेः स्वनः इव [८९४]– वृष्टिचा जसा शब्द होतो, तसा (पवमानस्य श्रूयते) सोमाचा शब्द ऐकूं येतो.

४ सूर्यः रश्मिभिः उषाः न [८९६]– सूर्य आपल्या किरणांनीं उषःकालानंतर विश्वाला व्यापतो, त्याप्रमाणें (विचर्षणे ! मही रोदसी आ पृण) हे सर्वांना पाहणाऱ्या सोमा ! तूं या मोठचा द्यावापृथिवीला भरून टाक.

५ विष्टपं रसा इव [८९७]– या भूलोकाला ज्याप्रमाणें पाणी व्यापतें, त्याप्रमाणें (हे सोम ! धारया विश्वतः परि स्तर) हे सोमा ! तूं आपल्या रसाच्या धारेनें चहूंकडे व्याप.

६ अभ्रात् वृष्टिः इव [९१६]– मेघापासून जशी वृष्टी होते, त्याप्रमाणें (इयं पूर्व्यस्तुतिःअस्य मन्मनः अजनि) ही अपूर्व स्तुति या विद्वानापासून झाली आहे.

७ ते घृणा तपन्तं परं सूर्यं शकुना इव अति पतिम [९२३]– स्वतःच्या तेजानें चमकणाऱ्या दूरच्या सूर्याला जसे पक्षी पाहतात, त्याप्रमाणें मी चमकणाऱ्या सोमाला पाहत आहें.

८ अर्वा न [९२७]– घोडा जसा आनंद देतो, त्याप्रमाणें (अद्रिः यत् सुषाव) दगड जो सोमाचा रस काढतो तो तुला आनंद देतो.

९ देवः सूर्यः न [९३४]– सूर्यदेव जसा तेजस्वी आहे, त्याप्रमाणें (दर्शतः महान् वज्रः) दर्शनीय महान् वज्र तेजस्वी आहे.

१० सप्तिः न [९४२]– जसा घोडा युद्धांत जातो तसा, (पुनानः वाचं जनयन् असिष्यत्) गाळला जाणारा सोम शब्द करीत कलशामध्यें जातो.

११ सिन्धुः वाचः ऊर्मिं न [९४५]– ज्याप्रमाणें नदी शब्द करीत जाते, त्याप्रमाणें (पवमानः स्तोमान् प्रावीविपत्) गाळला जाणारा सोम स्तुतींना प्रेरणा करीत आहे.

१२ त्वष्टा तक्ष्या रूपा इव [९४७]– ज्याप्रमाणें सुतार शस्त्रानें लांकडाला सुन्दर बनवतो, त्याप्रमाणें (अयं नः आ भुवत्) हा अग्नि आम्हांला सुन्दर बनवतो.

१३ दिवः न [९५३]– द्युलोकांतून जसा प्रकाश येतो, त्याप्रमाणें (सुतस्य मदः) सोमरसाचा आनंद मिळत आहे.

१४ स्वः न [९५३]– स्वर्गीय आनंदाप्रमाणें सोमाचा आनंद आहे.

१५ नव्यं न [९५३]– नवीन असल्याप्रमाणें (जठरं पृणस्व) आपलें पोट भरून सोमरस पी.

१६ मित्रः न [९५४]– मित्र जसा सहाय्य करतो त्याप्रमाणें (इन्द्रः वृत्रं जघान) इन्द्रानें वृत्राला मारून सहाय्य केलें.

१७ यतिः न [९५४]– संयमी वीर जसा शत्रूला मारतो, त्याप्रमाणें इन्द्रानें (वलं बिभेद) वल राक्षसाला मारलें.

१८ भृगुः न [९५४]– भृगु जसा शत्रूचा नाश करतो, त्याप्रमाणें (शत्रून् सासहे) शत्रूंचा पराभव करतो.

याप्रमाणें या अध्यायामध्यें उपमा आल्या आहेत.

पञ्चमाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
८८६	९।८६।४	अकृष्टा माषाः	पवमानः सोमः	जगती
८८७	९।८६।६	अकृष्टा माषाः	,,	,,
८८८	९।८६।५	अकृष्टा माषाः	,,	,,
८८९	९।६१।१६	अमहीयुरांगिरसः	,,	गायत्री
८९०	९।६१।१८	अमहीयुरांगिरसः	,,	,,
८९१	९।६१।१७	अमहीयुरांगिरसः	,,	,,
८९२	९।४१।१	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
८९३	९।४१।२	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
८९४	९।४१।३	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
८९५	९।४१।४	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
८९६	९।४१।५	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
८९७	९।४१।६	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
		(२)		
८९८	९।३९।१	बृहन्मतिरांगिरसः	,,	,,
८९९	९।३९।२	बृहन्मतिरांगिरसः	,,	,,
९००	९।३९।३	बृहन्मतिरांगिरसः	,,	,,
९०१	९।३९।४	बृहन्मतिरांगिरसः	,,	,,
९०२	९।३९।५	बृहन्मतिरांगिरसः	,,	,,
९०३	९।३९।६	बृहन्मतिरांगिरसः	,,	,,
९०४	९।६५।१	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
९०५	९।६५।२	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
९०६	९।६५।३	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
		(३)		
९०७	५।११।१	सुतंभर आत्रेयः	अग्निः	जगती
९०८	५।११।६	सुतंभर आत्रेयः	,,	,,
९०९	५।११।२	सुतंभर आत्रेयः	,,	,,
९१०	२।४१।४	गृत्समदः शौनकः	मित्रावरुणौ	गायत्री
९११	२।४१।५	गृत्समदः शौनकः	,,	,,
९१२	२।४१।६	गृत्समदः शौनकः	,,	,,
९१३	१।८४।१३	गोतमो राहूगणः	इन्द्रः	,,
९१४	१।८४।१४	गोतमो राहूगणः	,,	,,
९१५	१।८४।१५	गोतमो राहूगणः	,,	,,
९१६	७।९४।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	इन्द्राग्नी	,,
९१७	७।९४।२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
९१८	७।९४।३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
		(४)		
९१९	९।२५।१	दृढच्युत आगस्त्यः	पवमानः सोमः	गायत्री
९२०	९।२५।२	दृढच्युत आगस्त्यः	,,	,,
९२१	९।२५।३	दृढच्युत आगस्त्यः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
९२२	९।१०७।१९	सप्तर्षयः	पवमानः सोमः	प्रगाथः (विषमा बृहती, समा सतो बृहती)
९२३	९।१०७।२०	सप्तर्षयः	,,	,,
९२४	९।४०।१	बृहन्मतिरांगिरसः	,,	गायत्री
९२५	९।४०।२	बृहन्मतिरांगिरसः	,,	,,
९२६	९।४०।३	बृहन्मतिरांगिरसः	,,	,,
		(५)		
९२७	७।३२।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	इन्द्रः	विराट्
९२८	७।३२।२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
९२९	७।३२।३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
९३०	८।९७।१०	रेभः काश्यपः	,,	अतिजगती
९३१	८।९७।११	रेभः काश्यपः	,,	उपरिष्टाद्बृहती
९३२	८।९७।१२	रेभः काश्यपः	,,	,,
९३३	८।७०।१	पुरुहन्मा आंगिरसः	,,	प्रगाथः (विषमा बृहती, समा सतो बृहती)
९३४	८।७०।२	पुरुहन्मा आंगिरसः	,,	,,
		(६)		
९३५	९।९।१	असितः काश्यपो देवलो वा	पवमानः सोमः	गायत्री
९३६	९।९।३	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
९३७	९।९।२	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
९३८	९।१०८।३	शक्तिर्वासिष्ठः	,,	काकुभः प्रगाथः (विषमा ककुप्, समा सतो बृहती)
९३९	९।१०८।४	ऊरुरांगिरसः	,,	,,
९४०	९।१०६।१०	अग्निश्चाक्षुषः	,,	उष्णिक्
९४१	९।१०६।११	अग्निश्चाक्षुषः	,,	,,
९४२	९।१०६।१२	अग्निश्चाक्षुषः	,,	,,
९४३	९।९६।५	प्रतर्दनो दैवोदासिः	,,	त्रिष्टुप्
९४४	९।९६।६	प्रतर्दनो दैवोदासिः	,,	,,
९४५	९।९६।७	प्रतर्दनो दैवोदासिः	,,	,,
		(७)		
९४६	८।१०२।७	प्रयोगो भार्गवः	अग्निः	गायत्री
९४७	८।१०२।८	प्रयोगो भार्गवः	,,	,,
९४८	८।१०२।९	प्रयोगो भार्गवः	,,	,,
९४९	१।८४।४	गोतमो राहूगणः	इन्द्रः	अनुष्टुप्
९५०	१।८४।६	गोतमो राहूगणः	,,	,,
९५१	१।८४।५	गोतमो राहूगणः	,,	,,
९५२	—	पावकोऽग्निर्बार्हस्पत्यो वा, गृहपतियविष्ठौ सहसः पुत्रान्यतरो वा	,,	तृचात्मकं सूक्तम्
९५३	—	पावकोऽग्निर्बार्हस्पत्यो वा, गृहपतियविष्ठौ सहसः पुत्रान्यतरो वा	,,	,,
९५४	—	पावकोऽग्निर्बार्हस्पत्यो वा, गृहपतियविष्ठौ सहसः पुत्रान्यतरो वा	,,	,,

अथ षष्ठोऽध्यायः ।

अथ तृतीयप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ ३ ॥

[१]

(१-२३) १ (अकृष्टा माषावयः) त्रयः ऋषयः; २ कश्यपो मारीचः; ३, ४, १३ असितः काश्यपो देवलो वा; ५ अवत्सारः काश्यपः; ६, १६ जमदग्निर्भार्गवः; ७ अरुणो वैतहव्यः; ८ उरुचक्रिरात्रेयः; ९ कुरुसुतिः काण्वः; १० भरद्वाजो बार्हस्पत्यः, ११ भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा; १२ सप्तर्षयः (१ भरद्वाजो बार्हस्पत्यः, २ कश्यपो मारीचः, ३ गोतमो राहूगणः, ४ अत्रिर्भौमः, ५ विश्वामित्रो गाथिनः, ६ जमदग्निर्भार्गवः, ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः); १४, १५, २३ गोतमो राहूगणः; १७ (१) उर्ध्वसद्मा आंगिरसः, १७ (२) कृतयशा आंगिरसः, १८ त्रित आप्त्यः; १९ रेभसूनू काश्यपौ; २० मन्युर्वासिष्ठः; २१ वसुश्रुत आत्रेयः; २२ नृमेध आंगिरसः ॥ १-६, ११-१३; १६-२० पवमानः सोमः; ७, २१ अग्निः; ८ मित्रावरुणौ; ९, १४-१५, २२-२३ इन्द्रः, १० इंद्राग्नी ॥ १, ७ जगती; २-६, ८-११, १३, १६ गायत्री; १२ बृहती, १४, १५, २१ पंक्तिः; १७ काकुभः प्रगाथः= (विषमा ककुप्, समा सतो बृहती); १८, २२ उष्णिक्; १९, २३ अनुष्टुप्; २० त्रिष्टुप् ॥

९५५ गोवित्पवस्व वसुविद्धिरण्यविद्रेतोधा इन्दो भुवनेष्वर्पितः ।
त्वꣳ सुवीरो असि सोम विश्ववित्तं त्वा नर उप गिरेम आसते ॥ १ ॥ (ऋ. ९।८६।३९)

९५६ त्वं नृचक्षा असि सोम विश्वतः पवमान वृषभ ता वि धावसि ।
स नः पवस्व वसुमद्धिरण्यवद्वयꣳ स्याम भुवनेषु जीवसे ॥ २ ॥ (ऋ. ९।८६।३८)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[९५५] हे (इन्दो) सोमा ! (गो-वित्) गाई जवळ ठेवणारा, (वसु-वित्) धन जवळ ठेवणारा, (हिरण्य-वित्) सोनें जवळ ठेवणारा, (रेतो-धाः) वीर्य धारण करणारा (भुवनेषु अर्पितः) भुवनांमध्यें राहणारा, असा तूं (पवस्व) गाळला जा. हे (सोम) सोमा ! तूं (सुवीरः) उत्तम वीर (विश्व-वित्) सर्वज्ञानी (असि) आहेस. हे (नरः) नेता सोमा ! (तं त्वा) त्या तुझी (इमे गिरा उपासते) हे ऋत्विज स्तुति करून उपासना करतात. ॥ १ ॥

[९५६] हे (पवमान वृषभ सोम) शुद्ध होणाऱ्या बलवर्धक सोमा ! (विश्वतः नृचक्षाः असि) तूं सर्व प्रकारें मनुष्यांचा साक्षी आहेस. (ताः विधावसि) त्यांच्याजवळ तूं जातोस. (सः नः) तो तूं आम्हांसाठीं (पवस्व) गाळला जा. त्याच्या योगानें आम्ही (वसुमत् हिरण्यवत्) धन व सुवर्ण यांनीं युक्त होऊन (भुवनेषु जीवसे स्याम) लोकांमध्यें जिवंत राहणारे होऊं. ॥ २ ॥

९५७ ईशान इमा भुवनानि ईयसे युजान इन्दो हरितः सुपर्ण्यः ।
तास्ते क्षरन्तु मधुमद्घृतं पयस्तव व्रते सोम तिष्ठन्तु कृष्टयः ॥ ३ ॥ १ (खी) ॥
[धा० ४१ । उ० २ । स्व० ४] (ऋ. ९।८६।३७)

९५८ पवमानस्य विश्ववित्प्र ते सर्गा असृक्षत । सूर्यस्येव न रश्मयः ॥ १ ॥ (ऋ. ९।६४।७)

९५९ केतुं कृण्वं दिवस्परि विश्वा रूपाभ्यर्षसि । समुद्रः सोम पिन्वसे । ॥ २ ॥ (ऋ ९।६४।८)

९६० जज्ञानो वाचमिष्यसि पवमान विधर्मणि । क्रन्दं देवो न सूर्यः ॥ ३ ॥ २ (पा) ॥
[धा० १५ । उ० १ । स्व० २] (ऋ. ९।६४।९)

९६१ प्र सोमासो अधन्विषुः पवमानास इन्दवः । श्रीणाना अप्सु वृञ्जते ॥ १ ॥ (ऋ. ९।२४।१)

९६२ अभि गावो अधन्विषुरापो न प्रवता यतीः । पुनाना इन्द्रमाशत ॥ २ ॥ (ऋ. ९।२४।२)

९६३ प्र पवमान धन्वसि सोमेन्द्राय मादनः । नृभिर्यतो वि नीयसे ॥ ३ ॥ (ऋ. ९।२४।३)

९६४ इन्दो यदद्रिभिः सुतः पवित्रं परिदीयसे । अरमिन्द्रस्य धाम्ने ॥ ४ ॥ (ऋ. ९।२४।५)

---

[९५७] हे (इन्दो) सोमा ! (ईशानः) स्वामी असा तूं (हरितः सुपर्ण्यः युजानः) हरिद्वर्णाचे उत्तम चालणारे घोडे रथाला जोडून (इमा भुवनानि) या सर्व भुवनांमध्यें (ईयसे) जातोस. (ताः) ते (ते) तुझे रस (मधुमत् घृतं पयः) मधुरता युक्त चमकणाऱ्या जलामध्यें (क्षरन्तु) गाळले जावोत. हे (सोम) सोमा ! (कृष्टयः) यज्ञ करणारे मनुष्य (तव व्रते तिष्ठन्तु) तुझ्या यज्ञकर्मांत राहोत. ॥ ३ ॥

[९५८] हे (विश्ववित्) सर्वज्ञा सोमा ! (पवमानस्य ते सर्गाः) शुद्ध होत असतां तुझ्या धारा (सूर्यस्य रश्मयः इव) सूर्याच्या किरणांप्रमाणें (न प्रासृक्षत) यावेळीं खालीं पडत आहेत. ॥ १ ॥

[९५९] हे (सोम) सोमा ! (समुद्रः) पाण्यांत मिसळलेला तूं (केतुं कृण्वन्) ज्ञान प्रसार करीत (विश्वा रूपा) सर्व रूपांनीं (दिवः परि अभ्यर्षसि) अन्तरिक्षाच्या मार्गानें जाऊन आम्हांला (पिन्वसे) अनेक धनें देतोस. ॥ २ ॥

[९६०] हे (पवमान) शुद्ध होणाऱ्या सोमा ! (देवः सूर्यः न) तेजस्वी सूर्याप्रमाणें (जज्ञानः) प्रकट होणारा तूं (विधर्मणि) गाळणींतून (क्रन्दन्) शब्द करीत (वाचं इष्यसि) स्तुतिला प्राप्त होतोस. ॥ ३ ॥

[९६१] (पवमानासः इन्दवः सोमासः) गाळले जाणारे सोमरस (प्राधन्विषुः) खालील भांड्यांत पडत आहेत. (श्रीणानाः) ते सोमरस गोदुग्धामध्यें मिसळून (अप्सु वृंजते) पाण्यांत मिसळले जातात. ॥ १ ॥

[९६२] (गावः इन्दवः) गाळले जाणारे सोमरस (प्रवता यतीः) खालील भांड्यांत जातांना (आपः न) पाण्याप्रमाणें (अभि अधन्विषुः) गाळणीमधून खालीं गळतात. (पुनानाः) गाळले गेलेले हे सोमरस (इन्द्रं आशत) इन्द्राला प्राप्त होतात. ॥ २ ॥

[९६३] हे (पवमान सोम) गाळल्या जाणाऱ्या सोमा ! (इन्द्राय मादनः) इन्द्राला उत्साह देणारा तूं (प्र धन्वसि) गाळणीमधून खालीं पडतोस. नंतर (नृभिः यतः) ऋत्विजांनीं घेऊन (विनीयसे) तूं यज्ञ स्थानाजवळ नेला जात आहेस. ॥ ३ ॥

[९६४] हे (इन्दो) सोमा ! तूं (यद् अद्रिभिः सुतः) जेव्हां पाषाणांनीं कुटून रस काढल्यानंतर (पवित्रं परिदीयसे) गाळणीजवळ नेला जातोस, तेव्हां (इन्द्रस्य धाम्ने अरं) इन्द्राच्या पोटांत जाण्यास योग्य होतोस. ॥ ४ ॥

९६५ त्वꣳसोम नृमादनः पवस्व चर्षणीधृतिः । सस्निर्यो अनुमाद्यः ॥ ५ ॥ (ऋ. ९।२४।४)

९६६ पवस्व वृत्रहन्तम उक्थेभिरनुमाद्यः । शुचिः पावको अद्भुतः ॥ ६ ॥ (ऋ. ९।२४।६)

९६७ शुचिः पावक उच्यते सोमः सुतः स मधुमान् । देवावीरघशꣳसहा ॥ ७ ॥ २ (है) ॥

[धा० ४१ । उ० नास्ति । स्व० ८] (ऋ. ९।२४।७)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

९६८ प्र कविर्देववीतयेऽव्या वारेभिरव्यत । साह्वान्विश्वा अभि स्पृधः ॥ १ ॥ (ऋ. ९।२०।१)

९६९ स हि ष्मा जरितृभ्य आ वाजं गोमन्तमिन्वति । पवमानः सहस्रिणम् ॥ २ ॥ (ऋ. ९।२०।२)

९७० परि विश्वानि चेतसा मृज्यसे पवसे मती । स नः सोम श्रवो विदः ॥ ३ ॥ (ऋ. ९।२०।३)

९७१ अभ्यर्ष बृहद्यशो मघवद्भ्यो ध्रुवꣳरयिम् । इषꣳस्तोतृभ्य आ भर ॥ ४ ॥ (ऋ. ९।२०।४)

९७२ त्वं राजेव सुव्रतो गिरः सोमाविवेशिथ । पुनानो वह्ने अद्भुत ॥ ५ ॥ (ऋ. ९।२०।५)

९७३ स वह्निरप्सु दुष्टरो मृज्यमानो गभस्त्योः । सोमश्चमूषु सीदति ॥ ६ ॥ (ऋ. ९।२०।६)

---

[९६५] हे (सोम) सोमा ! (नृमादनः) मनुष्यांना आनंद देणारा (चर्षणी-धृतिः) ऋत्विजांनीं धारण केलेला (त्वं पवस्व) तूं गाळला जा. (यः सस्निः) जो सोम शुद्ध व (अनुमाद्यः) प्रशंसनीय आहे. ॥ ५ ॥

[९६६] हे सोमा ! (उक्थेभिः अनुमाद्यः) स्तोत्रांनीं स्तुति करण्यास योग्य (अद्भुतः शुचिः पावकः) अद्भुत, शुद्ध व पवित्र असा (वृत्रहन्तमः पवस्व) तूं शत्रूंचा नाश करणारा होऊन पवित्र हो. ॥ ६ ॥

[९६७] (सुतः मधुमान् सः) रस काढलेला मधुर असा तो (शुचिः पावकः) पवित्र व शुद्ध (देवावीः) देवतांना तृप्त करणारा व (अघ-शंस-हा) पापी असुरांचा नाशक असा तो सोम (उच्यते) वर्णिला जात असतो. ॥७॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[९६८] (कविः) ज्ञानी सोम (देव-वीतये) देवतांना देण्यासाठीं (अव्या वारेभिः) मेंढीच्या केसांच्या गाळणीनें (अव्यत) गाळला जात आहे. (साह्वान्) शत्रूंचा पराभव करणारा सोम (विश्वाः स्पृधः) सर्व दुष्टांना पराभूत करतो. ॥ १ ॥

[९६९] (पवमानः) पवित्र होणारा (स हि स्म) तो सोमच (जरितृभ्यः) स्तुति करणाऱ्यांना (गोमन्तं सहस्रिणं वाजं) गाईंनीं युक्त असें हजारों प्रकारचें अन्न (आ इन्वति) देत असतो. ॥ २ ॥

[९७०] हे (सोम) सोमा ! तूं (मती) आमच्या स्तुति म्हणून (मृज्यसे) गाळला जात आहेस. (सः) तो तूं (नः) आम्हांला (चेतसा) बुद्धिपूर्वक (विश्वानि श्रवः विदः) अनेक प्रकारचीं अन्नें दे. ॥ ३ ॥

[९७१] हे सोमा ! (मघवद्भ्यः स्तोतृभ्यः) धनवान् स्तोत्यांसाठीं (बृहत् यशः) मोठें यश (ध्रुवं रयिं) स्थायी धन (अभ्यर्ष) दे व (इषं आ भर) अन्न भरपूर दे. ॥ ४ ॥

[९७२] हे (वह्ने) यज्ञ करवणाऱ्या (अद्भुत सोम) अपूर्व सोमा ! (सुव्रतः पुरातनः राजा इव) उत्तम कार्य करणाऱ्या पुरातन राजाप्रमाणें (गिरः आ विवेशिथ) आमच्या स्तुतिचा तूं स्वीकार करतोस. ॥ ५ ॥

[९७३] (वह्निः) यज्ञ करवणारा (सोमः) सोम (अप्सु दुष्टरः) जलांमध्यें मिसळला जाणारा (गभस्त्योः मृज्यमानः) हातांनीं स्वच्छ केला जाणारा (सः सोमः) तो सोम (चमूषु सीदति) पात्रांमध्यें जाऊन राहतो. ॥६॥

*

९७४ क्रीडुर्मखो न मंहयुः पवित्रं सोम गच्छसि । दधत्स्तोत्रे सुवीर्यम् ॥ ७ ॥ ४ (को) ॥
[धा० २१ । उ० १ । स्व० ९] (ऋ. ९।२०।७)

९७५ यवंयवं नो अन्धसा पुष्टंपुष्टं परि स्रव । विश्वा च सोम सौभगा ॥ १ ॥ (ऋ.९।५५।१)

९७६ इन्दो यथा तव स्तवो यथा ते जातमन्धसः । नि बर्हिषि प्रिये सदः ॥ २ ॥ (ऋ. ९।५५।२)

९७७ उत नो गोविदश्ववित्पवस्व सोमान्धसा । मक्षूतमेभिरहभिः ॥ ३ ॥ (ऋ. ९।५५।३)

९७८ यो जिनाति न जीयते हन्ति शत्रुमभीत्य । स पवस्व सहस्रजित् ॥ ४ ॥ ५ (हि) ॥
[धा० ११ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ९।५५।४)

९७९ यास्ते धारा मधुश्चुतोऽसृग्रमिन्द ऊतये । ताभिः पवित्रमासदः ॥ १ ॥ (ऋ. ९।६२।७)

९८० सो अर्षेन्द्राय पीतये तिरो वाराण्यव्यया । सीदन्नृतस्य योनिमा ॥ २ ॥ (ऋ ९।६२।८)

९८१ त्वं सोम परि स्रव स्वादिष्ठो अङ्गिरोभ्यः । वरिवोविद्घृतं पयः ॥ ३ ॥ ६ (हि) ॥
[धा० ११ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ९।६२।९)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[९७४] हे (सोम) सोमा ! (क्रीडुः) क्रीडा करणारा तूं (मखः न) यज्ञाप्रमाणें (मंह-युः) दान देण्याची इच्छा करणारा (स्तोत्रे) स्तुति करणाऱ्याला (सुवीर्यं दधत्) उत्तम वीरता देऊन (पवित्रं गच्छसि) गाळणीवर जातोस. ॥ ७ ॥

[९७५] हे (सोम) सोमा ! (नः) आमच्यासाठीं (पुष्टं पुष्टं यवं यवं) अधिक पोषक रसाच्या (अन्धसा परिस्रव) अन्नाच्या धारेनें वहात रहा (च) आणि (विश्वा सौभगा) सर्व ऐश्वर्य दे. ॥ १ ॥

[९७६] हे (इन्दो) सोमा ! (ते अन्धसः स्तवः) तुझ्या अन्नाचें स्तोत्र (तव यथा जातं) तुझ्यासाठीं जसें झालें आहे त्याप्रमाणें तूं (प्रिये बर्हिषि निषदः) प्रिय आसनावर बैस. ॥ २ ॥

[९७७] (उत सोम) आणि हे सोमा ! (नः) आम्हांला (गो-वित्) गाई देणारा, (अश्ववित्) घोडे देणारा (मक्षूतमेभिः अहभिः) व अत्यंत लवकर (अन्धसा पवस्व) अन्नही देणारा हो. ॥ ३ ॥

[९७८] हे (सहस्रजित्) हजारों शत्रूंना जिंकणाऱ्या सोमा ! (यः जिनाति) जो तूं शत्रूंना जिंकतोस, पण (न जीयते) शत्रूंकडून जिंकला जात नाहींस आणि (शत्रुं अभीत्य हन्ति) शत्रूंवर चाल करून त्यांना मारतोस, असा (सः पवस्व) तो तूं धारेनें गाळला जा. ॥ ४ ॥

[९७९] हे (इन्दो) सोमा ! (ते) तुझ्या (मधुश्चुतः याः धाराः) मधुर रसाच्या ज्या धारा आहेत, त्या (ऊतये असृग्रन्) संरक्षणासाठीं असतात. (ताभिः पवित्रं आसदः) त्या धारांसह तूं गाळणीवर चढ. ॥ १ ॥

[९८०] हे सोमा ! (सः) तो तूं (अव्यया वाराणि) मेंढीच्या लोंकरीच्या गाळणीमधून (तिरः) गळतोस. (ऋतस्य योनिं आसीदन्) व यज्ञाच्या स्थानीं बसून (इन्द्राय पीतये अर्ष) इन्द्राला पिण्यासाठीं पुढें हो. ॥ २ ॥

[९८१] हे (सोम) सोमा ! (स्वादिष्ठः) तूं स्वादिष्ठ आहेस व (वरिवो-वित्) धन देणारा आहेस. म्हणून तूं (अंगिरोभ्यः) अंगिरांसाठीं (घृतं पयः परिस्रव) तेजस्वी दूध दे. ॥ ३ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३]

९८२ तव श्रियो वर्ष्यस्येव विद्युतोऽग्नेश्चिकित्र उषसामिवेतयः ।
यदोषधीरभिसृष्टो वनानि च परि स्वयं चिनुषे अन्नमासनि ॥ १ ॥ (ऋ. १०।९१।५)

९८३ वातोपजूत इषितो वशाꣳ अनु तृषु यदन्ना वेविषद्वितिष्ठसे
आ ते यतन्ते रथ्यो३यथा पृथक् शर्धाꣳस्यग्ने अजरस्य धक्षतः ॥ २ ॥ (ऋ. १०।९१।७)

९८४ मेधाकारं विदथस्य प्रसाधनमग्निꣳहोतारं परिभूतरं मतिम् ।
त्वामर्भस्य हविषः समानमित्त्वां महो वृणते नान्यं त्वत् ॥ ३ ॥ ७ (बु) ॥
[धा० ३९ । उ० ३ । स्व० ५] (ऋ. १०।९१।८)

९८५ पुरूरुणा चिद्ध्यस्त्यवो नूनं वां वरुण । मित्र वꣳसि वाꣳसुमतिम् ॥ १ ॥ (ऋ. ५।७०।१)

९८६ ता वाꣳ सम्यगद्रुह्वाणेषमश्याम धाम च । वयं वां मित्रा स्याम ॥ २ ॥ (ऋ. ५।७०।२)

[३] तृतीयः खण्डः ।

[९८२] हे अग्ने ! (यत्) जेव्हां तूं (ओषधीः वनानि च) औषधी व वनें (अभिसृष्टः) जाळण्यासाठीं घेतोस (स्वयं आसन्) तेव्हां स्वतः आपल्या मुखामध्यें (अन्नं परिचिनुषे) स्थावर जंगम जगत्‌रूपी अन्न घालतोस, त्यावेळीं (तव श्रियः) तुझीं किरणें (वर्ष्यस्य विद्युतः इव) वृष्टीच्या वेळच्या विजांप्रमाणें (उषसां ऊतयः इव) अथवा उषःकालच्या प्रकाशाप्रमाणें (चिकित्रे) दिसूं लागतात. ॥ १ ॥

[९८३] हे (अग्ने) अग्ने ! (यत् वातोपजूतः) जेव्हां तूं वायूनें कंपायमान होतोस, (वशान् अनु) तेव्हां प्रिय वनस्पतिंमध्यें (तृषु इषितः) लवकर प्रेरित होऊन (अन्ना वेविषत्) आपल्या अन्नाला घेरतोसच, (वितिष्ठसे) तेथेंच राहतोस. तेव्हां (अजरस्य धक्षतः ते) जरारहित तरुणासारख्या भस्म करूं इच्छिणाऱ्या तुझी (शर्धांसि) तेजें (रथ्यः यथा) रथीवीरांप्रमाणें (पृथक् आयतन्ते) पृथक् पृथक् वाढत आहेत अशीं दिसतात. ॥ २ ॥

[९८४] (मेधाकारं) बुद्धिला करणारा (विदथस्य प्रसाधनं) यज्ञाचें साधन (होतारं) देवतांना बोलावून आणणारा, (परिभू-तरं) शत्रूचा पराभव करणारा (मतिं) बुद्धिचा प्रेरक अशा (अग्निं) अग्निची आम्ही प्रार्थना करतों. हे अग्ने ! (त्वां इत्) तुलाच (अर्भस्य हविषः) थोडें हविष्यान्न भक्षण करण्यासाठीं, (त्वां इत् महः) तुलाच पुष्कळ हवि भक्षण करण्यासाठीं (समानं वृणते) एकत्र होऊन प्रार्थना करतों, बोलावतों. (त्वत् अन्यं न) तुझ्याशिवाय दुसऱ्या देवतेला बोलावीत नाहीं. ॥ ३ ॥

[९८५] हे मित्र व वरुण हो ! (वां) तुम्हां दोघांचें (पुरूरुणा अवः) पुष्कळ संरक्षण (नूनं अस्ति) खरोखर आहे. हें (हि) प्रसिद्धच आहे. (चित्) आणि हे (वरुण मित्र) वरुणा व हे मित्रा ! (वां सुमतिं वंसि) तुमची अनुकूल बुद्धि प्राप्त होवो. ॥ १ ॥

[९८६] आम्ही स्तुति करणारे (अ-द्रुह्वाणा) द्रोह न करणाऱ्या (ता वां) त्या तुम्हां दोघांची (सम्यक्) नीटपणानें स्तुति करीत आहों. (वयं) आम्ही (वां मित्रा स्याम) तुमचे मित्र होऊन राहूं व (इषं) अन्नाला (च धाम) आणि स्थानाला (अश्याम) प्राप्त करूं. ॥ २ ॥

९८७ पातं नो मित्रा पायुभिरुत त्रायेथाऽसुत्रात्रा । साह्याम दस्यूं तनूभिः ॥ ३ ॥ ८ (य) ॥
[धा० १२ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ९।७०।३)

९८८ उत्तिष्ठन्नोजसा सह पीत्वा शिप्रे अवेपयः । सोममिन्द्र चमू सुतम् ॥ १ ॥ (ऋ. ८।७६।१०)

९८९ अनु त्वा रोदसी उभे स्पर्धमान मदेताम् । इन्द्र यद्दस्युहाभवः ॥ २ ॥ (ऋ. ८।७६।११)

९९० वाचमष्टापदीमहं नवस्रक्तिमृतावृधम् । इन्द्रात्परितन्वं ममे ॥ ३ ॥ ९ (ही) ॥
[धा० ११ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ८।७६।१२)

९९१ इन्द्राग्नी युवामिमे३ऽभि स्तोमा अनूषत । पिबतंऽशम्भुवा सुतम् ॥ १ ॥ (ऋ. ६।६०।७)

९९२ या वांऽसन्ति पुरुस्पृहो नियुतो दाशुषे नरा । इन्द्राग्नी ताभिरा गतम् ॥२॥ (ऋ. ६।६०।८)

९९३ ताभिरा गच्छतं नरोपेदऽसवनऽसुतम् । इन्द्राग्नी सोमपीतये ॥ ३ ॥ १० (हा) ॥
[धा० ११ । उ० नास्ति० । स्व० २] (ऋ. ६।६०।९)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

९९४ अर्षा सोम द्युमत्तमोऽभि द्रोणानि रोरुवत् । सीदन्योनौ वनेष्वा ॥ १ ॥ (ऋ. ९।६५।१९)

---

[९८७] हे (मित्रा) मित्र व वरुणानों ! तुम्ही (नः) आमचें (पायुभिः पातं) संरक्षणाच्या साधनांनीं रक्षण करा. (उत) आणि (सुत्रात्रा त्रायेथां) उत्तम संरक्षण करणारे तुम्ही आमचें पालन करा. आम्हीहि (तनूभिः) आपल्या शारीरिक सामर्थ्यांनीं (दस्यून् साह्याम) शत्रूंचा पराभव करूं. ॥ ३ ॥

[९८८] हे (इन्द्र) इन्द्रा ! तूं (चमू-सुतं सोमं पीत्वा) पात्रांमध्यें ठेवलेल्या सोमरसाचें पान करून (ओजसा सह उतिष्ठन्) बलानें उठून (शिप्रे अवेपयः) आपल्या हनुवटींना हालव. ॥ १ ॥

[९८९] हे (स्पर्धमान इन्द्र) स्पर्धा करणाऱ्या इन्द्रा ! (त्वा अनु) तुझ्या अनुकूल (उभे रोदसी) दोघेही द्युलोक व पृथिवी (मदेतां) आनंदानें होतात. (यत्) जेव्हां तूं (दस्युहा भवः) शत्रूंचा नाश करणारा होतोस. ॥ २ ॥

[९९०] (अष्टापदीं) आठ चरणांची (नव-स्रक्तिं) नव्या कल्पनांनीं युक्त (ऋता-वृधं वाचं) सत्याला वाढवणारी स्तुति (तन्वं) लहानशीच (अहं परिममे) मी करीत आहें. ॥ ३ ॥

[९९१] हे (इन्द्राग्नी) इन्द्र व अग्नि हो ! (युवां) तुम्हां दोघांची (इमे स्तोमाः अभ्यनूषत) हे स्तुति करणारे स्तुति करीत आहेत. हे (शं-भुवा) सुख देणाऱ्या इन्द्र व अग्नि ! (सुतं पिबतं) सोमरस प्या. ॥ १ ॥

[९९२] (नरा इन्द्राग्नी) हे नेता इन्द्र व अग्नि ! (वां) तुम्हां दोघांच्या (पुरु-स्पृहः) पुष्कळांनीं प्रशंसा करण्यास योग्य (दाशुषे) दान देणाऱ्याच्या सहाय्यासाठीं (याः नियुतः सन्ति) ज्या घोड्या आहेत (ताभिः आगतं) त्यांच्या सहाय्यानें येथें या. ॥ २ ॥

[९९३] हे (नरा इन्द्राग्नी) नेता इन्द्र व अग्नि हो ! (इदं सुतं सवनं उप) या शुद्ध केलेल्या सोमरसाजवळ (सोम-पीतये) सोम पिण्यासाठीं (ताभिः आगच्छतं) त्या घोड्यांनीं या. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[९९४] हे (सोम) सोमा ! (द्युमत्तमः) तेजस्वी असा तूं (वनेषु योनौ आसीदन्) काष्ठपात्रांमध्यें राहून (द्रोणानि अभि) द्रोण-कलशांमध्यें (रोरुवत् अर्ष) शब्द करीत जा. ॥ १ ॥

९९५ अप्सा इन्द्राय वायवे वरुणाय मरुद्भ्यः । सोमा अर्षन्तु विष्णवे ॥ २ ॥ (ऋ. ९।६३।२०)

९९६ इषं तोकाय नो दधदस्मभ्यं सोम विश्वतः । आ पवस्व सहस्रिणम् ॥ ३ ॥ ११ (ला) ॥

[धा० १४ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ ९।६३।२१)

९९७ सोम उ ष्वाणः सोतृभिरधि ष्णुभिरवीनाम् ।
अश्वयेव हरिता याति धारया मन्द्रया याति धारया ॥ १ ॥ (ऋ ९।१०७।८)

९९८ अनूपे गोमान् गोभिरक्षाः सोमो दुग्धाभिरक्षाः ।
समुद्रं न संवरणान्यग्मन्मन्दी मदाय तोशते ॥ २ ॥ १२ (फ) ॥

[धा० १५ । उ० २ । स्व० १] (ऋ. ९।१०७।९)

९९९ यत्सोम चित्रमुक्थ्यं दिव्यं पार्थिवं वसु । तन्नः पुनान आ भर ॥ १ ॥ (ऋ ९।१९।१)

१००० वृषा पुनान आयूंषि स्तनयन्नधि बर्हिषि । हरिः सन्योनिमासदः ॥ २ ॥ (ऋ. ९।१९।३)

१००१ युवंहि स्थः स्वःपती इन्द्रश्च सोम गोपती । ईशाना पिप्यतं धियः ॥ ३ ॥ १३ (पु) ॥

[धा० १५ । उ० १ । स्व० ५] (ऋ. ९।१९।२)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

---

[९९५] (अप्साः) पाण्याशीं मिसळलेले (सोमाः) सोमरस (इन्द्राय वायवे) इन्द्र, वायु (वरुणाय मरुद्भ्यः) वरुण, मरुत् (विष्णवे अर्षन्तु) व विष्णु यांसाठीं कलशामध्यें येवोत. ॥ २ ॥

[९९६] हे (सोम) सोमा ! (अस्माकं तोकाय) आमच्या पुत्रांसाठीं (इषं दधत्) अन्न देत (सहस्रिणं) सहस्रप्रकारचें धन (विश्वतः अस्मभ्यं आ पवस्व) चारही बाजूंनीं आमच्यासाठीं आणून दे. ॥ ३ ॥

[९९७] (सोतृभिः) सोमरस तयार करणाऱ्या ऋत्विजांनीं (स्वानः सोमः) काढलेला सोमरस (अवीनां स्नुभिः) मेंढीच्या लोंकरीच्या छाननीमधून (अधि याति) वेगानें गाळला जात आहे; (उ) खरोखर (अश्वया इव) घोडीप्रमाणें (हरिता धारया) हिरव्या रंगाच्या धारेनें (मन्द्रया धारया) आनन्दकारक धारेनें (याति) कलशामध्यें पडतो. ॥ १ ॥

[९९८] (गोमान् सोमः) गाईंनीं युक्त सोम (अनूपे गोभिः अक्षाः) कलशामध्यें गोदुग्धासह टपकत आहे. (सोमः दुग्धाभिः अक्षाः) सोम दुधासह टपकत आहे. (समुद्रं न) समुद्राला जलप्रवाह जातात, तसें (सं वरणानि अग्मन्) सोमरसरूपी अन्न कलशामध्यें जात आहे. (मन्दी मदाय तोशते) आनन्ददायक सोम आनन्दप्राप्तीसाठीं कुटला जात आहे. ॥ २ ॥

[९९९] हे (सोम) सोमा ! (यत्) जें (चित्रं उक्थ्यं दिव्यं) विलक्षण दिव्य असें (पार्थिवं वसु) पृथ्वीवरचें धन आहे (तत्) तें धन (पुनानः नः आभर) शुद्ध होणारा तूं सोम आम्हांला दे. ॥ १ ॥

[१०००] (आयूंषि पुनानः) याजकांचीं आयुष्यें पवित्र करणारा (वृषा स्तनयन्) बलानें शब्द करीत (अधि बर्हिषि) आसनावर (हरिः सन्) हिरव्या रंगाचा असतांना (योनिं आसदः) तूं आपल्या स्थानावर बैस. ॥२॥

[१००१] (सोम च इन्द्र) सोमा व इन्द्रा ! (युवं हि स्वः पती स्थः) तुम्ही दोघे खरोखर सर्वांचे अधिपति आहात. (गोपती ईशाना) गोपालक व ऐश्वर्याचे स्वामी असे तुम्ही (धियं पिप्यतं) आमच्या बुद्धींना पुष्ट करा. ॥३॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५]

१००२ इन्द्रो मदाय वावृधे शवसे वृत्रहा नृभिः ।
तमिन्महत्स्वाजिषूतिमर्भे हवामहे स वाजेषु प्र नोऽविषत् ॥ १ ॥ (ऋ. १।८१।१)

१००३ असि हि वीर सेन्योऽसि भूरि परादादिः ।
असि दभ्रस्य चिद्वृधो यजमानाय शिक्षसि सुन्वते भूरि ते वसु ॥ २ ॥ (ऋ. १।८१।२)

१००४ यदुदीरत आजयो धृष्णवे धीयते धनम् ।
युङ्क्ष्वा मदच्युता हरी कꣳ हनः कꣳ वसौ दधोऽस्माꣳ इन्द्र वसौ दधः ॥३॥ १४ (खु)॥
[धा० २६ । उ० २ । स्व० ५] (ऋ १।८१।३)

१००५ स्वादोरित्था विषूवतो मधोः पिबन्ति गौर्यः ।
या इन्द्रेण सयावरीर्वृष्णा मदन्ति शोभया वस्वीरनु स्वराज्यम् ॥ १ ॥ (ऋ. १।८४।१०)

१००६ ता अस्य पृशनायुवः सोमꣳ श्रीणन्ति पृश्नयः ।
प्रिया इन्द्रस्य धेनवो वज्रꣳ हिन्वन्ति सायकं वस्वीरनु स्वराज्यम् ॥ २ ॥ (ऋ १।८४।११)

---

[५] पञ्चमः खण्डः ।

[१००२] (वृत्र-हा इन्द्रः) शत्रूनाशक इन्द्र (मदाय शवसे) आनन्द मिळावा व बल वाढावें यासाठीं (नृभिः वावृधे) याजकांकडून अधिक मोठा केला गेला आहे, (तं इत्) त्याच्याजवळ (महत्सु आजिषु) मोठ्या संग्रामांमध्यें (अर्भे) व लहान युद्धांमध्यें (ऊतिं हवामहे) आम्ही संरक्षण मागतों. (सः वाजेषु) तो युद्धांमध्यें (नः प्राविषत्) आमचें संरक्षण करो. ॥ १ ॥

[१००३] हे (वीर) वीरा इन्द्रा ! (सैन्यः असिः) तूं सैन्यच आहेस. म्हणून (भूरिः परादादिः असि) शत्रूंच्या पुष्कळ धनाचें हरण करणारा आहेस. (दभ्रस्य चित् वृधः) लहानालाहि तूं मोठा करणारा आहेस. (सुन्वते यजमानाय शिक्षसि) सोमयाग करणाऱ्या यजमानाला तूं धन देतोस. कारण (ते भूरि वसु) तुझ्याजवळ पुष्कळच धन आहे. ॥ २ ॥

[१००४] (यत् आजयः उदीरते) जेव्हां युद्धें उत्पन्न होतात, तेव्हां (धृष्णवे धना धीयते) विजयी वीराला धन मिळत असतें. हे इन्द्रा ! युद्धाच्यावेळीं (मदच्युता हरी युंक्ष्व) मद गळत आहे असे घोडे रथाला जोड. (कं हनः) कोणाला मारावें व (कं वसौ दधः) कोणाला धनामध्यें स्थापावें हें ठरव. हे (इन्द्र) इन्द्रा ! (अस्मान् वसौ दधः) आम्हांला धनामध्यें ठेव. ॥ ३ ॥

[१००५] (स्वादोः) स्वादु (इत्था विषूवतः मधोः) व याप्रमाणें सर्व यज्ञांत व्यापणाऱ्या मधुर सोमरसाला (गौर्यः पिबन्ति) गोऱ्या रंगाच्या गाई पितात. (याः इन्द्रेण शोभथाः) ज्या इन्द्राबरोबर राहून शोभत असतात. (वृष्णाः सयावरीः मदन्ति) बलशाली इन्द्राबरोबर जाणाऱ्या गाई आनन्दित दिसतात. अशा (वस्वीः स्वराज्यं अनु) दूध देऊन निवास करणाऱ्या गाई आपल्या राज्यामध्यें राहिल्या आहेत. ॥ १ ॥

[१००६] (ताः अस्य) त्या या इन्द्राच्या (पृशनायुवः पृश्नयः) स्पर्श व्हावा अशी इच्छा करणाऱ्या गाई (सोमं श्रीणन्ति) आपलें दूध सोमरसांत मिसळतात, (इन्द्रस्य प्रियाः धेनवः) इन्द्राच्या या आवडत्या गाई (सायकं वज्रं हिन्वन्ति) शत्रूनाशक वज्राला प्रेरणा देतात. (वस्वीः स्वराज्यं अनु) आपलें दूध देऊन आपल्या राज्यांत राहतात. ॥ २ ॥

१००७ ता अस्य नमसा सहः सपर्यन्ति प्रचेतसः ।
व्रतान्यस्य सश्चिरे पुरूणि पूर्वचित्तये वस्वीरनु स्वराज्यम् ॥ ३ ॥ १५ (व) ॥
[धा० १२ । उ० नास्ति । स्व १](ऋ. १।८४।१२)

॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

[६]

१००८ असाव्यꣳशुर्मदायाप्सु दक्षो गिरिष्ठाः । श्येनो न योनिमासदत् ॥ १ ॥ (ऋ. ९।६२।४)

१००९ शुभ्रमन्धो देववातमप्सु धौतं नृभिः सुतम् । स्वदन्ति गावः पयोभिः ॥ २ ॥
(ऋ. ९।६२।५)

१०१० आदीमश्वं न हेतारमशूशुभन्नमृताय । मधो रसꣳ सधमादे ॥ ३ ॥ १६ (चु) ॥
[धा० १२ । उ० १ । स्व० ९] (ऋ. ९।६२।६)

१०११ अभि द्युम्नं बृहद्यश इषस्पते दिदीहि देव देवयुम् । वि कोशं मध्यमं युव ॥ १ ॥
(ऋ. ९।१०८।९)

[१००७] (प्रचेतसः ताः) विशेष बुद्धिवान् अशा त्या गाई (अस्य सहः) या इन्द्राच्या साहसाला (नमसा सपर्यन्ति) आपल्या दूधरूपी अन्नानें पूजीत असतात. (पूर्व-चित्तये) पूर्वीचे शत्रु मारले हें समजावें यासाठीं (अस्य पुरूणि व्रतानि) या इन्द्राचीं पूर्वीचीं पुष्कळ कार्यें (सश्चिरे) आठवतात. (वस्वीः स्वराज्यं अनु) दुध देऊन आपल्या राज्यांत त्या अनुकूल होऊन राहतात. ॥ ३ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६] षष्ठः खण्डः ।

[१००८] (गिरिष्ठाः अंशुः) पर्वतावर उगवणाऱ्या सोमाचा (मदाय असावि) आनन्द मिळावा यासाठीं रस काढला आहे. (अप्सु दक्षः) नंतर पाण्याशीं तो मिसळला आहे. त्यानंतर (श्येनः न) श्येन पक्ष्याप्रमाणें (योनिं आसदत्) हा आपल्या स्थानावर बसत आहे. ॥ १ ॥

[१००९] (देव-वातं शुभ्रं अन्धः) देवतांना देण्यासाठीं स्वच्छ सुन्दर अन्न अशा (नृभिः सुतं) ऋत्विजांनीं तयार केलेल्या (अप्सु धौतं) पाण्यांमध्यें मिसळलेल्या सोमरसाला (गावः) गाई (पयोभिः स्वदन्ति) आपल्या दूधाशीं मिसळून स्वादिष्ट करतात. ॥ २ ॥

[१०१०] (आत्) नंतर (हेतारं ईं मधोः रसं) स्फूर्ति देणाऱ्या या सोमरसाला (सधमादे अमृताय अशूशुभन्) यज्ञामध्यें अमरत्व प्राप्त व्हावें यासाठीं ऋत्विज सुशोभित करतात. (अश्वं न) जसा संग्रामांत जाणाऱ्या घोड्याला सजवितात. ॥ ३ ॥

[१०११] (इषस्पते देव) हे अन्नपते सोमदेवा ! (देवयुं द्युम्नं बृहत् यशः) देव ज्याची इच्छा करतात असें तेजस्वी मोठें अन्न (अभि दिदीहि) आम्हांला दे. (मध्यमं कोशं वियुव) मधल्या भांड्यांत जाऊन रहा. ॥ १ ॥

१०१२ आ वच्यस्व सुदक्ष चम्वोः सुतो विशां वह्निर्न विश्पतिः ।
वृष्टिं दिवः पवस्व रीतिमपो जिन्वन् गविष्टये धियः ॥ २ ॥ १७ (डा) ॥
[धा० १८ । उ० ३ । स्व० २] (ऋ. ९।१०८।१०)

१०१३ प्राणा शिशुर्महीनाꣳ हिन्वन्नृतस्य दीधितिम् ।
विश्वा परि प्रिया भुवदध द्विता ॥ १ ॥ (ऋ ९।१०२।१)

१०१४ उप त्रितस्य पाष्योऽरभक्त यद्गुहा पदम् । यज्ञस्य सप्त धामभिरध प्रियम् ॥ २ ॥
(ऋ. ९।१०२।२)

१०१५ त्रीणि त्रितस्य धारया पृष्ठेष्वैरयद्रयिम् ।
मिमीते अस्य योजना वि सुक्रतुः ॥ ३ ॥ १८ (री) ॥
[धा० ८ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ९।१०२।३)

१०१६ पवस्व वाजसातये पवित्रे धारया सुतः । इन्द्राय सोम विष्णवे देवेभ्यो मधुमत्तरः ॥१॥
(ऋ. ९।१००।६)

१०१७ त्वाꣳ रिहन्ति धीतयो हरिं पवित्रे अद्रुहः । वत्सं जातं न मातरः पवमान विधर्मणि ॥२॥
(ऋ. ९।१००।७)

[१०१२] हे (सु-दक्ष) उत्तम बलवान् सोमा ! (चम्वोः सुतः) कलशामध्यें ठेवलेला तूं (वह्निः न) सर्व प्रजांचा चालक जसा राजा असतो, तसा (विशां विश्पतिः) तूं प्रजांचा पालक होऊन (आ वच्यस्व) कलशामध्यें जा. (गविष्टये) गायी प्राप्त करूं इच्छिणाऱ्या यजमानाच्या (धियः जिन्वन्) बुद्धिना प्रेरणा करीत (दिवः अपः वृष्टिं रीतिं) द्युलोकामधून जसें पाणी पडतें त्याप्रमाणें (पवस्व) खालील भांडचांत तूं गाळला जा. ॥ २ ॥

[१०१३] (प्राणाः) यज्ञाचा प्राण असल्यासारखा (महीनां शिशुः) जलांचा पुत्र सोम (ऋतस्य दीधितिं हिन्वन्) यज्ञाच्या प्रकाशक अशा आपल्या रसाला प्रेरणा करीत (विश्वा प्रिया परिभुवत्) सर्व प्रिय हविंपेक्षां अधिक महत्त्वाचा होतो व (अध द्विता) नंतर द्युलोक व भूलोक यांमध्यें राहत असतो. ॥ १ ॥

[१०१४] (त्रितस्य गुहा) त्रित नामक ऋषिच्या गुहेमध्यें (पाष्योः पदं) दोन फलकांच्या मध्यें स्थान (यत् उप अभक्त) जेव्हां त्या सोमानें प्राप्त केलें, (अध) तेव्हां (यज्ञस्य सप्त धामभिः) यज्ञाच्या सात छन्दांनीं (प्रियं अभि) प्रिय सोमाची ऋत्विज स्तुति करूं लागले. ॥ २ ॥

[१०१५] हे सोमा ! (धारया) आपल्या रसाच्या धारेनें (त्रितस्य त्रीणि) त्रिताच्या तीनही सवनांमध्यें (पृष्ठेषु रयिं ऐरयत्) सामगान चाललें असतां धन देणाऱ्या इन्द्राला प्रेरणा कर, कारण (सु-क्रतुः) उत्तम यज्ञ करणारा स्तोता (अस्य योजना) या इन्द्राच्या स्तोत्रांचेंच (वि मिमीते) उच्चारण करीत आहे. ॥ ३ ॥

[१०१६] हे (सोम) सोमा ! (सुतः) रस तयार केल्यावर तूं (इन्द्राय विष्णवे देवेभ्यः) इन्द्र, विष्णु व सर्व देव यांसाठीं (मधुमत्तरः) अत्यन्त मधुर होऊन (वाज-सातये) अन्नाच्या प्राप्तीसाठीं (पवित्रे धारया पवस्व) गाळणीमधून धारेनें टपकत उतर. ॥ १ ॥

[१०१७] हे (पवमान) शुद्ध होणाऱ्या सोमा ! (विधर्मणि) यज्ञामध्यें (अ-द्रुहः धीतयः) द्रोह न करणाऱ्या अंगुली (हरिं) हिरव्या रंगाच्या (त्वां पवित्रे रिहन्ति) तुला गाळणीमध्यें दाबतात. (जातं वत्सं मातरः न) नवीन जन्मलेल्या वासराला ज्याप्रमाणें गाई चाटतात. ॥ २ ॥

१०१८ त्वं द्यां च महिव्रत पृथिवीं चाति जभ्रिषे ।
प्रति द्रापिममुञ्चथाः पवमान महित्वना ॥ ३ ॥ १९ (ता) ॥
[धा० २४ । उ० १ । स्व० २] (ऋ. ९।१००।९)

१०१९ इन्दुर्वाजी पवते गोन्योघा इन्द्रे सोमः सह इन्वन्मदाय ।
हन्ति रक्षो बाधते पर्यरातिं वरिवस्कृण्वन्वृजनस्य राजा ॥ १ ॥ (ऋ. ९।९७।१०)

१०२० अध धारया मध्वा पृचानस्तिरो रोम पवते अद्रिदुग्धः ।
इन्दुरिन्द्रस्य सख्यं जुषाणो देवो देवस्य मत्सरो मदाय ॥ २ ॥ (ऋ. ९।९७।११)

१०२१ अभि व्रतानि पवते पुनानो देवो देवान्त्स्वेन रसेन पृञ्चन् ।
इन्दुर्धर्माण्यृतुथा वसानो दश क्षिपो अव्यत सानो अव्ये ॥ ३ ॥ २० (पी) ॥
[धा० २० । उ० १ । स्व० ४] (ऋ. ९।९७।१२)

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

[७]

१०२२ आ ते अग्न इधीमहि द्युमन्तं देवाजरम् ।
यद्ध स्या ते पनीयसी समिद्दीदयति द्यवीषं स्तोतृभ्य आ भर ॥ १ ॥ (ऋ. ५।६।४)

[१०१८] (महीव्रत) यज्ञरूप मोठें व्रत करणाऱ्या सोमा ! (त्वं) तूं (द्यां च पृथिवीं च) द्युलोक व पृथिवी यांना (अति जभ्रिषे) उत्तम रीतिनें धारण करतोस. हे (पवमान) शुद्ध होणाऱ्या सोमा ! (महित्वना द्रापिं प्रति अमुंचथाः) तूं आपल्या मोठेपणाला योग्य कवच धारण करतोस. ॥ ३ ॥

[१०१९] (वाजी) बलवान् (गोन्योधा) रस ज्यांतून वाहत आहे असा (इन्दुः सोमः) सोम (इन्द्रे सहः इन्वन्) इन्द्रामध्यें साहस उत्पन्न करून (मदाय पवते) आनन्द वाढवण्यासाठीं गाळला जात आहे. (वृजनस्य राजा) बलाचा राजा (वरिवः कृण्वन्) स्तोत्यांना धन देत (रक्षः हन्ति) राक्षसांचा नाश करतो आणि (अ-रातिं परि बाधते) शत्रूंना त्रास देतो. ॥ १ ॥

[१०२०] (अध) त्यानंतर (अद्रिदुग्धः) रस काढलेला सोम (मध्वा धारया पृचानः) मधु धारेनें देवांना तृप्त करीत (रोम तिरः पवते) लोंकरीच्या छाननींमधून गळत आहे. (इन्द्रस्य सख्यं जुषाणः) इन्द्राच्या मैत्रीची इच्छा करून (देवः मत्सरः इन्दुः) चमकणारा आनन्दवर्धक सोम (देवस्य मदाय पवते) इन्द्राचा उत्साह वाढवण्यासाठीं गाळला जात आहे. ॥ २ ॥

[१०२१] (धर्माणि व्रतानि) धार्मिक व्रतांना (ऋतुथा वसानः) ऋतुंच्या अनुकूल करीत (पुनानः इन्दुः) गाळला जाणारा सोम (अभि पवते) कलशामध्यें गाळला जात आहे. (देवः) तेजस्वी सोम (स्वेन रसेन देवान् पृंचन्) आपल्या रसानें देवांना सन्तोष देत (दश क्षिपः) दहा अंगुली (सानो अव्ये अव्यत) उच्चस्थानीं असलेल्या लोंकरीच्या गाळणीमध्यें त्याला पोंचवीत आहेत. ॥ ३ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

[७] सप्तमः खण्डः ।

[१०२२] हे (अग्ने) अग्निदेवा ! (द्युमन्तं अजरं) तेजस्वी व जरारहित अशा (ते आ इधीमहि) तुला आम्ही अधिक प्रदीप्त करीत आहों. (यत् ह ते स्या पनीयसी समित्) जेव्हां तुझी ही प्रशंसनीय समिधा (द्यवि दीदयति) द्युलोकामध्यें प्रकाशूं लागते, तेव्हां हे अग्ने ! तूं (स्तोतृभ्यः इषं आभर) स्तुति करणारांना अन्न भरपूर दे. ॥१॥

*

१०२३ आ ते अग्न ऋचा हविः शुक्रस्य ज्योतिषस्पते ।
सुश्चन्द्र दस्म विश्पते हव्यवाट् तुभ्यं हूयत इषं स्तोतृभ्य आ भर ॥२॥ (ऋ. ५।६।५)

१०२४ ओभे सुश्चन्द्र विश्पते दर्वी श्रीणीष आसनि ।
उतो न उत्पुपूर्या उक्थेषु शवसस्पत इषं स्तोतृभ्य आ भर ॥ ३ ॥ २१ (रा) ॥
[धा० २८ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ५।६।९)

१०२५ इन्द्राय साम गायत विप्राय बृहते बृहत् । ब्रह्मकृते विपश्चिते पनस्यवे ॥ १ ॥
(ऋ. ८।९८।१)

१०२६ त्वमिन्द्राभिभूरसि त्वं सूर्यमरोचयः । विश्वकर्मा विश्वदेवो महाँ असि ॥ २ ॥
(ऋ. ८।९८।२)

१०२७ विभ्राजं ज्योतिषा स्वरगच्छो रोचनं दिवः ।
देवास्त इन्द्र सख्याय येमिरे । ॥ ३ ॥ २२ (व) ॥
[धा० १९ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ८।९८।३)

१०२८ असावि सोम इन्द्र ते शविष्ठ धृष्णवा गहि ।
आ त्वा पृणक्त्विन्द्रियं रजः सूर्यो न रश्मिभिः ॥ १ ॥ (ऋ. १।८४।१)

[१०२३] (सुश्चन्द्र) हे श्रेष्ठ आनन्द देणाऱ्या ! (दस्म) शत्रूनाशका, (विश्पते हव्यवाट्) प्रजापालका व हवि पोंचवणाऱ्या, (ज्योतिषस्पते अग्ने) प्रकाशमान् अग्ने ! (शुक्रस्य ते) प्रदीप्त अशा तुझ्यामध्यें (ऋचा हविः आ हूयते) मंत्र म्हणून हवि दिलें जात आहे. (स्तोतृभ्यः इषं आभर) स्तुति करणारांना अन्न भरपूर दे. ॥ २ ॥

[१०२४] हे (शवसस्पते, विश्पते सुश्चन्द्र) बलाच्या स्वामी प्रजापालका, अति तेजस्वी अग्ने ! (उभे दर्वी) दोनही पात्र (आसनि श्रीणीषे) आपल्या तोंडाजवळ नेऊन पोंचवतोस. (उत उ) आणि (उक्थेषु नः उत्पुपूर्याः) स्तुति केल्यानंतर आम्हांला तूं पूर्ण करीत आहेस. (स्तोतृभ्यः इषं आभर) स्तुति करणारांना अन्न भरपूर दे. ॥ ३ ॥

[१०२५] हे उद्गात्यानों ! (विप्राय बृहते) ज्ञानी मोठ्या (ब्रह्मकृते विपश्चिते) ज्ञान पसरविणाऱ्या विद्वान् (पनस्यवे इन्द्राय) अशा स्तुत्य इन्द्राला (बृहत् साम गायत) बृहत् नांवाचें सामगायन करा. ॥ १ ॥

[१०२६] हे (इन्द्र) इन्द्रा ! (त्वं अभिभूः असि) तूं शत्रूंचा पराभव करणारा आहेस, (त्वं सूर्यं अरोचयः) तूं सूर्याला प्रकाशित केलेंस. तूं (विश्वकर्मा विश्वदेवः महान् असि) सर्व कार्यें करणारा, सर्व देवांसारखा मोठा आहेस. ॥ २ ॥

[१०२७] हे (इन्द्र) इन्द्रा ! (ज्योतिषा दिवः रोचनं) आपल्या तेजानें सूर्याचा प्रकाशक (स्वः विभ्राजन्) आपला प्रकाश पसरविणारा असा तूं (आगच्छ) ये. (देवाः ते सख्याय येमिरे) सर्व देव तुझ्याशीं मित्रता करण्याची इच्छा करीत आहेस. ॥ ३ ॥

[१०२८] हे (इन्द्र) इन्द्रा ! (ते सोमः असावि) तुझ्यासाठीं सोमरस तयार केला आहे. (शविष्ठ धृष्णो) हे बलवान् व शत्रूंचा पराभव करणाऱ्या इन्द्रा ! (आ गहि) ये. (सूर्यः रश्मिभिः रजः न) सूर्य किरणांनीं अन्तरिक्ष जसें भरून टाकतो, त्याप्रमाणें (त्वा इन्द्रियं आ पृणक्तु) तुला सोमपानानें मोठी शक्ति प्राप्त होवो. ॥ १ ॥

१०२९ आ तिष्ठ वृत्रहन्रथं युक्ता ते ब्रह्मणा हरी ।
अर्वाचीनꣳ सु ते मनो ग्रावा कृणोतु वग्नुना ॥ २ ॥ (ऋ. १।८४।३)

१०३० इन्द्रमिद्धरी वहतोऽप्रतिधृष्टशवसम् ।
ऋषीणाꣳ सुष्टुतीरुप यज्ञं च मानुषाणाम् ॥ ३ ॥ २३ (पा) ॥
[धा० १० । उ० १ । स्व० २] (ऋ. १।८४।२)

॥ इति सप्तमः खण्डः ॥ ७ ॥

॥ इति तृतीयप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ ३ ॥

॥ इति तृतीयः प्रपाठकश्च समाप्तः ॥ ३ ॥

॥ इति षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

[१०२९] हे (वृत्रहन्) शत्रूला मारणाऱ्या इन्द्रा ! (रथं आ तिष्ठ) रथावर चढ. (ते हरी ब्रह्मणा युक्ता) तुझे दोनही घोडे आम्ही मंत्रांनीं जोडले आहेत. (ग्रावा) सोमाला कुटणारे दगड (वग्नुना) मनाला आकर्षित करणाऱ्या शब्दांनीं (ते मनः) तुझें मन (आर्वाचीनं सुकृणोतु) आमच्याकडे आकर्षित करोत. ॥ २ ॥

[१०३०] (अ-प्रति-धृष्ट-शवसं इन्द्रं इत्) अपराजित अशा मोठ्या बलानें युक्त इन्द्राला (ऋषीणां मानुषाणां) ऋषि व ऋत्विज (सुष्टुतीः) यांनीं केलेल्या स्तुतिजवळ (यज्ञं च) आणि यज्ञाजवळ (हरी उप वहतः) घोडे पोंचवतात. ॥ ३ ॥

॥ येथें सातवा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति षष्ठोऽध्यायः ॥

षष्ठ अध्याय

या सहाव्या अध्यायामध्यें इन्द्र देवतेचें वर्णन असें केलेलें आहे—

इन्द्र

१ हे स्पर्धमान इन्द्र ! यत् त्वं दस्युहा भवः, उभे रोदसी अनु मदेताम् [९८९]- हे स्पर्धा करणाऱ्या इन्द्रा ! जेव्हां तूं शत्रूंचा नाश करणारा होतोस, तेव्हां दोनही द्युलोक व भूलोक हे आनंदानें तुझ्या अनुकूल होतात.

२ यत् आजयः उदीरते, धृष्णवे धनं धीयते [१००४]- जेव्हां युद्धें सुरू होतात, तेव्हां विजयी वीराला धनें मिळत असतात.

३ वृत्रहा इन्द्रः मदाय शवसे नृभिः वावृधे [१००२]- वृत्राचा नाश करणाऱ्या इन्द्राचा आनंद व बल यांची वाढ व्हावी यासाठीं लोक त्याची महिमा वाढवित असतात.

४ तं महत्सु आजिषु अर्भे ऊतिं हवामहे [१००२]- त्या इन्द्राला मोठ्या युद्धांमध्यें व लहान लढायांमध्यें आमचें संरक्षण करण्यासाठीं आम्हीं बोलावतों.

५ सः वाजेषु नः प्राविषत् [१००२]- तो युद्धांमध्यें आमचें रक्षण करतो.

६ हे इन्द्र ! त्वं अभिभूः असि [१०२६]- हे इन्द्रा ! तूं शत्रूंना जिंकणारा आहेस.

७ हे शविष्ठ धृष्णो ! आगहि [१०२८]- हे बलवान् व विजयी इन्द्रा ! आमच्या सहाय्यासाठीं ये.

८ अ-प्रति-धृष्ट-शवसं इन्द्रं ऋषीणां मानुषाणां सुष्टुतिः यज्ञं च हरी उपवहतः [१०३०]- ज्याचें धैर्य

व साहस कमी होत नाहीं त्या इन्द्राला ऋषिंच्या व मनुष्यांच्या स्तुतिजवळ म्हणजे यज्ञाजवळ त्याचे घोडे नेतात.

९ हे इन्द्र ! सोमं पीत्वा ओजसा सह उत्तिष्ठन् शिप्रे अवेपयः [९८८]- हे इन्द्रा ! सोम पिऊन आपल्या सामर्थ्यानें ऊठ व आपले ओंठ कांपव. शौर्य दाखव.

१० हे वीर ! सेन्यः असि, दभ्रस्य चित् वृधः [१००३]- हे वीर इन्द्रा ! तं सैन्याबरोबर असतोस. लहानाला तूं मोठा बनवतोस.

११ प्रचेतसः ताः गावः अस्य महः नमसा वर्धयन्ति [१००७]- बुद्धिवान् अशा त्या गाई या इन्द्राचें सामर्थ्य आपल्या दुधानें वाढतात.

१२ पूर्वचित्तये अस्य पुरूणि व्रतानि सश्चिरे [१००७]- पूर्वीचे पराक्रम ध्यानीं यावे यासाठीं याचीं पुष्कळच पराक्रमाचीं कार्ये वर्णिलीं जातात.

१३ वृत्रहन् रथं आतिष्ठ [१०२१]- हे वृत्राला मारणाऱ्या इन्द्रा ! आपल्या रथांत बैस.

१४ मदच्युता हरी युंक्ष्व, कं हनः, कं वसौ दधः, अस्मान् वसौ दधः [१००४]- मदोन्मत्त घोडे रथाला जोड, कोणाला मारावें व कोणाला धन द्यावें, याचा विचार कर. आम्हांला धन दे.

१५ सुन्वते यजमानाय शिक्षसि, ते भूरिवसु [१००३]- सोमयाग करणाऱ्या यजमानाला तूं धन देतोस. तुझ्याजवळ पुष्कळ धन आहे.

१६ अस्य ताः पृशनायुवः पृश्नयः सोमं श्रीणन्ति [१००६]- त्या इन्द्राच्या उत्तम गाई आपलें दूध सोमरसामध्यें मिसळतात.

१७ वाजी सोमः इन्द्रे सहः इन्वन् मदाय पवते [१०१९]- बलवान् सोम इन्द्रामध्यें सामर्थ्य वाढवून त्याचा आनंद वाढवतो.

१८ हे इन्द्र ! त्वं सूर्यः अरोचयः, त्वं विश्वकर्मा विश्वदेवः महान् असि [१०२६]- हे इन्द्रा ! तूं सूर्याला प्रकाशित केलेंस, तूं सर्व कर्में करणारा आहेस. तूं सर्वांचा देव आहेस व तूं मोठा आहेस.

१९ विप्रः बृहत् ब्रह्मकृत् विपश्चित् [१०२५]- इन्द्र ज्ञानी, मोठा, ज्ञानाचा प्रसार करणारा विद्वान् आहे.

२० इन्द्रस्य सख्यं जुषाणः देवः इन्दुः [१०२०]- इन्द्राची मित्रता व्हावी असें इच्छिणारा तेजस्वी सोमरस आहे.

याप्रमाणें इन्द्राच्या गुणांचें वर्णन या अध्यायामध्यें आलेलें आहे. हे गुण उपासकांनीं आपणांमध्यें आणावे. आतां अग्निचें वर्णन पहा—

अग्नि

या अध्यायामध्यें अग्निचें असें वर्णन आलें आहे. तें आतां पहा—

१ अजरः [९८३]- जरारहित, वृद्धावस्था ज्याला येत नाहीं, सदा तरुण.

२ मेधाकारः [९८४]- बुद्धिचीं कार्यें करणारा, बुद्धि वाढवणारा.

३ विदथस्य प्रसाधनः [९८४]- युद्धांचें व यज्ञाचें साधन.

४ होता [९८४]- देवांना बोलावून आणणारा, हवन करणारा.

५ परिभूतरः [९८४]- शत्रूंचा पराभव करणारा.

६ मतिः [९८४]- बुद्धिमान्.

७ द्युमान् [१०२२]- तेजस्वी.

८ सुश्चन्द्रः [१०२३]- उत्तम तेजस्वी.

९ दस्मः [१०२३]- दर्शनीय, सुन्दर.

१० विश्पतिः [१०२३]- प्रजापालक.

११ ज्योतिषस्पतिः [१०२३]- तेजस्वितेचा पालक.

१२ हव्यवाट् [१०२३]- हवन केलेल्या पदार्थांना योग्य ठिकाणीं पोंचवणारा.

१३ शुक्रः [१०२३]- शुद्ध, वीर्यवान्.

१४ शवसस्पतिः [१०२४]- बलवान्, सामर्थ्यवान्.

१५ धक्षन् [९८३]- जाळणारा, शत्रूंना जाळणारा.

अग्निचे हे गुण या अध्यायामध्यें वर्णिले आहेत. तसेंच अग्निचें असें अधिक वर्णनही या अध्यायामध्यें आलेलें आहे.

१६ हविः आहूयते [१०२३]- अग्निमध्यें हविर्द्रव्याचें हवन होतें.

१७ उभे दर्वी आसनि श्रीणीषे [१०२४]- दोनही पळ्या आपल्या तोंडाजवळ नेतोस. आहुतिचें हवन करण्यासाठीं पळ्या अग्निजवळ पोंचतात.

१८ स्तोतृभ्यः इषं आभर [१०२२]- स्तुति करणाऱ्यांना अन्न भरपूर दे.

१९ त्वां इत् अर्भस्य हविषः, त्वां इत् महः, समानं वृणुते, त्वत् अन्यं न [९८४]- तुलाच थोडें हवि अर्पण करण्यासाठीं किंवा विशेष अधिक हवि अर्पण करण्यासाठीं बोलावलें जातें. तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाहि बोलावलें जात नाहीं.

२० हे अग्ने ! यत् ओषधिः वनानि च अभिसृष्टः, स्वयं आसन्, अन्नं परिचिनुषे, तव श्रियः, वर्षस्य

विद्युत इव चिकित्रे [९८२]- जेव्हां तूं औषधि वनस्पति अथवा वनें जाळण्याची इच्छा करतोस, तेव्हां तुझ्या तोंडांत तें अन्न पडतें व त्यावेळीं तुझीं किरणें वृष्टीच्या वेळच्या विजांप्रमाणें प्रकाशूं लागतात.

याप्रमाणें अग्निचें वर्णन या अध्यायामध्यें आलेलें आहे.

इन्द्र व अग्नि

इन्द्र व अग्नि यांची संयुक्त स्तुतिहि या अध्यायांत आली आहे, ती पहा—

१ इन्द्राग्नी शंभुवा [९९१]- इन्द्र व अग्नि हे कल्याण करणारे आहेत.

२ सोमपीतये आगच्छतं [९९३]- सोमपान करण्यासाठीं या.

३ नरा इन्द्राग्नी! वां पुरुस्पृहा दाशुषे याः नियुतः सन्ति, ताभिः आगतं [९९२]- हे नेतृत्व करणाऱ्या इन्द्र व अग्नि देव हो ! तुमच्या दोघांच्या पुष्कळांनीं प्रशंसा करण्यास योग्य अशा दात्यांना सहाय्य करणाऱ्या ज्या घोड्या आहेत, त्यांना जोडून तुम्ही या.

हें इन्द्र व अग्नि या दोघांचें मिळून वर्णन आहे. हे देव सर्वांचें कल्याण करीत असतात. सर्वांचें हित करावें हा यांचा स्वभावच आहे. यासाठीं हे सर्वदा नेतृत्व करीत असतात. जे उदार असतात, त्यांना हे सहाय्य करतात. यासाठीं यज्ञामध्यें यांना सर्व यज्ञ करणारे बोलावीत असतात.

मित्र व वरुण

मित्र व वरुण यांचीहि संयुक्त स्तुति या अध्यायांत आलेली आहे, यांचें वर्णन असें येथें आलें आहे—

१ हे मित्रा ! नः पायुभिः पातं [९८७]- हे मित्र व वरुण हो ! तुम्ही आमचे मित्र आहां, म्हणून हे मित्र हो संरक्षणाच्या साधनांनीं आमचें रक्षण करा.

२ सुत्रामा त्रायेथां [९८७]- उत्तम संरक्षण करणारे तुम्ही आमचें उत्तम रक्षण करा.

३ तनूभिः दस्यून् साह्याम [९८७]- आमच्या शारीरिक सामर्थ्यांनीं शत्रूंचा पराभव करूं या.

४ अद्रुहाणा वां सम्यक् मित्रा स्याम [९८६]- द्रोह न करणारे तुम्ही दोघे आहांत, ते तुम्ही मित्रासारखे होऊन रहा.

५ इषं च धाम अश्यामः [९८६]- अन्न व घर तुम्हांकडून आम्हांस प्राप्त होवो.

६ वां पुरूणा अव नूनं अस्ति [९८५]- तुम्हां दोघांचें पुष्कळच संरक्षण आम्हांला आहे.

७ वां सुमतिं वंसि [९८५]- तुमची उत्तम व अनुकूल बुद्धि आम्हांस प्राप्त होवो.

याप्रमाणें मित्र व वरुण यांच्या सहाय्याचें वर्णन या अध्यायांत आलेलें आहे.

सोमाचे गुण

आतां सोमाचें वर्णन या अध्यायांत जें आलें आहे तें पहा–

१ इन्दुः [९५५]- तेजस्वी, चंद्राप्रमाणें प्रकाशयुक्त.

२ गोवित् [९५५]- गाईंनीं युक्त. गाईचें दूध ज्यांत मिसळलें जातें तो.

३ वसुवित् [९५५]- धनानें युक्त, निवासक शक्तिनें युक्त.

४ हिरण्यवित् [९५५]-सुवर्णानें युक्त.

५ रेतोधाः [९५५]- वीर्य वाढवणारा, वीर्याचें धारण करणारा.

६ सु-वीरः [९५५]- उत्तम शूर.

७ विश्व-वित् [९५५]- सर्व जाणणारा.

८ वृषभः [९५६]- बलवान्.

९ पवमानः [९५६]- शुद्ध होणारा.

१० विश्वतः नृचक्षाः [९५६]- सर्व प्रकारें मनुष्यांचें निरीक्षण करणारा.

११ ईशानः [९५७]- स्वामी, शासक.

१२ नृमादनः [९६५]- मनुष्यांचा आनंद वाढवणारा.

१३ चर्षणी-धृतिः [९६५]- मनुष्यांचें धारण करणारा.

१४ सस्निः [९६५]- शुद्ध, विजय करणारा, प्राप्त करणारा.

१५ अनुमाद्यः [९६५]- प्रशंसनीय.

१६ अद्भुतः [९६६]- अद्भुत, विलक्षण.

१७ शुचिः [९६६]- शुद्ध.

१८ पावकः [९६६]- शुद्ध होणारा.

१९ वृत्रहन्तमः [९६६]- शत्रूला मारणारा.

२० मधुमान् [९६७]- मिष्ठ, गोड,मधुर.

२१ देवावीः [९६७]- देवांना प्राप्त होण्यास योग्य.

२२ अघः-शंस-हा [९६७]- पापी लोकांचा नाशकर्ता.

२३ कविः [९६७]- ज्ञानी, क्रान्तदर्शी, दूरदर्शी.

२४ साह्वान् [९६७]– शत्रूंचा पराभव करणारा.

२५ क्रीळुः [९७४]– क्रीडाकुशल.

२६ मंहयुः [९७४]– महत्त्वयुक्त, दान देणारा.

२७ सुवीर्यं दधत् [९७४]– उत्तम वीर्यानें युक्त, उत्तम शूर.

२८ स्वादिष्ठः [९८१]– स्वादयुक्त, रुचिकर.

२९ वरिवोवित् [९८१]– धनयुक्त, दान देणारा.

३० द्युमत्तमः [९९४]– अति तेजस्वी.

हे सोमाचे गुण या अध्यायांत वर्णिलेले आहेत. सोमरस प्याल्यानंतर तो उत्साह वाढतो, त्यानें हे गुण वीरांच्या अंगीं वाढतात. म्हणून हे गुण सोमाचे आहेत असें म्हटलें जातें.

स्वर्गामध्यें सोम

सोमवल्ली स्वर्गामध्यें उगवते. स्वर्ग हा हिमालयाच्या उंच शिखरावर आहे. तेथें ही वल्ली उगवते. यासाठीं सोम हा स्वर्गांतून आणला जातो असें वर्णन केलें जातें. पहा—

१ हे सोम ! दिवस्परि विश्वा रूपा अभ्यर्षसि [९५९]– हे सोमा ! तूं स्वर्गावर अनेक रूपें धारण करून असतोस.

२ गिरिष्ठाः अंशुः मदाय असावि [१००८]– पर्वतावर असणाऱ्या सोमाचा उत्साह वाढावा म्हणून रस काढतात.

३ श्येनः न योनिं आसदत् [१००८]– श्येन पक्ष्याप्रमाणें (पर्वतावरून येऊन) यज्ञांत बसतो. त्याप्रमाणें सोम बसतो.

याप्रमाणे सोम हा पर्वत शिखरावर असतो या संबंधींचें वर्णन आहे.

सोम दगडांनीं कुटतात

सोम दगडांनीं कुटून त्याचा रस काढतात. याविषयीं म्हटलें आहे—

१ अद्रिभिः सुतः पवित्रं परि दीयसे, इन्द्रस्य धाम्ने अरं [९६४]– दगडांनीं कुटून काढलेला रस गाळणींतून गाळतात व नंतर तो इन्द्राला देण्यास योग्य होतो.

२ सोमः इन्द्रः च । यूयं स्वपती स्थ । गोपती ईशाना धियं पिप्यतं [१००१]– सोम व इन्द्र हो ! तुम्ही खरोखर सर्वांचे अधिपती आहांत. तुम्ही गाईंचें पालन करतां व तुम्ही सर्वांचें आधिपत्य करीत असतां. आमच्या बुद्धींचें पोषण करा.

सोमरस प्याल्यानंतर बुद्धिमध्यें मोठा उत्साह येतो व मोठमोठीं कार्यें करण्याचें सामर्थ्य अंगीं येतें.

सोम पाण्यांत मिसळतात

सोमवल्लीचा रस काढल्यानंतर त्यास पाण्यांत मिसळतात. पहा —

१ अप्सु दुष्टरः गभस्त्योः मृज्यमानः चमूषु सीदति [९७३]– पाण्यांत मिसळला गेलेला सोम हातांनीं स्वच्छ केल्यानंतर भांड्यांत राहतो.

२ अप्सा सोमाः इन्द्राय वायवे अर्षन्तु [९९५]– पाण्यांत मिसळल्यानंतर सोमरस इन्द्र, वायु वगैरे देवांना दिले जातात.

३ ताः ते मधुमत् घृतं पयः क्षरन्तु [९५७]– तुझे ते रस मधुर जल व दूध यांत मिसळोत.

४ मधोः रसं सधमादे अमृताय अशूशुभन् [१०१०] – मधुर सोमाचा रस यज्ञामध्यें पाण्याशीं मिसळून शोभवला जातो.

पाण्यांत सोमरस मिसळल्यानंतर तो गाळतात. याचें वर्णन पहा—

सोमरस गाळतात

१ देववीतये अव्या वारेभिः अव्यत [९६८]– देवांना देण्यासाठीं मेंढीच्या केसांच्या गाळणींतून सोमरस गाळला जातो.

२ हे सोम ! सु-वीर्यं दधत् पवित्रं गच्छसि [९७४]– हे सोमा ! उत्तम सामर्थ्य धारण करून तूं गाळणीवर गाळला जाण्यासाठीं जातोस.

३ ते मधुश्चुतः धाराः असृग्रन्, ताभिः पवित्रं आ सदः [९७९]– तुझ्या मधुर धारा निघूं लागल्या, त्यांनीं तूं गाळणीवर जाऊन बसलास.

४ सः अव्यया वाराणि तिरः इन्द्राय पातवे अर्ष [९८०]– तो तूं सोम मेंढीच्या केसांच्या गाळणींतून इन्द्राला पिण्यास देण्यासाठीं गाळला जा.

५ सुतः देवेभ्यः मधुमत्तरः पवित्रे धारया पवस्व [१०१६]– रस काढल्यानंतर देवांना देण्यासाठीं अधिक मधुर होऊन धारेनें गाळणींतून गाळला जा.

६ अ-द्रुहः धीतयः हरिं त्वां पवित्रे रिहन्ति [१०१७]– द्रोह न करणाऱ्या अंगुली हिरव्या रंगाच्या तुला-सोमरसाला - गाळणीवर दाबतात.

७ अद्रिदुग्धः सोम तिरः पवते [१०२०]– रस काढल्यानंतर तो सोमरस केंसाच्या गाळणींतून गाळला जातो.

८ देवः स्वेन रसेन देवान् पृञ्चन् सा नो अव्ये अव्यत [१०२१]- दिव्य सोम आपल्या रसानें देवांना संतोष देत उच्चस्थानीं असलेल्या मेंढीच्या केंसांच्या गाळणींत गाळण्यासाठीं नेला जातो.

९ स्वानः सोमः अव्यानां स्नुभिः अधियाति [९१७] – काढलेला सोमरस मेंढीच्या केंसांच्या गाळणींतून गाळला जातो.

याप्रमाणें सोमरस काढून पाण्यांत मिसळून तो मेंढीच्या लोंकरीच्या गाळणींतून गाळला जातो व नंतर तो गाईच्या दुधांत मिसळण्यांत येतो.

सोमरस गाईच्या दुधांत मिसळतात

१ देववातं शुभ्रं अन्धः नृभिः सुतं, अप्सु धौतं, गावः पयोभिः स्वदयन्ति [१००९]- देवांना देण्यासाठीं ऋत्विजांनीं तयार केलेल्या, स्वच्छ सुन्दर अन्न अशा पाण्यांत मिसळलेल्या सोमरसाला गाई आपल्या दुधाशीं मिसळून स्वादिष्ट बनवतात.

२ श्रीणानः अप्सु वृज्यते [९६१]- सोमरस गाईच्या दुधांत व पाण्यांत मिसळण्यांत येतो.

३ सोमः अनूपे गोभिः अक्षाः [९९८]- सोमरस कलशामध्यें गाईच्या दुधासह टपकत आहे.

४ सोमः दुग्धाभिः अक्षाः [९९८]- सोमरस दूध मिसळल्यानंतर टपकत आहे.

याप्रमाणें सोमरसामध्यें गाईचें दूध मिसळून तो स्वादिष्ट बनवला जातो, असें वर्णन अनेक मंत्रांत आलेलें आहे.

सोम धन देतो

१ हे सोम ! नः विश्वा सौभगा, पुष्टं यवं परिस्रव [९७५]- हे सोमा ! आम्हांला सर्व सौभाग्यें व पोषक अन्न दे.

२ हे सोम ! चित्रं उक्थ्यं दिव्यं पार्थिवं वसु नः आ भर [९९९]- हे सोमा ! विलक्षण, प्रशंसनीय, दिव्य व पार्थिव धन आम्हांला भरपूर दे.

दीर्घजीवन देतो

१ हे सोम ! भुवनेषु जीवसे स्याम [९५६]- हे सोमा ! आम्ही या भुवनामध्यें दीर्घजीवन प्राप्त करूं शकूं असें कर.

सोम अन्न देतो

१ सः गोमन्तं सहस्रिणं वाजं आ इन्वति [९६९]- तो सोम आम्हांला गाईंनीयुक्त असलेलें सहस्र प्रकारचें अन्न देतो.

२ नः विश्वानि श्रवः विदः [९७०]- आम्हांला सर्व प्रकारचीं अन्नें दे.

३ हे सोम ! स्तोतृभ्यः बृहद् यशः ध्रुवं रयिं इषं आ भर [९७१]- हे सोमा ! स्तुति करणाऱ्यांना मोठें यश, स्थिर धन व अन्न भरपूर दे.

४ अस्माकं तोकाय इषं दधत् [९९६]- आमच्या मुलांबाळांना अन्न दे.

५ हे इषस्पते देव ! द्युम्नं बृहत् यशः देवयुं अभि दिदीहि [१०११]- हे धनपते सोमदेवा ! आम्हांला तेजस्वी असें विपुल अन्न जें देवांना दिलें जातें तें दे.

अशाप्रकारें सोम भरपूर अन्न देतो, असें वर्णन आलें आहे.

सोम शत्रु दूर करतो

१ साह्वान् विश्वाः स्पृधः [९६८]- सर्व स्पर्धा करणाऱ्या शत्रूंना पराभूत करणारा सोम आहे.

२ सहस्रजित्, यः जिनाति, न जीयते, शत्रुं अभीत्य हन्ति [९७८]- सहस्रावधि शत्रूंना सोम जिंकतो. जो जय प्राप्त करतो, पण कधींहि पराभूत होत नाहीं, शत्रूवर आक्रमण करून त्यास ठार मारतो.

३ वृजनस्य राजा वरिवः कृण्वन्, रक्षः हन्ति, अरातिं परि बाधते [१०१९]- हा सोम बलाचा राजा आहे. तो उपासकांना धन देतो, राक्षसांना मारतो, शत्रूंना दूर करतो.

याप्रमाणें सोम शत्रूंना दूर करतो या संबंधींचें वर्णन आहे. याप्रमाणें सोमाचें वर्णन या अध्यायामध्यें आलेलें आहे. तें वाचकांनीं पहावें व यामध्यें जे गुण आहेत ते आपलेसे करावे व देवत्व प्राप्त करावें.

सुभाषितें

१ गोवित् वसुवित् हिरण्यवित् रेतोधाः भुवनेषु अर्पितः [९५५]- गाई, धन, सुवर्ण व वीर्य यांना आपणाजवळ बाळगणारा तूं भुवनांचें कल्याण करण्यासाठीं समर्पित झाला आहेस.

२ हे सोम ! सुवीरः विश्ववित् असि [९५५]- हे सोमा ! तूं उत्तम वीर व सर्वज्ञ आहेस.

३ हे वृषभ ! विश्वतः नृचक्षाः असि [९५६]- हे बलवर्धक सोमा ! तूं सर्वप्रकारें मनुष्यांचें निरीक्षण करणारा आहेस.

४ ताः विधावसि [९५६]- त्या प्रजांजवळ तूं जातोस.

५ वसुमत् हिरण्यवत् भुवनेषु जीवसे स्याम [९५६]- धन व सुवर्ण यांनीं युक्त होऊन भुवनांमध्यें दीर्घजीवन प्राप्त करणारे आम्ही होऊं.

६ ईशानः हरितः सुपर्ण्यः युजानः इमा भुवनानि ईयसे [९५७]- तूं स्वामी आपल्या रथाला उत्तम चालणारे घोडे जोडून या भुवनांमध्यें फिरत असतोस.

७ ते मधुमत् घृतं पयः क्षरन्तु [९५७]- ते तुझ्यासाठीं घृत व दूध देवोत.

८ कृष्टयः ते व्रते तिष्ठन्तु [९५७]- मनुष्य तुझ्या नियमांमध्यें राहोत.

९ केतुं कृण्वन् दिवः परि अभ्यर्षसि [९५९]- प्रकाश करीत तूं द्युलोकावर जातोस.

१० देवः सूर्यः न जज्ञानः क्रन्दन् वाचं इष्यसि [९६०]- सूर्यदेवाप्रमाणें प्रकट होऊन शब्द करीत स्तुतिला प्राप्त होतोस.

११ नृमादनः चर्षणी-धृतिः अनुमाद्यः [९६५]- मनुष्यांना आनंद देणारा व मनुष्यांचें धारण करणारा प्रशंसनीय आहे.

१२ अद्भुतः शुचिः पावकः वृत्रहन्तमः अनुमाद्यः [९६६]- जो अद्भुत शुद्ध व पवित्रता करणारा वीर शत्रूचा नाश करणारा असतो, तो प्रशंसनीय आहे.

१३ शुचिः पावकः देवावीः अघ-शंस-हा [९६७] – जो निर्दोष पवित्र व देवांना प्राप्त करणारा असतो, तो पापी दुष्टांचा नाश करतो.

१४ कविः देववीतये विश्वाः स्पृधः साह्वान् [९६८] – ज्ञानी देवत्वप्राप्तीसाठीं सर्व स्पर्धा करणाऱ्या शत्रूंचा पराभव करतो.

१५ सः पवमानः जरितृभ्यः गोमन्तं सहस्रिणं वाजं आ इन्वति [९६९]- तो सोम स्तोत्यांना गाईपासून उत्पन्न झालेलें सहस्र प्रकारचें अन्न देतो.

१६ सः नः चेतसा विश्वानि श्रवः विदः [९७०] – तो तूं आम्हांला बुद्धिपूर्वक अनेक प्रकारचीं अन्नें दे.

१७ स्तोतृभ्यः बृहद् यशः ध्रुवं रयिं अभ्यर्ष, इषं आभर [९७१]- स्तुति करणाऱ्यांना मोठें यश, स्थिर धन दे व अन्न भरपूर दे.

१८ सुव्रतः पुरातनः राजा इव गिरः आविवेशिथ [९७२]- उत्तम नियमांनीं चालणाऱ्या राजाप्रमाणें आमची स्तुति ऐक.

१९ मंहयुः स्तोत्रे सुवीर्यं दधत् [९७४]- दान देणारा तूं स्तुति करणाऱ्याला उत्तम वीर्य देतोस.

२० नः पुष्टं यवं अन्धसा परिस्रव विश्वा सौभगा च [९७५]- आम्हांला पोषण करणारें धान्य व अन्नासह सर्व सौभाग्यें दे.

२१ नः गोवित् अश्ववित् अन्धसा पवस्व [९७७] -आम्हांला गाई, घोडे व अन्न दे.

२२ हे सहस्रजित् ! यः जिनाति, न जीयते, शत्रुं अभीत्य हन्ति [९७८]- हे हजारों शत्रूंना जिंकणाऱ्या वीरा ! जो जिंकतो, पण जिंकला जात नाहीं, शत्रूंना घेरून मारतो तो वीर आहे.

२३ वरिवोवित् घृतं पयः परिस्रव [९८१]- तूं धन देणारा घृत व दूध आम्हांला दे.

२४ अजरस्य धक्षतः ते शर्धांसि, रथ्यः यथा, पृथक् आयतन्ते [९८३]- जरारहित अर्थात् तरुण व शत्रूंना जाळणाऱ्या अशा तुझीं सामर्थ्यें रथीवीराप्रमाणें, पृथक् पृथक् वाढत आहेत असें दिसतें.

२५ मेधाकारं विदथस्य प्रसाधनं, परिभूतरं मतिं अग्निं [९८४]- बुद्धिला वाढवणारा, यज्ञाचें साधन, शत्रूचा पराभव करणारा, बुद्धिमान् अग्निप्रमाणें तेजस्वी जो असतो त्याची प्रशंसा होते.

२६ वां पुरूरुणा अवः नूनं अस्ति [९८५]- तुमच्याकडून पुष्कळच संरक्षण प्राप्त होतें.

२७ वां सुमतिं वंसि [९८५]- तुमची उत्तम बुद्धि आम्हांला अनुकूल होते.

१८ अ-द्रुह्वाणा सख्यक् मित्रा वयं स्याम, इषं धाम च अश्याम [९८६]- द्रोह न करणाऱ्या तुमचे आम्ही योग्य मित्र होऊं व अन्न व घर प्राप्त करूं.

२९ हे मित्रा ! पायुभिः नः पातं, सुत्रामा त्रायेथां, तनूभिः दस्यून् साह्याम [९८७]- हे मित्र हो ! तुम्ही संरक्षणाच्या साधनांनीं आमचें रक्षण करा, उत्तम रक्षण करणारे तुम्हीं आमचें पालन करा, तसेंच आपल्या शारीरिक सामर्थ्यांनीं शत्रूंचा पराभव करूं शकूं असें करा.

३० हे इन्द्र ! सोमं पीत्वा ओजसा सह उत्तिष्ठन् [९८८]- हे इन्द्रा ! सोम पिऊन आपल्या सामर्थ्यासह उठून उभा रहा.

३१ हे स्पर्धमान इन्द्र ! यत् दस्युहा भवः, त्वा

उभे रोदसी अनुमदेताम् [७८९]- हे स्पर्धा करणाऱ्या इन्द्रा ! जेव्हां तूं दुष्टांना मारणारा होतोस, तेव्हां दोनही द्यु व पृथिवी आनंदानें तुला अनुकूल होतात.

३२ अष्टापदीं नव-स्रक्तिं ऋतावृधं तन्वं वाचं अहं परिममे [९९०]- आठ पदें असलेलें व नवीन कल्पनांनीं बनलेलें असें सत्याचें संवर्धन करणारें लहानसें भाषण मी करीत आहें.

३३ इन्द्राग्नी शं भुवा [९९१]- इन्द्र व अग्नि कल्याण करणारे आहेत.

३४ अस्माकं तोकाय इषं दधत्, सहस्रिणं अस्मभ्यं विश्वतः आ पवस्व [९९६]- आमच्या मुलांसाठीं अन्न द्या व सहस्र प्रकारचें धन चारही बाजूंनीं आम्हांला द्या.

३५ यत् चित्रं उकथ्यं दिव्यं पार्थिवं वसुः पुनानः आ भर [९९९]- जें विलक्षण प्रशंसनीय असें दिव्य व पार्थिव धन आहे, तें तूं शुद्ध होऊन आम्हांला भरपूर दे.

३६ आयूंषि पुनानः स्तनयन्, हरिः सन् अधि बर्हिषि, योनिं आ सदः [१०००]- आपलीं जीवनें पवित्र करीत, बलवान् होऊन भाषण करीत, लोकांचीं दुःखें दूर करीत, आपल्या स्थानीं आसनांवर बैस.

३७ युवं सत्पती ईशाना गोपती धियं पिप्यतं [१००१]- तुम्ही उत्तम स्वामी, ऐश्वर्याचे अधिकारी, गाईंचें पालन करणारे बुद्धींना पुष्ट करा.

३८ तं महत्सु आजिषु, अर्भे ऊतिं हवामहे, सः वाजेषु नः प्राविशत् [१००२]- त्याला मोठ्या युद्धांमध्यें, तसेंच लहान लढायांमध्यें आमच्या संरक्षणांसाठीं आम्ही बोलावतों. तो आमचें युद्धांमध्यें रक्षण करो.

३९ हे वीर ! सेन्यः असि, भूरिः परादद्‌िः असि [१००३]- हे वीरा ! तूं सेनेनें युक्त आहेस. शत्रूंच्या पुष्कळ धनाचें हरण करणारा आहेस.

४० दभ्रस्य चित् वृधः [१००३]- लहानाला तूं मोठा करणारा आहेस.

४१ सुन्वते यजमानाय शिक्षसि [१००३]- सोमयाग करणाऱ्याला तूं धन देतोस.

४२ ते भूरि वसु [१००३]- तुझ्याजवळ पुष्कळ धन आहे.

४३ यत् आजयः उदीरते, धृष्णवे धना धीयते [१००४]- जेव्हां युद्धें होतात, तेव्हां विजयी वीराला धन मिळतें.

४४ मदच्युता हरी युंक्ष्व [१००४]- मद गळत असणारे घोडे रथाला जोड.

४५ कं हनः, कं वसौ दधः [१००४]- कोणाला मारावें व कोणाला धनामध्यें स्थापावें याचा विचार कर.

४६ अस्मान् वसौ दधः [१००४]- आम्हांला धनामध्यें ठेव.

४७ अस्य पुरूणि व्रतानि सश्चिरे [१००७]- याचीं पुष्कळ कार्यें आठवत असतात.

४८ हे इषस्पते देव ! द्युम्नं बृहद् यशः देवयुं अभि दिदीहि [१०११]- हे अन्नपते देवा ! तेजस्वी मोठें यश किंवा अन्न ज्याची देव इच्छा करतात, तें आम्हांला दे.

४९ वृजनस्य राजा वरिवः कृण्वन्, रक्षः हन्ति, अरातिं परि बाधते [१०१९]- बलाचा राजा धन देतो, राक्षसांना मारतो, व शत्रूंना त्रास देतो.

५० द्युमन्तं अजरं आ इधीमहि [१०२२]- तेजस्वी व जरारहित अशा तुला आम्ही अधिक प्रदीप्त करीत आहों.

५१ स्तोतृभ्यः इषं आ भर [१०२२]- स्तुति करणाऱ्यांना भरपूर अन्न दे.

५२ सुश्चन्द्र, दस्म, विश्पते, ज्योतिषस्पते, हव्यवाट् अग्ने ! इषं आ भर [१०२३]- उत्तम आनंद देणाऱ्या, शत्रूला मारणाऱ्या, प्रजापालका, तेजस्वी, हवनीय द्रव्यें यथास्थानीं पोंचवणाऱ्या अग्ने ! आम्हांला भरपूर अन्न दे.

५३ त्वं अभिभूः असि [१०२६]- तूं शत्रूंचा पराभव करणारा आहेस.

५४ त्वं विश्वकर्मा विश्वदेवः महान् असि [१०२६] -तूं सर्व कर्में करणारा सर्वांचा देव व मोठा आहेस.

५५ ज्योतिषः रोचनं स्वः विभ्राजन् आगच्छ [१०२७]- तूं तेजस्वी सूर्याचा प्रकाशक व द्युलोकाला प्रकाशित करणारा आहेस. असा तूं येथें ये.

५६ शविष्ठ धृष्णो ! आ गहि [१०२८]- हे बलवान् व शत्रूंचा पराभव करणाऱ्या वीरा ! येथें ये.

५७ अप्रतिधृष्ट-शवसं इन्द्रं ऋषीणां मानुषाणां यज्ञं हरी उप वहतः [१०३०]- अपराजित वीर इन्द्राला ऋषींच्या व मनुष्यांच्या यज्ञामध्यें घोडे रथांतून वाहून आणतात.

उपमा

या अध्यायामध्यें या उपमा आल्या आहेत. त्या आतां पहा—

१ सूर्यस्य रश्मयः इव [९५८]- सूर्याच्या किरणांप्रमाणें (ते सर्गाः प्रासृक्षत) सोमाच्या धारा पसरत आहेत.

*

२ देवः सूर्यः न [९६०]- दिव्य सूर्याप्रमाणें तूं सोम (विधर्मणि जज्ञानः) यज्ञामध्यें प्रकट होतोस.

३ आपः न [९६२]- पाण्याच्या प्रवाहाप्रमाणें (इन्दवः अभि अधन्विषुः) सोमरस गाळणीमधून खालीं येतात.

४ सुव्रतः पुरातनः राजा इव [९७२]- उत्तम नियमांचें पालन करणारा पुरातन राजा असतो, त्याप्रमाणें (सोम ! गिरः आविवेशिथ) हे सोमा ! तूं स्तुतिचा स्वीकार कर.

५ मखः न [९७४]- यज्ञाप्रमाणें (मंहयुः) दान देण्याची इच्छा करतो.

६ वर्षस्य विद्युतः इव [९८२]- वृष्टीच्यावेळीं विजा चमकतात, त्याप्रमाणें (तव श्रियः चिकित्रे) तुझीं किरणें चमकतात.

७ उषसां ऊतयः इव [९८२]- उषःकालच्या किरणांप्रमाणें तुझीं किरणें चमकतात.

८ रथ्यः यथा [९८३]- रथीवीराप्रमाणें (ते शर्धांसि पृथक् आयतन्ते) तुझीं सामर्थ्यें वाढत आहेत.

९ अश्वया इव [९९७]- घोडीप्रमाणें (हरिता धारया याति) हिरव्या रंगाच्या धारेनें सोम जातो.

१० समुद्रं न [९९८]- समुद्राला जसे जलप्रवाह जाऊन मिळतात, त्याप्रमाणें (संवरणानि अग्मन्) सोमरसरूपी अन्नप्रवाह कलशामध्यें जात आहेत.

११ श्येनः न [१००८]- श्येनपक्षी जसा आपल्या घरट्यांत येतो, त्याप्रमाणें हा सोम (योनिं आसदत्) आपल्या कलशामध्यें येतो.

१२ अश्वं न [१०१०]- जसा संग्रामांत जाणाऱ्या घोड्याला सजवितात, त्याप्रमाणें (मधोः रसं सधमादे अशूशुभन्) मधुर सोमरसाला यज्ञामध्यें शोभवीत असतात. दूध वगैरे मिसळून शोभवितात.

१३ वह्निः न [१०१२]- सर्व प्रजांचा चालक जसा तेजस्वी राजा असतो, त्याप्रमाणें हे सोमा ! तूं (विश्पतिः आ वच्यस्व) सोम प्रजांचा पालक बनून कलशामध्यें जा.

१४ गावः जातं वत्सं न [१०१७]- गाई ज्याप्रमाणें नवजात वांसराला चाटतात, त्याप्रमाणें (धीतयः हरिं रिहन्ति) अंगुली हिरव्या रंगाच्या सोमाला दाबत असतात. दाबून रस काढतात.

१५ सूर्यः रश्मिभिः रजः न [१०२८]- सूर्य ज्याप्रमाणें किरणांनीं अन्तरिक्ष भरून टांकतो, त्याप्रमाणें (त्वा इन्द्रियं आ पृणस्व) तुला सोमपानानें मोठी इन्द्रियशक्ति भरून टांको.

याप्रमाणें उपमा या अध्यायामध्यें आल्या आहेत.

षष्ठाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
९५५	९।८६।३९	[अकृष्टा माषादयः] त्रयः ऋषयः	पवमानः सोमः	जगती
९५६	९।८६।३८	[अकृष्टा माषादयः] त्रयः ऋषयः	,,	,,
९५७	९।८६।३७	[अकृष्टा माषादयः] त्रयः ऋषयः	,,	,,
९५८	९।६४।७	कश्यपो मारीचः	,,	गायत्री
९५९	९।६४।८	कश्यपो मारीचः	,,	,,
९६०	९।६४।९	कश्यपो मारीचः	,,	,,
९६१	९।२४।१	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
९६२	९।२४।२	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
९६३	९।२४।३	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
९६४	९।२४।५	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
९६५	९।२४।४	असितः काश्यपो देवलो वा	पवमानः सोमः	गायत्री
९६६	९।२४।६	असितः काश्यपो देवलो वा	"	"
९६७	९।२४।७	असितः काश्यपो देवलो वा	"	"
		(२)		
९६८	९।२०।१	असितः काश्यपो देवलो वा	"	"
९६९	९।२०।२	असितः काश्यपो देवलो वा	"	"
९७०	९।२०।३	असितः काश्यपो देवलो वा	"	"
९७१	९।२०।४	असितः कश्यपो देवलो वा	"	"
९७२	९।२०।५	असितः कश्यपो देवलो वा	"	"
९७३	९।२०।६	असितः काश्यपो देवलो वा	"	"
९७४	९।२०।७	असितः काश्यपो देवलो वा	"	"
९७५	९।५५।१	अवत्सारः काश्यपः	"	"
९७६	९।५५।२	अवत्सारः काश्यपः	"	"
९७७	९।५५।३	अवत्सारः काश्यपः	"	"
९७८	९।५५।४	अवत्सारः काश्यपः	"	"
९७९	९।६२।७	जमदग्निर्भार्गवः	"	"
९८०	९।६२।८	जमदग्निर्भार्गवः	"	"
९८१	९।६२।९	जमदग्निर्भार्गवः	"	"
		(३)		
९८२	१०।९१।५	अरुणो वैतहव्यः	अग्निः	जगती
९८३	१०।९१।७	अरुणो वैतहव्यः	"	"
९८४	१०।९१।८	अरुणो वैतहव्यः	"	"
९८५	५।७०।१	उरुचक्रिरात्रेयः	मित्रावरुणौ	गायत्री
९८६	५।७०।२	उरुचक्रिरात्रेयः	"	"
९८७	५।७०।३	उरुचक्रिरात्रेयः	"	"
९८८	८।७६।१०	कुरुसुतिः काण्वः	इन्द्र	"
९८९	८।७६।११	कुरुसुतिः काण्वः	"	"
९९०	८।७६।१२	कुरुसुतिः काण्वः	"	"
९९१	६।६०।७	भरद्वाजो बार्हस्पत्यः	इन्द्राग्नी	"
९९२	६।६०।८	भरद्वाजो बार्हस्पत्यः	"	"
९९३	६।६०।९	भरद्वाजो बार्हस्पत्यः	"	"
		(४)		
९९४	९।६५।१९	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	पवमानः सोम	"
९९५	९।६५।२०	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	"	"
९९६	९।६५।२१	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	"	"
९९७	९।१०७।८	सप्तर्षयः	"	बृहती

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
९९८	९।१०७।९	सप्तर्षयः	पवमानः सोमः	बृहती
९९९	९।१९।१	असितः काश्यपो देवलो वा	"	गायत्री
१०००	९।१९।३	असितः काश्यपो देवलो वा	"	"
१००१	९।१९।२	असितः काश्यपो देवलो वा	"	"
		(५)		
१००२	१।८१।१	गोतमो राहूगणः	इन्द्रः	पंक्तिः
१००३	१।८१।२	गोतमो राहूगणः	"	"
१००४	१।८१।३	गोतमो राहूगणः	"	"
१००५	१।८४।१०	गोतमो राहूगणः	"	"
१००६	१।८४।११	गोतमो राहूगणः	"	"
१००७	१।८४।१२	गोतमो राहूगणः	"	"
		(६)		
१००८	९।६२।४	जमदग्निर्भार्गवः	पवमानः सोमः	गायत्री
१००९	९।६२।५	जमदग्निर्भार्गवः	"	"
१०१०	९।६२।६	जमदग्निर्भार्गवः	"	"
१०११	९।१०८।९	उर्ध्वसद्मा आंगिरसः	"	काकुभः प्रागाथः (विषमा ककुप्, समा सतो बृहती)
१०१२	९।१०८।१०	कृतयशा आंगिरसः	"	"
१०१३	९।१०२।१	त्रित आप्त्यः	"	उष्णिक्
१०१४	९।१०२।२	त्रित आप्त्यः	"	"
१०१५	९।१०२।३	त्रित आप्त्यः	"	"
१०१६	९।१००।६	रेभसूनू काश्यपौ	"	अनुष्टुप्
१०१७	९।१००।७	रेभसूनू काश्यपौ	"	"
१०१८	९।१००।९	रेभसूनू काश्यपौ	"	"
१०१९	९।९७।१०	मन्युर्वासिष्ठः	"	त्रिष्टुप्
१०२०	९।९७।११	मन्युर्वासिष्ठः	"	"
१०२१	९।९७।१२	मन्युर्वासिष्ठः	"	"
		(७)		
१०२२	५।६।४	वसुश्रुत आत्रेयः	अग्निः	पंक्तिः
१०२३	५।६।५	वसुश्रुत आत्रेयः	"	"
१०२४	५।६।९	वसुश्रुत आत्रेयः	"	"
१०२५	८।९८।१	नृमेध आंगिरसः	इन्द्रः	उष्णिक्
१०२६	८।९८।२	नृमेध आंगिरसः	"	"
१०२७	८।९८।३	नृमेध आंगिरसः	"	"
१०२८	१।८४।१	गोतमो राहूगणः	"	"
१०२९	१।८४।३	गोतमो राहूगणः	"	"
१०३०	१।८४।२	गोतमो राहूगणः	"	"

अथ सप्तमोऽध्यायः ।

अथ चतुर्थप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ ४ ॥

[१]

(१-२४) १ (अकृष्टमाषादयः) त्रयः; २, ११ कश्यपो मारीचः; ३ मेधातिथिः काण्वः; ४ हिरण्यस्तूप आंगिरसः; ५ अवत्सारः काश्यपः; ६ जमदग्निर्भार्गवः; ७, २१ कुत्स आंगिरसः; ८ वसिष्ठो मैत्रावरुणिः ९ त्रिशोकः काण्वः; १० श्यावाश्व आत्रेयः; १२ सप्तर्षयः (१ भरद्वाजो बार्हस्पत्यः, २ कश्यपो मारीच; ३ गोतमो राहूगणः, ४ अत्रिर्भौमः, ५ विश्वामित्रो गाथिनः, ६ जमदग्निर्भार्गवः, ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः), १३ अमहीयुरांगिरसः; १४ शुनःशेप आजीगर्तिः; १५ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; १६ (१, ३, २-पूर्वार्धः) मान्धाता यौवनाश्वः, १६ (२ उत्तरार्धः) गोधा ऋषिका; १७ असितः काश्यपो देवलो वा; १८ (१) ऋणंचयो राजर्षिः, १८ (२) शक्तिर्वासिष्ठः; १९ पर्वतनारदौ काण्वौ; २० मनुः सांवरणः, २२ बन्धुः सुबन्धुः श्रुतबन्धुर्विप्रबन्धुश्च क्रमेण गोपायना लौपायना वा; २३ भुवन आप्त्यः साधनो वा भौवनः ॥ १-६, ११-१३, १७-२१ पवमानः सोमः; ७, २२ अग्निः, ८ आदित्यः, ९, १४-१६ इन्द्रः; १० इन्द्राग्नी; २३ विश्वे देवाः, २४ ॥ १, ७ जगती; २-६, ८-११, १३-१५, १७ गायत्री; १२ प्रगाथः = विषमा बृहती, समा सतोबृहती); १६ महापंक्तिः; १८ (१) यवमध्या गायत्री, १८ (२) सतो बृहती; १९ उष्णिक्; २० अनुष्टुप्; २१ त्रिष्टुप्; २२ द्विपदा विराट्; २३ द्विपदा त्रिष्टुप्; २४ ॥

१०३१ ज्योतिर्यज्ञस्य पवते मधु प्रियं पिता देवानां जनिता विभूवसुः ।
दधाति रत्नं स्वधयोरपीच्यं मदिन्तमो मत्सर इन्द्रियो रसः ॥ १ ॥ (ऋ. ९।८६।१०)

१०३२ अभिक्रन्दन्कलशं वाज्यर्षति पतिर्दिवः शतधारो विचक्षणः ।
हरिर्मित्रस्य सदनेषु सीदति मर्मृजानोऽविभिः सिन्धुभिर्वृषा ॥ २ ॥ (ऋ. ९।८६।११)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१०३१] (यज्ञस्य ज्योतिः) यज्ञाचा प्रकाशच जणूंकाय असा सोम (देवानां प्रियं मधु पवते) देवांना प्रिय असलेल्या मधुर रसाला देत असतो. तो (पिता) पालन करणारा (जनिता) उत्पादक, (विभू-वसुः) पुष्कळ धन असलेला (मदिन्तमः) अत्यंत आनंद वाढवणारा (मत्सरः) उत्साह वाढवणारा (इन्द्रियः) इन्द्राला प्रिय (रसः) सोमरस (स्वधयोः) द्यावापृथिवीमध्यें (अपीच्यं रत्नं दधाति) गुप्त धन यजमानांना देतो. ॥ १ ॥

[१०३२] (दिवः पतिः) द्युलोकाचा स्वामी (शतधारः) शेंकडों धारांनीं गाळला जाणारा (विचक्षणः वाजी) बुद्धिमान् व बलवान् (हरिः) हिरव्या रंगाचा सोमरस (अभिक्रन्दन् कलशं अर्षति) शब्द करीत कलशामध्यें जात आहे. (सिन्धुभिः) जलाशीं मिश्रित होऊन (अविभिः मर्मृजानः) लोंकरीच्या गाळणींतून शुद्ध होत हा (वृषा) बलवान् सोम (मित्रस्य सदनेषु सीदति) मित्राच्या-यज्ञाच्या पात्रांमध्यें जाऊन राहतो. ॥ २ ॥

१०३३ अग्ने सिन्धूनां पवमानो अर्षस्यग्रे वाचो अग्रियो गोषु गच्छसि ।
अग्रे वाजस्य भजसे महद्धनꣳ स्वायुधः सोतृभिः सोम सूयसे ॥ ३ ॥ १ (लु) ॥
[धा० २९ । उ० नास्ति । स्व० ५] (ऋ. ९।८६।१२)

१०३४ असृक्षत प्र वाजिनो गव्या सोमासो अश्वया । शुक्रासो वीरयाशवः ॥१॥ (ऋ. ९।६४।४)

१०३५ शुम्भमाना ऋतायुभिर्मृज्यमाना गभस्त्योः । पवन्ते वारे अव्यये ॥ २ ॥ (ऋ ९।६४।५)

१०३६ ते विश्वा दाशुषे वसु सोमा दिव्यानि पार्थिवा । पवन्तामान्तरिक्ष्या ॥ ३ ॥ २ (वी) ॥
[धा० २० । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ९।६४।६)

१०३७ पवस्व देववीरति पवित्रꣳसोम रꣳह्या । इन्द्रमिन्दो वृषा विश ॥ १ ॥ (ऋ. ९।२।१)

१०३८ आ वच्यस्व महि प्सरो वृषेन्दो द्युम्नवत्तमः । आ योनिं धर्णसिः सदः ॥२॥ (ऋ. ९।२।२)

१०३९ अधुक्षत प्रियं मधु धारा सुतस्य वेधसः । अपो वसिष्ट सुक्रतुः ॥ ३ ॥ (ऋ. ९।२।३)

[१०३३] हे सोमा ! तूं (सिन्धूनां अग्रे) जल मिश्रणाच्या पूर्वी (पवमानः अर्षसि) शुद्ध होण्यासाठीं जात असतोस. (वाचः अग्रे गच्छसि) स्तुतिला पूज्य होऊन जातोस. (गोषु अग्रियः गच्छसि) गाईंच्या अग्रभागीं जातोस. (वाजस्य स्वायुधः) बलासाठीं उत्तम आयुधांनीं युक्त होऊन (महत् धनं भजसे) मोठें धन प्राप्त करतोस. (सोम सोतृभिः सूयसे) सोमाचा रस अध्वर्यु काढतात. ॥ ३ ॥

[१०३४] (वाजिनः) बलवान् (शुक्रासः आशवः सोमासः) तेजस्वी आणि गतिमान् सोम (गव्या, अश्वया, वीरया) गाई, घोडे व पुत्र यजमानाला मिळावे यासाठीं (प्र असृक्षत) आपल्या रसांला सोडतो. ॥ १ ॥

[१०३५] (ऋतायुभिः) यज्ञ करणाऱ्या ऋत्विजांनीं (शुंभमानाः) सजवलेले (गभस्त्योः मृज्यमानाः) हातांनीं शुद्ध केले जाणारे सोमरस (अव्यये वारे) लोंकरीच्या छाननीमधून (पवन्ते) शुद्ध केले जात आहेत. ॥ २ ॥

[१०३६] (ते सोमाः) ते सोमरस (दाशुषे) दान देणाऱ्या यजमानाला (दिव्यानि आन्तरिक्ष्या पार्थिवा) द्युलोक अन्तरिक्ष व पृथ्वीवरील (विश्वा वसु) सर्व धन (आ पवन्तां) देवोत. ॥ ३ ॥

[१०३७] हे (सोम) सोमा ! (देववीः) देवतांना प्राप्त होण्याची इच्छा करणारा तूं (रंह्या पवित्रं अति पवस्व) वेगानें गाळणीमधून गाळला जा. हे (इन्दो) सोमा ! (वृषा) बल वाढवणारा तूं (इन्द्रं विश) इन्द्रामध्यें प्रविष्ट हो. ॥ १ ॥

[१०३८] हे (इन्दो) सोमा ! (वृषा द्युम्नवत्तमः धर्णसिः) बलवान् तेजस्वी व सर्वांचें धारण करणारा तूं (महि प्सरः) पुष्कळ अन्न व जल (आ वच्यस्व) आम्हांला दे व (योनिं आ सदः) आपल्या स्थानीं बैस. ॥ २ ॥

[१०३९] (सुतस्य वेधसः धारा) रस काढलेल्या सोमाची धारा (प्रियं मधु अधुक्षत) प्रिय मधुररसाला पात्रामध्यें एकत्रित करीत आहे. (सु-क्रतुः) उत्तम यज्ञ कर्म करणारा सोम (अपः वसिष्ट) जलामध्यें मिसळला जात आहे. ॥ ३ ॥

१०४० महान्तं त्वा महीरन्वापो अर्षन्ति सिन्धवः । यद्गोभिर्वासयिष्यसे ॥ ४ ॥ (ऋ. ९।२।४)

१०४१ समुद्रो अप्सु मामृजे विष्टम्भो धरुणो दिवः । सोमः पवित्रे अस्मयुः ॥ ५ ॥ (ऋ. ९।२।५)

१०४२ अचिक्रदद्वृषा हरिर्महान्मित्रो न दर्शतः । सꣳसूर्येण दिद्युते ॥ ६ ॥ (ऋ. ९।२।६)

१०४३ गिरस्त इन्द ओजसा मर्मृज्यन्ते अपस्युवः । याभिर्मदाय शुम्भसे ॥ ७ ॥ (ऋ. ९।२।७)

१०४४ तं त्वा मदाय धृष्वय उ लोककृत्नुमीमहे । तव प्रशस्तये महे ॥ ८ ॥ (ऋ. ९।२।८)

१०४५ गोषा इन्दो नृषा अस्यश्वसा वाजसा उत । आत्मा यज्ञस्य पूर्व्यः ॥ ९ ॥ (ऋ. ९।२।१०)

१०४६ अस्मभ्यमिन्दविन्द्रियं मधोः पवस्व धारया । पर्जन्यो वृष्टिमाꣳइव ॥ १० ॥ ३ (कै) ॥
[धा० ५१ । उ० १ । स्व० ८] (ऋ. ९।२।९)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

१०४७ सना च सोम जेषि च पवमान महि श्रवः । अथा नो वस्यसस्कृधि ॥ १ ॥ ऋ. ९।४।१)

[१०४०] हे सोमा ! (यत् गोभिः वासयिष्यसे) जेव्हां तुला गाईंच्या दुधाशीं मिसळण्यांत येतो, तेव्हां (महान्तं त्वा) महत्त्वपूर्ण अशा तुझ्यामध्यें (सिन्धवः महीः अपः) नद्यांचें विपुल पाणी (अनु अर्षन्ति) मिसळलें जातें. ॥ ४ ॥

[१०४१] (समुद्रः) जलमय (दिवः विष्टम्भः) द्युलोकाला धारण करणारा व (धरुणः) आधार देणारा आणि (अस्मयुः सोमः) आमच्याकडे येणारा सोम (पवित्रे अप्सु मामृजे) भांड्यांतील जलामध्यें वारंवार धुतला जातो. ॥ ५ ॥

[१०४२] (वृषा महान् हरिः) बलवर्धक मोठा हिरव्या रंगाचा (मित्रः न दर्शतः) मित्राप्रमाणें दर्शनीय सोम (अचिक्रदत्) शब्द करीत असतो व (सूर्येण सं दिद्युते) सूर्याप्रमाणें चमकत असतो. ॥ ६ ॥

[१०४३] हे (इन्दो) सोमा ! (ते ओजसा) तुझ्या सामर्थ्यानें (अपस्यवः गिरः मर्मृज्यन्ते) कर्म करण्याची इच्छा करणारे स्तोते स्तुतीचे मंत्र म्हणत असतात व (याभिः मदाय शुम्भसे) ज्या स्तुतींनीं आनन्द वाढवण्यासाठीं तूं अलंकृत केला जात आहेस. ॥ ७ ॥

[१०४४] हे सोमा ! (तव महे प्रशस्तये) तुझी मोठी स्तुति करावी यासाठीं (लोककृत्नुं तं त्वा) लोकांचें हित करूं इच्छिणाऱ्या अशा तुला (धृष्वये मदाय) शत्रूंचा नाश करण्यासाठीं व आनंद वाढवण्यासाठीं (ईमहे) आम्ही प्राप्त करतों. ॥ ८ ॥

[१०४५] हे (इन्दो) सोमा ! (यज्ञस्य पूर्व्यः आत्मा) यज्ञाचा मुख्य आत्मा तूं (गोषा नृषा) गाई देणारा, पुत्र देणारा (अश्वसा उत वाजसा) घोडे व अन्न देणारा (असि) आहेस. ॥ ९ ॥

[१०४६] हे (इन्दो) सोमा ! (वृष्टिमान् पर्जन्य इव) वृष्टी करणाऱ्या मेघाप्रमाणें (अस्मभ्यं) आम्हांला (इन्द्रियं) बलवर्धक सामर्थ्य (मधोः धारया पवस्व) मधुर रसाच्या धारेनें दे. ॥ १० ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[१०४७] (महिश्रवः पवमान सोम) पुष्कळ प्रशंसनीय शुद्ध होणाऱ्या सोमा ! (सन) देवतांना प्राप्त हो. (जेषि च) तूं विजय प्राप्त करीत आहेस. (अथ) नंतर (नः वस्यसः कृधि) आम्हांला यशस्वी कर. ॥ ४ ॥

१०४८ सना ज्योतिः सना स्व३र्विश्वा च सोम सौभगा । अथा नो वस्यसस्कृधि ॥ २ ॥
(ऋ. ९।४।२)

१०४९ सना दक्षमुत क्रतुमप सोम मृधो जहि । अथा नो वस्यसस्कृधि ॥ ३ ॥ (ऋ ९।४।३)

१०५० पवीतारः पुनीतन सोममिन्द्राय पातवे । अथा नो वस्यसस्कृधि ॥ ४ ॥ (ऋ ९।४।४)

१०५१ त्वꣳसूर्ये न आ भज तव क्रत्वा तवोतिभिः । अथा नो वस्यसस्कृधि ॥ ५ ॥ (ऋ ९।४।५)

१०५२ तव क्रत्वा तवोतिभिर्ज्योक्पश्येम सूर्यम् । अथा नो वस्यसस्कृधि ॥ ६ ॥ (ऋ. ९।४।६)

१०५३ अभ्यर्ष स्वायुध सोम द्विबर्हसꣳरयिम् । अथा नो वस्यसस्कृधि ॥ ७ ॥ (ऋ. ९।४।७)

१०५४ अभ्य३र्षानपच्युतो वाजिन्त्समत्सु सासहिः । अथा नो वस्यसस्कृधि ॥ ८ ॥ (ऋ. ९।४।८)

१०५५ त्वां यज्ञैरवीवृधन्पवमान विधर्मणि । अथा नो वस्यसस्कृधि ॥ ९ ॥ (ऋ. ९।४।९)

१०५६ रयिं नश्चित्रमश्विनमिन्दो विश्वायुमा भर । अथा नो वस्यसस्कृधि ॥ १० ॥ ४ (चा) ॥
[धा० २२ । उ० १ । स्व० २] (ऋ. ९।४।१०)

[१०४८] हे (सोम) सोमा ! (ज्योतिः सन) आम्हांला तेज दे. (स्वः च विश्वा सौभगा सन) सुख व सर्व सौभाग्य दे, (अथ) नंतर (नः वस्यसः कृधि) आम्हांला कल्याणयुक्त कर. ॥ २ ॥

[१०४९] हे (सोम) सोमा ! (दक्षं क्रतुं सन) बल व यज्ञ करण्याचें सामर्थ्य दे, (मृधः अपजहि) शत्रूंचा पराभव कर (अथ नः वस्यसः कृधि) आणि आम्हांला कल्याणयुक्त कर. ॥ ३ ॥

[१०५०] हे (पवीतारः) सोमरस तयार करणाऱ्या ऋत्विजांनों ! (इन्द्राय पातवे) इन्द्राला पिण्यासाठीं (सोमं पुनीतन) सोमरसाला पवित्र करा, (अथ नः वस्यसः कृधि) आणि आम्हांला कल्याणयुक्त कर. ॥ ४ ॥

[१०५१] हे सोमा ! (त्वं) तूं (तव क्रत्वा) तुझ्या कर्तृत्वानें व (तव ऊतिभिः) तुझ्या संरक्षणांनीं (नः सूर्ये आ भज) आम्हांला सूर्याच्या उपासनेमध्यें लाव (अथ नः वस्यसः कृधि) आणि आम्हांला कल्याण प्राप्त होईल असें कर. ॥ ५ ॥

[१०५२] हे (सोम) सोमा ! (तव क्रत्वा) तुझ्याकडून मिळालेल्या ज्ञानानें (तव ऊतिभिः) तुझ्या संरक्षणांनीं (ज्योक् सूर्यं पश्येम) चिरकालपर्यंत सूर्याला आम्ही पाहूं असें कर, (अथ नः वस्यसः कृधि) नंतर आम्हांला कल्याण प्राप्त होईल असें कर. ॥ ६ ॥

[१०५३] हे (स्वायुध सोम) उत्तम आयुधें घेणाऱ्या सोमा ! (द्वि-बर्हसं रयिं अभ्यर्ष) दोनही स्थानांत राहणारें धन आम्हांला दे (अथ नः वस्यसः कृधि) आणि आम्हांला सुखी कर. ॥ ७ ॥

[१०५४] हे (वाजिन्) बलवान् सोमा ! (समत्सु अनपच्युतः) युद्धांमध्यें पराभूत न होणारा व (सासहिः) शत्रूंचा पराभव करणारा तूं (अभि अर्ष) कलशामध्यें गाळला जा (अथ) व (अथा नः वस्यसः कृधि) आम्हांला कल्याण प्राप्त होईल असें कर. ॥ ८ ॥

[१०५५] हे (पवमान) शुद्ध होणाऱ्या सोमा ! (त्वां) तुला (विधर्मणि) विविध फळें देणाऱ्या यज्ञामध्यें (यज्ञैः अवीवृधन्) यजनीय स्तोत्रांनीं महत्त्व वाढवतात. (अथः नः वस्यसः कृधि) आम्हांला कल्याण प्राप्त होईल असें कर. ॥ ९ ॥

[१०५६] हे (इन्दो) सोमा ! (नः) आम्हांला (चित्रं) विलक्षण (अश्विनं) घोड्यांनीं युक्त (विश्वायुं रयिं) सर्व लोकांचें हित करणारें धन (नः आभर) भरपूर दे (अथः न वस्यसः कृधि) आणि आम्हांला आनंदित कर. ॥ १० ॥

१०५७ तरत्स मन्दी धावति धारा सुतस्यान्धसः । तरत्स मन्दी धावति ॥ १ ॥ (ऋ. ९।५८।१)

१०५८ उस्रा वेद वसूनां मर्तस्य देव्यवसः । तरत्स मन्दी धावति ॥ २ ॥ (ऋ. ९।५८।२)

१०५९ ध्वस्रयोः पुरुषन्त्योरा सहस्राणि दद्महे । तरत्स मन्दी धावति ॥ ३ ॥ (ऋ. ९।५८।३)

१०६० आ ययोस्त्रिंशतं तना सहस्राणि च दद्महे । तरत्स मन्दी धावति ॥ ४ ॥ ५ (हा) ॥

[धा० ६ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ९।५८।४)

१०६१ एते सोमा असृक्षत गृणानाः शवसे महे । मदिन्तमस्य धारया ॥ १ ॥ (ऋ. ९।६२।२२)

१०६२ अभि गव्यानि वीतये नृम्णा पुनानो अर्षसि । सनद्वाजः परि स्रव ॥ २ ॥ (ऋ. ९।६२।२३)

१०६३ उत नो गोमतीरिषो विश्वा अर्ष परिष्टुभः । गृणानो जमदग्निना ॥ ३ ॥ ६ (वि) ॥

[धा० १५ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ९।६२।२४)

१०६४ इमंस्तोममर्हते जातवेदसे रथमिव सं महेमा मनीषया ।
भद्रा हि नः प्रमतिरस्य संसद्यग्ने सख्ये मा रिषामा वयं तव ॥ १ ॥ (ऋ १।९४।१)

[१०५७] (मन्दी सः) आनन्द देणारा तो सोम (तरत् धावति) सत्वर गाळणींतून खालीं पडतो. (सुतस्य अन्धसः धारा) या सोमरसरूपी अन्नाची धारा (धावति) धांवत आहे. (मन्दी सः तरत् धावति) आनन्द देणारा हा सोम तारण करीत धांवत आहे. ॥ १ ॥

[१०५८] (वसूनां उस्रा) धन देणारी (देवी) चमकत असलेली धारा (मर्तस्य अवसः वेद) यजमानाचें संरक्षण करण्याचें सर्व ज्ञान जाणते (सः मन्दी तरत् धावति) ती आनन्द देणारी धारा त्वरेनें धांवते. ॥ २ ॥

[१०५९] (ध्वस्रयोः पुरुषन्त्योः) ध्वस्र व पुरुषन्तिच्या (सहस्राणि आदद्महे) सहस्र प्रकारच्या धनांचें आम्ही ग्रहण करतों. (मन्दी सः) आनंद देणारा तो सोम (तरत् धावति) त्वरेनें धांवतो. ॥ ३ ॥

[१०६०] (ययोः) ज्या ध्वस्र व पुरुषन्तिच्या (त्रिंशतं सहस्राणि च) तीनशें व सहस्र (तना आदद्महे) वस्त्रांचा आम्ही स्वीकार करतों. (मन्दी सः तरत् धावति) आनन्द देणारा तो सोम लवकर खालील भांडयांत उतरत आहे. ॥ ४ ॥

[१०६१ [(मदिन्तमस्य एते सोमाः) परम आनन्द देणाऱ्या सोमाचे हे रस (गृणानाः) स्तुति केल्यानंतर (महे शवसे) आम्हांला उत्तम बल देण्यासाठीं (धारया असृक्षत) धारेनें कलशामध्यें उतरत आहेत. ॥ १ ॥

[१०६२] हे सोमा ! तूं (वीतये) देवांना भक्षण करण्याकरितां देण्यासाठीं (नृम्णा गव्यानि) मानवांना आनंद देणाऱ्या दूध आदींना (पुनानः अर्षसि) पवित्र करीत कलशामध्यें जात आहेस. (वाजः सनत् परिस्रव) अन्न देत तूं कलशामध्यें उतर. ॥ २ ॥

[१०६३] (उत) आणि हे सोमा ! (जमदग्निना गृणानः) जमदग्निनें स्तविलेला तूं (नः) आम्हांला (गोमतीः) गाईनीं युक्त (परिष्टुभः) स्तुत्य (विश्वाः इषः) सर्व अन्नें (अर्ष) दे. ॥ ३ ॥

[१०६४] (अर्हते जातवेदसे) पूजनीय अग्निसाठीं (मनीषया) बुद्धिपूर्वक केलेल्या (इमं स्तोमं) या स्तोत्राला (रथं इव) रथ करतात त्याप्रमाणें (सं महेम) आम्ही पूजनीय करीत आहों. (अस्य संसदि) याच्या आराधनेंमध्यें (नः प्रमतिः) आमची बुद्धि (भद्रा हि) उत्तम चालत आहे. हे (अग्ने) अग्निदेवा ! (तव सख्ये) तुझ्या मैत्रीमध्यें (वयं मा रिषाम) आम्ही हिंसित होणार नाहीं. ॥ १ ॥

*

१०६५ भरामेध्मं कृणवामा हवींऽषि ते चितयन्तः पर्वणापर्वणा वयम् ।
जीवातवे प्रतराऽसाधया धियोऽग्ने सख्ये मा रिषामा वयं तव ॥ २ ॥ (ऋ. १।९४।४)

१०६६ शकेम त्वा समिधंऽसाधया धियस्त्वे देवा हविरदन्त्याहुतम् ।
त्वमादित्याँ आ वह तान्ह्यू३श्मस्यग्ने सख्ये मा रिषामा वयं तव ॥ ३ ॥ ७ (छौ) ॥

[धा० ३७ । उ० २ । स्व० १०] (ऋ. १।९४।३)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

१०६७ प्रति वाऽंसूर उदिते मित्रं गृणीषे वरुणम् । अर्यमणंऽरिशादसम् ॥ १ ॥ (ऋ. ७।६६।७)

१०६८ राया हिरण्यया मतिरियमवृकाय शवसे । इयं विप्रा मेधसातये ॥ २ ॥ (ऋ. ७।६६।८)

१०६९ ते स्याम देव वरुण ते मित्र सूरिभिः सह । इषंऽस्वश्च धीमहि ॥ ३ ॥ ८ (हा) ॥

[धा० ११ । उ० नास्ति० । स्व० २] (ऋ. ७।६६।९)

१०७० भिन्धि विश्वा अप द्विषः परि बाधो जही मृधः । वसु स्पार्हं तदा भर ॥ १ ॥

(ऋ. ८।४५।४०)

[१०६५] हे (अग्ने) अग्निदेवा ! (इध्मं भराम) आम्ही तुझ्यासाठीं समिधा एकत्रित करीत आहों. (वयं) आम्ही (पर्वणा पर्वणा) प्रत्येक पर्वामध्यें (चितयन्तः) तुला प्रदीप्त करीत (ते हवींषि कृणवाम) तुझ्यासाठीं हवि तयार करीत आहोंत. तो तूं (जीवातवे) आम्हांला दीर्घजीवन प्राप्त व्हावें यासाठीं (धियः प्रतरां साधय) आमच्या यज्ञकर्मांची उत्तम पूर्णता कर. हे (अग्ने) अग्निदेवा ! (तव सख्ये) तुझ्या मित्रात्वामध्यें राहिल्यानें (वयं मा रिषाम) आम्ही नष्ट होणार नाहीं. ॥ २ ॥

[१०६६] हे अग्ने ! (त्वा समिधं शकेम) तुला आम्ही उत्तम रीतिनें प्रदीप्त करीत आहों. (धियः साधय) आमची यज्ञादि कर्मे उत्तम रीतिनें सिद्ध कर. (त्वे आहुतं हविः) तुझ्यामध्यें आहुतिनें दिलेलें हवि (देवाः अदन्ति) देव भक्षण करतात. (त्वं आदित्यान् आ वह) तूं अदितिच्या पुत्रांना बोलावून आण. (तान् हि उश्मसि) त्यांना आम्ही येथें इच्छित आहों. (अग्ने) हे अग्निदेवा ! (तव सख्ये वयं मा रिषाम) तुझ्या मैत्रीनें आम्ही नष्ट होणार नाहीं. ॥ ३ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[१०६७] हे मित्र व वरुण देवतांनों ! (सूरे उदिते) सूर्य उदय पावल्यावर (मित्रं) मित्राची (वरुणं) वरुणाची अर्थात् (वां) तुम्हां दोघांची आणि (रिशादसं अर्यमणं) शत्रूनाशक अर्यमाची (प्रति गृणीषे) प्रत्येकाची स्तुति करीत आहें. ॥ १ ॥

[१०६८] हे (विप्राः) ज्ञानी लोक हो ! (इयं मतिः) ही स्तुति (हिरण्यया राया) हितकारक व रमणीय धनासह (अवृकाय शवसे) क्रूरतारहित बल प्राप्त होण्यासाठीं तसेंच (मेध-सातये) यज्ञाची सिद्धि व्हावी यासाठीं तुम्हांला मान्य होवो. ॥ २ ॥

[१०६९] हे (देव वरुण) वरुणदेवा ! (सूरिभिः सह) विद्वानांसह (ते) तुझी स्तुति करणारे आम्ही धनवान् (स्याम) व्हावें. हें (मित्र) मित्रा ! तुझी स्तुति करणारे आम्ही धनवान् व्हावें, त्याचप्रमाणें (इषं च स्वः धीमहि) अन्न व स्वर्गीय आनन्द प्राप्त करणारे व्हावें. ॥ ३ ॥

[१०७०] हे इन्द्रा ! तूं (विश्वाः द्विषः अप भिन्धि) सर्व शत्रूंचा नाश कर. (बाधः मृधः परि जहि) बाधा करणाऱ्या शत्रूंचा नाश कर (स्पार्हं तत् वसु आभर) व स्पृहणीय असें तें धन आम्हांला भरपूर दे. ॥ १ ॥

१०७१ यस्य ते विश्वमानुषग्भूरेर्दत्तस्य वेदति । वसु स्पार्हं तदाभर ॥ २ ॥ (ऋ. ८।४५।४२)

१०७२ यद्वीडाविन्द्र यत्स्थिरे यत्पर्शाने पराभृतम् । वसु स्पार्हं तदा भर ॥ ३ ॥ ९ (चू) ॥
[धा० १२ । उ० १ । स्व० ६] (ऋ. ८।४५।४१)

१०७३ यज्ञस्य हि स्थ ऋत्विजा सस्नी वाजेषु कर्मसु । इन्द्राग्नी तस्य बोधताम् ॥ १ ॥
(ऋ. ८।३८।१)

१०७४ तोशासा रथयावाना वृत्रहणापराजिता । इन्द्राग्नी तस्य बोधताम् ॥ २ ॥ (ऋ. ८।३८।२)

१०७५ इदं वां मदिरं मध्वधुक्षन्नद्रिभिर्नरः । इन्द्राग्नी तस्य बोधतम् ॥ ३ ॥ १० (टा) ॥
[धा० ८ । उ० १ । स्व० २] (ऋ. ८।३८।३)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

१०७६ इन्द्रायेन्दो मरुत्वते पवस्व मधुमत्तमः । अर्कस्य योनिमासदम् ॥ १ ॥ (ऋ. ९।६४।२२)

१०७७ तं त्वा विप्रा वचोविदः परिष्कृण्वन्ति धर्णसिम् । सं त्वा मृजन्त्यायवः ॥ २ ॥
(ऋ. ९।६४।२३)

[१०७१] हे इन्द्रा ! (ते दत्तस्य) तूं दिलेल्या (भूरेः यस्य) पुष्कळ अशा ज्या धनाला (विश्व मानुषः) सर्व मनुष्यें (आनुषक् वेदति) जाणतात. (तत् स्पार्हं वसु) तें स्पृहणीय धन (नः आभर) आम्हांला भरपूर दे. ॥ २ ॥

[१०७२] हे (इन्द्र) इन्द्रा ! तूं (यत् वीडौ) जें धन भक्कम खजिन्यांत ठेवलें आहेस, (यत् स्थिरे) जें जमिनींत स्थिर ठिकाणीं ठेवलें आहेस, (यत् विपर्शाने) जें स्पर्श न करतां येण्याजोग्या ठिकाणीं ठेवलेलें (पराभृतं) तें शत्रूंकडून तूं आणलेलें (तत् स्पार्हं वसु नः आभर) स्पृहणीय धन आम्हांला दे. ॥ ३ ॥

[१०७३] हे (इन्द्राग्नी) इन्द्र व अग्नि ! तुम्ही (हि) च खरोखर (यज्ञस्य ऋत्विजाः स्थ) यज्ञाचे ऋत्विज आहांत. (वाजेषु कर्मसु) युद्धासारख्या कार्यांमध्येंहि (सस्नी) तुम्ही शुद्ध राहतां, म्हणून (तस्य बोधतं) या स्तुतिला तुम्ही जाणून स्वीकारा. ॥ १ ॥

[१०७४] (तोशासा) शत्रूला मारणारे (रथ-यावाना) रथांतून जाणारे (वृत्र-हणा) घेरणाऱ्या शत्रूंचा नाश करणारे (अ-पराजिता) पराजित न होणारे (इन्द्राग्नी) इन्द्र व अग्नि (तस्य बोधतं) त्या माझ्या स्तुतिला ऐकून स्वीकारोत. ॥ २ ॥

[१०७५] हे (इन्द्राग्नी) इन्द्र व अग्नि ! (वां) तुमच्यासाठीं (नरः) ऋत्विजांनीं (अद्रिभिः) दगडांनीं (मदिरं मधु अधुक्षन्) आनन्द देणारा मधुर सोमरस काढून तयार केला आहे. (तस्य बोधतं) त्या संबंधाची माझी स्तुति तुम्ही लक्ष्यांत घ्या. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[१०७६] हे (इन्दो) सोमा ! (मधुमत्तमः) अत्यंत मधुर असा तूं (अर्कस्य योनिं आसदं) पूज्य यज्ञाच्या स्थानामध्यें बसण्यासाठीं (मरुत्वते इन्द्राय पवस्व) मरुतांसह येणाऱ्या इन्द्राकरितां तूं शुद्ध हो. ॥ १ ॥

[१०७७] हे (इन्दो) सोमा ! (तं धर्णसिं त्वां) त्या धारकशक्तिनेंयुक्त असणाऱ्या तुला (वचोविदः विप्राः) वाक्याचा अर्थ जाणणारे ज्ञानी (परिष्कृण्वन्ति) सुशोभित करीत असतात. (आयवः) ऋत्विजलोक (त्वा सं मृजन्ति) तुला उत्तमप्रकारें शुद्ध करीत आहेत. ॥ २ ॥

१०७८ रसं ते मित्रो अर्यमा पिबन्तु वरुणः कवे । पवमानस्य मरुतः ॥ ३ ॥ ११ (ल) ॥

[धा० १४ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ९।६४।२४)

१०७९ मृज्यमानः सुहस्त्या समुद्रे वाचमिन्वसि ।
रयिं पिशङ्गं बहुलं पुरुस्पृहं पवमानाभ्यर्षसि ॥ १ ॥ (ऋ. ९।१०७।२१)

१०८० पुनानो वारे पवमानो अव्यये वृषो अचिक्रदद्वने ।
देवाना२ सोम पवमान निष्कृतं गोभिरञ्जानो अर्षसि ॥ २ ॥ १२ (ति) ॥

[धा० २४ । उ० १ । स्व० ३) (ऋ. ९।१०७।२२)

१०८१ एतमु त्यं दश क्षिपो मृजन्ति सिन्धुमातरम् । समादित्येभिरख्यत ॥ १ ॥ (ऋ. ९।६१।७)

१०८२ समिन्द्रेणोत वायुना सुत एति पवित्र आ । स२ सूर्यस्य रश्मिभिः ॥ २ ॥ (ऋ. ९।६१।८)

१०८३ स नो भगाय वायवे पूष्णे पवस्व मधुमान् । चारुर्मित्रे वरुणे च ॥ ३ ॥ १३ (टि) ॥

[धा० ८ । उ० १ । स्व० ३] (ऋ. ९।६१।९)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

[५]

१०८४ रेवतीर्नः सधमाद इन्द्रे सन्तु तुविवाजाः । क्षुमन्तो याभिर्मदेम ॥ १ ॥ (ऋ. १।३०।१३)

[१०७८] हे (कवे) क्रान्तदर्शी सोमा ! (पवमानस्य ते रसं) पवित्र होणाऱ्या तुझ्या रसाला (मित्रः वरुणः अर्यमा मरुतः पिबन्तु) मित्र, वरुण, अर्यमा व मरुत् हे पिवोत. ॥ ३ ॥

[१०७९] (सु-हस्त्या) सुन्दर अंगुलींनीं (मृज्यमानः) शुद्ध केला जाणारा सोम (समुद्रे वाचं इन्वसि) कलशामध्यें शब्द करीत पडत असतो. हे (पवमान) शुद्ध होणाऱ्या सोमा ! (पिशंगं पुरुस्पृशं) सुवर्णाच्या रंगाचें अनेकांनीं इच्छिण्याजोगें (बहुलं रयिं अभ्यर्षसि) पुष्कळ धन तूं देत असतोस. ॥ १ ॥

[१०८०] (वृषः पुनानः) बल वाढवणारा, शुद्ध होणारा (अव्यये वारे पवमानः) मेंढीच्या लोंकरीच्या गाळणीमधून गाळला जाणारा (वने अचिक्रदत्) उदकामध्यें शब्द करीत पडत असतो. हे (पवमान सोम) शुद्ध होणाऱ्या सोमा ! तूं (देवानां) देवांसाठीं (गोभिः अंजानः) गाईंच्या दुधाशीं मिसळला जात (निष्कृतं अर्षसि) शुद्ध केलेल्या स्थानाजवळ जातोस. ॥ २ ॥

[१०८१] (सिन्धु-मातरं त्यं एतं) सिंधु ज्याची माता आहे अशा त्या ह्या सोमाला (दश क्षिपः) दहा अंगुली (मृजन्ति) शुद्ध करीत असतात. तो हा सोम (आदित्येभिः समख्यत) आदित्यांना प्राप्त होत असतो. ॥ १ ॥

[१०८२] (सुतः) सोमरस (पवित्रे) कलशामध्यें (इन्द्रेण सं एति) इन्द्राला प्राप्त होतो (उत वायुना आ) आणि वायुला प्राप्त होतो. तसेंच (सूर्यस्य रश्मिभिः सं) सूर्याच्या किरणांशीं मिळत असतो. ॥ २ ॥

[१०८३] हे सोमा ! (मधुमान् चारुः सः) मधुर व सुन्दर असा तूं (नः) आमच्या यज्ञामध्यें (भगाय, वायवे, पूष्णे, मित्रे, वरुणे च पवस्व) भग, वायु, पूषा, मित्र व वरुण यांसाठीं शुद्ध हो. ॥ ३ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५] पञ्चमः खण्डः ।

[१०८४] (क्षुमन्तः) अन्न जवळ असलेले आम्ही (याभिः) ज्या गाईंच्याबरोबर राहून (मदेम) आनंद उपभोगीत आहों, (इन्द्रे सधमादे) त्या इन्द्रासह एकास्थानीं राहून (नः) आमच्या त्या गाई (रेवतीः) दूध तूप देणाऱ्या व (तुविवाजाः सन्तु) बलानें युक्त होवोत. ॥ १ ॥

१०८५ आ घ त्वावान् त्मना युक्तः स्तोतृभ्यो धृष्णवीयानः । ऋणोरक्षं न चक्रयोः ॥ २ ॥
(ऋ. १।३०।१४)

१०८६ आ यद् दुवः शतक्रतवा कामं जरितॄणाम् । ऋणोरक्षं न शचीभिः ॥ ३ ॥ १४ (ठी) ॥
[धा० १८ । उ० २ । स्व० ४] (ऋ. १।३०।१५)

१०८७ सुरूपकृत्नुमूतये सुदुघामिव गोदुहे । जुहूमसि द्यविद्यवि ॥ १ ॥ (ऋ. १।४।१)

१०८८ उप नः सवना गहि सोमस्य सोमपाः पिब । गोदा इद्रेवतो मदः ॥ २ ॥ (ऋ. १।४।२)

१०८९ अथा ते अन्तमानां विद्याम सुमतीनाम् । मा नो अति ख्य आ गहि ॥ ३ ॥ १५ (कौ) ॥
[धा० ११ । उ० १ । स्व० नास्ति] (ऋ. १।४।३)

१०९० उभे यदिन्द्र रोदसी आपप्राथोषा इव । महान्तं त्वा महीनाꣳ सम्राजं चर्षणीनाम् ।
देवी जनित्र्यजीजनद्भद्रा जनित्र्यजीजनत् ॥ १ ॥ (ऋ. १०।१३४।१)

१०९१ दीर्घꣳ ह्यङ्कुशं यथा शक्तिं बिभर्षि मन्तुमः । पूर्वेण मघवन्पदा वयामजो यथा यमः ।
देवी जनित्र्यजीजनद्भद्रा जनित्र्यजीजनत् ॥ २ ॥ (ऋ. १०।१३४।६)

[१०८५] हे (धृष्णो) धैर्यवान् इन्द्रा ! (त्वावान्) तुझ्यासारखा (त्मना युक्तः) बुद्धिनें युक्त होऊन (ईयानः) प्रार्थना केल्यानंतर (स्तोतृभ्यः) स्तोत्यांसाठीं इष्ट पदार्थ (घ आ ऋणोः) अवश्य देवो. (चक्रयोः अक्षं न) ज्याप्रमाणें दोनही रथचक्रांना आंस मिळत असतो. ॥ २ ॥

[१०८६] हे (शत-क्रतो) शेंकडों कर्म करणाऱ्या इन्द्रा ! (यत् दुवः कामं) जी इष्ट धन मिळावें अशी उपासकांची इच्छा आहे ती (जरितॄणां आ ऋणोः) स्तुति करणाऱ्यांना प्राप्त करून दे. (शचीभिः अक्षं न) ज्याप्रमाणें गाडीच्या योग्य हालचालींनीं धुरेला चालना मिळत असते. ॥ ३ ॥

[१०८७] (सुरूपकृत्नुं) सुन्दर रूप करणाऱ्या इन्द्राला (ऊतये) आपल्या संरक्षणासाठीं (द्यवि द्यवि जुहूमसि) प्रत्येक दिवशीं आम्ही बोलावीत आहों. (गोदुहे सुदुघां इव) गाईचें दूध काढावयाच्यावेळीं गोपाल ज्याप्रमाणें उत्तम दूध देणाऱ्या गाईला बोलावतात तसें. ॥ १ ॥

[१०८८] हे (सोमपाः) सोमरस पिणाऱ्या इन्द्रा ! सोमरस पिण्यासाठीं (नः सवना उप आगहि) आमच्या यज्ञांतील सवनांमध्यें ये. (सोमस्य पिब) सोम पी आणि तूं (रेवतः मदः गोदाः इत्) धनवानांना आनन्द व गाई देणारा आहेस. ॥ २ ॥

[१०८९] (अथ) सोम प्यायल्यानंतर (ते अन्तमानां सुमतीनां विद्याम) तुझ्याजवळ असणाऱ्या उत्तम बुद्धिना आम्हीं जाणूं. तूं हि आमच्याजवळ (आ गहि) ये. (नः मा अति ख्यः) आम्हांला सोडून दुसऱ्यांना तें ज्ञान सांगूं नकोस. ॥ ३ ॥

[१०९०] हे (इन्द्र) इन्द्रा ! (उभे रोदसी) दोनही द्यावापृथिवींना (यत् आपप्राथ) तसें तूं पूर्णपणानें भरून टाकीत आहेस. (उषाः इव) जशी उषा आपल्या प्रकाशानें सर्व जगत् भरून टाकते. (महीनां महान्तं) मोठ्यांत मोठा (चर्षणीनां सम्राजं त्वा) मनुष्यांचा सम्राट् अशा तुला (देवी जनित्री) अदिति ही देवमाता (अजीजनत्) उत्पन्न करते, (भद्रा जनित्री अजीजनत्) कल्याण करणारी माता उत्पन्न करते. ॥ १ ॥

[१०९१] हे (मन्तुमः) ज्ञानवान् इन्द्रा ! (दीर्घं अंकुशं यथा) मोठ्या शस्त्राला धारण करण्यासारखें (शक्तिं बिभर्षि) तूं शक्तिला धारण करतोस. हे (मघवन्) इन्द्रा ! (यथा अजः पूर्वेण पदा) जसा बकरा पुढच्या पायानें (वयां यमः) शाखा खेंचतो, त्याप्रमाणें तूं शत्रूंना नष्ट करतोस, (देवी जनित्री अजीजनत्) अदितिदेवीनें असें तुला प्रकट केलें. (भद्रा जनित्री अजीजनत्) कल्याण करणाऱ्या मातेनें तुला प्रकट केलें. ॥ २ ॥

१०९२ अव स्म दुर्हृणायतो मर्त्तस्य तनुहि स्थिरम् । अधस्पदं तमीं कृधि यो अस्माँ अभिदासति ।
देवी जनित्र्यजीजनद्भद्रा जनित्र्यजीजनत् ॥ ३ ॥ १६ (यौ) ॥

[धा० ४२ । उ० नास्ति । स्व० १०] (ऋ. १०।१३४।२)

॥ इति पंचमः खण्डः ॥ ५ ॥

[६]

१०९३ परि स्वानो गिरिष्ठाः पवित्रे सोमो अक्षरत् । मदेषु सर्वधा असि ॥ १ ॥ (ऋ. ९।१८।१)

१०९४ त्वं विप्रस्त्वं कविर्मधु प्र जातमन्धसः । मदेषु सर्वधा असि ॥ २ ॥ (ऋ. ९।१८।२)

१०९५ त्वे विश्वे सजोषसो देवासः पीतिमाशत । मदेषु सर्वधा असि ॥ ३ ॥ १७ (खा) ॥

[धा० ११ । उ० २ । स्व० ९] (ऋ. ९।१८।३)

१०९६ स सुन्वे यो वसूनां यो रायामानेता य इडानाम् । सोमो यः सुक्षितीनाम् ॥ १ ॥

(ऋ. ९।१०८।१३)

१०९७ यस्य त इन्द्रः पिबाद्यस्य मरुतो यस्य वार्यमणा भगः ।
आ येन मित्रावरुणा करामह एन्द्रमवसे महे ॥ २ ॥ १८ (लौ) ॥

[धा० ९ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ९।१०८।१४)

[१०९२] (दुर्हृणायतः मर्त्तस्य) दुष्ट शत्रूच्या (स्थिरं अव तनुहि) स्थायी बलाला क्षीण कर. (यः अस्मान् अभिदासति) जो आम्हांला दास करूं इच्छितो, (तं ईं अधस्पदं कृधि) त्याला खालीं दाबून टाक. (देवी जनित्री अजीजनत्) अदितिमातेनें असें तुला उत्पन्न केलेलें. (भद्रा जनित्री अजीजनत्) कल्याण करणाऱ्या मातेनें तुला असें प्रकट केलें. ॥ ३ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६] षष्ठः खण्डः ।

[१०९३] (गिरिष्ठाः स्वानः सोमः) पर्वतावर असणारा रस काढलेला सोम (पवित्रे परि अक्षरत्) गाळणींमधून टपकत आहे. हे सोमा ! (मदेषु सर्वधा असि) आनन्ददायक पदार्थांमध्यें तूं सर्वांत अधिक श्रेष्ठ आहेस. ॥१॥

[१०९४] हे सोमा ! (त्वं विप्रः) तूं ज्ञानी आहेस, (त्वं कविः) तूं दूरदर्शी आहेस, तूं (अन्धसः जातं मधु प्र) अन्नांपासून उत्पन्न झालेल्या मधुर रसाला देतोस. (मदेषु सर्वधा असि) तूं आनन्द देणाऱ्यांमध्यें सर्वश्रेष्ठ आहेस. ॥२॥

[१०९५] हे सोमा ! (सजोषसः विश्वे देवासः) एका कार्यामध्यें उत्साहानें कार्य करणारे सर्व देव (त्वे पीतिं आशत) तुझा रस पिण्याची इच्छा करतात. (मदेषु सर्वधा असि) आनन्द देणाऱ्यांमध्यें तूं सर्वांपेक्षा अधिक श्रेष्ठ आहेस. ॥ ३ ॥

[१०९६] (यः सोमः) जो सोम (वसूनां आ नेता) धनांना आणणारा, (यः रायां) जो गाईंना आणणारा, (यः इडां) जो अन्न आणणारा (यः सुक्षितीनां) जो उत्तम पुत्रांना, उत्तम नोकरांना देणारा आहे (सः सुन्वे) त्या सोमाचा रस काढला जात आहे. ॥ १ ॥

[१०९७] हे सोमा ! (यस्य ते इन्द्रः पिबात्) ज्या तुझा रस इन्द्र पीतो, (यस्य मरुतः) ज्याचा रस मरुत् पितात, (वा) अथवा (यस्य अर्यमणा भगः) ज्याचा रस अर्यम्यासह भगदेव पीत असतो, (येन महे अवसे) ज्या सोमानें मोठ्या संरक्षणासाठीं (मित्रावरुणा आ) मित्र व वरुण यांना बोलावलें, तसेंच (इन्द्रः आ) इन्द्राला बोलावलें. ॥२॥

१०९८ तं वः सखायो मदाय पुनानमभि गायत । शिशुं न हव्यैः स्वदयन्त गूर्तिभिः ॥ १ ॥
(ऋ. ९।१०५।१)

१०९९ सं वत्स इव मातृभिरिन्दुर्हिन्वानो अज्यते । देवावीर्मदो मतिभिः परिष्कृतः ॥ २ ॥
(ऋ. ९।१०५।२)

११०० अयं दक्षाय साधनोऽयं शर्धाय वीतये ।
अयं देवेभ्यो मधुमत्तरः सुतः ॥ ३ ॥ १९ (यि) ॥
[धा० १७ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ९।१०५।३)

११०१ सोमाः पवन्त इन्दवोऽस्मभ्यं गातुवित्तमाः ।
मित्राः स्वाना अरेपसः स्वाध्यः स्वर्विदः ॥ १ ॥ (ऋ. ९।१०१।१०)

१००२ ते पूतासो विपश्चितः सोमासो दध्याशिरः ।
सूरासो न दर्शतासो जिगत्नवो ध्रुवा घृते ॥ २ ॥ (ऋ. ९।१०१।१२)

११०३ सुष्वाणासो व्यद्रिभिश्चिताना गोरधि त्वचि ।
इषमस्मभ्यमभितः समस्वरन्वसुविदः ॥ ३ ॥ २० (वा) ॥
[धा० १० । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ९।१०१।११)

[१०९८] हे (सखायः) ऋत्विजरूपी मित्रांनों ! (वः मदाय) तुम्ही देवतांना आनंद देण्यासाठीं (पुनानं तं अभि गायत) गाळल्या जाणाऱ्या त्या सोमाचें स्तोत्र-गायन करा. (शिशुं न) ज्याप्रमाणें आया बालकाला सुशोभित करतात, त्याप्रमाणें सोमाला (हव्यैः गूर्तिभिः स्वदयन्त) हवि व स्तुति यांनीं अधिक स्वादिष्ट बनवा. ॥ १ ॥

[१०९९] (देवावीः मदः) देवतांचा रक्षक व आनंददायक तसेंच (मतिभिः परिष्कृतः) स्तुतिंनीं शुद्ध केलेला (हिन्वानः इन्दुः) याजकांना प्रेरणा करणारा सोम (सं अज्यते) पाण्याशीं मिसळला जात असतो. (मातृभिः वत्सः इव) मातांकडून मुलगा जसा न्हाऊं घातला जात असतो. ॥ २ ॥

[११००] (अयं दक्षाय साधनः) हा सोम बल वाढवण्याचें साधन आहे. (अयं शर्धाय) हा सोम बल वाढविण्यासाठीं व (वीतये) भक्षण करण्यासाठीं आहे. (अयं सुतः) याचा रस काढल्यानंतर (देवेभ्यः मधुमत्तरः) तो देवांसाठीं अधिक मधुर होत असतो. ॥ ३ ॥

[११०१] (मित्राः स्वानाः) मित्रासारखे हितकारक रस काढलेले (अरेपसः स्वाध्यः) निष्पाप व उत्तम लक्ष्य देण्याजोगे (स्वः विदः) आत्मदर्शी (गातु-वित्तमाः इन्दवः सोमाः) स्तुत्य चमकणारे सोमरस (अस्मभ्यं पवन्ते) आमच्यासाठीं कलशामध्यें गाळले जात आहेत. ॥ १ ॥

[११०२] (पूतासः विपश्चितः) पवित्र व ज्ञानी (दध्याशिरः) दह्यांशीं मिसळलेले (घृते जिगत्नवः) जलामध्यें मिसळले जाणारे (ध्रुवाः ते सोमासः) कलशामध्यें राहणारे ते सोमरस (सूरासः न) सूर्यासारखे (दर्शतासः) दर्शनीय असतात. ॥ २ ॥

[११०३] (गोः अधि त्वचि) बैलाच्या चर्मावर (चितानाः) असणारे (वि अद्रिभिः सुष्वानासः) अनेक दगडांनीं कुटले जाणारे (वसुविदः) धन देणारे हे सोम (अस्मभ्यं अभितः इष समस्वरन्) आम्हांला चारही बाजूंनीं अन्न देत असतात. ॥ ३ ॥

११०४ अया पवा पवस्वैना वसूनि माँश्चत्व इन्दो सरसि प्र धन्व ।
ब्रध्नश्चिद्यस्य वातो न जूतिं पुरुमेधाश्चित्तकवे नरं धात् ॥ १ ॥ (ऋ. ९।९७।५२)

११०५ उत न एना पवया पवस्वाधि श्रुते श्रवाय्यस्य तीर्थे ।
षष्टिँ सहस्रा नैगुतो वसूनि वृक्षं न पक्वं धूनवद्रणाय ॥ २ ॥ (ऋ. ९।९७।५३)

११०६ महीमे अस्य वृष नाम शूषे माँश्चत्वे वा पृशने वा वधत्रे
अस्वापयन्निगुतः स्नेहयच्चापामित्राँ अपाचितो अचेतः ॥ ३ ॥ २१ (कि) ॥
[धा० १६ । उ० १ । स्व० ३] (ऋ. ९।९७।५४)

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

[७]

११०७ अग्ने त्वं नो अन्तम उत त्राता शिवो भुवो वरूथ्यः ॥ १ ॥ (ऋ. ५।२४।१)

११०८ वसुरग्निर्वसुश्रवा अच्छा नक्षि द्युमत्तमो रयिं दाः ॥ २ ॥ (ऋ. ५।२४।२)

[११०४] हे सोमा ! (अया पवा) या पवित्र धारेनें (एना वसूनि) हीं धनें आम्हांला (पवस्व) दे. हे (इन्दो) सोमा ! (मांश्चत्वे सरसि प्रधन्व) या स्वागतार्ह पाण्यांत तूं जा, मिसळून रहा. (यस्य) ज्याचें शोधन झाल्यावर (ब्रध्नः चित्) सूर्यहि (वातः न) वायुप्रमाणेंच (जूतिं) वेगाला प्राप्त होतो व (पुरुमेधाः चित्) अधिक बुद्धिमान् इन्द्र (तकवे मह्यं) सोम प्राप्त करणाऱ्या मला (नरं धात्) नेता होण्यासारखा पुत्र देतो. ॥ १ ॥

[११०५] हे सोमा ! (उत श्रवाय्यस्य तीर्थे) आणि स्तुतिला योग्य अशा तुझ्या स्थानीं, (नः श्रुते) आमच्या यज्ञामध्यें (एना पवया) या पवित्र धारेनें (पवस्व) तूं गाळला जा. (नैगुतः) शत्रूंचा नाश करणारा सोम (षष्टिं सहस्रा वसूनि) साठ हजार धनें (रणाय) शत्रूंशीं युद्ध करणासाठीं (धूनवत्) आम्हांला देवो, (पक्वं वृक्षं न) जसा पिकलेल्या फळांचा वृक्ष फळें देत असतो. ॥ २ ॥

[११०६] (मही वृष, नाम) पुष्कळ बाण मारणें व शत्रुला नमविणें (इमे अस्य शूषे) हीं दोनही या सोमाचीं कार्यें सुखकारी होत असतात. हीं कर्में (मांश्चत्वे) घोड्यांनीं करावयाच्या युद्धांमध्यें केलीं जातात, (वा पृशने) अथवा बाहु युद्धामध्यें (वा वधत्रे) अथवा जीं हातघाईच्या कत्तलीच्यावेळीं करावीं लागतात, (निगुतः अस्वापयन्) जीं शत्रूंना लोळवण्याच्यावेळीं, (स्नेहयत्) किंवा शत्रूंना पळवून लावण्याच्यावेळीं करावीं लागतात, हे सोमा ! (अमित्रान्) तेव्हां शत्रूंना (अचेतः) दूर कर, (इतः अपाचितः) येथून तूं शत्रूंना दूर कर. ॥ ३ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

[७] सप्तमः खण्डः ।

[११०७] हे (अग्ने) अग्निदेवा ! (वरूथ्यः त्वं) सेवा करण्यास योग्य असा तूं (नः अन्तमः) आमच्याजवळ रहा, (उत त्राता) आणि आमचा रक्षक हो व आमचें (शिवः भव) कल्याण करणारा हो ॥ १ ॥

[११०८] (वसुः वसुश्रवाः अग्निः) निवासक व धनासाठीं प्रसिद्ध असा अग्रणी तूं (अच्छ नक्षि) विशेषेंकरून आमच्याजवळ ये व (द्युमत्तमः रयिं दाः) तेजस्वी होऊन धन आम्हांला दे. ॥ २ ॥

१११० तं त्वा शोचिष्ठ दीदिवः सुम्नाय नूनमीमहे सखिभ्यः ॥ ३ ॥ २२ (वा) ॥

[धा० १९ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ५।२४।४)

१११० इमा नु कं भुवना सीषधेमेन्द्रश्च विश्वे च देवाः ॥ १ ॥ (ऋ. १०।१५७।१)

११११ यज्ञं च नस्तन्वं च प्रजां चादित्यैरिन्द्रः सह सीषधातु ॥ २ ॥ (ऋ. १०।१५७।२)

१११२ आदित्यैरिन्द्रः सगणो मरुद्भिरस्मभ्यं भेषजा करत् ॥ ३ ॥ २३ (छा) ॥

[धा० १२ । उ० २ । स्व० २] (ऋ. १०।१५७।३)

१११३ प्र व इन्द्राय वृत्रहन्तमाय विप्राय गाथं गायता य जुजोषते ॥ १ ॥

१११४ अर्चन्त्यर्कं मरुतः स्वर्का आ स्तोभति श्रुतो युवा स इन्द्रः ॥ २ ॥

१११५ उप प्रक्षे मधुमति क्षियन्तः पुष्येम रयिं धीमहे त इन्द्र ॥ ३ ॥ २४ (य) ॥

[धा० २ । उ० नास्ति । स्व १]

॥ इति सप्तमः खण्डः ॥ ७ ॥

॥ इति चतुर्थप्रपाठकस्य प्रथमोऽर्धः ॥ ४ ॥

॥ इति सप्तमोऽध्यायः ॥ ६ ॥

[११०९] हे (**शोचिष्ठ दीदिवः**) तेजस्वी व प्रकाशणाऱ्या अग्निदेवा ! (**तं त्वा**) त्या तुझी (**सुम्नाय**) आम्हांला सुख मिळावें यासाठीं व (**सखिभ्यः**) मित्र वाढावे, पुत्र आदि प्राप्त व्हावे यासाठीं (**नूनं ईमहे**) खरोखर आम्ही प्रार्थना करीत आहों. ॥ ३ ॥

[१११०] (**इमा भुवना**) हीं भुवनें (**नु कं सीषधेम**) आमच्या सुखाचीं साधनें बनोत. (**इन्द्रः च विश्वे-देवाः च**) इन्द्र व सर्व देव आम्हांला सुख देवोत. ॥ १ ॥

[११११] (**आदित्यैः सह इन्द्रः**) आदित्यांसह इन्द्र (**नः यज्ञं**) आमच्या यज्ञाला, (**तन्वं च**) आमच्या शरीराला (**प्रजां च**) मुलांबाळांना (**सीषधातु**) उत्तम सफल करो. ॥ २ ॥

[१११२] (**आदित्यैः मरुद्भिः**) आदित्य व मरुत् यांसह (**सगणः इन्द्रः**) गणांसहित असणारा इन्द्र (**अस्मभ्यं**) आम्हांसाठीं (**भेषजा करत्**) औषधें तयार करो, रोग दूर करो. ॥ ३ ॥

[१११३] (**विप्राय वृत्रहन्तमाय**) ज्ञानी व वृत्राला मारणाऱ्या (**वः इन्द्राय गाथं प्रगायत**) आपल्या इन्द्रासाठीं गाथेचें गायन करा (**यः जुजोषते**) जो तें ऐकत आहे. ॥ १ ॥

[१११४] (**सु-अर्काः मरुतः**) उत्तम तेजस्वी मरुत् (**अर्कं अर्चन्ति**) पूजनीय इन्द्राची पूजा करीत आहेत. (**श्रुतः युवा आ स्तोभति**) ज्ञानी युवा स्तविला जात आहे. (**सः इन्द्रः**) तोच इन्द्र आहे. ॥ २ ॥

[१११५] हे (**इन्द्र**) इन्द्रा ! (**ते मधुमति प्रक्षे**) तुझ्या मधुर निरीक्षणांमध्यें (**उपक्षियन्तः**) राहणारे आम्हीं (**पुष्येम**) पुष्ट होऊं व (**रयिं धीमहे**) धनाचें धारण करूं. ॥ ३ ॥

॥ येथें सातवा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति सप्तमोऽध्यायः ॥

*

सप्तम अध्याय

या सातव्या अध्यायामध्यें देवतांचीं वर्णनें करणारे कांहीं मंत्र आहेत व सोमाचें वर्णन करणारे पुष्कळच मंत्र आहेत. आधीं आपण देवतांचीं वर्णनें पाहूं, कारण देवतांसाठीं सोम आहे. प्रथमतः इन्द्र देवतेचें वर्णन पहा—

इन्द्र

१ सुरूपकृत्नुं ऊतये द्यविद्यवि जुहुमसि [१०८७] –सुन्दर रूप बनवणाऱ्या इन्द्राला आमच्या संरक्षणासाठीं आम्ही प्रत्येक दिवशीं बोलावीत आहों. जगामध्यें जें सौंदर्य आहे तें इन्द्रानें बनवलेलें आहे. अशा इन्द्राला आमच्या संरक्षणासाठीं आम्ही बोलावीत आहों.

२ आगहि, नः मा अतिख्यः [१०८९]- आमच्याजवळ ये. आम्हांला सोडून आमच्या गोष्टी दुसऱ्यांना सांगू नकोस.

३ हे मन्तुमः ! दीर्घं अंकुशं शक्तिं बिभर्षि [१०९१] –मोठ्या शस्त्राप्रमाणें असलेल्या शक्तिला तूं धारण करतोस. या शस्त्रानें तूं शत्रूबरोबर लढून त्याचा पराभव करतोस.

४ हे सोमपाः ! नः सवना आगहि, सोमस्य पिब, रेवतः मदः गोदाः [१०८८]- हे सोम पिणाऱ्या इन्द्रा ! तूं आमच्या यज्ञांत ये, सोम पी. धनवानाचा आनंद गाई देणारा असतो.

इन्द्र शत्रूंना दूर करतो

१ दुर्हणायतः मर्त्तस्य स्थिरं अवतनुहि [१०९२]- दुष्ट शत्रूच्या स्थिर बलाला क्षीण कर.

२ यः अस्मान् अभिदासति तं अधस्पदं कृधि [१०९२]- जो आम्हांला दास बनवण्याची इच्छा करतो, त्याला दाबून टांक.

इन्द्राचीं हीं कार्यें आहेत. यासाठींच इन्द्राची चारही बाजूंना प्रशंसा होत असते.

इन्द्राला सोम दिला जातो

१ इन्द्राय पातवे सोमं पुनीतन [१०५०]-इन्द्राला पिण्यास देण्याकरतां तुम्ही सोम गाळून तयार करा.

२ हे इन्द्र ! विश्वा द्विषः अप भिन्धि [१०७०]- हे इन्द्रा ! सर्व प्रकारच्या आमच्या शत्रूंना ठार मारून टांक. इन्द्र सोमरस पितो व त्यामुळें तो उत्साहित होऊन अशीं शौर्याचीं कार्यें करतो.

३ बाधः परिजहि, स्पार्हं तद् आभर [१०७०] –बाधा करणाऱ्या शत्रूंना जिंक व स्पृहणीय धन असेल तें आम्हांला भरपूर दे. सोमपान केल्यानंतर इन्द्र हें सर्व करतो.

इन्द्र धन देतो

१ हे इन्द्र ! ते दत्तस्य भूरेः यस्य विश्व-मानुषः आनुषक् वेदाति [१०७१]- हे इन्द्रा ! तूं पुष्कळसें धन दिलेंस तर तें सर्व मनुष्यें एकदम जाणतात.

२ हे इन्द्र ! यत् वीडौ, यत् स्थिरे, यत् विपर्शाने, यत् पराभृतं तत् स्पार्हं वसु नः आभर [१०७२]- हे इन्द्रा ! जें धन भक्कम खजिन्यांत असेल, जें स्थिर जागेंत ठेवलेलें असेल, जें स्पर्श न करतां येण्याजोग्याजागीं ठेवलें असेल अथवा जें शत्रूकडून त्यास पराजित करून आणलें असेल, तें स्पृहणीय धन आम्हांला भरपूर दे.

याप्रमाणें इन्द्र धन देतो याविषयीं या अध्यायांत विधानें आहेत.

अग्नि

अग्निदेवते संबंधीं काय म्हटलें आहे, तें आतां पहा—

१ हे अग्ने ! ते सख्ये वयं मा रिषाम [१०६४]- हे अग्ने ! तुझी मित्रता झाल्यानंतर आमचा नाश होणार नाहीं. तूं आमचा मित्र झालास म्हणजे आमचें सर्व प्रकारें रक्षण होईल यांत शंका मुळींच नाहीं.

२ हे अग्ने ! इध्मं भराम, ते हवींषि कृणवाम, जीवातवे धियः प्रतरां साधय [१०६५]- हे अग्ने ! आम्हीं तुझ्यासाठीं समिधा एकत्रित करतों. तुझ्यासाठीं हवनसामग्री एकत्रित करीत आहों. आम्हांला दीर्घ आयुष्य प्राप्त व्हावें यासाठीं आमच्या बुद्धि श्रेष्ठ कर, आमचीं कर्में यथासांग पूर्ण कर.

३ त्वं आदित्यान् आ वह [१०६६]- तूं आदित्यांना येथें घेऊन ये.

४ हे अग्ने ! त्वं नः अन्तमः, त्राता शिवः भव [११०७] हे अग्ने ! तूं आमचा जवळचा मित्र, रक्षण करणारा व कल्याण करणारा हो.

५ वसुः वसुश्रवाः अग्निः द्युमत्तमः रयिं दाः [११०८]- हे अग्ने ! तूं प्रत्यक्ष धन आहेस, धनासाठीं प्रसिद्ध आहेस. तूं अत्यंत तेजस्वी आहेस. असा तूं आम्हांला धन दे.

६ हे शोचिष्ठ दीदिवः! त्वा सुम्नाय सखिभ्यः ईमहे [११०९]– हे तेजस्वी व प्रकाशित होणाऱ्या अग्नि! आम्हांला सुख मिळावें व पुत्र-पौत्र व्हावे यासाठीं आम्ही तुझी प्रार्थना करीत आहों.

याप्रमाणें अग्निसंबंधाचे मंत्र या अध्यायांत आहेत. आतां इन्द्र व अग्निचे मंत्र पहा —

इन्द्र व अग्नि

१ तोशासा रथयावाना वृत्रहणा अपराजिता इन्द्राग्नी! तस्य बोधत [१०७४]– हे इन्द्र व अग्नि हो! तुम्ही शत्रूला मारणारे वीर आहांत, तुम्ही रथांतून जातां, वृत्रादि असुरांना मारतां, तुमचा कधींहि पराजय होत नाहीं, असे तुम्ही आहांत. आम्ही तुमची स्तुति करत आहोंत, तें तुम्हीं जाणून लक्ष्यांत ठेवा.

२ वां अद्रिभिः मदिरं मधु अधुक्षन् [१०७५]– तुमच्यासाठीं दगडांनीं कुटून हा आनंददायक मधुर रस काढला आहे. या रसाचा स्वीकार करा.

मित्र, वरुण व अन्य देव

१ हे विप्राः! इयं मतिः हिरण्यया राया, अवृकाय शवसे मेधसातये [१०६८]– हे ज्ञानी मित्र व वरुणो हो! हितकारक व रमणीय असें धन प्राप्त व्हावें यासाठीं, क्रूरतारहित बल मिळावें यासाठीं व बुद्धिची प्राप्ति व्हावी यासाठीं आम्हीं तुमची स्तुति करीत आहों. ती तुम्हांस मान्य होवो.

२ इषं च स्वः धीमहि [१०६९]– आम्ही अन्न व आनंद प्राप्त करणारे व्हावें.

३ आदित्यैः सह इन्द्रः नः यज्ञं, तन्वं प्रजां च सीषधातु [११११]– द्वादश आदित्यांसह इन्द्र आमच्या यज्ञामध्यें येवो. आमच्या शरीराला व आमच्या मुलांबाळांना उत्तम सहाय्य देवो.

असें वर्णन मित्र, वरुण व अन्य देवांसंबंधीं आलेलें आहे. आता सोमाचें वर्णन या अध्यायांत विशेष रीतिनें केलेलें आहे तें पहा —

देवांसाठीं सोम

१ [सुतः]आदित्येभिः समख्यत [१०८१]– सोम आदित्यांना प्राप्त होतो.

२ इन्द्रेण वायुना सूर्यस्य रश्मिभिः सं [१०८२] – इन्द्र, वायु व सूर्यकिरण यांना प्राप्त होतो.

३ हे सोम! यस्य ते इन्द्रः पिबात्, मरुतः, अर्यमणा, भगः, मित्रावरुणा [१०९७]– हे सोमा! तुझा रस इन्द्र पितो व मरुत्, अर्यमा, भग, मित्र व वरुण पितात.

याप्रमाणें यज्ञांत सर्व देव सोमरस पितात.

पर्वतावर सोम असतो

१ गिरिष्ठाः स्वानः सोमः पवित्रे परि अक्षरत्, मदेषु सर्वधा असि [१०९३]– पर्वतावर असणारा सोम, रस काढल्यानंतर तो गाळणींतून गाळला जातो. तो आनंद वाढवणाऱ्या पदार्थांमध्यें सर्वांहून अधिक आनंद देणारा आहे.

हा यज्ञाचा आत्मा आहे

१ हे इन्दो! यज्ञस्य पूर्व्यः आत्मा [१०४५]– हे सोमा! तूं यज्ञाचा पूर्वीपासून आत्मा आहेस.

सोम नसेल तर यज्ञ होऊं शकत नाहीं, म्हणून सोम हा यज्ञाचा आत्मा आहे असें म्हटलेलें आहे.

सोमाचे गुण

अशा या सोमाचे हे गुण मंत्रांत वर्णिले आहेत —

१ यज्ञस्य ज्योतिः [१०३१]– यज्ञाचें तेज.

२ प्रियं मधु [१०३१]– प्रिय व मधुर.

३ पिता [१०३१]– पिता, पालक.

४ जनिता [१०३१]– उत्पन्नकर्ता, नाना प्रकारच्या शक्ति उत्पन्न करणारा.

५ विभुः वसुः [१०३१]– पुष्कळ वैभव ज्याच्याजवळ आहे असा.

६ मदिन्तमः [१०३१]– अत्यंत आनंद देणारा.

७ मत्सरः [१०३१]– आनंद देणारा.

८ इन्द्रियः [१०३१]– इन्द्रियशक्ति वाढवणारा, इन्द्राची शक्ति वाढवणारा.

९ दिवः पतिः [१०३२]– द्युलोकाचा स्वामी, द्युलोकावर राहणारा.

१० विचक्षणः [१०३२]– विशेष ज्ञानी.

११ वाजी [१०३२]– बलवान्, अन्नवान्.

१२ हरितः [१०३२]– हिरव्या रंगाचा.

१३ शुक्रः [१०३४]– स्वच्छ, वीर्यवान्, वीर्य वाढवणारा, बलवान्.

१४ आशुः [१०३४]– शीघ्रतेनें कार्य करणारा.

१५ सोमः [१०३४]– सोमवल्ली, सोमरस.

१६ इन्दुः [१०३८]– तेजस्वी, चमकणारा.

१७ वृषा [१०३८]- बलशाली, कामनांची तृप्ती करणारा.

१८ द्युम्नवत्तमः [१०३८]- अति चमकणारा.

१९ धर्णसिः [१०३८]- धारकशक्ति वाढवणारा.

२० स्वायुधः [१०५३]- उत्तम शस्त्रास्त्रांनीं युक्त.

२१ मित्रः [११०१]- मित्राप्रमाणें हितकर्ता.

२२ अरेपाः [११०१] निर्दोष, निष्कलंक.

२३ स्वाध्यः [११०१]- उत्तम निरीक्षण करणारा.

२४ स्वर्विदः [११०१]-स्वर्गाला जाणारा, आत्मज्ञानी.

२५ गातुवित्तमः [११०१]- उत्तम मार्ग जाणणारा.

२६ पूतः [११०२]- पवित्र, गाळलेला.

२७ विपश्चितः [११०२]- ज्ञानी.

२८ दध्याशिरः [११०२]- दहीं ज्यांत मिसळलें आहे असा.

२९ घृते जिगत्नुः [११०२]- पाण्यांत मिसळण्याची इच्छा करणारा.

३० ध्रुवः [११०२]- ज्याचा परिणाम स्थिर राहतो असा.

३१ दर्शतः [११०२]- दर्शनीय, सुंदर, दिसावयास उत्तम.

३२ वसुविदः अस्मभ्यं इषं समस्वरन् [११०३]- धन जवळ बाळगणारा आम्हांला अन्न देवो.

३३ रसः स्वधयोः अपीच्यं रत्नं दधाति [१०३१] – सोमरस या द्यावापृथिवीमध्यें असलेलें उत्तम धन देतो.

याप्रमाणें या सोमाचें वर्णन या अध्यायामध्यें आलेलें आहे, सोमरस प्यात्यानंतर जे गुण वीरांमध्यें अथवा पिणाऱ्यांमध्यें दिसून येतात ते गुण सोमाचेच आहेत असें समजावयाचें आहे. उपासकांनीं आपणांमध्यें यापैकीं जे गुण येण्यासारखे असतील ते आणावे व वाढवावे.

बैलाच्या चामड्यावर कुटतात

१ गोः अधि त्वचि चितानाः वि अद्रिभिः सुष्वाणासः [११०३]- गाईच्या म्हणजे बैलाच्या चामड्यावर, म्हणजे तें चामडें पसरून त्यावर सोमाला दगडांनीं कुटण्याचें कार्य करतात. चामड्यावर फळ्या ठेऊन त्या फळ्यांवर सोमवल्ली ठेवून ती कुटतात व तिचा रस काढतात.

सोमरस पाण्यांत मिसळतात

सोमाचा रस काढल्यानंतर तो गाळण्यापूर्वी त्यांत पाणी मिसळतात—

१ सिन्धुभिः अनिभिः मर्मृजानः [१०३२]- नदीचें पाणी मिसळून गाळणींनीं तो सोमरस गाळला जातो.

२ सिन्धूनां अग्रे पवमानः अर्षसि [१०३३]- नद्यांच्या पाण्याच्या जवळ शुद्ध होण्यासाठीं जातो.

३ सुहस्त्या मृज्यमानः समुद्रे वाचं इन्वति [१०७९]- उत्तम हाताच्या अंगुलींनीं शुद्ध केला जाणारा सोमरस पाण्याच्या भांड्यांत शब्द करीत जातो.

४ मांश्चत्वे सरसि प्रधन्व [११०४]- या उत्तम पाण्यांत मिसळून जा.

५ वृषा मित्रस्य सदनेषु सीदति [१०३२]- हा बल वाढवणारा सोम मित्ररूप यज्ञपात्रांमध्यें जाऊन बसतो. पाण्याच्या भांड्यांत ठेवला जातो.

याप्रमाणें सोमरसाला पाण्यांत मिसळतात या संबंधाचीं वर्णनें या अध्यायांत आलेलीं आहेत.

सोमरस गाळला जातो

सोमरस पाण्यांत मिसळून त्याला मेंढीच्या केंसांच्या गाळणींतून गाळतात. याविषयींचे हे मंत्र आहेत, ते आतां पहा—

१ गभस्त्योः मृज्यमानः अव्ये वारे पवते [१०३५] – हातांनीं शुद्ध केला जाणारा सोमरस मेंढीच्या केंसांच्या गाळणींतून गाळला जातो.

२ देववीः रंह्या पवित्रं अति पवस्व [१०३७]- देवांजवळ जाणारा सोम वेगानें गाळणींमधून गाळला जातो.

३ समुद्रः दिवः विष्टम्भः धरुणः सोमः पवित्रे अप्सु मामृजे [१०४१]- जलमय द्युलोकाला धारण करणारा सोम गाळणीमधून भांड्यांतील पाण्यामध्यें शुद्ध केला जात आहे.

४ आयवः त्वा सं मृजन्ति [१०७७]- ऋत्विज तुला उत्तम प्रकारें शुद्ध करतात.

५ वृषा पुनानः अव्यये वारे पवमानः वने अचिक्रदत् [१०८०]- बल वाढवणारा सोम मेंढीच्या केंसांच्या गाळणींमधून गाळला जात असतां पाण्यांत शब्द करीत पडतो.

सोम शब्द करीत गाळला जातो

१ अभिक्रन्दन् कलशं अर्षति [१०३२]- शब्द करीत कलशामध्यें जातो.

२ वृषा महान्, हरिः मित्रः न दर्शतः अचिक्रदत् [१०४२]- बल वाढवणारा मोठा, दुःख दूर करणारा, मित्राप्रमाणें दर्शनीय, सोम शब्द करीत भांड्यांत पडतो.

खालच्या भांड्यांत पाणी असतें त्यांत वरच्या गाळणींतून रस पडूं लागला म्हणजे त्याचा शब्द होतो.

सोमरस चमकतो

१ सोमः सूर्येण सं दिद्युते [१०४२]- सोम सूर्याप्रमाणें चमकतो.

सोम गाईच्या दुधांत मिसळतात

सोम पाण्यांत मिसळून गाळतात व नंतर त्यांत गाईचें दूध मिसळतात. पहा —

१ गोषु अग्रं गच्छति [१०३३]- गाईच्या अग्रभागीं जातो. गाईंच्या दुधांत सोमरस मिसळला जातो.

२ यत् गोभिः वासयिष्यसे, महान्तं त्वा सिन्धवः महीः अपः अनु अर्षन्ति [१०४०]- ज्यावेळीं तुझ्यामध्यें गाईचें दूध मिसळतात, त्याच्यापूर्वीं नद्यांचें पाणी किंवा अन्य पाणी घेऊन मिळालेलें असतें.

३ वीतये नृम्णा गव्यानि पुनानः अर्षसि [१०६२] -सोमरसाचें पान करण्यापूर्वी उत्तम गाईचें दूध स्वच्छ सोमामध्यें मिळालेलें असतें.

सोमरस पिणें

१ सजोषसः विश्वेदेवासः त्वे पीतिं आशत [१०९५]- एक कार्य करणारे सर्व देव सोमाला पिऊं इच्छितात.

याप्रमाणें यज्ञ करणारे व सर्व देव सोमस पिऊं इच्छित असतात, यासंबंधींचें वर्णन आहे.

सोम अन्न देतो

१ महि प्सरः आ वच्यस्व [१०३८]- पुष्कळ अन्न आम्हांला दे.

२ नः गोमतीः विश्वा इषः अर्ष [१०६३]- आम्हांला गाईपासून उत्पन्न होणारें सर्व प्रकारचें अन्न दे. सोमरसामध्यें गाईचें दूध दहीं वगैरे मिसळतात, म्हणून सोमरस प्याल्यानें गाईपासून मिळणारें अन्न मिळालें असें होतें. सोम हेंहि अन्नच आहे. तें बल वाढवतें. पहा—

सोम बल वाढवतो

१ हे इन्दो ! [अस्माकं] इन्द्रियं मधोः धारया पवस्व [१०४६]- हे सोमा ! आमची इन्द्रियशक्ति आपल्या मधुर धारेनें वाढव.

२ दक्षं क्रतुं सन [१०४९]- बल व कर्मशक्ति वाढव.

३ अयं दक्षाय, शर्धाय, वीतये साधनः [११००] -हा सोम बल, सामर्थ्य व अन्न यांचें साधन आहे म्हणजे बल, सामर्थ्य हीं वाढवणारा आहे.

सोम दीर्घायु देतो

१ तव क्रत्वा, तव ऊतिभिः ज्योक् सूर्यं पश्येम [१०५२]- हे सोमा ! तुझ्या कर्तृत्वानें व तुझ्या संरक्षणांनीं आम्ही चिरकाल सूर्याला पाहत राहूं, अर्थात् आम्ही दीर्घ आयु प्राप्त करूं. सोमपान योग्य रीतिनें केलें असतां मनुष्याचें आयुष्य वाढतें.

सोम संरक्षण देतो

१ वसूनां उस्रा देवी मर्तस्य अवसः वेद [१०५८] –धन देणारी चमकत असलेली सोमाची धारा संरक्षण करण्याचें सर्व ज्ञान जाणते.

२ सोमाः महे अवसे धारया असृक्षत [१०६१]- सोमरस मोठ्या रक्षणासाठीं धारेनें कलशामध्यें पडतो.

याप्रमाणें सोमरस स्वसंरक्षण करण्याची शक्ति वाढवतो व वीरांना स्वसंरक्षणक्षम बनवतो, असें मंत्रांमध्यें वर्णन आहे.

सोम लोकसेवा करतो

१ लोककृत्नुं त्वा धृष्णवे मदाय ईमहे [१०४४]- लोकांचें हित करणाऱ्या अशा तुला - सोमाला - शत्रूंचा नाश करण्यासाठीं व आनंद वाढवण्यासाठीं आम्ही स्वीकारीत आहों. सोम प्याल्यानें जो वीरांच्या शरीरांत उत्साह वाढतो, त्यामुळें ते लोकसेवेचीं मोठमोठीं कार्यें करूं शकतात.

सोम शत्रूंना दूर करतो

१ हे सोम ! दक्षं क्रतुं सन । मृधः अप जहि । नः वस्यसः कृधि [१०४९]- हे सोमा ! आम्हांला बल व व कर्म करण्याचें सामर्थ्य दे. शत्रूंना दूर कर व आमचें कल्याण कर.

२ हे वाजिन् ! समत्सु अनपच्युतः सासहिः अभि अर्ष [१०५४]- हे बलवान् सोमा ! युद्धांमध्यें पराभूत न होणारा, शत्रूंचा पराभव करणारा होऊन पुढें जा.

३ मही वृष-नाम इमे अस्य शूषे [११०६]- पुष्कळ बाणांची शत्रूवर वृष्टि करणें व शत्रूला नमविणें हीं या सोमाचीं दोन बलें आहेत.

४ मांश्चत्वे, पृशने, वधत्रे, निगुतः अस्वापयन्, स्नेहयन्, अमित्रान्, अपाचितः, इतः अपचितः [११०६]- घोड्यांच्या युद्धांत, बाहुयुद्धांत, हातघाईच्या कत्तलीमध्यें, शत्रूंना लोळविण्याच्यावेळीं, किंवा शत्रूंना पळवून लावण्याच्यावेळीं तूं शत्रूंना दूर कर व येथून तूं शत्रूंना दूर कर.

याप्रमाणें सोम शत्रूंना दूर करतो असें वर्णन आहे. सोमरस प्याल्यानें वीरांमध्यें अशा प्रकारचीं युद्धें करण्याची शक्ति येते.

सोम धन देतो

१ सोमाः दाशुषे दिव्यानि आन्तरिक्ष्या पार्थिवाः विश्वा वसु आ पवतां [१०३६]– सोमरस दात्याला स्वर्गीय, अन्तरिक्षीय व पार्थिव अशीं सर्व धनें देवो.

२ हे सोम ! गोषा, नृषा, अश्वसा उत वाजसा असि [१०४५]– हे सोमा ! तूं गाई देणारा, पुत्र देणारा, घोडे देणारा व अन्न देणारा आहेस.

३ महिश्रवः सोम ! जेषि, नः वस्यसः कृधि [१०४७]– हे प्रशंसित सोमा ! तूं विजय मिळवतोस. आम्हांला यशस्वी कर.

४ ज्योतिः सन ! स्वः च विश्वा सौभगा सन [१०४८]– आम्हांला तेज दे व सुख तसेंच सर्व सौभाग्यें दे.

५ द्विबर्हसं रयिं अभ्यर्ष [१०५३]– दोनही ठिकाणीं उपयोगी पडणारें धन दे.

६ नः चित्रं, अश्विनं, विश्वायुं रयिं आ भर [१०५६] –आम्हांला विलक्षण, घोड्यांनीं युक्त, सर्व लोकांचें हित करणारें धन भरपूर दे.

७ सहस्राणि आदद्महे [१०५९]– सहस्र प्रकारचीं धनें आम्हीं घेतों.

८ त्रिंशतं सहस्राणि तना आदद्महे [१०६०]– तीनशें व सहस्र वस्त्रांचा आम्ही स्वीकार करतों.

९ पिशंगं पुरुस्पृहं बहुलं रयिं अभ्यर्षसि [१०७९] पिवळ्या रंगाचें पुष्कळांनीं प्रशंसिलेलें पुष्कळ धन तूं देतोस.

१० सोमः वसूनां आ नेता, रायां, इडां, सुक्षितीनां [१०९६]– सोम धनें, ऐश्वर्यें, अन्नें, उत्तम पुत्र यांना देणारा आहे.

११ अया पवा पवस्व एना वसूनि [११०४]– या धारेनें हीं धनें तूं आम्हाला दे.

१२ नैयुतः षष्टिं सहस्रा वसूनि रणाय धूनवत् [११०५]– शत्रूंचा नाश करणारा सोम साठ हजार धनें शत्रूंशीं युद्ध करण्यासाठीं देवो.

१३ वाजस्य स्वायुधः महत् धनं भजसे [१०२३]– बल वाढवण्यासाठीं उत्तम आयुधांनीं युक्त अशा तूं सोमा ! मोठें धन प्राप्त करतोस.

याप्रमाणें सोम हा धन व ऐश्वर्य देतो असें वर्णन अनेक मंत्रांनीं केलेलें आहे. सोम जर वीरता अंगीं आणीत असेल, तर तो शत्रूचा पराजय करून पुष्कळ धन देईल यांत शंकाच नाहीं. असा विचार केला म्हणजे हा सोम धन कसें देतो, तें समजून येण्यासारखें आहे.

सुभाषित

१ यज्ञस्य ज्योतिः प्रियं मधु पवते [१०३१]– यज्ञाची ज्योति प्रिय मधुरभाव उत्पन्न करते.

२ विभ्वः वसुः मदिन्तमः मत्सरः अपीच्यं रत्नं दधाति [१०३१]– पुष्कळ धन जवळ बाळगणारा व आनंद वाढवणारा गुप्तस्थानीं धन धारण करतो. गुप्त ठिकाणीं ठेवतो.

३ वाजस्य स्वायुधः महत् धनं भजसे [१०३३]– युद्धासाठीं उत्तम आयुधांनीं सज्ज झालेला वीर पुष्कळ धन प्राप्त करतो.

४ ते दाशुषे दिव्यानि आन्तरिक्ष्या पार्थिवा विश्वा वसु आ पवन्तां [१०३६]– ते दात्याला दिव्य, अन्तरिक्षीय व पार्थिव अशीं सर्व धनें देतात.

५ वृषा द्युम्नवत्तमः धर्णसिः माहि त्सरः आ वच्यस्व [१०३८]– तूं बलवान्, तेजस्वी व सर्वांचें धारण करणारा होऊन पुष्कळ अन्न आम्हांला दे.

६ वृषा महान् हरिः, मित्रः नः दर्शतः [१०४२]– बलवान्, मोठा दुःखाचें हरण करणारा जो असतो, तो मित्राप्रमाणें दर्शनीय आहे.

७ लोककृत्नुं त्वा धृष्णवे मदाय ईमहे [१०४४]– लोकांचें कल्याण करणाऱ्या तुला शत्रूंचा नाश करण्यासाठीं व आनंद प्राप्त करण्यासाठीं प्राप्त करीत आहों.

८ जेषि, अथ नः वस्यसः कृधि [१०४७]– तूं विजय प्राप्त करतोस, म्हणून आम्हांला यशस्वी कर.

९ ज्योतिः सन, विश्वा सौभगा सन [१०४८]– आम्हांला तेजस्विता दे व सर्व सौभाग्यें - ऐश्वर्यें - दे.

१० दक्षं क्रतुं सन [१०४९]– बल व कर्मशक्ति दे.

११ मृधः अप जहि [१०४९]– शत्रूंना पराभूत कर.

१२ तव क्रत्वा, तव ऊतिभिः नः आ भज [१०५१]

— तुझ्या पुरुषार्थांनीं व तुझ्या संरक्षणाच्या साधनांनीं आम्हांला सहाय्य कर.

१३ ज्योक् सूर्यं दृशेम [१०५२]– पुष्कळ वर्षेपर्यंत आम्ही सूर्याला पाहूं असें कर. आम्हांला दीर्घायुषी कर.

१४ हे स्वायुधः द्विबर्हसं रयिं अभ्यर्ष [१०५३]– हे उत्तम शस्त्रास्त्रें वापरणाऱ्या वीरा ! दोनही स्थानांत राहणाऱ्या वीरा, आम्हांला दोनही ठिकाणीं राहणारें धन दे.

१५ हे वाजिन् ! समत्सु अनपच्युतः सासहिः अभि अर्ष [१०५४]– हे बलवान् वीरा ! युद्धामध्यें आपल्या जागेवर राहणारा व शत्रूंचा पराभव करणारा होऊन पुढें जा.

१६ नः चित्रं विश्वायुं रयिं आ भर [१०५६]– आम्हांला विलक्षण पूर्ण आयु देणारें धन भरपूर दे.

१७ वसूनां उस्रा देवी मर्तस्य अवसः वेद [१०५८] – धन देणारी देवी मानवाच्या संरक्षणाचें सर्व कार्य जाणत असते.

१८ नः गोमतीः विश्वाः इषः अर्ष [१०६३]– आम्हांला गाईंपासून उत्पन्न होणारें सर्व प्रकारचें अन्न दे.

१९ अस्य संसदि नः प्रमतिः भद्रा [१०६४]– याच्या सभेमध्यें आमची बुद्धि उत्तम कल्याण करणारी होते.

२० हे अग्ने ! तव सख्ये वयं मा रिषाम [१०६४ [– हे अग्ने ! तुझ्या मित्रभावामध्यें राहून आम्ही कांहींनें नष्ट होणार नाहीं.

२१ जीवातवे धियः प्रतरां साधय [१०६५] दीर्घ-जीवन प्राप्त करण्यासाठीं बुद्धिची पूर्णता सिद्ध कर.

२२ इयं मतिः हिरण्यया राया, अवृकाय शवसे, मेधसातये [१०६८]– ही बुद्धि हितकारक व रमणीय धन, क्रूरतारहित बल व बुद्धिवैभव यांची प्राप्ति करणारी होवो.

२३ इषं च स्वः धीमहि [१०६९]– अन्न व स्वर्गीय आनंद आम्हांला प्राप्त होवो.

२४ विश्वाः द्विषः अपाभिन्धि [१०७०]– सर्व शत्रूंचा नाश कर.

२५ बाधः मृधः परिजहि [१०७०]– बाधा करणाऱ्या व हिंसा करणाऱ्या शत्रूंना दूर कर.

२६ स्पार्हं तत् वसु आभर [१०७०]– स्पृहणीय असें तें धन आम्हांला भरपूर दे.

२७ ते दत्तस्य भूरेः विश्वमानुषः आनुषक् वेदति तत् स्पार्हं वसु नः आभर [१०७१] तूं दिलेल्या पुष्कळ धनाला सर्व मनुष्यें एकदम जाणतील, असें स्पृहणीय धन आम्हांला भरपूर दे.

२८ यत् वीडौ, यत् स्थिरे, यत् विपर्शाने पराभृतं, तत् स्पार्हं वसु नः आभर [१०७२]– जें धन बंदोबस्तानें खजिन्यांत ठेवलेलें आहे, जें उत्तम स्थिर ठिकाणीं ठेवलें आहे, जें कोणाचा स्पर्श होऊं नये अशा ठिकाणीं आहे, जें शत्रूंकडून आणलेलें असेल तें स्पृहणीय धन आम्हांला भरपूर दे.

२९ तोशासा, रथयावाना, वृत्रहणा, अपराजिता [१०७४]– शत्रूंना मारणारे, रथांतून जाणारे, शत्रूंचा नाश करणारे व पराजित न होणारे ते वीर आहेत.

३० पिशंगं पुरुस्पृहं बहुलं रयिं अभ्यर्षसि [१०७९] – सोन्याच्या रंगाचें अनेकांनीं इच्छिण्याजोगें पुष्कळ धन तू देतोस.

३१ ऊतये सुरूपकृत्नुं द्यविद्यवि जुहूमसि [१०८७] – आमच्या संरक्षणासाठीं उत्तम रूप बनवणाऱ्या इंद्राला आम्ही दररोज बोलावतों.

३२ मा नः अति ख्यः [१०८९]– आम्हांला दूर करूं नकोस.

३३ हे मन्तुम ! दीर्घं अंकुशं शक्तिं बिभर्षि [१०९१] – हे ज्ञानवान वीरा ! तूं मोठें शक्ति असलेलें शस्त्र धारण करतोस.

३४ मदेषु सर्वधा असि [१०९४]– आनंद देणाऱ्यांमध्यें तूं सर्वांत श्रेष्ठ आहेस.

३५ वसूनां, रायां, इडां सुक्षितीनां आ नेता [१०९६]– तो धनें, ऐश्वर्यें, अन्नें, उत्तम पुत्रांना देणारा आहे.

३६ नैगुतः षष्टिं सहस्रा वसूनि रणाय धूनवत् [११०५]– शत्रूंचा नाश करणारा वीर साठ हजार धनें आमच्या आनंदासाठीं आम्हांला देवो.

३७ मही वृष नाम इमे अस्य शूषे [११०६]– पुष्कळ बाण मारून शत्रूला नमविणें हीं या वीराचीं कार्यें आहेत.

३८ मांश्चत्वे, पृशने, वधत्रे, निगुतः अस्वापयन्, स्नेहयत् [११०६]– हीं कार्यें घोड्यांच्या युद्धांत, बाहुयुद्धांत, हातघाईच्या युद्धांत, शत्रूंना लोळवावयाच्यावेळीं, किंवा शत्रूला पळवून लावावयाच्यावेळीं करावीं लागतात.

३९ अमित्रान् अपचित; इतः अपाचितः [११०६] –शत्रूंना दूर कर, शत्रूंना येथून पळवून लाव.

४० अग्ने ! नः अन्तमः त्राता शिवः भव [११०७] – हे अग्रणी ! तूं आमच्याजवळ रहा, आमचें रक्षण कर व कल्याण कर.

४१ द्युमत्तमः रयिं दाः [११०८]- तूं तेजस्वी आहेस. तूं आम्हांला धन दे.

४२ शोचिष्ठः दीदिवः ! त्वा सुम्नाय सखिभ्यः ईमहे [११०९]- हे तेजस्वी व प्रकाशमान् देवा! तुला सुखासाठीं व मित्र मिळावे म्हणून प्रार्थना करीत आहों.

४३ इमा भुवना कं सीषधेम [१११०]- हीं भुवनें सुखाचीं साधनें बनोत.

४४ इन्द्रः तन्वं प्रजां च सीषधातु [११११]- इन्द्र आमच्या शरीरांना व पुत्रांना सुखी करो.

४५ इन्द्र अस्मभ्यं भेषजा करत् [१११२]- इन्द्र आम्हांला औषध करून देवो.

४६ वः उप प्र अर्च [१११३]- तुम्ही इन्द्राची जवळून उपासना करा.

उपमा

या सातव्या अध्यायांत या उपमा आल्या आहेत—

१ मित्रः न [१०४२]- मित्राप्रमाणें (हरिः दर्शतः) सोम दर्शनीय आहे.

२ वृष्टिमान् पर्जन्यः इव [१०४६]- वृष्टी करणाऱ्या मेघाप्रमाणें (अस्माकं इन्द्रियं मधोः धारया पवस्व) आमचें इंद्रियसामर्थ्य मधुररसाच्या धारेनें प्राप्त करून दे. पर्जन्याची धारा व मधुररसाची धारा हें साम्य येथें आहे.

३ रथं इव [१०६४]- रथ करतात, त्याप्रमाणें (इमं स्तोमं सं महेम) हें स्तोत्र आम्ही करतों, त्या स्तोत्राची महिमा वर्णन करतों.

४ चक्रयोः अक्षं न [१०८५]- रथाच्या दोनही चाकांना त्याचा आंस मिळतो, त्याप्रमाणें हे इन्द्रा ! तूं व स्तोते यांमध्यें इष्ट धनाचें दान राहो.

५ शचीभिः अक्षं न [१०८६]- ज्याप्रमाणें गाडीच्या योग्य हालचीलींनीं धुरेला चालना मिळत असते, त्याप्रमाणें (जरितॄणां आ ऋणोः) स्तोत्यांच्या प्रार्थनांनीं तूं त्याना प्राप्त हो.

६ गो दुहे सुदुघां इव [१०८७]- गाईचें दूध काढण्या-च्यावेळीं ज्याप्रमाणें सहज दूध देणाऱ्या गाईला बोलावतात, त्याप्रमाणें (सुरूप कृत्नुं ऊतये द्यवि द्यवि जुहूमसि) उत्तम रूप बनवणाऱ्या इन्द्राला आमच्या संरक्षणासाठीं दररोज आम्ही बोलावतों.

७ उषा इव [१०९०]- उषा ज्याप्रमाणें आपल्या प्रकाशानें सर्व जग भरून टाकते, त्याप्रमाणें (हे इन्द्र ! उभे रोदसी आ पप्राथ) हे इन्द्रा ! तूं आपल्या प्रकाशानें द्यु व पृथिवी हे दोनही लोक भरून टाकतोस.

८ यथा दीर्घं अंकुशं [१०९१]- ज्याप्रमाणें वीरानें मोठें थोरलें शस्त्र धारण करावें, त्याप्रमाणें तूं (शक्तिं बिभर्षि) शक्तिला धारण करतोस.

९ यथा अजः पूर्वेण पदा वया यम [१०९१]- ज्या-प्रमाणें बकरा पुढल्या पायानें शाखा खेंचतो, त्याप्रमाणें तूं शत्रूंचा नाश करतोस किंवा (देवी जनित्री अजीजनत्) अदितिदेवीनें तुला प्रथम उत्पन्न केलें.

१० शिशुं न [१०९८]- ज्याप्रमाणें लहान मुलाला सजवतात, त्याप्रमाणें (हव्यैः गूर्तिभिः स्वदयन्त) हवि व स्तुति यांनीं हे सोमा ! तुला अधिक स्वादिष्ट बनवतात.

११ मातृभिः वत्सः इव [१०९९]- ज्याप्रमाणें माता आपल्या मुलाला न्हाऊं घालतात, त्याप्रमाणें (इन्दुः सं अज्यते) सोम पाण्यांत धुतला जातो.

१२ सूरासः न [११०२]- सूर्यासारखे (सोमासः दर्शतासः) सोमरस दर्शनीय आहेत.

१३ वातः न [११०४]- वायुप्रमाणें (ब्रध्नः जूर्तिं) सूर्य वेगाचा आश्रय करतो.

१४ वृक्षं पक्वं न [११०५]- वृक्ष ज्याप्रमाणें पिकलेल्या फळाला देतो, त्याप्रमाणें (नैगुतः वसूनि धूनवत्) सोम धनें देतो.

सप्तमाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
१०३१	९।८६।१०	[अकृष्ट माषादयः] त्रयः ऋषयः	पवमानः सोमः	जगती
१०३२	९।८६।११	[अकृष्ट माषादयः] त्रयः ऋषयः	,,	,,
१०३३	९।८६।१२	[अकृष्ट माषादयः] त्रयः ऋषयः	,,	,,
१०३४	९।६४।४	कश्यपो मारीचः	,,	गायत्री
१०३५	९।६४।५	कश्यपो मारीचः	,,	,,
१०३६	९।६४।६	कश्यपो मारीचः	,,	,,
१०३७	९।२।१	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१०३८	९।२।२	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१०३९	९।२।३	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१०४०	९।२।४	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१०४१	९।२।५	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१०४२	९।२।६	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१०४३	९।२।७	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१०४४	९।२।८	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१०४५	९।२।१०	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१०४६	९।२।९	मेधातिथिः काण्वः	,,	,,
		(२)		
१०४७	९।४।१	हिरण्यस्तूप आंगिरसः	,,	,,
१०४८	९।४।२	हिरण्यस्तूप आंगिरसः	,,	,,
१०४९	९।४।३	हिरण्यस्तूप आंगिरसः	,,	,,
१०५०	९।४।४	हिरण्यस्तूप आंगिरसः	,,	,,
१०५१	९।४।५	हिरण्यस्तूप आंगिरसः	,,	,,
१०५२	९।४।६	हिरण्यस्तूप आंगिरसः	,,	,,
१०५३	९।४।७	हिरण्यस्तूप आंगिरसः	,,	,,
१०५४	९।४।८	हिरण्यस्तूप आंगिरसः	,,	,,
१०५५	९।४।९	हिरण्यस्तूप आंगिरसः	,,	,,
१०५६	९।४।१०	हिरण्यस्तूपः आंगिरसः	,,	,,
१०५७	९।५८।१	अवत्सारः काश्यपः	,,	,,
१०५८	९।५८।३	अवत्सारः काश्यपः	,,	,,
१०५९	९।५८।२	अवत्सारः काश्यपः	,,	,,
१०६०	९।५८।४	अवत्सारः काश्यपः	,,	,,
१०६१	९।६२।२२	जमदग्निर्भार्गवः	,,	,,
१०६२	९।६२।२२	जमदग्निर्भार्गवः	,,	,,
१०६३	९।६२।२४	जमदग्निर्भार्गवः	,,	,,

*

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१०६४	१।९४।१	कुत्स आंगिरसः	अग्निः	जगती
१०६५	१।९४।२	कुत्स आंगिरसः	,,	,,
१०६६	१।९४।३	कुत्सः आंगिरसः	,,	,,
		(३)		
१०६७	७।६६।७	वसिष्ठो मैत्रावरुणिः	आदित्यः	गायत्री
१०६८	७।६६।८	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१०६९	७।६६।९	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१०७०	८।४५।४०	त्रिशोकः काण्वः	इन्द्र	,,
१०७१	८।४५।४२	त्रिशोकः काण्वः	,,	,,
१०७२	८।४५।४१	त्रिशोकः काण्वः	,,	,,
१०७३	८।३८।१	श्यावाश्व आत्रेयः	इन्द्राग्नी	,,
१०७४	८।३८।२	श्यावाश्व आत्रेयः	,,	,,
१०७५	८।३८।३	श्यावाश्व आत्रेयः	,,	,,
		(४)		
१०७६	९।६४।२२	कश्यपो मारीचः	पवमानः सोमः	,,
१०७७	९।६४।२३	कश्यपो मारीचः	,,	,,
१०७८	९।६४।२४	कश्यपो मारीचः	,,	,,
१०७९	९।१०७।२१	सप्तर्षयः	,,	प्रगाथः (विषमा बृहती, समा सतो बृहती)
१०८०	९।१०७।२२	सप्तर्षयः	,,	,,
१०८१	९।६१।७	अमहीयुरांगिरसः	,,	गायत्री
१०८२	९।६१।८	अमहीयुरांगिरसः	,,	,,
१०८३	९।६१।९	अमहीयुरांगिरसः	,,	,,
		(५)		
१०८४	१।३०।१३	शुनःशेप आजीगर्तिः	इन्द्रः	,,
१०८५	१।३०।१४	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१०८६	१।३०।१५	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१०८७	१।४।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
१०८८	१।४।२	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
१०८९	१।४।३	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
१०९०	१०।१३४।१	मान्धाता यौवनाश्वः	,,	महापंक्तिः
१०९१	१०।१३४।६	मान्धाता यौवनाश्वः (पूर्वार्धस्य) गोधा ऋषिका (उत्तरार्धस्य)	,,	,,
१०९२	१०।१३४।२	मान्धाता यौवनाश्वः	,,	,,
		(६)		
१०९३	९।१८।१	असितः काश्यपो देवलो वा	पवमानः सोमः	गायत्री

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१०९४	९।१८।१	असितः काश्यपो देवलो वा	पवमानः सोमः	गायत्री
१०९५	९।१८।३	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
१०९६	९।१०८।१३	ऋणंचयो राजर्षिः	,,	यवमध्या गायत्री
१०९७	९।१०८।१४	शक्तिर्वासिष्ठः	,,	सतो बृहती
१०९८	९।१०५।१	पर्वतनारदौ काण्वौ	,,	उष्णिक्
१०९९	९।१०५।२	पर्वतनारदौ काण्वौ	,,	,,
११००	९।१०५।३	पर्वतनारदौ काण्वौ	,,	,,
११०१	९।१०१।१०	मनुः सांवरणः	,,	अनुष्टुप्
११०२	९।१०१।१२	मनुः सांवरणः	,,	,,
११०३	९।१०१।११	मनुः सांवरणः	,,	,,
११०४	९।९७।५२	कुत्स आंगिरसः	,,	त्रिष्टुप्
११०५	९।९७।५३	कुत्स आंगिरसः	,,	,,
११०६	९।९७।५४	कुत्स आंगिरसः	,,	,,

(७)

११०७	५।२४।१	बन्धु, सुबन्धुः श्रुतबन्धुर्विप्रबन्धुः क्रमेण गोपायना लौपायना वा	अग्निः ,,	द्विपदा विराट् ,,
११०८	५।२४।२	बन्धुः सुबन्धुः श्रुतबन्धुर्विप्रबन्धुः क्रमेण गोपायना लौपायना वा	,, ,,	,, ,,
११०९	५।२४।३	बन्धुः सुबन्धुः श्रुतबन्धुर्विप्रबन्धुः क्रमेण गोपायना लौपायना वा	,, ,,	,, ,,
१११०	१०।१५७।१	भुवन आप्त्यः साधनो वा भौवनः	विश्वेदेवाः	द्विपदा त्रिष्टुप्
११११	१०।१५७।२	भुवन आप्त्यः साधनो वा भौवनः	,,	,,
१११२	१०।१५७।३	भुवन आप्त्यः साधनो वा भौवनः	,,	,,
१११३	—	—	—	—
१११४	—	—	—	—
१११५	—	—	—	—

अथ अष्टमोऽध्यायः ।

अथ चतुर्थप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ ४ ॥

[१]

(१-१४) १ (२-३) वृषगणो वासिष्ठः; १ (४-१२), २ (१-९) असितः काश्यपो देवलो वा; २ (१०-१२), ११ भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा; ३, ६ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ४ यजत आत्रेयः, ५ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ७ सिकता निवावरी; ८ पुरुहन्मा आंगिरसः; ९ पर्वतनारदौ काण्वौ शिखण्डिन्यावप्सरसौ काश्यपौ वा; १० अग्नये धिष्ण्यो ऐश्वराः १२ वत्सः काण्वः; १३ नृमेध आंगिरसः; १४ अत्रिर्भौमः ॥ १-२, ७, ९-११ पवमानः सोमः ३, १२ अग्निः; ४ मित्रावरुणौ; ५, ८, १३-१४ इन्द्रः; ६ इन्द्राग्नी ॥ (१-३,) ३ त्रिष्टुप्; १ (४-१२), २, ४-६, ११-१२ गायत्री; ७ जगती; ८ प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतो बृहती); ९ उष्णिक्; १० द्विपदा विराट्; १३ (१-२) ककुप् १३ (३) पुर उष्णिक्; १४ अनुष्टुप् ॥

१११६ प्र काव्यमुशनेव ब्रुवाणो देवो देवानां जनिमा विवक्ति ।
महिव्रतः शुचिबन्धुः पावकः पदा वराहो अभ्येति रेभन् ॥ १ ॥ (ऋ. ९।९७।७)

१११७ प्र हꣳसासस्तृपला वग्नुमच्छामादस्तं वृषगणा अयासुः ।
अङ्गोषिणं पवमानꣳ सखायो दुर्मर्षं वाणं प्र वदन्ति साकम् ॥ २ ॥ (ऋ. ९।९७।८)

१११८ स योजत उरुगायस्य जूतिं वृथा क्रीडन्तं मिमते न गावः ।
परीणसं कृणुते तिग्मशृङ्गो दिवा हरिर्ददृशे नक्तमृज्रः ॥ ३ ॥ (ऋ. ९।९७।९)

---

[६] प्रथमः खण्डः ।

[१११६] (उशना इव) उशना ऋषिसारखें (काव्यं ब्रुवाणः) काव्य बोलणारा (देवः) स्तुति करणारा (देवानां जनिमा विवक्ति) देवांचीं जीवनवृत्तें उत्तम रीतिनें सांगत असतो. (महि-व्रतः) मोठीं कार्यें करणारा (शुचिः-बन्धुः पावकः वराहः) शुद्ध बंधुसारखा पवित्र होणारा व श्रेष्ठ दिवसांमध्यें संस्कार केलेला सोम (रेभन् पदा अभि-एति) शब्द करीत पात्रांमध्यें जातो. ॥ १ ॥

[१११७] (हंसासः वृषगणाः) त्रस्त झालेले वृषगण नामक ऋषि (अमात्) शत्रूच्या सामर्थ्यानें त्रस्त झालेले (तृपला वग्नुं अच्छ अस्तं अयासुः) सत्वर सोम कुटण्याचा शब्द होत होता त्याठिकाणीं गेले. (सखायः) ते मित्ररूप ऋषि (अङ्गोषिणं) स्तुत्य (दुर्मर्षं) शत्रूंना असह्य आणि (पवमानं) शुद्ध होत असलेल्या सोमासाठीं (वाणं साकं प्रवदन्ति) वाण नामक वाद्य वाजवीत होते. ॥ २ ॥

[१११८] (सः) तो सोम (उरुगायस्य जूतिं योजते) अनेकांनीं स्तुति केलेली उत्तम गति प्राप्त करतो. (वृथा क्रीडन्तं गावः न मिमते) सहज क्रीडा करणाऱ्याची गति दुसरे गमन करणारे मापूं शकत नाहींत. (तिग्मशृंगः) तेजानें युक्त सोम (परीणसं कृणुते) प्रकाश पसरवतो. (दिवा हरिः ददृशे) दिवसा हिरवा दिसतो (नक्तं ऋज्रः) रात्रीं प्रकाशयुक्त दिसतो. ॥ ३ ॥

११११९ प्र स्वानासो रथा इवार्वन्तो न श्रवस्यवः । सोमासो राये अक्रमुः ॥ ४ ॥ (ऋ. ९।१०।१)

११२० हिन्वानासो रथा इव दधन्विरे गभस्त्योः । भरासः कारिणामिव ॥ ५ ॥ (ऋ. ९।१०।२)

११२१ राजानो न प्रशस्तिभिः सोमासो गोभिरञ्जते । यज्ञो न सप्त धातृभिः ॥ ६ ॥ (ऋ. ९।१०।३)

११२२ परि स्वानास इन्दवो मदाय बर्हणा गिरा । मधो अर्षन्ति धारया ॥ ७ ॥ (ऋ ९।१०।४)

११२३ आपानासो विवस्वतो जिन्वन्त उषसो भगम् । सूरा अण्वं वि तन्वते ॥ ८ ॥ (ऋ. ९।१०।५)

११२४ अप द्वारा मतीनां प्रत्ना ऋण्वन्ति कारवः । वृष्णो हरस आयवः ॥ ९ ॥ (ऋ. ९।१०।६)

११२५ समीचीनास आशत होतारः सप्तजानयः । पदमेकस्य पिप्रतः ॥ १० ॥ (ऋ ९।१०।७)

११२६ नाभा नाभिं न आ ददे चक्षुषा सूर्यं दृशे । कवेरपत्यमा दुहे ॥ ११ ॥ (ऋ. ९।१०।८)

[११११९] (स्वानासः सोमासः) गाळले जात असतांना शब्द करणारे सोम (रथाः इव) रथ व (अर्वन्तः न) घोडे जशी (श्रवस्यवः) यशाची इच्छा करून (राये प्राक्रमुः) धनप्राप्तिसाठीं पराक्रम करितात त्याप्रमाणें पराक्रम करीत असतात. ॥ ४ ॥

[११२०] युद्धामध्यें जाणाऱ्या (रथाः इव) रथांप्रमाणें (हिन्वानासः) गतिमान् सोम (गभस्त्योः दधन्विरे) हातांमध्यें धरलेले असतात, (भरासः कारिणां इव) भार घेऊन जाणाऱ्यांच्या - मजुरांच्या - हातांनीं भार धरावा त्याप्रमाणें. ॥ ५ ॥

[११२१] (सोमासः) सोम, (प्रशस्तिभिः राजानः न) ज्याप्रमाणें, स्तुतिनीं राजे (सप्तधातृभिः यज्ञः न) व सात ऋत्विजांनीं यज्ञ, त्याप्रमाणें (गोभिः अंजते) गाईच्या घृतादिकांनीं शोभित केले जातात. ॥ ६ ॥

[११२२] (स्वानासः इन्दवः) रस काढलेले सोम (बर्हणा गिरा) मोठ्या स्तोत्रांनीं प्रशंसित झाल्यानंतर (मधोः धारया) मधुर रसाच्या धारेनें (मदाय) आनन्द वाढवण्यासाठीं (परि अर्षन्ति) कलशामध्यें जातात. ॥ ७ ॥

[११२३] (विवस्वतः आपानासः) इन्द्राला पिण्यासाठीं (उषसः भगं जिन्वन्तः) उषेचें तेज वाढवीत (सूराः) सोमरस (अण्वं वितन्वते) शब्द करीत असतात. ॥ ८ ॥

[११२४] (मतीनां कारवः) स्तुति करणारे (प्रत्नाः) प्राचीन (वृष्णः हरसः) बलवान् सोमाला आणणारे (आयवः) मनुष्य - ऋत्विज (द्वारा अप ऋण्वन्ति) यज्ञाचीं द्वारें उघडतात. ॥ ९ ॥

[११२५] (समीचीनासः) श्रेष्ठ (जातयः) जातीचे (एकस्य पदं पिप्रतः) एकट्या सोमाच्या स्थानाला पूर्ण करीत (सप्त आशत) सात होते यज्ञ करण्यासाठीं बसतात. ॥ १० ॥

[११२६] (चक्षुषा सूर्यं दृशे) डोळ्यांनीं सूर्याला पहावें म्हणून (नाभिः) यज्ञाची नाभी अशा सोमाला (नः नाभा आददे) आपल्या नाभीजवळ म्हणजे पोटांत धरीत आहें. (कवेः अपत्यं) असें करण्यानें सोमाच्या अपत्यरूपी तेजाला मी (आ दुहे) स्वीकारीत आहें. ॥ १० ॥

११२७ अभि प्रियं दिवस्पदमध्वर्युभिर्गुहा हितम् । सूरः पश्यति चक्षसा ॥ १२ ॥ १ (झै) ॥
[धा० ९७ । उ० ४ । स्व० ८] (ऋ. ९।१०।९)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ ५ ॥

[२]

११२८ असृग्रमिन्दवः पथा धर्मन्नृतस्य सुश्रियः । विदाना अस्य योजना ॥ १ ॥ (ऋ. ९।७।१)
११२९ प्र धारा मधो अग्रियो महीरपो वि गाहते । हविर्हविःषु वन्द्यः ॥ २ ॥ (ऋ. ९।७।२)
११३० प्र युजा वाचो अग्रियो वृषो अचिक्रदद्वने । सद्माभि सत्यो अध्वरः ॥ ३ ॥ (ऋ. ९।७।३)
११३१ परि यत्काव्या कविर्नृम्णा पुनानो अर्षति । स्वर्वाजी सिषासति ॥ ४ ॥ (ऋ. ९।७।४)
११३२ पवमानो अभि स्पृधो विशो राजेव सीदति । यदीमृण्वन्ति वेधसः ॥ ५ ॥ (ऋ. ९।७।५)
११३३ अव्या वारे परि प्रियो हरिर्वनेषु सीदति । रेभो वनुष्यते मती ॥ ६ ॥ (ऋ. ९।७।६)

[११२७] (सूरः) इन्द्र (चक्षसा) नेत्रांनीं (दिवः प्रियं पदं) द्युलोकामधील प्रिय असा (गुहाहितं) हृदयामध्यें ठेवलेल्या सोमाला-प्यालेल्या सोमाला-(अभि पश्यति) पहात असतो. ॥ १२ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[११२८] (अस्य योजना विदानाः) या यजमानानें केलेल्या देवतांसंबंधींच्या योजना जाणून (सुश्रियः इन्दवः) उत्तम-सुशोभित असलेले सोम (धर्मन्) धर्माप्रमाणें (ऋतस्य पथा) यज्ञाच्या मार्गानें (असृग्रं) रचले जात असतात. ॥ १ ॥

[११२९] (हविःषु वन्द्यः हविः) हवींमध्यें प्रशंसनीय सोम (महीः अपः विगाहते) पुष्कळ जलांमध्यें स्नान करीत असतो. (मधोः अग्रियः धाराः प्र) मधुर रसाच्या मुख्य धारा कलशामध्यें पडत आहेत. ॥ २ ॥

[११३०] (अग्रियः युजाः वाचः प्र) हवींमध्यें मुख्य असा हा सोम योग्य स्तोत्रांना प्रकट करतो. (वृषः सत्यः अध्वरः) बलवान्, सत्यस्वरूप हिंसा न करणारा सोम (सद्म अभि) यज्ञशालेमध्यें (वने अचिक्रदत्) जलामध्यें शब्द करीत येत असतो. ॥ ३ ॥

[११३१] (कविः नृम्णा पुनानः) हा क्रान्तदर्शी सोम आपल्या बलांनीं मनुष्यांना शुद्ध करीत (काव्या यत् परि अर्षति) जेव्हां स्तुतिंना प्राप्त होतो, तेव्हां (स्वः वाजी सिषासति) स्वर्गांतील बलवान् इन्द्र यज्ञामध्यें येण्याची इच्छा करतो. ॥ ४ ॥

[११३२] (यत् ईं) जेव्हां या सोमाला (वेधसः ऋण्वन्ति) ऋत्विज प्रेरणा करतात तेव्हां (पवमानः) शुद्ध होणारा सोम (स्पृधः अभि सीदति) शत्रूंना नष्ट करण्यासाठीं तयार होतो. (विशः राजा इव) जसा प्रजांचा राजा शत्रूंना दूर करण्यासाठीं जात असतो तसाच हा सोम जातो. ॥ ५ ॥

[११३३] (हरिः प्रियः) हिरव्या रंगाचा प्रिय सोम (वनेषु) पाण्यांत मिसळा जाऊन जेव्हां (अव्याः वारे परि सीदति) लोंकरीच्या गाळणींमधून गाळला जातो, तेव्हां (रेभः मती वनुष्यते) शब्द करीत स्तुतिंना तो स्वीकारतो. ॥ ६ ॥

११३४ स वायुमिन्द्रमश्विना साकं मदेन गच्छति । रणा यो अस्य धर्मणा ॥७॥ (ऋ. ९।७।७)

११३५ आ मित्रे वरुणे भगे मधोः पवन्त ऊर्मयः । विदाना अस्य शक्मभिः ॥८॥ (ऋ. ९।७।८)

११३६ अस्मभ्यꣳ रोदसी रयिं मध्वो वाजस्य सातये । श्रवो वसूनि सञ्जितम् ॥९॥ (ऋ. ९।७।९)

११३७ आ ते दक्षं मयोभुवं वह्निमद्या वृणीमहे । पान्तमा पुरुस्पृहम् ॥१०॥ (ऋ. ९।६५।२८)

११३८ आ मन्द्रमा वरेण्यमा विप्रमा मनीषिणम् । पान्तमा पुरुस्पृहम् ॥११॥ (ऋ. ९।६५।२९)

११३९ आ रयिमा सुचेतुनमा सुक्रतो तनूष्वा । पान्तमा पुरुस्पृहम् ॥ १२ ॥ २ (ण) ॥

[धा० ३८ । उ० ५ । स्व० ११] (ऋ. ९।६५।३०)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[११३४] (यः अस्य धर्मणा रणा) जो यजमान या सोमाच्या रस काढणें आदि कर्मामध्यें रममाण होत असतो, (सः वायुं इन्द्रं अश्विना) तो वायु, इन्द्र, अश्विनौ यांच्याजवळ (मदेन साकं गच्छति) आपल्या आनंद देणाऱ्या सोमासह पोंचतो. ॥ ७ ॥

[११३५] ज्या यजमानांच्या (मधोः ऊर्मयः) मधुर सोमाच्या लाटा (मित्रे वरुणे भगे पवन्ते) मित्र, वरुण व भग यांच्यासाठीं येतात, ते यजमान (अस्य [सोमस्य] विदानाः) या सोमाचें महत्व जाणून (शक्मभिः) सुखांनीं युक्त होतात. ॥ ८ ॥

[११३६] हे (रोदसी) द्युलोक व पृथिवी देवतांनों ! तुम्ही (मध्वः वाजस्य सातये) या मधुर सोमरस-रूपी अन्नाच्या प्राप्तिसाठीं (अस्माकं) आम्हांला (रयिं श्रवः वसूनि) धन, अन्न व सम्पत्ति (संजितं) जय मिळून प्राप्त करून द्या. ॥ ९ ॥

[११३७] हे सोमा ! यज्ञ करणारे आम्ही (ते दक्षं अद्य आ वृणीमहे) तुझें बल आज आमच्याजवळ करूं इच्छीत आहों. तुझें हें बल (मयो भुवं) सुख देणारें (वह्निं) धन देणारें (पान्तं) संरक्षण करणारें (पुरु-स्पृहं) अनेकांनीं इच्छा करण्यास योग्य असें आहे. ॥ १० ॥

[११३८] हे सोमा ! (मन्द्रं आ) आनंद देणाऱ्या तुझी आम्ही आराधना करीत आहों. (वरेण्यं आ) श्रेष्ठ अशा तुझी आम्ही सेवा करतों. (विप्रं आ) ज्ञानी अशा तुझी उपासना करतों. (मनीषिणं आ) बुद्धिमान् अशा तुझी आम्ही स्तुति करीत आहों. (पान्तं पुरुस्पृहं आ) रक्षण करणाऱ्या व अनेकांनीं स्तुति करण्यास योग्य अशा तुझी आम्ही भक्ति करीत आहों. ॥ ११ ॥

[११३९] हे (सुक्रतो) उत्तम यज्ञ करणाऱ्या सोमा ! (रयिं आ) धनासाठीं आम्ही प्रार्थना करीत आहों. (सुचेतुनं आ) उत्तम ज्ञानासाठीं आम्ही प्रार्थना करीत आहों. (तनूषु आ) पुत्रपौत्रांसाठीं आम्ही प्रार्थना करीत आहों. (पान्तं पुरुस्पृहं आ) रक्षण करणाऱ्या व पुष्कळांनीं प्रशंसनीय अशा तुझी आम्ही आराधना करीत आहों. ॥ १२ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३]

११४० मूर्धानं दिवो अरतिं पृथिव्या वैश्वानरमृत आ जातमग्निम् ।
कविँ सम्राजमतिथिं जनानामासन्नः पात्रं जनयन्त देवाः ॥ १ ॥ (ऋ. ६।७।१)

११४१ त्वां विश्वे अमृतं जायमानँ शिशुं न देवा अभि सं नवन्ते ।
तव क्रतुभिरमृतत्वमायन् वैश्वानर यत्पित्रोरदीदेः ॥ २ ॥ (ऋ. ६।७।४)

११४२ नाभिं यज्ञानाँ सदनँ रयीणां महामाहावमभि सं नवन्त ।
वैश्वानरँ रथ्यमध्वराणां यज्ञस्य केतुं जनयन्त देवाः ॥ ३ ॥ ३ (कु) ॥
[धा० २६ । उ० १ । स्व० ६] (ऋ. ६।७।२)

११४३ प्र वो मित्राय गायत वरुणाय विपा गिरा । महिक्षत्रावृतं बृहत् ॥ १ ॥ (ऋ. ५।६८।१)

११४४ सम्राजा या घृतयोनी मित्रश्चोभा वरुणश्च । देवा देवेषु प्रशस्ता ॥ २ ॥ (ऋ. ५।६८।२)

११४५ ता नः शक्तं पार्थिवस्य महो रायो दिव्यस्य । महि वां क्षत्रं देवेषु ॥ ३ ॥ ४ (र) ॥
[धा० १३ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ५।६८।३)

---

[३] तृतीयः खण्डः ।

[११४०] (दिवः मूर्धानं) द्युलोकाचें मस्तक असावें अशा (पृथिव्याः अरतिं) भूमिमध्यें जाणारा, (वैश्वानरं) सर्व मनुष्यांना हितकारक (ऋते आ जातं) यज्ञासाठीं उत्पन्न झालेला, (कविं सम्राजं) ज्ञानी व सम्राट् (जनानां अतिथिं) लोकांना पूजनीय आणि (आसन्) देवतांचें मुख अशा (नः पात्रं अग्निं) आमच्या संरक्षक अग्निला (देवाः आ जनयन्त) ऋत्विज यज्ञामध्यें अरणींमधून उत्पन्न करतात. ॥ १ ॥

[११४१] हे (अमृत) अमर अग्ने ! (विश्वे देवाः) सर्व देव सर्व ऋत्विज (जायमानं त्वां) प्रकट होतांच तुला (शिशुं न अभि सं नवन्ते) बालकाप्रमाणें संमानित करतात. हे (वैश्वानर) विश्वनेत्या अग्ने ! (यत् पित्रोः अदीदेः) जेव्हां पालन करणाऱ्या द्यावापृथ्वीमध्यें तूं प्रदीप्त होतोस, तेव्हां यजमान (तव क्रतुभिः) तुझ्या यज्ञांमुळें (अमृतत्वं आयन्) देवत्वाला प्राप्त झाले ॥ २ ॥

[११४२] (यज्ञानां नाभिं) यज्ञाची नाभी (रयीणां सदनं) धनांचें भण्डार (महां आहावं) ज्यांत मोठ्या आहुति दिल्या जात आहेत अशा अग्निची (अभि सं नवन्ते) ऋत्विजलोग स्तुति करीत आहेत. (वैश्वानरं) सर्व विश्वाचा नेता (अध्वराणां रथ्यं) हिंसारहित यज्ञांचा चालक (यज्ञस्य केतुं) यज्ञाचा ध्वज अशा अग्निला (देवाः जनयन्त) ऋत्विजांनीं मन्थन करून उत्पन्न केलें. ॥ ३ ॥

[११४३] हे ऋत्विज हो ! (वः मित्राय वरुणाय) तुम्ही मित्र व वरुण यांसाठीं (विपा गिरा गायत) मोठ्या आवाजानें गायन करा. (महि-क्षत्रौ) मोठें क्षात्रतेज असणाऱ्या मित्र व वरुण देवतानों ! (ऋतं बृहत्) यज्ञाच्या ठिकाणीं मोठी स्तुति ऐकण्यासाठीं या. ॥ १ ॥

[११४४] (या मित्रः वरुणः च) जे मित्र व वरुण (उभा सम्राजा) दोघेही सम्राट् आहेत, ते (घृत-योनी देवा) जल उत्पन्न करणारे असे प्रकाशमान् (देवेषु प्रशस्ता) देवांमध्यें प्रशंसनीय आहेत. ॥ २ ॥

[११४५] (ता) ते मित्र व वरुण (नः) आम्हांला (दिव्यस्य पार्थिवस्य) द्युलोकांतील व पृथ्वीवरील (महः रायः शक्तं) मोठें धन देण्यास समर्थ आहेत. हे देव हो ! (वां) तुम्हां दोघांचे (देवेषु) देवांमध्यें (महि क्षत्रं) मोठें क्षात्रबल प्रसिद्ध आहे. ॥ ३ ॥

११४६ इन्द्रा याहि चित्रभानो सुता इमे त्वायवः । अण्वीभिस्तना पूतासः ॥१॥ (ऋ. १।३।४)

११४७ इन्द्रा याहि धियेषितो विप्रजूतः सुतावतः । उप ब्रह्माणि वाघतः ॥२॥ (ऋ. १।३।५)

११४८ इन्द्रा याहि तूतुजान उप ब्रह्माणि हरिवः । सुते दधिष्व नश्चनः ॥३॥ ५ (ही) ॥

[धा० १६ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. १।३।६)

११४९ तमीडिष्व यो अर्चिषा वना विश्वा परिष्वजत् । कृष्णा कृणोति जिह्वया ॥ १ ॥

(ऋ ६।६०।१०)

११५० य इद्ध आविवासति सुम्नमिन्द्रस्य मर्त्यः । द्युम्नाय सुतरा अपः ॥ २ ॥ (ऋ ६।६०।११)

११५१ ता नो वाजवतीरिष आशून् पिपृतमर्वतः । एन्द्रमग्निं च वोढवे ॥ ३ ॥ ६ (य) ॥

[धा० ७ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ६।६०।१२)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

११५२ प्रो अयासीदिन्दुरिन्द्रस्य निष्कृतꣳ सखा सख्युर्न प्र मिनाति सङ्गिरम् ।
मर्य इव युवतिभिः समर्षति सोमः कलशे शतयामना पथा ॥ १ ॥ (ऋ. ९।८६।१६)

[११४६] हे (चित्रभानो इन्द्र) विशेष प्रकाशमान् इन्द्रा ! (आयाहि) ये. (अण्वीभिः सुताः) अंगुलींनीं काढलेले (तना पूतासः) उत्तम शुद्ध करून ठेवलेले (इमे) हे सोमरस (त्वायवः) तुझ्यासाठीं आहेत. ॥ १ ॥

[११४७] हे (इन्द्र) इन्द्रा ! (धिया इषितः) बुद्धिनें प्रेरणा केलेला (विप्रजूतः) ऋत्विजांनीं बोलावलेला तूं (सुतावतः वाघतः) सोमरस तयार करून स्तुति करणाऱ्यांनीं चालवलेल्या (ब्रह्माणि) स्तोत्रांचें श्रवण करण्यास (उप आयाहि) यज्ञाच्या जवळ ये. ॥ २ ॥

[११४८] हे (हरिवः) घोडे पाळणाऱ्या इन्द्रा ! तू (तूतुजानः) लवकर (ब्रह्माणि उप) स्तोत्रें ऐकण्यास जवळ (आ याहि) ये, व (सुते नः चनः दधिष्व) या यज्ञामध्यें आमचें हवि ग्रहण कर. ॥ १ ॥

[११४९] (यः अर्चिषा) जो आपल्या तेजानें (विश्वा वना) सर्व वनांना (परिष्वजत) घेरून टांकतो व (जिह्वया कृष्णा कृणोति) ज्वालेनें सर्वांना काळें करून टांकतो. (तं ईडिष्व) त्या अग्निची स्तुति कर. ॥ २ ॥

[११५०] (यः मर्त्यः) जो ऋत्विज (इद्धे) प्रदीप्त अग्निमध्यें (इन्द्रस्य सुम्नं) इन्द्राला सुखदायक हवि (आ विवासति) अर्पण करतो, त्याच्या (द्युम्नाय) तेजासाठीं (सुतराः अपः) उत्तम तरण्याजोगें पाणी इन्द्र देतो. ॥२॥

[११५१] हे इन्द्र व अग्नि हो ! (ता) ते तुम्ही (इन्द्रं च अग्निं आ वोढवे) इन्द्र व अग्निला देवतांकडे पोंचवण्यासाठीं (नः) आम्हांला (वाजवतीः इषः) बल वाढवणारें अन्न व (आशून् अर्वतः) लवकर चालणारे घोडे (पिपृतं) द्या. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[११५२] (इन्दुः) सोम (इन्द्रस्य निष्कृतं) इन्द्राच्या पोटांत (प्रो अयासीत्) गेला. (सखा) मित्ररूपी हा सोम (सख्युः न) आपल्या इन्द्ररूपी मित्राच्या (सं गिरं न प्रमिनाति) उदरामध्यें त्रास देत नाहीं. (मर्यः युवतिभिः इव) पुरुष जसा तरुण स्त्रियांशीं मिसळतो, तसा (सोमः समर्षति) सोम जलांसह मिसळला जातो. नंतर तो सोम (शतयामना पथा) शेंकडों मार्ग असलेल्या मार्गानें (कलशे) कलशामध्यें जातो. ॥ १ ॥

*

१९५३ प्र वो धियो मन्द्रयुवो विपन्युवः पनस्युवः संवरणेष्वक्रमुः ।
हरिं क्रीडन्तमभ्यनूषत स्तुभोऽभि धेनवः पयसेदशिश्रयुः ॥ २ ॥ (ऋ. ९।८६।१७)

११५४ आ नः सोम संयतं पिप्युषीमिषमिन्दो पवस्व पवमान ऊर्मिणा ।
या नो दोहते त्रिरहन्नसश्चुषी क्षुमद्वाजवन्मधुमत्सुवीर्यम् ॥ ३ ॥ ७ (ठि) ॥
[धा० २८ । उ० २ । स्व० ३ । (ऋ. ९।८६।१८)

११५५ न किष्टं कर्मणा नशद्यश्चकार सदावृधम् ।
इन्द्रं न यज्ञैर्विश्वगूर्तमृभ्वसमधृष्टं धृष्णुमोजसा ॥ १ ॥ (ऋ. ८।७०।३)

११५६ अषाढमुग्रं पृतनासु सासहिं यस्मिन्महीरुरुज्रयः ।
सं धेनवो जायमाने अनोनवुर्द्यावः क्षामीरनोनवुः ॥ २ ॥ ८ (ही) ॥
[धा० १६ । उ० नास्ति । स्व० ४] ऋ. ८।७०।४)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

[११५३] हे सोमा ! (वः धियः) तुमचें बुद्धिनें ध्यान करणारे (मन्द्रयुवः) आनन्दवर्धक (पनस्युवः) स्तुति करूं इच्छिणारे (विपन्युवः) स्तोताजन (संवरणेषु प्राक्रमुः) यज्ञमण्डपामध्यें यज्ञकर्म करूं लागतात. तेव्हां (स्तुभः) स्तुति करणारे (हरिं क्रीडन्तं) हिरव्या रंगाच्या क्रीडा करणाऱ्या तुज सोमाची (अभ्यनूषत) स्तुति करतात. त्यावेळीं (धेनवः) गाई (पयसा इत् अभिशिश्रयुः) आपल्या दुधानें या सोमाची अधिक दूध देऊन सेवा करतात. ॥ २ ॥

[११५४] (पवमान इन्दो सोम) हे शुद्ध होणाऱ्या तेजस्वी सोमा ! (नः संयतं पिप्युषीं इषं) आम्हीं आणलेल्या पोषक अन्नाला (उर्मिणा पवस्व) आपल्या लाटेने शुद्ध कर. (या इद्) जें अन्न (नः अहन् त्रिः असश्चुषी) आमच्या एकच दिवसांत तीन सवनांमध्यें बाधा न आणतां (क्षुमत् वाजवत्) प्रसिद्ध बलवर्धक (मधुमत् सुवीर्यं दोहते) मधुरतायुक्त उत्तम वीर पुत्र देत असतें. ॥ ३ ॥

[११५५] (यः) तो यज्ञकर्ता (सदावृधं विश्वगूर्तं) सदा वाढवणाऱ्या सर्वांनीं स्तुति करण्यास योग्य (ऋभ्वसं) महान् (ओजसा अधृष्टं) व आपल्या शक्तिनें अपराभूत आणि (धृष्णुं) शत्रूंना पराजित करणारा असा (इन्द्रं) इन्द्राचा (न) जणूंकाय (यज्ञैः चकार) यज्ञानीं सत्कार करतो. (तं) त्याला (कर्मणा न किः नशत्) आपल्या कर्मानें कोणीहि नष्ट करूं शकत नाहीं. ॥ १ ॥

[११५६] (अषाढं उग्रं) शत्रूचा पराभव करणाऱ्या उग्र व (पृतनासु सासहिं) युद्धांमध्यें साहस दाखवणाऱ्या इन्द्राची स्तुति मी करतों. (यस्मिन् जायमाने) जो इन्द्र प्रकट होतांच (महीः उरुज्रयः धेनवः) मोठ्या वेगवान् गाई (समनोनवुः) त्याला प्रणाम करतात, तसेंच (द्यावः क्षामीः समनोनवुः) द्युलोक व पृथ्वीलोकहि ज्याच्यापुढें नम्र होतात. ॥ २ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५]

११५७ सखाय आ नि षीदत पुनानाय प्रगायत । शिशुं नः यज्ञैः परि भूषत श्रिये ॥ १ ॥
(ऋ. ९।१०४।१)

११५८ समी वत्सं न मातृभिः सृजता गयसाधनम् । देवाव्यं३मदमभि द्विशवसम् ॥ २ ॥
(ऋ. ९।१०४।२)

११५९ पुनाता दक्षसाधनं यथा शर्धाय वीतये । यथा मित्राय वरुणाय शन्तमम् ॥३॥ ९ (पि)॥
[धा० १९ । उ० १ । स्व० ३] (ऋ. ९।१०४।३)

११६० प्र वाज्यक्षाः सहस्रधारस्तिरः पवित्रं वि वारमव्यम् ॥ १ ॥ (ऋ. ९।१०९।१६)

११६१ स वाज्यक्षाः सहस्ररेता अद्भिर्मृजानो गोभिः श्रीणानः ॥ २ ॥ (ऋ. ९।१०९।१७)

११६२ प्र सोम याहीन्द्रस्य कुक्षा नृभिर्येमानो अद्रिभिः सुतः ॥ ३ ॥ १० (पु) ॥
[धा० १९ । उ० १ । स्व० ५] (ऋ. ९।१०९।१८)

११६३ ये सोमासः परावति ये अर्वावति सुन्विरे । ये वादः शर्यणावति ॥ १ ॥ (ऋ.९।६५।२२)

११६४ य आर्जीकेषु कृत्वसु ये मध्ये पस्त्यानाम् । ये वा जनेषु पञ्चसु ॥ २ ॥ (ऋ. ९।६५।२३)

---

[५] पञ्चमः खण्डः ।

[११५७] हे (सखाय) ऋत्विज हो ! (आ निषीदत) बसा. (पुनानाय प्रगायत) शुद्ध होणाऱ्या सोमासाठीं गायन करा. (शिशुं न) बालकाला ज्याप्रमाणें पिता आभूषणांनीं सुशोभित करतो, त्याप्रमाणें (यज्ञैः श्रिये परिभूषत) यज्ञांनीं याची शोभा वाढवा. ॥ १ ॥

[११५८] हे ऋत्विज हो ! (गय-साधनं) घराला साधनरूप असणाऱ्या (देवाव्यं मदं) देवांचा रक्षक व आनंद वाढवणाऱ्या (द्वि-शवसं ईं) दोनही प्रकारचीं बलें वाढवणाऱ्या या सोमाला (मातृभिः वत्सं न) मातेशीं जसा मुलाला ठेवतात त्याप्रमाणें (अभि संसृजत) जलाशीं मिसळा. ॥ २ ॥

[११५९] (शर्धाय) वेगासाठीं (वीतये) देवतांना देण्यासाठीं (मित्राय, वरुणाय) मित्र व वरुण यांसाठीं (यथा शंतमं) जसें अधिक सुख होईल त्याप्रमाणें (दक्ष-साधनं पुनाता) बल वाढवणाऱ्या सोमाला शुद्ध करा. ॥ ३ ॥

[११६०] (वाजी सहस्रधारः) बलवान् व अनेक धारांनीं गाळला जाणारा सोम (अव्यं वारं तिरः पवित्रं प्राक्षाः) लोंकरीच्या गाळणींतून गाळला जात आहे. ॥ १ ॥

[११६१] हे (सहस्र-रेताः) अनेक बलांनीं युक्त (अद्भिः मृजानः) जलानें धुतला जाणारा (गोभिः श्रीणानः सः वाजी) गाईंच्या दुधाशीं मिळवला जाणारा तो बलवान् सोम (अक्षाः) गाळला जात आहे. ॥ २ ॥

[११६२] हे (सोम) सोमा ! (नृभिः येमानः) ऋत्विजांनीं नियमांत ठेवलेला (अद्रिभिः सुतः) दगडांनीं कु‌ काढलेला तूं (इन्द्रस्य कुक्षा) इन्द्राच्या उदरामध्यें (प्र याहि) जा. ॥ ३ ॥

[११६३] (ये सोमासः) जे सोम (परावति) दूरच्या देशांत (ये अर्वावति सुन्विरे) जे जवळच्या देशांत गाळले ‌न असतात. (वा ये अदः शर्यणावति) किंवा जे या शर्यणावत् नामक सरोवराजवळ गाळले जातात. ॥ १ ॥

[११६४] (ये आर्जीकेषु) जे सोम ऋजीक देशांत (ये कृत्वसु) जे कर्म करणाऱ्यांच्या देशांत (पस्त्यानां मध्ये) जे न‌ दीतीरांमध्यें (वा ये पंचसु जनेषु) किंवा जे सोम पञ्चजनांमध्यें गाळले जातात ते सोम आम्हाला सुख देवोत ॥ २ ॥

११६५ ते नो वृष्टिं दिवस्परि पवन्तामा सुवीर्यम् । स्वाना देवास इन्दवः ॥ ३ ॥ ११ (चि) ॥

[धा० ७ । उ० १ । स्व० ३] (ऋ. ९।६५।२४)

॥ इति पंचमः खण्डः ॥ ५ ॥

[६]

११६६ आ ते वत्सो मनो यमत्परमाच्चित्सधस्थात् । अग्ने त्वां कामये गिरा ॥ १ ॥ (ऋ. ८।११।७)

११६७ पुरुत्रा हि सदृङ्ङसि दिशो विश्वा अनु प्रभुः । समत्सु त्वा हवामहे ॥ २ ॥ (ऋ. ८।११।८)

११६८ समत्स्वग्निमवसे वाजयन्तो हवामहे । वाजेषु चित्रराधसम् ॥ ३ ॥ १२ (ठा) ॥

[धा० १३ । उ० २ । स्व० २] (ऋ. ८।११।९)

११६९ त्वं न इन्द्रा भर ओजो नृम्णं शतक्रतो विचर्षणे । आ वीरं पृतनासहम् ॥ १ ॥

(ऋ. ८।९८।१०)

११७० त्वं हि नः पिता वसो त्वं माता शतक्रतो बभूविथ । अथा ते सुम्नमीमहे ॥ २ ॥

(ऋ. ८।९८।११)

११७१ त्वां शुष्मिन्पुरुहूत वाजयन्तमुप ब्रुवे सहस्कृत । स नो रास्व सुवीर्यम् ॥३॥ १३ (ल)॥

[धा १४ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ८।९८।१२)

[११६५] (स्वानाः देवासः इन्दवः) काढलेले ते चमकणारे सोमरस (नः दिवस्परि) आम्हांला द्युलोकांतून (वृष्टिं सुवीर्यं आ पवन्ताम्) वृष्टि व उत्तम पराक्रमयुक्त पुत्र देवोत. ॥ ३ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६] षष्ठः खण्डः ।

[११६६] हे (अग्ने) अग्नि ! (वत्सः) वत्स ऋषि (गिरा त्वां कामये) तुझी स्तुति करून मागत आहे किं (ते मनः) तुझे मन (परमात् सधस्थात् चित्) परमउच्च स्थानापासूनहि (आ यमत्) येथें येवो. ॥ १ ॥

[११६७] हे अग्ने ! तूं (पुरुत्रा हि सदृङ् असि) सर्वत्र तूं सारखी दृष्टि ठेवणारा आहेस, यामुळे तूं (विश्वाः दिशः अनु प्रभुः) सर्व दिशांचा अनुकूल असा प्रभू आहेस. म्हणून (समत्सु त्वा हवामहे) संग्रामांमध्यें तुला सहाय्यासाठीं आम्ही बोलावीत आहों. ॥ २ ॥

[११६८] (समत्सु वाजयन्तः) संग्रामांमध्यें बलाचा उपयोग करणारे आम्हीं (अवसे) रक्षणासाठीं (वाजेषु) संग्रामांमध्यें (चित्र-राधसं) विलक्षण पराक्रम करणाऱ्या (अग्निं हवामहे) अग्निला सहाय्यासाठीं बोलावीत आहों. ॥३॥

[११६९] (शतक्रतो विचर्षणे इन्द्र) शेंकडों कर्म करणाऱ्या विशेष ज्ञानी इन्द्रा ! तूं (नः नृम्णं ओजः आ भर) आम्हांला पौरुषयुक्त बल भरपूर दे, तसेंच (पृतना-सहं वीरं आ) युद्धांमध्यें शत्रूचा पराभव करणारा वीर पुत्र दे. ॥ १ ॥

[११७०] हे (वसो शतक्रतो) निवासक व शेंकडों कर्में करणाऱ्या इन्द्रा ! (त्वं नः पिता बभूविथ) तूं आमचा पिता आहेस. (त्वं माता) तूं माता आहेस. (अथ ते सुम्नं ईमहे) म्हणून तुझ्याजवळ आम्ही सुख मांगत आहों. ॥ २ ॥

[११७१] हे (सहस्कृत) बलासाठीं प्रसिद्ध (शुष्मिन्) सामर्थ्यवान् आणि (पुरुहूत) पुष्कळांनीं बोलावलेल्या इन्द्रा ! (वाजयन्तं त्वा उपब्रुवे) बलवान् अशा तुझी आम्ही स्तुति करीत आहों. (सः नः सुवीर्यं रास्व) तो तूं आम्हांला उत्तम वीर्य दे. ॥ ३ ॥

१९७२ यदिन्द्र चित्र म इह नास्ति त्वादातमद्रिवः ।
राधस्तन्नो विदद्वस उभयाहस्त्या भर ॥ १ ॥ (ऋ. ५।३९।१)

११७३ यन्मन्यसे वरेण्यमिन्द्र द्युक्षं तदा भर । विद्याम तस्य ते वयमकूपारस्य दावनः ॥ २ ॥
(ऋ ५।३९।२)

११७४ यत्ते दिक्षु प्रराध्यं मनो अस्ति श्रुतं बृहत् ।
तेन दृढा चिदद्रिव आ वाजं दर्षि सातये ॥ ३ ॥ १४ (पी) ॥
[धा० २१ । उ० १ । स्व० ४] (ऋ. ५।३९।३)

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

॥ इति चतुर्थप्रपाठकस्य द्वितीयोऽर्धः ॥ २ ॥ चतुर्थप्रपाठकश्च समाप्तः ॥ ४ ॥

॥ इति सप्तमोऽध्यायः ॥ ६ ॥

[११७२] हे (अद्रिवः चित्र इन्द्र) वज्रधारी विलक्षण बलवान् इन्द्रा ! (त्वादातं यत् मे इह नास्ति) तू दिलेलें असें धन मजजवळ येथें नाहीं. हे (विदद्वसो) धनयुक्त इन्द्रा ! यासाठीं (तत् उभयाहस्ती) तें दोनही हातांनीं (नः आभर) आम्हांला भरपूर दे. ॥ १ ॥

[११७३] हे (इन्द्र) इन्द्रा ! (यत् द्युक्षं वरेण्यं मन्यसे) जें तेजस्वी श्रेष्ठ आहे असें तूं मानतोस (तत् आभर) तें धन आम्हांस भरपूर दे. (ते वयं) ते आम्ही (तस्य अकूपारस्य) त्या उत्तम धनाचें (दावनः) दान घेणारे व्हावें. ॥ २ ॥

[११७४] हे (अद्रिवः) वज्रधारी इन्द्रा ! (ते दिक्षु प्रराध्यं) तुझें नाना दिशांमध्यें प्रशंसनीय असें (श्रुतं बृहत् यत् मनः अस्ति) सुप्रसिद्ध मोठें जें मन आहे. (तेन दृढा चित्) त्या मनानें दृढ असलेलें धन असेल (वाजं सातये आदर्षि) तें बल वाढविण्यासाठीं आम्हांस दे. ॥ ३ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति अष्टमोऽध्यायः ॥

अष्टम अध्याय

प्रथम देवतांचा राजा इन्द्र आहे, त्याचें वर्णन पाहूं या. या इन्द्राचे हे गुण या आठव्या अध्यायांत वर्णिले आहेत —

१ चित्र-भानुः [११४६]- विलक्षण प्रकाशणारा.

२ सदा-वृधः [११५५]- सदोदित वाढत राहणारा.

३ विश्व-गूर्तः [११५५]- सर्वांनीं स्तुति करण्यास योग्य, प्रशंसनीय.

४ ऋभ्वसः [११५५]- मोठा, महान्.

५ ओजसा अ-धृष्टः [११५५]- आपल्या विशेष शक्तिनें जो कधींहि पराभूत होत नाहीं, नित्य विजयी.

६ अषाढः [११५६]- शत्रूंचा पराभव करणारा, स्वतः कधींहि पराभूत न होणारा.

७ उग्रः [११५६]- उग्रवीर, शूर.

८ पृतनासु सासहिः [११५६]- युद्धांमध्यें शत्रूंचा पराभव करणारा, संग्रामांमध्यें विजयी.

९ शतक्रतुः [११६९]- शेंकडों महान् कार्यं उत्तम रीतिनें करणारा.

१० विचर्षणिः [११६९]- विशेष ज्ञानी.

११ वसुः [११६९]- धनवान्, निवास करवणारा.

१२ सहस्कृतः [११७१]- बलासाठीं सुप्रसिद्ध.

१३ पुरुहूतः [११७१]- पुष्कळ ज्याला सहाय्यासाठीं बोलावतात.

१४ वाजयन् [११७१]- बलशाली, सामर्थ्यवान्.

१५ अद्रिवः [११७२]- वज्र हातांत धरणारा, पहाडावरच्या किल्ल्यांत राहणारा.

१६ चित्रः [११७२]- विलक्षण, बलशाली.

१७ विदद्वसुः [११७२]- धनयुक्त, धनाचें दान करणारा.

१८ विवस्वान् [११७३]- विशेष तेजस्वी.

हे इन्द्राचे गुण या अध्यायांत वर्णिले आहेत. हे गुण जर उपासना करणारांनीं आपल्या अंगीं वाढवले, तर त्यांची चहूंकडे प्रशंसा होऊं लागेल. मनुष्य अशा रीतिनें उन्नत व्हावे, याचसाठीं हीं देवतांचीं वर्णनें आहेत. आतां या इन्द्राचेंच आणखी वर्णन पहा —

१ धिया इषितः विप्रजूतः सुतावतः वाघतः ब्रह्माणि उप आयाहि [११४७]- हे इन्द्रा ! बुद्धिपूर्वक प्रार्थना करून बोलावलेला, ब्राह्मणांनीं निमंत्रित केलेला, सोमरस ज्याच्यासाठीं तयार केला गेला आहे, ज्याची स्तुति चाललेली आहे असा तूं स्तोत्रांचें श्रवण करण्यासाठीं यज्ञाच्या जवळ ये.

२ यः मर्त्यः इद्धे इन्द्रस्य सुम्नं हविः आ विवासति, द्युम्नाय सुतरा अपः [११५०]- जो मनुष्य प्रदीप्त अग्निमध्यें इन्द्राला प्रिय असणारें हविर्द्रव्य अर्पण करतो, त्याच्या तेजासाठीं इन्द्र वृष्टिकरून उत्तम तरण्याजोगें पाणी देतो.

इन्द्र देवतेच्या प्रेमासाठीं कांहीं विशेष हवनीय द्रव्यें आहेत, त्यांचें हवन प्रदीप्त अग्निमध्यें केलें म्हणजे चांगला पाऊस पडतो व त्यामुळें विपुल पाणी होतें. हें हवन कोणत्या हविर्द्रव्यांचें असेल तीं हवनीय द्रव्यें शोधलीं पाहिजेत.

३ ओजसा अ-प्रधृष्टं इन्द्रं यज्ञैः चकार, तं न किः कर्मणा नशत् [११५५]- आपल्या सामर्थ्यानें नित्य विजयी इन्द्राचा यज्ञांनीं जो सत्कार करतो, त्याला आपल्या कर्मानें कोणीहि नष्ट करूं शकत नाहीं. इतकें त्या यज्ञकर्त्याचें सामर्थ्य वाढतें. यज्ञ करणें म्हणजे नुसतें हवन करणेंच नव्हे. तर (१) सत्कारला योग्य असलेल्या सज्जनांचा राष्ट्रांत सत्कार व्हावा, (२) संघटन राष्ट्रांत व्हावें व (३) सत्पात्रीं दान होऊन लोक कल्याण साधावें अशीं तीन प्रकारचीं कार्यें यज्ञामध्यें करावयाचीं असतात. हीं कार्यें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें जो करतो त्याचें सामर्थ्य त्याच्या या लोकसेवेच्या कार्यामुळें वाढतें व म्हणून त्याचा कोणीहि नाश करूं शकत नाहीं.

४ हे इन्द्र ! नृम्णं ओजः पृतनासहं वीरं नः आभर [११६९]- हे इन्द्रा ! आम्हांला पौरुषयुक्त बल दे व युद्धांमध्यें शत्रूंचा पराभव करणारा पुत्रही दे.

५ हे शुष्मिन् ! त्वां उपब्रुवे, नः सुवीर्यं रास्व [११७१]- हे बलवान् इन्द्रा ! तुझी मी प्रार्थना करतों कीं, आम्हांला तूं उत्तम सामर्थ्य दे.

६ हे इन्द्र ! यत् द्युक्षं वरेण्यं मन्यसे तत् आ भर तस्य अकूपारस्य दावनः विद्याम [११७३]- हे इन्द्रा ! जें तेजस्वी व श्रेष्ठ असें तुझ्या मतानें उत्तम धन आहे, तें आम्हांला भरपूर दे. त्या उत्तम व श्रेष्ठ धनाचें दान घेणारे आम्हींच व्हावें.

७ हे इन्द्र ! त्वा दातं यत् मे इदं नास्ति, तत् उभयाहस्ती नः आ भर [११७२]- हे इन्द्रा ! तूं दिलेलें असें धन येथें माझ्याकडे नाहीं, तें तूं आम्हाला दोनही हातांनीं भरपूर दे.

८ हे वसो शतक्रतो ! त्वं नः पिता, त्वं माता बभूविथ ! अथ ते सुम्नं ईमहे [११७०]- हे निवासक व शेंकडों कार्यें उत्तम रीतिनें करणाऱ्या इन्द्रा ! तूं आमचा पिता व तूंच आमची माता आहेस म्हणून तुझ्याजवळ आम्ही सुख मागत आहों.

९ हे अद्रिवः ! ते दिक्षु प्रसाध्यं श्रुतं बृहत् यत् मनः अस्ति, तेन दृढा चित् वाजं सातये आदर्षि [११७४]- हे वज्रधारी इन्द्रा ! तुझें सर्व दिशांमध्यें प्रशंसनीय असें जें मोठें मन आहे, त्या तुझ्या मनानें दृढ असें जें धन निश्चित झालेलें आहे, तें धन बल वाढावें यासाठीं आम्हांला दे.

याप्रमाणें इन्द्राचें वर्णन या अध्यायांत आलें आहे. यामध्यें जें इन्द्राचें सामर्थ्य वर्णिलें आहे, तें उपासकांनीं आपणामध्यें वाढवलें पाहिजे आतां अग्निचें वर्णन पहा —

अग्नि

१ तव क्रतुभिः अमृतत्वं आयन् [११४१]- यजमान तुझे यज्ञ करून अमरत्वाला प्राप्त झाले.

२ वैश्वानरं अध्वराणां रथ्यं यज्ञस्य केतुं देवाः जनयन्त [११४२]- विश्वाचा नेता, हिंसारहित यज्ञकर्माचा संचालक, यज्ञाचा ध्वज अशा तुज अग्निला देवांनीं निर्माण केलें.

३ यः अग्निषा विश्वा वना परिष्वजत्, जिह्वया

कृष्णा करोति तं ईडिष्व [११४९]- जो आपल्या ज्वालेनें सर्व वनांना जाळून टांकतो व आपल्या ज्वालेनें सर्व काळें करतो त्या अग्निची स्तुति कर.

अग्नि आपल्या ज्वालांनीं वनें भस्म करून टांकतो व ज्या मार्गानें तो वनांना जाळीत जातो, त्या मार्गाला काळाकुट्ट करून टांकतो. असा हा अग्नि स्तुति करण्यास योग्य आहे.

४ अवसे चित्र-राधसं अग्निं हवामहे [११६८]- आमचें संरक्षण व्हावें यासाठीं विलक्षण पराक्रम करणाऱ्या अग्निला आमच्या सहाय्यासाठीं आम्ही बोलावतों.

५ दिवः मूर्धानं, पृथिव्याः अरतिं, वैश्वानरं, ऋते आजातं, कविं सम्राजं जनानां अतिथिं आसन्, नः पात्रं देवाः आ जनयन्त [११४०]- द्युलोकाच्या मस्तकाच्या ठिकाणीं असणाऱ्या, पृथिवीवर फिरणाऱ्या, विश्वाचा नेता अशा, यज्ञासाठीं झालेल्या, ज्ञानी व सम्राट अशा, लोकांकडे अतिथिरूपानें जाणाऱ्या, देवांचें मुख व आमचा संरक्षक अशा अग्निला देवांनीं उत्पन्न केला आहे.

याप्रमाणें अग्निचें वर्णन या अध्यायामध्यें आलेलें आहे. आतां इन्द्र व अग्नि यांची एकदम केलेली प्रार्थना पहा—

इन्द्र व अग्नि

१ इन्द्रं अग्निं च आ वोढवे नः वाजवतीः इषः, आशून् अर्वतः पिपृतं [११५१]- इन्द्र व अग्निला देवतांकडे पोंचविण्यासाठीं आम्हांला बल वाढवणारें अन्न व चपळ घोडे द्या.

अन्न नुसतें नको तर तें बल वाढवणारें पाहिजे. घोडेही साधे नकोत तर ते जलद धावणारे अत्यंत चपल असे पाहिजेत. ही शब्द योजना येथें पाहण्यासारखी आहे.

मित्र व वरुण

या अध्यायामध्यें मित्र व वरुण यांचीही थोडीशी स्तुति आलेली आहे, ती आतां येथें पहा—

१ मित्राय वरुणाय विपा गिरा गायत । महि क्षत्रौ ! ऋतं बृहत् [११४३]- मित्र व वरुण यांचीं स्तोत्रें मोठ्या आवाजानें म्हणा. मोठें क्षात्रबल धारण करणाऱ्या मित्र व वरुण हो ! यज्ञामध्यें तुमची मोठी स्तुति होत आहे, ती ऐकण्यासाठीं या.

२ उभा सम्राजा घृतयोनी देवा देवेषु प्रशस्ता [११४४]- मित्र व वरुण हे दोघेही मोठे सम्राट् आहेत. ते जल उत्पन्न करणारे देव आहेत म्हणून ते सर्व देवांमध्यें प्रशंसित देव आहेत.

३ ता नः दिव्यस्य पार्थिवस्य महः रायः शक्तं, वां देवेषु महि क्षत्रम् [११४५] ते मित्र व वरुण द्युलोकांतील व पृथिवीवरील मोठें धन देण्यास समर्थ आहेत. तुम्हां दोघांचें मोठें क्षात्रबल देवांमध्येंहि प्रसिद्ध आहे.

४ शर्धाय वीतये मित्राय वरुणाय यथाशंतमं दक्ष-साधनं पुनाता [११५९]- बल वाढवण्यासाठीं व देवांना देण्यासाठीं मित्र व वरुण यांना ज्या रीतिनें आनन्द होईल, असें बल वाढवण्याचें साधन अशा सोमाला शुद्ध करून द्या.

देवांसाठीं सोमरस

सोमरस यज्ञांमध्यें काढतात, तो देवांना देतात व नंतर यज्ञ करणारे पितात, याविषयीं थोडेंसें वर्णन पहा—

१ स वायुं, इन्द्रं, अश्विना मदेन साकं गच्छति [११३४]- तो सोमरस वायु, इन्द्र, अश्विनौ आदि देवांजवळ आपल्या स्वाभाविक आनंदासह पोंचतो.

२ मधोः ऊर्मयः मित्रे वरुणे भगे पवन्ते [११३५]- या सोमरसाच्या लाटा मित्र वरुण व भग आदि देवांपर्यंत पोंचतात.

३ हे सोम ! नृभिः येमानः अद्रिभिः सुतः इन्द्रस्य कुक्षा प्र याहि [११६२]- हे सोमा ! ऋत्विजांनीं दगडांनीं कुटून काढलेला तूं इन्द्राच्या पोटांत जातोस.

सोम स्वर्गात असतो

१ इन्दवः नः दिवस्परि वृष्टिं सुवीर्यं आ पवन्तां [११६५]- सोमरस आम्हांला स्वर्गलोकांतून वृष्टी व उत्तम वीर्य - पराक्रम करण्याची शक्ति - आणतो.

सोमाचे गुण

१ देवः [१११६]- प्रकाशणारा, स्वर्गांत असणारा.

२ महिव्रतः [१११६]- मोठीं कार्यें करणारा.

३ शुचि-बन्धुः [१११६]- शुद्ध बंधुसमान.

४ पावकः [१११६]- शुद्ध, शुद्धि करणारा.

५ वराहः [१११६]- बलवान्, श्रेष्ठ दिवशीं ज्याच्यावर संस्कार झाले आहेत.

६ इन्दुः [११५२]- तेजस्वी.

७ सखा [११५२]-मित्र, मित्राप्रमाणें हित करणारा.

८ गयसाधनः [११५८]- यज्ञास्थानाचें मुख्य साधन, घराचें मुख्य साधन.

९ देवाव्यः [११५८]- देवांचें देवत्व रक्षण करणारा.

१० द्विशवस् [११५८]- दोन प्रकारचीं बलें ज्याच्या-जवळ आहेत. दिव्य व पार्थिव बल ज्याच्याजवळ आहेत.

याप्रमाणें सोमाचे गुण या अध्यायांत वर्णिले आहेत. हा सोम चमकत असतो. पहा—

सोम चमकतो

१ तिग्मशृंगः परीणसं कृणुते, दिवा हरिः ददृशे, नक्तं ऋज्रः [१११८]- तो सोम तीक्ष्ण किरणांनीं प्रकाश करतो, दिवसा हिरवा दिसतो व रात्रौ प्रकाशमय दिसतो.

सोमाचें बल

सोमरसामध्यें सामर्थ्य वाढवण्याचा गुण आहे. यामुळेच तो रस देव पितात व राक्षसांचा संहार करीत असतात. या सोमाचें हें बल वेदमंत्रांमध्यें अनेक प्रकारांनीं वर्णिलें आहे, त्यांपैकीं काहीं मंत्र आतां पहा—

१ ते मयोभुवं वह्निं पान्तं पुरुस्पृहं दक्षं अद्य आवृणीमहे [११३७]- हे सोमा ! तुझें सुखदायी, इष्ट-स्थानीं पोंचवणारें, पुष्कळांकडून प्रशंसित असें बल आम्हीं आज प्राप्त करूं इच्छीत आहों.

२ मन्द्रं वरेण्यं विप्रं मनीषिणं पान्तं पुरुस्पृहं आ वृणीमहे [११३८]- आनंद वाढवणारें, श्रेष्ठ, ज्ञानपूर्ण, बुद्धियुक्त, संरक्षण करणारें, पुष्कळांनीं इच्छिण्यास योग्य असें जें तुझें बल आहे तें आम्ही प्राप्त करूं इच्छीत आहों.

३ हे सुक्रतो । रयिं सुचेतुनं तनूषु पान्तं पुरुस्पृहं आ वृणीमहे [११३९]- हे उत्तम कर्म करणाऱ्या सोमा ! धन, उत्तम ज्ञान, उत्तम पुत्रपौत्र, उत्तम संरक्षण व प्रशंसनीय बल आम्ही तुझ्याकडून प्राप्त व्हावें असें इच्छीत आहों.

सोमरसामध्यें हे गुण आहेत. ते गुण आमच्यामध्यें यावे व आम्हीं या गुणांनीं युक्त व्हावें, अशी आमची इच्छा आहे. प्रत्येक आत्मोन्नति करणाऱ्याची अशीच इच्छा असावयास पाहिजे.

सोम दगडांनीं कुटून त्याचा रस काढतात, त्या रसांत पाणी मिसळून तो गाळतात. यासंबंधीं असें वर्णन मंत्रांत आढळतें—

सोम पाण्यांत मिसळतात

१ वन्द्यः हविः महीः अपः विगाहते [११२९]- अत्यन्त वंदनीय सोम पुष्कळ पाण्यांत स्नान करतो. अर्थात् पुष्कळ पाण्यांत तो मिसळला जातो.

२ वृषः सत्यः अध्वरः सद्म अभि वने अचिक्रदत् [११३०]- बलवान्, सत्यस्वरूप, हिंसारहित सोम यज्ञशालेंत पाण्यामध्यें शब्द करीत मिसळला जातो.

३ हरिः प्रियः वनेषु अव्या वारं परिसीदति [११३३]- हिरव्या रंगाचा प्रिय सोमरस पाण्यांत मिसळ-ल्यानंतर मेंढीच्या केंसांच्या गाळणींमधून गाळला जातो.

असा हा सोम पाण्यांत मिसळून गाळला जात असतांना खालीं भांड्यांत पडतांना त्याचा शब्द होतो—

सोम गाळतांना शब्द होतो

१ रेभन् पदा अभ्येति [१११६]- सोम शब्द करीत पात्रामध्यें उतरत असतो.

२ सूराः अर्णवं वितन्वते [११२३]- सोमरस शब्द करीत असतात.

३ वाजी सहस्रधारः अव्यं वारं तिरः प्राक्षाः [११६०]- बलवान् सोम सहस्र धारांनीं मेंढीच्या केंसांच्या छाननींमधून खालीं पडत असतो.

एक कलश जलमिश्रित सोमरसानें भरलेला असतो. दुसऱ्या कलशामध्यें शुद्ध पाणी असतें. त्या दुसऱ्या कळशीच्या तोंडावर मेंढीच्या केंसांची गाळणी ठेवतात व त्या गाळणीवर सोमरस व पाणी यांचें मिश्रण गाळण्यासाठीं ओततात. हें ओतत असतां गाळला गेलेला सोमरस खालच्या भांड्यांत पडतो व तो पडत असतां त्याचा आवाज होतो. त्याचें हें आलंकारिक वर्णन आहे.

गाईच्या दुधांत सोमाचें मिश्रण

गाळलेला सोमरस गाईच्या दुधांत मिसळतात. याचें वर्णन असें आढळतें—

१ धेनवः पयसा इत् अभि शिश्रयुः हरिं क्रीडन्तं अभ्यनूषत [११५३]- गाई आपल्या दुधाचें मिश्रण या सोमरसाशीं करतात. खेळणाऱ्या हिरव्या रंगाच्या सोमाला त्या सुभूषित करतात.

२ सहस्ररेताः अद्भिः मृजानः गोभिः श्रीणानः अक्षाः [११६१]- सहस्र प्रकारच्या बलांनीं युक्त असलेल्या सोमरसामध्यें प्रथम पाणी मिसळलें जातें व नंतर गाईचें दूध मिळवलें जातें. मग हा रस भांड्यांत गाळला जातो.

३ सोमासः गोभिः अंजते [११२१]- सोमरस गाईच्या दुधानें सुशोभित होतात.

या ठिकाणीं “ गाईचें दूध ” असें न म्हणतां “ गाई ”

असेंच म्हटलें आहे, ही आलंकारिक भाषा आहे. सोम गाईशीं मिसळला जातो याचा अर्थ सोमाचा रस गाईच्या दुधाशीं मिसळला जातो, असाच समजावयाचा आहे.

सोमासाठीं वाद्य

सोमरस काढण्याच्या वेळीं जसे मंत्र म्हटले जातात, जसें सामगायन केलें जातें, त्याप्रमाणें वाद्यही वाजवलें जातें. पहा—

१ सखायः दुर्मर्षं पवमानं वाणं साकं प्रवदन्ति [१११७]– ते मित्र - ते ऋषि शत्रूंना असह्य अशा शुद्ध होणाऱ्या सोमासाठीं वाण नामक वाद्य वाजवीतात. सामगायनाच्यावेळीं हें वाद्य वाजवीत असतात. वाण हें चर्मवाद्य असावेंसें वाटतें. अनेक ऋषि तें वाद्य सोमरस तयार करण्याच्यावेळीं वाजवीत असत असें दिसतें.

जयानें संपत्ति मिळूं दे

द्यु व भूमि यांची मिळून प्रार्थना अशी केलेली आहे—

१ हे रोदसी ! मध्वः वाजस्य सातये अस्माकं रयिं श्रवः वसूनि संजितं [११३६]- हे द्यावापृथिवी हो ! सोमरूपी अन्न प्राप्त करावें यासाठीं आम्हांला धन, अन्न व ऐश्वर्य विजयप्राप्तिनंतर मिळो. अर्थात् आधीं आमचा विजय होवो व त्या विजयानंतर आम्हांस ऐश्वर्यही प्राप्त होवो.

सोम अन्न देतो

१ नः संयतं पिप्युषीं इषं ऊर्मिणा पवस्व, या [इद्] क्षुमत्, वाजवत्, मधुमत् सुवीर्यं दोहते [११५४]– आम्हीं आणलेल्या पोषक अन्नाला हे सोमा ! तूं आपल्या लाटेनें शुद्ध कर. जें अन्न प्रसिद्ध बलवर्धक व मधुरतायुक्त उत्तम वीर्य देतें. ज्यानें वीरपुत्र होऊं शकतो. असा हा सोम शत्रु दूर करतो. पहा —

सोम शत्रु दूर करतो

१ पवमानः स्पृधः अभिसीदति विशः राजा इव [११३२]– सोम हा प्रजेचें पालन करणाऱ्या राजाप्रमाणें शत्रूंचा पराभव करतो.

२ विश्वाः दिशः अनु प्रभुः समत्सु त्वा हवामहे [११६७]- हे सोमा ! तूं सर्व दिशांमध्यें अनुकूल असा प्रभु आहेस, म्हणून युद्धामध्यें सहाय्यासाठीं आम्हीं तुला बोलावीत असतों.

याप्रमाणें सोमाचें वर्णन या अध्यायामध्यें आलेलें आहे.

---

*

सुभाषित

१ काव्यं ब्रुवाणः देवः देवानां जनिमा विवक्ति [१११६]- काव्य बोलणारा सोमदेव देवांच्या जन्माचें वृत्तान्त सांगत असतो.

२ सखायः दुर्मर्षं पवमानं वाणं साकं प्रवदन्ति [१११७]- ते मित्र शत्रूंना असह्य अशा शुद्ध होणाऱ्या सोमासाठीं वाण नामक वाद्य सर्व मिळून वाजवतात, अनेक लोक मिळून ब्यांड वाजवितात.

३ दिवा हरिः ददृशे, नक्तं ऋज्रः [१११८]- सोम दिवसाला हिरवा दिसतो व रात्रौ तो चमकतो.

४ रथाः इव, अर्वन्तः न श्रवस्यन्तः राये प्राक्रमुः [१११९]- रथ व घोडे यशाची इच्छा करीत धन प्राप्तिसाठीं पराक्रम करतात.

५ प्रशस्तिभिः राजानः न गोभिः अञ्जते [११२१] स्तुतींनीं जसे राजे शोभतात, त्याप्रमाणें गाईच्या दुधानें सोमरस शोभतात.

६ धर्मन् ऋतस्य पथा असृग्रम् [११२८]- धर्माप्रमाणें सत्याच्या मार्गानें ते जातात.

७ पवमानः स्पृधः विशः राजा इव अभिसीदति [११३२]- सोमरस स्पर्धा करणाऱ्या शत्रूंना प्रजांच्या राजाप्रमाणें नष्ट करतो.

८ रोदसी अस्मभ्यं रयिं श्रवः वसूनि संजितं [११३६]- द्यावापृथिवींनीं आमच्यासाठीं धन, यश व ऐश्वर्य जय मिळवून प्राप्त करून द्यावें.

९ हे सोम ! ते मयोभुवं पान्तं पुरुस्पृहं दक्षं अद्य आवृणीमहे [११३७]- हे सोमा ! तुझें सुखदायी, संरक्षण करण्यास समर्थ म्हणून पुष्कळांनीं प्रशंसा करण्यास योग्य, असें बल प्राप्त व्हावें असें इच्छीत आहों.

१० हे सोम ! मन्द्रं वरेण्यं, विप्रं मनीषिणं पान्तं पुरुस्पृहं आ [११३८]- हे सोमा ! आनंद देणाऱ्या, श्रेष्ठ, ज्ञानी, मननशील, संरक्षक व पुष्कळांनीं प्राप्त करण्यास योग्य अशा तुझी आम्ही भक्ति करीत आहों.

११ हे सुक्रतो ! रयिं सुचेतनं तनुषु पान्तं पुरुस्पृहं आ [११३९]- हे उत्तम कर्में करणाऱ्या सोमा ! धन, उत्तम ज्ञान, पुत्रपौत्र, संरक्षण यांसाठीं पुष्कळांकडून ज्याची स्तुति होत आहे अशा सोमाची प्रार्थना आम्ही करीत आहों.

१२ वां देवेषु महि क्षत्रं [११४५]- तुमचें देवामध्यें मोठें शौर्य आहे.

१३ नः वाजवतीः इषः आशून् अर्वतः पिपृतं [११५१]- आम्हांला बल वाढवणारें अन्न व चपल घोडे द्या.

१४ सखा सख्युः संगिरं न प्रमिनाति [११५२]- मित्र मित्राला त्रास देत नाहीं.

१५ मर्यः युवतिभिः [११५२]- पुरुष स्त्रियांसह आनंदानें राहतो.

१६ नः संयतं पिप्युषीं इषं ऊर्मिणा पवस्व [११५४] -आम्हांला पोषक अन्न लाटेनें दे. पुष्कळ दे.

१७ क्षुमत् वाजवत् मधुमत् सुवीर्यं दोहते [११५४] - प्रसिद्ध बलवर्धक मधुर सोम वीर्यवर्धक अन्न देतो.

१८ सदावृधं विश्वगूर्तं ऋभ्वसं ओजसा अधृष्टं धृष्णुं इन्द्रं कर्मणा नकिः नशत् [११५५]- सदा वाढणाऱ्या, प्रशंसनीय मोठ्या, आपल्या शक्तिमुळें पराभूत न होणाऱ्या आणि शत्रूंना जिंकणाऱ्या इन्द्राचा आपल्या प्रयत्नांनीं कोणीहि पराभव करूं शकत नाहीं.

१९ अषाळ्हं उग्रं पृतनासु सासहिं इन्द्रं [११५७] शत्रूचा पराभव करणाऱ्या उग्रवीर व युद्धांमध्यें विजयी इन्द्राची मी स्तुति करतों.

२० सखायः आ निषीदत, पुनानाय प्रगायत [११५७]- हे मित्र हो ! या बसा व शुद्ध होणाऱ्याची प्रशंसा करा.

२१ विश्वाः दिशः अनु प्रभुः, समत्सु त्वा हवामहे [११६७]- सर्व दिशांमध्यें तूं योग्य शासक आहेस, म्हणून तुला युद्धांमध्यें सहाय्यासाठीं आम्ही बोलावीत आहों.

२२ समत्सु वाजयन्तः अवसे वाजेषु चित्रराधसं अग्निं हवामहे [११६८]- युद्धामध्यें बलाचा उपयोग करणारे आम्ही संग्रामामध्यें आमचें संरक्षण करण्यासाठीं विलक्षण पराक्रम करणाऱ्या अग्रणीला सहाय्यार्थ बोलावीत आहों.

२३ हे शतक्रतो विचर्षणे इन्द्र ! नः नृम्णं ओजः आभर, पृतनासहं वीरं आ [११६९]- हे शेंकडों कर्में करणाऱ्या ज्ञानी इन्द्रा ! आम्हांला पौरुषयुक्त बल भरपूर दे आणि युद्धांमध्यें शत्रूंचा पराभव करणारा पुत्र दे.

२४ हे वसो शतक्रतो ! त्वं नः पिता, त्वं माता बभूविथ । अथ ते सुम्नं ईमहे [११७०]- हे निवासका इन्द्रा ! तूं आमचा पिता व तूंच आमची माता आहेस. म्हणून तुझ्याजवळ सुख मागत आहों.

२५ सहस्कृत शुष्मिन् पुरुहूत ! वाजयन्तं त्वां उपब्रुवे । नः सुवीर्यं रास्व [११७१]- हे बलासाठीं प्रसिद्ध व सामर्थ्यवान् सर्वांनीं प्रशंसिलेल्या इन्द्रा ! बलानें युक्त अशा तुझी आम्ही स्तुति करीत आहों. तूं आम्हांला उत्तम पराक्रम करण्याचें सामर्थ्य दे.

२६ हे विदद्वसो ! हे अद्रिवः चित्र इन्द्र ! तत् उभया हस्ती नः आभर [११७२]-हे धनवान्, वज्रधारी, विलक्षण बलवान् इन्द्रा ! तें धन दोनही हातांनीं आम्हांला भरपूर दे.

२७ हे इन्द्र ! यत् द्युक्षं वरेण्यं मन्यसे तत् आभर [११७२]- हे इन्द्रा ! जें तेजस्वी व श्रेष्ठ धन आहे असें तूं मानतोस, तें आम्हांला भरपूर दे.

२८ ते वयं तस्य अकूपारस्य दावनः विद्याम [११७३]- ते आम्ही त्या उत्तम धनाचें दान घेणारे होऊं इच्छीत आहों.

२९ हे अद्रिवः ! ते दिक्षु प्रराध्यं श्रुतं बृहत् मनः अस्ति, तेन दृढा चित् वाजं सातये आदर्षि [११७४] -हे वज्रधारी इन्द्रा ! तुझें नाना दिशांमध्यें जाणारें सुप्रसिद्ध असें विशाल मन आहे, त्या मनानें मिळण्यास कठीण असें जें धन असेल, तें बल वाढवणारें धन आम्हांस बल वाढवण्यासाठीं दे.

उपमा

आतां या अध्यायांत आलेल्या उपमा पहा—

१ उशना इव [१११६]- उशना ऋषिप्रमाणें (काव्यं ब्रुवाणाः) कवि काव्य बोलतो.

२ रथाः इव अर्वन्तः न [१११९]- रथांप्रमाणें आणि घोड्यांप्रमाणें (श्रवस्यवः सोमासः राये प्राक्रमुः) यशाची इच्छा करून सोमरस धन प्राप्तिसाठीं प्रयत्न करतात.

३ रथाः इव [११२०]- युद्धांत जाणाऱ्या रथांप्रमाणें (हिन्वानासः गभस्त्योः दधिरे) प्रेरित झालेले सोमरस हातांत धरले गेले. पिण्यासाठीं सोमपात्र हातांत धरलें.

४ भरासः कारिणां इव [११२०]- भार उचलून नेणाऱ्या मजुरांच्या हातांनीं भार उचलावा, त्याप्रमाणें सोमपात्र सोम पिण्यासाठीं हातांनीं उचललें.

५ प्रशस्तिभिः राजानः न [११२१]- स्तुतींनीं जसे राजे खुष होतात, त्याप्रमाणें सोमरस (गोभिः अंजते) गाईच्या दुधानें शोभतो.

६ सप्त-धातृभिः यज्ञः न [११२१]- सात ऋत्विजांनीं जसा यज्ञ सिद्ध होतो तसा सोम गाईंच्या दुधानें सिद्ध होतो.

७ शिशुं न [१२४१]- मुलाला जसें त्याच्या माता जपतात त्याप्रमाणें (जायमानं त्वां अग्निं) नवीन पेट-वलेल्या अग्निला ऋत्विज जपून पेटवितात.

८ शिशुं न [११५७]- बालकाला जसा पिता आभूषणांनीं सजवितो, त्याप्रमाणें ऋत्विज (यज्ञैः श्रिये परिभूषत) यज्ञांनीं अग्निची शोभा वाढवितात.

९ मर्यः युवतिभिः इव [११५२]- पुरुष जसा स्त्रियां-सह आनंदांत असतो, तसा (सोमः समर्षति) सोम पाण्या-सह राहतो.

१० इन्द्रं न [११५५]- इन्द्राचा जसा (यज्ञैः चकार) लोक यज्ञांनीं सत्कार करतात, तसा सोमाचा सत्कार यज्ञांनीं करतात.

११ मातृभिः वत्सं न [११५८]- मातांबरोबर जसा मुलगा राहतो, त्याप्रमाणें (ईं अभि सं सृजत) या सोमाला जलाशीं मिसळून ठेवा.

१२ विशः राजा इव [११३२]- प्रजांचा राजा जसा शत्रूंना दूर करतो, त्याप्रमाणें (पवमानः स्पृधः अभि सीदति) सोम शत्रूंना दूर करतो.

अष्टमाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
१११६	९।९७।७	वृषगणो वासिष्ठः	पवमानः सोमः	त्रिष्टुप्
१११७	९।९७।८	वृषगणो वासिष्ठः	"	"
१११८	९।९७।९	वृषगणो वासिष्ठः	"	"
१११९	९।१०।१	असितः काश्यपो देवलो वा	"	गायत्री
११२०	९।१०।२	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११२१	९।१०।३	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११२२	९।१०।४	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११२३	९।१०।५	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११२४	९।१०।६	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११२५	९।१०।७	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११२६	९।१०।८	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११२७	९।१०।९	असितः काश्यपो देवलो वा	"	"
		(२)		
११२८	९।७।१	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११२९	९।७।२	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११३०	९।७।३	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११३१	९।७।४	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११३२	९।७।५	असितः काश्यपो देवलो वा	"	"

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
११३३	९।७।६	असितः काश्यपो देवलो वा	पवमानः सोमः	गायत्री
११३४	९।७।७	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
११३५	९।७।८	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
११३६	९।७।९	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
११३७	९।६५।१८	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
११३८	९।६५।१९	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
११३९	९।६५।३०	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
		(३)		
११४०	६।७।१	भरद्वाजो बार्हस्पत्यः	अग्निः	त्रिष्टुप्
११४१	६।७।४	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
११४२	६।७।२	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
११४३	५।६८।१	यजत आत्रेयः	मित्रावरुणौ	गायत्री
११४४	५।६८।२	यजत आत्रेयः	,,	,,
११४५	५।६८।३	यजत आत्रेयः	,,	,,
११४६	१।३।४	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	इन्द्रः	,,
११४७	१।३।५	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
११४८	१।३।६	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
११४९	६।६०।१०	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
११५०	६।६०।११	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
११५१	६।६०।१२	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
		(४)		
११५२	९।८६।१६	सिकता निवावरी	पवमानः सोमः	जगती
११५३	९।८६।१७	सिकता निवावरी	,,	,,
११५४	९।८६।१८	सिकता निवावरी	,,	,,
११५५	८।७०।३	पुरुहन्मा आंगिरसः	इन्द्रः	प्रगाथः- (विषमा बृहती, समा सतो बृहती)
११५६	८।७०।४	पुरुहन्मा आंगिरसः	,,	,,
		(५)		
११५७	९।१०४।१	पर्वतनारदौ काण्वौ, शिखण्डिन्याव-प्सरसौ काश्यपौ वा।	पवमानः सोमः	उष्णिक्
११५८	९।१०४।२	पर्वतनारदौ काण्वौ, शिखिण्डिन्याव प्सरसौ काश्यपौ वा	,,	,,
११५९	९।१०४।३	पर्वतनारदौ काण्वौ, शिखण्डिन्याव प्सरसौ काश्यपौ वा	,,	,,
११६०	९।१०९।१६	अग्नये धिष्ण्यो ऐश्वराः	,,	द्विपदा विराट्

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
११६१	९।१०९।१७	अग्नये धिष्ण्यो ऐश्वराः	पवमानः सोमः	द्विपदा विराट्
११६२	९।१०९।१८	अग्नये धिष्ण्यो ऐश्वराः	,,	,,
११६३	९।६५।२२	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	गायत्री
११६४	९।६५।२३	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
११६५	९।६५।२४	भृगुर्वारुणिर्जमदग्निर्भार्गवो वा	,,	,,
		(६)		
११६६	८।११।७	वत्सः काण्वः	अग्निः	,,
११६७	८।११।८	वत्सः काण्वः	,,	,,
११६८	८।११।९	वत्सः काण्वः	,,	,,
११६९	८।९८।१०	नृमेध आंगिरसः	इन्द्रः	ककुप्
११७०	८।९८।११	नृमेध आंगिरसः	,,	,,
११७१	८।९८।१२	नृमेध आंगिरसः	,,	पुर उष्णिक्
११७२	५।३९।१	अत्रिर्भौमः	,,	अनुष्टुप्
११७३	५।३९।२	अत्रिर्भौमः	,,	,,
११७४	५।३९।३	अत्रिर्भौमः	,,	,,

अथ नवमोऽध्यायः ।

अथ पञ्चमप्रपाठके प्रथमोऽध्यायः ॥ ५ ॥

[१]

(१-२०) १ प्रतर्दनो दैवोदासिः; २, ३, ४ असितः काश्यपो देवलो वा; ५, ११ उचथ्य आंगिरसः; ६, ७ अमहीयुरांगिरसः; ८, १५ निध्रुविः काश्यपः; ९ वसिष्ठो मैत्रावरुणिः; १० सुकक्ष आंगिरसः; १२ कविर्भार्गवः; १३ देवातिथिः काण्वः; १४ भर्गः प्रागाथः; १६ अम्बरीषो वार्षागिरः ऋजिश्वा भारद्वाजश्च; १७ अग्नयो धिष्ण्या ऐश्वराः; १८ उशना काव्यः; १९ नृमेध आंगिरसः; २० जेता माधुच्छन्दसः ॥ १-८, ११-१२, १५-१७ पवमानः सोमः; ९, १८ अग्निः; १०, १३, १४, १९-२० इन्द्रः ॥ १-९ त्रिष्टुप्; २-८, १०-११,-१५, १८ गायत्री; जगती १३, १४ प्रगाथः=(विषमा बृहती, समा सतोबृहती); १६-२० अनुष्टुप्; १७ द्विपदा विराट्; १९ उष्णिक् ॥

१ २ ३ १ २ ३ १ २ ३ २ ३ १ २ ३ १ २ ३ १ २
११७५ शिशुं जज्ञान॑ᳩ हर्यतं मृजन्ति शुम्भन्ति विप्रं मरुतो गणेन ।
३ २ ३ १ २र ३ १ २र ३ २ ३ १ २ ३ १ २
कविर्गीर्भिः काव्येना कविः सन्त्सोमः पवित्रमत्येति रेभन् ॥ १ ॥ (ऋ. ९।९६।१७)

३ २ ३ १ २ ३ २ ३ २ ३ १ २ ३ १ २ ३ २
११७६ ऋषिमना य ऋषिकृत्स्वर्षाः सहस्रनीथः पदवीः कवीनाम् ।
३ २ ३ १ २ ३ १ २र ३ १ २ ३ २ ३ १ २ ३ २
तृतीयं धाम महिषः सिषासन्त्सोमो विराजमनु राजति ष्टुप् ॥ २ ॥ (ऋ. ९।९६।१८)

३ २ ३ १ २ ३ २ ३ १ २ १ २ ३ १ २र ३ १ २
११७७ चमूषच्छ्येनः शकुनो विभृत्वा गोविन्दुर्द्रप्स आयुधानि बिभ्रत् ।
३ २ ३ १ २र ३ २ ३ २ ३ १ २ ३ १ २
अपामूर्मि॑ᳩ सचमानः समुद्रं तुरीयं धाम महिषो विवक्ति ॥ ३ ॥ १ (लु) ॥

[धा० २४ । उ० नास्ति । स्व० ९] (ऋ. ९।९६।१९)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[११७५] (जज्ञानं शिशुं) सोमरस नुकताच उत्पन्न झाल्यामुळें बालकाप्रमाणें राहणारा आहे. (हर्यतं) सर्वांना पूज्य असलेल्या या सोमाला (मरुतः मृजन्ति) मरुत शुद्ध करतात. (गणेन विप्रं शुम्भन्ति) सात संख्येच्या गणानें या ज्ञानवर्धक सोमाला सुशोभित करतात. त्यानंतर (कविः सोमः काव्येन) हा ज्ञानी सोम स्तुतिच्या काव्यानें (कविः गीर्भिः) स्तुति चालली आहे ती ऐकत (रेभन् पवित्रं अत्येति) शब्द करीत गाळणीमधून गाळला जातो. ॥ १ ॥

[११७६] (ऋषिः-मना) ऋषिसारखें मन असणारा (ऋषि-कृत्) ऋषि करणारा (स्वर्षाः सहस्र-नीथः) सर्वांचें सेवन करणारा, सहस्र स्तुतींनीं स्तविला गेलेला (कवीनां पदवीः) कवींच्या योग्यतेस पोंचलेला (यः सोमः) जो सोम आहे तो (महिषः) अत्यंत पूज्य (तृतीयं धाम सिषासन्) तिसऱ्या स्थानामध्यें राहणाऱ्या आणि (स्तुप्) स्तुत्य होऊन (विराजं अनु विराजति) विशेष तेजस्वी इन्द्राला अधिक प्रकाशित करतो. ॥ २ ॥

[११७७] (चमूषद् श्येनः) कलशामध्यें असलेला प्रशंसनीय (शकुनः) शक्तिमान् (विभृत्वा) गति करणारा (गो-विन्दुः) गाई प्राप्त करणारा, गोदुग्धांत मिसळला जाणारा, (द्रप्सः) द्रवरूप (अपां ऊर्मिं समुद्रं सचमानः) जलांच्या लाटांना, जलसमूहामध्यें मिसळणारा (आयुधानि बिभ्रत्) शस्त्रें धारण करणारा (महिषः) हा बलवान् सोम (तुरीयं धाम विवक्ति) चतुर्थधामाचें सेवन करतो, उच्चस्थानीं विराजतो. ॥ ३ ॥

११७८ एते सोमा अभि प्रियमिन्द्रस्य काममक्षरन् । वर्धन्तो अस्य वीर्यम् ॥ १ ॥ (ऋ. ९।८।१)
११७९ पुनानासश्चमूषदो गच्छन्तो वायुमश्विना । ते नो धत्त सुवीर्यम् ॥ २ ॥ (ऋ. ९।८।२)
११८० इन्द्रस्य सोम राधसे पुनानो हार्दि चोदय । देवानां योनिमासदम् ॥ ३ ॥ (ऋ. ९।८।३)
११८१ मृजन्ति त्वा दश क्षिपो हिन्वन्ति सप्त धीतयः । अनु विप्रा अमादिषुः ॥४॥ (ऋ. ९।८।४)
११८२ देवेभ्यस्त्वा मदाय कꣳ सृजानमति मेष्यः । सं गोभिर्वासयामसि ॥५॥ (ऋ. ९।८।५)
११८३ पुनानः कलशेष्वा वस्त्राण्यरुषो हरिः । परि गव्यान्यव्यत ॥ ६ ॥ (ऋ. ९।८।६)
११८४ मघोन आ पवस्व नो जहि विश्वा अप द्विषः । इन्दो सखायमा विश ॥७॥ (ऋ. ९।८।७)
११८५ नृचक्षसं त्वा वयमिन्द्रपीतꣳ स्वर्विदम् । भक्षीमहि प्रजामिषम् ॥ ८ ॥ (ऋ. ९।८।९)
११८६ वृष्टिं दिवः परि स्रव द्युम्नं पृथिव्या अधि । सहो नः सोम पृत्सु धाः ॥९॥ २ (ति)॥
[धा० २९ । उ० १ । स्व० १३] (ऋ. ९।८।८)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[११७८] (एते सोमाः) हे सोमरस (अस्य वीर्यं वर्धन्तः) या इन्द्राचें सामर्थ्य वाढवीत (इन्द्रस्य कामं प्रियं) इन्द्राला आवडणाऱ्या प्रिय रसाची (सं अभि अक्षरन्) वृष्टि करतात. रस खालीं पात्रांत गाळून पडतो. ॥ १ ॥

[११७९] हे (पुनानासः चमूषदः) गाळलेले, पात्रांत असलेल्या सोमरसांनों ! (वायुं अश्विना गच्छन्तः) वायु व अश्विनौ देवतांना प्राप्त होऊन (ते) ते तुम्ही (नः सुवीर्यं धत्त) आम्हांला उत्तम वीरता द्या. ॥ २ ॥

[११८०] हे (सोम) सोमा ! (पुनानः) गाळला जात असतां तूं (इन्द्रस्य राधसे) इन्द्राच्या आराधनेसाठीं (हार्दि चोदय) हृदयांना प्रेरित कर. मी (देवानां योनिं आ सदं) देवांच्या यज्ञस्थानामध्यें बसलों आहें. ॥३॥

[११८१] हे सोमा ! (त्वा दश क्षिपः मृजन्ति) तुला दहा अंगुली शुद्ध करीत आहेत. (सप्तधीतयः हिन्वन्ति) सात होते तुला संतुष्ट करीत आहेत. (विप्राः अनु अमादिषुः) ज्ञानी तुला अनुसरून प्रसन्न करीत आहेत. ॥ ४ ॥

[११८२] हे सोमा ! (मेष्यः अति सृजानं) लोंकरीच्या छाननीमधून गाळला जाणाऱ्या (कं त्वा) सुख वाढवणाऱ्या अशा तुला (देवेभ्यः मदाय) देवांना आनंद देण्यासाठीं (गोभिः संवासयामसि) गाईच्या दुधादिमध्यें मिसळत आहोंत. ॥ ५ ॥

[११८३] (पुनानः) शुद्ध होऊन (कलशेषु आ) कलशांमध्यें असणारा (अरुषः हरिः) चमकणारा हिरव्या रंगाचा सोम (गव्यानि वस्त्राणि परि अव्यत) गाईंचीं वस्त्रें पांघरतो. गाईच्या दुधांत मिसळला जातो. ॥ ६ ॥

[११८४] हे (इन्दो) सोमा ! (मघोनः नः) धनवान् अशा आम्हांसाठीं (आ पवस्व) गाळला जा. (विश्वाः द्विषः अप जहि) सर्व शत्रूंना नष्ट कर, (सखायं आ विश) मित्र अशा इन्द्रामध्यें प्रवेश कर. ॥ ७ ॥

[११८५] हे सोमा ! (नृ-चक्षसं) मनुष्यांचें निरीक्षण करणाऱ्या (इन्द्र-पीतं) इन्द्रानें पिण्यास योग्य आणि (स्वर्विदं त्वां) सर्वज्ञ अशा तुला प्राप्त करून (वयं प्रजां इषं भक्षीमहि) आम्ही सन्तान व अन्न प्राप्त करून आनंदानें राहूं. ॥ ८ ॥

[११८६] हे (सोम) सोमा ! तूं (दिवः वृष्टिं परिस्रव) द्युलोकांतून वृष्टि कर. (पृथिव्याः अधि द्युम्नं) पृथिवीवर अन्न उत्पन्न कर. (पृत्सु नः सहः धाः) संग्रामांमध्यें उपयोगी होईल असें सामर्थ्य आम्हांला दे. ॥ ९ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२]

११८७ सोमः पुनानो अर्षति सहस्रधारो अत्यविः । वायोरिन्द्रस्य निष्कृतम् ॥१॥ (ऋ. ९।१३।१)

११८८ पवमानमवस्यवो विप्रमभि प्र गायत । सुष्वाणं देववीतये ॥ २ ॥ (ऋ. ९।१३।२)

११८९ पवन्ते वाजसातये सोमाः सहस्रपाजसः । गृणाना देववीतये ॥ ३ ॥ (ऋ. ९।१३।३)

११९० उत नो वाजसातये पवस्व बृहतीरिषः । द्युमदिन्दो सुवीर्यम् ॥ ४ ॥ (ऋ. ९।१३।४)

११९१ अत्या हियाना न हेतृभिरसृग्रं वाजसातये । वि वारमव्यमाशवः ॥ ५ ॥ (ऋ. ९।१३।६)

११९२ ते नः सहस्रिणꣳ रयिं पवन्तामा सुवीर्यम् । स्वाना देवास इन्दवः ॥६॥ (ऋ. ९।१३।५)

११९३ वाश्रा अर्षन्तीन्दवोऽभि वत्सं न मातरः । दधन्विरे गभस्त्योः ॥ ७ ॥ (ऋ. ९।१३।७)

११९४ जुष्ट इन्द्राय मत्सरः पवमानः कनिक्रदत् । विश्वा अप द्विषो जहि ॥८॥ (ऋ. ९।१३।८)

---

[२] द्वितीयः खण्डः ।

[११८७] (सहस्रधारः) सहस्र धारांनीं (अति अविः) लोंकरीच्या छाननीमधून (पुनानः सोमः) गाळला जाणारा सोम (वायोः इन्द्रस्य) वायु व इन्द्र यांना पिण्यासाठीं (निष्कृतं अर्षति) पात्रामध्यें जातो. ॥ १ ॥

[११८८] हे (अवस्यवः) आपल्या संरक्षणाची इच्छा करणाऱ्या उद्गाता आदि याजकांनों ! तुम्ही (पवमानं विप्रं) शुद्ध होणाऱ्या ज्ञानी (देववीतये सुष्वाणं) देवांना पिण्यास देण्यासाठीं गाळल्या जाणाऱ्या सोमाला उद्देशून (अभि प्र गायत) मंत्रांचें गायन करा. ॥ २ ॥

[११८९] (वाजसातये) अन्नदान करण्यासाठीं (देववीतये) व देवांना देण्यासाठीं (गृणानाः) ज्याची स्तुति होत आहे, असे (सहस्र–पाजसः सोमाः) सहस्रों प्रकारचें बल वाढवणारे हे सोमरस (पवन्ते) शुद्ध केले जात आहेत. ॥ ३ ॥

[११९०] हे (इन्दो) सोमा ! (द्युमत् सुवीर्यं पवस्व) तेजस्वी उत्तम सामर्थ्य आम्हांस दे (उत) आणि (वाजसातये) अन्नदान करण्यासाठीं (बृहतीः इषः) पुष्कळ अन्न आम्हांस दे. ॥ ४ ॥

[११९१] (वाजसातये हियानाः) संग्रामासाठीं प्रेरित झालेले सोम (आशवः न) शीघ्रगामी घोड्यांप्रमाणें (हेतृभिः) ऋत्विजांच्या द्वारें (अव्यं वारं वि अति असृग्रं) लोंकरीच्या छाननींमधून टपकत आहेत. ॥ ५ ॥

[११९२] (ते स्वानाः देवासः इन्दवः) ते रस काढलेले दिव्य सोम (नः सहस्रिणं रयिं सुवीर्यं आ पवन्तां) आम्हांला सहस्र प्रकारचें धन व उत्तम सामर्थ्य देवोत. ॥ ६ ॥

[११९३] (वाश्राः इन्दवः) शब्द करणारे सोम (मातरः वत्सं न) गाय जशी वांसराकडे जाते, त्याप्रमाणें (अभि अर्षन्ति) कलशामध्यें जातात आणि (गभस्त्योः दधन्विरे) हातांनीं धारण केले जात आहेत. ॥ ७ ॥

[११९४] सोम (इन्द्राय जुष्टः) इन्द्राला दिला जातो. हे सोम ! तो तूं (मत्सरः पवमानः) आनंद देणारा गाळत असतां (कनिक्रदत्) शब्द करीत (विश्वाः द्विषः अप जहि) सर्व शत्रूंना नष्ट कर. ॥ ८ ॥

११९५ अपघ्नन्तो अराव्णः पवमानाः स्वर्दृशः । योनावृतस्य सीदत ॥ ९ ॥ ३ (दृ) ॥
[धा० ३९ । उ० ३ । स्व० ६] (ऋ. ९।१३।९)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

११९६ सोमा असृग्रमिन्दवः सुता ऋतस्य धारया । इन्द्राय मधुमत्तमाः ॥ १ ॥ (ऋ. ९।१२।१)
११९७ अभि विप्रा अनूषत गावो वत्सं न धेनवः । इन्द्रꣳ सोमस्य पीतये ॥२॥ (ऋ. ९।१२।२)
११९८ मदच्युत्क्षेति सादने सिन्धोरूर्मा विपश्चित् । सोमो गौरी अधि श्रितः ॥ ३ ॥
(ऋ. ९।१२।३)
११९९ दिवो नाभा विचक्षणोऽव्या वारे महीयते । सोमो यः सुक्रतुः कविः ॥४॥ (ऋ. ९।१२।४)
१२०० यः सोमः कलशेष्वा अन्तः पवित्र आहितः । तमिन्दुः परि षस्वजे ॥५॥ (ऋ. ९।१२।५)
१२०१ प्र वाचमिन्दुरिष्यति समुद्रस्याधि विष्टपि । जिन्वन्कोशं मधुश्चुतम् ॥६॥ (ऋ. ९।१२।६)
१२०२ नित्यस्तोत्रो वनस्पतिर्धेनामन्तः सबर्दुघाम् । हिन्वानो मानुषा युजा ॥७॥ (ऋ. ९।१२।७)

[११९५] हे (पवमानाः) सोम हो ! (अ-राव्णः अपघ्नन्तः) दान न देणाऱ्या शत्रूंचा नाश करीत (स्वः-दृशः) चमकत (ऋतस्य योनौ सीदत) तुम्ही यज्ञाच्या ठिकाणीं बसा. ॥ ९ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[११९६] (ऋतस्य सुताः) यज्ञासाठीं तयार केलेले (मधुमत्तमाः इन्दवः) अति मधुर व तेजस्वी (सोमाः) सोमरस (इन्द्राय धारया असृग्रं) इन्द्रासाठीं धारेनें गाळले जात आहेत. ॥ १ ॥

[११९७] हे (विप्राः) ऋत्विज हो ! (सोमस्य पीतये) सोम पिण्यासाठीं (इन्द्रं अभि अनूषत) इन्द्राची सेवा करा. (धेनवः गावः वत्सं न) दुधाळ गाई जशा आपल्या वासराची सेवा करतात. ॥ २ ॥

[११९८] (मदच्युत् सोमः) आनंद वाढवणारा सोम (सदने क्षेति) यज्ञशालेंत असतो. (सिन्धोः ऊर्मा विपश्चित्) नदीच्या तरंगांत जसा ज्ञानी सोम असतो तसा हा सोम (गौरी अधिश्रितः) गांधर्वीमध्यें असतो. गाळणी-मध्यें शुद्ध होत असतो. ॥ ३ ॥

[११९९] (यः) जो (सुक्रतुः कविः विचक्षणः) उत्तम यज्ञ करणारा मोठा ज्ञानी असतो तसा हा (सोमः) सोम (दिवः नाभा) अन्तरिक्षाच्या नाभीसारख्या (अव्या वारे महीयते) लोंकरीच्या छाननीच्या ठिकाणीं महत्व प्राप्त करून असतो. ॥ ४ ॥

[१२००] (यः सोमः) जो सोम (कलशेषु आ) कलशामध्यें (पवित्रे अन्तः आहितः) गाळणीच्यामध्यें ठेवलेला असतो (तं इन्दुः परिषस्वजे) त्या सोमाला जल स्पर्श करो. ॥ ५ ॥

[१२०१] (इन्दुः) सोम (मधुश्चुतं कोशं जिन्वन्) मधुर रस ज्यांत टपकत आहे त्या भांड्यांत पूर्णपणें भरला जात आहे तो (समुद्रस्य अधि विष्टपि) जलाच्या आश्रयस्थानीं (वाचं प्र इष्यति) शब्द करीत जात आहे. ॥ ६ ॥

[१२०२] (नित्य-स्तोत्रः वनस्पतिः) नित्य ज्याची स्तुति केली जाते असा वनांचा स्वामी सोम (मानुषा युजा हिन्वानः) मनुष्यांना संघटन करण्यास प्रेरणा करीत (सबर्दुघां) सर्वांना प्रियवचनें देणाऱ्याच्या (अन्तः धेनां) अन्तःकरणांत असणाऱ्या स्तुतिचा स्वीकार करो. ॥ ७ ॥

१२०३ आ पवमान धारया रयिं सहस्रवर्चसम् । अस्मे इन्दो स्वाभुवम् ॥८॥ (ऋ. ९।१२।९)

१२०४ अभि प्रिया दिवः कविर्विप्रः स धारया सुतः । सोमो हिन्वे परावति ॥ ९ ॥ ४ (मे) ॥

[धा० ४० । उ० ४ । स्व० ७] (ऋ. ९।१२।८)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

१२०५ उत्ते शुष्मास ईरते सिन्धोरूर्मेरिव स्वनः । वाणस्य चोदया पविम् ॥१॥ (ऋ. ९।५०।१)

१२०६ प्रसवे त उदीरते तिस्रो वाचो मखस्युवः । यदव्य एषि सानवि ॥ २ ॥ (ऋ. ९।५०।२)

१२०७ अव्या वारैः परि प्रियं हरिं हिन्वन्त्यद्रिभिः । पवमानं मधुश्चुतम् ॥ ३ ॥ (ऋ. ९।५०।३)

१२०८ आ पवस्व मदिन्तम पवित्रं धारया कवे । अर्कस्य योनिमासदम् ॥ ४ ॥ (ऋ. ९।५०।४)

१२०९ स पवस्व मदिन्तम गोभिरञ्जानो अक्तुभिः । एन्द्रस्य जठरं विश ॥५॥ ५ (का) ॥

[धा० ३१ । उ० १ । स्व० २] (ऋ. ९।५०।५)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

[१२०३] हे (पवमान इन्दो) शुद्ध होणाऱ्या सोमा ! (सहस्रवर्चसं स्वाभुवं) सहस्र तेजांनीं युक्त स्वतःचें घर तसेंच (रयिं) धन (अस्मे धारय) आम्हांला दे. ॥ ८ ॥

[१२०४] (कविः सुतः) ज्ञानी सोमरस (परावति विप्रः सः) श्रेष्ठ स्थानामध्यें राहणाऱ्या ज्ञान्याप्रमाणें तो आपल्या (धारया) धारेनें (दिवः प्रिया) द्युलोकांतील प्रिय स्थानांकडे (अभि हिन्वे) प्रेरणा करीत आहे. ॥ ९ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[१२०५] (सिन्धोः ऊर्मेः स्वनः इव) समुद्राच्या लाटेच्या शब्दाप्रमाणें (ते शुष्मासः उत् ईरते) तुझे वेगाचे शब्द निघत आहेत. असा तूं (वाणस्य पविं चोदय) वाण नांवाच्या वाद्याच्या शब्दाप्रमाणें शब्द कर. ॥ १ ॥

[१२०६] (ते प्रसवे) तुझी उत्पत्ति झाल्यावर (मखस्युवः तिस्रः वाचः उत् ईरते) यज्ञ करणारे ऋत्विज ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद असे तीन प्रकारचे मंत्र म्हणूं लागतात. (यत् सानवि अव्ये एषि) तेव्हां तूं उंच असलेल्या लोंकरीच्या गाळणीमध्यें जातोस. ॥ २ ॥

[१२०७] (प्रियं हरिं) प्रिय हिरव्या रंगाच्या (अद्रिभिः) पाषाणांनीं कुटलेल्या (मधुश्चुतं-पवमानं) मधुर सोमरसाला गाळणारे ऋत्विज (अव्याः वारैः परि हिन्वन्ति) मेंढीच्या लोंकरीच्या चाळणींमधून गाळतात. ॥३॥

[१२०८] (मदिन्तम कवे) हे परम हर्ष वाढवणाऱ्या सोमा ! (अर्कस्य योनिं आसदं) इन्द्राच्या पोटांत जाण्यासाठीं (पवित्रं धारया आ पवस्व) गाळणींतून धारेनें गाळला जा. ॥ ४ ॥

[१२०९] हे (मदिन्तम) आनन्द देणाऱ्या सोमा ! (अक्तुभिः गोभिः अंजानः) तेजस्वी गाईच्या दुग्धादि पदार्थांशीं मिळून (पवस्व) गाळला जा व तूं (इन्द्रस्य जठरं आ विश) इन्द्राच्या पोटांत प्रविष्ट हो. ॥ ५ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५]

१२१० अया वीती परि स्रव यस्त इन्दो मदेष्वा । अवाहन्नवतीर्नव ॥ १ ॥ (ऋ ९।६१।१)

१२११ पुरः सद्य इत्थाधिये दिवोदासाय शंबरम् । अध त्यं तुर्वशं यदुम् ॥ २ ॥ (ऋ. ९।६१।२)

१२१२ परि णो अश्वमश्वविद्गोमदिन्दो हिरण्यवत् । क्षरा सहस्रिणीरिषः ॥ ३ ॥ ६ (हि) ॥

[धा० ११ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ९।६१।३)

१२१३ अपघ्नन्पवते मृधोऽप सोमो अराव्णः । गच्छन्निन्द्रस्य निष्कृतम् ॥ १ ॥ (ऋ. ९।६१।२५)

१२१४ महो नो राय आ भर पवमान जही मृधः । रास्वेन्दो वीरवद्यशः ॥ २ ॥ (ऋ. ९।६१।२६)

१२१५ न त्वा शतं च न ह्रुतो राधो दित्सन्तमा मिनन् । यत्पुनानो मखस्यसे ॥ ३ ॥ ७ (खा) ॥

[धा० ११ । उ० २ । स्व० २] (ऋ. ९।६१।२७)

१२१६ अया पवस्व धारया यया सूर्यमरोचयः । हिन्वानो मानुषीरपः ॥ १ ॥ (ऋ. ९।६३।७)

१२१७ अयुक्त सूर एतशं पवमानो मनावधि । अन्तरिक्षेण यातवे ॥ २ ॥ (ऋ. ९।६३।८)

---

[५] पञ्चमः खण्डः ।

[१२१०] हे (इन्दो) सोमा ! (अया वीति परिस्रव) या रीतिनें इन्द्राच्या पिण्यासाठीं तूं गाळला जा. (ते यः मदेषु) तुझा हा रस संग्रामांमध्यें (नव-नवतीः अवाहन्) नव्याण्णव शत्रूंना नष्ट करतो. ॥ १ ॥

[१२११] (सद्यः पुरः) तत्काळ शत्रूच्या नगरांचा नाश हा सोम करतो. (इत्था) याप्रमाणें (धिये दिवोदासाय) यज्ञकर्त्या दिवोदासासाठीं (शंबरं) शंबरासुराला (अध त्यं तुर्वशं) आणि त्या तुर्वशाला (यदुं) व यदुला (अवाहन्) इन्द्रानें मारलें. ॥ २ ॥

[१२१२] हे (इन्दो) सोमा ! (अश्ववित्) घोडे प्राप्त करणारा तूं (नः) आम्हांला (गोमत् हिरण्यवत् अश्वं) गाई व सुवर्ण ज्याच्याबरोबर आहे अशा घोड्याला व (सहस्रिणीः इषः) अनेक प्रकारच्या अन्नाला (परि क्षर) दे. ॥ ३ ॥

[१२१३] (सोमः मृधः अपघ्नन्) सोम शत्रूंना मारून (अराव्णः अप) दान न देणाऱ्या दुष्टांना दूर करून (इन्द्रस्यः निष्कृतं गच्छन्) इन्द्राच्या स्थानाजवळ जाण्यासाठीं (पवते) गाळला जात आहे. ॥ १ ॥

[१२१४] हे (पवमान इन्दो) गाळल्या जाणाऱ्या सोमा ! (नः महः रायः आ भर) आम्हांला पुष्कळ धन भरपूर दे. (मृधः जहि) शत्रूंना मार. व (वीरवत् यशः रास्व) पुत्रांसह असलेलें यश दे. ॥ २ ॥

[१२१५] हे सोमा ! (यत् पुनानः) जेव्हां गाळला जाणारा तूं (मखस्यसे) यज्ञ करणारास धन देऊं इच्छितोस, तेव्हां (राधः दित्सन्तं त्वा) धन देऊं इच्छिणाऱ्या तुला (शतं चन-ह्रुतः) शेंकडों शत्रूहि (न आमिनन्) प्रतिबंध करूं शकत नाहींत. ॥ ३ ॥

[१२१६] हे सोमा ! (मानुषीः अपः हिन्वानः) मनुष्यांना हितकारक जल देणारा तूं (यया धारया सूर्यं अरोचयः) ज्या चमकणाऱ्या धारेनें सूर्याला प्रकाशित केलेंस (अया पवस्व) त्या धारेनें गाळला जा. ॥ १ ॥

[१२१७] (पवमानः) शुद्ध होणारा सोम (मनावधि) मनुष्याला इष्ट अशा (अन्तरिक्षेण यातवे) अन्तरिक्षाच्या मार्गानें जाण्यासाठीं (सूरः एतशं अयुक्त) सूर्याच्या एतश नामक घोड्याला त्याच्या रथाला जोडतो. ॥ २ ॥

१२१८ उत त्या हरितो रथे सूरो अयुक्त यातवे । इन्दुरिन्द्र इति ब्रुवन् ॥ ३ ॥ ८ (का) ॥
[धा० ११ । उ० १ । स्व० २] (ऋ. ९।६३।९)

॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

[६]

१२१९ अग्निं वो देवमग्निभिः सजोषा यजिष्ठं दूतमध्वरे कृणुध्वम् ।
यो मर्त्येषु निध्रुविर्ऋतावा तपुर्मूर्धा घृतान्नः पावकः ॥ १ ॥ (ऋ. ७।३।१)

१२२० प्रोथदश्वो न यवसेऽविष्यन्यदा महः संवरणाद्व्यस्थात् ।
आदस्य वातो अनु वाति शोचिरध स्म ते व्रजनं कृष्णमस्ति ॥ २ ॥ (ऋ. ७।३।२)

१२२१ उद्यस्य ते नवजातस्य वृष्णोऽग्ने चरन्त्यजरा इधानाः ।
अच्छा द्यामरुषो धूम एषि सं दूतो अग्न ईयसे हि देवान् ॥ ३ ॥ ९ (टी) ॥
[धा० १८ । उ० १ । स्व० ४] (ऋ. ७।३।३)

१२२२ तमिन्द्रं वाजयामसि महे वृत्राय हन्तवे । स वृषा वृषभो भुवत् ॥ १ ॥ (ऋ. ८।९३।७)

[१२१८] (उत इन्दुः) आणि सोम (इन्द्रः इति ब्रुवत्) इन्द्र असें म्हणत (त्या हरितः) ते घोडे (सूरः रथे) सूर्याच्या रथालाही (यातवे अयुक्त) जाण्यासाठीं जोडतो. ॥ ३ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६] षष्ठः खण्डः ।

[१२१९] हे देवांनों ! (वः) तुम्ही (यः मर्त्येषु निध्रुविः) जो मानवांमध्येंच असतो, जो (ऋतावा) यज्ञ करणारा (तपुर्मूर्धा) ज्याचें तेज तप्त करणारें आहे असा (घृतान्नः पावकः) तूप हें ज्याचें अन्न आहे व जो शुद्धता करणारा आहे, अशा (अग्निभिः सजोषाः) अनेक अग्निंसह (यजिष्ठं अग्निं देवं) परम पूज्य अग्निदेवाला (अध्वरे दूतं कृणुध्वं) हिंसारहित यज्ञामध्यें दूत करा. ॥ १ ॥

[१२२०] (यवसे अविष्यन्) गवत खात (प्रोथत् अश्वः न) खिंकाळणाऱ्या घोड्याप्रमाणें (महः संवरणात्) मोठ्या वेगानें पसरणारा दावानल (यदा व्यस्थात्) जेव्हां वृक्षांमध्यें पोंचतो, तेव्हां (आत् अस्य शोचिः) याच्या ज्वाला (अनुवातः वाति) वाऱ्याच्या अनुकूल होऊन चालतात. (अध) आणि हे अग्नि ! (ते व्रजनं कृष्णं अस्ति) तुझा मार्ग काळा असतो. ॥ २ ॥

[१२२१] हे (अग्ने) अग्ने ! (नव-जातस्य वृष्णः) नवीन उत्पन्न झालेल्या व वृष्टि करणाऱ्या (यस्य ते) ज्या तुझ्या (अजराः इधानाः उच्चरन्ति) नष्ट न होणाऱ्या प्रज्वलित ज्वाला वर येतात, तेव्हां हे (अग्ने) अग्ने ! (अरुषः धूमः दूतः) प्रकाश करणारा धूररूपी ज्याचा दूत आहे, असा तूं (द्यां अच्छ समेषि) द्युलोकामध्यें जातोस व तेथें (देवान् हि ईयसे) देवांना प्राप्त होतोस. ॥ ३ ॥

[१२२२] (महे वृत्राय हन्तवे) मोठ्या वृत्राला मारण्यासाठीं (तं इन्द्रं वाजयामसि) त्या इन्द्राला आम्हीं बलवान् बनवीत असतों. (वृषा सः वृषभः भुवत्) तो प्रथमच बलवान् असताहि अधिक बलवान् होत असतो. ॥ १ ॥

१२२३ इन्द्रः स दामने कृत ओजिष्ठः स बले हितः । द्युम्नी श्लोकी स सोम्यः ॥ २ ॥
(ऋ. ८।९३।८)

१२२४ गिरा वज्रो न सम्भृतः सबलो अनपच्युतः । ववक्ष उग्रो अस्तृतः ॥ ३ ॥ १० (छे) ॥
[धा० १७ । उ० २ । स्व० ७] (ऋ. ८।९३।९)

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

[७]

१२२५ अध्वर्यो अद्रिभिः सुतꣳ सोमं पवित्र आ नय । पुनाहीन्द्राय पातवे ॥१॥ (ऋ. ९।५१।१)

१२२६ तव त्य इन्दो अन्धसो देवा मधोर्व्याशत । पवमानस्य मरुतः ॥ २ ॥ (ऋ. ९।५१।२)

१२२७ दिवः पीयूषमुत्तमꣳ सोममिन्द्राय वज्रिणे । सुनोता मधुमत्तमम् ॥ ३ ॥ ११ (खा) ॥
[धा० ११ । उ० २ । स्व० २] (ऋ. ९।५१।३)

१२२८ धर्ता दिवः पवते कृत्व्यो रसो दक्षो देवानामनुमाद्यो नृभिः ।
हरिः सृजानो अत्यो न सत्वभिर्वृथा पाजाꣳसि कृणुषे नदीष्वा ॥ १ ॥ (ऋ. ९।७६।१)

[१२२३] (सः इन्द्रः दामने कृतः) तो इन्द्र दान देण्यासाठींच झाला आहे. (स ओजिष्ठः बले हितः) तो प्रभावशाली इन्द्र बल वाढवणाऱ्या सोमाला पिण्यासाठींच आहे. (द्युम्नीः श्लोकी स सोम्यः) तेजस्वी प्रशंसित असा तो इन्द्र सोम पिण्यास योग्य आहे. ॥ २ ॥

[१२२४] (गिरा संभृतः) स्तुतिनें प्रशंसित केलेला (वज्रः न) वज्रासारखा (सबलःअनपच्युतः) बलवान् व दुसऱ्यांनीं दाबला न जाणारा (उग्रः अ-स्तृतः) उग्रवीर व अपराजित इन्द्र (ववक्षे) धन देण्याची इच्छा करतो. ॥ ३ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

[७] सप्तमः खण्डः ।

[१२२५] हे (अध्वर्यो) अध्वर्यु ! (अद्रिभिः सुतं सोमं) दगडांनीं कुटून काढलेल्या सोमरसाला (पवित्रे आनय) गाळणीमध्यें आणून ठेव व (इन्द्राय पातवे पुनाहि) इन्द्राला पिण्यासाठीं गाळ. ॥ १ ॥

[१२१६] (त्ये देवाः मरुतः) ते देव व मरुत, हे (इन्दो) सोमा ! (तव मधोः पवमानस्य अन्धसः) तुझ्या मधुर व पवित्र अशा अन्नरूपी रसाला (वि आशत) भक्षण करतात. ॥ २ ॥

[१२२७] हे ऋत्विज हो ! (मधुमत्तमं दिवः पीयूषं) अति मधुर द्युलोकांतील अमृत (उत्तमं सोमं) अशा या उत्तम सोमाला (वज्रिणे इन्द्राय सुनोत) वज्रधारी इन्द्रासाठीं तयार करा. ॥ ३ ॥

[१२२८] (कृत्व्यः रसः) कर्तव्य करणारा हा रस (देवानां दक्षः) देवांचें बल वाढवणारा (नृभिः अनुमाद्यः) ऋत्विजांनीं प्रशंसनीय (धर्ता) सर्वांचें धारण करणारा (दिवः पवते) अन्तरिक्षांतील गाळणींमधून गाळला जात आहे. (हरिः) हा हिरव्या रंगाचा रस (सत्वभिः सृजानः) बलवान् ऋत्विजांकडून गाळला जाणारा (अत्यः न) घोड्याप्रमाणें (नदीषु) पाण्यांमध्यें (वृथा) सहजच (पाजांसि कृणुते) आपलीं बलें प्रकट करतो. ॥ १ ॥

१२२९ शूरो न धत्त आयुधा गभस्त्योः स्व३ः सिषासन्रथिरो गविष्टिषु ।
इन्द्रस्य शुष्ममीरयन्नपस्युभिरिन्दुर्हिन्वानो अज्यते मनीषिभिः ॥ २ ॥ (ऋ. ९।७६।२)

१२३० इन्द्रस्य सोम पवमान ऊर्मिणा तविष्यमाणो जठरेष्वा विश ।
प्र नः पिन्व विद्युदभ्रेव रोदसी धिया नो वाजाꣳ उप माहि शश्वतः ॥ ३ ॥ १२ (चा) ॥
[धा० २७ । उ० १ । स्व० २] (ऋ. ९।७६।३)

१२३१ यदिन्द्र प्रागपागुदङ्न्यग्वा हूयसे नृभिः ।
सिमा पुरू नृषूतो अस्यानवेऽसि प्रशर्ध तुर्वशे ॥ १ ॥ (ऋ. ८।४।१)

१२३२ यद्वा रुमे रुशमे श्यावके कृप इन्द्र मादयसे सचा ।
कण्वासस्त्वा स्तोमेभिर्ब्रह्मवाहस इन्द्रा यच्छन्त्या गहि ॥ २ ॥ १३ (कि) ॥
[धा० ११ । उ० १ । स्व० ३] (ऋ. ८।४।२)

१२३३ उभयꣳ शृणवच्च न इन्द्रो अर्वागिदं वचः ।
सत्राच्या मघवान्त्सोमपीतये धिया शविष्ठ आ गमत् ॥ १ ॥ (ऋ. ८।६१।१)

[१२२९] हा सोम ! (शूरः न) शूराप्रमाणें (गभस्त्योः आयुधा धत्ते) हातांत आयुधें धरतो. (स्वः सिषासन्) यज्ञ करूं इच्छिणारा (रथिरः गविष्टिषु) रथांत बसणाऱ्या वीराच्या गाईंची इच्छा करणारा (इन्द्रस्य शुष्मं ईरयन्) इन्द्राचें बल वाढवीत हा (इन्दुः) सोम (अपस्युभिः मनीषिभिः) यज्ञ करणाऱ्या विद्वान् ऋत्विजांकडून (हिन्वानः अज्यते) प्रेरित झालेला गाईच्या दुधांत मिसळला जातो. ॥ २ ॥

[१२३०] हे (सोम पवमान) शुद्ध होणाऱ्या सोमा ! (तविष्यमाणः) वाढविला जाणारा तूं (इन्द्रस्य जठरेषु) इन्द्राच्या पोटांत (उर्मिणा आ विश) धारेनें प्रवेश कर. (विद्युत् अभ्रा इव) वीज जशी अभ्रांना वृष्टी करावयास लावते, त्याप्रमाणें (नः रोदसी प्र पिन्व) आम्हांसाठीं द्युलोक व भूलोक यांना फलयुक्त कर. (धिया नः) कर्म करून आम्हांसाठीं (शश्वतः वाजान् उप माहि) शाश्वत अन्नें दे. ॥ ३ ॥

[१२३१] हे (इन्द्र) इन्द्रा ! (यत्) जरी तूं (प्राक्, अपाक्, उदक् वा न्यक्) पूर्व, पश्चिम, उत्तर व खालच्या दिशांमध्यें (नृभिः हूयसे) ऋत्विजांकडून सहाय्यार्थ बोलावला जातोस, तथापि (सिम) हे श्रेष्ठ इन्द्रा ! (अनवे) अनुराजासाठीं (पुरु नृषूतः असि) पुष्कळ स्तविला गेला आहेस. हे (प्रशर्ध) शत्रूचा पराभव करणाऱ्या इन्द्रा ! (तुर्वशे) तुर्वशासाठींहि तसाच स्तविला गेला आहेस. ॥ १ ॥

[१२३२] हे (इन्द्र) इन्द्रा ! (यद् वा) तसेंच (रुमे, रुशमे, श्यावके, कृपे) रुम, रुशम, श्यावक व कृप यांसाठीं (सचा मादयसे) एकाचवेळीं तूं प्रसन्न केला जात आहेस. तथापि (ब्रह्म-वाहसः) स्तुति करणारे (कण्वासः) कण्व (स्तोमेभिः) स्तोत्रांनीं तुला वश करूं इच्छितात. यासाठीं (इन्द्र) हे इन्द्रा ! (आगहि) ये. ॥ २ ॥

[१२३३] (उभयं इदं वचः) दोनही प्रकारचीं हीं स्तुतिचीं वचनें (नः अर्वाक्) आमच्या समोर (इन्द्रः शृणवत्) इन्द्र ऐकून घेवो. (मघवान् शविष्ठः) धनवान् आणि बलवान् असा तो इन्द्र (सत्राच्या धिया) आमच्या स्तुतिनें संतुष्ट होऊन (सोमपीतये आगमत्) सोमपान करण्यासाठीं आमच्याजवळ येवो. ॥ १ ॥

१२३४ तꣳ हि स्वराजं वृषभं तमोजसा धिषणे निष्टतक्षतुः ।
उतोपमानां प्रथमो नि षीदसि सोमकामꣳ हि ते मनः ॥ २ ॥ १४ (ची) ॥
[धा० १७ । उ० [illegible] । स्व० [illegible]] (ऋ. ८।६१।२)

॥ इति सप्तमः खण्डः ॥ ७ ॥

[८]

१२३५ पवस्व देव आयुषगिन्द्रं गच्छतु ते मदः । वायुमा रोह धर्मणा ॥ १ ॥ (ऋ ९।६३।२२)

१२३६ पवमान नि तोशसे रयिꣳ सोम श्रवाय्यम् । इन्दो समुद्रमा विश ॥२॥ (ऋ ९।६३।२३)

१२३७ अपघ्नन्पवसे मृधः क्रतुवित्सोम मत्सरः । नुदस्वादेवयुं जनम् ॥ ३ ॥ १५ (लि) ॥
[धा० १४ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ९।६३।२४)

१२३८ अभी नो वाजसातमं रयिमर्ष शतस्पृहम् ।
इन्दो सहस्रभर्णसं तुविद्युम्नं विभासहम् ॥ १ ॥ (ऋ. ९।९८।१)

१२३९ वयं ते अस्य राधसो वसोर्वसो पुरुस्पृहः ।
नि नेदिष्ठतमा इषः स्याम सुम्ने ते अध्रिगो ॥ २ ॥ (ऋ. ९।९८।२)

[१२३४] (धिषणे) द्युलोक व भूलोक (स्वराजं वृषभं तं हि) स्वयंप्रकाशी बलवान् अशा त्या इन्द्राला (ओजसा निष्टतक्षतुः) आपल्या बलानें प्रकट करतात (उत) आणि हे इन्द्रा ! (उपमानां प्रथमः) उपमा देण्यास योग्य अशांमध्यें पहिला तूं (निषीदसि) आपल्या स्थानावर बसतोस. (हि ते मनः सोमकामं) कारण तुझें मन सोमाची इच्छा करीत आहे. ॥ २ ॥

॥ येथें सातवा खण्ड समाप्त झाला ॥

[८] अष्टमः खण्डः ।

[१२३५] हे सोमा ! (देवः पवस्व) चमकणारा तूं गाळला जा. (ते मदः आयुषक् इन्द्रं गच्छतु) तुझा आनंददायक रस इन्द्राजवळ जावो. (धर्मणा वायुं आरोह) आपल्या शक्तिनें तूं वायुला प्राप्त हो. ॥ १ ॥

[१२३६] हे (पवमान इन्दो) शुद्ध होणाऱ्या सोमा ! तूं (श्रवाय्यं रयिं नि तोशसे) प्रशंसनीय धनासाठीं शत्रूंना पीडा देतोस, असा तूं (समुद्रं आविश) कलशामधील पाण्यांत प्रवेश कर. ॥ २ ॥

[१२३७] हे सोमा ! (मत्सरः) आनंद देणारा (क्रतुवित्) यज्ञकर्माला जाणणारा तूं (पवसे) शुद्ध होतोस आणि नंतर तूं (मृधः अपघ्नन्) शत्रूंना दूर करून (अदेवयुं जनं नुदस्व) नास्तिक मनुष्यांना दूर कर. ॥ ३ ॥

[१२३८] हे (इन्दो) तेजस्वी सोमा ! (नः) आम्हांला (वाजसातमं) बल वाढवणारें (शतस्पृहं) शेंकडों लोकांनीं प्रशंसिलेलें (सहस्रभर्णसं) हजारों माणसांचें भरणपोषण करणारें (तुविद्युम्नं) अति तेजस्वी (विभासहं) विशेष प्रकाशमान् असें (रयिं अभि अर्ष) धन दे. ॥ १ ॥

[१२३९] हे (वसो) निवासक सोमा ! (पुरुस्पृहः वसोः) अनेक ज्याची प्रशंसा करतात अशा (अस्य ते राधसः) या तुझ्या धनाजवळ (नेदिष्ठतमाः स्याम) राहणारे आम्ही व्हावें. हे (अध्रि-गो) गाईंच्याजवळ असणाऱ्या सोमा ! (ते इषः सुम्ने) तुझ्या दिलेल्या अन्नाच्या आनंदानें आम्ही सुखी असावें. ॥ २ ॥

१२४० परि स्य स्वानो अक्षरदिन्दुरव्ये मदच्युतः ।
धारा य ऊर्ध्वो अध्वरे भ्राजा न याति गव्ययुः ॥ ३ ॥ १६ (ली) ॥
[धा० १४ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ९।९८।३)

१२४१ पवस्व सोम महान्त्समुद्रः पिता देवानां विश्वाभि धाम ॥ १ ॥ (ऋ ९।१०९।४)

१२४२ शुक्रः पवस्व देवेभ्यः सोम दिवे पृथिव्यै शं च प्रजाभ्यः ॥ २ ॥ (ऋ. ९।१०९।५)

१२४३ दिवो धर्तासि शुक्रः पीयूषः सत्ये विधर्मन्वाजी पवस्व ॥ ३ ॥ १७ (हि) ॥
[धा० ११ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ९।१०९।६)

॥ इत्यष्टमः खण्डः ॥ ८ ॥

[९]

१२४४ प्रेष्ठं वो अतिथिꣳस्तुषे मित्रमिव प्रियम् । अग्ने रथं न वेद्यम् ॥ १ ॥ (ऋ. ८।८४।१)

१२४५ कविमिव प्रशꣳस्यं यं देवास इति द्विता । नि मर्त्येष्वादधुः ॥ २ ॥ (ऋ. ८।८४।२)

१२४६ त्वं यविष्ठ दाशुषो नॄꣳः पाहि शृणुही गिरः । रक्षा तोकमुत त्मना ॥३॥ १८ (यी) ॥
[धा० १२ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ८।८४।३)

[१२४०] (गव्ययुः) गाईच्या दुधाची इच्छा करणारा (ऊर्ध्वः यः) श्रेष्ठ असा हा सोम (भ्राजा न) तेजानें जसा चमकावा तसा चमकतो. (अध्वरे धारा याति) अहिंसक यज्ञामध्यें धारेनें पोंचतो. (स्वानः स्यः इन्दुः) गाळलेला असा तो सोम (मदच्युतः अव्ये परि अक्षरत्) आनंद वाढवण्यासाठीं लोंकरीच्या गाळणीमधून टपकत आहे. ॥ ३ ॥

[१२४१] हे (सोम) सोमा ! (महान् समुद्रः) मोठा रसयुक्त (पिता) पालनकर्ता तूं (देवानां विश्वा धाम) देवांचीं सर्व धामें स्वरसानें (अभि पवस्व) भरून टाक. ॥ १ ॥

[१२४२] हे (सोम) सोमा ! (शुक्रः) चमकणारा तूं (देवेभ्यः पवस्व) देवांसाठीं गाळला जा. (दिवे पृथिव्यै) द्युलोक, पृथिवी तसेंच (प्रजाभ्यः शं) प्रजाजनांना सुख मिळो. ॥ २ ॥

[१२४३] हे सोमा ! तूं (शुक्रः पीयूषः) तेजस्वी पिण्यास योग्य (दिवः धर्ता असि) द्युलोकाला धारण करणारा आहेस. (वाजी) बलवान् तूं (सत्ये) यज्ञामध्यें (विधर्मन् पवस्व) विविध कर्में करावयाच्यावेळीं गाळला जा. ॥ ३ ॥

॥ येथें आठवा खण्ड समाप्त झाला ॥

[९] नवमः खण्डः ।

[१२४४] हे (अग्ने) अग्ने ! (प्रेष्ठं अतिथिं) प्रिय अतिथिरूप (मित्रं इव प्रियं) मित्राप्रमाणें प्रिय (रथं न वेद्यं) रथाप्रमाणें धन मिळण्याचा हेतु (वः स्तुषे) अशा तुम्ही मी स्तुति करतों. ॥ १ ॥

[१२४५] (देवासः) सर्व देवांनीं (कविं इव प्रशस्यं) कविप्रमाणें प्रशंसनीय अशा (यं) ज्या अग्निला (मर्त्येषु इति) मनुष्यांमध्यें (द्विता) गार्हपत्य व आहवनीय या दोन रूपांमध्यें (न्यादधुः) स्थापन केलें. ॥ २ ॥

[१२४६] हे (यविष्ठ) सदा तरुण इन्द्रा ! (त्वं) तूं (दाशुषः नॄन् पाहि) दान करणाऱ्या माणसांचें रक्षण कर, (गिरः श्रृणुहि) स्तुति ऐक (उत त्मना तोकं रक्ष) आणि आपल्या प्रयत्नानें पुत्राचें रक्षण कर. ॥ ३ ॥

१२४७ एन्द्र नो गधि प्रिय सत्राजिदगोह्य । गिरिर्न विश्वतः पृथुः पतिर्दिवः ॥१॥ (ऋ. ८।९८।४)

१२४८ अभि हि सत्य सोमपा उभे बभूथ रोदसी । इन्द्रासि सुन्वतो वृधः पतिर्दिवः ॥ २ ॥ (ऋ. ८।९८।५)

१२४९ त्वꣳहि शश्वतीनामिन्द्र धर्ता पुरामसि । हन्ता दस्योर्मनोर्वृधः पतिर्दिवः ॥३॥ १९(फे)॥
[धा० २० । उ० २ । स्व० ७] (ऋ. ८।९८।६)

१२५० पुरां भिन्दुर्युवा कविरमितौजा अजायत ।
इन्द्रो विश्वस्य कर्मणो धर्ता वज्री पुरुष्टुतः ॥ १ ॥ (ऋ. १।११।४)

१२५१ त्वं वलस्य गोमतोऽपावरद्रिवो बिलम् । त्वां देवा अबिभ्युषस्तुज्यमानास आविषुः ॥२॥ (ऋ. १।११।५)

१२५२ इन्द्रमीशानमोजसाभि स्तोमैरनूषत ।
सहस्रं यस्य रातय उत वा सन्ति भूयसीः ॥ ३ ॥ २० (ही) ॥
[धा० ११ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. १।११।८)

॥ इति नवमः खण्डः ॥ ९ ॥
॥ इति पञ्चमप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ ५-१ ॥
॥ इति नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

[१२४७] हे (प्रिय) हित करणाऱ्या (सत्राजित्) सर्व शत्रूंना जिंकणाऱ्या आणि (अ-गोह्यः) कोणाहि पुढें न दबणाऱ्या (इन्द्र) इन्द्रा ! (गिरिः न) पर्वताप्रमाणें (विश्वतः पृथुः) सर्व प्रकारें मोठा आणि (दिवः पतिः) द्युलोकाचा स्वामी तूं (नः आगधि) आमच्याजवळ ये. ॥ १ ॥

[१२४८] (सत्य सोमपाः इन्द्र) हे सत्यपालक सोम पिणाऱ्या इन्द्रा ! तूं (उभे रोदसी) दोनही द्यु व भू या लोकांना (अभि बभूथ) आपल्या प्रभावानें आच्छादून टाकतोस. असा तूं (सुन्वतः वृधः) सोमयाग करणाराला मोठा करणारा (दिवः पतिः असि) द्युलोकाचा स्वामी आहेस. ॥ २ ॥

[१२४९] हे (इन्द्र) इन्द्रा ! (त्वं हि) तूं (शश्वतीनां पुरां धर्ता) पुष्कळ शत्रूंच्या नगरांना तोडणारा, (दस्योः हन्ता) शत्रूंचा नाश करणारा, (मनोवृधः) यज्ञ करणाऱ्या मनुष्यांच्या मनाचें बल वाढवणारा आणि (दिवः पतिः असि) असा द्युलोकाचा स्वामी आहेस. ॥ ३ ॥

[१२५०] (पुरां भिन्दुः) शत्रूंच्या नगरांचा नाश करणारा (युवा) सदा तरुण (कविः अमितौजाः) ज्ञानी व अपरिमित पराक्रमी (विश्वस्य कर्मणः धर्ता) सर्व यज्ञ कर्मांचा पोषणकर्ता (वज्री पुरुष्टुतः) वज्रधारी व पुष्कळांनीं स्तुति केली जाते असा (इन्द्रः अजायत) इन्द्र प्रकट झाला आहे. ॥ १ ॥

[१२५१] हे (अद्रिवः) वज्रधारी इन्द्रा ! (त्वं) तूं (गोमतः वलस्य) गाई चोरून नेणाऱ्या वल असुराच्या (बिलं अपावः) गुहेला फोडलेंस. तेव्हां (तुज्यमानासः देवाः) पराभूत झालेले देव (अ-बिभ्युषः) न घाबरतां (त्वां आविषुः) तुला येऊन मिळाले. ॥ २ ॥

[१२५२] स्तुति करणारे (ओजसा ईशानं इन्द्रं) सामर्थ्यानें स्वामी असलेल्या इन्द्राची (स्तोमैः अभ्यनूषत) स्तोत्रांनीं स्तुति करूं लागले. (यस्य रातयः सहस्रं) ज्याचीं दानें हजारों आहेत, (उत वा) अथवा (भूयसीः सन्ति) अधिक आहेत. ॥ ३ ॥

॥ येथें नववा खण्ड समाप्त झाला ॥
॥ इति नवमोऽध्यायः ॥

नवम अध्याय

या अध्यायामध्यें इन्द्र देवतेच्या वर्णनामध्यें इन्द्राचे हे गुण वर्णिले आहेत—

इन्द्राचे गुण

१ वृषाः [१२२२]- बलवान्.

२ वृषभः [१२२२]- सामर्थ्यवान्.

३ ओजिष्ठः [१२२३]- सामर्थ्यवान्.

४ बले-हितः [१२२३]- बलानें युक्त, बलानें हित करणारा.

५ सबलः [१२२४]- बलवान् सामर्थ्ययुक्त.

६ उग्रः [१२२४]- उग्रवीर.

७ अस्तृतः [१२२४]- अपराजित, पराजित न होणारा.

८ अनपच्युतः [१२२४]- दुसऱ्या कोणाकडूनही दाबला न जाणारा.

९ वज्रः न [१२२४]- वज्रासारखा कठिण, बलशाली.

१० वज्री [१२५०]- वज्र हें आयुध वापरणारा.

११ प्रशर्ध [१२३१]- शत्रूचा पराभव करणारा.

१२ शविष्ठः [१२३३]- सामर्थ्यवान्.

१३ स्वराट् [१२३४]- तेजस्वी, स्वतःच राज्य करणारा.

१४ सोम्यः [१२२३]- उत्तम मन ज्याचें आहे.

१५ श्लोकी [१२२३]- ज्याची प्रशंसा होत असते, प्रशंसनीय.

१६ उपमानां प्रथमः [१२३४]- उपमा देण्यास योग्य असलेल्यामध्यें पहिला.

१७ प्रियः [१२४७]- सर्वांना प्रिय.

१८ सत्राजित् [१२४७]- अनेक शत्रूंना एकदम जिंकणारा.

१९ अगोह्यः [१२४७]- जो गुप्त राहूं शकत नाहीं, जो आपल्या सामर्थ्यानें प्रसिद्ध होतो.

२० विश्वतः पृथुः [१२४८]- सर्व प्रकारांनीं मोठा.

२१ दिवः पतिः [१२४८]- द्युलोकाचा स्वामी.

२२ दामने कृतः [१२२३]- दान देण्यासाठीं प्रसिद्ध.

२३ पुरां भिन्दुः [१२५०]- शत्रूच्या नगरींना तोडणारा.

२४ युवा [१२५०]- तरुण, आयुष्य केवढेंहि झालें तरी तरुणाप्रमाणें कार्य करणारा.

२५ कविः [१२५०]- ज्ञानी, दूरदर्शी.

२६ अमितौजाः [१२५०]- अपरिमितशक्तिनें युक्त.

२७ विश्वस्य कर्मणः धर्ता [१२५०]- सर्व श्रेष्ठ कर्मं करणारा.

२८ पुरुष्टुतः [१२५०]- अनेक ज्याची स्तुति करतात.

२९ ओजसा ईशानः [१२५२]- सामर्थ्यानें शासक झालेला.

३० महे वृत्राय हन्तवे इन्द्रं वाजयामसि [१२२२] – मोठ्या वृत्राला मारण्यासाठीं त्या इन्द्राच्या बलाचें आम्ही वर्णन करीत आहों.

३१ हे इन्द्र ! प्राक्, अपाक्, उदक्, न्यक् वा नृभिः हूयसे [१२३१]- हे इन्द्रा ! तुला पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिणेमधून वीर नेते सहाय्यासाठीं बोलावतात.

३२ त्वं दाशुषः नॄन् पाहि [१२४६]- तूं दात्या नेत्यांचें व त्यांच्या पुत्रपौत्रांचें रक्षण कर.

३३ त्मना तोकं रक्ष [१२४६]- स्वतः पुत्रपौत्रांचें संरक्षण कर.

३४ हे अद्रिवः ! त्वं गोमतः वलस्य बिलं अपावः [१२५१]- हे इन्द्रा ! तूं गाई चोरून नेणाऱ्या राक्षसाची गुहा तोडलीस.

३५ तुज्यमानासः देवाः अविभ्युषः त्वां आविशुः [१२५१]- पराभूत झालेले सर्व देव न भितां तुझ्या आश्रयाला येऊन राहिले.

३६ यस्य रातयः सहस्रं, उत वा भूयसीः सन्ति [१२५२]- इन्द्राचीं दानें हजारों किंवा त्यांहून अधिकच आहेत.

३७ इन्द्रः उभे रोदसी अभि बभूथ [१२४८]- इन्द्रानें दोनही लोक आपल्या तेजानें भरून टांकले आहेत.

इन्द्राचे हे गुण या अध्यायांत वर्णिले आहेत. ते वाचकांनीं पहावे व आपणामध्यें ते गुण येतील असा प्रयत्न करावा.

इन्द्राला सोम

या इन्द्राला यज्ञ करणारे सोमरस काढून तो अर्पण करीत असतात. याविषयीं असें वर्णन केलेलें या अध्यायामध्यें दिसतें—

१ अद्रिभिः सुतं सोमं पवित्रे आनय, इन्द्राय पातवे पुनाहि [१२२५]- दगडांनीं कुटून काढलेला सोमरस गाळणीजवळ न्या व इन्द्राला पिण्यास देण्यासाठीं तो गाळून तयार करा.

२ मधुमत्तमं दिवः पीयूषं सोमं इन्द्राय सुनोत [१२२७]- अत्यंत मधुर द्युलोकांतील हें अमृत म्हणजे सोमरस इन्द्रासाठीं तयार करा.

३ तविष्यमाणः इन्द्रस्य जठरेषु ऊर्मिणा आविश [१२३०]- वाढवला जाणारा हा सोमरस इन्द्राच्या पोटांत लाटांनीं जावो, इन्द्राचें पोट त्यानें उत्तम रीतिनें भरलें जावो.

४ ते मनः सोमकामं [१२३४]-हे इन्द्रा ! तुझें मन सोमरस पिण्याची इच्छा करतें.

५ ते मदः आयुपक् इन्द्रं गच्छतु [१२३५]- हे सोमा ! तुझा आनन्द वाढवणारा रस सरळ इन्द्राजवळ जावो.

६ सखायं आ विश [११८४]- हे सोमा ! मित्ररूपी इन्द्रामध्यें तूं प्रविष्ट हो.

७ इन्द्राय जुष्टः मत्सरः पवमानः [११९४]-इन्द्राला दिला जाणारा आनंदवर्धक सोमरस शुद्ध केला जात आहे.

८ सुताः सोमाः इन्द्राय धारया असृग्रं [११९६]- सोमरस इन्द्राला देण्यासाठीं धारेनें गाळले जात आहेत.

९ इन्द्रस्य जठरं आ विश [१२०९]- हे सोमा ! इन्द्राच्या पोटांत शिर.

१० इन्द्रस्य निष्कृतं गच्छन् पवते [१२१३]- इन्द्राच्यास्थानीं पोंचण्यासाठीं सोमरस शुद्ध केला जात आहे.

याप्रमाणें सोमरस इन्द्राला दिला जाण्याचें वर्णन आहे.

देवांसाठीं सोमरस

ज्याप्रमाणें इन्द्राला सोमरस दिला जातो, त्याप्रमाणें तो अन्य देवांनाही दिला जातो. पहा—

१ महान् समुद्रः पिता देवानां विश्वा धाम अभि पवस्व [१२४१]- मोठ्या समुद्राप्रमाणें रसानें भरलेला सोम, सर्वांचा पालक देवांच्या सर्व स्थानांपर्यंत जातो, शुद्ध होऊन पोंचतो. सर्व देवांना तो मिळतो.

२ शुक्रः देवेभ्यः पवस्व [१२४२]- चमकणारा सोमरस देवांसाठीं गाळला जावो.

३ दिवे पृथिव्यै प्रजाभ्यः शं [१२४२]- द्युलोक, पृथिवी व प्रजाजनांना सुख मिळो यासाठीं हे सोमा ! तूं शुद्ध हो.

द्युलोकांतील सोम

सोम स्वर्गांत म्हणजे हिमालयाच्या उच्च शिखरावर होतो, याविषयीं असें वर्णन आहे—

१ शुक्रः पीयूषः दिवः धर्ता असि [१२४३]- हे सोमा ! तूं तेजस्वी अमृतासारखा द्युलोकांत राहणारा आहेस.

याप्रमाणें सोमवल्ली ही स्वर्गांतील आहे असें वर्णन आहे.

सोमाचे गुण

सोमाचे हे गुण या अध्यायांत वर्णिले आहेत. ते आतां पहा—

१ विप्रः [११७५]- ज्ञानी.

२ कविः [११७५]- दूरदर्शी क्रान्तदर्शी.

३ हर्यतः [११७५]- पूज्य.

४ ऋषिमनाः [११७६]- ऋषींप्रमाणें शुद्ध मनानें युक्त.

५ ऋषिकृत् [११७६] ऋषि बनवणारा.

६ स्वर्षाः [११७६]- सर्वांचें तत्त्व जाणणारा.

७ सहस्रनीथः [११७६]- सहस्र प्रकाराचे मार्ग जाणणारा.

८ महिषः [११७६]- बल वाढवणारा.

९ कवीनां पदवीः [११७६]- ज्ञान्यांचे पद ज्याला प्राप्त झालें आहे.

१० स्तुप् [११७६]- स्तुत्य.

११ विराट् [११७६]- विशेष तेजस्वी.

१२ श्येनः [११७६]- प्रशंसनीय, श्येन पक्ष्याप्रमाणें द्युलोकीं राहणारा.

१३ शकुनः [११७६]- शक्ति वाढवणारा.

१४ गोविन्दुः [११७६]- गाई प्राप्त करणारा, गाईच्या दुधांत मिसळला जाणारा.

१५ द्रप्सः [११७६]- रस स्वरूप.

१६ नृचक्षाः [११८५]- मानवांचें निरीक्षण करणारा.

१७ स्वर्विद् [११८५]- स्वर्गांत राहणारा, स्वर्गाला जाणणारा.

१८ सोमाः इन्द्रस्य वीर्यं वर्धन्तः [११७८]- सोमरस इन्द्राचें सामर्थ्य वाढवतात.

हे गुण सोमरसाचे आहेत. यांतील कांहीं गुण इन्द्राच्या गुणांसारखेच आहेत. देव सोमरस पितात, त्यानें त्यांचा उत्साह वाढतो व ते अनेक महत्त्वाचीं कार्यें करतात. हें देवांचें सामर्थ्य सोमरसपानानें वाढतें, म्हणून हे गुण सोमाचेच आहेत असें वर्णन केलें आहे.

सोम यज्ञस्थानीं बसतो

यज्ञ करणारे सोमवल्ली हिमालयाच्या शिखरावरून आणतात व सोमयाग करतात. यावेळीं सोमवल्लीही यज्ञ-मंडपांत ठेवतात, म्हणून म्हटलें आहे—

१ स्वर्दृशः ऋतस्य योनौ सीदत [११९५]- स्वर्गांत राहणारे सोम यज्ञस्थानांत येतात.

२ मदच्युतः सोमः सादने क्षेति, गौरी अधिश्रितः [११९८]- आनंद व उत्साह वाढवणारा सोम यज्ञशाळेंत असतो. गाण्यानें - सामगायनानें तो शुद्ध होत असतो. तो शुद्ध करण्याच्यावेळीं सामगायन सुरू असतें.

३ वाजी सत्ये विधर्मन् पवस्व [१२४३]- बल वाढवणारा सोम यज्ञशालेमध्यें शुद्ध होतो.

याप्रमाणें सोमाचा यज्ञशालेशीं संबंध आहे.

सोम संघटना करतो

१ नित्य-स्तोत्रः वनस्पतिः मानुषा युजा हिन्वानः [१२०२]- नित्य प्रशंसिली जाणारी सोमवल्ली मानवांची संघटना करते. मानवांना यज्ञाच्या निमित्तानें एकत्रित करते.

सोमरस पाण्यांत मिसळतात

सोमाचा रस काढल्यानंतर तो पाण्यांत मिसळून गाळतात. पहा—

१ अत्यः न नदीषु वृथा पाजांसि कृणुते [१२२८] -घोड्याप्रमाणें हा सोम नदींमध्यें सहजच आपलीं बलें प्रकट करतो. घोडा जसा पाण्यांत आपलें बल दाखवतो, त्याप्रमाणें सोम जलामध्यें मिसळला जाऊन आपली उत्साह वाढवण्याची शक्ति दाखवतो.

२ हे सोम ! समुद्रं आ विश [१२३६]-हे सोमा ! कलशामधील पाण्यांत प्रवेश कर. पाण्यांत मिसळला जा.

याप्रमाणें सोम पाण्यांत मिसळला जातो याचें वर्णन आहे.

सोमासाठीं सामगान

सोमरस गाळण्याच्यावेळीं सामगायन केलें जातें, याविषयीं असें वर्णन केलेलें आढळतें—

१ हे अवस्यवः ! पवमानं विप्रं देववीतये सुष्वाणं अभि प्रगायत [११८८]- हे आपल्या रक्षणाची इच्छा करणाऱ्या याजकांनों ! शुद्ध होणाऱ्या ज्ञानी व देवांना पिण्यास देण्यासाठीं ज्याचा रस काढला आहे अशा सोमाला उद्देशून वेदमंत्रांचें - सामांचें - गायन करा.

सोमरस काढणें, गाळणें वगैरे कार्यें होईपर्यंत सामवेदाचें गायन यज्ञमंडपांत केलें जातें, एकीकडे उद्गाते सामगायन करतात व दुसरीकडे सोमरस गाळला जात असतो.

सोम गाळला जातो

सोमाचा रस काढल्यानंतर त्यांत पाणी मिसळून तो गाळणींतून गाळला जातो. याविषयींचें वर्णन असें आहे—

१ कविः पवित्रं अत्येति [११७५]- ज्ञानी सोम गाळणींतून गाळला जातो.

२ त्वा दश क्षिपः मृजन्ति [११८१]-हे सोमा ! तुला दहा अंगुली शुद्ध करतात.

३ सहस्रधारः अत्याविः पुनानः सोमः [११८७]- हजारों धारांनीं मेंढीच्या केंसांच्या छाननीमधून सोम गाळला जातो.

४ होतृभिः अव्यं वारं वि अति असृग्रं [११९१] -ऋत्विजांकडून सोमरस मेंढीच्या केंसांच्या छाननीमधून गाळला जातो.

५ सुक्रतुः कविः सोमः दिवः नाभा अव्या वारे महीयते [११९९]- उत्तम यज्ञ करणारा ज्ञानी सोम स्वर्गाच्या नाभिस्थानीं-वरच्या कलशावरील मेंढीच्या केंसांच्या गाळणीमधून महत्त्व प्राप्त करीत असतो. गाळला जातो.

६ सोमः पवित्रे अन्तः आहितः [१२००]- सोमरस गाळणीवर ठेवला आहे.

७ इन्दुः मधुश्चुतं कोशं जिन्वन् समुद्रस्य अधि विष्टपि वाचं प्रेष्यति [१२०१]- सोमरस ठेवण्याच्या भांड्यांत पडतो तेव्हां जलाच्या कलशामध्यें तो शब्द करीत पडतो.

८ अद्रिभिः प्रियं हरिं मधुश्चुतं पवमानं अव्याः वारैः परि हिन्वति [१२०७]- दगडांनीं कुटून काढलेल्या प्रिय हिरव्या रंगाच्या सोमाच्या मधुर रसाला मेंढीच्या केंसांच्या चाळणींतून गाळतात.

९ पवित्रं धारया आ पवस्व [१२०८]- गाळणीं-मधून धारेनें गाळला जा.

१० स्वानः इन्दुः अव्ये परि अक्षरत् [१२४०]- काढलेला सोमरस मेंढीच्या केंसांच्या चाळणींतून गाळला जात आहे.

सोमरस गाईच्या दुधांत मिसळतात

सोमरस काढल्यानंतर तो पाण्यांत मिसळून गाळतात व नंतर त्यांत गाईचें दूध मिसळलें जातें. पहा—

१ मदिन्तमः अक्तुभिः गोभिः अञ्जानः पवस्व [१२०९]-हे आनंदवर्धक सोमा ! तेजस्वी गाईच्या दुधाशीं मिसळला जाऊन शुद्ध हो.

२ गव्ययुः ऊर्ध्वः यः भ्राजा न अध्वरे धारा याति [१२४०]- गाईच्या दुधाशीं मिसळला जाणारा श्रेष्ठ असा हा सोम तेजानें चमकावा, त्याप्रमाणें चमकत यज्ञामध्यें धारेनें गाळला जातो.

३ मेष्यः अति सृजानं त्वा देवेभ्यः मदाय गोभिः सं वासयामसि [११८२]- हे सोमा ! मेंढीच्या केंसांच्या चाळणींतून गाळल्यानंतर, देवांना आनंद देण्यासाठीं, तुला गाईच्या दुधामध्यें मिसळत आहों. प्रथम मेंढीच्या केंसांच्या छाननीमधून सोमरस गाळतों, त्यानंतर देवांना पिण्यास देण्यासाठीं त्यांना तो आवडावा म्हणून त्याला गाईच्या दुधा-मध्यें मिसळत आहों.

४ पुनानः कलशेषु आ, अरुषः हरिः गव्यानि वस्त्राणि परि अव्यत [११८३]– सोमरस गाळून कलशांमध्यें भरल्यानंतर तो हिरव्या रंगाचा चमकणारा सोमरस गाईच्या दुधाचीं वस्त्रें परिधान करतो. गाईच्या दुधामध्यें मिसळला जातो.

याप्रमाणें सोमरस गाईच्या दुधांत मिसळण्याचें वर्णन आहे. 'गाईचीं वस्त्रें सोम ओढतो' असें याचें आलंकारिक वर्णनही आहे. सोमरसामध्यें गाईचें दूध मिळवलें म्हणजे त्यानें गाईचें वस्त्र पांघरलें असा भाव समजावयाचा आहे. 'गाईशीं मिसळतो' असे मंत्र भागही आहेत. गाईशीं मिसळतो याचा अर्थ गाईच्या दुधाशीं मिळला जातो असा आहे. 'अंशासाठीं पूर्णाचा उपयोग' वैदिक अलंकारामध्यें पुष्कळदां दिसून येतो. 'दूध' हा अंश आहे व 'गाई' ही पूर्ण आहे. म्हणून दुधासाठीं गाईचा प्रयोग केलेला असतो. ही वैदिकपद्धतिच आहे.

सोमाचा शब्द

सोमरस गाळून कलशामध्यें भरला जातो, तेव्हां त्या कलशामध्यें भरण्याचा त्याचा शब्द होत असतो. त्याचें असें वर्णन वेदमंत्रांमध्यें आहे. पहा—

१ सिन्धोः स्वनः इव ते शुष्मासः उदीरते [१२०५] – नदीच्या किंवा समुद्राच्या लाटेचा जसा शब्द होतो, त्या प्रमाणें सोमाचे शब्द ऐकूं येतात. सोम कलशामध्यें ओततांना त्याचा शब्द होतो.

२ वाणस्य पवि चोदय [१२०५]– वाण नांवाच्या वाद्याचा जसा शब्द होतो, तसा शब्द कर.

हा शब्द कलशामध्यें ओततेवेळीं प्रवाही पदार्थाचा जसा होतो, तसला शब्द आहे.

सोम अन्न देतो

सोमरस हें एक प्रकारचें पौष्टिक व बल वाढवणारें अन्नच आहे. पहा —

१ सोम ! स्वर्विदं त्वां, वयं प्रजां इषं भक्षीमहि [११८५] - हे सोमा ! स्वर्गाला जाणणाऱ्या अशा तुला प्राप्त करून, आम्ही संतति व अन्न प्राप्त करून आनंदानें राहूं.

२ हे इन्दो ! वाजसातये बृहतीः इषः पवस्व [११९०]- हे सोमा ! आम्ही अन्नदान करावें यासाठीं पुष्कळ अन्न आम्हांला दे.

३ नः गोमत् हिरण्यवत् अश्ववित् सहस्त्रिणीः इषः परिक्षर [१२१२]– हे सोमा ! आम्हाला गाई, सोनें, घोडे व सहस्र प्रकारचें अन्न दे.

४ धिया नः शश्वतः वाजान् उपमाहि [१२३०]– कर्मे करून आम्हांला शाश्वत टिकणारें बलवर्धक अन्न दे.

५ हे अद्रिगो ! ते इषः सुम्ने [१२३९]– हे गाईला पुढें करणाऱ्या सोमा ! तुझें अन्न सुख वाढवणारें आहे. गाईला पुढें करणारा सोम म्हणजे गाईचें दूध ज्यांत मिसळलें जातें तो सोम.

गाईचें दूध सोमरसामध्यें मिळतांच, तें मिश्रण म्हणजे एक उत्तम प्रकारचें अन्नच होतें.

सोम बल वाढवतो

सोमरस गाळून व दूध मिसळून तयार झाला, म्हणजे तें मिश्रण उत्तम प्रकारचें पुष्टीकारक अन्नच तयार होतें. पहा–

१ सहस्र-पाजसः सोमाः पवन्ते [११८९]– सहस्र प्रकारची शक्ति वाढवणारे सोमरस गाळले जात आहेत.

२ द्युमत् सुवीर्यं पवस्व [११९०]– तेजस्वी उत्तम पराक्रम करण्याचें सामर्थ्य आम्हांस दे.

सोमरसरूपी जें अन्न आहे, त्यांत असें विलक्षण सामर्थ्य आहे यांत शंका नाहीं.

सोम धन व उत्तम वीर्य देतो

१ ते स्वानाः देवासः इन्दवः नः सहस्रिणं रयिं सुवीर्यं आ पवन्ताम् [११९२]– ते रस काढलेले दिव्य सोम आम्हांला सहस्रावधि प्रकारचें धन व उत्तम वीर्य देवोत.

२ हे पवमान ! सहस्रवर्चसं स्वाभुवं रयिं असे धारय [१२०३]– हे शुद्ध होणाऱ्या सोमा ! सहस्र तेजांनीं युक्त असें स्वतःचें घर व धन आम्हाला दे.

३ हे इन्दो ! नः महः रायः आभर, वीरवत् यशः रास्व [१२१४]– हे सोमा ! आम्हांला मोठें घर दे व पुत्र-पौत्रांनीं युक्त असें यश दे.

४ मखस्यसे राधः दित्सन्तं त्वा शतं चन ह्रुतः नः आमिनन् [१२१५]– यज्ञ करण्यास जेव्हां तूं धन देऊं इच्छितोस तेव्हां शेंकडों कुटिल शत्रूहि तुला प्रतिबंध करूं शकत नाहींत.

५ हे इन्दो ! नः वाजसातमं शतस्पृहं, सहस्र-भर्णसं तुविद्युम्नं विभासहं रयिं अभि अर्ष [१२३८]– हे सोमा ! आम्हांला बल देणारें, शेंकडों ज्याची प्रशंसा करतात, सहस्रावधि लोकांचें जें पोषण करतें असें तेजस्वी विशेष दीप्तिमान् धन आहे तें दे.

६ पुरुस्पृहः वसोः ते राधसः नेदिष्ठतमाः स्याम [१२३९]– पुष्कळ लोक तुझ्याजवळच्या धनाची प्रशंसा करतात, म्हणून त्या धनाजवळ आम्हीं पोंचावें.

शत्रूला दूर कर

१ विश्वाः द्विषः अप जहि [११८४-११९४]- सर्व शत्रूंना पराभूत कर.

२ पृत्सु नः सहः धाः [११८६]- लढायांमध्यें आमचें शत्रूला जिंकण्याचें सामर्थ्य आम्हांमध्यें वाढो.

३ पवमान ! अराव्णः अपघ्नन्तः [११९४]- हे सोमरस हो ! तुम्ही दान न देणाऱ्या कंजूसांना दूर करणारे आहां.

४ ते यः मदेषु नवनवतीः अवाहन् [१२१०]- तुझा हा सोमरस संग्रामांमध्यें ९९ शत्रूंचा पराभव करतो.

५ सद्यः पुरः [१२११]- तत्काल शत्रूच्या नगरीचा नाश हा करतो.

६ दिवोदासाय शम्बरं तुर्वशं यदुं अवाहन् [१२११] – दिवोदासाचें कल्याण करण्यासाठीं शंबर, तुर्वश व यदू यांना इन्द्रानें ठार मारलें.

७ सोमः मृधः अपघ्नन्, अराव्णः अप [१२१३] – सोम शत्रूंना मारतो व दान न देणाऱ्यांनाही दूर करतो.

८ मृधः जहि [१२१४]- शत्रूंना पराभूत कर.

९ शूरः न गभस्त्योः आयुधा धत्ते [१२२९]- शूराप्रमाणें हा सोम हातांमध्यें आयुधें धरतो.

१० मत्सरः क्रतुवित् मृधः अपघ्नन् [१२३७]- हा आनंद देणारा सोम कर्म करण्याचें सर्व ज्ञान जाणतो व शत्रूंना मारतो.

११ हे इन्द्र ! त्वं शश्वतीनां पुरां धर्ता, दस्योः हन्ता असि [१२४९]– हे इन्द्रा ! तूं शत्रूंच्या शाश्वत नगरींचा नाश करणारा व दुष्टांचा नाश करणारा आहेस.

याप्रमाणें या अध्यायामध्यें शत्रूंचा नाश करण्याचें वर्णन आलें आहे. हें वर्णन पाहून आपण या गुणांनीं युक्त होण्याचा बोध घेऊन विजयी व्हावें.

सुभाषितें

१ जज्ञानं हर्यतं शिशुं मृजन्ति [११७५]- नुकत्याच जन्मलेल्या पूज्य बालकाला शुद्ध करून - स्वच्छ करून - ठेवतात.

२ गणेन विप्रं शुम्भन्ति [११७५]- समूहानें मिळून ज्ञान्याची पूजा करतात. सत्कार करतात.

३ कविः गीर्भिः पवित्रं अत्येति [११७५]- कवि भाषणांनीं पवित्रतेच्या पलीकडे गेलेला आहे.

४ ऋषिमना ऋषिकृत्, सहस्रनीथः, कवीनां पदवीः महिषः तृतीयं धाम सिषासन् विराजं अनु विराजति [११७६]- ऋषिसारखें ज्याचें पवित्र मन आहे, जो ऋषिंना निर्माण करतो, जो सहस्रावधि मार्गांनीं उत्तम कार्य करतो, जो ज्ञानी या पदवीला पोंचला आहे, असा जो महान् शक्तिमान् असल्यामुळें सर्वोच्च तृतीयस्थानामध्यें राहतो, तो विशेष तेजस्वी असल्याप्रमाणें विराजत असतो.

५ चमूषद् शकुनः गोविन्दुः महिषः तुरीयं धाम विवक्ति [११७७]- समूहामध्यें सन्मानानें बसणारा, शक्तिमान्, गाई पाळणारा, चतुर्थस्थानामध्यें अर्थात् उच्चस्थानीं विराजतो.

६ एते अस्य वीर्यं वर्धन्तः [११७८]- हे वीर याचा पराक्रम वाढवतात.

७ पुनानासः चमूषदः ते नः सुवीर्यं धत्त [११७९] –ते पवित्र होणारे समूहांत सन्मानानें बसणारे तुम्ही आम्हांस उत्तम पराक्रम करण्याचें सामर्थ्य द्या.

८ पुनानः राधसे हार्दि चोदय, देवानां योनिं आसदं [११८०]- शुद्ध होऊन सिद्धि प्राप्त करण्यासाठीं लोकांच्या हृदयांना शुद्ध प्रेरणा कर, देवांच्या स्थानामध्यें मी बसलों आहें.

९ विप्राः त्वा अनु अमादिषुः [११८१]- ज्ञानी तुला आनंद देत असतात.

१० विश्वाः द्विषः अप जहि [११८४]- सर्व द्वेष करणाऱ्या शत्रूंना पराजित कर.

११ सखायं आ विश [११८४]- मित्राजवळ बैस.

१२ नृचक्षसं स्वर्विदं त्वां वयं प्रजां इषं भक्षीमहि [११८५]–मनुष्यांचें निरीक्षण करणाऱ्या आत्मज्ञानी अशा तुला प्राप्त करून, सुसन्तान व अन्न प्राप्त करून आनंदानें राहूं.

१३ पृथिव्याः अधि द्युम्नं [११८६]- पृथिवीवर तेजस्वी अन्न उत्पन्न कर.

१४ पृत्सु नः सहः धाः [११८६]- संग्रामांमध्यें उपयोगी पडेल असें शत्रूचा पराभव करण्याचें सामर्थ्य आम्हांमध्यें स्थापन कर.

१५ अवस्यवः ! पवमानं विप्रं देववीतये सुष्वाणं अभि प्रगायत [११८८]- आपल्या संरक्षणाची इच्छा करणारे हो ! शुद्ध ज्ञानी असा देवांना पिण्यास देण्यासाठीं काढलेल्या सोमरसाला उद्देशून स्तोत्रांचें गायन करा.

१६ द्युमत् सुवीर्यं पवस्व [११९०]– तेजस्वी उत्तम सामर्थ्य आम्हांस दे.

१७ नः सहस्रिणं रयिं सुवीर्यं पवन्ताम् [११९२] –आम्हांला हजारों प्रकारचें धन व उत्तम पराक्रम करण्याचें सामर्थ्य द्या.

१८ पवमानः कनिक्रदत् विश्वाः द्विषः अप जहि [११९४]– तूं शुद्ध होत व शब्द करीत असतांना सर्व शत्रूंना दूर कर.

१९ अराव्णः अपघ्नन्तः स्वर्दृशः ऋतस्य योनौ सीदत [११९५]– अनुदार शत्रूंना ठार मारून, स्वतः तेजस्वी होऊन यज्ञाच्या ठिकाणीं बसा.

२० सहस्रवर्चसं स्वाभुवं रयिं अस्मे रास्व [१२०३]– हजारों प्रकारच्या तेजांनीं युक्त घर व धन आम्हांला दे.

२१ कविः विप्रः दिवः प्रिया अभि हिन्वे [१२०४] –ज्ञानी विप्र द्युलोकांतील प्रिय स्थानांकडे प्रेरणा करीत आहे.

२२ ते मदेषु नव-नवतीः अवाहन् [१२१०]– तुझा उत्साह युद्धांमध्यें नव्याण्णव शत्रूंना ठार करतो.

२३ सद्यः पुरः [अवाहन्] [१२११]– तत्काल शत्रूच्या नगरांना यानें तोडलें.

२४ नः गोमत् हिरण्यवत् अश्ववित् सहस्रिणीः इषः परिस्रव [१२१२]– आम्हांला गाई, सोनें, घोडे यांनीं युक्त असलेलें सहस्र प्रकारचें अन्न दे.

२५ सोमः मृधः अपघ्नन् अराव्णः अप [१२१३]– सोम हिंसक व अनुदार शत्रूंचा नाश करतो.

२६ नः महः रायः आ भर, मृधः जहि, वीरवत् यशः रास्व [१२१४]– आम्हांला पुष्कळ धन भरपूर दे, शत्रूंना पराजित कर व पुत्रांसह मिळणारें यश व अन्न दे.

२७ राधः दित्सन्तं त्वा शतं चन हुतः न आमिनन् [१२१५]– धन देऊं इच्छिणाऱ्या तुला शेंकडों शत्रूसुद्धां प्रतिबंध करूं शकत नाहींत.

२८ सः वृषा वृषभः भुवत् [१२२२]– तो बलवान् अधिक बलवान् झाला आहे.

२९ स दामने कृतः [१२२३]– तो दान देण्यासाठींच झाला आहे.

३० स ओजिष्ठः बले हितः [१२२३]– तो बलशाली वीर बलाच्या कामांमध्यें ठेवला आहे, बलाच्या कार्यासाठीं हितकर आहे.

३१ गिरा सम्भृतः सबलः अनपच्युतः उग्रः अस्तृतः ववक्षे [१२२४]– वाणीनें प्रशंसित, बलवान् असल्यामुळें आपल्या कर्तव्यापासून परावृत्त न होणारा, उग्र-वीर व अपराजित असा तो इन्द्र धन देण्याची इच्छा करीत आहे.

३२ शूरः नः गभस्त्योः आयुधं धत्ते [१२२९]– शूराप्रमाणें तो हातांमध्यें आयुध धरतो.

३३ प्राक्, अपाक्, उदक् वा न्यक् नृभिः हूयसे [१२३१]– पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण दिशांमध्यें लोक तुला सहाय्यासाठीं बोलावतात.

३४ उपमानां प्रथमः निषीदसि [१२३४]– उपमा देण्यास योग्य असलेल्यामध्यें पहिला होऊन तूं आपल्या स्थानांवर बसतोस.

३५ श्रवाय्यं रयिं नितोशसे [१२३६]– प्रशंसनीय धनांसाठीं तूं शत्रूंना पीडा देतोस.

३६ पुरुस्पृहस्य वसोः राधसः नेदिष्ठतमाः स्याम [१२३९]– पुष्कळ ज्याची प्रशंसा करतात, अशा सिद्धि देणाऱ्या धनाच्या अगदीं जवळ आम्ही राहणारे व्हावें.

३७ प्रजाभ्यः शं [१२४२]– प्रजांचें कल्याण होवो.

३८ शुक्रः वाजी सत्ये विधर्मन् [१२४३]– तेजस्वी, बलवान् व सत्यमार्गानें अनेक कामें करणारा तूं आहेस.

३९ त्वं दाशुषः नॄन् पाहि [१२४६]– तूं दान देणाऱ्या माणसांचें संरक्षण कर.

४० त्मना तोकं रक्ष [१२४६]– स्वतः आपल्या प्रयत्नानें आपल्या मुलाबाळांचें रक्षण कर.

४१ सत्राजित् अगोह्यः विश्वतः पृथुः [१२४७]– सर्व शत्रूंना जिंकणारा, कोणापुढेंही न दबणारा व सर्वांत मोठा वीर तूं आहेस.

४२ शश्वतीनां पुरां धर्ता, दस्योः हन्ता, मनोः वृधः असि [१२४९]– तूं शत्रूंच्या शाश्वत नगरींना तोडणारा, शत्रूला मारणारा व मनाला बलवान् करणारा आहेस.

४३ पुरां भिन्दुः युवा कविः अमितौजाः विश्वस्य कर्मणः धर्ता वज्री पुरुष्टुतः अजायत [१२५०]– शत्रूंचीं नगरें तोडणारा, तरुण, ज्ञानी, अपरिमित शक्तिशाली, सर्व कर्मांचा धारणकर्ता, वज्रधारी व पुष्कळांनीं स्तुति करण्यास योग्य असा तूं झाला आहेस.

४४ त्वं गोमतः वलस्य बिलं अपावः [१२५१]– तूं गाई चोरणाऱ्या वल राक्षसाच्या गुहेला फोडलेंस.

४५ तुज्यमानासः देवाः अबिभ्युषः त्वां आविषुः

[१२५१]- पराभूत झालेले देव न घाबरतां तुझ्या आश्रयाला येऊन मिळाले.

४६ यस्य रातयः सहस्रं, उत वा भूयसीः सन्ति, तं ओजसा ईशानं इन्द्रं स्तोमैः अभ्यनूषत [१२५२]- ज्याचीं दानें हजारों किंवा त्याहूनही अधिक आहेत, त्या सामर्थ्यानें युक्त इन्द्राची स्तोत्रांनीं स्तुति करीत होते.

उपमा

१ जज्ञानं शिशुं न [११७५]- नवीन जन्मलेल्या मुलाला जसें स्वच्छ ठेवतात, त्याप्रमाणें (हर्यतं मरुतः मृजन्ति) पूज्य सोमाला मरुत् स्वच्छ करतात.

२ वाजसातये हियानाः आशवः न [११९१]- युद्धासाठीं तयार झालेल्या चपल घोड्यांप्रमाणें (हेतृभिः अव्यं वारं आति असृग्रं) ऋत्विजांकडून सोमरस गाळणीं-मधून गाळले जात आहेत.

३ मातरः वत्सं न [११९३]- गाई ज्याप्रमाणें आपल्या वांसराकडे जातात, त्याप्रमाणें (इन्दवः अभि अर्षन्ति) सोमरस कलशामध्यें जातात.

४ धेनवः गावः वत्सं न [११९७]- दुधाळ गाई आपल्या वांसराकडे जातात, त्याप्रमाणें (विप्राः इन्द्रं अभि अनूषत) ऋत्विज इन्द्राजवळ जातात.

५ मदच्युत् सोमः सादने क्षेति [११९८]- आनंद देणारा सोम यज्ञशाळेंत असतो, त्याप्रमाणें (सिन्धोः ऊर्मा विपश्चित्) नदीच्या पाण्यांत सोम राहतो, त्याचप्रमाणें (गौरी अधिश्रितः) गाण्यामध्यें सोम शुद्ध होत असतो.

६ सुक्रतुः कविः विचक्षणः [११९९]- उत्तम यज्ञ करणारा ज्ञानी मोठा विद्वान् असतो, त्याप्रमाणें (सोमः दिवः नाभा) सोम द्युलोकांतील उच्चस्थानीं राहतो, तसेंच (अव्या वारे महीयते) मेंढीच्या केंसांच्या गाळणी-वर महत्त्वाचें स्थान प्राप्त करतो.

७ परावति कविः विप्रः [१२०४]- जसा श्रेष्ठ स्थानामध्यें कवि व ज्ञानी राहतो, त्याप्रमाणें (धारया दिवः प्रिया अभि हिन्वे) धारेनें द्युलोकांतील प्रिय स्थानाजवळ सोम राहतो.

८ सिन्धोः ऊर्मेः स्वनः इव [१२०५]- समुद्राच्या लाटेच्या शब्दाप्रमाणें (ते शुष्मासः उदीरते) तुझ्या - सोमरसाच्या - वेगानें शब्द ऐकूं येतात.

९ प्रोथत् अश्वः न [१२२०]- खिंकाळणाऱ्या घोड्या-प्रमाणें (महः संवरणात् यदा व्यस्थात्) मोठ्या वेगानें दावानल अग्नि पसरतो.

१० वज्रः न [१२२४]- वज्रासारखा (सबलः अन-पच्युतः) बलवान् व न दबला जाणारा इन्द्र आहे.

११ अत्यः न [१२२८]- घोड्याप्रमाणें (नदीषु वृथा पाजांसि कृणुते) नदीच्या पाण्यांत सहजच आपलीं बलें दाखवतो. सोम पाण्यांत मिसळला जातो.

१२ शूरः न [१२२९]- शूराप्रमाणें (गभस्त्योः आयुधा धत्ते) सोम हातांत आयुधें धरतो.

१३ विद्युत् अभ्रा इव [१२३०]- वीज जशी अभ्रांतून वृष्टी करते, त्याप्रमाणें (रोदसी प्रपिन्वे) द्युलोक व भूलोक फल देतात.

१४ भ्राजा न [१२४०]- तेजानें जसा चमकतो, तसा सोम (अध्वरे धारा याति) यज्ञामध्यें आपल्या धारेनें जातो. तेथें जाऊन चमकतो.

१५ प्रियं मित्रं इव [१२४४]- प्रिय मित्राप्रमाणें (प्रेष्ठं अतिथिं स्तुषे) श्रेष्ठ अतिथिची मीं स्तुति करतों.

१६ रथं न वेद्यं [१२४४]- रथाप्रमाणें धन मिळवणारा अशा अतिथिची मी स्तुति करतों.

१७ कविं इव प्रशस्यं [१२४५]- कविप्रमाणें प्रशंसनीय.

१८ गिरिः न [१२४७]- पर्वताप्रमाणें (विश्वतः पृथुः) चारही बाजूंनीं मोठा असा (दिवः पतिः) द्युलोका-चा शासक इन्द्र आहे.

नवमाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
११७५	९।९६।१७	प्रतर्दनो दैवोदासिः	पवमानः सोमः	त्रिष्टुप्
११७६	९।९६।१८	प्रतर्दनो दैवोदासिः	"	"
११७७	९।९६।१९	प्रतर्दनो दैवोदासिः	"	"
११७८	९।८।१	असितः काश्यपो देवलो वा	"	गायत्री
११७९	९।८।२	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११८०	९।८।३	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११८१	९।८।४	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११८२	९।८।५	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११८३	९।८।६	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११८४	९।८।७	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११८५	९।८।९	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११८६	९।८।८	असितः काश्यपो देवलो वा	"	"
		(२)		
११८७	९।१३।१	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११८८	९।१३।२	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११८९	९।१३।३	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११९०	९।१३।४	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११९१	९।१३।६	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११९२	९।१३।५	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११९३	९।१३।७	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११९४	९।१३।८	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११९५	९।१३।९	असितः काश्यपो देवलो वा	"	"
		(३)		
११९६	९।११।१	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११९७	९।११।२	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११९८	९।११।३	असितः काश्यपो देवलो वा	"	"
११९९	९।११।४	असितः काश्यपो देवलो वा	"	"
१२००	९।११।५	असितः काश्यपो देवलो वा	"	"
१२०१	९।११।६	असितः काश्यपो देवलो वा	"	"
१२०२	९।११।७	असितः काश्यपो देवलो वा	"	"
१२०३	९।११।९	असितः काश्यपो देवलो वा	"	"
१२०४	९।११।८	असितः काश्यपो देवलो वा	"	"

*

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(४)		
११०५	९।५०।१	उचथ्य आंगिरसः	पवमानः सोमः	गायत्री
११०६	९।५०।२	उचथ्य आंगिरसः	"	"
११०७	९।५०।३	उचथ्य आंगिरसः	"	"
११०८	९।५०।४	उचथ्य आंगिरसः	"	"
११०९	९।५०।५	उचथ्य आंगिरसः	"	"
		(५)		
१११०	९।६१।१	अमहीयुरांगिरसः	"	"
११११	९।६१।२	अमहीयुरांगिरसः	"	"
१११२	९।६१।३	अमहीयुरांगिरसः	"	"
१११३	९।६१।२५	अमहीयुरांगिरसः	"	"
१११४	९।६१।२६	अमहीयुरांगिरसः	"	"
१११५	९।६१।२७	अमहीयुरांगिरसः	"	"
१११६	९।६३।७	निध्रुविः काश्यपः	"	"
१११७	९।६३।८	निध्रुविः काश्यपः	"	"
१११८	९।६३।९	निध्रुविः काश्यपः	"	"
		(६)		
१११९	७।३।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	अग्निः	त्रिष्टुप्
११२०	७।३।२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
११२१	७।३।३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
११२२	८।९३।७	सुकक्ष आंगिरसः	इन्द्रः	गायत्री
११२३	८।९३।८	सुकक्ष आंगिरसः	"	"
११२४	८।९३।९	सुकक्ष आंगिरसः	"	"
		(७)		
११२५	९।५१।१	उचथ्य आंगिरसः	पवमानः सोमः	"
११२६	९।५१।२	उचथ्य आंगिरसः	"	"
११२७	९।५१।३	उचथ्य आंगिरसः	"	"
११२८	९।७६।१	कविर्भार्गवः	"	जगती
११२९	९।७६।२	कविर्भार्गवः	"	"
११३०	९।७६।३	कविर्भार्गवः	"	"
११३१	८।४।१	देवातिथिः काण्वः	इन्द्रः	प्रगाथः-(विषमा बृहती, समा सतो बृहती)
११३२	८।४।२	देवातिथिः काण्वः	"	"
११३३	८।६१।१	भर्गः प्रागाथः	"	"
११३४	८।६१।२	भर्गः प्रागाथः	"	"

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(८)		
१२३५	९।६३।११	निध्रुविः काश्यपः	पवमानः सोमः	गायत्री
१२३६	९।६३।१३	निध्रुविः काश्यपः	,,	,,
१२३७	९।६३।१४	निध्रुविः काश्यपः	,,	,,
१२३८	९।९८।१	अम्बरीषो वार्षागिरः ऋजिश्वा भारद्वाजश्च	,,	अनुष्टुप्
१२३९	९।९८।५	अम्बरीषो वार्षागिरः ऋजिश्वा भारद्वाजश्च	,,	,,
१२४०	९।९८।३	अम्बरीषो वार्षागिरः ऋजिश्वा भारद्वाजश्च	,,	,,
१२४१	९।१०९।४	अग्नये धिष्ण्या ऐश्वराः	,,	द्विपदा विराट्
१२४२	९।१०९।५	अग्नये धिष्ण्या ऐश्वराः	,,	,,
१२४३	९।१०९।६	अग्नये धिष्ण्या ऐश्वराः	,,	,,
		(९)		
१२४४	८।८४।१	उशना काव्यः	अग्निः	गायत्री
१२४५	८।८४।२	उशना काव्यः	,,	,,
१२४६	८।८४।३	उशना काव्यः	,,	,,
१२४७	८।९८।४	नृमेध आंगिरसः	इन्द्रः	उष्णिक्
१२४८	८।९८।५	नृमेध आंगिरसः	,,	,,
१२४९	८।९८।६	नृमेध आंगिरसः	,,	,,
१२५०	१।११।४	जेता माधुच्छन्दसः	,,	अनुष्टुप्
१२५१	१।११।५	जेता माधुच्छन्दसः	,,	,,
१२५२	१।११।८	जेता माधुच्छन्दसः	,,	,,

अथ दशमोऽध्यायः ।

अथ पञ्चमप्रपाठकस्य द्वितीयोऽध्यायः ॥ ५ ॥

[१]

(१-२३) १ पराशरः शाक्त्यः; २ शुनःशेप आजीगर्तिः स देवरातः कृत्रिमो वैश्वामित्रः; ३ असितः काश्यपो देवलो वा; ४, ७, राहूगण आंगिरसः; ५ (१-४), ५ (प्रथम पादः) प्रियमेध आंगिरसः; ५ (शेषास्त्रयः पादाः) ६ (प्रथमः पादः) १४ नृमेध आंगिरसः; ६ (शेषास्त्रयः पादाः) इध्मवाहो दार्ढच्युतः; ८ पवित्र आंगिरसो वा वसिष्ठो वा उभौ वा; ९ वसिष्ठो मैत्रावरुणिः; १० वत्सः काण्वः; ११ शतं वैखानसः; १२ सप्तर्षयः (१ भरद्वाजो बार्हस्पत्यः; २ कश्यपो मारीचः; ३ गोतमो राहूगणः, ४ अत्रिर्भौमः; ५ विश्वामित्रो गाथिनः, ६ जमदग्निर्भार्गवः; ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः); १३ वसुर्भारद्वाजः; १५ भर्गः प्रागाथः; १६ भरद्वाजो बार्हस्पत्यः; १७ मनुराप्सवः; १८ अम्बरीषो वार्षागिरः ऋजिश्वा भारद्वाजश्च; १९ अग्नयो धिष्ण्या ऐश्वराः; २० अमहीयुरांगिरसः; २१ त्रिशोकः काण्वः; २२ गोतमो राहूगणः; २३ मधुच्छन्दा वैश्वामित्रः ॥ १-७, ११-१३, १६-२० पवमानः सोमः, ८ पवमानाध्येता, १०, १४-१५, २१ (२-३), २२-२३ इन्द्रः; ९ अग्निः, २१ (१) अग्नीन्द्रौ ॥ १, ९ त्रिष्टुप्; २-७, १०-११, १६, २०-२१ गायत्री; ८, १८, २३ अनुष्टुप्; १२ (१-२), १४, १५ प्रगाथः= (बृहती, सतो बृहती); १३ (३), १९ द्विपदा विराट्; १३ जगती, १७, २२ उष्णिक् ॥

१ २ ३ १ २ ३ १ २ ३ १ २ ३ १ २ ३ १ २र ३ २

१२५३ अक्रान्त्समुद्रः प्रथमे विधर्मन् जनयन्प्रजा भुवनस्य गोपाः ।

१ २ ३ २ ३ २ ३ २ ३ १ २ ३ १ २र ३ १ २र

वृषा पवित्रे अधि सानो अव्ये बृहत्सोमो वावृधे स्वानो अद्रिः ॥ १ ॥ (ऋ. ९।९७।४०)

१ २ ३ १ २ ३ २ ३ १ २ ३ १ २ ३ १ २र ३ १ २

१२५४ मत्सि वायुमिष्टये राधसे नो मत्सि मित्रावरुणा पूयमानः ।

२ ३ २ ३ १ २ ३ १ २ ३ २उ ३ १ २ ३ १ २

मत्सि शर्धो मारुतं मत्सि देवान्मत्सि द्यावापृथिवी देव सोम ॥ २ ॥ (ऋ. ९।९७।४२)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१२५३] (**समुद्रः गो-पाः**) पाण्याची वृष्टी करणारा रक्षक सोम (**प्रथमे भुवनस्य विधर्मन्**) पहिल्या भुवनाचें धारण करणाऱ्या अन्तरिक्षामध्यें (**प्रजाः जनयन् अक्रान्**) प्रजांना उत्पन्न करून सर्वांपेक्षां श्रेष्ठ झाला. (**वृषा स्वानः**) बलवर्धक अशा सोमाचा रस काढल्यानंतर (**अद्रिः सोमः**) आदरणीय असा तो सोम (**अधिसानौ अव्ये पवित्रे**) अधिक उच्च अशा लोंकरीच्या गाळणींतून (**बृहत् वावृधे**) अधिक वाढत आहे. ॥ १ ॥

] १२५४] हे (**देव सोम**) दिव्य सोमा ! (**नः इष्टये राधसे**) आम्हांला अन्न व धन प्राप्त व्हावें यासाठीं (**वायुं मत्सि**) वायुला प्रसन्न कर. (**पूयमानः**) गाळला जाणारा तूं (**मित्रावरुणा मत्सि**) मित्रावरुणांना सन्तुष्ट कर. (**मारुतं शर्द्धः मत्सि**) मरुतांच्या बलांना आनन्दित कर. (**देवान् मत्सि**) देवांना सन्तुष्ट कर. (**द्यावापृथिवी [मत्सि]**) द्युलोक व पृथिवी यांना प्रसन्न कर. ॥ २ ॥

१२५५ महत्तत्सोमो महिषश्चकारापां यद्गर्भोऽवृणीत देवान् ।
अदधादिन्द्रे पवमान ओजोऽजनयत्सूर्ये ज्योतिरिन्दुः ॥ ३ ॥ १ (टै) ॥

[धा० २८ । उ० १ । स्व० ८] (ऋ. ९।९७।१)

१२५६ एष देवो अमर्त्यः पर्णवीरिव दीयते । अभि द्रोणान्यासदम् ॥ १ ॥ (ऋ. ९।३।१)

१२५७ एष विप्रैरभिष्टुतोऽपो देवो वि गाहते । दधद्रत्नानि दाशुषे ॥ २ ॥ (ऋ. ९।३।६)

१२५८ एष विश्वानि वार्या शूरो यन्निव सत्वभिः । पवमानः सिषासति ॥ ३ ॥ (ऋ. ९।३।४)

१२५९ एष देवो रथर्यति पवमानो दिशस्यति । आविष्कृणोति वग्वनुम् ॥ ४ ॥ (ऋ. ९।३।५)

१२६० एष देवो विपन्युभिः पवमान ऋतायुभिः । हरिर्वाजाय मृज्यते ॥ ५ ॥ (ऋ. ९।३।३)

१२६१ एष देवो विपा कृतोऽति ह्वरांऽसि धावति । पवमानो अदाभ्यः ॥ ६ ॥ (ऋ. ९।३।२)

१२६२ एष दिवं वि धावति तिरो रजाꣳसि धारया । पवमानः कनिक्रदत् ॥७॥ (ऋ. ९।३।७)

[१२५५] (महिषः सोमः) मोठा पूज्य सोम (महत् तत् चकार) तें मोठें कार्य करीत आहे. (यत्) जें कार्य (अपां गर्भः) पाण्यांचा गर्भ असा हा सोम (देवान् आवृणीत) देवतांची सेवा करण्यासाठीं करीत आहे. (पवमानः) हा गाळला जाऊन त्यानें (इन्द्रे ओजः अदधात्) इन्द्रामध्यें बल वाढवलें, तसेंच या (इन्दुः) सोमानें (सूर्ये ज्योतिः अदधात्) सूर्यामध्यें तेज ठेवलें. ॥ ३ ॥

[१२५६] (एषः अमर्त्यः देवः) हा अमर देव सोम (द्रोणानि अभि आसदं) कलशांमध्यें बसण्यासाठीं (पर्णवीः इव) पक्ष्याप्रमाणें (दीयते) वेगानें जातो. ॥ १ ॥

[१२५७] (विप्रैः अभिष्टुतः) ज्ञान्यांनीं स्तविलेला (एषः देवः) हा देव सोम (दाशुषे रत्नानि दधत्) दात्याला रत्नें देत (अपः विगाहते) जलांमध्यें जात आहे. ॥ २ ॥

[१२५८] (पवमानः एषः शूरः) गाळला जाणारा हा शूर वीर सोम (विश्वानि वार्या) सर्व धनें (सत्वभिः यन्निव) आपल्या बलांच्या योगानें प्राप्त करीत (सिषासति) आम्हांला देऊं इच्छीत आहे. ॥ ३ ॥

[१२५९] (एषः पवमानः देवः) हा गाळला जाणारा दिव्य सोम (रथर्यति) यज्ञांत जाण्यासाठीं रथाची इच्छा करीत आहे. (दिशस्यति) आम्हांला इष्ट पदार्थ देऊं इच्छीत आहे व (वग्वनुं आविष्कृणोति) शब्द करीत आहे. ॥ ४ ॥

[१२६०] (एषः पवमानः देवः) हा गाळला जाणारा दिव्य सोम (ऋतायुभिः विपन्युभिः) यज्ञ करणाऱ्या ऋत्विजांनीं (हरिः) लोक घोड्याला जसा (वाजाय मृज्यते) संग्रामामध्यें जाण्यासाठीं सजवितात, त्याप्रमाणें सजविला जात आहे. ॥ ५ ॥

[१२६१] (विपा कृतः) अंगुलींनीं काढलेला आणि (अ-दाभ्यः) न दबला जाणारा (एष पवमानः देवः) हा शुद्ध होणारा दिव्य सोम (ह्वरांसि अति धावति) शत्रूंवर चाल करून जात आहे. ॥ ६ ॥

[१२६२] (धारया पवमानः एषः) धारेनें गाळला जाणारा हा सोम (कनिक्रदत्) शब्द करीत (रजांसि तिरः) शत्रूच्या लोकांचा पराभव करीत, यज्ञस्थानांतून (दिवं विधावति) जणूं काय स्वर्गालाच जातो असा दिसतो. ॥७॥

१२६३ एष दिवं व्यासरत्तिरो रजांस्यस्तृतः । पवमानः स्वध्वरः ॥ ८ ॥ (ऋ. ९।३।८)

१२६४ एष प्रत्नेन जन्मना देवो देवेभ्यः सुतः । हरिः पवित्रे अर्षति ॥ ९ ॥ (ऋ. ९।३।९)

१२६५ एष उ स्य पुरुव्रतो जज्ञानो जनयन्निषः । धारया पवते सुतः ॥ १० ॥ २ (दु) ॥

[धा० ३४ । उ० ३ । स्व० ६] (ऋ. ९।३।१०)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

१२६६ एष धिया यात्यण्व्या शूरो रथेभिराशुभिः । गच्छन्निन्द्रस्य निष्कृतम् ॥१॥ (ऋ. ९।१५।१)

१२६७ एष पुरू धियायते बृहते देवतातये । यत्रामृतास आशत ॥ २ ॥ (ऋ. ९।१५।२)

१२६८ एतं मृजन्ति मर्ज्यमुप द्रोणेष्वायवः । प्रचक्राणं महीरिषः ॥ ३ ॥ (ऋ. ९।१५।७)

१२६९ एष हितो वि नीयतेऽन्तः शुन्ध्यावता पथा । यदी तुञ्जन्ति भूर्णयः ॥४॥ (ऋ ९।१५।३)

१२७० एष रुक्मिभिरीयते वाजी शुभ्रेभिरंशुभिः । पतिः सिन्धूनां भवन् ॥५॥ (ऋ. ९।१५।५)

[१२६३] (सु-अध्वरः पवमानः एषः) उत्तम यज्ञ करणारा आणि गाळला जाणारा हा सोम (अस्तृतः) अपराजित अर्थात् विजयी होऊन (रजांसि तिरः) शत्रूच्या लोकांना नष्ट करून (दिवं व्यासरत्) स्वर्गाला जात आहे असें वाटतें. ॥ ८ ॥

[१२६४] (हरिः एषः देवः) हिरव्या रंगाचा हा दिव्य सोम (प्रत्नेन जन्मना) जन्मापासून (देवेभ्यः सुतः) देवांसाठीं तयार केलेला (पवित्रे अर्षति) गाळणींतून गाळला जात आहे. ॥ ९ ॥

[१२६५] (एष उ स्यः) हाच तो (पुरुव्रतः जज्ञानः) पुष्कळ कर्में करण्यासाठीं उत्पन्न झालेला (इषः जनयन्) अन्न उत्पन्न करीत (सुतः धारया पवते) रस धारेनें गाळला जात आहे. ॥ १० ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[१२६६] (शूरः) शूर आणि (अण्व्या) अंगुलींनीं दाबून काढलेला (एषः) हा सोम (इन्द्रस्य निष्कृतं) इन्द्राच्या स्थानाजवळ (आशुभिः रथेभिः) शीघ्रगामी रथांनीं (गच्छन्) जाण्याची इच्छा करीत (धिया याति) बुद्धिपूर्वक जातो. ॥ १ ॥

[१२६७] (एषः) हा सोम (बृहते देवतातये) मोठ्या यज्ञासाठीं (पुरू धियायते) पुष्कळ कर्में करण्याची इच्छा करीत आहे. (यत्र) ज्या यज्ञामध्यें (अमृतासः आशत) अमर देव बसतात. ॥ २ ॥

[१२६८] (आयवः) ऋत्विज (महीः इषः प्रचक्राणं) पुष्कळ अन्नें उत्पन्न करणाऱ्या (एतं मर्ज्यं) या शुद्ध होण्यास योग्य अशा सोमाला (द्रोणेषु उप मृजन्ति) कलशामध्यें गाळून ठेवतात. ॥ ३ ॥

[१२६९] (हितः एषः) हविर्धानांत ठेवलेला हा सोम (विनीयते) आहवनीय स्थानाकडे नेला जात आहे. (अन्तः शुन्ध्यावता पथा) येथें शुद्ध होण्याच्या मार्गानें (यदि भूर्णयः) अध्वर्यु आदिक (तुञ्जन्ति) त्याला देवांकडे नेतात. ॥ ५ ॥

[१२७०] (वाजी) बलवान् आणि (शुभ्रेभिः अंशुभिः) शुभ्र किरणांनीं युक्त असलेला (एषः) हा सोम (सिन्धूनां पतिः भवन्) प्रवाहित रसांचा स्वामी होऊन (रुक्मिभिः ईयते) याजकांबरोबर जातो. ॥ ६ ॥

१२७१ एष शृङ्गाणि दोधुवच्छिशीते यूथ्यो३ वृषा । नृम्णा दधान ओजसा ॥६॥ (ऋ. ९।१५।४)

१२७२ एष वसूनि पिब्दनः परुषा ययिवाँ अति । अव शादेषु गच्छति ॥७॥ (ऋ. ९।१५।६)

१२७३ एतमु त्यं दश क्षिपो हरिँ हिन्वन्ति यातवे । स्वायुधं मदिन्तमम् ॥ ८ ॥ २ (के) ॥

[धा० ११ । उ० १ । स्व० ७] (ऋ. ९।१५।८)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

१२७४ एष उ स्य वृषा रथोऽव्या वारेभिरव्यत । गच्छन्वाजँ सहस्रिणम् ॥१॥ (ऋ. ९।३८।१)

१२७५ एतं त्रितस्य योषणो हरिँ हिन्वन्त्यद्रिभिः । इन्दुमिन्द्राय पीतये ॥२॥ (ऋ. ९।३८।२)

१२७६ एष स्य मानुषीष्वा श्येनो न विक्षु सीदति । गच्छं जारो न योषितम् ॥३॥ (ऋ ९।३८।४)

१२७७ एष स्य मद्यो रसोऽव चष्टे दिवः शिशुः । य इन्दुर्वारमाविशत् ॥ ४ ॥ (ऋ. ९।३८।५)

[१२७१] (ओजसा नृम्णा दधानः) आपल्या सामर्थ्यानें धनांचें धारण करीत (एषः) हा सोम (शृंगाणि दोधुवत्) शिंगांसारख्या आपल्या किरणांना हालवतो. ज्याप्रमाणें (यूथ्यः) कळपांतील (वृषा शिशीते) बैल आपलीं शिंगें हालवतो. ॥ ६ ॥

[१२७२] (वसूनि पिब्दनः) बसणाऱ्या राक्षसांना पीडा देणारा (एषः) हा सोम (परुषा अति ययिवान्) आपल्या शक्तिनें दूर जाऊन हल्ला करतो (शादेषु अव गच्छति) व मारण्यास योग्य राक्षसांवर चालून जातो. ॥ ७ ॥

[१२७३] (सु-आयुधं) उत्तम आयुधें वापरणाऱ्या आणि (मदिन्तमं) अत्यन्त आनन्ददायक अशा (त्यं हरिं एतं उ) त्या ह्या हिरव्या रंगाच्या सोमाचा (यातवे) देवांजवळ नेण्यासाठीं (दश क्षिपः हिन्वन्ति) दहा अंगुली दाबून रस काढतात. ॥ ८ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[१२७४] (एषः) हा (रथः) रथाप्रमाणें वेगवान् आणि (वृषा स्यः बलवान् असा हा सोम (सहस्रिणं वाजं) हजारों अन्नें देण्यासाठीं (गच्छन्) कलशामध्यें प्रवेश करण्याकरितां (अव्या वारेभिः) लोकरीच्या गाळणींतून (अव्यत) जात आहे. ॥ १ ॥

[१२७५] (त्रितस्य योषणः) त्रिताच्या अंगुली (इन्द्राय पीतये) इन्द्राला प्यावयास देण्यासाठीं (एतं हरिं इन्दुं) या हिरव्या रंगाच्या सोमाला (अद्रिभिः हिन्वन्ति) दगडांनीं कुटत आहेत. ॥ २ ॥

[१२७६] (स्यः एषः) तो हा सोम (मानुषीषु विक्षु) मनुष्य प्रजाजनांमध्यें (श्येनः न) श्येन पक्ष्याप्रमाणें (योषितं गच्छन् जारः न) जसा स्त्रीजवळ तिचा जार जातो (आ सीदति) तसा जाऊन बसतो. ॥ ३ ॥

[१२७७] (दिवः शिशुः) द्युलोकाचा पुत्र (यः इन्दुः) जो सोम आहे तो (वारं आ विशत्) गाळणीमध्यें प्रवेश करतो. (एषः स्यः) तो हा सोमरूपी (मद्यः रसः अव चष्टे) आनन्द वाढवणारा रस सर्वांना पाहतो. ॥४॥

१२७८ एष स्य पीतये सुतो हरिरर्षति धर्णसिः । क्रन्दन्योनिमभि प्रियम् ॥ ५ ॥ (ऋ. ९।३८।६)

१२७९ एतं त्यꣳ हरितो दश मर्मृज्यन्ते अपस्युवः । याभिर्मदाय शुम्भते ॥ ६ ॥ ४ (बी) ॥

[धा० २९ । उ० ८ । स्व० ४] (ऋ. ९।३८।३)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

१२८० एष वाजी हितो नृभिर्विश्वविन्मनसस्पतिः । अव्यं वारं वि धावति ॥ १ ॥ (ऋ. ९।२८।१)

१२८१ एष पवित्रे अक्षरत्सोमो देवेभ्यः सुतः । विश्वा धामान्याविशन् ॥ २ ॥ (ऋ. ९।२८।२)

१२८२ एष देवः शुभायतेऽधि योनावमर्त्यः । वृत्रहा देववीतमः ॥ ३ ॥ (ऋ. ९।२८।३)

१२८३ एष वृषा कनिक्रदद्दशभिर्जामिभिर्यतः । अभि द्रोणानि धावति ॥ ४ ॥ (ऋ. ९।२८।४)

१२८४ एष सूर्यमरोचयत्पवमानो अधि द्यवि । पवित्रे मत्सरो मदः ॥ ५ ॥

(ऋ. ९।२८।५ [प्रथमः पादः]; ऋ. ९।२७।४ [त्रयः पादाः])

[१२७८] (पीतये सुतः) देवांना पिण्यास देण्यासाठीं काढलेला (हरिः धर्णसिः) हिरव्या रंगाचा व सर्वांचें धारण करणारा (स्यः एषः) तो हा सोम (प्रियं योनिं) आपल्या प्रिय अशा कलशरूपी स्थानाजवळ (क्रन्दन् अभि अर्षति) शब्द करीत जातो. ॥ ५ ॥

[१२७९] (त्यं एतत्) त्या ह्या सोमाला (दशः हरितः) दहा अंगुली (अपस्युवः मर्मृज्यन्ते) यज्ञकर्म करण्याची इच्छा करून स्वच्छ करतात. (याभिः) ज्या अंगुलींनीं (मदाय शुम्भते) इन्द्राचा आनन्द वाढावा यासाठीं सोम गाळला जात असतो. ॥ ६ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[१२८०] (वाजी) बलवान् सोम (नृभिः हितः) याजकांनीं कलशामध्यें ठेवला आहे. (विश्ववित् मनसः पतिः) सर्वज्ञ व मनाचा स्वामी असा (एषः) हा सोम (अव्यं वारं विधावति) लोंकरीच्या गाळणीकडे धांवत आहे. ॥ १ ॥

[१२८१] (देवेभ्यः सुतः एषः) देवांना देण्यासाठीं काढलेला हा सोम (पवित्र अक्षरत्) गाळणीमधून गाळला जात आहे. (विश्वा धामानि आविशन्) तो सर्व धामांमध्यें - देवांच्या शरीरांमध्यें - प्रवेश करीत आहे. ॥ २ ॥

[१२८२] (अमर्त्यः वृत्र-हा) अमर व शत्रूंचा नाश करणारा (देव-वी-तमः देवः एषः) देवांना फार आवडणारा हा दिव्य सोम (अधि योनौ शुभायते) आपल्या कलशामध्यें सुशोभित होत आहे. ॥ ३ ॥

[१२८३] (वृषा एषः) बल वाढवणारा हा सोम (कनिक्रदत्) शब्द करीत (दशभिः जामिभिः यतः) दहाही अंगुलींनीं दाबल्यानंतर (द्रोणानि अभि धावति) कलशामध्यें धांवत पोंचतो. ॥ ४ ॥

[१२८४] (पवित्रे) गाळणीमध्यें असणारा (मत्सरः मदः) आनन्द वाढवणारा आणि प्रसन्नता देणारा (एषः पवमानः) हा शुद्ध केला जाणारा सोम (द्यवि) द्युलोकांतील (सूर्यं अधि अरोचयत्) सूर्याला प्रकाशित करतो. ॥५॥

१२८५ एष सूर्येण हासते संवसानो विवस्वता । पतिर्वाचो अदाभ्यः ॥ ६ ॥ ५ (के) ॥
[धा० २६ । उ० १ । स्व० ७] (ऋ. ९।२७।५ [प्रथमः पादः]; ऋ. ९।२६।४ [त्रयः पादाः])

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

[५]

१२८६ एष कविरभिष्टुतः पवित्रे अधि तोशते । पुनानो घ्नन्नप द्विषः ॥ १ ॥ (ऋ. ९।२७।१)
१२८७ एष इन्द्राय वायवे स्वर्जित्परि षिच्यते । पवित्रे दक्षसाधनः ॥ २ ॥ (ऋ. ९।२७।२)
१२८८ एष नृभिर्वि नीयते दिवो मूर्धा वृषा सुतः । सोमो वनेषु विश्ववित् ॥ ३ ॥ (ऋ. ९।२७।३)
१२८९ एष गव्युरचिक्रदत्पवमानो हिरण्ययुः । इन्दुः सत्राजिदस्तृतः ॥ ४ ॥ (ऋ. ९।२७।४)
१२९० एष शुष्म्यसिष्यददन्तरिक्षे वृषा हरिः । पुनान इन्दुरिन्द्रमा ॥ ५ ॥ (ऋ. ९।२७।६)
१२९१ एष शुष्म्यदाभ्यः सोमः पुनानो अर्षति । देवावीरघशंसहा ॥ ६ ॥ ६ (गु) ॥
[धा० ३१ । उ० ३ । स्व० ९] (ऋ. ९।२८।६)

॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

[१२८५] (वाचः पतिः) स्तुतिचा स्वामी (अदाभ्यः एषः) न दबला जाणारा हा सोम (सं वसानः) जलादिकांत मिसळला जाण्यासाठीं (विवस्वता सूर्येण) प्रकाशमान् सूर्याकडून (हासते) सोडला जातो, भांड्यांत गाळला जातो. ॥ ६ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५] पञ्चमः खण्डः ।

[१२८६] (कविः अभिष्टुतः) कवि असल्यामुळें प्रशंसित होणारा आणि (पुनानः) गाळला जाणारा (द्विषः अपघ्नन्) शत्रूंना मारणारा (एषः) हा सोम (पवित्रे अधि तोशते) कृष्णाजिनावर कुटला जातो. ॥ १ ॥

[१२८७] (दक्ष-साधनः स्वर्जित् एषः) बल वाढवण्याचें साधन व स्वर्गाला - सुखाला - जिंकणारा हा सोम (इन्द्राय वायवे) इन्द्र व वायु यांसाठीं (पवित्रे परि षिच्यते) गाळणीमधून टपकत खालील कलशामध्यें पडतो. ॥ २ ॥

[१२८८] (दिवः मूर्धा) द्युलोकाचें शिर (वृषा सुतः) बलवान् व रसरूप (विश्ववित् एषः सोमः) सर्वज्ञ असा हा सोम (वनेषु नृभिः नीयते) काष्टपात्रांमधून ऋत्विजांकडून नेण्यांत येतो. ॥ ३ ॥

[१२८९] (गव्युः हिरण्ययुः) गोदुग्धांत मिसळणारा, सुवर्णाचा स्पर्श ज्याला होत आहे असा (इन्दुः सत्राजित्) चमकणारा व शत्रूंना जिंकणारा (अस्तृतः) अपराजित (एषः पवमानः) असा हा शुद्ध होणारा सोम (अचिक्रदत्) शब्द करीत टपकत आहे. ॥ ४ ॥

[१२९०] (वृषा हरिः) बल वाढवणारा हिरव्या रंगाचा (पुनानः इन्दुः) पवित्र होणारा व चमकणारा (शुष्मी एषः) सामर्थ्यवान् असा हा सोम (अन्तरिक्षे असिष्यदत्) गाळणीमधून टपकत आहे व (इन्द्रं आ) इन्द्राजवळ पोंचत आहे. ॥ ५ ॥

[१२९१] (देवावीः अघशंसहा) देवांचा रक्षक व पापी शत्रूंचा नाश करणारा, (अ-दाभ्यः पुनानः) न दबणारा व शुद्ध होणारा (शुष्मी एषः अर्षति) बलवान् असा हा सोम कलशामध्यें जात आहे. ॥ ६ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

*

[६]

१२९२ स सुतः पीतये वृषा सोमः पवित्रे अर्षति । विघ्नन्रक्षांऽसि देवयुः ॥ १ ॥ (ऋ ९।३७।१)

१२९३ स पवित्रे विचक्षणो हरिरर्षति धर्णसिः । अभि योनिं कनिक्रदत् ॥ २ ॥ (ऋ ९।३७।२)

१२९४ स वाजी रोचनं दिवः पवमानो वि धावति । रक्षोहा वारमव्ययम् ॥ ३ ॥ (ऋ. ९।३७।३)

१२९५ स त्रितस्याधि सानवि पवमानो अरोचयत् । जामिभिः सूर्यंऽसह ॥ ४ ॥ (ऋ. ९।३७।४)

१२९६ स वृत्रहा वृषा सुतो वरिवोविददाभ्यः । सोमो वाजमिवासरत् ॥ ५ ॥ (ऋ ९।३७।५)

१२९७ स देवः कविनेषितो३ऽभि द्रोणानि धावति । इन्दुरिन्द्राय मंऽहयन् ॥ ६ ॥ ७ (खे) ॥

[धा० २१ । उ० २ । स्व० ७] ऋ.९।३७।६)

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

[७]

१२९८ यः पावमानीरध्येत्यृषिभिः संभृतंऽरसम् ।
सर्वंऽस पूतमश्नाति स्वदितं मातरिश्वना ॥ १ ॥ (ऋ. ९।६७।३१)

---

[६] षष्ठः खण्डः ।

[१२९२] (देवयुः) देवांना प्राप्त होणारा (पीतये सुतः) इन्द्रादि देवांना पिण्यासाठीं तयार केलेला (वृषा) बल वाढवणारा (सः सोमः) तो सोम (रक्षांसि निघ्नन्) राक्षसांचा नाश करीत (पवित्रे अर्षति) गाळणीमधून खालीं येत आहे. ॥ १ ॥

[१२९३] (विचक्षणः हरिः) सर्वांना पाहणारा हिरव्या रंगाचा (धर्णसिः सः) सर्वांचें धारण करणारा तो सोम (पवित्रे) गाळणीमधून (कनिक्रदत् योनिं अभि अर्षति) शब्द करीत कलशामध्यें जात आहे. ॥ २ ॥

[१२९४] (वाजी दिवः रोचनं) बलवान्, द्युलोकांत चमकणारा (रक्षोहा पवमानः सः) राक्षसांचा नाश करणारा शुद्ध होणारा तो सोम (अव्ययं वारं विधावति) लोंकरीच्या गाळणीमधून गाळला जातो. ॥ ३ ॥

[१२९५] (सः) तो सोम (त्रितस्य अधि सानवि) त्रिताच्या मोठ्या यज्ञामध्यें (पवमानः) गाळला जात असतां (जामिभिः सह) मोठ्या तेजांनीं (सूर्यं अरोचयत्) सूर्याला प्रकाशित करता झाला. ॥ ४ ॥

[१२९६] (वृत्रहा वृषा) शत्रूला मारणारा बलवान् (सुतः) रस काढल्यानंतर (वरिवोवित्) धन देणारा (अदाभ्यः सः सोमः) न दबणारा तो सोम (वाजं इव असरत्) घोड्याप्रमाणें कलशामध्यें जात आहे. ॥ ५ ॥

[१२९७] (देवः इन्दुः सः) [द्युलोकांत] प्रकाशणारा तो सोम (कविना इषितः) अध्वर्युनें प्रेरणा केल्यानंतर (इन्द्राय मंहयन्) इन्द्राला मोठेपणा देऊन (द्रोणानि अभि धावति) कलशामध्यें जात आहे. ॥ ६ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

[७] सप्तमः खण्डः ।

[१२९८] (यः) जो (ऋषिभिः सम्भृतं रसं) ऋषिनीं एकत्र केलेल्या रसाचें-वेदमंत्रांचें-(पावमानीः) पवमानाच्या मंत्रांचें (अध्येति) अध्ययन करतो. (सः) तो (मातरिश्वना स्वदितं सर्वं) वायुनें स्वाद घेतलेल्या सर्व (पूतं अश्नाति) पवित्र अन्नाचें भक्षण करतो. ॥१ ॥

१२९९ पावमानीर्यो अध्येत्यृषिभिः संभृतꣳरसम् ।
तस्मै सरस्वती दुहे क्षीरꣳसर्पिर्मधूदकम् ॥ २ ॥ (ऋ. ९।६७।३२)

१३०० पवमानीः स्वस्त्ययनीः सुदुघा हि घृतश्चुतः ।
ऋषिभिः संभृतो रसो ब्राह्मणेष्वमृतꣳहितम् ॥ ३ ॥

१३०१ पावमानीर्दधन्तु न इमं लोकमथो अमुम् ।
कामान्त्समर्धयन्तु नो देवीर्देवैः समाहृताः ॥ ४ ॥

१३०२ येन देवाः पवित्रेणात्मानं पुनते सदा । तेन सहस्रधारेण पावमानीः पुनन्तु नः ॥ ५ ॥

१३०३ पावमानीः स्वस्त्ययनीस्ताभिर्गच्छति नान्दनम् ।
पुण्याꣳश्च भक्षान्भक्षयत्यमृतत्वं च गच्छति ॥ ६ ॥ ८ (ती) ॥

[धा० ४४ । उ० १ । स्व० ४]

॥ इति सप्तमः खण्डः ॥ ७ ॥

[१२९९] (यः ऋषिभिः संभृतं रसं) जो ऋषिंनीं एकत्र केलेल्या साररूपी (पावमानीः अध्येति) शुद्ध करणाऱ्या मंत्रांचें अध्ययन करतो, (तस्मै सरस्वती) त्याला विद्यादेवी (क्षीरं सर्पिः मधु उदकं दुहे) दूध, तूप, मध व उदक देते. ॥ २ ॥

[१३००] (पावमानीः) शुद्ध करणारे (स्वस्त्ययनीः) कल्याण करणारे (सु-दुघा) उत्तम फल देणारे (घृतश्चुतः) तुपाची वृष्टि करणारे मंत्र हे (हि ऋषिभिः संभृतः रसः) ऋषींनी एकत्र केलेले साररूपी मंत्र आहेत (ब्राह्मणेषु अमृतं हितं) वेदपाठी ब्राह्मणांमध्यें हें अमृतच ठेवलेलें आहे. ॥ ३ ॥

[१३०१] (देवैः समाहृताः पावमानीः देवीः) देवांनीं संपादन केलेल्या पवित्रता करणाऱ्या ह्या देवतारूपी ऋचा (नः) आम्हांला (इमं अथो अमुं लोकं) ह्या व त्या लोकांना (दधन्तु) देवोत व त्या लोकांमध्यें (नः कामान् समर्धयन्तु) आमचे मनोरथ सफल करोत. ॥ ४ ॥

[१३०२] (देवाः) देव (येन पवित्रेण) ज्या पवित्र साधनानें (सदा आत्मानं पुनते) सदा आपल्याला पवित्र करतात. (तेन सहस्रधारेण) त्या सहस्रावधि साधनांनीं (पावमानीः नः पुनन्तु) पवित्र करणाऱ्या या ऋचा आम्हांला पवित्र करोत. ॥ ५ ॥

[१३०३] (पावमानीः) पवित्र करणाऱ्या व (स्वस्त्ययनीः) कल्याण करणाऱ्या या ऋचा आहेत. (ताभिः नान्दनं गच्छति) त्या ऋचांच्या योगानें उपासकाला आनन्दपूर्ण स्थान प्राप्त होतें. तो (पुण्यान् भक्षान् च भक्षयति) पवित्र अन्न खातो (अमृतत्वं च गच्छति) अमरत्वाला पोंचतो. ॥ ६ ॥

॥ येथें सातवा खण्ड समाप्त झाला ॥

[८]

१३०४ अगन्म महा नमसा यविष्ठं यो दीदाय समिद्धः स्वे दुरोणे ।
चित्रभानु२ँरोदसी अन्तरुर्वी स्वाहुतं विश्वतः प्रत्यञ्चम् ॥ १ ॥ (ऋ. ७।१२।१)

१३०५ स मह्ना विश्वा दुरितानि साह्वानग्निः ष्टवे दम आ जातवेदाः ।
स नो रक्षिषद्दुरितादवद्यादस्मान्गृणत उत नो मघोनः ॥ २ ॥ (ऋ. ७।१२।२)

१३०६ त्वं वरुण उत मित्रो अग्ने त्वां वर्धन्ति मतिभिर्वसिष्ठाः ।
त्वे वसु सुषणनानि सन्तु यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ॥ ३ ॥ ९ (ही) ॥
[धा० २१ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ७।१२।३)

१३०७ महा२ँइन्द्रो य ओजसा पर्जन्यो वृष्टिमा२ँइव । स्तोमैर्वत्सस्य वावृधे ॥ १ ॥ (ऋ ८।६।१)

१३०८ कण्वा इन्द्रं यदक्रत स्तोमैर्यज्ञस्य साधनम् । जामि ब्रुवत आयुधा ॥ २ ॥ (ऋ. ८।६।३)

---

[८] अष्टमः खण्डः ।

[१३०४] (यः स्वे दुरोणे) जो आपल्या यज्ञस्थानामध्यें (समिद्धः दीदाय) अग्निला उत्तम रीतिनें प्रदीप्त करतो. त्या (यविष्ठं) तरुण (ऊर्वी रोदसी अन्तः चित्रभानुं) त्या विशाल द्यावापृथिवीमध्यें विशेष प्रकाशमान् (स्वाहुतं) उत्तम रीतिनें आहुति दिलेल्या (विश्वतः प्रत्यंचं) सर्वत्र गमन करणाऱ्या अग्निजवळ (महा नमसा अगन्म) आम्हीं मोठे नमस्कार करीत जात आहों. ॥ १ ॥

[१३०५] (मह्ना) आपल्या महान् प्रभावानें (विश्वा दुरितानि साह्वान्) सर्व पापांना दूर करणारा (जातवेदाः सः अग्निः) ज्ञानाचा प्रसार करणारा तो अग्नि (दमे आ स्तवे) यज्ञशालेमध्यें स्तविला जात आहे. (सः गृणतः नः) तो स्तुति करणाऱ्या आम्हांला (दुरितात् अवद्यात् रक्षिषत्) पापापासून व निंदित कर्मांपासून सुरक्षित ठेवतो (उत मघोनः अस्मान्) आणि हवि जवळ बाळगणाऱ्या आमचें रक्षण करतो. ॥ २ ॥

[११०६] हे (अग्ने) अग्ने ! (त्वं वरुणः उत मित्रः) तूं वरुण व मित्र आहेस. (वसिष्ठाः त्वां मतिभिः वर्धन्ति) जितेंद्रिय ऋषि तुला बुद्धिपूर्वक केलेल्या स्तुतिंनीं संवर्धित करतात. (त्वे वसु) तुझ्याजवळ जीं धनें आहेत तीं (सुषणनानि सन्तु) आम्हांला स्वीकारण्यास योग्य होवोत. (यूयं) तुम्ही (नः) आम्हांला (सदा स्वस्तिभिः पात) सदोदित कल्याण करणाऱ्या साधनांनीं सुरक्षित करा. ॥ ३ ॥

[१३०७] (यः इन्द्रः) जो इन्द्र (वृष्टिमान् पर्जन्यः इव) वृष्टि करणाऱ्या मेघाप्रमाणें (तेजसा महान्) आपल्या तेजानें मोठा आहे. तो इन्द्र (वत्सस्य स्तोमैः वावृधे) वत्साच्या स्तोत्रांनीं वाढत आहे. इन्द्राचें यश वाढतें. ॥१॥

[१३०८] (यत्) जेव्हां (कण्वाः) कण्वांनीं (इन्द्रं) इन्द्राला (स्तोमैः यज्ञस्य साधनं अक्रत) स्तोत्रांनीं यज्ञाचें साधन केलें तेव्हां (आयुधा जामि ब्रुवत) आयुधांचें - युद्धाचें कारण उरलें नाहीं असें लोक म्हणूं लागले. ॥ २ ॥

१३०९ प्रजामृतस्य पिप्रतः प्र यद्भरन्त वह्नयः । विप्रा ऋतस्य वाहसा ॥ ३ ॥ १० (टि) ॥

[धा० ८ । उ० १ । स्व० ३] (ऋ. ८।६।२)

॥ इत्यष्टमः खण्डः ॥ ८ ॥

[९]

१३१० पवमानस्य जिघ्नतो हरेश्चन्द्रा असृक्षत । जीरा अजिरशोचिषः ॥ १ ॥ (ऋ. ९।६६।२५)

१३११ पवमानो रथीतमः शुभ्रेभिः शुभ्रशस्तमः । हरिश्चन्द्रो मरुद्गणः ॥ २ ॥ (ऋ. ९।६६।२६)

१३१२ पवमान व्यश्नुहि रश्मिभिर्वाजसातमः । दधत्स्तोत्रे सुवीर्यम् ॥ ३ ॥ ११ (हु) ॥

[धा० ११ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ९।६६।२७)

१३१३ परीतो षिञ्चता सुतꣳ सोमो य उत्तमꣳ हविः ।
दधन्वाꣳ यो नर्यो अप्स्वऽन्तरा सुषाव सोममद्रिभिः ॥ १ ॥ (ऋ. ९।१०७।१)

१३१४ नूनं पुनानोऽविभिः परि स्रवादब्धः सुरभिंतरः ।
सुते चित्वाप्सु मदामो अंधसा श्रीणन्तो गोभिरुत्तरम् ॥ २ ॥ (ऋ. ९।१०७।२)

[१३०९] (यत्) जेव्हां (पिप्रतः वह्नयः) आकाशाला आपल्या वेगानें भरून टाकणारे वाहनरूपी घोडे (ऋतस्य प्रजां) यज्ञामध्यें जाण्यासाठीं तयार झालेल्या इन्द्राला (प्र भरन्त) वेगानें घेऊन जातात. तेव्हां (विप्राः) ऋत्विज (ऋतस्य वाहसा) यज्ञाला प्रेरणा करणाऱ्या स्तोत्रांनीं त्याची स्तुति करूं लागतात. ॥ ३ ॥

॥ येथें आठवा खण्ड समाप्त झाला ॥

[९] नवमः खण्डः ।

[१३१०] (जिघ्नतः) शत्रूचा नाश करणाऱ्या (हरेः अजिरशोचिषः) हिरव्या रंगाच्या व सर्वत्र ज्याचें तेज पसरत आहे अशा (पवमानस्य) गाळल्या जाणाऱ्या सोमाच्या (चन्द्राः जीराः असृक्षत) तेजस्वी धारा चालल्या आहेत. ॥ १ ॥

[१३११] (रथीतमः) उत्तम रथांत बसणारा (शुभ्रेभिः शुभ्रशस्तमः) स्वतःच्या तेजांनीं अधिक तेजस्वी (हरिः चन्द्रः) हिरव्या रंगाचें ज्याचें तेज आहे, (मरुद्गणः पवमानः) मरुतांचें सहाय्य ज्याला मिळतें असा हा गाळला जाणारा सोम आहे. ॥ २ ॥

[१३१२] हे (पवमान) शुद्ध होत असलेला सोमा ! (वाजसातमः) पुष्कळ अन्न व बल देणारा तूं (स्तोत्रे सुवीर्यं दधत्) स्तुति करणाऱ्याला उत्तम वीर पुत्र अथवा उत्तम पराक्रम करणाऱ्याचें सामर्थ्य देत (रश्मिभिः व्यश्नुहि) आपल्या किरणांनीं जगताला व्यापून टाक. ॥ ३ ॥

[१३१३] (यः सोमः) जो सोम (उत्तमं हविः) उत्तम हवि आहे, तसेंच (यः नर्यः आ) जो मानवाचें हित करणारा आहे. तो (अप्सु अन्तः दधन्वान्) पाण्यांत मिसळला जात आहे. (सोमः अद्रिभिः सुषाव) त्या सोमाचा अध्वर्यूंनीं दगडांनीं कुटून रस काढला आहे. त्या (सुतं) सोमरसाला (इतः परि षिंचत) येथून वर नेऊन सिंचन करा. ॥ १ ॥

[१३१४] हे सोमा ! (अ-दब्धः) न दबला जाणारा (सुरभिन्तरः) अत्यन्त सुगंधित (नूनं पुनानः) आतां शुद्ध होत असलेला तूं (अविभिः परिस्रव) लोंकरीच्या गाळणींतून गाळला जा. (सुते चित्) गाळल्यानंतर (अन्धसा गोभिः श्रीणन्तः) अन्न व गोदुग्ध यांशीं मिळवून (उत्तरं अप्सु त्वा मदामः) नंतर तुला पाण्यांत मिसळून प्रसन्न करूं. ॥ २ ॥

१३१५ परि स्वानश्चक्षसे देवमादनः क्रतुरिन्दुर्विचक्षणः ॥ ३ ॥ १२ (खा) ॥
[धा० १६ । उ० २ । स्व ७] (ऋ ९।१०७।३)

१३१६ असावि सोमो अरुषो वृषा हरी राजेव दस्मो अभि गा अचिक्रदत् ।
पुनानो वारमत्येष्यव्ययं श्येनो न योनिं घृतवन्तमासदत् ॥ १ ॥ (ऋ ९।८२।१)

१३१७ पर्जन्यः पिता महिषस्य पर्णिनो नाभा पृथिव्या गिरिषु क्षयं दधे ।
स्वसार आपो अभि गा उदासरन्त्सं ग्रावभिर्वसते वीते अध्वरे ॥ २ ॥ (ऋ. ९।८२।३)

१३१८ कविर्वेधस्या पर्येषि माहिनमत्यो न मृष्टो अभि वाजमर्षसि ।
अपसेधन् दुरिता सोम नो मृड घृता वसानः परि यासि निर्णिजम् ॥ ३ ॥ १३ (गू) ॥
[धा० २६ । उ० ३ । स्व० ६] (ऋ. ९।८२।२)

॥ इति नवमः खण्डः ॥ ९ ॥

[१०]

१३१९ श्रायन्त इव सूर्यं विश्वेदिन्द्रस्य भक्षत ।
वसूनि जातो जनिमान्योजसा प्रति भागं न दीधिमः ॥ १ ॥ (ऋ. ८।९९।३)

[१३१५] (देवमादनः क्रतुः) देवांना आनन्द देणारा, यज्ञाचें साधन असलेला (इन्दुः विचक्षणः) तेजस्वी व ज्ञानी असा (स्वानः) हा सोम (चक्षसे परि) सर्वांचें निरीक्षण करण्यासाठीं कलशामध्यें उतरो. ॥ ३ ॥

[१३१६] (अरुषः वृषा) तेजस्वी व बल वाढवणारा (हरिः सोमः असावि) हिरव्या रंगाचा सोम शुद्ध केला आहे. हा (राजा इव दस्मः) राजाप्रमाणें दर्शनीय आहे. (गाः अभि अचिक्रदत्) गाईंना पाहून शब्द करूं लागतो- गाईंच्या दुधांत मिसळल्यानंतर शब्द करतो आणि (पुनानः अव्ययं वारं अत्येषि) पवित्र होणारा तो सोम मेंढीच्या लोंकरीच्या गाळणींतून गाळला जातो. (श्येनः न) श्येन पक्ष्याप्रमाणें (घृतवन्तं योनिं आसदत्) जल असलेल्या कलशामध्यें जाऊन पोंचतो. ॥ १ ॥

[१३१७] (महिषस्य पर्णिनः पर्जन्यः पिता) मोठ्या पानांच्या सोमाला उत्पन्न करणारा पर्जन्य आहे. तो (पृथिव्याः नाभा गिरिषु क्षयं दधे) पृथिवीवरील नाभिस्थानीं असलेल्या पर्वतांमध्यें राहण्याचें स्थान करतो. (स्वसारः आपः गाः) अंगुली, जल व गाई या (अभिः उदासरन्) त्याच्यासमोर येतात. (वीते अध्वरे) श्रेष्ठ यज्ञामध्यें (ग्रावभिः सं वसते) दगडांबरोबर तो मिळून राहतो. ॥ २ ॥

[१३१८] हे (सोम) सोमा ! (कविः) हा ज्ञानी सोम (वेधस्या माहिनं पर्येषि) यज्ञ करण्याच्या इच्छेनें गाळणीवर जातो. (मृष्टः) शुद्ध केल्यानंतर (अत्यः न) घोड्याप्रमाणें (वाजं अभ्यर्षसि) संग्रामामध्यें जातो. हे सोमा ! (दुरिता अपसेधन्) पापांना दूर करीत (नः मृड) आम्हांला सुखी कर. (घृता वसानः निर्णिजं परि यासि) तूं जलामध्यें मिसळल्यानंतर गाळणीमध्यें जातोस. ॥ ३ ॥

॥ येथें नववा खण्ड समाप्त झाला ॥

[१०] दशमः खण्डः ।

[१३१९] हे पुरुषानों ! (श्रायन्तः सूर्यं इव) सूर्याचा आश्रय करणारीं किरणें ज्याप्रमाणें सूर्याचा आधार घेतात, त्याप्रमाणें (विश्वा इत् इन्द्रस्य भक्षत) सर्व धनें इन्द्राच्या आश्रयानें असतात. (जातः) प्रकट झालेला इन्द्र (वसूनि ओजसा जनिमानि) ज्या धनांना आपल्या सामर्थ्यानें प्रकट करतो त्या धनांचा (भागं न प्रति दीधिमः) आम्ही पितरांकडून प्राप्त होणाऱ्या धनाप्रमाणें धारण करतों. ॥ १ ॥

१३२० अलर्षिरातिं वसुदामुप स्तुहि भद्रा इन्द्रस्य रातयः ।
यो अस्य कामं विधतो न रोषति मनो दानाय चोदयन् ॥ २ ॥ १४ (लू) ॥
[धा १९ । उ० नास्ति । स्व० ६] (ऋ. ८।९९।४)

१३२१ यत इन्द्र भयामहे ततो नो अभयं कृधि ।
मघवन् छग्धि तव तन्न ऊतये वि द्विषो वि मृधो जहि ॥ १ ॥ (ऋ. ८।६१।१३)

१३२२ त्वꣳ हि राधसस्पते राधसो महः क्षयस्यासि विधर्ता ।
तं त्वा वयं मघवन्निन्द्र गिर्वणः सुतावन्तो हवामहे ॥ २ ॥ १५ (बा) ॥
[धा० २० । उ० ३ । स्व० २] (ऋ. ८।६१।१४)

॥ इति दशमः खण्डः ॥ १० ॥

[११]

१३२३ त्वꣳ सोमासि धारयुर्मन्द्र ओजिष्ठो अध्वरे । पवस्व मꣳहयद्रयिः ॥ १ ॥ (ऋ. ९।६७।१)

१३२४ त्वꣳ सुतो मदिन्तमो दधन्वान्मत्सरिन्तमः । इन्दुः सत्राजिदस्तृतः ॥२॥ (ऋ. ९।६७।२)

[१३२०] (अलर्षिरातिं वसुदां उप स्तुहि) निष्पाप पुरुषांना धन देणाऱ्या व भक्तांना धन देणाऱ्या इन्द्राची स्तुति करा. कारण (इन्द्रस्य रातयः भद्राः) इन्द्राचीं दानें कल्याण करणारीं असतात. (यः मनः चोदयन्) जो इन्द्र आपल्या मनाला दान देण्याची प्रेरणा करतो व (विधतः अस्य कामं न रोषति) तो उपासना करणाऱ्या या यजमानाची इच्छा नष्ट करीत नाहीं. ॥ २ ॥

[१३२१] हे (इन्द्र) इन्द्रा ! (यतः भयामहे) ज्या दुष्टांना आम्ही भीत आहों (ततः नः अभयं कृधि) त्यांपासून आम्हांला निर्भय कर. हे (मघवन्) धनवान् इन्द्रा ! (नः तत् तव ऊतये शग्धि) आम्हांला त्या तुझ्या रक्षणानें सुरक्षित करण्यास तूं समर्थ हो. (द्विषः विजहि) द्वेष करणाऱ्यांचा पराभव कर, तसेंच (मृधः वि) आमच्या शत्रूंचा पराभव कर. ॥ १ ॥

[१३२२] हे (राधसस्पते) धनपते इन्द्रा ! (त्वं हि) तूं खरोखर (महः राधसः क्षयस्य) मोठ्या धनाच्या स्थानाचा (विधर्ता असि) विशेष रीतिनें धारण करणारा आहेस. हे (गिर्वणः मघवन् इन्द्र) स्तुत्य धनवान् इन्द्रा ! (तं त्वा) त्या तुला आम्ही (सुतावन्तः वयं हवामहे) सोमरस काढून बोलावीत आहों. ॥ २ ॥

॥ येथें दहावा खण्ड समाप्त झाला ॥

[११] एकादशः खण्डः ।

[१३२३] हे (सोम) सोमा ! (मन्द्रः ओजिष्ठः) आनंद वाढवणारा व महा सामर्थ्यवान् असा तूं (अध्वरे धारयुः असि) हिंसारहित यज्ञामध्यें सोमरसाच्या धारांनींयुक्त होत असतोस. यासाठीं (मंहयत् रयिः त्वं पवस्व) धन देणारा असा तूं शुद्ध हो. ॥ १ ॥

[१३२४] हे सोमा ! (सुतः) काढलेला असा (त्वं मदिन्तमः) तूं अत्यंत आनन्द वाढवणारा (दधन्वान्) सर्व यज्ञाचें धारण करणारा (मत्सरिन्तमः इन्दुः) परम उत्साह वाढवणारा व चमकणारा (सत्राजित् अस्तृतः) सर्व शत्रूंना जिंकणारा व पराजित न होणारा असा आहेस. ॥ २ ॥

१३२५ त्वꣳ सुष्वाणो अद्रिभिरभ्यर्ष कनिक्रदत् । द्युमन्तꣳ शुष्ममा भर ॥ ३ ॥ १६ (ली) ॥

[धा० १४ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ९।६७।३)

१३२६ पवस्व देववीतय इन्दो धाराभिरोजसा । आ कलशं मधुमान्त्सोम नः सदः ॥ १ ॥

(ऋ. ९।१०६।७)

१३२७ तव द्रप्सा उदप्रुत इन्द्रं मदाय वावृधुः । त्वां देवासो अमृताय कं पपुः ॥ २ ॥

(ऋ. ९।१०६।८)

१३२८ आ नः सुतास इन्दवः पुनाना धावता रयिम् ।
वृष्टिद्यावो रीत्यापः स्वर्विदः ॥ ३ ॥ १७ (वौ) ॥

[धा० १९ । उ० नास्ति । स्व० नास्ति] (ऋ. ९।१०६।९)

१३२९ परि त्यꣳ हर्यतꣳ हरिं बभ्रुं पुनन्ति वारेण ।
यो देवान्विश्वाꣳ इत्परि मदेन सह गच्छति ॥ १ ॥ (ऋ. ९।९८।७)

१३३० द्विर्यं पञ्च स्वयशसꣳ सखायो अद्रिसꣳहतम् ।
प्रियमिन्द्रस्य काम्यं प्रस्नापयन्त ऊर्मयः ॥ २ ॥ (ऋ. ९।९८।६)

[१३२५] हे सोमा ! (अद्रिभिः सुष्वाणः त्वं) दगडांनीं कुटून रस काढलेला तूं (कनिक्रदत् अभ्यर्ष) शब्द करीत कलशामध्यें जा. (द्युमन्तं शुष्मं आभर) तेजस्वी सामर्थ्य आम्हांस दे. ॥ ३ ॥

[१३२६] हे (इन्दो) सोमा ! (देववीतये) देवतांना देण्यासाठीं (ओजसा धाराभिः पवस्व) वेगानें धारांनीं गाळला जा. हे (सोम) सोमा ! (मधुमान्) मधुर असा तूं (नः कलशं आ सदः) आमच्या कलशामध्यें येऊन रहा. ॥ १ ॥

[१३२७] (उदप्रुतः तव द्रप्साः) पाण्याशीं मिळणारे तुझे रस (मदाय इन्द्रं वावृधुः) आनंद व्हावा यासाठीं इन्द्राचें महत्त्व वाढवितात. नंतर (देवासः कं त्वां अमृताय पपुः) देव सुख देणाऱ्या अशा तुला अमृतत्व प्राप्त व्हावें यासाठीं पितात. ॥ २ ॥

[१३२८] (वृष्टि-द्यावः) द्युलोकापासून वृष्टि करवणारे (स्वः-विदः) स्वर्गाचें ज्ञान असलेले (रीत्यापः सुतासः) पृथिवीवर पाण्याची वृष्टि करणारे हे सोमरस (पुनानाः इन्दवः) स्वच्छ होणारे तेजस्वी आहेत. हे सोमरस हो ! तुम्ही (नः रयिं आ धावत) आम्हांला धन प्राप्त होईल असें करा. ॥ ३ ॥

[१३२९] (हर्यतं हरिं) पुण्य व पाप दूर करणाऱ्या (बभ्रुं त्यं) त्या भुऱ्या रंगाच्या सोमाला (वारेण परि-पुनन्ति) गाळणीनें गाळून शुद्ध करतात. (यः विश्वान् देवान्) जो सर्व देवांजवळ (मदेन सह इत्) आनंदकारक गुणासह (परि गच्छति) जातो. ॥ १ ॥

[१३३०] (द्विः पंच सखायः) दहा अंगुली (स्वयशसं अद्रिसंहतं) स्वयं यशस्वी व पाषाणांनीं कुटलेल्या इन्द्रस्य प्रियं काम्यं यं) इन्द्राला प्रिय व इष्ट अशा सोमाला (ऊर्मयः) जलांनीं (प्रस्नापयन्ते) स्नान घालतात. ॥२॥

१३३१ इन्द्राय सोम पातवे वृत्रघ्ने परि षिच्यसे ।
नरे च दक्षिणावते वीराय सदनासदे ॥ ३ ॥ १८ (जी) ॥
[धा० २२ । उ० ३ । स्व० ४] (ऋ. ९।९८।१०)

१३३२ पवस्व सोम महे दक्षायाश्वो न निक्तो वाजी धनाय ॥ १ ॥ (ऋ. ९।१०९।१०)

१३३३ प्र ते सोतारो रसं मदाय पुनन्ति सोमं महे द्युम्नाय ॥ २ ॥ (ऋ. ९।१०९।११)

१३३४ शिशुं जज्ञानꣳ हरिं मृजन्ति पवित्रे सोमं देवेभ्य इन्दुम् ॥ ३ ॥ १९ (का) ॥
[धा० ११ । उ० १ । स्व० २] (ऋ. ९।१०९।१२)

१३३५ उपो षु जातमप्तुरं गोभिर्भङ्गं परिष्कृतम् । इन्दुं देवा अयासिषुः ॥ १ ॥ (ऋ. ९।६१।१३)

१३३६ तमिद्वर्धन्तु नो गिरो वत्सꣳ सꣳशिश्वरीरिव । य इन्द्रस्य हृदꣳ सनिः ॥ २ ॥
(ऋ ९।६१।१४)

१३३७ अर्षा नः सोम शं गवे धुक्षस्व पिप्युषीमिषम् । वर्धा समुद्रमुक्थ्य ॥ ३ ॥ २० (ही) ॥
[धा० ११ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ९।६१।१५)

॥ इति एकादशः खण्डः ॥ ११ ॥

[१३३१] हे (सोम) सोमा ! (वृत्रघ्ने इन्द्राय पातवे) वृत्राचा नाश करणाऱ्या इन्द्राला पिण्यासाठीं देण्या करितां, (दक्षिणावते वीराय) ज्याच्या यज्ञांत ऋत्विजांना दक्षिणा दिली जाते त्या वीरासाठीं व (सदना-सदे नरे) यज्ञामध्यें बसणाऱ्या यजमानासाठीं (परिषिच्यसे) तूं कलशामध्यें टपकत आहेस. ॥ ३ ॥

[१३३२] हे (सोम) सोमा ! (अश्वः न) घोड्याप्रमाणें (निक्तः) धुवून शुद्ध केलेला (वाजी) वेगवान् तूं (महे दक्षाय धनाय पवस्व) शत्रूचा पराभव करण्याच्या शक्तिसाठीं व बल आणि धन यांसाठीं शुद्ध हो. ॥ १ ॥

[१३३३] हे सोमा ! (सोतारः) रस काढणारे ऋत्विज (ते रसं) तुझ्या रसाला (मदाय पुनन्ति) आनंद प्राप्तिसाठीं शुद्ध करतात. तसेंच (महे द्युम्नाय सोमं) मोठ्या तेजस्वी सोमरसाला गाळतात. ॥ २ ॥

[१३३४] (शिशुं जज्ञानं) नवजात मुलाला जसा शुद्ध ठेवतात, त्याप्रमाणें ऋत्विज (देवेभ्यः) देवांना देण्या-साठीं (हरिं इन्दुं सोमं) हिरव्या रंगाच्या चमकणाऱ्या सोमाला (पवित्रे मृजन्ति) गाळणीमधून शुद्ध करतात. ॥ ३ ॥

[१३३५] (जातं अप्तुरं) तयार असलेल्या पाण्यांत मिसळलेल्या (भंगं) शत्रूचा नाश करणाऱ्या (गोभिः सुपरिष्कृतं) गाईंच्या दुधाशीं मिसळलेल्या (इन्दुं देवाः उप अयासिषुः) सोमरसाला देव प्राप्त करतात. ॥ १ ॥

[१३३६] (यः इन्द्रस्य हृदं सनिः) जो इन्द्राच्या हृदयाचा श्रेष्ठसेवक आहे (तं इत् नः गिरः सं वर्धन्तु) त्या सोमाचें वर्णन आमच्या वाणी उत्तम रीतिनें करोत. (वत्सं शिश्वरीः इव) ज्याप्रमाणें बालकाला त्याची माता वाढवते, त्याप्रमाणें आमची वाणी सोमाचें यश वाढवो. ॥ २ ॥

[१३३७] हे सोमा ! (नः गवे शं अर्ष) आमच्या गाईंना सुख होण्यासाठीं तूं कलशामध्यें जा. (पिप्युषीं इषं धुक्षस्व) पौष्टिक अन्न आम्हांला भरपूर दे. हे (उक्थ्य) स्तुत्य सोमा ! (समुद्रं वर्ध) कलशांतील पाण्याला वाढव. । ३ ॥

॥ येथें अकरावा खण्ड समाप्त झाला ॥

*

[१२]

१३३८ आ घा ये अग्निमिन्धते स्तृणन्ति बर्हिरानुषक् । येषामिन्द्रो युवा सखा ॥ १ ॥
(ऋ. ८।४५।१)

१३३९ बृहन्निदिध्म एषां भूरि शस्तं पृथुः स्वरुः । येषामिन्द्रो युवा सखा ॥२॥ (ऋ. ८।४५।२)

१३४० अयुद्ध इद्युधा वृतꣳ शूर आजति सत्वभिः । येषामिन्द्रो युवा सखा ॥ ३ ॥ २१ (ठ) ॥
[धा० ३ । उ० २ । स्व० १] (ऋ. ८।४५।३)

१३४१ य एक इद्विदयते वसु मर्ताय दाशुषे । ईशानो अप्रतिष्कुत इन्द्रो अङ्ग ॥ १ ॥
(ऋ. १।८४।७)

१३४२ यश्चिद्धि त्वा बहुभ्य आ सुतावाꣳआविवासति । उग्रं तत्पत्यते शव इन्द्रो अङ्ग ॥ २ ॥
(ऋ. १।८४।९)

१३४३ कदा मर्तमराधसं पदा क्षुम्पमिव स्फुरत् ।
कदा नः शुश्रवद्गिर इन्द्रो अङ्ग ॥ ३ ॥ २२ (कि) ॥
[धा० ११ । उ० १ । स्व० ३] (ऋ. १।८४।८)

---

[१२] द्वादशः खण्डः ।

[१३३८] (ये) जे ऋषि (आ घा) समोर बसून (अग्निं इन्धते) अग्निला प्रदीप्त करतात, (युवा इन्द्रः येषां सखा) तरुण इन्द्र ज्यांचा मित्र आहे, ते (आनुषक् बर्हिः स्तृणन्ति) क्रमानें देवांसाठीं आसनें पसरून ठेवतात. ॥ १ ॥

[१३३९] (युवा इन्द्रः येषां सखा) तरुण इन्द्र ज्यांचा मित्र आहे (एषां इध्मः बृहत् इत्) या ऋषींच्या समिधा पुष्कळ आहेत. (शस्तं भूरि) स्तोत्रेंही पुष्कळ आहेत. (स्वरुः पृथुः) शस्त्र मोठें आहे. ॥ २ ॥

[१३४०] (युवा इन्द्रः येषां सखा) तरुण इन्द्र ज्याचा मित्र आहे, तो (अयुद्धः इत्) युद्ध करण्याची इच्छा नसतांहि (युधा वृतं) योध्यांनीं युक्त शत्रूला (सत्वभिः शूरः) आपल्या बलांच्या योगानें शूरवीर असलेला (आजति) पराभूत करून टाकतो. ॥ ३ ॥

[१३४१] (यः एकः इत्) जो एकटाच इन्द्र (दाशुषे मर्ताय वसु विदयते) दात्या याजकाला धन देतो, तो (अप्रतिष्कुतः इन्द्रः) ज्याचा पराभव होत नाहीं असा इन्द्र (अंग ईशानः) तत्काल या सर्व जगाचा स्वामी होतो. ॥१॥

[१३४२] (बहुभ्यः यः चित् हि) पुष्कळ मनुष्यांमधून जो यजमान (सुतावान्) सोमयाग करून (त्वा आ विवासति) आराधना करतो, (तत्) त्याला (इन्द्रः) इन्द्र (उग्रं शवः) उग्र बल (अंग आपत्यते) अति शीघ्र देत असतो. ॥ २ ॥

[१३४३] (इन्द्रः) इन्द्र (कदा) केव्हां (अ-राधसं मर्तं) दान न देणाऱ्या माणसाला (पदा क्षुम्पं इव) पायानें एखादें फूल चिरडून टाकावें, त्याप्रमाणें (स्फुरत्) नष्ट करून टाकील ? हे (अंग) प्रिया ! (कदा) केव्हां बरें तो (नः गिरः शुश्रवत्) आमच्या स्तुति ऐकेल ? ॥ ३ ॥

१३४४ गायन्ति त्वा गायत्रिणोऽर्चन्त्यर्कमर्किणः ।
ब्रह्माणस्त्वा शतक्रत उद्वंशमिव येमिरे ॥ १ ॥ (ऋ. १।१०।१)

१३४५ यत्सानोः सान्वारुहो भूर्यस्पष्ट कर्त्वम् ।
तदिन्द्रो अर्थं चेतति यूथेन वृष्णिरेजति ॥ २ ॥ (ऋ. १।१०।२)

१३४६ युंक्ष्वा हि केशिना हरी वृषणा कक्ष्यप्रा ।
अथा न इन्द्र सोमपा गिरामुपश्रुतिं चर ॥ ३ ॥ २३ (वी) ॥

[धा० २१ । उ० ३ । स्व० ४] (ऋ. १।१०।३)

॥ इति द्वादशः खण्डः ॥ १२ ॥

॥ इति पञ्चमप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ २ ॥ पञ्चमप्रपाठकश्च समाप्तः ॥ ५ ॥

॥ इति दशमोऽध्यायः ॥ १० ॥

[१३४४] हे (शतक्रतो) शेंकडों कर्म करणाऱ्या इन्द्रा ! (गायत्रिणः त्वा गायन्ति) उद्गाते तुझ्या स्तुतिचें गायन करतात. (अर्किणः अर्कं अर्चन्ति) अर्चना करणारे पूजनीय अशा इन्द्राची अर्चना करतात. (ब्रह्माणः त्वा उद्येमिरे) अन्य ऋत्विज तुझें महात्म्य गातात. (वंशं इव) लोक ज्याप्रमाणें वेळू वर उचलतात, त्याप्रमाणें तुझें महत्त्व वर्णन करून तुला (उत् येमिरे) श्रेष्ठ ठरवतात. ॥ १ ॥

[१३४५] (यत्) जेव्हां यजमान (सानोः सानु आरुहः) समिधा आदि आणण्यासाठीं पर्वतांच्या शिखरावर चढतो, तेव्हां तो (भूरि कर्त्वं अस्पष्ट) पुष्कळ प्रयत्न करतो. (तत् इन्द्रः) त्यावेळीं इन्द्र (अर्थं चेतति) यजमानाचा उद्देश जाणतो व (वृष्णिः यूथेन एजति) मनोरथांची वृष्टि करणारा तो इन्द्र देवांसह यज्ञभूमिमध्यें येत असतो. ॥ २ ॥

[१३४६] (सोमपाः) सोम पिणारा इन्द्र (केशिना वृषणा) उत्तम आयाळ असणारे बलवान् (कक्ष्यप्राः हरी) पुष्ट शरीराच्या आपल्या घोड्यांना (युंक्ष्व हि) अवश्य जोडतोच. (अथ) नंतर हे (इन्द्र) इन्द्रा ! (नः गिरां उपश्रुतिं चर) आमच्या स्तुति ऐकण्यासाठीं जवळ ये. ॥ ३ ॥

॥ येथें बारावा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति दशमोऽध्यायः ॥

दशम अध्याय

इन्द्र

या दशम अध्यायामध्यें सोमाचें वर्णन विशेष आहे, पण यामध्यें अन्य देवतांचेंही वर्णन आहे. त्यापैकीं इन्द्र देवतेचें वर्णन प्रथम पहा—

१ इन्द्रः कदा अ-राधसं मर्तं, पदा क्षुम्पं इव, स्फुरत् [१३४३]- इन्द्र केव्हां पायानें एखादें फूल चिरडून टांकावें, त्याप्रमाणें कंजूस - दान न देणाऱ्या माणसाला नष्ट करून टांकील बरें ?

उदार माणसांनीं समाजांत रहावें, अनुदार मनुष्य समाजाला जाचक होतात. हा भाव येथें आहे.

२ इन्द्रः उग्रं शवः आपत्यते [१३४२]- इन्द्र उग्र

बल देत असतो. तो इन्द्र आपल्या उपासकांना बलवान् बनवतो.

३ इन्द्रः ओजसा महान् [१३०७]- इन्द्र आपल्या तेजानें मोठा आहे.

४ विश्वा इत् इन्द्रस्य भक्षत [१३१९]- सर्व प्रकारचीं धनें निश्चयानें इन्द्राच्या आश्रयानें राहत असतात.

५ जातः ओजसा वसूनि जनिमानि [१३१९]- इन्द्र उत्पन्न होतांच आपल्या शक्तिनें सर्व धनें उत्पन्न करतो.

६ अलर्षिरातिं वसुदां उप स्तुहि। इन्द्रस्य रातयः भद्राः [१३२०]– निष्पाप दान करणाऱ्या पुरुषांना धन देणाऱ्या इन्द्राची स्तुति करा. इन्द्राचीं दानें कल्याण करणारीं आहेत.

७ यः मनः दानाय चोदयन्, विधतः अस्य कामं न रोषति [१३२०]- जो इन्द्र आपल्या मनाला दान देण्याची प्रेरणा करतो व या दान देणाऱ्याची दान देण्याची इच्छा तो नष्ट करीत नाहीं.

८ हे इन्द्र ! यतः भयामहे, ततः नः अभयं कृधि [१३२१]- हे इन्द्रा ! जेथून आम्हांला भय होत असेल, तेथून आम्हांला निर्भय कर.

९ नः तव तत् ऊतये शग्धि। द्विषः वि जहि। मृधः वि [१३२१]- आम्हांला त्या तुझ्या संरक्षणानें सुरक्षित करण्यास तूं समर्थ आहेस. द्वेष करणाऱ्यांचा पराभव कर व हिंसक शत्रूंना दूर कर.

१० यत् कण्वाः इन्द्रं स्तोमैः यज्ञस्य साधनं अक्रत। आयुधा जामि ब्रुवत [१३०८]- जेव्हां कण्वांनीं इन्द्राला स्तोत्रांनीं यज्ञाचें साधन बनवलें, तेव्हां आयुधांचें कारण उरलें नाहीं असें लोक म्हणूं लागले. इतकी शान्तता स्थापन झाली व शस्त्रांनीं लढण्याचें कारण राहिलें नाहीं असें लोकांना वाटलें.

११ हे राधसः पते ! त्वं महः राधसः क्षयस्य विधर्ता असि [१३२२]- हे धनपते इन्द्रा ! तूं खरोखर मोठ्या धनांचा व मोठ्या घराचा स्वामी आहेस. इन्द्राजवळ पुष्कळ धनही आहे व मोठीं घरेंहि आहेत.

१२ युवा इन्द्रः येषां सखा, शूरः अयुद्धः इत् युधा वृतं सत्वभिः आजाति [१३४०]- तरुण इन्द्र ज्यांचा मित्र असतो, ते शूर युद्धाची इच्छा नसतांही, योध्यांनींयुक्त शत्रूला आपल्या सामर्थ्यांनीं पराभूत करतात.

१३ यः एकः इत् दाशुषे मर्ताय वसु विदयते। अप्रतिष्कुतः इन्द्रः ईशानः [१३४१]- जो एकटाच इन्द्र दान देणाऱ्या मनुष्याला धन देतो. असा पराभूत न होणारा इन्द्र खरोखर सर्वांचा ईश्वर आहे.

असें इन्द्राच्या गुणांचें व सामर्थ्याचें वर्णन या अध्यायामध्यें आलेलें आहे. अशा इन्द्राला सोम पिण्यास दिला जात असतो, पहा—

इन्द्राला सोम

१ शूरः एषः अण्व्या इन्द्रस्य निष्कृतं आशुभिः रथेभिः धिया याति [१२६६]- हा शूर सोम अंगुलींनीं दाबून काढल्यानंतर इन्द्राच्या स्थानाजवळ लवकर जाणाऱ्या रथांनीं बुद्धिपूर्वक जातो.

प्रथम सोम कुटतात, नंतर बोटांनीं दाबून त्याचा रस काढतात व नंतर त्याला इन्द्राच्या बसण्याच्या जागेजवळ नेतात. रथांनीं जातो ही आलंकारिक भाषा आहे.

२ इन्द्राय पातवे त्रितस्य योषणः हरिं इन्दुं अद्रिभिः हिन्वन्ति [१२७५]- इन्द्राला सोमरस पिण्यास देण्यासाठीं त्रित ऋषिच्या अंगुली या हिरव्या रंगाच्या सोमाला दगडांनीं कुटत आहेत.

३ वृषा हरिः पुनानः इन्दुः शुष्मी एषः अन्तरिक्षे इन्द्रं आ असिष्यदत् [१२९०]- बल वाढवणारा हिरव्या रंगाचा पवित्र होणारा व चमकणारा हा सोम गाळणींमधून इन्द्राजवळ पोंचत आहे.

४ देवः इन्दुः, कविना इषितः, इन्द्राय मंहयन्, द्रोणानि अभि धावति [१२९७]- द्युलोकांत प्रकाशणारा तो सोम, कविनें प्रेरणा केल्यानंतर, इन्द्राला मोठेपणा देऊन कलशामध्यें जात आहे.

५ उदप्रुतः तव द्रप्सः मदाय इन्द्रं वावृधुः [१३२७]- पाण्याशीं मिसळणारे तुझे रस आनंद व्हावा यासाठीं इन्द्राचें महत्त्व वाढवितात.

६ देवासः कं त्वां अमृताय पपुः [१३२७]- देव आनंद देणाऱ्या तुज सोमरसाला अमृतत्व प्राप्त व्हावें यासाठीं पितात.

७ वृत्रघ्ने दक्षिणावते इन्द्राय पातवे सदनासदे नरे परिषिच्यसे [१३३१]- वृत्राला मारणाऱ्या आणि दान देणाऱ्या इन्द्राला पिण्यास देण्यासाठीं आणि यज्ञमंडपांत बसणाऱ्या यजमानासाठीं हा रस गाळला जात आहे.

याप्रमाणें इन्द्राला सोमरस पिण्यास देण्याचें वर्णन करणारे मंत्र या अध्यायामध्यें आहेत.

अग्नि

अग्निदेवतेसंबंधीं थोडेसे मंत्र येथें या अध्यायांत आहेत. त्यांतील वर्णन आतां पहा—

१ स्वे दुरोणे यः समिद्धः दीदाय, यविष्ठं उर्वी रोदसी अन्तः चित्रभानुं स्वाहुतं विश्वतः प्रत्यंचं महा नमसा अगन्म [१३०४]- आपल्या यज्ञस्थानामध्यें जो अग्निला उत्तम रीतिनें प्रदीप्त करतो, त्या तरुण विशाल

द्यावापृथिवीमध्यें विशेष प्रकाशमान् उत्तम रीतिनें आहुति दिलेल्या सर्वत्र प्रकाशमान् अग्निजवळ आम्ही नमस्कार करीत जातों.

२ महा विश्वा दुरितानि साह्वान् जातवेदाः अग्निः दमे आ स्तवे। सः गृणतः नः दुरितात् नः अवद्यात् रक्षिषत्। उत मघोनः अस्मान् रक्षिषत् [१३०५]- आपल्या महान् प्रभावानें सर्व पापांना दूर करणारा ज्ञानाचा प्रसारक अग्नि यज्ञशालेमध्यें स्तविला जात आहे. तो स्तुति करणाऱ्या आम्हांला पापांपासून व निंदित कर्मापासून दूर करतो व हवि जवळ बाळगणाऱ्या आमचें रक्षण करतो.

३ हे अग्ने ! त्वे वसु सुपणनानि सन्तु [१३०६]- हे अग्ने ! तुझ्याजवळ असलेलें धन आम्हांला स्वीकार करण्यास योग्य होवो.

याठिकाणीं यज्ञशाळेंत अग्नि प्रदीप्त केला जातो, त्याची स्तुति केली जाते, उत्तम हवनीय पदार्थांचें त्यांत हवन केलें जातें. अशा रीतिनें प्रदीप्त झालेला अग्नि अनेक प्रकारें लोकांचें संरक्षण करतो, इत्यादि वर्णन आलें आहे.

देवांना सोमरस

इन्द्राला सोमरस देण्याचें वर्णन मागें आलें आहे. आतां देवांना सोमरस दिला जात असतो, याचें वर्णन पहा—

१ हे सोम ! नः इष्टये राधसे वायुं मित्रावरुणा मारुतं शर्धः देवान् द्यावापृथिवी मत्सि [१२५४]- हे सोमा ! आम्हांला अन्न व धन प्राप्त व्हावें यासाठीं वायु, मित्र वरुण, मरुतांचा संघ, सर्व देव, द्यावापृथिवी यांना तूं संतुष्ट कर.

२ पवमानः सोमः इन्द्रे ओजः, सूर्ये ज्योतिः, अपां गर्भः देवान् आवृणीत [१२५५]- गाळलेल्या सोमानें इन्द्रामध्यें सामर्थ्य, सूर्यामध्यें तेज वाढवून आणि पाण्यांत मिसळून देवांची सेवा केली.

३ देवेभ्यः सुतः पवित्रे अक्षरत् विश्वा धामानि आविशन् [१२८१]- देवांना देण्यासाठीं हा सोमरस गाळणीमधून गाळला जात आहे. हा देवांच्या सर्व स्थानामध्यें पोंचत आहे.

४ दक्षसाधनः स्वर्जित् एषः इन्द्राय वायवे पवित्रे परि षिच्यते [१२८७]- बल वाढवण्याचें साधन असा हा स्वर्गाला जिंकणारा सोम इन्द्र व वायु यांना देण्यासाठीं गाळणींमधून गाळला जात आहे.

५ देवावीः अघशंसहा अदाभ्यः पुनानः शुष्मी एषः अर्षति [१२९१]- देवांना देण्यासाठीं हा पापी लोकांना नष्ट करणारा आणि न दबला जाणारा बलवान् असा हा सोम गाळला जात आहे, गाळून भांड्यांत पडत आहे.

६ देवयुः पीतये सुतः वृषा रक्षांसि विघ्नन् पवित्रे अर्षति [१२९२]- देवांना देण्यासाठीं काढलेला हा बल वाढवणारा सोमरस राक्षसांना मारून गाळणीमधून गाळला जातो.

७ यः विश्वान् देवान् मदन् सह इत् परि गच्छति [१३२९]- हा सोमरस सर्व देवांना आनंद देण्याच्या इच्छेनें देवांजवळ जात आहे.

८ जातं अप्तुरं भंगं गोभिः सुपरिष्कृतं इन्दुं देवाः उप अयासिषुः [१३३५]- तयार केलेल्या, पाण्यांत मिसळलेल्या, शत्रूचा नाश करणाऱ्या, गाईच्या दुधामध्यें मिसळलेल्या सोमाजवळ देव जातात.

९ इन्द्रस्य हृदं सनिः तं नः गिरः संवर्धन्तु [१३३६]- इन्द्राच्या हृदयाला आनंद देणारा हा सोम आहे, त्याची स्तुति आमच्या वाणी करून त्याचें महात्म्य वाढवोत.

हा सोमरस तयार करून तो प्रथम देवांना समर्पण केला जातो व नंतर त्याचें सेवन ऋत्विज करतात. असा हा सोम पर्वतावर - हिमालयाच्या उंच शिखरावर - मिळतो. पहा—

पर्वतावर सोम

हा सोम हिमालय पर्वताच्या उंच शिखरावर होतो याविषयीं असें वर्णन मंत्र करीत आहेत—

१ गिरिषु क्षयं दधे [१३१७]- पर्वतांवर हा सोम आपलें घर करतो.

२ दिवः शिशुः इन्दुः [१२७७]- द्युलोकांत जन्मलेला सोम आहे. द्युलोक म्हणजे हिमालयाचें शिखर होय.

३ दिवः मूर्धा वृषा [१२८८]- द्युलोकांतील उंच स्थानावर हा बल वाढवणारा सोम राहतो.

४ वृष्टिद्यावः स्वर्विदः सुतासः इन्दवः [१३२८] –स्वर्गलोकांतून वृष्टी करवणारे, स्वर्गाला जाणणारे हे सोमरस आहेत.

सोम पर्वतावर उंच ठिकाणीं राहतो. तेथून वृष्टी होते. तो सोम स्वर्गांत राहतो म्हणूनच तो स्वर्गाला जाणतो.

हीं वर्णनें सोमवल्ली हिमालयांतील उंच शिखरावर उगवते असें दर्शवीत आहेत.

सोम दगडांनीं कुटतात

१ वीते अध्वरे ग्रावभिः सं वसते [१३१७]-

यज्ञामध्यें सोम दगडांनीं कुटला जातो व नंतर त्याचा रस अंगुलींनीं दाबून काढतात.

दहा अंगुली

ऋत्विजांच्या दहा अंगुली त्या कुटलेल्या सोमवल्लीचा दाबून रस काढतात. याविषयींचें वर्णन असें आहे —

१ त्यं दश हरितः मर्मृज्यन्ते [१२७९]- त्या सोमाला दहा अंगुली शुद्ध करतात.

२ एषः वृषा कनिक्रदत् दशभिः जामिभिः यतः द्रोणानि अभि धावति [१२८३]- हा बल वाढवणारा सोम शब्द करतो व दहा बहिणींनीं - अंगुलींनीं - दाबल्यानंतर कलशांमध्यें जातो.

३ द्विः पंच सखायः स्वयशसं अद्रिसंहतं इन्द्रस्य प्रियं काम्यं ऊर्मयः प्रस्नापयन्ति [१३३०]- दहा अंगुली स्वतःच यशस्वी व पाषाणांनीं कुटलेल्या, इन्द्राला प्रिय व इष्ट अशा सोमाला पाण्यानें स्नान घालतात.

४ स्वायुधं मदिन्तमं हरिं यातवे दशक्षिपः हिन्वन्ति [१२७३]- उत्तम आयुधें वापरणाऱ्या आनंददायक हिरव्या रंगाच्या सोमाला देवांजवळ नेण्यासाठीं दहा अंगुली रस काढतात.

याप्रमाणें दहा अंगुलींनीं दाबून रस काढण्याचीं वर्णनें या अध्यायामध्यें आलेलीं आहेत. असा हा सोमरस मेंढीच्या केंसांच्या गाळणींतून गाळला जातो. यासंबंधीचें वर्णन आतां पहा—

सोम गाळला जातो

१ अधि सानौ अव्ये पवित्रे बृहत् वावृधे [१२५३] --अधिक उंच लोंकरीच्या गाळणींतून सोमरस अधिक वाढत आहे, गाळला जात आहे.

२ हरिः एषः देवः देवेभ्यः सुतः पवित्रे अर्षति [१२६४]- हा हिरव्या रंगाचा चमकणारा देवांसाठीं काढलेला सोमरस गाळणींतून गाळला जात आहे.

३ एषः अव्या वारेभिः अव्यत [१२७४]- हा सोमरस मेंढीच्या केंसांच्या जाळींतून गाळला जात आहे.

४ वाजी नृभिः हितः अव्यं वारं विधावति [१२८०] --हा बल वाढवणारा याजकांनीं ठेवलेला सोमरस मेंढीच्या केंसांच्या चाळणींतून खालील भांड्यांत पडत आहे.

५ वाजी रक्षोहा सः पवमानः अव्ययं वारं विधावति [१२९४]- हा बलवान् व राक्षसांना मारणारा गाळला जाणारा सोमरस मेंढीच्या केंसांच्या चाळणींतून गाळला जात आहे.

६ हर्यतं हरिं वारेण परि पुनन्ति [१३२९]- पवित्र व हिरव्या रंगाच्या सोमाला गाळणींतून गाळतात.

७ शिशुं जज्ञानं इव, देवेभ्यः हरिं इन्दुं सोमं पवित्रे मृजन्ति [१३३४]- नवीन जन्मलेल्या मुलाला जसा स्वच्छ करतात, त्याप्रमाणें देवांना देण्यासाठीं काढलेल्या हिरव्या सोमरसाला पवित्र करावयाच्या गाळणींतून शुद्ध करतात.

याप्रमाणें सोमरस गाळण्याचें वर्णन अनेक मंत्रांमध्यें आलेलें आहे. मेंढीच्या केंसांची जाळी करतात. ती जाळी एका कलशाच्या तोंडावर ठेवतात व त्यावर एका कळशीनें हा सोमरस ओतला जातो व तो गाळला जाऊन खालच्या कळशींमध्यें टपकत पडतो. त्याच्या टपकण्याचा शब्द होतो. त्या शब्द होण्याचें असें वर्णन मंत्रांमध्यें आढळतें—

सोम शब्द करतो

सोमरस गाळला जात असतां त्याच्या टपकण्याचा शब्द होतो. पहा—

१ वग्नुं आविष्कृणोति [१२५९]- सोम शब्द प्रकट करतो.

२ एषः पवमानः धारया कनिक्रदत् [१२६२]- हा गाळला जाणारा सोमरस धारेनें शब्द करीत असतो.

३ हरिः सः पवित्रे कनिक्रदत् योनिं अभि अर्षति [१२९३]- तो हिरव्या रंगाचा सोमरस गाळणींतून शब्द करीत खालच्या कलशामध्यें येतो.

४ अद्रिभिः सुष्वाणः त्वं कनिक्रदत् अभ्यर्ष [१३२५]- दगडांनीं कुटून काढलेला तूं शब्द करीत खालील भांड्यांत ये.

५ पीतये सुतः हरिः एषः क्रन्दन् योनिं अभि अर्षति [१२७८]- पिण्यासाठीं काढलेला हा सोमरस आपल्या प्रिय कलशामध्यें शब्द करीत येत आहे.

६ इन्दुः एषः पवमानः अचिक्रदत् [१२८९]- चमकणारा हा शुद्ध होत असलेला सोमरस शब्द करीत गाळला जात आहे.

याप्रमाणें सोमरस गाळला जात असतां शब्द करतो याचें वर्णन आहे. वरच्या भांड्यांतील प्रवाही पदार्थ खालच्या भांड्यांतील प्रवाही पदार्थांत पडूं लागला असतां त्याचा शब्द हा होणारच. तोच हा शब्द आहे. याचें आलंकारिक वर्णन हें असें मंत्रांत केलेलें आहे.

सोम चमकतो

सोमरस अंधेऱ्या जागीं चमकत असतो. चमकण्याचा गुण सोमरसामध्यें व सोमवल्लीमध्यें आहे. पर्वतावर जेथें उगवते

तेथेंही तो चमकते, पण रस अधिक चमकतो. याचें वर्णन असें वेदमंत्रांमध्यें आलेलें आहे—

१ देवः सोमः [१२५४]– चमकणारा सोम आहे.

२ हरेः अजिरशोचिषः पवमानस्य चन्द्राः जीराः असृक्षत [१३१०]– हिरव्या रंगाच्या सर्वत्र तेज पसरवणाऱ्या शुद्ध होणाऱ्या सोमरसाच्या तेजस्वी धारा चालल्या आहेत.

३ पवमानः हरिः चन्द्रः [१३११]- शुद्ध होणारा सोमरस हिरव्या रंगाचें तेज पसरवतो.

४ हे पवमान ! रश्मिभिः व्यश्नुहि [१३१२]-हे सोमरसा ! तूं आपल्या किरणांनीं व्याप.

५ अरुषः वृषा [१३१६]– हा बलवान् सोम तेजस्वी आहे.

याप्रमाणें सोमरस चमकतो असें वर्णन मंत्रांमध्यें आलेलें आहे. सोमवल्ली कुटून त्याचा रस काढतात. त्यामध्यें पाणी मिसळून तो गाळतात व नंतर त्यांत गाईचें दूध मिसळलें जातें. याविषयींचें वर्णन पहा—

गाईच्या दूधांत मिसळतात

१ गोपाः [१२५३]- सोम गाई पाळतो. गाईच्या दुधांत तो मिसळला जातो.

२ गाः अभि अचिक्रदत् [१३१६]– गाईंजवळ शब्द करीत जातो. सोम गाळतांना शब्द होतो. त्यानंतर त्यांत गाईचें दूध मिसळतात.

३ स्वसारः आपः गाः अभि उदासरन् [१३१७] –अंगुली, पाणी व गाई त्या सोमाजवळ येतात. अंगुलींनीं दाबून रस काढतात, नंतर त्यांत पाणी मिसळतात व त्यानंतर त्यांत गाईचें दूध मिसळतात.

याप्रमाणें गाईंच्या दुधांत सोमरस मिसळला जातो, याचें हें असें वर्णन आहे. हें आलंकारिक वर्णन आहे. पाणी व गाई त्याच्यासमोर येतात याचा अर्थ सोमरसांत पाणी मिसळतात व त्यानंतर त्यांत गोदुग्ध मिसळण्यांत येतें असा समजावयाचा आहे. अंशासाठीं पूर्णाचा प्रयोग, दुधासाठीं गाईचा उल्लेख करणें ही वेदाची पद्धतिच आहे.

सोम युद्धांत जातो

इन्द्र आदि देव सोमरस पितात. त्यामुळें त्यांचा उत्साह वाढतो. नंतर ते युद्धामध्यें जाऊन शत्रूचा पाडाव करतात. हें सोमरसाचें कार्य आहे, असें वर्णन वेदामध्यें आहे. पहा—

१ पवमानः देवः अदाभ्यः द्वरांसि अति धावति [१२६१]– हा शुद्ध होणारा न दबला जाणारा सोम शत्रूंवर चाल करून जातो.

२ पवमानः एषः रजांसि तिरः, दिवं विधावति [१२६२]- शुद्ध होणारा हा सोमरस, शत्रूंना दूर करीत, द्युलोकांत जणूंकाय धांवत जातो.

३ एषः पवमानः अस्तृतः रजांसि तिरः, दिवं व्यासरत् [१२६३]– हा शुद्ध होणारा अपराजित सोम शत्रूंना दूर करीत स्वर्गाकडे जातो.

४ एषः पुनानः द्विषः अपघ्नन् पवित्रे अधितोशते [१२८६]-हा पवित्र होणारा सोम, शत्रूंना दूर करीत, पवित्र स्थानावर कुटला जात आहे.

शत्रूंना दूर करण्याचा अर्थ युद्धांत जाणें व शत्रूंशीं लढणें. हें वीरांचें कार्य आहे. वीर सोम पितात. त्यामुळें ते उत्साहित होतात व शत्रूंना दूर करतात. हें सोमाच्या उत्साहानें होतें म्हणून सोमच हें सर्व करतो असें वर्णन केलें आहे.

सोम पाण्यांत मिसळतात

१ एषः देवः अपः विगाहते [१२५७]– हा दिव्य सोम पाण्यांत स्नान करतो. पाण्यांत मिसळला जातो.

२ वाजी सिन्धूनां पतिः भवन् [१२७०]– हा बलवान् सोम नद्यांचा स्वामी झाला आहे. पाण्यांत मिसळला गेला आहे.

३ घृता वसानः निर्णिजं परियासि [१३१८]– पाण्यांत मिसळल्यानंतर गाळणीमध्यें जातोस.

याप्रमाणें सोमरस पाण्यांत मिसळतात याचें वर्णन आहे.

सोम धन देतो

१ एषः देवः दाशुषे रत्नानि दधत् [१२५७]– हा सोमदेव दात्याला रत्नें देतो.

२ एषः शूरः विश्वानि वार्या सिषासति [१२५८] हा शूर सोम सर्व स्वीकारण्यास योग्य अशीं धनें देतो.

३ एषः ओजसा नृम्णा दधानः [१२७१]– हा सोम आपल्या सामर्थ्यानें धनें देत असतो.

४ नः रायिं आधावत [१३२८]– हे सोमरस हो ! आम्हांला धनाजवळ पोंचवा.

याप्रमाणें सोम धन देतो यासंबंधांचें वर्णन आहे.

सोम उत्तम वीर्य देतो

१ वाजसातमः स्तोत्रे सुवीर्यं दधत् [१३१२]- बल वाढवणारा हा सोम स्तुति करणाऱ्याला उत्तम वीर्य देतो.

सोमरस प्याल्यानें शरीरांत उत्तम वीर्य होतें व त्यामुळें उत्तम संतानही होतें.

पवित्र करणारी वेदवाणी

वेदमंत्रांमधील पवमानसूक्तांचें महत्त्व असें वर्णन केलेलें आहे --

१ यः ऋषिभिः संभृतं रसं पावमानीः अध्येति, सः सर्वं पूतं अश्नाति [१२९८]– जो ऋषिनीं एकत्रित केलेल्या पावमानीमंत्रसंग्रहरूपी ज्ञानरसाचें अध्ययन करतो तो सर्व प्रकाराचें पवित्र अन्न खातो.

२ तस्मै सरस्वती क्षीरं सर्पिः मधु उदकं दुहे [१२९९]– जो पावमानीमंत्रांचें अध्ययन करतो त्याला सरस्वती दूध, तूप, मध व जल देते.

३ पावमानीः स्वस्त्ययनीः सुदुघा [१३००]– पवमानसूक्तें कल्याण करणारीं व उत्तम अन्न देणारीं आहेत.

४ देवैः समाहृताः पावमानीः देवीः नः इमं अथो अमुं लोकं दधन्तु, नः कामान् समर्धयन्तु [१३०१]– देवांनीं एकत्रित केलेल्या पावमानीदेवी आम्हांला या लोकांत व त्या लोकांत उत्तम स्थान देवोत व आमच्या सर्व इच्छा पूर्ण करोत.

५ देवाः येन पवित्रेण सदा आत्मानं पुनते, तेन पावमानीः नः पुनन्तु [१३०२]– देव ज्या पवित्र करण्याच्या साधनानें आपली पवित्रता करतात, त्या साधनानें हीं पवमानसूक्तें आमची पवित्रता करोत.

६ पावमानीः स्वस्त्ययनीः ताभिः नान्दनं गच्छाति, पुण्यान् भक्षान् भक्षयति, अमृतत्वं च गच्छति [१३०३]– हीं पवमानसूक्तें कल्याण करणारीं आहेत. यांच्या योगानें आनन्द मिळतो, पुण्यकारक अन्न खावयास मिळतें व अमरत्व प्राप्त होतें.

वेदमंत्रांच्या विशेषतः पवमानसूक्तांच्या अध्ययनानें मनुष्यांची उत्तम उन्नति होते. सोमाचे गुण आपणामध्यें वाढवले तर मनुष्याची उत्तम उन्नति होते. यासाठीं याकडे वाचकांनीं विशेष लक्ष्य द्यावें.

सुभाषितें

१ गोपाः प्रथमे भुवनस्य विधर्मन् प्रजाः जनयन् अक्रान् [१२१३]– गाईंचें वा इन्द्रियांचें पालन करणारा, भुवनाच्या पहिल्या विशेष धर्माचें पालन करून, संतति उत्पन्न करून म्हणजे गृहस्थधर्माचें विशेष रीतिनें पालन करून, सर्वांहून श्रेष्ठ होतो.

२ वृषा अद्रिः अधिसानौ पवित्रे बृहन् वावृधे [१२५३] - बलवान् असा तो पर्वताप्रमाणें विशाल होऊन, उच्च ठिकाणीं राहून, पवित्र होऊन, अधिक श्रेष्ठ होत आहे.

३ हे देव ! नः इष्टये राधसे मत्सि [१२५४]– हे देवा ! आमच्या इष्ट सिद्धि व धनप्राप्तिसाठीं आनन्दानें सहाय्यता कर.

४ महिषः तत् महत् चकार [१२५५]– त्या महाबलवानानें तें मोठें कार्य केलें आहे.

५ पवमानः इन्द्रे ओजः अदधात् [१२५५]– सोमानें इन्द्रामध्यें सामर्थ्य वाढवलें.

६ इन्दुः सूर्ये ज्योतिः अजनयत् [१२५५]– सोमानें सूर्यामध्यें प्रकाश ठेवला.

७ विप्रैः अभिष्टुतः एषः देवः दाशुषे रत्नानि दधत् [१२५७]– ब्राह्मणांनीं प्रशंसिलेला हा देव दात्याला रत्नें देतो.

८ एषः शूरः विश्वानि वार्या सत्वभिः यन् इव सिषासति [१२५८]– हा शूर सर्व धनांना आपल्या सामर्थ्यांनीं प्राप्त करून, त्यांचें सेवन करतो.

९ एषः देवः रथर्यति, दिशस्यति, वग्वनुं आविष्कृणोति [१२५९]– हा देव - विद्वान् - रथामध्यें बसण्याची इच्छा करतो, लोकांना उन्नतिची दिशा दाखवतो व योग्य उपदेशाच्या शब्दांचें व्याख्यान करतो.

१० एषः देवः हरिः ऋतायुभिः विपन्युभिः वाजाय मृज्यते [१२६०]– हा दुःखाचें हरण करणारा ज्ञानी वीर, सत्यासाठींच ज्याचें आयुष्य खर्च होत आहे, अशा विशेष हितकारक कर्मे करणाऱ्यांनीं युद्धामध्यें विजय मिळावा यासाठीं तयार केला जात आहे.

ऋतायुः (ऋत-आयुः)– सत्यासाठीं, श्रेष्ठ कर्मांसाठींच ज्यांचें आयुष्य खर्च होत आहे. विपन्युः (वि-पन्युः)– विशेष हितकारक कर्मे करणारा. हरिः– दुःखांचें हरण करणारा. देवः– प्रकाशमान्, वीर, विजय इच्छिणारा, मृज्यते– शुद्ध केला जातो, निर्दोष बनवला जातो.

११ अदाभ्यः ह्वरांसि अति धावति [१२६१]– न दबला जाणारा वीर शत्रूंवर आक्रमण करून जातो.

१२ पवमानः रजांसि तिरः, दिवं विधावति [१२६२]– शुद्ध होणारा मनुष्य रजोगुणी शत्रूंना दूर

करून, रजोगुणाला दूर करून, स्वर्गाला जाण्याच्या मार्गावरून जातो.

१३ स्वध्वरः, अस्तृतः रजांसि तिरः दिवं व्यासरत् [१२६३]- उत्तम हिंसारहित कार्यें करणारा, पराजित न होतां रजोगुणांना दूर करून, स्वर्गाच्या मार्गानें पुढें जात असतो.

१४ एषः हरिः प्रत्नेन जन्मना देवेभ्यः सुतः पवित्रे अर्षति [१२६४]- हा दुःखें दूर करूं इच्छिणारा, जन्मापासूनच, देवांसाठींच निर्माण झाला आहे अशा रीतिनें, पवित्र होण्याच्या मार्गानें जातो.

१५ एषः शूरः आशुभिः रथेभिः गच्छन्, धिया याति [१२६६]- हा शूर पुरुष शीघ्रगामी रथांनीं जाऊन, बुद्धिपूर्वक उन्नतिच्या मार्गानेंच पुढें जातो.

१६ अमृतासः आशत, बृहते देवतातये, पुरू धियायते [१२६७]- जेथें अमर देव बसतात, त्या मोठ्या यज्ञांत, हा पुष्कळ कार्यें करण्याची इच्छा करतो.

१७ एषः हितः अन्तः शुन्ध्यावता पथा विनीयते [१२६९]- या हितकारक साधकाला अन्तर्यामींच्या शुद्ध होण्याच्या मार्गानें पुढें नेला जात आहे.

१८ ओजसा नृम्णा दधानः एषः शृंगाणि दोधुवत् [१२७१]- आपल्या सामर्थ्यानें धनांचें धारण करणारा हा आपलीं शिंगें हालवित आहे.

१९ वसूनि विब्दनः एषः, परुषा अति ययिवान्, शादेषु अव गच्छति [१२७२]- निवास करून राहणाऱ्या दुष्टांना त्रास देत हा आपल्या शक्तिनें त्यांच्या पुढें जाऊन, मारण्यास योग्य अशा त्या दुष्टांवर चाल करून जातो.

२० एषः सहस्रिणं वाजं गच्छन् [१२७४]- हा सहस्र प्रकारचें अन्न देण्यासाठीं जात आहे.

२१ एषः मानुषीषु विक्षु श्येनः न आ सीदति [१२७६]- हा मानवी प्रजाजनांमध्यें, श्येन पक्ष्याप्रमाणें उच्चस्थानावर जाऊन बसतो.

२२ वाजी विश्ववित् मनसः पतिः नृभिः हितः [१२८०]- बलवान् असा हा, सर्वज्ञ व मनाचा स्वामी होऊन, मनुष्यांनीं सन्मान्य अशा ठिकाणीं ठेवला जातो.

२३ अमर्त्यः वृत्रहा देववीतमः देवः अधि योनौ शुभायते [१२८२]- अमर व शत्रूंना मारणारा व देवांना फार आनंद देणारा असा हा देव आपल्या स्थानांत शोभत असतो.

*

२४ एषः द्यवि सूर्यं अरोचयत् [१२८४]- हा द्युलोकामध्यें सूर्याला प्रकाशित करतो.

२५ एष कविः द्विषः अपघ्नन् [१२८६]- हा ज्ञानी शत्रूंना मारतो.

२६ दक्षसाधनः एषः स्वर्जित् [१२८७]- बल वाढवण्याचें साधन असा हा सुखाला जिंकून प्राप्त करणारा आहे.

२७ गव्युः हिरण्ययुः सत्राजित् अस्तृतः अभिक्रदत् [१२८९]- गाई पाळणारा, सुवर्ण जवळ ठेवणारा, एकदम सर्व शत्रूंना मारणारा अपराजित वीर शब्द करीत आहे.

२८ देवावीः अघशंसहा अदाभ्यः शुष्मी एषः अर्षति [१२९१]- देवांचा रक्षक, पाप्यांचा संहारक, न दबला जाणारा असा हा बलवान् पुढें जात आहे.

२९ वृषा रक्षांसि विघ्नन् अर्षति [१२९२]- बलवान् असा हा राक्षसांना मारीत पुढें जात आहे.

३० वृत्रहा वृषा वरिवोविद् अदाभ्यः, वाजं इव, असरत् [१२९६]- शत्रूला मारणारा बलवान् वीर, धन देणारा व न दबला जाणारा घोड्यांप्रमाणें पुढें जात आहे.

३१ यः ऋषिभिः संभृतं रसं अध्येति, सरस्वती तस्मै क्षीरं सर्पिः मधु उदकं दुहे [१२९९]- जो ऋषींनीं एकत्र केलेल्या ज्ञानाचें अध्ययन करतो, सरस्वतीदेवी त्या विद्वानाला दूध, तूप, मध व जल देते.

३२ ऋषिभिः संभृतः रसः ब्राह्मणेषु अमृतं हितं [१३००]- ऋषींनीं एकत्र केलेला हा ज्ञानरस म्हणजे ब्राह्मणांमध्यें हें अमृतच आहे.

३३ देवैः समाहृताः पावमानीः देवीः नः इमं अथो अमुं लोकं दधन्तु, नः कामान् समर्धयन्तु [१३०१]- देवांनीं संपादन केलेल्या पवित्रता करणाऱ्या देवता आम्हांला या व त्या लोकांत सुख देवोत व आमच्या कामना पूर्ण करोत.

३४ देवाः येन पवित्रेण आत्मानं पुनते, तेन नः पुनन्तु [१३०२]- देव ज्या पवित्र करण्याच्या साधनानें आपल्याला पवित्र करतात, त्या साधनानें ते आम्हांला पवित्र करोत.

३५ पावमानीः स्वस्त्ययनीः, ताभिः नान्दनं गच्छाति, पुण्यान् भक्षान् भक्षयति, अमृतत्वं गच्छति [१३०३]- पवित्रता करणाऱ्या व कल्याण करणाऱ्या या ऋचा आहेत. यांनीं आनंद प्राप्त होतो व पवित्र अन्न खावयास मिळतें व अमृतत्व प्राप्त होतें.

३६ स्वादुतं चित्रभानुं नमसा अगन्म [१३०४]-

ज्यांत उत्तम हवन केलें आहे त्या प्रकाशयुक्त अग्निजवळ नमस्कार करीत आम्ही जाऊं या.

३७ महा विश्वा दुरितानि साह्वान् अग्निः दमे आस्तवे [१३०५]- आपल्या महान् प्रभावानें सर्व पापांपासून दूर करणाऱ्या अग्निची यज्ञशालेमध्यें स्तुति केली जात आहे.

३८ सः नः दुरितात् अवद्यात् रक्षिषत् [१३०५]- तो आमचें पापांपासून व निंदित कर्मांपासून रक्षण करतो.

३९ हे अग्ने! त्वे वसु सुषणनानि सन्तु [१३०६]- हे अग्ने ! तुझ्याजवळचीं धनें आम्हांस स्वीकार करण्यास योग्य असोत.

४० नः स्वस्तिभिः पात [१३०६]- आम्हांला कल्याण करणाऱ्या साधनांनीं सुरक्षित करा.

४१ इन्द्रः ओजसा महान् [१३०७]- इन्द्र आपल्या तेजानें मोठा आहे.

४२ आयुधा जामि ब्रुवत [१३०८]- आयुधें आतां निरुपयोगी झालीं असें लोक म्हणूं लागले.

४३ वाजसातमः सुवीर्यं दधत् रश्मिभिः व्यश्नुहि [१३१२]- बल वाढवणारा तूं उत्तम वीर्य धारण करून, आपल्या तेजानें सर्व जग व्यापून टाक.

४४ यः नर्यः [१३१३]- जो सर्व मानवांचें हित करणारा आहे.

४५ वृषा हरिः, राजा इव, दस्मः [१३१६]- हा बल वाढवणारा, दुःखाचें हरण करणारा राजासारखा दर्शनीय आहे.

४६ दुरिता अपसेधन् नः मृड [१३१८]- पापें दूर करून आम्हाला सुखी कर.

४७ वसूनि ओजसा जनिमानि भागं प्रति दीधिमः [१३१९]- धनें आपल्या सामर्थ्यानें उत्पन्न करून, त्याचा योग्य भाग आम्ही घेतों.

४८ इन्द्रस्य रातयः भद्राः [१३२०] इन्द्राचीं दानें कल्याण करणारीं आहेत.

४९ यः मनः चोदयत् [१३२०]- जो मनाला उत्तम प्रेरणा देतो.

५० विधतः कामं न रोषति [१६२०]- उपासकाची इच्छा तो नष्ट करीत नाहीं.

५१ हे इन्द्र ! यतः भयामहे ततः नः अभयं कृधि [१३२१]- हे इन्द्रा ! जेथून आम्हांस भय उत्पन्न होतें तेथून आम्हांस निर्भय कर.

५२ हे मघवन् ! नः तव ऊतये शग्धि, द्विषः जहि, मृधः वि [१३२१]- हे धनवान् इन्द्रा ! आम्हांला तुझ्या रक्षणानें सुरक्षित कर, द्वेष करणाऱ्यांचा पराभव कर, शत्रूंना दूर कर.

५३ हे राधसः पते ! त्वं महः राधसः क्षयस्य विधर्ता असि [१३२२]- हे धनपते ! तूं मोठ्या धनाच्या स्थानाचें धारण करणारा आहेस.

५४ त्वं मदिन्तमः सत्राजित् अस्तृतः [१३२४]- तूं आनन्द देणारा, सर्व शत्रूंना एकदम जिंकणारा व अपराजित आहेस.

५५ द्युमन्तं शुष्मं आभर [१३२४]- तेजस्वी बल आम्हांस भरपूर दे.

५६ महे दक्षाय धनाय पवस्व [१३३२]- शत्रूचा पराजय करणारें बल व धन प्राप्त व्हावें यासाठीं शुद्ध हो.

५७ नः गवे शं [१३३७]- आमच्या गाईंचें कल्याण होवो.

५८ पिप्युर्षी इषं धुक्षस्व [१३३७]- पोषण करणारें अन्न दे.

५९ युवा इन्द्रः येषां सखा, अयुद्धः इत् युधा वृतं सत्वभिः शूरः आजति [१३४०]- तरुण इन्द्र ज्यांचा मित्र आहे, ते वीर युद्ध करण्याची इच्छा नसतांहि अनेक योध्यांनींयुक्त शत्रूला आपल्या बलांनीं शूरवीर होऊन दूर करतात.

६० दाशुषे मर्ताय वसु विदयते [१३४१]- दान देणाऱ्या माणसाला तो इन्द्र धन देतो.

६१ अ-प्रतिष्कुतः इन्द्रः ईशानः [१३४१]- ज्याचा पराभव होत नाहीं, असा इन्द्र सर्वांचा ईश्वर आहे.

६२ यः आविवासति, तत् उग्रं शवः इन्द्रः आ पत्यते [१३४२]- जो उपासना करतो, त्याला उग्र बल इन्द्र देतो.

६३ इन्द्रः अराधसं मर्तं, पदा क्षुम्पं इव, स्फुरत् [१३४३]- इन्द्र दान न देणाऱ्या मनुष्याला, पायानें फूल चिरडावें, त्याप्रमाणें, नष्ट करून टाकतो.

उपमा

१ पर्णवीः इव [१२५६]- पक्ष्याप्रमाणें (एषः देवः द्रोणानि अभि आसदम्) हा सोम भांड्यांत वेगानें शिरतो.

२ हरिः वाजाय मृज्यते [१२६०]- घोडा युद्धामध्यें जाण्यासाठीं सजवितात, त्याप्रमाणें (एषः पवमानः विपन्युभिः मृज्यते) हा सोम यज्ञ करणाऱ्यांकडून शुद्ध केला जातो.

३ एषः शृंगाणि दोधुवत् [१२७१]- हा सोम आपलीं शिंगें हालवतो, ज्याप्रमाणें (यूथ्यः वृषा शिशीते) कळपांतील बैल आपलीं शिंगें हालवतो.

४ श्येनः न [१२७६]- श्येन पक्ष्याप्रमाणें हा सोम (आ सीदति) येऊन बसतो.

५ योषितं गच्छन् जारः न [१२७६]- स्त्रीजवळ जसा तिचा जार जातो, त्याप्रमाणें (एषः मानुषीषु विक्षु) हा सोम मानवीलोकांमध्यें येऊन बसतो.

६ वाजं इव [१२९६]- घोड्याप्रमाणें (सः सोमः) तो सोम कलशांमध्यें वेगानें जातो.

७ वृष्टिमान् पर्जन्यः इव [१३०७]- वृष्टि करणाऱ्या पर्जन्याप्रमाणें (तेजसा महान्) तेजानें मोठा दिसतो.

८ राजा इव दस्मः [१३१६]- राजाप्रमाणें सुन्दर हा (सोमः) सोम आहे.

९ श्येनः न [१३१६]- श्येन पक्ष्याप्रमाणें (घृतवन्तं योनिं आसदत्) पाण्याच्या कलशामध्यें सोम जातो.

१० अत्यः न [१३१८]- घोड्याप्रमाणें (वाजं अभ्यर्षति) युद्धामध्यें सोम जातो.

११ आयन्तः सूर्यं इव [१३१९] किरणें जशीं सूर्याचा आश्रय करतात, त्याप्रमाणें (विश्वा इत् इन्द्रस्य भक्षत) सर्व धनें इन्द्राच्या आश्रयानें राहतात.

१२ भागं न प्रतिदीधिमः [१३१९]- पित्याच्या धनाचा भाग जसा भावांच्या वांटपांमध्यें मिळतो, त्याप्रमाणें आम्हांस धनाचा भाग मिळो.

१३ अश्वः न [१३३२]- घोड्याप्रमाणें (निक्तः वाजी) धुवून शुद्ध केलेला बलवान् सोम आहे.

१४ शिशुं जज्ञानं [१३३४]- नवीन मुलाला जसा स्वच्छ करतात, त्याप्रमाणें (सोमं पवित्रे मृजन्ति) सोमाला गाळणीवर शुद्ध करतात.

१५ वत्सं शिश्वरीः इव [१३३६]- मुलाला ज्याप्रमाणें माता वाढवतात, त्याप्रमाणें (तं नः गिरः सं वर्धन्तु) त्या सोमाचें आमच्या स्तुति वर्णन करोत.

१६ पदा क्षुम्पं इव [१३४३]- पायानें जसें फूल चुरडावें, त्याप्रमाणें (अ-राधसं मर्तं स्फुरत्) दान न देणाऱ्या मनुष्याचा इन्द्र नाश करतो.

१७ वंशं इव [१३४४]- वेळू जसा उंच करतात, त्याप्रमाणें (ब्रह्माणः त्वा उद्येमिरे) ब्राह्मण तुज इन्द्राला श्रेष्ठ म्हणून उंच करतात. तुझें महात्म्य वाढवतात.

दशमाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
११५३	९।९७।४०	पराशरः शाक्त्यः	पवमानः सोमः	त्रिष्टुप्
११५४	९।९७।४२	पराशरः शाक्त्यः	,,	,,
११५५	९।९७।४१	पराशरः शाक्त्यः	,,	,,
११५६	९।३।१	शुनःशेप आजीगर्तिः सः देवरातः कृत्रिमो वैश्वामित्रः	,,	गायत्री
११५७	९।३।६	शुनःशेप आजीगर्तिः सः देवरातः कृत्रिमो वैश्वामित्रः	,,	,,
११५८	९।३।४	शुनःशेप आजीगर्तिः सः देवरातः कृत्रिमो वैश्वामित्रः	,,	,,

अथ एकादशोऽध्यायः ।

अथ षष्ठप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ ६ ॥

[१]

(१-११) मेधातिथिः काण्वः, २, १० वसिष्ठो मैत्रावरुणिः; ३ प्रगाथः काण्वः; ४ पराशरः शाक्त्यः, ५ प्रगाथो घौरः काण्वः; ६ मेध्यातिथिः काण्वः; ७ त्र्यरुणस्त्रैवृष्णः, त्रसदस्युः पौरुकुत्स्यः; ८ अग्नयो धिष्ण्या ऐश्वराः; ९ हिरण्यस्तूप आंगिरसः; १० सार्पराज्ञी ॥ १ आप्रीसूक्तं= (१ इध्मः समिद्धोऽग्निर्वा, २ तनूनपात्, ३ नराशंसः, ४ इळा); २ आदित्यः; ३, ५-६ इन्द्रः, ४, ७-९ पवमानः सोमः; १० अग्निः; ११ आत्मा, सूर्यो वा । १-३, ११ गायत्री; ४ त्रिष्टुप्; ५-६ प्रगाथः- (विषमा बृहती, समा सतोबृहती); पिपीलिकमध्या अनुष्टुप्; ८ द्विपदा विराट्; ९ जगती; १० विराट् ॥

१३४७ सुषमिद्धो न आ वह देवाँ अग्ने हविष्मते । होतः पावक यक्षि च ॥१॥ (ऋ. १।१३।१)

१३४८ मधुमन्तं तनूनपाद्यज्ञं देवेषु नः कवे । अद्या कृणुह्यूतये ॥ २ ॥ (ऋ. १।१३।२)

१३४९ नराशँसमिह प्रियमस्मिन्यज्ञ उप ह्वये । मधुजिह्वँ हविष्कृतम् ॥ ३ ॥ (ऋ. १।१३।३)

१३५० अग्ने सुखतमे रथे देवाँ ईडित आ वह । असि होता मनुर्हितः ॥ ४ ॥ १ (रा) ॥

[धा० १८ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. १।१३।४)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१३४७] हे अग्ने ! (सु-समिद्धः) उत्तम प्रज्वलित होऊन (नः हविष्मते) आमच्या हवि आपणाजवळ बाळगणाऱ्या यजमानासाठीं (देवान् आ वह) देवांना बोलाऊन आण. हे (होतः पावक) हवन करणाऱ्या व पवित्रता करणाऱ्या अग्ने ! (यक्षि च) त्या देवतांच्या उद्देशानें यज्ञ कर. ॥ १ ॥

[१३४८] हे (कवे) दूरदर्शी अग्ने ! (तनू-न-पात्) शरीराचें पतन न करणारा तूं (अद्य) आज (ऊतये) आमच्या संरक्षणासाठीं (नः मधुमन्तं यज्ञं) आमच्या अत्यंत मधुर अशा हविला (देवेषु कृणुहि) देवांकडे पोंचव. ॥२॥

[१३४९] (इह अस्मिन् यज्ञे) येथें या यज्ञामध्यें (प्रियं मधु-जिह्वं) प्रिय व मधुरभाषणी (हविष्कृतं नराशंसं) हविला देवतांकडे पोंचवणाऱ्या व मनुष्यें ज्याची स्तुति करतात अशा त्या अग्निला (उप ह्वये) मी बोलावीत आहें. ॥ ३ ॥

१ मधुजिह्वः— मधुर भाषण करणारा.

२ प्रियः— प्रिय आचरण करणारा.

३ नराशंसः— मनुष्य ज्याची प्रशंसा करतात.

४ हविष्कृत्— हवि तयार करून यजन करणारा.

[१३५०] हे (अग्ने) अग्ने ! (ईडितः) स्तुति केल्यानंतर (सुखतमे रथे) अत्यंत सुख देणाऱ्या रथांतून (देवान् आ वह) देवांना घेऊन ये. (मनुः-हितः) मनुष्यांनीं - यजमानांनीं - स्थापन केलेला (होता असि) देवतांना आणणारा तूं आहेस. ॥ ४ ॥

१ सुख-तमः रथः— अत्यंत सुख देणारा रथ असावा.

१३६१ अवक्रक्षिणं वृषभं यथा जुवं गां न चर्षणीसहम् ।
विद्वेषणꣳ संवननमुभयङ्करं मꣳहिष्ठमुभयाविनम् ॥ २ ॥ ५ (यी) ॥
[धा० १७ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ ८।१।२)

१३६२ उदु त्ये मधुमत्तमा गिरः स्तोमास ईरते ।
सत्राजितो धनसा अक्षितोतयो वाजयन्तो रथा इव ॥ १ ॥ (ऋ. ८।३।१५)

१३६३ कण्वा इव भृगवः सूर्या इव विश्वमिद्धीतमाशत ।
इन्द्रꣳ स्तोमेभिर्महयन्त आयवः प्रियमेधासो अस्वरन् ॥ २ ॥ ६ (ला) ॥
[धा० १४ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ८।३।१६)

१३६४ पर्यू षु प्र धन्व वाजसातये परि वृत्राणि सक्षणिः । द्विषस्तरध्या ऋणया न ईरसे ॥१॥
(ऋ. ९।११०।१)

१३६५ अजीजनो हि पवमान सूर्यं विधारे शक्मना पयः । गोजीरया रꣳहमाणः पुरन्ध्या ॥२॥
(ऋ. ९।११०।३)

[१३६१] (वृषभं यथा अवक्रक्षिणं) बैलाप्रमाणें शत्रूंना टक्कर देणाऱ्या (गां न जुवं) बैलाप्रमाणें शीघ्रता करून (चर्षणीसहं) शत्रूचा पराभव करणाऱ्या (विद्वेषणं) शत्रूचा द्वेष करणाऱ्या (संवननं) उपासकांनीं सेवा करण्यास योग्य (अभयं-करं मंहिष्ठं) निर्भय करणाऱ्या व मोठ्या (उभयाविनं) दोनही प्रकारचीं ऐश्वर्ये देणाऱ्या इन्द्राची स्तुति करा. ॥ २ ॥

[१३६२] (त्ये मधुमत्तमाः) तीं अत्यंत मधुर (गिरः स्तोमासः) वाणीचीं स्तोत्रें (उत् ईरते) उच्चारलीं जात आहेत. (सत्राजितः) एकदम शत्रूला जिंकणारीं (धनसा) धन देणारीं (अ-क्षित-ऊतयः) अक्षय रक्षण करणारीं (वाजयन्तः रथाः इव) युद्धांत जाणाऱ्या रथाप्रमाणें तीं स्तोत्रें म्हटलीं जात आहेत. ॥ १ ॥

[१३६३] (कण्वाः इव) कण्वांप्रमाणें (भृगवः) भृगु (धीतं विश्वं इत्) ध्यान केलेल्या व सर्वत्र असणाऱ्या इन्द्राला (आशत) प्राप्त करते झाले. (सूर्याः इव) सूर्य जसा प्रकाशानें व्यापतो, त्याप्रमाणें तो त्यांना दिसला. (प्रियमेधासः आयवः) प्रेमानें यज्ञ करणाऱ्या ऋत्विजांप्रमाणें (इन्द्रं महयन्तः) इन्द्राचें महत्त्व प्रकट करीत (स्तोमेभिः अस्वरन्) ते स्तोत्रांनीं वर्णन करूं लागले. ॥ २ ॥

[१३६४] हे सोमा ! (सु वाजसातये) उत्तम प्रकारांनीं अन्न देण्यासाठीं (प्र धन्व) पुढें तूं जा. (सक्षणिः वृत्राणि परि) साहस करणारा वीर जसा वृत्रांसारख्या शत्रूंवर चालून जातो, तसा तूं शत्रूंवर हल्ला कर. (नः ऋणया) आमचें ऋण दूर करणारा तूं (द्विषः तरध्यै ईरसे) शत्रूंना मारण्यासाठीं पुढें जातोस. ॥ १ ॥

[१३६५] हे (पवमान) सोमा ! (पयः विधारे हि) जल धारण करणाऱ्या अन्तरिक्षामध्यें (शक्मना सूर्यं अजीजनः) आपल्या शक्तिनें तूं सूर्याला उत्पन्न केलें आहेस. (गो-जीरया पुरंध्या) स्तुति करणाऱ्यांना गाई देण्याऱ्या बुद्धिनें (रंहमाणः) तूं प्रगतिमान् झाला आहेस. ॥ २ ॥

१३६६ अनु हि त्वा सुतꣳ सोम मदामसि महे समर्यराज्ये ।
वाजाꣳ अभि पवमान प्र गाहसे ॥ ३ ॥ ७ (ल) ॥

[धा० ९ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ९।११०।२)

१३६७ परि प्र धन्वेन्द्राय सोम स्वादुर्मित्राय पूष्णे भगाय ॥ १ ॥ (ऋ. ९।१०९।१)

१३६८ एवामृताय महे क्षयाय स शुक्रो अर्ष दिव्यः पीयूषः ॥ २ ॥ (ऋ. ९।१०९।३)

१३६९ इन्द्रस्ते सोम सुतस्य पेयात्क्रत्वे दक्षाय विश्वे च देवाः ॥ ३ ॥ ८ (ला) ॥

[धा० ९ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ९।१०९।२)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

१३७० सूर्यस्येव रश्मयो द्रावयित्नवो मत्सरासः प्रसुतः साकमीरते ।
तन्तुं ततं परि सर्गास आशवो नेन्द्रादृते पवते धाम किंचन ॥ १ ॥ (ऋ. ९।६९।६)

१३७१ उपो मतिः पृच्यते सिच्यते मधु मन्द्राजनी चोदते अन्तरासनि ।
पवमानः सन्तनिः सुन्वतामिव मधुमान् द्रप्सः परि वारमर्षति ॥ २ ॥ (ऋ. ९।६९।२)

[१३६६] हे (सोम) सोमा ! (महे अर्यराज्ये) मोठ्या आर्यराज्यामध्यें (त्वा सुतं अनु) तुला अनुकूल होऊनच (सं मदामसि) राहण्यामध्यें आम्ही आनंदित होत असतों. हे (पवमान) सोमा ! (वाजान् अभि प्र गाहसे) तूं बलांनीं होणाऱ्या कार्यांमध्यें जातोस. ॥ ३ ॥

[१३६७] हे सोमा ! तूं (स्वादुः) मधुर होऊन (मित्राय पूष्णे भगाय इन्द्राय) मित्र, पूषा, भग, इन्द्र यांच्याकडे जाण्यासाठीं (प्र धन्व) पुढें हो. ॥ १ ॥

[१३६८] हे सोमा ! (शुक्रः दिव्यः) तेजस्वी व स्वर्गामध्यें उत्पन्न झालेला (पीयूषः सः) पिण्यास योग्य तूं (अमृताय) अमर होण्यासाठीं (महे क्षयाय) मोठ्या स्थानाला प्राप्त करण्याच्या इच्छेनेंच (एव अर्ष) पुढें जा. ॥२॥

[१३६९] हे सोमा ! (क्रत्वे दक्षाय) ज्ञान व बल प्राप्त करण्यासाठीं (सुतस्य ते) तुझा रस (इन्द्रः पेयात्) इन्द्र पिवो व (विश्वे च देवाः) सर्व देवही पिवोत. ॥ ३ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[१३७०] (सूर्यस्य रश्मयः इवः) सूर्याच्या किरणांसारखे (द्रावयित्नवः मत्सरासः) प्रेरणा करणारे व आनंद देणारे (प्रसुतः आशवः सर्गासः) शुद्ध केलेले, पात्रांत असलेले सोमरस (ततं तन्तुं साकं परीरते) पसरलेल्या गाळणींमधून एकदम खालीं पडत आहेत. ते (इन्द्रात् ऋते) इन्द्राशिवाय (किंचन धाम) दुसरे कोणतेंहि स्थान (न पवते) पसंत करीत नाहींत. ॥ १ ॥

[१३७१] (मतिः पृच्यते) स्तुति केली जात आहे, (मधु सिच्यते) मधुर सोमरस इन्द्राला दिला जात आहे. (मन्द्रा-जनी आसनि अन्तः उप चोदते) आनंद देणारी रसाची धारा इन्द्राच्या तोंडांत सोडली जात आहे. (सन्तनिः) सतत (सुन्वतां) सोमरस काढणाऱ्या यजमानांचा (पवमानः मधुमान् द्रप्सः) शुद्ध केला जाणारा मधुर सोमरस (वारं परि अर्षति) गाळणींतून खालीं पडत आहे. ॥ २ ॥

शंसत [१३६०]- सोमयागामध्यें बलवान् अशा त्या इन्द्राचेंच स्तोत्र म्हणा व वारंवार त्याचींच स्तोत्रें म्हणा.

१० वृषभं यथा अवक्रक्षिणं [१३६१]- टक्कर मारणाऱ्या बैलाप्रमाणें सामर्थ्यवान् असलेल्या इन्द्राचीच स्तुति करा.

११ कण्वाः भृगवः धीतं विश्वं इत् आशत [१३६३] -कण्व व भृगु यांनीं त्या इन्द्राचें ध्यान केलें व त्या व्यापक देवाची उपासना केली.

याप्रमाणें इन्द्राचें वर्णन या अध्यायांत आलेलें आहे. यापैकीं जे गुण आपणांमध्यें आणतां येतील ते गुण आपल्या अंगीं आणावे. आतां अग्निचे गुण पहा —

अग्नि

१ अग्निः [१३४७]- अग्रणी, पुढें नेणारा, नेता, अग्नि.

२ पावकः [१३४७]- पवित्र करणारा, शुद्धता करणारा.

३ होता [१३४७]- हवन करणारा.

४ कविः [१३४८]- ज्ञानी, दूरदर्शी, अतीन्द्रियार्थदर्शी.

५ तनू-न-पात् [१३४८]- शरीराचें पतन न होईल असें करणारा.

६ मधुजिह्वः [१३४९]- मधुर भाषण करणारा.

७ प्रियः [१३४९]- सर्वांना प्रिय.

८ नराशंसः [१३४९]- मनुष्य ज्याची प्रशंसा करतात असा.

९ मनुर्हितः [१३५०]- मनुष्यांचें हित करणारा, मनुष्यांनीं स्थापन केलेला.

१० होता [१३५०]- हवन करणारा, बोलावणारा.

११ प्रशस्तः [१३७३]- प्रशंसित, स्तुत्य.

१२ दूरेदृक् [१३७३] दूरून दिसणारा.

१३ गृहपतिः [१३७३]- गृहस्थ, घराचा स्वामी.

१४ अथर्युः [१३७३]- प्रगतिशील, गति करणारा.

१५ सुप्रतिचक्षः [१३७४]- अत्यन्त दर्शनीय.

१६ यविष्ठः [१३७५]- तरुण.

याप्रमाणें या अध्यायामध्यें अग्निचें गुण वर्णिले आहेत, ते वाचकांनीं पहावे व शक्य होईल तें करून ते आपल्या जीवनांत आणण्याचा यत्न करून अग्निप्रमाणें तेजस्वी व्हावें. याच अध्यायांत आलेले अग्निचे आणखी वर्णन पहा —

१ हे अग्ने ! देवान् आ वह [१३४७]- हे अग्ने ! देवांना बोलावून आण.

२ यक्षि [१३४७]- यजन कर.

३ सुखतमे रथे देवान् आ वह [१३५०]- उत्तम सुखदायक रथामधून देवांना येथें आण. असें वर्णन अनेक मंत्रांतून येतें. शरीर हा सुखदायक रथ आहे. जेवढे देव विश्वांत आहेत ते सर्व देव अंशरूपानें या देहांत आहेत. उष्णता म्हणजे अग्नि असेपर्यंत या सर्व देवांचा निवास या देहांत होत असतो. देह थंड झाला म्हणजे अग्नि या देहांतून नष्ट झाला म्हणजे सर्व देव हा देह सोडून जातात. तेव्हां 'अत्यंत सुखदायक रथांतून सर्व देवांना येथें आण' याचा अर्थ शरीररूपी रथांतून आण असा समजावा.

४ यः दमे दक्षाय्यः नित्यः आस [१३७४]- हा अग्नि प्रत्येक स्थानांमध्यें बल वाढवणारा होऊन नेहेमींच राहत असतो. (दक्षाय्यः- बल वाढवणारा.)

५ अत्रसे वसवः अस्ते न्यृण्वन् [१३७४]- संरक्षणासाठीं याला वसुदेव प्रत्येक स्थानामध्यें ठेवतात. अग्नि असेपर्यंतच या देहामध्यें देवतांचें वास्तव्य असतें. हा अनुभव सर्वांना येणें शक्य आहे. तेंच वर्णन येथें आलंकारिक भाषेंत केलें आहे.

देवांचें दर्शन

अनेक देवांचीं नांवें या अध्यायामध्यें आलेलीं आहेत तीं अशीं आहेत —

१ तत् मित्रः अर्यमा भगः सविता सुवाति [१३५१] –तें धन मित्र, अर्यमा, भग व सविता हे आमच्याकडे प्रेरित करोत.

२ सु-दानवः ! प्र नु यामन् सः क्षयः सु-प्रावीः अस्तु [१३५२]- हे उत्तम दान देणारे देव हो ! तुमचें आगमन झाल्यावर तुमचा यज्ञामध्यें होणारा निवास हा आमचें उत्तम संरक्षण करणारा होवो.

३ ये नः अंहः अति पिप्रति [१३५२]- जे तुम्ही आम्हांला पापापासून दूर करीत असतां.

४ उत ये आदितिः अ-दब्धस्य व्रतस्य स्वराजः महः राजानः ईशते [१३५३]- आणि ते देव व देवमाता अदिति हे सर्व मिळून न दबल्या जाणाऱ्या व्रताचे सम्राट् आहेत, ते मोठे राजे व सर्वांचे ईश्वर आहेत.

५ हे सोम ! स्वादुः मित्राय, भगाय, पूष्णे इन्द्राय प्र धन्व [१३६७]- हे सोमा ! तूं मधुर होऊन मित्र, भग, पूषा व इन्द्र यांच्याकडे जा.

याप्रमाणें अनेक देवांचीं नांवें या अध्यायामध्यें आलेलीं आहेत. कित्येक देव धन देतात. कित्येक संरक्षण करतात. कित्येक देव साधकांना पापापासून दूर करतात. कित्येक सर्व विश्वाचें आधिपत्य करतात. यज्ञामध्यें या सर्व देवांना सोमरस अर्पण केला जात असतो.

सोम

सोमाचें वर्णन अनेक प्रकारें या अध्यायामध्यें आलेलें आहे. तें आतां पहा—

१ जागृविः ऋतं मतीनां विप्रः सोमः पुनानः चमूषु आसदत् [१३५७]- जागृत राहणारा, सत्य

स्तुतींचा ज्ञाता हा सोम गाळला गेल्यानंतर कलशामध्यें जातो. कलशामध्यें सोमरस भरून ठेवतात. हा सोम (जागृविः) जागत राहतो. अर्थात् हा प्याल्यानंतर इतका उत्साह वाढतो कीं त्या पिणाऱ्याला गुंगी येत नाहीं.

२ वाजसातये प्र धन्व [१३६४]- अन्न दान करण्यासाठीं तूं पुढें हो. सोमरस हें एक अन्नच आहे. तो प्यावयास देणें हें एक प्रकारचें अन्नाचें दानच आहे.

३ सक्षणिः वृत्राणि परि [१३६४]- साहस करणारा वीर शत्रूंवर चालून जातो, त्याप्रमाणें " द्विषः तरध्यै ईरसे " द्वेष करीत राहणाऱ्या शत्रूंना मारण्यासाठीं पुढें जातो. सोमरस पिऊन उत्साहित झालेले वीर शत्रूवर चालून जातात.

४ हे सोम ! महे अर्य-राज्ये संमदामसि [१३६६] – हे सोमा ! मोठ्या आर्यराज्यांमध्यें आम्ही संघटित होऊन आनंदित होत राहूं.

५ हे सोम ! शुक्रः दिव्यः पीयूषः सः अमृताय महे क्षयाय एव अर्ष [१३६८]- हे सोमा ! तूं तेजस्वी बलवान् व स्वर्गामध्यें उत्पन्न झालेला अमृतरूपी रस आहेस. असा तूं अमर होण्यासाठीं व मोठें निवासस्थान प्राप्त करण्यासाठीं अग्रेसर होऊन प्रगति कर.

६ हे सोम ! क्रत्वे दक्षाय सुतस्य ते इन्द्रः पेयात्, विश्वे च देवाः [१३६९] - हे सोमा ! कर्म व बल प्राप्त करण्यासाठीं तुझा रस इन्द्र व सर्व इतर देव पिवोत.

७ सूर्यस्य रश्मयः इव, द्रावयित्नवः मत्सरासः प्रसुतः आशवः सर्गासः ततं तन्तुं साकं ईरते, इन्द्रात् ऋते किंचन धाम न पवते [१३७०]- सूर्याच्या किरणांप्रमाणें पसरणारे व आनन्द देणारे सोमरस पसरलेल्या गाळणीमधून खालीं पडत आहेत. ते इन्द्राशिवाय दुसरें कोणतेंहि स्थान पसंत करीत नाहींत.

याप्रमाणें सोमरसाचें वर्णन या अध्यायामध्यें आलेलें आहे. हा सोम उत्साह वाढवणारा, सुस्ती कमी करणारा, अन्नाप्रमाणें उपयोगांत येणारा, शत्रूंना दूर करणारा, मोठ्या राष्ट्रामध्यें संघटित होऊन आनंदानें राहण्याची अवस्था देणारा, कर्मशक्ति व बल वाढवणारा असा आहे.

सोम रक्षण करतो

१ सोमः आवः [१३५८]- सोम आमचें रक्षण करतो. सोमानें जो उत्साह वाढतो, त्यानें शौर्य व वीर्य वाढतें व त्यानें रक्षण होतें.

२ प्रियसासः ऊती [१३५८]- प्रिय असे हे या सोमाचे रस आमचें रक्षण करणारे आहेत.

३ वर्धिता वर्धनः मीढ्वान् सोमः नः ज्योतिषा अभि आवित् [१३५९]- संवर्धन करणारा, वाढणारा, इच्छांची तृप्ती करणारा हा सोम आमचें आपल्या तेजानें रक्षण करो. संवर्धकशक्ति ज्याच्यामध्यें आहे तो संरक्षण करूं शकतो.

याप्रमाणें सोमाच्या संरक्षकशक्तिचें वर्णन आलेलें आहे.

सोम धन देतो

१ सोमः कारिणे न, धनं प्र यंसत् [१३५८]- कारागिराला, यज्ञ करणाऱ्याला जसें धन देतात, त्याप्रमाणें हा सोम धन देतो. हा सोम स्फूर्ति वाढवणारा असल्यामुळें सोम प्याल्यानें स्फूर्ति वाढते व तो पुष्कळ कार्य करून धन मिळवूं शकतो.

वैदिक-स्तोत्रें

वैदिक स्तोत्रांचें महत्त्व पुढें दिल्याप्रमाणें या अध्यायांत वर्णन केलें आहे तें काळजीपूर्वक पाहण्यासारखें आहे, तें आतां पहा—

१ ते मधुमत्तमाः गिरः स्तोमासः उदीरते, सत्राजितः धनसा अक्षितोतयः वाजयन्तः रथाः इव [१३६२]- तीं अत्यन्त मधुर अशीं स्तोत्रें उच्चारलीं जात आहेत. तीं शत्रूंना एकदम जिंकणारीं, धन देणारीं, अक्षय संरक्षण करणारीं, युद्धांत जाणाऱ्या रथांप्रमाणें तीं विजय देणारीं आहेत.

वेदमंत्रांच्या स्तोत्रांचें हें वर्णन अगदीं खरें आहे. इन्द्राचीं व सोमाचीं स्तोत्रें शौर्य व वीर्य आणि पराक्रम करण्याची शक्ति वाढवणारीं आहेत. अग्निचीं सूक्तें ज्ञान वाढवणारीं आहेत व तशींच तीं इतर देवतांचींहि सूक्तें अशींच विजयाचा मार्ग दाखवणारीं आहेत. मंत्रांमध्यें वर्णिलेले देवतांचे गुण उपासकांनीं आपल्या अंगीं वाढवावे व देवत्व प्राप्त करून घ्यावें. हा विजयाचा निश्चित मार्ग आहे.

सुभाषितें

१ सुसमिद्धः हविष्मते देवान् आ वह [१३४७] – प्रदीप्त होऊन यज्ञ करणाऱ्यासाठीं देवांना घेऊन ये.

२ हे पावक ! यक्षि [१३४७]- हे पवित्र करणाऱ्या देवा ! यज्ञ कर.

३ हे कवे ! तनू-न-पात् [१३४८]- हे ज्ञानी

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१३५३	७।६६।६	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१३५४	८।६४।१	प्रगाथः काण्वः	इन्द्रः	,,
१३५५	८।६४।२	प्रगाथः काण्वः	,,	,,
१३५६	८।६४।३	प्रगाथः काण्वः	,,	,,

(२)

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१३५७	९।९७।३७	पराशरः शाक्त्यः	पवमानः सोमः	त्रिष्टुप्
१३५८	९।९७।३८	पराशरः शाक्त्यः	,,	,,
१३५९	९।९७।३९	पराशरः शाक्त्यः	,,	,,
१३६०	८।१।१	प्रगाथः घोरः काण्वः	इन्द्रः	प्रगाथः-(विषमा बृहती, समा सतो बृहती)
१३६१	८।१।२	प्रगाथः घोरः काण्वः	,,	,,
१३६२	८।३।१५	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
१३६३	८।३।१६	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
१३६४	९।११०।१	त्र्यरुणस्त्रैवृष्णः त्रसदस्युः पौरुकुत्स्यः	पवमानः सोमः	पिपीलिका मध्या अनुष्टुप्
१३६५	९।११०।३	त्र्यरुणस्त्रैवृष्णः त्रसदस्युः पौरुकुत्स्यः	,,	,,
१३६६	९।११०।२	त्र्यरुणस्त्रैवृष्णः त्रसदस्युः पौरुकुत्स्यः	,,	,,
१३६७	९।१०९।१	अग्नयो धिष्ण्या ऐश्वराः	,,	द्विपदा विराट्
१३६८	९।१०९।३	अग्नयो धिष्ण्या ऐश्वराः	,,	,,
१३६९	९।१०९।२	अग्नयो धिष्ण्या ऐश्वराः	,,	,,

(३)

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१३७०	९।६९।६	हिरण्यस्तूप आंगिरसः	,,	जगती
१३७१	९।६९।१	हिरण्यस्तूप आंगिरसः	,,	,,
१३७२	९।६९।४	हिरण्यस्तूप आंगिरसः	,,	,,
१३७३	७।१।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	अग्निः	विराट्
१३७४	७।१।२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१३७५	७।१।३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१३७६	१०।१८९।१	सार्पराज्ञी	आत्मा सूर्यो वा	गायत्री
१३७७	१०।१८९।२	सार्पराज्ञी	,,	,,
१३७८	१०।१८९।३	सार्पराज्ञी	,,	,,

अथ द्वादशोऽध्यायः ।

अथ षष्ठप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ ६-२ ॥

[१]

(१-२०) १ (१-२) गोतमो राहूगणः; १ (३), ८, ११ वसिष्ठो मैत्रावरुणिः; २, ७ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ३ प्रजापतिर्वैश्वामित्रो वाच्यो वा; ४, १३ सोभरिः काण्वः; ५ मेधातिथि-मेध्यातिथी काण्वौ; ६ (१) ऋजिश्वा भारद्वाजः; ६ (२) ऊर्ध्वसद्मा आंगिरसः, ९ तिरश्चीरांगिरसः; १० सुतंभर आत्रेयः; १२, १९ नृमेध-पुरुमेधावांगिरसौ; १४ शुनःशेप आजीगर्तिः; १५ नोधा गौतमः; १६ मेध्यातिथिः काण्वः; १७ रेणुर्वैश्वामित्रः; १८ कुत्स आंगिरसः; २० अगस्त्यो मैत्रावरुणः ॥ १-२, ७, १०, १३-१४ अग्निः; ३, ६, ८, ११, १५, १७-१८ पवमानः सोमः; ४, ५, ९, १२, १६, १९, २० इन्द्रः ॥ १-२, ७, १०, १४, गायत्री; ३, ९, १९ (१-२) २० (२-३) अनुष्टुप्; ४, ६-१३ काकुभः प्रगाथः= (विषमा ककुप्, समा सतोबृहती); ५, १९ (३) बृहती; ८, ११, १५, १८ त्रिष्टुप्; १२, १६ प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती); १७ जगती; २० (१) स्कन्धोग्रीवी बृहती ॥

१३७९ उपप्रयन्तो अध्वरं मन्त्रं वोचेमाग्नये । आरे अस्मे च शृण्वते ॥ १ ॥ (ऋ. १।७४।१)

१३८० यः स्नीहितीषु पूर्व्यः संजग्मानासु कृष्टिषु । अरक्षद्दाशुषे गयम् ॥ २ ॥ (ऋ. १।७४।२)

१३८१ स नो वेदो अमात्यमग्नी रक्षतु शन्तमः । उतास्मान्पात्वंहसः ॥ ३ ॥ (ऋ. ७।१५।३)

१३८२ उत ब्रुवन्तु जन्तव उदग्निर्वृत्रहाजनि । धनञ्जयो रणेरणे ॥ ४ ॥ १ (वि) ॥

[धा० १९। उ० १ । स्व० ३] (ऋ १।७४।३)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१३७९] (अध्वरं उप प्रयन्तः) हिंसारहित यज्ञ करणारे आम्ही (आरे च अस्मे शृण्वते) दूर राहूनही आमची स्तुति ऐकणाऱ्या (अग्नये) अग्निसाठीं (मंत्रं वोचेम) मंत्र बोलत आहों. ॥ १ ॥

[१३८०] (यः पूर्व्यः) जो पूर्वीपासून जाग्रत आहे तो अग्नि (स्नीहितीषु कृष्टिषु संजग्मानासु) हिंसक शत्रू एकत्रित झाल्यावरहि (दाशुषे) दात्यासाठीं (गयं अरक्षत्) घराचें रक्षण करतो. ॥ २ ॥

[१३८१] (शन्तमः सः अग्निः) अत्यन्त सुख देणारा तो अग्नि (नः वेदः) आमचें धन (अमा-त्यं रक्षतु) जवळ असेल तें सुरक्षित ठेवो, (उत् अस्मान्) आणि आम्हांला (अंहसः पातु) पापापासून सुरक्षित राखो. ॥ ३ ॥

[१३८२] (वृत्र-हा) शत्रूला मारणारा (रणे रणे धनंजयः) प्रत्येक संग्रामामध्यें शत्रूंचा पराभव करून धन जिंकणारा (अग्निः उद्जनि) अग्नि प्रकट झाला आहे, (उत) आतां (जन्तवः ब्रुवन्तु) ऋत्विज त्याची स्तुति करोत. ॥ ४ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२]

१३८३ अग्ने युंक्ष्वा हि ये तवाश्वासो देव साधवः । अरं वहन्त्याशवः ॥ १ ॥ (ऋ. ६।१६।४३)

१३८४ अच्छा नो याह्या वहाभि प्रयांसि वीतये । आ देवान्त्सोमपीतये ॥२॥ (ऋ. ६।१६।४४)

१३८५ उदग्ने भारत द्युमदजस्रेण दविद्युतत् । शोचा वि भाह्यजर ॥ ३ ॥ २ (यी) ॥

[धा० १७ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ६।१६।४५)

१३८६ प्र सुन्वानायान्धसो मर्तो न वष्ट तद्वचः ।
अप श्वानमराधसं हता मखं न भृगवः ॥ १ ॥ (ऋ. ९।१०१।१३)

१३८७ आ जामिरत्के अव्यत भुजे न पुत्र ओण्योः ।
सरज्जारो न योषणां वरो न योनिमासदम् ॥ २ ॥ (ऋ. ९।१०१।१४)

१३८८ स वीरो दक्षसाधनो वि यस्तस्तम्भ रोदसी ।
हरिः पवित्रे अव्यत वेधा न योनिमासदम् ॥ ३ ॥ ३ (खै) ॥

[धा० २१ । उ० २ । स्व० ८] (ऋ. ९।१०१।१५)

---

[२] द्वितीयः खण्डः ।

[१३८३] हे (अग्ने देव) अग्निदेवा ! (ये तव साधवः अश्वासः) जे तुझे उत्तम सुशील घोडे (आशवः अरं वहन्ति) त्वरेनें तुला पोंचवतात त्यांनाच (युंक्ष्व हि) तूं जोड. ॥ १ ॥

[१३८४] हे अग्ने ! (नः अच्छ याहि) आमच्याजवळ सरळ ये. (वीतये सोमपीतये) अन्न भक्षण करून सोम पिण्यासाठीं (प्रयांसि अभि) हविरूपी अन्नाजवळ (देवान् आ वह) देवांना घेऊन ये. ॥ २ ॥

[१३८५] हे (भारत अग्ने) पोषण करणाऱ्या अग्नि ! (उत शोच) तूं प्रज्वलित हो. हे (अ-जर) जरा-रहित (दविद्युतत्) तेजस्वी व (द्युमत्) प्रकाशमान् अग्ने ! (अ-जस्रेण विभाहि) कमी न होणाऱ्या तेजानें प्रकाशित हो. ॥ ३ ॥

[१३८६] (सुन्वानाय अन्धसः) रस काढलेल्या सोमाविषयींचे (तत् वचः) ते प्रसिद्ध शब्द (मर्तः न वष्ट) हलका मनुष्य न ऐको. हे स्तुति करणाऱ्यांनों ! (अ-राधसं श्वानं अप हत) विघ्न करणाऱ्या कुत्र्याला मारा. (भृगवः मखं न) ज्याप्रमाणें भृगुनीं दुष्ट मखाला मारलें होतें. ॥ १ ॥

[१३८७] (जामिः) बंधुसारखा सोम (अत्के आ अव्यत) गाळणींमधून गाळला जातो. (ओण्योः भुजे पुत्रः न) रक्षण करणाऱ्या माता-पिता यांच्या बाहूंमध्यें जसा पुत्र राहत असतो. तो (योनिं आसदम्) आपल्या कलशा-मध्यें जाण्यासाठीं (सरत्) खालीं उतरत आहे. (जारः योषणां न) ज्याप्रमाणें जार स्त्रीजवळ जातो किंवा (वरः न) वर - पति - कन्येकडे जातो, त्याप्रमाणेंच सोम कलशाकडे जातो. ॥ २ ॥

[१३८८] (दक्ष-साधनः सः वीरः) बल वाढवण्याचें साधन असा तो वीर सोम (यः रोदसी वितस्तम्भ) ज्यानें द्यावापृथिवींना आपल्या तेजानें भरून टाकलें आहे. (वेधाः न) ज्याप्रमाणें यजमान आपल्या घरीं येतो त्याप्रमाणें (हरिः योनिं आसदम्) हिरव्या रंगाचा सोम कलशामध्यें आला आहे. तो (पवित्रे अव्यत) गाळणींमधून गाळला जात आहे. ॥ ३ ॥

१३८९ अभ्रातृव्यो अना त्वमनापिरिन्द्र जनुषा सनादसि । युधेदापित्वमिच्छसे ॥ १ ॥
(ऋ. ८।२१।१३)

१३९० न की रेवन्तꣳ सख्याय विन्दसे पीयन्ति ते सुराश्वः ।
यदा कृणोषि नदनुꣳ समूहस्यादित्पितेव हूयसे ॥ २ ॥ ४ (पि))
[धा० १९ । उ० १ । स्व० २] (ऋ ८।२१।१४)

१३९१ आ त्वा सहस्रमा शतं युक्ता रथे हिरण्यये ।
ब्रह्मयुजो हरय इन्द्र केशिनो वहन्तु सोमपीतये ॥ १ ॥ (ऋ ८।१।२४)

१३९२ आ त्वा रथे हिरण्यये हरी मयूरशेप्या ।
शितिपृष्ठा वहतां मध्वो अन्धसो विवक्षणस्य पीतये ॥ २ ॥ (ऋ. ८।१।२५)

१३९३ पिबा त्वꣳस्य गिर्वणः सुतस्य पूर्वपा इव ।
परिष्कृतस्य रसिन इयमासुतिश्चारुर्मदाय पत्यते ॥ ३ ॥ ५ (प) ॥
[धा २० । उ० १ । स्व० १] (ऋ. ८।१।२६)

[१३८९] हे (**इन्द्र**) इन्द्रा ! (**त्वं जनुषा अ-भ्रातृव्यः**) तूं जन्मापासूनच शत्रूरहित आहेस. (**सनात् अ-ना**) नेहेमीं नेतारहित व (**अनापिः असि**) बंधुरहित आहेस. जेव्हां (**आपित्वं इच्छसे**) तूं बंधूची इच्छा करतोस त्यावेळीं (**युधा इत्**) युद्धानेंच तें करूं इच्छतोस. ॥ १ ॥

१ **अ-भ्रातृव्यः**— ज्याला भाऊ नाहीं असा, शत्रू नाहीं असा.
२ **अ-ना**— ज्याच्यावर नियंत्रण करणारा दुसरा कोणी नाहीं.
३ **युधा इत्**— युद्ध करूनच - शत्रूंना दूर करूनच उपासकांना इन्द्र मित्र बनवतो.

[१३९०] (**रेवन्तं**) केवल धनवान् आहे एवढ्यानेंच (**सख्याय न किः विन्दसे**) तूं त्याला आपला मित्र करीत नाहींस. (**सुराश्वः ते पीयन्ति**) दारू पिणारे नास्तिक तुला दुःख देतात. (**यदा नदनुं कृणोषि**) जेव्हां ज्ञान प्राप्त करणाऱ्यांना तूं आपला मित्र करतोस, तेव्हां (**समूहसि**) त्यांना उत्तम मार्गावर चालवतोस, (**आदित्**) तेव्हां (**पिता इव हूयसे**) पित्याप्रमाणें ते तुझी स्तुति करतात. ॥ २ ।

[१३९१] हे (**इन्द्र**) इन्द्रा ! (**ब्रह्म-युजः केशिनः**) शब्दांच्या इशाऱ्यानें जोडले जाणारे, उत्तम अयाळ असलेले (**हिरण्यये रथे युक्ताः**) सुवर्णाच्या रथाला जोडलेले (**सहस्रं शतं हरयः**) हजारों व शेंकडों घोडे (**सोम पीतये त्वा आ हवन्तु**) सोम पिण्यासाठीं तुला यज्ञाच्या ठिकाणीं आणोत. ॥ १ ॥

[१३९२] हे इन्द्रा ! (**मध्वः विवक्षणस्य अन्धसः पीतये**) मधुर रसयुक्त आणि स्तुत्य सोम पिण्यासाठीं (**हिरण्यये रथे**) सुवर्णाच्या रथामध्यें (**मयूर-शेप्या शितिपृष्ठा हरी**) मोराप्रमाणें सुंदर स्वच्छ पांढरी पाठ असलेले दोन घोडे (**त्वा आवहतां**) तुला यज्ञामध्यें पोंचवोत. ॥ २ ॥

[१३९३] हे (**गिर्वणः**) प्रशंसनीय इन्द्रा ! (**परिष्कृतस्य रसिनः अस्य सुतस्य**) स्वच्छ केलेल्या रसाळ अशा या सोमरसाचें (**नु पिब**) निःसंशय तूं पान कर. तूं (**पूर्व-पाः इव**) प्रथम पिणारा आहेस. (**चारुः इयं आसुतिः**) सुन्दर असा हा सोमरस (**मदाय पत्यते**) आनन्द देण्यास योग्य आहे. ॥ ३ ॥

१३९४ आ सोता परि षिञ्चताश्वं न स्तोममप्तुरं रजस्तुरम् । वनप्रक्षमुदप्रुतम् ॥ १ ॥
(ऋ. ९।१०८।७)

१३९५ सहस्रधारं वृषभं पयोदुहं प्रियं देवाय जन्मने ।
ऋतेन य ऋतजातो विवावृधे राजा देव ऋतं बृहत् ॥ २ ॥ ६ (या) ॥
[धा० १२ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ९।१०८।८)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

१३९६ अग्निर्वृत्राणि जङ्घनद्द्रविणस्युर्विपन्यया । समिद्धः शुक्र आहुतः ॥ १ ॥ (ऋ. ६।१६।३४)

१३९७ गर्भे मातुः पितुः पिता विदिद्युतानो अक्षरे । सीदन्नृतस्य योनिमा ॥२॥ (ऋ. ६।१६।३५)

१३९८ ब्रह्म प्रजावदा भर जातवेदो विचर्षणे । अग्ने यद्दीदयद्दिवि ॥ ३ ॥ ७ (व) ॥
[धा० १० । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ३।१६।३६)

१३९९ अस्य प्रेषा हेमना पूयमानो देवो देवेभिः समपृक्त रसम् ।
सुतः पवित्रं पर्येति रेभन्मितेव सद्म पशुमन्ति होता ॥ १ ॥ (ऋ. ९।९७।१)

[१३९४] हे ऋत्विज हो ! (अश्वं न) घोड्याप्रमाणें (अप्तुरं स्तोमं) जलाला वेगानें चालवणाऱ्या प्रशंसनीय (रजस्तुरं वनप्रक्षं) तेजाला वेगानें पसरवणाऱ्या व पाण्याप्रमाणें गति करणाऱ्या (उदप्रुतं आसोत) पाण्यांत पोहणाऱ्या सोमाचा रस काढा व (परि षिंचत) त्याला पाण्यांत मिसळा. ॥ १ ॥

[१३९५] (सहस्र-धारं वृषभं) हजारों धारांनीं गाळला जाणारा बलवर्धक (पयो-दुहं प्रियं) दुधामध्यें मिसळलेल्या प्रिय अशा सोमाला (देवाय जन्मने) देवांना देण्यासाठीं शुद्ध करा. (देवः ऋतं) दिव्य व यज्ञरूप (बृहत् ऋतजातः) मोठा व यज्ञांत आणलेला (यः राजा) जो राजा सोम आहे तो (ऋतेन वि वावृधे) जलानें वाढवला जात आहे. ॥ २ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[१३९६] (समिद्धः शुक्रः) प्रज्वलित व तेजस्वी (आहुतः विपन्यया) आहुति दिलेला व ज्याची स्तुति केली आहे असा (द्रविणस्युः अग्निः) धन देणारा अग्नि (वृत्राणि जंघनत्) शत्रूंना ठार करतो. ॥ १ ॥

[१३९७] (मातुः गर्भे) मातृभूमीमध्यें (अ-क्षरे) अविनाशी यज्ञवेदीच्या ठिकाणीं (विदिद्युतानः) विशेष प्रदीप्त झालेला (पितुः पिता) द्युलोकाचा रक्षक असा हा अग्नि (ऋतस्य योनिं) यज्ञांमधील वेदीमध्यें (आसीदन्) बसला आहे. ॥ २ ॥

[१३९८] हे (जातवेदः विचर्षणे अग्ने) सर्वज्ञ, विशेष द्रष्टा अशा अग्ने ! (प्रजावत् ब्रह्म आ भर) पुत्र-पौत्रांसह असलेलें अन्न आम्हांला भरपूर दे. (यत् दिवि दीदयत्) जें द्युलोकांतील देवतांना दिलें जात असतें. ॥ ३ ॥

[१३९९] (अस्य प्रेषा हेमना) या सोमाचा प्रेरणा करणारा व सुवर्णानें (पूयमानः देवः) पवित्र होणारा तेजस्वी (रसं देवेभिः समपृक्त) रस देवांशीं मिळत आहे. (सुतः रेभन् पवित्रं पर्येति) सोमरस शब्द करीत गाळणीमधून गाळला जात आहे. (होता मिता पशुमन्ति सद्म इव) हवन करणारा यजमान स्वतः निर्माण केलेल्या पशुयुक्त घरांत जातो, तसा सोम कलशामध्यें जात आहे. ॥ १ ॥

१४०० भद्रा वस्त्रा समन्या३ वसानो महान्कविर्निवचनानि शꣳसन् ।
आ वच्यस्व चम्वोः पूयमानो विचक्षणो जागृविर्देववीतौ ॥ २ ॥ (ऋ. ९।९७।२)

१४०१ समु प्रियो मृज्यते सानौ अव्ये यशस्तरो यशसां क्षैतो अस्मे ।
अभि स्वर धन्वा पूयमानो यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ॥ ३ ॥ ८ (रि) ॥
[धा० १८ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ९।९७।३)

१४०२ एतो न्विन्द्रꣳस्तवाम शुद्धꣳशुद्धेन साम्ना ।
शुद्धैरुक्थैर्वावृध्वाꣳसꣳशुद्धैराशीर्वान्ममत्तु ॥ १ ॥ (ऋ. ८।९५।७)

१४०३ इन्द्र शुद्धो न आ गहि शुद्धः शुद्धाभिरूतिभिः ।
शुद्धो रयिं नि धारय शुद्धो ममद्धि सोम्य ॥ २ ॥ (ऋ. ८।९५।८)

१४०४ इन्द्र शुद्धो हि नो रयिꣳशुद्धो रत्नानि दाशुषे ।
शुद्धो वृत्राणि जिघ्नसे शुद्धो वाजꣳ सिषाससि ॥ ३ ॥ ९ (यी) ॥
[धा० १२ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ८।९५।९)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[१४००] (भद्रा समन्या वस्त्रा वसानः) कल्याणकारक युद्धाला योग्य अशा वस्त्रांना - तेजांना धारण करणारा (महान् कविः) मोठा ज्ञानी (नि वचनानि शंसन्) स्तुति स्तोत्रें म्हणत (विचक्षणः जागृविः) ज्ञानी व जाग्रत राहणारा सोम आहे. हे सोमा ! तो तूं (पूयमानः) पवित्र होऊन (देववीतौ) यज्ञामध्यें (चम्वोः आ वच्यस्व) भांड्यांत प्रविष्ट हो. ॥ २ ॥

[१४०१] (यशसां यशस्तरः) यशस्वी होणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ यशस्वी (क्षैतः प्रियः) भूमिवर उत्पन्न होऊन सर्वांस प्रिय झालेला (सानौ अव्ये) लोंकरीच्या श्रेष्ठ गाळणीमध्यें (अस्मे सं मृज्यते) आमच्यासाठीं ऋत्विजांकडून गाळला जात आहे. (पूयमानः त्वं उ) पवित्र होणारा तूं (धन्वा अभि स्वर) पोकळींतून शब्द करीत जा. (यूयं नः स्वस्तिभिः सदा पात) तुम्ही आमचें कल्याण करणाऱ्या साधनांनीं सदा संरक्षण करा. ॥ ३॥

[१४०२] (नु एत उ) तुम्ही लवकर या. (शुद्धेन साम्ना) आम्ही शुद्ध सामगायनानें व (शुद्धैः उक्थैः) शुद्ध मंत्रांनीं (शुद्धं इन्द्रं स्तवाम) शुद्ध इन्द्राची स्तुति करीत आहों. (वावृध्वांसं) सामर्थ्यानें वृद्धिगत होणाऱ्या इन्द्राला (शुद्धैः आशीर्वान्) शुद्ध गोदुग्धाशीं मिसळलेला सोम (ममत्तु) प्रसन्न करो. ॥ १ ॥

[१४०३] हे इन्द्रा ! तूं (शुद्धः नः आगहि) शुद्ध असलेला आमच्याजवळ ये. (शुद्धाभिः ऊतिभिः शुद्धः) शुद्ध रक्षणांच्या साधनांनींयुक्त असणारा तूं शुद्ध आहेस. (शुद्धः रयिं नि धारय) तूं शुद्ध राहून आम्हांला धन दे. हे (सोम्य) सोम पिणाऱ्या इन्द्रा ! (शुद्धः ममद्धि) तूं शुद्ध होऊन आनंद प्राप्त होईल असें कर. ॥ २ ॥

[१४०४] हे (इन्द्र) इन्द्रा ! (शुद्धः हि नः रयिं) तूं शुद्ध आहेस असा तूं आम्हांला धन दे. (शुद्धः दाशुषे रत्नानि) तूं शुद्ध दात्याला रत्नें दे. (शुद्धः वृत्राणि जिघ्नसे) तूं शुद्ध राहून शत्रूंना ठार मारतोस. (शुद्धः वाजं सिषाससि) तूं शुद्ध राहून अन्न देतोस. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४]

१४०५ अग्ने स्तोमं मनामहे सिध्रमद्य दिविस्पृशः । देवस्य द्रविणस्यवः ॥ १ ॥ (ऋ. ५।१३।२)

१४०६ अग्निर्जुषत नो गिरो होता यो मानुषेष्वा । स यक्षद्दैव्यं जनम् ॥ २ ॥ (ऋ. ५।१३।३)

१४०७ त्वमग्ने सप्रथा असि जुष्टो होता वरेण्यः । त्वया यज्ञं वि तन्वते ॥ ३ ॥ १० (रि)॥

[धा० १३ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ५।१३।४)

१४०८ अभि त्रिपृष्ठं वृषणं वयोधामङ्गोषिणमवावशंत वाणीः ।
वना वसानो वरुणो न सिन्धुर्वि रत्नधा दयते वार्याणि ॥ १ ॥ (ऋ. ९।९०।२)

१४०९ शूरग्रामः सर्ववीरः सहावान् जेता पवस्व सनिता धनानि ।
तिग्मायुधः क्षिप्रधन्वा समत्स्वषाढः साह्वान्पृतनासु शत्रून् ॥ २ ॥ (ऋ. ९।९०।३)

१४१० उरुगव्यूतिरभयानि कृण्वन्त्समीचीने आ पवस्वा पुरन्धी ।
अपः सिषासन्नुषसः स्व३र्गाः सं चिक्रदो महो अस्मभ्यं वाजान् ॥ ३ ॥ ११ (५)॥

[धा० ३० । उ० १ । स्व० ६] (ऋ. ९।९०।४)

---

[४] चतुर्थः खण्डः ।

[१४०५] (द्रविणस्यवः) धनाची इच्छा करणारे आम्ही (दिवि-स्पृशः देवस्य अग्नेः) आकाशांत व्यापणाऱ्या तेजस्वी अग्निच्या (सिध्रं स्तोमं) सिद्धि देणाऱ्या स्तोत्राला (अद्य) आज (मनामहे) म्हणत आहों. ॥ १ ॥

[१४०६] (होता यः अग्निः) हवन करणारा असा हा अग्नि (मानुषेषु आ) मानवांच्या घरांमध्यें असतो. (सः नः गिरः जुषत) तो आमची स्तुति ऐको व (दैव्यं जनं यक्षत्) दिव्य जनाला पूज्य करो. ॥ २ ॥

[१४०७] हे (अग्ने) अग्नि ! (जुष्टः वरेण्यः होता त्वं) प्रसन्न, श्रेष्ठ व हवन करणारा असा तूं (स-प्रथाः असि) सर्वांहून श्रेष्ठ आहेस. सर्व यजमान (त्वया) तुझ्या द्वारेंच (यज्ञं वितन्वते) यज्ञाचें अनुष्ठान करतात. ॥ ३ ॥

[१४०८] (त्रिपृष्ठं वृषणं) तीन सवनांमध्यें असणाऱ्या बलवान् (वयोधां) अन्न देणाऱ्या व (अंगोषिणं) शब्द करणाऱ्या सोमाची (वाणीः अभ्यवावशन्त) आमच्या वाणी स्तुति करतात. (वरुणः न) वरुणाप्रमाणें (वना वसानः) जलांमध्यें मिसळलेला (सिन्धुः रत्नधाः) गमनशील व रत्नें देणारा सोम (वार्याणि दयते) स्वीकार करण्यास योग्य अशीं धनें स्तुति करणारांस देतो. ॥ १ ॥

[१४०९] हे सोमा ! (शूरग्रामः सर्ववीरः) शूरांचा समूह, अनेक वीरांनीं युक्त (सहावान् जेता) सामर्थ्यवान् व विजयी (धनानि सनिता) धन देणारा (तिग्मायुधः क्षिप्रधन्वा) तीक्ष्ण आयुधें जवळ बाळगणारा व लवकर धनुष्य चालवणारा (समत्सु अषाळ्हः) संग्रामांमध्यें असह्य (पृतनासु शत्रून् साह्वान्) युद्धांमध्यें शत्रूंचा पराभव करणारा तूं सोम (पवस्व) कलशामध्यें गाळला जा. ॥ २ ॥

[१४१०] हे सोमा ! (उरु-गव्यूतिः) विस्तीर्ण मार्ग ज्याचा आहे असा (अभयानि कृण्वन्) निर्भय करणारा (पुरन्धी समीचीने कुर्वन्) द्यावापृथिवींना जोडून ठेवणारा (आ पवस्व) तूं गाळला जा आणि (अपः उषसः स्वः गाः सिषासन्) जल उषा सूर्य किरण व गाई यांचें पुष्टीसाठीं सेवन करीत (सं चिक्रदः) आणि शब्द करीत (महः वाजान्) पुष्कळ अन्न (अस्मभ्यं) आम्हांला दे. ॥ ३ ॥

१४११ त्वमिन्द्र यशा अस्यृजीषी शवसस्पतिः ।
त्वं वृत्राणि हꣳस्यप्रतीन्येक इत्पुर्वनुत्तश्चर्षणीधृतिः ॥ १ ॥ (ऋ. ८।९०।५)

१४१२ तमु त्वा नूनमसुर प्रचेतसꣳ राधो भागमिवेमहे ।
महीव कृत्तिः शरणा त इन्द्र प्र ते सुम्ना नो अश्नवन् ॥ २ ॥ १२ (त) ॥
[धा० १४ । उ० १ । स्व० १] (ऋ. ८।९०।६)

१४१३ यजिष्ठं त्वा ववृमहे देवं देवत्रा होतारममर्त्यम् । अस्य यज्ञस्य सुक्रतुम् ॥१॥ (ऋ. ८।१९।३)

१४१४ अपां नपातꣳ सुभगꣳ सुदीदितिमग्निमु श्रेष्ठशोचिषम् ।
स नो मित्रस्य वरुणस्य सो अपामा सुम्नं यक्षते दिवि ॥ २ ॥ १३ (ता) ॥
[धा० १४ । उ० १ । स्व० २] (ऋ. ८।१९।४)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

[५]

१४१५ यमग्ने पृत्सु मर्त्यमवा वाजेषु यं जुनाः । स यन्ता शश्वतीरिषः ॥ १ ॥ (ऋ. १।२७।७)

१४१६ न किरस्य सहन्त्य पर्येता कयस्य चित् । वाजो अस्ति श्रवाय्यः ॥ २ ॥ (ऋ. १।२७।८)

[१४११] हे (इन्द्र) इन्द्रा ! (त्वं) तूं (शवसः पतिः ऋजीषी) बलाचा स्वामी व सोमाची इच्छा करणारा (यशाः असि) असा यशस्वी आहेस. (अनुत्तः चर्षणी-धृतिः त्वं) अपराजित व सर्व मानवांना आधार असा तूं (एकः इत्) एकटाच (अप्रतीनि वृत्राणि) बलवान् अशा शत्रूंना (पुरु हंसि) मोठ्या प्रमाणांत ठार करतोस. ॥१॥

[१४१२] हे (असुर इन्द्र) बलवान् इन्द्रा ! (तं प्रचेतसं त्वा उ) त्या ज्ञानी अशा तुझ्याजवळ (भागं इव) पित्याकडे धनाचा भाग मागावा त्याप्रमाणें (राधः नूनं ईमहे) आम्ही धन मागत आहों. (कृत्तिः इव) मोठ्या अंगरख्या-प्रमाणें (ते मही शरणा) तुझें मोठें स्थान आम्हांला आश्रय देणारें आहे. (ते सुम्ना) तुझ्याकडून उत्तम मन बनवणारें सुख (नः प्राश्नुवन्) आम्हांला प्राप्त होवो. ॥ २ ॥

[१४१३] हे अग्ने ! (देवत्रा देवं) देवांमध्यें अधिक दिव्य (होतारं अमर्त्यं) हवन करणारा अमर (अस्य यज्ञस्य सुक्रतुं) या यज्ञाचा उत्तम संपादन करणारा (यजिष्ठं त्वा ववृमहे) यज्ञाचा कर्ता अशा तुझी आम्ही भक्ति करीत आहों. ॥ १ ॥

[१४१४] (अपां-न-पातं) जलांचें पतन न करणाऱ्या (सुभगं सु-दीदितिं) उत्तम भाग्यवान् व उत्तम तेजानें तेजस्वी (श्रेष्ठ-शोचिषं अग्निं उ) अशा श्रेष्ठ ज्वालांनींयुक्त अग्निची आम्ही प्रार्थना करीत आहों. (सः नः) तो आम्हांला (दिवि मित्रस्य वरुणस्य) यज्ञस्थानांत असणाऱ्या मित्र व वरुण यांच्याकडून मिळणारें (सुम्नं यक्षते) सुख देवो. (सः अपां) तो आम्हांला जलाकडून मिळणारें सुख देवो. ॥ २ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५] पञ्चमः खण्डः ।

[१४१५] हे (अग्ने) अग्नि ! (पृत्सु यं मर्त्यं अवाः) संग्रामांमध्यें ज्या माणसाचें तूं रक्षण करतोस, (वाजेषु यं जुनाः) स्पर्धेमध्यें ज्या पुरुषाला तूं प्रेरणा करतोस, (सः) तो (शश्वतीः इषः यन्ता) सदा अन्न प्राप्त करतो. ॥१॥

[१४१६] हे (सहन्त्य) शत्रूंचा पराभव करणाऱ्या अग्ने ! (अस्य कयस्य पर्येता न किः) या तुझ्या भक्ताचा पराभव करणारा कोणी नाहीं, कारण याचें (श्रवाय्यः वाजः अस्ति) यशस्वी बल प्रसिद्ध आहे. ॥ २ ॥

*

१४१७ स वाजं विश्वचर्षणिरर्वद्भिरस्तु तरुता । विप्रेभिरस्तु सनिता ॥ ३ ॥ १४ (ठा) ॥
[धा० १८ । उ० २ । स्व० २] (ऋ. १।२७।९)

१४१८ साकमुक्षो मर्जयन्त स्वसारो दश धीरस्य धीतयो धनुत्रीः ।
हरिः पर्यद्रवज्जाः सूर्यस्य द्रोणं ननक्षे अत्यो न वाजी ॥ १ ॥ (ऋ. ९।९३।१)

१४१९ सं मातृभिर्न शिशुर्वावशानो वृषा दधन्वे पुरुवारो अद्भिः ।
मर्यो न योषामभि निष्कृतं यन्त्सं गच्छते कलश उस्रियाभिः ॥ २ ॥ (ऋ. ९।९३।२)

१४२० उत प्र पिप्य ऊधरघ्न्याया इन्दुर्धाराभिः सचते सुमेधाः ।
मूर्धानं गावः पयसा चमूष्वभि श्रीणन्ति वसुभिर्न निक्तैः ॥ ३ ॥ १५ (वू) ॥
[धा २० । उ० नास्ति । स्व० ६] (ऋ. ९।९३।३)

१४२१ पिबा सुतस्य रसिनो मत्स्वा न इन्द्र गोमतः ।
आपिर्नो बोधि सधमाद्ये वृधे३ ऽस्मा२ँ अवन्तु ते धियः ॥ १ ॥ (ऋ. ८।३।१)

[१४१७] (विश्व-चर्षणिः सः) सर्व मानवांचें कल्याण करणारा तो अग्नि (अर्वद्भिः वाजं तरुता अस्तु) घोड्यांनीं युद्धांमध्यें विजय मिळवणारा होवो. (विप्रेभिः सनिता अस्तु) तसेंच ज्ञानी लोकांनीं प्रसन्न केलेला तो अग्नि आम्हांला फल देणारा होवो ॥ ३ ॥

[१४१८] (साकं उक्षः स्वसारः) एकदम कार्य करीत राहणाऱ्या ह्या अंगुली (मर्जयन्त) सोमरसाला शुद्ध करीत आहेत. (दश धीतयः) या दहा अंगुली (धीरस्य धनुत्रीः) या धैर्यधारी सोमाची हालचाल करीत आहेत. नंतर (हरिः सूर्यस्य जाः पर्यद्रवत्) हा हिरव्या रंगाचा सोम सूर्याच्या दिशांमधून गाळला जात आहे. (वाजी न अत्यः) घोड्यासारखा चपल सोम (द्रोणं ननक्षे) कलशामध्यें जात आहे. ॥ १ ॥

[१४१९] (वावशानः वृषा) देवता ज्याची इच्छा करतात असा हा बलवान् (पुरुवारः) अनेक ज्याला प्राप्त करूं इच्छित आहेत असा हा सोम (अद्भिः सं दधन्वे) पाण्याशीं मिसळला जात आहे. (मातृभिः शिशुः न) मातांशीं जसा पुत्र मिळालेला असतो किंवा (मर्यः योषां न) पुरुष तरुण स्त्रीशीं जसा मिळतो, त्याप्रमाणें सोम पाण्यांत मिसळला जातो. (निष्कृतं अभियन्) आपल्या संस्कार करण्याच्या स्थानाजवळ जाण्यासाठीं (कलशे) कलशामध्यें (उस्रियाभिः सं गच्छते) गाईच्या दुधाशीं सोमरस मिसळला जातो. ॥ २ ॥

[१४२०] (उत अघ्न्यायाः ऊधः प्रपिप्ये) आणि गाईच्या दुग्धाशयाला हा सोम अधिक पूर्ण करतो. (सु-मेधाः इन्दुः) उत्तम बुद्धिमान् हा सोम (धाराभिः सचते) धारांनीं मिसळत असतो. (गावः चमूषु मूर्धानं) गाई पात्रांमध्यें असणाऱ्या श्रेष्ठ सोमाला (निक्तैः वसुभिः न) ज्याप्रमाणें स्वच्छ वस्त्रांनीं आच्छादित करावें, त्याप्रमाणें (पयसा अभि श्रीणन्ति) आपल्या दुधानें आच्छादित करतात. ॥ ३ ॥

[१४२१] हे (इन्द्र) इन्द्रा ! (गोमतः नः रसिनः सुतस्य) गाईचें दूध ज्यांत मिळालें आहे अशा आम्ही काढलेल्या सोमरसाचें (पिब, मत्स्व) पान कर व आनंदित हो. (सधमाद्ये आपिः नः वृधे बोधि) एकत्र बसून पिण्याच्यावेळीं बंधुप्रमाणें आमचें संवर्धन करावयाचें आहे हें जाण. (ते धियः अस्मान् अवन्तु) तुझ्या बुद्धि आमचें रक्षण करोत. ॥ १ ॥

१४२२ भूयाम ते सुमतौ वाजिनो वयं मा न स्तरभिमातये ।
अस्माँ चित्राभिरवतादभिष्टिभिरा नः सुम्नेषु यामय ॥ २ ॥ १६ (ल) ॥
[धा० १४ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ८।३।२)

१४२३ त्रिरस्मै सप्त धेनवो दुदुह्रिरे सत्यामाशिरं परमे व्योमनि ।
चत्वार्यन्या भुवनानि निर्णिजे चारूणि चक्रे यदृतैरवर्धत ॥ १ ॥ (ऋ. ९।७०।१)

१४२४ स भक्षमाणो अमृतस्य चारुण उभे द्यावा काव्येना वि शश्रथे ।
तेजिष्ठा अपो मंहना परि व्यत यदी देवस्य श्रवसा सदो विदुः ॥ २ ॥ (ऋ. ९।७०।२)

१४२५ ते अस्य सन्तु केतवोऽमृत्यवोऽदाभ्यासो जनुषी उभे अनु ।
येभिर्नृम्णा च देव्या च पुनत आदिद्राजानं मनना अगृभ्णत ॥ ३ ॥ १७ (चे) ॥
[धा० ३२ । उ० १ । स्व० ७] (ऋ ९।७०।३)

॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

[१४२२] हे इन्द्रा ! (वयं ते सुमतौ) आम्ही तुझ्या अनुकूल उत्तम बुद्धिमध्यें राहून (वाजिनः भूयाम) बलवान् होऊं. (अभिमातये) शत्रूसाठीं (नः मा स्तः) आमचा नाश करूं नकोस. परंतु (अभिष्टिभिः चित्राभिः [ऊतिभिः]) इष्ट अशा सामर्थ्यवान् संरक्षणांनीं (अस्मान् अवतात्) आमचें रक्षण कर आणि (सुम्नेषु नः आयामय) सुख समृद्धिमध्यें आम्हांला वाढव. ॥ २ ॥

[१४२३] (परमे व्योमनि अस्मै) अन्तरिक्षांत राहणाऱ्या या सोमासाठीं (त्रिः सप्त धेनवः) एकवीस गाई (सत्यां आशिरं दुदुह्रिरे) योग्य दूध मिसळण्यासाठीं देतात. व हा सोम (यत्) जेव्हां (ऋतैः अवर्धत) यज्ञांनीं वाढवला जातो तेव्हां (अन्या चत्वारि भुवनानि) अन्य चार प्रकारच्या पाण्यांना (निर्णिजे चारूणि चक्रे) गाळण्यासाठीं उत्तम सहाय्यक होतो. ॥ १ ॥

[१४२४] (चारुणः अमृतस्य) उत्तम जलाची (भक्षमाणः सः) इच्छा करणारा हा सोम (उभे द्यावा) दोनही द्यु व पृथिवी यांना (काव्येन विशश्रथे) स्तुतिस्तोत्रांनीं जलानें परिपूर्ण करीत असतो. (तेजिष्ठाः अपः) तेजस्वी पाण्यांना (मंहना परिव्यत) आपल्या मोठेपणानें झांकून टाकतो (यदि) यावेळीं ऋत्विज (देवस्य सदः) या दिव्य सोमाचें स्थान (श्रवसा विदुः) यज्ञासाठीं हविर्नेयुक्त करतात. ॥ २ ॥

[१४२५] (अमृत्यवः अदाभ्यासः) अमर व न दबले जाणारे (अस्य ते केतवः) या सोमाचे ते किरण (उभे जनुषी अनु सन्तु) दोनही प्राण्यांना सुरक्षित ठेवतात. (येभिः) ज्या किरणांनीं (नृम्णा च देव्या च) सोम आपल्या सामर्थ्यांना व देवांना देण्याच्या अन्नांना (पुनते) देवांजवळ प्रेरित करतो. (आत् इत्) नंतर (राजानं) सोम राजाला (मननाः अगृभ्णत) स्तुति प्राप्त होतात. ॥ ३ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६]

१४२६ अभि वायुं वीत्यर्षा गृणानो३ऽभि मित्रावरुणा पूयमानः ।
अभी नरं धीजवनं रथेष्ठामभीन्द्रं वृषणं वज्रबाहुम् ॥ १ ॥ (ऋ. ९।९७।४९)

१४२७ अभि वस्त्रा सुवसनान्यर्षाभि धेनूः सुदुघाः पूयमानः ।
अभि चन्द्रा भर्तवे नो हिरण्याभ्यश्वान्रथिनो देव सोम ॥ २ ॥ (ऋ. ९।९७।५०)

१४२८ अभी नो अर्ष दिव्या वसून्यभि विश्वा पार्थिवा पूयमानः ।
अभि येन द्रविणमश्नवामाभ्यार्षेयं जमदग्निवन्नः ॥ ३ ॥ १८ (खे) ॥
[धा० २१ । उ० २ । स्व० ७] (ऋ. ९।९७।५१)

१४२९ यज्जायथा अपूर्व्य मघवन्वृत्रहत्याय ।
तत्पृथिवीमप्रथयस्तदस्तभ्ना उतो दिवम् ॥ १ ॥ (ऋ. ८।८९।५)

१४३० तत्ते यज्ञो अजायत तदर्क उत हस्कृतिः ।
तद्विश्वमभिभूरसि यज्जातं यच्च जन्त्वम् ॥ २ ॥ (ऋ. ८।८९।६)

---

[६] षष्ठः खण्डः ।

[१४२६] हे सोमा ! (गृणानः) स्तुति केल्यानंतर तूं (वीति वायुं अभि अर्ष) पिण्यासाठीं वायुजवळ जा. (पूयमानः मित्रावरुणौ अभि) स्वच्छ केल्यानंतर मित्र व वरुण यांच्याजवळ जा. (नरं धी-जवनं) सर्वांचा नेता व बुद्धिला वेग देणाऱ्या (रथेष्ठां अभि) रथामध्यें बसलेल्या अश्विनीकुमारांजवळ जा, तसेंच (वृषणं वज्र-बाहुं इन्द्रं अभि) बलवान्, वज्रासारखे बाहु ज्याचे आहेत अशा इन्द्राजवळहि जा. ॥ १ ॥

[१४२७] हे (देव सोम) दिव्य सोमा ! तूं आम्हांस (सु वसनानि वस्त्रा अभ्यर्ष) उत्तम पांघरण्याजोगीं वस्त्रें दे. (पूयमानः) स्वच्छ होणारा तूं (सुदुघाः धेनूः अभि) उत्तम दूध देणाऱ्या गाई दे. (भर्तवे) भरणपोषणासाठीं (नः चन्द्रा हिरण्या अभि) आम्हांला तेजस्वी सोनें दे आणि (रथिनः अश्वान् अभि) रथासह घोडे दे. ॥ २ ॥

[१४२८] हे सोमा ! (पूयमानः) गाळला जाणारा तूं (नः दिव्या वसूनि अभ्यर्ष) आम्हांला दिव्य धनें दे. (पार्थिवा विश्वा अभि) पृथिवीवरील सर्व ऐश्वर्यें दे. (येन द्रविणं अश्नुवाम अभि) ज्या सामर्थ्यानें आम्ही धन मिळवूं तें सामर्थ्य आम्हांस दे. (जमदग्निवत् आर्षेयं नः) जमदग्निप्रमाणें ऋषिचें धनही आम्हांला दे. ॥ ३ ॥

[१४२९] (अपूर्व्य मघवन्) हे अपूर्व इन्द्रा ! (वृत्रहत्याय यत् जायथाः) शत्रूंचा नाश करण्यासाठीं जेव्हां तूं प्रकट झालास तेव्हां (तत् पृथिवीं अ प्रथयः) तूं पृथिवीला दृढ केलीस (उत् उ तत् दिवं अस्तभ्नाः) आणि द्युलोकाला वर स्तब्ध केलेंस. ॥ १ ॥

[१४३०] हे इन्द्रा ! (तत् ते यज्ञः अजायत) त्यावेळीं तुझ्यासाठीं यज्ञ झाले. (उत तत् हस्कृतिः अर्कः) तेव्हां दिवस करणारा सूर्य झाला. (यत् जातं यत् जन्त्वं) जें झालें व जें होणार आहे (तत् विश्वं अभिभूः असि) त्या सर्वांचा तूं पराभव करणारा आहेस. ॥ २ ॥

१४३१ आमासु पक्वमैरय आ सूर्यं रोहयो दिवि ।
घर्मं न सामं तपता सुवृक्तिभिर्जुष्टं गिर्वणसे बृहत् ॥ ३ ॥ १९ (पे) ॥
[धा० २० । उ० १ । स्व० ७] (ऋ. ८।८९।७)

१४३२ मत्स्यपायि ते महः पात्रस्येव हरिवो मत्सरो मदः ।
वृषा ते वृष्ण इन्दुर्वाजी सहस्रसातमः ॥ १ ॥ (ऋ. १।१७५।१)

१४३३ आ नस्ते गन्तु मत्सरो वृषा मदो वरेण्यः ।
सहावाँ इन्द्र सानसिः पृतनाषाडमर्त्यः ॥ २ ॥ (ऋ. १।१७५।२)

१४३४ त्वँ हि शूरः सनिता चोदयो मनुषो रथम् ।
सहावान्दस्युमव्रतमोषः पात्रं न शोचिषा ॥ ३ ॥ २० (वि) ॥
[धा० २९ । उ० ३ । स्व० ३] (ऋ. १।१७५।३)

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

॥ इति षष्ठप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ ६-२ ॥

॥ द्वादशोऽध्यायः समाप्तः ॥ १२ ॥

[१४३१] हे इन्द्रा ! (आमासु पक्वं ऐरयः) अपक्व गाईमध्यें परिपक्व दूध तूं उत्पन्न केलेंस. (दिवि सूर्यं अरोहयः) द्युलोकामध्यें सूर्याला चढवलेंस. (घर्मं सामं न) ज्याप्रमाणें प्रवर्ग्याला तापवितात त्याप्रमाणें (सु वृक्तिभिः तपत) उत्तम स्तुतिनीं इन्द्राला तापवा, उत्साहित करा. (गिर्वणसे जुष्टं बृहत्) स्तुत्य इन्द्राला आनंद देण्यासाठीं बृहत् सामाचें गायन करा. ॥ ३ ॥

[१३३२] हे (हरिवः) घोडे ज्याच्याजवळ आहेत अशा इन्द्रा ! (महः पात्रस्य इव ते) मोठें पात्र असल्यासारखा तूं मोठा आहेस. (वृष्णः ते) बलवान् अशा तुला (मत्सरः मदः वृषा इन्दुः) आनंददायक हर्षवर्धक बल वाढवणारा सोमरस जो (वाजी सहस्रसातमः) बलवान् सहस्रावधि दानें देणारा आहे तो सोम (अपायि मत्सि) पी व आनंदित हो. ॥ १ ॥

[१४३३] हे (इन्द्रः ते) इन्द्रा ! तुझ्यासाठीं तयार केलेला हा (वृषा मदः) बलवर्धक आनंददायक (वरेण्यः सहावान्) श्रेष्ठ व सामर्थ्यवान् (सानसिः पृतनाषाट्) सेवन करण्याजोगा व शत्रूंना पराभूत करणारा (अमर्त्यः मत्सरः गन्तु) अमर व आनंद देणारा सोमरस तुला प्राप्त होवो. ॥ २ ॥

[१४३४] हे इन्द्रा ! (त्वं हि शूरः सनिता) तूं शूर आहेस व दाताही आहेस. (मनुषः रथं चोदयः) मनुष्याच्या मनोरथांना उत्तम प्रेरणा कर. (सहावान्) सहाय्यता करणारा होऊन ([अग्निः] शोचिषा पात्रं न) अग्नि आपल्या ज्वालेनें पात्र जाळतो त्याप्रमाणें (दस्युं अव्रतं ओषः) दुष्ट व व्रतपालन न करणाऱ्याला भस्म करून टाक. ॥ ३ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति द्वादशोऽध्यायः ॥

द्वादश अध्याय

या अध्यायांत इन्द्र देवतेचें वर्णन करणारे जे मंत्र आहेत, त्यांत इन्द्राचें असें वर्णन आलेलें आहे—

इन्द्र

१ हे इन्द्र ! त्वं जनुषा अ-भ्रातृव्यः [१३८९]- हे इन्द्रा ! तूं जन्मापासून शत्रूरहित आहेस. तुला कोणीहि शत्रु नाहीं. येथें " भ्रातृव्य " शब्द भाऊबंदकीचा भाव दाखवणारा शब्द आहे. भावाभावांमध्यें वैर होणें स्वाभाविक असतें असें वाटतें. वैदिककाळामध्येंहि " भ्रातृव्य " पद वैरभाव दाखवणारें होतें. मूळापासून इन्द्राला कोणी बंधु नाहीं, ज्याच्याशीं द्वेष होऊं शकेल.

२ सनात् अ-ना [१३८९]- नेहमीं तुझ्यावर नेतृत्व करणारा कोणी नाहीं.

३ अनापिः असि [१३८९]- तूं बंधुरहित आहेस. तुला कोणीहि बंधु नाहीं, सहाय्यक कोणीहि नाहीं.

४ आपित्वं इच्छसे युधा इत् [१३८९]- तूं जेव्हां बंधु असावे असें इच्छितोस, तेव्हां युद्धानेंच तें करतोस. युद्ध करून शत्रु दूर करतो व आपले मित्र बनवतो.

इन्द्राला भाऊ नाहीं, नेता नाहीं, मित्र नाहीं, असा हा इन्द्र एकटाच आहे. पण तो आपल्या अपार शक्तिनें सर्वांत अधिक सामर्थ्यवान् आहे व एकटाच सर्व कांहीं करावयाचें तें करून दाखवतो. त्याला भाऊ, मित्र अथवा नेता दुसरा कोणीहि नाहीं व तो सर्व कांहीं करतो यावरून त्याच्या अपार सामर्थ्याचा बोध होतो. तो एकटा असला तरी सर्वांहून अधिक सामर्थ्यशाली आहे, यासाठीं तो एकटाच सर्व कांहीं करूं शकतो.

५ रेवन्तं सख्याय न किः विन्दसे [१३९०]- केवल कोणी धनवान् आहे म्हणून तूं त्याला आपला मित्र बनवीत नाहींस. तर त्याच्यामध्यें शुभ गुण काय आहेत हें तूं पाहतोस व जो गुणवान् असेल त्यालाच मित्र बनवतोस.

६ यदा नदनुं कृणोषि, समूहसि, आदित् पिता इव हूयसे [१३९०]- जेव्हां तूं ज्ञान प्राप्त करणाऱ्याला मित्र करतोस, तेव्हां त्याला सन्मार्गानें चालवून समृद्ध करतोस, तेव्हां लोक तुझी पित्याप्रमाणें स्तुति करतात. कारण पिता आपल्या मुलांना सन्मार्गावरून चालवतो व त्यांची उन्नति करतो.

७ हे इन्द्र ! त्वं शवसः पतिः यशाः असि [१४११] – हे इन्द्रा ! तूं बलवान् आहेस व त्यामुळें यशस्वीहि आहेस.

८ अनुत्तः चर्षणीधृतिः त्वं एकः इत् अप्रतीनि, पुरु वृत्राणि हंसि [१४११]- पराजित न होणारा व सर्व मानवांचें धारण करणारा असा एकटाच तूं पुष्कळ बलवान् शत्रूंना ठार करतोस.

९ ते धियः अस्मान् अवन्तु [१४२१]- तुझ्या बुद्धि आमचें रक्षण करोत.

१० वयं ते सुमतौ वाजिनः भूयाम [१४२२]- आम्ही तुझ्या अनुकूलतेनें बलवान् होऊं.

११ नः मा स्तः [१४२२]- आमचा नाश करूं नकोस.

१२ अभिष्टिभिः चित्राभिः [ऊतिभिः] अस्मान् अवतात् [१४२२]- इष्ट सामर्थ्यवान् व विलक्षण संरक्षणाच्या साधनांनीं आमचें संरक्षण कर.

१३ सुम्नेषु नः आयामय [१४२२]- सुखसमृद्धींमध्यें आम्हांला वाढव.

१४ हे इन्द्र ! शुद्धः नः रयिं, शुद्धः दाशुषे रत्नानि [१४०४]- हे इन्द्रा ! तूं शुद्ध असा आम्हांला धन दे, शुद्ध असा तूं दात्याला रत्नें देतोस.

१५ शुद्धः वृत्राणि जिघ्नसे [१४०४]- शुद्ध असा तूं शत्रूंना मारतोस.

१६ शुद्धः वाजं सिषाससि [१४०४]- शुद्ध असा तूं अन्न देतोस.

१७ यत् जातं यत् जन्त्वं तत् विश्वं अभिभूः असि [१४३०]- जें झालेलें व जें होणारें आहे त्या सर्वांचा तूं पराभव करणारा आहेस.

१८ हे अपूर्व्य ! मघवन् ! यत् वृत्रहत्याय त्वं जायथाः, तत् पृथिवीं अप्रथयः, उत दिवं अस्तभ्नाः [१४२९]- हे अपूर्व इन्द्रा ! शत्रूचा नाश करण्यासाठीं जेव्हां तूं तयार झालास, तेव्हां पृथिवीला दृढ केलीस व द्युलोकाला वर स्तब्ध करून ठेवलेंस.

१९ हे इन्द्र ! त्वं शूरः सनिता [१४३४]- हे इन्द्रा ! तूं शूर आहेस व दाता आहेस.

२० मनुषः रथं चोदय [१४३४]- मनुष्यांचे मनोरथ सिद्ध होतील, अशी प्रेरणा त्यांना दे.

२१ सहावान् अव्रतं दस्युं ओषः [१४३४]- तूं सामर्थ्यवान् होऊन नियम पालन न करणाऱ्या दुष्टांना नष्ट करून टाक.

२२ हे असुर इन्द्र ! प्रचेतसं त्वा भागं इव राधः नूनं ईमहे [१४१२]- हे बलवान् इन्द्रा ! ज्ञानवान् असा

तुझ्याजवळ आम्ही धनाचा भाग मागत आहों. आपल्या वडिलांकडे जसा मागतात, तसा धनाचा भाग आम्हीं मागत आहों.

२३ ते मही शरणा [१४१२]- तुझें मोठें शरण जाण्याजोगें स्थान आहे.

२४ ते सुम्ना नः प्राश्नुवन् [१४१२]- तुझ्याजवळ उत्तम मन आम्ही मागत आहों.

२५ आमासु पक्वं पेरयः [१४३१]- तूं गाईमध्यें पक्व दूध उत्पन्न केलें आहेस.

२६ दिवि सूर्यं अरोहयः [१४३१]- आकाशामध्यें सूर्याला वर चढवलें आहेस.

२७ तत् ते यज्ञः अजायत [१४३०]-तेव्हां तुझ्यासाठीं यज्ञ सुरू झाला आहे. तूं मोठा प्रतापी असल्यामुळें यज्ञ करून तुझा सन्मान लोक करूं लागले.

२८ गिर्वणसे जुष्टं बृहत् [१४३१]- प्रशंसनीय इन्द्राला आनंद देण्यासाठीं बृहत् सामाचें गायन केलें जातें.

असें हें इन्द्राचें वर्णन मंत्रांनीं केलेलें आहे. या इन्द्रासाठीं यज्ञ करतात व त्यामध्यें त्याला पिण्यास सोमरस देतात.

इन्द्राला सोम

१ वाजी सहस्रसातमः अपायि मत्सि [१४३२] बलवान् व सहस्रावधी दानें देणारा इन्द्र सोमरस पितो व आनंदित होतो.

२ हे इन्द्र ! ते वृषा मदः वरेण्यः सहावान् सानसिः पृतनाषाट्, अमर्त्यः मत्सरः गन्तु [१४३३]- हे इन्द्रा ! तुझ्यासाठीं तयार केलेला हा बलवान् व आनंद देणारा, श्रेष्ठ व सामर्थ्ययुक्त, सेवन करण्याजोगा, शत्रूंचा पराभव करणारा अमर आल्हाददायक सोमरस आहे तो तुला प्राप्त होवो.

३ त्वं पूर्वपाः असि । इयं चारुः आसुतिः मदाय पत्यते [१३९३]- तूं प्रथम पिणारा आहेस. सुन्दर असा हा सोमरस तुला आनंद देण्यास योग्य आहे.

४ शुद्धेन साम्ना, शुद्धैः उक्थैः, शुद्धं इन्द्रं स्तवाम। वावृध्वांसं शुद्धः आशीर्वान् ममत्तु [१४०२]- शुद्ध सामगायनानें, शुद्ध स्तोत्रांनीं, शुद्ध इन्द्राची आम्ही स्तुति करतों. आत्मसामर्थ्यानें वाढणाऱ्या इन्द्राला शुद्ध गाईंच्या दुधाशीं मिसळलेला सोमरस प्रसन्न करो.

५ हे इन्द्र ! शुद्धः नः आगहि । शुद्धाभिः ऊतिभिः शुद्धः रयिं नि धारय । शुद्धः ममद्धि [१४०३]- हे इन्द्रा ! तूं शुद्ध असा आमच्याजवळ ये. शुद्ध संरक्षणाच्या साधनांनीं शुद्ध होऊन आम्हांला धन दे आणि शुद्ध होऊन सोम पिऊन आनंदित हो.

६ हे इन्द्र ! नः रसिनः गोमतः सुतस्य पिब, मत्स्व । सधमाद्ये आपिः न वृधे बोधि [१४२१]- हे इन्द्रा ! गाईंचें दूध ज्यांत मिसळलें आहे असा आम्ही काढलेला सोमरस पी व आनंदित हो. एकत्र बसून पिण्याच्या ठिकाणीं - यज्ञस्थानामध्यें - मित्राप्रमाणें आमचें संवर्धन करावयाचें आहे हें जाण.

७ हे इन्द्र ! ब्रह्मयुजः केशिनः हिरण्यये रथे युक्ताः सहस्रं शतं हरयः सोम-पीतये त्वा वहन्तु [१३९१]- हे इन्द्रा ! शब्दांच्या इशाऱ्यानें जोडले जाणारे, उत्तम आयाळ असलेले सुवर्णाच्या रथाला जोडलेले हजारों व शेंकडों घोडे सोम पिण्यासाठीं तुला वाहून नेवोत.

८ मध्वः विवक्षणस्य अन्धसः पीतये हिरण्यये रथे मयूर-शेप्या शितिपृष्ठा हरी त्वा आ वहताम् [१३९२]- मधुर रसयुक्त प्रशंसनीय सोमरस पिण्यासाठीं सुवर्णाच्या रथामधून मोराप्रमाणें सुंदर आयाळ असलेले पांढऱ्या पाठीचे दोन घोडे तुला पोंचवोत.

याप्रमाणें इन्द्राचें सोमरस पिण्यासाठीं यज्ञामध्यें जाण्याचें वर्णन आहे.

अग्नि

अग्नि देवतेचें वर्णन या अध्यायामध्यें असें आलेलें आहे—

१ आरे असे शृण्वते अग्नये मंत्रं वोचेम [१३७९] –दूर राहूनहि आमचें म्हणणें ऐकणाऱ्या अग्निसाठीं आम्ही मंत्र म्हणत आहों. मंत्र म्हणून त्याची स्तुति करीत आहों.

२ पूर्व्यः स्नीहितीषु कृष्टिषु संजग्मानासु दाशुषे गयं अरक्षत् [१३८०]- पूर्वीपासून हिंसक शत्रुसैन्य एकत्रित झाल्यावरहि दानी मनुष्याचें घर हा अग्नि रक्षण करीत असतो.

३ शंतमः सः अग्निः नः वेद, अमा-त्यं रक्षतु उत अस्मान् अंहसः पातु [१३८१]- अत्यन्त सुखमय शान्ति देणारा तो अग्नि आमचें धन व जें आमच्याजवळ आहे तें सर्व सुरक्षित राखो व आम्हांला पापापासून दूर ठेवो.

४ वृत्रहा रणे रणे धनंजयः अग्निः उदजनि [१३८२] –शत्रूचा नाश करणारा व प्रत्येक युद्धांत धन मिळवून देणारा अग्नि प्रकट झाला आहे.

५ हे भारत अग्ने ! उत् शोच ! हे अजर ! दवि-द्युतत् द्युमत् अजस्रेण वि भाहि [१३८५]–हे भरणपोषण

करणाऱ्या अग्ने ! तूं प्रज्वलित हो. हे जरारहित तेजस्वी व प्रकाशमान् अग्ने ! कमी न होणाऱ्या तेजानें प्रकाशित हो.

६ समिद्धः शुक्रः आहुतः द्रविणस्युः अग्निः वृत्राणि जंघनत् [१३९६]- प्रज्वलित तेजस्वी आहुति दिलेला, धन देणारा अग्नि शत्रूंना ठार मारतो.

७ हे अग्ने ! पृत्सु यं मर्त्यं अवाः, वाजेषु यं जुनाः, सः शश्वतीः इषः यन्ता [१४१५]- हे अग्ने ! तूं संग्रामांमध्यें ज्या माणसाचें रक्षण केलेंस, स्पर्धेमध्यें ज्याला तूं उत्तम प्रेरणा केलीस, तो सदा अन्न प्राप्त करतो.

८ हे सहन्त्य ! अस्य कयस्य पर्येता न किः । श्रवाय्यः वाजः अस्ति [१४१६]- हे शत्रूंचा पराभव करणाऱ्या अग्ने ! या तुझ्या भक्ताचा पराभव करणारा कोणीहि नाहीं. याचें यशस्वी बल प्रसिद्ध आहे.

९ सः विश्वचर्षणिः अर्वद्भिः वाजं तरुता अस्तु, विप्रेभिः सनिता अस्तु [१४१७]- तो सर्व मानवांचें कल्याण करणारा अग्नि घोडयांनीं युद्धामध्यें विजय मिळविणारा असो व ज्ञानी लोकांनीं प्रसन्न केलेला असो.

१० हे अग्ने ! प्रजावत् ब्रह्म आ भर [१३९८]- हे अग्ने ! पुत्रपौत्रांसह असणारें अन्न आम्हांला भरपूर दे.

११ होता अग्निः मानुषेषु आ। सः नः गिरः जुषत। दैव्यं जनं यक्षत् [१४०६]- हवन ज्यांत होत आहे असा अग्नि मानवांच्या घरांमध्यें असतो. तो आमची स्तुति ऐको व दिव्य जनाला अधिक पवित्र करो.

१२ अपां नपातं सुभगं सुदीदितिं श्रेष्ठशोचिषं अग्निं [१४१४]- कर्माचें पतन न करणारा, उत्तम भाग्यवान्, तेजस्वी, प्रकाशमान् अग्निची आम्ही प्रार्थना करतों.

१३ सः नः द्युम्नं यक्षते [१४१४]- तो आम्हांला सुख देतो.

१४ हे अग्ने ! जुष्टः वरेण्यः होता त्वं सप्रथाः असि, त्वया यज्ञं वितन्वते [१४०७]- हे अग्ने ! प्रसन्न, श्रेष्ठ व हवन करणारा तूं सर्वांहून थोर आहेस, तुझ्या सहाय्यानेंच यज्ञाचें अनुष्ठान होतें.

१५ हे अग्ने ! ये तव साधवः आशवः अश्वासः अरं वहन्ति, युंक्ष्व हि [१३८३]- हे अग्ने ! जे तुझे उत्तम सुशिक्षित शीघ्रगामी घोडे त्वरेनें तुला नेतात, त्यांना तूं जोड.

१६ हे अग्ने ! देवान् प्रयांसि अभि आवह [१३८४] – हे अग्ने ! देवांना यज्ञांमध्यें घेऊन ये.

याप्रमाणें अग्निचें वर्णन या अध्यायामध्यें आहे. तें वाचकांनीं पहावें.

देवांसाठीं सोम

१ गृणानः वीति वायुं अभि अर्ष [१४२६]- हे सोमा ! स्तुति केल्यानंतर पिण्यासाठीं वायुजवळ जा.

२ पूयमानः मित्रावरुणौ अभि अर्ष [१४२६]- स्वच्छ केल्यानंतर मित्र व वरुण यांच्याजवळ जा.

३ नरं धीजवनं रथेष्ठां अभि अर्ष [१४२६]- नेत्या बुद्धिला वेग देणाऱ्या व रथांत बसणाऱ्या अश्विनौदेवांकडे जा.

४ वृषणं वज्रबाहुं इन्द्रं अभि अर्ष [१४२६]- बलवान् वज्रासारखे बाहु असलेल्या इन्द्रजवळ जा.

याप्रमाणें सोमरस देवांना देण्यासंबंधींचें वर्णन मंत्रांत आहे.

सोम

सोमासंबंधींचें वर्णन आतां पहा —

१ दक्षसाधनः सः वीरः रोदसी वि तस्तम्भ [१३८८]- बल वाढवण्याचें साधन असा तो शूर सोम आपल्या तेजानें द्यावापृथिवींना भरून टाकतो.

२ हरिः योनिं आसदम् [१३८८]- हिरव्या रंगाचा सोम कलशामध्यें जात आहे.

३ पवित्रे अव्यत [१३८८]- सोम गाळणीमधून गाळला जात आहे.

४ अप्तुरं स्तोमं रजस्तुरं वनप्रक्षं उदप्रुतं आसोत, परि षिञ्चत [१३९४]- पाण्यामध्यें त्वरेनें मिसळण्याची इच्छा करणाऱ्या, तेजस्वी, पात्रांत राहणाऱ्या सोमरसाला काढून त्यांत पाणी मिसळा.

५ सहस्रधारं वृषभं पयोदुहं प्रियं देवाय जन्मने [१३९५]- हजारों धारांनीं गाळला जाणारा बलवर्धक दुधामध्यें मिसळलेला असा प्रिय सोम देवांना देण्यासाठीं शुद्ध करा.

६ अस्य प्रेषा हेमना पूयमानः देवः रसं देवेभिः समपृक्त । सुतः रेभन् पवित्रं पर्येति [१३९९]- या सोमाचा प्रेरणा करणारा व सुवर्णानें पवित्र होणारा, तेजस्वी रस देवांशीं मिळत आहे. हा सोमरस शब्द करीत गाळणीमधून गाळला जात आहे.

सोम गाळणारे ऋत्विज हातामध्यें सोन्याची आंगठी घालीत असत. त्या सोन्याचा स्पर्श सोमरसाला झाल्यानें सोमरस शुद्ध होतो हें " हेमना पूयमानः " या शब्दांवरून दिसते. अथवा अन्य रीतिनें सोमरसाशीं सोन्याचा संबंध आणीत असतील, पण सोमरसाला सोन्याचा स्पर्श आवश्यक समजला जात असे, हें खरें आहे.

७ भद्रा समन्या वस्त्रा वसानः महान् कविः नि वचनानि शंसन् विचक्षणः जागृविः पूयमानः देववीतौ चम्वोः आ वच्यस्व [१४००]– कल्याणकारक, युद्धाला योग्य अशा वस्त्रांना - तेजांना - धारण करणारा, मोठा ज्ञानी, स्तुति स्तोत्रें म्हणत, ज्ञानी असून जागृत राहणारा सोम पवित्र होऊन - यज्ञामध्यें कळशीमध्यें गाळल्यानंतर पडतो.

८ त्रिपृष्ठं वृषणं वयोधां अंगोषिणं वाणीः अभि अवावशन्त [१४०८]– तीन सवनांमध्यें असणाऱ्या, बलवान् व अन्न देणाऱ्या आणि शब्द करणाऱ्या सोमाची आमच्या वाणी स्तुति करीत आहेत.

९ वना वसानः सिन्धुः रत्नधाः वार्याणि दयते [१४०८]– जलामध्यें मिसळलेला, प्रगतिशील व रत्नें देणारा सोम स्वीकार करण्यास योग्य धनें देतो.

१० शूरग्रामः, सर्ववीरः, सहावान्, जेता, धनानि सनिता, तिग्मायुधः क्षिप्र-धन्वा, समत्सु अषाळहः, पृतनासु शत्रून् साह्वान् पवस्व [१४०९]– शूरांच्या समूहानें व अनेक वीरांनीं युक्त, सामर्थ्ययुक्त व विजयी, धनें देणारा, तीक्ष्ण आयुधें जवळ बाळगणारा, लवकर धनुष्य चालवणारा, संग्रामांमध्यें शत्रूला असह्य, युद्धांमध्यें शत्रूंचा पराभव करणारा सोम गाळला जात आहे. सर्व देववीर सोमरस पिऊन लढाईवर जात व शौर्याचीं कामें करीत, म्हणून हीं शौर्याचीं कामें सोमच करतो असें आलंकारिक वर्णन येथें केलें आहे.

११ वावशानः वृषा पुरुवारः अद्भिः संदधन्वे [१४१९]– देव ज्याची इच्छा करतात असा बलवान् सोम पुष्कळांना पाहिजे आहे असा पाण्याशीं मिसळला जात आहे.

१२ निष्कृतं अभियन् कलशे उस्रियाभिः सं गच्छते [१४१९]– आपल्या संस्कार करण्याच्या स्थानाजवळ जाण्यासाठीं, कलशामध्यें गाईंच्या दुधाशीं मिसळला जाऊन सोम राहतो.

१३ अघ्न्यायाः ऊधः प्रापिप्ये [१४२०]– गाईच्या दुग्धाशयाला हा सोम अधिक पूर्ण करतो.

१४ सुमेधाः इन्दुः धाराभिः सचते [१४२०]– उत्तम बुद्धिमान् हा सोम धारांनीं मिसळला जातो.

१५ गावः चमूषु मूर्धानं पयसा अभि श्रीणन्ति [१४२०]– गाई भांड्यांमध्यें या श्रेष्ठ सोमाला दुधानें आच्छादित करतात. सोमरसामध्यें दूध मिसळलें जातें.

१६ परमे व्योमनि अस्मै त्रिः सप्त धेनवः सत्यां आशिरं दुदुह्रिरे [१४२३]– अन्तरिक्षांत - पर्वतावर ऊंच ठिकाणीं राहणाऱ्या या सोमासाठीं एकवीस गाई उत्तम दूध मिसळण्यासाठीं देतात.

१७ चारुणः अमृतस्य भक्षमाणः सः उभे द्यावा काव्येन वि शश्रथे [१४२४]– उत्तम जलाची इच्छा करणारा हा सोम दोनही द्यावापृथिवी यांना आपल्या स्तुतिनें परिपूर्ण करीत असतो.

१८ तेजिष्ठाः अपः मंहना परिव्यत [१४२४]– तेजस्वी पाण्याला आपल्या महात्म्यानें झांकून टाकतो. पाण्यांत सोमरस मिसळला जातो.

१९ हे सोम देव ! सु वसनानि वस्त्रा अभ्यर्ष [१४२७]– हे सोम देवा ! उत्तम पांघरावयाचीं वस्त्रें दे.

२० पूयमानः सुदुघाः धेनूः अभि अर्ष [१४२७]– स्वच्छ झाल्यानंतर उत्तम दूध देणाऱ्या गाईंना प्राप्त हो. गाईंच्या दुधांत मिसळला जा.

२१ नः चन्द्रा हिरण्या अभि [१४२७]– आम्हांला चमकणारीं सोन्याचीं नाणीं दे.

२२ रथिनः अश्वान् अभि [१४२७]– रथांना जोडावयाचे घोडे दे.

२३ पूयमानः नः दिव्या वसूनि अभ्यर्ष [१४२८]– गाळला गेल्यानंतर आम्हांला दिव्य धनें दे.

२४ पार्थिवा विश्वा अभि [१४२८]–सर्व पार्थिव धनें दे.

२५ येन वयं द्रविणं अभि अश्नुवाम [१४२८]– ज्याच्या योगानें आम्ही धन मिळवूं असें सामर्थ्य आम्हांस दे.

२६ आर्षेयं नः [१४२८]– ऋषिजवळ असणारें धन आम्हांला दे.

२७ यशसां यशस्तरः क्षैतः प्रियः सानौ अव्ये सं मृज्यते [१४०१]– यशस्वी होणाऱ्यांमध्यें अधिक यशस्वी, भूमिवर उत्पन्न होणाऱ्या पदार्थांमध्यें प्रिय झालेला सोम लोंकरीच्या गाळणीमधून गाळला जात आहे.

याप्रमाणें सोमरस गाळणें व त्याचें सेवन करणें या संबंधांचें वर्णन या अध्यायांत आलें आहे. यांत कित्येक ठिकाणीं आलंकारिक वर्णनें आहेत. जसें ' सोमरस गाईंसह भांड्यांत जातो ' याचा अर्थ ' सोमरस गाईच्या दुधामध्यें मिसळून कलशामध्यें ठेवला जातो ' असा समजावयाचा आहे. असे अनेक अलंकार या मंत्रांमध्यें वाचकांना दिसतील.

सुभाषित

१ आरे च असे शृण्वते अग्नये मंत्रं वोचेम [१३७९] दूर राहूनसुद्धां आमचें म्हणणें ऐकणाऱ्या अग्निची आम्हीं प्रशंसा करीत आहों.

२ यः पूर्व्यः स्नीहितीषु कृष्टिषु संजग्मानासु दाशुषे गयं अरक्षत् [१३८०]– जो पूर्वीपासून हिंसक शत्रु एकत्रित झाल्यावरहि दात्यासाठीं त्या दात्याच्या घराचें संरक्षण करतो.

३ शन्तमः सः अग्निः नः अमा–त्यं वेदः रक्षतु [१३८१]– अत्यंत सुख देणारा तो अग्नि आमच्याजवळ असलेलें धन सुरक्षित ठेवो.

४ उत अस्मान् अंहसः पातु [१३८१]– आणि तो आमचें पापापासून रक्षण करो.

५ वृत्रहा रणे रणे धनंजयः अग्निः उदजानि [१३८२] –शत्रूंना मारणारा प्रत्येक संग्रामामध्यें शत्रूंचा पराभव करून धन जिंकून आणणारा अग्नि प्रकट झाला आहे.

६ हे अग्ने देव ! ये तव साधवः आशवः अश्वासः अरं वहन्ति युंक्ष्व हि [१३८३]– हे अग्निदेवा ! जे तुझे उत्तम सुशील त्वरेनें जाणारे घोडे आहेत, त्यांना तूं जोड.

७ नः अच्छ वीतये आयाहि [१३८४]– आमच्याजवळ अन्न भक्षण करून सोम पिण्यासाठीं ये.

८ प्रयांसि अभि देवान् आ वह [१३८४]– अन्नाजवळ देवांना घेऊन ये.

९ हे भारत अग्ने ! उत् शोच [१३८५]– हे भरण पोषण करणाऱ्या अग्ने ! प्रज्वलित हो.

१० हे अजर ! दविद्युतत् द्युमत् अजस्रेण विभाहि [१३८५]-हे जरारहित ! तेजस्वी व प्रकाशमान् तूं कमी न होणाऱ्या तेजानें प्रकाशित हो.

११ सुन्वानाय अन्धसः तत् वचः मर्तः न वष्ट [१३८६]– रस काढलेल्या सोमाची स्तुति क्षुद्र मनुष्य न ऐको.

१२ अराधसं श्वानं अपहत [१३८६]– विघ्न करणाऱ्या कुतऱ्याला दूर करा.

१३ हे इन्द्र ! त्वं जनुषा अभ्रातृव्यः [१३८९]– हे इन्द्रा ! तूं जन्मापासून शत्रूरहित आहेस.

१४ सनात् अना, अनापिः असि [१३८९]– नेहेमीं तुझें नेतृत्व करणारा दुसरा कोणी नाहीं व कोणी सहाय्यक बंधुहि नाहीं. तुझा नियंता किंवा सहाय्यक दुसरा कोणी नाहीं. तूं एकटाच सर्व कांहीं करीत असतोस.

१५ आपित्वं इच्छसे युधा इत् [१३८९]– जेव्हां तूं बन्धूची इच्छा करतोस तेव्हां शत्रूंना दूर करून उपासकांनाच मित्र बनवतोस.

१६ रेवन्तं सख्याय न किः विन्दसे [१३९०]– केवल धनवानालाच तूं आपला मित्र करीत नाहींस.

१७ सुराश्वः ते पीयन्ति [१३९०]– दारू पिणारे नास्तिक तुला दुःख देतात.

१८ यदा नदनुं कृणोषि, समूहसि, आदित् पिता इव हूयसे [१३९०]– जेव्हां स्तुति करणाऱ्यांस तूं आपला मित्र बनवतोस, तेव्हां तूं त्यांना धन देतोस, त्यावेळीं ते आपल्या पित्याप्रमाणें तुझी स्तुति करूं लागतात.

१९ हे इन्द्र ! ब्रह्मयुजः केशिनः, हिरण्यये रथे युक्ताः, सहस्रं शतं हरयः सोमपीतये त्वा वहन्तु [१३९१]– हे इन्द्रा ! शब्दांच्या इशाऱ्यानें जोडले जाणारे, उत्तम आयाळ असलेले, तुझ्या सोन्याच्या रथाला जोडलेले हजारों अथवा शेंकडों घोडे सोम पिण्यासाठीं तुला यज्ञामध्यें पोंचवोत. येथें (सहस्रं शतं हरयः) हजार किंवा शंभर घोडे हे खरे घोडे नसून हें आलंकारिक वर्णन आहे. रथाला घोडे दोन किंवा चारच असतात. येथें हजार आहेत. हे किरण आहेत. कारण किरण हजारों असूं शकतात. रथाला घोडे हजारों असत नाहींत. दोन घोडे रथाला जोडलेले होते असेंही वर्णन आहे. पुढील मंत्र पहा—

२० हिरण्यये रथे मयूर–शेप्या शितिपृष्ठा हरी त्वा आ वहतां [१३९२]– सोन्याच्या रथामधून मोराप्रमाणें शोभीवंत व स्वच्छपाठ असलेले दोन घोडे तुला वाहून नेवोत.

२१ राजा ऋतेन विवावृधे [१३९५]– राजा सत्यानें विशेष वाढतो.

२२ द्रविणस्युः अग्निः वृत्राणि जंघनत् [१३९६] –धन देणारा अग्नि शत्रूंना मारतो.

२३ प्रजावत् ब्रह्म आ भर [१३९८]– पुत्रपौत्रांसह असणारें अन्न अथवा ज्ञान आम्हांला भरपूर दे.

२४ यशसां यशस्तरः [१४०१]– यशस्वी लोकांमध्यें अधिक यशस्वी हो.

२५ शुद्धं इन्द्रं स्तवाम [१४०२]-शुद्ध इन्द्राची आम्ही स्तुति करतों.

२६ हे इन्द्र ! शुद्धः नः आगहि [१४०३]– शुद्ध असलेला तूं आमच्याजवळ ये.

२७ शुद्धाभिः ऊतिभिः शुद्धः [१४०३]– रक्षणाच्या शुद्ध साधनांनीं शुद्ध असा तूं आहेस.

२८ शुद्धः रयिं नि धारय [१४०३]- तूं शुद्ध होऊन आम्हांला धन दे.

२९ शुद्धः ममद्धि [१४०३]- तूं शुद्ध होऊन आनंद प्राप्त कर.

३० शुद्धः नः रयिं [१४०४]- शुद्ध असा तूं आम्हांला धन दे.

३१ शुद्धः दाशुषे रत्नानि [१३०४]- तूं शुद्ध राहून दात्याला रत्नें दे.

३१ शुद्धः वृत्राणि जिघ्नसे [१४०४]- तूं शुद्ध राहून शत्रूंना ठार करतोस.

३३ शुद्धः वाजं सिषाससि [१४०४]- तूं शुद्ध राहून अन्न देतोस.

३४ दिव्यं जनं यक्षत् [१४०६]-दिव्यजनाला पूज्य कर.

३५ जुष्टः वरेण्यः होता सप्रथाः त्वं असि [१४०७] प्रसन्न श्रेष्ठ व हवन करणारा तूं सर्वांहून श्रेष्ठ आहेस.

३६ रत्नधाः वार्याणि दयते [१४०८]- रत्नांचें धारण करणारा धनें देतो.

३७ शूरग्रामः सर्ववीरः सहावान् जेता, धनानि सनिता, तिग्मायुधः क्षिप्र-धन्वा, समत्सु अषाळ्हः, पृतनासु शत्रून् साह्वान् [१४०९]- शूरांच्या समूहानें व अनेक वीरांनीं युक्त, सामर्थ्यसंपन्न व विजयी, धनें देणारा, तीक्ष्ण आयुधें बाळगणारा, धनुष्य लवकर चालवणारा, संग्रामांमध्यें शत्रूला असह्य, युद्धांत शत्रूंचा पराभव करणारा (सोम) आहे.

३८ उरु-गव्यूतिः अभयानि कृण्वन् [१४१०]- ज्याचा मार्ग विस्तीर्ण आहे तो आम्हांस निर्भय करीत आहे.

३९ हे इन्द्र ! शवसः पतिः अनुत्तः चर्षणी-धृतिः एकः इत्, अप्रतीनि वृत्राणि पुरु हंसि [१४११]- हे इन्द्रा ! तूं बलाचा स्वामी, प्रजाचें धारण पोषण करणारा, एकटाच बलवान् शत्रूंना मोठ्याप्रमाणांत ठार मारतोस.

४० हे असुर इन्द्र ! प्रचेतसं त्वा भागं इव राधः ईमहे [१४१२]- हे बलवान् इन्द्रा ! तुझ्यासारख्या ज्ञान्या-जवळ धनाचा भाग आम्ही मागत आहों.

४१ ते मही शरणा [१४१२]- तुझें मोठें स्थान शरण जाण्यास योग्य आहे.

४२ ते सुम्ना नः प्राश्नुवन् [१४१२]- तुझ्याकडून आम्हांला उत्तम सुख मिळो.

४३ देवं अमर्त्यं यज्ञस्य सुक्रतुं यजिष्ठं त्वा ववृमहे [१४१३]- देवांमध्यें श्रेष्ठ अमर देव, यज्ञ उत्तम रीतिनें करणाऱ्या श्रेष्ठ अशा तुला आम्ही उपास्य म्हणून स्वीकारीत आहों.

४४ अपां-न-पातं सुभगं सुदीदितं श्रेष्ठशोचिषं अग्निं [१४१४]- कर्मांचें पतन न करणारा, उत्तम भाग्यवान्, उत्तम तेजस्वी व श्रेष्ठ प्रकाशानेंयुक्त अग्निची आम्ही स्तुति करीत आहों.

४५ सः नः द्युम्नं यक्षते [१४१४]- तो आम्हांला सुख देतो.

४६ हे अग्ने ! पृत्सु यं मर्त्यं अवाः, वाजेषु यं जुनाः, सः शश्वतीः इषः यन्ता [१४१५]- हे अग्ने ! युद्धांमध्यें ज्या मनुष्याचें तूं रक्षण करतोस, स्पर्धेमध्यें ज्याला तूं उत्तम प्रेरणा देतोस, त्याला सदोदित अन्न प्राप्त होतें.

४७ सहंत्य ! अस्य कयस्य पर्येता न किः, श्रवाय्यः वाजः अस्ति [१४१६]- हे शत्रूंचा पराभव करणाऱ्या ! या तुझ्या भक्ताचा पराभव करणारा कोणीहि नाहीं, कारण याचें यशस्वी बल प्रसिद्ध आहे.

४८ विश्वचर्षणिः सः अर्वद्भिः वाजं तरुता अस्तु, विप्रेभिः सनिता अस्तु [१४१७]- सर्व लोकांचें कल्याण करणारा तो घोड्यांनीं युद्धांमध्यें विजय मिळवो व ज्ञानी लोकांनीं तो प्रसन्न केला जावो.

४९ सधमाद्ये आपिः नः वृधे बोधि [१४२१]- एकत्र बसून आनंद मिळवावयाच्यावेळीं मित्राप्रमाणें आमचें संवर्धन करणें आहे हें तूं जाण.

५० ते धियः अस्मान् अवन्तु [१४२१]- तुझ्या बुद्धि आमचें रक्षण करोत.

५१ वयं ते सुमतौ वाजिनः भूयाम [१४२२]-आम्ही तुझ्या अनुकूल अशा उत्तम विचारांनीं राहून बलवान् होऊं.

५२ अभिमातये नः मा स्त [१४२२]- शत्रूच्या हितासाठीं आमचा नाश करूं नकोस.

५३ अभिष्टिभिः चित्राभिः ऊतिभिः अस्मान् अव-तात् [१४२२]- इष्ट अशा सामर्थ्ययुक्त संरक्षणांनीं आमचें रक्षण कर.

५४ सुम्नेषु नः आयामय [१४२२]- सुख समृद्धि-मध्यें आम्हांला वाढव.

५५ अमृत्यवः अदाभ्यासः अस्य केतवः उभे जनुषी अनु सन्तु [१४२५]- अमर व न दबले जाणारे याचे किरण दोनही प्राण्यांना सुरक्षित ठेवतात.

५६ राजानं मननाः अगृभ्णत [१४२५]- राजाला स्तुति प्राप्त होतात.

५७ नः दिव्या वसूनि अभ्यर्ष [१४२८]- आम्हांला दिव्य धनें दे.

५८ पार्थिवा विश्वा अभि अर्ष [१४२२]- आम्हांला पार्थिव धनें दे।

५९ येन वयं द्रविणं अभि अश्नुवाम [१४२२]- ज्यानें आम्ही धन मिळवूं शकूं असें सामर्थ्य आम्हांला दे.

६० आर्षेयं नः [१४२२]- ऋषिसारखें धन आम्हांला मिळो.

६१ हे मघवन्! वृत्रहत्याय यत् जायथाः तत् पृथिवीं अप्रथयः उत दिवं अस्तभ्नाः [१४२९]- हे इन्द्रा! जेव्हां तूं वृत्राचा वध करण्यासाठीं गेलास तेव्हां तूं पृथिवीला सुदृढ केलीस व द्युलोकाला स्तब्ध केलेंस.

६२ यत् जातं यत् जन्त्वं तत् विश्वं अभिभूः असि [१४३०] - जें झालें व जें होणार त्या सर्वांचा तूं पराभव करणारा आहेस.

६३ आमासु पक्वं ऐरयः [१४३१]- गाईंमध्यें पक्व दूध तूं ठेवलेंस.

६४ दिवि सूर्यं अरोहयः [१४३१]- द्युलोकामध्यें सूर्याला चढवलेंस.

६५ गिर्वणसे जुष्टं बृहत् [१४३१]- स्तुत्य इन्द्रासाठीं बृहत् सामाचें गायन करा.

६६ हे इन्द्र! ते वरेण्यः सहावान् पृतनाषाट् अमर्त्यः मत्सरः गन्तु [१४३३]- हे इन्द्रा! तुला हा श्रेष्ठ सामर्थ्यवान्, शत्रूंना पराभूत करणारा अमर व आनंद देणारा सोम प्राप्त होवो.

६७ हे इन्द्र! त्वं शूरः सनिना मनुष्यः रथं चोदय [१४३४]- हे इन्द्रा! तूं शूर व दाता आहेस. मनुष्यांच्या मनोरथांना उत्तम रीतिनें प्रेरित कर.

६८ सहावान् दस्युं अ-व्रतं ओषः [१४३४]- तूं सामर्थ्यवान् आहेस म्हणून तूं व्रत पालन न करणाऱ्या दुष्टांचा नाश कर.

उपमा

आतां या अध्यायामध्यें उपमा आल्या आहेत, त्या पहा—

१ भृगवः मखं न [१३८६]- भृगुंनीं मखाला दूर केलें, त्याप्रमाणें (अ-राधसं श्वानं अपहत) विघ्नकारी कुत्र्याला दूर मारा.

२ मात्रोः भुजे पुत्रः न [१३८७]- माता पिता यांच्या हातांत जसा त्यांचा पुत्र असतो, त्याप्रमाणें (जामिः अत्के आ अव्यत्) सोमरस गाळणीमध्यें शुद्ध होत असतो.

३ जारः योषणां न [१३८७]- ज्याप्रमाणें जार स्त्रीजवळ जातो, त्याप्रमाणें सोम (योनिं आसदत्) कलशामध्यें जातो.

४ वरः न [१३८७]- पति पत्नीजवळ जातो, त्याप्रमाणें सोम कलशामध्यें जातो.

५ वेधाः न [१३८८]- ज्ञानी ज्याप्रमाणें आपल्या घरी येतो, त्याप्रमाणें (हरिः योनिं आसदत्) हिरवा सोम कलशामध्यें जातो.

६ पिता इव हूयसे [१३९०]- पित्याची प्रार्थना करतात, त्याप्रमाणें लोक तुझी - इन्द्राची - प्रार्थना करतात.

७ अश्वं न [१३९४]- घोडयाप्रमाणें (अप्तुरं सोमं परि षिञ्चत) - पाण्यांत मिसळणाऱ्या सोमाला पहा. घोडा जसा पाण्यांत स्नान करतो, त्याप्रमाणें सोमरस पाण्यांत मिसळतो.

८ होता पशुमन्ति सद्म इव [१३९९]- हवन करणारा जसा पशुयुक्त गाईंनींयुक्त घरामध्यें जातो, तसा (सुतः रेभन् पवित्रं पर्येति) सोमरस शब्द करीत गाळणीमध्यें जातो.

९ वरुणः न [१४०८]- वरुणाप्रमाणें (वना वसानः) सोम जलांमध्यें राहतो.

१० भागं इव [१४१२]- पित्याजवळ आपल्या धनाचा वांटा मागावा, त्याप्रमाणें आम्ही इन्द्राजवळ (राधः ईमहे) धन मागतों.

११ कृत्तिः इव [१४१२]- मोठया अंगरख्याप्रमाणें (ते मही शरणा) तुझें मोठे आश्रय स्थान आम्हांला आहे.

१२ वाजी अत्यः न [१४१८]- लवकर पळणारा घोडा असतो, त्याप्रमाणें सोम (द्रोणं ननक्षे) भांडयांत वेगानें जात आहे.

१३ मातृभिः शिशुः न [१४१९]- मातांशीं जसा पुत्र मिसळून राहतो, त्याप्रमाणें सोम (अद्भिः सं दधन्वे) पाण्याशीं मिसळून असतो.

१४ मर्यः योषां न [१४१९]- पुरुष स्त्रीकडे जातो, त्याप्रमाणें सोम पाण्याकडे जातो.

१५ निक्तैः वसुभिः न [१४२०]- स्वच्छ वस्त्रांनी पांघरूण घालावें त्याप्रमाणें (गावः पयसा चमूषु मूर्धानं अभि श्रीणन्ति) गाई आपल्या दुधानें भांडयांत राहणाऱ्या

श्रेष्ठ सोमाला आच्छादित करतात. सोमरसामध्यें गाईचें दूध मिसळतात.

१६ जमदग्निवत् आर्येयं नः [१४२८]- जमदग्नि-प्रमाणें ऋषिसारखें धन आम्हांला दे.

१७ घर्मं सामं न [१४३१]- ज्याप्रमाणें प्रवर्गाला ताप-वितात, त्याप्रमाणें (सुवृक्तिभिः तपत) उत्तम स्तुतींनीं इन्द्राला उत्साहित करा.

१८ महः पात्रस्य इव [१४३२]- मोठ्या भांड्या-प्रमाणें तूं (वृष्णः ते) मोठा बलवान् आहेस.

१८ [अग्निः] शोचिषा पात्रं न [१४३४]- अग्नि आपल्या ज्वालेनें पात्रही जाळतो, त्याप्रमाणें (दस्युं अव्रतं ओषः) हे इन्द्रा ! तूं नियम न पाळणाऱ्या दुष्टाचा नाश कर.

द्वादशाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
१३७९	१।७४।१	गोतमो राहूगणः	अग्निः	गायत्री
१३८०	१।७४।२	गोतमो राहूगणः	,,	,,
१३८१	७।१५।३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१३८२	१।७४।३	गोतमो राहूगणः	,,	,,
		(२)		
१३८३	६।१६।४३	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
१३८४	६।१६।४४	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
१३८५	६।१६।४५	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
१३८६	९।१०१।१३	प्रजापतिर्वैश्वामित्रो वाच्यो वा	पवमानः सोमः	अनुष्टुप्
१३८७	९।१०१।१४	प्रजापतिर्वैश्वामित्रो वाच्यो वा	,,	,,
१३८८	९।१०१।१५	प्रजापतिर्वैश्वामित्रो वाच्यो वा	,,	,,
१३८९	८।११।१३	सोभरिः काण्वः	इन्द्रः	काकुभः प्रगाथः=(विषमा ककुप्, समा सतोबृहती)
१३९०	८।११।१४	सोभरिः काण्वः	,,	,,
१३९१	८।१।२४	मेधातिथि - मेध्यातिथी काण्वौ	,,	बृहती
१३९२	८।१।२५	मेधातिथि - मेध्यातिथी काण्वौ	,,	,,
१३९३	८।१।२६	मेधातिथि - मेध्यातिथी काण्वौ	,,	,,
१३९४	९।१०८।७	ऋजिश्वा भारद्वाजः	पवमानः सोमः	काकुभः प्रगाथः=(विषमा ककुप् समा सतोबृहती)
१३९५	९।१०८।८	ऊर्ध्वसद्मा आंगिरसः	,,	,,
		(३)		
१३९६	६।१६।३४	भरद्वाजो बार्हस्पत्यः	अग्निः	गायत्री
१३९७	६।१६।३५	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
१३९८	६।१६।३६	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
१३९९	९।९७।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	पवमानः सोमः	त्रिष्टुप्
१४००	९।९७।२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१४०१	९।९७।३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१४०२	८।९५।७	तिरश्चीरांगिरसः	इन्द्रः	अनुष्टुप्
१४०३	९।९५।८	तिरश्चीरांगिरसः	,,	,,
१४०४	९।९५।९	तिरश्चीरांगिरसः	,,	,,
		(४)		
१४०५	५।१३।२	सुतंभर आत्रेयः	अग्निः	गायत्री
१४०६	५।१३।३	सुतंभर आत्रेयः	,,	,,
१४०७	५।१३।४	सुतंभर आत्रेयः	,,	,,
१४०८	९।९०।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	पवमानः सोमः	त्रिष्टुप्
१४०९	९।९०।३	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१४१०	९।९०।४	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१४११	८।१०।५	नृमेध–पुरुमेधावांगिरसौ	इन्द्रः	प्रगाथः– (विषमा बृहती, समा सतोबृहती)
१४१२	८।३०।६	नृमेध–पुरुमेधावांगिरसौ	,,	,,
१४१३	८।१९।३	सोभरिः काण्वः	अग्निः	काकुभः प्रगाथः= (विषमा ककुप् समा सतोबृहती)
१४१४	८।१९।४	सोभरिः काण्वः	,,	,,
		(५)		
१४१५	१।२७।७	शुनःशेप आजीगर्तिः	,,	गायत्री
१४१६	१।२७।८	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१४१७	१।२७।९	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१४१८	९।९३।१	नोधा गौतमः	पवमानः सोमः	त्रिष्टुप्
१४१९	९।९३।२	नोधा गौतमः	,,	,,
१४२०	९।९३।३	नोधा गौतमः	,,	,,
१४२१	८।३।१	मेध्यातिथिः काण्वः	इन्द्रः	प्रगाथः– (विषमा बृहती, समा सतोबृहती)
१४२२	८।३।२	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
१४२३	९।७०।१	रेणुर्वैश्वामित्रः	पवमानः सोमः	जगती
१४२४	९।७०।२	रेणुर्वैश्वामित्रः	,,	,,
१४२५	९।७०।३	रेणुर्वैश्वामित्रः	,,	,,
		(६)		
१४२६	९।९७।४९	कुत्स आंगिरसः	,,	त्रिष्टुप्
१४२७	९।९७।५०	कुत्स आंगिरसः	,,	,,
१४२८	९।९७।५१	कुत्स आंगिरसः	,,	,,
१४२९	८।८९।५	नृमेध–पुरुमेधावांगिरसौ	इन्द्रः	अनुष्टुप्
१४३०	८।८९।६	नृमेध–पुरुमेधावांगिरसौ	,,	,,
१०३१	८।८९।७	नृमेध–पुरुमेधावांगिरसौ	,,	बृहती
१४३२	१।१७५।१	अगस्त्यो मैत्रावरुणः	,,	स्कंधोग्रीवी बृहती
१४३३	१।१७५।२	अगस्त्यो मैत्रावरुणः	,,	अनुष्टुप्
१४३४	१।१७५।३	अगस्त्यो मैत्रावरुणः	,,	,,

अथ त्रयोदशोऽध्यायः ।

अथ षष्ठप्रपाठके तृतीयोऽर्धः ॥ ६-३ ॥

[१]

(१-२०) १ कविर्भार्गवः; २, ९, १६ भरद्वाजो बार्हस्पत्यः; ३ असितः काश्यपो देवलो वा; ४ सुकक्ष आंगिरसः; ५ विभ्राट् सौर्यः; ६, ८ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ७ भर्गः प्रागाथः; १०, १७ विश्वामित्रो गाथिनः; ११ मेधातिथिः काण्वः; १२ शतं वैखानसाः; १३ यजत आत्रेयः; १४ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; १५ उशना काव्यः; १८ हर्यतः प्रागाथः; १९ बृहद्दिव आथर्वणः; २० गृत्समदः शौनकः ॥ १, ३, १५ पवमानः सोमः; २, ४, ६, ७, १४, १९, २० इन्द्रः; ८ सरस्वान्; ९ सरस्वती; १० सविता; ११ ब्रह्मणस्पतिः; १२ अग्निः पवमानः; १३ मित्रावरुणौ; १६-१८ अग्निः; १८ हवींषि वा; ५ सूर्यः ॥ १, ३-४, ८-१४, १६ (२-३) १७, १८ गायत्री; २ (१ ३) अनुष्टुप्; २ (४) बृहती; ६, ७ प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती); १६ (१) वर्धमाना; १५ १९ त्रिष्टुप्; २० (१) अष्टिः; २० (२-३) अतिशक्वरी, ५ जगती ॥

१४३५ पवस्व वृष्टिमा सु नोऽपामूर्मिं दिवस्परि । अयक्ष्मा बृहतीरिषः ॥ १ ॥ (ऋ. ९।४९।१)

१४३६ तया पवस्व धारया यया गाव इहागमन् । जन्यास उप नो गृहम् ॥२॥ (ऋ. ९।४९।२)

१४३७ घृतं पवस्व धारया यज्ञेषु देववीतमः । अस्मभ्यं वृष्टिमा पव ॥ ३ ॥ (ऋ. ९।४९।३)

१४३८ स न ऊर्जे व्य३ऽव्ययं पवित्रं धाव धारया । देवासः शृणवन् हि कम् ॥४॥ (ऋ. ९।४९।४)

१४३९ पवमानो असिष्यदद्रक्षांस्यपजङ्घनत् । प्रत्नवद्रोचयन्रुचः ॥ ५ ॥ १ (ची) ॥

[धा० २२ । उ० १ । स्व० ४] (ऋ ९।४९।५)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१४३५] हे सोमा ! तूं (दिवः वृष्टिं) द्युलोकांतून वृष्टिला (नः सु आ पवस्व) आमच्यासाठीं उत्तम रीतिनें खालीं आण. (अपां ऊर्मिं परि) पाण्याच्या लाटा उसळोत. तसेंच (अ-यक्ष्मा बृहतीः इषः) रोगरहित पुष्कळ अन्न आम्हांला दे. ॥ १ ॥

[१४३६] हे सोमा ! तूं (तया धारया पवस्व) त्या धारेनें येथें पवित्र हो, (यया जन्यासः गावः) जिच्या योगानें दुधाळ गाई (इह नः गृहं उप आगमन्) येथें आमच्या घरीं येतील ॥ २ ॥

[१४३७] हे सोमा ! (यज्ञेषु देव-वीतमः) यज्ञांमध्यें देवतांकडून इच्छिलेला तूं (अस्मभ्यं घृतं धारया पवस्व) आम्हांला जलाच्या धारेनें वृष्टीच्या रूपानें पाणी दे, अर्थात् (वृष्टिं आ पवस्व) वृष्टीला खालीं सोड. ॥ ३ ॥

[१४३८] हे (सोम) सोमा ! (सः) तो तूं (नः ऊर्जे) आमच्या अन्नासाठीं (अव्ययं पवित्रं धारया वि धाव) लोंकरीच्या गाळणीमधून धारेनें खालील भांड्यांत उतर. (देवासः हि कं शृणवन्) देव तुझा तो शब्द ऐकोत. ॥ ४ ॥

[१४३९] (रक्षांसि अप जंघनत्) राक्षसांचा नाश करीत (रुचः प्रत्नवत् रोचयन्) आपल्या तेजाला पूर्वीप्रमाणेंच प्रकाशित करीत (पवमानः असिष्यदत्) गाळला जाणारा सोम खालील कलशामध्यें टपकत आहे. ॥ ५ ॥

१४४० प्रत्यस्मै पिपीषते विश्वानि विदुषे भर । अरङ्गमाय जग्मयेऽपश्चादध्वने नरः ॥ १ ॥
(ऋ. ६।४२।१)

१४४१ एमेनं प्रत्येतन सोमेभिः सोमपातमम् । अमत्रेभिर्ऋजीषिणमिन्द्रꣳ सुतेभिरिन्दुभिः ॥२॥
(ऋ. ६।४२।२)

१४४२ यदी सुतेभिरिन्दुभिः सोमेभिः प्रतिभूषथ । वेदा विश्वस्य मेधिरो धृषत्तन्तमिदेषते ॥३॥
(ऋ. ६।४२।३)

१४४३ अस्माअस्मा इदन्धसोऽध्वर्यो प्र भरा सुतम् ।
कुवित्समस्य जेन्यस्य शर्धतोऽभिशस्तेरवस्वरत् ॥ ४ ॥ २ (ठ) ॥
[धा० २३ । उ० २ । स्व० १] (ऋ. ६।४२।४)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

१४४४ बभ्रवे नु स्वतवसेऽरुणाय दिविस्पृशे । सोमाय गाथमर्चत ॥ १ ॥ (ऋ. ९।११।४)

१४४५ हस्तच्युतेभिरद्रिभिः सुतꣳ सोमं पुनीतन । मधावा धावता मधु ॥ २ ॥ (ऋ. ९।११।५)

[१४४०] हे अध्वर्यो ! (नरः) यज्ञाचा चालक तूं (विश्वानि विदुषे) सर्व जाणणाऱ्या (अरंगमाय जग्मये) पुष्कळ प्रगतिमान् व यज्ञांत जाणाऱ्या (अ-पश्चात् अध्वने) सर्वांच्या अग्रभागीं राहणाऱ्या (पिपीषते अस्मै) पिण्याची इच्छा करणाऱ्या या इन्द्राला (प्रति भर) सोमरस दे. ॥ १ ॥

[१४४१] हे अध्वर्यु हो ! (अमत्रेभिः ऋजीषिणं) सोम पात्रांनीं सोमरस पिणाऱ्या (सुतेभिः इन्दुभिः सोमेभिः) रस काढलेल्या चमकणाऱ्या सोमरसाचें (सोमपातमं) पान करणाऱ्या (एनं इन्द्रं) या इन्द्राची (आ प्रत्येतन) जवळ जाऊन प्रार्थना करा. ॥२॥

[१४४२] हे अध्वर्यु हो ! (सुतेभिः इन्दुभिः सोमेभिः) रस काढलेल्या चमकणाऱ्या सोमरसासह (यदि प्रतिभूषथ) जर तुम्ही इन्द्राजवळ जाल तर (मेधिरः विश्वस्य वेद) बुद्धिमान् इन्द्र तुमच्या सर्व मनोरथांना जाणील, (धृषत्) शत्रूंचा पराभव करील व (तं इत् एषते) तुमच्या कामना पूर्ण करील. ॥ ३ ॥

[१४४३] हे (अध्वर्यो) अध्वर्यु ! (अस्मा अस्मा इत्) या इन्द्रासाठींच (अन्धसः सुतं प्रभर) अन्नरूप सोमरस भरपूर अर्पण कर. तो इन्द्र (समस्य जेन्यस्य शर्धतः) सर्व जिंकण्यास योग्य असे स्पर्धा करणारे जे शत्रु आहेत, त्यांचा (अभिशस्तेः) नाश करून (कुवित् अवस्वरत्) तुमचें अधिक संरक्षण करील. ॥ ४ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[१४४४] हे स्तुति करणाऱ्यांनों ! (बभ्रवे) भूऱ्या रंगाच्या (स्व-तवसे) निज बलानें युक्त (अरुणाय दिविस्पृशे) अरुण रंगाच्या आकाशांत असणाऱ्या (सोमाय) सोमाची (गाथं अर्चत) तुम्ही स्तुति करा. ॥ १ ॥

[१४४५] हे ऋत्विज हो ! (हस्तच्युतेभिः अद्रिभिः सुतं) हातांतून सुटणाऱ्या दगडांनीं काढलेल्या (सोमं पुनीतन) सोमरसाला तुम्ही शुद्ध करा. (मधौ मधु आ धावत) मधुर सोमरसामध्यें गाईचें मधुर दूध घाला. ॥ २ ॥

१४४६ नमसेदुप सीदत दध्नेदभि श्रीणीतन । इन्दुमिन्द्रे दधातन ॥ ३ ॥ (ऋ. ९।११।६)

१४४७ अमित्रहा विचर्षणिः पवस्व सोम शं गवे । देवेभ्यो अनुकामकृत् ॥ ४ ॥ (ऋ. ९।११।७)

१४४८ इन्द्राय सोम पातवे मदाय परि षिच्यसे । मनश्चिन्मनसस्पतिः ॥ ५ ॥ (ऋ. ९।११।८)

१४४९ पवमान सुवीर्यꣳ रयिꣳ सोम रिरीहि णः । इन्दविन्द्रेण नो युजा ॥ ६ ॥ ३ (यू) ॥
[धा० ३२ । उ० नास्ति । स्व० ६] (ऋ. ९।११।९)

१४५० उद्घेदभि श्रुतामघं वृषभं नर्यापसम् । अस्तारमेषि सूर्य ॥ १ ॥ (ऋ. ८।९३।१)

१४५१ नव यो नवतिं पुरो बिभेद बाह्वोजसा । अहिं च वृत्रहावधीत् ॥ २ ॥ (ऋ. ८।९३।२)

१४५२ स न इन्द्रः शिवः सखाश्वावद्गोमद्यवमत् । उरुधारेव दोहते ॥ ३ ॥ ४ (ती) ॥
[धा० ९ । उ० १ । स्व० ४] (ऋ. ८।९३।३)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[१४४६] हे ऋत्विज हो ! (नमसा इत् उप सीदत) नमस्कार करीत सोमाजवळ बसा. (दध्ना इत् अभि श्रीणीतन) दहीं त्यांत मिसळा आणि (इन्द्रे इन्दुं दधातन) इन्द्राला चमकणारा सोमरस द्या. ॥ ३ ॥

[१४४७] हे (सोम) सोमा ! तूं (अमित्र-हा विचर्षणिः) शत्रूंचा नाश करणारा, सर्वांना पाहणारा (देवेभ्यः अनु-कामकृत्) देवांना जें इष्ट असतें तेंच कार्य करणारा (गवे शं पवस्व) आमच्या गाईंना सुख दे. ॥ ४ ॥

[१४४८] हे (सोम) सोमा ! (मनः चित् मनसः पतिः) मनाचा ज्ञाता तूं मनाचा स्वामी आहे. (इन्द्राय पातवे) इन्द्राला पिण्यासाठीं तसेंच त्याचा (मदाय) आनंद वाढवण्यासाठीं तूं (परिषिच्यसे) पात्रांमध्यें पडत आहेस. ॥ ५ ॥

[१४४९] हे (इन्दो पवमान) हे गाळल्या जाणाऱ्या सोमा ! तूं (सुवीर्यं रयिं) उत्तम वीर्यासह असणारें धन (नः युजा इन्द्रेण) आमच्या सहाय्यक इन्द्राकडून (नः रिरीहि) आम्हांला देवव. ॥ ६ ॥

[१४५०] हे (सूर्य) प्रकाशणाऱ्या इन्द्रा ! (श्रुतामघं) प्रसिद्ध धनानें युक्त (वृषभं नर्यापसं) बलवान् व मानवांचें हित करणाऱ्या (अस्तारं अभि उदेषि) दात्याजवळ तूं उदित होतोस. ॥ १ ॥

[१४५१] (यः) जो इन्द्र (नव नवतिं पुरः) नव्याण्णव शत्रूंच्या नगरी (बाह्वोजसा बिभेद) आपल्या बाहुबलानें तोडतो व (वृत्रहा) ज्या वृत्राला मारणाऱ्या इन्द्रानें (अ-हिं) कमी न होणाऱ्या शत्रूचा (अवधीत्) वध केला, तो इन्द्र आम्हांस धन देवो. ॥ २ ॥

[१४५२] (सः शिवः इन्द्रः) तो कल्याण करणारा इन्द्र (नः सखा) आमचा मित्र आहे, तो आम्हांला (अश्वावत्, गोमत्, यवमत्) घोडे, गायी व अन्न यांसह असलेलें धन (उरु-धारा इव) दोहन करण्याच्यावेळीं पुष्कळ दूध देणाऱ्या गाईप्रमाणें (दोहते) देतो. ॥ ३ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

*

[३]

१४५३ विभ्राड् बृहत्पिबतु सोम्यं मध्वायुर्दधद्यज्ञपतावविह्रुतम् ।
वातजूतो यो अभिरक्षति त्मना प्रजाः पिपर्ति बहुधा वि राजति ॥१॥ (ऋ. १०।१७०।१)

१४५४ विभ्राड् बृहत्सुभृतं वाजसातमं धर्मं दिवो धरुणे सत्यमर्पितम् ।
अमित्रहा वृत्रहा दस्युहन्तमं ज्योतिर्जज्ञे असुरहा सपत्नहा ॥ २ ॥ (ऋ. १०।१७०।२)

१४५५ इद२ं श्रेष्ठं ज्योतिषां ज्योतिरुत्तमं विश्वजिद्धनजिदुच्यते बृहत् ।
विश्वभ्राड् भ्राजो महि सूर्यो दृश उरु पप्रथे सह ओजो अच्युतम् ॥ ३ ॥ ५ (जि) ॥
[धा० २७ । उ० ३ । स्व० ३] (ऋ. १०।१७०।३)

१४५६ इन्द्र क्रतुं न आ भर पिता पुत्रेभ्यो यथा ।
शिक्षा णो अस्मिन्पुरुहूत यामनि जीवा ज्योतिरशीमहि ॥ १ ॥ (ऋ. ७।३२।२६)

१४५७ मा नो अज्ञाता वृजना दुराध्यो३ माशिवासोऽव क्रमुः ।
त्वया वयं प्रवतः शश्वतीरपोऽति शूर तरामसि ॥ २ ॥ ६ (ल) ॥
[धा० ९ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ७।३२।२७)

---

[३] तृतीयः खण्डः ।

[१४५३] (विभ्राट्) विशेष प्रकाशणारा सूर्य (यज्ञपतौ) यज्ञ करणाऱ्याला (अ-वि-ह्रुतं आयुः दधत्) आरोग्यपूर्ण दीर्घ आयुष्य देतो. (यः वातजूतः) जो वाऱ्याला गति देणारा (त्मना अभि रक्षति) स्वतःच सर्वांचें रक्षण करतो, (प्रजाः पिपर्ति) प्रजांचें पूर्णपणें पालन करतो आणि (बहुधा विराजति) पुष्कळ प्रकारांनीं विराजमान होत असतो असा तो इन्द्र (बृहत् सोम्यं मधु पिबतु) पुष्कळ सोमरसरूपी मधुर पेय पिवो. ॥ १ ॥

[१४५४] (विभ्राट् बृहत्) विशेष प्रकाशमान् व मोठा (सुभृतं वाजसातमं) उत्तम पोषण करणारा व अन्न देणारा (धर्मं दिवः धरुणे अर्पितं) आपल्या धर्मानें द्युलोकाचें धारण करण्यासाठीं नेमलेला (सत्यं अ-मित्र-हा) खरोखर शत्रूंचा नाश करणारा (वृत्र-हा) वृत्राला मारणारा (दस्यु-हन्तमं असुर-हा) दुष्टांना मारणारा, राक्षसांचा विनाशक (सपत्न-हा ज्योतिः जज्ञे) शत्रूंना मारणारा सूर्य प्रकाश पसरवतो. ॥ २ ॥

[१४५५] (इदं श्रेष्ठं ज्योतिषां ज्योतिः) हें सूर्याचें तेज अनेक तेजांचें प्रकाशक (उत्तमं विश्वजित्) उत्तम विश्वविजयी (धनजित् बृहत् उच्यते) धन जिंकणारें यासाठीं तें मोठें आहे असें म्हटलें जातें. (विश्वभ्राट् भ्राजः) विश्वाला प्रकाशित करणारा व स्वयं प्रकाशमय (महि सूर्यः) हा मोठा सूर्य (दृशे उरु सहः) दिसावयाला मोठा सामर्थ्यवान् (अच्युतं ओजः पप्रथे) अविनाशी तेजस्वरूपी बलाला प्रसारित करीत आहे. ॥ ३ ॥

[१४५६] हे (इन्द्र) इन्द्रा ! (नः क्रतुं आभर) आमचा यज्ञ पूर्ण कर. (यथा पिता पुत्रेभ्यः) जसा पिता पुत्रांना धन देतो त्याप्रमाणें (नः शिक्ष) आम्हांला दे. हे (पुरुहूत) अनेकांनीं सहाय्यार्थ बोलावलेल्या इन्द्रा ! (यामनि) यज्ञामध्यें आम्ही (जीवाः) मनुष्य (ज्योतिः अशीमहि) तेज प्राप्त करूं ॥ १ ॥

[१४५७] हे इन्द्रा ! (अ-ज्ञाताः) अज्ञात (वृजनाः अ-शिवासः दुराध्याः) कुटिल पापी व अमंगल शत्रु (नः मा अवक्रमुः) आमच्यावर हल्ला न करोत. हे (शूर) शूरा ! (त्वया वयं प्रवतः) तुझ्याकडून सुरक्षित झालेले आम्हीं (शश्वतीः अपः अति तरामसि) पुष्कळ संकटांच्या प्रवाहांतून पार होऊं. ॥ २ ॥

१४५८ अद्याद्या श्वःश्व इन्द्र त्रास्व परे च नः ।
विश्वा च नो जरितॄन्त्सत्पते अहा दिवा नक्तं च रक्षिषः　　॥ १ ॥ (ऋ. ८।६१।१७)

१४५९ प्रभङ्गी शूरो मघवा तुवीमघः सम्मिश्लो वीर्याय कम् ।
उभा ते बाहू वृषणा शतक्रतो नि या वज्रं मिमिक्षतुः　　॥ २ ॥ ७ (वी) ॥
[धा० १२ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ८।६१।१८)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

१४६० जनीयन्तो न्वग्रवः पुत्रीयन्तः सुदानवः । सरस्वन्तꣳहवामहे ॥ १ ॥ ८ (रै) ॥
[धा० ३ । उ० नास्ति । स्व० नास्ति] (ऋ. ७।९६।४)

१४६१ उत नः प्रिया प्रियासु सप्तस्वसा सुजुष्टा । सरस्वती स्तोम्या भूत् ॥ १ ॥ ९ (हौ)
[धा० १ । उ० नास्ति । स्व० नास्ति] (ऋ. ६।६१।१०)

१४६२ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ॥१॥ (ऋ. ३।६२।१०)

१४६३ सोमानं स्वरणं कृणुहि ब्रह्मणस्पते । कक्षीवन्तं य औशिजः　　॥ २ ॥ (ऋ. १।१८।१)

[१४५८] हे (इन्द्र) इन्द्रा ! (अद्य अद्य) आज (श्वः श्वः) उद्यां (परे च) आणि परवां म्हणजे सर्वदा आमचें (त्रास्व) रक्षण कर. हे (सत्पते) सज्जनांच्या पालक इन्द्रा ! (विश्वा च अहा) सर्वदा (नः जरितॄन्) आम्हां स्तुति करणाऱ्यांना (दिवा नक्तं च रक्षिषः) दिवसा व रात्रौ सुरक्षित ठेव. ॥ १ ॥

[१४५९] ([अयं] मघवा) हा इन्द्र (वीर्याय कं) सुखानें पराक्रम करण्यासाठीं (प्र-भंगी शूरः) शत्रूंना तोडणारा शूर (तुवी-मघः संमिश्लः) पुष्कळ धनवान् व सर्वांशीं मिळून वागणारा असा आहे. हे (इन्द्र) इन्द्रा ! (ते उभा बाहू वृषणा) तुझे दोनही बाहू फार बलवान् आहेत. हे (शतक्रतो) शेंकडों कर्मे करणाऱ्या इन्द्रा ! (या वज्रं नि मिमिक्षतुः) जे बाहु वज्र धारण करीत असतात. ॥ २ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[१४६०] (जनीयन्तः) स्त्री असलेले (पुत्रीयन्तः) पुत्र असलेले (सुदानवः अग्रवः) उत्तम धन देणारे व पुढें राहणारे (नु सरस्वन्तं हवामहे) आम्ही सरस्वतीला सहाय्यासाठीं बोलावीत आहों. ॥ १ ॥

[१४६१] (उत नः प्रियासु प्रिया) आणि आम्हांला प्रिय वस्तूंमध्यें अत्यंत प्रिय (सप्तस्वसा) सात नदी-रूपी बहिणी जिला आहेत, अशी (सुजुष्टा सरस्वती) उत्तम सेवा केली जाणारी सरस्वती नदी (स्तोम्या भूत्) स्तुति करण्यास योग्य अशी झाली आहे. ॥ १ ॥

[१४६२] (यः सविता देवः) जो सविता देव (नः धियः प्रचोदयात्) आमच्या बुद्धिंना प्रेरणा करतो त्या (देवस्य सवितुः) सवित्या देवाचें (तत् वरेण्यं भर्गः) तें श्रेष्ठ तेज आहे त्याचें (धीमहि) आम्ही ध्यान करीत आहों. ॥ १ ॥

[१४६३] हे (ब्रह्मणः पते) ज्ञानपते ! (सोमानां) सोम अर्थात् ज्ञानानें प्राप्त योगसाधनाच्या अनुभवानें (कक्षी-वन्तं) छातीमध्यें राहणाऱ्या प्राणाला (स्वरणं-सु-अरणं) उत्तम गमनागमन करणारा (कृणुहि) कर (य औशिजः) जो प्राण वश झालेला आहे. ॥ २ ॥

१४६४ अग्न आयूंषि पवस आ सुवोर्जमिषं च नः । आरे बाधस्व दुच्छुनाम् ॥३॥ १० (य) ॥
[धा० २ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ९।६६।१९)

१४६५ ता नः शक्तं पार्थिवस्य महो रायो दिव्यस्य । महि वां क्षत्रं देवेषु ॥१॥ (ऋ. ५।६८।३)

१४६६ ऋतमृतेन सपन्तेषिरं दक्षमाशाते । अद्रुहा देवौ वर्धेते ॥ २ ॥ (ऋ. ५।६८।४)

१४६७ वृष्टिद्यावा रीत्यापेषस्पती दानुमत्याः । बृहन्तं गर्तमाशाते ॥ ३ ॥ ११ (पा) ॥
[धा० ५ । उ० १ । स्व० २] (ऋ. ५।६८।५)

१४६८ युञ्जन्ति ब्रध्नमरुषं चरन्तं परि तस्थुषः । रोचन्ते रोचना दिवि ॥ १ ॥ (ऋ १।६।१)

१४६९ युञ्जन्त्यस्य काम्या हरी विपक्षसा रथे । शोणा धृष्णू नृवाहसा ॥ २ ॥ (ऋ. १।६।२)

१४७० केतुं कृण्वन्नकेतवे पेशो मर्या अपेशसे । समुषद्भिरजायथाः ॥ ३ ॥ १२ (य) ॥
[धा० ७ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. १।६।३)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

[१४६४] हे (अग्ने) प्रकाशस्वरूप ! (नः आयूंषि पवसे) आम्हांला दीर्घ आयुष्य दे. (नः ऊर्जं) आम्हांला बल व (इषं च) अन्न दे, (दुच्छुनां आरे बाधस्व) दुष्टांना दूर कर. ॥ ३ ॥

[१४६५] (ता) त्या मित्र व वरुण या देवता (नः) आम्हांला (पार्थिवस्य दिव्यस्य) पृथिवीवरचें व द्युलोकाचें (महः रायः शक्तं) मोठें धन देण्यास समर्थ होवोत. (वां महि क्षत्रं) तुमचें मोठें क्षात्रबल (देवेषु) देवांमध्यें प्रसिद्ध आहे. ॥ १ ॥

[१४६६] (ऋतेन ऋतं सपन्ता) यज्ञानें यज्ञ पूर्ण करीत (इषिरं दक्षं आशाते) इच्छा करण्याजोगें बल प्राप्त करतात. असे (अ-द्रुहा देवौ वर्धेते) द्रोह न करणारे मित्र व वरुण हे देव सामर्थ्यानें वाढत असतात. ॥ २ ॥

[१४६७] (वृष्टि-द्यावा) वृष्टीसाठीं ज्याची स्तुति होत असते (रीत्यापा) योग्य रीतिनें ज्यांना वस्तु प्राप्त होतात, असे (दानुमत्याः इषः पती) दान देण्यास योग्य अशा अन्नाचे जे स्वामी आहेत ते (बृहन्तं गर्तं आशाते) मोठ्या रथावर बसतात. ॥ ३ ॥

[१४६८] (ब्रध्नं) आदित्यरूपामध्यें असलेल्या (अरुषं) तेजस्वी अग्निच्या रूपानें असणाऱ्या (चरन्तं) चालल्याप्रमाणें दिसणाऱ्या पण (परि तस्थुषः) स्थिर असणाऱ्या सूर्याचा साधक (युंजंति) उपासनेसाठीं उपयोग करतात. त्याच इन्द्राचीं (रोचना दिवि रोचन्ते) प्रकाशकिरणें द्युलोकामध्यें प्रकाशित होत आहेत. ॥ १ ॥

[१४६९] (अस्य रथे) या इन्द्राच्या रथामध्यें (काम्या विपक्षसा) सुंदर व दोन ही बाजूंस जोडलेले (शोणा धृष्णू) लाल रंगाचे व शत्रूंचा पराभव करणारे (नृवाहसा हरी) इन्द्राला वाहून नेणारे घोडे (युंजन्ति) जोडले जातात. ॥ २ ॥

[१४७०] हे (मर्याः) मनुष्य हो ! (अ-केतवे) अज्ञान्याला (केतुं कृण्वन्) ज्ञान देत व (अपेशसे पेशः) रूप नसलेल्याला रूप देत (उषद्भिः समजायथाः) उषःकालानंतर सूर्याचा उदय होत असतो. ॥ ३ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५]

१४७१ अयꣳसोम इन्द्र तुभ्यꣳसुन्वे तुभ्यं पवते त्वमस्य पाहि ।
त्वꣳह यं चकृषे त्वं ववृष इन्दुं मदाय युज्याय सोमम् ॥ १ ॥ (ऋ. ९।८८।१)

१४७२ स ईꣳरथो न भुरिषाडयोजि महः पुरूणि सातये वसूनि ।
आदीं विश्वा नहुष्याणि जाता स्वर्षाता वन ऊर्ध्वा नवन्त ॥ २ ॥ (ऋ. ९।८८।२)

१४७३ शुष्मी शर्धो न मारुतं पवस्वानभिशस्ता दिव्या यथा विट् ।
आपो न मक्षु सुमतिर्भवा नः सहस्राप्साः पृतनाषाण्न यज्ञः ॥ ३ ॥ १३ (घी) ॥
[धा० २६ । उ० ४ । स्व० ४] (ऋ. ९।८८।३)

१४७४ त्वमग्ने यज्ञानाꣳहोता विश्वेषाꣳहितः । देवेभिर्मानुषे जने ॥ १ ॥ (ऋ. ६।१६।१)

१४७५ स नो मन्द्राभिरध्वरे जिह्वाभिर्यजा महः । आ देवान्वक्षि यक्षि च ॥ २ ॥ (ऋ. ६।१६।२)

---

[५] पञ्चमः खण्डः ।

[१४७१] हे (इन्द्र) इन्द्रा ! (अयं सोमः तुभ्यं सुन्वे) हा सोमरस तुझ्यासाठीं काढला जात आहे. (तुभ्यं पवते) तुझ्यासाठींच गाळला जात आहे. (त्वं अस्य पाहि) तूं याचें पान कर. (त्वं ह यं चकृषे) तूंच याला केला आहेस. (इन्दुं सोमं) ज्या चमकणाऱ्या सोमाला (मदाय युज्याय) आनंदासाठीं व सहाय्य मिळावें म्हणून (त्वं ववृषे) तूं स्वीकारतोस. ॥ १ ॥

[१४७२] (सः ईं महः) तो हा मोठा इन्द्र आहे. (भूरि-षाड् रथः न) मोठा भार घेऊन जाणाऱ्या रथाप्रमाणें (पुरूणि वसूनि सातये) पुष्कळ धनें देतां यावीं यासाठीं (अयोजि) यज्ञामध्यें याची योजना केली आहे. (आत् ईं) यानंतर (विश्वा नहुष्याणि जाता) सर्व मनुष्यांचा विरोध करणारे शत्रु उत्पन्न झाले आहेत ते (ऊर्ध्वा) वर मुख करून (वने स्वर्षाता नवन्त) वनामध्यें होणाऱ्या युद्धामध्यें जावोत व तेथें नाश पावोत. ॥ २ ॥

[१४७३] हे सोमा ! (शुष्मी) तूं बलवान् आहेस. (मारुतं शर्धः न) मरुतांच्या सामर्थ्याप्रमाणें समर्थ होण्यासाठीं (पवस्व) तूं शुद्ध हो. (यथा दिव्या विट्) ज्याप्रमाणें दिव्य प्रजा (अनभिशस्ता) अनिंदित रूपानें पवित्र असते, तसा (आपः न) पाण्याप्रमाणें पवित्र होऊन (मक्षु नः सुमतिः भव) तत्काल आमच्यासाठीं उत्तम बुद्धि देणारा हो. (सहस्राप्साः) अनेक रूपांमध्यें असणारा (पृतनाषाट्) शत्रूसेनेचा पराभव करणाऱ्या 'इन्द्राप्रमाणें (यज्ञः न) यज्ञासारखा तूं पूजनीय आहेस. ॥ ३ ॥

[१४७४] हे (अग्ने) अग्ने ! (त्वं विश्वेषां यज्ञानां होता) तूं सर्व यज्ञामध्यें हवन करणारा आहेस व (देवेभिः मानुषे जने हितः) देवांनीं मानवी प्रजेमध्यें तुला स्थापन केलें आहे. ॥ १ ॥

[१४७५] हे अग्ने ! (सः नः अध्वरे) तो तूं आमच्या यज्ञामध्यें (मन्द्राभिः जिह्वाभिः) आनंद वाढवणाऱ्या ज्वालांनीं (महः यज) देवांचें यजन कर. (देवान् आ वक्षि) देवांना बोलावून आण (यक्षि च) आणि त्यांना हवि अर्पण कर. ॥ २ ॥

१४७६ वेत्था हि वेधो अध्वनः पथश्च देवाञ्जसा । अग्ने यज्ञेषु सुक्रतो ॥ ३ ॥ १४ (हौ)

[धा० ६ । उ० नास्ति । स्व० नास्ति] (ऋ. ६।१६।३)

१४७७ होता देवो अमर्त्यः पुरस्तादेति मायया । विदथानि प्रचोदयन् ॥ १ ॥ (ऋ. ३।२७।७)

१४७८ वाजी वाजेषु धीयतेऽध्वरेषु प्र णीयते । विप्रो यज्ञस्य साधनः ॥ २ ॥ (ऋ. ३।२७।८)

१४७९ धिया चक्रे वरेण्यो भूतानां गर्भमा दधे । दक्षस्य पितरं तना ॥ ३ ॥ १५ (रा) ॥

[धा० १३ । उ० नास्ति । स्व० २](ऋ. ३।२७।९)

॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

[६]

१४८० आ सुते सिञ्चत श्रियं रोदस्योरभिश्रियम् । रसा दधीत वृषभम् ॥१॥ (ऋ. ८।७२।१३)

१४८१ ते जानत स्वमोक्यं३ सं वत्सासो न मातृभिः । मिथो नसन्त जामिभिः ॥ २ ॥

(ऋ. ८।७२।१४)

१४८२ उप स्रक्वेषु बप्सतः कृण्वते धरुणं दिवि । इन्द्रे अग्ना नमः स्वः ॥ ३ ॥ १६ (च) ॥

[धा० १२ । उ० १ । स्व० १] (ऋ. ८।७२।१२)

[१४७६] (वेधः सुक्रतो देव अग्ने) हे विधात्या, उत्तम कर्म करणाऱ्या दिव्य अग्ने ! तूं (यज्ञेषु) यज्ञांमध्यें (अध्वनः पथः अंजसा च वेत्थ) यज्ञांचा जवळचा व दूरचा मार्ग जाणतोस. यासाठीं यजमानाला मार्ग दाखव.॥ ३॥

[१४७७] (होता अमर्त्यः) हवन करणारा अमर (देवः विदथानि प्रचोदयन्) देव कर्मांना प्रेरणा करीत अग्नि (मायया) कुशलतेनें (पुरस्तात् एति) पुढें येत असतो. ॥ १ ॥

[१४७८] (वाजी वाजेषु धीयते) बलवान् अग्नि युद्धांमध्यें शत्रूचा नाश करण्यासाठीं स्थापन केला जात असतो. (अध्वरेषु प्रणीयते) यज्ञांमध्यें तो नेला जातो. म्हणून (विप्रः) हा ज्ञानी अग्नि (यज्ञस्य साधनः) यज्ञाचें साधन आहे. ॥ २ ॥

[१४७९] हा अग्नि (धिया चक्रे) कर्मामध्यें प्रज्वलित केलेला आहे म्हणून तो (वरेण्यः) श्रेष्ठ आहे व तो (भूतानां गर्भं आदधे) सर्व भूतांमध्यें व्यापून राहतो. (पितरं दक्षस्य तना) जगताचा पालक अशा दक्षाची वेदी ही पुत्री अग्निला धारण करीत आहे. ॥ ३ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६] षष्ठः खण्डः ।

[१४८०] हे अध्वर्यु हो ! (सुते) सोमरसामध्यें (रोदस्योः अभिश्रियं) द्यावापृथिवीमधील शोभा वाढवणाऱ्या (श्रियं आसिंचत) दुधाला मिळवा. नंतर (रसा वृषभं दधीत) तें दूध बलवान् सोमाला आपल्यामध्यें धारण करील. ॥ १ ॥

[१४८१] (ते स्वं ओक्यं जानत) त्या गाई आपलें स्थान जाणत आहेत. (वत्सासः मातृभिः न) वांसरें जशीं आयांकडे जातात त्याप्रमाणें (जामिभिः मिथः नसन्त) आपल्या बांधवांसह ते मिळतात. ॥ २ ॥

गाईच्या दुधाचें स्थान सोमाचें भांडें आहे हें त्यांस माहीत आहे.

[१४८२] (स्रक्वेषु बप्सतः) ज्वालांनीं भक्षण करणाऱ्या अग्निचें (नमः) अन्नरूप गोदुग्ध (धरुणं) धारण करणाऱ्याला (दिवि उप कृण्वते) अन्तरिक्षामध्यें समर्पित करतात. नंतर (इन्द्रे अग्ना स्वः नमः) इन्द्र व अग्निला सर्व दूध अर्पण करतात. ॥ ३ ॥

१४८३ तदिदास भुवनेषु ज्येष्ठं यतो जज्ञ उग्रस्त्वेषनृम्णः ।
सद्यो जज्ञानो नि रिणाति शत्रूननु यं विश्वे मदन्त्यूमाः ॥ १ ॥ (ऋ. १०।१२०।१)

१४८४ वावृधानः शवसा भूर्योजाः शत्रुर्दासाय भियसं दधाति ।
अव्यनच्च व्यनच्च सस्नि सं ते नवन्त प्रभृता मदेषु ॥ २ ॥ (ऋ. १०।१२०।२)

१४८५ त्वे क्रतुमपि वृञ्जन्ति विश्वे द्विर्यदेते त्रिर्भवन्त्यूमाः ।
स्वादोः स्वादीयः स्वादुना सृजा समदः सु मधु मधुनाभि योधीः ॥३॥ १७ (णी) ॥
[धा० २३ । उ० ५ । स्व० ४] (ऋ. १०।१२०।३)

१४८६ त्रिकद्रुकेषु महिषो यवाशिरं तुविशुष्मस्तृम्पत्
सोममपिबद्विष्णुना सुतं यथावशम् ।
स ईं ममाद महि कर्म कर्तवे महामुरु॰ सैनं॰
सश्चद्देवो देव॰ सत्य इन्दुः सत्यमिन्द्रम् ॥ १ ॥ (ऋ. २।२२।१)

[१४८३] (तत् ज्येष्ठं इत्) तें ज्येष्ठ ब्रह्मच (भुवनेषु आस) सर्व भुवनांमध्यें व्यापून होतें. (यतः) ज्याच्यापासून (उग्रः त्वेषनृम्णः जज्ञे) उग्र व तेजस्वी बलाचा सूर्य प्रकट झाला. (जज्ञानः सद्यः शत्रून् निरिणाति) उत्पन्न होतांच त्यानें तत्काल सर्व शत्रूंना नष्ट केलें. (यं विश्वे ऊमाः अनुमदन्ति) ज्याला पाहून सर्व प्राणी प्रसन्न होतात. ॥ १ ॥

[१४८४] (शवसा वावृधानः) बलामुळें वाढणारा (भूर्योजाः शत्रुः) अनंतशक्तींनीं युक्त असा दुष्टांचा शत्रु इन्द्र (दासाय भियसं दधाति) शत्रूंच्या अन्तःकरणांत भय उत्पन्न करतो. (अव्यनत् च व्यनत् च सस्नि) श्वास घेणारे व श्वास न घेणारे या दोघांचें हित तो करतो. हे इन्द्रा ! (ते मदेषु) तुझ्या आनंदामध्यें (प्रभृता सं नवन्त) वाढलेले सर्व लोक तुझी भक्ति करण्यासाठीं एकत्रित होतात. ॥ २ ॥

[१४८५] हे इन्द्रा ! (विश्वे अपि त्वे क्रतुं वृञ्जंति) सर्व यजमान तुझ्यासाठींच यज्ञ करतात. (यत् एते ऊमाः) ज्यावेळीं हे यज्ञ करणारे यजमान (द्विः त्रिः भवन्ति) लग्न करून दोघे व पुत्र झाल्यानंतर तिघे होतात, त्यावेळीं हे इन्द्रा ! (स्वादोः स्वादीयः) प्रियाहून प्रिय असलेल्या [संताना] ला (स्वादुना संसृज) प्रिय अशा [मातापित्या] शीं संयुक्त कर. (अदः मधु) या प्रिय संतानाला नंतर (मधुना सु अभि योधीः) पौत्ररूपी मधुरतेनें युक्त कर. ॥ ३ ॥

[१४८६] (महिषः तुविशुष्मः) मोठा व अधिक सामर्थ्यवान् (तृम्पत्) तृप्त झालेला इन्द्र (त्रि-कद्रुकेषु सुतं) तीन भांड्यांत काढलेल्या (यवाशिरं सोमं) सत्तूच्या पिठाशीं मिसळलेल्या सोमरसाला (विष्णुना यथावशं अपिबत्) विष्णु बरोबर यथेच्छ पितो. (सः) तो सोमरस (महां ऊरुं ईं) मोठ्या विस्तृत तेजस्वी अशा या इन्द्राला (महि कर्म कर्तवे) मोठें कार्य करण्यासाठीं (ममाद) हर्षित करतो. (सत्यः इन्दुः) सत्यस्वरूप चमकणारा (देवः सः) दिव्य असा तो सोम (सत्यं देवं) अविनाशी आणि तेजस्वी (एनं इन्द्रं सश्चत्) अशा या इन्द्राला प्राप्त होतो. ॥ १ ॥

१४८७ साकं जातः क्रतुना साकमोजसा ववक्षिथ
साकं वृद्धो वीर्यैः सासहिर्मृधो विचर्षणिः ।
दाता राध स्तुवते काम्यं वसु प्रचेतन सैनꣳ
सश्चद्देवो देवꣳ सत्य इन्दुः सत्यमिन्द्रम् ॥ २ ॥ (ऋ. २।२२।३)

१४८८ अध त्विषीमाꣳअभ्योजसा कृविं युधाभवदा
रोदसी आपृणदस्य मज्मना प्र वावृधे ।
अधत्तान्यं जठरे प्रेमरिच्यत प्र चेतय सैनꣳ
सश्चद्देवो देवꣳ सत्य इन्दुः सत्यमिन्द्रम् ॥ ३ ॥ १८ (थि) ॥
[धा० ९४ । उ० २ । स्व० १३] (ऋ. २।२२।२)

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

॥ इति षष्ठप्रपाठके तृतीयोऽर्धः ॥ ३ ॥ षष्ठः प्रपाठकश्च समाप्तः ॥ ६ ॥

॥ इति त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥

[१४८७] हे इन्द्रा ! तूं (क्रतुना साकं जातः) यज्ञासह प्रकट झाला आहेस. (ओजसा साकं ववक्षिथ) आपल्या सामर्थ्यानें विश्वाचा भार उचलण्याची इच्छा तूं करीत आहेस. हे (प्रचेतन) श्रेष्ठज्ञानी इन्द्रा ! (वीर्यैः साकं वृद्धः) आपल्या पराक्रमांनीं तूं मोठा झाला आहेस. (मृधः सासहिः) संग्रामामध्यें शत्रूंचा तूं पराभव करीत आहेस. (विचर्षणिः स्तुवते) विशेष ज्ञानी तूं स्तुति करणाऱ्याला (राधः काम्यं वसु दाता) धन व इष्ट ऐश्वर्य देतोस. (सत्यः इन्दुः) सत्य सोमरस (देवः सः) चमकत असतां (सत्यं देवं) सत्यदेव (एनं इन्द्रं सश्चत्) या इन्द्राला प्राप्त होतो. ॥ २ ॥

[१४८८] हे इन्द्रा ! (अध) नंतर (त्विषामान्) तेजस्वी तूं (ओजसा कृविं युधा अभ्यभवत्) आपल्या सामर्थ्यानें युद्धामध्यें कृविला जिंकलेंस व (रोदसी आ पृणात्) द्यावापृथिवीला आपल्या तेजानें भरून टाकलेंस. (अस्य मज्मना प्र वावृधे) या सोमाच्या बलानें तूं अधिक मोठा झालास त्या इन्द्रानें (अन्यं जठरे अधत्त) सोमरसाचा एक भाग आपल्या पोटांत घातला व दुसऱ्या भागाला (ईं प्रारिच्यत) त्यानें देवांसाठीं ठेवला. हे इन्द्रा ! तूं इतर देवांना (प्र चेतय) सोमपानाची प्रेरणा कर. (सत्यः इन्दुः) सत्य सोमरस (देवः सः) दिव्य असा तो (सत्यं देवं एनं इन्द्रं सश्चत्) सत्यदेव इन्द्राला प्राप्त होतो. ॥ ३ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति त्रयोदशोऽध्यायः ॥

त्रयोदश अध्याय

इन्द्र देवता

या अध्यायामध्यें इन्द्र देवतेचें वर्णन आलें आहे, तें असें आहे —

१ यः नव नवतिं पुरः बाह्वोजसा विभेद । वृत्रहा अहिं अवधीत् [१४५१]- इन्द्रानें आपल्या बाहुबलानें शत्रूंचीं ९९ नगरें तोडलीं व या वृत्राला मारणाऱ्या इन्द्रानें अहिला मारलें.

२ समस्य जेन्यस्य शर्धतः अभिशस्तेः कुवित् अवस्वरत् [१४४३]- सर्व जिंकण्यास योग्य अशा स्पर्धा करणाऱ्या सर्व शत्रूंचा नाश करून तो इन्द्र तुमचें अधिक संरक्षण करील.

३ शवसा वावृधानः भूर्योजाः शक्रः दासाय भियसं दधाति [१४८४]- आपल्या बलानें वाढणारा अनंत सामर्थ्यांनीं युक्त, दुष्टांचा शत्रु इन्द्र शत्रूंच्या अन्तः-करणांत भय उत्पन्न करतो.

४ क्रतुना साकं जातः । ओजसा साकं ववक्षिथ । वीर्यैः साकं वृद्धः । मृधः सासहि [१४८७]- कर्म करण्यासाठीं तो प्रसिद्ध झालेला आहे. आपल्या सामर्थ्यानें तो सर्व कार्याचा भार उचलतो. आपल्या पराक्रमांनीं तो मोठा झाला आहे. सर्व शत्रूंचा तो पराभव करतो.

५ अज्ञाताः वृजनाः अशिवासः दुराध्याः नः मा अवक्रमुः [१४५७]- अज्ञात, कुटिल, पापी व अमंगल शत्रु आमच्यावर हल्ला न करोत.

६ हे शूर ! त्वया वयं प्रवतः शश्वतीः अपः अति तरामसि [१४५७]- हे शूर इन्द्रा ! तुझ्या सहाय्यानें सुरक्षित झालेले आम्ही पुष्कळ संकटांच्या प्रवाहांतून पार होऊं.

७ हे इन्द्र ! अद्य श्वः परे च नः त्रास्व [१४५८]- आज उद्यां व परवां अर्थात् सर्वदा आमचें तूं संरक्षण कर.

८ विश्वा च अहा नः दिवा नक्तं च राक्षिषः [१४५८] – सर्वदा दिवसा व रात्रीं आमचें संरक्षण कर.

९ अयं मघवा वीर्याय कं, प्रभंगी शूरः, तुवीमघः संमिश्लः । हे इन्द्र शतक्रतो ! ते उभा बाहू वृषणा या वज्रं नि मिमिक्षतुः [१४५९]- हा इन्द्र सुखानें पराक्रम करण्यासाठीं शत्रूंचा नाश करणारा शूर, पुष्कळ धनवान् व सर्वांशीं मिळून मिसळून वागणारा आहे. हे शेंकडों कार्यें करणाऱ्या इन्द्रा ! तुझे दोनही बाहु बलवान् आहेत, जे वज्राला धारण करीत असतात.

१० स ईं महः, भूरिषाट् रथः इव, पुरूणि वसूनि सातये अयोजि । आत् ईं विश्वा नहुष्याणि जाता, ऊर्ध्वा वने स्वर्षाता नवन्त [१४७२]- तो निःसंशय मोठा इन्द्र आहे. पुष्कळ मोठा भार घेऊन जाणाऱ्या रथा-प्रमाणें पुष्कळ धनें देण्यासाठी त्या रथांत त्यानें योजना केलेली आहे. हे इन्द्रा ! सर्व मनुष्यांचा विरोध करणारे शत्रु उत्पन्न झाले तर त्यांचा नाश वनामध्यें होणाऱ्या युद्धामध्यें होवो व वर तोंड करून ते नष्ट होवोत.

११ त्विषीमान् ओजसा कृविं युधा अभ्यभवत् । अस्य मज्मना प्र वावृधे [१४८८]- तो इन्द्र तेजस्वी आहे व त्यानें आपल्या सामर्थ्यानें शत्रूला युद्धामध्यें जिंकलें, तो आपल्या बलानें फार मोठा झाला आहे.

याप्रमाणें इन्द्राच्या सामर्थ्याचें वर्णन आहे. आतां त्याचें इतर वर्णन पहा —

१२ सुतेभिः इन्दुभिः सोमेभिः यदि प्रतिभूषथ, मेधिरः विश्वस्य वेद, धृषत् इत् एषते [१४४२]- सोमरसांसह जर तुम्ही इन्द्राजवळ गेलांत, तर तो बुद्धिमान् इन्द्र तुमचें सर्व मनोगत जाणील व तुमच्या सर्व कामना पूर्ण करील.

१३ असा इत् अन्धसः सुतं प्र भर [१४४३]- त्या इन्द्राला सोमरस भरपूर द्या.

१४ सः शिवः इन्द्रः नः सखा, अश्वावत् गोमत् यवमत् उरु धारा इव दोहते [१४५२]- तो कल्याण करणारा इन्द्र आमचा मित्र आहे तो आम्हांला, पुष्कळ दूध देणाऱ्या गाईप्रमाणें, घोडे, गाई व जव पुष्कळ देतो.

१५ हे इन्द्र ! नः क्रतुं आ भर । यथा पुत्रेभ्यः पिता, नः शिक्ष । हे पुरुहूत ! यामनि जीवाः ज्योतिः अशीमहि [१४५६]- हे इन्द्रा ! आमचा यज्ञ पूर्ण कर. जसा पिता आपल्या पुत्रांना धन देतो, त्याप्रमाणें तूं आम्हांला दे. हे प्रशंसनीय इन्द्रा ! यज्ञामध्यें आम्ही मनुष्य तेजस्वी बनूं.

१६ हे इन्द्र ! अयं सोमः तुभ्यं सुन्वे । तुभ्यं पवते । त्वं अस्य पाहि [१४७१]- हे इन्द्रा ! हा सोमरस तुझ्या-साठीं काढला आहे. तुझ्यासाठीं गाळला जात आहे. तूं तो पी.

*

१७ विचर्षणिः स्तुवते राधः काम्यं वसु दाता [१४८७]- विशेष ज्ञानी तूं स्तुति करणाऱ्याला धन व इष्ट ऐश्वर्य देतोस.

१८ अव्यनत् च व्यनत् च सस्नि [१४८४]- श्वासोच्छ्वास करणारे व न करणारे या दोघांचें तो हित करतो.

१९ विश्वे त्वे क्रतुं वृंजन्ति [१४८५]- सर्व याज्ञिक तुझ्यासाठीं यज्ञ करतात.

२० महिषः तुविशुष्मः तृम्पत् यवाशिरं सोमं विष्णुना यथावशं अपिबत् । सः महां ऊरुं ईं महि कर्म कर्तवे ममाद [१४८६]- मोठा व फार सामर्थ्यवान् तृप्त झालेला इन्द्र सतूच्या पिठाशीं मिसळलेला सोम विष्णु-बरोबर प्याला. तो सोमरस त्या मोठ्या इन्द्राला मोठें कार्य करण्यासाठीं हर्षित करता झाला.

याप्रमाणें इन्द्र सोमरस पितो याविषयींचें वर्णन आहे. हा इन्द्र सोम पितो व मोठीं कार्यें करतो. आणखी पहा—

२१ अस्य रथे काम्या विपक्षसा शोणा, धृष्णू नृवाहसा हरी युंजन्ति [१४६९]- या इन्द्राच्या रथाला सुन्दर दोन बाजूंना जोडले जाणारे, लाल रंगाचे, शत्रूंचा पराभव करणारे, इन्द्राला वाहून नेणारे दोन घोडे जोडले जातात.

याप्रमाणें इन्द्राच्या रथाचें वर्णन या अध्यायांत आलेलें आहे.

सूर्य – इन्द्र

सूर्याच्या रूपानें इन्द्राचें व सूर्याचेंहि वर्णन या अध्यायांत आलेलें आहे. तें आतां पहा—

१ हे सूर्य ! श्रुतामघं वृषभं नर्यापसं अस्तारं अभि उदेषि [१४५०]- हे सूर्या ! प्रसिद्ध धनवान्, बलवान्, मानवांचें हित करणाऱ्या दात्यासमोर तूं उदित होतोस.

२ विभ्राट् यज्ञपतौ अविन्हुतं आयुः दधत् [१४५३] –विशेष प्रकाशणारा सूर्य यज्ञ करणाऱ्याला आरोग्यपूर्ण दीर्घ आयुष्य देतो.

३ त्मना अभिरक्षति [१४५३]- तो स्वतःच रक्षण करतो.

प्रजाः पिपर्ति, बहुधा विराजति [१४५३]- प्रजाचें पूर्णपणें पालन करतो व अनेक प्रकारांनीं प्रकाशित होतो.

४ विभ्राट् बृहत् सुभृतं वाजसातमं, धर्मन् दिवः धरुणे अर्पितं, सत्यं अमित्र-हा, दस्युहन्तमं असुर-हा सपत्न-हा ज्योतिः जज्ञे [१४५४]- विशेष प्रकाशमान् व मोठा, उत्तम भरण पोषण करणारा व अन्न देणारा, आपल्या शक्तीनें द्युलोकाचें धारण करण्यासाठीं नेमलेला, खरोखर शत्रूंचा नाश करणारा, दुष्टांना मारणारा व राक्षसां-चा विनाशक सपत्नांना मारणारा सूर्य प्रकाश पसरवतो.

५ इदं श्रेष्ठं ज्योतिषां उत्तमं ज्योतिः, विश्वजित्, धनजित् बृहत् उच्यते । विश्वभ्राट् भ्राजः महि सूर्यः दृशे, उरु सहः अच्युतं ओजः पप्रथे [१४५५]- हें श्रेष्ठ व उत्तम सूर्याचें तेज अनेक तेजांचें प्रकाशक आहे, हें तेज उत्तम विश्वविजयी, धन जिंकणारें आणि फार मोठें आहे असें म्हणतात. विश्वाला प्रकाशित करणारा, स्वयं-प्रकाशी हा मोठा सूर्य दिवसाला मोठें सामर्थ्यवान् अविनाशी तेजस्वरूपी बल प्रकाशित करतो.

६ ब्रध्नं अरुषं चरन्तं परि तस्थुषः युञ्जन्ति। रोचना दिवि रोचन्ते [१४६८]- आदित्यरूपी तेजस्वी, चालत असल्याप्रमाणें दिसणाऱ्या पण स्थिर असणाऱ्या, सूर्याला साधक उपासनेसाठीं उपयोगांत आणतात. त्याचे प्रकाशकिरण आकाशांत प्रकाशत आहेत.

७ तत् ज्येष्ठं भुवनेषु आस, यतः उग्रः त्वेषनृम्णः जज्ञे । जज्ञानः सद्यः शत्रून् निरिणाति। यं विश्वे ऊमाः अनुमदन्ति [१४८३]- तें ज्येष्ठ ब्रह्मच सर्व भुवनांमध्यें व्यापून होतें, ज्या पासून उग्र असा हा अत्यंत तेजस्वी सूर्य उत्पन्न झाला. उत्पन्न होतांच त्यानें तत्काल सर्व शत्रूंना नष्ट केलें. त्याला पाहून सर्व प्राणी प्रसन्न होतात.

८ मर्याः ! अकेतवे केतुं कृण्वन्, अपेशसे पेशः, उषद्भिः समजायथाः [१४७०]- हे लोक हो ! अज्ञा-न्याला ज्ञान देत व रूप नसलेल्याला रूप देत उषःकालानंतर हा सूर्य उदय पावला आहे.

९ सवितुः देवस्य तत् वरेण्यं भर्गः धीमहि, यः नः धियः प्रचोदयात् [१४६२]- सवित्या देवाचें तें श्रेष्ठ तेज आहे त्याचें आम्ही ध्यान करतों. जो सविता - सूर्य आमच्या बुद्धींना उत्तम प्रेरणा देत आहे.

याप्रमाणें सूर्याचें वर्णन या अध्यायांत आहे शेवटचा मंत्र गायत्री मंत्र आहे व तो प्रसिद्ध असल्यामुळें सर्वांना माहित आहे. आतां अग्निचें वर्णन पहा—

अग्नि

१ हे अग्ने ! नः आयूंषि ऊर्जं इषं च पवसे [१४६४] – हे अग्ने ! आम्हांला दीर्घ आयुष्य, बल व अन्न दे.

२ दुच्छुनां आरे बाधस्व [१४६४]– दुष्टांना दूर कर.

३ हे अग्ने ! त्वं विश्वेषां यज्ञानां होता, देवेभिः मानुषे जने हितः [१४७४]- हे अग्ने ! तूं सर्व यज्ञांचा होता देवांनीं मानवी जनांमध्यें यज्ञासाठीं स्थापन केला आहे.

४ सः नः अध्वरे मन्द्राभिः जिव्हाभिः महः यज,

देवान् आ वक्षि यक्षि च [१४७५]- तो तूं आमच्या यज्ञामध्यें आनंद वाढवणाऱ्या ज्वालांनीं प्रदीप्त हो व देवासाठीं यजन कर. देवांना बोलाऊन आण व त्यांच्यासाठीं यजन कर.

५ **वेधः सुकृतो देव अग्ने ! यज्ञेषु अध्वनः पथः अंजसा वेत्थ** [१४७६]- हे विधात्या, उत्तम कर्म करणाऱ्या अग्निदेवा ! तूं यज्ञांचा मार्ग - जवळचा व दूरचा मार्ग जाणतोस, म्हणून तूं योग्य मार्ग दाखव.

६ **होता अमर्त्यः देवः विदथानि प्रचोदयन् मायया पुरस्तात् एति** [१४७७]- होता अमर देव कर्मांची प्रेरणा करीत कुशलतेनें पुढें जातो.

७ **वाजी वाजेषु धीयते । अध्वरेषु प्रणीयते । विप्रः यज्ञस्य साधनः** [१४७८]- बलवान् अग्नि युद्धांमध्यें स्थापन केला जातो. दोन पक्षांमध्यें जेव्हां अग्निसारखा द्वेष प्रज्वलित होतो, तेव्हांच युद्ध होतें. यज्ञामध्यें अग्नि नेला जातो. हा ज्ञानी अग्नि यज्ञाचें साधन आहे.

अग्निच्या वर्णनामध्यें यज्ञ करणें हें अग्निचें मुख्य काम आहे. आरोग्य साधन व दीर्घ आयु हें त्याचें फल आहे. शरीरामध्यें अग्निची उष्णता असेपर्यंतच शरीररूपी यज्ञशालेमध्यें सूर्यादि देवतांचे अंश राहत असतात. शरीरांतील उष्णता नष्ट पावली म्हणजे सर्व देव शरीरांतून निघून जातात. हा अनुभव सर्वांना आहे. वरील मंत्रांतील वर्णन मानव शरीरांत होत असलेल्या शतसांवत्सरीय यज्ञामध्यें पहावें म्हणजे मंत्रांतील आलंकारिक भाषा स्पष्ट समजेल व सर्व मंत्रांचा स्पष्ट अर्थ ध्यानीं येईल.

मित्र व वरुण

१ **ताः नः पार्थिवस्य दिव्यस्य महः रायः शक्तं, देवेषु वां महि क्षत्रं** [१४६५]- ते दोन मित्र व वरुण देव पार्थिव व दिव्य असें दोन ही प्रकारचें मोठें धन देण्यास समर्थ आहेत. देवांमध्यें यांचें मोठें क्षात्रबल आहे.

२ **ऋतेन ऋतं सपन्ता इषिरं दक्षं आशाते, अद्रुहा देवौ वर्धेते** [१४६६]- यज्ञानें यज्ञ पूर्ण करीत इच्छा करण्याजोगें बल प्राप्त करतात. द्रोह न करणारे मित्र व वरुण हे दोन देव आपल्या सामर्थ्यानें वाढत असतात.

३ **वृष्टिद्यावा रीत्यापा दानुमत्या इषः पती, बृहन्तं गर्तं आशाते** [१४६७]- वृष्टिच्या कारणानें ज्यांची स्तुति होते, प्रगति होण्यासाठीं जे कर्में करतात, दान देण्याकडे ज्यांची बुद्धि वळत असते असे अन्नाचे स्वामी हे मित्र व वरुण मोठ्या रथांत बसतात.

या मंत्रांत मित्र वरुण यांचीं नांवें नाहींत. पण या मंत्रांच्या या देवता आहेत. पार्थिव व दिव्य ऐश्वर्य हे देतात. क्षात्रकर्मामध्यें हे फार प्रवीण असल्या कारणानें हे शत्रूला पराभूत करून दूर करतात. हे बलवान् आहेत व एक कर्तव्य संपलें कीं दुसरें कर्तव्य करावयास लागतात. स्वस्थ बसून आळसांत वेळ घालवीत नाहींत. आपसांत भांडत बसत नाहींत. प्रगति करण्याचीं सर्व कार्यें करीत असतात. असे यांचे सद्गुण उपासकांनीं आपल्या अंगीं आणण्यासारखे आहेत.

सरस्वती

सरस्वती देवी संबंधीं थोडेंसें वर्णन या अध्यायामध्यें आलेलें आहे. तें आतां पहा—

१ **उत नः प्रियासु प्रिया, सप्त-स्वसा सुजुष्टा सरस्वती स्तोम्या भूत्** [१४६१]- आम्हांला प्रिय वस्तुमध्यें प्रिय, सात बहिणी जिला आहेत अशी उत्तम सेवा केली जाणारी सरस्वती स्तुति करण्यास योग्य अशी झाली आहे.

सरस्वती ही विद्या व संस्कृति आहे. आपल्या देशाची संस्कृति आपणास प्रिय असलीच पाहिजे. ही प्रिय वस्तूंपेक्षा अधिक प्रिय आहे. सर्व प्रशंसनीयांमध्येंही अधिक प्रशंसनीय आहे. हिच्या सात बहिणी आहेत. धर्म भावना, भाषा, सभ्यता, सत्कर्म करण्याची इच्छा व शक्ति, संस्कृति आणि मातृभूमि या हिच्या सात बहिणी आहेत. यांची सेवा करणें अगदीं प्रत्येकास योग्य आहे. तसेंच आणखी पहा —

२ **जनीयन्तः पुत्रीयन्तः सुदानवः अग्रवः सरस्वन्तं हवामहे** [१४६०]- स्त्री असलेले गृहस्थी लोग, पुत्र असलेले, उत्तम दान देणारे, सर्वांच्या पुढें राहणारे अग्रेसर असे सर्व आम्ही सरस्वतीची सहाय्यासाठीं प्रार्थना करीत आहों.

सर्व प्रकारच्या लोकांनीं या विद्यादेवीची उपासना केली पाहिजे. सर्व उत्कर्ष साधण्यासाठीं विद्येचाच उपयोग होत असतो. विद्येमध्यें जो पुढें असतो, तो सर्वांत पुढें होतो.

प्राणाची उपासना

दीर्घ आयुष्य प्राप्त करण्यासाठीं प्राणाची उपासना करणें अत्यंत आवश्यक आहे. या विषयीं असें म्हटलें आहे—

१ **हे ब्रह्मणस्पते ! सोमानां कक्षीवन्तं स्वरणं कृणुहि, यः औशिजः** [१४६२]- हे ज्ञानाच्या स्वामी, हे ज्ञानपते ! (स-उमानां) ब्रह्मविद्या ही उमा आहे, त्या ब्रह्मविद्येसह जो असतो तो सोम म्हणजे ब्रह्मज्ञानी ! त्या ज्ञानी लोकांमध्यें योगसाधनाच्या अनुभवानें जें प्राणाचें ज्ञान त्याला झालेलें असतें, त्या छातीमध्यें राहणाऱ्या प्राणाला (स्वरणं-सु-अरणं) उत्तम पूरक व रेचक - उत्तम गमन व आगमन करणारा करा, हा प्राण आपणाला वश झालेला असावा. म्हणजे आपणांस मोठी सिद्धि मिळेल.

ज्ञान प्राप्त करून घ्यावें, नंतर प्राणाला वश करून घ्यावें, पूरक व रेचक यांचा अभ्यास करावा. हा छातीमध्यें राहणारा प्राण वश झाला म्हणजे दीर्घजीवन साध्य होतें, निरोगी राहतां येतें, स्वास्थ्य सुख मिळवतां येतें..

याप्रमाणें या अध्यायामध्यें ही महत्त्वाची साधना सांगितली आहे. जे याचें अनुष्ठान करतील त्यांना स्वास्थ्य, आरोग्य व दीर्घजीवन सुखानें प्राप्त होईल.

सोम

आतां सोमाचें वर्णन पहा या अध्यायामध्यें सोमाचें वर्णन आलेलें आहे—

१ बभ्रुः [१४४४]- भूरकट रंगाचा.

२ स्वतवाः [१४४४]- आपल्या शक्तिचें वाढणारा.

३ अरुणः [१४४४]- चमकणारा.

४ दिविस्पृक् [१४४४]- स्वर्गामध्यें असणारा, हिमालयाच्या उंच शिखरावर उगवणारा-

५ मनसः पतिः [१४४८]- मनाचा स्वामी, मनाचा उत्साह वाढवणारा.

६ शुष्मी [१४७३ [- सामर्थ्यवान्, बलवान्.

७ सुमतिः [१४७३]- उत्तम बुद्धि देणारा, मनाला उत्तेजित करणारा.

असे सोमाचे गुण आहेत. आतां सोमाचें आणखी वर्णन पहा—

८ दिवः वृष्टिं नः आ पवस्व, अपां ऊर्मिं परि, अयक्ष्माः बृहतीः इषः [१४३५]- द्युलोकांतून वृष्टि कर, पाण्याच्या लाटा उसळोत, रोगरहित अन्न मिळो.

९ तया धारया पवस्व, यया जन्यासः गावः इह नः गृहं उप आगमन् [१४३६] - त्या धारेचें गाळला जा, जिच्या योगानें दुधाळ व वांसरांसह गाई आमच्या घराजवळ येतील. त्यांचें दूध सोमरसामध्यें मिसळलें जाईल.

१० नः ऊर्जे अव्ययं पवित्रं धारया विधाव [१४३८] -आमच्या बलसंवर्धनासाठीं मेंढीच्या केंसांच्या गाळणीमधून धारेनें खालील भांड्यांत लवकर जा.

११ रक्षांसि अपजंघनत्, रुचः प्रत्नवत् रोचयन् पवमानः असिष्यदत् [१४३९]- राक्षसांना मारून, पूर्वीप्रमाणें तेजाचीं किरणें प्रकाशित करीत, गाळला जाऊन भांड्यांत उतर.

१२ विश्वानि विदुषे अरंगमाय जग्मये अपश्चाद् अध्वने पिपीषते असै प्रति भर [१४४०]- सर्व ज्ञान ज्याला आहे, पुष्कळ प्रगति करणाऱ्या, यज्ञामध्यें जाणाऱ्या, अग्रभागीं राहणाऱ्या, सोम पिण्याची इच्छा करणाऱ्या या इन्द्रासाठीं सोमरस दे.

१३ हे सोम ! अ-मित्र-हा विश्वचर्षणिः देवेभ्यः अनुकामकृत् गवे शं पवस्व [१४४७]- हे सोमा ! तूं शत्रूंना मारणारा, सर्व मनुष्यांचें कल्याण करणारा, देवांसाठीं अनुकूल कर्म करणारा तूं गाईसाठीं कल्याण करण्यासाठीं शुद्ध हो. गाईचें दूध सोमामध्यें मिसळलें जातें. यामुळें गाईंना आनन्द वाटतो.

१४ हे सोम ! इन्द्राय पातवे मदाय परिषिच्यसे [१४४८]- हे सोमा ! इन्द्राला पिण्यासाठीं व त्याला आनंद देण्यासाठीं पात्रामध्यें तूं पडत आहेस. गाळला जात आहेस.

१५ हे इन्दो पवमान ! सुवीर्यं रयिं नः युजा इन्द्रेण नः रिरीहि [१४४९]- हे शुद्ध होणाऱ्या सोमा ! उत्तम वीर्यासह असणारें धन आमच्या सहाय्य करणाऱ्या इन्द्राकडून आम्हांस देवव.

१६ यथा दिव्या विट् अनभिशस्ता [१४७३]- ज्या रीतिनें दिव्य प्रजा आनन्दित राहतील असें कर.

१७ नः मक्षु सुपतिः भव । सहस्राप्साः पृतनाषाड् [१४७३]- आमच्या बुद्धि लवकर उत्तम होतील असें कर. अनेक कर्मं करणारा व शत्रुसेनेचा पराभव करणारा हो.

१८ सुते श्रियं आसिंचत । रसा वृषभं दधीत [१४८०]- सोमरसामध्यें दूध मिसळा, त्या दुधानें बलवान् सोमाचें धारण करावें.

१९ ते स्वं ओक्यं जानत, वत्सासः मातृभिः न, जामिभिः मिथः नसन्त [१४८१]- त्या गाई आपलें घर जाणोत. वांसरें आपल्या मातांजवळ जातात, त्याप्रमाणें आपल्या बांधवांसह ते मिळून राहोत.

गाईचें घर सोमरस हें आहे म्हणून सोमामध्यें गाईचें दूध मिसळतात. अर्थात् गाईचें दूध आपल्या घरीं जातें. म्हणजे तें सोमामध्यें मिसळलें जातें, या अलंकाराचा हा अर्थ आहे.

सोमामध्यें दूध

सोमरसामध्यें गाईचें दूध मिसळलें जातें हें अनेक मंत्रांनीं दाखवलेलें आहे. पहा—

१ हस्तच्युतेभिः अद्रिभिः सुतं सोमं पुनीतन, मधौ मधु आधावत [१४४५]- हातांनीं आपटल्या जाणाऱ्या दगडांनीं काढलेला हा सोमरस शुद्ध करा व या मधुर सोमरसामध्यें मधुर दूध मिसळा.

२ नमसा उपसीदत, दध्ना अभिश्रीणीत, इन्द्रे इन्दुं दधातन [१४४६]- नमस्कार करीत सोमाजवळ बसा, त्या सोमरसामध्यें दहीं वा दूध मिसळा व तो सोमरस इन्द्राला द्या.

याप्रमाणें सोम इन्द्राला देण्याचें वर्णन आहे. अन्य देवांनाहि याचप्रमाणें सोमरस पिण्यास दिला जात असतो.

सुभाषित

१ दिवः वृष्टिं नः सु आ पवस्व, अयक्ष्माः बृहतीः इषः [१४३५]– आकाशांतून पाऊस उत्तम रीतिनें पाड व रोगरहित पुष्कळ अन्न आम्हांला दे.

२ तया धारया पवस्व, यया जन्यासः गावः इह नः गृहं उपागमन् [१४३६]– तूं धारेनें वृष्टी कर, ज्या योगानें दूध देणाऱ्या गाई येथें आमच्या घरीं येतील.

३ देवासः कं शृण्वन् [१४३८]– देव आनंदाचे शब्द ऐकोत.

४ रक्षांसि अपजंघनत्, रुचः प्रत्नवत् रोचयन् [१४३९]– राक्षसांना मारून, पूर्वींप्रमाणें आपल्या तेजानें तेजस्वी होत रहा.

५ विश्वानि विदुषे, अरंगमाय जग्मये, अपश्चात् अध्वने प्रतिभर [१४४०]– सर्व जाणणाऱ्या, पुष्कळ प्रगति करणाऱ्या, सर्वांच्या पुढें असणाऱ्याला भरपूर अन्न दे.

६ मेधिरः विश्वस्य वेद, धृषत्, तं इत् एषते [१४४२]– बुद्धिमान् इन्द्र तुमच्या सर्व मनोरथांना जाणतो, तो शत्रूंचा पराभव करतो व तुमच्या सर्व कामना पूर्ण करतो.

७ समस्य जेन्यस्य शर्धतः अभिशस्तेः कुवित् अवस्वरत् [१४४३]– सर्व जिंकण्यास योग्य अशा स्पर्धा करणाऱ्या शत्रूंचा नाश करून तो इन्द्र तुमचें निःसंशय संरक्षण करील.

८ अमित्रहा विश्वचर्षणिः देवेभ्यः अनुकामकृत् [१४४७]– तूं शत्रूंचा नाश करणारा, सर्व मानवांचें कल्याण करणारा व देवांच्या अनुकूल कार्य करणारा आहेस.

९ गवे शं पवस्व [१४४७]– गाईंना सुख दे.

१० मनः चित् मनसः पतिः [१४४८]- मनाचें सामर्थ्य जाणावें व मनावर स्वामित्व करावें.

११ सुवीर्यं रयिं नः रिरीहि [१४४५]- उत्तम पराक्रम करण्याच्या सामर्थ्यांबरोबर असणारें धन आम्हांला दे.

१२ श्रुतामघं वृषभं नर्यापसं अस्तारं अभि उदेषि [१४५०]– प्रसिद्ध धनवान्, बलवान् तथा मानवांचें हित करण्याचें कार्य करणाऱ्यांच्या व दान देणाऱ्यांच्या समोर तूं प्रकट होतोस.

१३ यः नव नवतिं पुरः बाह्वोजसा बिभेद [१४५१] –ज्या इन्द्रानें शत्रूंचीं ९९ नगरें आपल्या बाहुबलानें तोडलीं.

१४ वृत्र-हा अहिं अवधीत् [१४५१]- वृत्राला मारणाऱ्या इन्द्रानें अहिला ठार मारलें.

१५ सः शिवः इन्द्रः नः सखा, अश्वावत्, गोमत् यवमत् उरुधारा इव दोहते [१४५२]- तो कल्याण करणारा इन्द्र आमचा मित्र आहे, तो घोडे, गाई व जव यांच्यासह मिळणारें अन्न, पुष्कळ दूध देणाऱ्या गाईप्रमाणें आम्हांला देतो.

१६ विभ्राट् यज्ञपतौ अ-विन्हुतं आयुः दधत् [१४५३] - सूर्य यज्ञ करणाऱ्याला आरोग्यमय दीर्घ आयु देतो.

१७ बृहत् सोम्यं मधु पिबतु [१४५३]- पुष्कळ सोमरसाचें मधुर पेय तो पिऊं दे.

१८ वातजूतः त्मना अभि रक्षति [१४५३]- वायुनें प्रेरित केलेला स्वतःचें सर्वप्रकारें रक्षण करतो.

१९ प्रजाः पिपर्ति [१४५३]– प्रजांचें उत्तम पोषण करतो.

२० बहुधा विराजति [१४५३]- अनेक रीतिंनीं तो विशेष तेजस्वी होतो.

२१ विभ्राट् बृहत् सत्यं अमित्रहा दस्युहन्तमः असुरहा सपत्नहा, ज्योतिः जज्ञे [१४५४]- विशेष तेजस्वी व विशाल, खरोखर शत्रूंचा नाशक, दुष्टांना मारणारा, असुरांना मारणारा, सपत्नां [शत्रूं] ना मारणारा असा तेजस्वी वीर उत्पन्न झाला आहे.

२२ इदं श्रेष्ठं ज्योतिषां उत्तमं ज्योतिः विश्ववित्, धनजित् बृहत् उच्यते [१४५५]– हें श्रेष्ठ तेजस्वी पदार्थांमध्यें उत्तम तेजस्वी, सर्वत्र विजय करणारें, धन जिंकणारें असें मोठें प्रसिद्ध तेज आहे.

२३ विश्वभ्राट्, भ्राजः महि सूर्यः दृशे उरु सहः अच्युतं ओजः पप्रथे [१४५५]- सर्वांना प्रकाशित करणारा, स्वयं प्रकाशमान् हा मोठा सूर्य दिसावयाला मोठा सामर्थ्यवान् व अविनाशी असा तेजस्वी सामर्थ्याला प्रसारित करीत आहे.

२४ क्रतुं आ भर [१४५६]- यज्ञ उत्तम रीतिनें समाप्त कर.

२५ यथा पुत्रेभ्यः पिता, नः शिक्ष [१४५६]– जसा आपल्या पुत्रांना पिता धन वांटून देतो, तसें तूं आम्हांला दे.

२६ यामनि जीवाः ज्योतिः अशीमहि [१४५६]- यज्ञामध्यें आम्ही मनुष्य प्रकाश प्राप्त करूं.

२७ अज्ञाताः वृजनाः अशिवासः दुराध्याः नः मा अवक्रमुः [१४५७]– अज्ञात, कुटिल, पापी व अमंगल शत्रु आमच्यावर हल्ला न करोत.

२८ हे शूर ! त्वया वयं प्रवतः शश्वतीः अपः अति तरामसि [१४५७] - हे शूरा ! तुझ्या सहाय्यानें सुरक्षित झालेले आम्ही पुष्कळ संकटांच्या प्रवाहांतून पार होऊं.

२९ अद्य श्वः परे च नः त्रास्व [१४५८]- आज, उद्यां व परवां म्हणजे सर्वदा आमचें रक्षण कर.

३० हे सत्पते ! विश्वा च अहा नः दिवा नक्तं च रक्षिषः [१४५८]- हे सज्जनांच्या संरक्षका ! सर्वदा आम्हांला दिवसा व रात्रौ सुरक्षित ठेव.

३१ अयं मघवा वीर्याय कं प्रभंगी शूरः तुवी-मघः संमिश्लः [१४५९] हा धनवान् इन्द्र सुखानें पराक्रम करण्यासाठीं, शत्रूंना विनष्ट करणारा, शूर, पुष्कळ ऐश्वर्यवान् व मिळून मिसळून वागणारा आहे.

३२ या वज्रं नि मिमिक्षतुः ते उभा बाहू वृषणा [१४५९]- तुझे दोनही बाहू बलवान् आहेत जे वज्र धारण करतात.

३३ जनीयन्तः पुत्रीयन्तः सुदानवः अग्रवः सरस्वन्तं हवामहे [१४६०]- स्त्रीबरोबर राहणारे अर्थात् विवाहित, पुत्र असलेले, उत्तम दान देणारे आम्हीं विद्यादेवीला सहाय्यासाठीं बोलावीत आहों.

सरस्वान्- विद्येचा उपासक, विद्वान्, ज्ञानी.

३४ सरस्वती स्तोम्या भूत् [१४६१]- विद्यादेवी स्तुति करण्यास योग्य आहे.

३५ सवितुः देवस्य तत् वरेण्यं भर्गः धीमहि, यः नः धियः प्रचोदयात् [१४६२]- सविता देवाच्या त्या श्रेष्ठ तेजाचें आम्ही ध्यान करतों, जें आमच्या बुद्धिना प्रेरणा देतें.

३६ हे ब्रह्मणस्पते ! सोमानां कक्षीवन्तं स्वरणं कृणुहि [१४६३]- हे ज्ञानपते ! ज्ञानानें व योगसाधनानें छातीमध्यें राहणाऱ्या प्राणाला उत्तम गमनागमन करणारा कर. प्राणायामाचा अभ्यास कर.

३७ नः आयूंषि पवसे, नः ऊर्जं इषं च [१४६४]- आम्हांला दीर्घायुष्य दे व आम्हांला बल व अन्न दे.

३८ दुच्छुनां आरे बाधस्व [१४६४]- दुष्टांना दूर कर.

३९ ता नः दिव्यस्य पार्थिवस्य महः रायः शक्तं, वां देवेषु माहि क्षत्रं [१४६५]- तुम्हीं आम्हांला द्युलोकांतील व पृथिवीवरील मोठें ऐश्वर्य द्या. कारण तुमचें देवांमध्यें मोठें बल प्रसिद्ध आहे.

४० ऋतेन ऋतं सपन्ता इषिरं दक्षं आशाते, अद्रुहौ देवौ वर्धेते [१४६६]- सत्यानें सत्याचें पालन करीत इच्छा करण्यास योग्य बल प्राप्त करतात व हे परस्पर द्रोह न करणारे दोन देव वाढत असतात.

४१ दानुमत्या इषस्पती बृहन्तं गर्तं आशाते [१४६७]- दान देणारे अन्नपति मोठ्या रथांत बसतात.

४२ ब्रध्नं अरुषं चरन्तं परि तस्थुषः युञ्जंति [१४६८] – ध्यान करणारे लोक सूर्याच्या तेजस्वी फिरणाऱ्या रूपाला उपासनेसाठीं उपयोगांत आणतात.

४३ रोचना दिवि रोचन्ते [१४६८]- त्याचे किरण आकाशांत प्रकाशित होत आहेत.

४४ अस्य रथे काम्या विपक्षसा शोणा धृष्णू नृवाहसा हरी युंजन्ति [१४६९]- याच्या रथाला सुन्दर दोनही बाजूंना जोडले जाणारे लाल रंगाचे, शत्रूचा पराभव करणारे, वीरांना वाहून नेणारे दोन घोडे जोडले जातात.

४५ अकेतवे केतुं कृण्वन्, अपेशसे पेशः, उषद्भिः समजायथाः [१४७०]- अज्ञान्याला ज्ञान देणाऱ्या, रूप नसलेल्याला सुंदर रूप देणाऱ्या सूर्याचा उषांच्या आगमनानंतर उदय होतो.

४६ सः महः पुरूणि वसूनि सातये अयोजि [१४७२] – या मोठ्या इन्द्रानें पुष्कळ धनाचें दान देण्याची योजना केली आहे.

४७ विश्वा नहुष्याणि जाता, ऊर्ध्वा वने स्वर्षाता नवन्त [१४७२]- सर्वांचा विरोध करणारे शत्रु उत्पन्न झाले आहेत, ते वर तोंड करून वनामध्यें होणाऱ्या युद्धांमध्यें नाश पावोत.

४८ सहस्राप्साः पृतनाषाट् [१४७३]- अनेक रूपांनीं शत्रूच्या सेनेचा पराभव करणारा तो वीर आहे.

४९ अमर्त्यः देवः विदथानि प्रचोदयन् मायया पुरस्तात् एति [१४७७]- अमर देव सर्व उत्तम कर्मांना प्रोत्साहन देत कुशलतेनें पुढें होतो.

५० वाजी वाजेषु धीयते [१४७८]- बलवान् वीर युद्धामध्यें जातो.

५१ विप्रः यज्ञस्य साधनः [१४७८] ज्ञानी यज्ञाचें साधन करतो.

५२ ते स्वं ओक्यं जानत [१४८१]- ते आपलें घर जाणतात.

५३ वत्सासः मातृभिः [१४८१]- मुलें आयांबरोबर जातात.

५४ जामिभिः मिथः नसन्त [१४८१]- आपल्या बांधवांबरोबर ते मिसळून राहतात.

५५ तत् ज्येष्ठं इत् भुवनेषु आस [१४८३]- तें श्रेष्ठ ब्रह्म खरोखर भुवनांमध्यें व्यापून राहिलें आहे.

५६ यतः उग्रः त्वेष-नृम्णः जज्ञे [१४८३]- ज्यापासून उग्र तेजस्वी सूर्य प्रकट झाला आहे.

५७ जज्ञानः सद्यः शत्रून् निरिणाति [१४८३]- उत्पन्न होतांच तो शत्रूंना नष्ट करून टाकतो.

५८ यं विश्वे ऊमाः अनु मदन्ति [१४८३]- ज्याला पाहून सर्व प्राणी आनन्दित होतात.

५९ शवसा वावृधानः भूर्योजाः शत्रुः दासाय भियसं दधाति [१४८४]- सामर्थ्यानें वाढणारा आणि अनंतशक्तिनीं युक्त असा तो दुष्टांचा शत्रु इन्द्र शत्रूंच्या अन्तःकरणांत भय उत्पन्न करतो.

६० अव्यनत् च व्यनत् च सस्नि [१४८४]- श्वासोच्छ्वास करणारे व न करणारे या दोघांचें तो हित करतो.

६१ ते मदेषु प्रभृता सं नवन्त [१४८४]- तुझ्या आनंदांत वाढलेले सर्व लोक तुझी भक्ति करण्यासाठीं एकत्र जमतात.

६२ महां उरुं ईं माहि कर्म कर्तवे ममाद [१४८६]- मोठ्या अधिक सामर्थ्यवान् वीराला मोठें कार्य करण्यासाठीं उत्साहित कर.

६३ क्रतुना साकं जातः [१४८७]- कर्म करण्याच्या शक्तिसह तूं उत्पन्न झाला आहेस.

६४ ओजसा साकं ववक्षिथ [१४८७]- आपल्या सामर्थ्यानें कामें करण्याची तुझी इच्छा आहे.

६५ हे प्रचेतन ! वीर्यैः साकं वृद्धः [१४८७]- हे उत्साही वीरा ! आपल्या पराक्रमांनीं तूं मोठा झाला आहेस.

६६ मृधः सासहिः [१४८७] शत्रूंचा पराभव कर.

६७ विचर्षणिः स्तुवते राधः काम्यं वसु दाता [१४८७]- विशेष ज्ञानी तूं स्तुति करणाराला धन व इष्ट ऐश्वर्य देतोस.

६८ त्विषीमान् ओजसा क्रिविं युधा अभि अभवत् [१४८८]- तेजस्वी तूं आपल्या सामर्थ्यानें हिंसक शत्रूला युद्धामध्यें जिंकलेंस.

६९ रोदसी आ पृणात् [१४८८]- द्यावापृथिवीला तेजानें भरलेंस.

७० अस्य मज्मना प्र वावृधे [१४८८]- याच्या सामर्थ्यानें तूं वाढलास.

७१ प्र चेतय [१४८८]- इतरांना उत्तम प्रेरणा कर.

उपमा

१ उरुधारा इव [१४५२]- पुष्कळ दूध देणाऱ्या गाई प्रमाणें (सः इन्द्रः दोहते) तो इन्द्र धन देतो.

२ यथा पिता पुत्रेभ्यः, नः शिक्ष [१४५६]- जसा पिता पुत्रांना धन देतो, त्याप्रमाणें हे इन्द्रा ! तूं आम्हांला धन दे.

३ यथा दिव्या विद् अनभिशस्ता [१४७३]- ज्याप्रमाणें दिव्य प्रजाजन आनंदानें पवित्र राहतात, त्याप्रमाणें सोम पवित्र असतो.

४ आपः न [१४७३]- पाण्याप्रमाणें शुद्ध बुद्धि आम्हांस दे.

५ यज्ञः न [१४७३]- यज्ञाप्रमाणें तूं पूज्य आहेस.

६ वत्सासः मातृभिः न [१४८१]- वांसरें मातांजवळ जातात, त्याप्रमाणें आपल्या बांधवांसह ते सोमरस जातात. सोमरस भांड्यांत जातात.

त्रयोदशाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

(१)

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१४३५	९।४९।१	कविर्भार्गवः	पवमानः सोमः	गायत्री
१४३६	९।४९।२	कविर्भार्गवः	,,	,,
१४३७	९।४९।३	कविर्भार्गवः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१४३८	९।४९।४	कविर्भार्गवः	पवमानः सोमः	गायत्री
१४३९	९।४९।५	कविर्भार्गवः	,,	,,
१४४०	६।४२।१	भरद्वाजो बार्हस्पत्यः	इन्द्रः	अनुष्टुप्
१४४१	६।४२।२	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
१४४२	६।४२।३	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
१४४३	६।४२।४	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	बृहती
		(२)		
१४४३	९।११।४	असितः काश्यपो देवलो वा	पवमानः सोमः	गायत्री
१४४५	९।११।५	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
१४४६	९।११।६	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
१४४७	९।११।७	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
१४४८	९।११।८	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
१४४९	९।११।९	असितः काश्यपो देवलो वा	,,	,,
१४५०	८।९३।१	सुकक्ष आंगिरसः	इन्द्रः	,,
१४५१	८।९३।२	सुकक्ष आंगिरसः	,,	,,
१४५२	८।९३।३	सुकक्ष आंगिरसः	,,	,,
		(३)		
१४५३	१०।१७०।१	विभ्राट् सौर्यः	सूर्यः	जगती
१४५४	१०।१७०।२	विभ्राट् सौर्यः	,,	,,
१४५५	१०।१७०।३	विभ्राट् सौर्यः	,,	,,
१४५६	७।३२।२६	वसिष्ठो मैत्रावरुणिः	इन्द्रः	प्रगाथः-(विषमा बृहती समा सतोबृहती)
१४५७	७।३२।२७	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१४५८	८।६१।१७	भर्गः प्रागाथः	,,	,,
१४५९	८।६१।१८	भर्गः प्रागाथः	,,	,,
		(४)		
१४६०	७।९६।४	वसिष्ठो मैत्रावरुणिः	सरस्वान्	गायत्री
१४६१	६।६१।१०	भरद्वाजो बार्हस्पत्यः	सरस्वती	,,
१४६२	३।६२।१०	विश्वामित्रो गाथिनः	सविता	,,
१४६३	१।१८।१	मेधातिथिः काण्वः	ब्रह्मणस्पतिः	,,
१४६४	९।६६।१९	शतं वैखानसः	अग्निः पवमानः	,,
१४६५	५।६८।३	यजत आत्रेयः	मित्रावरुणौ	,,
१४६६	५।६८।४	यजत आत्रेयः	,,	,,
१४६७	५।६८।५	यजत आत्रेयः	,,	,,
१४६८	१।६।१	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	इन्द्र	,,
१४६९	१।६।२	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
१४७०	१।६।३	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(५)		
१४७१	९।८८।१	उशना काव्यः	पवमानः सोमः	त्रिष्टुप्
१४७२	९।८८।२	उशना काव्यः	,,	,,
१४७३	९।८८।७	उशना काव्यः	,,	,,
१४७४	६।१६।१	भरद्वाजो बार्हस्पत्यः	अग्निः	वर्धमाना
१४७५	६।१६।२	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	गायत्री
१४७६	६।१६।३	भरद्वाजो बार्हस्पत्यः	,,	,,
१४७७	३।२७।७	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१४७८	३।२७।८	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१४७९	३।२७।९	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
		(६)		
१४८०	८।७२।१३	हर्यतः प्रागाथः	अग्निः, हवींषि वा	,,
१४८१	८।७२।१४	हर्यतः प्रागाथः	,,	,,
१४८२	८।७२।१५	हर्यतः प्रागाथः	,,	,,
१४८३	१०।१२०।१	बृहद्दिव आथर्वणः	इन्द्रः	त्रिष्टुप्
१४८४	१०।१२०।२	बृहद्दिव आथर्वणः	,,	,,
१४८५	१०।१२०।३	बृहद्दिव आथर्वणः	,,	,,
१४८६	२।२२।१	गृत्समदः शौनकः	,,	अष्टिः
१४८७	२।२२।३	गृत्समदः शौनकः	,,	अतिशक्वरी
१४८८	२।२२।२	गृत्समदः शौनकः	,,	,,

अथ चतुर्दशोऽध्यायः ।

अथ सप्तमप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ ७-१ ॥

[१]

(१-१६) १, ९ प्रियमेध आंगिरसः; २ नृमेध-पुरुमेधावांगिरसौ; ३, ७ त्र्यरुणस्त्रैवृष्णः, त्रसदस्युः पौरुकुत्सः; ४ शुनःशेप आजीगर्तिः; ५ वत्सः काण्वः; ६ अग्निस्तापसः; ८ विश्वमना वैयश्वः; १० वसिष्ठो मैत्रावरुणिः; ११ सौभरिः काण्वः; १२ शतं वैखानसः; १३ वसूयव आत्रेयः; १४ गोतमो राहूगणः; १५ केतुराग्नेयः; १६ विरूप आंगिरसः ॥ १-२, ५, ८-९ इन्द्रः; ३, ७ पवमानः सोमः; ४, १०-११, १३-१६ अग्निः; ६ विश्वे देवाः, १२ अग्निः पवमानः ॥ १, ४-५, १२-१६ गायत्री; २, १० प्रगाथः=(विषमा बृहती, समा सतोबृहती); ३, ७ ऊर्ध्वा बृहती; ६ अनुष्टुप्, ८-९ उष्णिक्; ११ बृहती ॥

१४८९ अभि प्र गोपतिं गिरेन्द्रमर्च यथा विदे । सूनुꣳ सत्यस्य सत्पतिम् ॥१॥ ऋ. ८।६९।४)

१४९० आ हरयः ससृज्रिरेऽरुषीरधि बर्हिषि । यत्राभि संनवामहे ॥ २ ॥ (ऋ. ८।६९।५)

१४९१ इन्द्राय गाव आशिरं दुदुह्रे वज्रिणे मधु । यत्सीमुपह्वरे विदत् ॥ ३ ॥ १ (हा) ॥
[धा० ११ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ८।६९।६)

१४९२ आ नो विश्वासु हव्यमिन्द्रꣳ समत्सु भूषत ।
उप ब्रह्माणि सवनानि वृत्रहन्परमज्या ऋचीषम ॥ १ ॥ (ऋ. ८।९०।१)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१४८९] हे स्तुति करणाऱ्या ! (सत्यस्य सूनुं) सत्य यज्ञाचा पालक (सत्पतिं गोपतिं) सज्जनांचा रक्षक व गाईंचा प्रतिपालक यासंबंधीं (यथा विदे गिरा) जशी माहिती आहे तशा स्तुतिनें (इन्द्रं अभि प्र अर्च) इन्द्राचा उत्तम सत्कार कर. ॥ १ ॥

[१४९०] (हरयः) इन्द्राचे घोडे (अरुषीः) चमकणाऱ्या (अधि बर्हिषि) आसनांवर त्याला (आ ससृज्रिरे) आणोत. (यत्र अभि सन्नवामहे) ज्याठिकाणीं बसलेल्या इन्द्राची आम्ही स्तुति करणार आहों. ॥ २ ॥

[१४९१] (यत्) जेव्हां इन्द्र (उपह्वरे) जवळच (मधु सीं विदत्) मधुर सोमरस पीत असतो तेव्हां (गावः) गाई (वज्रिणे इन्द्राय) वज्रधारी इन्द्रासाठीं (मधु आशिरं दुदुह्रे) मधुर दूध देत आहेत. ॥ ३ ॥

[१४९२] हे ऋत्विज हो ! (विश्वासु समत्सु) सर्व युद्धांमध्यें (हव्यं इन्द्रं) सहाय्यासाठीं बोलावण्यास योग्य इन्द्राच्या उद्देशानें गाईली जाऊन (नः ब्रह्माणि सवनानि उप आभूषत) आमचीं स्तोत्रें त्याची शोभा वाढवितात. (वृत्रहन् परमज्याः ऋचीषम) हे वृत्राला- मारणाऱ्या व श्रेष्ठ धनुष्याची दोरी ज्याची आहे अशा स्तुत्य इन्द्रा ! आम्हांला इच्छित धन दे ॥ १ ॥

१४९३ त्वं दाता प्रथमो राधसामस्यसि सत्य ईशानकृत् ।
तुविद्युम्नस्य युज्या वृणीमहे पुत्रस्य शवसो महः ॥ २ ॥ २ (या) ॥

[धा० १७ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ८।९०।२)

१४९४ प्रत्नं पीयूषं पूर्व्यं यदुक्थ्यं महो गाहाद्दिव आ निरधुक्षत ।
इन्द्रमभि जायमानꣳ समस्वरन् ॥ १ ॥ (ऋ. ९।११०।८)

१४९५ आदीं के चित्पश्यमानास आप्यं वसुरुचो दिव्या अभ्यनूषत ।
दिवो न वारꣳ सविता व्यूर्णुते ॥ २ ॥ (ऋ ९।११०।६)

१४९६ अध यदिमे पवमान रोदसी इमा च विश्वा भुवनाभि मज्मना ।
यूथे न निष्ठा वृषभो वि राजसि ॥ ३ ॥ ३ (खु) ॥

[धा० १६ । उ० २ । स्व० ६] (ऋ. ९।११०।९)

१४९७ इममू षु त्वमस्माकꣳ सनिं गायत्रं नव्याꣳसम् । अग्ने देवेषु प्र वोचः ॥ १ ॥

(ऋ. १।२७।४)

१४९८ विभक्तासि चित्रभानो सिन्धोरूर्मा उपाक आ । सद्यो दाशुषे क्षरसि ॥२॥ (ऋ. १।२७।६)

[१४९३] हे इन्द्रा ! (प्रथमः त्वं राधसां दाता असि) सर्वांत प्रथम तूं धनांचा दाता आहेस. (ईशानकृत् सत्यः असि) ऐश्वर्ययुक्त करणारा तूं खरोखरच आहेस. (तुविद्युम्नस्य शवसः पुत्रस्य महः) पुष्कळ तेजस्वी बलाच्या पुत्रासारख्या तुझ्याकडून (युज्या वृणीमहे) धनांची प्रार्थना आम्ही करीत आहों. ॥ २ ॥

[१४९४] (यत् प्रत्नं) जें पूर्वीपासून मिळत आलें आहे, तें (पीयूषं उक्थ्यं) अमृत प्रशंसनीय आहे. तें (पूर्व्यं) पूर्वीपासून मिळणारें (महः गाहात् दिवः) मोठ्या अगाध द्युलोकापासून (आ निरधुक्षत) काढलें आहे. त्यानंतर (इन्द्रं अभि) इन्द्राच्या पुढें (जायमानं) उत्पन्न झालेल्या सोमाची (समस्वरन्) यज्ञकर्ते स्तुति करतात. ॥ १ ॥

[१४९५] (आत्) नंतर (पश्यमानासः दिव्याः वसुरुचः) याला पाहणारे दिव्य वसुरुच जोपर्यंत (दिवः सविता) द्युलोकांतील सविता (वारं न व्यूर्णुते) आवरक अन्धकाराला दूर करीत नाहीं, तोपर्यंत (आप्यं ईं अभ्यनूषत) बांधवासारख्या या सोमाची स्तुति करतात. ॥ २ ॥

[१४९६] हे (पवमान) सोमा ! (अध) नंतर (यत् इमे रोदसी) जेव्हां या द्यु व पृथिवी (इमा विश्वा भुवना च) आणि हे सगळे प्राणी यांमध्यें (मज्मना यूथे निष्ठा वृषभः न) आपल्या बलानें गाईंच्या कळपांत राहणाऱ्या बैलाप्रमाणें (विराजसि) तूं विराजमान होत असतोस. ॥ ३ ॥

[१४९७] हे (अग्ने) अग्ने ! (त्वं अस्माकं) तूं आमच्याजवळ (इमं ऊ सु) म्हटले जाणारे हे (सनिं) हवनयुक्त (नव्यांसं गायत्रं) नवीन स्तुतिचे मंत्र (देवेषु प्रवोचः) देवांजवळ जाऊन त्यांना सांग. ॥ १ ॥

[१४९८] हे (चित्रभानो) विलक्षण तेजस्वी अग्ने ! तूं (विभक्ता असि) धन देणारा आहेस. (सिन्धोः उपाके ऊर्मा आ) ज्याप्रमाणें नदीच्या जवळ पाण्याच्या लाटा येतात, त्याप्रमाणें (दाशुषे सद्यः क्षरसि) दात्याला तत्काल कर्माचें फल तूं देतोस. ॥ २ ॥

१४९९ आ नो भज परमेष्वा वाजेषु मध्यमेषु । शिक्षा वस्वो अन्तमस्य ॥ ३ ॥ ४ (टा) ॥
[धा० ११ । उ० १ । स्व० २] (ऋ. १।२७।५)

१५०० अहमिद्धि पितुष्परि मेधामृतस्य जग्रह । अहं सूर्य इवाजनि ॥ १ ॥ (ऋ. ८।६।१०)

१५०१ अहं प्रत्नेन जन्मना गिरः शुम्भामि कण्ववत् । येनेन्द्रः शुष्ममिद्दधे ॥२॥ (ऋ. ८।६।११)

१५०२ ये त्वामिन्द्र न तुष्टुवुर्ऋषयो ये च तुष्टुवुः । ममेद्वर्धस्व सुष्टुतः ॥ ३ ॥ ५ (थु) ॥
[धा० १४ । उ० २ । स्व० ५] (ऋ ८।६।१२)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

१५०३ अग्ने विश्वेभिरग्निभिर्जोषि ब्रह्म सहस्कृत । ये देवत्रा य आयुषु तेभिर्नो महया गिरः ॥१॥

१५०४ प्र स विश्वेभिरग्निभिरग्निः स यस्य वाजिनः ।
तनये तोके अस्मदा सम्यङ्वाजैः परीवृतः ॥ २ ॥

१५०५ त्वं नो अग्ने अग्निभिर्ब्रह्म यज्ञं च वर्धय ।
त्वं नो देवतातये रायो दानाय चोदय ॥ ३ ॥ ६ (डि) ॥
[धा० १८ । उ० ३ । स्व० ३] (ऋ. १०।१४१।६)

[१४९९] हे अग्ने ! (नः) आम्हांला (परमेषु वाजेषु) श्रेष्ठ भोगांमध्यें (आ भज) पोंचव, तसेंच (मध्यमेषु आ) मध्यम भोगांमध्यें पोंचव, अथवा (अन्तमस्य वस्वः शिक्ष) कनिष्ठ धन तरी दे. ॥ ३ ॥

[१५००] (पितुः ऋतस्य मेधां) पालक आणि अमर इन्द्राची अनुग्रह बुद्धि (अहं इत् परि जग्रह) मी प्राप्त केली आहे. यामुळें (अहं सूर्यः इव अजनि) मी सूर्यासारखा तेजस्वी झालों आहें. ॥ १ ॥

[१५०१] (कण्ववत् अहं) कण्वाप्रमाणें (प्रत्नेन जन्मना) प्राचीन वाणीनें (गिरः शुम्भामि) स्तोत्रें म्हणून मी इन्द्राला शोभायमान् असा वर्णित आहें. (येन इन्द्रः शुष्मं दधे इत्) ज्याच्या योगानें इन्द्र बल धारण करीत असतो. ॥ २ ॥

[१५०२] हे (इन्द्र) इन्द्रा ! (ये त्वां न तुष्टुवुः) ज्यांनीं तुझी स्तुति केली नाहीं व (ये ऋषयः च तुष्टुवुः) जे ऋषि स्तुति करतात, त्यांच्यामध्यें (मम इत्) माझ्या स्तोत्रानेंच (सुष्टुतः वर्धस्व) झालेल्या उत्तम स्तुतिमुळें तूं संवर्धित हो. ॥ ३ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[१५०३] हे (सहस्कृत अग्ने) बल प्रकट करणाऱ्या अग्ने ! (विश्वेभिः अग्निभिः ब्रह्म जोषि) सर्व अग्निंना बरोबर ठेऊन आमचें स्तोत्र ऐकून घे. (ये देवत्रा) जे अग्नि देवतांमध्यें आहेत व (ये आयुषु) जे मानवांमध्यें आहेत, (तेभिः नः गिरः महय) त्यांच्या द्वारें आमच्या स्तुतिचें महत्त्व वाढव. ॥ १ ॥

[१५०४] (यस्य वाजिनः) ज्या बलवान् अग्निमध्यें हवन करणारे पुष्कळ आहेत, (सः अग्निः) तो अग्नि (विश्वेभिः अग्निभिः) सर्व इतर अग्निंबरोबर (वाजैः परीवृतः) हविष्याान्नांनीं घेरलेला (सम्यक् अस्मत् प्र आ) योग्य रीतिनें आमच्याजवळ येवो, तसेंच तो (सः तनये तोके) आमच्या पुत्रपौत्रांकडेही जावो. ॥ २ ॥

[१५०५] हे (अग्ने) अग्ने ! (त्वं अग्निभिः) तूं अग्नींसह (नः ब्रह्म यज्ञं च वर्धय) आमचें स्तोत्र व यज्ञ वाढव. (त्वं नः देवतातये) तूं आम्हांसाठीं देवतांना (रायः दानाय चोदय) धनाचें दान करण्यासाठीं प्रेरित कर. ॥३॥

१५०६ त्वे सोम प्रथमा वृक्तबर्हिषो महे वाजाय श्रवसे धियं दधुः ।
स त्वं नो वीर वीर्याय चोदय ॥ १ ॥ (ऋ ९।११०।७)

१५०७ अभ्यभि हि श्रवसा ततर्दिथोत्सं न कं चिज्जनपानमक्षितम् ।
शर्याभिर्न भरमाणो गभस्त्योः ॥ २ ॥ (ऋ. ९।११०।५)

१५०८ अजीजनो अमृत मर्त्याय कमृतस्य धर्मन्नमृतस्य चारुणः ।
सदासरो वाजमच्छा सनिष्यदत् ॥ ३ ॥ ७ (लॆ) ॥
[धा० १० । उ० नास्ति । स्व० ७] (ऋ. ९।११०।४)

१५०९ एन्दुमिन्द्राय सिञ्चत पिबाति सोम्यं मधु । प्र राधाꣳसि चोदयते महित्वना ॥ १ ॥
(ऋ. ८।२४।१३)

१५१० उपो हरीणां पतिं राधः पृञ्चन्तमब्रवम् । नूनꣳश्रुधि स्तुवतो अश्व्यस्य ॥ २ ॥
(ऋ. ८।२४।१४)

१५११ न ह्यꣳ३ग पुरा च न जज्ञे वीरतरस्त्वत् । न की राया नैवथा न भन्दना ॥३॥ ८ (चा)॥
[धा० १७ । उ० १ । स्व० २] (ऋ. ८।२४।१५)

[१५०६] (सोम) हे सोमा ! (प्रथमाः) सर्वांत प्रथम (वृक्त-बर्हिषः) आसन पसरणारे यजमान (महे वाजाय श्रवसे) विशेष बल व अन्नासाठीं (त्वे धियं दधुः) तुझ्याविषयीं उत्तम बुद्धि धारण करतात. (सः त्वं) तो तूं, (वीर) हे वीर सोमा ! (नः वीर्याय चोदय) आम्हांला वीर होण्याची प्रेरणा कर. ॥ १ ॥

[१५०७] हे सोमा ! (श्रवसा) अन्नानें युक्त होऊन (अभि-अभि ततर्दिथ) तूं छाननीमधून खालीं पडतोस, (न कं चित् जनपानं अ-क्षितं उत्सं) मनुष्यांना पिण्याजोगें पाणी मिळावें यासाठीं पाण्याचा हौदाला (गभस्त्योः शर्याभिः भरमाणः न) ज्याप्रमाणें हातांच्या अंगुलींनीं भरतात, त्याप्रमाणें तूं कलशामध्यें भरत आहेस. ॥ २ ॥

[१५०८] हे (अमृत) अमृतरूपी सोमा ! (ऋतस्य चारुणः अमृतस्य) सत्य व मंगल करणाऱ्या पाण्यास धारण करणाऱ्या अन्तरिक्षांमध्यें (कं मर्त्याय अजीजनः) सूर्याला मानवांसाठीं उत्पन्न केलेंस. (सनिष्यदत्) व देवतांची सेवा केलीस. नंतर (वाजं अच्छ) तूं युद्धासाठीं सरळ (सदा असरः) नेहेमींच जातोस. ॥ ३ ॥

[१५०९] (इन्दुं) सोमरस (इन्द्राय आ सिंचत) इन्द्राला द्या. तो इन्द्र (सोम्यं मधु पिबाति) सोमाचा मधुर रस पितो आणि (महित्वना राधांसि प्रचोदयते) आपल्या मोठेपणानें धनांना तो प्रेरित करतो. ॥ १ ॥

[१५१०] (हरीणां पतिं) घोड्यांचा स्वामी व (राधः पृञ्चन्तं) भक्तांना धन देणाऱ्या इन्द्राची (उप अब्रवं) मी स्तुति करतों. (अश्व्यस्य स्तुवतः नूनं श्रुधि) अश्व ऋषि स्तुति करीत आहे. ती स्तुति, हे इन्द्रा ! तूं ऐक. ॥ २ ॥

[१५११] हे इन्द्रा ! (त्वत् पुरा न जज्ञे) तुझ्यापूर्वी तुझ्यासारखा कोणी झाला नाहीं, हे (अंग) सामर्थ्य-वान् इन्द्रा ! (वीरतरः न हि) तुझ्यापेक्षां अधिक श्रेष्ठ वीरही कोणी दुसरा झाला नाहीं, (राया: नकिः) धन देणाराहि दुसरा कोणी झाला नाहीं, (एवथा न) युद्धांमध्यें शत्रूवर चालून जाणाराहि दुसरा कोणी झाला नाहीं, तसेंच (भन्दना न) स्तुतिला योग्यही दुसरा कोणी झाला नाहीं. ॥ ३ ॥

१५१२ नदं व ओदतीनां नदं योयुवतीनाम् ।
पतिं वो अघ्न्यानां धेनूनामिषुध्यसि ॥ १ ॥ ९ (व) ॥

[धा० ९ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ८।६९।२)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

१५१३ देवो वो द्रविणोदाः पूर्णां विवष्ट्वासिचम् ।
उद्वा सिञ्चध्वमुप वा पृणध्वमादिद्वो देव ओहते ॥ १ ॥ (ऋ. ७।१६।११)

१५१४ तं होतारमध्वरस्य प्रचेतसं वह्निं देवा अकृण्वत ।
दधाति रत्नं विधते सुवीर्यमग्निर्जनाय दाशुषे ॥ २ ॥ १० (लि) ॥

[धा० १४ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ७।१६।१२)

१५१५ अदर्शि गातुवित्तमो यस्मिन्व्रतान्यादधुः ।
उपो षु जातमार्यस्य वर्धनमग्निं नक्षन्तु नो गिरः ॥ १ ॥ (ऋ. ८।१०३।१)

१५१६ यस्माद्रेजन्त कृष्टयश्चर्कृत्यानि कृण्वतः ।
सहस्रसां मेधसाताविव त्मनाग्निं धीभिर्नमस्यत ॥ २ ॥ (ऋ. ८।१०३।३)

[१५१२] हे यजमानानों ! (वः) तुमच्यासाठीं (ओदतीनां नदं) उषांना उत्पन्न करणाऱ्या आदित्यरूपी इन्द्राला आम्हो बोलावित आहों. (योयुवतीनां नदं) चन्द्रकिरणांना उत्पन्न करणाऱ्या इन्द्राला तुमच्यासाठीं बोलावीत आहों. (अघ्न्यानां पतिं वः) गाईचें पालन करणाऱ्या इन्द्राला मी तुमच्यासाठीं बोलावीत आहें. (धेनूनां इषुध्यसि) हे यजमाना ! तूं गाईचें दूध अन्न म्हणून उपयोग करण्याची इच्छा करीत आहेस. ॥ १ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[१५१३] (द्रविणोदाः देवः) धन देणारा अग्निदेव (वः पूर्णां आसिचं विविष्टु) तुमच्या तुपानें भरलेल्या चमचाची इच्छा करो व तुम्ही (उत् सिंचध्वं वा) सोमाचें पात्र भरा (पृणध्वं वा) पात्राला हविनें पूर्ण भरा. (आत् इत् देवः वः ओहते) नंतर अग्निदेव तुमचें पोषण करील. ॥ १ ॥

[१५१४] (देवाः) देवांनीं (प्रचेतसं तं) श्रेष्ठ बुद्धिमान् (अध्वरस्य वह्निं होतारं) अहिंसापूर्ण यज्ञाचा कर्ता व हव्यवाहक आणि हवन करणाऱ्या अशा त्या अग्निला (अकृण्वत) आपला सहायक बनवलें आहे. (अग्निः विधते दाशुषे जनाय) तो अग्नि यज्ञ करणाऱ्या दात्या माणसाला (सु-वीर्यं रत्नं दधाति) उत्तम वीरता वाढवणारें धन देतो. ॥ २ ॥

[१५१५] (यस्मिन् व्रतानि आदधुः) जेथें ज्या अग्निमध्यें यजमान यज्ञकर्म करतात, तेथें (गातुवित्तमः अदर्शि) मार्गदर्शकांमध्यें श्रेष्ठ असा अग्नि प्रकट होतो. (सुजातं आर्यस्य वर्धनं) उत्तम रीतिनें प्रदीप्त झालेल्या व आर्यांचें संवर्धन करणाऱ्या (अग्निं) अग्निला (नः गिरः उपो नक्षन्तु) आमच्या स्तुति प्राप्त होवोत. ॥ १ ॥

[१५१६] (यस्मात् चर्कृत्यानि कृण्वतः) ज्यावेळीं कर्तव्य करणाऱ्या मनुष्यांना (कृष्टयः रेजन्ते) शत्रूचे मनुष्य कंपायमान करण्याचा यत्न करतात त्यावेळीं, हे मनुष्य हो ! (सहस्रसां अग्निं) सहस्र प्रकारचें धन देणाऱ्या अग्निला (मेधसातौ) यज्ञामध्यें (धीभिः त्मना नमस्यत) बुद्धिपूर्वक स्वतः प्रणाम करा. ॥ २ ॥

१५१७ प्र दैवोदासो अग्निर्देव इन्द्रो न मज्मना ।
अनु मातरं पृथिवीं वि वावृते तस्थौ नाकस्य शर्मणि ॥ ३ ॥ ११ (हा) ॥
[धा० १६ । उ० नास्ति । स्व० २]) ऋ. ८।१०३।२)

१५१८ अग्न आयूंषि पवस आ सुवोर्जमिषं च नः । आरे बाधस्व दुच्छुनाम् ॥ १ ॥
(ऋ. ९।६६।१९)

१५१९ अग्निर्ऋषिः पवमानः पाञ्चजन्यः पुरोहितः । तमीमहे महागयम् ॥२॥ (ऋ. ९।६६।२०)

१५२० अग्ने पवस्व स्वपा अस्मे वर्चः सुवीर्यम् । दधद्रयिं मयि पोषम् ॥ ३ ॥ १२ (फ) ॥
[धा० १० । उ० २ । स्व० १] (ऋ. ९।६६।२१)

१५२१ अग्ने पावक रोचिषा मन्द्रया देव जिह्वया । आ देवान्वक्षि यक्षि च ॥१॥ (ऋ. ९।२६।१)

१५२२ तं त्वा घृतस्नवीमहे चित्रभानो स्वर्दृशम् । देवाँ आ वीतये वह ॥२॥ (ऋ. ९।२६।२)

१५२३ वीतिहोत्रं त्वा कवे द्युमन्तँ समिधीमहि । अग्ने बृहन्तमध्वरे ॥ ३ ॥ १३ (टौ) ॥
[धा० १८ । उ० १ । स्व० नास्ति] (ऋ. ९।२६।३)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[१५१७] (दैवोदासः अग्निः देवः) द्युलोकांत राहणारा अग्निदेव (इन्द्रः न) इन्द्राप्रमाणें (मज्मना) बलपूर्वक (मातरं पृथिवीं अनु) मातृभूमिवर (प्र वि वावृते) नाना प्रकारच्या प्रवृत्ति करीत असतो व (नाकस्य शर्मणि तस्थौ) अन्तरिक्षाच्या आश्रयानें राहतो. ॥ ३ ॥

[१५१८] हे (अग्ने) अग्ने ! (नः आयूंषि पवसे) आम्हांला आयुष्य प्रदान कर. (नः ऊर्जं इषं च आसुव) आम्हांला बल व अन्न दे. (दुच्छुनां) दुष्टांना (आरे बाधस्व) दूर करून त्रास दे. ॥ १ ॥

[१५१९] (पांचजन्यः ऋषिः) पंचजनांचें हित करणारा व सर्व पाहणारा (पवमानः अग्निः) शुद्ध अग्नि (पुरोहितः) पुढें ठेवला आहे, (तं महागयं ईमहे) त्या मोठ्या यज्ञशाळेंत असणाऱ्या अग्निची आम्हीं प्रार्थना करतों ॥२॥

[१५२०] हे अग्ने ! तूं (स्वपाः) उत्तम कर्म करणारा आहेस. (अस्मे वर्चः सुवीर्यं पवस्व) आम्हांला तेज आणि पराक्रम करण्याची शक्ति दे व (मयि रयिं पोषं दधत्) मला धन व पोषण दे. ॥ ३ ॥

[१५२१] (पावक अग्ने देव) हे पवित्र करणाऱ्या अग्निदेवा ! (शोचिषा मन्द्रया जिह्वया) आपल्या तेजानें व आनंद देणाऱ्या ज्वालेनें (देवान् आ वक्षि यक्षि च) देवांना बोलाव व त्यांच्यासाठीं यज्ञ कर. ॥ १ ॥

[१५२२] हे (घृत-स्नो चित्र-भानो) तुपापासून उत्पन्न होणाऱ्या आणि विलक्षण तेजस्वी अग्ने ! (स्वर्दृशं तं त्वा ईमहे) सर्वांना पाहणाऱ्या तुझी आम्ही प्रार्थना करतों, ती ही कीं, (वीतये देवान् आ वह) हवि भक्षण करण्यासाठीं देवांना येथें बोलाऊन आण. ॥ २ ॥

[१५२३] हे (कवे अग्ने) ज्ञानी अग्ने ! (वीति-होत्रं द्युमन्तं) हवनावर प्रेम करणाऱ्या, तेजस्वी व (बृहन्तं त्वा) मोठ्या अशा तुला (अध्वरे समिधीमहि) यज्ञामध्यें आम्ही प्रज्वलित करतों. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४]

१५२४ अवा नो अग्न ऊतिभिर्गायत्रस्य प्रभर्मणि । विश्वासु धीषु वन्द्य ॥ १ ॥ (ऋ. १।७९।७)

१५२५ आ नो अग्ने रयिं भर सत्रासाहं वरेण्यम् । विश्वासु पृत्सु दुष्टरम् ॥ २ ॥ (ऋ. १।७९।८)

१५२६ आ नो अग्ने सुचेतुना रयिं विश्वायुपोषसम् । मार्डीकं धेहि जीवसे ॥ ३ ॥ १४ (वौ) ॥
[धा० १९ । उ० नास्ति । स्व० नास्ति] (ऋ. १।७९।९)

१५२७ अग्निं हिन्वन्तु नो धियः सप्तिमाशुमिवाजिषु । तेन जेष्म धनंधनम् ॥ १ ॥
(ऋ. १०।१५६।१)

१५२८ यया गा आकरामहै सेनयाग्ने तवोत्या । तां नो हिन्व मघत्तये ॥२॥ (ऋ. १०।१५६।२)

१५२९ आग्ने स्थूरं रयिं भर पृथुं गोमन्तमश्विनम् । अङ्ग्धि खं वर्तया पविम् ॥ ३ ॥
(ऋ. १०।१५६।३)

१५३० अग्ने नक्षत्रमजरमा सूर्यं रोहयो दिवि । दधज्ज्योतिर्जनेभ्यः ॥ ४ ॥ (ऋ. १०।१५६।४)

१५३१ अग्ने केतुर्विशामसि प्रेष्ठः श्रेष्ठ उपस्थसत् । बोधा स्तोत्रे वयो दधत् ॥५॥ १५ (था) ॥
[धा० १९ । उ० २ । स्व० २] (ऋ. १०।१५६।५)

---

[४] चतुर्थः खण्डः ।

[१५२४] हे (विश्वासु धीषु वन्द्य अग्ने) सर्व यज्ञांमध्यें वन्दनीय अग्ने ! (गायत्रस्य प्रभर्मणि) गायत्री छंदाचें सामगायन चालू असतांना (ऊतिभिः नः अव) संरक्षणाच्या साधनांनीं आमचें रक्षण कर. ॥ १ ॥

[१५२५] हे (अग्ने) अग्ने ! (सत्रा-साहं) सर्व शत्रूंचा पराभव करणारें (वरेण्यं) श्रेष्ठ (विश्वासु पृत्सु दुष्टरं) सर्व युद्धांमध्यें दुस्तर (रयिं नः आभर) असें धन आम्हांला दे. ॥ २ ॥

[१५२६] हे (अग्ने) अग्ने ! (नः जीवसे) आमच्या दीर्घजीवनासाठीं (सु-चेतुना) उत्तम ज्ञानानें युक्त (विश्व-आयु-पोषसं) सर्व आयुपर्यंत पोषण करणारें (मार्डीकं रयिं) सुखदायक असें धन (नः धेहि) आम्हांला दे. ॥ ३ ॥

[१५२७] (आजिषु आशुं सप्तिं इव) ज्याप्रमाणें युद्धांत सत्वर चालणाऱ्या घोड्याला प्रेरित करतात, तसेंच (नः धियः) आमच्या बुद्धि (अग्निं हिन्वन्तु) अग्निला प्रेरित करोत, (तेन धनं धनं जेष्म) त्यानें आम्ही प्रत्येक युद्ध जिंकूं. ॥ १ ॥

[१५२८] हे (अग्ने) अग्ने ! (यया सेनया) ज्या सेनेनें (तव ऊत्या) व ज्या तुझ्या संरक्षणानें (गाः आकरामहै) गाई आम्हांला मिळतील, (तां) त्या संरक्षण शक्तिला (नः मघत्तये हिन्व) आम्हांला धन मिळावें म्हणून प्रेरित कर. ॥ २ ॥

[१५२९] हे (अग्ने) अग्ने ! (स्थूरं पृथुं) फार मोठें व (गोमन्तं अश्विनं रयिं) गाई व घोड्यांनीं युक्त धन (आ भर) आम्हांला भरपूर दे, (खं अंग्धि) आकाशामध्यें आपलें तेज पसर व (पविं वर्तय) शत्रूचें शस्त्र आमच्यापासून दूर कर. ॥ ३ ॥

[१५३०] हे (अग्ने) अग्ने ! (जनेभ्यः ज्योतिः दधत्) लोकांसाठीं प्रकाश करीत (अजरं नक्षत्रं सूर्यं दिवि) जरारहित व निरंतर गतिमान् अशा सूर्याला द्युलोकामध्यें (आरोहयः) तूं चढव. ॥ ४ ॥

[१५३१] हे (अग्ने) अग्ने ! (विशां केतुः प्रेष्ठः श्रेष्ठः) तूं प्रजांना ज्ञान देणारा, प्रिय व श्रेष्ठ (असि) आहेस. (उप-स्थ सत्) यज्ञशालेंत राहणारा तूं (स्तोत्रे वयः दधत्) स्तुति करणाऱ्याला अन्न देत (बोध) त्याची स्तुति जाण. ॥ ५ ॥

१५३२ अग्निर्मूर्धा दिवः ककुत्पतिः पृथिव्या अयम् । अपाꣳ रेताꣳसि जिन्वति ॥ १ ॥
(ऋ. ८।४४।१६)

१५३३ ईशिषे वार्यस्य हि दात्रस्याग्ने स्वः पतिः । स्तोता स्यां तव शर्मणि ॥२॥ (ऋ. ८।४४।१८)

१५३४ उदग्ने शुचयस्तव शुक्रा भ्राजन्त ईरते । तव ज्योतीꣳष्यर्चयः ॥ ३ ॥ १६ (ली) ॥
[धा० ४ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ८।४४।१७)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

॥ इति सप्तमप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ ७-१ ॥

॥ इति चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

[१५३२] (मूर्धा) सर्वांमध्यें श्रेष्ठ (दिवः ककुत्) द्युलोकांमध्यें उंचस्थानीं असणारा (पृथिव्याः पतिः अयं अग्निः) पृथिवीचा पालक हा अग्नि (अपां रेतांसि जिन्वति) जलांचें सारतत्व आपल्यामध्यें वाळगतो. ॥ १ ॥

[१५३३] हे (अग्ने) अग्ने ! (स्वः पतिः) स्वर्गाचा स्वामी तूं (वार्यस्य दात्रस्य ईशिषे) स्वीकार करण्यास योग्य व दान देण्यास योग्य अशा धनाचा स्वामी आहेस. (तव शर्मणि) तूं दिलेल्या सुखामध्यें राहून (स्तोता स्याम्) मी तुझी स्तुति करणारा होईन. ॥ २ ॥

[१५३४] हे अग्ने ! तुझी (शुचयः शुक्राः) शुद्ध, स्वच्छ व (भ्राजन्तः अर्चयः) देदीप्यमान ज्वाला (तव ज्योतींषि) तुझ्या तेजांना (उदीरते) प्रेरणा देत असतात. ॥ २ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति चतुर्दशोऽध्यायः ॥

चतुर्दश अध्याय

या चौदाव्या अध्यायामध्यें इन्द्र, अग्नि व सोम या तीन देवतांचींच वर्णनें आहेत, तीं आतां पहा. प्रथम इन्द्र देवतेचें वर्णन असें केलेलें आहे—

इन्द्र

१ सत्यस्य सूनुं सत्पतिं गोपतिं इन्द्रं, यथा विदे, गिरा अभि प्र अर्च [१४८९]– सत्याचा प्रचारक, सत्याचा पालक, गाईंचा पालक इन्द्र आहे, त्याची जशी माहिती असेल त्याप्रमाणें, आपल्या वाणीनें स्तुति करा.

२ विश्वासु समत्सु हव्यं नः ब्रह्माणि सवनानि उप आभूषत [१४९२]– सर्व युद्धांमध्यें सहाय्यासाठीं बोलावण्यास योग्य अशा इन्द्राला आमचीं स्तोत्रें गाइलीं जाऊन त्याची शोभा वाढवतात. इन्द्र असा शूरवीर आहे किं त्याला सर्व प्रकारच्या युद्धांमध्यें आपल्या संरक्षणासाठीं लोक बोलावीत असतात.

३ वृत्रहन् परमज्याः ऋचीषम [१४९२]– हे शत्रूला मारणाऱ्या व ज्याची धनुष्याची दोरी उत्तम आहे अशा इन्द्रा ! आम्हांला इच्छित धन दे.

४ त्वत्पुरा न जज्ञे। वीरतरः न हि। राया न कि। एवथा न। भन्दना न [१५११]–तुझ्या पूर्वी तुझ्यासारखा कोणीहि झालेला नाहीं, तुझ्यापेक्षा अधिक श्रेष्ठ वीर कोणीहि झालेला नाहीं, धन देणाराहि कोणी दुसरा नाहीं, युद्धांमध्यें शत्रूंवर चालून जाणारा कोणी दुसरा झालेला नाहीं, म्हणून तुझ्यासारखा प्रशंसनीयही दुसरा कोणी नाहीं.

५ अघ्न्यानां पतिं वः [१५१२]- अवध्य गाईंचा पालनकर्ता इन्द्र आहे त्याला तुमच्यासाठीं मी बोलावीत आहें.

६ त्वं प्रथमः राधसां दाता असि, ईशानकृत् सत्यः असि, तुविद्युम्नस्य शवसः पुत्रस्य महः युज्या वृणीमहे [१४९३]- तूं सर्वांत प्रथम धन देणारा आहेस. तूं खरोखर आम्हांस ऐश्वर्ययुक्त करणारा आहेस. पुष्कळ तेजस्वी बलासाठीं प्रसिद्ध अशा तुझ्याकडे आम्ही धन मिळावें असें इच्छित आहों.

७ पितुः सत्यस्य मेधां अहं परि जग्रह, अहं सूर्यः इव अजनि [१५००]- सत्यपालक सर्वांचा पिता असल्याप्रमाणें पूज्य असणाऱ्या इन्द्राची बुद्धि मी अनुकूल करून घेतली आहे व त्यामुळें मी सूर्यासारखा तेजस्वी झालों आहें.

८ हे इन्द्र ! ये त्वां न तुष्टुवुः, ये च तुष्टुवुः, मम इत् सुष्टुतः वर्धस्व [१५०२]- हे इन्द्रा ! जे तुझी स्तुति करीत नाहींत व जे स्तुति करतात, त्यांमध्यें माझ्याच स्तुतिनें स्तुति केलेला तूं उत्तम संवर्धित हो.

९ हरीणां पतिं, राधः पृक्षतं, उप अब्रवं, अश्व्यस्य स्तुवतः नूनं श्रुधि [१५१०]- घोड्यांचा स्वामी, धन देणाऱ्या इन्द्राची मी स्तुति करीत आहें, अश्व ऋषिहि स्तुति करीत आहे, या स्तुति तूं ऐक.

१० हरयः अरुषीः अधि बर्हिषि आ ससृज्रिरे [१४९०]- इन्द्राचे घोडे चमकणाऱ्या आसनावर त्याला आणोत. इन्द्र यज्ञशाळेंत येऊन बसो.

११ गावः वज्रिणे इन्द्राय मधु आशिरं दुदुहे, उपह्वरे सीं मधु विदत [१४९१]- गाई वज्रधारी इन्द्रासाठीं मधुर दूध देतात. तो इन्द्र जवळच बसून मधुर सोमरस पीत असतो. सोमरसामध्यें गाईचें दूध मिसळून इन्द्र पीत असतो.

१२ इन्द्राय इन्दुं आसिंचत। सोम्यं मधु पिबाति। महित्वना राधांसि प्रचोदयते [१५०९]- इन्द्राला सोमरस द्या. इन्द्र मधुर सोमरस पीतो. आपल्या मोठेपणानें तो धनें देतो.

या प्रमाणें इन्द्राचें वर्णन या अध्यायामध्यें आलेलें आहे. यांत इन्द्राचें शौर्य, वीर, औदार्य, धनाचें दान करण्याची प्रवृत्ति व सोमरस पिण्याकडे ओढा दिसून येत आहे. इन्द्राचे घोडेही येथे वर्णिले आहेत.

अग्नि

अग्नि संबंधाचें वर्णन या अध्यायामध्यें असें आलें आहे—

१ त्वं अस्माकं नव्यांसं गायत्रं देवेषु प्रवोचः [१४९७]- हे अग्ने ! तूं आमचें अपूर्व गायत्री मंत्रांचें स्तोत्र देवांजवळ जाऊन सांग.

२ हे चित्रभानो ! विभक्ता असि, दाशुषे सद्यः क्षरसि [१४९८]- हे विलक्षण प्रकाशमान् अग्ने ! तूं धन देणारा आहेस. त्याच्या कर्माचें फल तत्काल तूं देतोस.

३ नः परमेषु वाजेषु, मध्यमेषु आ भज। अन्तमस्य वस्वः शिक्ष [१४९९]- आम्हांला श्रेष्ठ भोगांमध्यें पोंचव तसेंच कनिष्ठ धन तरी दे.

४ सहस्कृत अग्ने ! ब्रह्म जुषस्व, ये देवत्रा, ये आयुषु, तेभिः नः गिरः महय [१५०३]- हे बल प्रकट करणाऱ्या अग्ने ! हें स्तोत्र ऐक. जे देवांमध्यें व जे मनुष्यांमध्यें देव आहेत. त्यांच्या मदतीनें आमच्या स्तुतींचें महत्त्व वाढव.

५ अग्ने ! त्वं अग्निभिः नः ब्रह्म यज्ञं च वर्धय। त्वं नः रायः दानाय देवतातये चोदय [१५०५]- हे अग्ने ! तूं अन्य अग्निच्या सहाय्यानें आमचें ज्ञान व यज्ञकर्म वाढव. तूं आम्हांला देवतांना देण्यासाठीं धनाचें दान करण्याची प्रेरणा कर. यज्ञामध्यें अनेक अग्नि असतात, ते यज्ञाचें अनुष्ठान वाढवीत असतात.

६ देवाः प्रचेतसं तं अध्वरस्य वन्हिं होतारं अकृण्वत। विधते दाशुषे जनाय सुवीर्यं रत्नं दधाति [१५१४]- देवांनीं ज्ञानी अशा त्या हिंसारहित यज्ञाचा कर्ता व हव्यवाहक अशा अग्निला उत्पन्न केलें. यज्ञ करणाऱ्या दात्या मनुष्याला उत्तम वीरता वाढवणारें धन तो देतो.

७ यस्मिन् व्रतानि आदधुः गातुवित्तमः अदर्शि, सु-जातं आर्यस्य वर्धनं अग्निं नः गिरः उपो नक्षन्तु [१५१५]- ज्या अग्निमध्यें यजमान व्रतें करतात, तेथें सन्मार्ग दाखवणारा अग्नि प्रकट होतो. उत्तम रीतिनें प्रकट झालेल्या व आर्यांचें संवर्धन करणाऱ्या अग्निला आमच्या स्तुति प्राप्त होवोत.

८ यस्मात् चकृत्यानि कृण्वतः कृष्टयः रेजन्ते सहस्रसां मेधसातौ धीभिः त्मना नमस्यत [१५१६] - ज्यावेळीं कर्तव्य करणाऱ्या मनुष्यांना शत्रूचे मनुष्य कंपायमान करण्याचा यत्न करतात, त्यावेळीं हे मनुष्य हो ! सहस्र प्रकारचें धन देणाऱ्या अग्निला यज्ञामध्यें बुद्धिपूर्वक स्वतः प्रणाम करा. म्हणजे तो त्यांची भीति दूर करील.

९ दैवोदासो अग्निः, इन्द्रः न, मज्मना मातरं पृथिवीं अनु प्र विवावृते [१५१७]- द्युलोकांत राहणारा अग्नि इन्द्राप्रमाणें बलपूर्वक मातृभूमिवर नाना प्रकारच्या प्रवृत्ति करीत असतो. अग्निच्या सहाय्यानें अनेक यज्ञ केले जातात.

१० हे अग्ने ! नः आयूंषि, नः ऊर्जं इषं च पवसे। दुच्छुनां आरे बाधस्व [१५१८]- हे अग्ने ! आम्हांला आयुष्य, बल व अन्न दे. दुष्टांना दूर कर.

११ पांचजन्यः ऋषिः पवमानः अग्निः पुरोहितः। तं महागयं ईमहे [१५१९]- पंचजनांचें हित करणारा ज्ञानी शुद्ध अग्नि पुढें ठेवला आहे त्या मोठ्या यज्ञशालेमध्यें राहणाऱ्या अग्निची आम्ही प्रार्थना करीत आहों.

१२ अग्ने ! स्वपा अस्मे वर्चः पवस्व, मयि रयिं पोषं दधत् [१५२०]- हे अग्ने ! तूं उत्तम कर्म करणारा आहेस. आम्हांला तेज दे तसेंच मला धन व पोषण दे.

१३ हे पावक अग्ने देव ! शोचिषा मन्द्रया जिव्हया देवान् आवक्षि यक्षि च [१५२१]- हे पवित्र करणाऱ्या अग्निदेवा ! आपल्या तेजानें व आनन्द देणाऱ्या ज्वालेनें देवांना बोलाव व त्याच्यासाठीं यज्ञ कर.

१४ हे घृतस्नो चित्रभानो ! स्वर्दृशं त्वा ईमहे। वीतये देवान् आ वह [१५२२]- हे तुपानें उत्पन्न झालेल्या व विलक्षण तेजस्वी अग्ने ! सर्वांना पाहणाऱ्या तुझी आम्ही प्रार्थना करतों, ती ही कीं हवि भक्षण करण्यास देवांना येथें बोलावून आण.

१५ हे कवे अग्ने ! वीतिहोत्रं द्युमन्तं बृहन्तं त्वा अध्वरे समिधीमहि [१५२३]- हे ज्ञानी अग्ने ! हवनावर प्रेम करणाऱ्या तेजस्वी मोठ्या अशा तुला यज्ञामध्यें आम्ही पेटवीत असतों.

१६ हे अग्ने ! सत्रासाहं वरेण्यं विश्वासु पृत्सु दुष्टरं रयिं नः आभर [१५२५]- हे अग्ने ! सर्व शत्रूंचा एकावेळीं पराभव करणारें श्रेष्ठ व सर्व युद्धांमध्यें शत्रूला दुस्तर असें धन आम्हांला भरपूर दे.

१७ हे अग्ने ! नः जीवसे सुचेतुना विश्वायुपोषसं मार्डीकं रयिं नः धेहि [१५२६]- हे अग्ने ! आमच्या दीर्घजीवनासाठीं उत्तम ज्ञानानें युक्त सर्व आयुष्य भर पोषण करण्यास समर्थ, सुखदायक धन आम्हांला दे.

१८ नः धियः अग्निं हिन्वन्तु, आजिषु आशुं सप्तिं इव, तेन धनं धनं जेष्म [१५२७]- आमच्या बुद्धि अग्निना आमच्या अनुकूल करोत. ज्याप्रमाणें युद्धांत ,घोड्याला लवकर चालवितात, त्याप्रमाणें लवकर जाऊन आम्ही प्रत्येक युद्धामध्यें विजय मिळवूं.

१९ हे अग्ने ! यया सेनया तव ऊत्या गाः आकरामहै, तां नः मघत्तये हिन्व [१५२८]- हे अग्ने ! ज्या सेनेनें तसेंच ज्या तुझ्या संरक्षणानें आम्ही गाई मिळवूं, त्या संरक्षणशक्तिला आमचें महत्त्व वाढावें म्हणून आम्हांला अनुकूल होईल अशी प्रेरित कर.

२० हे अग्ने ! स्थूरं पृथुं गोमन्तं अश्विनं रयिं आ भर। खं अंग्धि पावें वर्तय [१५२९]- हे अग्ने ! फार मोठें गाई व घोड्यांनीं युक्त धन आम्हांला भरपूर दे. आकाशामध्यें आपलें तेज पसर. व शत्रूचें शस्त्र आमच्या पासून दूर कर.

२१ हे अग्ने ! जनेभ्यः ज्योतिः दधत्, अजरं नक्षत्रं सूर्यं दिवि आरोहयः [१५३०]- हे अग्ने ! तूं लोकांसाठीं प्रकाश देतोस व क्षीण न होणारा प्रकाशमान् सूर्य आकाशामध्यें चढवला आहेस.

२२ हे अग्ने ! विशां केतुः प्रेष्ठः श्रेष्ठः असि, उपस्थसत् स्तोत्रे वयः दधत्, बोध [१५३१]- हे अग्ने ! तूं प्रजांना ज्ञान देणारा प्रिय व श्रेष्ठ आहेस. यज्ञशाळेत राहणारा तूं स्तुति करणाऱ्याला अन्न देतोस व स्तुति जाणतोस.

२३ मूर्धा दिवः ककुत् पृथिव्याः पतिः अयं अग्निः अपां रेतांसि जिन्वति [१५३२]- सर्वांमध्ये श्रेष्ठ व द्युलोकामध्यें श्रेष्ठस्थानीं राहणारा पृथिवीचा पालक हा अग्नि जलांचें सत्त्व आपणामध्यें धारण करतो.

२४ हे अग्ने ! स्वः पतिः वार्यस्य दात्रस्य ईशिषे, तव शर्मणि स्तोता स्याम् [१५३३]- हे अग्ने ! तूं स्वर्गाचा स्वामी स्वीकार करण्यास योग्य व दान देण्यास योग्य अशा धनाचा स्वामी आहेस, तूं दिलेल्या सुखामध्यें राहून मी तुझी स्तुति करणारा होईन.

२५ हे अग्ने ! शुचयः शुक्राः भ्राजन्तः अर्चयः तव ज्योतींषि उदीरते [१५३४]- हे अग्ने ! शुद्ध, स्वच्छ व देदीप्यमान ज्वाला तुझ्या तेजांना प्रेरणा देत असतात.

याप्रमाणें अग्निचें वर्णन या अध्यायामध्यें आहे. अग्नि यज्ञामध्यें प्रदीप्त होतो. ऋत्विज त्याची स्तुति करतात. यज्ञामध्यें सर्व देवांना तो बोलावून आणतो. त्या देवांना सोमरस दिला जातो. इत्यादि अग्निचें वर्णन येथें दिसून येत आहे. आतां सोमाचें वर्णन पहा—

सोम

१ यत्प्रत्नं पीयूषं पूर्व्यं उक्थ्यं महः गाहात् दिवः आ निरधुक्षत् [१४९४]- अमृत, जें पूर्वीपासून मिळत आहे तें प्रशंसनीय आहे. मोठ्या अगाध द्युलोकांतुन तें काढलेलें आहे. हिमालयाच्या उंच शिखरावर हा सोम उगवतो व तेथून तो यज्ञासाठीं आणतात.

२ पश्यमानासः दिव्याः वसुरुचः आभ्यं ईं अभ्यनूषत [१४९५]- या सोमाला पाहणारे दिव्य वसुरुच बंधुसारख्या या सोमाची स्तुति करतात.

३ हे पवमान ! यत् इमे रोदसी इमा विश्वा भुवना च विराजसि [१४९६]- हे सोमा ! या द्यु व पृथिवीवर या सर्व भुवनांवर तूं विराजमान होत आहेस.

४ प्रथमः वृक्त-बर्हिषः महे वाजाय श्रवसे ते धियं दधुः । सः त्वं नः वीर्याय चोदय [१५०६]–तूं सर्वांत मुख्य आहेस. आसन पसरणारे यजमान विशेष बल व अन्न प्राप्त व्हावें यासाठीं तुझ्याविषयीं उत्तम आदर बुद्धि धारण करतात, तो तूं, हे सोमा ! आम्हांला वीर व्हावा अशी प्रेरणा कर.

५ श्रवसा अभ्यभि ततर्दिथ [१५०७]– अन्नानें युक्त होऊन हा सोम गाळणीमधून खालील भांड्यांत गाळला जातो.

६ हे अमृत ! ऋतस्य चारुणः अमृतस्य कं मर्त्याय अजीजनः सलिप्यदत् वाजं अच्छ सदा असर [१५०८] –हे अमृतरूपी सोमा ! सत्य व मंगल करणाऱ्या पाण्यास धारण करणाऱ्या आकाशांत सूर्याला मानवांसाठीं केलेंस. तूं देवांची सेवा केलीस. तूं युद्धासाठीं सरळ नेहेमींच जातोस.

याप्रमाणें या अध्यायामध्यें सोमाचें वर्णन आहे. सोम उंच पर्वत शिखरावर उत्पन्न होतो, तेथून तो यज्ञासाठीं आणतात, कुटून त्याचा रस काढतात, त्यांत पाणी मिसळून तो गाळतात, त्यांत गाईचें दूध मिसळतात. तो इन्द्रादि देवांना देतात व सर्व नंतर पितात.

इत्यादि वर्णन आलंकारिक भाषेत आलेलें आहे.

सुभाषितें

१ सत्यस्य सूनुं गोपतिं सत्पतिं अभि प्र अर्च [१४८९]– सत्याचा प्रचार करणारा, सत्याचा रक्षक असा जो आहे त्याचा सत्कार करा.

२ गावः वज्रिणे इन्द्राय मधु आशिरं दुदुह्रे [१४९१] –गाई वज्रधारी इन्द्राला मधुर दूध देतात. वीरानें गाईचें दूध प्यावें.

३ विश्वासु समत्सु हव्यं नः ब्रह्माणि सवनानि उप आभूषत [१४९२] - सर्व युद्धांमध्यें सहाय्यार्थ बोलावण्यास योग्य वीराची शोभा आमचीं स्तोत्रें वाढवितात.

४ वृत्रहन् परमज्याः ऋचीषम ! [१४९२]- हे शत्रूला मारणाऱ्या व मोठी धनुष्यची दोरी ज्याची आहे अशा वीरा ! आम्ही तुझी स्तुति करतों.

५ त्वं राधसां प्रथमः दाता असि [१४९३]– तूं धनाचा पहिला दाता आहेस.

६ ईशानकृत् सत्यः असि [१४९३]– तूं ऐश्वर्ययुक्त करणारा खरोखर आहेस.

७ तुविद्युम्नस्य शवसः पुत्रस्य महः युज्या वृणीमहे [१४९३]– पुष्कळ तेजस्वी, बलवानाच्या पुत्राप्रमाणें तुझ्याकडून पुष्कळ धन मिळावें अशी इच्छा आम्ही करीत आहों. जो बलवान् असतो त्याला पुष्कळ धन मिळतें व तो पुष्कळ दानही देतो. तसें पुष्कळ धन मिळवावें व पुष्कळ दान द्यावें.

८ दिव्याः पश्यमानासः आप्यं अभ्यनूषत [१४९५] –दिव्यद्रष्टे खऱ्या बांधवाची स्तुति करतात.

९ दिवः सविता वारं न व्यूर्णुते [१४९५]– द्युलोकांतील सूर्य जोंपर्यंत अंधकार दूर करीत नाहीं तोंपर्यंत त्याची स्तुति कोणी करीत नाहीं. तो अंधकार दूर करूं लागला कीं त्याची स्तुति होते.

१० इमे रोदसी, इमा विश्वा भुवना, मज्मना विराजसि [१४९६]– या द्यावापृथिवीमध्यें, या सर्व भुवनांमध्यें आपल्या सामर्थ्यानें तूं शोभतोस.

११ हे चित्रभानो ! विभक्ता असि [१४९८]– हे तेजस्वी देवा ! तूं धन देणारा आहेस.

१२ दाशुषे सद्यः क्षरसि [१४९८]– दात्याला कर्माचें फल तत्काल देतोस.

१३ नः परमेषु मध्यमेषु वाजेषु आभज [१४९९] –आम्हांला श्रेष्ठ भोगांमध्यें अथवा मध्यम भोगांमध्यें पोंचव.

१४ अन्तमस्य वस्वः शिक्ष [१४९९]– निदान कनिष्ठ भोग तरी मिळोत.

१५ पितुः अमृतस्य मेधां अहं इत् परि जग्रह [१५००]– पालकाची सत्यबुद्धि मी प्राप्त केली आहे.

१६ अहं सूर्यः इव अजनि [१५००]– मी सूर्यासारखा तेजस्वी झालों आहें.

१७ येन इन्द्रः शुष्मं दधे [१५०१]– ज्यानें इन्द्र बल धारण करतो.

१८ त्वं नः रायः दानाय देवतातये चोदय [१५०५[–तूं आमच्यासाठीं देवांना धनाचें दान करण्याची प्रेरणा कर.

१९ प्रथमः महे वाजाय श्रवसे धियं दधुः [१५०६] –मुख्य होऊन ते मोठें बल व यश मिळवण्याची बुद्धि धारण करतात.

२० सः त्वं नः वीर्याय चोदय [१५०६]– तो तूं आम्हांला वीर होण्याची प्रेरणा कर.

२१ वाजं अच्छ सदा असरः [१५०८]- युद्धासाठीं सरळ पुढें हो.

२२ महित्वना राधांसि प्रचोदयते [१५०९]-आपल्या मोठेपणानें तो धनांना प्रेरित करतो.

२३ त्वत् पुरा वीरतरः न जज्ञे [१५११]- तुझ्या पूर्वी तुझ्यापेक्षां अधिक मोठा वीर कोणी झालाच नाहीं.

२४ राया न कि, एवथा न, मन्दना न [१५११] -धन देणारा दुसरा कोणी नाहीं, शत्रूवर चाल करून जाणाराहि दुसरा कोणी नाहीं व स्तुत्यही दुसरा कोणी झाला नाहीं.

२५ विधते दाशुषे जनाय सुवीर्यं रत्नं दधाति [१५१४]- यज्ञ करणाऱ्या, दात्या मनुष्याला उत्तम वीरता वाढवणारें धन तो देतो.

२६ गातुवित्तमः अदर्शि [१५१५]- उत्तम मार्गदर्शक असा हा दिसत आहे.

२७ सुजातं आर्यस्य वर्धनं नः गिरः उपो नक्षन्तु [१५१५]- उत्तम रीतिनें झालेल्या आर्यांचें वर्धन करणाऱ्याची आमच्या वाणी स्तुति करतात.

२८ यस्मात् चर्कृत्यानि कृण्वतः कृष्टयः रेजन्ते, सहस्रसां मेधसातौ धीभिः त्मना नमस्यत [१५१६] -जेव्हां कर्तव्य करणाऱ्या मनुष्याला शत्रु कंपायमान करतात, तेव्हां सहस्र प्रकारचें सहाय्य करणाऱ्या अग्निला हे मनुष्य हो ! बुद्धिपूर्वक तुम्ही स्वतः प्रणाम करा.

२९ नः आयूंषि ऊर्जं इषं च पवसे [१५१८]- आम्हांला दीर्घ आयुष्य, बल व अन्न दे.

३० दुच्छुनां आरे बाधस्व [१५१८]- दुष्टांना दूर करून त्रास दे.

३१ पांचजन्यः ऋषिः पुरोहितः [१५१९]- पंचजनांचा हित करणारा ऋषि पुढें राहून कार्य करतो.

३२ तं महागयं ईमहे [१५१९]- त्यानें मोठ्या घरांत रहावें असें आम्हीं इच्छित आहों.

३३ स्वपाः अस्मे वर्चः पवस्व, मयि रयिं पोषं दधत् [१५२०]- तूं उत्तम कार्य करणारा आम्हांला तेज दे व मला धन व पोषणहि दे.

३४ ऊतिभिः नः अव [१५२४]- संरक्षणाच्या साधनांनीं आमचें संरक्षण कर.

३५ सत्रासाहं वरेण्यं विश्वासु पृत्सु दुष्टरं रयिं नः आ भर [१५२५]- सर्व शत्रूंचा पराभव करणारें श्रेष्ठ व सर्व युद्धांमध्यें शत्रूला दुस्तर असें धन आम्हांला दे.

३६ नः जीवसे सुचेतुना विश्वायुपोषसं मार्डीकं रयिं नः धेहि [१५२६]- आमच्या दीर्घजीवनासाठीं, उत्तम ज्ञानानें युक्त, सर्व आयुपर्यंत पोषण करणारें, सुखदायक धन आम्हांला दे.

३७ तेन धनं धनं जेष्म [१५२७]- त्या सामर्थ्यानें आम्ही प्रत्येक युद्ध जिंकूं.

३८ यया सेनया तव ऊत्या गाः आकरामहै, तां नः मघत्तये हिन्व [१५२८]- ज्या सैन्यानें व ज्या तुझ्या संरक्षणानें आम्हांला गाई मिळतील त्या संरक्षणशक्तिला आम्हांला धन मिळावें म्हणून प्रेरित कर.

३९ स्थूरं पृथुं गोमन्तं अश्विनं रयिं आ भर [१५२९] -फार मोठें गाई व घोडे ज्याच्याबरोबर असतात असें धन आम्हांला भरपूर दे.

४० खं अंग्धि, पविं वर्तय [१५२९]- आकाशांत आपलें तेज पसर व शस्त्राला दूर कर.

४१ जनेभ्यः ज्योतिः दधत् [१५३०]- लोकांसाठीं प्रकाश कर.

४२ त्वं विशां केतुः प्रेष्ठः श्रेष्ठः [१५३१]- तूं प्रजांना ज्ञान देणारा प्रिय व श्रेष्ठ आहेस.

४३ स्वपतिः वार्यस्य दात्रस्य ईशिषे [१५३३]- तूं स्वामी आहेस व स्वीकार करण्यास योग्य व दान देण्यास योग्य अशा धनाचा स्वामी आहेस.

४४ शुचयः शुक्राः भ्राजन्तः अर्चयः तव ज्योतींषि उदीरते [१५३४]- शुद्ध, स्वच्छ, तेजस्वी व प्रकाशमान् तुझीं प्रकाश किरणें चारही बाजूंना पसरत आहेत.

उपमा

आतां या अध्यायांत आलेल्या उपमा पहा—

१ मज्मना यूथे निष्ठा वृषभः न [१४९६]- आपल्या शक्तिनें कळपामध्यें जसा बैल राहतो, त्याप्रमाणें हे सोमा ! तूं (विराजसि) येथें विराजमान होत आहेस.

२ सिन्धोः उपाके ऊर्मा आ [१४९८]-जशा समुद्राला पाण्याच्या लाटा येतात, त्याप्रमाणें (दाशुषे सद्यः क्षरसि) दात्याला तूं धन देतोस.

३ अहं सूर्यः इव अजनि [१५००]- मी सूर्यासारखा तेजस्वी झालों आहें.

४ कण्ववत् अहं प्रत्नेन जन्मना गिरः शुम्भामि [१५०१]- कण्वाप्रमाणें मी प्राचीन वाणीनें इन्द्राची स्तुति करून त्याला सुशोभित करतों.

५ न कंचित् जनपानं अक्षितं उत्सं [१५०१]- मानवांना पाणी पिण्यासाठीं मिळावें यासाठीं जसा हौद भरतात, त्याप्रमाणें हे सोमा ! (अभ्यभि ततर्दिथ) गाळला जाऊन तूं भांड्यांत भरला जातोस.

६ भरमाणः न [१५०१]- हौद भरतात त्याप्रमाणें (गभस्त्योः शर्याभिः) हाताच्या अंगुलींनीं सोमरस भांड्यांत भरला जातो.

७ इन्द्रः न [१५१७]- इन्द्राप्रमाणें (अग्निः मातरं पृथिवीं अनु प्र वि वावृते) अग्नि मातृभूमिवर अनेक प्रवृत्ति करतो.

८ आजिषु आशुं सप्ति इव [१५२७]- युद्धांमध्यें दौड करणाऱ्या घोड्याला चालवितात, त्याप्रमाणें (नः धियः अग्निं हिन्वन्तु) आमच्या बुद्धि अग्निला प्रेरित करोत.

चतुर्दशाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
१४८९	८।६९।४	प्रियमेध आंगिरसः	इन्द्रः	गायत्री
१४९०	८।६९।५	प्रियमेध आंगिरसः	,,	,,
१४९१	८।६९।६	प्रियमेध आंगिरसः	,,	,,
१४९२	८।९०।१	नृमेध-पुरुमेधावांगिरसौ	,,	प्रगाथः-(विषमा बृहती, समा सतोबृहती)
१४९३	८।९०।२	नृमेध-पुरुमेधावांगिरसौ	,,	,,
१४९४	९।११०।८	त्र्यरुणस्त्रैवृष्णः, त्रसदस्युः पौरुकुत्सः	पवमानः सोमः	ऊर्ध्वा बृहती
१४९५	९।११०।६	त्र्यरुणस्त्रैवृष्णः, त्रसदस्युः पौरुकुत्सः	,,	,,
१४९६	९।११०।९	त्र्यरुणस्त्रैवृष्णः, त्रसदस्युः पौरुकुत्सः	,,	,,
१४९७	१।२७।४	शुनःशेप आजीगर्तिः	अग्निः	गायत्री
१४९८	१।२७।६	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१४९९	१।२७।५	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१५००	८।६।१०	वत्सः काण्वः	इन्द्रः	,,
१५०१	८।६।११	वत्सः काण्वः	,,	,,
१५०२	८।६।१२	वत्सः काण्वः	,,	,,
		(२)		
१५०३	—	अग्निस्तापसः	विश्वेदेवाः	अनुष्टुप्
१५०४	—	अग्निस्तापसः	,,	,,
१५०५	१०।१४१।६	अग्निस्तापसः	,,	,,
१५०६	९।११०।७	त्र्यरुणस्त्रैवृष्णः, त्रसदस्युः पौरुकुत्सः	पवमानः सोमः	ऊर्ध्वा बृहती
१५०७	९।११०।५	त्र्यरुणस्त्रैवृष्णः, त्रसदस्युः पौरुकुत्सः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१५०८	९।११०।३	त्र्यरुणस्त्रैवृष्णः, त्रसदस्युः पौरुकुत्सः	पवमानः सोमः	ऊर्ध्वा बृहती
१५०९	८।२४।१३	विश्वमना वैयश्वः	इन्द्रः	उष्णिक्
१५१०	८।२४।१४	विश्वमना वैयश्वः	"	"
१५११	८।२४।१५	विश्वमना वैयश्वः	"	"
१५१२	८।६९।२	प्रियमेध आंगिरसः	"	"
		(३)		
१५१३	७।१६।११	वसिष्ठो मैत्रावरुणिः	अग्निः	प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती)
१५१४	७।१६।१२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	"	"
१५१५	८।१०३।१	सौभरिः काण्वः	"	बृहती
१५१६	८।१०३।३	सौभरिः काण्वः	"	"
१५१७	८।१०३।२	सौभरिः काण्वः	"	"
१५१८	९।६६।१९	शतं वैखानसः	अग्निः पवमानः	गायत्री
१५१९	९।६६।२०	शतं वैखानसः	"	"
१५२०	९।६६।२१	शतं वैखानसः	"	"
१५२१	५।२६।१	वसूयव आत्रेयः	अग्निः	"
१५२२	५।२६।२	वसूयव आत्रेयः	"	"
१५२३	५।२६।३	वसूयव आत्रेयः	"	"
		(४)		
१५२४	१।७९।७	गोतमो राहूगणः	"	"
१५२५	१।७९।८	गोतमो राहूगणः	"	"
१५२६	१।७९।९	गोतमो राहूगणः	"	"
१५२७	१०।१५६।१	केतुराग्नेयः	"	"
१५२८	१०।१५६।२	केतुराग्नेयः	"	"
१५२९	१०।१५६।३	केतुराग्नेयः	"	"
१५३०	१०।१५६।४	केतुराग्नेयः	"	"
१५३१	१०।१५६।५	केतुराग्नेयः	"	"
१५३२	८।४४।१६	विरूप आंगिरसः	"	"
१५३३	८।४४।१८	विरूप आंगिरसः	"	"
१५३४	८।४४।१७	विरूप आंगिरसः	"	"

अथ पञ्चदशोऽध्यायः ।

अथ सप्तमप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ ७-२ ॥

[१]

(१-१४) १, ११ गोतमो राहूगणः; २, ९ विश्वामित्रो गाथिनः; ३ विरूप आंगिरसः; ४, ७ भर्गः प्रागाथः; ५ त्रित आप्त्यः; ६ उशना काव्यः; ८ सुवीति- पुरुमीळ्हावांगिरसौ १० सोभरिः काण्वः; १२ गोपवन आत्रेयः; १३ भरद्वाजो बार्हस्पत्यो, वीतहव्य आंगिरसो वा; १४ प्रयोगो भार्गवः; पावकोऽग्निर्बार्हस्पत्यो वा, गृहपति-यविष्ठौ सहसः पुत्रो वान्यतरो वा ॥ अग्निः ॥ १-३, ६, ९, १४ गायत्री; ४, ७, ८ प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती,); ५ त्रिष्टुप् १० काकुभः प्रगाथः= (विषमा ककुप्, समा सतोबृहती); ११ उष्णिक्; १२ अनुष्टुम्मुखः प्रगाथः= (अनुष्टुप् + गायत्र्यौ); १३ जगती ॥

१५३५ कस्ते जामिर्जनानामग्ने को दाश्वध्वरः । को ह कस्मिन्नसि श्रितः ॥ १ ॥ (ऋ. १।७५।३)

१५३६ त्वं जामिर्जनानामग्ने मित्रो असि प्रियः । सखा सखिभ्य ईड्यः ॥ २ ॥ (ऋ. १।७५।४)

१५३७ यजा नो मित्रावरुणा यजा देवाँ ऋतं बृहत् । अग्ने यक्षि स्वं दमम् ॥३॥ १ (रु) ॥

[धा० ८ । उ० नास्ति । स्व० ५] (ऋ. १।७५।५)

१५३८ ईडेन्यो नमस्यस्तिरस्तमाँसि दर्शतः । समग्निरिध्यते वृषा ॥ १ ॥ (ऋ. ३।२७।१३)

१५३९ वृषो अग्निः समिध्यतेऽश्वो न देववाहनः । तँ हविष्मन्त ईडते ॥२॥ (ऋ. ३।२७।१४)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१५३५] हे अग्ने ! (जनानां ते जामिः कः) मनुष्यांमध्यें तुझा कोण बंधु आहे ? (दाशु-अध्वरः कः) दानानें तुझें यजन करणारा कोण आहे ? (कः ह) तूं कसा आहेस हें कोण बरें जाणत आहे ? (कस्मिन् श्रितः असि) तूं कोठें आश्रय करून राहिला आहेस बरें ? ॥ १ ॥

[१५३६] हे अग्ने ! (त्वं जनानां जामिः प्रियः मित्रः असि) तूं लोकांचा बन्धु व प्रिय मित्र आहेस. (ईड्यः सखिभ्यः सखा) तूं स्तुत्य व ऋत्विजरूपी मित्रांना मित्राप्रमाणें आहेस. ॥ २ ॥

[१५३७] हे अग्ने ! (नः) आमच्यासाठीं (मित्रावरुणा यज) मित्र व वरुण यांचें यजन कर. (देवान् यज) देवांचें यजन कर. (ऋतं बृहत् स्वं दमं यक्षि) यज्ञ कर व मोठ्या यज्ञशालेमध्यें पूज्य होऊन रहा. ॥ ३ ॥

[१५३८] (ईडेन्यः नमस्यः) स्तुत्य व नमस्कार करण्यास योग्य (तमांसि तिरः) अन्धकाराला दूर करणारा (दर्शत वृषा अग्निः) दर्शनीय व बलवान् अग्नि (सं इध्यते) आहुति देऊन उत्तमतेनें प्रदीप्त केला जातो. ॥ १ ॥

[१५३९] (वृषा उ) बलवान् (अश्वः न देववाहनः) घोडा जसा राजाला वाहून नेतो त्या माणें अग्नि देवांजवळ हवि नेतो, असा हा (अग्निः समिध्यते) अग्नि आहुति देऊन प्रदीप्त केला जात आहे, (तं हविष्मन्तः ईडते) त्या अग्निची हवन करणारे यजमान स्तुति करीत आहेत. ॥ २ ॥

१५४० वृषणं त्वा वयं वृषन्वृषणः समिधीमहि । अग्ने दीद्यतं बृहत् ॥ ३ ॥ २ (लि) ॥
[धा० ९ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ३।२७।१५)

१५४१ उत्ते बृहन्तो अर्चयः समिधानस्य दीदिवः । अग्ने शुक्रास ईरते ॥ १ ॥ (ऋ. ८।४४।४)

१५४२ उप त्वा जुह्वो३ मम घृताचीर्यन्तु हर्यत । अग्ने हव्या जुषस्व नः ॥२॥ (ऋ ८।४४।५)

१५४३ मन्द्रं होतारमृत्विजं चित्रभानुं विभावसुम् । अग्निमीडे स उ श्रवत् ॥ ३ ॥ ३ (ह) ॥
[धा० ६ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ८।४४।६)

१५४४ पाहि नो अग्न एकया पाह्यु३त द्वितीयया ।
पाहि गीर्भिस्तिसृभिरूर्जां पते पाहि चतसृभिर्वसो ॥ १ ॥ (ऋ. ८।६०।९)

१५४५ पाहि विश्वस्माद्रक्षसो अराव्णः प्र स्म वाजेषु नोऽव ।
त्वामिद्धि नेदिष्ठं देवतातय आपिं नक्षामहे वृधे ॥ २ ॥ ४ (यि) ॥
[धा० १७ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ८।६०।१०)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[१५४०] हे (वृषन् अग्ने) बलवान् अग्ने ! (वृषणः वयं) आहुति देणारे आम्ही (वृषणं दीद्यतं बृहत्) बलवान् तेजस्वी अशा महान् अग्निला (समिधीमहि) प्रज्वलित करीत आहों. ॥ ३ ॥

[१५४१] हे (दीदिवः) तेजस्वी अग्ने ! (समिधानस्य ते) प्रदीप्त होणाऱ्या तुझ्या (बृहन्तः शुक्रासः) मोठ्या शुद्ध (अर्चयः) ज्वाला (उदीरते) निघत आहेत. ॥ १ ॥

[१५४२] हे (हर्यत अग्ने) पूज्य अग्ने ! (मम घृताचीः जुह्वः) माझे तुपानें पूर्ण भरलेले असे चमचे (त्वा उपयन्तु) तुझ्याजवळ जावोत. (नः हव्या जुषस्व) आमच्या हवींचें सेवन कर. ॥ २ ॥

[१५४३] (मन्द्रं होतारं) आनंद देणाऱ्या, देवांना बोलावून आणणाऱ्या (ऋत्विजं चित्रभानुं) ऋतूंप्रमाणें यजन करणाऱ्या तेजस्वी (विभावसुं अग्निं ईडे) प्रकाशमान् अग्निची मी स्तुति करतों. (सः श्रवत् उ) तो ती ऐको. ॥ ३ ॥

[१५४४] हे (अग्ने) अग्ने ! (नः एकया पाहि) तूं आमचें एक ऋचेनें संरक्षण कर. (उत द्वितीयया पाहि) अथवा दुसऱ्या ऋचेनें संरक्षण कर. हे (ऊर्जां पते) बलांच्या पालका ! (तिसृभिः गीर्भिः पाहि) तीन मंत्रांनीं संरक्षण कर. हे (वसो) निवासका ! (चतसृभिः पाहि) चार मंत्रांनीं संरक्षण कर. ॥ १ ॥

[१५४५] हे अग्ने ! (विश्वस्मात् रक्षसः अ-राव्णः) सर्व राक्षसांपासून व दान न देणाऱ्या वैऱ्यांपासून (नः पाहि) तूं आमचें रक्षण कर. तसेंच (वाजेषु प्राव स्म) युद्धांमध्यें आमचें रक्षण कर. (हि) कारण कीं (नेदिष्ठं आपिं त्वां इत् हि) आमचा जवळचा बंधु तूंच आहेस. (देवतातये वृधे नक्षामहे) यज्ञाच्या सिद्धिसाठीं व आमचें संवर्धन व्हावें यासाठीं तुझ्या आश्रयाला आम्ही येत आहों. ॥ २ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

*

[२]

१५४६ इनो राजन्नरतिः समिद्धो रौद्रो दक्षाय सुषुमाँ अदर्शि ।
चिकिद्वि भाति भासा बृहतासिक्नीमेति रुशतीमपाजन् ॥ १ ॥ (ऋ. १०।३।१)

१५४७ कृष्णां यदेनीमभि वर्पसाभूज्जनयन्योषां बृहतः पितुर्जाम् ।
ऊर्ध्वं भानुं सूर्यस्य स्तभायन् दिवो वसुभिररतिर्वि भाति ॥ २ ॥ (ऋ. १०।३।२)

१५४८ भद्रो भद्रया सचमान आगात्स्वसारं जारो अभ्येति पश्चात् ।
सुप्रकेतैर्द्युभिरग्निर्वितिष्ठन्रुशद्भिर्वर्णैरभि राममस्थात् ॥ ३ ॥ ५ (यो) ॥
[धा० २७ । उ० नास्ति । स्व० ९] (ऋ. १०।३।३)

१५४९ कया ते अग्ने अङ्गिर ऊर्जो नपादुपस्तुतिम् । वराय देव मन्यवे ॥ १ ॥ (ऋ. ८।८४।४)

१५५० दाशेम कस्य मनसा यज्ञस्य सहसो यहो । कदु वोच इदं नमः ॥ २ ॥ (ऋ. ८।८४।५)

---

[२] द्वितीयः खण्डः ।

[१५४६] हे अग्ने ! तूं (इनः) सर्वांचा स्वामी आहेस. (अरतिः) देवांजवळ जाणारा, (समिद्धः) प्रज्वलित केलेला, (रौद्रः) शत्रूंना भय दाखवणारा, (सुषुमान्) उपासकांना इष्ट पदार्थ देणारा, (दक्षाय अदर्शि) तूं बल वाढवणारा आहेस हें पाहिलें आहे. (चिकित् विभाति) सर्वज्ञ असा तूं प्रदीप्त होत आहेस. (रुशतीं अपाजन्) तेजस्वी ज्वालेला पसरवीत (बृहता भासा) मोठ्या तेजानें (असिक्नीं एति) रात्रीमध्यें हा जातो. ॥ १ ॥

[१५४७] हा अग्नि (यत्) जेव्हां (बृहतः पितुः-जां योषां) मोठ्या पित्यापासून उत्पन्न झालेली स्त्रीरूपी उषा (जनयन्) प्रकट करून (कृष्णां एनीं वर्पसा अभिभूत्) काळ्या रात्रीला आपल्या ज्वालांनीं पराभूत करतो, तेव्हां (अरतिः) हा गतिमान् अग्नि (दिवः वसुभिः) द्युलोकांतील तेजांनीं (सूर्यस्य भानुं) सूर्याच्या तेजाला (ऊर्ध्वं स्तभायन्) वरच थांबवीत (विभाति) स्वतः प्रकाशित होत आहे. ॥ २ ॥

[१५४८] (भद्रः) कल्याण करणारा अग्नि (भद्रया सचमानः आगात्) कल्याण करणाऱ्या उषेकडून सेविला जाऊन प्रज्वलित होत आहे, (पश्चात् जारः स्वसारं अभ्येति) तेव्हां शत्रूंचा नाश करणारा अग्नि आपली बहिण उषा हिला प्राप्त होतो. (सुप्रकेतैः द्युभिः वितिष्ठन् अग्निः) आपल्या तेजांनीं सर्वत्र राहणारा हा अग्नि (उशद्भिः वर्णैः) तेजस्वी रंगाच्या ज्वालांनीं (रामं अभ्यस्थात्) रात्रीच्या अन्धकाराला पराभूत करून स्थिर राहतो. ॥ ३ ॥

[१५४९] हे (अंगिरः) अंगांच्या प्रकाशका, व (ऊर्जः न-पात्) बल कमी न करणाऱ्या (देव अग्ने) अग्नि देवा ! (वराय) सर्वांना स्वीकरणीय व (मन्यवे ते) शत्रूवर क्रोध करणाऱ्या तुझ्यासाठीं (कया उप स्तुतिं) कोणत्या पद्धतिनें मी स्तुति करावी बरें ? ॥ १ ॥

[१५५०] (सहसः यहो) हे बलानें उत्पन्न होणाऱ्या अग्ने ! (कस्य यज्ञस्य मनसा दाशेम) कोणत्या यज्ञ करणाऱ्याच्या मनाप्रमाणें आम्ही हवि अर्पण करावें बरें ? (इदं नमः कत् वोचे उ) हें हवि किंवा हा नमस्कार तुला मिळो, हें आम्ही केव्हां म्हणावें बरें ? ॥ २ ॥

१५५१ अधा त्वꣳ हि नस्करो विश्वा अस्मभ्यꣳ सुक्षितीः । वाजद्रविणसो गिरः ॥३॥ ६ (ट) ॥
[धा० १८ । उ० १ । स्व० १] (ऋ. ८।८४।६)

१५५२ अग्न आ याह्यग्निभिर्होतारं त्वा वृणीमहे ।
आ त्वामनक्तु प्रयता हविष्मती यजिष्ठं बर्हिरासदे ॥ १ ॥ (ऋ. ८।६०।१)

१५५३ अच्छा हि त्वा सहसः सूनो अङ्गिरः स्रुचश्चरन्त्यध्वरे ।
ऊर्जो नपातं घृतकेशमीमहेऽग्निं यज्ञेषु पूर्व्यम् ॥ २ ॥ ७ (या) ॥
(धा० १७ । उ० नास्ति । स्व० २) (ऋ. ८।६०।२)

१५५४ अच्छा नः शीरशोचिषं गिरो यन्तु दर्शतम् ।
अच्छा यज्ञासो नमसा पुरूवसुं पुरुप्रशस्तमूतये ॥ १ ॥ (ऋ. ८।७१।१०)

१५५५ अग्निꣳ सूनुꣳ सहसो जातवेदसं दानाय वार्याणाम् ।
द्विता यो भूदमृतो मर्त्येष्वा होता मन्द्रतमो विशि ॥ २ ॥ ८ (टा) ॥
[धा० ८ । उ० १ । स्व० २] (ऋ. ८।७१।११)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[१५५१] हे (अग्ने) अग्ने ! (अध) यानंतर (त्वं हि अस्मभ्यं करः) तूंच आमच्यासाठीं असें कर कीं (नः विश्वाः गिरः) आमच्या सर्व स्तुति (सु-क्षितीः) आम्हांला श्रेष्ठस्थानांचे स्वामी व (वाजद्रविणसः) अन्न अथवा धनानें युक्त करोत. ॥ ३ ॥

[१५५२] हे (अग्ने) अग्ने ! (त्वा होतारं वृणीमहे) तूं देवांना बोलावणारा आहेस असें समजून तुझी प्रार्थना आम्ही करतों. तूं (अग्निभिः आयाहि) अग्नींसह येथें ये. (यजिष्ठं त्वां) पूजनीय अशा तुला (प्रयता हविष्मती) तयार हवियुक्त आहुति (बर्हिः आसदे) आसनावर बसल्यानंतर (अनक्तु) प्राप्त होवो. ॥ १ ॥

[१५५३] हे (सहसः सूनो अंगिरः) बलाच्या पुत्रा व सर्वत्र गमन करणाऱ्या अग्ने ! (त्वा अध्वरे अच्छ) तुला यज्ञामध्यें प्राप्त करण्यासाठीं (स्रुचः चरन्ति) चमचे हालचाल करीत आहेत. (ऊर्जः नपातं घृतकेशं) बल कमी न करणाऱ्या व प्रखर ज्वालायुक्त (पूर्व्यं अग्निं) मनोरथ पूर्ण करणाऱ्या अग्निची आम्ही (यज्ञेषु ईमहे) यज्ञांत स्तुति करीत आहों. ॥ २ ॥

[१५५४] (नः गिरः) आमच्या स्तुति (शीर-शोचिषं दर्शतं) प्रज्वलित ज्वालांनीं युक्त व दर्शनीय अग्निजवळ (अच्छा यन्तु) सरळ पोंचोत. (ऊतये) आमच्या रक्षणासाठीं (नमसा यज्ञासः) तुपानें युक्त असलेले आमचे यज्ञ (पुरु-वसुं पुरु-प्रशस्तं अच्छ) पुष्कळ धनानें युक्त व पुष्कळांनीं प्रशंसनीय अशा अग्निला प्राप्त होवोत. ॥१ ॥

[१५५५] (मर्त्येषु) मनुष्यांमध्यें (यः अमृतः) जो अमर आहे. (द्विता अभूत्) तो देवांमध्येंहि अमरच आहे. अर्थात् दोनही ठिकाणीं तो अमरच आहे. (विशि होता मन्द्रतमः) मानवांमध्यें हवन करणारा व आनंद देणारा आहे. (सहसः सूनुं) बलानें उत्पन्न होणाऱ्या (जात-वेदसं अग्निं) सर्वज्ञानी अग्निची (वार्याणां दानाय) धनाच्या दानासाठीं आम्ही प्रार्थना करीत आहों. ॥ २ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३]

१५५६ अदाभ्यः पुरएता विशामग्निर्मानुषीणाम् । तूर्णी रथः सदा नवः ॥ १ ॥ (ऋ. ३।११।५)

१५५७ अभि प्रयाꣳसि वाहसा दाश्वाꣳअश्नोति मर्त्यः । क्षयं पावकशोचिषः ॥२॥ (ऋ. ३।११।७)

१५५८ साह्वान्विश्वा अभियुजः क्रतुर्देवानाममृक्तः । अग्निस्तुविश्रवस्तमः ॥ ३ ॥ ९ (वि) ॥

[धा० १० । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ३।११।६)

१५५९ भद्रो नो अग्निराहुतो भद्रा रातिः सुभग भद्रो अध्वरः । भद्रा उत प्रशस्तयः ॥ १ ॥

(ऋ. ८।१९।१९)

१५६० भद्रं मनः कृणुष्व वृत्रतूर्ये येना समत्सु सासहिः ।

अव स्थिरा तनुहि भूरि शर्धतां वनेमा ते अभिष्टये ॥ २ ॥ १० (लि))

[धा० ४ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ८।१९।२०)

१५६१ अग्ने वाजस्य गोमत ईशानः सहसो यहो । अस्मे देहि जातवेदो महि श्रवः ॥ १ ॥

(ऋ. १।७९।४)

---

[३] तृतीयः खण्डः ।

[१५५६] (मानुषीणां विशां पुर-एता) मानवी प्रजांचा अग्रगामी, (तूर्णीः) त्वरेनें कार्य करणारा (रथः) रथाप्रमाणें प्रगतिशील (सदा नवः अग्निः) नेहमीं नवीन असा अग्नि (अ-दाभ्यः) कोणाकडूनहि दबला न जाणारा असा आहे. ॥ १ ॥

[१५५७] (दाश्वान् मर्त्यः) दाता मनुष्य (वाहसा) हव्य पोंचवणाऱ्या) अग्निकडून, (प्रयांसि अभि अश्नोति) अन्नांना प्राप्त करतो. तसेंच (पावक-शोचिषः) पवित्र प्रकाश असणाऱ्या अग्निकडून (क्षयं) निवास योग्य घर प्राप्त करतो. ॥ २ ॥

[१५५८] (अभियुजः विश्वाः साह्वान्) चढाई करणाऱ्या सर्व शत्रूसेनांचा पराभव करणारा (अ-मृक्तः) कोणाकडूनहि पराजित न होणार (देवानां क्रतुः अग्निः) देवांचा यज्ञ करणारा अग्नि (तुवि-श्रवस्तमः) पुष्कळ अन्न देणारा आहे. ॥ ३ ॥

[१५५९] (आहुतः अग्निः नः भद्रः) आहुतींनीं तृप्त झालेला अग्नि आमचें कल्याण करणारा होवो. हे (सु-भग) उत्तम भाग्यवान् अग्ने ! (भद्रा रातिः) तुझें कल्याण करणारें दान आम्हांस प्राप्त होवो. (अध्वरः भद्रः) आमचा यज्ञ कल्याण करणारा होवो (उतः प्रशस्तयः भद्राः) आणि आम्ही केलेल्या स्तुति आमचें कल्याण करणाऱ्या होवोत. ॥ १ ॥

[१५६०] हे अग्ने ! (वृत्र-तूर्ये मनः भद्रं कृणुष्व) युद्धामध्यें आमचें मन कल्याणमय विचार करणारें कर. (येन समत्सु सासहिः) ज्यानें युद्धांमध्यें शत्रूंचा पराभव तूं करतोस. (शर्धतां भूरि स्थिरा अवतनुहि) युद्ध करणाऱ्या शत्रूच्या सुदृढ सेनेचाहि तूं पराभव कर. (अभिष्टये ते वनेम) आम्ही आमचें कल्याण व्हावें यासाठीं तुझी आराधना करीत आहों. ॥ २ ॥

[१५६१] हे (सहसः यहो) बलाच्या पुत्रा अग्ने ! (गोमतः वाजस्य ईशानः) गाईंबरोबर असणाऱ्या अन्नाचा तूं स्वामी आहेस. हे (जातवेदः) सर्वज्ञा ! (अस्मे महि श्रवः देहि) आम्हांला पुष्कळ अन्न दे. ॥ १ ॥

१५६२ स इधानो वसुष्कविरग्निरीडेन्यो गिरा । रेवदस्मभ्यं पुर्वणीक दीदिहि ॥ २ ॥
(ऋ. १।७९।५)

१५६३ क्षपो राजन्नुत त्मनाग्ने वस्तोरुतोषसः । स तिग्मजम्भ रक्षसो दह प्रति ॥३॥ ११(टा)॥
[धा० १३ । उ० १ । स्व० २] (ऋ. १।७९।६)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

१५६४ विशोविशो वो अतिथिं वाजयन्तः पुरुप्रियम् ।
अग्निं वो दुर्यं वचः स्तुषे शूषस्य मन्मभिः ॥ १ ॥ (ऋ. ८।७४।१)

१५६५ यं जनासो हविष्मन्तो मित्रं न सर्पिरासुतिम् । प्रशꣳसन्ति प्रशस्तिभिः ॥ २ ॥
(ऋ. ८।७४।२)

१५६६ पन्याꣳसं जातवेदसं यो देवतात्युद्यता । हव्यान्यैरयद्दिवि ॥ ३ ॥ १२ (टा) ॥
[धा० १३ । उ० १ । स्व० २] (ऋ. ८।७४।३)

१५६७ समिद्धमग्निं समिधा गिरा गृणे शुचिं पावकं पुरो अध्वरे ध्रुवम् ।
विप्रꣳ होतारं पुरुवारमद्रुहं कविꣳ सुम्नैरीमहे जातवेदसम् ॥ १ ॥ (ऋ. ६।१५।७)

[१५६२] (सः अग्निः) तो अग्नि (इधानः वसुः) प्रदीप्त झालेला व निवास करणारा (कविः) ज्ञानी (गिरा ईडेन्यः) वाणीनें स्तुति करण्यास योग्य आहे. हे (पुरु-अनीक) अनेक ज्वालायुक्त अग्ने ! (अस्मभ्यं रेवत् दीदिहि) आम्हांला चमकणारें धन दे. ॥ २ ॥

[१५६३] (राजन् अग्ने) हे प्रकाशमान् अग्ने ! (वस्तोः उत उषसः) सर्व दिवसा व रात्रीमध्यें (क्षपः) शत्रूंचा नाश कर (उत त्मना) आणि स्वतः तूं हे (तिग्म-जम्भ) तीक्ष्ण मुखाच्या अग्ने ! (रक्षसः प्रति दह) राक्षसांना जाळून टाक. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[१५६४] हे याजक हो ! (वाजयन्तः वः) अन्न व बलांची इच्छा करणारे तुम्ही (विशः विशः अतिथिं) प्रत्येक प्रजाजनांच्या घरीं अतिथिप्रमाणें पूजनीय व (पुरुप्रियं अग्निं) पुष्कळांना प्रिय असणाऱ्या अग्निला हवि अर्पण करा. (वः शूषस्य मन्मभिः) तुमचें बल वाढवणाऱ्या स्तोत्रांनीं (दुर्यं वचः स्तुषे) स्थंडिलांत असणाऱ्या अग्निची आम्ही स्तुति करीत आहों. ॥ १ ॥

[१५६५] (यं) ज्याची (हविष्मन्तः जनासः) हवि बाळगणारे लोक (मित्रं न) मित्रासारखी (सर्पिरासुतिं) तुपाच्या हवनाबरोबरच (प्रशस्तिभिः प्रशंसन्ति) स्तोत्रांनीं प्रशंसा करतात. ॥ २ ॥

[१५६६] (पन्यांसं जातवेदसं) अत्यंत स्तुति करण्यास योग्य सर्वज्ञानी अग्निची आम्ही स्तुति करीत आहों. (यः) जो (देवताति) देव यज्ञामध्यें (उद्यता हव्यानि) दिलीं जाणारीं हविर्द्रव्यें (दिवि ऐरयत्) द्युलोकामध्यें पोंचवीत असतो. ॥ ३ ॥

[१५६७] (समिधा समिद्धं अग्निं) समिधांनीं प्रज्वलित झालेल्या अग्निची मी (गिरा गृणे) वाणीनें स्तुति करीत आहें. (शुचिं ध्रुवं पावकं अध्वरे पुरः) शुद्ध स्थिर व पवित्र करणाऱ्या अग्निला यज्ञामध्यें मी पुढें स्थापन करीत आहें. (विप्रं होतारं) ज्ञानी, हवन करणाऱ्या (पुरुवारं अद्रुहं) अनेकांनीं स्वीकार करण्यास योग्य द्रोह न करणाऱ्या (कविं जातवेदसं) ज्ञानी व सर्वज्ञानी अग्निची (सुम्नैः ईमहे) धनासाठीं आम्ही प्रार्थना करीत आहों. ॥ १ ॥

१५६८ त्वां दूतमग्ने अमृतं युगेयुगे हव्यवाहं दधिरे पायुमीड्यम् ।
देवासश्च मर्तासश्च जागृविं विभुं विश्पतिं नमसा नि षेदिरे ॥ २ ॥ (ऋ. ६।१५।८)

१५६९ विभूषन्नग्न उभयाँ अनु व्रता दूतो देवानाँ रजसी समीयसे ।
यत्ते धीतिं सुमतिमावृणीमहेऽध स्म नस्त्रिवरूथः शिवो भव ॥ ३ ॥ १३ (या) ॥
[धा० २२ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ६।१५।९)

१५७० उप त्वा जामयो गिरो देदिशतीर्हविष्कृतः । वायोरनीके अस्थिरन् ॥१॥ (ऋ. ८।१०२।१३)

१५७१ यस्य त्रिधात्ववृतं बर्हिस्तस्थावसन्दिनम् । आपश्चिन्नि दधा पदम् ॥२॥ (ऋ. ८।१०२।१४)

१५७२ पदं देवस्य मीढुषोऽनाधृष्टाभिरूतिभिः । भद्रा सूर्य इवोपदृक् ॥ ३ ॥ १४ (हु) ॥
[धा० १६ । उ० नास्ति । स्व० ५] (ऋ. ८।१०२।१५)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥
॥ इति सप्तमप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ ७-२ ॥
॥ इति पञ्चदशोऽध्यायः ॥ १५ ॥

[१५६८] हे (अग्ने) अग्ने ! (देवासः च मर्तासः च) देव आणि मनुष्य (अमृतं युगे युगे हव्यवाहं) अमर व प्रत्येक यज्ञामध्यें हव्यें देवांकडे पोंचवणाऱ्या (पायुं ईड्यं त्वां) रक्षक स्तुत्य अशा तुला (दूतं दधिरे) दूत बनवीत आहेत. तेच (जागृविं विभुं विश्पतिं) जागृत, व्यापक अशा प्रजारक्षक अग्निची (नमसा निषेदिरे) नमन करीत उपासना करीत आहेत. ॥ २ ॥

[१५६९] हे अग्ने ! (उभयान् विभूषन्) देव व मनुष्य या दोघांना सुशोभित करणारा तूं (अनुव्रता देवानां दूतः) अनुकूल नियमांप्रमाणें चालणाऱ्या देवांचा दूत होऊन (रजसी समीयसे) द्युलोकांत व या लोकांत हवि पोंचवण्यासाठीं जातोस. (यत् ते) यासाठीं तुझ्याकडे (धीतिं सुमतिं आवृणीमहे) उत्तम कर्मामध्यें केलेल्या स्तुति पाठवीत आहों. (अध) यानंतर (त्रि-वरूथः) तीन स्थानांत राहणारा तूं (अस्मान् शिवः भव) आम्हांला सुख देणारा हो. ॥३॥

[१५७०] हे अग्ने ! (हविष्कृतः) यज्ञ करणाऱ्यासाठीं (गिरः जामयः) स्तुति बहिणींप्रमाणें (देदिशतीः) तुझ्या गुणांचें गान करीत (वायोः अनीके) वायुच्या जवळ (त्वां उपास्थिरन्) तुला प्रदीप्त करून स्थापित करीत आहेत. ॥ १ ॥

[१५७१] (यस्य) ज्या अग्निचें (त्रिधातु अवृतं) तीन पर्वें असलेलें उघडलेलें व (अवसंदिनं बर्हिः तस्थौ) न बांधलेलें आसन ठेवलेलें आहे. त्या अग्निमध्यें (आपः चित्) जलही (पदं निदधा) आपलें स्थान ठेवीत असतें. ॥ २ ॥

जल अन्तरिक्षांत आपलें स्थान ठेवीत असतें. तेथें अग्नि विद्युत् रूपानें असतो.

[१५७२] (मीढुषः देवस्य पदं) स्तुत्य व तेजस्वी अग्नि देवाचें स्थान (अनाधृष्टाभिः ऊतिभिः) शत्रूंकडून बाधा न पोंचलेल्या संरक्षणांनीं युक्त असतें. त्याची (उपदृक्) दृष्टिही (सूर्यः इव भद्रा) सूर्याप्रमाणें कल्याण करणारी असते. ॥ ३ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥
॥ इति पञ्चदशोऽध्यायः ॥

पञ्चदश अध्याय

अग्निदेवता

अग्निदेवाची उपासना हवनानें होत असते. यासंबंधानें म्हटलें आहे —

१ वृषः अश्वः न, देववाहनः अग्निः समिध्यते, तं हविष्मन्तः ईळते [१५३९]- बलवान् घोडा जसा राजाला वाहून नेतो, त्याप्रमाणें अग्नि आहुति देऊन प्रदीप्त केला जातो. त्या अग्निची स्तुति हवन करणारे करीत आहेत.

अग्नि देवांना आपल्या रथांतून यज्ञाच्या जागीं वाहून आणतो व हवि अर्पण करणारे यजमान त्याची स्तुति करतात.

२ वृषणः वयं वृषणं दीद्यतं बृहत् समिधीमहि [१५४०]- आहुति देणारे आम्ही बलवान् व तेजस्वी अग्निला समिधांनीं प्रज्वलित करीत आहों.

३ समिधानस्य ते बृहन्तः शुक्रासः अर्चयः उदीरते [१५४१]- हे अग्ने ! प्रदीप्त होणाऱ्या तुझ्या मोठ्या शुद्ध ज्वाला निघत आहेत.

४ हविष्मन्तः जनासः विप्रं न सर्पिरासुतिं प्रशस्तिभिः प्रशंसन्ति [१५६५]- हवि जवळ बाळगणारे यजमान मित्रासारखी तुपाच्या हवनाबरोबरच अग्निची स्तुति करतात.

५ पन्यांसं जातवेदसं ,यः देवताति उद्यता हव्यानि दिवि ऐरयत् [१५६६]- अत्यंत स्तुति करण्यास योग्य सर्वज्ञ अग्निची आम्ही स्तुति करीत आहों, जो यज्ञामध्यें हवन केल्या जाणाऱ्या हविर्द्रव्यांनां द्युलोकामध्यें देवांजवळ पोंचवीत असतो.

६ विशः विशः अतिथिं पुरु-प्रियं अग्निं, वः शूषस्य मन्मभिः दुर्यं वचः स्तुषे [१५६४]- प्रत्येक प्रजाजनाच्या घरीं अतिथिप्रमाणें पूजनीय व पुष्कळ लोकांना प्रिय असणाऱ्या अग्निला हवि अर्पण करा. तुमचें बल वाढवणाऱ्या स्तोत्रांनीं स्थंडिलांत असणाऱ्या अग्निची आम्ही स्तुति करीत आहों.

घरोघर अग्नि स्थापन केलेला असतो व त्यांत हवन होत असतें.

७ समिधा समिद्धं अग्निं गिरा गृणे [१५६७]- समिधांनीं प्रदीप्त झालेल्या अग्निची मी आपल्या वाणीनें स्तुति करीत आहें.

यांत समिधा घालून अग्नि प्रज्वलित केला जातो हें सांगितलें आहे.

८ शुचिं ध्रुवं पावकं अध्वरे पुरः [१५६७]- शुद्ध, स्थिर व पवित्र करणाऱ्या अग्निला यज्ञांत पुढें स्थापन केला जातो.

९ होतारं पुरुवारं अद्रुहं कविं जातवेदसं सुम्नैः ईमहे [१५६७]- हवन करणाऱ्या, पुष्कळांनीं स्वीकार करण्यास योग्य, द्रोह न करणाऱ्या ज्ञानी व सर्वज्ञ अग्निची उत्तम मनानें आम्ही स्तुति करीत आहों.

१० देवासः मर्त्तासः च अमृतं युगे युगे हव्यवाहं पायुं ईड्यं त्वां जागृविं विभुं विश्पतिं नमसा निषेदिरे [१५६८]- देव व मनुष्य असे आम्ही अमर, प्रत्येक यज्ञामध्यें हवनीय द्रव्यें देवांजवळ पोंचवणाऱ्या संरक्षक व स्तुत्य, जागृत व्यापक व प्रजारक्षक अशा अग्निची नमन करून उपासना करीत आहों.

११ अग्ने ! उभयान् विभूषन अनुव्रता देवानां दूतः रजसी समीयसे [१५६९]- हे अग्ने ! देव व मनुष्य दोघांनाही सुशोभित करणारा तूं नियमांप्रमाणें चालणाऱ्या देवांचा दूत होऊन द्युलोकांत व या लोकांत हवि पोंचवण्यासाठीं जातोस.

१२ यत् ते धीतिं सुमतिं आवृणीमहे [१५६९]- यासाठीं तुझ्याकडे उत्तम यज्ञकर्मांमध्यें केलेल्या स्तुति पाठवीत आहोंत.

१३ त्रिवरूथः अस्मान् शिवः भव [१५६९]- तीन स्थानांमध्यें राहणारा तूं आम्हांला सुख देणारा हो.

१४ त्वं जनानां जामिः मित्रः प्रियः ईड्यः सखिभ्यः सखा असि [१५३६]- तूं लोकांचा बंधु, स्तुत्य, मित्रांमध्यें प्रिय मित्र असा आहेस.

१५ देवान् यज। ऋतं बृहत् स्वं दमं यक्षि [१५३७] – तूं देवासाठीं यज्ञ कर. यज्ञासाठीं मोठ्या यज्ञशालेंत पूज्य होऊन रहा.

१६ तमांसि तिरः दर्शतः वृषा अग्निः इध्यते

[१५३८]- अन्धकार दूर कर. दर्शनीय व बलवान् अग्नि आहुति देऊन प्रदीप्त केला जात आहे.

१७ मन्द्रं होतारं ऋत्विजं चित्रभानुं विभावसुं अग्निं ईडे [१५४३]- आनंद देणाऱ्या, देवांना बोलाऊन आणणाऱ्या, ऋतुप्रमाणें यजन करणाऱ्या विशेष तेजस्वी प्रकाशमान् अग्निची आम्ही स्तुति करतों.

१८ विश्वस्मात् अरावणः रक्षसः नः पाहि [१५४५] –सर्व कंजूस राक्षसांपासून आमचें रक्षण कर. अग्नि हा रोगबीजांचा नाश करतो. रोगबीजें, रोगजन्तु हे राक्षस आहेत. कारण ते प्राण्यांचा नाश करीत असतात.

१९ इनः अरातिः समिद्धः रौद्रः सुषुमान्, दक्षाय अदर्शि [१५४६]- अग्नि सर्वांचा स्वामी, देवांजवळ जाणारा, प्रदीप्त, शत्रूंना भय दाखवणारा, उपासकांना इष्ट पदार्थ देणारा, बल वाढवणारा आहे असें पाहिलें आहे.

२० चिकित् विभाति [१५४६]- तो ज्ञान वाढवीत प्रकाशतो.

२१ रुशतीं अपाजन् बृहता भासा असिक्नीं एति [१५४६]- तेजस्वी ज्वाला बाहेर फेंकीत, मोठ्या प्रकाशानें रात्रीमध्यें हा प्रकाशतो. प्रकाशित होऊन पुढें जातो.

२२ भद्रः भद्रया सचमानः पश्चात् जारः स्वसारं अभ्येति [१५४८]- कल्याण करणारा अग्नि उषेकडून सेविला जातो. नंतर शत्रूचा नाश करणारा हा अग्नि आपली बहिण अशी जी उषा तिच्याजवळ जातो.

यज्ञशालेमध्यें उषःकालीं अग्नि पेटविला जातो. थोड्यावेळानें दिवस उगवतो व उषेचा नाश होतो. अग्निच हा उषेचा नाश करतो. कारण अग्नि प्रदीप्त झाल्यानंतर थोड्यावेळानें उषःकाल संपतो. उषा ही बहिण व अग्नि हा उषेचा भाऊ आहे. पण हा अग्नि उषेचा जार म्हणजे नाश करणारा होतो.

२३ नः विश्वाः गिरः सुक्षितीः वाजद्रविणसः [१५५१]- आमच्या सर्व स्तुति आम्हांला उत्तम घरांचे स्वामी व अन्न आणि धन यांनीं युक्त करोत.

२४ ऊतये यज्ञासः पुरुवसुं पुरुप्रशस्तं अच्छ [१५५४]- आमच्या संरक्षणासाठीं हे यज्ञ पुष्कळ [illegible] ज्याच्याजवळ आहे व ज्याची पुष्कळ स्तुति होते त्या अग्निजवळ पोंचवोत. अग्निमध्यें यज्ञ होवो व त्यामुळें आमचें संरक्षण होवो.

२५ अमृतः मर्त्येषु, विशि होता मन्द्रतमः [१५५५] –प्रजांमध्यें हा अमर अग्नि असतो. हा प्रजांमध्यें हवन करणारा व आनंद वाढवणारा आहे. हवनानें रोग दूर होऊन लोकांचा आनंद वाढतो.

२६ मानुषीणां विशां पुरः एता तूर्णिः रथः सदा नवः अग्निः अदाभ्यः [१५५६]- मानवी प्रजांचा हा पुढारी, त्वरेनें सर्व कार्य करणारा, रथाप्रमाणें प्रगतिशील, सदा तरुण असल्याप्रमाणें कार्य करणारा अग्नि कोणाकडून हो दबला जाणारा नाहीं असा हा आहे.

हे गुण उपासकांनीं आपल्या अंगीं आणण्यासारखे आहेत.

२७ दाश्वान् मर्त्यः वाहसा प्रयांसि अभि अश्नोति, पावकशोचिषः क्षयं [१५५७]- दाता मनुष्य अग्निकडून पुष्कळ अन्नें व उत्तम घर प्राप्त करून घेऊं इच्छितो.

२८ अभियुजः विश्वाः साह्वान् अमृक्तः देवानां क्रतुः अग्निः तुविश्रवस्तमः [१५५८]- चढाई करणाऱ्या सर्व शत्रूंचा पराभव करणारा, कोणाकडूनही पराभूत न होणारा, देवांसाठीं यज्ञ करणारा अग्नि पुष्कळ अन्न देणारा आहे.

२९ आहुतः अग्निः भद्रः । रातिः भद्रा । अध्वरः भद्रः । प्रशस्तयः भद्राः [१५५९]- आहुति दिलेला अग्नि कल्याण करणारा आहे. तुझें दान कल्याण करणारें आहे. यज्ञ कल्याण करणारा आहे. स्तुति कल्याण करणाऱ्या आहेत.

३० वृत्रतूर्ये मनः भद्रं कृणुष्व, येन समत्सु सासहिः [१५६०]- शत्रूशीं युद्ध करण्याच्यावेळीं मन कल्याणकारक विचार करणारें राहूं दे, ज्यामुळें युद्धांमध्यें विजय मिळूं शकेल.

३१ शर्धतां भूरि स्थिरा अव तनुहि [१५६०]- स्पर्धा करणाऱ्या शत्रूच्या मोठ्या व सुदृढ सेनेचा तूं पराभव कर.

३२ गोमतः वाजस्य ईशानः [१५६१]- गाईंच्या दुधाबरोबर असणाऱ्या अन्नाचा तूं स्वामी आहेस.


३३ हे जातवेदः ! अस्मे महि श्रवः देहि [१५६१] [illegible] पुष्कळ अन्न दे.

[illegible] वसुः कविः गिरा ईळेन्यः, अस्मभ्यं रेवत् [illegible] [१५६२]- तूं निवास करवणारा, वाणीनें स्तुत्य असा आम्हांला चमकणारें धन दे.

३५ हे राजन् अग्ने ! वस्तो उषसः क्षपः [१५६३] –हे अग्नि राजन् ! तूं रात्री व दिवसा शत्रूंचा नाश कर.

३६ हे तिग्मजम्भ ! रक्षसः प्रति दह [१५६३]- हे तीक्ष्ण प्रकाशयुक्त अग्ने ! राक्षसांना जाळून टाक.

यज्ञशाळेचें चित्र



याप्रमाणें अग्निचें वर्णन या अध्यायामध्यें आलेलें आहे. दुसऱ्या कशाचें वर्णन येथें नाहीं. फक्त एकट्या अग्निचेंच वर्णन आहे.

अग्नि समिधांनीं व तुपाच्या आहुतींनीं प्रदीप्त केला जातो. हें तूप गाईचेंच असलें पाहिजे, कारण गाईच्या तुपाचा कोळसा हवेंतील वीष शोषून घेतो व हवा शुद्ध करतो. अग्नि हा आहुतिनें दिलेल्या हविर्द्रव्यांना जेथें तीं पाहिजेत तेथें पोंचवतो. समिधांनीं पेटविलेला हा अग्नि हविर्द्रव्यांना अतिसूक्ष्म करून हवेंत चहुंकडे पसरवितो. त्यामूळें वायु शुद्ध होतो व तो मनुष्यांना निरोगी व दीर्घजीवी करतो.

अग्नि हवनासाठीं घरोघर प्रदीप्त व्हावा. त्यास ऋतुपरत्वें हविर्द्रव्यें द्या म्हणजे तो तुमचें बल वाढवील व तुम्हांस दीर्घायु करील. हा अग्नि दोष दूर करणारा व पवित्रता करणारा आहे. याची दिवसा व रात्रौ उपासना हवनीय पदार्थ देऊन करावी.

हा अग्नि वायु आदि देव व मनुष्य यांची पवित्रता करणारा आहे, म्हणून तो प्रिय मित्र आहे. तो मानवाचा सखा आहे. तो नीट रीतिनें सेविला असतां सर्वांचें कल्याणच करतो. कधींहि अकल्याण करीत नाहीं.

सर्व राक्षस जे रोग पसरवतात, त्या दुष्ट राक्षसांचा हा नाश करतो व सर्व प्राणिमात्रांचें हा कल्याण करतो. हा प्रदीप्त झाला असतां फार रौद्ररूप दिसतो. पण तो आरोग्याच्या सर्व शत्रूंचा नाश करतो व मनुष्यांचें बल वाढवतो.

मनुष्यांच्या शरीरांत सर्व देव अग्निबरोबर येऊन राहत असतात. मनुष्य शरीर ही एक दिव्य यज्ञशाला आहे. सर्व देवांचे अंशावतार होऊन ते या यज्ञशालेमध्यें शतसांवत्सरीक यज्ञ करतात. शरीरांतील अग्नि नष्ट झाला कीं हे देव येथून निघून जातात. शरीररूपी घर आम्हांस प्राप्त व्हावें असें जे इच्छीत असतील, त्यांनीं या शरीररूपी यज्ञशाळेंतील अग्नि जाग्रत ठेवलाच पाहिजे.

मर्त्य शरीरामध्यें हा अमर्त्य अग्नि आहे व त्याच्या बरोबर सर्व देव हा जीवन यज्ञ चालवीत आहेत.

यासाठीं हा यज्ञाग्नि नीट अवस्थेमध्यें राहील असें प्रत्येकानें केलें पाहिजे. शरीरांतील यज्ञ कसा चाललेला आहे तें यज्ञाच्या वर्णनानें दाखवलें आहे. तें वाचकांनीं समजून घ्यावें व या आलंकारिक वर्णनाचा नीट अर्थ समजून घ्यावा व त्यास आपल्या जीवनामध्यें पहावा.

*

सुभाषितें

१ जनानां ते कः जामिः [१५३५]- लोकांपैकीं तुझा बंधु कोण आहे ?

२ दाशु अध्वरः कः [१५३५]- कोण बरें तुला दान देऊन यज्ञ करूं इच्छीत आहे ?

३ कस्मिन् श्रितः असि [१५३५]- तूं कोणाच्या आश्रयानें राहत आहेस बरें ?

४ हे अग्ने ! त्वं जनानां जामिः मित्रः प्रियः असि [१५३६]- हे अग्ने ! तूं लोकांचा बंधु व प्रिय मित्र आहेस. लोकांच्या शरीरांत उष्णतेच्या रूपानें राहतोस.

५ ईड्यः सखिभ्यः सखा [१५३६]- तूं प्रशंसनीय व मित्रांचा मित्र आहेस.

६ ईडेन्यः नमस्यः तमांसि तिरः दर्शतः वृषा सं इध्यते [१५३८]- जो प्रशंसनीय, नमस्कार करण्यास योग्य, अन्धकार दूर करणारा, दर्शनीय व बलवान् असतो त्याचें तेज वाढतें.

७ वृषणः वयं वृषणं दीद्यतं बृहत् समिधीमहि [१५४०]- बलवान् असे आम्हीं बलवान् तेजस्वी मोठ्या अग्निला प्रज्वलित करीत आहों.

८ समिधानस्य ते बृहन्तः शुक्रासः अर्चयः उदीरते [१५४१]- प्रदीप्त होणाऱ्या तुझ्या मोठ्या शुद्ध ज्वाला निघत आहेत.

९ विश्वस्मात् अराव्णः रक्षसः नः पाहि [१५४५] सर्व अनुदार राक्षसांपासून आमचें संरक्षण कर.

१० वाजेषु प्राव स्म [१५४५]- युद्धांमध्यें आमचें रक्षण कर.

११ नेदिष्ठं आपिं त्वां इत् हि [१५४५]- आमचा जवळचा बंधू तूंच आहेस.

१२ देवतातये वृधे नक्षामहे [१५४५]- यज्ञाची सिद्धि व आमचें संवर्धन यासाठीं आम्हीं तुझा आश्रय करीत आहों.

१३ इनः अरतिः समिद्धः रौद्रः दक्षाय अदर्शि [१५४६]- तूं स्वामी, प्रगतिशील, प्रदीप्त, शत्रूंना भय दाखवणारा व बल वाढवणारा आहेस, असें दिसतें.

१४ चिकित् विभाति [१५४६]- ज्ञानवान् असा तूं प्रदीप्त होत आहेस.

१५ रुशतीं अपाजन्, बृहता भासा असिक्नीं एति [१५४६]- तेजस्वी प्रकाश पाडीत, मोठ्या तेजानें रात्रीमध्यें हा पुढें जातो.

१६ नः गिरः सुक्षितीः वाजद्रविणसः [१५५१]- आमच्या स्तुति आम्हांला उत्तम घरांचे स्वामी व अन्नानें व धनानें युक्त करोत.

१७ नः गिरः शीरशोचिषं दर्शतं अच्छ यन्तु [१५५४]- आमच्या स्तुति प्रज्वलित व दर्शनीय अग्निला पोंचोत.

१८ जातवेदसं अग्निं वार्याणां दानाय [१५५५]- ज्ञान ज्याच्यापासून झालें आहे, अशा अग्निची धनांच्या दानासाठीं प्रार्थना करतों.

१९ मानुषीणां विशां पुर-एता, तूर्णीः रथः सदा नवः अदाभ्यः [१५५६]- मानवी प्रजांमध्यें अग्रगामी, त्वरेनें काम करणारा, रथाप्रमाणें पुढें जाणारा, सदा नवीन होऊन कार्य करणारा असा अग्नि दबला जात नाहीं.

२० दाश्वान् मर्त्यः वाहसा प्रियांसि अभि अश्नोति [१५५७]- दाता मनुष्य अग्निकडून प्रिय अन्नें प्राप्त करतो.

२१ पावक-शोचिषः क्षयं [१५५७]- पवित्र प्रकाश असलेल्याकडून घर प्राप्त करतो.

२२ अभियुजः विश्वाः साह्वान् अमृक्तः देवानां क्रतुः अग्निः तुविश्रवस्तमः [१५५८]- चढाई करणाऱ्या सर्व शत्रुसैनिकांचा पराभव करणारा, कोणाकडूनहि पराभूत न होणारा, देवांचा यज्ञ करणारा अग्नि पुष्कळ अन्न देणारा आहे.

२३ आहुतः अग्निः नः भद्रः [१५५९]- आहुतींनीं तृप्त झालेला अग्नि आमचें कल्याण करणारा आहे.

२४ रातिः भद्रा [१५५९]- दान कल्याण करणारें होवो.

२५ अध्वरः भद्रः [१५५९]- यज्ञ कल्याण करणारा होवो.

२६ प्रशस्तयः भद्राः [१५५९]- स्तुति कल्याण करणाऱ्या होवोत.

२७ वृत्रतूर्ये मनः भद्रं कृणुष्व [१५६०]- युद्धामध्यें मन कल्याणमय विचार करणारें करा.

२८ समत्सु सासहिः [१५६०]- युद्धामध्यें शत्रूचा पराभव करणारा हो.

२९ शर्धतां भूरि स्थिरा अवतनुहि [१५६०]- युद्ध करणाऱ्या सुदृढ शत्रूसेनेचा तूं पराभव करणारा हो.

३० अभिष्टये ते वनेम [१५६०]- कल्याण व्हावें म्हणून तुझी भक्ति करतों.

३१ गोमतः वाजस्य ईशानः असे माहि श्रवः देहि [१५६१]- गाईंपासून मिळणाऱ्या अन्नाचा स्वामी तूं आहेस. आम्हांला पुष्कळ अन्न दे.

३२ अस्मभ्यं रेवत् दीदिहि [१५६२]- आम्हांला चमकणारें धन दे.

३३ हे राजन् ! वस्तोः उत उषसः क्षपः, रक्षसः प्रति दह [१५६३]- हे राजन् ! रात्रौ व दिवसा शत्रूंचा नाश कर, राक्षसांना जाळून टाक.

३४ शुचिं ध्रुवं पावकं अध्वरे पुरः पुरुवारं, अद्रुहं कविं जातवेदस सुम्नैः ईमहे [१५६७]- शुद्ध, स्थिर, पवित्र करणाऱ्या, अहिंसक यज्ञामध्यें पुढें स्थापन केलेल्या अनेकांनीं स्वीकार करण्यास योग्य, द्रोह न करणाऱ्या, ज्ञानी सर्वज्ञ अग्निची धनासाठीं स्तोत्रांनीं प्रार्थना करतों.

३५ देवासः मर्तासः अमृतं, पायुं, ईड्यं त्वा दूतं दधिरे, जागृविं विभुं विश्पतिं नमसा निषेदिरे [१५६७] –देव व मनुष्य अमर, रक्षक, स्तुत्य अशा तुला - अग्निला - हव्य देवांकडे पोंचवणारा दूत म्हणून स्वीकारीत आहेत आणि जागृत व्यापक व प्रजारक्षक अग्निची नमस्कार करून उपासना करीत आहेत.

३६ अस्मान् शिवः भव [१५६९]- आमचें कल्याण करणारा हो.

३७ मीढुषः देवस्य पदं अनाधृष्टाभिः ऊतिभिः [१५७२]- स्तुत्य व तेजस्वी अग्निचें स्थान शत्रूंकडून बाधा न पोंचलेल्या संरक्षणाच्या साधनांनीं युक्त असतें.

३८ उपदृक् सूर्यः इव भद्रा [१५७२]- त्याची दृष्टि सूर्याप्रमाणें कल्याण करणारी असते.

उपमा

१ अश्वः नः देववाहनः [१५३९]- घोड्याप्रमाणें देवांचें वाहन हा अग्नि आहे.

२ मानुषीणां विशां पुरः एता तूर्णिः रथः अग्निः [१५५६]- मानवी प्रजांचा पुढारी त्वरेनें धांवणाऱ्या रथाप्रमाणें हा अग्नि आहे.

३ मित्रं न [१५६५]- मित्राप्रमाणें या अग्निची (प्रशंसन्ति) प्रशंसा करतात.

४ जामयः देदिशतीः [१५७०]- बहिणी स्तुति करतात, त्याप्रमाणें (गिरः) आमच्या वाणी तुझी स्तुति करतात.

५ सूर्यः इव भद्रा उपदृक् [१५७२]- सूर्याप्रमाणें कल्याण करणारी त्याची दृष्टि आहे.

पञ्चदशाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
१५३५	१।७५।३	गोतमो राहूगणः	अग्निः	गायत्री
१५३६	१।७५।४	गोतमो राहूगणः	,,	,,
१५३७	१।७५।५	गोतमो राहूगणः	,,	,,
१५३८	३।२७।१३	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१५३९	३।२७।१४	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१५४०	३।२७।१५	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१५४१	८।४४।४	विरूप आंगिरसः	,,	,,
१५४२	८।४४।५	विरूप आंगिरसः	,,	,,
१५४३	८।४४।६	विरूप आंगिरसः	,,	,,
१५४४	८।६०।९	भर्गः प्रागाथः	,,	प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती)
१५४५	८।६०।१०	भर्गः प्रागाथः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(२)		
१५४६	१०।३।१	त्रित आप्त्यः	अग्निः	त्रिष्टुप्
१५४७	१०।३।२	त्रित आप्त्यः	,,	,,
१५४८	१०।३।३	त्रित आप्त्यः	,,	,,
१५४९	८।८४।४	उशना काव्यः	,,	गायत्री
१५५०	८।८४।५	उशना काव्यः	,,	,,
१५५१	८।८४।६	उशना काव्यः	,,	,,
१५५२	८।६०।१	भर्गः प्रागाथः	,,	प्रगाथः- (विषमा बृहती समा सतोबृहती)
१५५३	८।६०।२	भर्गः प्रागाथः	,,	,,
१५५४	८।७१।१०	सुदीति - पुरुमीळ्हावांगिरसौ	,,	,,
१५५५	८।७१।११	सुदीति - पुरुमीळ्हावांगिरसौ	,,	,,
		(३)		
१५५६	३।११।५	विश्वामित्रो गाथिनः	,,	गायत्री
१५५७	३।११।७	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१५५८	३।११।६	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१५५९	८।१९।१९	सोभरिः काण्वः	,,	काकुभः प्रगाथः-(विषमा ककुप्, समा सतोबृहती)
१५६०	८।१९।२०	सोभरिः काण्वः	,,	,,
१५६१	१।७९।४	गोतमो राहूगणः	,,	उष्णिक्
१५६२	१।७९।५	गोतमो राहूगणः	,,	,,
१५६३	१।७९।६	गोतमो राहूगणः	,,	,,
		(४)		
१५६४	८।७४।१	गोपवन आत्रेयः	,,	अनुष्टुम्मुख प्रगाथः- (अनुष्टुप्+गायत्र्यौ)
१५६५	८।७४।२	गोपवन आत्रेयः	,,	,,
१५६६	८।७४।३	गोपवन आत्रेयः	,,	,,
१५६७	६।१५।७	भरद्वाजो बार्हस्पत्यो, वीतहव्य आंगिरसो वा	,,	जगती
१५६८	६।१५।८	भरद्वाजो बार्हस्पत्यो, वीतहव्य आंगिरसो वा	,,	,,
१५६९	६।१५।९	भरद्वाजो बार्हस्पत्यो, वीतहव्य आंगिरसो वा	,,	,,
१५७०	८।१०२।१३	प्रयोगो भार्गवः, पावकोग्निर्बार्हस्पत्यो वा, गृहपतियविष्ठौ सहसः पुत्रो वान्यतरो वा	,,	गायत्री
१५७१	८।१०२।१४	प्रयोगो भार्गवः, पावकोग्निर्बार्हस्पत्यो वा, गृहपतियविष्ठौ सहसः पुत्रो वान्यतरो वा	,,	,,
१५७२	८।१०२।१५	प्रयोगो भार्गवः, पावकोग्निर्बार्हस्पत्यो वा, गृहपतियविष्ठौ सहसः पुत्रो वान्यतरो वा	,,	,,

अथ षोडशोऽध्यायः ।

अथ सप्तमप्रपाठके तृतीयोऽर्धः ॥ ७-३ ॥

[१]

(१-२१) १, ८, १८, मेध्यातिथिः काण्वः; २ विश्वामित्रो गाथिनः; ३-४ भर्गः प्रागाथः; ५ सोभरिः काण्वः; ६, १५ शुनःशेप आजीगर्तिः; ७ सुकक्ष आंगिरसः; ९ विश्वकर्मा भौवनः; १० अनानतः पारुच्छेपिः; ११ भरद्वाजो बार्हस्पत्यः; १२ गोतमो राहूगणः; १३ ऋजिश्वा भारद्वाजः; १४ वामदेवो गौतमः; १६ हर्यतः प्रागाथः; १७ देवातिथिः काण्वः १९ वालखिल्यः (श्रुष्टिगुः काण्वः); २० पर्वतनारदौ; २१ अत्रिर्भौमः ॥ १, ३-४, ७-८, १५ १७-१९ इन्द्रः; २ इन्द्राग्नी; ५ अग्निः; ६ वरुणः; ९ विश्वकर्मा; १०, २०, २१ पवमानः सोमः; ११ पूषा; १२ मरुतः; १३ विश्वे देवाः; १४ द्यावापृथिवी; १६ अग्निः हवींषि वा ॥ १, ३-५, ८, १७-१९ प्रगाथः० (विषमा बृहती, समा सतोबृहती); २, ६-७, ११-१६ गायत्री; ९ त्रिष्टुप्; १० अत्यष्टिः; २० उष्णिक्; २१ जगती ॥

१५७३ अभि त्वा पूर्वपीतय इन्द्र स्तोमेभिरायवः ।
समीचीनास ऋभवः समस्वरन्रुद्रा गृणन्त पूर्व्यम् ॥ १ ॥ (ऋ. ८।३।७)

१५७४ अस्येदिन्द्रो वावृधे वृष्ण्यंशवो मदे सुतस्य विष्णवि ।
अद्या तमस्य महिमानमायवोऽनु ष्टुवन्ति पूर्वथा ॥ २ ॥ १ (रि) ॥
[धा० १८ । उ० नास्ति । स्व ३] (ऋ. ८।३।८)

१५७५ प्र वामर्चन्त्युक्थिनो नीथाविदो जरितारः । इन्द्राग्नी इष आ वृणे ॥१॥ (ऋ. ३।१२।५)

१५७६ इन्द्राग्नी नवतिं पुरो दासपत्नीरधूनुतम् । साकमेकेन कर्मणा ॥ २ ॥ (ऋ. ३।१२।६)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१५७३] हे (**इन्द्र**) इन्द्रा ! (**आयवः**) उपासक मनुष्य (**पूर्वपीतये**) प्रथम रसपान करण्यासाठीं (**त्वा स्तोमेभिः अभि**) तुझी स्तोत्रांनीं स्तुति करतात. (**समीचीनासः ऋभवः**) योग्य दृष्टी असलेले ऋभु (**समस्वरन्**) तुझी स्तुति करीत आहेत. (**रुद्राः पूर्व्यं गृणन्तः**) रुद्र पुराण पुरुष अशा तुझी स्तुति करीत आहेत. ॥ १ ॥

याज्ञिक लोक, ऋभु व रुद्र हे सर्व इन्द्राचे गुण गात असतात.

[१५७४] (**इन्द्रः**) इन्द्र (**सुतस्य विष्णवि मदे**) सोमाचा व्यापक आनंद प्राप्त झाल्यावर (**अस्य इत् वृष्ण्यं शवः वावृधे**) या यजमानाचें वीर्य व बल वाढवतो. म्हणून (**आयवः अद्य**) मनुष्य आजहि (**पूर्वथा**) पूर्वीप्रमाणेंच (**अस्य तं महिमानं अनुष्टुवन्ति**) या इन्द्राच्या त्या महिम्याचें वर्णन करतात. ॥ २ ॥

[१५७५] हे (**इन्द्राग्नी**) इन्द्र व अग्नि ! (**उक्थिनः वां प्रार्चन्ति**) वेदपाठी तुम्ही अर्चना करतात. (**नीथाविदः जरितारः**) सामगायक तुम्ही स्तुति करतात, (**इषः आवृणे**) अन्नासाठीं मीहि तुम्ही प्रार्थना करतों. ॥ १ ॥

[१५७६] हे (**इन्द्राग्नी**) इन्द्र व अग्नि ! तुम्ही दोघे (**दासपत्नीः नवतिं पुरः**) शत्रूंच्या नव्वद नगरी (**एकेन कर्मणा साकं**) एकाच प्रयत्नानें एकावेळींच (**अधूनुतं**) हालवून सोडतां. ॥ २ ॥

१५७७ इन्द्राग्नी अपसस्पर्युप प्र यन्ति धीतयः । ऋतस्य पथ्या३ अनु ॥ ३ ॥ (ऋ. ३।१२।७)

१५७८ इन्द्राग्नी तविषाणि वां सधस्थानि प्रयांसि च । युवोरप्तूर्यं हितम् ॥ ४ ॥ २ (टा) ॥

[धा० १३ । उ० १ । स्व० २] (ऋ. ३।१२।८)

१५७९ शग्ध्यू३ षु शचीपत इन्द्र विश्वाभिरूतिभिः ।
भगं न हि त्वा यशसं वसुविदमनु शूर चरामसि ॥ १ ॥ (ऋ. ८।६१।५)

१५८० पौरो अश्वस्य पुरुकृद्गवामस्युत्सो देव हिरण्ययः ।
न किर्हि दानं परि मर्धिषत्त्वे यद्यद्यामि तदा भर ॥ २ ॥ ३ (चु) ॥

[धा० १७ । उ० १ । स्व० ९] (ऋ. ८।६१।६)

१५८१ त्वं ह्येहि चेरवे विदा भगं वसुत्तये ।
उद्वावृषस्व मघवन्गविष्टय उदिन्द्राश्वमिष्टये ॥ १ ॥ (ऋ. ८।६१।७)

१५८२ त्वं पुरू सहस्राणि शतानि च यूथा दानाय मंहसे
आ पुरंदरं चकृम विप्रवचस इन्द्रं गायन्तोऽवसे ॥ २ ॥ ४ (फौ) ॥

[धा० १९ । उ० २ । स्व० नास्ति] (ऋ. ८।६१।८)

[१५७७] (इन्द्राग्नी) हे इन्द्र व अग्नि ! (धीतयः) होता आदि ऋत्विज (ऋतस्य पथ्या अनु) यज्ञाच्या मार्गानें (अपसः परि) आमच्या यज्ञामध्यें (उप प्रयन्ति) येऊन बसतात. ॥ ३ ॥

[१५७८] हे (इन्द्राग्नी) इन्द्र व अग्नि ! (वां तविषाणि प्रयांसि सधस्थानि) तुमचीं बलें व अन्नें एकत्रच राहतात. (युवो हितं) तुमचें बल (अप्तूर्यं) शुभ कर्मांना प्रेरणा करणारें आहे. ॥ ४ ॥

[१५७९] हे (शचीपते इन्द्र) शक्तिमान् इन्द्रा ! (विश्वाभिः ऊतिभिः) सर्व प्रकारच्या संरक्षणाच्या शक्तींनीं (उ सु शग्धि) तूं उत्तम रीतिनीं समर्थ आहेस. हे (शूर) शूर इन्द्रा ! (वसुविदं) धनसंपन्न (यशसं) यशस्वी (भगं न) भाग्यवानाप्रमाणें (त्वा हि अनुचरामसि) तुझ्या अनुकूल होऊन आम्ही चालत आहों. ॥ १ ॥

[१५८०] हे इन्द्रा ! तूं (अश्वस्य पौरः) घोड्यांना पुष्ट करणारा व (गवां पुरुकृत् असि) गाईंचें पोषण करणारा आहेस. हे (देव) देवा ! (हिरण्ययः उत्सः) सुवर्णासारख्या जलाचा हौद जसा असतो तसा तूं तृप्ती करणारा आहेस. हे (इन्द्र) इन्द्रा ! (त्वे दानं) तुझें दान (न किः हि परमर्धिषत्) कोणीहि नष्ट करूं शकत नाहीं. (यत् यत् यामि) जें जें मी मागतों (तत् आ भर) तें तूं मला भरपूर दे. ॥ २ ॥

[१५८१] (त्वं वसुत्तये हि एहि) तूं धन देण्यासाठीं अवश्य ये. (चेरवे भगं विदाः) सदाचरण करणाऱ्याला भाग्य दे. हे (मघवन्) धनवान् इन्द्रा ! (गविष्टये उत् वावृषस्व) गाईंची इच्छा करणाऱ्या मला गाई दे, तसेंच हे (इन्द्र) इन्द्रा ! (अश्वं इष्टये) घोड्यांची इच्छा करणाऱ्या मला (उत्) घोडे दे. ॥ १ ॥

[१५८२] हे इन्द्रा ! (त्वं) तूं (पुरू सहस्राणि शतानि च) पुष्कळ हजार अथवा शेंकडों (यूथा दानाय मंहसे) गाईंचे कळप दान देणाऱ्याला देतोस. (पुरंदरं इन्द्रं) शत्रूच्या नगरांना तोडणाऱ्या इन्द्राला (अवसे) आपलें रक्षण करण्यासाठीं (गायन्तः विप्र-वचसः) सामगान करणारे व ज्ञानाचें भाषण करणारे आम्हीं (आ चकृम) बोलावीत आहों. ॥ २ ॥

१५८३ यो विश्वा दयते वसु होता मन्द्रो जनानाम् ।
मधोर्न पात्रा प्रथमान्यस्मै प्र स्तोमा यन्त्वग्नये ॥ १ ॥ (ऋ. ८।१०३।६)

१५८४ अश्वं न गीर्भी रथ्य॑सुदानवो मर्मृज्यन्ते देवयवः ।
उभे तोके तनये दस्म विश्पते पर्षि राधो मघोनाम् ॥ २ ॥ ५ (पु) ॥
[धा० १९ । उ० १ । स्व० ९] (ऋ. ८।१०३।७)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

१५८५ इमं मे वरुण श्रुधी हवमद्या च मृडय । त्वामवस्युरा चके ॥ १ ॥ ६ (व) ॥
[धा० ९ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. १।२५।१९)

१५८६ कया त्वं न ऊत्याभि प्र मन्दसे वृषन् । कया स्तोतृभ्य आ भर ॥ १ ॥ ७ (य) ॥
[धा० २ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ८।९३।१९)

१५८७ इन्द्रमिद्देवतातय इन्द्रं प्रयत्यध्वरे ।
इन्द्र॑समीके वनिनो हवामह इन्द्रं धनस्य सातये ॥ १ ॥ (ऋ. ८।३।५)

[१५८३] (होता मन्द्रः यः) यज्ञामध्यें देवांना बोलावणारा व आनंद देणारा जो अग्नि आहे तो (विश्वा वसु) सर्व प्रकारचीं धनें (जनानां दयते) लोकांना देत असतो. (अस्मै अग्नये) या अग्निला (मधोः न) सोमरसाचीं (प्रथमानि) मुख्य (पात्रा) पात्रें व (स्तोमाः प्रयन्तु) स्तोत्रें प्राप्त होवोत. ॥ १ ॥

[१५८४] (दस्म विश्पते) हे सुन्दर प्रजापालक अग्ने ! तुझी (सुदानवः देवयवः) उत्तम दान देणारे व देवत्व प्राप्त करणारे यजमान (रथ्यं अश्वं न) रथाला जोडावयाच्या घोड्याप्रमाणें (गीर्भिः मर्मृज्यन्ते) आपल्या वाणीनें स्तुति करतात. असा तूं यज्ञ करणाऱ्यांच्या (तनये तोके उभे) पुत्र पौत्र या दोघांनाहि (मघोनां राधः पर्षि) धनवानांकडे असतें तें धन दे. ॥ २ ॥

रथाला जोडणाऱ्या घोड्याचा उत्साह वाढवण्यासाठीं रथाचें संचालक त्याची स्तुति करतात, त्याप्रमाणें यज्ञ करणारे लोक अग्निची स्तुति करतात.

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[१५८५] हे (वरुण) वरुणा ! (मे इमं हवं श्रुधि) माझी ही प्रार्थना ऐक (अद्य मृडय च) व आज आम्हांला सुखी कर. (अवस्युः त्वां आ चके) आमचें रक्षण व्हावें असें इच्छिणारे आम्ही तुझी स्तुति करीत आहों. । १॥

[१५८६] हे (वृषन्) इष्ट फल देणाऱ्या इन्द्रा ! (कया ऊत्या) कोणत्या रक्षणसामर्थ्यानें (त्वं नः अभि प्रमन्दसे) तूं आम्हांला अधिक आनन्द देत असतोस ? (कया स्तोतृभ्यः आभर) कोणत्या रक्षणशक्तिनें तूं स्तोत्यांना भरपूर अन्न देत असतोस ? ॥ १ ॥

[१५८७] (देवतातये) यज्ञासाठीं (इन्द्रं इत् हवामहे) इन्द्रालाच आम्ही बोलावतों. (अध्वरे प्रयति इन्द्रं) अहिंसामय यज्ञ झाला असतां आम्हीं इन्द्राला बोलावतों. (समीके वनिनः इन्द्रं) युद्धामध्यें भक्तलोक (इन्द्रं) इन्द्रालाच बोलावतात आणि (धनस्य सातये) धनाचें दान करण्याच्यावेळीं (इन्द्रं) इन्द्रालाच बोलावतों. ॥ १ ॥

१५८८ इन्द्रो मह्ना रोदसी पप्रथच्छव इन्द्रः सूर्यमरोचयत् ।
इन्द्रे ह विश्वा भुवनानि येमिर इन्द्रे स्वानास इन्दवः ॥ २ ॥ ८ (वा) ॥
[धा० १५ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ८।३।६)

१५८९ विश्वकर्मन्हविषा वावृधानः स्वयं यजस्व तन्व३ं स्वा हि ते ।
मुह्यन्त्वन्ये अभितो जनास इहास्माकं मघवा सूरिरस्तु ॥ १ ॥ ९ (ला) ॥
[धा० ९ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. १०।८१।६)

१५९० अया रुचा हरिण्या पुनानो विश्वा द्वेषांसि तरति सयुग्वभिः सूरो न सयुग्वभिः ।
धारा पृष्ठस्य रोचते पुनानो अरुषो हरिः ।
विश्वा यद्रूपा परियास्यृक्वभिः सप्तास्येभिर्ऋक्वभिः ॥ १ ॥ (ऋ. ९।१११।१)

१५९१ प्राचीमनु प्रदिशं याति चेकितत्सं रश्मिभिर्यतते दर्शतो रथो दैव्यो दर्शतो रथः ।
अग्मन्नुक्थानि पौंस्येन्द्रं जैत्राय हर्षयन् ।
वज्रश्च यद्भवथो अनपच्युता समत्स्वनपच्युता ॥ २ ॥ (ऋ. ९।१११।३)

[१५८८] (इन्द्रः शवः मह्ना) इन्द्रानें आपल्या शक्तिच्या महात्म्यानें (रोदसी पप्रथत्) द्युलोक व पृथिवीला विस्तृत केलें. (इन्द्रः सूर्यं अरोचयत्) इन्द्रानें सूर्याला प्रकाशित केलें आहे. (इन्द्रे ह विश्वा भुवनानि) इन्द्रामध्यें सर्व भुवनें (येमिरे) राहिलीं आहेत. (स्वानासः इन्दवः इन्द्रे) गाळलेले सोमरस इन्द्राला दिले जातात. ॥ २ ॥

[१५८९] हे (विश्वकर्मन्) सर्व कर्मे करणाऱ्या ईश्वरा ! (हविषा वावृधानः) हविनें वाढणारा (स्वयं) स्वतः तूंच (तन्वं स्वा हि ते यजस्व) आपल्या शरीराला स्वतः करावयाच्या विश्वरूपी यज्ञामध्यें अर्पण कर. (अन्ये जनासः अभितः मुह्यन्तु) अन्य यज्ञ न करणारे चारहि दिशांना मोहित होऊन पडोत. (इह) येथें हा (मघवा) धनवान् इन्द्र आणि (सूरिः अस्माकं अस्तु) सर्व ज्ञानी आमचा होऊन राहोत. ॥ १ ॥

[१५९०] (पुनानः) गाळला जाणारा सोम (हरिण्या अया रुचा) हिरव्या रंगाच्या तेजानें (सूरः सयुग्वभिः न) सूर्य आपल्या किरणांनीं अंधाराचा नाश करतो त्याप्रमाणें (विश्वा द्वेषांसि तरति) सर्व शत्रूंचा नाश करतो. (पुनानः हरिः अरुषः) पवित्र होणारा हिरवा सोम चमकतो आणि (पृष्ठस्य धारा रोचते) गाळणीच्या पाठीवर याची धाराही चमकत असते. हे सोम ! तूं (सप्तास्येभिः) सात मुखांनीं, तेजांनीं (ऋक्वभिः) व किरणांनीं (विश्वा रूपा परियासि) सर्व तेजस्वी पदार्थांपेक्षां श्रेष्ठ होऊन जातोस. ॥ १ ॥

[१५९१] (चेकितत् प्राचीं प्रदिशं अनुयाति) सर्वज्ञानी सोम पूर्व दिशेला जातो, तेव्हां (दैव्यः दर्शतः रथः रश्मिभिः सं यतते) दिव्य सुंदर असा तुझा रथ किरणांनीं तेजस्वी झालेला दिसतो. (पौंस्या उक्थानि अग्मन्) पौरुषाचें वर्णन करणारीं स्तोत्रें इन्द्राला प्राप्त होतात. स्तोते त्यांनीं (जैत्राय इन्द्रं हर्षयन्) विजयासाठीं इन्द्राला प्रसन्न करतात. (वज्रः च) वज्रही इन्द्राला प्राप्त होतें. हे सोमा व इन्द्रा ! (यत् समत्सु अनपच्युता भवथः) तेव्हां तुम्ही दोघे युद्धांमध्यें पराभूत होत नाहीं. ॥ २ ॥

१५९२ त्वꣳह त्यत्पणीनां विदो वसु सं मातृभिर्मर्जयसि स्व आ दम ऋतस्य धीतिभिर्दमे ।
परावतो न साम तद्यत्रा रणन्ति धीतयः ।
त्रिधातुभिररुषीभिर्वयो दधे रोचमानो वयो दधे　　॥ ३ ॥ १० (के) ॥
[धा० ४१ । उ० ९ । स्व० ७] (ऋ. ९।१११।२)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

१५९३ उत नो गोषणिं धियमश्वसां वाजसामुत । नृवत्कृणुह्यूतये　　॥ १ ॥ ११ (यौ) ॥
[धा० २ । उ० नास्ति । स्व० नास्ति] (ऋ. ६।५३।१०)

१५९४ शशमानस्य वा नरः स्वेदस्य सत्यशवसः । विदा कामस्य वेनतः ॥ १ ॥ १२ (व) ॥
[धा० ५ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. १।८६।८)

१५९५ उप नः सूनवो गिरः शृण्वन्त्वमृतस्य ये । सुमृडीका भवन्तु नः ॥ १ ॥ १३ (रौ) ॥
[धा० ३ । उ० नास्ति । स्व० नास्ति] (ऋ. ६।५२।९)

१५९६ प्र वां महि द्यवी अभ्युपस्तुतिं भरामहे । शुची उप प्रशस्तये ॥ १ ॥　(ऋ. ४।५६।५)

१५९७ पुनाने तन्वा मिथः स्वेन दक्षेण राजथः । ऊह्याथे सनादृतम् ॥ २ ॥　(ऋ. ४।५६।६)

[१५९२] हे सोमा ! (त्वं ह) तूं (पणीनां त्यत् वसु) पणींकडच्या त्या धनाला (विदः) प्राप्त केलेंस. (ऋतस्य धीतिभिः मातृभिः) यज्ञाच्या आधारभूत जलांनीं (स्वे दमे सं मर्जयसि) आपल्या यज्ञाच्या स्थानामध्यें उत्तम प्रकारें तूं शुद्ध होत आहेस. (परावतः न साम तत्) दूरून तें सामगान ऐकूं येतें, (यत्र धीतयः रणन्ति) जेथें यज्ञ करणारे यजमान आनंदित झालेले दिसतात. (त्रिधातुभिः अरुषीभिः) तीन ठिकाणीं प्रकाशणाऱ्या तेजांनीं (रोचमानः) चमकणारा सोम (वयः दधे वयः दधे) अन्न देतो. खरोखरच अन्न देतो. ॥ ३ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[१५९३] हे पूषा देवता ! (उत) आणि (गो-षणिं अश्व-सां वाजसां) गाई, घोडे व अन्न देणाऱ्या आणि नृवत्) पुत्र अथवा सेवक देणाऱ्या (धियं) बुद्धिला (नः ऊतये कृणुहि) आमच्या संरक्षणासाठीं उपयोगी पडेल अशी कर. ॥ १ ॥

[१५९४] हे (सत्य-शवसः नरः) सत्य बलानें युक्त वीर मरुत हो ! (शशमानस्य स्वेदस्य) तुमची स्तुति करीत असतां झालेल्या घामानें भरलेल्यांना व (वेनतः) फलाची इच्छा करणाऱ्यांना (कामस्य विदः) इष्ट फल द्या. ॥ १ ॥

[१५९५] (ये अमृतस्य सूनवः) जे अमर प्रजापतिचे पुत्र आहेत ते (नः गिरः उप शृण्वन्तु) आमच्या स्तुति ऐकोत व (नः सुमृडीकाः भवन्तु) आम्हांला उत्तम सुख देणारे होवोत. ॥ १ ॥

[१५९६] हे (शुची) पवित्र द्यावापृथिवीनों ! (प्रशस्तये उप) स्तुति करण्यासाठीं तुमच्याजवळ येऊन (द्यवी वां) तेजस्वी अशा तुम्हां दोघांना (उपस्तुतिं महि अभि भरामहे) स्तुति व स्तोत्र मोठ्या प्रमाणामध्यें अर्पण करीत आहों. ॥ १ ॥

[१५९७] हे देवींनों ! (तन्वा दक्षेण) आपल्या शरीरानें व बलानें तुम्ही (मिथः पुनाने) यज्ञ व यजमान या दोघांनाहि शुद्ध करीत (राजथः) प्रकाशित होत आहां व (सनात् ऋतं ऊह्याथे) नेहेमींच यज्ञ सिद्ध करीत आहां. ॥ २ ॥

१५९८ मही मित्रस्य साधथस्तरन्ती पिप्रती ऋतम् । परि यज्ञं निषेदथुः ॥ ३ ॥ १४ (का) ॥
[धा० ६ । उ० १ । स्व० २] (ऋ. ४।५६।७)

१५९९ अयमु ते समतसि कपोत इव गर्भधिम् । वचस्तच्चिन्न ओहसे ॥ १ ॥ (ऋ. १।३०।४)

१६०० स्तोत्रꣳ राधानां पते गिर्वाहो वीर यस्य ते । विभूतिरस्तु सूनृता ॥२॥ (ऋ. १।३०।५)

१६०१ ऊर्ध्वस्तिष्ठा न ऊतयेऽस्मिन्वाजे शतक्रतो । समन्येषु ब्रवावहै ॥ ३ ॥ १५ (ह) ॥
[धा० १६ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. १।३०।६)

१६०२ गाव उप वदावटे मही यज्ञस्य रप्सुदा । उभा कर्णा हिरण्यया ॥ १ ॥ (ऋ. ८।७२।१२)

१६०३ अभ्यारमिदद्रयो निषिक्तं पुष्करे मधु । अवटस्य विसर्जने ॥ २ ॥ (ऋ. ८।७२।११)

१६०४ सिञ्चन्ति नमसावटमुच्चाचक्रं परिज्मानम् । नीचीनबारमक्षितम् ॥ ३ ॥ १६ (रा) ॥
[धा० ८ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ८।७२।१०)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[१५९८] (मही) मोठ्या द्यावापृथिवीनों ! तुम्ही (मित्रस्य साधथः) तुमचा मित्र जो तुमची स्तुति करीत आहे त्याला जें पाहिजे तें तुम्ही देतां. (ऋतं तरन्ती) यज्ञाचें रक्षण करतां व (पिप्रती) यज्ञ पूर्ण करतां आणि (यज्ञं परि निषेदथुः) यज्ञाला आश्रय देत आहां. ॥ ३ ॥

[१५९९] हे इन्द्रा ! (अयं कपोतः) हा कबूतर जसा (गर्भधिं इव) आपल्या कबूतरीजवळ जातो, त्याप्रमाणें (ते समतसि) तो तुझ्याजवळ येतो, यासाठीं (नः तत् वचः) आमचें तें भाषण (ओहसे) विचारपूर्वक तूं ऐकतोस. ॥१॥

[१६००] हे (राधानां पते) धनांच्या अधिपते व (गिर्वाहः) स्तुतिला योग्य (वीर) शूर इन्द्रा ! (यस्य ते स्तोत्रं) ज्या तुझें हें स्तोत्र आहे त्या तुझी (विभूतिः सुनृता अस्तु) वैभवसंपन्न सत्यस्वरूप वाणी सत्य होवो. ॥२॥

[१६०१] हे (शतक्रतो) शेंकडों कार्यें करणाऱ्या इन्द्रा ! (अस्मिन् वाजे) या युद्धामध्यें (नः ऊतये) आमच्या संरक्षणासाठीं तूं (ऊर्ध्वः तिष्ठ) उभा रहा. आम्हीं तुझ्याशीं (अन्येषु) अन्य कार्याविषयीं (सं ब्रवावहै) मिळून विचार करूं. ॥ ३ ॥

[१६०२] हे (गावः) गाईनों ! (अवटे उप वद) यज्ञाच्या ठिकाणीं या व आपला शब्द करा. तुम्ही (मही यज्ञस्य रप्सुदा) मोठें यज्ञाचें फल देणाऱ्या आहांत. (उभा कर्णा हिरण्यया) तुमचे दोनही कान सुवर्णाच्या भूषणांनीं अलंकृत झालेले आहेत. ॥ १ ॥

[१६०३] (अद्रयः) आवरणीय अध्वर्यु (अभ्यारमित्) यज्ञाजवळ आले आहेत. (निषिक्तं मधु) शिल्लक राहिलेल्या या मधुर सोमरसाला (अवटस्य विसर्जने) महावीराच्या विसर्जन करण्याच्यावेळीं (पुष्करे) कलशामध्यें ठेवीत आहेत. ॥ २ ॥

[१६०४] (उच्चा-चक्रं) ज्याच्या वरच्या भागामध्यें चक्र आहे (परिज्मानं नीचीनबारं अक्षितम्) व चहूंकडून खालीं वांकलेल्या खालच्या द्वाराजवळ जें बारीक झालेलें नाहीं, अशा (अवटं नमसा सिंचन्ति) महावीराला नमस्कार करून यज्ञ करणारे हवन करीत आहेत. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४]

१६०५ मा भेम मा श्रमिष्मोग्रस्य सख्ये तव ।
महत्ते वृष्णो अभिचक्ष्यं कृतं पश्येम तुर्वशं यदुम् ॥ १ ॥ (ऋ. ८।४।७)

१६०६ सव्यामनु स्फिग्यं वावसे वृषा न दानो अस्य रोषति ।
मध्वा संपृक्ताः सारघेण धेनवस्तूयमेहि द्रवा पिब ॥ २ ॥ १७ (वी) ॥
[धा० १० । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ८।४।८)

१६०७ इमा उ त्वा पुरूवसो गिरो वर्धन्तु या मम ।
पावकवर्णाः शुचयो विपश्चितोऽभि स्तोमैरनूषत ॥ १ ॥ (ऋ. ८।३।३)

१६०८ अयं सहस्रमृषिभिः सहस्कृतः समुद्र इव पप्रथे ।
सत्यः सो अस्य महिमा गृणे शवो यज्ञेषु विप्रराज्ये ॥ २ ॥ १८ (रि) ॥
[धा० १८ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ८।३।४)

१६०९ यस्यायं विश्व आर्यो दासः शेवधिपा अरिः ।
तिरश्चिदर्ये रुशमे पवीरवि तुभ्येत्सो अज्यते रयिः ॥ १ ॥ (ऋ. ८।५१।९)

---

[४] चतुर्थः खण्डः ।

[१६०५] हे इन्द्रा ! (उग्रस्य तव सख्ये मा भेम) उग्रवीर अशा तुझी मित्रता झाल्यावर आम्ही कोणालाहि भिणार नाहीं (मा श्रमिष्म) आम्ही थकणारही नाहीं. (वृष्णः ते) उपासकांच्या कामना तृप्त करणाऱ्या तुझी (महत् कृतं अभि चक्ष्यं) महाकृत्यें वर्णनीय अशीं झालीं आहेत. (तुर्वशं यदुं पश्येम) तुर्वश व यदुला आनंदित अवस्थें-मध्यें पाहूं. ॥ १ ॥

[१६०६] (वृषा) बलवान् इन्द्रा ! तूं (सव्यां स्फिग्यं अनु) आपल्या उजव्या बाजूच्या भागानें (वावसे) सर्वांना आधार देत आहेस (दानः अस्य न रोषति) कापणारा शत्रु याला कष्ट देऊं शकत नाहीं. (सारघेण संपृक्ताः धेनवः) मधमाशांच्या मधासारख्या मधुर दुधानें युक्त असलेल्या गाईंप्रमाणें आनंददायक सोमा ! (तूयं एहि) तूं येथें लवकर ये. (द्रव) यज्ञामध्यें लवकर पोंच व हे इन्द्रा ! (पिब) सोम पी. ॥ २ ॥

[१६०७] हे (पुरू-वसो) पुष्कळ धनवान् इन्द्रा ! (मम याः इमाः गिरः) माझ्या या ज्या स्तुति आहेत. त्या (त्वा वर्धन्तु) तुला वाढवोत. (पावक-वर्णाः शुचयः विपश्चितः) अग्निसारखे तेजस्वी शुद्ध ज्ञानी (स्तोमैः अभ्यनूषत) स्तोत्रांनीं तुझी स्तुति करीत आहेत. ॥ १ ॥

[१६०८] (अयं) हा इन्द्र (सहस्रं ऋषिभिः सहस्कृतः) सहस्रावधि ऋषींनीं बलवान् म्हणून प्रसिद्ध केला आहे तो (समुद्रः इव पप्रथे) समुद्राप्रमाणें विस्तृत झाला आहे. (अस्य सत्यः सः महिमा शवः) या इन्द्राचा तो सत्य महिमा व तें बल प्रसिद्ध आहे. (यज्ञेषु विप्रराज्ये गृणे) यज्ञांतील ब्राह्मणांच्या राज्यामध्यें त्याची स्तुति होत आहे. ॥ २ ॥

[१६०९] (विश्वः अरिः आर्यः अयं) सर्व लोकांचा स्वामी आणि श्रेष्ठ असा हा इन्द्रही (दासः अस्य शेवधिपा) दासासारखा ज्या यज्ञाच्या खजिन्याचें संरक्षण करतो, (सः) तो यज्ञ (अर्ये रुशमे पवीरवि तिरः चित्) अर्य, रुशम आणि पवि यांमध्यें गुप्त राहूनही (तुभ्या इत् अज्यते) तुलाच हवि प्रदान करतो. ॥ १ ॥

१६१० तुरण्यवो मधुमन्तं घृतश्चुतं विप्रासो अर्कमानृचुः ।
अस्मे रयिः पप्रथे वृष्ण्यं शवोऽस्मे स्वानास इन्दवः ॥ २ ॥ १९ (त) ॥
[धा० १४ । उ० १ । स्व० १] (ऋ. ८।६१।१०)

१६११ गोमन्न इन्दो अश्ववत्सुतः सुदक्ष धनिव । शुचिं च वर्णमधि गोषु धारय ॥ १ ॥
(ऋ. ९।१०५।४)

१६१२ स नो हरीणां पत इन्दो देव प्सरस्तमः । सखेव सख्ये नर्यो रुचे भव ॥ २ ॥
(ऋ. ९।१०५।५)

१६१३ सनेमि त्वमस्मदा अदेवं कं चिदत्रिणम् ।
साह्वां इन्दो परि बाधो अप द्वयुम् ॥ ३ ॥ २० (ल) ॥
[धा० ९ । उ०नास्ति । स्व० १४] (ऋ. ९।१०५।६)

१६१४ अञ्जते व्यञ्जते समञ्जते क्रतुं रिहन्ति मध्वाभ्यञ्जते ।
सिन्धोरुच्छ्वासे पतयन्तमुक्षणं हिरण्यपावाः पशुमप्सु गृभ्णते ॥ १ ॥ (ऋ. ९।८६।४३)

[१६१०] (तुरण्यवो विप्रासः) याग करण्यांत त्वरा करणारे ज्ञानी (मधुमन्तं घृतश्चुतं) मधुर दूध आविच्या व तुपाच्या आहुति दिल्या जात आहेत अशा (अर्कं आनृचुः) पूज्य इन्द्राची पूजा करीत आहेत. (अस्मे रयिः पप्रथे) आमचे हविरूपी धन प्रसिद्ध होवो. (वृष्ण्यं शवः) सोम देणारें बल प्रसिद्ध होवो व (अस्मे स्वानासः इन्दवः) आमचे शुद्ध केलेले सोमरस प्रसिद्ध होवोत. ॥ २ ॥

[१६११] हे (इन्दो) सोमा ! (नः गोमत् अश्ववत्) आम्हांला गाई व घोड्यांनीं युक्त असलेलें धन (धनिव) दे. हे (सु-दक्ष) उत्तम बलसंपन्न सोमा ! (सुतः) रस काढल्यानंतर (गोषु शुचिं वर्णं च धारय) गाईंच्या दुधानें शुद्ध वर्णाचें धारण कर. ॥ १ ॥

गाईचें दूध सोमामध्यें मिसळा.

[१६१२] (हरीणां पते देव इन्दो) हे हिरव्या रंगाच्या वनस्पतींच्या स्वामी सोम देवा ! (प्सरस्तमः नर्यः सः) अत्यंत तेजस्वी, मानवांचें हित करणारा तो तूं (नः रुचे भव) आमचें तेज वाढवणारा हो. (सखा सख्ये इव) ज्याप्रमाणें एक मित्र दुसऱ्या मित्राचें सहाय्य करतो. ॥ २ ॥

[१६१३] हे सोमा ! (त्वं सनेमि कं अस्मत् आ) तूं प्राचीनकालापासून चालत आलेलें सुख आमच्याशीं प्रकट कर. हे (साह्वान् इन्दो) शत्रूंचा पराभव करणाऱ्या सोमा ! (बाधः परि) बाधा करणाऱ्या शत्रूंचा नाश कर. तसेंच (द्वयुं अप) दुटप्पी वर्तन करणाऱ्या शत्रूला दूर कर आणि (अ-देवं अत्रिणं चित्) दिव्यगुणांनीं रहित आणि खादाड शत्रूलाही मार. ॥ ३ ॥

[१६१४] सोमाला ऋत्विजलोक (अञ्जते) गाईच्या दुधाशीं मिसळतात, (व्यञ्जते) अनेक रीतिंनी मिसळतात. (समञ्जते) उत्तम रीतिनें मिळवितात (क्रतुं रिहन्ति) या यज्ञरूपी सोमाचा स्वाद घेतात. (मध्वा अभ्यञ्जते) मधुर दुधाशीं मिसळतात, (सिंधोः उच्छ्वासे) पाण्याच्या उच्च भागावरून (पतयन्तं उक्षणं) पडणाऱ्या सोमाला व (पशुं) द्रष्टया सोमाला (हिरण्यपावाः अप्सु गृभ्णते) सुवर्णानें पाण्यांत पवित्र करून पुनः पाण्यांत मिसळतात. ॥ १ ॥

१६१५ विपश्चिते पवमानाय गायत मही न धारात्यन्धो अर्षति ।
अहिर्न जूर्णामति सर्पति त्वचमत्यो न क्रीडन्नसरद्वृषा हरिः ॥ २ ॥ (ऋ. ९।८६।४४)

१६१६ अग्रेगो राजाप्यस्तविष्यते विमानो अह्नां भुवनेष्वर्पितः ।
हरिर्घृतस्नुः सुदृशीको अर्णवो ज्योतीरथः पवते राय ओक्यः ॥ ३ ॥ २१ (ले) ॥
[धा० ३९ । उ० नास्ति । स्व ७] (ऋ. ९।८६।४५)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

॥ इति सप्तमप्रपाठकस्य तृतीयोऽर्धः ॥ ३ ॥ सप्तमः प्रपाठकश्च समाप्तः ॥ ७ ॥

॥ इति षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

[१६१५] हे ऋत्विजांनो ! (विपश्चिते पवमानाय गायत) ज्ञानी व गाळल्या जाणाऱ्या सोमाची स्तुति गात रहा. (माहि धारा न अन्धः अत्यर्षति) तो सोम मोठ्या धारेसारख्या प्रवाहानें अन्न देत आहे. (अहिः न) सर्पाप्रमाणें (जूर्णां त्वचं आति सर्पति) जीर्ण त्वचा तो त्यागतो. (वृषा हरिः) बलवान् व हिरव्या रंगाचा तो सोमरस (अत्यः न) घोड्याप्रमाणें (क्रीडन् असरत्) क्रीडा करीत कलशामध्यें उतरत आहे. ॥ २ ॥

[१६१६] (अग्रेगः राजा) प्रगति करणारा राजा सोम (आप्य-स्तविष्यते) जलामध्यें मिसळला जात असतां स्तविला जात आहे. (अह्नां विमानः) दिवसांचें मापन करणारा (भुवनेषु अर्पितः) जलामध्यें ठेवला आहे. (हरिः घृतस्नुः) हिरव्या रंगाचा व पाण्यांत मिसळलेला (सु-दृशीकः अर्णवः) सुन्दर दर्शनीय व पाण्यांत राहणारा (ज्योति-रथः) तेजस्वी रथ ज्याचा आहे असा (रायः ओक्यः) हा सोम धनाचें घर असल्यासारखा आहे. ॥ ३ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति षोडशोऽध्यायः ॥

षोडश अध्याय

इन्द्र-देवता

या सोळाव्या अध्यायामध्यें अनेक देवतांची स्तुति आलेली आहे. त्यांत इन्द्र देवतेची स्तुति बरीच मोठी आहे. ती अशी आहे—

१ इन्द्रः सुतस्य विष्णवि मदे अस्य वृष्ण्यं शवः वावृधे [१५७४]- इन्द्र सोमरस प्याल्यानंतर विशेष आनंद प्राप्त करून या यजमानाचें वीर्य बल वाढवतो.

२ आयवः अद्य पूर्वथा अस्य तं महिमानं अनुष्टुवन्ति [१५७४]- मनुष्य आज पूर्वीप्रमाणें या इन्द्राच्या त्या महिम्याचें वर्णन करीत आहेत.

३ हे शचीपते इन्द्र ! विश्वाभिः ऊतिभिः सुशग्धि [१५७९]- हे शक्तिमान् इन्द्रा ! सर्व संरक्षणाच्या साधनांनीं तूं समर्थ झाला आहेस.

४ हे शूर ! वसुविदं यशसं, भगं न, त्वा अनु चरामसि [१५७९]- हे शूर इन्द्रा ! धनानें युक्त यशस्वी व भाग्यवानाप्रमाणें असणाऱ्या तुला अनुकूल होऊनच आम्हीं चालत आहों.

५ अश्वस्य पौरः गवां पुरुकृत् असि [१५८०]- इन्द्र घोड्यांना पुष्ट करणारा व गाईंचें पोषण करणारा आहे.

६ हे इन्द्र ! त्वे दानं नकिः परमर्धिषत् । यत् यामि

तत् आभर [१५८०]- हे इन्द्रा ! तुझें दान कोणीहि नष्ट करूं शकत नाहीं. जें मी मागतों तें तूं मला भरपूर दे.

७ हे देव ! हिरण्ययः उत्सः [१५८०]- हे इन्द्र देवा ! जसा सोन्याचा हौद असावा तसा तूं संपत्तिनें भरलेला आहेस.

८ वसुत्तये एहि [१५८०]- धन देण्यासाठीं तूं ये.

९ चेरवे भगं विदाः [१५८०]- सदाचरण करणाऱ्याला भाग्य दे.

१० हे मघवन् ! गविष्टये वावृषस्व [१५८०]- हे धनवान् इन्द्रा ! गाईंची इच्छा करणाऱ्या मला गाई दे.

११ अश्वं इष्टये उत् [१५८०]- घोड्यांची इच्छा करणाऱ्याला घोडे दे .

१२ त्वं पुरू सहस्राणि शतानि च यूथा दानाय मंहसे [१५८२]- तूं अनेक अर्थात् हजारों व शेंकडों गाईंचे कळप दान करण्यासाठीं जवळ बाळगीत आहेस.

१३ हे वृषन् ! कया ऊत्या त्वं नः अभि प्रमन्दसे [१५८६]- हे बलवान् इन्द्रा ! तूं कोणत्या संरक्षण सामर्थ्यानें आम्हांला अधिक आनन्द देतोस बरें ?

१४ इन्द्रः मह्ना रोदसी पप्रथत् [१५८८]- इन्द्र आपल्या अतुल शक्तीनें द्युलोक व पृथिवी यांना विस्तृत करतो.

१५ इन्द्रः सूर्यं अरोचयत् [१५८८]- इन्द्रानें सूर्याला प्रकाशित केलें आहे.

१६ इन्द्रे विश्वा भुवनानि येमिरे [१५८८]- इन्द्रामध्यें सर्व भूतें राहिलीं आहेत.

१७ हे राधानां पते ! गिर्वणः वीर ! यस्य ते स्तोत्रं विभूतिः सूनृता अस्तु [१६००]- हे धनांच्या अधिपते ! हे स्तुत्य वीरा इन्द्रा ! ज्या तुझें हें स्तोत्र आम्ही गात आहों, त्या तुझी ही विभूती खरी होवो.

१८ हे शतक्रतो ! अस्मिन्वाजे नः ऊतये ऊर्ध्वः तिष्ठ [१६०१]- हे शेंकडों कर्मे करणाऱ्या इन्द्रा ! या युद्धामध्यें आमचें रक्षण करण्यासाठीं तूं उठून तयार होऊन उभा रहा.

१९ उग्रस्य तव सख्ये मा भेम, मा श्रमिष्म [१६०५] - तुझ्यासारख्या शूराच्या सख्यामध्यें आम्हीं भीत नाहीं व कार्य करून थकणारही नाहीं.

२० वृष्णः ते महत् कृतं अभिचक्ष्यं [१६०५]- बलवान् अशा तूं मोठें प्रशंसनीय कार्य केलें आहे.

२१ दानः अस्य न रोहति [१६०६]- कापणारा शस्त्र याला कष्ट देऊं शकत नाहीं.

२२ पावकवर्णाः शुचयः विपश्चितः स्तोमैः अभ्यनूषत [१६०७]- अग्निप्रमाणें तेजस्वी असे शुद्ध ज्ञानी स्तोत्रांनीं तुझी स्तुति करतात.

२३ अयं सहस्रं ऋषिभिः सहस्कृतः समुद्रः इव पप्रथे [१६०८]- हा सहस्रावधि ऋषींनीं बलवान् म्हणून प्रशंसित केलेला इन्द्र समुद्राप्रमाणें मोठा आहे.

२४ तुरण्यवो विप्रासः अर्कं आनृचुः [१६१०]- त्वरा करणारे ज्ञानी इन्द्राची अर्चना करीत आहेत.

याप्रमाणें इन्द्राचें येथें वर्णन केलेलें आहे. इन्द्र बलवान् आहे. त्याचा महिमा ज्ञानी विद्वान् वर्णन करीत असतात. सर्व संरक्षणाचीं साधनें त्याच्याजवळ तयार आहेत. तो इन्द्र सर्व प्रकारचीं धनें आपणाजवळ ठेवतो. तो यशस्वी व भाग्यवान् आहे. घोडे व गाई यांचें तो उत्तम पालन करतो. जसा एक हौद सोन्यानें भरलेला असावा तसें धन या इन्द्राजवळ आहे. सदाचारी माणसाला तो धन देतो. हजारों गाई व घोडे त्याच्याजवळ देण्यासाठीं आहेत. त्याचें शौर्य या द्युलोकांत व भूलोकांत चहूंकडे पसरलेलें आहे. त्यानें सूर्याला तेजस्वी करून आकाशांत ठेवलें आहे. सर्व भूतें त्याच्या आधारानें राहिलीं आहेत. सर्व युद्धांमध्यें आमचें रक्षण करण्यासाठीं तयार होऊन राहो व चारही बाजूंनीं आमचें संरक्षण करो. याच्या संरक्षणामध्यें आम्ही असलों तर आम्हांला कोणापासूनही भय होणार नाहीं असा हा इन्द्र आहे.

इन्द्र व अग्नि

इन्द्र व अग्नि यांचें असें वर्णन आलें आहे—

१ इन्द्राग्नी दासपत्नीः नवतिं पुरः एकेन कर्मणा साकं अधूनुत [१५७६]- इन्द्र व अग्नि यांनीं दासाची नव्वद नगरें एका आक्रमणानें हालवून सोडलीं.

२ इन्द्राग्नी ! वां तविषाणि प्रयांसि सधस्थानि [१५७८]- हे इन्द्र व अग्नि हो ! तुमचीं बलें व अन्नें एकत्र असतात. अर्थात् तुम्ही मिळून काय करावयाचें तें कार्य करतां.

३ अप्तूर्यं युवोः हितम् [१५७८]- शुभ कार्याला प्रेरणा देणारें तुमचें बल तुमच्यामध्यें राहिलें आहे.

दास लोकांचीं नव्वद नगरें एकाच हल्ल्यानें यांनीं हालवून सोडलीं असें यांचें युद्धकौशल्य आहे.

अग्नि

अग्निचें असें वर्णन या अध्यायामध्यें आलेलें आहे—

१ होता मन्द्रः यः विश्वा वसु जनानां दयते

[१५८३]- देवांना बोलावून आणणारा व आनंद वाढवणारा जो अग्नि आहे तो सर्व प्रकारचीं धनें लोकांना देतो.

२ दस्म विश्पते ! सुदानवः देवयुवः गीर्भिः मर्मृज्यन्ते, तनये तोके च मघोनां राधः पर्षि [१५८४]- हे सुन्दर प्रजापालक अग्ने ! उत्तम दान देणारे व देवत्व प्राप्त करणारे आपल्या वाणीनें तुझी स्तुति करतात. असा तूं पुत्र-पौत्रांना धनवानांकडे असतें तें धन देतोस.

अर्थात् अग्निची उपासना करणाऱ्यांना धन मिळतें. तें धन त्यांस अग्नि देतो.

सोम व इन्द्र

१ समत्सु अनपच्युता भवथः [१५९१]- तुम्ही दोघेही युद्धांमध्यें पराभूत होत नाहीं. असे हे दोघेही शूरवीर आहेत.

पूषा

१ गोषणिं अश्वसां वाजसां नृवत् धियं नः ऊतये कृणुहि [१५९३]- गाई देणाऱ्या, घोडे देणाऱ्या, अन्न देणाऱ्या व पुत्र देणाऱ्या बुद्धिला आमच्या संरक्षणाला उपयोगी पडेल अशी ती बुद्धि कर.

वरुण

१ हे वरुण ! मे इमं हवं श्रुधि। अद्य मृडय। अवस्युः त्वां आ चके [१५८५]- हे वरुणा ! ही माझी स्तुति ऐक, आज मला सुखी कर. आपलें रक्षण व्हावें अशी इच्छा करणारे आम्ही तुझी स्तुति करीत आहों.

वरुण लोकांना सुखी करतो व सुरक्षित ठेवतो.

मरुत्

१ हे सत्यशवसः नरः शशमानस्य स्वेदस्य वेनतः कामस्य विद [१५९४]- खऱ्या बलानें युक्त मरुत् वीर हो ! सैनिक हो ! तुमची स्तुति करीत असतां झालेल्या परिश्रमानें आलेल्या घामानें भरलेल्यांना व फलाची इच्छा करणाऱ्यांना इष्ट असलेलें फल द्या.

२ अमृतस्य सूनवः नः गिरः उपश्रृण्वन्तु, नः सुमृळीकाः भवन्तु [१५९५]- हे अमर प्रजापतिचे पुत्र मरुत्वीर आमची स्तुति ऐकोत व आम्हांला सुख देणारे ते होवोत.

मरुत् हे सैनिक वीर आहेत व ते सर्वांचें रक्षण शत्रूला नष्ट करून करीत असतात.

द्यावापृथिवी

१ हे शुची ! प्रशस्तये उप, द्यवी वां, उपस्तुतिं मंहि, अभि भरामहे [१५९६]- हे पवित्र द्यावापृथिवीनों ! तुमची स्तुति करण्यासाठीं तुमच्याजवळ येऊन तेजस्वी अशा तुम्हां दोघांना स्तुति स्तोत्रें मोठ्या प्रमाणामध्यें अर्पण करीत आहों.

येथें द्यु व पृथिवी या देवता " शुची " शुद्ध आहेत व " द्यवी " तेजस्वी आहेत, असें सांगितलें आहे.

२ तन्वा दक्षेण मिथः पुनाने राजथः। सनात् ऋतं ऊह्याथे [१५९७]- तुम्ही आपल्या शरीरानें व आपल्या सामर्थ्यानें दोघांचीहि - दोनही द्यौ व पृथिवी यांची - शुद्धि करून प्रकाशित होत असतां व नेहेमींच सत्याला - यज्ञाला - सिद्ध करीत आहां.

पृथिवीला द्युलोकाचें सहाय्य मिळतें व त्यामुळें पृथिवीवर शुद्धता राहते. पृथिवीवर जो सत्ययज्ञ चालला आहे, ज्यानें सर्व प्राण्यांचें कल्याण होतें, तो यज्ञ तुमच्या सत्य व्यवहारा-मुळेंच होत आहे. द्युलोक व पृथिवी यांचें हें सहकार्य असें दोघांच्याही हिताला कारणीभूत होत आहे.

३ मही ! मित्रस्य साधथः, ऋतं तरन्ती, पिप्रती, यज्ञं परि निषेदथुः [१५९८]- हे मोठ्या द्यावापृथिवीनों ! तुम्ही तुमच्या मित्राचें कार्य करीत आहां, सत्याचें संरक्षण करतां, कार्य पूर्ण करीत आहां व यज्ञाला सिद्ध करीत आहां.

तुमच्या अनुकूल वर्तन करणाऱ्याचें तुम्ही संवर्धन करीत असतां, सत्याचें तारण करून त्याचें पोषण करतां व विश्वयज्ञ पूर्ण करीत आहां. विश्वामध्यें एक प्रकारचा महायज्ञ चालूच आहे. तो यथायोग्यरीतिनें या द्यौ व पृथिवी करीत आहेत. याच यज्ञानें सर्वांचें कल्याण होत आहे.

गौ

१ हे गावः ! अवटे उपवद। मही यज्ञस्य रप्सुदा। उभा कर्णा हिरण्यया [१६०२]- अहो गाईंनों ! यज्ञाच्या ठिकाणीं या व आपला शब्द करा. तुम्हीं मोठें यज्ञाचें कार्य करणाऱ्या आहांत. तुमच्या दोनही कानांमध्यें सुवर्णाचीं भूषणें आहेत.

यज्ञ ज्याठिकाणीं होतो तेथें गाई असाव्या व त्यांचा हंबारव तेथें ऐकूं यावा. गाई आपल्या तुपानें व दुधानें यज्ञाला उत्तम रीतिनें सिद्ध करीत असतात. गाईचें तूप व दूध मिळालें नाहीं तर यज्ञ सिद्ध होणारच नाहीं.

२ सारघेण संपृक्ताः धेनवः [१६०६]- मधाप्रमाणें मधुर दूध गाई भरपूर देतात. यापासून उत्तम तूप मिळतें. तें (ह्य्यंगवीनं घृतं) कालच्या दुधापासून आज तयार केलेलें घृत आज हवनामध्यें आहुति घालण्यासाठीं वापरावें.

सोम

१ पुनानः हरिण्या अया रुचा, सूरः सयुग्वभिः न, विश्वा द्वेषांसि तरति [१५९०]- शुद्ध होणारा सोमरस आपल्या हिरव्या रंगाच्या तेजानें, सूर्य जसा आपल्या किरणांनीं अन्धकाराचा नाश करतो, त्याप्रमाणें सर्व द्वेष करणाऱ्या शत्रूंचा नाश करतो.

२ पुनानः हरिः अरुषः [१५९०]- स्वच्छ होणारा सोम चमकतो.

३ पणीनां वसु विदः [१५९२]- पणीकडचें-व्यापाऱ्यांकडचें धन तूं प्राप्त केलें आहेस.

४ ऋतस्य धीतिभिः मातृभिः स्वे दमे संमर्जयसि [१५९२]- यज्ञाला आधार देणाऱ्या पाण्यानें तूं आपल्या स्थानीं गाळला जातोस.

सोमरसामध्यें पाणी मिसळून नंतर तो गाळून शुद्ध केला जातो.

५ परावतः साम तत् [१५९२]- यज्ञामध्यें दुरून सामगान ऐकूं येतें. त्यावरून तेथें यज्ञ चालू आहे व सोमरस गाळला जात आहे हें समजून येतें.

६ हे इन्दो ! नः गोमत् अश्वमत् धानिव [१६११] -हे सोमा ! आम्हांला गाई व घोड्यांनीं युक्त असलेलें धन दे.

७ हे सुदक्ष ! सुतः गोषु शुचिं वर्ण धारय [१६११]- हे उत्तम बल वाढवणाऱ्या सोमा ! तुझा रस काढल्यानंतर गाईंच्या दुधाचा उत्तम रंग धारण कर. गाईंच्या दुधामध्यें मिसळला जा.

८ हे हरीणां पते देव इन्दो ! प्सरस्तमः नर्यः नः रुचे भव [१६१२]- हे हिरव्या रंगाच्या वनस्पतिच्या स्वामी सोमदेवा ! अत्यंत तेजस्वी व मानवांचें हित करणारा तूं आमचें तेज वाढव.

९ साह्वान्! बाधः परि, द्वयुं अप [१६१३]- हे शत्रूंचा पराभव करणाऱ्या सोमा ! बाधा करणाऱ्या शत्रूंचा नाश कर व दुटप्पी वर्तन करणाऱ्या दुष्टांना दूर कर.

१० अहिः न, जीर्णां त्वचं अति सर्पति [१६१५] - साप जसा आपली जीर्ण झालेली कातडी दूर करतो, त्याप्रमाणें सोम आपली त्वचा दूर करतो. सोम कुटल्यानंतर त्याची त्वचा दूर होते.

११ अग्रेगः राजा आप्यः स्तविष्यते [१६१६]- प्रगति करणारा राजा कर्तव्य करण्यानें प्रशंसिला जातो. राजा सोम पाण्यांत मिसळतांना स्तविला जातो.

१२ हरिः घृतस्नुः सुदृशीकः अर्णवः ज्योतीरथः रायः ओक्यः [१६१६]- हिरव्या रंगाचा पाण्यांत मिसळलेला सुंदर, दर्शनीय व तेजस्वी रथ ज्याचा आहे असा हा सोम जणूं काय तेजाचें घरच आहे असा तेजस्वी दिसत आहे.

सोमाचा रस काढल्यानंतर त्यांत पाणी मिसळतात व त्याला गाळतात, तेव्हां तो सोम चमकूं लागतो. सूर्य जसा आपल्या किरणांनीं चमकतो, तसा हा सोमरस चमकतो, ज्यावेळीं तो गाळला जातो, त्यावेळीं सामगायन सुरू असतें. तें मोठ्यानें होत असल्यामुळें दूरूनहि ऐकूं येतें.

नंतर त्यांत गाईचें दूध मिसळतात व त्यानंतर त्याचें हवन होऊन तो प्याला जातो. असें हें सोमाचें वर्णन आहे.

याप्रमाणें या इतक्या देवता या अध्यायांत वर्णिल्या आहेत.

सुभाषितें

१ आयवः अस्य महिमानं अनुष्टुवन्ति [१५७४] – मनुष्य या इन्द्राच्या महिम्याचें वर्णन करतात.

२ इषः आवृणे [१५७५]- अन्नप्राप्तिसाठीं मी प्रार्थना करतों.

३ हे इन्द्राग्नी ! दासपत्नीः नवतिं पुरः एकेन कर्मणा साकं अधूनुतम् [१५७६]-हे इन्द्र व अग्नि हो ! तुम्ही शत्रूंच्या नव्वद नगरी एका प्रयत्नानें एकाच - हल्ल्यानें हालवून सोडल्या.

४ धीतयः ऋतस्य पथ्या अनु अपसः परि उप प्रयन्ति [१५७७]- बुद्धिमान् याज्ञिक सत्याच्या मार्गानें यज्ञाजवळ येऊन बसतात.

५ वां तविषाणि प्रयांसि सधस्थानि, अप्तूर्यं युवोः हितम् [१५७८]- तुमचीं बलें व अन्नें एकत्र असतात. शुभ कर्माला प्रेरणा करणारें तुमचें बल आहे.

६ हे शचीपते इन्द्र ! विश्वाभिः ऊतिभिः सुशग्धि [१५७९]- हे शक्तिमान् इन्द्रा ! सर्व संरक्षणाच्या शक्तिनीं तूं युक्त असल्यामुळें तूं सामर्थ्यवान् आहेस.

७ वसुविदं यशसं भगं न त्वा अनु चरामसि [१५७९]- धनवान् व यशस्वी अशा तुला, भाग्यवानाला अनुसरतात त्याप्रमाणें, आम्ही अनुकूल होईल असें आचरण करतों.

८ अश्वस्य पौरः गवां पुरुकृत् असि [१५८०]- घोड्याला पुष्ट करणारा व गाईचें पोषण करणारा आहेस.

९ हिरण्ययः उत्सः [१५८०[- सोन्याचा हौद असावा तसा तूं आहेस.

१० त्वे दानं न किः परिमर्धिषत् [१५८१]- तुझें दान कोणीहि नष्ट करूं शकत नाहीं.

११ यत् यत् यामि तत् आभर [१५८१]- जें जें मी मागतों तें तूं मला दे.

१२ त्वं वसुत्तये एहि [१५८१]- तूं धन देण्या-साठीं ये.

१३ चेरवे भगं विदा [१५८१]- सदाचरण करणाऱ्याला भाग्य दे.

१४ हे मघवन्! गविष्टये उत् वावृषस्व [१५८१]- गाईंची इच्छा करणाऱ्याला गाई दे.

१५ हे इन्द्र! अश्वं इष्टये उत् [१५८१]- हे इन्द्रा! घोड्याची इच्छा करणाऱ्याला घोडे दे.

१६ त्वं पुरू सहस्राणि शतानि च यूथा दानाय मंहसे [१५८२]- तूं पुष्कळ हजारों आणि शेंकडों गाईंचे कळप दानासाठीं देतोस.

१७ पुरंदरं इन्द्रं अवसे गायन्तः विप्रवचसः आचक्रम [१५८२]- शत्रूच्या नगरांना तोडणाऱ्या इन्द्राला आपलें रक्षण करण्यासाठीं ज्ञानयुक्त भाषण करणारे आम्ही बोलवीत आहों.

१८ होता मन्द्रः यः विश्वा वसु जनानां दयते [१५८३]- देवांना बोलावणारा व आनंद देणारा अग्नि सर्व धनें लोकांना देत असतो.

१९ दस्म विश्पते! सुदानवः देवयन्तः, रथ्यं अश्वं न, गीर्भिः मर्मृज्यन्ते [१५८४]- हे दर्शनीय प्रजापालका! उत्तम दान देणारे व देवत्व प्राप्त करणारे याजक, रथाला जोडलेल्या घोड्याप्रमाणें, आपल्या वाणीनें तुझी स्तुति करतात.

२० तनये तोके उभे मघोनां राधः पर्षि [१५८४]- पुत्रपौत्र या दोघांना धनवानांकडे असतें तें धन तूं दे.

२१ अवस्युः त्वां आ चक्रे। हे वरुण! मे इमं हवं श्रुधि, अद्य मृडय च [१५८५]- आपलें संरक्षण व्हावें अशी इच्छा करणारे आम्ही तुझी स्तुति करीत आहों. हे वरुणा! ही माझी प्रार्थना ऐक व आम्हांला सुखी कर.

२२ हे वृषन्! कया ऊत्या त्वं नः अभि प्रमन्दसे [१५८६]- हे बलवान् इन्द्रा! कोणत्या संरक्षणाच्या सामर्थ्यानें तूं आम्हांला अधिक आनंदित करतोस बरें?

२३ कया स्तोतृभ्यः आ भर [१५८६]- कोणत्या संरक्षणाच्या शक्तिनें तूं स्तोत्यांना भरपूर अन्न देतोस.

२४ इन्द्रः शवः मह्ना रोदसी पप्रथत् [१५८८]- इन्द्र आपल्या शक्तिच्या योगानें द्युलोक व भूलोक यांना भरून टाकतो.

२५ इन्द्रः सूर्यं अरोचयत् [१५८८]- इन्द्रानें सूर्याला तेजस्वी केलें आहे.

२६ इन्द्रे ह विश्वा भुवनानि येमिरे [१५८८]- इन्द्रामध्यें सर्व भूतें राहिलीं आहेत.

२७ विश्वकर्मन्! हविषा वावृधानः स्वयं तन्वं स्वा हि ते यजस्व [१५८९]- हे सर्व कर्मे करणाऱ्या ईश्वरा! हविनें वाढणारा तूं स्वतः करावयाच्या विश्वरूपी यज्ञासाठीं स्वतःलाच अर्पण कर.

२८ अन्ये जनासः अभितः मुह्यन्तु [१५८९]- अन्य यज्ञ न करणारे लोक चारही बाजूंना मोहून पडोत.

२९ इह मघवा सूरिः अस्तु [१५८९]- येथें इन्द्र सर्व जाणणारा असो.

३० पुनानः विश्वा द्वेषांसि तरति [१५९०]- पवित्र वीर सर्व शत्रूंचा नाश करतो.

३१ सूरः सयुग्भिः [१५९०]- सूर्य आपल्या किरणांनीं सर्व अन्धकाराचा नाश करतो.

३२ दैव्यः दर्शत रथः रश्मिभिः संयसते [१५९१] -दिव्य व दर्शनीय असा हा रथ किरणांनीं तेजस्वी झालेला दिसतो.

३३ जैत्राय इन्द्रं हर्षयन् [१५९१]- विजयासाठीं इन्द्राला प्रसन्न करतात.

३४ समत्सु अनपच्युता भवथः [१५९१]- युद्धांमध्यें तुम्ही दोघे पराभूत होत नाहींत.

३५ गोषाणिं अश्वसां वाजसां नृवत् धियं नः ऊतये कृणुहि [१५९३]- गाई, घोडे, अन्न देणाऱ्या व पुत्र देणाऱ्या, बुद्धिला आमच्या संरक्षणासाठीं उपयोगी पडेल अशी कर.

३६ तन्वा दक्षेण मिथः पुनाने राजथः [१५९७] -शरीरानें व बलानें तुम्ही दोघे परस्परांना शुद्ध करीत तेजस्वी होत आहांत.

३७ मित्रस्य साधथः [१५९८]- तुम्ही मित्राला सहाय्य करतां.

३८ ऋतं तरन्ती पिप्रती [१५९८]- यज्ञाचें रक्षण करतां व यज्ञाला पूर्ण करीत आहां.

३९ नः तत् वचः ओहसे [१५९९]- आमचें भाषण लक्ष्यपूर्वक तूं ऐकतोस.

४० राधानां पते गिर्वाहः वीर! ते स्तोत्रं विभूतिः सूनृता अस्तु [१६००]- हे धनांच्या स्वामी स्तुत्य वीरा! तुझें स्तोत्र वैभव दाखवणारें व खरें असो.

४१ हे शतक्रतो ! अस्मिन् वाजे नः ऊतये ऊर्ध्वः तिष्ठ [१६०१]- हे शेंकडों कार्ये करणाऱ्या इन्द्रा ! या युद्धामध्यें आमच्या रक्षणासाठीं तयार होऊन उभा रहा.

४२ उग्रस्य तव सख्ये मा भेम [१६०५]- उग्रवीर अशा तुझ्या मित्रत्वामध्यें आम्हांला कसलेंहि भय नाहीं

४३ मा श्रमिष्म [१६०५]- आम्हांला थकवाही येत नाहीं.

४४ वृष्णः ते महत् कृतं अभिचक्ष्यं [१६०५]- भक्तांच्या इच्छा तृप्त करणाऱ्या तुझीं मोठीं वर्णनीय कृत्यें झालीं आहेत.

४५ वृषा सव्यां सिफग्यं अनु वावसे [१६०६]- बलवान् इन्द्र आपल्या उजव्या बाजूनें सर्वांस आधार देत आहे.

४६ दानः अस्य न रोषति [१६०६]- कापणारा शत्रु याला कष्ट देऊं शकत नाहीं. (दानः= ' दा '– कापणें, ' दानः '– कापणारा.)

४७ सारघेण संपृक्ताः धेनवः [१६०६]- मधुर दुधानें युक्त या गाई आहेत.

४८ पावकवर्णाः शुचयः विपश्चितः स्तोमैः अभ्यनूषत [१६०७]- अग्निसारखे तेजस्वी शुद्ध विद्वान् स्तोत्रांनीं तुझी स्तुती करीत आहेत.

४९ अयं सहस्रं ऋषिभिः सहस्कृतः समुद्रः इव पप्रथे [१६०८]- हा इन्द्र हजारों ऋषिनीं बलवान् म्हणून प्रसिद्धीस आणला आहे व तो समुद्राप्रमाणें मोठा झाला आहे.

५० अस्य सत्यः महिमा शवः यज्ञेषु विप्रराज्ये गृणे [१६०८]- याचा तो सत्य महिमा व सामर्थ्य ब्राह्मणांच्या यज्ञाच्या राज्यामध्यें प्रशंसिला जात आहे.

५१ अयं अस्य विश्वः आर्यः शेवधिपा अरिः [१६०९] – या यज्ञाचा व सर्व आर्यांचा हा निधि रक्षक झाला आहे.

५२ देवः सोमः ! ऽसरस्तमः नर्यः सः नः रुचे भव [१६१२]– हे सोमदेवा ! अत्यंत तेजस्वी व मानवांचें हित करणारा तूं आमचें तेज वाढवणारा हो,

५३ इन्दो सासह्वान् ! बाधः परि, द्वयुं अप [१६१३] – हे शत्रूचा पराभव करणाऱ्या सोमा ! बाधा करणाऱ्या व दुटप्पी वर्तन करणाऱ्या शत्रूंना दूर कर.

५४ अहिः न, जीर्णां त्वचं अति सर्पति [१६१५]- सर्पाप्रमाणें तो जीर्ण त्वचेला काढून टांकतो.

उपमा

१ भगं न [१५७९]- भाग्याप्रमाणें तुझ्या (अनु चरामसि) अनुकूल आम्ही चालत आहों. जसें भाग्य अनुकूल होतें, तसे आम्ही तुला अनुकूल होऊन व्यवहार करीत आहों.

२ हिरण्ययः उत्सः [१५८०]– जसा सोन्यानें भरलेला हौद असावा, त्याप्रमाणें तूं धनानें भरलेला आहेस.

३ मधोः न प्रथमानि पात्रा [१५८३]– मधुर सोमरसाच्या मुख्य पात्रांप्रमाणें या अग्निला (स्तोमाः प्रयन्तु) स्तुति स्तोत्रें प्राप्त होवोत.

४ रथ्यं अश्वं न [१५८४]– रथाला जोडावयाच्या घोड्याप्रमाणें (गीर्भिः मर्मृज्यन्ते) आपल्या वाणीनें अग्निची स्तुति करतात.

५ सूरः सयुग्वभिः न [१५९०]- सूर्य आपल्या किरणांनीं जसा अन्धकार दूर करतो, त्याप्रमाणें (पुनानः रुचा विश्वा द्वेषांसि तरति) स्वच्छ होणारा सोम आपल्या प्रकाशानें सर्व शत्रूंना दूर करतो.

६ परावतः तत् साम न [१५९२]– दुरून जसें तें सामगायन ऐकूं येतें, (यत्र धीतयः रणन्ति) जेथें ऋत्विज गात असतात. यज्ञशाळेंत ऋत्विज सामगायन करतात, तें दुरून ऐकूं येतें व त्यावरून तेथें यज्ञ चालला आहे असें समजतें.

७ कपोतः गर्भधिं इव [१५९९]– कबूतर आपल्या कबूतरीकडे जातो, त्याप्रमाणें (ते समतसि) तो तुझ्याजवळ येतो.

८ समुद्रः इव पप्रथे [१६०८]– समुद्राप्रमाणें तो इन्द्र मोठा आहे.

९ सखा सख्ये इव [१६१२]– मित्र मित्राला सहाय्य करतो, त्याप्रमाणें (सः नः रुचे भव) तूं आमचें तेज वाढवणारा हो.

१० सिन्धोः उच्छ्वासे पतयन्तं उक्षणं [१६१४]– नदीच्या पाण्यांत ज्याप्रमाणें बैल डुबकी घेतो, त्याप्रमाणें पाण्यांत सोमरस मिसळला जातो.

११ महि धारा न अन्धः अत्यर्षति [१६१५]– मोठ्या धारेनें अन्न जसें गाळलें जातें, त्याप्रमाणें अन्नरूपी सोम धारेनें गाळला जातो.

१२ अग्रेगः राजा [१६१६]– प्रगति करणारा राजा जसा स्तविला जातो, तसा (आप्यः स्तविष्यते) जलामध्यें मिसळला जाणारा सोम स्तविला जात आहे.

षोडशाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
१५७३	८।३।७	मेध्यातिथिः काण्वः	इन्द्रः	प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती)
१५७४	८।३।८	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
१५७५	३।१२।५	विश्वामित्रो गाथिनः	इन्द्राग्नी	गायत्री
१५७६	३।१२।६	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१५७७	३।१२।७	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१५७८	३।१२।८	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१५७९	८।६१।५	भर्गः प्रागाथः	इन्द्रः	प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती)
१५८०	८।६१।६	भर्गः प्रागाथः	,,	,,
१५८१	८।६१।७	भर्गः प्रागाथः	,,	,,
१५८२	८।६१।८	भर्गः प्रागाथः	,,	,,
१५८३	८।१०३।६	सोभरिः काण्वः	अग्निः	,,
१५८४	८।१०३।७	सोभरिः काण्वः	,,	,,
		(२)		
१५८५	१।२५।१९	शुनःशेप आजीगर्तिः	वरुणः	गायत्री
१५८६	८।९३।१९	सुकक्ष आंगिरसः	इन्द्रः	,,
१५८७	८।३।५	मेध्यातिथिः काण्वः	,,	प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती)
१५८८	८।३।६	मेध्यातिथिः काण्वः	,,	,,
१५८९	१०।८१।६	विश्वकर्मा भौवनः	विश्वकर्मा	त्रिष्टुप्
१५९०	९।१११।१	अनानतः पारुच्छेपिः	पवमानः सोमः	अत्यष्टिः
१५९१	९।१११।३	अनानतः पारुच्छेपिः	,,	,,
१५९२	९।१११।२	अनानतः पारुच्छेपिः	,,	,,
		(३)		
१५९३	६।५३।१०	भरद्वाजो बार्हस्पत्यः	पूषा	गायत्री
१५९४	१।८६।८	गोतमो राहूगणः	मरुतः	,,
१५९५	६।५२।९	ऋजिश्वा भारद्वाजः	विश्वेदेवाः	,,
१५९६	४।५६।५	वामदेवो गौतमः	द्यावापृथिवी	,,
१५९७	४।५६।६	वामदेवो गौतमः	,,	,,
१५९८	४।५६।७	वामदेवो गौतमः	,,	,,
१५९९	१।३०।४	शुनःशेप आजीगर्तिः	इन्द्रः	,,
१६००	१।३०।५	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,

मन्त्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१६०१	१।३०।६	शुनःशेप आजीगर्तिः	इन्द्रः	गायत्री
१६०२	८।७२।१२	हर्यतः प्रागाथः	अग्निः हवींषि वा	"
१६०३	८।७२।११	हर्यतः प्रागाथः	"	"
१६०४	८।७२।१०	हर्यतः प्रागाथः	"	"
		(४)		
१६०५	८।४।७	देवातिथिः काण्वः	इन्द्रः	प्रागाथः=(विषमा बृहती, समा सतोबृहती)
१६०६	८।४।८	देवातिथिः काण्वः	"	"
१६०७	८।३।३	मेध्यातिथिः काण्वः	"	"
१६०८	८।३।४	मेध्यातिथिः काण्वः	"	"
१६०९	८।५१।९	वालखिल्यः (श्रुष्टिगुः काण्वः)	"	"
१६१०	८।५१।१०	वालखिल्यः (श्रुष्टिगुः काण्वः)	"	"
१६११	९।१०५।४	पर्वतनारदौ	पवमानः सोमः	उष्णिक्
१६१२	९।१०५।५	पर्वतनारदौ	"	"
१६१३	९।१०५।६	पर्वतनारदौ	"	"
१६१४	९।८६।४३	अत्रिर्भौमः	"	जगती
१६१५	९।८६।४४	अत्रिर्भौमः	"	"
१६१६	९।८६।४५	अत्रिर्भौमः	"	"

अथ सप्तदशोऽध्यायः ।

अथाष्टमप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ ८-१ ॥

[१]

(१-१४) १, ७, १४ शुनःशेप आजीगर्तिः; २ मधुच्छन्दा वैश्वामित्रः; ३ शंयुर्बार्हस्पत्यः; (तृणपाणिः), ४ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ५ वामदेवो गौतमः; ६ रेभसूनू काश्यपौ; ८ नृमेध आंगिरसः; ९, ११ गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ; १० श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः; १२ विरूप आंगिरसः; १३ वत्सः काण्वः ॥ १, ३, ७, १२ अग्निः; २, ८-११, १३, १४ इन्द्रः, ४ विष्णुः; ५ (१) वायु, ५ (२-३) इन्द्रवायू; ६ पवमानः सोमः ॥ १-२, ७, ९, १०, १२, १३, १४ गायत्री; ३, ८ प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती); ४ त्रिष्टुप्; ५, ६ अनुष्टुप्; ११ उष्णिक् ।

१६१७ विश्वेभिरग्ने अग्निभिरिमं यज्ञमिदं वचः । चनो धाः सहसो यहो ॥१॥ (ऋ. १।२६।१०)

१६१८ यच्चिद्धि शश्वता तना देवंदेवं यजामहे । त्वे इद्धूयते हविः ॥ २ ॥ (ऋ. १।२६।६)

१६१९ प्रियो नो अस्तु विश्पतिर्होता मन्द्रो वरेण्यः । प्रियाः स्वग्नयो वयम् ॥ ३ ॥ १ (ही) ॥
[धा० ११ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. १।२६।७)

१६२० इन्द्रं वो विश्वतस्परि हवामहे जनेभ्यः । अस्माकमस्तु केवलः ॥ १ ॥ (ऋ. १।७।१०)

१६२१ स नो वृषन्नमुं चरुं सत्रादावन्नपा वृधि । अस्मभ्यमप्रतिष्कुतः ॥ २ ॥ (ऋ. १।७।६)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१६१७] हे (सहसः यहो) बलाच्या पुत्रा ! (विश्वेभिः अग्निभिः) सर्व अग्निसह तूं (इमं यज्ञं) या यज्ञांमध्यें ये व (इदं वचः) ही स्तुति ऐक आणि (चनः धाः) आम्हांला अन्न दे. ॥ १ ॥

[१६१८] (यत् चित् हि) यद्यपि (शश्वता तना) नित्य व विस्तृत हवि अर्पण करून (देवं देवं यजामहे) प्रत्येक देवतेसाठीं आम्ही यजन करीत आहों, तथापि (हविः त्वे इत् हूयते) हवि तुझ्यामध्येंच हवन केलें जात असतें. ॥२॥

[१६१९] (विश्पतिः होता) प्रजांचा पालक हवन करणारा (मन्द्रः वरेण्यः) आनंद वाढवणारा श्रेष्ठ अग्नि (नः प्रियः अस्तु) आम्हांला प्रिय होवो, तसेंच (स्वग्नयः वयं प्रियाः) उत्तम रीतिनें अग्निला ठेवणारे आम्ही त्या अग्निला प्रिय होऊं. ॥ ३ ॥

[१६२०] हे ऋत्विज हो ! (विश्वतः जनेभ्यः परि) सर्व लोकांमध्यें श्रेष्ठ अशा (इन्द्रं वः हवामहे) इन्द्राला तुमच्या सर्वांच्या हितासाठीं आम्ही बोलावीत आहों, तो इन्द्र (अस्माकं केवलः अस्तु) आम्हांलाच केवळ अधिक लाभ देणारा होवो. ॥ १ ॥

[१६२१] हे (सत्रा-दावन् वृषन्) एकदम सर्व फळें देणाऱ्या व बलवान् इन्द्रा ! (सः) तो तूं (नः अमुं चरुं अपावृधि) आमच्यासाठीं या अन्नाचा उघड स्वीकार कर व (अस्मभ्यं अप्रतिष्कुतः) आमचा प्रतीकार करणारा होऊं नकोस. ॥ २ ॥

१६२२ वृषा यूथेव वंसगः कृष्टीरियर्त्योजसा । ईशानो अप्रतिष्कुतः ॥ ३ ॥ २ (र) ॥
[धा० ८ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. १।७।८)

१६२३ त्वं नश्चित्र ऊत्या वसो राधांसि चोदय ।
अस्य रायस्त्वमग्ने रथीरसि विदा गाधं तुचे तु नः ॥ १ ॥ (ऋ. ६।४८।९)

१६२४ पर्षि तोकं तनयं पर्तृभिष्ट्वमदब्धैरप्रयुत्वभिः ।
अग्ने हेडांसि दैव्या युयोधि नोऽदेवानि ह्वरांसि च ॥ २ ॥ ३ (की) ॥
[धा० ११ । उ० १ । स्व० ४] (ऋ. ६।४८।१०)

१६२५ किमित्ते विष्णो परिचक्षि नाम प्र यद्ववक्षे शिपिविष्टो अस्मि ।
मा वर्पो अस्मदप गूह एतद्यदन्यरूपः समिथे बभूथ ॥ १ ॥ (ऋ. ७।१००।६)

१६२६ प्र तत्ते अद्य शिपिविष्ट हव्यमर्यः शंसामि वयुनानि विद्वान् ।
तं त्वा गृणामि तवसमतव्यान्क्षयन्तमस्य रजसः पराके ॥ २ ॥ (ऋ. ७।१००।५)

[१६२२] (ईशानः अप्रतिष्कुतः) सर्वांचा ईश्वर व आमचा निषेध न करणारा आणि (वृषा) बलवान् इन्द्र (ओजसा कृष्टीः इयर्ति) आपल्या बलानें अनुग्रह करण्यासाठीं मनुष्यांजवळ जातो (वंसगः यूथा इव) जसा बैल गाईंच्या कळपांत जातो. ॥ ३ ॥

[१६२३] हे (वसो) निवासक अग्ने ! (चित्रः त्वं) सुन्दर दर्शनीय असा तूं (ऊत्या राधांसि नः चोदय) रक्षणासह असलेलीं धनें आम्हांला दे. हे (अग्ने) अग्ने ! (त्वं अस्य रायः रथीः असि) तूं या धनांना रथांतून नेणारा आहेस. (नः तुचे गाधं नु विदः) आमच्या पुत्रांना प्रतिष्ठेचें स्थान मिळो. ॥ १ ॥

[१६२४] हे (अग्ने) अग्ने ! (त्वं) तूं (अ-प्रयुत्वभिः) अविरोधी भावनांनीं युक्त व (अ-दब्धैः) कोणा-कडूनहि दबला न जाणाऱ्या (पर्तृभिः) संरक्षणाच्या साधनांनीं (तोकं तनयं पर्षि) आमच्या पुत्रपौत्रांचें पालन कर. (दैव्या हेडांसिः नः युयोधि) देवांच्या क्रोधांना आमच्यापासून दूर ठेव. (अ-देवानि ह्वरांसि च) माणसांचे व राक्षसांचे क्रोध सुद्धां आमच्यापासून दूर कर. ॥ २ ॥

[१६२५] हे (विष्णो) व्यापक देवा ! (ते तत् नाम) तें तुझें नांव (किं परिचक्षि) काय प्रसिद्ध होण्यास योग्य आहे ? (यत् नाम) जें नांव (शिपि-विष्टः अस्मि इति प्र ववक्षे) किरणांनीं व्यापलेला मीं आहें असा अर्थ दाखवीत आहे. म्हणून (एतद् वर्पः अस्मत् मा अपगूह) हें रूप आमच्यापासून दूर ठेऊं नकोस. (यत्) कारण कीं (समिथे) संग्रामामध्यें (अन्यरूपः इत्) दूसरें रूप धारण करूनही तूं आमचा सहाय्यक (बभूव) होत असतोस. ॥ १ ॥

[१६२६] हे (शिपि-विष्ट) किरणांनीं व्यापलेल्या विष्णो ! (ते हव्यं तत्) तुझ्या त्या नांवाची (अर्यः वयुनानि विद्वान्) आर्य व सर्व कर्मांना जाणणारा मी (अद्य प्रशंसामि) आज प्रशंसा करीत आहें. (तं तवसं) त्या बलवान् (अस्य रजसः पराके क्षयन्तं) या रजोलोकापासून दूर राहणाऱ्या (अ-तव्यान्) तुझा लहान भाऊ मी (गृणामि त्वा) तुझी स्तुति करीत आहें. ॥ २ ॥

१६२७ वषट् ते विष्णवास आ कृणोमि तन्मे जुषस्व शिपिविष्ट हव्यम्
वर्धन्तु त्वा सुष्टुतयो गिरो मे यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ॥ ३ ॥ ४ (ते) ॥
[धा० ४४ । उ० १ । स्व० ७] (ऋ. ७।१००।७)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

१६२८ वायो शुक्रो अयामि ते मध्वो अग्रं दिविष्टिषु ।
आ याहि सोमपीतये स्पार्हो देव नियुत्वता ॥ १ ॥ (ऋ. ४।४७।१)

१६२९ इन्द्रश्च वायवेषाꣳसोमानां पीतिमर्हथः ।
युवाꣳहि यन्तीन्दवो निम्नमापो न सध्र्यक् ॥ २ ॥ (ऋ. ४।४७।२)

१६३० वायविन्द्रश्च शुष्मिणा सरथꣳशवसस्पती ।
नियुत्वन्ता न ऊतय आ यातꣳसोमपीतये ॥ ३ ॥ ५ (ता) ॥
[धा० १९ । उ० १ । स्व० २] (ऋ. ४।४७।३)

[१६२७] हे (विष्णो) विष्णुदेवा ! (ते आसः आ) तुझ्या मुखाजवळ येऊन (वषट् कृणोमि) वषट्कारपूर्वक हव्यपदार्थांचें मीं हवन करीत आहें. हे (शिपिविष्ट) किरणांनीं व्यापलेल्या देवा ! (तत् मे हव्यं जुषस्व) त्या माझ्या हव्याचा स्वीकार कर. (सुष्टुतयः मे गिरः) उत्तम स्तुति करणाऱ्या माझ्या वाणी (त्वा वर्धन्तु) तुझें महात्म्य वाढवोत. हे विष्णो ! (यूयं) तुझ्यासह सर्व देवता (स्वस्तिभिः नः सदा पात) कल्याण करणाऱ्या शक्तींनीं आमचें सदा संरक्षण करोत. ॥ ३ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[१६२८] हे (वायो) वायो ! (शुक्रः) निर्दोष असलेला मी (दिविष्टिषु) यज्ञांमध्यें (ते) तुला (मध्वः) सोमरस (अग्रं अयामि) सर्वांत प्रथम अर्पण करीत आहें. हे (देव) देवा ! (स्पार्हः) प्रशंसनीय असा तूं (नियुत्वता) नियुत नामक घोड्यावरून (सोमपीतये आ याहि) सोमपान करण्यासाठीं ये. ॥ १ ॥

[१६२९] हे (वायो) वायु ! तूं (इन्द्रः च) आणि इन्द्र (एषां सोमानां पीतिं अर्हथः) या सोमांचें पान करण्यास योग्य आहांत. (हि) यासाठींच (निम्नं आपः न) ज्याप्रमाणें सखल जागेंत पाण्याचे प्रवाह जातात, त्याप्रमाणें (सध्र्यक्) एकदम (युवां इन्दवः यन्ति) तुमच्याजवळ सोमरस जातात. ॥ २ ॥

[१६३०] हे (वायो) वायु ! तूं व (इन्द्रः च) इन्द्र (शवसः पती) बलाचे स्वामी व (शुष्मिणा) बलवान् आहांत. (नियुत्वन्ता) नियुत नामक घोडे असलेले तुम्ही दोघे (नः ऊतये) आमच्या रक्षणासाठीं व (सोमपीतये) सोमपान करण्यासाठीं (सरथं आयातं) एका रथांतून या. ॥ ३ ॥

१६३१ अध क्षपा परिष्कृतो वाजाꣳअभि प्र गाहसे ।
यदी विवस्वतो धियो हरिꣳहिन्वन्ति यातवे ॥ १ ॥ (ऋ ९।९९।२)

१६३२ तमस्य मर्जयामसि मदो य इन्द्रपातमः ।
यं गाव आसभिर्दधुः पुरा नूनं च सूरयः ॥ २ ॥ (ऋ. ९।९९।३)

१६३३ तं गाथया पुराण्या पुनानमभ्यनूषत ।
उतो कृपन्त धीतयो देवानां नाम बिभ्रतीः ॥ ३ ॥ ६ (लु) ॥
[धा० १४ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ९।९९।४)

१६३४ अश्वं न त्वा वारवन्तं वन्दध्या अग्निं नमोभिः । सम्राजन्तमध्वराणाम् ॥ १ ॥
(ऋ. १।२७।१)

१६३५ स घा नः सूनुः शवसा पृथुप्रगामा सुशेवः । मीढ्वाꣳअस्माकं बभूयात् ॥ २ ॥
(ऋ. १।२७।२)

१६३६ स नो दूराच्चासाच्च नि मर्त्यादघायोः । पाहि सदमिद्विश्वायुः ॥ ३ ॥ ७ (टि) ॥
[धा० १३ । उ० १ । स्व० ३] (ऋ. १।२७।३)

[१६३१] (क्षपा अध) रात्र संपल्यानंतर प्रातःकालीं (परिष्कृतः) जलांचें मिश्रण करून शोभायमान झालेला सोम तयार होतो. अशा हे सोमा ! तूं (वाजान् अभि प्रगाहसे) अन्नाकडे जातोस. (विवस्वतः धियः) संस्कार करणाऱ्याच्या अंगुली (हरिं यातवे) हिरव्या रंगाच्या सोमाला कलशामध्यें जाण्यासाठीं (यदि हिन्वन्ति) जेव्हां प्रेरणा करतात, तेव्हां तूं सवनांमध्यें जातोस. ॥ १ ॥

[१६३२] (अस्य तं मर्जयामसि) या सोमाच्या त्या रसाला आम्ही गाळीत आहों. (यः मदः इन्द्रपातमः) जो आनंद वाढवणारा सोमरस इन्द्राला पिण्यास योग्य आहे. (यं सूरयः पुरा च नूनं) ज्या सोमरसाचें विद्वान् लोक पूर्वी व आतांहि पान करीत असतात. (गावः आसभिः दधुः) गाई आपल्या तोंडानें त्या सोमाचें भक्षण करीत असतात. ॥२॥

[१६३३] (पुनानं) गाळल्या जाणाऱ्या सोमाची (पुराण्या गाथया अभ्यनूषत) पुरातन स्तोत्रानें स्तुति केली जाते. (उत उ) आणि (नाम बिभ्रतीः) हविचें धारण करणाऱ्या (धीतयः) अंगुली (देवानां कृपन्त) देवांसाठीं सोम अर्पण करण्यास समर्थ होतात. ॥ ३ ॥

[१६३४] (अध्वराणां सम्राजन्तं त्वा अग्निं) यज्ञाचा सम्राट् अशा तुज अग्निला (नमोभिः वन्दध्यै) हवि अर्पण करून आम्ही नमस्कार करीत आहों. (वारवन्तं अश्वं न) ज्याप्रमाणें अयाळ असलेल्या घोड्यावर बसणारे प्रेम करतात. ॥ १ ॥

[१६३५] (सः घ नः सुशेवः) तो अग्नि आमच्याकडून उत्तम रीतिनें सेविला जावो. (शवसा सूनुः पृथुप्रगामा) तो बलाचा पुत्र शीघ्र गमन करणारा अग्नि (अस्माकं मीढ्वान् बभूयात्) आम्हांला सुख देणारा होवो. ॥२॥

[१६३६] हे अग्ने ! (विश्वायुः) सर्व मानवांचें हित करणारा तूं (दूरात् च आसात् च) दूरून व जवळून (अघायोः मर्त्यात्) पापी माणसांपासून (नः सदं इत् निपाहि) आमचें सर्वदा रक्षण कर. ॥ ३ ॥

१६३७ त्वमिन्द्र प्रतूर्तिष्वभि विश्वा असि स्पृधः ।
अशस्तिहा जनिता वृत्रतूरसि त्वं तूर्य तरुष्यतः ॥ १ ॥ (ऋ. ८।९९।५)
१६३८ अनु ते शुष्मं तुरयन्तमीयतुः क्षोणी शिशुं न मातरा ।
विश्वास्ते स्पृधः श्नथयन्त मन्यवे वृत्रं यदिन्द्र तूर्वसि ॥ २ ॥ ८ (टा) ॥
[धा० १८ । उ० १ । स्व० २] (ऋ. ८।९९।६)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

१६३९ यज्ञ इन्द्रमवर्धयद्यद्भूमिं व्यवर्तयत् । चक्राण ओपशं दिवि ॥ १ ॥ (ऋ. ८।१४।५)
१६४० व्य३न्तरिक्षमतिरन्मदे सोमस्य रोचना । इन्द्रो यदभिनद्वलम् ॥ २ ॥ (ऋ. ८।१४।७)
१६४१ उद्गा आजदङ्गिरोभ्य आविष्कृण्वन्गुहा सतीः । अर्वाञ्चं नुनुदे वलम् ॥ ३ ॥ ९ (पी) ॥
[धा० २० । उ० १ । स्व० ४] (ऋ. ८।१४।८)
१६४२ त्यमु वः सत्रासाहं विश्वासु गीर्ष्वायतम् । आ च्यावयस्यूतये ॥ १ ॥ (ऋ. ८।९२।७)

[१६३७] हे (इन्द्र) इन्द्रा ! तूं (प्रतूर्तिषु) युद्धांमध्यें (विश्वाः स्पृधः अभि असि) सर्व स्पर्धा करणाऱ्या शत्रूंचा पराभव करतोस. हे (तूर्य) शत्रूंना त्वरेनें दूर घालवणाऱ्या इन्द्रा ! (त्वं अ-शस्तिहा) तूं विपत्तिंना [illegible] करणारा, (जनिता) संपत्तींचा उत्पादक व (वृत्र-तूः) शत्रूंचा नाश करणारा व (तरुष्यतः असि) बाधा करणाऱ्यांस दूर करणारा आहेस. ॥ १ ॥

[१६३८] हे इन्द्रा ! (तुरयन्तं ते शुष्मं) शत्रूंचा नाश करणारें तुझें बल आहे. (क्षोणी) द्यावापृथि[illegible] (मातरा शिशुं न) ज्याप्रमाणें मातापिता आपल्या बालकाच्या मागून जातात, त्याप्रमाणें तुला अनुसरतात. हे (इन्द्र) इन्द्रा ! (यत् वृत्रं तूर्वसि) जेव्हां तूं वृत्राचा वध करतोस, यामुळें (ते मन्यवे) तुझ्या क्रोधापुढें (विश्वाः स्पृधः) सर्व स्पर्धा करणारे शत्रु (श्नथयन्त) खिन्न होत असतात. ॥ २ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[१६३९] (यज्ञः इन्द्रं अवर्धयत्) यज्ञ इन्द्राला वाढवतो. याचें कारण (यत्) हें आहे कीं तो ([illegible] ओपशं चक्राणः) अन्तरिक्षलोकामध्यें मेघाला निजल्याप्रमाणें करतो व त्याच्या पावसानें (भूमिं व्यवर्तयत्) [illegible] पोषण करणारी करतो. ॥ १ ॥

[१६४०] (सोमस्य मदे) सोमपान करून हर्ष झाल्यानंतर (इन्द्रः) इन्द्र (रोचना अन्तरिक्षं) [illegible] अन्तरिक्षाला (वि अतिरत्) विशेष तेजस्वी करतो, (यत्) कारण कीं (वलं अभिनत्) [illegible] करतो. ॥ २ ॥

[१६४१] (गुहा सतीः) गुहेमध्यें गुप्त ठेवलेल्या (गाः) गाई इन्द्र (आविष्कृण्वन्) बाहेर [illegible] (अंगिरोभ्यः उदाजत्) अंगिरा ऋषिंना त्या देतो आणि (वलं अर्वाञ्चं नुनुदे) त्या गाईंना [illegible] असुराला खालीं मान करून पळावयास लावतो. ॥ ३ ॥

[१६४२] (सत्रा-साहं) अनेक शत्रूंना एकदम पराभूत करणाऱ्या (वः विश्वासु गीर्षु आयतं) [illegible] सर्व स्तोत्रांमध्यें वर्णिलेल्या (त्यं उ) त्या इन्द्राला (ऊतये) आमच्या संरक्षणासाठीं (आच्यावयसि) [illegible] येऊं दे. ॥ १ ॥

*

१६४३ युध्मꣳसन्तमनर्वाणꣳसोमपामनपच्युतम् । नरमवार्यक्रतुम् ॥ २ ॥ (ऋ. ८।९२।८)

१६४४ शिक्षा ण इन्द्र राय आ पुरु विद्वाꣳऋचीषम । अवा नः पार्ये धने ॥ ३ ॥ १० (ता) ॥

[धा० १४ । उ० १ । स्व० २] (ऋ. ८।९२।९)

१६४५ तव त्यदिन्द्रियं बृहत्तव दक्षमुत क्रतुम् । वज्रꣳशिशाति धिषणा वरेण्यम् ॥ १ ॥

(ऋ. ८।१५।७)

१६४६ तव द्यौरिन्द्र पौꣳस्यं पृथिवी वर्धति श्रवः । त्वामापः पर्वतासश्च हिन्विरे ॥ २ ॥

(ऋ ८।१५।८)

१६४७ त्वां विष्णुर्बृहन्क्षयो मित्रो गृणाति वरुणः ।
त्वाꣳ शर्द्धो मदत्यनु मारुतम् ॥ ३ ॥ ११ (ठी) ॥

[धा० १३ । उ० २ । स्व० ४] (ऋ. ८।१५।९)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

१६४८ नमस्ते अग्न ओजसे गृणन्ति देव कृष्टयः । अमैरमित्रमर्दय ॥ १ ॥ (ऋ. ८।७५।१०)

१६४९ कुवित्सु नो गविष्टयेऽग्ने संवेषिषो रयिम् । उरुकृदुरु णस्कृधि ॥ २ ॥ (ऋ. ८।७५।११)

[१६४३] (युध्मं सन्तं) युद्ध करणाऱ्या पण (अनर्वाणं) कधींहि पराभूत न होणाऱ्या (अनपच्युतं सोमपां) न दबला जाणाऱ्या व सोम पिणाऱ्या (अवार्यक्रतुं नरं) ज्याचा कार्यक्रम कोणी बदलूं शकत नाहीं अशा नेत्या इन्द्राला सहाय्यासाठीं आम्ही बोलावतों. ॥ २ ॥

[१६४४] (ऋचीषम इन्द्र) हे दर्शनीय इन्द्रा ! (विद्वान्) सर्व जाणणारा तूं (रायः आ) धन घेऊन (नः पुरु शिक्ष) आम्हांला तें पुष्कळ दे. (पार्ये धने नः अव) शत्रूकडील धन आणून त्यानें आमचें रक्षण कर. ॥ ३ ॥

[१६४५] हे इन्द्रा ! तुझी (धिषणा) बुद्धि (तव त्यत् बृहत् इन्द्रियं) तुझ्या मोठ्या बलाला, (तव दक्षं) तुझ्या दक्षतेला, (उत क्रतुं) आणि तुझ्या पराक्रमाला आणि, (वरेण्यं वज्रं) तुझ्या श्रेष्ठ वज्राला (शिशाति) तीक्ष्ण करते. ॥ १ ॥

[१६४६] हे (इन्द्र) इन्द्रा ! (द्यौः तव पौंस्यं) द्युलोक तुझ्या पौरुषाला (पृथिवी श्रवः वर्धति) आणि पृथ्वी तुझ्या यशाला वाढवते. (त्वां आपः) तुझ्याजवळ जलप्रवाह आणि (पर्वतासः च) पर्वत तुला (हिन्विरे) स्वामी मानून येतात. ॥ २ ॥

[१६४७] हे इन्द्रा ! (बृहत् क्षयः) मोठें घर देणारा म्हणून (विष्णुः मित्रः वरुणः) विष्णु, मित्र व वरुण (त्वां गृणाति) तुझी स्तुति करीत असतात. (मारुतं शर्द्धः) मरुतांचें बल (त्वां अनुमदाति) तुला आनंदित करतें. ॥३॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[१६४८] हे (अग्ने देव) अग्निदेवा ! (कृष्टयः) यज्ञ करणारे लोक (ओजसे ते नमः गृणन्ति) बल प्राप्त करण्यासाठीं तुला नमस्कार करून तुझी स्तुति करतात. (अमैः अमित्रं अर्दय) आपल्या बलांनीं तूं शत्रूंचा नाश कर. ॥१॥

[१६४९] हे (अग्ने) अग्ने ! (नः गविष्टये) आम्हांला गाई मिळाव्या यासाठीं तूं (कुवित् सु रयिं संवेषिषः) पुष्कळ धन आम्हांला दे. (उरुकृत्) महात्म्य वाढवणारा तूं (नः उरु कृधि) आम्हांला मोठे कर. ॥ २ ॥

१६५० मा नो अग्ने महाधने परा वर्ग्भारभृद्यथा । संवर्गं सं रयिं जय ॥ ३ ॥ १२ (प) ॥
[धा० १५ । उ० १ । स्व० १] (ऋ. ८।७५।१२)

१६५१ समस्य मन्यवे विशो विश्वा नमन्त कृष्टयः । समुद्रायेव सिन्धवः ॥ १ ॥ (ऋ. ८।६।४)

१६५२ वि चिद्वृत्रस्य दोधतः शिरो बिभेद वृष्णिना । वज्रेण शतपर्वणा ॥ २ ॥ (ऋ. ८।६।६)

१६५३ ओजस्तदस्य तित्विष उभे यत्समवर्तयत् । इन्द्रश्चर्मेव रोदसी ॥ ३ ॥ १३ (तौ) ॥
[धा० १४ । उ० १ । स्व० नास्ति] (ऋ. ८।६।५)

१६५४ सुमन्मा वस्वी रन्ती सूनरी ॥ १ ॥

१६५५ सरूप वृषन्ना गहीमौ भद्रौ धुर्यावभि । ताविमा उप सर्पतः ॥ २ ॥

१६५६ नीव शीर्षाणि मृढ्वं मध्य आपस्य तिष्ठति । शृङ्गेभिर्दशभिर्दिशन् ॥ ३ ॥ १४ (यि) ॥
[धा० ७ । उ० नास्ति । स्व० ३]

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

॥ इत्यष्टम-प्रपाठकस्य प्रथमोऽर्धः ॥ ८-१ ॥

॥ इति सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

[१६५०] हे (अग्ने) अग्ने ! (नः महाधने) आम्हांला संग्रामांमध्यें (मा परावर्क्) दूर करूं नकोस. (यथा भारभृत्) ज्याप्रमाणें भार वाहणारा भार पोंचवतो, त्याप्रमाणें (संवर्गं रयिं संजय) एकत्र केलेलें धन जिंकून आण व तें आम्हांला दे. ॥ ३ ॥

[१६५१] (विश्वाः विशः कृष्टयः) सर्व प्रजाजन (अस्य मन्यवे) या इन्द्राच्या क्रोधापुढें (सं नमन्त) नमून राहतात. (समुद्राय सिन्धवः न) समुद्रापुढें जशा नद्या नमून असतात. ॥ १ ॥

[१६५२] (दोधतः वृत्रस्य शिरः चित्) जगाला कांपवणाऱ्या वृत्राचें डोकें (वृष्णिना) इन्द्रानें (शतपर्वणा वज्रेण वि बिभेद) शेंकडों धारा असलेल्या वज्रानें फोडलें. ॥ २ ॥

[१६५३] (अस्य तत् ओजः तित्विषे) याचें तें सामर्थ्य चमकूं लागलें. (यत् इन्द्रः) ज्या बलानें इन्द्रानें (उभे रोदसी) दोनही द्यु व भू लोकांना (चर्म इव समवर्तयत्) चामड्याप्रमाणें आपल्या आधीन केलें आहे. ॥ ३ ॥

[१६५४] हे इन्द्रा ! तुझे घोडे (सुमन्मा वस्वी) उत्तम समजूतदार व धन्य आहेत; तसेंच ते (रन्ती सूनरी) रमणीय व सुंदरहि आहेत. ॥ १ ॥

[१६५५] हे (सरूप वृषन्) सुरूप व बलवान् इन्द्रा ! (भद्रौ इमौ धुर्यौ) उत्तम कल्याण करणारे हे रथाला जोडावयाचे दोन घोडे जोडून (अभि आगहि) आमच्या यज्ञांत ये. (तौ इमौ उप सर्पतः) ते हे दोन घोडे तुझी उत्तम सेवा करीत आहेत. ॥ २ ॥

[१६५६] हे ऋत्विज हो ! (दशभिः शृंगेभिः) दहाही अंगुलींनीं (इव दिशन्) आम्हांला हवें तें धन देत इन्द्र (आपस्य मध्ये तिष्ठति) आमच्या यज्ञांत उभा आहे. (शीर्षाणि नि मृढ्वं) आपलीं मस्तकें नम्र करून त्याला पहा. ॥ ३ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति सप्तदशोऽध्यायः ॥

सप्तदश अध्याय

या अध्यायामध्यें इन्द्र, अग्नि, विष्णु, वायु व सोम या पांच देवतांचीं वर्णनें आहेत. त्यांमध्यें इन्द्राचें वर्णन मोठें आहे, म्हणून तें आधीं पहा —

इन्द्र

१ विश्वतः जनेभ्यः परि इन्द्रं हवामहे [१६२०] – सर्व लोकांपेक्षां श्रेष्ठ अशा इन्द्राला तुमच्या सर्वांच्या हितासाठीं आम्हीं बोलावीत आहों.

२ अस्माकं केवलः अस्तु [१६२०]– इन्द्र आम्हांलाच केवळ अधिक लाभ देणारा होवो.

३ सत्रा–दावन् वृषन् ! सः नः अमुं चरुं अपावृधि, अस्मभ्यं अप्रतिष्कुतः [१६२१]– हे एकदम फळें देणाऱ्या बलवान् इन्द्रा ! तो तूं आमच्या अन्नाचा स्वीकार कर, आमचा प्रतिकार करूं नकोस. आमचा सहाय्यक हो.

४ ईशानः अप्रतिष्कुतः वृषा ओजसा कृष्टीः इयर्ति वंसगः यूथा इव [१६२२]– सर्वांचा स्वामी, आमच्या विरुद्ध कार्य न करणारा बलवान् इन्द्र आपल्या सामर्थ्यानें उपकार करण्यासाठीं मनुष्यांजवळ जातो. जसा बैल कळपांत जातो.

५ हे इन्द्र ! प्रतूर्तिषु विश्वाः स्पृधः अभि असि [१६३७]– हे इन्द्रा ! तूं युद्धांमध्यें सर्व स्पर्धा करणाऱ्या शत्रूंचा पराभव करतोस.

६ हे तूर्य ! त्वं अशस्ति–हा, जनिता वृत्रतूः तरुष्यतः असि [१६३७]- हे त्वरेनें शत्रूंना दूर करणाऱ्या इन्द्रा ! तूं विपत्तींना दूर करणारा, सपत्तींचा निर्माता, शत्रूंचा नाश करणारा, बाधा उत्पन्न करणाऱ्या शत्रूंना दूर करणारा आहेस.

७ तुरयन्तं ते शुष्मं [१६३८]– शत्रूंचा नाश करणारें तुझें सामर्थ्य आहे.

८ यत् वृत्रं तूर्वसि, ते मन्यवे विश्वाः स्पृधः श्नथयन्त [१६३८]– हे इन्द्रा ! जेव्हां तूं वृत्राचा वध करतोस, तेव्हां तुझ्या क्रोधापुढें सर्व स्पर्धा करणारे शत्रु खिन्न होऊन जातात.

९ यत् वलं अभिनत्, इन्द्रः रोचना अन्तरिक्षं वि अतिरत् [१६४०]– इन्द्रानें अन्तरिक्षाच्या तेजाला अधिक प्रकाशित केलें, जेव्हां वल राक्षसाला त्यानें विदीर्ण केलें.

१० गुहा सतीः गाः आविष्कृण्वन् अंगिरोभ्यः उदाजत् । अर्वाचं वलं नुनुदे [१६४१]– गुहेंत लपवून ठेवलेल्या गाईंना इन्द्रानें बाहेर काढलें व अंगिरा ऋषिंना त्यानें त्या गाई दिल्या. त्या गाई चोरून नेणाऱ्या वल राक्षसाला खालीं मान करून पळावयास लावलें.

११ सत्रासाहं वः विश्वासु गीर्षु आयतं त्यं ऊतये आच्यावयसि [१६४२]– अनेक शत्रूंना एकदम पराभूत करणाऱ्या व तुमच्या सर्व स्तोत्रांमध्यें वर्णिलेल्या त्या इन्द्राला आमच्या संरक्षणासाठीं आम्हीं आमच्याजवळ बोलावीत आहों.

१२ युध्मं सन्तं अनर्वाणं अनपच्युतं अवार्यक्रतुं नरं [१६४३]– युद्ध करणाऱ्या, पण कधींहि पराभूत न होणाऱ्या, कोणापुढेंहि न दबणाऱ्या, ज्याचा कार्यक्रम कोणी बदलूं शकत नाहीं अशा नेत्या इन्द्राला संरक्षणासाठीं आम्ही आमच्याजवळ बोलावीत आहोंत.

१३ हे ऋचीषम इन्द्र ! विद्वान् रायः आ नः पुरु शिक्ष, पार्ये धने नः अव [१६४४]– हे दर्शनीय इन्द्रा ! सर्व जाणणारा तूं धन घेऊन ये व आम्हांला पुष्कळ धन दे. शत्रूकडील धन आणून त्यानें आमचें संरक्षण कर.

१४ धिषणा तव बृहत् इन्द्रियं दक्षं क्रतुं वरेण्यं वज्रं शिशाति [१६४५]– तुझी बुद्धि, तुझें मोठें बल, सामर्थ्य, दाक्षिण्य, पराक्रम व श्रेष्ठ वज्र यांना तीक्ष्ण करते.

१५ द्यौः तव पौंस्यं, पृथिवी श्रवः वर्धति [१६४६] – द्युलोक तुझ्या पौरुषाला व पृथिवी तुझ्या यशाला वाढवते.

१६ बृहत् क्षयः गृणाति [१६४७]– तूं मोठें घर देणारा आहेस, म्हणून तुझी स्तुति होत आहे.

१७ विश्वाः कृष्टयः विशः अस्य मन्यवे सं नमन्त [१६५१]– सर्व प्रजाजन याच्या क्रोधापुढें नमून राहतात.

१८ दोधतः वृत्रस्य शिरः वृष्णिना शतपर्वणा वज्रेण बिभेद [१६५२]- सर्व जगाला कांपविणाऱ्या वृत्राचें शिर इन्द्रानें शेंकडों धारा असलेल्या वज्रानें फोडलें.

१९ अस्य ओजः तित्विषे [१६५३]- या इन्द्राचें सामर्थ्य चमकूं लागलें.

२० सुमन्मा वस्वी रन्ती सूनरी [१६५४]–हे इन्द्रा ! तुझे दोनही घोडे मोठे समजूतदार, धन्य, रमणीय व देखणे आहेत.

२१ सरूप वृषन् ! भद्रौ इमौ धुर्यौ, तौ इमौ उपसर्पतः, अभि आगहि [१६५५]– हे सुरूप व बलवान् इन्द्रा ! हे उत्तम कल्याण करणारे दोन घोडे रथाला जोडून, ते उत्तम रीतिनें पुढें येत आहेत. ते जोडून आमच्या यज्ञांत ये.

२२ दशभिः शृंगेभिः दिशन् आपस्य मध्ये तिष्ठति, शीर्षाणि नि मृढ्वं [१६५६]– दहाही अंगुलींनीं धन देत आमच्या यज्ञांत इन्द्र उभा आहे. आपलीं मस्तकें नम्र करून त्याला अवलोकन करा.

इन्द्र सर्वांहून श्रेष्ठ आहे, त्याच्याहून अधिक सामर्थ्यवान् असा दुसरा कोणीहि नाहीं. तो आमचा सहाय्य करणारा होवो. तो एकाचवेळीं अनेक शत्रूंचा पराभव करतो. तो आम्ही दिलेलें नैवेद्याचें अन्न स्वीकारून आमच्यावर प्रसन्न होवो. तो कधींहि पराभूत न होणारा इन्द्र यज्ञामध्यें आमच्यामध्यें येऊन बसो. युद्धांमध्यें तो सर्व शत्रूंचा पराभव करो. इन्द्र सर्व विपत्ती दूर करणारा, संपत्ती उत्पन्न करणारा व शत्रूंना दूर करणारा आहे.

जेव्हां इन्द्र वृत्राला मारतो त्यावेळीं सर्व शत्रू खिन्न होतात. जेव्हां बल राक्षसाला त्यानें मारलें, तेव्हां अन्तरिक्षामध्यें मोठा प्रकाश पडला. बलानें गाई चोरल्या व त्यांना गुहेमध्यें कोंडून ठेवलें. इन्द्रानें गुहा फोडून त्या गाई बाहेर काढल्या. आंगिरा ऋषिंना त्या दिल्या.

सर्व शत्रूंना एकदम पराभूत करतो, असा तो इन्द्र आहे. त्याचा कोणी पराभव करूं शकत नाहीं व त्याच्या कार्यक्रमामध्येंहि कोणी बदल करूं शकत नाहीं. इन्द्र शत्रूकडून धन आणून तें आम्हांला वांटून देवो. त्याचें सामर्थ्य, बल, पौरुष वगैरे सर्व फार सामर्थ्यवान् आहे. सर्व लोक याच्यापुढें डोकें नम्र करूनच असतात. वृत्रानें सर्व जगाला भयभीत केलें, पण शेवटीं इन्द्रानें वृत्राला मारून टाकलें, यामुळें इन्द्राचें तेज सर्व जगांत पसरलें.

इन्द्राचे दोन घोडे रथाला जोडावयासाठीं आहेत. ते उत्तम सुशिक्षित, शहाणे, हुषार, देखणे व चपल आहेत. त्यांना रथाला जोडून तो यज्ञाच्या ठिकाणीं येत असतो.

अग्नि

१ हविः त्वे इत् हूयते [१६१८]– हे अग्ने ! तुझ्यामध्यें हविर्द्रव्यांचें हवन केलें जातें.

२ देवं देवं यजामहे [१६१८]– प्रत्येक देवतेसाठीं आम्ही यजन करीत आहों.

३ विश्पतिः होता मन्द्रः वरेण्यः नः प्रियः अस्तु, स्वग्नयः वयं प्रियाः [१६१९]– प्रजांचा पालक, हवन ज्यांत होत आहे, असा आनंद देणारा श्रेष्ठ अग्नि आम्हांला प्रिय असो व उत्तम रीतिनें अग्निला ठेवणारे आम्ही त्या अग्निला प्रिय होऊं.

अग्नि हा " विश्-पतिः " प्रजांचें पालन करतो, त्यांना निरोगी ठेवतो.

४ हे वसो ! चित्रः त्वं ऊत्या राधांसि नः चोदय [१६२३]– हे निवासक अग्ने ! तूं विलक्षण शक्तिमान् आहेस, आमचें संरक्षण कर व त्याबरोबर धनेंही आमच्याजवळ पाठव.

५ हे अग्ने ! त्वं अस्य रायः रथीः असि [१६२३]– हे अग्ने ! तूं या धनांना रथांतून नेणारा आहेस.

६ नः तुचे गाधं विदः [१६२३]–आमच्या पुत्रपौत्रांना प्रतिष्ठेचें स्थान मिळो.

७ हे अग्ने ! त्वं अप्रयुत्वभिः अदब्धैः पर्तृभिः तोकं तनयं पर्षि [१६२४]– हे अग्ने ! तूं अविरोधी भावनांनीं युक्त व कोणाकडून दबला न जाणारा आपल्या संरक्षणाच्या साधनांनीं आमच्या पुत्रपौत्रांचें पालन कर.

८ दैव्या हेडांसि नः युयोधि [१६२४]–दैवी प्रकोपांना आमच्यापासून दूर कर.

९ अदेवानि ह्वरांसि च [१३२४]– मानवांचे अथवा राक्षसांचे प्रकोपहि आमच्यापासून दूर ठेव.

१० अध्वराणां सम्राजन्तं त्वा अग्निं नमोभिः वन्दध्यै [१६३४]– यज्ञांचा सम्राट् तुज अग्निला हविष्यान्नें अर्पण करून वन्दन करीत आहों.

११ नः सुशेवः शवसा सूनुः पृथुप्रगामा, अस्माकं मीढ्वान् भूयात् [१६३५]– तो अग्नि आमच्याकडून उत्तम रीतिनें सेविला जाऊन, तो बलाचा पुत्र, पुष्कळ प्रगति करणारा आम्हांला सुख देणारा होवो.

१२ हे अग्ने ! विश्वायुः दूरात् आसात् च अघायोः मर्त्यात् नः सदं इत् पाहि [१६३६]– हे अग्ने ! सर्व मानवांचें हित करणारा तूं दूरून व जवळून पापी माणसांपासून आमचें सर्वदा संरक्षण कर.

१३ हे अग्ने देव ! कृष्टयः ओजसे ते नमः गृणन्ति । अमैः अमित्रं अर्दय [१६४८]– हे अग्निदेवा ! सर्व प्रजाजन बल प्राप्त करण्यासाठीं नमस्कार करून तुझी स्तुति करतात. आपल्या सामर्थ्यांनीं शत्रूचा तूं नाश कर.

१४ हे अग्ने ! गविष्टये कुवित् सुरयिं संवेविषः । उरुकृत् ! नः उरु कृधि [१६४९]– हे अग्ने ! आम्हांला गाई मिळाव्या म्हणून तूं आम्हांला पुष्कळ धन दे. पुष्कळ कार्य करणाऱ्या अग्ने ! तूं आम्हांला मोठे कर.

२१ हे अग्ने ! नः महाधने मा परावर्क् । संगमे रयिं संजय [१६५०]- हे अग्ने ! आम्हाला संग्रामामध्यें दूर करूं नकोस. एकत्र केलेलें धन जिंकून आण.

अग्निमध्यें हविर्द्रव्यांचें हवन ऋतुपरत्वें केलें जातें, त्यामुळें वायु आदि देव प्रसन्न होतात. हा अग्नि प्रजांचें पालन उत्तम रीतिनें करणारा आहे. लोकांनीं ऋतुपरत्वें यज्ञ करून त्याची प्रसन्नता करून घ्यावी. सर्व रोगबीजांना हा अग्नि दूर करतो, व सर्व मनुष्यांचें आरोग्य वाढवतो. पुत्रपौत्रांचें हा कल्याण करतो. दैवी, मानवी व राक्षसांचे प्रकोप हा दूर करतो. रोगराई हे दैवी प्रकोप आहेत. इतरांचे प्रकोप चोरी, लूट व युद्ध आदि आहेत. हे सर्व त्रास हा अग्नि दूर करतो व लोकांना सुखी करतो. पापी लोकांचा त्रास हा दूर करतो. बल वाढवतो. युद्धांमध्यें यामुळें यश प्राप्त होतें.

विष्णु

१ हे विष्णो ! ते तत् नाम किं परिचक्षि [१६२५] हे विष्णो ! तुझें तें नांव किती उत्तम आहे बरें ?

२ यत् नाम " शिपि-विष्टः अस्मि " इति ववक्षे [१६२५]- जें नांव " किरणांनीं व्यापलेला आहे " असा भाव दाखवीत आहे.

३ एतत् वर्पः अस्मत् मा अप गूह [१६२५]- हें रूप तूं आमच्यापासून दूर ठेवूं नकोस.

४ यत् समिथे अन्यरूपः इत् बभूव [१६२५]- युद्धामध्यें तूं अन्यरूपें धारण करूनहि आमचें सहाय्य करतोस.

५ हे शिपि-विष्ट ! ते तत् अर्यः वयुनानि विद्वान् अद्य प्रशंसामि [१६२६]- हे किरणांनीं व्यापणाऱ्या विष्णो ! तुझ्या त्या नांवाचें महत्त्व जाणणारा विद्वान् मी आज तुझी प्रशंसा करीत आहें.

६ हे विष्णो ! ते आसः आ वषट् कृणोमि । हे शिपिविष्ट ! तत् मे हव्यं जुषस्व ! मे सुष्टुतयः गिरः त्वा वर्धन्तु [१६२७]- हे विष्णो ! तुझ्या मुखामध्यें वषट्कारपूर्वक मी हवि अर्पण करीत आहें. हे प्रकाशानें व्याप्त देवा ! तें माझें हव्य तूं स्वीकार कर. माझ्या उत्तम स्तुति तुझें महात्म्य वाढवोत.

विष्णुचें नांव शिपिविष्ट आहे. कारण तो चारही बाजूंना किरणांनीं व्यापतो. चारही बाजूंना त्याचे किरण पसरत असतात. पण तो आपल्या अनेक रूपांनीं मानवांचें सहाय्य करीत असतो. किरणांनीं व्यापणारा आकाशांत सूर्य आहे, मेघांमध्यें विद्युत् आहे व पृथिवीवर अग्नि आहे. या अग्निमध्यें हवन केलें जातें. ते हवनीय पदार्थ सूक्ष्म करून तो चारहि दिशांमध्ये पसरवतो व त्यामुळें चहूंकडे आरोग्याचें वातावरण उत्पन्न होतें. सर्व लोकांचें जीवन यामुळें सुखाचें व आरोग्याचें जीवन होतें.

वायु

१ हे वायो ! शुक्रः दिविष्टिषु ते मध्वः अग्रं अयामि [१६२८]- हे वायो ! मी निर्दोष होऊन यज्ञ करीत आहें. त्या यज्ञांत तुला सर्वांत प्रथम सोमरस देण्यासाठीं अर्पण करीत आहें.

२ स्पार्हः सोमपीतये आयाहि [१६२८]- प्रशंसनीय असा तूं सोमपान करण्यासाठीं ये.

३ हे वायो ! इन्द्रः च एषां सोमानां पीतिं अर्हथः [१६२९]- हे वायो ! व इन्द्र असे तुम्ही दोघे सोम पिण्याला योग्य आहांत.

४ युवां इन्दवः यन्ति [१६२९]- तुमच्याजवळ सोमरस येत आहेत.

५ हे वायो ! इन्द्रः च शवसः पती शुष्मिणा । नः ऊतये आयातं [१६३०]- हे वायो ! व इन्द्र तुम्ही दोघे फार बलवान् आहांत. आमच्या रक्षणासाठीं या.

वायुची प्रशंसा सर्वत्र होत असते. वायु व इन्द्र हे दोघेहि देव फार सामर्थवान् आहेत, म्हणून यांना प्रथम सोमरस देण्यांत येत असतो. लोकांचें संरक्षण वायु करतो. वायु जर नसेल तर अल्पकाळही कोणताही प्राणी जगूंच शकणार नाहीं. श्वास उच्छ्वास करून मनुष्य जगतो. मनुष्याचें जीवित असें वायुवर अवलंबून आहे. म्हणून सर्व यज्ञामध्यें वायुला पहिलें स्थान दिलें जातें व त्याची पूजा प्रथम होते. वायु शुद्ध असेल तरच प्राण्यांचें जीवन दीर्घकालपर्यंत होणें शक्य आहे. अन्न - पाण्यापेक्षांही वायुची गरज मानवाला फार आहे. नव्हे तर सर्व प्राण्यांना व वनस्पतिंना सुद्धां वायुची आवश्यकता फार आहे. हें वायुचें महत्त्व वरील मंत्रांनीं उत्तम रीतिनें दाखवलें आहे.

सोम

१ विवस्वतः धियः हरिं यातवे हिन्वन्ति [१६३१] - संस्कार करणाऱ्याच्या अंगुली हिरव्या रंगाच्या सोमाला कलशामध्यें जाण्यासाठीं प्रेरणा करतात.

२ अस्य तं मर्जयामसि [१६३२]- या सोमाच्या त्या रसाला आम्हीं शुद्ध करीत आहों.

३ यं सूरयः पुरा च नूनं गावः आसभिः दधुः [१६३२]- ज्या सोमरसाला विद्वान् लोक जसे पूर्वी पीत असत, तसेच सध्यांहि पितात. गाईहि आपल्या तोंडांनीं तो सोम भक्षण करतात.

४ पुनानं पुराण्या गाथया अभ्यनूषत [१६३३]- गाळल्या जाणाऱ्या सोमाची पुरातन स्तोत्रांनीं स्तुति केली जाते.

५ नाम बिभ्रतीः धीतयः देवानां कृपन्त [१६३३]- हवि धारण करणाऱ्या अंगुली देवांसाठीं सोमरस अर्पण करण्यास समर्थ होतात.

सोम कुटला जातो, अंगुलींनीं दाबून त्याचा रस काढला जातो व तो रस कलशांमध्यें भरून ठेवला जातो. नंतर त्यांत पाणी मिसळून तो गाळतात. विद्वान् लोक हा रस पूर्वी जसा पीत होते, तसा सध्यांहि पितात. सोमरस गाळला जात असतां वेदाचीं स्तोत्रें मोठ्यानें म्हटलीं जातात. नंतर तो देवांना दिला जातो व त्यानंतर यज्ञ करणारे सोमरस पितात.

याप्रमाणें सोमाचें वर्णन या अध्यायामध्यें आलें आहे.

सुभाषितें

१ हे सहसः यहो ! विश्वेभिः अग्निभिः इमं यज्ञं इदं वचः, चनः धाः [१६१७]- हे बलाच्या पुत्रा ! सर्व अग्नींसह या यज्ञांत ये, ही स्तुति ऐक व आम्हांला अन्न दे.

२ यत् चित् हि शश्वता तना देवं देवं यजामहे हविः त्वे इत् हूयते [१६१८]- जें काय नेहेमीं हवि अर्पून प्रत्येक देवतेचें यजन आम्ही करीत आहों, तें हवन तुझ्यामध्येंच केलें जात असतें.

३ विश्पतिः होता मन्द्रः वरेण्यः नः प्रियः अस्तु, स्वग्नयः वयं प्रियाः [१६१९]- प्रजांचा पालक, हवन करणारा, सुखदायी असा श्रेष्ठ अग्नि आम्हांला प्रिय होवो. तसेंच उत्तम रीतिनें अग्निला आपल्या घरीं ठेवणारे आम्हीहि त्याला प्रिय होऊं.

४ विश्वतः जनेभ्यः परि इन्द्रं वः हवामहे, अस्माकं केवलः अस्तु [१६२०]- सर्व लोकांमध्यें श्रेष्ठ अशा इन्द्राला तुमच्या हितासाठीं व सहाय्यासाठीं आम्ही बोलावीत आहों. तो इन्द्र केवळ आम्हांलाच लाभ देणारा होवो.

५ ईशानः अप्रतिष्कुतः वृषा ओजसा कृष्टीः इयर्ति [१६२२]- तो सर्वांचा ईश्वर व आमचा प्रतिकार न करणारा बलवान् इन्द्र आपल्या सामर्थ्यानें अनुग्रह करण्यासाठीं मनुष्यांजवळ जातो.

६ हे वसो ! चित्रः त्वं ऊत्या राधांसि नः चोदय [१६२३]- हे निवासक अग्ने ! सुन्दर व दर्शनीय असा तं संरक्षणासह असलेलीं धनें आमच्याकडे पाठव.

७ त्वं अस्य रायः रथीः असि [१६२३]- तूं या धनांना रथांतून आणणारा आहेस.

८ नः तुचे गाधं विदः [१६२३]- आमच्या पुत्रांना प्रतिष्ठेचें स्थान मिळो.

९ अग्ने ! त्वं अप्रयुत्वभिः अदृब्धैः पर्तृभिः तोकं तनयं पर्षि [१६२४]- हे अग्ने ! तूं अविरोधी भावनांनीं युक्त व कोणाकडूनहि दबला न जाणारा आपल्या संरक्षणाच्या साधनांनीं आमच्या पुत्रपौत्रांचें पालन कर.

१० दैव्या हेडांसि नः युयोधि [१६२४]- देवांच्या क्रोधांना आमच्यापासून दूर ठेव.

११ अदेवानि ह्वरांसि च [१६२४]- माणसांचे व राक्षसांचे क्रोधही दूर ठेव.

१२ हे शिपि-विष्ट ! ते तत् अर्यः वयुनानि विद्वान् अद्य प्रशंसामि [१६२६]- हे किरणांनीं व्यापणाऱ्या विष्णो ! त्या तुझ्या नांवाची, श्रेष्ठ व सर्व कर्में जाणणारा ज्ञानी मी, आज प्रशंसा करीत आहें.

१३ सुष्टुतयः मे गिरः त्वा वर्धन्तु [१६२७]- माझ्या उत्तम स्तुति तुझें महात्म्य वाढवोत.

१४ यूयं स्वस्तिभिः नः सदा पात [१६२७]- तुम्ही कल्याण करणाऱ्या साधनांनीं आमचें सदा रक्षण करा.

१५ शवसः पती शुष्मिणा [१६३०]- तुम्ही बलाचे स्वामी व सामर्थ्यवान् आहांत.

१६ नः ऊतये आयातं [१६३०]- आमच्या रक्षणासाठीं या.

१७ शवसा सूनुः अस्माकं मीढ्वान् बभूयात् [१६३५]- तो बलाचा पुत्र आम्हांला सुख देणारा होवो.

१८ विश्वायुः दूरात् च आसात् च अघायोः मर्त्यात् नः सदं इत् निपाहि [१६३६]- सर्व मानवांचें हित करणारा तूं दुरून व जवळून पापी मनुष्यांपासून सर्वदा आमचें संरक्षण कर.

१९ हे इन्द्र ! प्रतूर्तिषु विश्वाः स्पृधः अभि असि [१६३७]- हे इन्द्रा ! तूं सर्व युद्धांमध्यें सर्व स्पर्धा करणाऱ्या शत्रूंचा पराभव करतोस.

२० तूर्य ! त्वं अशस्तिहा जनिता वृत्र-तूः तरुष्यतः असि [१६३७]- हे त्वरेनें शत्रूंना दूर करणाऱ्या इन्द्रा ! तूं विपत्तींना दूर करणारा, संपत्तिचा उत्पादक, शत्रूंचा विनाशक व बाधा करणाऱ्या शत्रूंना दूर करणारा आहेस.

२१ तुरयन्तं ते शुष्मं [१६३८]- शत्रूंचा नाश करणारें तुझें बल आहे.

२२ यत् वृत्रं तूर्वसि, ते मन्यवे विश्वाः स्पृधः श्नथयन्त [१६३८]- जेव्हां तूं वृत्राचा वध करतोस, तेव्हां तुझ्या क्रोधापुढें सर्व स्पर्धा करणारे शत्रू खिन्न होऊन जातात.

२३ इन्द्रः यत् वलं अभिनत् रोचना अन्तरिक्षं वि अतिरत् [१६४०]- इन्द्रानें जेव्हां वल राक्षसाला विदीर्ण केलें, तेव्हां त्यानें तेजस्वी अन्तरिक्षाला विशेष तेजस्वी केलें.

२४ गुहा सतीः गाः आविष्कृण्वन् वलं अर्वाचं नुनुदे [१६४१]- गुहेमध्यें ठेवलेल्या गाई इन्द्रानें बाहेर काढल्या व गुहेंत त्यांना ठेवणाऱ्या वल राक्षसाला खालीं तोंड करून पळावयास लावलें.

२५ सत्रासाहं विश्वासु गीर्षु आयतं त्यं ऊतये आ च्यावयसि [१६४२]- अनंत शत्रूंना एकदम मारणाऱ्या सर्व स्तोत्रांनीं वर्णिलेल्या त्या इन्द्राला आमच्या संरक्षणासाठीं आमच्याजवळ येऊं दे.

२६ युध्मं सन्तं अनर्वाणं अनपच्युतं अवार्यक्रतुं नरं [१६४३]- युद्ध करणाऱ्या, पण कधींहि पराभूत न होणाऱ्या, न ढवळ्या जाणाऱ्या, ज्याचा कार्यक्रम कोणी बदलूं शकत नाहीं अशा वीर नेत्या इन्द्राला आम्ही सहाय्यासाठीं बोलावीत आहों.

२७ हे ऋचीषम इन्द्र ! विद्वान् रायः नः पुरु शिक्ष, पार्ये धने नः अव [१६४४]- हे सुन्दर इन्द्रा ! सर्व जाणणारा तूं धन घेऊन त्यापैकीं आम्हांला पुष्कळसें दे व शत्रूकडील धन आणून त्यानें आमचें रक्षण कर.

२८ धिषणा त्यत् बृहत् इन्द्रियं तव दक्षं उत क्रतुं वरेण्यं वज्रं शिशाति [१६४५]- तुझी बुद्धि तुझ्या बलाला, तुझ्या दक्षतेला, तुझ्या कार्याला व तुझ्या श्रेष्ठ वज्राला तीक्ष्ण करते.

२९ हे इन्द्र ! द्यौः तव पौंस्यं पृथिवी श्रवः वर्धति [१६४६]- हे इन्द्रा ! द्युलोक तुझ्या पौरुषाला, पृथिवी तुझ्या यशाला वाढवते.

३० बृहत् क्षयः गृणाति [१६४७]- मोठें घर देणारा म्हणून तुझी स्तुति होत आहे.

३१ हे अग्ने देव ! कृष्टयः ओजसे ते नमः गृणन्ति, अमैः अमित्रं अर्दय [१६४८]- हे अग्निदेवा ! मनुष्य बल प्राप्त व्हावें यासाठीं तुला नमस्कार करून तुझी स्तुति करतात. आपल्या बलांनीं तूं शत्रूंचा नाश कर.

३२ हे अग्ने ! नः गविष्टये कुवित् सु-रयिं सं-वेविषः उरुकृत् नः उरुकृधि [१६४९]- हे अग्ने ! आम्हांला गाई मिळाव्या म्हणून तूं आम्हांला पुष्कळ धन दे. तूं महात्म्य वाढवणारा आम्हांला मोठे कर.

३३ हे अग्ने ! नः महाधने मा परावर्क् । संवर्गं रयिं संजय [१६५०]- हे अग्ने ! आम्हांला संग्रामांमध्यें दूर करूं नकोस. एकत्र करून व जिंकून धन आण.

३४ विश्वाः विशः कृष्टयः अस्य मन्यवे सं नमन्त [१६५१]- सर्व प्रजाजन याच्या क्रोधापुढें नमून राहतात.

३५ दोधतः वृत्रस्य शिरः वृष्णिना शतपर्वणा वज्रेण वि बिभेद [१६५२]- जगाला कांपवणाऱ्या वृत्राचें डोकें इन्द्रानें शेंकडों धारा असलेल्या वज्रानें फोडलें.

३६ अस्य तत् ओजः तित्विषे, यत् इन्द्रः उभे रोदसी चर्म इव समवर्तयत् [१६५३]- याचें तें सामर्थ्य चमकूं लागलें, ज्या बलानें इन्द्रानें द्यु व पृथिवीला चामड्याप्रमाणें गुंडाळून ठेवलें.

३७ दशभिः शृंगेभिः इव दिशन् आपस्य मध्ये तिष्ठति, शीर्षाणि निमृद्वम् [१६५६]- दहा अंगुलींनीं आम्हाला हवें तें धन देत, आमच्या यज्ञामध्यें इन्द्र उभा आहे. हे लोक हो ! त्याच्या पुढें आपलीं मस्तकें नम्र करा.

उपमा

१ वंसगः यूथा इव [१६२२]- जसा बैल कळपामध्यें जातो, तसा (वृषा ओजसा कृष्टीः इयर्ति) बलवान् इन्द्र आपल्या सामर्थ्यानें मानवी समूहामध्यें - यज्ञामध्यें - जातो.

२ निम्नं आपः न [१६२९]- ज्याप्रमाणें सखल जागेकडे पाण्याचे प्रवाह जातात, त्याप्रमाणें (युवां इन्दवः यन्ति) तुमच्याजवळ सोमरस जातात.

३ वारवन्तं अश्वं न [१६३४]- अयाळ असलेल्या घोड्यावर बसणारे लोक प्रेम करतात, त्याप्रमाणें (अग्निं नमोभिः वन्दध्यै) अग्निला यज्ञकर्ते हवि अर्पण करून प्रेम करतात.

४ मातरा शिशुं न [१६३८]- ज्याप्रमाणें आया आपल्या मुलाच्या मागून जातात, त्याप्रमाणें (क्षोणी) द्यावा-पृथिवी इन्द्राच्या अनुकूल वागतात.

५ यथा भारभृत् [१६५०]- जसा ओझें उचलणारा हमाल ओझें पोंचवतो, त्याप्रमाणें (रयिं संजय) धन तूं जिंकून आण.

६ समुद्राय सिन्धवः न [१६५१]- जशा समुद्राला नद्या नम्रतेनें मिळतात, त्याप्रमाणें (विश्वाः विशः अस्य मन्यवे सं नमन्त) सर्व प्रजा या इन्द्राच्या क्रोधापुढें नम्र होऊन राहतात.

७ चर्म इव [१६५३]- चमड्याप्रमाणें (उभे रोदसी समवर्तयत्) द्यु व पृथिवी या दोघांना इन्द्रानें गुंडाळून ठेवलें.

सप्तदशाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
१६१७	१।२६।१०	शुनःशेप आजीगर्तिः	अग्निः	गायत्री
१६१८	१।२६।६	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१६१९	१।२६।७	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१६२०	१।७।१०	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	इन्द्रः	,,
१६२१	१।७।९	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
१६२२	१।७।८	मधुच्छन्दा वैश्वामित्रः	,,	,,
१६२३	६।४८।९	शंयुर्बार्हस्पत्यः (तृणपाणिः)	अग्निः	प्रगाथः-(विषमा बृहती, समा सतोबृहती)
१६२४	६।४८।१०	शंयुर्बार्हस्पत्यः (तृणपाणिः)	,,	,,
१६२५	७।१००।६	वसिष्ठो मैत्रावरुणिः	विष्णुः	त्रिष्टुप्
१६२६	७।१००।५	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१६२७	७।१००।७	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
		(२)		
१६२८	४।४७।१	वामदेवो गौतमः	वायुः	अनुष्टुप्
१६२९	४।४७।२	वामदेवो गौतमः	इन्द्रवायू	,,
१६३०	४।४७।३	वामदेवो गौतमः	,,	,,
१६३१	९।९९।२	रेभसूनू काश्यपौ	पवमानः सोमः	,,
१६३२	९।९९।३	रेभसूनू काश्यपौ	,,	,,
१६३३	९।९९।४	रेभसूनू काश्यपौ	,,	,,
१६३४	१।२७।१	शुनःशेप आजीगर्तिः	अग्निः	गायत्री
१६३५	१।२७।२	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१६३६	१।२७।३	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,

*

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१६३७	८।९९।५	नृमेध आंगिरसः	इन्द्रः	प्रगाथः=(विषमा बृहती, समा सतोबृहती
१६३८	८।९९।६	नृमेध आंगिरसः	,,	,,
		(३)		
१६३९	८।१४।५	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	इन्द्रः	गायत्री
१६४०	८।१४।७	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	,,	,,
१६४१	८।१४।८	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	,,	,,
१६४२	८।९२।७	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
१६४३	८।९२।८	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
१६४४	८।९२।९	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
१६४५	८।१५।७	विरूप आंगिरसः	,,	उष्णिक्
१६४६	८।१५।८	विरूप आंगिरसः	,,	,,
१६४७	८।१५।९	विरूप आंगिरसः	,,	,,
		(४)		
१६४८	८।७५।१०	विरूप आंगिरसः	अग्निः	गायत्री
१६४९	८।७५।११	विरूप आंगिरसः	,,	,,
१६५०	८।७५।१२	विरूप आंगिरसः	,,	,,
१६५१	८।६।४	वत्सः काण्वः	इन्द्रः	,,
१६५२	८।६।६	वत्सः काण्वः	,,	,,
१६५३	८।६।५	वत्सः काण्वः	,,	,,
१६५४	—	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१६५५	—	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१६५६	—	शुनःशेपः आजीगर्तिः	,,	,,

अथाष्टादशोऽध्यायः ।

अथाष्टमप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ ८-२ ॥

[१]

(१-१९) १ मेधातिथिः काण्वः प्रियमेधश्चांगिरसः; २ श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः; ३ शुनःशेप आजीगर्तिः; ४ शंयुर्बार्हस्पत्यः; ५ मेधातिथिः काण्वः; ६, ९ वसिष्ठो मैत्रावरुणिः; ७ वालखिल्यम् (आयुः काण्वः); ८ अम्बरिषो वार्षागिरः, ऋजिश्वा भारद्वाजश्च; १० विश्वमना वैयश्वः; ११ सोभरिः काण्वः; १२ सप्तर्षयः (१ भरद्वाजो बार्हस्पत्यः, २ काश्यपो मारीचः, ३ गोतमो राहूगणः; ४ अत्रिर्भौमः, ५ विश्वामित्रो गाथिनः, ६ जमदग्निर्भार्गवः, ७ वसिष्ठो मैत्रावरुणिः); १३ कलिः प्रागाथः; १४, १७ विश्वामित्रः प्रागाथः; १५ मेध्यातिथिः काण्वः, १६ निध्रुविः काश्यपः; १८ भरद्वाजो बार्हस्पत्यः ॥ १-२, ४, ६ ७, ९-१०, १३, १५ इन्द्रः; ३, ११, १८, १९ अग्निः; ५ विष्णुः, ५ (६) देवो वा; ८, १२, १६ पवमानः सोमः; १४, १७ इन्द्राग्नी ॥ १-५, १४, १५-१८, १९ गायत्री; ६, ७, ९, १२, १३ प्रगाथः- (विषमा बृहती, समा सतोबृहती); ८ अनुष्टुप् १० उष्णिक्, ११ काकुभः प्रगाथः= (विषमा ककुप्, समा सतोबृहती); १५ बृहती ॥

१६५७ पन्यंपन्यमित्सोतार आ धावत मद्याय । सोमं वीराय शूराय ॥ १ ॥ (ऋ. ८।२।२५)

१६५८ एह हरी ब्रह्मयुजा शग्मा वक्षतः सखायम् । इन्द्रं गीर्भिर्गिर्वणसम् ॥२॥ (ऋ. ८।२।२७)

१६५९ पाता वृत्रहा सुतमा घा गमन्नारे अस्मत् । नि यमते शतमूतिः ॥ ३ ॥ १ (ति) ॥

[धा० १४ । उ १ । स्व० ३] (ऋ. ८।२।२६)

१६६० आ त्वा विशन्त्विन्दवः समुद्रमिव सिन्धवः । न त्वामिन्द्राति रिच्यते ॥ १ ॥

(ऋ. ८।९२।२२)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१६५७] हे (सोतारः) सोमरस काढणाऱ्या यजकांनों ! (मद्याय वीराय) प्रसन्न व पराक्रमी (शूराय) शूर इन्द्राजवळ (पन्यं पन्यं इत् सोमं) प्रशंसनीय सोमरसाला (आ धावत) पोंचवा. ॥ १ ॥

[१६५८] (ब्रह्मयुजा शग्मा) शब्दांच्या इशाऱ्यानें जोडले जाणारे सुख देणारे (हरी) इन्द्राचे दोन घोडे (इह) या यज्ञांत (सखायं गिर्वणसं इन्द्रं) मित्र व स्तुत्य इन्द्राला (आवक्षतः) घेऊन येवोत. ॥ २ ॥

[१६५९] (सुतं पाता वृत्र-हा) सोम पिणारा वृत्रवधकर्ता इन्द्र (अस्मत् आरे) आमच्याजवळ (घ आगमत्) अवश्य येवो. (शतं ऊतिः) शेंकडों साधनांनीं संरक्षण करणारा इन्द्र (नियमते) शत्रूंना दूर करो. ॥ ३ ॥

[१६६०] हे (इन्द्र) इन्द्रा ! (इन्दवः त्वा आ विशन्तु) सोमरस तुला प्राप्त होवोत. (सिन्धवः समुद्रं इव) जशा नद्या समुद्राला मिळतात. हे इन्द्रा ! (त्वां न अतिरिच्यते) तुझ्यापेक्षां कोणीहि अधिक श्रेष्ठ नाहीं. ॥१॥

१६६१ विव्यक्थ महिना वृषन्भक्षं सोमस्य जागृवे । य इन्द्र जठरेषु ते ॥२॥ (ऋ. ८।९२।२३)

१६६२ अरं त इन्द्र कुक्षये सोमो भवतु वृत्रहन् । अरं धामभ्य इन्दवः ॥ ३ ॥ २ (क) ॥

[धा० ११ । उ० १ । स्व० १] (ऋ. ८।९२।२४)

१६६३ जराबोध तद्विविड्ढि विशेविशे यज्ञियाय । स्तोमं रुद्राय दृशीकम् ॥१॥ (ऋ. १।२७।१०)

१६६४ स नो महाँ अनिमानो धूमकेतुः पुरुश्चन्द्रः । धिये वाजाय हिन्वतु ॥२॥ (ऋ. १।२७।११)

१६६५ स रेवाँ इव विश्पतिर्दैव्यः केतुः शृणोतु नः । उक्थैरग्निर्बृहद्भानुः ॥ ३ ॥ ३ (ह) ॥

[धा० ११ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. १।२७।१२)

१६६६ तद्वो गाय सुते सचा पुरुहूताय सत्वने । शं यद्गवे न शाकिने ॥ १ ॥ (ऋ. ६।४५।२२)

१६६७ न घा वसुर्नि यमते दानं वाजस्य गोमतः । यत्सीमुपश्रवद्गिरः ॥२॥ (ऋ. ६।४५।२३)

१६६८ कुवित्सस्य प्र हि व्रजं गोमन्तं दस्युहा गमत् । शचीभिरप नो वरत् ॥३॥ ४ (फी) ॥

[धा० १९ । उ २ । स्व० ४] (ऋ. ६।४५।२४)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[१६६१] हे (वृषन् जागृवे) बलवान् व जाग्रत राहणाऱ्या इन्द्रा ! तूं (सोमस्य भक्षं) सोम पिण्यासाठीं (महिना विव्यक्थ) आपल्या महात्म्यानें सर्वत्र व्यापून राहतोस. हे (इन्द्र) इन्द्रा ! (यः ते जठरेषु) जो सोम तुझ्या पोटांत जातो. ॥ २ ॥

[१६६२] हे (वृत्रहन् इन्द्र) वृत्रनाशक इन्द्रा ! (सोमः ते कुक्षये अरं भवतु) आम्ही दिलेला सोम तुझ्या कुशींमध्यें पुरेसा होवो. (इन्दवः धामभ्यः अरं) सोमरस सर्व देवतांना पुरेसे होवोत. ॥ ३ ॥

[१६६३] हे (जराबोध) स्तुतीनें जागृत होणाऱ्या अग्ने ! (विशे विशे) प्रत्येक प्रजाजनाच्या हितासाठीं (यज्ञियाय) यज्ञ सिद्ध करण्याकरितां (तत् विविड्ढि) त्या यज्ञशालेंत प्रवेश कर. (रुद्राय दृशीकं स्तोमं) रुद्र-स्वरूपी अग्निसाठीं सुंदर स्तोत्र म्हणावें. ॥ १ ॥

[१६६४] (महान् अनिमानः) मोठा व अमाप (धूमकेतुः पुरुश्चन्द्रः सः) धूर हा ज्याचा ध्वजच आहे असा, पुष्कळ आनन्द देणारा, तो अग्नि (नः धिये वाजाय हिन्वतु) आम्हांला ज्ञान व अन्न प्राप्त करण्यासाठीं प्रेरित करो. ॥ २ ॥

[१६६५] (दैव्यः विश्पतिः) दिव्य प्रजापालक (बृहद्भानुः केतुः सः) मोठा प्रकाशमान् व ध्वजासारखा असणारा तो अग्नि (रेवान् इव) धनवान् राजाप्रमाणें (नः उक्थैः शृणोतु) आमचीं स्तोत्रें ऐको. ॥ ३ ॥

[१६६६] हे स्तुति करणाऱ्यांनों ! (सुते) सोमाचा रस काढल्यानंतर (वः) तुम्ही (पुरु-हूताय सत्वने) पुष्कळांनीं स्तविलेल्या सत्ववान् अशा इन्द्रासाठीं (तत् सचा गाय) तें स्तोत्र एकत्र जमून गा. (यत् गवे न) जसें गाईला गवत सुखकारक होतें, त्याप्रमाणें (शाकिने शं) शक्तिमान् इन्द्राला तें स्तोत्र आनंददायक होतें. ॥ १ ॥

[१६६७] (यत् सीं) जर तो इन्द्र (गिरः उप श्रवत्) आमच्या स्तुति ऐकेल तर (वसुः) सर्वांच्या निवासक इन्द्राला (गोमतः वाजस्य दानं) गाईंनीं युक्त अन्नाचें दान करण्यापासून (न घ नियमते) कोणीहि प्रतिबंध करूं शकत नाहीं. ॥ २ ॥

[१६६८] (दस्यु-हा) शत्रूंना मारणारा इन्द्र (कुवित्सस्य) पुष्कळ हिंसा करणाऱ्या असुराच्या (गोमन्तं व्रजं प्रागमत्) गाईंनीं भरलेल्या गोठ्यावर आपला अधिकार करतो, तेव्हां (हि शचीभिः) आपल्या शक्तींनीं (नः [गाः] अपवरत्) तो आमच्या गाई प्राप्त करून देतो. ॥ ३ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२]

१६६९ इदं विष्णुर्वि चक्रमे त्रेधा नि दधे पदम् । समूढमस्य पाꣳसुले ॥ १ ॥ (ऋ. १।२२।१७)

१६७० त्रीणि पदा वि चक्रमे विष्णुर्गोपा अदाभ्यः । अतो धर्माणि धारयन् ॥ २ ॥
(ऋ. १।२२।१८)

१६७१ विष्णोः कर्माणि पश्यत यतो व्रतानि पस्पशे । इन्द्रस्य युज्यः सखा ॥ ३ ॥
(ऋ. १।२२।१९)

१६७२ तद्विष्णोः परमं पदꣳ सदा पश्यन्ति सूरयः । दिवीव चक्षुराततम् ॥४॥ (ऋ. १।२२।२०)

१६७३ तद्विप्रासो विपन्यवो जागृवाꣳसः समिन्धते । विष्णोर्यत्परमं पदम् ॥५॥ (ऋ. १।२२।२१)

१६७४ अतो देवा अवन्तु नो यतो विष्णुर्विचक्रमे । पृथिव्या अधि सानवि ॥ ६ ॥ (ह्रू) ॥
[धा० ३२ । उ० २ । स्व० ६] (ऋ. १।२२।१६)

१६७५ मो षु त्वा वाघतश्च नारे अस्मन्नि रीरमन् ।
आरात्ताद्वा सधमादं न आ गहीह वा सन्नुप श्रुधि ॥ १ ॥ (ऋ ७।३२।१)

---

[२] द्वितीयः खण्डः ।

[१६६९] (विष्णुः इदं विचक्रमे) विष्णूनें जेव्हां या जगामध्यें पराक्रम केले, तेव्हां त्यानें (त्रेधा पदं निदधे) तीन प्रकारांनीं आपला पाय तेथें ठेवला. (अस्य पांसुले समूढम्) याच्या धूलियुक्त पायाच्या ठिकाणीं सर्व जगत् राहिलें आहे. ॥ १ ॥

[१६७०] (अ-दाभ्यः गोपाः विष्णुः) न दबला जाणारा रक्षक विष्णु (अतः धर्माणि धारयन्) तेथूनच सर्वांच्या कर्तव्याचें पोषण करीत (त्रीणि पदा विचक्रमे) आपल्या तीन पायांनीं सर्व जगत् आक्रमण करीत आहे. ॥ २॥

[१६७१] हे मनुष्य हो ! (विष्णोः कर्माणि पश्यत) विष्णुच्या पुरुषार्थांना पहा (यतः व्रतानि पस्पशे) ज्याच्यामुळें सर्व व्रतें - कर्मे चालत आहेत. तो विष्णु (इन्द्रस्य युज्यः सखा) इन्द्राचा योग्य मित्र आहे. ॥ ३ ॥

[१६७२] (सूरयः) विद्वान् (विष्णोः तत् परमं पदं) विष्णुचें तें श्रेष्ठ स्थान (सदा पश्यन्ति) नेहमीं पाहतात. (दिवि आततं चक्षुः इव) आकाशांत प्रकाशानें पसरलेला जसा नेत्ररूपी सूर्य पहातात तसेंच त्या श्रेष्ठ स्थानाला विद्वान् लोक पाहतात. ॥ ४ ॥

[१६७३] (विष्णोः तत् परमं पदं) विष्णुच्या त्या श्रेष्ठ स्थानाला (विप्रासः जागृवांसः विपन्यवः) ज्ञानी जागृत व स्तुति करणारे (यत् समिन्धते) प्रदीप्त करतात. ॥ ५ ॥

[१६७४] (विष्णुः पृथिव्याः अधिसानवि) विष्णु पृथिवीवरील अत्यन्त उच्च स्थानामध्यें (यतः विचक्रमे) जेथून आपला विक्रम करतो (अतः) त्या स्थानापासून (देवाः नः अवन्तु) सर्व देव आमचें रक्षण करोत. ॥ ६ ॥

[१६७५] हे इन्द्रा ! (त्वा) तुला (वाघतः च न) स्तुति करणारे (अस्मत् आरे) आमच्यापासून दूर (मा नि रीरमन्) न रममाण करोत. म्हणून तूं (आरात्तात् वा) दूर असलास तरी (नः सधमादं आगहि) आमच्या यज्ञाच्या ठिकाणीं ये व (इह वा सन्) येथें असलास तर (उप श्रुधि) आमची स्तुति ऐक. ॥ १ ॥

१६७६ इमे हि ते ब्रह्मकृतः सुते सचा मधौ न मक्ष आसते ।
इन्द्रे कामं जरितारो वसूयवो रथे न पादमा दधुः ॥ २ ॥ ६ (डी) ॥
[धा० १३ । उ० ४ । स्व० ४] (ऋ. ७।३२।२)

१६७७ अस्तावि मन्म पूर्व्यं ब्रह्मेन्द्राय वोचत ।
पूर्वीर्ऋतस्य बृहतीरनूषत स्तोतुर्मेधा असृक्षत ॥ १ ॥ (ऋ. ८।५२।९)

१६७८ समिन्द्रो रायो बृहतीरधूनुत सं क्षोणी समु सूर्यम् ।
सꣳशुक्रासः शुचयः सं गवाशिरः सोमा इन्द्रममन्दिषुः ॥ २ ॥ ७ (ठा) ॥
[धा० १३ । उ० २ । स्व० २] (ऋ. ८।५२।१०)

१६७९ इन्द्राय सोम पातवे वृत्रघ्ने परि षिच्यसे । नरे च दक्षिणावते वीराय सदनासदे ॥ १ ॥
(ऋ. ९।९८।१०)

१६८० तꣳसखायः पुरूरुचं वयं यूयं च सूरयः । अश्याम वाजगन्ध्यꣳ सनेम वाजपस्त्यम् ॥२॥
(ऋ. ९।९८।१२)

[१६७६] हे इन्द्रा ! (ते सुते) तुझ्यासाठीं सोमरस काढल्यानंतर (ब्रह्म-कृतः) स्तोत्र म्हणणारे ऋत्विज (मधौ मक्षः न) मधासाठीं माशा जशा एकत्र जमतात, त्याप्रमाणें (सचा आसते) एकत्र बसतात. (वसूयवः जरितारः) धनाची इच्छा करणारे स्तुतिपाठक (कामं) आपल्या इष्ट फलाला (रथे पादं न) रथामध्यें पाय ठेवावा त्याप्रमाणें (आदधुः) धारण करतात. ॥ २ ॥

[१६७७] (अस्तावि) आम्ही इन्द्राची स्तुति केली. हे ऋत्विज हो ! त्या (इन्द्राय) इन्द्रासाठीं (पूर्व्यं मन्म ब्रह्म वोचत) पूर्वीचें मननीय स्तोत्र म्हणा. तसेंच (पूर्वीः ऋतस्य बृहतीः अनूषत) पूर्वीचें यज्ञांचें बृहती छन्दांतील सामगान म्हणा. (स्तोतुः मेधाः असृक्षत) स्तुति करणाराला अशा बुद्धि दे. ॥ १ ॥

[१६७८] (इन्द्रः) इन्द्र (बृहतीः रायः) पुष्कळ धन (सं अधूनुत) आम्हांला देवो. (क्षोणीः सं) भूमि आम्हांला देवो. (सूर्यं सं) सूर्यप्रकाश आम्हांला प्राप्त होवो. (शुचयः शुक्रासः इन्द्रं सं) शुद्ध केलेला सोम इन्द्राला प्राप्त होवो. (गवाशिरः सोमाः इन्द्रं अमन्दिषुः) गोदुग्धामध्यें मिसळलेले सोमरस इन्द्राला प्रसन्न करोत. ॥ २ ॥

[१६७९] हे (सोम) सोमा ! (वृत्रघ्ने इन्द्राय पातवे) वृत्राला मारणाऱ्या इन्द्राला पिण्याला देण्यासाठीं (परि षिच्यसे) तूं कलशामध्यें भरला जात आहेस. (दक्षिणावते) दक्षिणा देणाऱ्या (वीराय) वीर इन्द्राला देण्यासाठीं (सदना-सदे) यज्ञशालेंत बसणाऱ्या (नरे) नेत्या यजमानाला मिळावा यासाठीं कलशामध्यें भरला जात आहेस. ॥ १ ॥

[१६८०] हे (सखायः) स्तुति करणाऱ्यांनों ! (यूयं सूरयः) तुम्ही विद्वान् (वयं च) आणि आम्ही (तं पुरूरुचं वाजगन्ध्यं अश्याम) त्या अति तेजस्वी श्रेष्ठ सुगंध असणाऱ्या सोमाला पिऊं या. (वाजपस्त्यं सनेम) बल वाढवणाऱ्या सोमाला पिऊं या. ॥ २ ॥

१६८१ परि त्यꣳ हर्यतꣳ हरिं बभ्रुं पुनन्ति वारेण ।
यो देवान् विश्वाꣳ इत् परि मदेन सह गच्छति ॥ ३ ॥ ८ (हा) ॥
[धा० १६ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ९।९८।७)

१६८२ कस्तमिन्द्र त्वा वसवा मर्त्यो दधर्षति ।
श्रद्धा इत् ते मघवन् पार्ये दिवि वाजी वाजं सिषासति ॥ १ ॥ (ऋ. ७।३२।१४)

१६८३ मघोनः स्म वृत्रहत्येषु चोदय ये ददति प्रिया वसु ।
तव प्रणीती हर्यश्व सूरिभिर्विश्वा तरेम दुरिता ॥ २ ॥ ९ (यि) ॥
[धा० १७ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ७।३२।१५)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

१६८४ एदु मधोर्मदिन्तरꣳसिश्चाध्वर्यो अन्धसः । एवा हि वीर स्तवते सदावृधः ॥ १ ॥
(ऋ. ८।२४।१६)

१६८५ इन्द्र स्थातर्हरीणां न किष्टे पूर्व्यस्तुतिम् । उदानꣳश शवसा न भन्दना ॥ २ ॥
(ऋ. ८।२४।१७)

[१६८१] (हर्यतं हरिं बभ्रुं त्यं) मनोहर, दुःख हरण करणाऱ्या व भरणपोषण करणाऱ्या त्या सोमाला (वारेण परि पुनन्ति) गाळणीनें ते गाळीत आहेत. (यः विश्वान् देवान्) जो सर्व देवांना (मदेन सह इत्) आनंदानेंच (परि गच्छति) प्राप्त होत असतो. ॥ ३ ॥

[१६८२] हे (वसो इन्द्र) निवासक इन्द्रा ! (तं त्वा) त्या तुला (कः आदधर्षति) कोण बरें धमकी देत आहे ? हे (मघवन्) इन्द्रा ! (ते श्रद्धा) तुझ्यावर जो श्रद्धा ठेवतो तो (वाजी) बलवान् हवि घेऊन (पार्ये दिवि) सोमरस काढण्याच्या दिवशीं (वाजं सिषासति) अन्नाचें दान करण्याची इच्छा करीत असतो. ॥ १ ॥

[१६८३] हे इन्द्रा ! (मघोनः) धनवान् अशा तुझ्यासाठीं (प्रिया वसु ये ददति) प्रिय धन-हवि-जे देतात, त्यांना (वृत्रहत्येषु चोदय) युद्धांमध्यें जाण्याचा उत्साह दे. हे (हर्यश्व) उत्तम घोडे बाळगणाऱ्या इन्द्रा ! (तव प्रणीती) तुझ्या प्रेरणेनें (सूरिभिः) विद्वानांबरोबर (विश्वा दुरिता तरेम) सर्व पापांपासून आम्ही मुक्त होऊं. ॥५॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[१६८४] हे (अध्वर्यो) अध्वर्यु ! (मधोः अन्धसः) मधुर सोमाचा आनंददायक रस (मदिन्तरं इत्) अत्यंत हर्षाला प्राप्त होणाऱ्या इन्द्राजवळ (आसिंच) ठेव. (सदावृधः वीरः एव हि स्तवते) आपल्या बलानें सदा वाढत राहणारा वीर इन्द्रच स्तविला जात आहे. ॥ १ ॥

[१६८५] हे (हरीणां स्थातः इन्द्र) घोडे जवळ बाळगणाऱ्या इन्द्रा ! (ते पूर्व्य-स्तुतिं) तुझी पूर्वी केली गेलेली स्तुति (शवसा न किः उदानंश) आपल्या बलानें दुसरा कोणीहि प्राप्त करूं शकत नाहीं. तसेंच (भन्दना न) तुझें तेजही कोणी प्राप्त करूं शकत नाहीं. ॥ २ ॥

१६८६ तं वो वाजानां पतिमहूमहि श्रवस्यवः । अप्रायुभिर्यज्ञेभिर्वावृधेन्यम् ॥३॥ १० (क) ॥

[धा० १६ । उ० १ । स्व० १] (ऋ. ८।२४।१८)

१६८७ तं गूर्धया स्वर्णरं देवासो देवमरतिं दधन्विरे । देवत्रा हव्यमूहिषे ॥ १ ॥ ऋ. ८।१९।१)

१६८८ विभूतरातिं विप्र चित्रशोचिषमग्निमीडिष्व यन्तुरम् ।
अस्य मेधस्य सोम्यस्य सोभरे प्रेमध्वराय पूर्व्यम् ॥ २ ॥ ११ (या) ॥

[धा० १७ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ८।१९।२)

१६८९ आ सोम स्वानो अद्रिभिस्तिरो वाराण्यव्यया ।
जनो न पुरि चम्वोर्विशद्धरिः सदो वनेषु दध्रिषे ॥ १ ॥ (ऋ. ९।१०७।१०)

१६९० स मामृजे तिरो अण्वानि मेष्यो मीढ्वान्त्सप्तिर्न वाजयुः ।
अनुमाद्यः पवमानो मनीषिभिः सोमो विप्रेभिर्ऋक्वभिः ॥ २ ॥ १२ (तु) ॥

[धा० १४ । उ० १ । स्व० ५] (ऋ. ९।१०७।११)

१६९१ वयमेनमिदा ह्योऽपीपेमेह वज्रिणम् । तस्मा उ अद्य सवने सुतं भरा नूनं भूषत श्रुते ॥१॥

(ऋ. ८।६६।७)

[१६८६] (श्रवस्यवः) यश इच्छिणारे आम्ही (वाजानां पतिं) बलांचा स्वामी (अप्रायुभिः यज्ञेभिः वावृधेन्यं) न चुकतां केलेल्या यज्ञांनीं वाढणाऱ्या (वः तं) तुमच्या त्या इन्द्राला (अहूमहि) सहाय्यासाठीं बोलावीत आहों. ॥ ३ ॥

[१६८७] (स्वः-नरं तं गूर्धय) स्वर्गामधील नेता अशा त्या अग्निची स्तुति कर. (देवासः देवं अरतिं दधन्विरे) स्तुति करणारे ऋत्विज दिव्य धनाला प्राप्त करतात. हे अग्ने ! तूं (हव्यं देवत्रा ऊहिषे) हविला देवांकडे पोंचव. ॥ १ ॥

[१६८८] हे (सोभरे विप्र) सोभरे ऋषे ! (विभूतरातिं चित्रशोचिषं) पुष्कळ दान देणाऱ्या विशेष प्रकाशमान् (सोम्यस्य अस्य यन्तुरं) या सोमयागाचा चालक अशा (पूर्व्यं अग्निं) प्राचीन अग्निची (अध्वराय ईं ईडिष्व) यज्ञ करण्यासाठीं स्तुति कर. ॥ २ ॥

[१६८९] हे (सोम) सोमा ! (अद्रिभिः स्वानः) दगडांनीं कुटून रस काढलेला (अव्यया वाराणि तिरः आ) मेंढीच्या लोंकरीच्या गाळणींतून गाळला जाऊन (हरिः चम्वोः विशत्) हिरव्या रंगाचा सोम कलशामध्यें उतरत आहे. (पुरि जनः न) नगरामध्यें जसा कोणी माणूस जातो, त्याप्रमाणें हा सोम (वनेषु सदः दध्रिषे) लांकडाच्या पात्रामध्यें आपलें स्थान करीत आहे. ॥ १ ॥

[१६९०] (वाजयुः) बल वाढवणारा (मीढ्वान् सप्तिः न अनुमाद्यः) वीर्यवान् घोड्याप्रमाणें प्रेम करण्यास योग्य (सः पवमानः सोमः) तो गाळला जाणारा सोम (मनीषिभिः मेष्यः अण्वानि तिरः) विद्वानांकडून मेंढीच्या लोंकरीच्या चाळणींमधून गाळला जात असतां (ऋक्वभिः विप्रेभिः मामृजे) ऋत्विज विप्रांकडून स्तुति केली जात असतां शुद्ध होत आहे. ॥ २ ॥

[१६९१] (वयं एनं वज्रिणं) आम्ही ह्या वज्रधारी इन्द्राला (इदा ह्यः इह) यावेळीं आणि पूर्व समयींहि या यज्ञामध्यें (अपीपेम) या सोमानें तृप्त करीत आहों, (तस्मा उ) या इन्द्रासाठींच (अद्य सवने) या यज्ञामध्यें (सुतं भर) सोमरस अर्पण करा. (नूनं श्रुते आभूषत) खरोखर स्तोत्रपाठ ऐकण्यासाठीं तो येथें येवो. ॥ १ ॥

१६९२ वृकश्चिदस्य वारण उरामथिरा वयुनेषु भूषति ।
मेमं न स्तोमं जुजुषाण आ गहीन्द्र प्र चित्रया धिया ॥ २ ॥ १३ (ख) ॥
[धा० १६ । उ० २ । स्व० २] (ऋ. ८।६६।८)

१६९३ इन्द्राग्नी रोचना दिवः परि वाजेषु भूषथः । तद्वां चेति प्र वीर्यम् ॥ १ ॥ (ऋ. ३।१२।९)

१६९४ इन्द्राग्नी अपसस्पर्युप प्र यन्ति धीतयः । ऋतस्य पथ्या३ अनु ॥ २ ॥ (ऋ. ३।१२।७)

१६९५ इन्द्राग्नी तविषाणि वां सधस्थानि प्रयांसि च । युवोरप्तूर्यं हितम् ॥ ३ ॥ १४ (क) ॥
[धा० ६ । उ० १ । स्व० १] (ऋ. ३।१२।८)

१६९६ क ईं वेद सुते सचा पिबन्तं कद् वयो दधे ।
अयं यः पुरो विभिनत्त्योजसा मन्दानः शिप्र्यन्धसः ॥ १ ॥ (ऋ. ८।३३।७)

१६९७ दाना मृगो न वारणः पुरुत्रा च रथं दधे ।
न किष्ट्वा नि यमदा सुते गमो महांश्चरस्योजसा ॥ २ ॥ (ऋ. ८।३३।८)

[१६९२] (अस्य वयुनेषु) या इन्द्राच्या मार्गामध्यें (उरामथिः वारणः वृकश्चित्) कष्ट देणारा व प्रतिबंध करणारा लांडग्यासारखा क्रूर असला तरी तो (आभूषति) अनुकूल होऊन सेवा करूं लागतो. (सः इन्द्र) तो तूं, हे इन्द्रा ! (नः इमं स्तोमं जुजुषाणः) आमच्या या स्तोत्राचा स्वीकार करून (चित्रया धिया प्र आगहि) फल देणाऱ्या बुद्धिसह इकडे ये. ॥ २ ॥

[१६९३] हे (इन्द्राग्नी) इन्द्रा व अग्ने ! (दिवः रोचना) द्युलोकाला प्रकाशित करणारे तुम्ही (वाजेषु परिभूषथः) युद्धामध्यें विजय मिळवून सुशोभित होत आहांत. (वां तत् वीर्यं प्र चेति) तुमचें तें सामर्थ्य असें प्रकट होत आहे. ॥ १ ॥

[१६९४] हे (इन्द्राग्नी) इन्द्र व अग्नि ! (धीतयः) ज्ञानी लोक (ऋतस्य पथ्या अनु) सत्यमार्गानें जाऊन (अपसः परि उप प्रयन्ति) कर्माच्या सिद्धिला प्राप्त करतात. ॥ २ ॥

ज्ञानी लोक सत्यमार्गानें जाऊन कर्माची सिद्धि प्राप्त करतात.

[१६९५] हे (इन्द्राग्नी) इन्द्र व अग्नि ! (वां तविषाणि) आपलें बल व (प्रयांसि) ज्ञान हीं (सधस्थाने) बरोबरच राहत असतात. (युवोः अप्तूर्यं हितं) तुम्हांमध्यें त्वरेनें कर्म करण्याचें सामर्थ्य ठेवलेलें आहे. ॥ ३ ॥

[१६९६] (सुते सचा पिबन्तं ईं कः वेद) सोमयागामध्यें सर्वांबरोबर बसून सोमरस पिणाऱ्या या इन्द्राला कोण बरें जाणतो ? (कद् वयः दधे) किती आयु त्याची आहे हें तरी कोण जाणतो बरें ? (अयं यः शिप्री) जो मस्तकावर शिरस्त्राण धारण करणारा इन्द्र (अन्धसः मन्दानः) सोमरसानें आनंदित होऊन (ओजसा) आपल्या सामर्थ्यानें शत्रूचीं (पुरः विभिनत्ति) नगरें तोडून टाकतो. ॥ १ ॥

[१६९७] (मृगः वारणः दाना न) शत्रूचा शोध करणाऱ्या मदोन्मत्त हत्तीप्रमाणें (पुरुत्रा च रथं दधे) अनेक यज्ञांमध्यें तूं आपला रथ नेतोस. (त्वा न किः नियमत्) तुला कोणीहि प्रतिबंध करूं शकत नाहीं. हे इन्द्रा ! (सुते अगमः) सोमयागामध्यें तूं ये. (नः महान्) आम्हांला तूं मोठा आदरणीय आहेस व तूं (ओजसा चरसि) आपल्या सामर्थ्यानें सर्वत्र संचार करीत आहेस. ॥ २ ॥

*

१६९८ य उग्रः सन्ननिष्टृतः स्थिरो रणाय संस्कृतः ।
यदि स्तोतुर्मघवा शृणवद्धवं नेन्द्रो योषत्या गमत् ॥ ३ ॥ १५ (ही) ॥
[धा० ११ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ८।३३।९)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

१६९९ पवमाना असृक्षत सोमाः शुक्रास इन्दवः । अभि विश्वानि काव्या ॥१॥ (ऋ. ९।६३।२५)

१७०० पवमाना दिवस्पर्यन्तरिक्षादसृक्षत । पृथिव्या अधि सानवि ॥२॥ (ऋ. ९।६३।२७)

१७०१ पवमानास आशवः शुभ्रा असृग्रमिन्दवः । घ्नन्तो विश्वा अप द्विषः ॥३॥ १६ (फ) ॥
[धा० १९ । उ० २ । स्व० १] (ऋ. ९।६३।२६)

१७०२ तोशा वृत्रहणा हुवे सजित्वानापराजिता । इन्द्राग्नी वाजसातमा ॥ १ ॥ (ऋ. ३।१२।४)

१७०३ प्र वामर्चन्त्युक्थिनो नीथाविदो जरितारः । इन्द्राग्नी इष आ वृणे ॥ २ ॥ (ऋ. ३।१२।५)

१७०४ इन्द्राग्नी नवतिं पुरो दासपत्नीरधूनुतम् । साकमेकेन कर्मणा ॥ ३ ॥ १७ (र) ॥
[धा० ८ । उ० नास्ति । स्व १] (ऋ. ३।१२।६)

[१६९८] (यः उग्रः सन्) जो उग्रवीर असल्यामुळें (अनिष्टृतः) शत्रूंकडून पराभूत न होतां (स्थिरः) स्थिर राहतो व (रणाय संस्कृतः) युद्धासाठीं शस्त्रांनीं भूषित झालेला आहे असा तो (मघवा इन्द्रः) धनवान् इन्द्र (यदि स्तोतुः हवं शृणवत्) जर स्तोत्याची प्रार्थना ऐकेल तर तो (न योषति) दुसरीकडे जाणार नाहीं व (आगमत्) येथें यज्ञांतच येईल. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[१६९९] (शुक्रासः इन्दवः) स्वच्छ व चमकणारे (पवमानाः सोमाः) गाळले जाणारे सोमरस (विश्वानि काव्या) सर्व वेदमंत्रांनीं स्तुति चालली असतांना (अभि असृक्षत) शुद्ध केले जातात. ॥ १ ॥

[१७००] (पवमानाः) शुद्ध होत असलेले सोमरस (दिवः अन्तरिक्षात्) द्युलोकांतून आणि अन्तरिक्षांतून (पृथिव्याः अधि सानवि) भूमिवरील उच्च अशा यज्ञस्थानामध्यें (पर्यसृक्षत) वहात आहेत. ॥ २ ॥

[१७०१] (आशवः शुभ्राः) वेगवान् व शुभ्र असे (पवमानासः इन्दवः) शुद्ध होणारे सोमरस (विश्वाः द्विषः अपघ्नन्तः) सर्व शत्रूंना विनष्ट करीत (असृग्रम्) कलशामध्यें येत आहेत. ॥ ३ ॥

[१७०२] (तोशा) शत्रूंना बाधा पोंचवणारे (वृत्रहणा) शत्रूंचा नाश करणारे (सजित्वाना अपराजिता) शत्रूंना जिंकणारे व स्वतः अपराजित अशा (वाजसातमा इन्द्राग्नी हुवे) अन्न देणाऱ्या इन्द्र व अग्निची मी प्रार्थना करतों. ॥ १ ॥

[१७०३] हे (इन्द्राग्नी) इन्द्र व अग्नि ! (उक्थिनः वां अर्चन्ति) वेदपाठी तुमची अर्चना करतात. (नीथाविदः जरितारः) सामगायक तुमची स्तुति करतात. (इषः आ वृणे) अन्नप्राप्तिसाठीं मीहि स्तुति करतों. ॥२॥

[१७०४] हे (इन्द्राग्नी) इन्द्र व अग्नि ! (दास-पत्नीः नवतिं पुरः) दासांनीं पालन केलेल्या नव्वद नगरींना (एकेन कर्मणा साकं अधूनुत) एका प्रयत्नानें एकाचवेळीं तुम्हीं हालवून सोडल्यात. ॥ ३ ॥

१७०५ उप त्वा रण्वसंदृशं प्रयस्वन्तः सहस्कृत । अग्ने ससृज्महे गिरः ॥ १ ॥ (ऋ. ६।१६।३७)

१७०६ उप च्छायामिव घृणेरगन्म शर्म ते वयम् । अग्ने हिरण्यसंदृशः ॥ २ ॥ (ऋ. ६।१६।३८)

१७०७ य उग्र इव शर्यहा तिग्मशृङ्गो न वंसगः । अग्ने पुरो रुरोजिथ ॥ ३ ॥ १८ (य) ॥

[धा० ७ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ६।१६।३९)

१७०८ ऋतावानं वैश्वानरमृतस्य ज्योतिषस्पतिम् । अजस्रं घर्ममीमहे ॥ १ ॥ (अथर्व. ६।३६।१)

१७०९ य इदं प्रतिपप्रथे यज्ञस्य स्वरुत्तिरन् । ऋतूनुत्सृजते वशी ॥ २ ॥

१७१० अग्निः प्रियेषु धामसु कामो भूतस्य भव्यस्य । सम्राडेको विराजति ॥ ३ ॥ १९ (का) ॥

[धा० ११ । उ० १ । स्व० २]

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

॥ इत्यष्टमप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ ८-२ ॥

॥ इत्यष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥

[१७०५] हे (सहस्कृत अग्ने) बलानें उत्पन्न केलेल्या अग्ने ! (प्रयस्वन्तः) हवि घेऊन येणारे आम्ही (रण्वसंदृशं त्वा उप) रमणीय व दर्शनीय अशा तुझ्याजवळ राहून (गिरः ससृज्महे) आपल्या वाणीनें तुझी स्तुति करीत आहों. ॥ १ ॥

[१७०६] हे (अग्ने) अग्ने ! (हिरण्यसंदृशः घृणेः ते) सुवर्णासारख्या तेजस्वी दिसणाऱ्या तुझ्या (शर्म) आश्रयाला येऊन (वयं उप अगन्म) आम्ही सुख प्राप्त करूं (छायां इव) ज्याप्रमाणें कोणी उन्हांतून छायेमध्यें येऊन सुख प्राप्त करतो. ॥ २ ॥

[१७०७] (यः उग्रः इव) जो अग्नि उग्रवीर धनुर्धारी शूराप्रमाणें आहे, (वंसगः न तिग्मशृंगः) वेगवान् बैल जसा तीक्ष्ण शिंगांनीं युक्त असतो तसा तो स्वतःच्या तीक्ष्ण ज्वालांनीं युक्त असतो. हे (अग्ने) अग्नि ! (पुरः रुरोजिथ) तूं शत्रूचीं नगरें तोडलीं आहेस. ॥ ३ ॥

[१७०८] हे अग्ने ! (ऋतावानं वैश्वानरं) यज्ञ करणारा, मानवांचा हित करणारा, (ऋतस्य ज्योतिषः पतिं) यज्ञाच्या तेजाचें रक्षण करणारा (अजस्रं घर्मं ईमहे) अबाधित असा आहेस, त्या तुज प्रदीप्त अग्निची आम्ही आराधना करतों. ॥ १ ॥

[१७०९] (यः) जो अग्नि (इदं) या जगताला सुखी करण्यासाठीं (यज्ञस्य स्वः उत्तिरन्) यज्ञाच्या सर्व विघ्नांना दूर करतो, अशी (प्रति पप्रथे) ज्याची प्रसिद्धि आहे, तो (वशी) सर्वांना आपल्या आधीन ठेऊन (ऋतून् उत्सृजते) ऋतूंना उत्पन्न करतो. ॥ २ ॥

[१७१०] (भूतस्य भव्यस्य कामः) पूर्वीं झालेले व पुढें होणारे ज्याची इच्छा करतात, असा (एकः सम्राट् अग्निः) एकटा सम्राट् अग्नि (प्रियेषु धामसु विराजति) प्रिय अशा यज्ञस्थानांमध्यें विराजत आहे. ॥ ३ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इत्यष्टादशोऽध्यायः ॥

अष्टादश अध्याय

या अठराव्या अध्यायामध्यें इन्द्र, अग्नि, इन्द्राग्नी, विष्णु व सोम या पांच देवतांचीं वर्णनें आहेत. यांमध्यें इन्द्र देवतेचें विस्तृत वर्णन आहे, तें पहा —

इन्द्र

१ मद्याय वीराय शूराय पन्यं सोमं आधावत [१६५७]– प्रसन्नचित्त व पराक्रमी शूर इन्द्राजवळ प्रशंसनीय सोम लवकर पोंचवा. पराक्रमी शूर इन्द्र आहे. सोम पिऊन तो अधिक पराक्रम करणारा होईल.

२ वृत्रहा अस्मत् आरे आगमत्, शतं ऊतिः नियमते [१६५९]– वृत्राला मारणारा इन्द्र आमच्याजवळ येवो. शेंकडों संरक्षणाच्या साधनांनीं सज्ज असणारा इन्द्र शत्रूंना दूर करतो.

३ हे इन्द्र ! त्वां न अतिरिच्यते [१६६०]– हे इन्द्रा ! तुझ्यापेक्षां अधिक श्रेष्ठ कोणीहि नाहीं. तूंच सर्वांहून श्रेष्ठ आहेस.

४ पुरुहूताय सत्वने सचा गाय, शाकिने शं [१६६६]– ज्याला पुष्कळ लोक सहाय्यासाठीं बोलावतात त्या सत्ववान् इन्द्रासाठीं एकत्र जमून स्तोत्राचें गायन करा. शक्तिमान् इन्द्रासाठीं तें आनन्ददायक होतें.

५ वसुः गोमतः वाजस्य दानं न घ नियमते [१६६७]– सर्वांचा निवास करणाऱ्या, गाई व अन्न यांचें दान करणाऱ्या इन्द्राला त्याच्या दानापासून कोणीहि निवृत्त करूं शकत नाहीं.

६ दस्युहा कुवित्सस्य गोमन्तं व्रजं प्रागमत्, शचीभिः नः [गाः] अपवरत् [१६६८]– शत्रूंना मारणारा इन्द्र पुष्कळ हिंसा करणाऱ्या असुरांच्या गाईंनीं भरलेल्या गोठ्यावर आपला अधिकार चालवतो, तेव्हां आपल्या शक्तींनीं तो आम्हांलाहि गाई देतो.

७ वाघतः अस्मत् आरे त्वा मा निरीरमन् । नः सधमादं आगहि इह उप श्रुधि [१६७५]– ते स्तुति करणारे आम्हांपासून तुला दूर न ठेवोत. आमच्या यज्ञाच्या ठिकाणीं ये व येथें स्तुति ऐक.

८ ते सुते ब्रह्मकृतः सचा आसते [१६७६]– तुझ्यासाठीं सोमरस काढल्यानंतर स्तोत्रपाठ करणारे एकत्र बसतात व स्तोत्रें म्हणतात.

९ पूर्वीः ऋतस्य बृहतीः अनूषत [१६७७]– पूर्वीचें यज्ञामध्यें म्हणावयाचें बृहती छंदामधील सामगान म्हणा.

१० इन्द्र बृहती रायः सं अधूनुत [१६७८]– इन्द्र पुष्कळ धन आम्हांला देवो.

११ क्षोणी सं [१६७८]– भूमिहि आम्हांला देवो.

१२ गवाशिरः सोमाः अमन्दिषुः [१६७८]– गोदुग्धांत मिसळलेले सोमरस इन्द्राला आनन्द देवोत.

१३ वृत्रघ्ने इन्द्राय पातवे परिषिच्यसे [१६७९]– वृत्राचा वध करणाऱ्या इन्द्राला पिण्याला देण्यासाठीं, हे सोमा ! तुला कलशामध्यें भरला जात आहे.

१४ हे मघवन् ! ते श्रद्धा वाजी पार्ये दिवि वाजं सिषासति [१६८२]– हे धनवान् इन्द्रा ! तुझ्यावर श्रद्धा ठेवणारा बलवान् होऊन सोमरस काढण्याच्या दिवशीं अन्नदान करण्याची इच्छा करतो.

१५ मघोनः तव प्रिया वसु ये ददति, वृत्र–हत्येषु चोदय [१६८३]– धनवान् इन्द्राला प्रिय वस्तु जो देतो, त्याचा युद्धामध्यें जाण्याचा उत्साह, हे इन्द्रा ! वाढव.

१६ हे हर्यश्व ! तव प्रणीती सूरिभिः विश्वा दुरिता तरेम [१६८३]– हे उत्तम घोडे पाळणाऱ्या इन्द्रा ! तुझ्या प्रेरणेनें विद्वानांबरोबर राहून सर्व पापांपासून आम्ही मुक्त होऊं.

१७ सदा वृधः वीरः स्तवते [१६८४]– आपल्या बलानें सदा वाढत राहणारा वीर इन्द्र स्तविला जात आहे.

१८ हे हरीणां स्थातः इन्द्र ! ते पूर्व्य–स्तुतिं शवसा न किः उदानंश [१६८५]– हे घोडे जवळ बाळगणाऱ्या इन्द्रा ! तुझ्या पूर्वी केलेल्या स्तुतिला आपल्या बलानें दुसरा कोणीहि प्राप्त करूंच शकत नाहीं. तूंच असा सामर्थ्यवान् आहेस कीं ज्याची अशी प्रशंसा होत असते.

१९ श्रवस्यवः वाजानां पतिं अ–प्रायुभिः यज्ञेभिः वावृधेन्यं वः तं अहूमहि [१६८६]– यशाची इच्छा करणारे आम्ही बलांचा स्वामी व न चुकतां केलेल्या यज्ञांनीं वाढणाऱ्या तुमच्या त्या इन्द्राला सहाय्यासाठीं बोलावीत आहों.

२० वयं एनं वज्रिणं इह अपीपेम [१६९१]– आम्ही या वज्रधारी इन्द्राला या यज्ञामध्यें सोमरसानें तृप्त करीत आहों.

२१ अस्य वयुनेषु उरामथिः वारणः वृकः चित्

आभूषति [१६९२]– या इन्द्राच्या कुळामध्यें कष्ट देणारा व प्रतिबंध करणारा लांडग्यासारखा क्रूर शत्रु असला तरी तो अनुकूल होऊन शोभूं लागतो.

२२ शिप्री अन्धसः मन्दानः ओजसा पुरः विभिनत्ति [१६९६]– इन्द्र सोमपानानें आनंदित होऊन आपल्या सामर्थ्यानें शत्रूचीं नगरें तोडून टाकतो.

२३ पुरुत्रा रथं दधे, त्वा न किः नियमत् [१६९७]– इन्द्रा ! तूं आपला रथ पुढें चालव. तुला प्रतिबंध करणारा कोणीहि नाहीं.

२४ हे वसो इन्द्र ! त्वा कः आदधर्षति [१६८२]– हे निवासक इन्द्रा ! तुला कोण भय दाखवण्यास समर्थ आहे बरें ?

२५ यः उग्रः सन् अनिष्टृतः, स्थिरः रणाय संस्कृतः मघवा इन्द्रः यदि स्तोतुः हवं शृणवत्, न योषति, आगमत् [१६९८]– जो उग्रवीर असल्यामुळें कधींहि पराभूत होत नाहीं, युद्धभूमिवर स्थिर राहून युद्ध करण्यास तयार असतो, तो धनवान् इन्द्र जर स्तुति करणाऱ्याची प्रार्थना ऐकेल, तर दुसरीकडे जाणारच नाहीं, खात्रीनें येथें यज्ञांत येईलच.

२६ ब्रह्मयुजा शग्मा हरी इह सखायं इन्द्रं आवक्षतः [१६५८]– शब्दांच्या इशाऱ्यानें जोडले जाणारे, सुख देणारे इन्द्राचे दोन घोडे येथें यज्ञामध्यें मित्र व स्तुत्य इन्द्राला घेऊन येतात.

सदा आनंदित, उत्साहित व शूरवीर असा इन्द्र आहे. त्याच्याजवळ संरक्षणाचीं अनेक साधनें आहेत. त्याच्यासारखा दुसरा शूरवीर कोणीहि नाहीं. तो जेव्हां धनादिकांचें दान करतो तेव्हां त्याला कोणीहि निवारण करूं शकत नाहीं. गाई चोरणाऱ्या असुरांचा तो पराभव करून गाई परत मिळवतो व त्या तो भक्तांना वांटून देतो. इन्द्राच्या नीतिनें उपासक सर्व पापांपासून मुक्त होतो. सर्व लोक या इन्द्राला आपल्या सहाय्यासाठीं बोलावतात व तो इन्द्र त्यांच्या मदतीला जातोच. तो इतका मोठा बलवान् आहे कि, एका हल्ल्यानेंच शत्रूंचीं शेंकडों नगरें तोडून आपला विजय करून यशस्वी होतो. असा इन्द्र सर्वांनीं प्रशंसण्यास योग्य आहे.

अग्नि

१ हे जराबोध ! विशे विशे जनाय यज्ञियाय तत् विविड्ढि [१६६३]– हे स्तुतिनें जागृत होणाऱ्या अग्ने ! प्रत्येक मनुष्याच्या हितासाठीं जो यज्ञ करावयाचा असतो, तो सिद्ध करण्यासाठीं तूं यज्ञशाळेमध्यें प्रवेश कर.

यज्ञशाळेंत अग्नि सिद्ध करून त्यांत विशिष्ट वस्तूंचें हवन केलें जातें व त्या यज्ञानें सर्व मनुष्यांचें कल्याण होतें.

२ महान् अनिमानः धूमकेतुः पुरुश्चन्द्रः सः नः धिये वाजाय हिन्वतु [१६६४]– मोठा व अमाप असा, धूर हा ज्याचा ध्वज आहे व पुष्कळ आनंद देणारा तो अग्नि आम्हांला ज्ञान व बल किंवा अन्न प्राप्त व्हावें यासाठीं प्रेरणा देवो. त्या मार्गानें आम्हांस नेवो कि ज्या मार्गानें ज्ञान व बल आम्हांस प्राप्त होईल.

३ दैव्यः विश्पतिः बृहद् भानुः सः रेवान् इव नः उक्थैः शृणोतु [१६६५]– हा दिव्य शक्तिनें युक्त प्रजांचा पालन करणारा, मोठा तेजस्वी तो अग्नि धनवान् राजाप्रमाणें आमचीं स्तोत्रें ऐको. अग्निमध्यें दिव्य शक्ति आहे. अग्निमध्यें जो यज्ञ होतो त्यानें प्रजा निरोगी होतात व त्यांचें रोगांपासून संरक्षण होतें. असा हा अग्नि आमची स्तुतिचीं स्तोत्रें ऐको.

४ विभूतरातिं चित्रशोचिषं पूर्व्यं अग्निं अध्वराय ईळिष्व [१६८८]– पुष्कळ दान देणाऱ्या, विशेष प्रकाशमान् पूर्व अग्निची यज्ञ करण्यासाठीं स्तुति कर.

५ हे सहस्कृत अग्ने ! प्रयस्वन्तः रण्वसंदृशं त्वा उप गिरा ससृज्महे [१७०५]– हे बलानें उत्पन्न होणाऱ्या अग्ने ! अन्न घेऊन येणारे आम्ही रमणीय दिसणाऱ्या तुझ्याजवळ येऊन आपल्या वाणीनें तुझी स्तुति करीत आहों.

६ हे अग्ने ! हिरण्यसंदृशः घृणेः ते शर्म, छायां इव वयं उप अगन्म [१७०६]– हे अग्ने ! सुवर्णाप्रमाणें तेजस्वी दिसणाऱ्या तुझ्या आश्रयाला येऊन आम्ही सुख प्राप्त करूं, जसे उन्हांतून येणारे सावलीमध्यें सुख प्राप्त करतात.

७ यः उग्रः इव, वंसगः न तिग्मशृंगः, पुरः रुरोजिथ [१७०७]– तो अग्नि उग्रवीर धनुर्धारी शूराप्रमाणें पराक्रमी आहे. वेगवान् तीक्ष्ण शिंगांच्या बैलाप्रमाणें तो आहे. तो अग्नि शत्रूंचीं नगरें तोडून टाकतो.

८ ऋतावानं वैश्वानरं, ऋतस्य ज्योतिषः पतिं अजस्रं घर्मं ईमहे [१७०८]– सत्यमार्गानें - यज्ञाच्या मार्गानें जाणारा, सर्व मानवांचें हित करणारा, यज्ञाच्या तेजाचें रक्षण करणारा अग्नि आहे, त्या बाधारहित प्रदीप्त अग्निची आम्ही आराधना करीत आहों.

९ यः इदं यज्ञस्य स्वः उत्तिरन्, प्रति पप्रथे, वशी ऋतून् उत्सृजते [१७०९]– जो अग्नि या जगताला

सुखी करण्यासाठी यज्ञाच्या सर्व विघ्नांना दूर करतो, अशी त्याची प्रसिद्धि आहे तो सर्वांना आपल्या आधीन करून ऋतूंना उत्पन्न करतो व त्यामुळें सर्वांना सुख होतें.

१० भूतस्य भव्यस्य कामः सम्राट् एकः अग्निः प्रियेषु धामसु विराजति [१७१०]- पूर्वींचे व पुढें होणारे ज्याची इच्छा करतात असा एकटाच सम्राट् अग्नि आपल्या यज्ञांतील प्रिय स्थानांमध्यें - यज्ञकुंडांमध्यें - विराजमान होत असतो.

अग्निचें असें वर्णन या अध्यायामध्यें आहे. अग्निमध्यें योग्य पदार्थांचें हवन केल्यानें सर्व लोक रोगरहित होऊन सुखी होतात.

इन्द्र व अग्नि

१ हे इन्द्राग्नी ! दिवः रोचना वाजेषु परिभूषथः, वां तत् वीर्यं प्रचेति [१६९३]- हे इन्द्र व अग्नि ! द्युलोकाला प्रकाशित करणारे तुम्ही युद्धामध्यें विजय मिळवून सुशोभित होत आहां, तुमचें सामर्थ्य असें प्रकट होत आहे.

२ हे इन्द्राग्नी ! वां तविषाणि प्रयांसि सधस्थानि युवा अप्तूर्यं हितम् [१६९५]- हे इन्द्र व अग्नि ! आपलें बल व ज्ञान बरोबरच राहत असतात, तुमच्यामध्यें त्वरेनें कार्य करण्याचें सामर्थ्य आहे.

३ तोशा; वृत्रहणा, सजित्वाना, अपराजिता वाजसातमा इन्द्राग्नी हुवे [१७०२]- शत्रूंना बाधा पोंचवणारे, शत्रूंना ठार करणारे, विजयी व पराजित न होणारे, अन्नाचें दान करणारे इन्द्र व अग्नि हे आहेत, त्यांना आमच्या सहाय्यासाठीं मी बोलावीत आहें.

४ इन्द्राग्नी ! दासपत्नीः नवतिं पुरः एकेन कर्मणा साकं अधूनुतम् [१७०४]- हे इन्द्र व अग्नि ! दासांनीं पालन केलेल्या नव्वद नगरींना एकाच हल्ल्यानें तुम्हीं हालवून सोडलें.

याप्रमाणें इन्द्र व अग्नि यांच्या शौर्य, वीर्य व पराक्रमाचें वर्णन या अध्यायामध्यें आलें आहे. हे शूर, कौशल्यानें युद्ध करणारे, कधींहि पराभूत न होणारे असल्यामुळें हे नेहमीं विजय प्राप्त करीत असतात.

विष्णु

१ विष्णुः इदं विचक्रमे [१६६९]- विष्णुचा हा पराक्रम आहे.

२ अदाभ्यः गोपाः विष्णुः, धर्माणि धारयन्, त्रीणि पदा विचक्रमे [१६७०]- न दबला जाणारा सर्वांचें संरक्षण करणारा विष्णु, सर्व धर्मांचें - कर्तव्यांचें पालन करून, आपल्या तीन पायांनीं सर्व जग व्यापत आहे.

३ विष्णोः कर्माणि पश्यत, यतः व्रतानि पस्पशे, इन्द्रस्य युज्यः सखा [१६७१]- विष्णुच्या पराक्रमाचें दर्शन करा, ज्याच्यामुळें सर्वांचीं कर्में नीट चालत आहेत. हा विष्णु इन्द्राचा योग्य मित्र आहे.

इन्द्र व विष्णु हे दोन देव आहेत. विष्णु हा उपेन्द्र आहे. जसे अध्यक्ष व उपाध्यक्ष असतात, त्याप्रमाणें " इन्द्र व उपेन्द्र " हे आहेत.

४ सूरयः विष्णोः तत् परमं पदं, दिवि आततं चक्षुः इव, सदा पश्यन्ति [१६७२]- ज्ञानी लोक विष्णुचें तें परमपद नेहमीं पाहतात, जसा द्युलोकांत जगाचा नेत्ररूपी सूर्य सर्वांस दिसत असतो.

५ विष्णोः तत् परमं पदं विप्रासः विपन्यवः जागृवांसः समिन्धते [१६७३]- विष्णुच्या त्या परमपदाला ज्ञानी व जागृत लोक प्रदीप्त करून स्वतः पहात असतात.

६ विष्णुः पृथिव्या अधि सानवि, यतः विचक्रमे, अतः देवाः नः अवन्तु [१६७४] विष्णु पृथिवीवर अत्यंत उच्चस्थानीं, जेथून तो आपला पराक्रम करीत राहतो. त्या ठिकाणाहून सर्व देव आमचें संरक्षण करोत.

विष्णु हा उपेन्द्र आहे म्हणजे इन्द्राला विष्णु सहाय्य करणारा आहे, अध्यक्ष व उपाध्यक्ष जसे असतात तसे ते एकमेकांस सहाय्य करणारे आहेत. सर्वत्र विश्वामध्यें विष्णुचेच पराक्रम दिसत आहेत. ज्ञानी मनुष्य याच्या पराक्रमाला पाहत असतात. हे याचे पराक्रम पहावे व ते गुण वाचकांनीं आपणांमध्यें वाढतील असें करावें.

सोम

१ हे सखायः ! यूयं सूरयः वयं च तं पुरूरुचं वाजगंध्यं अश्याम, वाजस्पत्यं सनेम [१६८०]- हे मित्र हो ! तुम्ही विद्वान् व आम्ही मिळून त्या पुष्कळ चमकणाऱ्या व उत्तम सुगंधानें युक्त सोमाला पिऊं या. बल वाढवणाऱ्या सोमाला पिऊं या.

२ हर्यतं हरिं बभ्रुं त्यं वारेण परि पुनन्ति, यः विश्वान् देवान् गच्छति [१६८१]- मनोहर, दुःख हरण करणाऱ्या, भरणपोषण करणाऱ्या त्या सोमाला गाळणीनें गाळतात. त्यानंतर तो सोम सर्व देवांकडे जातो.

३ अद्रिभिः स्वानः अव्यया वाराणि तिरः आ, हरिः चम्वोः विशत् वनेषु सदः दधिषे [१६८९]- दगडांनीं कुटून काढलेला रस मेंढीच्या लोंकरीच्या गाळणींतून

गाळला जाऊन, तो हिरव्या रंगाचा सोम कलशामध्यें उतरत आहे. लांकडाच्या भांड्यांत तो आपलें स्थान करीत आहे.

४ वाजयुः मीढ्वान् पवमानः सोमः मेष्यः अव्यानि तिरः विप्रेभिः मामृजे [१६९०]– बल वाढवणारा, वीर्य वाढवणारा, घोड्याप्रमाणें प्रेम करण्यास योग्य, असा तो गाळला जाणारा सोम मेंढीच्या लोंकरीच्या गाळणींतून गाळला जात असतां विप्रांकडून स्तविला जाऊन शुद्ध होत आहे.

५ शुक्रासः इन्दवः पवमानाः सोमाः विश्वानि काव्या अभि असृक्षत [१६९९]– स्वच्छ व चमकणारे गाळले जाणारे सोमरस सर्व वेदमंत्रांनीं स्तुति केली जात असतांना शुद्ध केले जातात.

६ पवमानाः दिवः पृथिव्याः अधि सानवि पर्यसृक्षत [१७००]– शुद्ध होत असलेले सोमरस द्युलोकांतून पृथ्वीवरील उंच भागामध्यें सिद्ध केले जात आहेत.

७ आशवः शुभ्राः पवमानासः इन्दवः विश्वाः द्विषः अपघ्नन्तः असृग्रम् [१७०१]– वेगवान्, शुभ्र व शुद्ध होणारे सोमरस सर्व शत्रूंना नष्ट करीत कलशामध्यें उतरत आहेत.

सोमवल्ली दगडांनीं कुटतात, नंतर तिचा रस काढतात. त्यांत पाणी मिसळून मेंढीच्या केंसांच्या गाळणींमधून गाळतात. हा गाळलेला सोमरस कलशामध्यें भरून ठेवतात. यावेळीं वेदपठन उच्च स्वरानें केलें जातें. हा सोम हिम पर्वतावर उंच ठिकाणीं होतो, तेथून तो यज्ञ करण्याच्या ठिकाणीं आणतात व त्याच्यापासून असा रस तयार करतात. गाळून हा रस तयार झाल्यानंतर तो देवांना अर्पण करून यज्ञ करणारे पितात. या सोमरस पिण्यानें शरीरामध्यें शक्ति वाढते व मनाचा उत्साह वाढतो व सर्व शत्रूंना पराभूत करण्याचें सामर्थ्य अंगीं येतें.

सुभाषितें

१ वीराय शूराय पन्यं सोमं आधावत [१६५७] –शूरवीर इन्द्राला प्रशंसनीय सोमरस पोंचवा.

२ ब्रह्मयुजा शग्मा हरी इह सखायं गिर्वणसं इन्द्रं आवक्षतः [१६५८]– शब्दांच्या इशाऱ्यानें जोडले जाणारे सुखदायी दोन घोडे या यज्ञामध्यें मित्र व स्तुत्य इन्द्राला घेऊन येवोत.

३ शतं ऊतिः वृत्रहा नियमते [१६५९]– सेंकडों साधनांनीं संरक्षण करणारा, वृत्रवध करणारा इन्द्र शत्रूंना दूर करो.

४ त्वां न अतिरिच्यते [१६६०]–हे इन्द्रा ! तुझ्यापेक्षां अधिक श्रेष्ठ कोणीहि नाहीं.

५ हे वृषन् जागृवे ! महिना विव्यक्थ [१६६१]– हे बलवान् व जागृत राहणाऱ्या ! आपल्या महत्त्वानें तूं सर्व व्यापतोस.

६ हे जराबोध ! विशे विशे रुद्राय दृशीकं [१६६३] –हे जागृत राहून सर्व जाणणाऱ्या अग्ने ! प्रत्येक मानवाच्या हितासाठीं रुद्रदेवतेसाठीं सुन्दर स्तोत्र म्हणावें.

७ नः धिये वाजाय हिन्वतु [१६६४]– आम्हांला बुद्धि संवर्धनासाठीं व अन्नप्राप्तिसाठीं प्रेरित कर.

८ दैव्यः विश्पतिः बृहद्भानुः केतुः सः रेवान् इव नः उक्थैः शृणोतु [१६६५]– दिव्य प्रजापालक, मोठा प्रकाशमान् व ध्वजासारखा शोभणारा धनवान् अग्नि राजाप्रमाणें आमचीं स्तोत्रें तो ऐको.

९ पुरुहूताय सत्वने तत् सचा गाय, तत् गोकिंन शं [१६६६]– पुष्कळ लोक ज्याला सहाय्यासाठीं बोलावतात, त्या सत्त्ववान् इन्द्रासाठीं तें स्तोत्र एकत्र जमून गात रहा. तें शक्तिमान् इन्द्राला आनंददायक वाटतें.

१० वसुः गोमतः वाजस्य दानं न घ नियमते [१६६७]– सर्वांचा निवास करणाऱ्या इन्द्राला गाईच्या दुधापासून होणाऱ्या अन्नाचें दान करण्यापासून कोणीहि निवृत्त करूं शकत नाहीं.

११ दस्यु–हा कुवित्सस्य गोमन्तं व्रजं प्र गमत्, हि शचीभिः नः [गाः] अपवरत् [१६६८]– शत्रूंना मारणारा इन्द्र जेव्हां पुष्कळ हिंसा करणाऱ्या असुरांच्या गाईंनीं भरलेल्या गोठ्यावर आपला अधिकार स्थापन करतो, तेव्हां आपल्या शक्तींनीं आमच्या गाईहि प्राप्त करून देतो.

१२ विष्णुः इदं विचक्रमे [१६६९]– विष्णूनें येथें पराक्रम केले.

१३ अदाभ्यः गोपाः विष्णुः धर्माणि धारयन् पदा विचक्रमे [१६७०]– न दबला जाणारा संरक्षक विष्णु सर्वांच्या कर्तव्य कर्मांचें पोषण करीत, आपल्या पायांनीं सर्व जग आक्रमण करीत आहे.

१४ विष्णोः कर्माणि पश्यत, यतः व्रतानि पस्पशे इन्द्रस्य युज्यः सखा [१६७१]– विष्णुचे पराक्रम पहा, ज्यामुळें सर्वांचीं कार्ये नीट चाललीं आहेत. हा विष्णु इन्द्राचा योग्य मित्र आहे.

१५ सूरयः विष्णोः तत् परमं पदं, दिवि आततं चक्षुः इव, सदा पश्यन्ति [१६७२]– ज्ञानी लोक विष्णुचें तें श्रेष्ठस्थान नेहमीं पाहतात; आकाशांत प्रकाशाला पसरवणारा विश्वाचा नेत्ररूपी सूर्य जसा पहावा, तसें तें स्थान ज्ञान्यांना दिसतें.

१६ विष्णोः तत् परमं पदं विप्रासः जागृवांसः विपन्यवः यत् समिन्धते [१६७३]– विष्णुच्या त्या श्रेष्ठस्थानाला ज्ञानी आणि जागृत राहून स्तुति करणारे प्रदीप्त करतात.

१७ हे इन्द्रः ! वाघतः त्वा अस्मत् आरे मा निरीरमन् [१६७५]– हे इन्द्रा ! स्तुति करणारे तुला आमच्यापासून दूर न रममाण करोत.

१८ आरात्तात् नः सधमादं आगहि [१६७५]– दूर असलास तरी तेथून आमच्या यज्ञांत ये.

१९ इह सन् उपश्रुधि [१६७५]– येथें असलास तर आमची स्तुति ऐक.

२० इन्द्रः बृहतीः रायः सं अधूनुत [१६७८]– इन्द्र पुष्कळ धन आम्हांला देवो.

२१ इन्द्रः क्षोणीः सं अधूनुत [१६७८]– इन्द्र आम्हांला भूमि देवो.

२२ वृत्र-हत्येषु चोदय [१६८१]– तुझ्या भक्तांना शत्रूचा वध करण्याची प्रेरणा कर.

२३ हे हर्यश्व ! तव प्रणीती सूरिभिः विश्वा दुरिता तरेम [१६८३]– हे उत्तम घोडे बाळगणाऱ्या इन्द्रा ! तुझ्या प्रेरणेनें विद्वानांबरोबर आम्ही सर्व पापांपासून मुक्त होऊं.

२४ हे हरीणां स्थातः इन्द्र ! ते पूर्व्यस्तुतिं शवसा न किः उदानंश, भन्दना न [१६८५]– हे घोडे बाळगणाऱ्या इन्द्रा ! तुझ्या स्तुतिला आपल्या बलानें दुसरा कोणीहि प्राप्त करूं शकत नाहीं. तुझें तेजही कोणी प्राप्त करूं शकत नाहीं.

२५ अस्य वयुनेषु उरामथिः वारणः वृकश्चित् आभूषति [१६९२]– या इन्द्राच्या मार्गामध्यें कष्ट देणारा व प्रतिबंध करणारा कोणी क्रूर असला तरी तो अनुकूल होऊन सेवा करूं लागतो.

२६ हे इन्द्र ! चित्रया धिया प्र आगहि [१६९२]– हे इन्द्रा ! तुझ्या उत्तम बुद्धिसह तूं इकडे ये.

२७ हे इन्द्राग्नी ! दिवः रोचना वाजेषु परिभूषथः वीर्यं तत् प्रचेति [१६९३]– हे इन्द्र व अग्नि ! द्युलोकाला प्रकाशित करणारे तुम्ही युद्धामध्यें विजयी होऊन शोभत आहां. आपलें सामर्थ्य असें प्रकट होतें.

२८ धीतयः ऋतस्य पथ्या अनु अपसः परि उप प्रयन्ति [१६९४]– ज्ञानी सत्यमार्गानें जाऊन कर्माच्या सिद्धिला प्राप्त करतात.

२९ वां तविषाणि प्रयांसि सधस्थानि, युवोः अप्तूर्यं हितम् [१६९५]– तुमचीं बलें व ज्ञानें बरोबरच राहत असतात; व तुमच्यामध्यें त्वरेनें कार्य संपविण्याचें सामर्थ्य आहे.

३० यः शिप्री ओजसा पुरः विभिनत्ति [१६९६]– जो इन्द्र आपल्या सामर्थ्यानें शत्रूचीं नगरें तोडून टाकतो,

३१ त्वा न किः नियमत् [१६९७]– तुला कोणीहि प्रतिबंध करूं शकत नाहीं.

३२ नः महान् ओजसा चरसि [१६९७]– आम्हांला तूं मोठा आहेस व आपल्या सामर्थ्यानें तूं सर्वत्र संचार करतोस.

३३ यः उग्रः सन् अनिष्टृतः स्थिरः रणाय संस्कृतः [१६९८]– जो उग्रवीर आहे व पराभूत न होतां युद्धामध्यें स्थिर राहतो व युद्धासाठीं सदा तयार असतो.

३४ आशवः चिश्वाः द्विषः अपघ्नन्तः [१७०१]– वेगवान् वीर सर्व शत्रूंना नष्ट करतात.

३५ तोशा वृत्रहणा सजित्वाना अपराजिता वाजसातमा इन्द्राग्नी हुवे [१७०२]– शत्रूंचा नाश करणारे, वृत्राला मारणारे, शत्रूंना जिंकणारे, स्वयं अपराजित, अन्न देणारे इन्द्र व अग्नि आहेत, त्यांना मी बोलावतों.

३६ इषः आवृणे [१७०२]– अन्न प्राप्तिसाठीं मी त्यांची स्तुति करतों.

३७ हे इन्द्राग्नी ! दासपत्नीः नवतिं पुरः एकेन कर्मणा साकं अधूनुतम् [१७०४]– हे इन्द्र व अग्नि हो ! दासांनीं पालन केलेल्या नव्वद नगरींचा तुम्हीं एका हल्ल्यानेंच नाश करून टाकलात.

३८ हे अग्ने ! पुरः रुरोजिथ [१७०३]– हे अग्ने ! तूं शत्रूंचीं नगरें तोडलींस.

३९ ऋतावानं वैश्वानरं ऋतस्य ज्योतिषः पतिं अजस्रं घर्मं ईमहे [१७०८]– यज्ञ करणारा, सर्व लोकांचें कल्याण करणारा, यज्ञाच्या तेजाचें रक्षण करणारा, ज्याला कोणी बाधा पोंचवूं शकत नाहीं अशा प्रज्वलित अग्निची आम्ही आराधना करतों.

४० यः इदं यज्ञस्य स्वः उत्तिरन् प्रति पप्रथे [१७०९]

– जो यज्ञाचें हें स्वस्व रक्षण करतो, यज्ञामधील विघ्नांना दूर करतो, अशी त्याची प्रसिद्धि आहे.

४१ भूतस्य भव्यस्य कामः एकः सम्राट् अग्निः प्रियेषु धामसु विराजति [१७१०]- पूर्वी झालेले व पुढें होणारे ज्याची इच्छा करतात, असा अद्वितीय सम्राट् अग्नि आपल्या प्रिय अशा यज्ञाच्या स्थानांमध्यें विराजत आहे.

उपमा

१ सिन्धवः समुद्रं इव [१६६०]– ज्याप्रमाणें नद्या समुद्राला मिळतात, त्याप्रमाणें (इन्दवः त्वा आविशन्तु) सोमरस हे इन्द्रा ! तुला मिळोत.

२ रेवान् इव [१६६५]- धनवान् राजाप्रमाणें (बृहद् भानुः नः उक्थेभिः श्रृणोतु) विशेष प्रकाशमान् अग्नि आमची स्तुति ऐको.

३ तत् गवे न [१६६६]- गाईला जसें गवत प्रिय असतें, त्याप्रमाणें (शाकिने शं) शक्तिमान् इन्द्राला तें स्तोत्र प्रिय वाटतें.

४ दिवि आततं चक्षुः इव [१६७२]- आकाशामध्यें जसा प्रकाशमान् सूर्य दिसतो, त्याप्रमाणें (विष्णोः परमं पदं सूरयः पश्यन्ति) विष्णुचें श्रेष्ठस्थान ज्ञानी पाहतात.

५ मधौ मक्षः न [१६७६]- मधासाठीं मधमाशा एकत्र जमतात, त्याप्रमाणें (ब्रह्मकृतः सचा आसते) स्तुति करणारे एकत्र बसतात व स्तुति करतात.

६ पुरिः जनः न [१६८९]- नगरामध्यें जसा मनुष्य जातो, त्याप्रमाणें (वनेषुः सदः दधिषे) लांकडाच्या भांड्यांत सोम आपलें स्थान मिळवतो.

वनं- वनांतील लांकडाचें भांडें.

७ सप्तिः न [१६९०]- घोड्याप्रमाणें प्रेम करण्यास योग्य (सः सोमः) तो सोम आहे.

८ मृगः वारणः दानः न [१६९७]- शत्रूचा शोध करणाऱ्या मदोन्मत्त हत्तीप्रमाणें (पुरुत्रा रथं दधे) आपला रथ तूं पुढें ठेवतोस.

९ छायां इव [१७०६]- उन्हांतून तापलेले छायेंत येऊन आनंद प्राप्त करतात, त्याप्रमाणें (ते शर्म वयं उप गन्म) तुझ्या आश्रयाला येऊन आम्ही सुख प्राप्त करतों.

१० धन्वी इव [१७०७]- धनुर्धारी वीराप्रमाणें जो शूर (यः उग्रः) वीर आहे.

११ तिग्मश्रृंगः वंसगः न [१७०७]- तीक्ष्ण शिंगें असलेल्या बैलाप्रमाणें तो इन्द्र पराक्रमी आहे.

अष्टादशाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

(१)

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१६५७	८।१।२५	मेधातिथिः काण्वः प्रियमेधश्चांगिरसः	इन्द्रः	गायत्री
१६५८	८।१।२७	मेधातिथिः काण्वः प्रियमेधश्चांगिरसः	,,	,,
१६५९	८।०।२६	मेधातिथिः काण्वः प्रियमेधश्चांगिरसः	,,	,,
१६६०	८।९२।२२	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
१६६१	८।९२।२३	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
१६६२	८।९२।२४	श्रुतकक्षः सुकक्षो वा आंगिरसः	,,	,,
१६६३	१।२७।१०	शुनःशेप आजीगर्तिः	अग्निः	,,

*

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१६६४	१।२७।११	शुनःशेप आजीगर्तिः	अग्नि	गायत्री
१६६५	१।२७।१२	शुनःशेप आजीगर्तिः	,,	,,
१६६६	६।४५।२२	शंयुर्बार्हस्पत्यः	इन्द्रः	,,
१६६७	६।४५।२३	शंयुर्बार्हस्पत्यः	,,	,,
१६६८	६।४५।२४	शंयुर्बार्हस्पत्यः	,,	,,
		(२)		
१६६९	१।२२।१७	मेधातिथिः काण्वः	विष्णुः	,,
१६७०	१।२२।१८	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१६७१	१।२२।१९	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१६७२	१।२२।२०	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१६७३	१।२२।२१	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१६७४	१।२२।१६	मेधातिथिः काण्वः	देवा वा	,,
१६७५	७।३२।१	वसिष्ठो मैत्रावरुणिः	इन्द्रः	प्रगाथः- (विषमा बृहती, समा सतोबृहती)
१६७६	७।३२।२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१६७७	८।४९।९	वालखिल्यम् (आयुः काण्वः)	,,	,,
१६७८	५।५९।१०	वालखिल्यम् (आयुः काण्वः)	,,	,,
१६७९	९।९८।१०	अम्बरीषो वार्षागिरः ऋजिश्वा भारद्वाजश्च	पवमानः सोमः	अनुष्टुप्
१६८०	९।९८।११	अम्बरीषो वार्षागिरः ऋजिश्वा भारद्वाजश्च	,,	,,
१६८१	९।९८।७	अम्बरीषो वार्षागिरः ऋजिश्वा भारद्वाजश्च	,,	,,
१६८२	७।३२।१४	वसिष्ठो मैत्रावरुणिः	इन्द्रः	प्रगाथः- (विषमा बृहती, समा सतोबृहती)
१६८३	७।३२।१५	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
		(३)		
१६८४	८।२४।१६	विश्वमना वैयश्वः	इन्द्रः	उष्णिक्
१६८५	८।२४।१७	विश्वमना वैयश्वः	,,	,,
१६८६	८।२४।१८	विश्वमना वैयश्वः	,,	,,
१६८७	८।१९।१	सोभरीः काण्वः	अग्निः	काकुभः प्रगाथः-(विषमा ककुप् समा सतोबृहती)
१६८८	८।१९।२	सोभरीः काण्वः	,,	,,
१६८९	९।१०७।१०	सप्तर्षयः	पवमानः सोमः	प्रगाथः- (विषमा बृहती, समा सतोबृहती)
१६९०	९।१०७।११	सप्तर्षयः	,,	,,
१६९१	८।६६।७	कलिः प्रागाथः	इन्द्रः	,,
१६९२	८।६६।८	कलिः प्रागाथः	,,	,,
१६९३	३।१२।९	विश्वामित्रः प्रागाथः	इन्द्राग्नी	गायत्री
१६९४	३।१२।७	विश्वामित्रः प्रागाथः	,,	,,
१६९५	३।१२।८	विश्वामित्रः प्रागाथः	,,	,,

[illegible]	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१६९६	८।३३।७	मेध्यातिथिः काण्वः	इन्द्रः	बृहती
१६९७	८।३३।८	मेध्यातिथिः काण्वः	”	”
[illegible]	८।३३।९	मेध्यातिथिः काण्वः	”	”

(४)

१६९९	९।६३।२५	निध्रुविः काश्यपः	पवमानः सोमः	गायत्री
१७००	९।६३।१७	निध्रुविः काश्यपः	”	”
१७०१	९।६३।२६	निध्रुविः काश्यपः	”	”
[illegible]	३।१२।४	विश्वामित्रः गाथिनः	इन्द्राग्नी	”
१७०३	३।१२।५	विश्वामित्रः गाथिनः	”	”
१७०४	३।१२।६	विश्वामित्रः गाथिनः	”	”
१७०५	६।१६।७	भरद्वाजो बार्हस्पत्यः	अग्निः	”
१७०६	६।१६।८	भरद्वाजो बार्हस्पत्यः	”	”
१७०७	६।१६।९	भरद्वाजो बार्हस्पत्यः	”	”
१७०८	अथर्व. ६।३६।१	अथर्वा (स्वस्त्ययनकामः)	”	”
१७०९	—	—	”	”
१७१०	—	—	”	”

अथैकोनविंशोऽध्यायः ।

अथाष्टमप्रपाठके तृतीयोऽर्धः ॥ ८-३ ॥

[१]

(१-१८) १ विरूप आंगिरसः; २, १८ अवत्सारः काश्यपः; ३ विश्वामित्रो गाथिनः; ४ देवातिथिः काण्वः; ५, ८, ९, १६ गोतमो राहूगणः; ६ वामदेवो गौतमः; ७ प्रस्कण्वः काण्वः; १० वसुश्रुत आत्रेयः; ११ सत्यश्रवा आत्रेयः; १२ अवस्युरात्रेयः; १३ बुधगविष्ठिरावात्रेयौ; १४ कुत्स आंगिरसः; १५ अत्रिर्भौमः, १७ दीर्घतमा औचथ्यः ॥ १, १०, १३ अग्निः; २, १८ पवमानः सोमः; ३-५ इन्द्रः; ६, ८, ११, १४ (१ उत्तरार्धः रात्रिश्च), १६ उषाः; ७, ९, १२, १५, १७ अश्विनौ ॥ १-२, ६-७, १८ गायत्री; ३, १३-१५ त्रिष्टुप्; ४-५ प्रगाथः- (विषमा बृहती, समा सतोबृहती); ८-९ उष्णिक्; १० १२ पङ्क्तिः; १६, १७ जगती ॥

१७११ अग्निं प्रत्नेन जन्मना शुम्भानस्तन्व२ँ स्वाम् । कविर्विप्रेण वावृधे ॥१॥ (ऋ. ८।४४।१२)

१७१२ ऊर्जो नपातमा हुवेऽग्निं पावकशोचिषम् । अस्मिन्यज्ञे स्वध्वरे ॥२॥ (ऋ. ८।४४।१३)

१७१३ स नो मित्रमहस्त्वमग्ने शुक्रेण शोचिषा । देवैरा सत्सि बर्हिषि ॥३॥ १ (ली) ॥

[धा० ९ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ८।४४।१४)

१७१४ उत्ते शुष्मासो अस्थू रक्षो भिन्दन्तो अद्रिवः । नुदस्व याः परिस्पृधः ॥१॥ (ऋ. ९।५३।१)

१७१५ अया निजघ्निरोजसा रथसङ्गे धने हिते । स्तवा अबिभ्युषा हृदा ॥२॥ (ऋ. ९।५३।२)

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१७११] (कविः अग्निः) ज्ञानी अग्नि (प्रत्नेन जन्मना) पुरातन स्तोत्रानें (स्वां तन्वं शुम्भानः) आपल्या तेजोमय शरीराला सुशोभित करीत (विप्रेण वावृधे) ब्राह्मणांकडून वाढवला जात आहे. ॥ १ ॥

[१७१२] (ऊर्जः न-पातं) बलाला कमी न करणाऱ्या (पावक-शोचिषं) पवित्रता करणाऱ्या प्रकाशानें युक्त (अग्निं) अग्निला (अस्मिन् स्वध्वरे यज्ञे) या उत्तम हिंसारहित अशा या यज्ञामध्यें (आहुवे) आम्ही बोलावीत आहों. ॥ २ ॥

[१७१३] (मित्र-महः अग्ने) मित्रांना पूज्य असणाऱ्या अग्ने ! (सः त्वं) तो तूं (शुक्रेण शोचिषा) शुद्ध ज्वालांनीं युक्त होऊन (देवैः बर्हिषि आसत्सि) देवांना बरोबर घेऊन यज्ञांत येऊन बैस. ॥ ३ ॥

[१७१४] हे (अद्रिवः सोम) दगडांनीं कुटल्या जाणाऱ्या सोमा ! (ते शुष्मासः) तुझीं बलें (रक्षः भिन्दन्तः) राक्षसांचा नाश करीत (उदस्थुः) वर येत आहेत. (याः परिस्पृधः) जे स्पर्धा करणारे शत्रू आहेत, त्यांना (नुदस्व) दूर कर. ॥ १ ॥

[१७१५] हे सोमा ! तूं (अया ओजसा निजघ्निः) या बलानें शत्रूंना नष्ट करतोस. अशा तुझी आम्ही (अबिभ्युषा हृदा) निर्भय अन्तःकरणानें (रथसंगे हिते) रथांच्या युद्धांत शत्रु नष्ट झाल्यानंतर (धने स्तवै) धन प्राप्त व्हावें यासाठीं स्तुति करीत आहों. ॥ २ ॥

१७१६ अस्य व्रतानि नाधृषे पवमानस्य दूढ्या । रुज यस्त्वा पृतन्यति ॥३॥ (ऋ. ९।५३।३)

१७१७ तꣳ हिन्वति मदच्युतꣳ हरिं नदीषु वाजिनम् । इन्दुमिन्द्राय मत्सरम् ॥४॥ २ (पी)॥
[धा० २० । उ० १ । स्व० ४] (ऋ. ९।५३।४)

१७१८ आ मन्द्रैरिन्द्र हरिभिर्याहि मयूररोमभिः ।
मा त्वा के चिन्नि येमुरिन्न पाशिनोऽति धन्वेव ताꣳ इहि ॥१॥ (ऋ. ३।४५।१)

१७१९ वृत्रखादो वलं रुजः पुरां दर्मो अपामजः ।
स्थाता रथस्य हर्योरभिस्वर इन्द्रो दृढा चिदारुजः ॥ २ ॥ (ऋ ३।४५।२)

१७२० गम्भीराꣳ उदधीꣳरिव क्रतुं पुष्यसि गा इव ।
प्र सुगोपा यवसं धेनवो यथा ह्रदं कुल्या इवाशत ॥ ३ ॥ ३ (छा)॥
[धा० १७ । उ० २ । स्व० २] (ऋ. ३।४५।३)

१७२१ यथा गौरो अपा कृतं तृष्यन्नेत्यवेरिणम् ।
आपित्वे नः प्रपित्वे तूयमा गहि कण्वेषु सु सचा पिब ॥ १ ॥ (ऋ. ८।४।३)

[१७१६] (पवमानस्य अस्य व्रतानि) गाळल्या जाणाऱ्या या सोमाच्या कर्मांनीं (दूढ्या न आधृषे) दुष्ट राक्षस प्रगति करूं शकत नाहींत. हे सोमा ! (यः त्वा पृतन्यति) जो तुझ्यावर सैन्य पाठवण्याची इच्छा करतो त्याला (रुज) तूं नष्ट कर. ॥ ३ ॥

[१७१७] (मदच्युतं हरिं) आनंद देणारा हिरव्या रंगाचा (वाजिनं मत्सरं) बल वाढवणारा व उत्साह वाढवणारा अशा (तं इन्दुं) त्या सोमाला (नदीषु) पाण्यामध्यें (इन्द्राय) इन्द्रासाठीं (हिन्वन्ति) मिसळतात. ॥४॥

[१७१८] हे (इन्द्र) इन्द्रा ! (मन्द्रैः मयूर-रोमभिः हरिभिः) आनंद देणाऱ्या, मोरासारख्या केंसांनीं युक्त अशा घोड्यांनीं तूं (आयाहि) येथें यज्ञामध्यें ये. (केचित् त्वा) कोणी तुला (पाशिनः न) जाळें लावणारे व्याध जसें पक्ष्यांना पकडतात, त्याप्रमाणें (मा नियेमुः) प्रतिबंध करणार नाहींत. (धन्वेव तान् अति इहि) रेतीच्या देशाप्रमाणें त्यांना उल्लंघून तूं येथें ये. ॥ १ ॥

[१७१९] (इन्द्रः) तो इन्द्र (वृत्र-खादः) वृत्राचा नाशक (वलं रुजः) वल राक्षसाला छिन्नभिन्न करणारा (पुरां दर्मः) शत्रूचीं नगरें तोडणारा (अपां अजः) पाण्याची वृष्टि करणारा (हर्योः अभिस्वरे रथस्य स्थाता) घोड्यांच्या रथामध्यें बसणारा (दृढाचित् आरुजः) बलवान् शत्रूचाहि पराभव करणारा आहे. ॥ २ ॥

[१७२०] हे इन्द्रा ! तूं (गंभीरान् उदधीन् इव) गंभीर समुद्राला पुष्ट करावें त्याप्रमाणें (क्रतुं पुष्यसि) यज्ञांचें पोषण करतोस. ज्याप्रमाणें (सु-गोपाः) उत्तम गोपालक (गाः इव) गाईंचें गवत वगैरे देऊन पोषण करतो, (यथा धेनवः यवसं प्र) ज्याप्रमाणें गाई गवत खातात त्याप्रमाणें अथवा (कुल्या ह्रदं इव आशते) नद्या जलाशयाला मिळतात त्याप्रमाणें सोम तुला प्राप्त होतो. ॥ ३ ॥

[१७२१] (गौरः तृष्यन्) जसा मृग तहानेलेला होऊन (यथा अपाकृतं इरिणं एति) पाण्यानें भरलेल्या सरोवराजवळ जातो त्याप्रमाणें हे इन्द्रा ! तूं (नः तूयं) आमच्याजवळ लवकर (आपित्वे प्रपित्वे आगहि) मित्र भावनेनें ये. आणि (कण्वेषु सचा सु पिब) कण्वांच्या यज्ञामध्यें बसून सोम पी. ॥ १ ॥

१७२२ मन्दन्तु त्वा मघवन्निन्द्रेन्दवो राधोदेयाय सुन्वते ।
आमुष्या सोममपिबश्चमू-सुतं ज्येष्ठं तद्दधिषे सहः ॥ १ ॥ ४ (७) ॥
[धा० २१ । उ० ४ । स्व० १] (ऋ० [illegible])

१७२३ त्वमङ्ग प्र शंसिषो देवः शविष्ठ मर्त्यम् ।
न त्वदन्यो मघवन्नस्ति मर्डितेन्द्र ब्रवीमि ते वचः ॥ २ ॥ (ऋ० १।८४।१९)

१७२४ मा ते राधांसि मा त ऊतयो वसोऽस्मान्कदा चना दभन् ।
विश्वा च न उपमिमीहि मानुष वसूनि चर्षणिभ्य आ ॥ ३ ॥ (ऋ०) ॥
[धा० २१ । उ० १ । स्व० २] (ऋ० १।८४।२०)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

१७२५ प्रति ष्या सूनरी जनी व्युच्छन्ती परि स्वसुः । दिवो अदर्शि दुहिता ॥ १ ॥ (ऋ० ४।५२।१)

१७२६ अश्वेव चित्रारुषी माता गवामृतावरी । सखा भूदश्विनोरुषाः ॥ २ ॥ (ऋ० ४।५२।२)

१७२७ उत सखास्यश्विनोरुत माता गवामसि । उतोषो वस्व ईशिषे ॥ ३ ॥ (ऋ०) ॥
[धा० ९ । उ० नास्ति । स्व० [illegible]] (ऋ० ४।५२।३)

[१७२२] हे (मघवन् इन्द्र) धनवान् इन्द्रा ! (सुन्वते राधः देयाय) सोमयाग करणाऱ्याला धन देण्या-साठीं (इन्दवः त्वा मन्दन्तु) सोमरस तुला प्रसन्न करोत. तूं (चमू सुतं [illegible]) [illegible] सोमरसाला वेगानें घेऊन पीत असतोस. (तत् ज्येष्ठं सहः दधिषे) कारण तूं [illegible] बल [illegible] ॥ १ ॥

[१७२३] (अंग शविष्ठ) हे प्रिय व बलवान् इन्द्रा ! (देवः) तेजस्वी [illegible] करणाऱ्या माणसाची प्रशंसा करतोस. हे (मघवन् इन्द्र) धनवान् इन्द्रा ! (त्वत् अन्यः मर्डिता न अस्ति) तुझ्या-शिवाय दुसरा कोणीहि सुख देणारा नाहीं, म्हणून (ते वचः ब्रवीमि) तुझी स्तुति मी करीत आहें. ॥ २ ॥

[१७२४] हे (वसो) निवासक इन्द्रा ! (ते राधांसि) तुझीं धनें (अस्मान् कदा चन मा दभन्) आम्हांला कधींहि विनष्ट न करोत. (ते ऊतयः मा) तुझीं संरक्षणाचीं साधनें आमचा नाश न करोत. हे (मानुष) मनुष्यांचें हित करणाऱ्या इन्द्रा ! (नः चर्षणिभ्यः) आम्हां प्रजाजनांना (विश्वा वसूनि आ उप मिमीहि) सर्व धनें [illegible] ॥ ३ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[१७२५] (स्या सूनरी) ती उत्तम प्रेरणा देणारी (जनी) फल देणारी (स्वसुः परि व्युच्छन्ती) आपल्या बहिणीप्रमाणें रात्रीच्या उत्तर भागामध्यें प्रकाशणारी (दिवः दुहिता) सूर्याची मुलगी उषा [illegible] आहे. ॥ १ ॥

[१७२६] (अश्वा इव चित्रा) घोडीप्रमाणें सुंदर (अरुषी गवां माता) [illegible] किरणांची माता (ऋतावरी उषाः) यज्ञ करणारी उषा (अश्विनोः सखा अभूत्) अश्विनी देवांच्या मित्राप्रमाणें झाली आहे. ॥ २ ॥

[१७२७] (उत अश्विनोः सखा असि) आणि तूं अश्विनी कुमारांची मैत्रीण आहेस (उत गवां माता असि) आणि किरणांची माता आहेस (उत) म्हणून तूं हे (उषः) उषे ! (वस्वः ईशिषे) [illegible] स्वामित्व करतेस. ॥ ३ ॥

१७२८ एषो उषा अपूर्व्या व्युच्छति प्रिया दिवः । स्तुषे वामश्विना बृहत् ॥१॥ (ऋ. १।४६।१)

१७२९ या दस्रा सिन्धुमातरा मनोतरा रयीणाम् । धिया देवा वसुविदा ॥२॥ (ऋ. १।४६।२)

१७३० वच्यन्ते वां ककुहासो जूर्णायामधि विष्टपि । यद्वाँ रथो विभिष्पतात् ॥३॥ ७ (लि) ॥
[धा० १४ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. १।४६।३)

१७३१ उषस्तच्चित्रमा भरास्मभ्यं वाजिनीवति । येन तोकं च तनयं च धामहे ॥ १ ॥
(ऋ. १।९२।१३)

१७३२ उषो अद्येह गोमत्यश्वावति विभावरि । रेवदस्मे व्युच्छ सूनृतावति ॥२॥ (ऋ. १।९२।१४)

१७३३ युङ्क्ष्वा हि वाजिनीवत्यश्वाँ अद्यारुणाँ उषः ।
अथा नो विश्वा सौभगान्या वह ॥ ३ ॥ ८ (हि) ॥
[धा० ६ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. १।९२।१५)

१७३४ अश्विना वर्तिरस्मदा गोमद्दस्रा हिरण्यवत् । अर्वाग्रथं समनसा नि यच्छतम् ॥ १ ॥
(ऋ. १।९२।१६)

१७३५ एह देवा मयोभुवा दस्रा हिरण्यवर्तनी । उषर्बुधो वहन्तु सोमपीतये ॥२॥ (ऋ. १।९२।१८)

[१७२८] (एषा प्रिया अपूर्व्या उषाः) ही प्रिय अपूर्व उषा (दिवः व्युच्छति) द्युलोकाला प्रकाशित करते. हे (अश्विनौ) अश्विनीकुमार हो ! (वां बृहत् स्तुषे) तुमची पुष्कळ स्तुति करीत आहें. ॥ १ ॥

[१७२९] (या देवा) जे अश्विनौदेव (दस्रा) शत्रूचा नाश करणारे (सिन्धुमातरा) नद्यांना उत्पन्न करणारे (रयीणां मनोतरा) धन देणारे (धिया वसुविदा) बुद्धिपूर्वक कर्म करणारांस धन देणारे आहेत. ॥ २ ॥

[१७३०] हे अश्विनौ देवतांनों ! (वां रथः) तुमचा रथ (जूर्णायां अधि विष्टपि) प्रशंसनीय स्वर्गलोकामध्यें (यत् विभिः पतात्) जेव्हां पक्ष्यांनीं नेला जातो, त्यावेळीं (वां) तुमच्या (ककुहासः वचयन्ते) स्तुति बोलल्या जातात. ॥ ३ ॥

[१७३१] हे (वाजिनीवति उषः) हवन सुरू झालें आहे अशा उषे ! (अस्मभ्यं तत् चित्रं आभर) आम्हांला तें विलक्षण धन भरपूर दे (येन तोकं तनयं च धामहे) ज्याच्या योगानें पुत्रपौत्रांचें पोषण आम्हीं करूं शकूं. ॥ १ ॥

[१७३२] हे (गोमति) गाईंनीं युक्त (अश्वावति) घोड्यांनीं युक्त (सूनृतावति विभावरि उषः) यज्ञानें युक्त आणि तेजस्विनी उषे ! (अद्य इह) आज येथें (अस्मे रेवत् व्युच्छ) आम्हांला तूं धनयुक्त कर. ॥ २ ॥

[१७३३] हे (वाजिनीवति उषः) हवन केलें जात आहे अशा उषे ! (अरुणान् अश्वान्) लाल रंगाच्या घोड्यांना (अद्य युंक्ष्व हि) आपल्या रथाला आज जोड व (विश्वा सौभगानि नः आवह) सर्व सौभाग्यें आम्हांला दे. ॥ ३ ॥

[१७३४] हे (अश्विना) अश्विदेव हो ! (दस्रा) शत्रूंचा नाश करणारे तुम्ही (अस्मत् वर्तिः आ) आमच्या घराकडे - यज्ञगृहाकडे या. (गोमत् हिरण्यवत् रथं) गाई व सुवर्णयांनीं युक्त आपल्या रथाला (समनसा अर्वाक् नियच्छतम्) मनःपूर्वक आमच्याजवळ आणा. ॥ १ ॥

[१७३५] (उषर्बुधः) उषःकालीं जागणारे घोडे (इह सोमपीतये) येथें सोम पिण्यासाठीं (दस्रा मयोभुवा) शत्रूंचा नाश करणाऱ्या व सुख देणाऱ्या (हिरण्यवर्तनी देवा) सुवर्णाचा रथ ज्यांचा आहे अशा अश्विदेवाना (आवहन्तु) आणोत. ॥ २ ॥

२ ३ २उ ३ २ ३ २उ ३ १ २ ३ १ २
१७३६ यावित्था श्लोकमा दिवो ज्योतिर्जनाय चक्रथुः ।
२ ३ १ २ ३ २
आ न ऊर्जं वहतमश्विना युवम् ॥ ३ ॥ ९ (भा) ॥
[धा० २० । उ० ४ । स्व० २] (ऋ. ८।९२।१७)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

३ १ २र ३ २उ ३ २ ३ १ २र ३ १ २
१७३७ अग्निं तं मन्ये यो वसुरस्तं यं यन्ति धेनवः ।
१ ३ १ २ ३ २उ ३ १ २ ३ २ ३ १ २ ३ २ ३ १ २
अस्तमर्वन्त आशवोऽस्तं नित्यासो वाजिन इष५ स्तोतृभ्य आ भर ॥१॥ (ऋ. ५।६।१)
३ २उ ३ १ २ ३ १ २र ३ १ २
१७३८ अग्निर्हि वाजिनं विशे ददाति विश्वचर्षणिः ।
३ २र ३ २ ३ २ ३ २ ३ १ २ ३ २ ३ १ २ ३ २ ३ १ २
अग्नी राये स्वाभुव५ स प्रीतो याति वार्यमिष५ स्तोतृभ्य आ भर ॥२॥ (ऋ. ५।६।३)
२र ३ २उ ३ १ २ ३ १ २
१७३९ सो अग्निर्यो वसुर्गृणे सं यमायन्ति धेनवः ।
१ २र ३ २ ३ १ २ ३ १ २ ३ २ ३ १ २ ३ २ ३ १ २
समर्वन्तो रघुद्रुवः स५ सुजातासः सूरय इष५ स्तोतृभ्य आ भर ॥ ३ ॥ १० (घु) ॥
[धा० १६ । उ० ४ । स्व० ९] (ऋ. ५।६।२)

[१७३६] हे (अश्विना) अश्विनीकुमारांनो ! (यौ) जे तुम्ही (दिवः श्लोकं ज्योतिः) द्युलोकांतून प्रशंसनीय प्रकाश (इत्था जनाय चक्रथुः) याप्रमाणें लोकांच्या हितासाठीं आणला (युवं) असे तुम्ही (नः ऊर्जं आ वहतं) आम्हांला बल वाढवणारें अन्न द्या. ॥ ३ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[१७३७] (तं अग्निं मन्ये) त्या अग्निची मी स्तुति करतों. (यः वसुः) जो सर्वांचा निवास करणारा आहे. (अस्तं यं धेनवः यन्ति) ज्याच्या आश्रयाला गाई जातात. (अस्तं आशवः अर्वन्तः) ज्याच्या आश्रयाला घोडे जातात, (अस्तं नित्यासः वाजिनः) ज्याच्या आश्रयाला नित्य कर्म करणारे हविजवळ बाळगणारे यजमान जातात, असा तूं (स्तोतृभ्यः इषं आभर) स्तुति करणाऱ्या आम्हांला भरपूर अन्न दे. ॥ १ ॥

[१७३८] (अग्निः हि) अग्नि निश्चयानें (विशे वाजिनं ददाति) यजमानाला पुत्र देतो. (विश्वचर्षणिः सः अग्निः) सर्व मनुष्यांचें कल्याण करणारा तो अग्नि (प्रीतः) प्रसन्न होऊन (स्वाभुवं वार्यं) स्वतःची भरभराट करणारे (राये याति) धन देण्यासाठीं यज्ञामध्यें जात असतो. हे अग्ने ! (स्तोतृभ्यः इषं आभर) स्तुति करणाऱ्यांना भरपूर अन्न दे. ॥ २ ॥

[१७३९] (यः वसुः) जो सर्वांचा निवास करतो (यं धेनवः समायन्ति) ज्याच्याजवळ गाई मिळून जातात. (रघुद्रुवः अर्वन्तः सं) लवकर धांवणारे घोडे ज्याच्याजवळ जातात. (सु-जातासः सूरयः सं) उत्तम प्रसिद्ध विद्वान् ज्याच्याजवळ जातात (सः अग्निः गृणे) त्या अग्निची मीं स्तुति करतों, (स्तोतृभ्यः इषं आभर) हे अग्ने ! स्तुति करणाऱ्यांना भरपूर अन्न दे. ॥ ३ ॥

१७४० महे नो अद्य बोधयोषो राये दिवित्मती ।
यथा चिन्नो अबोधयः सत्यश्रवसि वाय्ये सुजाते अश्वसूनृते ॥ १ ॥ (ऋ. ५।७९।१)

१७४१ या सुनीथे शौचद्रथे व्यौच्छो दुहितर्दिवः ।
सा व्युच्छ सहीयसि सत्यश्रवसि वाय्ये सुजाते अश्वसूनृते ॥ २ ॥ (ऋ. ५।७९।२)

१७४२ सा नो अद्याभरद्वसुर्व्युच्छा दुहितर्दिवः ।
यो व्यौच्छः सहीयसि सत्यश्रवसि वाय्ये सुजाते अश्वसूनृते ॥ ३ ॥ ११ (तु)॥
[धा० १९ । उ० १ । स्व० ५] (ऋ. ५।७९।३)

१७४३ प्रति प्रियतमꣳ रथं वृषणं वसुवाहनम् ।
स्तोता वामश्विनावृषि स्तोमेभिर्भूषति प्रति माध्वी मम श्रुतꣳ हवम् ॥१॥ (ऋ. ५।७५।१)

१७४४ अत्यायातमश्विना तिरो विश्वा अहꣳ सना ।
दस्रा हिरण्यवर्तनी सुषुम्णा सिन्धुवाहसा माध्वी मम श्रुतꣳ हवम् ॥२॥ (ऋ. ५।७५।२)

[१७४०] (अद्य) आज हे (उषः) उषे देवि ! दिवित्मती) प्रकाशयुक्त तूं (नः महे राये बोधय) आम्हांला पुष्कळ धन प्राप्त व्हावें यासाठीं जागें कर. (यथा चित् नो अबोधयः) ज्याप्रमाणें पूर्वी जागृत केलें होतेंस. हे (सुजाते अ-श्व सूनृते) उत्तम कुलीन व आज खरें बोलणाऱ्या उषादेवी ! (वाय्ये सत्यश्रवसि) वय्याचा पुत्र सत्यश्रवा याच्यावर कृपा कर. ॥ १ ॥

[१७४१] हे (दिवः दुहितः) द्युलोकाच्या कन्ये ! (या) जो तूं (सुनीथे शौचद्रथे व्यौच्छः) सुनीथ नामक शुचद्रथाच्या पुत्रासाठीं प्रकाशित झालीस, (सा) ती तूं (सहीयसी वाय्ये सुजाते सत्यश्रवसि व्युच्छ) अति बलवान् वय्याच्या सत्यश्रवा नामक कुलीन मुलावर आपला प्रकाशरूपी अनुग्रह कर. ॥ २ ॥

[१७४२] हे (दिवः दुहितः) द्युलोकाच्या पुत्रि ! (सा वसु आभरद्) ती तूं धन भरपूर देणारी (नः अद्य व्युच्छ) आमच्यासाठीं आज प्रकाशित हो. हे (सहीयसि) अत्यंत बलवान् अशी तूं (या व्यौच्छः) ज्या तूने अन्धकाराला दूर केलें. हे (सुजाते अ-श्वसूनृते) उत्तम कुलीन व आजच सत्यनिष्ठ असणारी उषादेवी ! (वाय्ये सत्यश्रवसि) वय्याचा पुत्र सत्यश्रवा याच्यावर अनुग्रह कर. ॥ ३ ॥

[१७४३] हे (अश्विनौ) अश्विदेव हो ! (स्तोता ऋषिः) स्तुति करणारा ऋषि (वां) तुमच्या (वृषणं वसु-वाहनं) बलवान् व धन वाहून नेणाऱ्या (प्रियतमं रथं) अत्यंत प्रिय रथाला (स्तोमेभिः प्रतिभूषति) स्तोत्रांनीं सुशोभित करीत आहे. या कारणामुळें हे (माध्वी) मधुविद्येला जाणणाऱ्यांनों ! (मम हवं श्रुतं) माझी प्रार्थना ऐका. ॥१॥

[१७४४] हे (अश्विना) अश्विनौदेव हो ! (अत्यायातं) तुम्ही यजमानांना उल्लंघून आमच्याकडे या. (अहं विश्वाः सना तिरः) मी सर्व विरोधकांचा पराभव करतों. हे (दस्रा हिरण्यवर्तनी) शत्रूचा नाश करणाऱ्या व सुवर्णाचा ज्यांचा रथ आहे अशा (सुषुम्णा सिन्धुवाहसा) उत्तम धनानें युक्त व नदी मधूनही जाणाऱ्या (माध्वी) मधुविद्या जाणणाऱ्यानों ! (मम हवं श्रुतं) माझी प्रार्थना ऐका. ॥ २ ॥

*

१७४५ आ नो रत्नानि बिभ्रतावश्विना [illegible] युवम् ।
रुद्रा हिरण्यवर्तनी जुषाणा वाजिनीवसू माध्वी मम श्रुतं हवम् [illegible] ॥
[धा० ३० । उ० नास्ति । स्व० २] [illegible]

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

१७४६ अबोध्यग्निः समिधा जनानां प्रति धेनुमिवायतीमुषासम् ।
यह्वा इव प्र वयामुज्जिहानाः प्र भानवः सस्रते नाकमच्छ ॥ १ ॥ (ऋ. ५।१।१)

१७४७ अबोधि होता यजथाय देवानूर्ध्वो अग्निः सुमनाः प्रातरस्थात् ।
समिद्धस्य रुशददर्शि पाजो महान् देवस्तमसो निरमोचि ॥ २ ॥ (ऋ. ५।१।२)

१७४८ यदीं गणस्य रशनामजीगः शुचिरङ्क्ते शुचिभिर्गोभिरग्निः ।
आद्दक्षिणा युज्यते वाजयंत्युत्तानामूर्ध्वो अधयज्जुहूभिः ॥ ३ ॥ १३ (लि) ॥
[धा० १९ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ५।१।३)

[१७४५] हे (अश्विना) अश्विनौदेव हो ! (रुद्रा हिरण्यवर्तनी) तुम्ही शत्रूला रडवणारे व सुवर्णाच्या रथांत बसणारे (वाजिनीवसू जुषाणा) अन्न व धन यांनीं युक्त व यज्ञामध्यें येणारे (युवं आगच्छतं) असे तुम्ही आमच्याजवळ या. (माध्वी ! मम हवं श्रुतं) हे मधु विद्या जाणणाऱ्या देवांनों ! माझी प्रार्थना ऐका. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[१७४६] (अग्निः जनानां समिधा अबोधि) अग्नि याजकांच्या समिधांनीं प्रज्वलित झाला आहे. (धेनुं इव) गाईला ज्याप्रमाणें प्रातःकालीं जागृत करतात. (आयतीं उषासं प्रति) येणाऱ्या उषःकालामध्यें (भानवः) अग्निच्या ज्वाला (वयां प्रोज्जिहानाः यह्वाः इव) आपल्या शाखा पसरणाऱ्या वृक्षांप्रमाणें (नाकं अच्छ प्रसस्रते) अन्तरिक्षाच्या बाजूला पसरत आहेत. ॥ १ ॥

[१७४७] (होता अग्निः) हवन करणारा अग्नि (देवान् यजथाय अबोधि) देवां करतां यजन करण्यासाठीं प्रज्वलित झाला आहे. तो अग्नि (प्रातः सुमनाः) प्रातःकालीं उत्तम मनानें (ऊर्ध्वः अस्थात्) वर उठला आहे. (समिद्धस्य रुशत्) प्रज्वलित झालेल्या अग्निचें (पाजः अदर्शि) तेजस्वी बल दिसत आहे. हा (महान् देवः तमसः निरमोचि) हा महान् देव जगाला अन्धकारांतून सोडवतो. ॥ २ ॥

[१७४८] (यत् ईं) जेव्हां हा अग्नि (गणस्य रशनां अजीगः) जनसमुदायाला प्रतिबंध करणाऱ्या अन्धकार-रूपी प्रतिबंधाला गिळून टाकतो, तेव्हां (शुचिः अग्निः) शुद्ध तेजस्वी अग्नि (शुचिभिः गोभिः) शुद्ध किरणांनीं (अंक्ते) जगताला प्रकट करतो. (आत्) त्यानंतर (वाजयन्ती दक्षिणा) बल देण्याची इच्छा करणारी मोठी तुपाची धारा (जुहूभिः युज्यते) यज्ञपात्रातून संयुक्त होते, तेव्हां (उत्तानां ऊर्ध्वः अधयत्) वरून येणाऱ्या घृताच्या त्या धारेला हा अग्नि वर उठून पीत असतो. ॥ ३ ॥

१७४९ इदं श्रेष्ठं ज्योतिषां ज्योतिरागाच्चित्रः प्रकेतो अजनिष्ट विभ्वा ।
यथा प्रसूता सवितुः सवायैं एवा रात्र्युषसे योनिमारैक् ॥ १ ॥ (ऋ. १।११३।१)

१७५० रुशद्वत्सा रुशती श्वेत्यागादारैगु कृष्णा सदनान्यस्याः ।
समानबन्धू अमृते अनूची द्यावा वर्णं चरत आमिनाने ॥ २ ॥ (ऋ. १।११३।२)

१७५१ समानो अध्वा स्वस्रोरनन्तस्तमन्यान्या चरतो देवशिष्टे ।
न मेथेते न तस्थतुः सुमेके नक्तोषासा समनसा विरूपे ॥ ३ ॥ १४ (वि) [illegible]
[illegible] (ऋ. १।११३।३)

१७५२ आ भात्यग्निरुषसामनीकमुद्विप्राणां देवया वाचो अस्थुः ।
अर्वाञ्चा नूनं रथ्येह यातं पीपिवांसमश्विना घर्ममच्छ ॥ १ ॥ (ऋ. ५।७६।१)

१७५३ न संस्कृतं प्र मिमीतो गमिष्ठान्ति नूनमश्विनोपस्तुतेह ।
दिवाभिपित्वेऽवसागमिष्ठा प्रत्यवर्तिं दाशुषे शम्भविष्ठा ॥ २ ॥ (ऋ. ५।७६।२)

[१७४९] (ज्योतिषां श्रेष्ठं इदं ज्योतिः) तेजस्वी पदार्थांमध्ये ही उषा श्रेष्ठ तेजस्विनी अशी (आगात्) उदय पावली आहे. (चित्रः प्रकेतः) तिचा प्रकाश विलक्षण तेजस्वी (विभ्वा अजनिष्ट) चारही बाजूंला पसरला आहे. (यथा सवितुः प्रसूता रात्रिः) सूर्यापासून उत्पन्न झालेली - सूर्य गेल्यामुळें उत्पन्न झालेली रात्री (उषसे सवाय) उषेला उत्पन्न करण्यासाठीं (योनिं आरैक्) आपणामध्यें तिचें उत्पत्ति स्थान करीत असते. ॥ १ ॥

[१७५०] (रुशती श्वेत्या) प्रकाशित होणारी अशी श्वेत रंगाची उषा (रुशद्वत्सा आगात्) तेजस्वी सूर्य-रूप बालकाबरोबर आली आहे. (अस्याः कृष्णा सदनानि आरैक्) ह्या रात्रीचीं काळ्या रंगाचीं स्थानें होतीं. (समान-बन्धू) समान बन्धुत्व रात्री व उषा यांचें सूर्याशीं आहे. (अमृते अनूची) या अमर व क्रमानें येणाऱ्या आहेत व या (वर्णं आमिमाने) एकमेकांच्या रंगांना दूर करणाऱ्या (द्यावा चरतः) द्युलोकामध्यें फिरत असतात. ॥ २ ॥

[१७५१] (स्वस्रोः अध्वा समानः) रात्री व उषा या दोनही बहिणींचा मार्ग एकच आहे व तो (अनन्तः) अन्तरहित आहे. (तं देवशिष्टे अन्यान्या चरतः) त्या मार्गानें सूर्यानें आज्ञा केल्या प्रमाणें एका मागून एक क्रमानें येतात. (सुमेके नक्तोषासा) उत्तम कर्तृत्ववान् अशा या रात्री व उषा (विरूपे समनसा) विरुद्ध रूपाच्या असतांही एका विचाराच्या (न मेथेते) स्पर्धा आपसांत करीत नाहींत व (न तस्थतुः) स्थिरही राहत नाहींत. आपलें नेमलेलें कार्य करीत असतात. ॥ ३ ॥

[१७५२] (उषसां अनीकं अग्निः आभाति) उषांचें मुख असा हा अग्नि प्रदीप्त झाला आहे. ज्ञान्यांच्या (विप्राणां देवयाः वाचः उदस्थुः) ज्ञान्यांच्या दिव्य स्तुतिरूप वाणी सुरू झाल्या आहेत. या कारणानें (रथ्या अश्विना) रथा-मध्यें बसणाऱ्या अश्विदेवांनो ! (अर्वाञ्चा नूनं इह) आमच्याकडे येथें या. यज्ञामध्यें (पीपिवांसं घर्मं अच्छ) पिण्यास योग्य सोमरसाजवळ (आयातं) या. ॥ १ ॥

[१७५३] हे अश्विनीकुमार हो ! (संस्कृतं न प्रमिमीतः) संस्कार केलेल्या पदार्थांना तुम्ही मधुरें करूं नका. (अन्ति नूनं इह गमिष्ठा) जवळ असलेल्या या यज्ञामध्यें जा. (अश्विना उपस्तुता) अश्विनी देवांची स्तुति केली जात आहे. (दिवाभिपित्वे) दिवसाचा प्रातःकाल होतांच (अवसा अवर्तिं प्रत्यागमिष्ठा) रक्षण करणाऱ्या अन्नासह तुम्ही येत असतां यासाठीं (दाशुषे शंभविष्ठा) दान देणाऱ्याला सुख देणारे व्हा. ॥ २ ॥

१७५४ उता यातꣳसंगवे प्रातरह्नो मध्यन्दिन उदिता सूर्यस्य ।
दिवा नक्तमवसा शन्तमेन नेदानीं पीतिरश्विना ततान ॥ ३ ॥ १५ (लो) ॥

[धा० २४ । उ० नास्ति । स्व० ९] (ऋ. ५।७६।३)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

[५]

१७५५ एता उ त्या उषसः केतुमक्रत पूर्वे अर्धे रजसो भानुमञ्जते ।
निष्कृण्वाना आयुधानीव धृष्णवः प्रति गावोऽरुषीर्यन्ति मातरः ॥ १ ॥ (ऋ. १।९२।१)

१७५६ उदपप्तन्नरुणा भानवो वृथा स्वायुजो अरुषीर्गा अयुक्षत ।
अक्रन्नुषासो वयुनानि पूर्वथा रुशन्तं भानुमरुषीरशिश्रयुः ॥ २ ॥ (ऋ. १।९२।२)

१७५७ अर्चन्ति नारीरपसो न विष्टिभिः समानेन योजनेना परावतः ।
इषं वहन्तीः सुकृते सुदानवे विश्वेदह यजमानाय सुन्वते ॥ ३ ॥ १६ (कि) ॥

[धा० २६ । उ० १ । स्व० ३] (ऋ. १।९२।३)

[१७५४] हे (अश्विना) अश्विदेव हो ! (अह्नः संगवे) दिवसाच्या गोदोहनाच्या वेळीं, (प्रातः) प्रातःकालीं (सूर्यस्य उदिता) सूर्यउदय पावल्यानन्तर, (मध्यन्दिने) मध्यान्हांत (दिवा) दिवसा, (नक्तं) रात्रीं (शंतमेन अवसा) सुखदायक रक्षणाच्या साधनासह (आयातं) या. (उत) कारण कीं (इदानीं पीतिः न ततान) अजून सोम पिण्याचा प्रारंभ झालेला नाहीं. ॥ ३ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५] पञ्चमः खण्डः ।

[१७५५] (त्या एताः उषसः) त्या ह्या उषा (केतुं अक्रत) प्रकाश करीत आहेत. (रजसः पूर्वे अर्धे भानुं अंजते) अन्तरिक्षाच्या पूर्व अर्धामध्यें प्रकाश झाला आहे, (धृष्णवः आयुधानि इव) वीर लोक जशीं आयुधें तीक्ष्ण करतात, त्याप्रमाणें (निष्कृण्वानाः) आपल्या प्रकाशानें जगताला प्रकाशित करीत (गावः) गमन करणाऱ्या तेजस्वी (मातरः अरुषीः) जगज्जननी माता तेजस्वी उषा (प्रति यन्ति) प्रतिदिवशीं येत असतात. ॥ १ ॥

[१७५६] (अरुणाः भानवः) अरुण रंगाचे किरण (वृथा उदपप्तन्) सहजच वर आले आहेत. (स्वायुजः अरुषीः गाः अयुक्षत) स्वतःच जोडले जाणारे बैल - किरण - रथाला जोडले गेले आहेत. (उषासः पूर्वथा वयुनानि अक्रन्) उषा प्रथमपासून ज्ञानाचा प्रसार करीत आहेत. नंतर (अरुषीः रुशन्तं भानुं अशिश्रयुः) प्रकाशणाऱ्या उषा तेजस्वी सूर्याची सेवा करूं लागल्या. ॥ २ ॥

[१७५७] (सुकृते सुदानवे) उत्तम कर्म करणाऱ्या व उत्तम दान देणाऱ्या (सुन्वते यजमानाय) सोमरस काढणाऱ्या यजमानाला (विश्वा इत् अह इषं वहन्तीः) पुष्कळ अन्न देणाऱ्या (नारीः) उषारूपी स्त्रिया (विष्टिभिः) आपल्या किरणांनीं (समानेन योजनेन) समान योजनेनें (परावतः आ अर्चन्ति) दूर देशांतून आकाशाला सुन्दर बनवतात. (अपसः न) युद्ध करणारे वीर जसे आपल्या आयुधांनीं रणभूमीला सुशोभित करतात. ॥ ३ ॥

१७५८ अबोध्यग्निर्ज्म उदेति सूर्यो व्युषाश्चन्द्रा मह्यावो अर्चिषा ।
आयुक्षातामश्विना यातवे रथं प्रासावीद्देवः सविता जगत्पृथक् ॥ १ ॥ (ऋ. १।१५७।१)

१७५९ यद्युञ्जाथे वृषणमश्विना रथं घृतेन नो मधुना क्षत्रमुक्षतम् ।
अस्माकं ब्रह्म पृतनासु जिन्वतं वयं धना शूरसाता भजेमहि ॥ २ ॥ (ऋ. १।१५७।२)

१७६० अर्वाङ् त्रिचक्रो मधुवाहनो रथो जीराश्वो अश्विनोर्यातु सुष्टुतः ।
त्रिबन्धुरो मघवा विश्वसौभगः शं न आ वक्षद्द्विपदे चतुष्पदे ॥ ३ ॥ १७ (छा) ॥
[धा० २१ । उ २ । स्व० २] (ऋ. १।१५७।३)

१७६१ प्र ते धारा असश्चतो दिवो न यन्ति वृष्टयः । अच्छा वाजं सहस्रिणम् ॥ १ ॥ (ऋ. ९।५७।१)

१७६२ अभि प्रियाणि काव्या विश्वा चक्षाणो अर्षति । हरिस्तुञ्जान आयुधा ॥ २ ॥ (ऋ. ९।५७।२)

१७६३ स मर्मृजान आयुभिरिभो राजेव सुव्रतः । श्येनो न वंसु षीदति ॥ ३ ॥ (ऋ. ९।५७।३)

[१७५८] (अग्निः ज्मः अबोधि) अग्नि आपल्या वेदीमध्यें प्रदीप्त झाला आहे. (मही उषाः अर्चिषा चन्द्रा वि आवः) मोठी उषा आपल्या तेजानें लोकांना आनंद देत प्रकट झाली आहे. हे (अश्विना) अश्विदेव हो ! (यातवे रथं आयुक्षातां) यज्ञाजवळ जाण्यासाठीं आपला रथ जोडा. (सविता देवः) सूर्यदेव (जगत् पृथक् प्रासावीत्) सर्व जगांतील प्राण्यांना पृथक् पृथक् आपआपल्या कर्मामध्यें लावीत आहे. ॥ १ ॥

[१७५९] हे (अश्विना) अश्विनीकुमार हो ! (यत् वृषणं रथं युञ्जाथे) जेव्हां तुम्ही आपल्या बलवान् रथाला जोडतां तेव्हां (नः क्षत्रं) आमच्या क्षत्रियांचें (मधुना घृतेन उक्षतं) मधुर तुपानें पोषण करा. (अस्माकं पृतनासु ब्रह्म जिन्वतं) आमच्या प्रजाजनांमध्यें ज्ञान वाढवा, (वयं शूरसातौ धना भजेमहि) आणि आम्ही युद्धामध्यें धनाला प्राप्त करूं असें करा. ॥ २ ॥

[१७६०] (अश्विनोः रथः अर्वाक् यातु) अश्विनौंचा रथ आपल्याजवळ येवो. (त्रिचक्रः मधुवाहनः) तीन चाकें असलेला व मधुर अमृताचें धारण करणारा (जीराश्वः सुष्टुतः) जलद चालणाऱ्या घोड्यांचा व ज्याची उत्तम स्तुति होत आहे असा (त्रिबन्धुरः मघवा विश्वसौभगः) तीन बैठका असलेला धनानें भरलेला व सर्व सौभाग्यांनीं युक्त रथ (नः द्विपदे चतुष्पदे शं आवक्षत्) आमच्या द्विपाद व चतुष्पादांना सुख देवो. ॥ ३ ॥

[१७६१] हे सोमा ! (ते असश्चतः धाराः) तुझ्या न थांबतां स्रवणाऱ्या धारा (सहस्रिणं वाजं अच्छ प्रयन्ति) सहस्रों प्रकारचें अन्न आम्हांला देतात. (दिवः वृष्टयः न) जशी द्युलोकांतून वृष्टी होते. ॥ १ ॥

[१७६२] (हरिः) हिरव्या रंगाचा सोम (विश्वा प्रियाणि काव्या चक्षाणः) सर्व प्रिय कर्मांना पाहत (आयुधा तुंजानः) आयुधें शत्रूंवर फेंकीत (अभ्यर्षति) पुढें जातो. ॥ २ ॥

[१७६३] (सुव्रतः सः) उत्तम कर्मे करणारा तो सोम (आयुभिः मर्मृजानः इभः राजा इव) ऋत्विजां-कडून शुद्ध होत असतां निर्भीक राजाप्रमाणें दिसतो. (श्येनः न) श्येन पक्ष्याप्रमाणें (वंसु सीदति) पाण्यामध्यें त्रिसळला जात आहे. ॥ ३ ॥

१७६४ स नः विश्वा दिवो वसूतो पृथिव्या अधि । पुनान इन्दवा भर ॥ ४ ॥ १८ (ओ) ॥
[illegible]

॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

॥ इति अष्टमप्रपाठके तृतीयोऽर्धः ॥ ३ ॥ अष्टमः प्रपाठकश्च समाप्तः ॥ ८ ॥

॥ इत्येकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥

[१७६४] हे (इन्दो) सोमा ! (पुनानः) शुद्ध होणारा (सः) तो तूं (दिवः अधि) द्युलोकामध्यें (उत पृथिव्याः) आणि पृथिवीवर राहून (विश्वा वसु नः आभर) सर्व धनें आम्हांला भरपूर दे. ॥ ४ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इत्येकोनविंशोऽध्यायः ॥

एकोनविंश अध्याय

या अध्यायामध्यें उषा, अश्विनौ, इन्द्र व सोम या देवतांचीं वर्णनें आहेत. त्यांतील उषा देवतेचे वर्णन पहा —

उषा देवता

१ एषा स्या नव्यं दिवः दुहिता प्रत्यदर्शि, अजनी, स्वसुः परि व्युच्छन्ती [१७२५]– ती उषा उत्तम प्रेरणा करणारी, सूर्याची मुलगी, दिसूं लागली आहे, ही प्रकाशाला जन्म देणारी, रात्रीरूपी बहिणीनंतर चारही बाजूंनीं प्रकाशित होत आहे.

२ अश्वा इव चित्रा, अरुषी गवां माता, ऋतावरी उषा अश्विनोः सखा अभूत् [१७२६]– घोडीप्रमाणें सुन्दर, चमकणारी, किरणांची माता, यज्ञाची प्रेरक उषा अश्विदेवांना मित्रासारखी झाली आहे. अश्विनी हे देव उषःकालीं दिसतात, यासाठीं त्यांची मैत्रीण उषा आहे.

३ हे उषः ! वस्व ईशिषे [१७२७]– हे उषे ! तूं धनांची स्वामिनी आहेस.

४ गवां माता असि [१७२७]– प्रकाश किरणांना उत्पन्न करणारी त्यांची माताच आहेस.

५ एषा प्रिया अपूर्व्या उषा दिवः व्युच्छति [१७२८] – ही प्रिय अपूर्व उषा द्युलोकाला प्रकाशित करते.

६ वाजिनीवति उषः ! अस्मभ्यं तत् चित्रं आ भर तोकं तनयं च धामहे [१७३१]– हे अन्न असलेल्या बाळगणाऱ्या उषे ! आम्हांला तें श्रेष्ठ धन दे ज्यामुळे आम्ही पुत्रपौत्रांचें उत्तम पोषण करूं शकूं.

७ अश्वावति गोमति सूनृतावति विभावरि उषः ! अद्य इह अस्मे रेवत् व्युच्छ [१७३२]– हे घोडे व गाईंनीं युक्त, सत्य करणाऱ्या प्रकाशमान् उषे ! आज येथें आम्हांला धनानें युक्त करून प्रकाशित कर.

८ हे वाजिनीवति उषः ! अरुणान् अश्वान् अद्य युंक्ष्व, विश्वा सौभगानि नः आ वह [१७३३]– हे अन्न आपल्याजवळ बाळगणाऱ्या उषे ! आपल्या रथाला लाल रंगाचे घोडे जोड व सर्व सौभाग्यें आम्हांला दे.

९ हे सुजाते अश्वसूनृते उषः ! दिवित्मती नः महे राये बोधय यथा चित् नः अबोधयः [१७४०]– हे उत्तम कुलीन व आज यज्ञाला प्रारंभ करणाऱ्या उषे ! तूं प्रकाशयुक्त अशी आम्हांला पुष्कळ धन प्राप्तिच्या मार्गाची जाणीव होईल असा बोध कर, अशासाठीं जागें कर, जसें तूं पूर्वी जागें केलें होतेंस.

१० हे दिवः दुहितः ! सा आभरद् वसु नः व्युच्छ [१७४२]– हे द्युलोकाच्या पुत्रि उषे ! तूं भरपूर धन देणारी होऊन आमच्यासाठीं प्रकाशित हो.

११ ज्योतिषां इदं श्रेष्ठं ज्योतिः आगात्, चित्रः प्रकेतः विश्वा अजनिष्ट [१७४९]– तेजस्वी पदार्थांमध्यें विशेष तेजस्विनी उषा उदय पावली आहे, तिचा प्रकाश सर्व जगावर पसरला आहे.

१० [illegible] अनीकं अग्निः आभाति, [illegible] [illegible] [१७५२]– [illegible] आहे. आतुरांचे हित [illegible] सुरू झाले आहेत.

१३ एता उ त्या उषसः केतुं अक्रत, [illegible] पूर्वे अर्धे भानुं अंजते, निष्कृण्वानाः मातरः उषसः प्रति यन्ति [१७५५]– त्या ह्या उषा प्रकाश पसरवीत आहेत. अन्त-रिक्षाच्या पूर्व दिशेच्या अर्धभागांत प्रकाश झाला आहे. आपल्या प्रकाशानें जगाला प्रकाशित करीत या माता उषा प्रतिदिवशी येत असतात.

उषा ही सूर्याची अथवा द्युलोकाची पुत्री आहे. हिची बहिण रात्री आहे. या दोघी एकामागून एक अशा येत असतात. उषा दिसण्यामध्यें सुन्दर दिसते; कारण ती प्रकाशानें शोभत असते. प्रकाश किरणांची ही माता आहे. उषेपासूनच प्रकाशाचे किरण निघत असतात. आकाशाच्या पूर्व बाजूच्या [illegible] लालसर प्रकाश दिसूं लागतो, ती उषा होय. यज्ञ करणारे [illegible] व अग्नि [illegible] [illegible] [illegible] हा श्रेष्ठ [illegible] होय.

[illegible] चोर [illegible] [illegible] [illegible] [illegible] सुरू होतो. अग्नि [illegible] केला जातो व [illegible] होतो.

असें हें वर्णन, वर्णन उषेचें या मंत्रांत आलें आहे. उषः-[illegible] अश्विनी हे देव [illegible] असतात. या दोघी उषः-[illegible] [illegible] अश्विनी [illegible]

अश्विनौ

१ उस्रा सिन्धु-मातरा रयीणां मनोतरा धिया वसुविदा [१७२९]– हे अश्विनौ देव शत्रूंचा नाश करणारे, [illegible] करणारे, धनें देणारे व बुद्धिपूर्वक कार्य करणारांस धन देणारे आहेत.

२ [illegible] रथः [illegible] अधि [illegible], यद् [illegible] [illegible] [१७३०]– तुमचा रथ [illegible] नेला जातो, त्यावेळी [illegible] [illegible]

३ हे अश्विना ! [illegible] [illegible] वर्तिः [illegible] [illegible] [illegible] [illegible] आ [illegible] [१७३४]– हे अश्विनौ हो ! शत्रूंचा नाश करणारे तुम्ही [illegible] [illegible], [illegible] व सुवर्ण [illegible] युक्त असलेल्या [illegible] [illegible] [illegible] [illegible].

४ हे अश्विना ! यौ दिवः श्लोकं ज्योतिः [illegible] जनाय चक्रतुः, युवं न ऊर्जं आवहतम् [१७३६]– हे अश्विनौ ! जे तुम्ही आकाशांतून प्रशंसनीय प्रकाश याप्रमाणें लोकांच्या हितासाठीं आणतां, असे तुम्हीं आम्हांला बल वाढवणारें अन्न द्या.

५ हे दस्रा हिरण्यवर्तनी सुषुम्ना सिन्धुवाहसा माध्वी ! मम इदं श्रुतं [१७४४]– हे शत्रूंचा नाश करणाऱ्या, सुवर्णाच्या रथांत बसणाऱ्या उत्तम धन जवळ बाळगणाऱ्या, नद्यांमधून जाणाऱ्या व मधुविद्या जाणणाऱ्या अश्विनौ देवांनो ! माझी प्रार्थना ऐका.

६ हे अश्विना ! [illegible] हिरण्यवर्तनी वाजिनीवसू जुषाणा युवं आगच्छतम् [१७४५]-हे अश्विनौ देव हो ! तुम्ही शत्रूला रडवणारे, सुवर्णाच्या रथांत बसणारे, अन्न व धन जवळ बाळगणारे, [illegible] आहां. असे तुम्ही आमच्या यज्ञात या.

७ [illegible] [illegible] [illegible] [illegible], [illegible] [illegible] [१७७३]– दिवसा प्रातःकाल [illegible] [illegible] तुम्ही [illegible] असतां. यासाठीं [illegible] [illegible].

८ हे अश्विना ! अह्ना सक्थायं [illegible] [illegible] [illegible] शंतमेन अवसा [illegible] [[illegible]]– हे अश्विनौ हो ! दिवसा [illegible], [illegible], दिवसा व रात्री सुख देणाऱ्या संरक्षणाच्या साधनांसह या.

९ अश्विनोः रथः [illegible] यातु, [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible], [illegible], [illegible], [illegible] नः द्विपदे चतुष्पदे शं [illegible] [[illegible]] –अश्विनींचा रथ आमच्याजवळ येवो. तीन [illegible] मधुर रसानें धारण करणारा, जलद चालणारे घोडे जोडलेला, ज्याची उत्तम प्रशंसा होत आहे, तीन बैठका असलेला, धनांनी भरलेला, सर्व सौभाग्यांनीं युक्त असलेला रथ आमच्या द्विपाद व चतुष्पादांना सुख देवो.

अश्विनौ शत्रूंचा नाश करतात, धन देतात, [illegible] कार्य करणारांस ऐश्वर्य अर्पण करतात. त्यांचे [illegible] [illegible] ही [illegible] व त्यावेळीं त्याला पक्षी जोडलेले असतात. [illegible] व धृत आणि सुवर्ण [illegible] [illegible] [illegible] आहेत [illegible] असतात. यांचा हा रथ सुवर्णाचा, सुवर्णानें मढविलेला असा सुन्दर आहे. हे आपल्या शौर्यानें शत्रूला रडवितात, अन्न व धन आपल्या रथांत ठेवतात. हे सकाळीं गाईचें दोहन करण्याच्यावेळीं, दिवसा व रात्री [illegible] [illegible] [illegible] देणाऱ्या साधनांना [illegible]

बरोबर घेऊन रोग्यांच्या जवळ जातात व त्यांना करावयास योग्य औषधोपचार करतात. यांच्या रथाला तीन चाकें, तीन बैठका असतात व यामध्यें सर्वांचें आरोग्य वाढेल अशीं साधनें असतात.

अग्नि

१ ऊर्जो-न-पातं पावकशोचिषं अग्निं अस्मिन् स्वध्वरे यज्ञे आहुवे [१७१२]- बल कमी न करणाऱ्या, पवित्रता करणाऱ्या प्रकाशानें युक्त अग्निला उत्तम हिंसा-रहित अशा या यज्ञामध्यें आम्ही बोलावीत आहों.

२ मित्रमहः अग्ने ! शुक्रेण शोचिषा देवैः बर्हिषि आसत्सि [१७१३]- हे मित्रांना पूज्य असणाऱ्या अग्ने ! तो तूं शुद्ध ज्वालांनीं युक्त होऊन, देवांना बरोबर घेऊन आसनावर बैस.

३ यः वसुः । अस्तं यं धेनवः यन्ति, अस्तं आशवः अर्वन्तः [१७३७]- अग्नि सर्वांचा निवासक आहे, त्याच्या आश्रयाला गाई जातात व घोडेही जातात.

४ विश्वचर्षणिः अग्निः प्रीतः स्वाभुवं वार्यं राये याति [१७३८]- सर्व लोकांचें कल्याण करणारा अग्नि प्रसन्न होऊन आपली भरभराट करणारें धन देण्यासाठीं यज्ञा-मध्यें जात असतो.

५ अग्निः जनानां समिधा अबोधि [१७४६]- अग्नि याजकांच्या समिधांनीं प्रदीप्त झाला आहे.

६ आयतीं उषासं प्रति भानवः वयां प्रोज्जिहाना यह्वाः इव नाकं अच्छ प्र सस्रते [१७४६]- येणाऱ्या उषःकालामध्यें अग्निच्या ज्वाला आपल्या शाखा पसरणाऱ्या वृक्षांप्रमाणें अन्तरिक्षाच्या बाजूला पसरत आहेत. अग्नि पेटतांच त्याच्या ज्वाला अन्तरिक्षांत पसरतात, ज्याप्रमाणें वृक्षाच्या शाखा पसरतात.

७ अग्निः देवान् यजथाय अबोधि । प्रातः सुमनाः ऊर्ध्वः अस्थात् । समिद्धस्य रुशत् पाजः अदर्शि । महान् देवः तमसः निरमोचि [१७४७]- अग्नि देवाचें यजन करण्यासाठीं प्रदीप्त झाला आहे. प्रातःकालीं उत्तम मनानें वर उठला आहे. प्रज्वलित झालेल्या अग्निचें तेजस्वी बल दिसूं लागलें आहे. हा मोठा देव जगाला अन्धकारापासून मुक्त करीत आहे.

८ शुचिः अग्निः शुचिभिः गोभिः अंक्ते [१७४८]- शुद्ध अग्नि शुद्ध किरणांनीं जगाला प्रकाशित करीत असतो.

९ अग्निः ज्मः अबोधि [१७५८]- अग्नि वेदीमध्यें प्रज्वलित झाला आहे.

अग्नि हा बल कमी न करणारा आहे. अग्नि शरीरांत उष्णतेच्या रूपानें असतो. तो असेपर्यंतच शरीरांत बल असतें. जीवन हा एक यज्ञच आहे, त्या जीवन यज्ञाचा आधार शरीरां-तील उष्णता आहे. सर्व इंद्रियामध्यें अनेक देवांचे अंश राहत असतात. त्या देवांसह हा अग्नि येथें राहतो व शरीर चालवतो. ही शरीरांतील उष्णता कमी झाली, म्हणजे सर्व देव निघून जातात व शरीर कार्य करण्यास असमर्थ होतें.

हा अग्नि सर्व शक्तिचा निवासक आहे. त्याच्यामध्यें गाईच्या दुधाचें व तुपाचें हवन होतें, इतर हवनीय पदार्थ हवनासाठीं आणले जातात. सर्व मानवांचें कल्याण करणारा हा अग्नि आहे.

हा अग्नि समिधांनीं पेटविला जातो व नंतर त्यांत हव्य पदार्थांचें हवन केलें जातें. यज्ञस्थानामध्यें सकाळींच अग्नि प्रदीप्त केला जातो. तो प्रदीप्त होतांच त्याच्या ज्वाला आकाशांत पसरतात, ज्याप्रमाणें वृक्षाच्या शाखा आकाशांत पसरतात.

अग्नि महान् देव आहे. तो अन्धकार दूर करतो व प्रकाश पसरवतो. आपल्या प्रकाशानें सर्वत्र शुद्धता करून हा सर्व मानवांचें कल्याण करतो.

इन्द्र

१ हे इन्द्र ! मन्द्रैः मयूर-रोमभिः हरिभिः आयाहि [१७१८]- हे इन्द्रा ! आनंद देणाऱ्या मोरासारख्या केसांच्या घोड्यांनीं तूं येथें ये.

२ केचित् त्वा मा नियेमुः धन्वेव तान् अति इहि [१७१८]- कोणीहि तुला मध्यें न थांबवोत, मध्यें थांबवून घेणारांना दूर करून तूं येथें ये.

३ इन्द्रः वृत्रखादः, वलं रुजः, पुरां दर्मः, दृढा-चित् आरुजः, हर्योः अभिस्वरे रथस्य स्थाता [१७१९] - इन्द्र वृत्राचा नाशक, वल राक्षसाचा विध्वंसक, शत्रूंच्या नगरांना तोडणारा, सुदृढ शत्रूंना पराभूत करणारा व घोड्यांच्या रथांत बसणारा आहे.

४ क्रतुं पुष्यसि, सुगोपाः [१७२०]- तूं यज्ञाचें पोषण करतोस व तूं गाईचें उत्तम पालन करणारा आहेस.

५ हे मघवन् ! हे इन्द्र ! त्वत् अन्यः मर्डिता नास्ति [१७२३]- हे धनवान् इन्द्रा ! तुझ्याशिवाय सुख देणारा कोणीहि नाहीं.

६ हे वसो ! ते राधांसि अस्मान् कदाचन मा दभन् [१७२४]- तुझीं धनें आम्हांला कधींहि विनष्ट न करोत.

७ ते ऊतयः मा दभन् [१७२४] - तुझीं संरक्षणाचीं साधनें आमचा नाश न करोत.

८ नः चर्षणिभ्यः विश्वा वसूनि आ उप मिमीहि [१७२४]- आमच्या प्रजाजनांना सर्व धनें भरपूर आणून दे.

इन्द्र सुन्दर आयाळ असलेल्या घोड्यांच्या रथांत बसून यज्ञाच्या ठिकाणीं जात असतो. इन्द्र वृत्राचा वध करतो, बल राक्षसाला मारतो, शत्रूंचीं नगरें तोडतो, जे सामर्थ्यवान् शत्रू आहेत त्यांनाही तो पराभूत करतो, गाईंचें व घोड्यांचें पालन करतो. इन्द्राशिवाय दुसरा कोणीहि सुख देणारा नाहीं. इन्द्र लोकांना अनेक प्रकारचीं धनें देतो व त्यांना तो मोठे करतो. सर्वांचें संरक्षण तो करतो व सर्वांना निर्भय करतो. अशा रीतिनें तो सर्व लोकांचें कल्याण करतो.

सोम

आतां सोमदेवतेचें वर्णन पहा—

१ हे अद्रिवः सोम ! ते शुष्मासः रक्षः भिन्दन्तः उदस्थुः, याः स्पृधः नुदस्व [१७१४]- हे दगडांनीं कुटल्या जाणाऱ्या सोमा ! तुझीं सामर्थ्यें राक्षसांचा नाश करीत वर येत आहेत व जे स्पर्धा करणारे तुझे शत्रु आहेत त्यांना तूं दूर कर.

२ अया ओजसा निजघ्निः, अबिभ्युषा हृदा रथ-संगे हिते धने स्तवै [१७१५]- या तुझ्या बलांनीं तूं शत्रूंचा नाश करतोस, तसेंच निर्भय हृदयानें रथांच्या युद्धांमध्यें शत्रु नष्ट केल्यानंतर धन प्राप्त व्हावें यासाठीं मी तुझी स्तुति करीत आहें.

३ पवमानस्य अस्य व्रतानि दूळ्या न आधृषे, यः त्वा पृतन्यति, रुज [१७१६]- या गाळल्या जाणाऱ्या कर्मांनीं दुष्ट राक्षस प्रगति करूं शकत नाहींत. हे सोमा ! जो तुझ्यावर सैन्य पाठवण्याची इच्छा करतो, त्याचा नाश कर.

४ मदच्युतं हरिं वाजिनं मत्सरं तं इन्दुं नदीषु इन्द्राय [१७१७]- आनन्द देणाऱ्या हिरव्या रंगाच्या, बल वाढवणाऱ्या व उत्साह वृद्धिंगत करणाऱ्या, चमकणाऱ्या सोमाला नदीच्या पाण्यांत मिळवा व तो सोमरस इन्द्राला द्या.

५ ते असश्चतः धाराः सहस्रिणं वाजं अच्छ प्रयन्ति [१७६१]- तुझ्या न थांबतां स्रवणाऱ्या धारा सहस्र प्रकारचें अन्न आम्हांला देतात.

६ हरिः विश्वा प्रियाणि काव्या चक्षाणः, आयुधा तुजानः अभ्यर्षति [१७६२]- हिरव्या रंगाचा सोम सर्व प्रिय यज्ञकर्म पहात व स्तुति ऐकत आयुधें शत्रूंवर फेंकीत पुढें जातो.

*

७ सुव्रतः सः आयुभिः मर्मृजानः इभः राजा इव वसु सीदति [१७६३]- उत्तम कर्म करणारा तो सोम ऋत्विजांकडून शुद्ध होत असतां राजाप्रमाणें दिसतो व नंतर तो पाण्यांत मिसळला जातो.

८ हे इन्दो ! पुनानः दिवः अधि उत पृथिव्याः विश्वा वसु नः आभर [१७६४]- हे सोमा ! शुद्ध होत असतांना तूं द्युलोकामध्यें व पृथिवीवर राहून सर्व धनें आम्हांला भरपूर दे.

सोम दगडांनीं कुटतात व त्याचा रस काढतात, त्याचा प्रकाश यावेळीं बाहेर पडूं लागतो व तो तेथील अन्धकार दूर करतो. हा सोम आपल्या सामर्थ्यानें वीरामध्यें अपरिमित उत्साह उत्पन्न करतो व त्यांच्या द्वारें सर्व शत्रूंना दूर करतो. जो याचा द्वेष करतो त्याचा हा नाश करतो.

हा सोमरस पाण्यांत मिसळतात. याच्या धारा अनेक प्रकारचें अन्न देतात. सोम पिण्यानें अन्नाचें कार्य भागतें. क्षत्रिय वीर याला पितात व उत्साहित होऊन शत्रूवर आयुधें फेंकतात व शेवटीं विजयी होतात. सोमरस पाण्यांत मिसळल्यानंतर त्याला गाळतात व असा तयार केलेला सोमरस सर्व पृथिवीवरील सर्व ऐश्वर्य देण्यास योग्य होतो.

' स्वतः सोमच शत्रूवर शस्त्रें फेंकीत असतो. ' असें वर्णन आलंकारिक आहे. वीर सोमरसपानानें उत्साहित होऊन शत्रूवर शस्त्रें फेंकतात व विजय मिळवतात, सोमाचें हें आलंकारिक वर्णन अलंकार पाहून व समजून घेऊन तें समजून घेतलें पाहिजे. नाहींतर अर्थाचा अनर्थ होईल.

सुभाषितें

१ कविः अग्निः प्रत्नेन जन्मना स्वां तन्वं शुम्भानः विप्रेण वावृधे [१७११]- ज्ञानी अग्नि पुरातन स्तोत्रानें आपल्या शरीराची शोभा वाढवून, ब्राह्मणांनीं केलेल्या स्तुतिनीं मोठा होतो. ब्राह्मण अग्निला पेटवतात व स्तोत्रांचे मंत्र म्हणून हवनानें त्याला वाढवतात.

ज्ञानी तेजस्वी पुरुष आपलें शरीर नीट ठेवून ज्ञानानें आपली वाढ करतो.

२ ऊर्जः नपातं पावकशोचिषं अग्निं अस्मिन् स्वध्वरे यज्ञे आहुवे [१७१२]- बल कमी न करणाऱ्या

[illegible] प्रकाराने तुझा अभिषेक [illegible] उत्पन्न [illegible] [illegible] आहे. [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] बोलावी.

३ मित्रमहः [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [१७१३]– मित्रांना पूज्य असणारा तू आपल्या तेजाने देवांबरोबर आसनावर बैस. मित्रांना [illegible] [illegible] तेजस्वी असावें व श्रेष्ठांबरोबर सभेमध्ये बसावें.

४ [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] नुदस्व [१७१४]– तुम्ही [illegible] [illegible] [illegible] [illegible] प्रकार होतात व जे [illegible] [illegible] [illegible] [illegible] करतोस.

५ अया ओजसा [illegible] [१७१५]– तूं या बळानें [illegible] नाश करतोस.

६ [illegible] [illegible] [illegible] [illegible] [१७१६]– [illegible] [illegible] [illegible] [illegible] नष्ट कर.

७ [illegible] [illegible] तुकया न [illegible] [१७१७]– [illegible] [illegible] [illegible] पुढें होऊं [illegible] [illegible].

८ यः त्वा पृतन्यति, [illegible] [१७१८]– [illegible] [illegible] [illegible] पाठवतो, त्याचा नाश कर.

९ [illegible] [illegible] [illegible] [illegible] [१७१९]– [illegible] [illegible] प्रतिबंध [illegible] [illegible] [illegible].

१० [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [१७१९]– [illegible] आहेत.

११ [illegible] [illegible] [१७२०]– [illegible] [illegible] करतोस.

१२ [illegible] गाः [illegible] [१७२०]– [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] तुम्ही [illegible].

१३ हे [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [१७२२]– हे [illegible] [illegible]! [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] तुला आनंदित [illegible].

१४ तत् [illegible] सहः [illegible] [१७२२]– [illegible] [illegible] [illegible] तूं आपल्यामध्यें धारण करतोस.

१५ हे [illegible], इन्द्र ! [illegible] [illegible] [illegible] न [illegible] [१७२३]– [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] तुझा [illegible] [illegible] [illegible] नाही.

१६ हे [illegible] ! [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [१७२४]– हे [illegible] [illegible] ! [illegible] [illegible] [illegible] आम्हांला कांहीही [illegible] न [illegible].

१७ [illegible] [illegible] [illegible] [१७२५]– तुम्ही [illegible] [illegible] [illegible] न [illegible].

१८ हे [illegible] ! [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [१७२५] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] आहे तूं हे

१९ [illegible] [illegible] [illegible] [१७२६]– तूं [illegible] [illegible] करणारी [illegible] [illegible].

२० [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [१७२६]– [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible].

२१ हे [illegible] ! [illegible] [illegible] [illegible] [illegible], [illegible] [illegible] [illegible] [illegible] [१७२७]– हे [illegible] ! आम्हांला [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible].

२२ [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [१७२८]– हे [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible].

[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible].

२३ [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [१७२९]– हे [illegible] ! [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] सर्व [illegible] आम्हांला दे.

[illegible] [illegible] [illegible] [illegible] अर्थ ' [illegible] [illegible] ' असा आहे. " [illegible] " या अर्थ [illegible] [illegible] [illegible] [illegible]. [illegible] [illegible] [illegible] [illegible]; म्हणून [illegible] [illegible] [illegible] [illegible].

२४ हे [illegible] ! [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [१७३०]– हे [illegible] ! [illegible] [illegible] [illegible] करणारे [illegible] [illegible] या. [illegible] व [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible].

२५ हे अश्विना ! नः ऊर्जं आवहतं [१७३६]- हे अश्विदेवांनो ! आम्हांला बल वाढवणारें अन्न द्या.

२६ तं अग्निं मन्ये यः वसुः, अस्तं यं धेनवः यन्ति, अस्तं यं आशवः अर्वन्तः [१७३७]- त्या अग्निची स्तुति मी करतों, ज्याच्या आश्रयाला गाई जातात, ज्याच्या आश्रयाला घोडे जातात.

२७ अग्निः हि विशे वाजिनं ददाति [१७३८]- अग्नि निश्चयानें मनुष्यांना पुत्र देतो.

२८ विश्वचर्षणिः अग्निः प्रीतः स्वाभुवं वार्यं राये याति [१७३८]- सर्व मानवांचें कल्याण करणारा अग्नि संतुष्ट झाल्यानंतर स्वतःची भरभराट करणाऱ्या धनाला देण्यासाठीं जातो.

२९ सः अग्निः वसुः [१७३९]- तो अग्नि सर्वांचा निवास करणारा आहे.

३० हे उषः ! दिवित्मती नः महे राये बोधय [१७४०]- हे उषे ! तूं प्रकाशयुक्त होऊन आम्हांला पुष्कळ धन मिळावें म्हणून जागें कर.

३१ सु-जाते ! अश्वसूनृते ! यथा चित् नो अबोधयः [१७४०]- हे उत्तम कुलीन व आज खरें बोलणाऱ्या उषे ! ज्याप्रमाणें पूर्वीं तूं जागृत केलेंस तसें आजही कर.

३२ हे दिवः दुहितः सा अभरद्वसु ! नः अद्य व्युच्छ [१७४२]- हे द्युलोकाच्या पुत्रि, भरपूर धन देणारी उषे ! आमच्यासाठीं आज प्रकाशित हो.

३३ अहं विश्वा सना तिरः [१७४४]- मी सर्व विरोधकांचा पराभव करतों.

३४ अग्निः जनानां समिधा अबोधि [१७४५]- अग्नि लोकांच्या समिधांनीं जागा झाला आहे.

३५ आयतीं उषासं प्रति भानवः नाकं अच्छ प्रसस्रते [१७४६]- येणाऱ्या उषःकालाचे किरण. अन्तरिक्षामध्यें नीट रीतिनें पसरतात.

३६ होता अग्निः प्रातः सुमनाः ऊर्ध्वः अस्थात् [१७४७]- हवन ज्यांत होतें असा अग्नि प्रातःकालीं उत्तम मनानें वर चालला आहे. पेटूं लागला आहे.

३७ समिद्धस्य रुशत् पाजः अदर्शि, महान् देवः तमसा निरमोचि [१७४७]- प्रज्वलित झालेल्या अग्निचें तेजस्वी बल दिसूं लागलें. त्या मोठ्या देवानें जगाला अन्धकारांतून सोडविलें.

३८ यत् गणस्य रशनां अजीगः, [illegible] अग्निः, शुचिभिः गोभिः अंक्ते [१७४८]- जेव्हां समुदायाला प्रतिबंध करणारा अन्धकार दूर झाला, तेव्हां तेजस्वी शुद्ध अग्नि शुद्ध किरणांनीं जगाला प्रकाशित करूं लागतो.

३९ ज्योतिषां इदं श्रेष्ठं ज्योतिः आगात्, चित्रः प्रकेतः विभ्वा अजनिष्ट [१७४९]- तेजस्वी पदार्थांमध्यें ही उषा श्रेष्ठ तेजस्वी आहे, तिचा प्रकाश चारही बाजूंना पसरला आहे.

४० अस्माकं पृतनासु ब्रह्म जिन्वतं [१७५९]- आमच्या लोकांमध्यें ज्ञानाची वृद्धि करा.

४१ वयं शूरसातौ धना भजेमहि [१७५९]- आम्ही युद्धामध्यें धनें प्राप्त करूं.

४२ आयुधा तुञ्जानः अभ्यर्षति [१७६२]- तो वीर आयुधें शत्रूवर फेंकीत पुढें जातो.

४३ पुनानः विश्वावसु नः आभर [१७६४]- पवित्र होऊन सर्व धनें आम्हांला भरपूर दे.

उपमा

१ पाशिनः न [१७१८]- जाळें पसरणारे व्याध जसे पक्ष्यांना पकडतात, त्याप्रमाणें इन्द्राला कोणीहि पकडूं शकत नाहींत.

२ सुगोपाः गाः इव [१७२०]- उत्तम गोरक्षक ज्याप्रमाणें गाईचें पालन करतो, त्याप्रमाणें इन्द्र (क्रतुं पुष्यसि) यज्ञाचें पोषण करतो.

३ यथा धेनवः यवसं प्र [१७२०]- ज्याप्रमाणें गाई गवत खातात, त्याप्रमाणें सोमरस इन्द्र प्राप्त करतो.

४ कुल्या ह्रदं इव [१७२०]- जशा नद्या जलाशयाला मिळतात, तसा सोमरस इन्द्राला मिळो.

५ गौरः तृष्यत् यथा अपाकृतं इरिणं [१७२१]- जसा तहानेला मृग पाण्यानें भरलेल्या सरोवराजवळ जातो, त्याप्रमाणें (तूयं आगहि कण्वेषु सचा सु पिब) हे इन्द्रा ! तूं लवकर ये व कण्वांच्या यज्ञामध्यें बसून सर्वांबरोबर सोम पी.

६ अश्वा इव चित्रा [१७२६]- घोडीप्रमाणें सुंदर (अरुषी उषा) तेजस्वी उषा आहे.

७ धेनुं इव [१७४६]- गाईला जसें सकाळीं जागें करतात, तसा (अग्निः जनानां समिधा अबोधि) अग्नि लोकांच्या समिधांनीं सकाळीं प्रदीप्त झाला आहे.

८ नाकं यह्वाः वयां प्रोज्जिहानाः इव [१७४६]- अन्तरिक्षांत वृक्ष आपल्या शाखा पसरवतो, त्याप्रमाणें (अग्निः भानवः) अग्नि आपल्या ज्वाला आकाशांत पसरवितो.

९ अपसः न [१७५७]- युद्ध करणारे वीर ज्याप्रमाणें आयुधांनीं रणभूमिला सुशोभित करतात, त्याप्रमाणें (विष्टिभिः नारीः आ अर्चन्ति) किरणांनीं उषारूपी स्त्रिया आकाशाला सुन्दर बनवतात.

१० दिवः वृष्टयः न [१७६१]- ज्याप्रमाणें द्युलोकांतून वृष्टि होते, (धाराः वाजं प्रयन्ति) त्याप्रमाणें सोमरसाच्या धारा अन्न देतात.

११ राजा इव [१७६३]- राजासारखा (मर्मृजानः) शुद्ध होणारा सोम दिसतो.

१२ श्येनः न [१७६३]- श्येन पक्ष्याप्रमाणें (वंसु सीदति) सोम पाण्यामध्यें बसतो, डुबकी मारतो. पाण्यांत मिसळला जातो.

एकोनविंशाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
१७११	८।४४।१२	विरूप आंगिरसः	अग्निः	गायत्री
१७१२	८।४४।१३	विरूप आंगिरसः	,,	,,
१७१३	८।४४।१४	विरूप आंगिरसः	,,	,,
१७१४	९।५३।१	अवत्सारः काश्यपः	पवमानः सोमः	,,
१७१५	९।५३।२	अवत्सारः काश्यपः	,,	,,
१७१६	९।५३।३	अवत्सारः काश्यपः	,,	,,
१७१७	९।५३।४	अवत्सारः काश्यपः	,,	,,
१७१८	३।४५।१	विश्वामित्रो गाथिनः	इन्द्रः	त्रिष्टुप्
१७१९	३।४५।२	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१७२०	३।४५।३	विश्वामित्रो गाथिनः	,,	,,
१७२१	८।४।३	देवातिथिः काण्वः	,,	प्रगाथः=(विषमा बृहती, समा सतोबृहती)
१७२२	८।४।४	देवातिथिः काण्वः	,,	,,
१७२३	१।८४।१९	गोतमो राहूगणः	,,	,,
१७२४	१।८४।२०	गोतमो राहूगणः	,,	,,
		[२]		
१७२५	४।५२।१	वामदेवो गौतमः	उषाः	गायत्री
१७२६	४।५२।२	वामदेवो गौतमः	,,	,,
१७२७	४।५२।३	वामदेवो गौतमः	,,	,,
१७२८	१।४६।१	प्रस्कण्वः काण्वः	अश्विनौ	,,
१७२९	१।४६।२	प्रस्कण्वः काण्वः	,,	,,
१७३०	१।४६।३	प्रस्कण्वः काण्वः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१७३१	१।९२।१३	गोतमो राहूगणः	उषाः	उष्णिक्
१७३२	१।९२।१४	गोतमो राहूगणः	,,	,,
१७३३	१।९२।१५	गोतमो राहूगणः	,,	,,
१७३४	१।९२।१६	गोतमो राहूगणः	अश्विनौ	,,
१७३५	१।९२।१८	गोतमो राहूगणः	,,	,,
१७३६	१।९२।१७	गोतमो राहूगणः	,,	,,
		(३)		
१७३७	५।६।१	वसुश्रुत आत्रेयः	अग्निः	पंक्तिः
१७३८	५।६।३	वसुश्रुत आत्रेयः	,,	,,
१७३९	५।६।२	वसुश्रुत आत्रेयः	,,	,,
१७४०	५।७९।१	सत्यश्रवा आत्रेयः	उषाः	,,
१७४१	५।७९।२	सत्यश्रवा आत्रेयः	,,	,,
१७४२	५।७९।३	सत्यश्रवा आत्रेयः	,,	,,
१७४३	५।७५।१	अवस्युरात्रेयः	अश्विनौ	,,
१७४४	५।७५।२	अवस्युरात्रेयः	,,	,,
१७४५	५।७५।३	अवस्युरात्रेयः	,,	,,
		(४)		
१७४६	५।१।१	बुधगविष्ठिरावात्रेयौ	अग्निः	त्रिष्टुप्
१७४७	५।१।२	बुधगविष्ठिरावात्रेयौ	,,	,,
१७४८	५।१।३	बुधगविष्ठिरावात्रेयौ	,,	,,
१७४९	१।११३।१	कुत्स आंगिरसः	उषाः	,,
१७५०	१।११३।२	कुत्स आंगिरसः	,,	,,
१७५१	१।११३।३	कुत्स आंगिरसः	,,	,,
१७५२	५।७६।१	अत्रिर्भौमः	अश्विनौ	,,
१७५३	५।७६।२	अत्रिर्भौमः	,,	,,
१७५४	५।७६।३	अत्रिर्भौमः	,,	,,
		[५]		
१७५५	१।९२।१	गोतमो राहूगणः	उषाः	जगती
१७५६	१।९२।२	गोतमो राहूगणः	,,	,,
१७५७	१।९२।३	गोतमो राहूगणः	,,	,,
१७५८	१।१५७।१	दीर्घतमा औचथ्यः	अश्विनौ	,,
१७५९	१।१५७।२	दीर्घतमा औचथ्यः	,,	,,
१७६०	१।१५७।३	दीर्घतमा औचथ्यः	,,	,,
१७६१	९।५७।१	अवत्सारः काश्यपः	पवमानः सोमः	गायत्री
१७६२	९।५७।२	अवत्सारः काश्यपः	,,	,,
१७६३	९।५७।३	अवत्सारः काश्यपः	,,	,,
१७६४	९।५७।४	अवत्सारः काश्यपः	,,	,,

अथ विंशोऽध्यायः ।

अथ नवमप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ ९-१ ॥

[१]

(१-१८) १ नृमेध आंगिरसः; २—३ प्रियमेध आंगिरसः; ४ दीर्घतमा औचथ्यः; ५ वामदेवो गौतमः; ६ प्रस्कण्वः काण्वः; ७ बृहदुक्थो वामदेव्यः; ८ बिन्दुः पूतदक्षो वा आंगिरसः; ९, १७ जमदग्निर्भार्गवः; १० सुकक्ष आंगिरसः; ११-१३ वसिष्ठो मैत्रावरुणिः; १४ सुदासः पैजवनः; १५ मेधातिथिः काण्वः; १६ नीपातिथिः काण्वः; १८ परुच्छेपो दैवोदासिः ॥ १, १७ पवमानः सोमः; ३, ७, १०-१६ इन्द्रः; ४-६, १८ अग्निः; ८ मरुतः; ९ सूर्यः; २......॥ १, ८, १०, १५-१७ गायत्री; (१७ नित्यपदा) २......; ३ अनुष्टम्मुखः प्रगाथः= (१ अनुष्टुप्+गायत्र्यौ); ४, ११, १३ विराट्; ५ पदपंक्तिः; ६, ९, १२ प्रगाथः=(विषमा बृहती, समा सतोबृहती); ७ त्रिष्टुप्; १४ शक्करी; १८ अत्यष्टिः ॥

१७६५ प्रास्य धारा अक्षरन्वृष्णः सुतस्योजसः । देवाँ अनु प्रभूषतः ॥ १ ॥ (ऋ. ९।२९।१)

१७६६ सप्तिं मृजन्ति वेधसो गृणन्तः कारवो गिरा । ज्योतिर्जज्ञानमुक्थ्यम् ॥ २ ॥ (ऋ. ९।२९।२)

१७६७ सुषहा सोम तानि ते पुनानाय प्रभूवसो । वर्धा समुद्रमुक्थ्य ॥ ३ ॥ १ (यि) ॥
[धा० १२ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ९।२९।३)

१७६८ एष ब्रह्मा य ऋत्विय इन्द्रो नाम श्रुतो गृणे ॥ १ ॥

१७६९ त्वामिच्छवसस्पते यन्ति गिरो न संयतः ॥ २ ॥

१७७० वि स्रुतयो यथा पथः इन्द्र त्वद्यन्तु रातयः ॥ ३ ॥ २ (प) ॥
[धा० ९ । उ० १ । स्व० १]

---

[१] प्रथमः खण्डः ।

[१७६५] (देवान् अनु प्रभूषतः) देवांवर आपला अनुकूल प्रभाव पाडूं इच्छिणाऱ्या (वृष्णः) बल वाढवणाऱ्या (अस्य सुतस्य धाराः) या सोमरसाच्या धारा (ओजसः प्र अक्षरन्) वेगानें भांड्यांत पडूं लागल्या आहेत. ॥१॥

[१७६६] (वेधसः कारवः) ज्ञानी अध्वर्यु (गिरा गृणन्तः) आपल्या वाणीनें स्तुति करीत (ज्योतिः जज्ञानं) तेज प्रकट करणाऱ्या (उक्थ्यं सप्तिं) स्तुत्य व घोड्याप्रमाणें वेगवान् सोमाला (मृजन्ति) शुद्ध करतात. ॥२॥

[१७६७] (प्रभूवसो उक्थ्य सोम) हे पुष्कळ धनवान् आणि प्रशंसनीय सोमा ! (पुनानाय ते) गाळल्या जाणाऱ्या तुझीं (तानि सुषहा) तीं तेजें तुझें उत्तम रक्षण करणारीं आहेत. (समुद्रं वर्ध) समुद्राप्रमाणें त्या पात्रांना भरून टाक. ॥ ३ ॥

[१७६८] (यः इन्द्रः नाम श्रुतः) जो इन्द्र या नांवानें प्रसिद्ध आहे, (एषः ऋत्वियः ब्रह्मा) हा ऋतूंप्रमाणें वागणारा ब्रह्मा - ज्ञानी - आहे त्याची (गृणे) मी स्तुति करतों. ॥ १ ॥

[१७६९] (हे शवसः पते) हे बलवान् इन्द्रा ! (संयतः न) संयमी पुरुषाला प्राप्त होतात, त्याप्रमाणें (गिरः) स्तुति (त्वां इत् यन्ति) तुलाच प्राप्त होतात. ॥ २ ॥

[१७७०] हे (इन्द्र) इन्द्रा ! (यथा पथा स्रुतयः) ज्याप्रमाणें मोठ्या मार्गापासून अनेक लहान वाटा निघतात, त्याप्रमाणें (त्वत् रातयः वि यन्तु) तुझ्याकडून अनेक प्रकारचीं दानें उपासकांकडे येत असतात. ॥ ३ ॥

१७७१ आ त्वा रथं यथोतये सुम्नाय वर्तयामसि । तुविकूर्मिमृतीषहमिन्द्रं शविष्ठं सत्पतिम् ॥१॥
(ऋ. ८।६८।१)

१७७२ तुविशुष्म तुविक्रतो शचीवो विश्वया मते । आ पप्राथ महित्वना ॥ २ ॥ (ऋ. ८।६८।२)

१७७३ यस्य ते महिना महः परि ज्मायन्तमीयतुः । हस्ता वज्रꣳ हिरण्ययम् ॥ ३ ॥ ३ (व) ॥
[धा० १० । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ८।६८।३)

१७७४ आ यः पुरं नार्मिणीमदीदेदत्यः कविर्नभन्यो३ नार्वा । सूरो न रुरुक्वां छतात्मा ॥ १ ॥
(ऋ. १।१४९।३)

१७७५ अभि द्विजन्मा त्री रोचनानि विश्वा रजाꣳसि शुशुचानो अस्थात् ।
होता यजिष्ठो अपाꣳ सधस्थे ॥ २ ॥ (ऋ. १।१४९।४)

१७७६ अयꣳ स होता यो द्विजन्मा विश्वा दधे वार्याणि श्रवस्या ।
मर्तो यो अस्मै सुतुको ददाश ॥ ३ ॥ ४ (छ) ॥
[धा० १२ । उ० २ । स्व० १] (ऋ. १।१४९।५)

[१७७१] हे इन्द्रा ! आम्हीं (ऊतये सुम्नाय) स्वसंरक्षण व सुख मिळावें यासाठीं (तुविकूर्मिं) अनेक कर्में करणाऱ्या व (ऋती-षहं) हिंसक शत्रूंना नष्ट करणाऱ्या (शविष्ठं सत्पतिं) बलवान् व सज्जनांचें पालन करणाऱ्या (त्वा इन्द्रं) तुज इन्द्राला (रथं यथा) ज्याप्रमाणें लोक रथाची उपासना करतात,. त्याप्रमाणेंच (आवर्तयामसि) प्रदक्षिणा करीत आहों, तुझी उपासना करीत आहों. ॥ १ ॥

[१७७२] (तुवि-शुष्म तुवि-क्रतो) महान् बलवान् व पुष्कळ कर्में करणाऱ्या (शचीवः मते) शक्तिमान् व पूजनीय इन्द्रा ! तूं (विश्वया महित्वना) सर्व प्रकारच्या महत्वांनीं युक्त होऊन (आ पप्राथ) व्यापत आहेस. ॥२॥

[१७७३] (यस्य महः ते हस्ता) ज्या मोठ्या पुरुषाचे - तुझे हात (ज्मायन्तं हिरण्ययं वज्रं) पृथिवीवर सर्वत्र संचार करणारें सोनेरी वज्र (महिना परि ईयतुः) बलपूर्वक धारण करतात. ॥ ३ ॥

[१७७४] (यः) जो अग्नि (नार्मिणीं पुरं) यजमानांनीं निर्माण केलेल्या वेदीरूपी स्थानांना (अदीदेत्) प्रदीप्त करीत आहे. (यः अर्वा नभन्यः न) जो गतिमान् वायुप्रमाणें (अत्यः कविः) गति करणारा व दूरदर्शी आहे, तो (शतात्मा सूरः न) अनेक रूपांमध्यें राहणारा अग्नि सूर्याप्रमाणें (रुरुक्वान्) तेजस्वी आहे. ॥ १ ॥

[१७७५] हा अग्नि (द्वि-जन्मा) दोन अरणींतून उत्पन्न झालेला, (त्रि-रोचनानि) गार्हपत्य आदि तीन स्थानांना व (विश्वा रजांसि शुशुचानः) सर्व लोकांना प्रकाशित करीत (होता यजिष्ठः) देवांना बोलावून आणणारा, पूज्य (अपां सधस्थे) जलांच्या स्थानांमध्यें यज्ञशालेमध्यें (अस्थात्) राहत असतो. ॥ २ ॥

[१७७६] (यः द्विजन्मा) जो दोन अरणींतून उत्पन्न झालेला (सः होता) तो देवतांना आणणारा (अयं) हा अग्नि (विश्वा वार्याणि) सर्व स्वीकार करण्यास योग्य धनांना व (श्रवस्या दधे) यशस्वी कर्मांना धारण करतो. (अस्मै यः मर्तः ददाश) याला जो मनुष्य हवि अर्पण करतो, तो (सु-तुकः) उत्तम पुत्रांनीं युक्त होतो. ॥ ३ ॥

१७७७ अग्ने तमद्याश्वं न स्तोमैः क्रतुं न भद्र२ हृदिस्पृशम् । ऋध्यामा त ओहैः ॥ १ ॥
(ऋ. ४।१०।१)

१७७८ अधा ह्यग्ने क्रतोर्भद्रस्य दक्षस्य साधोः । रथीर्ऋतस्य बृहतो बभूथ ॥२॥ (ऋ. ४।१०।२)

१७७९ एभिर्नो अर्कैर्भवा नो अर्वाङ्क्स्व३र्ण ज्योतिः ।
अग्ने विश्वेभिः सुमना अनीकैः ॥ ३ ॥ ५ (चि) ॥
[धा० ७ । उ० १ । स्व० ३] (ऋ. ४।१०।३)

॥ इति प्रथमः खण्डः ॥ १ ॥

[२]

१७८० अग्ने विवस्वदुषसश्चित्र२ राधो अमर्त्य ।
आ दाशुषे जातवेदो वहा त्वमद्या देवा२ उषर्बुधः ॥ १ ॥ (ऋ. १।४४।१)

१७८१ जुष्टो हि दूतो असि हव्यवाहनोऽग्ने रथीरध्वराणाम् ।
सजूरश्विभ्यामुषसा सुवीर्यमस्मे धेहि श्रवो बृहत् ॥ २ ॥ ६ (ला) ॥
[धा० ९ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. १।४४।२)

[१७७७] हे (अग्ने) अग्ने ! (अद्य) आज (ओहैः ते स्तोमैः) इन्द्रादि देवतांजवळ पोंचवणाऱ्या तुझ्या स्तोत्रांनीं (अश्वं न) घोड्याप्रमाणें योग्य ठिकाणीं पोंचवणाऱ्या (क्रतुं न भद्रं) यज्ञाप्रमाणें कल्याणकारक (हृदिस्पृशं तं ऋध्याम) हृदयाला प्रिय अशा त्या अग्निला आम्ही वाढवीत आहों. ॥ १ ॥

[१७७८] हे (अग्ने) अग्ने ! (अधा हि) आतांच (भद्रस्य दक्षस्य) कल्याणकारक व बल वाढवणाऱ्या (साधोः ऋतस्य) इष्ट फल साधक व सत्यस्वरूप अशा (बृहतः क्रतोः) मोठ्या यज्ञाचा तूं (रथीः बभूथ) चालक होतोस. ॥ २ ॥

[१७७९] हे (अग्ने) अग्ने ! (ज्योतिः स्वः न) ज्योतिरूप सूर्याप्रमाणें (विश्वेभिः अनीकैः सुमनाः) सर्व तेजांसह उत्तम मन धारण करणारा तूं (नः एभिः अर्कैः) आमच्या या पूज्य देवांसह (नः अर्वाक् भव) आमच्या-जवळ ये. ॥ ३ ॥

॥ येथें पहिला खण्ड समाप्त झाला ॥

[२] द्वितीयः खण्डः ।

[१७८०] हे (अमर्त्य जातवेदः अग्ने) अमर सर्वज्ञ अग्ने ! (त्वं) तूं (उषसः) उषा देवतेकडून (दाशुषे) दान देणाऱ्याला देण्यासाठीं (विवस्वत् चित्रं राधः) उत्तम घर ज्याच्याबरोबर आहे असें अनेक प्रकारचें धन (आवह) घेऊन ये आणि (अद्य उषर्बुधः देवान्) आज उषःकालीं उठणाऱ्या देवांनाहि यज्ञामध्यें घेऊन ये. ॥ १ ॥

[१७८१] हे (अग्ने) अग्ने ! तूं (जुष्टः) सेवा करण्यास योग्य (हव्यवाहनः दूतः) देवांना हवि पोंचवणारा दूत (अध्वराणां रथीः असि) यज्ञांमध्यें देवांना आणणाऱ्या रथाप्रमाणें आहेस. (अश्विभ्यां उषसा सजूः) अश्विदेव व उषा यांच्याबरोबर येऊन (अस्मे सुवीर्यं बृहत् श्रवः धेहि) आम्हांला उत्तम वीर्यवान् असें पुष्कळ यश दे. ॥ २ ॥

१७८२ विधुं दद्राणꣳ समने बहूनां युवानꣳ सन्तं पलितो जगार ।
देवस्य पश्य काव्यं महित्वाद्या ममार स ह्यः समान ॥ १ ॥ (ऋ. १०।५५।५)

१७८३ शाक्मना शाको अरुणः सुपर्ण आ यो महः शूरः सनादनीडः ।
यच्चिकेत सत्यमित्तन्न मोघं वसु स्पार्हमुत जेतोत दाता ॥ २ ॥ (ऋ. १०।५५।६)

१७८४ ऐभिर्ददे वृष्ण्या पौꣳस्यानि येभिरौक्षद्वृत्रहत्याय वज्री ।
ये कर्मणः क्रियमाणस्य मह्न ऋते कर्ममुदजायन्त देवाः ॥ ३ ॥ ७ (घे) ॥
[धा० ३१ । उ० ४ । स्व० ७] (ऋ. १०।५५।७)

१७८५ अस्ति सोमो अयꣳ सुतः पिबन्त्यस्य मरुतः । उत स्वराजो अश्विना ॥ १ ॥
(ऋ. ८।९४।४)

१७८६ पिबन्ति मित्रो अर्यमा तना पूतस्य वरुणः । त्रिषधस्थस्य जावतः ॥२॥ (ऋ. ८।९४।५)

१७८७ उतो न्वस्य जोषमा इन्द्रः सुतस्य गोमतः । प्रातर्होतेव मत्सति ॥ ३ ॥ ८ (ली) ॥
[धा० ९ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ ८।९४।६)

[१७८२] (विधुं समने बहूनां दद्राणं) अनेक कार्यें करणाऱ्या व युद्धामध्यें पुष्कळ शत्रूंना ठार मारणाऱ्या (युवानं सन्तं पलितः जगार) तरुणाला सुद्धां वृद्धावस्था गिळून टांकते. (देवस्य महित्वा काव्यं पश्य) देवाचें महात्म्यानें भरलेलें हें काव्य पहा. (अद्य ममार) जो आज मरतो (सः ह्यः समान) तोच उद्यां प्रकट होत असतो. ॥ १ ॥

[१७८३] (शाक्मना शाकः) शक्तिनें सामर्थ्यवान् (अरुणः सुपर्णः आ) अरुण रंगाचा कोणी पक्षी येतो (यः महः शूरः) त्याप्रमाणें जो मोठा शूर आहे पण (सनात् अ-नीडः) अनंतकालापासून जो घर करून राहत नाहीं, असा तो इन्द्र (यत् चिकेत) जें कर्तव्य म्हणून ठरवतो (तत् सत्यं इत्) तें सत्य करून दाखवतो, (मोघं न) तो कांहींहि निष्फल कार्य करीत नाहीं. (उत स्पार्हं वसु जेता) तो स्पृहणीय धन जिंकून आणणारा (उत दाता) आणि स्तुति करणाऱ्याला धन देणारा आहे. ॥ २ ॥

[१७८४] तो इन्द्र (एभिः वृष्ण्या पौंस्यानि आददे) या मरुतांबरोबर राहून बलयुक्त पौरुषाचीं कृत्यें करीत असतो. (येभिः वृत्रहत्याय वज्री औक्षत्) ज्यांच्याबरोबर राहून शत्रूला मारण्यासाठीं वज्रधारी इन्द्र वृष्टि करतो. (ये देवाः) जे मरुत् देव (मह्नः क्रियमाणस्य कर्मणः) मोठ्या करावयाच्या कामामध्यें (ऋते कर्म उदजायन्त) सत्य कर्म करून दाखवतात. ॥ ३ ॥

[१७८५] (अयं सोमः सुतः अस्ति) हा सोमरस काढून तयार केला आहे. (अस्य स्वराजः मरुतः) आपल्या स्वतःच्या तेजानें तेजस्वी झालेले मरुत् (उत अश्विना) आणि अश्विदेव (पिबन्ति) पीत असतात. ॥ १ ॥

[१७८६] (मित्र) मित्र (अर्यमा वरुणः) अर्यमा व वरुण हे देव (तना पूतस्य) गाळणींतून शुद्ध झालेल्या (त्रिषधस्थस्य जावतः पिबन्ति) तीन पात्रांत असलेल्या स्तुत्य सोमाला पितात. ॥ २ ॥

[१७८७] (उत उ इन्द्रः) आणि इन्द्र (सुतस्य गोमतः अस्य जोषं) रस काढलेल्या व गाईचें दूध मिसळलेल्या या सोमाच्या पानाची (प्रातः नु मत्सति) प्रातःकाळीं इच्छा करीत असतो. (होता इव) ज्याप्रमाणें होता स्तुति करूं इच्छीत असतो. ॥ ३ ॥

*

१७८८ बण्महाँ असि सूर्य बडादित्य महाँ असि ।
महस्ते सतो महिमा पनिष्टम मह्ना देव महाँ असि ॥ १ ॥ (ऋ. ८।१०१।११)

१७८९ बट् सूर्य श्रवसा महाँ असि सत्रा देव महाँ असि ।
मह्ना देवानामसुर्यः पुरोहितो विभु ज्योतिरदाभ्यम् ॥ २ ॥ ९ (त) ॥
[धा० १४ । उ० १ । स्व० १] (ऋ. ८।१०१।१२)

॥ इति द्वितीयः खण्डः ॥ २ ॥

[३]

१७९० उप नो हरिभिः सुतं याहि मदानां पते । उप नो हरिभिः सुतम् ॥१॥ (ऋ. ८।९३।३१)

१७९१ द्विता यो वृत्रहन्तमो विद इन्द्रः शतक्रतुः । उप नो हरिभिः सुतम् ॥२॥ (ऋ. ८।९३।३२)

१७९२ त्वँ हि वृत्रहन्नेषां पाता सोमानामसि । उप नो हरिभिः सुतम् ॥ ३ ॥ १० (री) ॥
[धा० १३ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ८।९३।३३)

१७९३ प्र वो महे महेवृधे भरध्वं प्रचेतसे प्र सुमतिं कृणुध्वम् ।
विशः पूर्वीः प्र चर चर्षणिप्राः ॥ १ ॥ (ऋ. ७।३१।१०)

[१७८८] हे (सूर्य) सूर्या ! (महान् असि बट्) तूं मोठा आहेस हें खरें आहे. (आदित्य ! महान् असि बट्) हे आदित्या ! तूं मोठा आहेस हें खरें आहे. हे (पनिष्टम) स्तुतीला योग्या ! (ते महः सतः महिमा) तुझ्या-सारख्या मोठ्याची महिमा स्तविली जात आहे. (पनिष्टम ! मह्ना महान् असि) हे प्रशंसनीया ! तूं आपल्या महात्म्यानें मोठा आहेस. ॥ १ ॥

[१७८९] हे (सूर्य) सूर्या ! तूं (श्रवसा महान् असि बट्) तूं आपल्या मोठ्या यशानें फार मोठा आहेस. हे (देव) सूर्यदेवा ! तूं (देवानां मह्ना महान् असि सत्रा) देवतांमधील महत्त्वामुळें मोठा आहेस हें खरें आहे. तूं (असुर्यः पुरोहितः) असुरांचा नाश करणारा म्हणून देवतांनीं तुला पुढें ठेवलें आहे. (ज्योतिः विभु अदाभ्यं) तुझें तेज व्यापक व कोणाकडूनहि न दबलें जाणारें असें आहे. ॥ २ ॥

॥ येथें दुसरा खण्ड समाप्त झाला ॥

[३] तृतीयः खण्डः ।

[१७९०] हे (मदानां पते) सोमाच्या स्वामी इन्द्रा ! (हरिभिः नः सुतं उप याहि) घोडे जोडून आमच्या सोमयागामध्यें ये. (हरिभिः नः सुतं उप) घोड्यांनीं आमच्या सोमयागामध्यें ये. ॥ १ ॥

[१७९१] (वृत्रहन्तमः शतक्रतुः यः इन्द्रः) शत्रूला मारणारा व शेंकडों कर्में करणारा जो इन्द्र आहे. तो (द्विता विदे) दोन प्रकारचीं कामें करणारा आहे हें सर्वांस माहित आहे. हे इन्द्रा ! (हरिभिः नः सुतं उप) घोड्यांनीं आमच्या सोमयागाजवळ ये. ॥ २ ॥

शत्रूला मारणें व आर्यांचें रक्षण करणें हीं दोन कार्यें तो करतो.

[१७९२] हे (वृत्रहन्) शत्रूला मारणाऱ्या इन्द्रा ! (हि त्वं एषां सोमानां पाता असि) तूं या सोमरसांना पिणारा आहेस. (हरिभिः नः सुतं उप) घोडे जोडून आमच्या सोम यज्ञाजवळ ये. ॥ ३ ॥

[१७९३] हे मनुष्य हो ! (वः महेवृधे) तुम्ही आपल्या धनाची वाढ करण्यासाठीं (महे प्र भरध्वं) मोठ्या इन्द्राला सोम अर्पण करा. (प्र चेतसे सुमतिं प्र कृणुध्वं) ज्ञानी इन्द्राची स्तुति करा. हे इन्द्रा ! (चर्षणि-प्राः) प्रजांचें पोषण करणारा तूं (पूर्वीः विशः प्र चर) हविनें तुला पूर्ण करणाऱ्या प्रजांजवळ जा. ॥ १ ॥

१७९४ उरुव्यचसे महिने सुवृक्तिमिन्द्राय ब्रह्म जनयन्त विप्राः ।
तस्य व्रतानि न मिनन्ति धीराः ॥ २ ॥ (ऋ. ७।३१।११)

१७९५ इन्द्रं वाणीरनुत्तमन्युमेव सत्रा राजानं दधिरे सहध्यै ।
हर्यश्वाय बर्हया समापीन् ॥ ३ ॥ ११ (हि) ॥
[धा० २६ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. ७।३१।१२)

१७९६ यदिन्द्र यावतस्त्वमेतावदहमीशीय ।
स्तोतारमिद्दधिषे रदावसो न पापत्वाय रꣳसिषम् ॥ १ ॥ (ऋ. ७।३२।१८)

१७९७ शिक्षेयमिन्महयते दिवेदिवे राय आ कुहचिद्विदे ।
न हि त्वदन्यन्मघवन्न आप्यं वस्यो अस्ति पिता च न ॥ २ ॥ १२ (ता)
[धा० १४ । उ० १ । स्व० २] (ऋ. ७।३२।१९)

१७९८ श्रुधी हवं विपिपानस्याद्रेर्बोधा विप्रस्यार्चतो मनीषाम् ।
कृष्वा दुवाꣳस्यन्तमा सचेमा ॥ १ ॥ (ऋ. ७।२२।४)

[१७९४] हे (विप्राः) ब्राह्मण हो ! (उरुव्यचसे महिने इन्द्राय) विशेष व्यापक अशा मोठ्या इन्द्राला (सुवृक्तिं ब्रह्म जनयन्त) उत्तम स्तुति व अन्न तुम्ही अर्पण करीत आहां. (तस्य व्रतानि) त्या इन्द्राच्या व्रतांना (धीराः न मिनन्ति) बुद्धिमान् लोक विनष्ट करीत नाहींत. ॥ २ ॥

[१७९५] (सत्रा राजानं) सर्वांचा ईश्वर (अनुत्तमन्युं इन्द्रं एव) ज्याच्या क्रोधापुढें कोणीहि टिकूं शकत नाहीं अशा इन्द्रालाच (वाणीः सहध्यै दधिरे) स्तुति शत्रूंचा पराभव करण्यासाठीं पुढें करीत असतात. यासाठीं हे स्तुति करणाऱ्यांनों ! (हर्यश्वाय आपीन् सं बर्हय) इन्द्राची स्तुति करण्यासाठीं आपल्या मित्रांना उत्तेजित करा. ॥ ३ ॥

[१७९६] हे (इन्द्रः) इन्द्रा ! (यत् यावतः) जेवढ्या धनाचा तूं स्वामी आहेस (एतावत् अहं ईशीय) तेवढ्या धनाचा मी स्वामी व्हावें. हे (रदावसो) धन देणाऱ्या इन्द्रा ! मी (स्तोतारं इत् दधिषे) आपल्या स्तोत्याला धन देऊन धारण करूं शकेन, इतकेंच धन मी देईन. (पापत्वाय न रंसिषं) पापी होण्यासाठीं धन देणार नाहीं आणि धन हीन होईन इतकें दान करणार नाहीं. ॥ १ ॥

[१७९७] (कुहचित् विदे महयते) कोठेंहि राहून स्तुति करणाऱ्याला (दिवे दिवे रायः शिक्षेयं इत्) प्रतिदिवशीं धनाचें दान अवश्य करतोंच. हें इन्द्राचें म्हणणें ऐकून उपासक म्हणतो (मघवन् त्वत् अन्यत् आप्यं नहि) तुझ्याशिवाय आमचा कोणी दुसरा बंधु नाहीं व (वस्यः पिता च न अस्ति) प्रशंसनीय रक्षकही दुसरा कोणी नाहीं. ॥२॥

[१७९८] हे इन्द्रा ! (विपिपानस्य अद्रेः हवं श्रुधि) सोम कुटणाऱ्या माझ्या दगडाचें म्हणणें ऐक. (अर्चतः विप्रस्य मनीषां बोध) स्तुति करणाऱ्या विद्वानांचें म्हणणें ऐक, (इमा दुवांसि) या सेवांचा (अन्तमा सचा कृष्व) जवळचा मित्र आहें अशा भावनेनें स्वीकार कर. ॥ १ ॥

१७९९ न ते गिरो अपि मृष्ये तुरस्य न सुष्टुतिमसुर्यस्य विद्वान् ।
सदा ते नाम स्वयशो विवक्मि ॥ २ ॥ (ऋ. ७।२२।५)

१८०० भूरि हि ते सवना मानुषेषु भूरि मनीषी हवते त्वामित् ।
मारे अस्मन्मघवं ज्योक्कः ॥ ३ ॥ १३ (वा) ॥
[धा० १९ । उ० ३ । स्व० २] (ऋ. ७।२२।६)

॥ इति तृतीयः खण्डः ॥ ३ ॥

[४]

१८०१ प्रो ष्वस्मै पुरोरथमिन्द्राय शूषमर्चत । अभीके चिदु लोककृत्सङ्गे समत्सु वृत्रहा ।
अस्माकं बोधि चोदिता नभन्तामन्यकेषां ज्याका अधि धन्वसु ॥ १ ॥ (ऋ. १०।१३३।१)

१८०२ त्वꣳ सिंधूँरवासृजोऽधराचो अहन्नहिम् । अशत्रुरिन्द्र जज्ञिषे विश्वं पुष्यसि वार्यम् ।
तं त्वा परि ष्वजामहे नभन्तामन्यकेषां ज्याका अधि धन्वसु ॥ २ ॥ (ऋ. १०।१३३।२)

[१७९९] हे इन्द्रा ! (तुरस्य ते गिरः) शत्रूंचा त्वरेनें नाश करणाऱ्या तुझ्या स्तुतिंना (असुर्यस्य विद्वान्) तुझ्या बलाचा ज्ञाता असल्यामुळें (न अपि मृष्ये) मी सोडूं शकत नाहीं. (सुष्टुतिं नः) तुझ्या श्रेष्ठ प्रशंसांनाहि मी सोडूं शकत नाहीं. (स्वयशः ते नाम सदा विवक्मि) आपलें यश वाढवणाऱ्या तुझ्या स्तोत्राचेंच मी सर्वोचित उच्चारण करीत असतों. ॥ २ ॥

[१८००] हे (मघवन्) ऐश्वर्यवान् इन्द्रा ! (मानुषेषु ते भूरि सवना) मानवांमध्यें तुझ्यासाठीं सोमयाग पुष्कळच होतात. (मनीषी त्वां इत् भूरि हवते) बुद्धिमान् तुझ्यासाठीं पुष्कळ हवन करीत असतात. (अस्मत् आरे) आम्हांपासून दूर (ज्योक् मा कः) फार वेळ राहूं नकोस. ॥ ३ ॥

॥ येथें तिसरा खण्ड समाप्त झाला ॥

[४] चतुर्थः खण्डः ।

[१८०१] हे स्तोत्र पाठकांनों ! (अस्मै इन्द्राय) या इन्द्राच्या (पुरो रथं शूषं) रथाच्या पुढें असलेल्या त्या बलाची (सु प्र अर्चत उ) उत्तम प्रकारांनीं पूजा करा. (समत्सु संगे अभीके चित्) युद्धांमध्यें शत्रूचें बल आपल्यावर चालून जवळ आलें असतां (लोककृत् वृत्रहा) लोकपालक व शत्रूंना मारणारा इन्द्र (अस्माकं चोदिता बोधि) आमचा प्रेरक आहे हें तुम्ही जाणा. (अन्यकेषां धन्वसु अधि ज्याकाः नभन्तां) अन्य शत्रूंच्या धनुष्यांवरील दोऱ्या तुटून पडोत. ॥ १ ॥

[१८०२] हे (इन्द्र) इन्द्रा ! (त्वं) तूं (सिन्धून् अधराचः अवासृजः) नद्यांना खालच्या बाजूस वहावयास लावणाऱ्या मेघांना वृष्टि करावयास लावतोस. (अहिं अहन्) मेघांना फोडतोस. म्हणून हे इन्द्रा ! तूं (अशत्रुः जज्ञिषे) शत्रूरहित होतोस. तूं (विश्वं वार्यं पुष्यसि) सर्व स्वीकार करण्यास योग्य धन वाढवतोस. (तं त्वा परिष्वजामहे) त्या तुला आम्ही हवि देऊन वश करीत आहों. (अन्यकेषां धन्वसु अधि ज्याकाः नभन्तां) शत्रूंच्या धनुष्यावरील दोऱ्या तुटून पडोत. ॥ २ ॥

१८०३ वि षु विश्वा अरातयोऽर्यो नशन्त नो धियः ।
अस्तासि शत्रवे वधं यो न इन्द्र जिघांसति ।
या ते रातिर्ददिर्वसु नभन्तामन्यकेषां ज्याका अधि धन्वसु ॥ ३ ॥ १४ (टि) ॥
[धा० ४३ । उ० ६ । स्व० ३] (ऋ. १०।१३३।२)

१८०४ रेवाँ इद्रेवत स्तोता स्यात्त्वावतो मघोनः । प्रेदु हरिवः सुतस्य ॥ १ ॥ (ऋ. ८।२।१३)

१८०५ उक्थं च न शस्यमानं नागो रयिरा चिकेत । न गायत्रं गीयमानम् ॥२॥ (ऋ. ८।२।१४)

१८०६ मा न इन्द्र पीयत्नवे मा शर्धते परा दाः । शिक्षा शचीवः शचीभिः ॥३॥ १५ (ति) ॥
[धा० १४ । उ० १ । स्व० २] (ऋ. ८।२।१५)

१८०७ एन्द्र याहि हरिभिरुप कण्वस्य सुष्टुतिम् ।
दिवो अमुष्य शासतो दिवं यय दिवावसो ॥ १ ॥ (ऋ. ८।३४।१)

१८०८ अत्रा वि नेमिरेषामुरां न धूनुते वृकः ।
दिवो अमुष्य शासतो दिवं यय दिवावसो ॥ २ ॥ (ऋ. ८।३४।२)

[१८०३] (नः विश्वाः अरातयः अर्यः) आमचे सर्व शत्रु जे आमच्यावर चढाई करून येत आहेत, ते (सु विनशन्त) उत्तम रीतिनें नाश पावोत. हे इन्द्रा ! तुझ्याजवळ (धियः) आमचीं बुद्धिपूर्वक केलेलीं कर्मं पोंचोत. हे (इन्द्र) इन्द्रा ! (यः नः जिघांसति) जो आमचा वध करूं इच्छीत आहे त्या (शत्रवे वधं अस्ता असि) शत्रूवर शस्त्र तूं फेंकतोस. (ते या रातिः वसुं ददिः) तुझें जें दान आहे तें आम्हांला धन देवो. (अन्यकेषां धन्वसु अधि ज्याकाः नभन्तां) शत्रूंच्या धनुष्यावरील दोऱ्या तुटून पडोत. ॥ ३ ॥

[१८०४] हे (हरिवः) घोडे बाळगणाऱ्या इन्द्रा ! (रेवतः स्तोता रेवान् इत् स्यात्) तुझ्यासारख्या धनवानाचा स्तोता अवश्य धनवान् होत असतो. (त्वावतः मघोनः सुतस्य प्रेदुः) तुझ्यासारख्या धनवानाची स्तुति करणारा अवश्य ऐश्वर्यवान् होत असतो. ॥ १ ॥

[१८०५] हे इन्द्रा ! (न) यावेळीं (अ-गोः रयिः आ चिकेत) स्तुति न करणाऱ्याचें धन तूं जाणतोस. (न) सध्यां (शस्यमानं उक्थं च) म्हटलें जाणारें स्तोत्रही तूं जाणतोस. (न) सध्यां (गीयमानं गायत्रं) गाइलें जाणारें गायत्र सामही तूं जाणत आहेस. ॥ २ ॥

[१८०६] हे (इन्द्र) इन्द्रा ! तूं (पीयत्नवे नः मा परादाः) हिंसक शत्रूच्या आधीन आम्हांला देऊं नकोस. (शर्धते मा) आमचा नाश करणाऱ्याच्या स्वाधीन आम्हांला करूं नकोस. हे (शची-वः) शक्तिमान् इन्द्रा ! (शचीभिः शिक्ष) आपल्या शक्तींनीं आम्हांला धन दे. ॥ ३ ॥

[१८०७] हे (इन्द्र) इन्द्रा ! (हरिभिः) घोड्यांच्या सहाय्यानें (कण्वस्य सुष्टुतिं उप याहि) कण्वाच्या उत्तम स्तुतिजवळ पोंच. (अमुष्य दिवः शासतः) याच्या द्युलोकाच्या शासनामध्यें आम्ही सुखानें राहत आहों. हे (दिवावसो) द्युलोकामध्यें राहणाऱ्या इन्द्रा ! (दिवं यय) द्युलोकामध्यें जा. ॥ १ ॥

[१८०८] (अत्र एषां नेमिः) आतां या सोम कुटण्याच्या दगडांची धार (उरां वृकः न) मेंढाला लांडगा जसें कांपवितो त्याप्रमाणें सोमाला (विधूनुते) कुटत असतां कांपविते. (अमुष्य दिवः शासतः) हा इन्द्र द्युलोकावर शासन करीत असतां आम्ही सुखानें राहतों. हे (दिवावसो) तेजस्वी धनवान् इन्द्रा ! (दिवं यय) द्युलोकामध्यें जा. ॥२॥

१८०९ आ त्वा ग्रावा वदन्निह सोमी घोषेण वक्षतु ।
दिवो अमुष्य शासतो दिवं यय दिवावसो ॥ ३ ॥ १६ (व) ॥
[धा० ९ । उ० नास्ति । स्व० १] (ऋ. ८।३४।२)

१८१० पवस्व सोम मन्दयन्निन्द्राय मधुमत्तमः ॥ १ ॥ (ऋ. ९।६७।१६)

१८११ ते सुतासो विपश्चितः शुक्रा वायुमसृक्षत ॥ २ ॥ (ऋ. ९।६७।१८)

१८१२ असृग्रं देववीतये वाजयन्तो रथा इव ॥ ३ ॥ १७ (रौ) ॥
[धा० ८ । उ० नास्ति । स्व० नास्ति] (ऋ. ९।६७।१७)

॥ इति चतुर्थः खण्डः ॥ ४ ॥

[५]

१८१३ अग्निं होतारं मन्ये दास्वन्तं वसोः सूनुं सहसो जातवेदसं विप्रं न जातवेदसम् ।
य ऊर्ध्वया स्वध्वरो देवो देवाच्या कृपा ।
घृतस्य विभ्राष्टिमनु शुक्रशोचिष आजुह्वानस्य सर्पिषः ॥ १ ॥ (ऋ. १।१२७।१)

[१८०९] हे इन्द्रा ! (इह सोमी वदन् ग्रावा) येथें या यज्ञामध्यें सोम कुटण्याचा शब्द करणारा दगड (घोषेण आवक्षतु) शब्द करीत सोम तुझ्याजवळ पोंचवो. (अमुष्य दिवः शासतः) हा इन्द्र द्युलोकावर शासन करीत असतां आम्ही सुखानें राहतों. (दिवावसो ! दिवं यय) तेजस्वी धनवान् इन्द्रा ! तूं द्युलोकामध्यें जा. ॥ ३ ॥

[१८१०] हे (सोम) सोमा ! (मधुमत्तमः मन्दयन्) अत्यंत मधुर असा तूं हर्ष उत्पन्न करीत (इन्द्राय पवस्व) इन्द्रासाठीं शुद्ध हो. ॥ १ ॥

[१८११] (विपश्चितः) बुद्धिवर्धक (सुतासः) सोमरस (शुक्राः ते) शुद्ध झाल्यानंतर ते सोमरस (वायुं असृक्षत) वायुसाठीं तयार होतात. ॥ २ ॥

[१८१२] हा सोमरस (वाजयन्तः देववीतये) अन्न प्राप्त करूं इच्छिणारे यजमान देवांना देण्यासाठीं (असृग्रं) तयार करतात. (रथाः इव) ज्याप्रमाणें रथ तयार करतात. ॥ ३ ॥

॥ येथें चवथा खण्ड समाप्त झाला ॥

[५] पञ्चमः खण्डः ।

[१८१३] (दास्वन्तं वसोः) दान देणारा, निवास करविणारा (सहसः सूनुं जातवेदसं) बलानें उत्पन्न होणारा, सर्व जाणणारा, (विप्रं न जातवेदसं) ब्राह्मणाप्रमाणें ज्ञानी (यः देवः स्वध्वरः) जो प्रकाशमान् व उत्तम यज्ञ करणारा आहे, (ऊर्ध्वया देवाच्या कृपा) उच्च अशा दैवी सामर्थ्यानें युक्त, (शुक्रशोचिषः आजुह्वानस्य) उत्तम तेजस्वी व हवन केल्या जाणाऱ्या (सर्पिषः घृतस्य विभ्राष्टिं अनु) तुपाच्या तेजाला अनुकूल (अग्निं होतारं मन्ये) अशा अग्निला देवांना बोलावणारा म्हणून मानीत आहें. ॥ १ ॥

१८१४ यजिष्ठं त्वा यजमाना हुवेम ज्येष्ठमङ्गिरसां विप्र मन्मभिर्विप्रेभिः शुक्र मन्मभिः ।
परिज्मानमिव द्या२ँ होतारं चर्षणीनाम् ।
शोचिष्केशं वृषणं यमिमा विशः प्रावन्तु जूतये विशः　　॥ २ ॥ (ऋ. १।१२७।२)

१८१५ स हि पुरू चिदोजसा विरुक्मता दीद्यानो भवति द्रुहन्तरः परशुर्न द्रुहन्तरः ।
वीडु चिद्यस्य समृतौ श्रुवद्वनेव यत्स्थिरम् ।
निष्षहमाणो यमते नायते धन्वासहा नायते　　॥ ३ ॥ १८ (ठी) ॥
[धा० ४३ । उ० २ । स्व० ४] (ऋ. १।१२७।३)

॥ इति नवमप्रपाठके प्रथमोऽर्धः ॥ ९-१ ॥

अथ नवमप्रपाठके द्वितीयोऽर्धः ॥ ९-२ ॥

(१-१३) १ अग्निः पावकः; २ सोभरिः काण्वः; ३ अरुणो वैतहव्यः; ४ अग्निः प्रजापतिः; ५-६, ८ अवत्सारः काश्यपः; ७ मृगः; ९ गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ; १० त्रिशिरास्त्वाष्ट्रः, सिन्धुद्वीप आम्बरीषो वा; ११ उलो वातायनः; १३ वेनो भार्गवः; ४,७, ८,१२। १-४; ७-८, १२ अग्निः; ५-६ विश्वे देवाः; ९ इन्द्रः, १० आपः; ११ वायुः; १३ वेनः । १ (१-२) विष्टारपंक्तिः; १ (३-५) सतोबृहती, १ (६) उपरिष्टाज्ज्योतिः, २ काकुभः प्रगाथः- (विषमा ककुप्, समा सतोबृहती); ३ जगती; ५-६, १३ त्रिष्टुप्; ४, ७-११, गायत्री ४, ७, ८, १२ ।

१८१६ अग्ने तव श्रवो वयो महि भ्राजन्ते अर्चयो विभावसो ।
बृहद्भानो शवसा वाजमुक्थ्या३ँ दधासि दाशुषे कवे　　॥ १ ॥ (ऋ. १०।१४०।१)

[१८१४] हे (विप्र शुक्र) ज्ञानी व तेजस्वी अग्ने ! (यजमानाः) आम्ही यजमान (विप्रेभिः मन्मभिः) ज्ञानी विचारकांनीं व (मन्मभिः) मननीय मंत्रांनीं (अंगिरसां ज्येष्ठं) तेजस्वी लोकांमध्यें श्रेष्ठ व (यजिष्ठं त्वा हुवेम) पूजनीय अशा तुला हवन अर्पण करीत आहों. त्यानंतर (द्यां इव परिज्मानं) सूर्याप्रमाणें भ्रमण करणाऱ्या (चर्षणीनां होतारं) लोकांसाठीं हवन करणाऱ्या (शोचिष्केशं वृषणं यं) प्रदीप्त किरणांनीं युक्त बलवान् अशा ज्या अग्निचें (इमाः विशः) या प्रजा (जूतये प्र अवन्तु) इष्टफल प्राप्तिसाठीं संरक्षण करीत आहेत. ॥ २ ॥

[१८१५] (सः हि) तो अग्नि (विरुक्मता ओजसा) तेजस्वी बलानें (पुरुचिद् दीद्यानः) अत्यंत अधिक प्रकाशमान् (द्रुहन्तरः परशुः न) शत्रूंना कापणाऱ्या फरशीप्रमाणें (द्रुहन्तरः भवति) द्रोह करणाऱ्यांचा नाश करणारा होतो. (यस्य समृतौ) ज्याच्याबरोबर राहण्यानें (वीडु चित् श्रुवत्) बलवान् शत्रु सुद्धां पराजित होतात. (यत् स्थिरं वना इव) जें स्थिर आहे तेंही जलाप्रमाणें नष्ट होतें. कारण हा अग्नि (निः षहमाणः यमते) शत्रूंना पराजित करून सर्वांचें नियमन करतो. (न अयते) आपल्या जागेवरून पलायन करीत नाहीं. (धन्वासहा न अयते) धनुष्यधारी वीराप्रमाणें आपल्या जागेवरून दूर होत नाहीं. ॥ ३ ॥

[१८१६] हे (अग्ने) अग्ने ! (तव वयः श्रवः) तुझें अन्न प्रशंसनीय आहे. हे (विभावसो) अति तेजस्वी अग्ने ! (अर्चयः महि भ्राजन्ते) तुझ्या ज्वाला फार प्रदीप्त झाल्या आहेत. हे (बृहद् भानो कवे) अधिक तेजस्वी ज्ञानी देवा ! (शवसा) आपल्या बलानें (उक्थ्यां वाजं) प्रशंसनीय अन्न तूं (दाशुषे दधासि) प्रत्येक दान देणाऱ्या यज्ञकर्त्याला देतोस. ॥ १ ॥

१८१७ पावकवर्चाः शुक्रवर्चा अनूनवर्चा उदियर्षि भानुना ।
पुत्रो मातरा विचरन्नुपावसि पृणक्षि रोदसी उभे ॥ २ ॥ (ऋ. १०।१४०।२)

१८१८ ऊर्जो नपाज्जातवेदः सुशस्तिभिर्मन्दस्व धीतिभिर्हितः ।
त्वे इषः सं दधुर्भूरिवर्पसश्चित्रोतयो वामजाताः ॥ ३ ॥ (ऋ. १०।१४०।३)

१८१९ इरज्यन्नग्ने प्रथयस्व जन्तुभिरस्मे रायो अमर्त्य ।
स दर्शतस्य वपुषो वि राजसि पृणक्षि दर्शतं क्रतुम् ॥ ४ ॥ (ऋ. १०।१४०।४)

१८२० इष्कर्तारमध्वरस्य प्रचेतसं क्षयन्तꣳ राधसो महः ।
रातिं वामस्य सुभगां महीमिषं दधासि सानसिꣳ रयिम् ॥ ५ ॥ (ऋ. १०।१४०।५)

१८२१ ऋतावानं महिषं विश्वदर्शतमग्निꣳ सुम्नाय दधिरे पुरो जनाः ।
श्रुत्कर्णꣳ सप्रथस्तमं त्वा गिरा दैव्यं मानुषा युगा ॥ ६ ॥ १ (दि) ॥
[धा० ५९ । उ० ३ । स्व० ३] (ऋ. १०।१४०।६)

॥ इति पञ्चमः खण्डः ॥ ५ ॥

[१८१७] हे अग्ने ! (पावकवर्चाः) शुद्ध करणारे ज्याचे किरण आहेत (शुक्रवर्चाः) निर्मल तेजानें युक्त (अनूनवर्चाः) पूर्ण तेजस्वी असा तूं (भानुना उदियर्षि) आपल्या तेजानें उदित होत आहेस. (पुत्रः) पुत्ररूप अग्नि (मातरा विचरन्) मातारूपी दोन अरणींपासून उत्पन्न झाल्यानंतर (उपावसि) समीप राहणाऱ्या यज्ञ करणाऱ्यांचें तो रक्षण करतो. (उभे रोदसी पृणक्षि) दोनही द्यावा पृथिवींना तो जोडतो. अर्थात् हविनें स्वर्गाला व वृष्टिनें पृथिवीला तो पूर्ण करतो. ॥ २ ॥

[१८१८] हे (ऊर्जः नपात्) बलाच्या पुत्रा ! (जातवेदः) सर्वांना जाणणाऱ्या अग्निदेवा ! (सुशस्तिभिः मन्दस्व) उत्तम स्तुतींनीं तूं आनंदित हो. (धीतिभिः हितः) आम्ही केलेल्या कर्मांनीं तृप्त हो. (भूरि वर्पसः चित्रोतयः) अनेक रूपांनीं युक्त व विलक्षण संरक्षण करणारीं अशीं (वामजाताः इषः) उत्तम रीतिनें झालेलीं अन्नें (त्वे संदधुः) तुझ्यामध्यें यजमान हवन करतात. ॥ ३ ॥

[१८१९] हे (अमर्त्य अग्ने) अमर अग्ने ! (जन्तुभिः इरज्यन्) आपल्या तेजांनीं प्रकाशित होणारा तूं (अस्मे रायः प्रथयस्व) आमच्या धनाला वाढव. (सः) तो तूं (दर्शतस्य वपुषः) दर्शनीय शरीरानें (विराजसि) विशेष शोभिवंत होत आहेस व (दर्शतं क्रतुं पृणक्षि) दर्शनीय यज्ञ कर्माला उत्तम फल देत असतोस. ॥ ४ ॥

[१८२०] (अध्वरस्य इष्कर्तारं) यज्ञाच्या संस्कार करणाऱ्या (प्रचेतसं) विशेष ज्ञानी (महः राधसः क्षयन्तं) पुष्कळ धन जवळ बाळगणाऱ्या व (वामस्य रातिं) उत्तम धन देणाऱ्या अशा तुझी आम्ही स्तुति करीत आहों. तूं (सुभगां महीं इषं) उत्तम भाग्ययुक्त पुष्कळ अन्न व (सानसिं रयिं दधासि) सेवन करण्यास योग्य धन देतोस. ॥५॥

[१८२१] (जनाः) यज्ञ करणारे लोक (ऋतावानं महिषं) यज्ञ करणाऱ्या व पूज्य (विश्व-दर्शतं अग्निं) सर्वत्र दर्शनीय अशा अग्निला (सुम्नाय पुरः दधिरे) सुख प्राप्त व्हावें यासाठीं आपल्या समोर स्थापित करतात. हे अग्ने ! (श्रुत्कर्णं) उत्तम प्रकारें प्रार्थना ऐकणाऱ्या (सप्रथस्तमं) अत्यंत प्रसिद्ध (दैव्यं त्वा) दिव्य अशा तुझी (युगा मानुषा) पति व पत्नी मिळून दोघेही (गिरा) आपल्या वाणीनें स्तुति करतात. ॥ ६ ॥

॥ येथें पांचवा खण्ड समाप्त झाला ॥

[६]

१८२२ प्र सो अग्ने तवोतिभिः सुवीराभिस्तरति वाजकर्मभिः । यस्य त्वꣳ सख्यमाविथ ॥ १ ॥
(ऋ. ८।१९।३०)

१८२३ तव द्रप्सो नीलवान्वाश ऋत्विय इन्धानः सिष्णवा ददे ।
त्वं महीनामुषसामसि प्रियः क्षपो वस्तुषु राजसि ॥ २ ॥ २ (यी) ॥
[धा० १२ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ८।१९।३१)

१८२४ तमोषधीर्दधिरे गर्भमृत्वियं तमापो अग्निं जनयन्त मातरः ।
तमित्समानं वनिनश्च वीरुधोऽन्तर्वतीश्च सुवते च विश्वहा ॥ १ ॥ ३ (रि) ॥
[धा० १३ । उ० नास्ति । स्व० ३] (ऋ. १०।९१।६)

१८२५ अग्निरिन्द्राय पवते दिवि शुक्रो वि राजति । महिषीव वि जायते ॥ १ ॥ ४ (या) ॥
[धा ७ । उ० नास्ति । स्व० २]

१८२६ यो जागार तमृचः कामयन्ते यो जागार तमु सामानि यन्ति ।
यो जागार तमयꣳ सोम आह तवाहमस्मि सख्ये न्योकाः ॥ १ ॥ ५ (या) ॥
[धा० ७ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ५।४४।१४)

---

[६] षष्ठः खण्डः ।

[१८२२] हे (अग्ने) अग्नि ! (त्वं यस्य सख्यं आ विथ) तूं ज्याच्याशीं सख्य करतोस (सः) तो यजमान (सुवीराभिः) उत्तम वीर पुत्रांनीं (वाज-कर्मभिः) व बलवर्धक कर्मांनीं युक्त (तव ऊतिभिः) अशा तुझ्या संरक्षणांनीं (प्रतरति) संकटांतून तरून जातो. ॥ २ ॥

[१८२३] हे (सिष्णो) सोमाच्या आहुति ज्याला दिल्या जात आहेत अशा अग्ने ! (द्रप्सः नीलवान्) प्रवाहरूप व जवळ राहणारा (वाशः ऋत्वियः) स्तुत्य व ऋतुच्या अनुकूल असा (इन्धानः आददे) तेजस्वी सोम हवन करण्यासाठीं घेतला जात आहे. (त्वं महीनां उषसां प्रियः असि) तूं मोठया उषःकालांना प्रिय आहेस. (क्षपः वस्तुषु राजसि) रात्रीच्यावेळीं हवनीय पदार्थांनीं तूं प्रकाशित होत असतोस. ॥ २ ॥

[१८२४] (ऋत्वियं गर्भं तं ओषधीः दधिरे) ऋतुच्या अनुकूल प्रदीप्त अशा अग्निला गर्भरूपानें अरणी धारण करीत असतात. (तं अग्निं) त्या अग्निला (मातरः आपः जनयन्त) उदकरूपी माता उत्पन्न करतात. (वनिनः च समानं तं इत्) वनस्पति गर्भरूपामध्यें असणाऱ्या त्या अग्निला उत्पन्न करतात. (अन्तर्वतीः वीरुधः च) गर्भ धारण करणाऱ्या औषधी त्याला (विश्वहा सुवते) सर्वदा उत्पन्न करतात. ॥ १ ॥

[१८२५] (अग्निः इन्द्राय पवते) अग्नि इन्द्रासाठीं प्रदीप्त होत असतो. तो (शुक्रः दिवि विराजति) प्रदीप्त होऊन अन्तरिक्षामध्यें प्रकाशित होत असतो. (महिषी इव विजायते) राणीप्रमाणें तो विशेष शोभत असतो. ॥ १ ॥

[१८२६] (यः जागार) जो जागृत राहतो (तं ऋचः कामयन्ते) त्याची ऋचा इच्छा करतात. (यः जागार) जो जागृत राहतो (तं उ सामानि यन्ति) त्याला सामें प्राप्त होतात. (यः जागार) जो जागतो (तं अयं सोमः आह) त्याला हा सोम म्हणतो कीं (तव सख्ये अहं अस्मि) तुझा मित्र होऊन मी राहतों. (अहं न्योकाः अस्मि) मी गृहवान् आहें. ॥ १ ॥

*

१८२७ अग्निर्जागार तमृचः कामयन्तेऽग्निर्जागार तमु सामानि यन्ति ।
अग्निर्जागार तमयꣳ सोम आह तवाहमस्मि सख्ये न्योकाः ॥ १ ॥ ६ (वा) ॥

[धा० १० । उ० नास्ति । स्व० २](ऋ. ५।४४।१५)

१८२८ नमः सखिभ्यः पूर्वसद्भ्यो नमः साकंनिषेभ्यः । युञ्जे वाचꣳ शतपदीम् । ॥ १ ॥
१८२९ युञ्जे वाचꣳ शतपदीं गाये सहस्रवर्तनि । गायत्रं त्रैष्टुभं जगत् ॥ २ ॥
१८३० गायत्रं त्रैष्टुभं जगद्विश्वा रूपाणि सम्भृता । देवा ओकाꣳसि चक्रिरे ॥ ३ ॥ ७ (यु) ॥

[धा० १२ । उ० नास्ति । स्व० ५]

१८३१ अग्निर्ज्योतिर्ज्योतिरग्निरिन्द्रो ज्योतिर्ज्योतिरिन्द्रः । सूर्यो ज्योतिर्ज्योतिः सूर्यः ॥ १ ॥
१८३२ पुनरूर्जा नि वर्तस्व पुनरग्न इषायुषा । पुनर्नः पाह्यꣳहसः ॥ २ ॥
१८३३ सह रय्या नि वर्तस्वाग्ने पिन्वस्व धारया । विश्वप्स्न्या विश्वतस्परि ॥ ३ ॥ ८ (ठा) ॥

[धा० ८ । उ० २ । स्व० २]

॥ इति षष्ठः खण्डः ॥ ६ ॥

[१८२७] (अग्निः जागार) अग्नि जागृत असतो. (तं ऋचः कामयन्ते) त्याची इच्छा ऋचा करतात. (अग्निः जागार) अग्नि जागत असतो म्हणून (तं उ सामानि यन्ति) त्याच्याजवळ सामें जातात. (अग्निः जागार) अग्नि जागृत असतो (तं अयं सोम आह) त्याला हा सोम म्हणतो कीं (तव सख्ये) तुझ्या मैत्रीमध्यें (अहं न्योकाः अस्मि) मी गृहयुक्त होईन. ॥ १ ॥

[१८२८] (पूर्व-सद्भ्यः सखिभ्यः नमः) प्रथमपासून यज्ञांत बसणाऱ्या मित्ररूपी देवतांना नमस्कार करतों. (साकंनिषेभ्यः नमः) जवळ जवळ बसणाऱ्या देवांना नमस्कार करतों. (शतपदीं वाचं युञ्जे) असंख्य प्रकारांनीं केलेली स्तुति मी करीत आहें. ॥ १ ॥

[१८२९] (शतपदीं वाचं युञ्जे) असंख्य प्रकारांनीं केलेली स्तुति मीं बोलत आहें. (गायत्रं त्रैष्टुभं जगत्) गायत्री, त्रिष्टुप्, जगती या छंदांतील सामें (सहस्रवर्तनि) हजारों प्रकारांनीं (गाये) मी गात आहें. ॥ २ ॥

[१८३०] (गायत्रं त्रैष्टुभं जगत्) गायत्री, त्रिष्टुप् व जगती छंदांतील (संभृता) जीं एकत्र केलीं आहेत तीं (विश्वा रूपाणि) अनेक रूपांचीं सामें (देवाः ओकांसि चक्रिरे) देवांनीं आपलीं राहण्याचीं स्थानें बनवलीं आहेत. तीं मी गात आहें. ॥ ३ ॥

[१८३१] (अग्निः ज्योतिः) अग्नि ज्वालारूप आहे. (ज्योतिः अग्निः) ज्वाला अग्निच आहेत. (इन्द्रः ज्योतिः) इन्द्र प्रकाशरूप आहे. (ज्योतिः इन्द्रः) प्रकाश इन्द्राचें रूप आहे. (सूर्यः ज्योतिः) सूर्य प्रकाशरूप आहे व (ज्योतिः सूर्यः) ज्योति सूर्य आहे. ॥ १ ॥

[१८३२] हे (अग्ने) अग्नि ! (ऊर्जा पुनः निवर्तस्व) बलासह पुनः आमच्याकडे ये. (इषा आयुषा पुनः) अन्न व आयु यांसह आमच्याकडे पुनः ये. (अंहसः नः पुनः पाहि) पापापासून आमचें पुनः पुनः रक्षण कर. ॥ २ ॥

[१८३३] हे अग्ने ! (रय्या सह निवर्तस्व) धन बरोबर घेऊन आमच्याजवळ ये. (विश्वतः परि) सर्वांहून श्रेष्ठ व (विश्वप्स्न्या धारया) सर्वांचा उपभोग करतां येईल अशा धारेनें आम्हांला (पिन्वस्व) युक्त कर. ॥ ३ ॥

॥ येथें सहावा खण्ड समाप्त झाला ॥

[७]

१८३४ यदिन्द्राहं यथा त्वमीशीय वस्व एक इत् । स्तोता मे गोसखा स्यात् ॥१॥ (ऋ. ८।१४।१)

१८३५ शिक्षेयमस्मै दित्सेयꣳ शचीपते मनीषिणे । यदहं गोपतिः स्याम् ॥२॥ (ऋ. ८।१४।२)

१८३६ धेनुष्ट इन्द्र सूनृता यजमानाय सुन्वते । गामश्वं पिप्युषी दुहे ॥ ३ ॥ ९ (पि) ॥

[धा० १९ । उ० १ । स्व० ३] (ऋ. ८।१४।३)

१८३७ आपो हि ष्ठा मयोभुवस्ता न ऊर्जे दधातन । महे रणाय चक्षसे ॥ १ ॥ (ऋ. १०।९।१)

१८३८ यो वः शिवतमो रसस्तस्य भाजयतेह नः । उशतीरिव मातरः ॥ २ ॥ (ऋ. १०।९।२)

१८३९ तस्मा अरं गमाम वो यस्य क्षयाय जिन्वथ । आपो जनयथा च नः ॥३॥ १० (वा) ॥

[धा० १० । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. १०।९।३)

१८४० वात आ वातु भेषजꣳ शम्भु मयोभु नो हृदे । प्र न आयूꣳषि तारिषत् ॥ १ ॥

(ऋ. १०।१८६।१)

१८४१ उत वात पितासि न उत भ्रातोत नः सखा । स नो जीवातवे कृधि ॥ २ ॥

(ऋ. १०।१८६।२)

---

[७] सप्तमः खण्डः ।

[१८३४] हे इन्द्रा ! (यथा त्वं वस्वः एक इत्) जसा तूं धनाचा एकटा स्वामी आहेस, (यत् अहं ईशीय) तसा मी धनाचा स्वामी झालों तर (मे स्तोता गोसखा स्यात्) माझी स्तुति करणारा गाईंचा मित्र होईल, मग तुझी स्तुति करणारा मीं गाईंनीं युक्त कां बरे न व्हावें. ॥ १ ॥

[१८३५] हे (शचीपते) शक्तिमान् इन्द्रा ! (यत् अहं गोपतिः स्याम्) जर मी गाईंचा स्वामी बनलों तर मी (अस्मै मनीषिणे दित्सेयं) या बुद्धिमानाला धन देण्याची इच्छा करीन व (शिक्षेयं) धन देईन. ॥ २ ॥

[१८३६] हे इन्द्रा ! (ते सूनृता धेनुः) तुझी स्तुतिरूपी वाणी गोरूप धारण करून (पिप्युषी) पोषण करण्याची इच्छा करीत (सुन्वते यजमानाय) सोमयाग करणाऱ्या यजमानासाठीं (गां अश्वं दुहे) गाई व घोडे देत असते. ॥ ३ ॥

[१८३७] (आपः हि मयोभुवः स्थ) जल निःसंदेह सुख देणारें आहे. (ताः नः ऊर्जे दधातन) तें आमचें बल व अन्न वाढवणारें होवो. तसेंच (महे रणाय चक्षसे) मोठें रमणीय ज्ञान प्राप्त करून देणारें होवो. ॥ १ ॥

[१८३८] हे जलानों ! (इह वः यः रसः शिवतमः) येथें जो तुमचा रस अत्यंत सुख देणारा आहे (तस्य नः भाजयत) तो आम्हांस सेवन करावयास द्या. (उशतीः मातरः इव) मुलांचें पोषण करण्याची इच्छा करणाऱ्या माता ज्याप्रमाणें आपला दुग्धरूपी रस मुलांना देतात, त्याप्रमाणेंच तुम्हीं आम्हांला आपला रस द्या. ॥ २ ॥

[१८३९] हे (आपः) जलांनों ! (यस्य क्षयाय जिन्वथ) ज्याचा निवास करावा अशी तुम्ही प्रेरणा करीत आहां, (तस्मै अरं नः गमाम) त्यासाठीं पूर्णरूपानें आम्ही तुमचा उपयोग करूं शकूं असें तुम्ही करा. (नः जनयथ च) आम्हीं पुत्रपौत्र उत्पन्न करूं असें करा. ॥ ३ ॥

[१८४०] (वातः नः) वायु आम्हांकडे (हृदे शंभु मयोभु भेषजं) हृदयाला आनंद देणारें व सुखकारक औषध (आ वातु) वाहून आणो व (नः आयूंषि प्रतारिषत्) आमचीं आयुष्यें वाढवो. ॥ १ ॥

[१८४१] हे (वात) वायो ! (उत नः पिता असि) तूं आमचा पिता आहेस. (उत भ्राता) व भाऊ आहेस (उत नः सखा) आणि आमचा मित्रहि आहेस. (सः नः जीवातवे कृधि) तो तूं आमचें जीवन दीर्घ व्हावें असें कर. ॥ २ ॥

१८४२ यददो वात ते गृहे३ऽमृतं निहितं गुहा । तस्य नो धेहि जीवसे ॥ ३ ॥ ११ (पौ) ॥

[धा० १० । उ० १ । स्व० नास्ति] (ऋ. १०।१८६।३)

१८४३ अभि वाजी विश्वरूपो जनित्रꣳ हिरण्ययं बिभ्रदत्कꣳ सुपर्णः ।
सूर्यस्य भानुमृतुथा वसानः परि स्वयं मेधमृज्रो जजान ॥ १ ॥

१८४४ अप्सु रेतः शिश्रिये विश्वरूपं तेजः पृथिव्यामधि यत्संबभूव ।
अन्तरिक्षे स्वं महिमानं मिमानः कनिक्रन्ति वृष्णो अश्वस्य रेतः ॥ २ ॥

१८४५ अयꣳ सहस्रा परि युक्ता वसानः सूर्यस्य भानुं यज्ञो दाधार ।
सहस्रदाः शतदा भूरिदावा धर्ता दिवो भुवनस्य विश्पतिः ॥ ३ ॥ १२ (पु) ॥

[धा० २० । उ० १ । स्व० ९]

१८४६ नाके सुपर्णमुप यत्पतन्तꣳ हृदा वेनन्तो अभ्यचक्षत त्वा ।
हिरण्यपक्षं वरुणस्य दूतं यमस्य योनौ शकुनं भुरण्युम् ॥ १ ॥ (ऋ. १०।१२३।६)

[१८४२] हे (वात) वायो ! (ते गृहे) तुझ्या घरीं (यत् अदः गुहा अमृतं निहितं) जें हें गुप्त ठिकाणीं अमृत ठेवलेलें आहे. हे (विभावसो) तेजस्वी धन जवळ बाळगणाऱ्या वायो ! (तस्य नः धेहि) तें अमृत आम्हांला दे. ॥ ३ ॥

[१८४३] (सुपर्णः वाजी) गरुडाप्रमाणें बलवान् (विश्वरूपः ऋज्रः) अनेक रूपांनीं युक्त व पापनाशक अग्नि (जनित्रं अत्कं) आपल्या उत्पत्ति स्थानाला - अरणींना आपल्या तेजानें व्यापतो. व (हिरण्ययं अभि बिभ्रत्) सुवर्णासारखें तेज धारण करतो. (सूर्यस्य भानुं) सूर्याचें तेज (ऋतुथा वसानः) ऋतुच्या अनुसार धारण करून (मेधं परि स्वयं जजान) यज्ञाला स्वतः संपन्न करतो. ॥ १ ॥

[१८४४] (रेतः विश्वरूपं यत्तेजः) वीर्यासारखें अनंतरूपें असलेलें तें तेज (अप्सु शिश्रिये) जलांच्या आश्रयानें राहत आहे. (यत् पृथिव्यां अधि सं बभूव) जें पृथिवीवर असतें व (अन्तरिक्षे स्वं महिमानं मिमानः) जें अन्तरिक्षामध्यें आपल्या महिम्याला पसरीत (वृष्णः अश्वस्य रेतः कनिक्रन्ति) बलवान् सोमाचें वीर्य शब्द करीत तुला प्राप्त होत असतें. ॥ २ ॥

[१८४५] (दिवः भुवनस्य धर्ता) द्युलोक व पृथिवी यांचें धारण करणारा (विश्पतिः) प्रजांचें पालन करणारा (सहस्रदाः शतदाः भूरिदावा) यज्ञ करणाऱ्यांना सहस्रावधी, शेंकडों व पुष्कळ धन देणारा (यज्ञः अयं) यज्ञ करणारा हा अग्नि (युक्ता सहस्रा परि वसानः) आपल्याजवळ असलेलीं हजारों किरणें पसरवीत (सूर्यस्य भानुं दाधार) सूर्याच्या तेजाला धारण करीत असतो. ॥ ३ ॥

[१८४६] हे वेन ! (सुपर्णं पतन्तं) गरुडाप्रमाणें उडणाऱ्या (हिरण्यपक्षं वरुणस्य दूतं) सुवर्णासारखे पंख असलेल्या वरुणाच्या दूताला (यमस्य योनौ शकुनं भुरण्युं) नियामक विद्युत्‌रूप अग्निच्या, अन्तरिक्षामध्यें पक्ष्यांप्रमाणें उडणाऱ्या सर्व जगताच्या पोषक अशा (त्वा हृदा वेनन्तः) तुला अन्तःकरणानें प्राप्त करण्याची इच्छा करीत (नाके यत् अभ्यचक्षत) अन्तरिक्षामध्यें जेव्हां पाहतात तेव्हां (उप) तुझ्याकडे येतात. ॥ २ ॥

१८४७ ऊर्ध्वो गन्धर्वो अधि नाके अस्थात्प्रत्यङ्चित्रा बिभ्रदस्यायुधानि ।
वसानो अत्कꣳ सुरभिं दृशे कꣳ स्वाꣳर्ण नाम जनत प्रियाणि ॥२॥ (ऋ. १०।१२३।७)

१८४८ द्रप्सः समुद्रमभि यज्जिगाति पश्यन् गृध्रस्य चक्षसा विधर्मन् ।
भानु शुक्रेण शोचिषा चकानस्तृतीये चक्रे रजसि प्रियाणि ॥ ३ ॥ १३ (खु) ॥
[धा० २६ । उ० २ । स्व० ९] (ऋ. १०।१२३।८)

॥ इति सप्तमः खण्डः ॥ ७ ॥

॥ इति नवमप्रपाठकस्य द्वितीयोऽर्धः ॥ ९-२ ॥

॥ इति विंशोऽध्यायः ॥ २० ॥

[१८४७] (ऊर्ध्वः गन्धर्वः प्रत्यङ्) वर राहणारा जलांना धारण करणारा वेन जेव्हां आमच्या समोर येऊन (नाके अधि अस्थात्) अन्तरिक्षामध्यें स्थिर होतो, तेव्हां तो (अस्य चित्रा आयुधानि बिभ्रत्) आपलीं विलक्षण आयुधें धारण करून (दृशे सुरभिं अत्कं वसानः) पहावयासाठीं सुंदर रूप धारण करीत (स्वः न) सूर्याप्रमाणें (नाम प्रियाणि जनत) प्रिय जलाला उत्पन्न करीत असतो. ॥ २ ॥

[१८४८] (विधर्मन् द्रप्सः) विशेष गुणांनीं युक्त प्रवाहयुक्त (गृध्रस्य चक्षसा पश्यन्) गृध्राच्या - सूर्याच्या तेजानें तेजस्वी होऊन पाहत राहणारा वेन (यत् समुद्रं अभि जिगाति) जेव्हां पाण्यानें भरलेल्या मेघाजवळ जातो तेव्हां (भानुः शुक्रेण शोचिषा) सूर्य स्वच्छ तेजानें (तृतीये रजसि चकानः) तिसऱ्या द्युलोकांत प्रकाशित होऊन (प्रियाणि चक्रे) प्रिय जलांना उत्पन्न करतो. ॥ १ ॥

॥ येथें सातवा खण्ड समाप्त झाला ॥

॥ इति विंशोऽध्यायः ॥

विंश अध्याय

या विसाव्या अध्यायामध्यें इन्द्र, अग्नि, सूर्य, आप् व सोम या देवतांचें वर्णन आहे, तें आतां क्रमानें पहा—

इन्द्र

१ इन्द्रः नाम श्रुतः, ऋत्वियः ब्रह्मा [१७६८]- हा इन्द्र या नांवानें सुप्रसिद्ध आहे, हा ऋतूंच्या अनुसार कार्य करणारा व उत्तम ज्ञानी आहे.

२ हे शवसः पते ! त्वां इत् संयतः न गिरः यन्ति [१७६९]- हे बलाच्या स्वामी इन्द्रा ! संयमी पुरुषाची जशी स्तुति होते तशी तुमची स्तुति होत असते.

३ हे इन्द्र ! यथा पथा स्रुतयः त्वत् रातयः वि यन्तु [१७७०]- हे इन्द्रा ! ज्याप्रमाणें मोठ्या मार्गापासून अनेक लहान वाटा निघतात, त्याप्रमाणें तुझ्याकडून अनेक दानें उपासकांकडे येत असतात.

४ ऊतये सुम्नाय तुविकूर्मिं ऋतीषहं शविष्ठं सत्पतिं त्वा इन्द्रं आवर्तयामसि [१७७१]- स्वसंरक्षण व सुखप्राप्ति यासाठीं अनेक उपयोगी कार्यें करणाऱ्या, हिंसक शत्रूंना नष्ट करणाऱ्या, बलवान्, सज्जनांचें पालन करणाऱ्या तुज इन्द्राला आम्ही आमच्याजवळ बोलावीत आहों.

५ तुविशुष्म तुविक्रतो शचीवः मते ! विश्वया

महित्वना आ पप्राथ [१७७२]– महा बलवान्, पुष्कळ कार्यें करणाऱ्या, शक्तिमान् व बुद्धिमान् इन्द्रा ! तूं सर्व प्रकारच्या महत्वाच्या शक्तींनीं युक्त होऊन व्यापत आहेस.

६ यस्य महः ते हस्ता उभा–यन्तं हिरण्ययं वज्रं परि ईयतुः [१७७३]– ज्या मोठ्या पुरुषाचे - तुझे हात पृथिवीवर संचार करणाऱ्या वज्राला धारण करतात, वज्राला वापरतात.

७ शाक्मना शाकः महः शूरः यत् चिकेत, तत् सत्यं इत् मोघं न [१७८३]– आपल्या शक्तिनें सामर्थ्य-संपन्न असा मोठा शूर इन्द्र जें करावें म्हणून ठरवतो, तें खरें करून दाखवतो, तें निष्फल होत नाहीं.

८ स्पार्हं वसु जेता, उत दाता [१७८३]– स्पृहणीय धन तो जिंकून आणतो व त्याचें दानही करतो.

९ एभिः वृष्ण्या पौंस्यानि आ ददे [१७८४]– या मरुतांबरोबर राहून तो इन्द्र सामर्थ्यानें होणारीं कार्यें करीत असतो.

१० येभिः वृत्रहत्याय वज्री औक्षत् [१७८४]– या मरुतांबरोबर राहून तो वज्रधारी इन्द्र शत्रूचा वध करण्यासाठीं वृष्टी करीत असतो. बाणांची वृष्टि करतो.

११ वृत्रहन्तमः शतक्रतुः इन्द्रः द्विता विदे [१७९१] – शत्रूला मारणारा शेंकडों कर्में करणारा इन्द्र दोनही प्रकारचीं कर्में करणारा आहे. शत्रूंना मारणें व आर्यांचें संरक्षण करणें हीं दोनही कामें तो करतो.

१२ महेवृधे महे प्रभरध्वम् [१७९३]– मोठी भर-भराट व्हावी यासाठीं महान् इन्द्राला भरपूर हव्यें अर्पण करा.

१३ प्रचेतसे सुमतिं प्रकृणुध्वं [१७९३]– ज्ञानी इन्द्राविषयीं उत्तम भावना मनामध्यें धारण करा.

१४ चर्षणि-प्राः विशः प्रचर [१७९३] प्रजाचें पोषण करणारा तूं प्रजाचें सहाय्य कर.

१५ हे विप्राः ! उरुव्यचसे महिने इन्द्राय सुवृक्तिं ब्रह्म जनयन्त, तस्य व्रतानि धीराः न मिनन्ति [१७९४] –हे विद्वानांनों ! विशेष व्यापक अशा मोठ्या इन्द्राची उत्तम स्तुति करा. त्याच्या कर्मांना बुद्धिमान् लोकही विनष्ट करूं शकत नाहींत.

१६ सत्रा राजानं अनुत्तमन्युं इन्द्रं एव वाणीः सहध्यै दधिरे [१७९५]– सर्वांचा राजा, ज्याच्या क्रोधा-पुढें कोणीहि टिकूं शकत नाहीं, त्या इन्द्राला शत्रूंचा पराभव करण्यासाठीं स्तुति पुढें करीत आहेत.

[illegible] यावतः, एतावत् अहं ईशीय [१७९६]– हे इन्द्रा ! जेवढ्या धनाचा तूं स्वामी आहेस, तेवढ्याचा मी स्वामी व्हावें.

१८ पापत्वाय न रंसिषम् [१७९६]– पापी होण्या-साठीं धन देणार नाहीं.

१९ हे मघवन् ! त्वत् अन्यत् आप्यं नहि, [१७९७] –हे धनवान् इन्द्रा ! तुझ्याशिवाय आमचा दुसरा कोणीहि बंधु नाहीं.

२० वस्यः पिता च न अस्ति [१७९७]– तुझ्या-शिवाय प्रशंसनीय संरक्षकही दुसरा कोणी नाहीं.

२१ अस्मै इन्द्राय पुरो रथं शूषं सु प्र अर्चत [१८०१] –या इन्द्राच्या रथाच्या पुढें जाणाऱ्या बलाची स्तुति करा.

२२ समत्सु संगे अभीके चित् लोककृत् वृत्रहा अस्माकं चोदिता बोधि [१८०१]– युद्धांमध्यें शत्रूचें सैन्य आपणावर चालून आल्यावर लोकांचें कल्याण करणारा व शत्रूंचा नाश करणारा इन्द्र आमचा प्रेरक आहे हें तुम्ही समजा.

२३ अन्यकेषां धन्वसु अधि ज्याकाः नशन्ताम् [१८०१]– शत्रूंच्या धनुष्यांवरील दोऱ्या तुटून पडोत.

२४ हे इन्द्र ! अहिं अहन्, अशत्रुः जज्ञिषे, विश्वं वार्यं पुष्यसि [१८०२]– हे इन्द्रा ! तूं अहिला मारलेंस व शत्रूरहित झालास. तूं सर्व स्वीकारण्यास योग्य धन आपल्या जवळ वाढवतोस.

२५ नः विश्वाः अरातयः अर्यः सु विनशन्त, यः नः जिघांसति, शत्रवे वधं अस्ता असि [१८०३]– आमचे सर्व शत्रु जे आमच्यावर चढाई करून येत आहेत ते विनष्ट होवोत. जो आमचा नाश करूं इच्छित आहे त्या शत्रूवर तूं शस्त्र फेंक.

इन्द्र हा सुप्रसिद्ध शूर आहे. तो मोठा ज्ञानी व योग्यवेळीं योग्य कार्य करणारा आहे. तो संयमी आहे. अनेक उपयोगी कार्यें तो करतो, शत्रूंचा नाश करतो, तो अत्यंत सामर्थ्यवान् आहे. तो सज्जनांचें उत्तम पालन करतो, तो वज्र हातांमध्यें धरतो व त्याचा उपयोग शत्रूंचा नाश करण्यासाठीं करतो. जें करावें असें तो ठरवतो, तें कार्य तो करतोच करतो. सामर्थ्यानें होणारीं मोठ मोठीं कार्य तो करतो, शत्रूंचा नाश करतो व आर्यांचें रक्षण करतो, हीं दोनही कार्यें तो करतो. तो प्रजाजनांचें उत्तम पालन करतो, याकरितां त्या इन्द्रा-संबंधी आपण उत्तम बुद्धि धारण करावी. तो इन्द्र सर्वांचा राजा आहे. त्याचा क्रोध ज्याच्यावर होईल त्याचा नाश होईल, यासाठीं त्याची प्रसन्नता संपादन करावी. इन्द्राशिवाय दुसरा कोणीहि खरा मित्र नाहीं. तोच सर्वांचें कल्याण करणारा आहे, युद्धांमध्यें तोच खरा संरक्षक आहे. त्यानें राक्षसांना

मारलें यामुळें त्याला कोणीहि शत्रु उरलेला नाहीं. आमचे जे शत्रु असतील त्यांना इन्द्र मारून टाको व तो आम्हांला शत्रु-रहित करो.

अग्नि

आतां अग्निचें वर्णन पहा—

१ यः द्विजन्मा सः होता अयं विश्वा वार्याणि श्रवस्या दधे [१७७६]- दोन अरणींतून उत्पन्न झालेला, देवांना बोलावून यज्ञस्थानामध्यें आणणारा हा अग्नि सर्व स्वीकार करण्यास योग्य धनांना व यशस्वी कर्मांना धारण करतो.

२ हे अग्ने ! भद्रस्य दक्षस्य साधोः ऋतस्य बृहतः क्रतोः रथीः बभूथ [१७७८]- हे अग्ने ! कल्याणकारक व बल वाढवणाऱ्या उत्तम सत्य अशा मोठ्या यज्ञाचा तूं संचालक होतोस. यज्ञ कल्याण करतो, बल वाढवतो व असा हा यज्ञ अग्निमध्येंच होतो.

३ हे अग्ने ! हव्यवाहनः दूतः अध्वराणां रथीः असि । अस्मे सुवीर्यं बृहत् श्रवः धेहि [१७८१]- हे अग्ने ! तूं हवनीय द्रव्यें देवांजवळ पोंचवणारा दूत अहिंसा-पूर्ण यज्ञांचा संचालक आहेस. आम्हांला उत्तम वीर्य युक्त असें मोठें यश दे. अग्निमध्यें हवन केलेलीं हविर्द्रव्यें सूक्ष्म करून तीं जेथें पोंचवावयाचीं तेथें अग्नि पोंचवतो. हा अग्नि हिंसे-शिवाय यज्ञ करतो. या यज्ञांमध्यें हिंसा होत नसते. या यज्ञांनीं उत्तम वीर्य वाढतें व यशही वाढतें.

४ विरुक्मता ओजसा पुरुचित् दीद्यानः द्रुहन्तरः परशुः न द्रुहन्तरः भवाति [१८१५]- विशेष तेजस्वी बलानें अधिक प्रकाशमान् होऊन, शत्रूंना कापणाऱ्या फरशी-प्रमाणें, द्रोह करणाऱ्यांचा नाश करणारा होतो.

५ यस्य समृतौ वीडु चित् श्रुवत् [१८१५]- ज्याच्याबरोबर राहण्यानें बलवान् शत्रूसुद्धां पराजित करतां येतात.

६ निःषहमाणः यमते [१८१५] शत्रूचा पराजय करून त्याचें नियमन करतो.

७ पावकवर्चाः शुक्रवर्चाः अनूनवर्चाः भानुना उदियर्षि [१८१७]- शुद्धता करणाऱ्या किरणांनीं युक्त, निर्मल किरणांनीं युक्त, पूर्ण तेजस्वी असा तूं आपल्या तेजानें उदयाला प्राप्त होतोस.

८ अध्वरस्य पेशस्कर्तारं प्रचेतसं महः राधसः क्षयन्तं वामस्य रातिं [१८२०]- यज्ञ करणाऱ्या, ज्ञानी, पुष्कळ धन जवळ बाळगणाऱ्या अग्निची आम्ही स्तुति करीत आहों.

९ सुभगां महीं इषं सानसिं रयिं दधासि [१८२०] –अधिक भाग्ययुक्त अन्न व सेवन करण्याजोगें धन अग्नि देतो.

१० जनाः ऋतावानं महिषं विश्वदर्शतं अग्निं सुम्नाय पुरः दधिरे [१८२१]- लोक यज्ञ करणाऱ्या पूज्य सर्वत्र दर्शनीय अग्निला आपणास सुख प्राप्त व्हावें यासाठीं आपल्यापुढें स्थापन करतात.

११ हे अग्ने ! त्वं यस्य सख्यं आविध, सः सु-वीराभिः वाजकर्मभिः तव ऊतिभिः प्रतराति [१८२२] –हे अग्ने ! तूं ज्याच्याशीं मित्रता करतोस, तो उत्तम वीर पुत्रांनीं व बल वाढवणाऱ्या कर्मांनीं युक्त तुझ्या संरक्षणांनीं संकटांतून तरतो.

१२ हे अग्ने ! ऊर्जा इषा आयुषा निवर्तस्व । अंहसः नः पाहि [१८३२]- हे अग्ने ! तूं बल, अन्न व आयुष्य यांसह आमच्याकडे ये. पापापासून आमचें रक्षण कर.

१३ हे अग्ने ! रय्या सह निवर्त्तस्व [१८३३]- हे अग्ने ! तूं धनासह आमच्याजवळ ये.

हा अग्नि दोन अरणींच्या घर्षणानें उत्पन्न होतो. तो कल्याण करणारें बल वाढवतो. हा हवन केलेले पदार्थ जेथें पोंचवा-वयाचे तेथें पोंचवतो व उत्तम वीर्य वाढवतो. ज्याप्रमाणें फरशी लांकूड कापते, त्याप्रमाणें हा अग्नि रोगबीजें नाहींशीं करतो. याच्यायोगानें रोगबीजेंही विनष्ट होतात. याचा प्रकाश पवित्रता करणारा आहे. हा अग्नि उत्तम बल वाढव-णारें अन्न व धन देतो. सुख व आरोग्य वाढावें यासाठीं ज्ञानी लोक अग्निची स्थापना करतात. या अग्निमध्यें हवन करणें, हें बल वाढवणारें कर्म आहे. अग्निनें तयार केलेलें अन्न मानवांचें बल, आरोग्य व आयुष्य वाढवतें.

आपः (जल)

१ आपः मयोभुवः, ताः नः ऊर्जे दधातन, महे रणाय चक्षसे [१८३७]- जल निःसन्देह सुख वाढवणारें आहे. तें आमचें बल वाढवणारें होवो. तसेंच तें मोठें रमणीय दर्शन करणारें होवो.

२ इह यः वः शिवतमः रसः तस्य नः भाजयत [१८३८]- येथें जो तुमच्यामध्यें अत्यंत कल्याण करणारा रस आहे त्याचें सेवन आमच्याकडून व्हावें असें करा.

३ हे आपः ! यस्य क्षयाय जिन्वथ, तस्मै अरं वः

गमाम [१७३९]– हे जलांनो ! ज्याचा सुखानें निवास करावा अशासाठीं तुम्ही प्रयत्न करीत आहां, तें कार्य आम्ही तुमच्याकडून पूर्णरूपानें करून घेऊं.

पाणी आरोग्य वाढवणारें व सुख देणारें आहे. त्यानें शरीराचें बल वाढतें, शरीराची रमणीयता वाढते. पाण्यामध्यें जो रस आहे तो कल्याण करणारा आहे. तो प्राप्त करणारा मनुष्य निरोगी होऊन सुखी होतो. जलचिकित्सा या मंत्रांनीं सूचित होते. पाणी हें उत्तम प्रकारचें औषध आहे. जलचिकित्सेनें पुष्कळ रोग दूर होऊं शकतात. असें हें शुद्ध जल अत्यंत उपयोगी आहे.

वायु

१ वातः नः हृदे शंभु मयोभु भेषजं आवातु, नः आयूंषि प्रतारिषत् [१८४०]– वायु आमच्या हृदयाचा आनंद वाढवणारें व आरोग्य वाढवणारें औषध आणो व आमचीं आयुष्यें वाढवो.

२ हे वात ! ते गृहे यत् अदः गुहा अमृतं निहितं, तस्य नः धेहि [१८४२]– हे वायो ! तुझ्या घरीं जें अमृत ठेवलेलें आहे तें अमृत आम्हांला दे.

३ हे वात! नः पिता, भ्राता, सखा असि, नः जीवातवे कृधि [१८४१]– हे वायो ! तूं आमचा पिता, भाऊ व मित्र आहेस यासाठीं तूं आमचें जीवन दीर्घ होईल असें कर.

वायुमध्यें औषधि गुण आहेत, वायु त्या गुणांना घेऊन आमच्याजवळ येवो व आमचें आयुष्य वाढवो. वायुमध्यें अमृत आहे, म्हणून वायुचें योग्यरीतिनें सेवन केल्यानें मृत्यु दूर होतो व आयुष्य वाढतें.

सोम

१ यः जागार तं अयं सोमः आह, तव सख्ये अहं अस्मि [१८२६]– जो जागृत असतो, त्याला हा सोम म्हणतो कीं तुझ्या मैत्रीमध्यें मी आहें. तुझा मित्र मी आहें.

जागृत राहणाऱ्या लोकांचें मित्रत्व करणरा सोम आहे. त्यांचें कल्याण करणारा आहे. सोमाचा उपयोग जागृत राहून केला पाहिजे.

सुभाषितें

१ वेधसः कारवः ज्योतिः जज्ञानं मृजन्ति [१७६६] – ज्ञानी कार्य करणारे तेजस्विता प्रकट करणाऱ्याला शुद्ध करतात.

२ पुनानाय ते तानि सुषहा [१७६७]– शुद्ध होणाऱ्या तुला तीं उत्तम रक्षण करणारीं बलें प्राप्त होतात.

३ एषः ऋत्वियः ब्रह्मा गृणे [१७६८]– हा ऋतूंप्रमाणें कार्य करणारा ज्ञानी स्तविला जात आहे.

४ हे शवसः पते ! संयतः न त्वां गिरः यन्ति [१७६९]– हे बलाच्या अधिपते इन्द्रा ! संयमी पुरुषाला प्राप्त होतात, त्याप्रमाणें स्तुति तुला प्राप्त होतात.

५ हे इन्द्र ! यथा पथा स्रुतयः, त्वत् रातयः वि यन्तु [१७७०]– हे इन्द्रा ! जशा मोठ्या मार्गापासून लहान वाटा निघतात, त्याप्रमाणें तुझ्याकडून अनेक प्रकारचीं दानें दिलीं जावोत.

६ ऊतये सुम्नाय तुविकूर्मिं ऋतीषहं शविष्ठं सत्पतिं त्वा इन्द्रं आवर्तयामसि [१७७१]- स्वसंरक्षणासाठीं व सुख प्राप्त व्हावें यासाठीं अनेक कर्में करणाऱ्या, हिंसक शत्रूंचा नाश करणाऱ्या, बलवान् व सज्जनांचें पालन करणाऱ्या इन्द्राची आम्ही उपासना करीत आहों.

७ तुविशुष्म तुविक्रतो शचीवः मते ! विश्वया महित्वना आ पप्राथ [१७७२]– हे महा बलवान् व अनेक कर्में करणाऱ्या शक्तिमान् व बुद्धिमान् इन्द्रा ! सर्व प्रकारच्या महत्त्वपूर्ण शक्तिसह तूं सर्वत्र व्याप्त आहेस.

८ भद्रस्य दक्षस्य साधोः ऋतस्य बृहतः क्रतोः रथीः बभूथ [१७७८]– कल्याण करणाऱ्या, बल वाढवणाऱ्या, उत्तम सत्य मोठ्या कर्माचा तूं संचालक होतोस.

९ ज्योतिः स्वः न, विश्वेभिः अग्निकैः सुमनाः नः अर्वाक् भव [१७७९]– ज्योतिस्वरूप सूर्याप्रमाणें, सर्व तेजांनीं युक्त उत्तम मन धारण करणारा तूं आमच्याजवळ ये.

१० विवस्वत् चित्रं राधः आ वह, अद्य उषर्बुधः देवान् आ वह [१७८०]– तेजस्वी असें विलक्षण धन घेऊन ये व आज सकाळीं उठणाऱ्या विद्वानांना घेऊन या यज्ञामध्यें ये.

११ अध्वराणां रथीः असि [१७८१]– हिंसारहित कर्मांचा संचालक तूं आहेस.

१२ अस्मे सुवीर्यं बृहत् श्रवः धेहि [१७८१]– आम्हांला उत्तम पराक्रम करण्याचें सामर्थ्य व मोठें यश दे.

१३ विधुं समने बहूनां दद्राणं युवानं सन्तं पलितः जगार [१७८२]– अनेक कार्यें करणाऱ्या, युद्धामध्यें पुष्कळ शत्रूंना मारणाऱ्या तरुणाला सुद्धां वृद्धावस्था गिळून टाकते.

१४ देवस्य महित्वना काव्यं पश्य [१७८२]– देवाचें महात्म्यानें भरलेलें हें काव्य पहा.

१५ अद्य ममार स ह्यः समान [१७८२]- आज जो मेला तोच उद्यां प्रकट होत असतो. 'समान' (सं- आन) - योग्य रीतिनें प्राण धारण करणारा.

१६ यत् चिकेत, तत् सत्यं इत्, मोघं न [१७८३[- इन्द्र जें कर्तव्य करण्याचें ठरवतो, तें सत्य करून दाखवतो, तें व्यर्थ जाऊं देत नाहीं.

१७ स्पार्हं वसु जेता उत दाता [१७८३]- तो स्पृहणीय धन जिंकून आणतो व त्याचें दान करतो.

१८ वृष्ण्या पौंस्यानि आ ददे [१७८४]- तो बल वाढवणारीं पौरुषा[illegible] कृत्यें करीत असतो.

१९ ये देवाः महः क्रियमाणस्य कर्मणः ऋते कर्म उदजायन्त [१७८४]- जे देव महत्त्वाच्या करावयाच्या कार्यांमध्यें सत्य कर्मच करून दाखवतात.

२० हे सूर्य ! महान् असि बट् [१७८८]- हे सूर्या ! तूं मोठा आहेस हें खरें आहे.

२१ आदित्य ! महान् असि बट् [१७८८]- हे सूर्या ! तूं मोठा आहेस हें खरें आहे.

२२ ते सतः महः महिमा [१७८८]- तुझ्यासारख्या मोठ्याचा महिमा मोठा आहे.

२३ पनिष्टम ! मह्ना महान् असि [१७८८]- हे स्तुत्य ! तूं आपल्या महात्म्यानें मोठा आहेस.

२४ हे सूर्य ! श्रवसा महान् असि बट् [१७८९] - हे सूर्या ! तूं आपल्या मोठ्या यशानें मोठा आहेस हें खरें आहे.

२५ देवानां मह्ना महान् असि [१७८९]- तूं देवांच्या महत्त्वामुळें मोठा आहेस.

२६ असुर्यः पुरोहितः [१७८९]- तूं असुरांचा नाश करणारा म्हणून तुला पुढें ठेवलें आहे.

२७ ज्योतिः विभुः अदाभ्यं [१७८९]- तुझें तेज व्यापक व न दबलें जाणारें आहे.

२८ वृत्रहन्तमः शतक्रतुः इन्द्रः द्विता विदे [१७९१]- वृत्राला मारणारा शेंकडों कर्में करणारा इन्द्र दोनही प्रकारचीं कार्यें करतो. आर्यांचें संरक्षण व दुष्टांचा नाश हीं त्याचीं दोन कामें आहेत.

२९ वः महेवृधे महे प्रभरध्वम् [१७९३]- तुमचें मोठें संवर्धन व्हावें यासाठीं मोठ्या वीराचा विशेष संमान करा. त्याला द्यावयाचें तें भरपूर द्या.

*

३० प्र चेतसे सुमतिं प्रकृणुध्वं [१७९३]- विशेष बुद्धिमानाविषयीं आपली उत्तम मति करा.

३१ चर्षणिप्राः विशः प्रचर [१७९३]- प्रजांचें पोषण करणारा तूं सर्व प्रजांचें पोषण कर.

३२ हे विप्राः ! उरुव्यचसे महिने इन्द्राय सुवृक्तिं ब्रह्म जनयन्त, तस्य व्रतानि धीराः न मिनन्ति [१७९४] हे ब्राह्मणांनों ! विशेष व्यापक अशा मोठ्या, इन्द्रासाठीं उत्तम स्तुतिचें स्तोत्र करा. त्याचीं कार्यें बुद्धिमान् लोक विनष्ट करूं शकत नाहींत.

३३ सत्रा राजानं अनुत्तमन्युं इन्द्रं एव वाणीः सहध्यै दधिरे [१७९५]- सर्वांचा एकावेळींच राजा असणारा, ज्याच्या क्रोधापुढें कोणीहि टिकूं शकत नाहीं अशा इन्द्रालाच आमच्या वाणी शत्रूंचा पराभव करण्यासाठीं पुढें करीत असतात.

३४ हर्यश्वाय आपीन् सं वर्धय [१७९५]- इन्द्राची स्तुति करण्यासाठीं मित्रांना प्रोत्साहन द्या.

३५ हे इन्द्र ! यत् यावतः, एतावत् अहं ईशीय [१९७६] हे इन्द्रा ! जेवढ्या धनाचा तूं स्वामी आहेस तेवढ्याचा मी स्वामी व्हावें.

३६ स्तोतारं इत् दधिषे, पापत्वाय न रंसिषम् [१७८६]- स्तोत्याला मी धन देऊन त्याचें धारण करीन, पण त्याला पाप करण्यास प्रवृत्त करणार नाहीं. पाप करण्यांत तो आनंद मानील असें त्याला अवनत करणार नाहीं.

३७ कुहाचिद् विदे महयते दिवे दिवे रायः शिक्षेयं इत् [१७९७]- इन्द्र म्हणतो - कोठेंहि राहून ज्ञानपूर्वक महत्त्वाचें कार्य करणाऱ्याला मी धन देतोंच.

३८ हे मघवन् ! त्वत् अन्यत् आप्यं नहि, वस्यः पिता च न अस्ति [१७९७]- हे इन्द्रा ! तुझ्याशिवाय आमचा दुसरा कोणीहि बंधु नाहीं व प्रशंसनीय पिताही दुसरा कोणी नाहीं.

३९ अर्चतः विप्रस्य मनीषां बोध [१७९७]- अर्चना करणाऱ्या ब्राह्मणाचें मन तूं जाण.

४० अन्तमा सचा इमा दुवांसि कृष्व [१७९८] - जवळचा मित्र मी आहें अशा भावनेनें या सेवांचा स्वीकार कर.

४१ तुरस्य ते गिरः असुर्यस्य विद्वान् न अपि मृष्ये [१७९९]- त्वरेनें शत्रूंचा नाश करणाऱ्या तुझ्या स्तुतिंना तुझ्या बलाचा ज्ञाता मी दूर करूं शकत नाहीं. तुझी स्तुति मी करणारच.

४२ स्वयशः ते नाम सदा विचक्रिम [१७९९]- आपलें यश वाढवणारें तुझें नांव मी सदा घेत राहीन.

४३ मनीषी त्वां इत् भूरि हवते [१८००]-बुद्धिमान् तुझ्यालाशीं पुष्कळ हवन करतात.

४४ अस्मत् आरे ज्योक् मा कः [१८००]- आमच्यापासून दूर तूं फार वेळ राहूं नकोस.

४५ अस्मै इन्द्राय पुरोरथं शूषं सु प्र अर्चत [१८०१] या इन्द्राच्या रथाच्या पुढें असलेल्या सामर्थ्याचें उत्तम प्रकारें पूजन करा.

४६ समत्सु संगे अभीके चित् लोककृत् वृत्रहा अस्माकं चोदिता बोधि [१८०१]- युद्धांमध्यें शत्रूचें सैन्य आपल्यावर चालून जवळ आलें असतां, लोकांचें पालन करणारा वृत्रवधकर्ता इन्द्र आमचा उत्साह वाढवणारा आहे हें तुम्ही जाणा.

४७ अन्यकेषां धन्वसु अधि ज्याकाः नभन्तां [१८०१] -अन्य शत्रूंच्या धनुष्यांवरील दोऱ्या तुटून पडोत.

४८ अहिं अहन् अशत्रुः जज्ञिषे [१८०२]- अहिला मारून तूं शत्रूरहित होतोस.

४९ विश्वं वार्यं पुष्यसि [१८०२]- सर्व स्वीकारण्यास योग्य धन तूं वाढवितोस.

५० तं त्वा परिष्वजामहे [१८०२]- त्या तुला आम्ही वश करीत आहों.

५१ नः विश्वाः अरातयः अर्यः सुविनशन्त [१८०३] -आमच्यावर चाल करून येणारे सर्व शत्रू उत्तम रीतिनें नाश पावोत.

५२ यः नः जिघांसति शत्रवे वधं अस्ता असि [१८०३]- जो आमचा वध करण्याची इच्छा करीत आहे, त्या शत्रूवर तूं मारक अस्त्र फेंकतोस.

५३ ते या रातिः वसु ददिः [१८०३]- तुझें जें दान आहे तें आम्हांस धन देवो.

५४ हे हरिवः ! रेवतः स्तोता रेवान् स्यात् [१८०४] -हे उत्तम घोडे बाळगणाऱ्या इन्द्रा ! तुझ्यासारख्या धनवानाचा स्तुति करणारा अवश्य धनवान् होतो.

५५ त्वावतः मघोनः सुतस्य प्रेदुः [१८०४]- तुझ्यासारख्या धनवानाची स्तुति करणारा धनवान् होईलच.

५६ अ-गोः रयिः आ चिकेत [१८०५]- गाई न पाळणाऱ्याचें धन तूं जाणतोस.

५७ पीयत्नवे नः मा परा दाः [१८०६]- हिंसक शत्रूच्या आधीन आम्हांस देऊं नकोस.

५८ शर्धते मा [१८०६]- नाश करणाऱ्याच्या स्वाधीन आम्हांस करूं नकोस.

५९ हे शचीवः । शचीभिः शिक्ष [१८०६] हे शक्तिमान् इन्द्रा ! आपल्या शक्तींनीं आम्हांस धन दे.

६० सः विरुक्मता ओजसा पुरुचित् दीद्यानः द्रुहन्तरः भवति [१८१५] तो आपल्या तेजस्वी बलानें अत्यंत तेजस्वी होऊन शत्रूंचा नाश करणारा होतो.

६१ यस्य समृतौ वीड्डु चित् श्रवत् [१८१५]- ज्याच्याबरोबर राहण्यानें बलवान् शत्रूहि पराभूत होत असतात.

६२ धन्वासहा न अयते [१८१५]- धनुष्यधारी वीर आपल्या जागेवरून दूर होत नाहीं.

६३ निःषहमाणः यमते [१८१५]- शत्रूंना पराजित करणारा सर्वांचें नियमन करतो.

६४ तव वयः श्रवः [१८१६]- तुझें अन्न प्रशंसनीय आहे.

६५ हे विभावसो ! अर्चयः महि भ्राजन्ते [१८१६] -हे तेजस्वी अग्ने ! तुझ्या ज्वाला फार प्रदीप्त झाल्या आहेत.

६६ पावकवर्चाः, शुक्रवर्चाः, अनूनवर्चाः भानुना उदियर्षि [१८१७]- शुद्ध करणारे ज्याचे किरण आहेत, जो निर्मल तेजानें युक्त, व पूर्ण तेजस्वी आहे असा तूं आपल्या तेजानें उदयाला प्राप्त होत आहेस.

६७ हे अमर्त्य अग्ने ! जन्तुभिः इरज्यन् अस्मे रायः प्रथयस्व [१८१९]- हे अमर अग्ने ! आपल्या तेजांनीं तेजस्वी झालेला तूं आमचें धन वाढव.

६८ दर्शतस्य वपुषः विराजसि [१८१९] तूं सुंदर शरीरानें शोभत आहेस.

६९ दर्शतं क्रतुं पृणक्षि [१८१९]- दर्शनीय सुन्दर यज्ञकर्माला उत्तम फल देत असतोस.

७० अध्वरस्य इष्कर्त्तारं प्रचेतसं, महः राधसः क्षयन्तं, वामस्य रातिं सुभगां महीं इषं, सानसिं रयिं दधासि [१८२०]- अहिंसापूर्ण यज्ञाचा संस्कार करणाऱ्या, विशेष ज्ञानी, पुष्कळ धन जवळ बाळगणाऱ्या, व उत्तम धन देणाऱ्या अशा तुझी मी स्तुति करतों, तूं उत्तम भाग्ययुक्त पुष्कळ अन्न व सेवनीय धन आम्हांस देतोस.

७१ जनाः ऋतावानं महिषं विश्वदर्शतं अग्निं सुम्नाय पुरः दधिरे [१८२१]- याजक यज्ञ करणाऱ्या पूज्य सर्व प्रकारें दर्शनीय अग्निला सुख व्हावें म्हणून आपल्या पुढें स्थापन करतात.

७२ त्वं यस्य सख्यं आविथ, सः सुवीराभिः वाजः

कर्मभिः तव ऊतिभिः प्र तरति [१८२२]- तूं ज्याच्याशीं सख्य करतोस, तो उत्तम वीर पुत्रांनीं व बलवर्धक कर्मांनीं युक्त होतो व तुझ्या संरक्षणांनीं संकटांतून तरून जातो.

७३ शुक्रः दिवि विराजति, महिषीव विजायते [१८२५]- अग्नि प्रदीप्त होऊन आकाशांत प्रकाशित होत आहे, राणीप्रमाणें तो शोभत आहे.

७४ यो जागार तं ऋचः कामयन्ते [१८२६]- जो जागतो त्याची इच्छा ऋचा करतात.

७५ यो जागार तं उ सामानि यन्ति [१८२६]- जो जागृत असतो त्याला सामें प्राप्त होतात.

७६ यः जागार तं अयं सोमः आह, तव सख्ये अहं अस्मि [१८२६]- जो जागृत राहतो, त्याला हा सोम म्हणतो कीं मी तुझा मित्र होऊन राहतों.

७७ अहं न्योकाः अस्मि [१८२६]- मी घर करून राहत नाहीं.

७८ पूर्वसद्भ्यः सखिभ्यः नमः [१८२८]- पूर्वींपासून यज्ञांत बसणाऱ्या मित्रांना नमस्कार करतों.

७९ साकं निषेभ्यः नमः [१८२८]- जवळ जवळ बसणाऱ्यांना नमस्कार करतों.

८० विश्वा रूपाणि ओकांसि देवाः चक्रिरे [१८३०] -अनेक रूपांचीं घरें देवांनीं बनवलीं आहेत.

८१ हे अग्ने ! ऊर्जा इषा आयुषा पुनः निवर्तस्व [१८३२]- हे अग्ने ! तूं बल, अन्न व आयुष्य यांसह आमच्याकडे ये.

८२ अंहसः नः पुनः पाहि [१८३२] - पापापासून आमचें पुनः पुनः रक्षण कर.

८३ अग्ने ! रय्या सह निवर्त्तस्व [१८३३]- हे अग्ने ! धनाला बरोबर घेऊन तूं आमच्याकडे ये.

८४ हे इन्द्र ! यथा त्वं वस्वः एकः इत् , यत् अहं ईशीय, मे स्तोता गोसखा स्यात् [१८३४]- हे इन्द्रा ! जसा तूं एकटाच धनाचा स्वामी आहेस तसा मी धनाचा स्वामी व्हावें, तेव्हां माझी स्तुति करणारा गाईंचा मित्र होईल.

८५ आपः मयोभुवः स्थ, ताः नः ऊर्जे दधातन, महे रणाय चक्षसे [१८३७]- जल निःसंशय सुख देणारें आहे, तें आमचें बल वाढवणारें होवो, तें मोठें रमणीय ज्ञान प्राप्त करून देणारें होवो.

८६ इह वः यः शिवतमः रसः, तस्य नः भाजयत [१८३८]- हे जलांनों ! येथें जो तुमचा अत्यंत सुख देणारा रस आहे तो आम्हांस सेवन करणाऱ्यासाठीं मिळो.

८७ हे आपः ! यस्य क्षयाय जिन्वथ, तस्मै अरं गमाम [१८३९]- हे जलांनों ! ज्याचा येथें निवास व्हावा असें तुम्ही इच्छित आहां, त्यासाठीं आम्ही पूर्णरूपानें उपयोगी होऊं असें तुम्ही करा.

८८ वातः नः हृदे शंभु मयोभु भेषजं आ वातु, नः आयूंषि प्रतारिषत् [१८४०]- वायु आम्हांकडे हृदयाला आनंद देणारें व सुखकारक औषध वाहून आणो व आमचीं आयुष्यें वाढवो.

८९ हे वात ! नः पिता, भ्राता, सखा असि, सः नः जीवातवे कृधि [१८४१]- हे वायो ! तूं आमचा पिता, भाऊ व मित्र आहेस. तो तूं आमचें जीवन दीर्घ व्हावें असें कर.

९० हे वात ! ते गृहे गुहा अमृतं निहितं, हे विभावसो ! तस्य नः धेहि [१८४२]- हे वायो ! तुझ्या घरीं गुप्त ठिकाणीं अमृत ठेवलें आहे. हे धन जवळ बाळगणाऱ्या वायो ! तें आम्हांला दे.

उपमा

१ समुद्रं वर्ध [१७६७]- समुद्राप्रमाणें पात्रांना भरून टाक.

२ संयतः न [१७६९]- संयमी पुरुषाप्रमाणें (गिरः यन्तिः) स्तुति तुला प्राप्त होतात.

३ यथा पथा स्तुतयः [१७७०]- जशा मोठ्या मार्गापासून अनेक लहान वाटा फुटतात, (त्वत् रातयः वियन्तु) त्याप्रमाणें तुझ्याकडून अनेक दानें दिलीं जावोत.

४ यः अर्वा नभन्यः न [१७७४]- जो घोडा वायुप्रमाणें गतिमान् असतो.

५ अश्वं न [१७७७]- ज्याप्रमाणें घोडा पोंचवतो, त्याप्रमाणें तो (भद्रं क्रतुं) कल्याण करणाऱ्या यज्ञाला वाढवतो.

६ होता इव [१७८७]- ज्याप्रमाणें होता स्तुति करतो, त्याप्रमाणें (प्रातः मत्सति) तो प्रातःकाळीं सोमपानाची इच्छा करतो.

७ उरां वृकः न [१८०८]- मेषाला लांडगा जसें कांपवितो, त्याप्रमाणें (एषां नेमिः विधूनुते) या दगडाची धार सोमवल्लीला कुटतांना कांपविते.

८ रथाः इव [१८१२]- रथांना तयार करतात, त्याप्रमाणें (असृग्रन्) अन्न तयार करतात.

९ विप्रं न जातवेदसं [१८१३]- विप्राप्रमाणें ज्ञानी अग्निप्रमाणें तेजस्वी असतो.

१० द्यां इव परिज्मानं [१८१४]- सूर्याप्रमाणें भ्रमण करणारा.

११ द्रुहन्तरः परशुः न [१८१५]- लांकडें कापणाऱ्या फरशीप्रमाणें तो अग्नि (द्रुहन्तरः भवति) शत्रूंना कापणारा होतो.

१२ महिषी इव विजायते [१८२५]- राणीप्रमाणें तो अग्नि शोभतो.

१३ स्वः न [१८४७]- सूर्याप्रमाणें (दृशे सुरभिं अत्कं वसानः) दिसावयाला सुंदर रूप धारण करतो.

विंशाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
		(१)		
१७६५	९।११९।१	नृमेध आंगिरसः	पवमानः सोमः	गायत्री
१७६६	९।११९।२	नृमेध आंगिरसः	,,	,,
१७६७	९।११९।३	नृमेध आंगिरसः	,,	,,
१७६८	—	नृमेधः वामदेवो वा	इन्द्रः	द्विपदा पंक्तिः
१७६९	—	नृमेधः वामदेवो वा	,,	,,
१७७०	—	नृमेधः वामदेवो वा	,,	,,
१७७१	८।६८।१	प्रियमेधः आंगिरसः	,,	अनुष्टुप्
१७७२	८।६८।२	प्रियमेधः आंगिरसः	,,	गायत्री
१७७३	८।६८।३	प्रियमेधः आंगिरसः	,,	,,
१७७४	१।१४९।३	दीर्घतमा औचथ्यः	अग्निः	विराट्
१७७५	१।१४९।४	दीर्घतमा औचथ्यः	,,	,,
१७७६	१।१४९।५	दीर्घतमा औचथ्यः	,,	,,
१७७७	४।१०।१	वामदेवो गौतमः	,,	पदपंक्तिः
१७७८	४।१०।२	वामदेवो गौतमः	,,	,,
१७७९	४।१०।३	वामदेवो गौतमः	,,	,,
		(२)		
१७८०	१।४४।१	प्रस्कण्वः काण्वः	,,	प्रगाथः- (विषमा बृहती, समा सतोबृहती)
१७८१	१।४४।२	प्रस्कण्वः काण्वः	,,	,,
१७८२	१०।५५।५	बृहदुक्थो वामदेव्यः	इन्द्रः	त्रिष्टुप्
१७८३	१०।५५।६	बृहदुक्थो वामदेव्यः	,,	,,
१७८४	१०।५५।७	बृहदुक्थो वामदेव्यः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१७८५	८।९४।४	बिन्दुः पूतदक्षो वा आंगिरसः	मरुतः	गायत्री
१७८६	८।९४।५	बिन्दुः पूतदक्षो वा आंगिरसः	,,	,,
१७८७	८।९४।६	बिन्दुः पूतदक्षो वा आंगिरसः	,,	,,
१७८८	८।१०१।११	जमदग्निर्भार्गवः	सूर्यः	प्रगाथः= (विषमा बृहती, समा सतोबृहती)
१७८९	८।१०१।१२	जमदग्निर्भार्गवः	,,	,,
		(३)		
१७९०	८।९३।३१	सुकक्ष आंगिरसः	इन्द्रः	गायत्री
१७९१	८।९३।३२	सुकक्ष आंगिरसः	,,	,,
१७९२	८।९३।३३	सुकक्ष आंगिरसः	,,	,,
१७९३	७।३२।१०	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	विराट्
१७९४	७।३२।११	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१७९५	७।३२।१२	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१७९६	७।३२।१८	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	प्रगाथः=(विषमा बृहती, समा सतोबृहती,)
१७९७	७।३२।१९	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१७९८	७।२२।४	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	विराट्
१७९९	७।२२।५	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
१८००	७।२२।६	वसिष्ठो मैत्रावरुणिः	,,	,,
		(४)		
१८०१	१०।१३३।१	सुदासः पैजवनः	,,	शक्वरी
१८०२	१०।१३३।२	सुदासः पैजवनः	,,	,,
१८०३	१०।१३३।३	सुदासः पैजवनः	,,	,,
१८०४	८।२।१३	मेधातिथिः काण्वः	,,	गायत्री
१८०५	८।२।१४	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१८०६	८।२।१५	मेधातिथिः काण्वः	,,	,,
१८०७	८।३४।१	नीपातिथिः काण्वः	,,	,,
१८०८	८।३४।३	नीपातिथिः काण्वः	,,	,,
१८०९	८।३४।२	नीपातिथिः काण्वः	,,	,,
१८१०	९।६७।१६	जमदग्निर्भार्गवः	पवमानः सोमः	,,
१८११	९।६७।१८	जमदग्निर्भार्गवः	,,	,,
१८१२	९।६७।१७	जमदग्निर्भार्गवः	,,	,,
		(५)		
१८१३	१।१२७।१	परुच्छेपो दैवोदासिः	अग्निः	अत्यष्टिः
१८१४	१।१२७।२	परुच्छेपो दैवोदासिः	,,	,,
१८१५	१।१२७।३	परुच्छेपो दैवोदासिः	,,	,,
१८१६	१०।१४०।१	अग्निः पावकः	अग्निः	विष्टारपंक्तिः
१८१७	१०।१४०।२	अग्निः पावकः	,,	,,

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१८१८	१०।१४०।३	अग्निः पावकः	अग्निः	सतोबृहती
१८१९	१०।१४०।४	अग्निः पावकः	,,	,,
१८२०	१०।१४०।५	अग्निः पावकः	,,	,,
१८२१	१०।१४०।६	अग्निः पावकः	,,	उपरिष्टाज्ज्योतिः
		(६)		
१८२२	८।१९।३०	सोभरिः काण्वः	,,	काकुभः प्रगाथः- (विषमा ककुप्, समा सतोबृहती
१८२३	८।१९।३१	सोभरिः काण्वः	,,	,,
१८२४	१०।९१।६	अरुणो वैतहव्यः	,,	जगती
१८२५	—	अग्निः प्रजापतिः	,,	गायत्री
१८२६	५।४४।१४	अवत्सारः काश्यपः	विश्वे देवाः	त्रिष्टुप्
१८२७	५।४४।१५	अवत्सारः काश्यपः	,,	,,
१८२८	—	मृगः	अग्निः	गायत्री
१८२९	—	मृगः	,,	,,
१८३०	—	मृगः	,,	,,
१८३१	—	अवत्सारः काश्यपः	,,	,,
१८३२	—	अवत्सारः काश्यपः	,,	,,
१८३३	—	अवत्सारः काश्यपः	,,	,,
		(७)		
१८३४	८।१४।१	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	इन्द्रः	,,
१८३५	८।१४।२	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	,,	,,
१८३६	८।१४।३	गोषूक्त्यश्वसूक्तिनौ काण्वायनौ	,,	,,
१८३७	१०।९।१	त्रिशिरास्त्वाष्ट्रः, सिन्धुद्वीपो आम्बरीषो वा	आपः	,,
१८३८	१०।९।२	त्रिशिरास्त्वाष्ट्रः, सिन्धुद्वीपो आम्बरीषो वा	,,	,,
१८३९	१०।९।३	त्रिशिरास्त्वाष्ट्रः, सिन्धुद्वीपो आम्बरीषो वा	,,	,,
१८४०	१०।१८६।१	उलो वातायनः	वायुः	,,
१८४१	१०।१८६।२	उलो वातायनः	,,	,,
१८४२	१०।१८६।३	उलो वातायनः	,,	,,
१८४३	—	सुपर्णः	अग्निः	त्रिष्टुप्
१८४४	—	सुपर्णः	,,	,,
१८४५	—	सुपर्णः	,,	,,
१८४६	१०।१२३।६	वेनो भार्गवः	वेनः	,,
१८४७	१०।१२३।७	वेनो भार्गवः	,,	,,
१८४८	१०।१२३।८	वेनो भार्गवः	,,	,,

अथैकविंशोऽध्यायः ।

अथ नवमप्रपाठके तृतीयोऽर्धः ॥ ९-३ ॥

(१-९) १-४, ५ (१-२) अप्रतिरथ ऐन्द्रः; ५ (३), ६ (३), ८ (१, ३) पायुर्भारद्वाजः; ७ (१-२) शासो भारद्वाजः; ९ (१) जय ऐन्द्रः; ९ (२-३) गोतमो राहूगणः; ४ (३) ६ (१-२)-? ७ (३)...८ (२)... ॥ १, २ (२-३), ३-४, ५ (२), ६, ७, ९ (१) इन्द्रः; ५ (२) इन्द्रो मरुतो वा; २ (१) बृहस्पतिः; ५ (१) अप्वा देवी, ५ (३) इषवः; ६ (३) (संग्रामाशिषः) युद्धभूमि - कवच - ब्रह्मणस्पत्यादितयः; ८ (१, ३ [संग्रामाशिषः १ वर्म - सोम - वरुणाः, ३ देवब्रह्माणि]; ९ सोमावरुणौ । (२-३) विश्वे देवाः; ८ (३)... ॥ ३ ॥ १-४, ५ (१), ६ (१) ८ (१) ९ (१-२) त्रिष्टुप्; ५ (२-३), ६ (२) ७ (१-२), ८ (२) अनुष्टुप्; ६ (३) पंक्तिः; ९ (३) विराट्स्थाना; ७ (३) विराड् जगती ८ (३)... ॥

१८४९ आशुः शिशानो वृषभो न भीमो घनाघनः क्षोभणश्चर्षणीनाम् ।
सङ्क्रन्दनोऽनिमिष एकवीरः शतꣳ सेना अजयत्साकमिन्द्रः ॥ १ ॥ (ऋ. १०।१०३।१)

१८५० सङ्क्रन्दनेनानिमिषेण जिष्णुना युत्कारेण दुश्च्यवनेन धृष्णुना ।
तदिन्द्रेण जयत तत्सहध्वं युधो नर इषुहस्तेन वृष्णा ॥ २ ॥ (ऋ. १०।१०३।२)

१८५१ स इषुहस्तैः स निषङ्गिभिर्वशी सꣳस्रष्टा स युध इन्द्रो गणेन ।
सꣳसृष्टजित्सोमपा बाहुशर्ध्युग्रधन्वा प्रतिहिताभिरस्ता ॥ ३ ॥ १ (फे) ॥
[धा० ४० । उ० २ । स्व० ७] (ऋ. १०।१०३।३)

[१८४९] (आशुः भीमः) शीघ्रता करणारा व भयंकर (वृषभः न शिशानः) बैलाप्रमाणें शत्रूला मारणारा (घनाघनः) शत्रूंचा नाश करणारा (चर्षणीनां क्षोभणः) द्वेष करणाऱ्या दुष्टांमध्यें क्षोभ उत्पन्न करणारा (संक्रन्दनः अनिमिषः) शत्रूंना रडवणारा व आळस न करणारा (एकवीरः इन्द्रः) असा अद्वितीय वीर इन्द्र (शतं सेनाः साकं अजयत्) सेंकडों शत्रूंच्या सेनांना एक वेळींच जिंकून पराजित करतो. ॥ १ ॥

[१८५०] (युधः नरः) हे युद्ध करणाऱ्या नेत्यांनों ! (सं क्रन्दनेन) शत्रूंना रडवणाऱ्या (अ-निमिषेण) आळस न करणाऱ्या (जिष्णुना) जय मिळवणाऱ्या (युत्कारेण) युद्धामध्यें प्रवीण (दुश्च्यवनेन) आपल्या स्थानावर स्थिर राहणाऱ्या (धृष्णुना) शत्रूंना पराजित करणाऱ्या (इषु-हस्तेन वृष्णा इन्द्रेण) बाण हातांत धारण करणाऱ्या बलवान् इन्द्राच्या सहाय्यानें (तत् जयत) तें युद्ध जिंका व (तत् सहध्वं) त्यांत शत्रूंचा पराभव करा. ॥ २ ॥

[१८५१] (सः इषुहस्तैः वशी) तो इन्द्र बाण हातांत धरणाऱ्या योध्यांच्या सहाय्यानें सर्व शत्रूंना आपल्या ताब्यांत ठेवतो, (सः निषङ्गिभिः) तो खड्गधारी योध्यांच्या सहाय्यानें शत्रूंना वश करतो (सः इन्द्रः) असा तो इन्द्र (युधः) युद्ध करण्यांत प्रवीण (गणेन संस्रष्टा) शत्रूसमुदाया बरोबर युद्ध करतो. (संसृष्टजित्) युद्ध जिंकणारा (सोमपाः) सोमरस पिणारा, (बाहु-शर्धी) बाहुबल बाळगणारा (उग्र-धन्वा) धनुष्य चालवण्यांत कुशल (प्रहिताभिः अस्ता) सोडलेल्या बाणांनीं शत्रूंचा वध करणारा आहे. ॥ ३ ॥

१८५२ बृहस्पते परि दीया रथेन रक्षोहामित्राँ अपबाधमानः ।
प्रभञ्जन्त्सेनाः प्रमृणो युधा जयन्नस्माकमेध्यविता रथानाम् ॥ १ ॥ (ऋ. १०।१०३।४)

१८५३ बलविज्ञायः स्थविरः प्रवीरः सहस्वान्वाजी सहमान उग्रः ।
अभिवीरो अभिसत्वा सहोजा जैत्रमिन्द्र रथमा तिष्ठ गोवित् ॥ २ ॥ (ऋ. १०।१०३।५)

१८५४ गोत्रभिदं गोविदं वज्रबाहुं जयन्तमज्म प्रमृणन्तमोजसा ।
इमँ सजाता अनु वीरयध्वमिन्द्रँ सखायो अनु सँ रभध्वम् ॥ ३ ॥ २ (हे) ॥
[धा० ३६ । उ० नास्ति । स्व० ७] (ऋ. १०।१०३।६)

१८५५ अभि गोत्राणि सहसा गाहमानोऽदयो वीरः शतमन्युरिन्द्रः ।
दुश्च्यवनः पृतनाषाडयुध्यो३ऽस्माकँ सेना अवतु प्र युत्सु ॥ १ ॥ (ऋ. १०।१०३।७)

१८५६ इन्द्र आसां नेता बृहस्पतिर्दक्षिणा यज्ञः पुर एतु सोमः ।
देवसेनानामभिभञ्जतीनां जयन्तीनां मरुतो यन्त्वग्रम् ॥ २ ॥ (ऋ. १०।१०३।८)

[१८५२] हे (बृहस्पते) पुष्कळांचें पालन करणाऱ्या इन्द्रा ! (रथेन परिदीय) रथानें इकडे ये. (रक्षो-हा) राक्षसांना मारणारा व (अमित्रान् अपबाधमानः) शत्रूंना बाधा पोंचवणारा (सेनाः प्रभंजन् प्रमृण) शत्रूच्या सैन्याला छिन्नभिन्न करून त्यांचा नाश कर. (युधा जयत्) युद्धामध्यें जय मिळव (अस्माकं रथानां अविता एधि) आमच्या रथांचा रक्षक हो. ॥ १ ॥

[१८५३] हे (इन्द्र) इन्द्रा ! (बल-विज्ञायः) सर्वांचें बल जाणणारा (स्थविरः) मोठा (प्र-वीरः सहस्वान्) विशेष वीरता गाजविणारा, शत्रूंचा पराभव करणारा (वाजी सहमानः) बलवान् व साहस दाखवणारा (उग्रः अभिवीरः) उग्र महावीर (अभि सत्वा सहोजाः) सत्ववान् व सामर्थ्यासह उत्पन्न झालेला (गोवित्) गाई पाळणारा असा तूं (जैत्रं रथं आ तिष्ठ) विजयी रथावर बैस. ॥ २ ॥

[१८५४] हे (सजाताः) एक स्थानामध्यें राहणारे योद्धे हो ! (गोत्रभिदं) शत्रूंचे किल्ले तोडणारा (गो-विदं) गाई पाळणारा (वज्रबाहुं) वज्रासारखे बाहु ज्याचे आहेत असा (अज्म जयन्तं) युद्ध जिंकणारा (ओजसा प्रमृणन्तं) बलानें शत्रूचा नाश करणारा (इमं इन्द्रं) अशा या इन्द्राला पुढें करून (अनुवीरयध्वं) त्याच्या अनुकूल राहून वीरता दाखवा. हे (सखायः) मित्र हो ! (अनु संरभध्वम्) या इन्द्राच्या अनुकूल राहून शत्रूवर क्रोध करा. ॥ ३ ॥

[१८५५] (गोत्राणि सहसा अभि गाहमानः) शत्रूच्या किल्ल्यांत आपल्या शक्तीनें प्रवेश करणारा (अ-दयः वीरः) शत्रूवर दया न दाखवणारा वीर (शत-मन्युः) पुष्कळ शत्रूंवर क्रोध करणारा व (दुश्च्यवनः) तो आपल्या स्थानावरून हालवला जात नाहीं असा (पृतना-षाट्) शत्रूसेनेचा पराभव करणारा (अयुध्यः इन्द्रः) ज्याच्याशीं कोणताही शत्रु युद्ध करूं शकत नाहीं असा इन्द्र (युत्सु) युद्धांमध्यें (अस्माकं सेनाः प्र अवतु) आमच्या सैन्याचें संरक्षण करो. ॥ १ ॥

[१८५६] (आसां नेता इन्द्रः) आमच्या सर्व सेनांचा नेता इन्द्र आहे. (बृहस्पतिः पुरः एतु) बृहस्पति सर्वांत पुढें जावो. (दक्षिणा यज्ञः सोमः) दक्षतेनें युद्धरूप यज्ञ चालवणारा सोमही पुढें जावो. (मरुतः) मरुतवीर (अभिभंजतीनां) शत्रूंना मारणाऱ्या (जयन्तीनां देवसेनानां) विजयी देवांच्या सेनांच्या (अग्रं यन्तु) पुढें चालोत. ॥ २ ॥

१८५७ इन्द्रस्य वृष्णो वरुणस्य राज्ञ आदित्यानां मरुता२ँ शर्ध उग्रम् ।
महामनसां भुवनच्यवानां घोषो देवानां जयतामुदस्थात् ॥ ३ ॥ ३ ॥ (च) ॥
[धा० २७ । उ १ । स्व० १] (ऋ. १०।१०३।९)

१८५८ उद्धर्षय मघवन्नायुधान्युत्सत्वनां मामकानां मना२ँसि ।
उद्वृत्रहन्वाजिनां वाजिनान्युद्रथानां जयतां यन्तु घोषाः ॥ १ ॥ (ऋ. १०।१०३।१०)

१८५९ अस्माकमिन्द्रः समृतेषु ध्वजेष्वस्माकं या इषवस्ता जयन्तु ।
अस्माकं वीरा उत्तरे भवन्त्वस्मा२ँ उ देवा अवता हवेषु ॥ २ ॥ (ऋ. १०।१०३।११)

१८६० असौ या सेना मरुतः परेषामभ्येति न ओजसा स्पर्धमाना ।
तां गूहत तमसापव्रतेन यथैतेषामन्यो अन्यं न जानात् ॥ ३ ॥ ४ (चु) ॥
[धा ३२ । उ० १ । स्व० ५] (अथर्व. ३।२।६)

१८६१ अमीषां चित्तं प्रतिलोभयन्ती गृहाणाङ्गान्यप्वे परेहि ।
अभि प्रेहि निर्दह हृत्सु शोकैरन्धेनामित्रास्तमसा सचन्ताम् ॥ १ ॥ (ऋ. १०।१०३।१२)

[१८५७] (वृष्णः इन्द्रस्य) बलवान् इन्द्राचें (राज्ञः वरुणस्य) राजा वरुणाचें (आदित्यानां मरुतां) आदित्यांचें व मरुतांचें (उग्रं शर्धः) उग्र बल आमचें सहायक होवो. (महामनसां) उदार मनाच्या (भुवनच्यवानां) शत्रूच्या लोकांना स्थानभ्रष्ट करणाऱ्या (जयतां देवानां घोषः) विजयी देवांचा जयजयकार (उदस्थात्) ऐकूं येत आहे. ॥ ३ ॥

[१८५८] हे (मघवन्) धनवान् इन्द्रा ! आमच्या (आयुधानि उद् हर्षय) शस्त्रधारी वीरांचा उत्साह वाढव (मामकानां सत्वनां मनांसि उत्) आमच्या बलवान् सैनिकांचीं मनें उत्साहित कर. हे (वृत्रहन्) शत्रूला मारणाऱ्या इन्द्रा ! (वाजिनां वाजिनानि उत्) आमच्या घोड्यांचा वेग वाढव. तसेंच (जयतां रथानां घोषाः उत् यन्तु) आमच्या विजयी रथांचे शब्द ऐकूं येवोत. ॥ १ ॥

[१८५९] (अस्माकं समृतेषु ध्वजेषु) आमच्या ध्वजधारी सैनिकांचें रक्षण (इन्द्रः) इन्द्र करो. (अस्माकं याः इषवः ताः जयन्तु) आमचे जे बाण आहेत ते विजयी होवोत. (अस्माकं वीराः उत्तरे भवन्तु) आमचे वीर श्रेष्ठ होवोत. हे (देवाः) देव हो ! (अस्मान् उ हवेषु अवत) आमचें युद्धांमध्यें रक्षण करा. ॥ २ ॥

[१८६०] हे (मरुतः) मरुतवीर हो ! (या असौ) जी ही (ओजसा स्पर्धमाना) आपल्या सामर्थ्यानें आमच्याशीं स्पर्धा करीत (परेषां सेना नः अभ्येति) शत्रूंची सेना आमच्यावर चाल करून येत आहे, (तां अपव्रतेन तमसा गूहत) त्या सेनेला कांहीं न दिसण्याजोग्या अंधकारानें आच्छादून टाका, (यथा एतेषां अन्यः अन्यं न जानात्) कीं ज्याच्यायोगानें यांच्या पैकीं एक दुसऱ्याला ओळखूं शकणार नाहीं. ॥ ३ ॥

[१८६१] हे (अप्वे) पापाच्या देवते ! (परा इहि) माझ्यापासून दूर हो ! (अमीषां चित्तं प्रतिलोभयन्ती) या शत्रूंच्या चित्ताला मोहित कर व (अंगानि गृहाण) त्यांच्या अंगांनां जखडून टांक. (अभि प्र इहि) त्या शत्रूंवर हल्ला कर. (हृत्सु शोकैः निर्दह) त्यांच्या हृदयांना शोकानें जाळून टांक. (अमित्राः अन्धेन तमसा सचन्तां) आमचे शत्रु घोर अन्धकारानें व्याकुल होवोत. ॥ १ ॥

*

१८६२ प्रेता जयता नर इन्द्रो वः शर्म यच्छतु ।
उग्रा वः सन्तु बाहवोऽनाधृष्या यथासथ ॥ २ ॥ (ऋ. १०।१०३।१३)

१८६३ अवसृष्टा परा पत शरव्ये ब्रह्मसꣳशिते ।
गच्छामित्रान्प्र पद्यस्व मामीषां कं च नोच्छिषः ॥ ३ ॥ ५ (ठा) ॥
[धा० १८ । उ० २ । स्व० २] (ऋ. ६।७५।१६)

१८६४ कङ्काः सुपर्णा अनु यन्त्वेनान् गृध्राणामन्नमसावस्तु सेना ।
मैषां मोच्यघहारश्च नेन्द्र वयाꣳस्येनाननुसंयन्तु सर्वान् ॥ १ ॥

१८६५ अमित्रसेनां मघवन्नस्माञ्छत्रुयतीमभि । उभौ तामिन्द्र वृत्रहन्नग्निश्च दहतं प्रति ॥ २ ॥

१८६६ यत्र बाणाः संपतन्ति कुमारा विशिखा इव ।
तत्र नो ब्रह्मणस्पतिरदितिः शर्म यच्छतु विश्वाहा शर्म यच्छतु ॥ ३ ॥ ६ (या) ॥
[धा० २७ । उ० नास्ति । स्व० २] (ऋ. ६।७५।१७)

१८६७ वि रक्षो वि मृधो जहि वि वृत्रस्य हनू रुज ।
वि मन्युमिन्द्र वृत्रहन्नमित्रस्याभिदासतः ॥ १ ॥ (ऋ. १०।१५२।३)

[१८६२] हे (नरः) वीर हो ! (प्र इत, जयत) शत्रूंवर चढाई करा, विजय मिळवा (इन्द्रः वः शर्म यच्छतु) इन्द्र तुम्हांला सुख देवो. (वः बाहवः उग्राः सन्तु) तुमचे बाहू वीरता युक्त होवोत. (यथा अनाधृष्याः आसथ) ज्याचयायोगानें तुम्ही शत्रूंकडून आक्रमण होण्यास अशक्य असे व्हा. ॥ २ ॥

[१८६३] हे (ब्रह्मसंशिते शरव्ये) ज्ञानानें प्रेरित केलेले बाण हो ! (अवसृष्टा परा पत) सोडल्यानंतर तुम्ही दूर जा व (अमित्रान्) शत्रूंवर (प्र पद्यस्व) जाऊन पडा. (अमीषां कंचन मा उच्छिषः) त्यांपैकीं कोणीहि जिवंत न राहतील असें करा. ॥ ३ ॥

[१८६४] (सुपर्णाः कंकाः) उत्तम पंख ज्याचे आहेत असे मांसभक्षक पक्षी [बाण] (एनान् अनु यन्तु) या शत्रूंच्या मागें लागोत. (असौ सेना) ती शत्रूची सेना (गृध्राणां अन्नं अस्तु) गिधाडांचें अन्न होवो. (एषां मा अमोचि) यांपैकीं कोणीहि न वांचो. हे (इन्द्र) इन्द्रा ! (अघहारः च न) जो फार पापी नसेल तो शत्रूही न वांचो. (वयांसि एनान् सर्वान् अनु संयन्तु) मांसभक्षक पक्षी या सर्वांच्या मागें लागोत. ॥ १ ॥

[१८६५] हे (मघवन् वृत्रहन् इन्द्र) धनवान् शत्रूवध करणाऱ्या इन्द्रा ! (अग्निः च) आणि अग्नि ! तुम्ही (उभौ) दोघे (अस्मान् तां अभि शत्रुयतीं) आमच्याशीं शत्रुता करणाऱ्या (अमित्रसेनां प्रति दहतं) शत्रुसेनेला जाळून टांका. ॥ २ ॥

[१८६६] (यत्र) ज्या संग्रामामध्यें (विशिखाः कुमाराः इव) शिखारहित मुलांप्रमाणें (बाणाः सं पतन्ति) बाण पडतात, (तत्र नः) तेथें आम्हांला (ब्रह्मणस्पतिः अदितिः) ब्रह्मणस्पति व अदिति (शर्म यच्छतु) सुख देवोत. (विश्वाहा शर्म यच्छतु) सर्वदा सुख देवोत. ॥ ३ ॥

[१८६७] हे (इन्द्र) इन्द्रा ! (रक्षः विजहि) राक्षसांचा नाश कर, (मृधः विजहि) हिंसक शत्रूंचा नाश कर. (वृत्रस्य हनू रुज) वृत्राचया हनू तोड. हे (वृत्रहन्) शत्रूचा नाश करणाऱ्या इन्द्रा ! (अभिदासतः अमित्रस्य मन्युं) आमची हानि करणाऱ्या शत्रूचा क्रोध नाहींसा कर. ॥ १ ॥

१८६८ वि न इन्द्र मृधो जहि नीचा यच्छ पृतन्यतः ।
यो अस्माꣳ अभिदासत्यधरं गमया तमः ॥ २ ॥ (ऋ. १०।१५२।४)

१८६९ इन्द्रस्य बाहू स्थविरौ युवानावनाधृष्यौ सुप्रतीकावसह्यौ ।
तौ युञ्जीत प्रथमौ योग आगते याभ्यां जितमसुराणाꣳ सहो महत् ॥ ३ ॥ ७ (थि) ॥
[धा० २९ । उ० २ । स्व० ३]

१८७० मर्माणि ते वर्मणा च्छादयामि सोमस्त्वा राजामृतेनानु वस्ताम् ।
उरोर्वरीयो वरुणस्ते कृणोतु जयन्तं त्वानु देवा मदन्तु ॥ १ ॥ (ऋ. ६।७५।१८)

१८७१ अन्धा अमित्रा भवताशीर्षाणोऽहय इव ।
तेषां वो अग्निनुन्नानामिन्द्रो हन्तु वरंवरम् ॥ २ ॥ (अथर्व. ६।६७।२)

१८७२ यो नः स्वोऽरणो यश्च निष्ट्यो जिघाꣳसति ।
देवास्तꣳ सर्वे धूर्वन्तु ब्रह्म वर्म ममान्तरꣳ शर्म वर्म ममान्तरम् ॥ ३ ॥ ८ (वी) ॥
[धा० २५ । उ० नास्ति । स्व० ४] (ऋ. ६।७५।१९)

[१८६८] हे (इन्द्र) इन्द्रा ! (नः मृधः विजहि) आमच्या शत्रूंचा नाश कर. (पृतन्यतः नीचा यच्छ) आमच्यावर सैन्य पाठवणाऱ्या शत्रूंना खालीं पाड. (यः अस्मान् अभिदासति) जो आम्हांला दास करूं इच्छितो त्याला (अधरं तमः गमय) निकृष्ट अन्धकारांत पोंचव. ॥ २ ॥

[१८६९] (याभ्यां असुराणां महत् सहः जितं) ज्यांनीं असुरांचें मोठें बल जिंकलें. (तौ इन्द्रस्य) ते इन्द्राचे (स्थविरौ युवानौ) मोठे व तरुण (अनाधृष्यौ सु प्रतीकौ) ज्यांच्यावर कोणाचें आक्रमण होऊं शकत नाहीं, उत्तम नमुना असावे असे (असह्यौ बाहू) असह्य बाहू (योगे आगते) युद्धाचा योग आला असतां (प्रथमौ युंजीत) प्रथम उपयोगांत आणले जावे. ॥ ३ ॥

[१८७०] हे राजन् ! (ते मर्माणि) तुझी मर्मस्थानें (वर्मणा छादयामि) कवचानें झाकून टाकतों. त्यानंतर (सोमः राजा त्वा) सोम राजा तुला (अमृतेन अनु वस्तां) अमृतानें आच्छादून टाको. (वरुणः ते उरोः वरीयः कृणोतु) वरुण तुला अधिक सुख देवो. (देवाः जयन्तं त्वा अनु मदन्तु) सर्व देव विजय मिळवणाऱ्या तुला आनंदित करोत. ॥ १ ॥

[१८७१] (अमित्राः) शत्रू (अशीर्षाणः अहयः इव) शिर कापलेल्या सर्पाप्रमाणें (अन्धाः भवत) आंधळे होवोत. (तेषां अग्निनुन्नानां वः) त्या शत्रूंना अग्निनें जाळल्यानंतर राहिलेल्या शत्रूंपैकीं (वरं वरं इन्द्रः हन्तु) श्रेष्ठ श्रेष्ठ शत्रूला इन्द्र ठार मारो. ॥ २ ॥

[१८७२] (यः नः अरणः) जो स्वजातीय असूनहि शत्रुता करीत आहे (यः च निष्ट्यः) जो गुप्त राहून (नः जिघांसति) आम्हांला ठार करूं इच्छित आहे. (तं सर्वे देवाः धूर्वन्तु) त्याला सगळे देव नष्ट करोत. (ब्रह्म मम अन्तरं वर्म) ज्ञान हें माझें आन्तरिक कवच आहे, (शर्म वर्म मम अन्तरं अस्तु) कल्याण हें माझें आन्तरिक कवच होवो. ॥ ३ ॥

१८७३ मृगो न भीमः कुचरो गिरिष्ठाः परावत आ जगन्था परस्याः ।
सृकꣳ सꣳशाय पविमिन्द्र तिग्मं वि शत्रूं ताढि वि मृधो नुदस्व ॥ १ ॥ (ऋ. १०।१८०।२)

१८७४ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरंगैस्तुष्टुवाꣳ सस्तनूभिर्व्यशेमहि देवहितं यदायुः ॥ २ ॥ (ऋ. १।८९।८)

१८७५ स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।
स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥
ॐ स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥ ३ ॥ ९ (कू) ॥
[धा० २६ । उ० १ । स्व० ६] (ऋ. १।८९।६)

॥ इति नवमप्रपाठके तृतीयोऽर्धः ॥ ९-३ ॥ नवमप्रपाठकश्च समाप्तः ॥ ९ ॥

॥ इत्येकविंशोऽध्यायः ॥ २१ ॥

॥ इत्युत्तरार्चिकः समाप्तः ॥

॥ इति सामवेदसंहिता समाप्ता ॥

[१८७३] हे (इन्द्र) इन्द्रा ! तूं (कुचरः गिरिष्ठाः मृगः न भीमः) पर्वतावर राहणाऱ्या हिंसक सिंहाप्रमाणें भयंकर आहेस. (परस्याः परावतः आ जगन्थ) दूरांत दूर असलेल्या स्थानांतून तूं येथें ये. (सृकं तिग्मं पविं संशाय) दूर पोंचणाऱ्या तीक्ष्ण वज्राला अधिक तीक्ष्ण करून (शत्रून् विताढि) शत्रूंना नष्ट कर. (वि मृधः नुदस्व) संग्राम करणाऱ्या शत्रूंना दूर कर. ॥ १ ॥

[१८७४] हे (देवाः) देव हो ! (कर्णेभिः भद्रं शृणुयाम) कानांनीं आम्हीं कल्याण करणारीं वाक्यें ऐकूं या. हे (यजत्राः) याजक हो ! (अक्षभिः भद्रं पश्येम) डोळ्यांनीं हित करणाऱ्या पदार्थांनाच आम्हीं पाहूं, (स्थिरैः अंगैः तनूभिः) सुस्थिर अवयव असलेल्या शरीरांनीं (तुष्टुवांसः) तुमची स्तुति करीत (यत् देवहितं आयुः) जी देवांनीं हित केलेली आयु आहे (व्यशेमहि) ती आयु आम्ही प्राप्त करून तोंपर्यंत येथें कार्य करीत राहूं. ॥ २ ॥

[१८७५] (वृद्धश्रवाः इन्द्रः नः स्वस्ति) बहुत प्रशंसित इन्द्र आमचें कल्याण करणारा होवो. (विश्ववेदाः पूषा नः स्वस्ति) सर्वज्ञ पूषा आमचें कल्याण करणारा होवो. (अरिष्टनेमिः तार्क्ष्यः नः स्वस्ति) अहिंसित आयुधें जवळ बाळगणारा सुपर्ण आमचें हित करणारा होवो. (बृहस्पतिः नः स्वस्ति विदधातु) ज्ञानाचा स्वामी आमचें कल्याण करो. ॥ ३ ॥

॥ इति एकविंशोऽध्यायः ॥

एकविंश अध्याय

सुभाषितें

१ आशुः भीमः वृषभः न शिशानः घनाघनः चर्षणीनां क्षोभणः, संक्रन्दनः अनिमिषः एकवीरः इन्द्रः शतं सेनाः साकं अजयत् [१८४९]- त्वरित कार्ये करणारा, भयंकर शूर, बैलाप्रमाणें शत्रूंना मारणारा, शत्रूंचा समूळ नाश करणारा, द्वेष करणाऱ्या दुष्टांमध्यें क्षोभ उत्पन्न करणारा, शत्रूंना रडवणारा व आळस न करणारा, असा अद्वितीय वीर इन्द्र शेंकडों शत्रूंच्या सेनांना जिंकून पराभूत करतो.

२ हे युधः नरः ! संक्रन्दनेन अनिमिषेण जिष्णुना युत्कारेण दुश्च्यवनेन धृष्णुना इषुहस्तेन वृष्णा इन्द्रेण तत् जयत, सहध्वं [१८५०]- हे युद्ध करणाऱ्या नेत्यांनों ! शत्रूंना रडवणाऱ्या, आळस न करणाऱ्या, विजयी, युद्धामध्यें प्रवीण, युद्धामध्यें आपल्या स्थानावर स्थिर राहणाऱ्या, शत्रूंना पराजित करणाऱ्या, बाण हातांत धरणाऱ्या बलवान् इन्द्राच्या सहाय्यानें तें युद्ध जिंका व त्यांत शत्रूंचा पराभव करा.

३ सः इषुहस्तैः वशी, सः निषङ्गिभिः सः इन्द्रः युधः गणेन संस्रष्टा, संसृष्टजित्, बाहुशर्धी उग्रधन्वा प्रहिताभिः अस्ता [१८५१]-तो इन्द्र बाण हातांत धरणाऱ्या योध्यांच्या सहाय्यानें सर्व शत्रूंना आपल्या ताब्यांत ठेवतो, तो खड्ग धारण करणाऱ्या योध्यांच्या सहाय्यानें शत्रूंना वश करतो, तो इन्द्र युद्ध करण्यांत प्रवीण शत्रूच्या समूहाबरोबर एकदम युद्ध करतो, तो युद्ध जिंकणारा, बाहुबलानें सामर्थ्यवान्, धनुष्य चालविण्यांत प्रवीण व सोडलेल्या बाणानीं शत्रूचा वध करणारा आहे.

४ हे बृहस्पते ! रथेन परिदीय, रक्षोहा, अमित्रान् अपबाधमानः, सेनाः प्रभंजन् प्रमृण, युधा जयन्, अस्माकं रथानां अविता एधि [१८५२]- हे पुष्कळांचें पालन करणाऱ्या इन्द्रा ! रथानें इकडे ये. तूं राक्षसांना मारणारा, शत्रूंना बाधा पोंचवणारा, शत्रूंच्या सेनांना छिन्नभिन्न करून तूं त्यांचा नाश कर. युद्धामध्यें जय मिळव व आमच्या रथांचा संरक्षक हो.

५ हे इन्द्र ! बलविज्ञायः स्थविरः प्रवीरः सहस्वान् वाजी सहमानः उग्रः अभिवीरः अभिसत्वा, सहोजाः गोवित्, जैत्रं रथं आतिष्ठ [१८५३]- हे इन्द्रा ! तूं सर्वांचें बल जाणतोस, मोठा, विशेष सामर्थ्यवान् वीर, शत्रूचा पराभव करणारा, बलवान् व साहस दाखवणारा, उग्र महावीर, प्रभावी सामर्थ्यानें युक्त, गाई पाळणारा असा तूं विजयी रथावर बैस.

६ हे सजाताः ! गोत्रभिदं गोविदं वज्रबाहुं अज्मजयन्तं ओजसा प्रमृणन्तं इमं इन्द्रं अनुवीरयध्वं अनुसंरभध्वम् [१८५४]- हे युद्ध करणारे वीर हो ! शत्रूचे किल्ले तोडणाऱ्या, गाई पाळणाऱ्या, वज्रासारखे ज्याचे बाहू आहेत अशा, युद्ध जिंकणाऱ्या, आपल्या बलानें शत्रूचा नाश करणाऱ्या या इन्द्राला पुढें करून वीरता दाखवा, शत्रूंवर क्रोध करून दाखवा.

७ गोत्राणि सहसा अभिगाहमानः अदयः वीरः शतमन्युः दुश्च्यवनः, पृतनाषाट् अयुध्यः इन्द्रः युत्सु अस्माकं सेनाः प्र अवतु [१८५५]- शत्रूच्या किल्ल्यांत आपल्या शक्तिनें प्रवेश करणारा, शत्रूवर दया न करणारा वीर, शेंकडों प्रकारांनीं शत्रूंवर क्रोध करणारा, जो आपल्या स्थानावरून हालवला जात नाहीं असा, शत्रूच्या सेनेचा पराभव करणारा, ज्याच्याशीं कोणीहि युद्ध करूं शकत नाहीं असा इन्द्र आमच्या सैन्याचें संरक्षण करो.

८ मरुतः अभिभंजतीनां जयन्तीनां देव-सेनानां अग्रं यन्तु [१८५६]- मरुत वीर शत्रूंना मारणाऱ्या विजयी देवसेनांच्या पुढें चालोत.

९ उग्रं शर्धः महामनसां भुवनच्यवानां जयतां देवानां घोषः उदस्थात् [१८५७]- उदार मनाच्या शत्रूच्या वीरांना स्थान भ्रष्ट करणाऱ्या विजयी देवांचा उग्र बलामुळें होणारा जयघोष ऐकूं येत आहे.

१० हे मघवन् ! आयुधानि उद्धर्षय [१८५८] - हे इन्द्रा ! आमच्या शस्त्रधारी वीरांचा उत्साह वाढव.

११ मामकानां सत्वनां मनांसि उत् हर्षय [१८५८]- आमच्या बलवान् वीरांचीं मनें हर्षित कर.

१२ वाजिनां वाजिनानि उत् जयतां रथानां घोषाः उत् यन्तु [१८५८]- आमच्या घोड्यांचे वेग वाढव. आमच्या विजयी रथांचे घोष ऐकूं येवोत.

१३ अस्माकं समृतेषु ध्वजेषु इन्द्रः [१८५९]- आमच्या ध्वजधारी सैनिकांचें संरक्षण इन्द्र करो.

१४ अस्माकं इषवः जयन्तु [१८५९]- आमचे बाण विजयी होवोत.

१५ अस्माकं वीराः उत्तरे भवन्तु [१८५९]- आमचे वीर विजयी होवोत.

१६ देवाः ! अस्मान् हवेषु अवत [१८५९]- हे देवांनों! आम्हाला युद्धांमध्यें सुरक्षित ठेवा.

१७ या असौ ओजसा स्पर्धमाना परेषां सेना नः अभ्येति, तां अपव्रतेन तमसा गूहत, यथा एतेषां अन्यः अन्यं न जानात् [१८६०]- जी ही आपल्या सामर्थ्यानें आमच्याशीं स्पर्धा करीत शत्रूची सेना आमच्यावर चाल करून येत आहे. त्या शत्रूच्या सेनेला अन्धकारानें व्यापून टाका, ज्याच्यायोगानें ते शत्रू कांहीं करूं शकणार नाहींत व त्यांच्यापैकीं एक दुसऱ्याला ओळखूंही शकणार नाहींत असें करा.

" अपव्रत तमसास्त्र " नांवाचा युद्धामध्यें अस्त्रप्रयोग आहे, त्यानें शत्रूचे वीर गोंधळून जातात व परस्परांना ओळखूंहि शकत नाहींत.

१८ अप्वे ! परा इहि, अमीषां चित्तं प्रतिलोभयन्ती अंगानि गृहाण [१८६१]-हे पापमयी योजने ! आमच्यापासून दूर हो. या शत्रूंच्या चित्तांना मोहित कर व त्यांचीं शरीरांगें जखडून टाक.

१९ अभि प्रेहि, हृत्सु शोकैः निर्दह [१८६१]- शत्रूंवर हल्ला कर, त्यांचीं हृदयें शोकांनीं जाळून टाक.

२० अमित्राः अन्धेन तमसा सचन्ताम् [१८६१] - आमचे शत्रू घोर अन्धकारानें व्याकुल होवोत.

२१ नरः प्र इत, जयत, इन्द्रः वः शर्म यच्छतु [१८६२]-हे वीरांनों ! शत्रूवर चाल करा, विजय मिळवा. इन्द्र तुमचें कल्याण करो.

२२ वः बाहवः उग्राः सन्तु, यथा अनाधृष्याः आसथ [१८६२]- तुमचे बाहु वीरभाव दाखवणारे होवोत, ज्याच्यायोगानें तुमच्यावर शत्रूचें आक्रमण होऊं शकणार नाहीं.

२३ हे ब्रह्मसंशिते शरव्ये। अवसृष्टा परा पत, अमित्रान् प्र पद्यस्व, अमीषां कंचन मा उच्छिषः [१८६३]- हे ज्ञानपूर्वक सोडलेल्या बाणा ! दूर जाऊन शत्रूंवर पड, त्यांच्यापैकीं कोणीहि जिवंत राहूं नये असें कर.

२४ सुपर्णाः कंकाः एनान् अनु यन्तु [१८६४]- उत्तम पंख असलेले मांसभक्षक पक्षी या शत्रूंच्या मागें लागोत.

२५ असौ सेना गृध्राणां अन्नं अस्तु [१८६४]- ही शत्रूची सेना गिधाडांचें अन्न होवो.

२६ एषां मा अमोचि, अघहारः च न, वयांसि एनान् सर्वान् अनु संयन्तु [१८६४]- या शत्रूंपैकीं कोणीहि न वांचो. फार पापी असलेला शत्रूही न वांचो. मांसभक्षक पक्षी या शत्रूंच्या मागें लागोत.

२७ अस्मान् तां अभि शत्रुयतीं अमित्रसेनां प्रतिदहतं [१८६५]- आमच्यावर चालून येणाऱ्या त्या शत्रूसेनेला जाळून टाका.

२८ यत्र बाणाः सम्पतन्ति, तत्र नः शर्म यच्छतु [१८६५]- जेथें बाण शत्रूकडून येऊन पडतात त्या युद्धांत आम्हांला सुख मिळो.

२९ हे इन्द्र ! रक्षः मृधः विजहि, अभिदासतः अमित्रस्य मन्युं [१८६७]- हे इन्द्रा ! राक्षसांचा व हिंसकांचा पराभव कर, आमची हानि करणाऱ्या शत्रूंचा क्रोध नाहींसा कर.

३० हे इन्द्र ! नः मृधः विजहि, पृतन्यतः नीचा यच्छ, यः अस्मान् अभिदासति, अधरं तमः गमय [१८६८]- हे इन्द्रा ! आमच्या हिंसक शत्रूंना पराभूत कर, सैन्य आमच्यावर पाठवणारांना खालीं पाड. जो आम्हांला दास करूं इच्छितो त्याला निकृष्ट अन्धारांत पोंचव.

३१ याभ्यां असुराणां महत् सहः जितं, तौ इन्द्रस्य स्थविरौ युवानौ अनाधृष्यौ सुप्रतीकौ असह्यौ बाहू योगे आसते प्रथमौ युंजीत [१८६९]- ज्यांनीं असुरांचें मोठें बल जिंकलें, ते इन्द्राचे मोठे तरुण, ज्यांच्यावर कोणाचें आक्रमण होऊं शकत नाहीं, उत्तम नमुन्यासारखे, शत्रूला असह्य वाटणारे दोनही बाहू युद्धाचा योग आला असतां प्रथम उपयोगांत आणले जावे.

३२ हे राजन् ! ते मर्माणि वर्मणा छादयामि [१८७०]- हे राजन् ! तुझीं मर्मस्थानें कवचानें मी झांकून ठेवतों.

३३ देवाः जयन्तं त्वा अनुमदन्तु [१८७०]-देव तुझा जय होत असतांना तुला आनंदित करोत.

३४ अमित्राः अशीर्षाणः अहयः इव अन्धाः भवत [१८७१]- शत्रू शिर कापलेल्या सर्पाप्रमाणें आंधळे होवोत.

३५ तेषां वरं वरं इन्द्रः हन्तु [१८७१]-त्या शत्रूंच्या मुख्य वीरांना इन्द्र मारून टाको.

३६ यः स्वः अरणः यः च निष्ट्यः नः जिघांसति तं सर्वे देवाः धूर्वन्तु [१८७२]-जो स्वकीय असूनही द्वेष

करतो व जो गुप्त राहून आम्हांला ठार मारूं इच्छित आहे, त्याला सर्व देव नष्ट करोत.

३७ ब्रह्म मम अन्तरं वर्म [१८७२]- ज्ञान हें माझें आंतील मुख्य कवच आहे.

३८ हे इन्द्र ! कुचरः गिरिष्ठाः मृगः न भीमः [१८७३]- हे इन्द्रा ! पर्वतावर राहणाऱ्या सिंहाप्रमाणें तूं शत्रूंना भयंकर आहेस.

३९ परस्याः परावतः आजगन्थ [१८७३]- दूरांत दूर असलेल्या स्थानापासून तूं आमच्याजवळ ये.

४० सृकं तिग्मं पविं संशाय शत्रून् विताढि, मृधः वि नुदस्व [१८७३]- दूर पोंचवणाऱ्या तीक्ष्ण शस्त्राला अधिक तीक्ष्ण करून शत्रूंवर हाण व दुष्टांना दूर कर.

४१ हे देवाः ! कर्णेभिः भद्रं शृणुयाम [१८७४]- हे देवांनों ! कानांनीं आम्हीं कल्याण करणारीं वाक्यें ऐकूं या.

४२ अक्षभिः भद्रं पश्येम [१८७४]- डोळ्यांनीं कल्याणकारक दृश्य पाहूं.

४३ स्थिरैः अंगैः तनूभिः तुष्टुवांसः यत् देवहितं आयुः व्यशेमहि [१८७४]- सुस्थिर अवयवांनीं युक्त शरीरांनीं ईश्वराची स्तुति करीत जें देवांनीं दिलेलें आयुष्य असेल तें आम्ही प्राप्त करूं.

४४ इन्द्रः पूषा बृहस्पतिः नः स्वस्ति दधातु [१८७५]- इन्द्र, पूषा, बृहस्पति आदि देव आमचें कल्याण करोत.

उपमा

१ वृषभः शिशानः न [१८४९]- बैलाप्रमाणें शत्रूला टक्कर मारणारा.

२ विशिखाः कुमाराः इव [१८६६]- शिखा नसलेल्या कुमारांप्रमाणें तीक्ष्ण (बाणाः) बाण असतात

३ अशीर्षाणः अहयः इव [१८७१]- मस्तक कापून टाकलेल्या सर्पांप्रमाणें (अमित्राः अन्धाः भवत) शत्रु आंधळे होवोत.

४ कुचरः गिरिष्ठाः मृगः न [१८७३]- पर्वतावर राहणाऱ्या सिंहाप्रमाणें (इन्द्रः भीमः) इन्द्र भयंकर आहे.

एकविंशाध्यायान्तर्गत ऋषि-देवता-छन्द सूची

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१८४९	१०।१०३।१	अप्रतिरथ ऐन्द्रः	इन्द्रः	त्रिष्टुप्
१८५०	१०।१०३।२	अप्रतिरथ ऐन्द्रः	"	"
१८५१	१०।१०३।३	अप्रतिरथ ऐन्द्रः	"	"
१८५२	१०।१०३।४	अप्रतिरथ ऐन्द्रः	बृहस्पतिः	"
१८५३	१०।१०३।५	अप्रतिरथ ऐन्द्रः	इन्द्रः	"
१८५४	१०।१०३।६	अप्रतिरथ ऐन्द्रः	"	"
१८५५	१०।१०३।७	अप्रतिरथ ऐन्द्रः	"	"
१८५६	१०।१०३।८	अप्रतिरथ ऐन्द्रः	"	"
१८५७	१०।१०३।९	अप्रतिरथ ऐन्द्रः	"	"
१८५८	१०।१०३।१०	अप्रतिरथ ऐन्द्रः	"	"
१८५९	१०।१०३।११	अप्रतिरथ ऐन्द्रः	"	"
१८६०	अथर्व. ३।२।६	अथर्वा	मरुतः	"
१८६१	१०।१०३।१२	अप्रतिरथ ऐन्द्रः	अप्वा	"

मंत्रसंख्या	ऋग्वेदस्थानं	ऋषिः	देवता	छन्दः
१८६२	१०।१०३।१३	अप्रतिरथ ऐन्द्रः	इन्द्रो मरुतो वा	अनुष्टुप्
१८६३	६।६५।१७	पायुर्भारद्वाजः	इषवः	,,
१८६४	—	—	इन्द्रः	त्रिष्टुप्
१८६५	—	—	,,	अनुष्टुप्
१८६६	६।७५।१७	पायुर्भारद्वाजः	संग्रामाशिषः	पंक्तिः
१८६७	१०।१५२।३	शासो भारद्वाजः	इन्द्रः	अनुष्टुप्
१८६८	१०।१५२।४	शासो भारद्वाजः	,,	,,
१८६९	—	—	,,	विराड् जगती
१८७०	६।७५।१८	पायुर्भारद्वाजः	वर्मसोमवरुणाः	त्रिष्टुप्
१८७१	अथर्व. ६।६७।२	अथर्वा	इन्द्रः	अनुष्टुप्
१८७२	६।७५।१९	पायुर्भारद्वाजः	वर्म सोमवरुणाः	,,
१८७३	१०।१८०।१	जय ऐन्द्रः	इन्द्रः	त्रिष्टुप्
१८७४	१।८९।८	गोतमो राहूगणः	विश्वदेवाः	,,
१८७५	१।८९।६	गोतमो राहूगणः	,,	विराट्स्थाना